
श्रीज्ञानेश्वरी मुक्तचिंतन
लेखिका: सौ. शैलजादेवी वहिनीसाहेब प्रतिनिधि
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

## अनुक्रमणिका

# श्रीज्ञानेश्वरी मुक्तचिंतन

अनुक्रमणिका



**कै. तीर्थरूप श्रीमंत व्यंकटराव रावसाहेब घोरपडे**
युवराज इचलकरंजी



**कै. तीर्थरूप श्रीमंत अनुबाई वहिनीसाहेब घोरपडे**
युवराज्ञी इचलकरंजी

**या उभयतांचे चरणीं मस्तक ठेवून**

❄

अनुक्रमणिका

# श्रीज्ञानेश्वरी मुक्तचिंतन

**अनुवाद– स्पष्टीकरण**

**सौ. शैलजादेवी वहिनीसाहेब प्रतिनिधि**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

## अनुक्रमणिका

**प्रथमावृत्ती :**

जानेवारी १९८९
पुनर्मुद्रण २०१२

**प्रकाशक :**

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई-४०० ०२५.

**© प्रकाशकाधीन**

**मुद्रक :**

व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६ ००३.

**किंमत रु. ६६८-००**

## अनुक्रमणिका

उप-राष्ट्रपती, भारत
नई दिल्ली
अगस्त २९, १९८८

# प्राक्कथन

श्रीज्ञानेश्वरांनी लिहिलेल्या श्रीमद्भगवद्‌गीतेवरील टीकाग्रंथाचे दुसरे नाव, “भावार्थदीपिका” असे आहे. अहमदनगर जिल्ह्यातील नेवासे ह्या गावी इ. सन १२९० साली (**शके बाराशतें बारोत्तरें । तें टीका केली ज्ञानेश्वरें**) जवळजवळ ७०० वर्षांपूर्वी अनेक श्रोत्यांच्या उपस्थितीत केलेल्या प्रवचनांनी ह्या ग्रंथाची रचना झालेली आहे.

“श्रीमद्भगवद्‌गीता ” हा ग्रंथ संपूर्ण मानववंशाच्या चिरंतन तत्त्वज्ञानावरील अद्वितीय भाष्य आहे असे पाश्चात्य विद्वानांचे देखील मत असल्याचे आल्डस हक्सले ह्यांनी लिहिले आहे ते अत्यंत उचित आहे.

सर्वच श्रेष्ठ वाङ्‌मय तत्कालीन सामाजिक जीवनाचे दर्शन घडवते, तसेच आदर्श सामाजिक जीवनाचा मार्ग दाखविण्याचेही त्याचे उद्दिष्ट असते; आणि सामाजिक नीतितत्त्वांच्या विवेचनविषयक वाङ्‌मयाचे संदर्भात तर हे प्रकर्षाने आढळून येते. ह्या दृष्टिने ज्ञानेश्वरीकर्त्यांच्या जीवनकालातल्या सामाजिक परिस्थितीचा विचार करणे सयुक्तिक ठरेल. त्या काळी, रामदेवराय यादव ह्यांची राजवट होती. त्यांची राजधानी महाराष्ट्रातल्या सध्याच्या औरंगाबाद जिल्ह्यात, देवगिरी येथे होती. ज्ञानेश्वरमहाराजांनी, आपल्या ग्रंथाच्या अखेरीस, “न्यायाने पोशी क्षितीशु रामचंद्रु” अशा शब्दात त्याचा उल्लेख केला आहे. नंतरच्या इतिहासावरून स्पष्ट होते की, त्यानंतर थोड्याच कालावधीत महाराष्ट्रावर परकीय आक्रमण झाले. परंतु त्या आधीच्या काळात राज्यकारभार कायदेशीर व व्यवस्थित चालू होता ह्याची प्रमाणे मिळतात. यादवांच्या राज्यव्यवस्थेविषयीचे आपले मत श्रीज्ञानेश्वरांनी, कदाचित् त्यावेळी यादवांच्या पदरी अनेक विद्वान होते, हे जाणून व्यक्त केले असल्याची शक्यता आहे. विज्ञानेश्वर (इ. स. १०७० - ११००) ज्यांची “याज्ञवल्क्य स्मृति” वरील “मिताक्षरी” नामक टीका प्रख्यात आहे, श्रीधर-ज्यांनी “स्मृत्यर्थसार” आणि “भागवतम्वरील टीका” हे ग्रंथ लिहिले, “चतुर्वर्ग चिंतामणि” कर्ते हेमाद्रि, संस्कृत साहित्य शास्त्राचे विवरण, “चंद्रलोक”, ह्या ग्रंथात करणारे जयदेव, सूक्तिमुक्तावलिचे संपादक व कृष्णदेव यादव ह्यांचे मंत्री, जल्हण आणि संस्कृत व्याकरण व आयुर्वेदविषयक ग्रंथ लिहिणारे बोपदेव इत्यादि विद्वद्रत्नांचा त्यात समावेश होता. इतर विषयांवरसुद्धा शारंगधर लिखित, “संगीत रत्नाकर” सारखे शास्त्रोक्त प्रबंध लिहिले जात होते. ह्यावरून स्पष्ट होते की, धार्मिक, कर्मकाण्ड आणि कलाविषयक वाङ्‌मयाबरोबरच केवळ वाङ्‌मयीन साहित्य निर्माण करण्याकडे लक्ष दिले जात होते. यादवराजे विद्वत्तेचे आश्रयदाते होते आणि कर्मकाण्ड व धार्मिक आचार ह्याचे समर्थक होते असे निर्विवादपणे म्हणता येते.

अनुक्रमणिका

परंतु, शासनव्यवस्था-त्यातूनही एखाद्या राजवंशाची शासनव्यवस्था, सर्वच सामाजिक प्रश्नांचेवर-विशेषतः निकृष्ट परिस्थितीत जगणाऱ्या असहाय्य बहुजनसमाजाचे बाबतीत, ज्यांना आपल्या परिस्थितीत सुधारणा व्हावी अशी मागणी करण्याची संधी तर दूरच पण नुसती आपली गाऱ्हाणी मांडण्याचाही मार्ग नसतो-अशा लोकांवर इतर समाजाकडून होणाऱ्या विविध अन्यायांवर नियंत्रण ठेवण्यात नेहमीच यशस्वी होत नसे असे पुराविद सांगतात.

ही पार्श्वभूमी डोळ्यासमोर ठेवून श्रीज्ञानेश्वरांना त्यांच्या जीवनाच्या पहिल्या काही वर्षांत सोसाव्या लागलेल्या कठोर आपत्तींचा विचार करणे संयुक्तिक होईल श्रीज्ञानदेवांना काही वर्षे, त्यांचे मातापिता, दोन बंधू व एक भगिनी ह्यांच्यासह आणि समाजाच्या सक्तीमुळे मातापित्यांनी घेतलेल्या मृत्यूदंडरूपी जलसमाधीनंतर, चौघेही पोरके झाले असताना, बहिष्कृताचे कष्टमय जीवन जगावे लागले. कारण श्रीज्ञानेश्वरांच्या वडिलांनी-विठ्ठलपंतांनी, संन्यासाश्रमाचा त्याग करून पुन्हा गृहस्थाश्रमाचा स्वीकार केल्यानंतर झालेली त्यांची अपत्ये अशुद्ध आहेत असा धर्मपंडितांनी निर्णय घेतला होता. वस्तुतः केवळ आपल्या गुरूंची आज्ञा मानणे अपरिहार्य झाल्यामुळेच विठ्ठलपंतांना हे करावे लागले होते. तरीही विठ्ठलपंतांनी आपल्या मुलांना आपल्या कृत्यामुळे दुःख सोसावे लागू नये ह्यासाठी प्रायश्चित सांगावे अशी धर्मपंडितांना प्रार्थना केली असता त्यांनी “स्वतः जलसमाधी घ्यावी आणि मुलांचे शुद्धिकरणाचे बाबतीत पैठणच्या धर्मपंडितांची आज्ञा घ्यावी”, असा निर्णय दिला. त्याप्रमाणे विठ्ठलपंत व रखमाबाई यांनी जलसमाधी घेतली. पण पैठणच्या धर्मपंडितांनी दिलेल्या आज्ञापत्राप्रमाणे आळंदीच्या समाजात मात्र ह्या चौघा निष्पाप मुलांना न्याय दिला गेला नाही. अशा परिस्थितीत ह्या अल्पवयीन, निराधार चार मुलांना स्वतःच्या कुवतीप्रमाणे अतुल प्रयत्न करून आपआपली जीवनरेखा निश्चित करणे अपरिहार्य झाले. ज्येष्ठ बंधू निवृत्तिनाथ यांनी नाथसंप्रदाय स्वीकारला. सामाजिक समतेच्या तत्त्वावर आधारलेला हा पंथ त्याआधीच्या काही कालापासून प्रसृत झाला होता आणि ह्या मुलांचे पणजोबांनी-त्रिंबकपंतांनी, गोरक्षनाथांचेकडून व आजोबा-गोविंदपंत. ह्यांनी व आजी-नीराबाईंनी गहिनीनाथांचेकडून, नाथसंप्रदायाची दीक्षा घेतली होती. निवृत्तिनाथांच्यानंतर काही वर्षांनी श्रीज्ञानेश्वरांनी, ह्या संप्रदायाची दीक्षा ज्येष्ठ बंधू निवृत्तिनाथांचेकडून घेतली. आपल्या ग्रंथात श्रीज्ञानेश्वरांनी निवृत्तिनाथांचा उल्लेख पुष्कळ ठिकाणी “गुरु” ह्या शब्दाने केला आहे. ह्या संप्रदायात प्रवेश केला तरी श्रीज्ञानदेवांनी स्वतःच्या कर्तव्यांचे बाबतीत अधिक व्यापक दृष्टि ठेवली. निवृत्तिनाथांच्या आज्ञेवरूनच श्रीज्ञानेश्वरांनी पुढे, “अमृतानुभव”, ह्या आपल्या स्वतंत्र ग्रंथाची रचना केली.

विठ्ठलपंत व त्यांचे कुटुंबीय ही सर्व मंडळी विचारवंत होती, परंतु तत्कालीन समाज अज्ञानात बुडालेला होता. एका संशोधकाने लिहिले आहे, “बहुजनसमाज हा तर बोलून चालून मूढ व अज्ञानी होता. पशुतुल्य जीवन कंठण्यापलीकडे त्याला दुसरी गति नव्हती. त्याच्या ठिकाणी जी थोडीबहुत धर्मश्रद्धा होती, तिला उच्च विचारांची बैठक कधी लाभलीच नाही. म्हणून अज्ञानाने, भीतीने किंवा स्वार्थबुद्धिने मंगळाई, जोखाई, म्हसोबा, बहिरोबा इत्यादि देवतांची भक्ति करण्यापलीकडे तिची मजल गेली नाही.” भारतीय समाज नेहमीच एखाद्या पिरॅमिडसारखा राहिला आहे. त्याच्या बहुतांश भागावर अंधःकाराचे साम्राज्य-परंतु अगदी शिखराजवळच्या संकुचित भागावर मात्र कमी-जास्त प्रमाणात दिव्य प्रकाश! वस्तुतः तत्कालीन सुशिक्षित पंडितसमूहावर हा प्रकाश आपल्या सर्व समाजबांधवांचेपर्यंत पोचवण्याची नैतिक व सामाजिक जबाबदारी असते परंतु, श्रीज्ञानेश्वरांच्या कालातल्या विद्वान श्रेष्ठ मंडळींना त्याची जाणीव तरी नव्हती किंवा त्यांनी ती बुद्ध्याच टाळली

होती. ज्ञानेश्वरमाऊलींनी आपल्या लेखनात ह्या स्वार्थसाधू, कर्मकाण्डाचे अवास्तव स्तोम माजवणाऱ्या आणि दिशाभूल झालेल्या कंटकांवर अत्यंत तीक्ष्ण वाग्बाणांनी प्रहार करताना लिहिले आहे की, कर्मकाण्डाचे महत्त्व वाढवण्यात अशा लोकांचे एकमेव उद्दिष्ट स्वतःसाठी अधिकाधिक ऐहिक सुख मिळवत राहणे एवढेच असते.

**“जैसी रांधणी रससोय निकी । करूनिया मोलें विकी ।**
**तैसा भोगासाठी अविवेकी । धाडिती धर्मु ॥** (अ. २-२५४)

**म्हणौनि हे पार्था । दुर्बुद्धि देख सर्वथा ।**
**तयां वेदवादरतां । मनी वसे ॥”** (अ. २-२५५)

**“तो जे जे बोले । ते अज्ञानचि फुललें ।**
**तयाचें पुण्य जें फळलें । तें अज्ञान गा ॥”** (अ. १३-८४२)

आता दोन पैलूंवर विचार करणे आवश्यक आहे—

(१) श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या अध्ययनाच्या व संशोधनाच्या क्षेत्राचा परिघ किती विशाल असावा;
(२) टीकाग्रंथ लिहिण्यासाठी त्यांनी भगवद्गीतेचीच निवड का केली असावी?

श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या अध्ययन व संशोधनकार्याच्या क्षेत्राचा विचार केल्यास असे आढळून येते की, गीतेतील तत्त्वज्ञानावर त्यांच्या पूर्ववर्ती महान् आचार्यांनी केलेल्या प्रदीर्घ विवेचनाचे समुचित, सूक्ष्म अध्ययन त्यांनी केले होते हे सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ आहे. त्यांनी स्वतःच भाष्यकारांचेकडून आपण मार्गदर्शन घेतल्याचे निवेदन केले आहे. प्रमुख उपनिषदांचा जसा त्यांनी सखोल अभ्यास केला होता, तसेच बादरायणांचे ब्रह्मसूत्र (ख्रिस्तपूर्व) आणि व्यासांचे महाभारत ह्यांचेवर चिंतन केले होते, रामानुज (१००७-११३७), निंबार्क (सुमारे ११६२), मध्वाचार्य (११९७-१२७५) ह्यांच्या ग्रंथांमधील विशिष्टाद्वैत, द्वैताद्वैत आणि शुद्धाद्वैत ह्या दर्शनांच्या व तत्त्वज्ञानाच्या मूलभूत सिद्धांताचे अध्ययन केले होते. श्रीयोगवासिष्ठ, गौडपादकारिका, काश्मिरातला शैवसंप्रदाय व दक्षिणेतला नाथसंप्रदाय ह्यांवर सांगोपांग विचार केला होता.

ह्या प्रदीर्घ, सूक्ष्म व तौलनिक अध्ययनावर स्वतंत्रबुद्धिने चिंतन करून श्रीज्ञानेश्वरांनी आपली स्वतःची भूमिका निश्चित केली होती. उदाहरणार्थ, तुलनात्मक दृष्टिने पाहिल्यास २१८ संदर्भांपैकी ६८ जागी आद्यशंकराचार्यांचे मत श्रीज्ञानेश्वरांनी मान्य केले नाही व ६८ जागी आपले स्वतंत्र मत प्रस्थापित केले आहे. ज्ञानेश्वरी लिहिण्यास प्रारंभ करण्याआधीच आपले स्वतःचे सिद्धांत श्रीज्ञानदेवांनी ठरविले होते. आणि ते विस्तृत, सूक्ष्म व समुचित अध्ययनानंतर काढलेले सिद्धांत पद्धतशीरपणे सर्वांना समजावून देण्याचा निर्णय त्यांनी घेतला व त्यासाठी सर्व तत्त्वज्ञानाचे सार असलेली श्रीमद्भगवद्गीता निवडली. कारणे दोन आहेत—(१) भगवद्गीता हे अखिल जगातल्या चिरंतन तत्त्वज्ञानाचे सारभूत अद्वितीय शास्त्र आहे; (२) श्रीज्ञानेश्वरांच्या कौटुंबिक जीवनावर तत्कालीन अज्ञानी समाजाने, अन्यायाने कठोर आघात केले होते, तसे तीव्र दुःख कुणालाही सोसणे भाग पडू नये ह्यासाठी सामाजिक-समतेची यथातथ्य जाणीव, अजाण व पढतमूर्ख समाजाला

करून देण्यासाठी श्रीमद्भगवद्गीतेतले  तत्त्वज्ञान सहज समजेल अशाप्रकारे लोकांना सांगण्याचे त्यांनी ठरविले. समतादृष्टि हा ह्या तत्त्वज्ञानाचा गाभा आहे. श्रीज्ञानदेव नवव्या अध्यायात लिहितात—

**"परी राया रंका पाड धरूं । नेणती सानेयां थोरां कडसणी करूं ।**
**एकसरें आनंदाचें आवारूं । होत जगा ॥** (अ. ९-२०२)
**म्हणौनि कुळ जाति वर्ण । हें आघवेंचि गा अकारण ।**
**एथ अर्जुना माझेपण । सार्थक एक ॥"** (अ. ९-४५६)

श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी सामाजिक-समतेचे महत्त्व विशद केले, इतकेच नव्हे, तर प्रत्येक व्यक्तीला त्या समतेच्या पातळीवरून स्वतःच्या अक्षय कल्याणासाठी प्रयत्न करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य आहे हा संदेश भोवतालच्या सगळ्या लोकांचेपर्यंत पोचविण्याच्या महान् कार्याला प्रारंभ केला. त्याकरिता त्यांनी महाराष्ट्रात व इतर प्रांतात प्रवास केला आणि ठिकठिकाणी प्रवचने व कीर्तने करून लोकसंग्रह केला. अशा तऱ्हेच्या प्रवासात, नेवासे येथे मुक्काम असताना त्यांनी श्रीज्ञानेश्वरी ह्या महान् ग्रंथाची रचना केली. भारतातील उदात्त व्यक्तींचे वैशिष्ट्य आहे की, स्वतःला जे काही अमौलिक ज्ञानधन प्राप्त झाले ते केवळ आपल्यापुरतेच न ठेवता ते सर्वांना उपलब्ध करून देणे हे आपले कर्तव्य आहे असे त्यांनी मानले; आणि कित्येक वर्षानंतर अशा थोर व्यक्तींचीच गणना संतमालिकेत होते. सर्वसामान्य जनतेला आकलन होईल असे भाषेचे माध्यम आवश्यक असल्याने श्रीज्ञानेश्वरमाऊलींनी संस्कृत भाषेऐवजी मराठी भाषा स्वीकारली. अभंग, ओव्या, नित्यपाठ आदि काव्ये साध्या व कुणालाही सहज समजेल अशा सोप्या शब्दात रचून तत्त्वज्ञानाची शिकवण सर्वसाधारण समाजाच्या आटोक्यात आणून दिली. त्याच हेतूने, स्वतःचे तत्त्वज्ञानविषयक सर्व दृष्टिकोन एकत्रित स्वरूपाने स्वयंपूर्ण अशा, "अमृतानुभव", ह्या ग्रंथात लिहिले. लोकसंग्रहाचे महत्त्व जाणून त्यांनी, महानुभावपंथीयांनी सामाजिक सुधारणेसाठी केलेल्या यशस्वी प्रयत्नांचे अनुकरण केले व पंढरपूरच्या वारकरी मेळाव्यात भाग घेण्यास प्रारंभ केला. लोकसंग्रह करणे हे श्रीज्ञानेश्वरांनी आपल्या जीवनाचे एक प्रमुख उद्दिष्ट मानले होते. सामाजिक दृष्टिकोनात समता-तत्त्वाचा अनादर होऊ लागला म्हणजे त्या समाजावर परकीय, राजकीय किंवा सांस्कृतिक आक्रमण सोपे होण्याची शक्यता वाढते, ह्याचा साक्षीदार, इतिहास आहे. समता-तत्त्वाचा प्रचार ही आपल्या देशाच्या स्वतंत्रतेची ढाल आहे आणि ह्यासंबंधी ज्या श्रेष्ठ संतमालिकेने वेळोवेळी महत्कार्य केले त्यात श्रीज्ञानदेव मेरूमणि आहेत. त्यांच्या शिकवणीमुळे जनतेच्या वृत्तिवर इष्ट परिणाम होऊ लागल्याचे प्रत्यंतर नंतरच्या इतिहास खंडात आढळून येते.

मूळ गीतेची रचना आटोपशीर आणि पद्धतशीर आहे; तरीही त्या ग्रंथाच्या सूक्ष्म अभ्यासकांना त्यातली गूढ तत्त्वे समजून घेण्यात बऱ्याच अडचणी येऊ लागल्या होत्या; आणि त्यामुळे निरनिराळ्या विचारसरणीच्या आचार्यांनी आपआपल्या समजुतीप्रमाणे अभिप्राय प्रस्तुत केले होते. श्रीज्ञानेश्वरांचे स्वतःचे विश्लेषण, काही श्रेष्ठ पूर्ववर्तीयांच्या स्पष्टिकरणापेक्षा निराळे होते. त्यांनी चिद्विलासवादी पूर्णद्वैतावर केलेल्या विवेचनाचा अभ्यास केला म्हणजे श्रीमद्भगवद्गीतेतील —

**"सर्वभूतेषु येनैकं भावमव्ययमीक्षते ।**
**अविभक्तं विभक्तेषु तज्ज्ञानं विद्धि सात्त्विकम् ॥"** (अ. १८-श्लो. २०)

अनुक्रमणिका

ह्या सात्त्विक ज्ञानाची कल्पना येते.

सुमारे २०० वर्षांपासून पाश्चात्य विद्वान भगवद्‌गीतेचा अभ्यास करीत आहेत. मानवाच्या इहलोकावरील जीवनकालातले प्रश्न व त्यानंतरचे विधिलिखित ह्याविषयी कुतूहल, विचारवंत व्यक्तींना नेहमीच सर्वत्र वाटत राहिले आहे. त्याविषयी श्रीकृष्णानी अत्यंत प्रासादिक शैलीत दिलेल्या उत्तरांनी साहजिकच आकर्षित केले; परंतु तिथल्या काही अत्यंत चिकित्सक वृत्तिच्या अभ्यासकांना भारतीय तत्त्वज्ञानावरील विविध दृष्टिकोनांचे आकलन करणे तितकेच गुंतागुंतीचे वाटू लागले; जितके पूर्ववर्ती भारतीय तत्त्ववेत्त्यांचे वादंग समजून घेणे वाटत होते. अशा परिस्थितीत, ह्या देशातल्या अभ्यासकांनाही, ज्ञानेश्वरीत विशद केलेली स्पष्टीकरणे समजून घेण्यात प्रश्न पडू लागले तर काही आश्चर्य नाही. कारण ज्ञानेश्वरींतली तात्त्विक चर्चा काही ठिकाणी अवघड आहे व सुमारे ३० पिढ्यांपूर्वी किंवा ७०० वर्षांपूर्वी, श्रीज्ञानेश्वरकालीन मराठी भाषा, अर्वाचीन कालातील अभ्यासकांना सहज समजण्यासारखी नाही. त्याचबरोबर, वाढत्या सामाजिक क्रांतीमुळे भारताच्या अध्यात्मिक व सांस्कृतिक परंपरेविषयी, विशेषतः भारतीय समाजाला सगळ्या स्तरांवर समता देणाऱ्या परंपरेविषयी, देशवासियांना अधिक प्रमाणात जिज्ञासा वाटणे अपरिहार्य आहे. ह्या दृष्टिने ज्ञानेश्वरीचे विशेष महत्त्व आहे.

ह्याच कारणासाठी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने हा ग्रंथ प्रकाशित करण्याचा निर्णय घेतला ह्याचे मी मनःपूर्वक स्वागत करतो.

विदुषी ग्रंथकर्तीने ह्या ग्रंथात श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी श्रीमद्भगवद्‌गीतेतील तत्त्वप्रणालीवर केलेले विवेचन मार्मिक आणि सरल शैलीत प्रस्तुत केले आहे. ज्यांना भारतीय तत्त्वज्ञानाच्या मूलभूत गूढ सिद्धान्ताचा अभ्यास करण्याची संधी मिळालेली नसेल त्यांनादेखील हा विषय समजावा ह्या हेतूने हिंदू, जैन, बौद्ध, इस्लामी आणि ख्रिस्तीधर्मीय संतमहात्म्यांच्या चरित्रातील माहिती देऊन, तसेच सामान्य वाचकालादेखील त्याच्या जीवनक्रमांत येणाऱ्या निरनिराळ्या अनुभवांचे दाखले देऊन, ओघवती व रसाळ भाषेत विश्लेषण केले आहे आणि प्राचीन भारतीय दार्शनिक सिद्धान्ताची प्रसंगवशात् थोडक्यात माहिती दिली आहे. विषय गंभीर व काही प्रमाणात रूक्ष असूनही हे विश्लेषण उद्बोधक झाले आहे. त्यांचा हा उपक्रम निःसंशय, स्तुत्य व प्रशंसनीय आहे. मला विश्वास वाटतो की, अध्यात्माची गोडी असणाऱ्यांना ह्या ग्रंथाच्या वाचनाने निश्चित लाभ होईल. एका जाणत्या समीक्षकाने लिहिलेच आहे की, श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या प्रभावामुळे महाराष्ट्र सामाजिक व धार्मिक क्षेत्रात अत्यंत संपन्न झाला. वर्तमानकालीन व भविष्यकालीन मराठी वाचकांना त्या संपन्नतेची जाणीव देण्याचे सत्कार्य या ग्रंथाकडून होऊ शकेल.

"महाराष्ट्र संस्कृतीची विविध वैशिष्ट्ये ही ज्ञानेश्वरांच्या मानस सरोवरात बहरलेली सुवर्णकमळे होत. महाराष्ट्राच्या आंतरजीवनाची जान्हवी श्रीज्ञानेश्वरीने रेखाटलेल्या विशाल पात्रातून वाहत आली आहे."

"महाराष्ट्राचे स्वातंत्र्यप्रेम महाराष्ट्राच्या भक्तियोगाचे वैशिष्ट्ये, महाराष्ट्राचा नामनिष्ठ भागवतधर्म, महाराष्ट्राची कणखर तितिक्षा, महाराष्ट्राचे स्वावलंबन, महाराष्ट्रीय आचारातले प्रखर बुद्धिप्राधान्य हे सर्व सांस्कृतिक विशेष श्रीज्ञानेश्वरांच्या जीवनाचे, जीवनकार्याचे व त्यांच्या प्रतिभाविलासाचेही ठळक, विशेष

व्यावर्तक गुणधर्म आहेत."

"श्रीज्ञानेश्वरी ही महाराष्ट्रीय संस्कृतीची ऐतिहासिक गंगोत्री व श्रीज्ञानेश्वर हेच महाराष्ट्राचे परमपूज्य पितृतीर्थ होत."— (श्री. धुं. गो. विनोद, पं. महादेवशास्त्री जोशीलिखित "ज्ञानेश्वरी-प्रवेशिका" ची प्रस्तावना).

सौ. शैलजादेवी वहिनीसाहेबांचे ह्या उपक्रमाबद्दल व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे, ह्या ग्रंथाचे प्रकाशन करण्याचा निर्णय घेतल्याबद्दल मी हार्दिक अभिनंदन करतो व सौ. शैलजादेवी वहिनीसाहेब आपले हे अत्यंत उपयुक्त लेखनकार्य दीर्घकाल चालू ठेवतील अशी आशा करतो.

श्रीमद्भगवद्गीतेत भगवंतांनी म्हटलेच आहे—

**अध्येष्यते च य इमं धर्म्यं संवादमावयोः ।**
**ज्ञानयज्ञेन तेनाहमिष्टः स्यामिति मे मतिः ॥** (अ. १८-श्लो. ७०)

मानव जातीची ही चिरंतन पिपासा आहे.

**शंकर दयाल शर्मा**

**अनुक्रमणिका**

सत्यमेव जयते

VICE-PRISIDENT INDIA
NEW DELHI
August 29, 1988

# FOREWORD

'Bhavartha Deepika', which is an alternative name of the Tika written by Dnyaneshwar on Shrimadbhagavadgita is a series of expositions made by him before an audience at Nevase in Ahmednagar District of Maharashtra in 1290 AD *i.e.* about seven hundred years ago **(शके बाराशतें बारोत्तरें । तें टीका केली ज्ञानेश्वरें)**. It is justly regarded as an unequalled commentary on Gita which is regarded even by Western critical scholarship as part of all humanity's perennial philosophy, as so aptly concluded by Aldous Huxley.

All great literature, not only reflects aspects of contemporary social life but aims at furnishing a dependable guide of social conduct. This holds good, particularly, in respect of work manifestly devoted to analysis of social ethics. Accordingly, a brief reference to some details of the period in which Dnyaneshwari's author lived may prove useful. At that time, Ramdeorai Yadav was ruling over his Kingdom, from his Capital at Devagiri (in present Aurangabad District) in Maharashtra. Dnyaneshwarmaharaj had mentioned, at the end of his work, "Ramachandru King rules according to justice **"न्यायाने पोशी क्षितीशु रामचंद्रु"**. As later history disclosed, an invasion of Maharashtra was imminent-yet we have this testimony that public administration was being carried on then according to principles of law and order. Perhaps, while attributing this quality to Yadav political rule, Dnyaneshwarmaharaj might have had in mind an illustrious group of learned men adorning the Yadav Court like Vidyaneshwar (1070-1100 AD) - who wrote his famous Mitakshari - a commentary on Yadnyavalkyasmriti, Shridhar (1150-1200) -who wrote Smrityarthasara and commentary on Bhagavatam, Hemadri-the author of Chaturvarga Chintamani, Jayadev - who wrote Chandraloka (an analysis of Sanskrit rhetorics), Bopadeva - who wrote on Sanskrit grammar and on topics of Ayurveda and Jalhana-who was the compiler of 'Suktimuktavali and a minister of Krishnadeva Yadav'. Scientific treatises were written on other subjects as well *e.g.* Sangeet Ratnakar written by Sharangdhara. Thus, there was a lot of attention being paid to religious ritualistic literature and performing arts, besides purely literary topics. It could be said that the Yadav rulers were, doubtless, patrons of learning and supported conformity with religious and ritual procedures.

But a public administration, particularly under dynastic rule, does not always succeed in measuring, controlling and guiding social undercurrents, especially those affecting the bulk of the people, who, living undertrodden and *non privile* were in no position to voice their grievances; much less to assert a demand for a better life.

It is in this background that one may now look at the very unusual family life lived and suffered by Shri. Dnyaneshwar-for sometime along with his parents, two brothers and sister, and after a compulsory demise of his parents, only with his two brothers and sister-all three having become orphans, ostracized by surrounding society as they were regarded impure, being offsprings of the Sanyasi who had reverted to married life by breaking vows of celibacy etc. Dnyaneshwara's father-Vithalpant beseeched learned priests at Alandi in Pune District for a prescription for purification. He was told to enter into a Jalasamadhi and as for a degree of purification of his four young children, he was informed that they should approach priests at Paithan-and it so happened that whereas Dnyaneshwara's parents got the penalty of voluntary drowning, the second part of the decree, obtained at that price at Alandi could never be implemented because the certificate given by the priests in Paithan was never implemented in Alandi.

It was in these tragic circumstances that everyone of the four children had to determine his or her locus of life at his or her own volition and initiative. Nivrittinatha took to Nathasampradaya which had already come into existence and was a movement of some strength based on a doctrine of social equality. In fact, Dnyaneshwara's great-grand-father, Trimbakpant and grand-father, Govidpant, were followers of this Sampradaya, according to recent research. Dnyaneshwar too joined it in due course-but with a slightly different outlook. He treated Nivrittinatha-his elder brother, as his Guru and wrote at his instance, his independent work, "Amritanubhava".

Vithalpant and his family were a set of thiners, but the outlook on life entertained by what may be called 'masses' was teeped in ignorance. As observed by an analyst,

"बहुजनसमाज हा तर बोलून चालून मूढ व अज्ञानी होता. पशुतुल्य जीवन कंठण्यापलीकडे त्याला दुसरी गति नव्हती. त्याचे ठिकाणी जी थोडीबहुत धर्मश्रद्धा होती, तिला उच्च विचारांची बैठक कधी लाभलीच नाही. म्हणून अज्ञानाने, भीतीने किंवा स्वार्थबुद्धिने मंगळाई, जोखाई, म्हसोबा, बहिरोबा इत्यादि देवतांची भक्ति करण्यापलीकडे तिची मजल गेली नाही."

अनुक्रमणिका

Indian society has always remained like a vast pyramid, most of which was covered with darkness, but its top illuminated to varying extent, from time to time. The contemporary priesthood had possessed a moral and social responsibility of spreading light but it was either not conscious of it or had deliberately ignored it.

Dnyaneshwarmaharaj has shot some of his sharpest arrows at such misguided ritualists who had only one objective in life *viz.* that of achieving material pleasures by promoting a ritualistic approach in society—

**"जैसी रांधणी रससोय निकी । करूनिया मोलें विकी ।**
**तैसा भोगासाठी अविवेकी । धाडिती धर्मु ॥** (c. 2-254)

**म्हणौनि हे पार्था । दुर्बुद्धि देख सर्वथा ।**
**तयां वेदवादरतां । मनी वसे ॥"** (c. 2-255)

**"तो जे जे बोले । ते अज्ञानचि फुललें ।**
**तयाचें पुण्य जें फळलें । तें अज्ञान गा ॥"** (c. 13-842)

At this stage, two relevant questions may be dealt with-(l) what was the compass of studies made by Dnyaneshwarmaharaj; and (2) why did he select Shrimadbhagavadgita for his commentary?

That he had studied earlier views about Gita doctrines is absolutely clear. In fact, he has explicitly stated that he had consulted Bhasyakaras or Chief-commentators on Gita. That he had very carefully studied all principal Upanishads is equally clear. Thus, it can be safely stated that he had pondered over Badarayana Brahmasutras (centuries before Christ) perused Vyasa's Mahabharata, examined views of Adyashankaracharya (788-820 AD), Ramanuja (1017-1137 AD); Nimbarka (C 1162 AD), Madhavacharya (1197-1275 AD). These views contained exposure of *vishshtadvaita, Dvaitadvaita* and *Shudhadvaita* views on fundamental philosophy. There are also good reasons to believe that he took into account *Yogavasistha, Gaudapadakarika, Shaivism* as prevalent in Kashmir as well as doctrines of *Nathapanth* in the South.

But he had his own independent and original analysis of all that he read and pondered over. Thus, for example, it has been found that out of 218 instances of comparable views of Adyashankaracharya and Dnyaneshwara, Dnyaneshwara has not accepted his great predecessor's interpretation in as many as 68 instances; and differed further in 68 others. It appears that his

conclusions had assumed their final shape, well before he wrote Dnyaneshwari. This is another way of saying that his choice had settled itself on Shrimadbhagavadgita because he was convinced that thereby he could express, systematically, the entire body of his own well-formed conclusions-as already seen. Ignorance, resulting social injustice and other evil consequences had conditioned Dnyaneshwarmaharaja's family life; and these developments must have left an indelible print on his mind. The Gita emphatically preached the doctrine of equality. As pointedly observed in Dnyaneshwari,

**"परी राया रंका पाड धरूं । नेणती सानेयां थोरां कडसणी करूं ।**
**एकसरें आनंदाचें आवारूं । होत जगा ॥** (c. 9-202)

**म्हणौनि कुळ जाति वर्ण । हें आघवेंचि गा अकारण ।**
**एथ अर्जुना माझेपण । सार्थक एक ॥"** (c. 9-456)

He advocated not only the importance of social equality but prominently declared that an individual was free to promote his or her own welfare on the basis of that permanently equal status for all. Subject to these principles, what followed was a significant programme for carrying this message to all those around him. With this he travelled widely not only in Maharashtra but outside its boundaries. It was in the course of his halt at Nevase, that his great commentary was recorded. One must remember that it is characteristic of progressive minds in India, whom grateful generations later on referred to as saints, that they firmly belived that whatever they had learnt as valuable was really public property and should, accordingly, be made easily accessible to the public. This explains why Sanskrit as a medium of exposition was given up by Dnyaneshwaramaharaj in favour of Marathi language for helping people to grasp his views. This also emplains his construction of lyrical poetry or *Abhang* verses-as also his decision to make a self-contained independent statement of his philosophical views in a work like 'Amritanubhava'. It would further enable us to understand how he utilised results of an earlier Mahanubhava movement towards social reforms and an accepted convention of "वारकरी" pilgrimage to Pandharpur. 'Lokasangraha' became his principal objective. When the importance of the factor of social equality starts getting eroded the scope for foreign intervention in political cultural fields increases correspondignly. History stands witness to this phenomenon. Acute sense of equality is the shield of our freedom. Among those great saints who worked hard for promoting social equality, Shri. Dnyaneshwaramaharaj can easily be counted as an effective pioneer. Maharashtra has profited from his teachings time and again.

While Gita's text was conveniently small and very systematically arranged, those who undertook a serious study had encountered great difficulty in understanding some of its subtleties. These difficulties had reflected themselves in consequent diversities among explanations rendered by preceding Acharyas. His own interpretation was, as already noted, somewhat different from that of some leading authorities. It is a rewarding exercise to discover how Dnyaneshwaramaharaja's Chidvilasavadi Purnadvaita analysis is Gita brings out of the truth of the Gita view :

**"सर्वभूतेषु येनैकं भावमव्ययमीक्षते ।**
**अविभक्तं विभक्तेषु तज्ज्ञानं विद्धि सात्त्विकम् ॥"** (c. 18-20)

The Gita has been under serious study of Western scholarship for nearly 200 years past. Problems of man's life on earth and of his destiny thereafter have attracted intellectuals of all ages and climes. Shri. Krishna's answer to these problems, setforth so elegantly, naturally attracted attention, when East met West. But some very critical minds in Western countries got bogged down and tied themselves in knots on facing what seemed to them in that synthesis of philosophical views which was embodied in Gita, exactly as there appeared to be a never ending debate among competing interpretations of their Indian predecessors. In these circumstances, it was no wonder that, in course of time, Indian scholarship could locate problems in understanding views expounded in Dnyaneshwari. Apart from doctrinal difficulties, nearly 30 generations or seven centuries had removed modern Marathi reading public from the language employed by Dnyaneshwarmaharaj. At the same time, progressive democratic evolution had made and would continue to make a persistent demand for an increasingly wider appreciation of India's spiritual and cultural legacy-particularly, that part of it which gave equal status to all sections and parts of Indian society. Importance of Dnyaneshwari's role in this process cannot be minimised.

It is for this specific reason that I welcome Maharashtra Rajya Sahitya and Sanskritik Mandala's decision to publish this volume. The learned authoress has explained doctrines of Shrimad-Bhagavadgita as commented upon by Dnyaneshwarmaharaj, in simple and very elegant style, understandable, easily, by those who have not had the advantage of intensive coaching in obstruse texts of Indian philosophy. She has taken instances from the lives of great Hindu, Jain, Buddhist, Christian and Muslim Saints to illustrate her points. The homely atmosphere of her exposition is praiseworthy. I am sure that those interested would profit by their reading of this work, for it has been correctly observed by a perceptive critic that Maharashtra region has been greatly enriched by Dnyaneshwarmaharaj's influence of its religious and social life—

“महाराष्ट्र संस्कृतीची विविध वैशिष्ट्ये ही ज्ञानेश्वरांच्या मानस सरोवरात बहरलेली सुवर्णकमळे होत. महाराष्ट्राच्या आंतरजीवनाची जान्हवी श्रीज्ञानेश्वरीने रेखाटलेल्या पात्रातून वाहत आली आहे.”

“महाराष्ट्राचे स्वातंत्र्यप्रेम महाराष्ट्राच्या भक्तियोगाचे ज्ञान वैशिष्ट्ये, महाराष्ट्राचा नामनिष्ठ भागवतधर्म, महाराष्ट्राची कणखर तितिक्षा, महाराष्ट्राचे स्वावलंबन, महाराष्ट्रीय आचारातले प्रखर बुद्धिप्राधान्य हे सर्व सांस्कृतिक विशेष श्रीज्ञानेश्वरांच्या जीवनाचे, जीवनकार्याचे व त्यांच्या प्रतिभाविलासाचेही ठळक विशेष व्यावर्तक गुणधर्म आहेत.”

“श्रीज्ञानेश्वरी ही महाराष्ट्रीय संस्कृतीची ऐतिहासिक गंगोत्री व श्रीज्ञानेश्वर हेच महाराष्ट्राचे परमपूज्य पितृतीर्थ होत.”

I congratulate Smt. Shailajadevi Vahinisaheb Pratinidhi for her excellent presentation as also Maharashtra Rajya Sahitya and Sanskritik Mandala for its decision to publish it. I wish the learned authoress a long span of such highly useful literary activity-for has not the Lord

**अध्येष्यते च य इमं धर्म्यं संवादमावयोः ।**
**ज्ञानयज्ञेन तेनाहमिष्टः स्यामिति मे मतिः ॥** (c. 18-70)

This is an eternal quest of mankind.

**S. D. Sharma**

अनुक्रमणिका

## स्वा ग त...

श्रीमंत सौ. शैलजादेवी प्रतिनिधि यांनी लिहिलेल्या ‘श्रीज्ञानेश्वरी मुक्तचिंतन’ या ग्रंथाची काही प्रकरणे मी वाचून पाहिली. गीतेच्या वा ज्ञानेश्वरीच्या प्रत्येक अध्यायावर एक एक प्रकरण आहे. सौ. राणीसाहेबांना ज्ञानेश्वरीची गोडी का लागली? कोणी आवड निर्माण केली? त्यांनी ज्ञानेश्वरीचे वाचन कोणाजवळ केले? अर्थाची निश्चिती त्यांनी कशी केली? अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यापेक्षा ज्ञानेश्वरी जवळ बाळगणे, माऊलीप्रमाणे तिच्यावर प्रेम करणे, तिचा आस्वाद तिच्या कुशीत शिरून घेणे, ही आवड सतत जोपासणे या बाबींनाच महत्त्व द्यावयास हवे. ‘बहुत सुकृतांची जोडी’ असल्याशिवाय असली आवड निर्माण होत नाही, झाली तर टिकत नाही. मुलाला आईची व आईला मुलाची जशी ओढ असते तशी प्रत्ययास आल्याशिवाय ज्ञानेश्वरीत मन रमत नाही. मग सातशे वर्षांपूर्वीची भाषा दुर्बोध व अवघड वाटू लागते.

पण पूर्वसुकृताचा धागा बळकट असला की, सर्व अडचणी दूर होतात. एकदा माऊलीशी भिडल्यावर मग ‘स्तनमुखाचिये भेटी’ कधी पान्हा थबकतो का? अशीच धारणा वाचकांच्या मनात हे मुक्तचिंतन वाचून होते. बोलून-चालून हे चिंतन आहे आणि तेही मुक्त. त्याला कसली बंधने नाहीत. ‘बोलीं अरूपाचें रूप दावीन। अतीन्द्रिय परी भोगवीन। इंद्रियांकरवीं ॥’ ही माऊलीची प्रतिज्ञा आहे. ही ध्यानात धरून लेखिकेने ज्ञानेश्वरीचे वाचन, मनन, चिंतन केले आहे. येथे अर्थाची, पाठभेदाची, व्याकरणाची चिकित्सा नाही. आहे तो केवळ भावस्पर्श आणि ज्ञानेश्वरीत हाच महत्त्वाचा आहे. ज्ञानेश्वरी कशी वाचावी? तर एकनाथांनी सांगितले आहे. ‘भाव धरूनियां वाची ज्ञानेश्वरी’ भाव हाच ज्ञानेश्वरी समजावून घेण्याचा मार्ग आहे आणि तो लेखिकेस गवसला आहे असे वाटते.

सौ. राणीसाहेबांनी हे मुक्तचिंतन कशासाठी साकार केले? सुमारे नऊ हजार ओव्यांवरील हे निरूपण त्यांनी लिहून का काढले? ज्ञानेश्वरीचा अर्थ सांगणारे ग्रंथ मराठीत अनेक आहेत. साखरे, दांडेकर, बा. अ. भिडे इत्यादींच्या सार्थ ज्ञानेश्वरी लोकादरास पात्र झालेल्या आहेत. मग लेखिकेचा हा खटाटोप कशासाठी? याचे उत्तर ‘स्वान्तः सुखाय’-स्वतःच्या आनंदासाठी, समाधानासाठी; एवढेच आहे. नेपोलियनवर युरोपीय भाषांत सुमारे एक लाखावर पुस्तके आहेत. नेपोलियनचे गुण थोर पण तो महत्त्वाकांक्षी व सत्तापिपासू होता. उलट माऊली सर्व जगाला आनंदाचे भोजन देणारी, ब्रह्मविद्येचा सुकाळ करणारी, आत्मज्ञान विशद करून, ‘जें जें भेटे भूत। तें तें मानिजे भगवंत।’ म्हणणारी, खळांची दुष्टबुद्धि नष्ट व्हावी, सर्वांना सत्कर्मात प्रेम वाटावे, सर्व विश्वाने स्वधर्मसूर्याची पहाट अनुभवावी, दुरितांचा तिमिर नष्ट व्हावा, अशा हेतूने प्रेरित झालेले ज्ञानेश्वर सर्व भाग्यवंतांना प्रिय होतील यात काय संशय?’

सौ. राणीसाहेबांची भाषा सुलभ, प्रासादिक व प्रसन्न आहे. बोलून-चालून त्यांचे हे मुक्तचिंतन आहे. प्रकट चिंतन म्हणू या. हे साधताना त्यांनी ज्ञानेश्वरीमधील बोधाचा धागा न सोडता इतरही बाबींचा उल्लेख केला आहे. कधी त्या उपनिषदांतील कथांचा संदर्भ देतात; कधी कृष्णमूर्ति, रमणमहर्षि, सत्यदेवानंद इत्यादींचे दाखले देतात. कधी संभाषणात्मक रूप त्यांच्या लेखनास येते. यामुळे त्यांच्या मुक्तचिंतनास एकप्रकारचा जिवंतपणा आलेला आहे. सोपा विषय अवघड व क्लिष्ट करून सांगण्यात विद्वानांना धन्यता वाटते पण त्यांना

ज्ञानेश्वरांचा जीवनहेतूच समजलेला नाही असे आढळते. ज्ञानेश्वरांनी जे गुह्य वा गुप्त होते ते प्रकट केले. जगातील ज्ञान, खरे आत्मज्ञान लोप पावले होते. पण माऊलींचा स्पर्श गीतेला झाला आणि सर्वत्र आत्मज्ञानाची पहाट उजाडली. असाच अनुभव या मुक्तचिंतनाच्या वाचनाने होतो. म्हणून मी मराठी वाचकांच्यावतीने या मुक्तचिंतनाचे हार्दिक स्वागत करतो. स्त्री-शूद्रांसाठी मुक्त केलेल्या ज्ञानेश्वरांच्या तत्त्वज्ञानावर एका स्त्रीने मुक्तचिंतन प्रकट करावे, यातील औचित्य समजावून घ्यावयास हवे.

वास्तविकपणे पाहाता ज्ञानेश्वरी हा ग्रंथ विद्वत्तेच्या, व्यासंगाच्या प्रदर्शनासाठी नाही. त्यातील परतत्त्वाचा स्पर्श थोडा जरी ध्यानी आला तरी पुरे. एक ओवी जरी अनुभूतित उतरली तरी खूप झाले. ज्ञानेश्वरीत काही ठिकाणी विवरण कठीण आहे. काही ओव्यांचा अर्थ जाणत्यांनाही लागत नाही. पण लेखिकेस असा अडचणीचा प्रसंग आलेला दिसत नाही. ती आत्मानंदाच्या तुषारांत तृप्त आहे. असा एक मला नेहमीच आवडणारा प्रसंग लेखिकेने कसा सुबोध केला आहे त्याचा निर्देश करून हे स्वागत संपवितो. आपला उपदेश ऐकून अर्जुन आपणास येऊन मिळेल की काय? याची चिंता भगवान कृष्णांना सहाव्या अध्यायात लागलेली आहे. अर्जुन हा अर्जुन राहावा, असे कृष्णांना का वाटते? लेखिका लिहिते—

'मी जर ही ब्रह्मविद्या अधिक उघड करून सांगितली तर हा माझा परमभक्त माझ्यात विरून जाईल. मी देव, हा माझा लाडका भक्त ही भाषाच संपेल. याचे अर्जुनपण संपेल, हा कृष्णरूपच झाला तर तोंड भरून मी कुणाशी बोलू? कुणाला गाढ आलिंगन देऊ? डोळे भरून पाहावे असे मला कोण आहे? मनात न मावण्यासारखे सुंदर विचार आले तर ते कुणाला सांगू? हा माझ्याशी एकरूप झाला तर या सख्यसुखास दोघेही पारखे होऊ.... मोक्षसुखाची दृष्ट आमच्या या प्रेमास लागेल. म्हणून बोलण्यात थोडा आडपडदा असलेला बरा.'

अशी रम्य स्थळे या मुक्तचिंतनात अनेक आहेत. ज्ञानात अद्वैत्त पण प्रेमभोगात द्वैत अशी मौज ज्ञानेश्वरादि संतांनी दाखविली आहे. म्हणूनच तुकोबांसारखे संत म्हणतात, 'मी भक्त तूं देव, ऐसें करीं गा' या अवीट माधुर्याचा आस्वाद आबालवृद्धांना सुलभतेने घेता यावा म्हणून हे मुक्तचिंतन ज्ञानेश्वरप्रेमी वाचकांना उपयुक्त व मार्गदर्शक वाटेल यात शंका नाही. लेखिकेवर श्रीज्ञानेश्वरमाऊलींची पूर्ण कृपा होवो अशी प्रार्थना आहे.

३, सामदा सोसा., ९८/१, प्रभात रोड, पुणे-४.
दि. ९ जुलै, १९८८

**— प्र. न. जोशी**

अनुक्रमणिका

## वाचकांस विनंति—

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळातर्फे हा ग्रंथ प्रकाशित होत आहे. भाग्य असे की, आपले उप राष्ट्रपती, डॉ. श्री. शंकर दयाल शर्मा यांचा शुभाशीर्वादही त्याला लाभला आहे. मराठी वाचकांच्या हाती हा ग्रंथ देताना मला फार आनंद वाटतो आहे.

पण त्याचा अर्थ माझ्या अनधिकाराची मला पूर्ण जाणीव नाही असा मात्र नाही.

पुनरावृत्तीचा दोष पत्करूनहि मी म्हणते आहे की, कोल्हापूरच्या मैत्रिणींसाठी दिलेली ही प्रवचने पुण्याच्या मैत्रिणींसाठी मी लिहायला सुरुवात केली. पण हे काम आपल्या शक्तीबाहेरचे आहे असे वाटून ते लेखन बाजूस सारून ठेवले. प्रा. गं. वि. कुलकर्णी आणि प्रा. म. अ. कुलकर्णी या दोघांनी ते वाचून प्रोत्साहन दिले आणि अठरा अध्याय लिहून घेतले. ह्या लिहिलेल्या प्रवचनातून ग्रंथ तयार झाला आणि महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने त्याचे प्रकाशन केले.

१९७० साली एप्रिल महिन्यात प्रवचनास सुरुवात झाली. आम्ही सर्वजणींनी पहिल्याच दिवशी ठरविले होते की, "ह्या वाचनाने आपले जीवन अंतर्बाह्य शुद्ध, सुंदर होत गेले पाहिजे आणि तसे झाले तरच आपण ज्ञानेश्वरी वाचली असे म्हणता येईल."

बारा वर्षांनी जेव्हा आम्ही आत्मशोधन करून पाहिले तेव्हा वाटले की, ह्या वाचनातून आनंद तर मिळालाच आहे पण आपल्या जीवनासंबंधीच्या दृष्टिकोनात आमूलाग्र बदल होतो आहे. जीवनाच्या समुद्रमंथनातून उठणारे राग-द्वेषांचे काळकूट प्राशन करून अमृताचा लाभ करून देण्याचे महत्कार्य हा ग्रंथ करतो आहे.

आम्हा सर्वजणींना हा सुखद अनुभव आला.

मनात आले की, आपल्याला लाभलेल्या आनंदाचा हा प्रसाद सर्वांना वाटावा.

आज शिक्षणाची द्वारे सर्वांना खुली झाली आहेत. बहुजनसमाज सुशिक्षित होतो आहे. अंगच्या

अनुक्रमणिका

कर्तबगारीने पुढे येतो आहे. स्त्रिया, मुलीं उत्तमोत्तम उच्च शिक्षणाचा लाभ घेत आहेत अशावेळी ज्ञानेश्वरी चिंतन-मननाने मनावर होणाऱ्या शुद्ध संस्कारांचीही जोड मिळाली तर जगाकडे व जीवनाकडे पहाण्याचा एक निकोप, उदात्त दृष्टिकोन त्यांच्या ठिकाणी तयार होईल आणि प्राप्त जीवन धन्यतेचे, कृतार्थतेचे होऊन सर्वांभूती भगवंत पहाण्याची युक्ति त्यांच्या हाती येईल.

हा ग्रंथ विद्वान मंडळींना मान्य झाला तर आनंद आहेच; पण तो सर्वसामान्य माणसांच्या घरापर्यंत पोचून त्यांना प्रिय झाला, मनन-चिंतनाचा विषय झाला, तर मी कृतार्थ होईन.

आपल्याला मिळालेल्या आनंदाचा प्रसाद सर्वांना वाटावा ह्या विनम्र भूमिकेतून ह्या ग्रंथाचा प्रपंच केला आहे. सहृदय वाचक प्रेमाने ह्या प्रसादाचा स्वीकार करतील अशी अशा करते.

— **सौ. शैलजादेवी प्रतिनिधि**

**अनुक्रमणिका**

# अनुक्रमणिका

प्राक्कथन ........ ६
FOREWORD ........ १२
स्वा ग त... ........ १८
वाचकांस विनंति— ........ २०
अर्जुनविषादयोग ........ २७
सांख्ययोग ........ ५५
कर्मयोग ........ ८७
ज्ञानसंन्यासयोग ........ १०९
संन्यासयोग ........ १३०
आत्मसंयमयोग ........ १४६
ज्ञानविज्ञानयोग ........ १८२
अक्षरब्रह्मयोग ........ २०३
राजविद्याराजगुह्ययोग ........ २२३
विभूतियोग ........ २७०
विश्वरूपदर्शनयोग ........ २९९
भक्तियोग ........ ३५१
क्षेत्रक्षेत्रज्ञविभागयोग ........ ३७५
गुणत्रयविभागयोग ........ ४४९
पुरुषोत्तमयोग ........ ४७९
दैवासुरसंपद्विभागयोग ........ ५२८
श्रध्दात्रयविभागयोग ........ ५६५
मोक्षसंन्यासयोग ........ ५९८
पसायदान ........ ७२६

॥ श्री ॥

**अथ ध्यानम् ।**

शान्ताकारं भुजगशयनं पद्मनाभं सुरेशं
विश्वाधारं गगनसदृशं मेघवर्ण शुभाङ्गम् ।
लक्ष्मीकान्तं कमलनयनं योगिभिध्यनिगम्यं
वन्दे विष्णुं भवभयहरं सर्वलोकैकनाथम् ॥

**अनुक्रमणिका**

॥ श्री ॥

## गीता ध्यानम् ।

ॐ पार्थाय प्रतिबोधितां भगवता नारायणेन स्वयं
व्यासेन ग्रथितां पुराणमुनिना मध्येमहाभारतम् ।
अद्वैतामृतवर्षिणीं भगवतीमष्टादशाध्यायिनीम्
अम्बत्वामनुसंदधामि भगवद्गीते भवद्वेषिणीम् ॥ १ ॥

नमोस्तु ते व्यास विशालबुद्धे फुल्लारविन्दायतपत्रनेत्र ।
येन त्वया भारततैलपूर्णः प्रज्वालितो ज्ञानमयः प्रदीपः ॥ २ ॥

प्रपन्नपारिजाताय तोत्रवेत्रैकपाणये ।
ज्ञानमुद्राय कृष्णाय गीतामृत दुहे नमः ॥ ३ ॥

सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपालनन्दनः ।
पार्थो वत्सः सुधीर्भोक्ता दुग्धं गीतामृतं महत् ॥ ४ ॥

वसुदेवसुतं देवं कंसचाणूरमर्दनम् ।
देवकीपरमानन्दं कृष्णं वन्दे जगद्गुरुम् ॥ ५ ॥

भीष्मद्रोणतटा जयद्रथजला गान्धारनीलोत्पला ।
शल्यग्राहवती कृपेन वहनी कर्णेन वेलाकुला ।
अश्वत्थामविकर्णघोरमकरा दुर्योधनावर्तिनी ।
सोत्तीर्णा खलु पाण्डवै रणनदी कैवर्तकः केशवः ॥ ६ ॥

पाराशर्यवचः सरोजममलं गीतार्थगन्धोत्कटं
नानाख्यानककेसरं हरिकथा सद्वासनावासितम् ।
लोके सज्ञनषट्पदैरहरहः पेपीयमानं मुदा
भूयाद्भारतपङ्कजं  कलिमलप्रध्वंसि नः श्रेयसे ॥ ७ ॥

मूकं करोति वाचालं पंगुं लङ्घयते गिरिम् ।
यत्कृपा तमहं वन्दे परमानन्दमाधवम् ॥ ८ ॥

यं ब्रह्मा वरुणेंद्ररुद्रमरुतः स्तुन्वन्ति दिव्यैः स्तवैः

अनुक्रमणिका

वेदैः साङ्गपदक्रमोपनिषदैर्गायन्ति यं सामगाः ।
ध्यानावस्थिततद्गतेन मनसा पश्यन्ति यं योगिनो
यस्यान्तं न विदुः सुरासुरगणा देवाय तस्मै नमः ॥ ९ ॥

॥ श्री ॥

**कृपा प्रसाद**

भाव धरोनिया वाची ज्ञानेश्वरी ।
कृपा करि हरि तयावरी ॥ १ ॥

स्वमुखे आपण सांगे तो श्रीविष्णु ।
श्रीगीता हा प्रश्नु अर्जुनेशी ॥ २ ॥

तेचि ज्ञानेश्वरी वाचे वदता साचे ।
भय कळिकाळाचे नाही तया ॥ ३ ॥

एका जनार्दनी संशय सांडोनी ।
दृढ धरी मनीं ज्ञानेश्वरी ॥ ४ ॥

अनुक्रमणिका

॥ श्री ॥

अध्याय पहिला

# अर्जुनविषादयोग

**॥ ॐ नमो भगवते वासुदेवाय ॥**

धृतराष्ट्र उवाच—

**धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे समवेता युयुत्सवः ।**
**मामकाः पाण्डवाश्चैव किमकुर्वत संजय ॥ १ ॥**

संजय उवाच—

**दृष्ट्वा तु पांडवानीकं व्यूढं दुर्योधनस्तदा ।**
**आचार्यमुपसंगम्य राजा वचनमब्रवीत् ॥ २ ॥**

**पश्यैतां पाण्डुपुत्राणामाचार्य महतीं चमूम् ।**
**व्यूढां द्रुपदपुत्रेण तव शिष्येण धीमता ॥ ३ ॥**

**अत्र शूरा महेष्वासा भीमार्जुनसमा युधि ।**
**युयुधानो विराटश्च द्रुपदश्च महारथः ॥ ४ ॥**

**धृष्टकेतुश्चेकितानः काशिराजश्च वीर्यवान् ।**
**पुरुजित्कुन्तिभोजश्च शैब्यश्च नरपुङ्गवः ॥ ५ ॥**

**युधामन्युश्च विक्रान्त उत्तमौजाश्च वीर्यवान् ।**
**सौभद्रो द्रौपदेयाश्च सर्व एवं महारथाः ॥ ६ ॥**

**अस्माकं तु विशिष्टा ये तान्निबोध द्विजोत्तम ।**
**नायका मम सैन्यस्य संज्ञार्थं तान्ब्रवीमि ते ॥ ७ ॥**

**भवान् भीष्मश्च कर्णश्च कृपश्च समितींजयः ।**
**अश्वत्थामा विकर्णश्च सौमदत्तिस्तथैव च ॥ ८ ॥**

अनुक्रमणिका

अन्ये च बहवः शूरा मदर्थे त्यक्तजीविताः ।
नानाशस्त्रप्रहरणाः सर्वे युद्धविशारदाः ॥ ९ ॥

अपर्याप्तं तदस्माकं बलं भीष्माभिरक्षितम् ।
पर्याप्तं त्विदमेतेषां बलं भीमाभिरक्षितम् ॥ १० ॥

अयनेषु च सर्वेषु यथाभागमवस्थिताः ।
भीष्ममेवाभिरक्षन्तु भवन्तः सर्व एवं हि ॥ ११ ॥

तस्य संजनयन् हर्षं कुरुवृद्धः पितामहः ।
सिंहनादं विनद्योच्चैः शङ्खं दध्मौ प्रतापवान् ॥ १२ ॥

ततः शङ्खाश्च भेर्यश्च पणवानकगोमुखाः ।
सहसैवाभ्यहन्यन्त स शब्दस्तुमुलोऽभवत् ॥ १३ ॥

ततः श्वेतैर्हयैर्युक्ते महति स्यन्दने स्थितौ ।
माधवः पाण्डवश्चैव दिव्यौ शङ्खौ प्रदध्मतुः ॥ १४ ॥

पाञ्चजन्यं हृषीकेशो देवदत्तं धनंजयः ।
पौण्ड्रं दध्मौ महाशङ्खं भीमकर्मा वृकोदरः ॥ १५ ॥

अनन्तविजयं राजा कुंतीपुत्रो युधिष्ठिरः ।
नकुलः सहदेवश्च सुघोषमणिपुष्पकौ ॥ १६ ॥

काश्यश्च परमेष्वासः शिखण्डी च महारथः ।
धृष्टद्युम्नो विराटश्च सात्यकिश्चापराजितः ॥ १७ ॥

द्रुपदो द्रौपदेयाश्च सर्वशः पृथिवीपते ।
सौभद्रश्च महाबाहुः शङ्खान्दध्मुः पृथक् पृथक् ॥ १८ ॥

स घोषो धार्तराष्ट्राणां हृदयानि व्यदारयत् ।
नभश्च पृथिवीं चैव तुमुलो व्यनुनादयन् ॥ १९ ॥

अथ व्यवस्थितान् दृष्ट्वा धार्तराष्ट्रान् कपिध्वजः ।
प्रवृत्ते शस्त्रसंपाते धनुरुद्यम्य पाण्डवः ॥ २० ॥

**हृषीकेशं तदा वाक्यमिदमाह महीपते ।**

अर्जुन उवाच—

**सेनयोरुभयोर्मध्ये रथं स्थापय मेऽच्युत ॥ २१ ॥**

**यावदेतान्निरीक्षेऽहं योद्धुकामानवस्थितान् ।**
**कैर्मया सह योद्धव्यमस्मिन् रणसमुद्यमे ॥ २२ ॥**

**योत्स्यमानानवेक्षेऽहं य एतेऽत्र समागताः ।**
**धार्तराष्ट्रस्य दुर्बुद्धेर्युद्धे प्रियचिकीर्षवः ॥ २३ ॥**

संजय उवाच—

**एवमुक्तो हृषीकेशो गुडाकेशेन भारत ।**
**सेनयोरुभयोर्मध्ये स्थापयित्वा रथोत्तमम् ॥ २४ ॥**

**भीष्मद्रोणप्रमुखतः सर्वेषां च महीक्षिताम् ।**
**उवाच पार्थ पश्यैतान् समवेतान्कुरूनिति ॥ २५ ॥**

**तत्रापश्यत् स्थितान् पार्थः पितृनथ पितामहान् ।**
**आचार्यान् मातुलान्भ्रातृन् पुत्रान्पौत्रान्सखींस्तथा ॥ २६ ॥**

**श्वशुरान् सुहृदश्चैव सेनयोरुभयोरपि ।**
**तान्समीक्ष्य स कौन्तेयः सर्वान्बनधूनवस्थितान् ॥ २७ ॥**

**कृपया परया ऽऽविष्टो विषीदन्निदमब्रवीत् ।**

अर्जुन उवाच—

**दृष्ट्वेमं स्वजनं कृष्ण युयुत्सुं समुपस्थितम् ॥ २८ ॥**

**सीदन्ति मम गात्राणि मुखं च परिशुष्यति ।**
**वेपथुश्च शरीरे मे रोमहर्षश्च जायते ॥ २९ ॥**

**गाण्डीवं स्रंसते हस्तात् त्वक्चैव परिदह्यते ।**
**न च शक्नोम्यवस्थातुं भ्रमतीव च मे मनः ॥ ३० ॥**

अनुक्रमणिका

निमित्तानि च पश्यामि विपरीतानि केशव ।
न च श्रेयोनुपश्यति हत्वा स्वजनमाहवे ॥ ३१ ॥

न काङ्क्षे   विजयं कृष्ण न च राज्यं सुखानि च ।
किं नो राज्येन गोविंद किं भोगैर्जीवितेन वा ॥ ३२ ॥

येषामर्थे काङ्क्षितं नो राज्यं भोगाः सुखानि च ।
त इमेऽवस्थिता युद्धे प्राणांस्त्यक्त्वा धनानि च ॥ ३३ ॥

आचार्याः पितरः पुत्रास्तथैव च पितामहाः ।
मातुलाः श्वशुराः पौत्राः श्यालाः संबन्धिनस्तथा ॥ ३४ ॥

एतान्न हन्तुमिच्छामि घ्नतोऽपि मधुसूदन ।
अपि त्रैलोक्यराज्यस्य हेतोः किं नु महीकृते ॥ ३५ ॥

निहत्य धार्तराष्ट्रान्नः का प्रीतिः स्याज्जनार्दन ।
पापमेवाश्रयेदस्मान् हत्वैतानाततायिनः ॥ ३६ ॥

तस्मान्नार्हा वयं हन्तुं धार्तराष्ट्रान् स्वबांधवान् ।
स्वजनं हि कथं हत्वा सुखिनः स्याम माधव ॥ ३७ ॥

यद्यप्येते न पश्यन्ति लोभोपहतचेतसः ।
कुलक्षयकृतं दोषं मित्रद्रोहे च पातकम् ॥ ३८ ॥

कथं न ज्ञेयमस्माभिः पापादस्मान्निवर्तितुम् ।
कुलक्षयकृतं दोषं प्रपश्यद्भिर्जनार्दन ॥ ३९ ॥

कुलक्षये प्रणश्यन्ति कुलधर्माः सनातनाः ।
धर्मे नष्टे कुलं कृत्स्नंमधर्मोऽभिभवत्युत ॥ ४० ॥

अधर्माभिवात्कृष्ण प्रदुष्यन्ति कुलस्त्रियः ।
स्त्रीषु दुष्टासु वार्ष्णेय जायते वर्णसंकरः ॥ ४१ ॥

संकरो नरकायैव कुलघ्नानां कुलस्य च ।
पतन्ति पितरो ह्येषां लुप्तपिण्डोदकक्रियाः ॥ ४२ ॥

अनुक्रमणिका

**दोषैरेतैः कुलघ्नानां वर्णसंकरकारकैः ।**
**उत्साद्यन्ते जातिधर्माः कुलधर्माश्च शाश्वताः ॥ ४३ ॥**

**उत्सन्नकुलधर्माणां मनुष्याणां जनार्दन ।**
**नरके नियतं वासो भवतीत्यनुशुश्रुम् ॥ ४४ ॥**

**अहो बत महत्पापं कर्तुं व्यवसिता वयम् ।**
**यद्राज्यसुखलोभेन हन्तुं स्वजनमुद्यताः ॥ ४५ ॥**

**यदि मामप्रतीकारमशस्त्रं शस्त्रपाणयः ।**
**धार्तराष्ट्रा रणे हन्युस्तन्मे क्षेमतरं भवेत् ॥ ४६ ॥**

संजय उवाच—

**एवमुक्त्वाऽर्जुनः संख्ये रथोपस्थ उपाविशत् ।**
**विसृज्य सशरं चापं शोकसंविग्नमानसः ॥ ४७ ॥**

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे "अर्जुनविषादयोगो नाम" प्रथमोऽध्यायः ॥ १ ॥

श्रीकृष्णार्पणमस्तु ।

अनुक्रमणिका

**मालूताई**

आपण पुण्याच्या मैत्रिणींनी अपार प्रेम दिले आहे. परवा परवा तर भेटलो पण वाटते आपली ओळख अनंतकाळाची जुनी आहे. असेही सहज मनात येऊन गेले की, आपण सर्वजणींनी कोण्या एका गतजन्मी एकाच गुरुमाऊलीच्या पायाशी बसून अध्यात्माचा श्रीगणेशा गिरवला असेल काय?

कोण जाणे?

पण एवढे खरे की अशाच एका सुखद चर्चेच्या प्रसंगी ज्ञानेश्वरीबद्दल बोलताना आपण ठरविले की कोल्हापूरला सखीमेळाव्यात ज्ञानेश्वरीबद्दल जे बोलले जाईल ते मी आपल्याला लिहून पाठवावे. अधून मधून पाठवत राहिले, आपण भेटलो की चर्चा करीत राहिलो, आनंद लुटत राहिलो.

परवाची बैठक वेगळ्याच रंगाने रंगली. विषय होता पातंजल योगसूत्रांचा. माझ्या मनाने नुकतीच या निश्चयाकडे झेप घेतली होती की त्या सूत्रांचा अर्थ समजावून घ्यावयाचा, निकराचा प्रयत्न करावयाचा. मग पाऊण तास त्या पद्धतीने रोज ध्यानाचा अभ्यास सुरू केला होता. बैठक जमू लागली. आनंद मिळू लागला होता.

त्याच वेळी आपण सर्वजणी पुण्यास भेटला. वृत्तिनिरोध म्हणजे काय? त्याचे महत्त्व काय? अभ्यास करता करता तो अभ्यास सोपा कसा वाटू लागतो आणि योगसूत्रांच्या आधाराने ज्ञानेश्वरीचा अर्थ कसा स्पष्ट होऊ लागतो यावर आपण बोलत राहिलो.

मग मात्र आपल्याला रहावेना. आपण म्हटले, “हे कोल्हटकर आमच्या मामंजीचे मित्र. वरचेवर घरी यावयाचे. त्यांच्या चर्चा चालायच्या. पण आमचे तिकडे कुठले लक्ष? पण एकदा मनात आले आपण त्यांना काही तरी द्यावे. म्हणून मी त्यांना रुद्राक्षाची एक माळ दिली.”

पुढच्या खेपेस कोल्हटकर म्हणाले, “सूनबाईंनी रुद्राक्षाची माळ दिली. आता जप केला पाहिजे म्हणून जप करतो.” पातंजल योगसूत्रांच्या भाष्यकारांच्या ह्या उद्‌गारात सूनबाईंचे कौतुक होते. पण आम्हाला ही हकीकत ऐकणाऱ्यांना मात्र हे वाक्य त्यांच्या थोरपणाची साक्ष आहे असेच वाटले.

योगसूत्रांवरील चर्चा संपल्यावर आपण म्हटले, “माझ्या बंधूंनी हे पुस्तक मला तीन वर्षांपूर्वीच दिले पण मला ते काही कळेना. दोन-तीनदा प्रयत्न केला. पण काही उमजेनाच. आता ह्या चर्चेनंतर वाटते आहे की, पुस्तक कळेल की आपल्याला.”

ज्ञानेश्वरीबद्दलही तसेच घडते. ग्रंथ मोठा, भाषा मराठी खरी पण ती सातशे वर्षांपूर्वीची आणि आशय बुद्धीच्या पलीकडे नांदणारा. इतक्या संकटांना तोंड देऊन ज्ञानेश्वरी वाचण्याच्या भानगडीत कोण पडणार?

अनुक्रमणिका

त्यांतून एकदा का चुकून आपण तिच्या पंजात सापडलो तर मात्र संपले! "सुटिका नाही." आपण ग्रंथाच्या मागे न लागता ग्रंथच आपल्या मागे लागतो. इतर वेड पत्करले पण हे देवपिसे, ग्रंथपिसे अंगात शिरले की पंचमहाभूतांपेक्षाही जबर! इतकी विलक्षण ओढ लागते की माऊलींची कमळात सापडलेल्या भुंग्याची आवडती उपमा आपल्याला लागू पडते. प्राण गेला तरी ते कोमल बंध तोडावेसे वाटत नाहीत. कळो न कळो आपण वाचतच रहातो; डोलतच रहातो आणि मग एकेका ओवीचे दार उघडते.

"ये ना आत" असे म्हणत ओवी खुणावत रहाते. जरा अंगचोरपणा करावा तर ती सखी हात धरून ओढून घेऊन जाते आणि त्या आतल्या वैभवाने आपण आनंदात बुडून जातो. प्रयत्नपूर्वक त्या दारातून बाहेर पडले तरी हातास लागलेले कनोजी अत्तर हात धुतला तरी आपला सहवास सोडत नाही, तसेच काहीसे घडते. परिचय वाढेल तसतसे एकेक दालन आपल्याला खुले होईल या आशेवर जगायचे असे आपण म्हणू लागतो.

तेव्हा म्हणत काय होते की इथे जे बोलणे चालते ते जसेच्या तसे जरी लिहून पाठवता आले नाही तरी जसे सुचेल, जसे जमेल, तसतसे लिहून पाठवत जाईन.

कालच गुरुवार होता. थोड्या भगिनी जमल्या होत्या. त्यांना म्हटले, "आपले माझ्यावर किती उपकार आहेत! आज गुरुवार, तर मंगळवारपासून त्याची तयारी सुरू असते. विवेकानंदांचे ग्रंथ पाहिले जातात, रामकृष्ण परमहंसांचे चरित्र वरचेवर वाचले जाते, पातंजल योगसूत्रांशी झटापट चालते, इंग्रजी वाचनातला कोणता भाग लागू पडेल याचा विचार होतो, जुन्या कवींच्या रचनेची उजळणी होते आणि मग गुरुवार उजाडला की एकच धांदल उडते. आजचा विषय उत्तमात उत्तम कसा रंगवता येईल याच्याच चिंतनात संध्याकाळ होते. आपण ऐकायला बसता आणि सर्वजणी गीतेचे ध्यान म्हणून गीतेचे त्या दिवशींचे श्लोक वाचू लागतो. कधी चार, कधी दोन, कधी सात-आठसुद्धा आपण घेतो आणि मग माऊलीच्या ओव्यांना सुरवात करतो. आतून आनंदाचे उधाण येते. आपली दाद मिळते. त्यामुळे सांगायला उल्हासच उल्हास वाटतो. पण खरे सांगू का, समजा, ऐकायला कुणीच आले नाही तरी मी या समोरच्या कोचाला ज्ञानेश्वरी समजावून सांगत बसेन, कारण माझे हे दीड तास ध्यानच होते. अपूर्व आनंद मिळतो."

मालूताई, मला होणारा हा आनंद आपण सर्वजणी वाटून घेऊया. आपली भेट झाली की आपण हाच विषय बोलतो पण भेट होईल तेव्हा! देशकालाच्या मर्यादा ओलांडण्याचे सामर्थ्य शब्दात आहे. तेव्हा आपल्या चर्चेनंतर असे ठरवले की लिहावे आणि पाठवत रहावे. ज्ञानेश्वरीबद्दल लिहिण्याचा आपल्याला अधिकार आहे की, नाही याचा मी विचार केला नाही. लिहिताना मला आनंद होतो आहे. वाचताना वाचणाऱ्यांना झाला की. सार्थक झाले. "हेच आहे का ज्ञानेश्वरीत? मग कळेल की मला" असे म्हणून कोणी मूळ ज्ञानेश्वरी उचलली की, मी तृप्त होईन. तेव्हा तात्पर्य काय की मला जशी कळली तशी मी सांगतेच आहे, आता तशीच ती लिहून काढीन आणि पुण्याच्या सखीमंडळासाठी पाठवीन.

आणखी एक विचार मनात येतो आहे. माऊलीची क्षमा मागून म्हणते आहे की, अर्थ लिहिताना ओव्या मागे पुढे घ्याव्या लागल्या तरी घ्यावयाच्या पण अर्थ संगतवार लिहायचा. ओव्या शक्यतोवर सगळ्या येतील.

अनुक्रमणिका

पण थोड्या मागे पुढे सरकवलेल्या असतील इतकेच. गद्य लेखन रसाळ कसे होईल हे पाहीन पण अर्थास धक्का लावणार नाही.

लिहिलेले वाचून, चर्चा करून आपला स्पष्ट अभिप्राय कळवावा अशी आग्रहाची विनंती करते. जे आपल्याला दुर्बोध वाटेल, कंटाळवाणे वाटेल ते जरूर कळवावे. दुरुस्तीची पराकाष्ठा करीन.

**॥ श्री ॥**

ज्ञानेश्वरीच्या पहिल्या व सोळाव्या आध्यायाच्या सुरवातीस सांग रूपके आहेत. पहिल्या अध्यायात संपूर्ण सारस्वतरूपी गणेशाचे रूपक आहे व सोळाव्या अध्यायामध्ये उगवत्या सूर्याचे रूपक आहे. गुरूंना सूर्य मानून पूर्ण रूपक आहे. दहा, बारा, चौदा, पंधरा, सतरा अध्यायांच्या सुरवातीस गुरूंना नमन आहे. पाच अध्याय "मग" आणि दोन "तरी" व दोन "आता" या शब्दांनी सुरू होतात. पहिला व दहावा ॐने सुरू होतो. गुरुनमनाच्या सहा अध्यायात तीन अध्यायांची सुरवात जयजयकाराने झाली आहे.

ॐ हा मूलध्वनि आहे व शब्द ध्वनिरूप असल्याने संपूर्ण सारस्वत ही एक प्रचंड गणेश मूर्ती आहे अशी कल्पना करून माऊलींनी पहिली ओवी लिहिली आहे.

**ॐ नमो जी आद्या । वेद प्रतिपाद्या ।**
**जय जय स्वसंवेद्या । आत्मरूपा ॥ देवा तूंचि गणेशु ।**

मालूताई, सिद्धचरित्राबद्दलही आपण बरेच वेळा बोललो आहो. स आणि ह चा लोप होऊन उरणारा जो ॐकार त्याच्या बोधासाठी नाथपंथाच्या अकरा सिद्धांची ही चरित्रमाला म्हणजे रत्नांची खाणच आहे.

**काय सांगू नाथांची प्रौढी । जितुकी वर्णावी तितुकी थोडी ।**
**मनुष्यजन्मा येऊन जोडी । या मार्गाची करावी ॥**

ही सिद्धचरित्रातील पाचव्या अध्यायाच्या अखेरीची ओवी मी सतत जपत असते.

हा मार्ग म्हणजे "अखंड ॐकाराचा मौनजप" असा अगदी राजरस्ता. इथे ना वयाची अट, ना लिंगाची अट, ना जातीची अट, ना धर्माची अट.

"ज्याचा निशिदिनी घोष चालूच आहे त्याची फक्त जाणीव ठेवावयाची एवढीच ही उपासना आहे" हे ऐकून माझा जीव फार सुखावला आणि सरळ त्या रस्त्याला लागला. "ज्ञानेश्वरी वाच" ह्या अदृश्यातून आलेल्या आदेशांचे मी स्वागत केले आणि नाथपंथाचा हा प्रमुख ग्रंथ हे समजून आल्यावर कटाक्षाने पारायणे सुरू केली.

अनुक्रमणिका

श्रीमत् सत्यदेवानंदसरस्वती स्वामीजींशी ज्ञानेश्वरीमधल्या ह्या पहिल्या ओवीबद्दल चर्चा करताना मी म्हटले, “स्वामीजी, या पहिल्या ओवीतच सगळी ज्ञानेश्वरी सांगून झाली की!”

तेव्हा स्वामीजींनी हसून मान डोलावली. खुपेरकर शास्त्रीबुवांनी ह्या एकाच ओवीवर तीन दिवस रोटरीमध्ये प्रवचन केल्याचे एकून मला नवल वाटले नाही.

भवानी सहस्रनामाच्या सुरवातीस “कैलास शिखरे रम्ये” शिवपार्वती असताना नंदी भगवंताना विचारतो आहे, “देवा, आपण अहोरात्र कुणाचे स्मरण करता? ध्यान करता?”

देव म्हणाले, “जिच्या सामर्थ्यामुळे हे ब्रह्मांड उत्पन्न करण्याची शक्ति मला मिळाली त्या ह्या आदिमायेचे मी अहोरात्र स्मरण, चिंतन, ध्यान करतो.”

आणि मग शिवांनी नंदीला सहस्रनाम सांगण्यास सुरवात केली. सुरवात होती–

**“ॐ र्‍हीं जगन्माता”** या सूत्राने!

सिद्धचरित्रात तर भवानीच प्रश्न करते आहे. ती म्हणते आहे, “आपल्या तोंडून अठरा पुराणे इतिहास सर्व ऐकले.

**तथापि, चित्ता समाधान । नोहेचि जाण सर्वथा ॥**

तरी हे असे का होते? आपण स्वतः तर

**विदेह स्थिति समाधिस्थ । प्रेमभरे डुलसी सत्य ॥**

तेव्हा देवा आता असे करा की, तो सुखानुभव मला द्या.”

शिवदेव संतुष्ट झाले आणि त्यांनी भवानीला उपदेश केला. कशाचा? तर श्रीपतिनाथ लिहितात–

**“गिरीजे, या मूळ एकाक्षरे । जीवाचें जीवपणचि सरे ।**
**अहं ब्रह्मास्मि इया गजरे । गर्जे वेदु अखंड ॥**

तेव्हा माऊलींनी अशा या नाथपंथाच्या बीजमंत्राचा ग्रंथारंभी उच्चार केला व त्यावर गणेश रूपकाचा अपूर्व साज चढविला आहे. माऊली म्हणतात, “ॐकाराचा जयजयकार असो. वेदांनी त्याचे प्रतिपादन केले आहे खरे पण तो जाणवतो आपल्याच ठिकाणी, भेटतो आपल्या स्वतःच्या रूपातच. हे ॐकारा, तूच गणेश आहेस.”

हे वाचताना “मूलाधारस्थितोऽसि नित्यं” हे अथर्वशीर्षामधले वचन आठवते. ध्वनि मूलाधार चक्रात उत्पन्न होतो हे ध्यानात आले की, या ओवीचे सौंदर्य कळते. मूलाधार चक्राची देवता गणेश आहे. ध्वनीचे मूळ मूलाधार चक्रात आहे व सर्व सारस्वत ध्वनिरूप आहे. आता हा ध्वनि गणेश कृपेने व्यक्त होतो. ध्वनीचा अर्थ काय हेही आपल्याला गणेशकृपेनेच कळते. म्हणजेच सर्वप्रकारच्या अर्थाचा प्रकाश बुद्धिमध्ये पडतो तो गणेशामुळेच.

माऊली म्हणतात, “मी निवृत्तिदास ज्ञानदेव सांगतो आहे, ऐकावे महाराज, अखिल सारस्वत-मग त्याचा कर्ता कोणीही असो, विषय काहीही असो, हेतु कोणताही असो,– ते केवळ त्या एका आदिबीज ॐकाराचाच विस्तार आहे.

पहा हे अशेष शब्दब्रह्म त्या गणपतीची एकसंधी मूर्ति आहे. अक्षरेरूपी निर्दोष आकृति मिरवते आहे. स्मृति हे अवयव आहेत. त्यातील विषय हे बाह्यांग आहे. त्यातील अर्थाचे सौंदर्य ही त्या मूर्तीच्या लावण्याची ढब आहे. अठरा पुराणांचे अलंकार ह्या गणपतीने धारण केले आहेत. त्या पुराणांमध्ये गुंफलेली प्रमेये ही त्या अलंकारांतील जडावाची नक्षी आहे. श्लोकांचे सुसंस्कृत चरण हे देवाच्या अंगावरील तलम झळझळित वस्त्र आहे. पहा ही काव्य नाटके! त्यांतून निघणारा अर्थध्वनि मधुर रंजकपण बारीक! म्हणून कौतुकाने रुणझुणणाऱ्या घागऱ्या म्हणून देवानी त्यांचाही स्वीकार केला आहे. नाना प्रकारची प्रमेय पाहिली की, त्यात नैपुण्य दिसते आहे. उचित श्लोकांमुळे जणु ती रत्नजडित दागिने आहेत असे वाटते. व्यासादिकांच्या बुद्धींनी सगळे शब्दब्रह्म कवटाळून टाकले असल्याने ह्या बुद्धि म्हणजे गणपतीच्या कमरेस बांधलेला शेला झाल्या आहेत असे वाटते. शेल्याच्या पदराच्या दशा तर नुसत्या झळकत आहेत.

पातंजल, सांख्य, वैशेषिक, न्याय, पूर्वमीमांसा (कर्मकांड) व उत्तरमीमांसा (वेदान्त) या सहा दर्शनास षड्दर्शने म्हणतात. हे गणपतीचे सहा हात आहेत. या सहाही दर्शनामध्ये एकवाक्यता नाही. असलाच तर विरोधच आहे. तेव्हा देवानी त्या तत्त्वज्ञानांची आयुधे केली. भक्तांच्या अज्ञानाचा नाश यातील कोणत्यातरी एक आयुधाने होईलच असा त्यांचा विचार असावा. तर्काचा परशु केला, नीतिभेदाचा अंकुश केला व हाती धरला वेदांत! हा देवाच्या हातातील गोड मोदकच झाला. वार्तिकांचा बौद्धमत संकेत की जो मुळातच खंडित होता तो मोडका दात ह्या गजाननाने एका हातात घेतला. सत्कार्यवाद हाच वरद असा कमलहस्त झाला आणि धर्मप्रतिष्ठा हा अभयहस्त झाला. निर्मळ विवेक म्हणजे महासुखाचा परमानंदच असलेली सोंड झाली. शुभ्रवर्ण व समता यांनी युक्त असलेला संवाद हा गणपतीचा दात होय. ज्ञानदृष्टीने बारीक निरीक्षण करणे हेच त्या विघ्नहर्त्याचे डोळे होते. पूर्व व उत्तरमीमांसा हे देवाचे कान आहेत असे मला वाटले. ऋषिमुनि भ्रमर होऊन ह्या कानातून स्रवणारे बोधामृत पितात. द्वैत व अद्वैत ही देवाच्या गजमस्तकावरची गंडस्थले आहेत. त्यावर प्रमेयांची पोवळी तेजाने चमकत आहेत. ईश, केन, कठ, प्रश्न, मुंडक, मांडुक्य, ऐतरेय, तैत्तिरीय, छांदोग्य व बृहदारण्यक ही दहा उपनिषदे घमघमणारी फुले गणपतीच्या मस्तकावर शोभतात. त्या फुलांमध्ये ज्ञानमकरंद भरून वहात असतो.

“अ” हे गजाननाचे चरणयुगुल
“उ” हे गजाननाचे विशाल उदर
“म्” हे गजाननाचे महामंडल मस्तक

अनुक्रमणिका

अ, उ, म् ही तीन अक्षरे एकत्र आल्याबरोबर त्यांनी सगळे शब्दब्रह्म कवटाळून घेतले आहे आणि मी केवळ गुरुकृपेच्या जोरावर त्या आदिबीजास नमस्कार करतो आहे."

गणपतीला वंदन केल्यानंतर ज्ञानदेव शारदेस वंदन करतात . ते म्हणतात, "वाणीची अपूर्व क्रीडा करणारी जी देवता आहे , चातुर्य, वागर्थ व कला यांची जी अधिष्ठात्री आहे आणि म्हणून जगाला जी मोहून टाकते, त्या सरस्वतीला मी नमस्कार करतो.

डोळ्यांना दिव्य अंजन भेटले की , दृष्टि फाकते आणि भूमिगत द्रव्याचा साठा दिसू लागतो . चिंतामणी रत्न हाती आले की सगळे मनोरथ सिद्धीला जातात . निवृत्तिनाथासारखे गुरू मला लाभले आणि माझे सर्व मनोरथ पूर्ण झाले . निवृत्तिनाथ मला गुरू म्हणून लाभले एवढेच नव्हे तर माझ्या हृदयात येऊनच बसले . सहजच विवेकावर माझी आत्यंतिक निष्ठा बसली आणि मी हा संसारपूर तरून गेलो. ज्ञाते हो! म्हणून मी म्हणतो केवळ गुरूंची भक्ति करावी. म्हणजे आपण कृतकृत्य होतो. मुळाला पाणी घातले की फांद्या, पाने फोफावतातच ना? एका समुद्रस्नानाने सर्व तीर्थांत स्नान केल्याचे पुण्य लाभतेच ना ? अमृताच्या सेवनात सर्व रसांचा आस्वाद मिळतोच ना? तसेच हे आहे. म्हणूनच मी सर्व अभिलाषा पुरविण्याचे सामर्थ्य ज्यांच्याजवळ परिपूर्ण आहे त्या गुरूंनाच वारंवार वंदन करतो."

ज्ञानदेवानी इथे गुरूंना प्रत्यक्ष वंदन केले आहे हे खरे पण संपूर्ण ज्ञानेश्वरीमध्ये गुरूभक्तिचा मध्यम एकसारखा झंकारत असतो . मला गाणे शिकविण्यासाठी काळेबुवा आणि सतार शिकविण्यासाठी काणेबुवा यावयाचे. काळेबुवा तंबोरा लावायचे आणि म्हणायचे , "सा-प-ऐका. पण तंबोरा चांगला लागला की , आतून मध्यम उठत असतो तिकडे लक्ष द्या."

काणेबुवांनी एकदा एकच सूर वाजवला आणि विचारले , "कोणता सूर आहे हा ?" मी म्हटलं, "याचा षड्ज कोणता हे कळले की, सांगता येईल हा सूर कोणता आहे."

ते हसून म्हणाले, "अहो तसे नाही. एकच सूर ऐकला की , म्हणायचे 'सा' दुसरा सूर त्यानंतर ऐकला की, त्या षड्जाप्रमाणे ठरवायचे दुसरा सूर कोणता ते."

मला नेहमी ह्या संवादाची आठवण होते . गुरूभक्ति हा ज्ञानेशांचा स्थायी सूर आहे . आणि बाकी सगळे त्याच्या लयीत झंकारणारे सूर आहेत . काळेबुवांच्या सांगण्याप्रमाणे हा सूर -हा मध्यम कधी प्रगट असतो कधी आतून आस देत असतो इतकेच.

गुरूनमनानंतर ज्ञानदेव म्हणतात , "सर्व चमत्काराची खाण , विवेकवृक्षांची बाग, अशी ही गहन कथा ऐका. हे महाभारत सर्व सुखांचे उगमस्थान आहे . सिद्धांताचा साठा आहे. नवरसाने भरलेला समुद्रच आहे. सर्व विद्यांचे मूलस्थान असलेली ही कथा जणू काही प्रत्यक्ष मोक्षच आहे . रसाळ असूनही सर्व शास्त्रांमध्ये श्रेष्ठ शास्त्र आहे. हे सर्व धर्मांचे माहेरघर आहे . सज्जनांच्या मर्मबंधातील ही ठेव आहे . सरस्वतीचा तर हा जामदारखानाच

वाटतो. कधी कधी असे वाटते की, व्यासांच्या विशाल बुद्धिमध्ये प्रवेश करून प्रत्यक्ष शारदाच त्रैलोक्यात प्रगट झाली आहे की, काय! आणि म्हणून महाभारत हा ग्रंथ स्वतःच्या मोठेपणाच्या सामर्थ्याने सर्व काव्यग्रंथांचा राजा झाला आहे आणि रसांच्या रसाळपणाला राजैश्वर्य प्राप्त झाले आहे.

एवढ्यानेच महाभारताचे महात्म्य संपले नाही. महाभारतामुळे शब्दांना शास्त्रीय राजमान्यता मिळाली आणि ब्रह्मज्ञानाचा, कोमलपणा दुणावला. चातुर्य मुळात शहाणे खरे पण त्यालाही महाभारत कथांमुळे जास्त शहाणपण आले. तत्त्वांची शुष्कता जाऊन त्यांना गोडी आली. सुखाचे वैभव वाढलेच वाढले. मधुरतेची मधुरता, शृंगाराची सुरेखता आणि रुढीचे औचित्य विशेषपणाने महाभारतामुळे स्पष्ट झाले. येथे कलांना कुशलता प्राप्त झाली. पुण्याला तेज प्राप्त झाले आणि म्हणून या ग्रंथाच्या श्रवणाने जनमेजयाचे दोष सहज नाहीसे झाले.

विचार करता करता असे वाटते की, व्यासांच्या बुद्धीचा स्पर्श झाल्याबरोबर रंगांची झळाळी वाढली. गुणांचे सगुणत्व द्विगुणित झाले. सूर्याच्या प्रकाशाने त्रैलोक्य झळकत उठावे त्याप्रमाणे व्यासबुद्धीने कवळून घेतलेले हे विश्व नव्या प्रकाशाने जणू मिरवते आहे. त्याला दिव्यत्त्व प्राप्त झाले आहे. साधे साधे अर्थ पण व्यासमतीमध्ये त्यांनी प्रवेश केला की, चांगल्या सुपीक जमिनीत पेरलेले बी फोफावून येते, नवे रूप घेते, आपोआपच विस्तारून पसरते तसे घडते. व्यवहारात घडते ना? शहरात आल्याबरोबर गावाकडचा साधाभोळा ग्रामीण चाणाक्ष होतो तसा प्रकार, अर्थानी व्यासांच्या बुद्धीत प्रवेश केल्याबरोबर होतो. त्यांना काही वेगळाच डौल, वेगळेच ऐश्वर्य प्राप्त होते.

इतिहासांनी हा चमत्कार पहिला आणि विचार केला की, आपणही व्यासांच्या महाभारताचा आश्रय घ्यावा म्हणजे आपोआप आपल्याला जास्तच मोठेपणा मिळेल. मुलगी मुळात सुरेख असली तरी पण वयात आल्यावर तिचे सौंदर्य जास्तच खुलते. वनामध्ये सुंदर सुंदर वृक्षवेली असतातच पण वसंत आला की, त्यांच्या सौंदर्याची जणू काय खाणच उघडते. सोने अगदी बावन्नकशी असले तरी त्याची खरी शोभा दागिने घडविल्यावरच दिसते. त्याप्रमाणे इतिहासांनी महाभारतात प्रवेश केल्यावर त्यांचे सौंदर्य वृद्धिंगत होऊन शोभू लागले. इतिहासाच्या मागोमाग पूर्ण प्रतिष्ठा मिळेल या आशेने पुराणांनीही लहान रूप घेऊन महाभारतात प्रवेश केला. इतिहास पुराणाने संपन्न झाल्यावर महाभारतात जे नाही ते जगात नाही अशी म्हणच पडून गेली. त्रैलोक्य व्यासबुद्धीचे उच्छिष्ट असेच मानले जाऊ लागले.

परमार्थाची जन्मभूमि असलेली ही सुरस कथा वैशंपायन ऋषींनी जनमेजय राजाला सांगितली आणि त्या कथेत श्रीकृष्ण व अर्जुन यांचा गीता नावाचा संवाद आला आहे. अद्वितीय, उत्तम, पवित्र, निरुपम, परम मंगलधाम अशा भारतरूपी कमलाचा पराग म्हणजे गीता होय."

एखादा मोठा राजप्रासाद असावा, त्याच्या बाह्य सौंदर्याचे आपण आश्चर्यचकित होऊन दर्शन घ्यावे आणि चौकात प्रवेश करावा आणि चौकाच्या नक्षीदार महिरपी, डौलदार सुरूचे खांब, लखलखीत झुंबरे यांच्या थाटात मन रमते न रमते तोच प्रासादाच्या मध्यवर्ती चौकातील संगमर्मरी कारंजाचे तुषार अंगावर यावेत आणि उडणाऱ्या पाण्याचे मधुर संगीत कानावर पडावे तशी स्थिती यापुढे आपली होणार आहे. जाणवते आहे की, हे तर ह्या वाड्याचे पहिले खुले दालन आहे. भांडारखाना अजून नजरेस पडायचाच आहे. मात्र एकच होते की,

ह्या बाह्य दर्शनाने आतल्या अद्वितीय वैभवाची अंधुक कल्पना मनात डोकावू लागते आणि ते लावण्य पेलण्याची बुद्धीची बैठक तयार होऊ लागते.

जयपूरच्या खजिन्याची मोजदाद व किंमत करण्यासाठी काही जवाहिरे जयपूरला नेले होते. व्यापारी समोरासमोर बसल्यावर दागिन्यांचा ढीग मधे रचण्यात आला. एकेका बैठकीवरच समोरचा मनुष्य दिसेना एवढा उंच ढीग झाला आणि त्या खजिन्याच्या दालनात अशा अनेक बैठकी घातल्या होत्या. ढीग घातल्यावर व्यापाऱ्यांना किंमत करण्याची आज्ञा झाली. व्यापारी एकेक नग उचलत न्याहाळून पाहून बाजूस ठेवत, दुसरा उचलत शेवटी बिचारे हताश झाले. सगळे जवाहिरे एकमुखाने म्हणाले, "अहो आम्ही यांची काय किंमत करणार? यातला एकेक नगच पृथ्वीमोलाचा आहे."

ज्ञानेश्वरीतील एकेक ओवी तशीच अमोल आहे. ती हातात घेताना त्यातील भावार्थ कळण्यासाठी आपण आपली ताकद वाढवायला हवी आहे. ते रसायन मधुर आहे खरे, पण ते पचविण्याची शक्ति खाणाऱ्याने आधी कमवायला हवी आहे.

एका राजाच्या मुदपाकखान्यात एक उत्तम स्वयंपाक करणारा आचारी होता. नोकरीवर रहाताना त्याने एक अट मात्र घातली होती की, "मी फक्त महाराजांचा स्वयंपाक करीन. त्यांच्यासाठी केलेले पदार्थ इतर कोणासही वाढणार नाही." आचाऱ्याचे पाककौशल्य पाहून राजाने ही चमत्कारिक अट कबूल केली. नाना प्रकारचे अत्युत्तम पदार्थ करून तो आचारी फक्त राजाला वाढत असे. रोज ते पदार्थ खाऊन राजा तृप्त होत असे. एकदा एका सरदाराच्या मनात आले की, त्या पदार्थांची चव आपणही एकदा चाखावी. त्याने राजाला विनंती केली की, 'महाराज, आपल्या ताटातील पदार्थांची कीर्ति आम्ही रोज ऐकतो. एकदा तरी आपल्या पंक्तीचा लाभ मला मिळावा.'

राजा म्हणाला, "आचाऱ्याला विचारून बघतो." आचारी कबूल होईना. तो म्हणे, "मी माझी अट आपल्याला नोकरीवर रहातानाच सांगितली आहे. ह्या अन्नातील एकही पदार्थ मी दुसऱ्या कोणास वाढणार नाही."

सरदाराची तर रोज विनवणी! शेवटी फार मुष्किलीने आचारी तयार झाला. तरी पण त्याने एक अट घातलीच. तो म्हणाला, "सरदारसाहेबांनी या जेवणावर पाण्याचा घोटही घ्यायचा नाही संध्याकाळपर्यंत. जर का ते पाणी प्यायले तर त्यांची काय अवस्था होईल हे सांगता यायचे नाही. मी मग जबाबदार नाही." राजेसाहेब व सरदारसाहेब जेवायला बसले. केशर कस्तुरी घातलेले ते अप्रतीम जेवण दोघांनी मोठ्या आनंदाने घेतले. आपण आचाऱ्याची अट मान्य केली आहे याचा सरदारास विसरही पडून गेला. सरदार पानावरून उठला मात्र त्याला मनस्वी तहान लागली. आचाऱ्याची धोक्याची सूचना धुडकावून लावून तो यथेच्छ पाणी प्यायला. क्षणार्धात जीव जातो की, रहातो अशा असह्य वेदना सुरू झाल्या. असा मसाला पचविण्याची सवय व ताकद असलेले राजेसाहेब ते जेवण रोज सहज पचवत होते तर त्या सरदाराची अवस्था एकाच वेळेत अशी झाली.

अनुक्रमणिका

गीतासेवनाची पद्धत अशीच आहे. ते रसायन सेवन करण्यास जो खराखुरा भक्त असेल तोच तेव्हढा अधिकारी आहे. माऊली म्हणतात, "शब्दब्रह्माचा समुद्र व्यासांच्या बुद्धीने घुसळला, त्यांतून महाभारतरूपी लोण्याचा गोळा काढला, ज्ञानाग्नि पेटवून त्यावर हे लोणी ठेवले आणि लक्षपूर्वक ते कढविले. मग गीतारूपी साजुक तूप तयार झाले. ह्या तुपाचा इतका घमघमाट सुटला की, त्याचा आस्वाद घेण्यासाठी पुष्कळ मंडळी जमली.

पण महाभारताच्या भीष्मपर्वांत सांगितलेली ही भगवद्‌गीता केवळ भक्तांच्यासाठी होती. त्यामुळे ह्या जमलेल्या मंडळीपैकी जे भक्त, विरक्त आणि सोहंभावात पारंगत होते त्यांनाच ह्या साजुक तुपाचा आस्वाद घेता आला, आजही येतो. या अशा भक्तांप्रमाणे श्रीशंकर, ब्रह्मदेव आदिकरून देवांनीही गीतेची स्तुति केली. सनकादिक मुनींनी मोठ्या आदराने गीतेचे सेवन केले."

माझे मामा माधवराव कानिटकर नेहमी म्हणत असत की, "जे. कृष्णमूर्ति हे आधुनिक ज्ञानेश्वर आहेत." गीता ऐकावी कशी याचे जे विवेचन पुढे माऊलींनी केले आहे ते कृष्णजींच्या How to listen या विवेचनाशी इतके मिळतेजुळते आहे की, यापुढील ओव्या वाचताना मला नेहमी मामांचे शब्द आठवतात. "अरे मन मोकळे करून ऐक." Without naming and turning, choiceless awareness असे शब्द कृष्णजी वापरतात तर ज्ञानदेव मन हळुवार करून "इंद्रिया आधी झोंबिजे प्रमेयासी" असे म्हणतात इतकेच. भाषेचा फरक! बाकी आशय एकच.

एक जपानी साधू डोंगरमाथ्यावर एकटाच रहात असे. चिंतनात मग्न असे. त्याच्याजवळ तीर्थाने भरलेला एक लोटा असे. जो कोणी तीर्थासाठी डोंगर चढून जाईल त्याला तो तीर्थ देई. एकदा एक मनुष्य पेला घेऊन साधुकडे गेला आणि म्हणाला, "महाराज मला तीर्थ द्या."

साधूने पेल्याकडे पाहिले आणि त्या माणसाकडे वळून तो म्हणाला, "बाबा रे, हा पेला तर काठोकाठ भरलेलाच आहे. तीर्थ घालायला यात जागा कुठे आहे? तू तो मोकळा करून आण म्हणजे तीर्थ घालतो. एरवी ह्या भरलेल्या पेल्यात तीर्थ घातले तर ते बाहेरच्या बाहेर वाहून सांडून जाईल."

तीच अडचण लक्षात घेऊन ज्ञानेश्वर म्हणतात की, "ही कथा ऐकावयाची असेल तर एका खुबीने ऐकली पाहिजे. तरच त्यातील मर्म कळेल.

शब्दांमध्ये मन गुंतू द्यायचे नाही. इंद्रियांना कळू द्यायचे नाही. वरवरच्या अर्थाचा विचार न करता एकदम थेट कथेतील प्रमेयांना जाऊन भिडायचे म्हणजे अर्थ उराउरी भेटेल. शरद ऋतूतील चंद्रकिरणातील कोमल कण, चकोरांची लहान पिले नाजूकपणाने हळूच वेचून घेतात तो हळुवारपणा श्रोत्यांनी आपल्या मनाला आणावा. म्हणजे मग भ्रमर कमलपराग घेऊन जातात. पण कोमल पाकळ्यांना जरासुद्धा धक्का लावत नाहीत. तशा प्रकारे श्रोत्यांना ही कथा ऐकता येईल. आकाशात चंद्र उगवल्याबरोबर आपली जागा न सोडता त्याला आलिंगन कसे द्यावे आणि चंद्राच्या प्रेमाचा आस्वाद कसा घ्यावा हे चंद्रविकासी कुमुदिनी जाणते. जो श्रोता त्या कुमुदिनीसारखा गंभीर व स्थिर अंतःकरणाचा असेल त्यालाच गीतेचे रहस्य कळेल. श्रोतेहो, आपण तर

अर्जुनाच्या पंक्तीला बसून ऐकण्याच्या योग्यतेचे अहा; तेव्हा सज्ञनहो, मी काय सांगतो इकडे आपण चांगले लक्ष द्यावे.

महाराज, आपले हृदय थोर आहे. म्हणून आपल्या पायापाशी माझी ही सलगी चालली आहे. आईबापांचा स्वभावच असा असतो की, मूल बोबड्या भाषेत जे जे बोलते, त्याचे त्यांना जास्त जास्त कौतुकच वाटत रहाते. आपण "ज्ञानोबा आमचा" म्हणून माझा अंगीकार केलात ना? आता माझ्यातील उणेपणा आपण सहजच सहन कराल. प्रार्थना तरी कशाला करू? पण या प्रेमाच्या जोरावच मी आणखी मोठा अपराध करायला धजावलो आहे. मनाशी म्हणतो आहे की, मी गीतार्थ समजून घेईन आणि तो सांगीन. इतकेच नव्हे तर आपल्यासारख्यांना म्हणतो आहे की, माझे विवेचन आपण लक्षपूर्वक ऐका.

अनाकलनीय असा हा गीतार्थ सांगण्याचे माझे हे धाडस खरोखर वायाच आहे. हा अर्थ मला कळेल तरी कसा? सूर्याच्या उजेडात चमकण्याची ईर्षा काजव्याने धरावी काय? मी अज्ञान्याने, टिटवीसारखे चोचीने समुद्र मोजण्याचे काम करावे काय? आकाशाला गवसणी घालावयाची असेल तर आकाशाहून मोठे व्हावयास नको काय?"

भवानीने आश्चर्यचकित होऊन प्रत्यक्ष शिवास गीतार्थाची थोरवी विचारली असता देव म्हणाले, "देवी तुझे नित्य नूतन दिसणारे स्वरूप जसे कोणी जाणू शकत नाही तसेच ह्या गीतार्थाचे आहे. तो गीतार्थ नित्य नवे नवे आशय प्रगट करीत असतो. त्याची थोरवी मलाही सांगता येत नाही. वेद हे त्या निजलेल्या भगवंताचे घोरणे आहे, तर गीता हे त्या सजग भगवंताचे प्रत्यक्ष बोलणे आहे." त्यामुळे त्या गीतेचा अर्थ मी सांगतो असे म्हणणे म्हणजे आपल्या योग्यतेबाहेरच्या कामास हात घालणे आहे. जिथे वेद वेडे होतात तिथे माझ्यासारख्या मतिमंद अल्पज्ञांचा काय पाड आहे? ह्या अपारास कसे आलिंगन द्यावे? ह्या सूर्याला कसे उजळावे? चिलटाने आकाश मुठीत कसे धरावे?

पण मला एक फार मोठा आधार आहे. माझे श्रीगुरू मला अनुकुल आहेत, आणि त्यांच्या जिवावर मी ज्ञानदेव हा अविवेक करण्याचे धाडस करतो आहे. मी मूर्ख असेन, अविवेक करीत असेन, पण संतकृपेचा झळझळीत दिवा माझ्या हाती आहे. लोखंड हीन खरे पण त्याचे सोने करण्याचे सामर्थ्य परिसाजवळ असते. मृतास जिवंत करण्याची शक्ति, सिद्धि अमृताजवळ असते. सिद्ध सरस्वती प्रकट झाली की, मुकाही विद्वान होतो. पण यात नवल ते काय? त्या त्या वस्तूचा अंगभूत प्रभावच तसा असतो. ज्याची आई कामधेनु आहे त्याला जगात अप्राप्य काय आहे?

आणि म्हणूनच गुरुकृपेच्या भरवंशावर मी ह्या ग्रंथलेखनास प्रवृत्त झालो आहे. आता न्यून असेल ते पुरते आणि अधिक असेल ते सरते करून घ्यावे अशी मी आपल्याला विनंती करतो. आपण अवधान दिले की, मला स्फूर्ति येईल. लाकडी बाहुली सूत्रधाराच्या इशाऱ्यावर खेळ करते तसा मी आपण बोलवाल तसा बोलेन. मी गुरूंचा अनुगृहीत, त्यांचा केवळ निरोप्या आहे. त्यांच्या मर्जीप्रमाणे त्यांनी निरोप सजवून द्यावा."

इथे ह्या ओव्या वाचताना त्या जपानी साधूची आठवण होते. पेला रिता करण्याची प्रक्रिया ज्ञानदेव स्वतः

करून दाखवत आहेत. स्वतःचे व्यक्तिमत्त्व घासून, पुसून, सोज्वळ करून वरून येणाऱ्या अमृताच्या प्रवाहाची वाट मोकळी करून देत आहेत. इथे भगिनींच्या मेळाव्यात ज्ञानेश्वरी प्रवचनाच्या वेळी ते जाणवते आहे. हल्ली सोमवारी जमतो. तीन दिवस आधीपासून बोलण्याची तयारी करत असते. ओव्या वाचते, शब्दार्थ पाहून ठेवते, अनुरूप गोष्टी जमवून ठेवते. मनाशी विवेचनाचा क्रम ठरवते, अखेरच्या समेची ओवी पाहून ठेवते पण प्रत्यक्ष बोलायला सुरवात केली की पुष्कळदा योजलेले बाजूस रहाते आणि एका वेगळ्याच पट्टीचा सूर लागतो. नवे अर्थ सुचवले जातात, नव्या जुन्या गोष्टी आठवतात, आपल्याच आयुष्यातील घटना नव्या रंगात समोर येतात आणि एक वेगळाच आकारबंध तयार होतो. दीड तास सलग एकाच विचाराने भारून जाऊन बोलत रहाते. सहा वाजता समेची ओवी आली की, हात जोडते व आपण सर्व पसायदान म्हणून थांबतो. पेला रिकामा केला की, कसा अमृताने भरला जातो हे प्रंत्यक्षच अनुभवास येते. खरोखरच आपण येवढीच रिकामे होण्याची प्रक्रिया केली तर अमृतकुंभ घेऊन माऊली वाटच पहात असतात हे ध्यानी येते आणि वाटते धन्य जन्म आपला की, आपण ह्या महाराष्ट्रात जन्मलो आणि माऊलींनी पावन केलेली मराठी भाषा आपण बोलतो. पेला जितक्या प्रमाणात रिता होईल तितक्या प्रमाणात तो वरून भरला जातो आहे हे लक्षात आले की, सातशे वर्षे चाललेल्या ह्या अखंड अमृतगंगेच्या विलासाने मन थक्क होऊन जाते.

माऊलींनी मग इशाऱ्यासाठी आपल्या गुरूदेवांच्याकडे पाहिले आणि अनुज्ञा मागितली. तेव्हा गुरूदेव प्रसन्न मुखाने ज्ञानदेवाकडे पहात म्हणाले, “ज्ञानदेवा, हे गौरवाचे बोलणे राहू दे. हे शब्दात कशाला व्यक्त करायला हवे? तुमचा भाव आम्हाला पोचला आता बोलण्याकडे लक्ष द्या आणि झपाट्याने ग्रंथाच्या विवेचनास सुरवात होऊ दे.”

ज्ञानदेव म्हणतात, “मला निवृत्तिदासाला हे ऐकून अत्यंत उल्हास वाटला. मोकळ्या मनाने मी सांगतो ते ऐकावे महाराज.”

आता यापुढे युद्धभूमीचे, सैन्याचे वर्णन सुरू होते आहे. एखाद्या कुशल चित्रकाराने एक मोठे चित्र आखावे, मध्यवर्ती प्रमुख विषयाचा आकार, रंग मनाशी पक्के करावेत आणि तो मध्यवर्ती विषय झळाळून उठेल अशी पार्श्वभूमि रंगवून घेऊन मग अलगद मुख्य व्यक्तिरेषा झटक्यात तेजःपुंज रंगात रंगवाव्या तसा प्रकार आहे. आधी पार्श्वभूमि व नंतर मुख्य व्यक्तिरेखा रंगविण्यास किती सिद्धहस्त चित्रकार हवा हे सांगणे नकोच. चित्रकाराजवळ कागद, रंग, कुंचले हे साहित्य तरी मदतीस असते. लेखकाचे साहित्य, माध्यम फक्त “शब्द”. त्या शब्दाच्या सहाय्याने त्याला सर्व किमया करावी लागते. मोरोपंतांची गोष्ट सांगतात की, काव्य रचनेच्या वेळी डावा हात “थांब थांब” असे म्हटल्यासारखा हालविण्याची त्यांना सवय होती. त्यावर कोटी अशी की, शब्द “माझा उपयोग करा, माझा उपयोग करा” म्हणत समोर येत आणि त्यांना मोरोपंत सांगत “थांब थांब तुझाही उपयोग करतो बरं का”.

माऊली तर काय भाषाप्रभु! अस्सल हिऱ्यांतून जशा पैलूगणिक रंगाच्या छटा प्रगट होतात तसे घडते. माऊलींनी शब्दाचा स्वीकार केला की, त्याला जणू काय पैलूच पडतात. दरवेळी त्या शब्दांचा अर्थ वेगळ्याच तेजाने चमकतो किंबहुना असे जाणवते की, मागच्या वाचनात जो अर्थ वाटला त्यापेक्षा आजच्या वाचनात अर्थ काही वेगळेच बोलतो आहे.

मालूताई आपण कॉलेजमध्ये शेक्सपियर वाचलाच असेल. त्याने केलेले काष्ठौषधीच्या दुकानाचे वर्णन किंवा किंग लियरमधील डोव्हरच्या कड्याचे वर्णन घ्या. शेक्सपियर लिहितो.

*Edg*. Come on, Sir; her's the place :—
Stand still.—How fearful

And dizzy' tis to cast one's eyes so low! [air
The crows and choughs that wing the midway
Show scarce so gross as beetles : half way down
Hangs one that gathers samphire,—dreadful trade!
Methinks he seems no bigger than his head :
The fishermen that walk upon the beach
Appear like mice; and yond tall anchoring bark
Diminish'd to her cock; her cock a buoy
Almost too small for sight; the murmuring surge,
That on the unnumber'd idle pebbles chafes,
Cannot be heard so high.—I'll look no more;
Lest my brain turn, and the deficient sight
Topple down headlong.

आणि हे वर्णन आंधळ्या ग्लॉस्टरने कड्यावरून उडी घेऊन आत्महत्त्या करू नये म्हणून एडगर सपाट जमिनीवर, त्याच्याबरोबर उभे राहून करतो आहे हे ध्यानात येऊन, ह्या डोव्हरचा चुनखडी कड्याचे शब्दचित्र किती सुंदर व हुबेहूब आहे हे कळते.

माऊली तर शब्दचित्र रंगविण्यात अप्रतिम कुशल! आता त्यांनी युद्धभूमि शब्दांतून साकार करण्यास सुरवात केली आहे. अंध राजा धृतराष्ट्र आपल्या राजवाड्याच्या सौधावर बसलेला आहे आणि दूरदृष्टि व दूरश्रवण यांचा दुहेरी वर मिळालेला संजय युद्धभूमीवर घडणारे नाट्य शब्दरूपानें धृतराष्ट्रास प्रत्यक्ष दाखवतो आहे. माऊली म्हणतात, "पुत्रप्रेमाने आणखी एका प्रकारे अंध झालेल्या राजा धृतराष्ट्राने मोठ्या उत्सुकतेने संजयास विचारले, "संजया, मला कुरुक्षेत्राचा वृत्तांत सांग. ज्या रणभूमीस धर्मालय असे नाव आहे तिथे लढाईच्या निमित्ताने ते पांडव आणि माझे गेले आहेत. त्यांनी एकमेकांवर कसा काय हल्ला केला, लढाई कशी काय चालली आहे ते मला लवकर सांग."

या ओवींच्या निमित्ताने माऊलींनी सुचविले आहे की, धृतराष्ट्र दुर्जन असलेल्या आपल्या पुत्रांना सुजन व जिवलग मानतो आहे आणि सुजन असलेल्या पांडवांना दुर्जन व शत्रू मानतो आहे. हा त्याचा आंधळेपणा. चर्मचक्षु नाहीत म्हणून व्यावहारिक आंधळेपणा आहेच त्यात ह्या पुत्रस्नेहाची भर पडली.

अनुक्रमणिका

इकडे, अर्जुन, दुर्जन असलेल्या कौरवांना स्वजन मानून त्यांचा वध करण्याच्या कल्पनेने व्याकुळ होऊन शस्त्रत्याग करतो आहे. मोहाने आणलेले हे आंधळेपण त्याचे चर्मचक्षु अश्रूंनी भरून टाकून त्यांनाही आंधळेपण आणत आहे. ही भूमिका ध्यानात ठेवावयाची. संजय राजाला म्हणाला, "अहो काय वर्णन करावे त्या पांडव सैन्याचे! महाप्रलयकाली प्रत्यक्ष यमाने जबडा पसरावा तसे ते भयंकर दिसते आहे. हे घनदाट सैन्य जर एकदम उठले तर काळकूटाचा समुद्र उसळल्यासारखा होईल. कोण प्रतिकार करणार त्याचा? वाटते आहे की, जसा काही समुद्राच्या पोटातला वडवानलच पेटला आहे, त्याला प्रलयकाळच्या महावाताने चेतवला आहे आणि मग तो समुद्र शोषून टाकून आकाशापर्यंत भडकला आहे. राजा, हे सैन्य तसे अनावर आणि भयंकर दिसते आहे. त्यात आणखी अनेक व्यूहांची रचना केली असल्याने ते दुर्धरही झाले आहे.

महाराज, पण एखादा सिंह हत्तींच्या कळपाकडे तुच्छतेने पहातो तसा दुर्योधन ह्या सैन्याकडे पहातो आहे. त्याने त्याचा हिशोबही मांडलेला नाही. शत्रुसैन्याची पर्वा न करता दुर्योधन द्रोणाचार्याच्या जवळ आला आहे आणि म्हणतो आहे, "पाहिला का पांडवांच्या सैन्याचा आवेश? हुषार द्रुपदपुत्र धृष्टद्युम्नाने हे व्यूह रचले आहेत. वाटते आहे की, जसे काही डोंगरी किल्लेच चालले आहेत. तसे म्हटले तर हे शिक्षण आपणच त्याला दिले आहे. आपण शिकवलेल्या विद्येच्या जोरावरच त्याने ह्या सैन्यसिंहाला पंख लावून विस्तारून उभा केला आहे. पहा पहा."

क्षात्रधर्मामध्ये निपुण, शस्त्रास्त्रांत प्रवीण असे जे अनन्यसाधारण वीर पांडवांच्या बाजूस आहेत त्यांची नावे आपल्याला सहज कौतुकाने सांगतो. ते शौर्याच्या बाबतीत भीमार्जुनांच्या बरोबरीचे आहेत. युयुधान, विराट, द्रुपद इत्यादि उत्तम लढवय्ये महारथी आले आहेत. चेकितान, धृष्टकेतु, काशीश्वर, उत्तमौजा, राजा शैब्य, कुंतिभोज युधामन्यु, पुरुजित इत्यादि राजे लढाईस सज्ज होऊन आले आहेत. द्रोणाचार्य महाराज, सुभद्रेच्या आनंदाचे निधान, मूर्तिमंत अर्जुन वाटावा असा हा बालवीर अभिमन्यु पहा. ज्यांची गणना करता येत नाही असे अपार वीर इतर द्रौपदीकुमारांबरोबर उभे आहेत.

आता सहज ओघाने आपल्या सैन्यातील मुख्य मुख्य वीरांची नावे सांगतो. आपण ऐकावी. आपण ज्यांचे अध्वर्यु अहात अशा काही प्रमुख वीरांची नावे घेतो. हे पहा प्रतापाने सूर्याप्रमाणे तळपणारे गंगासुत भीष्म आहेत. शत्रुरूपी हत्तींचा केवळ सिंहच असा हा आपला कर्ण आहे. अहो, हे इतके बलाढ्य आहेत की, यांच्या नुसत्या संकल्पानेच विश्वाचा संहार होईल आणि तो संकल्प करण्यास इतक्या जणांचीही गरज नाही. एकटे कृपाचार्यही ह्या कामास पुरून उरतील.

इथे विकर्ण वीर उभा आहे. पलीकडे अश्वत्थामा ठाकला आहे. तो तर असा बहाद्दर वीर आहे की, कृतांताच्या मनात त्याचे भय सदोदित उभे असते. ब्रह्मदेवालाही ज्यांच्या बळाचा हिशोब करता येणार नाही असे समितिंजय, सौमदत्ती असे अगणित वीर आपल्या बाजूने लढण्यास सज्ज झाले आहेत.

हे शस्त्रविद्येमध्ये निपुण आहेत. जेव्हढी म्हणून अस्त्रे आहेत ती तर सर्व ह्यांच्यापासूनच निर्माण झाली आहेत. हे अद्वितीय योद्धे पूर्ण प्रतापी असून विशेष म्हणजे माझ्यासाठी त्यांनी आपल्या प्राणांची कुरवंडी केली

आहे. पतिव्रतेचे हृदय जसे पतीवाचून दुसऱ्या कुणाचेही चिंतन करीत नाही त्याप्रमाणे या वीरांना माझ्याशिवाय दुसरे कोणतेही श्रध्दास्थान माहीत नाही. आमच्या कामापुढे त्यांनी आपले जीवित तुच्छ मानले आहे. असे हे निरतिशय चोख स्वामिभक्त आहेत. युद्धाचे कौशल्य ते जाणतात. त्यांची युद्धकला कीर्ति जिंकून आणते. आणखी काय सांगावे? क्षात्रधर्म म्हणजे काय याचे ते मूर्तिमंत उदाहरण आहेत. सर्व बाजूंनी परिपूर्ण असलेले हे वीर आमच्या सैन्यात इतके आहेत की, त्यांची मोजदाद करणेच अशक्य आहे. ते अपारच आहेत.

आणि आमचे सेनानायक आहेत भीष्माचार्य! जगात शूर म्हणून नावाजलेल्या आपल्या भीष्माचार्यांना सेनापतीपदाचा अभिषेक झालेला आहे. त्यांनी आपल्या युद्धकौशल्याच्या बळावर या सैन्याची अशी काही व्यूहाकार रचना केली आहे की, ह्या त्रिभुवनात या किल्ल्यांना कोणी हातदेखील लावू शकणार नाही. समुद्र आधीच दुस्तर, त्यात त्याला वडवानळ सहाय्यकर्ता! तसेच झाले आहे. प्रलयकालचा अग्नि आणि महावात यांचा जणू काही मिलाफ झाला आहे. आधी भीष्माचार्यांसारखा रणधुरंधर आणि आता तो सेनापतीपदावर आरूढ झालेला! त्याच्याशी बरोबरीने लढण्याची कुणाची प्राज्ञा आहे?

मघाशी वर्णन करून सांगितलेले ते पांडवांचे सैन्य आपल्या सैन्यसमुद्रापुढे एखाद्या डबक्यासारखे दिसते आहे. त्यात तो निर्बुद्ध आडदांड भीम सेनापती झाला आहे. मग काय बोलायचे!"

द्रोणाचार्यांशी असे बोलून दुर्योधन सैन्याकडे वळला आणि म्हणाला, "आपआपले सैन्य सज्ज करा. ज्यांच्या ज्यांच्या अक्षौहिणी कोणकोणत्या महारथीच्या अधिपत्याखाली द्यावयाच्या त्या वाटून द्या आणि ते ते सैन्य तसतसे रणभूमीवर उभे राहू दे. महारथींनी आपआपले सैन्य आवरावे. पण लढताना भीष्माचार्यांच्या आज्ञेप्रमाणेच लढावे." मग दुर्योधन द्रोणाचार्यांच्याकडे वळून म्हणाला, "महाराज, ज्यांच्यामुळे आमच्या सैन्यास सैन्यपण आले आहे त्या भीष्माचार्यांचेच त्यांच्या जागी मी आहे असे समजून संरक्षण करावे."

भीष्माचार्यांनी दुर्योधनाचे हे गौरवपूर्ण भाषण ऐकले. त्यांना फार आनंद झाला. त्यांनी मोठ्याने सिंहगर्जना केली. तो नाद इतका अद्भुत होता की, त्याचे प्रतिध्वनि दोन्ही सैन्यांत मावेनात. त्याच प्रतिध्वनीत भीष्माचार्यांनी वीरश्रीने आपला दिव्य शंख फुंकला.

एकत्र झालेल्या ह्या दोन्ही नादामुळे आकाश खाली तुटून पडते की काय असे वाटू लागले. त्रैलोक्य बधिर होऊन गेले. मग आकाशात घडघडाट होऊ लागला. समुद्राचे पाणी उचंबळून आकाशाला भिडू लागले आणि त्यामुळे घाबरून क्षुब्ध झालेले चराचर थरथर कांपू लागले. त्या महाघोषामुळे डोंगर, नद्या दुमदुमून गेल्या. हे पुरेसे नाही म्हणनूच की काय सर्व सैन्यभर रणवाद्ये वाजू लागली. ह्या निरनिराळ्या वाद्यांचा संमिश्र कल्लोळ इतका भयानक होता की, महायोद्ध्यांनासुद्धा प्रलयकाल आला की, काय अशी भीति वाटली. नौबत, डंके, ढोल, शंख, झांजा आणि योद्ध्यांच्या गर्जना असा एकच गदारोळ झाला. सैनिक दंड थोपटून मोठमोठ्याने आव्हान देऊ लागले. मस्तीच्या हत्तीचे थवे आवरता आवरू नयेत तसा प्रकार झाला. भित्र्यांची गोष्ट बोलायलाच नको. कच्चे लोक केरासारखे उडाले. स्वतः यम इतका भ्यायला की, त्याला उभे राहता येईना. चांगल्या चांगल्यांची दातखीळ बसली. नावाजलेल्या शूरांची हृदयें हिंव भरल्यासारखी थडथडू लागली आणि काहीचे तर उभ्याउभ्याच प्राण गेले.

हा असा वाद्यांचा कल्लोळ ऐकून ब्रह्मदेव व्याकुळ झाला. देव म्हणू लागले, "अहो, हा तर प्रलयकाळच ओढवला की," रणभूमीवरचा आकांत ऐकून स्वर्गातील देवांची अशी स्थिती झाली.

"आणि त्याच वेळी पांडवदळामध्ये काय घडले पहा. राजा धृतराष्ट्रा, त्या रणभूमीवर एक महातेजस्वी रथ येऊन उभा राहिला आहे. तो रथ विजयाचा गाभा आणि महातेजाचा खजिना असावा तसा दिसतो आहे. गरुडाचे सख्खे भाऊ शोभतील असे वेगवान चार घोडे त्याला जुंपले आहेत. अहो काय त्या रथाची शोभा वर्णावी! जसा काही पंख पसरलेला मेरु पर्वतच वाटतो आहे. त्याच्या प्रकाशाने दाही दिशा कोंदाटून गेल्या आहेत. ध्वजस्तंभावर हनुमान आहे तो तर प्रत्यक्ष रुद्रच आहे. आणि काय सांगावे महाराज, त्या रथाचे सारथ्य करण्यास भगवान वैकुंठाधिपति श्रीकृष्ण बसले आहेत. आता ज्या रथाचे सारथ्य प्रत्यक्ष भगवान करीत आहेत त्या रथाचे गुण मी काय वर्णन करू? काय हो त्या प्रभूची नवलाई आहे! भक्तावर त्याचे प्रेम तरी किती? पार्थाच्या रथाचे सारथ्य करण्यासाठी घोड्यांचे लगाम देवांनी हाती घेतले आहेत. आपला पाईक देवांनी पाठीशी घातला आहे आणि देव युद्धाला तोंड देण्यास पुढे ठाकले आहेत."

मालूताई, लक्षात आली ना माऊलींची किमया? रंग आणि आवाज यांच्या गडद पार्श्वभूमीवर त्यांनी जणू झळझळीत पिवळ्या रंगात कुंचला बुडवून चार फटकाऱ्यांत हा रथ आणून उभा केला आहे. यापुढे एकदम रंगांची व आवाजाची लयच बदलली आहे.

एकदा चैतन्य महाप्रभु गंगा किनाऱ्याने फिरत होते. त्यांना असे दिसले की, एक भाविक गीता वाचत बसला आहे. प्रभुदेव हळूच मागे उभे राहिले आणि ऐकू लागले. भाविकाचे उच्चार अशुद्ध होत आहेत आणि डोळ्यातून अश्रुधारा सांडत आहेत. प्रभूंना राहवेना, त्यांनी हळूच त्या भाविकाच्या खांद्यावर हात ठेवला आणि म्हटले, "बंधो, वाचनात जरा अशुद्धता आहे. पाठ सुधारून घ्यायला हवा आहे, पण ह्या अश्रूंचे कारण सांगशील काय?"

भाविक डोळे पुसत म्हणला, "महाराज काय सांगू, माझे वाचन ह्या श्लोकाच्या पुढे जातच नाही काय करूं?

**ततः श्वेतैर्हयैर्युक्ते महति स्यंदने स्थितौ ।**

हे एवढे वाचले की, हुबेहुब सर्व देखावा दिसू लागतो आणि त्या भक्तवत्सल परमात्म्याचे दर्शन होऊन अश्रू आवरतच नाहीत. रथाच्या धुरेवर बसलेला तो भगवान मला पुढची गीता वाचूच देत नाही."

चैतन्य महाप्रभूंनी त्याला आलिंगन देत म्हटले, "अरे, वाच, वाच. कशीही अशुद्ध वाच. काय तुझे भाग्य सांगू रे."

**पाईकु पाठीशी घातला । आपण पुढा राहिला ।**

ह्या ओव्या वाचताना आमच्या सामुदायिक पारायणाच्या वेळी कित्येक भगिनींची अवस्था त्या भाविकाप्रमाणे होते. वाटते खरेच आपण आपल्या जीवनरथाची सूत्रे त्या परम कारुणिकाच्या हाती सोपवून दिली आणि निश्चिंत मनाने लढाई खेळण्यास सुरवात केली तर हे भाग्य आपल्यालाही लाभेलच लाभेल.

माऊली म्हणतात "अर्जुन मोठ्या वीरश्रीने युद्धास आला होता. तो सैन्यावर नजर टाकतो तोच श्रीकृष्णांनी आपला पांचजन्य नावाचा शंख फुंकला काय त्या शंखाचे सामर्थ्य हो! एवढा मोठा गदारोळ क्षणार्धात ऐकू येईनासा झाला. त्या शंखाचा ध्वनि म्हणजे जसा काही सूर्यच उगवला आणि त्याने आपल्या प्रकाशाने सगळी नक्षत्रे गिळून टाकली. कौरवांच्या सैन्यातील तो वाद्यध्वनि कुठेच्या कुठेच गेला. पाठोपाठ अर्जुनाने आपला देवदत्त शंख फुंकला. पांचजन्य व देवदत्त यांचे ध्वनि मिसळले. आतापर्यंत ब्रह्मकटाह थरथरतच होता. आता त्याचे शतशः तुकडे तुकडे होतात की, काय असे वाटू लागले. एवढ्यात भीमसेन आवेशाने पुढे सरसावला आणि महाकाळाप्रमाणे खवळून त्याने आपला पौंड्र नावाचा महाशंख फुंकला. महाप्रलयाच्या वेळच्या मेघाप्रमाणे तो गंभीर नाद घडघडत असतानाच युधिष्ठिराने अनंतविजय नावाच्या आपल्या शंखाचा आवाज त्यात ओतला. नकुळाने सुधोष, सहदेवाने मणिपुष्पक असे आपआपले शंख फुंकले आणि त्या आवाजाने धाबे दणाणले.

द्रुपद, द्रौपदेय, काशीपती, अभिमन्यू, सात्यकी, राजा धृष्टद्युम्न, शिखंडी, विराटादि प्रमुख योद्ध्यांनी आपआपल्या सैनिकांसह अखंड शंखनाद सुरू केला. शेष आणि कूर्म यांच्यावर अवचित या महाघोषाचा आघात झाल्याबरोबर तेही डळमळू लागले. वाटू लागले की, घाबरून आता ते पृथ्वीचे ओझे फेकून देतात की काय?

त्रैलोक्य डगमगू लागले, मेरु-मांदार हालू लागले आणि समुद्राचे पाणी कैलास पर्यंत उचंबळू लागले."

हा बाह्य देखावा अर्जुनाच्या मनाची आता पुढे जी व्याकुळ मनःस्थिती होणार आहे त्याचे प्रतीकच आहे. प्रथम त्याची वीरश्रीयुक्त मनःस्थिती दाखवून स्वजनांना शत्रु म्हणून समोर पाहिल्याबरोबर त्याच्या मनात जी अभूतपूर्व उलथापालथ झाली त्याची ही सूचनाच आहे. निसर्ग आणि मानवी मन यांची गुंफण सहज व सुंदर केली जाणार आहे.

संजय म्हणाला, "अहो काय हा कल्लोळ! पृथ्वी तर उलथू पहाते आहे. आकाशाला धक्के बसत आहेत. नक्षत्रे तुटून पडून पृथ्वीवर त्याचा सडा पडेल की काय असे वाटते आहे. सत्यलोकांत अशी ओरड झाली आहे की, "अहो, सृष्टि संपली हो संपली", एवढेच नव्हे तर देवदेखील निराधार झाले रे पहा."

असा आक्रोश झाल्याबरोबर दिवसाच अंधार पडला. प्रलयकाळच आला की, काय असे वाटू लागले. त्रैलोक्यात हाहाकार झाल्यामुळे आदिपुरुषास चमत्कार वाटला. मग त्याच्या मनांत आले की, एवढ्यातच सर्वनाश व्हावयास नको. हा संकल्प देवांच्या मनात आल्याबरोबर तो अद्भुत संभ्रम नाहीसा झाला आणि म्हणूनच केवळ विश्व सावरले. एरवी कृष्णादिकांच्या शंखनादानेच युगांत ओढवला होता.

अनुक्रमणिका

मूळ घोष थांबला पण जो काही प्रतिध्वनि राहिला होता तेवढ्यामुळेच कौरवांच्या कितीतरी सैन्याचा नाश झाला. हत्तींच्या समुदायामध्ये सिंह जशी सहज दाणादाण करतो त्याप्रमाणे त्या घोषाने कौरवांची हृदये फोडून काढली. तो प्रतिध्वनीचा गडगडाट ऐकून कौरव सेनेच्या हृदयाचा उभ्याउभ्याच थरकांप झाला. लढाई तर अजून दूरच आहे पण सैनिक एकमेकांस हाका मारून "सावध रे सावध" असे म्हणू लागले. आणि जे पराक्रमी महारथी वीर होते त्यांनी मग धीर देऊन आपआपली सैन्ये पुन्हा स्थिर केली. सैन्य पुन्हा सज्ज झाले. दुष्पट जोराने वर उसळले आणि तीन्ही लोक त्यांनी त्रस्त करून सोडले. प्रलयकालातील मेघांप्रमाणे ते धनुर्धर वीर एकमेकांवर बाणांचा पाऊस पाडू लागले.

अर्जुन खराखुरा वीर होता. युद्धाची ही धुमःश्चक्री पाहून त्याला अगदी आनंद झाला आणि लढाईचे स्फुरण चढले. उत्सुकतेने त्याने सैन्यावरून नजर फिरवली आणि संग्रामासाठी सज्ज झालेल्या त्या सगळ्या कौरवांकडे पाहून लीलेने धनुष्य उचलले आणि देवांना म्हटले,

"देवा, आता रथ एकदम त्या दोन्ही दळांच्यामध्ये घुसवून उभा करा. लढाई करायच्या ईर्षेने हे जे कोण कोण जमले आहेत त्या सगळ्या सैनिकांना मला एकदा न्याहाळून पाहू दे. इथे हजर तर सगळेच दिसतात पण त्यात माझ्या तोडीचा कोण वीर आला आहे ते पाहतो. हे कौरव अविचारी आणि दुष्ट आहेत. अंगी योग्यता नसतानाच केवळ बढाईने "आम्ही लढू" असे म्हणत आहेत. अहो देवा, ह्या सगळ्यांना युद्धाची हौस आहे पण योग्यता मुळीच नाही तेव्हा माझ्या बरोबरीचा योद्धा पाहूनच मला लढायला हवे आहे."

संजय राजा धृतराष्ट्राला म्हणाला, "राजा अर्जुनाच्या तोंडून हे वाक्य निघाले मात्र, सारथ्यचतुर श्रीकृष्णांनी रथ उडवला आणि दोन्ही सैन्यांच्या मध्यभागी आणून उभा केला.

अर्जुनाने शत्रुसैन्यावरून नजर फिरवली. प्रथमच दृष्टीस पडले भीष्म-द्रोणादिक गुरूजन! आणि त्यांच्या सभोवार जवळच्या नात्यांतील निरनिराळे राजेलोक!

अर्जुनाचे लक्ष प्रथम भीष्म-द्रोणांकडेच गेले. धर्मराजांचेही लक्ष प्रथम त्यांच्याचकडे गेले होते. त्यांनी युद्ध सुरू होण्यापूर्वी रथामध्ये आयुधे उतरून ठेवली, पादत्राण बाजूस सारले आणि ते अनवाणी एकाकी चालू लागले. दोन्ही पक्ष धर्मराजाचे हे वर्तन पहातच राहिले. धर्मराज थेट भीष्माचार्याच्या रथाजवळ गेले आणि म्हणाले "पितामह, मी, युधिष्ठिर आपल्या पायांना वंदन करतो आहे."

भीष्माचार्यांनी वंदन स्वीकारले आणि प्रेमाने त्याच्याकडे पहात विचारले, "युधिष्ठिरा, कोणता हेतू मनात धरून आला आहेस?"

धर्मराज हात जोडून म्हणाले, "महाराज, या युद्धात माझा जय होईल असा आपण मला आशीर्वाद द्यावा."

भीष्माचार्यांनी आशीर्वादासाठी हात उंचावून म्हटले, "धर्मराजा, तू नम्रतेने आलास, माझा आशीर्वाद

मागितलास, मी आनंदाने आशीर्वाद देतो की, 'जय तुझाच होईल.' तू जर आता येऊन नम्रतापूर्वक आशीर्वाद मागितला नसतास तर तुला कदापि जय मिळाला नसता."

द्रोणाचार्य, कृपाचार्य ह्या गुरूजनांच्या रथाजवळ जाऊन नम्रतेने वंदन करून धर्मराजांनी आशीर्वाद घेतला आणि ते परत फिरले, रथात येऊन बसले, आयुधे उचलली आणि युद्धास सुरुवात केली.

मनात येते धर्मराजांची काय ही जाज्वल्य धर्मनिष्ठा! एकटे, अनवाणी चाललेले जे ज्येष्ठ पांडव केवळ एका सामान्य सैनिकाच्याही एका बाणाचे भक्ष्य होते. पण कुणाचाही हात उचलला नाही. हा उदात्त प्रसंग पहात ती दोन्ही युयुत्सु सैन्ये तटस्थ उभी राहीली.

अर्जुनाचे लक्षही भीष्म, द्रोणांच्या पायाशीच स्थिर झाले. उभ्या असलेल्या रथातून अर्जुन त्या सगळ्या सैन्याकडे पुन्हा पुन्हा निरखून पाहू लागला. त्याचे मन गोंधळून गेले. देवाकडे पहात तो म्हणाला, "कृष्णा, पहा, पहा हे सगळे एकूण एक आमचे गोत्रजच की."

त्या हृदयस्थ भगवंतास अर्जुनाची मनःस्थिती कळत होती, इतकेच काय, पण पुढे काय काय घटना घडणार हेही त्यास माहीत होतेच. तरीही देव आपल्याशीच चकित होऊन म्हणू लागले, "हे आणि काय याच्या मनात आले नवीनच?"

काहीच उत्तर न देता देव अर्जुनाकडे पहातच राहिले. अर्जुनाची मनःस्थिती तर अधिकाधिक व्याकुळ होऊ लागली. चुलते, आजे, गुरू, भाऊ, मामा, इष्टमित्र, मुलेबाळे ही सर्व जिवलग मंडळी युद्धासाठी शस्त्रास्त्रे घेऊन उभी ठाकलेली पाहून अर्जुनाच्या मनात कल्लोळ झाला. यांच्यावर आपण एकेकाळी उपकार केले, संकटकाळी ज्यांचे आपण रक्षण केले, ती वडीलधारी मंडळी आणि लहान मुले पाहून ही लढाई म्हणजे आपण आपल्या उरात शस्त्र खुपसणे आहे हे त्याला जाणवू लागले. आपलेच कुळ वैराने व्यापून, दुभंगून, दोन फळ्या करून; संहारास आवेशाने एकमेकावर झडप घालण्यास उत्सुक झालेले पाहून अर्जुनाचे मन गजबजू लागले. हृदयात कृपेने प्रवेश करून स्वामिनीपद घेतलेले पहाताच त्या अपमानाने संतप्त झालेली वीरवृत्ती घर सोडून निघाली, साहजिकच आहे. उत्तम कुळातली तेजस्वी रूपवान, गुणवती, कन्या काय सवत सहन करील? एखादा कामी पुरुष नवीन स्त्रीच्या मोहात पडतो आणि भ्रमाने स्वतःची धर्मपत्नी विसरतो. तशी अर्जुनाची स्थिती झाली. उत्तम तप केल्यामुळे ऋद्धिसिद्धि प्राप्त झालेला तापस त्यांच्यामध्ये गुंतून वैराग्यसिद्धि विसरूनच जातो, तसे अर्जुनाचे झाले. अंतःकरणात करुणा आल्याबरोबर त्याच्या ठिकाणी हक्काने कायम वास करणारी वीरपुरुषवृत्ती निघून गेली."

माऊलींच्या दृष्टांताची काय मौज आहे! अर्जुनाच्या वीरवृत्तीस धर्मपत्नी म्हटले व करुणेस नवीन वनिता म्हटले. वीरवृत्तीरूपी धर्मपत्नी तेजस्वी, कुलवती आहे. आजवर तिनेच संसार चालविला आहे, ती सर्व आपत्तीत त्याच्याबरोबर राहिली आहे. तीच त्या शूर वीरास उचित गृहिणी आहे पण अयोग्य अशा करुणेच्या स्वाधीन अर्जुन झालेला पाहून, ती संतापून निघून गेली असा अत्यंत मनोहर दृष्टांत माऊलींनी योजला आहे. परस्त्रीची अभिलाषा, सिद्धीचा मोह आणि अकाली उत्पन्न झालेली ही करुणा मोहक खरी पण दुःखदायक व

अनुक्रमणिका

पतनास कारण होणारी आहे असे सुचविले जात आहे. तापसास सिद्धि, सांसारिकास परस्त्री आणि वीरास युद्धप्रसंगी करुणा ह्या तिन्ही गोष्टी अनुचित व अधोगतीस नेणाऱ्या आहेत हे सांगून, अर्जुनाच्या अस्थानी दयालुत्वाचे फसवे स्वरूप माऊलींनी प्रगट केले आहे. ह्या तिन्ही दृष्टांतानी विषय स्पष्ट झाला की, नाही अशी शंका येऊन ज्ञानदेव म्हणतात, "मांत्रिक मंत्रोच्चार करताना चुकला, म्हणजे पिशाच्चाचा बंदोबस्त न होता उलट तो मांत्रिकाच्याच अंगात संचार करून, त्याची बुद्धि झाकोळून टाकतो. त्याप्रमाणे त्या धनुर्धर अर्जुनास महामोहाने ग्रासून टाकले.

चंद्रकिरणामध्ये सोमकांत मणी पाझरावा त्याप्रमाणे अर्जुनाच्या मनातील वीरवृत्ती नाहीशी झाली आणि करुणेच्या स्पर्शाने त्याचे मन द्रवू लागले. अतिशय प्रबळ मोहाने व्याप्त झालेला अर्जुन अच्युतास म्हणू लागला, "बघा हो देवा, हा आप्तस्वकीयांचा मेळावा!"

कर्तव्यच्युत झालेला अर्जुन देवाकडे वळून बोलू लागल्याबरोबर ज्ञानदेवांनी देवांचे "अच्युत" हे नाव घेतले आहे. मूळ गीतेत नसताना माऊलींनी अनेक ठिकाणी सहजसुंदर अशी स्वतःची सूचक मांडणी केली आहे. त्यातलाच हा एक प्रसंग. देवांची नावे अगणित पण प्रसंगास योग्य असे नाव माऊलींनी योजले आहे. मनात येते की, आपल्याच ठिकाणी हे भगवत् तत्त्व अच्युतरूपाने नांदते. मन गोंधळते, भावना हेलावतात, बुद्धि चालत नाही अशा वेळी ह्या च्युतीचा गोंधळ अलिप्ततेने, स्थिर राहून, साक्षीभावाने पहाणारे अच्युत तत्त्व आपल्या ठिकाणीही असते. कर्तव्यापासून च्युत होत असताना व्याकुळ झालेल्या अर्जुनाने "अच्युता" अशी भगवंतास हाक मारली हे किती उचित आहे! अशी साद आपणच आपल्या आत्मतत्त्वास घालून कर्तव्याचा निर्णय घ्यावा असेच जणू माऊली सुचवत आहेत.

ज्ञानदेंव पुढे म्हणतात, "देवा अच्युता, आपण हा मेळावा बघितला का? हे सर्वजण युद्ध करण्यास उत्सुक आहेत खरे, पण आपण त्यांच्याशी लढाई करणे योग्य आहे काय? देवा, नुसत्या त्या कल्पनेनेच मला कापरे भरले आहे. मला माझे भान राहीना, मन, बुद्धिही थाऱ्यावर राहीनात, तोंड कोरडे पडले आहे आणि सगळी गात्रे विकल झाली आहेत. सगळ्या अंगावर कांटा फुलला आहे आणि मनामध्ये असह्य यातना होत आहेत. देवा, अहो पहा, गांडीव धनुष्यदेखील मला नकळत हातातून गळून पडले आहे. माझा हात ढिला कधी झाला, धनुष्य कधी निसटले हे सुद्धा मला कळले नाही. माझ्या मनात इतका गोंधळ उडाला आहे, काय करू मी आता?"

ज्याने लढाईत प्रत्यक्ष रुद्राचा पराभव केला, निवात आणि कवच ह्या समुद्रतीरी राहणाऱ्या हिरण्यकश्यपूच्या नातवांचा ज्याने बीमोड केला, त्या शूराग्रणी अर्जुनाला मोहाने कसे ग्रासून टाकले आहे पहा. वज्राहून कठीण व दुर्धर असे त्या अर्जुनाचे अंतःकरण पंण क्षणार्धातच मायेने त्याला कसे पराभूत केले आहे, कितीही कठीण लाकूड असो ते पोखरून भ्रमर त्याचा भुगा करून टाकतो पण जर का तो कमळाच्या कोवळ्या कळीत अडकला तर प्राण गेला तरी, ते कोमल दल चिरून बाहेर पडण्याची कल्पनासुद्धा मनात आणू शकत नाही. मायेचा हा अद्भुत  प्रभाव पाहून संजय धृतराष्ट्राला म्हणाला, "महाराज, ऐकावे, त्या आदिपुरुषाच्या मायेचा प्रभाव प्रत्यक्ष त्या ब्रह्मदेवालाही पुरा कळलेला नाही. तिच्यामुळेच अर्जुनाला भूल पडली. आपले आप्त पाहून युद्धाच्या अभिमानाचा त्याला कसा विसर पडला पहा." कशी कुणास ठाऊक अनिवार सदयता त्याच्या

चित्तात उत्पन्न झाली आणि तो म्हणू लागला, “कृष्णा रे, आता क्षणभरसुद्धा इथे नको असायला. जाऊ या कुठे तरी दिगंतराला. ह्यांना मारायचे ह्या नुसत्या कल्पनेनेच माझे मन व्याकुळ झाले आहे. तोंडातून धड शब्दही फुटत नाही. चल रे इथून. अरे, यांना मारायचं तर ते युधिष्ठिरादिकांस मारल्यासारखंच आहे. हे सगळेच आपले गोत्रज आहेत. जळो ती लढाई, मला काही कर्तव्य नाही तिच्याशी. हे महापाप करून ते फेडायला जायचं कुठ? देवा, अहो लढलो तर ते एक महाभयंकर कर्म होईल. आता जो लाभ व्हायचा तो लढाई टळली तरच होईल. मला आता विजयाची इच्छासुद्धा उरली नाही. सर्वनाश करून राज्य मिळाले तरी नको. काय करायचं आहे ते घेऊन? ह्यांना सर्वांना मारायचे, मग ते राज्यभोग प्राप्त व्हावयाचे त्यापेक्षा जळोत ते भोग.” असे पार्थ म्हणू लागला.

“श्रीकृष्णा, ह्या राज्यसुखाच्या अभावी जे जे नशिबी येईल ते भोगावे लागले तरी चालेल, किंबहुना या सर्व स्वजनासाठी मला माझे प्राण गमवावे लागले तरी चालेल, पण यांचा घात करावा आणि राज्य भोगावे ही कल्पना स्वप्नातही माझे मन करू शकत नाही. या वडील मंडळीशी वैर करावयाचे तर जगायचे तरी कशाला? मुलानेच जर आपल्या कुळाचा संहार करावयाचा तर तो मुलगा देवाजवळ मागायचा तरी कशाला? आपण या वडिलांच्या नाशाच्या कल्पना मनात येऊ तरी कशा द्यायच्या? त्या तर वज्रासारख्या वाटत आहेत. अरे, हातून काही घडावेच तर ह्यांचे भले घडावे. आम्ही पराक्रम करावा, कोश जिंकून आणावे, आणि ते ह्यांनी भोगावे. यांच्यावरून आम्ही आमचा जीव कुरवंडी करावा आणि त्यांचे कार्य यशास न्यावे. दिगंतीचे राजे जिंकून या आमच्या कुळास आम्ही संतोष द्यावा. कसे आमचे नशीब की, हे उफराटे कर्मच सिद्ध झाले आहे! हे गुरुजन आमच्याशीच लढायला काय म्हणून उद्युक्त झाले असतील? बायका मुले टाकून भाल्यावर आपले शिर चढवून हे सगळे आप्त काय म्हणून आमच्यावर धावून आले असतील? ते जरी लढाई करण्यास उत्सुक असले तरी मी त्यांना मारू कसा? कुणावर हत्यार चालवू? माझ्याच काळजावर तलवार चालवू काय?

देवा तुम्ही ह्यांना ओळखलं नाही का हो! अहो, दूर असले तरी ओळखू येतात ना? ते बघा भीष्म पितामह! ते बघा गुरू द्रोणाचार्य! काय अपार उपकार आहेत आमच्यावर त्यांचे! हे मेहुणे, हे सासरे, हे मामा, ते बंधु ही सगळी आमचीच माणसे! ती पहा आमची लाडकी नातवंडे! देवा बघा तरी आमचे अगदी जिवलग सखेसायरे आहेत हे सर्वजण! “यांना मारूया”! असे नुसते म्हटले तरी वाचा विटाळेल.

श्रीकृष्णा, ठरला माझा निश्चय. हे मला काही करोत. भले माझा प्राण घेवोत. पण त्यांचा घात करावा हे मी मनातही आणणार नाही.

त्रैलोक्याचे राज्य जरी कोणी माझ्या हाती आणून दिले तरी मी त्यासाठी ही लढाई करणार नाही.”

अर्जुन व्याकुळ होऊन हात जोडून भगवंताची विनवणी करीत होता. देव स्तब्धच होते. अनुतापाच्या लहरीवर लहरी अर्जुनाच्या मनात येत होत्या. स्वजनांचा वध करून जर आपण पापी झालो तर काय होईल हा विचार मनात आला मात्र, आर्त स्वरात त्याने आपल्या सख्याला हाक मारली आणि तो म्हणाला,

“आम्ही जर हे हीन कृत्य केले तर कोण आमचा मान ठेवील? देवा, तुझ्या तरी तोंडाकडे आम्ही कसे

पहावे? गोत्रजांचा वध करून दोषांचे माहेरघर जर आम्ही पापी झालो तर आमच्या हाती मोठ्या पुण्याईच्या बळाने सापडलेला तू आम्हाला अंतरशील."

मी, ज्ञानेश्वरी वाचनास १९७० साली श्री. स. कृ. देवधरांनी सांगितलेल्या क्रमाने सुरवात केली. पंधरा दिवसात पारायण संपवावे असे त्यांनी सांगितले होते. त्या काळात मनामध्ये अनेक लढाया चालू होत्या. दोन वर्षे अखंड वाचन चालू होते पण प्रत्येक पारायणाच्या वेळी ह्या ओळी आल्या की, मन गजबजायचे. वाटायचे आपण तर ह्या चार-दोन व्यक्तींवर व्यावहारिक मतभेदामुळे राग धरून आहोत. त्या व्यक्तींच्याबद्दल विचार आला रे, आला की, रागाचे, द्वेषाचे काहूर उठते. अशा या अपवित्र जागी तो भगवंत पाय तरी ठेवील काय? शिवाप्रमाणे निंदेचे विष पचवून जगास अमृताचे वरदान देणाऱ्या त्या ज्ञानदेवांची ही ज्ञानेश्वरी हातात धरण्याची तरी आपली लायकी आहे काय? जे घडते ते माझ्या प्रारब्धाने घडते, दुसऱ्याच्या करणीमुळे नव्हे, हा बोध माझ्या मनात कधी तरी ठसेल काय? मनाची तळमळ व्हावयाची पण फारसा उपयोग व्हावयाचा नाही. राग कमी व्हावयाचा नाही. मग असाच एक प्रसंग आला की ज्यांच्याबद्दल राग त्या व्यक्तींबरोबरच, चार-सहा दिवस एकत्र रहायला हवे. आधी दीड दिवस प्रवास आणि मग पुढे सहा दिवस सहजीवन. ज्ञानेश्वरीपुढे डोके टेकले आणि कळवळून प्रार्थना केली की माऊली, आपणच मला बळ द्या. माझ्या मनातील हा राग, द्वेष संपूर्ण जाऊ देच पण त्याऐवजी निर्भेळ प्रेम येऊ दे. शांतपणाने विचार केला तर त्या अवस्थेत, "हे तर माझेच प्रारब्ध! दुसऱ्यास दोष का? हे पटते पण आठवणींनी दंश मारला की, मन पेटून उठते. आता माझे बळ संपले. आपण कृपा करा! आणि हा राग घालवा. आपली पाईक म्हणवून घेण्यासारखी उचित क्रिया माझ्या हातून घडू दे. आपणच संभाळा." आणि मग प्रवासात दीड दिवस अखंड ज्ञानेश्वरी वाचली. इतक्या आर्ततेने हाक मारल्यावर न येईल ती माऊली कसली? तिने मन स्फटिकासारखे स्वच्छ केले. जुन्या घटनांची आठवण मृतप्राय केली आणि मग त्या जागी नव्या प्रेमाचे अंकुर आणले. सर्व दृष्टिकोनच बदलून टाकला. तो सहजीवनाचा काल तर उत्तम पार पडलाच, पण पुन्हा पुढे कधीही ती कडू भावना मनात आली नाही. आणि म्हणून ह्या ओवीशी आले की, अर्जुनाची व्यथा थेट काळजापर्यंत भिडते आणि वाटते, "ही तर माझीच युगायुगाची व्यथा!"

अर्जुन पुन्हा विनवतो आहे, "देवा, हे पाप माझ्या हातून घडू देऊ नका हो! कुलसंहारासारखे पातक अंगाशी जडल्यावर तुला कसा नी कुठे पहावा? बागेमध्ये वणवा पेटला की, कोकिळ क्षणभर तरी तिथे राहील का? चकोर कितीही तृषार्त असला तरी सरोवराच्या गढूळ पाण्यात चोंच घालील काय? पेटलेली आग आणि गढूळलेले पाणी पाहून कोकिळ आणि चकोर त्या अपवित्रांचा त्याग करून तिथून निघून जाणार नाहीत काय? ते बिचारे सामान्य पक्षी, आपण प्रत्यक्ष भगवंत! त्या पक्ष्यांनाही हे ज्ञान आहे तर पुण्याचा ओलावा नाहीसा झाल्यावर, मायेच्या अंधारात आम्हाला टाकून तू आमचा नक्की त्याग करणार नाहीस काय? तुझ्याशी वियोग झाल्यावर आमचे ह्या जगात राहिलेच काय? देवा रे! त्या वियोगदुःखाने आमचे हृदय फुटेल. नाही, नाही! मी हे युद्ध करणार नाही. यात मला दोषच दोष दिसतात. मी मुळीच हत्त्यार उचलणार नाही. मी ह्या कौरवांना मारणारही नाही आणि ते राज्यभोग भोगणारही नाही. देवा, हे कालत्रयी होणार नाही.

कौरव मदांध झाले आहेत आणि संग्रामास तयार होऊनच आले आहेत म्हणून काय आम्ही पण मदांध व्हावे काय? अविचार करावा? पाप करावे? हे आपले असून मारावे? काळकूट विष कुणी दिले तर ते महाविष जाणूनबुजून आपण खावे काय? देणाऱ्याला कळत नसेल तर घेणाऱ्याला तरी कळायला हवे ना? सिंह अवचित

समोर आला तर काय त्याला सामोरे जाऊन प्राण गमावावा काय? की, जरा वाट चुकवून आपला जीव वाचवावा? हातात असलेला दिवा टाकून देऊन, काळोख्या विहिरीत समजून-उमजून उडी टाकण्यात काय फायदा आहे? समोर धगधगणारी आग दिसत असताना ती चुकवून बाजूस सरले नाही तर निमिषार्धात ती आपल्याला कवळून भस्म करणार नाही काय? हे मूर्तिमंत दोष अंगावर कोसळून येत असताना त्यापासून परावृत्त व्हायला नको काय? का, त्यातच अविचाराने उडी मारायची? देवा, हे पातक किती घोर आहे हे तुम्हाला सांगू का? जंगलात झाडेच झाडावर घासली जातात आणि दावाग्नि पेटतो. एकदा पेटला की, उभ्या वनाची राखरांगोळी होते. तसेच अशा वेळी घडते. गोत्रामध्ये मत्सराग्नि पेटतो. त्यातून एकमेकांचा वध होतो, आणि त्या वैराग्नीत सगळ्या कुळाची आहुती पडते. यातून निर्माण झालेल्या पापामुळे वंशपरंपरागत चालत आलेल्या धर्माचा लोप होतो, आणि उरतो केवळ अधर्मच! हातात असलेला दिवा टाकला की, सरळ वाट असून पायात अडथळे येतात. त्याप्रमाणे सारासार विचार थांबला की, कोणी कसे आचरण करावे हे विधिनिषेधही थांबतात. कुळक्षयच झाल्यामुळे आद्यधर्म लोपतो आणि पाप जास्त जास्त प्रबळ होऊ लागते. यमनियम पाळले जात नाहीत. इंद्रिये सैरावैरा धावतात आणि मग सहज कुलस्त्रियांच्या हातूनहि व्यभिचार घडतो. उत्तम आणि अधम यांचा संकर होतो. वर्णावर्ण मिसळतात. जातिधर्म समूळ उपटले जातात आणि चव्हाट्यावर टाकलेल्या बळीवर जसे कावळे तुटून पडतात, तशी महापातके ह्या कुळावर झडप घालतात. संपूर्ण कूळ व कुळघातक यांना नरकाची प्राप्ती होते. वंशातील प्रजेची अशी अवस्था झाली की, स्वर्गस्थ पितर फिरून परत येतात. नित्यनैमित्तिक धर्मकृत्ये थांबल्यामुळे कोण कोणाला तिलोदक देणार? मग पितर तरी स्वर्गात कसे स्थिर होणार? तेही परतून मृत्युलोकी कुळाजवळ येतात. नखाग्रास सर्प डसला की, जसे नखशिखांत हा हा म्हणता विष पसरते तसे अशा महापातकांनी वंशजास ग्रासले की, पूर्वजच काय पण प्रत्यक्ष ब्रह्मदेवापर्यंत त्या विषाचा अंमल चढतो. देवा, हा अनर्थ इथेही थांबत नाही. त्या कुळाच्या संसर्गाने अवतीभवतीचे लोकही आचारभ्रष्ट होतात. पेटलेल्या घराशेजारची घरे जशी अकस्मात धडाडून पेटतात त्याप्रमाणे त्या कुळाच्या सान्निध्यात जी जी कूळे जगतात तीही या पातकी कुळामुळे बाधित होतात. अनेक दोषांमुळे त्या कुळाला किती भयंकर नरकयातना भोगाव्या लागतात! एकदा त्या नरकात पडल्यावर कल्पांतीही त्यातून त्या पातक्यांची सुटका होत नाही. ही एवढी अधोगती ह्या कलहातून, कुळक्षयातून निर्माण होते.

देवा! मी इतक्या विनवण्या करतो आहे पण आपण त्याकडे लक्षच देत नाही की अहो, आपण आपले मन काय वज्रासारखे अभेद्य केले आहे काय? ऐका हो! माझे जरा. ज्यासाठी हे राज्यसुख मिळविण्याची इतकी यातायात करावयाची ते शरीरदेखील क्षणभंगुरच! पुन्हा. देवा, हे सगळे कळत असूनसुद्धा मी त्या दोषांचा त्याग करू नको काय? खरे म्हटले तर ह्या वडील मंडळींच्याकडे अशा घातकी नजरेने आम्ही पाहिले हेच केवढे तरी पातक घडले आहे. आता हे पातक घडले ते घडलेच आता तरी थोडा विचार करायला हवा. कृष्णा, असे वाटते आहे की, हा अपवित्र देह ठेवूच नये. हातातील शस्त्रे खाली ठेवावी आणि खुशाल ह्यांचे बाण झेलावे, होतील ते क्लेश सहन करावे, प्राणत्यागही करावा पण हे पातक करण्याची इच्छाही करू नये."

धृतराष्ट्रास उद्देशून संजय म्हणाला, "महाराज, लढाईसाठी उत्सुक होऊन समोर ठाकलेल्या कुळाकडे पाहून अर्जुन व्याकुळ झाला आणि "राज्यभोग म्हणजे प्रत्यक्ष नरकच" असा त्याने मनाशी निश्चय केला.

अनुक्रमणिका

अत्यंत उद्विग्न झालेला अर्जुन गहिवरून गेला. त्याला रथात बसवेनासुद्धा. त्याने धाडकन रथावरून खाली उडी घेतली. धनुष्यबाण टाकले. दुःखाने जर्जर झालेल्या अर्जुनाने ओंजळीत तोंड लपविले. त्या ओंजळीतसुद्धा त्याचे अश्रू मावेनात. पदच्युत झालेला राजकुमार किंवा राहूने ग्रासलेला सूर्य जसा प्रभाहीन दिसतो, तसा तो अर्जुन दिसू लागला. महासिद्धीच्या मोहाने भ्रमलेला, तापसी कामविकाराने पछाडून जावा तसा तो दीन दिसू लागला."

रथच्युत झालेल्या त्या बापुडवाण्या पार्थाला आता तो वैकुंठनाथ परमार्थाचा कसा कसा बोध करील ती सविस्तर कथा पुढे आहे. निवृत्तिदास ज्ञानदेव म्हणतात की, "ती कथा ऐकावयास फारच विस्मयकारक आहे. ऐकावी महाराज."

ज्ञानदेवांनी याप्रमाणे पहिला अध्याय संपवला आहे. इंग्रजीत म्हटले जाते "The stage is set" तसे झाले आहे. आता आपण विसरायची आहे ती पार्श्वभूमि, ते हत्ती घोडे, शस्त्रास्त्रे घेतलेले ते रथी महारथी, ती द्रौपदीची विटंबना, तो लाक्षागृहदाह, ते जीवघेणे द्यूत आणि तो लाजिरवाणा वनवास! आता आपल्यापुढे उभा आहे तो मोहग्रस्त अर्जुन आणि त्याचा जिवलग सखा श्रीकृष्ण. भाग्य त्या धृतराष्ट्राचे की, हा त्या दोघांचा संवाद सांगण्यासाठी संजयासारखा द्रष्टा मिळाला. भाग्य आपले की, त्या संवादाचे रहस्य बोलीभाषेमध्ये आपल्यासारख्यांना उलगडून सांगण्यासाठी ज्ञानदेवासारखी परम कारुण्यवत्सल आई भेटली. धृतराष्ट्र, संजय, अर्जुन आणि भगवंत या चौघांचा एकमेकांतील संवाद आपण ऐकतोच पण ज्ञानदेव ह्या चौघांच्याही अंतर्मनाचे साक्षी आहेत आणि आपल्यालाही ते तेथवर नेत आहेत. फक्त आता आपण आपल्यालाच विनवावयाचे की,

**"जीवा, अवधान दीजे."**

***

अनुक्रमणिका

॥ श्री ॥

अध्याय दुसरा

# सांख्ययोग

॥ ॐ नमो भगवते वासुदेवाय ॥

संजय उवाच—

तं तथा कृपयाऽऽविष्टमश्रुपूर्णाकुलेक्षणम् ।
विषीदन्तमिदं वाक्यमुवाच मधुसूदनः ॥ १ ॥

श्रीभगवानुवाच—

कुतस्त्वा कश्मलमिदं विषमे समुपस्थितम् ।
अनार्यजुष्टमस्वर्ग्यमकीर्तिकरमर्जुन ॥ २ ॥

क्लैब्यं मा स्म गमः पार्थ नैतत्त्वय्युपपद्यते ।
क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ परंतप ॥ ३ ॥

अर्जुन उवाच—

कथं भीष्ममहं संख्ये द्रोणंच मधुसूदन ।
इषुभिः प्रतियोत्स्यामि पूजार्हावरिसूदन ॥ ४ ॥

गुरूनहत्वा हि महानुभावान् श्रेयो भोक्तुं भैक्ष्यमपीह लोके ।
हत्वाऽर्थकामांस्तु गुरूनिहैव भुञ्जीय भोगान् रुधिरप्रदिग्धान् ॥ ५ ॥

न चैतद्विद्मः कतरन्नो गरीयो यद्वा जयेम यदि वा नो जयेयुः ।
यानेव हत्वा न जिजीविषामस्तेऽवस्थिताः प्रमुखे धार्तराष्ट्राः ॥ ६ ॥

कार्पण्यदोषोपहतस्वभावः पृच्छामि त्वां धर्मसंमूढचेताः ।
यच्छ्रेयः स्यान्निश्चितं ब्रूहि तन्मे शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम् ॥ ७ ॥

अनुक्रमणिका

न हि प्रपश्यामि ममापनुद्याद्यच्छोकमुच्छोषणमिन्द्रियाणाम् ।
अवाप्य भूमावसपत्नमृद्धं राज्यं सुराणामपि चाऽऽधिपत्यम् ॥ ८ ॥

संजय उवाच—

एवमुक्त्वा हृषीकेशं गुडाकेशः परंतप ।
न योत्स्य इति गोविंदमुक्त्वा तूष्णीं बभव ह ॥ ९ ॥

तमुवाच हृषीकेशः प्रहसन्निव भारत ।
सेनयोरुभयोर्मध्ये विषीदन्तमिदं वचः ॥ १० ॥

श्रीभगवानुवाच—

अशोच्यानन्वशोचस्त्वं प्रज्ञावादांश्च भाषसे ।
गतासूनगतासूंश्च नानुशोचन्ति पंडिताः ॥ ११ ॥

न त्वेवाहं जातु नाऽऽसं न त्वं नेमे जनाधिपाः ।
न चैव न भविष्यामः सर्वे वयमतः परम् ॥ १२ ॥

देहिनोऽस्मिन्यथा देहे कौमारं यौवनं जरा ।
तथा देहान्तरप्राप्तिर्धीरस्तत्र न मुह्यति ॥ १३ ॥

मात्रास्पर्शास्तु कौन्तेय शीतोष्णसुखदुःखदाः ।
आगमापायिनोऽनित्यास्तांस्तितिक्षस्व भारत ॥ १४ ॥

यं हि न व्यथयंत्येते पुरुषं पुरुषर्षभ ।
समदुःखसुखं धीरं सोऽमृतत्वाय कल्पते ॥ १५ ॥

नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सतः ।
उभयोरपि दृष्टोऽन्तस्त्वनयोस्तत्त्वदर्शिभिः ॥ १६ ॥

अविनाशि तु तद्विद्धि येन सर्वमिदं ततम् ।
विनाशमव्ययस्यास्य न कश्चित्कर्तुमर्हति ॥ १७ ॥

अंतवन्त इमे देहा नित्यस्योक्ताः शरीरिणः ।

अनाशिनोऽप्रमेयस्य तस्माद्युध्यस्व भारत ॥ १८ ॥

य एनं वेत्ति हन्तारं यश्चैनं मन्यते हतम् ।
उभौ तौ न विजानीतो नायं हन्ति न हन्यते ॥ १९ ॥

न जायते म्रियते वा कदाचिन्नायं भूत्वा भविता वा न भूयः ।
अजो नित्यः शाश्वतोऽयं पुराणो न हन्यते हन्यमाने शरीरे ॥ २० ॥

वेदाविनाशिनं नित्यं य एनमजमव्ययम् ।
कथं स पुरुषः पार्थ कं घातयति हन्ति कम् ॥ २१ ॥

वासांसि जीर्णानि यथा विहाय नवानि गृह्णाति नरोऽपराणि ।
तथा शरीराणि विहाय जीर्णान्यन्यानि संयाति नवानि देही ॥ २२ ॥

नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः ।
न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारुतः ॥ २३ ॥

अच्छेद्योऽयमदाह्योऽयमक्लेद्योऽशोष्य एव च ।
नित्यः सर्वगतः स्थाणुरचलोऽयं सनातनः ॥ २४ ॥

अव्यक्तोऽयमचिन्त्योऽयमविकार्योऽयमुच्यते ।
तस्मादेवं विदित्वैनं नानुशोचितुमर्हसि ॥ २५ ॥

अथ चैनं नित्यजातं नित्यं वा मन्यसे मृतम् ।
तथाऽपि त्वं महाबाहो नैवं शोचितुमर्हसि ॥ २६ ॥

जातस्य हि ध्रुवो मृत्युर्ध्रुवं जन्म मृतस्य च ।
तस्मादपरिहार्येऽर्थे न त्वं शोचितुमर्हसि ॥ २७ ॥

अव्यक्तादीनि भूतानि व्यक्तमध्यानि भारत ।
अव्यक्तनिधनान्येव तत्र का परिदेवना ॥ २८ ॥

आश्चर्यवत्पश्यति कश्चिदेनमाश्चर्यवद्वदति तथैव चान्यः ।
आश्चर्यवच्चैनमन्यः श्रृणोति श्रुत्वाप्येनं वेद न चैव कश्चित् ॥ २९ ॥

देही नित्यमवध्योऽयं देहे सर्वस्य भारत ।

तस्मात्सर्वाणि भूतानि न त्वं शोचितुमर्हसि ॥ ३० ॥

स्वधर्ममपि चावेक्ष्य न विकम्पितुमर्हसि ।
धर्म्याद्धि युद्धाच्छ्रेयोऽन्यत्क्षत्रियस्य न विद्यते ॥ ३१ ॥

यदृच्छया चोपपन्नं स्वर्गद्वारमपावृतम् ।
सुखिनः क्षत्रियाः पार्थ लभन्ते युद्धमीदृशम् ॥ ३२ ॥

अथ चेत्त्वमिमं धर्म्यं संग्रामं न करिष्यसि ।
ततः स्वधर्मं कीर्तिं च हित्वा पापमवाप्स्यसि ॥ ३३ ॥

अकीर्तिं चापि भूतानि कथयिष्यन्ति तेऽव्ययाम् ।
संभावितस्य चाकीर्तिर्मरणादतिरिच्यते ॥ ३४ ॥

भयाद्रणादुपरतं मंस्यन्ते त्वां महारथाः ।
येषां च त्वं बहुमतो भूत्वा यास्यसि लाघवम् ॥ ३५ ॥

अवाच्यवादांश्च बहून्वदिष्यन्ति तवाहिताः ।
निन्दन्तस्तव सामर्थ्यं ततो दुःखतरं नु किम् ॥ ३६ ॥

हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा मोक्ष्यसे महीम् ।
तस्मादुत्तिष्ठ कौन्तेय युद्धाय कृतनिश्चयः ॥ ३७ ॥

सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ ।
ततो युद्धाय युज्यस्व नैवं पापमवाप्स्यसि ॥ ३८ ॥

एषा तेऽभिहिता सांख्ये बुद्धिर्योगे त्विमां श्रृणु ।
बुद्ध्या युक्तो यया पार्थ कर्मबंधं प्रहास्यसि ॥ ३९ ॥

नेहाभिक्रमनाशोऽस्ति प्रत्यवायो न विद्यते ।
स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ॥ ४० ॥

व्यवसायात्मिका बुद्धिरेकेह कुरुनंदन ।
बहुशाखा ह्यनंताश्च बुद्धयोऽव्यवसायिनाम् ॥ ४१ ॥

यामिमां पुष्पितां वाचं प्रवदन्त्यविपश्चितः ।

अनुक्रमणिका

वेदवादरताः पार्थ नान्यदस्तीति वादिनः ॥ ४२ ॥

कामात्मानः स्वर्गपरा जन्मकर्मफलप्रदाम् ।
क्रियाविशेषबहुलां भोगैश्वर्यगतिं प्रति ॥ ४३ ॥

भोगैश्वर्यप्रसक्तानां तयापहृतचेतसाम् ।
व्यवसायात्मिका बुद्धिः समाधौ न विधीयते ॥ ४४ ॥

त्रैगुण्यविषया वेदा निस्त्रैगुण्यो भवार्जुन ।
निर्द्वन्द्वो नित्यसत्त्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान् ॥ ४५ ॥

यावानर्थ उदपाने सर्वतः संप्लुतोदके ।
तावान्सर्वेषु वेदेषु ब्राह्मणस्य विजानतः ॥ ४६ ॥

कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।
मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते सङ्गो ऽस्त्वकर्मणि ॥ ४७ ॥

योगस्थः कुरु कर्माणि सङ्गं त्यक्त्वा धनंजय ।
सिद्ध्यसिद्ध्योः समो भूत्वा समत्वं योग उच्यते ॥ ४८ ॥

दूरेण ह्यवरं कर्म बुद्धियोगाद्धनंजय ।
बुद्धौ शरणमन्विच्छ कृपणाः फलहेतवः ॥ ४९ ॥

बुद्धियुक्तो जहातीह उभे सुकृतदुष्कृते ।
तस्माद्योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ॥ ५० ॥

कर्मजं बुद्धियुक्ता हि फलं त्यक्त्वा मनीषिणः ।
जन्मबन्धविनिर्मुक्ताः पदं गच्छन्त्यनामयम् ॥ ५१ ॥

यदा ते मोहकलिलं बुद्धिर्व्यतितरिष्यति ।
तदा गन्तासि निर्वेदं श्रोतव्यस्य श्रुतस्य च ॥ ५२ ॥

श्रुतिविप्रतिपन्ना ते यदा स्थास्यति निश्चला ।
समाधावचला बुद्धिस्तदा योगमवाप्स्यसि ॥ ५३ ॥

अर्जुन उवाच—

अनुक्रमणिका

स्थितप्रज्ञस्य का भाषा समाधिस्थस्य केशव ।
स्थितधीः किं प्रभाषेत किमासीत व्रजेत किम् ॥ ५४ ॥

श्रीभगवानुवाच—

प्रजहाति यदा कामान् सर्वान्पार्थ मनोगतान् ।
आत्मन्येवाऽऽत्मना तुष्टः स्थितप्रज्ञस्तदोच्यते ॥ ५५ ॥

दुःखेष्वनुद्विग्नमनाः सुखेषु विगतस्पृहः ।
वीतरागभयक्रोधः स्थितधीर्मुनिरुच्यते ॥ ५६ ॥

यः सर्वत्रानभिस्नेहस्तत्तत्प्राप्य शुभाशुभम् ।
नाभिनन्दति न द्वेष्टि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥ ५७ ॥

यदा संहरते चायं कूर्मोऽङ्गानीव सर्वशः ।
इन्द्रियाणीन्द्रियार्थेभ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥ ५८ ॥

विषया विनिवर्तन्ते निराहारस्य देहिनः ।
रसवर्जं रसोऽप्यस्य परं दृष्ट्वा निवर्तते ॥ ५९ ॥

यततो ह्यपि कौन्तेय पुरुषस्य विपश्चितः ।
इन्द्रियाणि प्रमाथीनि हरन्ति प्रसभं मनः ॥ ६० ॥

तानि सर्वाणि संयम्य युक्त आसीत मत्परः ।
वशे हि यस्येन्द्रियाणि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥ ६१ ॥

ध्यायतो विषयान्पुंसः सङ्गस्तेषूपजायते ।
सङ्गात्संजायते कामः कामात्क्रोधोऽभिजायते ॥ ६२ ॥

क्रोधाद्भवति संमोहः संमोहात्स्मृतिविभ्रमः ।
स्मृतिभ्रंशाद्बुद्धिनाशो बुद्धिनाशात्प्रणश्यति ॥ ६३ ॥

रागद्वेषवियुक्तैस्तु विषयानिन्द्रियैश्चरन् ।
आत्मवश्यैर्विधेयात्मा प्रसादमधिगच्छति ॥ ६४ ॥

अनुक्रमणिका

**प्रसादे सर्वदुःखानां हानिरस्योपजायते ।**
**प्रसन्नचेतसो ह्याशु बुद्धि पर्यवतिष्ठते ॥ ६५ ॥**

**नास्ति बुद्धिरयुक्तस्य न चायुक्तस्य भावना ।**
**न चाभावयतः शान्तिरशान्तस्य कुतः सुखम् ॥ ६६ ॥**

**इन्द्रियाणां हि चरतां यन्मनोऽनुविधीयते ।**
**तदस्य हरति प्रज्ञां वायुर्नावमिवाम्भसि ॥ ६७ ॥**

**तस्माद्यस्य महाबाहो निगृहीतानि सर्वशः ।**
**इन्द्रियाणीन्द्रियार्थेभ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥ ६८ ॥**

**या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी ।**
**यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः ॥ ६९ ॥**

**आपूर्यमाणमचलप्रतिष्ठं समुद्रमापः प्रविशन्ति यद्वत् ।**
**तद्वत्कामा यं प्रविशन्ति सर्वे स शान्तिमाप्नोति न कामकामी ॥ ७० ॥**

**विहाय कामान्यः सर्वान्पुमांश्चरति निःस्पृहः ।**
**निर्ममो निरहंकारः स शान्तिमधिगच्छति ॥ ७१ ॥**

**एषा ब्राह्मी स्थितिः पार्थ नैनां प्राप्य विमुह्यति ।**
**स्थित्वास्यामन्तकालेऽपि ब्रह्मनिर्वाणमृच्छाति ॥ ७२ ॥**

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे “सांख्ययोगो नाम” द्वितीयोऽध्यायः ॥ २ ॥

श्रीकृष्णार्पणमस्तु ।

----------

**अनुक्रमणिका**

दुसऱ्या अध्यायाचे नाव आहे “सांख्ययोग”. मनात असे आले की, ज्ञानेश्वरीतील ओव्या चिंतनासाठी घेण्यापूर्वी सांख्यशास्त्र म्हणजे काय याची थोडी कल्पना असलेली बरी म्हणून थोडा शोध घेतला. जास्त पारिभाषिक विवेचन माझ्या बुद्धीच्या पलीकडे आहे पण सामान्य रूपरेषा डोळ्यापुढे ठेवावयाची म्हणजे हा अध्याय समजण्यास सोपे जाईल असे वाटले. मालूताई, आपल्याला विभूतियोग ह्या दहाव्या अध्यायातील

**“सिद्धानां कपिलो मुनिः”**

हे वचन आठवत असेल, तर भगवंताची विभूति असलेले हे महामुनी ह्या शास्त्राचा कर्ता आहेत. पण सर्वच ज्ञानासही सांख्य असे म्हटले जाते. या अध्यायांत भगवंतानी बुद्धीयोगही थोडक्यात सांगितला.

विवेकानंदांनी म्हटले आहे की, “सांख्य तत्त्वज्ञान भारतातच नव्हे तर सगळ्या जगात सर्वांहून प्राचीन असे तत्त्वज्ञान आहे. या तत्त्वज्ञानाचे प्रवर्तक कपिलमुनी हे भारतीय मानसशास्त्राचे जनक असून त्यांनी उपदेशिलेले प्राचीन मानसशास्त्र भारतात मान्य असलेल्या तत्त्वज्ञानाच्या सर्व संप्रदायांना अधिष्ठानभूत आहे.”

भारतीय संप्रदायांनी हे तत्त्वज्ञान शिरोधार्य केलेच. पण कपिलांचे ऋण जगातील सर्व तत्त्वज्ञानांवर आहे. पायथागोरस हिंदुस्थानात येऊन हे तत्त्वज्ञान शिकला. त्यातील काही कल्पना त्याने ग्रीस देशात नेल्या. पुढे या कल्पनातून अलेक्झांड्रियाचा तत्त्वज्ञान संप्रदाय उद्भवला आणि त्याच्याही पुढच्या काळात ज्ञेयवादी Gnostic तत्त्वज्ञानाचा यातून उद्भव झाला.

याप्रमाणे कपिलांच्या तत्त्वज्ञानाचे दोन भाग झाले. एक भाग युरोपात अलेक्झांड्रियात गेला व दुसरा हिंदुस्थानात राहिला. व्यासांचे तत्त्वज्ञानही यातूनच विकास पावले.

भारतात तत्त्वाज्ञानास दर्शने म्हणतात. पहिल्या अध्यायात ॐकाररूपी गणपतीच्या सहा दर्शनेरूपी हातात निरनिराळी आयुधे आहेत. त्यात सांख्यशास्त्ररूपी गणपतीचा हात वरद कमलहस्त म्हटले आहे. यावरून या शास्त्राचे महत्त्व लक्षात येते.

कपिलमुनी सृष्टिनिर्मात्या ईश्वराचे अस्तित्व मान्य करीत नाहीत. त्यांच्या मते सर्वशक्तिमान, विश्वाचा कायमचा शासनकर्ता असा नित्य ईश्वर असू शकत नाही. ईश्वर मग एक तर बद्ध असला पाहिजे; बद्ध असला तर तो सृष्टि उत्पन्न करू शकणार नाही आणि मुक्त असला तर तो सृष्टि उत्पन्न करणारच नाही. तेव्हा सर्वशक्तिमान सगुण ईश्वर मानण्याची मुळी गरजच नाही. जे काही चांगले करायचे आहे ते करण्यासाठी प्रकृति समर्थ आहे. प्रथम सांख्यशास्त्राप्रमाणे प्रकृतीचा विचार समजावून घेऊ.

आधुनिक विज्ञान ज्याला Nature म्हणते त्याचा उल्लेख आपले तत्त्वज्ञ वेगवेगळ्या नावाने करतात. त्यात दोन नावे—

अनुक्रमणिका

“प्रकृति”

किंवा

“अव्यक्त” ही आहेत.

तीन प्रकारच्या शक्तींची अव्यक्त ही साम्यावस्था आहे.

१ तम ही आकर्षक शक्ति आहे.

२ रज ही अपसारक शक्ति आहे.

३ सत्त्व ही तम व रज ह्या दोन शक्तींची नियंत्रक शक्ति आहे.

सत्त्व ह्या दोन्ही शक्तींवर नियंत्रण ठेवते व या अवस्थेत साम्यावस्था असते. सृजन वा परिवर्तन होत नाही. ही साम्यावस्था कायम तशीच रहात नाही. तिचा भंग होतो. एक शक्ति दुसऱ्या शक्तीहून वरचढ होते व परिवर्तन किंवा गती चालू होते. ह्या शक्ति परस्परांशी संयुक्त होऊ लागतात आणि विश्व प्रगट होऊ लागते. ही प्रगटावस्थाही एकसारखी टिकत नाही. प्रत्येक वस्तू मुळच्या साम्यावस्थेस जाण्यास उत्सुक होते आणि हळूहळू सर्व अभिव्यक्त वस्तू अव्यक्तात लीन होतात. फिरून त्या साम्यावस्थेचा भंग होतो व पुन्हा विश्वाचे प्रगटीकरण होते. ह्या तात्पुरत्या लयावस्थेस कल्पांत म्हणतात. ह्या लयस्थितीत विश्वाची अव्यक्त बीजें अस्तित्त्वात असतातच. म्हणून या अवस्थेस विश्वाची

**“कारणावस्था”**

असे म्हटले जाते. आपल्याकडील आकाशाची कल्पना आधुनिक ईथरशी जुळती मिळती असली तरी एक नाही. आकाश व प्राण ह्या दोन तत्त्वांच्या संयोगाने सर्व स्थूल पदार्थ घडतात. कल्पांती सर्व स्थूल पदार्थ आकाश व प्राण यांच्या अव्यक्त अवस्थेत विलीन होऊन जातात. नव्या कल्पाच्या आरंभी अव्यक्त स्पंदन पावू लागते. आकाशावर प्राणाचा आघात होऊ लागतो, आकाश घनीभूत होऊ लागते, आकर्षण व अपसारण या शक्तींमुळे हळूहळू परमाणु उत्पन्न होतात व शेवटी स्थूल भूते उत्पन्न होऊन विश्वातील सर्व वस्तू उत्पन्न होतात. आकाशाचा प्राणावर वरचेवर आघाता झाला की, त्यापासून वायू म्हणजे आकाशाची स्पंदनयुक्त अवस्था उत्पन्न होते. ही स्पंदने तीव्र झाली की, उष्णता निर्माण होते. या उष्णतेला तेजस् असे नाव आहे. हळूहळू उष्णता कमी होते, बाष्पीय द्रव्य थंड होऊ लागते आणि त्याचे तरल पदार्थात रूपांतर होऊन आप होते व ते शेवटी घन पदार्थात परिवर्तित होते, त्याला पृथ्वी म्हणतात, ही पंचमहाभूते.

भूते अत्यंत स्थूलस्वरूपाची तत्त्वे असून स्थूल तत्त्वे सूक्ष्म तत्त्वांपासून तयार होतात. या सूक्ष्म तत्त्वांना तन्मात्रा असे म्हणतात. नाक, कान, डोळे इत्यादि ही बाह्य साधने स्थूलस्वरूपाची, तर खरी इंद्रिये

सूक्ष्मस्वरूपाची आहेत. ही आतली इंद्रिये ज्ञानतंतूंची मेंदूतील एकेक केंद्रे होत. प्राणाचे रूपांतर विभिन्न स्थूल शक्तीत करण्यासाठी हे शरीर स्थूल द्रव्यांचे बनलेले आहे. त्याचप्रमाणे या शरिराच्या आत असलेली सूक्ष्म इंद्रिये ही प्राणाचे रूपांतर अनुभवाच्या सूक्ष्म शक्तीत करण्यासाठी सूक्ष्म द्रव्यांची बनलेली असतात. ही इंद्रिये व अंतःकरण मिळून मानवाचे सूक्ष्म शरीर किंवा लिंग शरीर तयार होते. या लिंग शरिराला खराखुरा आकार असतो.

बाह्य विषयाचा आघात झाला की, चित्त स्पंदित होते व मग त्याला मन ही संज्ञा येते. मनाची जी निश्चयात्मक शक्ति त्याला बुद्धि म्हटले जाते. बुद्धीच्या मागे असतो अहंकार. या अहंकारामुळे "मी आहे" हे ज्ञान होते. त्याच्या मागे महत् हे प्रकृतीचे सर्वश्रेष्ठ व्यक्त स्वरूप आहे. या महत्त्व्या  मागे खरा आत्मा शुद्ध व पूर्ण असा पुरुष असतो. हाच एकमेव द्रष्टा व त्याच्यामुळेच ह्या सर्व घडामोडी होत असतात. पण घडामोडीत पुरुष सापडत नाही. तो त्या परिवर्तनाचा केवळ साक्षी असतो.

सांख्यांच्या मते पुरुष वा आत्मे अनेक असतात. ते पूर्ण व शुद्ध असतात. पण प्रकृतीने निर्माण केलेल्या स्थूल व सूक्ष्म पदार्थाच्या संपर्काने अनेक रंगाचे भासतात. आत्म्याला आपल्या मुक्त स्वरुपाचे ज्ञान व्हावे म्हणून प्रकृतीत ही परावर्तने होत असतात. कपिल म्हणतात, "मुक्त आत्म्यास ईश्वर म्हणता येईल पण, हे ईश्वर तात्पुरते वा अन्य ईश्वर म्हणता येतील व ते अनेक असू शकतात."

सांख्यांचा आणखी एक सिद्धांत असा की, ज्या धर्तीवर एका व्यक्तीची किंवा क्षुद्र प्राण्याची रचना झालेली आहे, त्याच धर्तीवर समग्र विश्वाची रचना झालेली आहे. माणसाला जसे मन तसे विश्वाचेही एक वैश्विक मन आहे. संपूर्ण दृश्य पदार्थ हे स्थूल शरीर, त्याच्या मागे सूक्ष्म शरीर, त्याच्या मागे वैश्विक अहंकार व त्याच्या मागे वैश्विक बुद्धितत्त्व असते. विश्वातील समष्टी बुद्धितत्त्वातून आवश्यक तेवढी बुद्धि काढून घेऊन आपण वापरीत असतो. तीच गोष्ट मानसिक शक्तीची. शरिराचे बीज मात्र आईबापापासून मिळणे आवश्यक असते. या सिद्धान्तात आनुवंशिक संक्रमण व पुनर्जन्मवाद अंतर्भूत आहेत.

प्रकृतितील सर्व गोष्टी मिश्र स्वरूपाच्या व अचेतन असतात. मन, बुद्धि, इच्छाशक्ति हीही अचेतनच पण ती सर्व त्यांच्यापलीकडे असलेल्या एका सत्तेचे चैतन्य प्रतिबिंबित करीत असतात. ह्या सत्तेला सांख्य "पुरुष" असे म्हणतात. पुरुष बुद्धिरूप नाही इच्छारूप नाही. पण त्या दोघांचेही कारण आहे. त्याला विश्वाचा स्पर्शही होत नाही पण, तो मात्र सर्व विश्व आपल्याकडे आकर्षण करून घेतो.

मात्र असे पुरुष अनादि, अनंत, विश्वव्यापी आहेत, त्यांची संख्या अनंत आहे. तत्त्वे मोजता येतात पण हे पुरुष मोजता येत नाहीत असे कपिलांचे मत आहे.

अद्वैतवादी म्हणतात की, संपूर्ण विश्व एक आहे, विश्वात एकच आत्मा आहे, एकच सत्ता आहे, देश, काल, कार्यकारणभाव यांच्या माध्यमातून ती एकमेव सत्ताच बुद्धि, अहंकार, सूक्ष्मभूते, स्थूलभूते इत्यादी रूपे धारण करते. सर्व भौतिक व मानसिक रूपे, विश्वातील यच्चयावत् पदार्थ ही सारी त्या एकाच सत्तेवरील विभिन्न अभिव्यक्ती होत. ईश्वर व मानव एकच. भेद केवळ आभासमय आहे.

अनुक्रमणिका

दुसऱ्या अध्यायाकडे वळताना मला वाटते एवढी तयारी आपल्याला पुरेशी आहे. सांख्य प्रकृति व पुरुष मानतात, वेदान्त पुरुषोत्तम मानतो एवढे सूत्र ध्यानात ठेवायचे. सर्व विश्व हा केवळ त्या एका भगवंताचाच लीलोत्सव आहे, केवळ त्याच्या चैतन्याचा विलास आहे, त्याच्याशिवाय अणु रेणूही सुना नाही, ह्या एकत्वाच्या, समत्वाच्या भूमिकेने पुढचे पाऊल टाकावयाचे आहे.

ज्ञानदेव म्हणतात, "संजय म्हणाला, राजा ऐकले काय? तो पार्थ आता शोकाकुल होऊन रुदन करतो आहे. स्वकुलाच्या दर्शनाने त्याच्या मनात प्रेमाचे पाझर फुटले आणि चित्त द्रवून गेले. त्याला उपमा केवळ पाण्यात विरघळलेल्या मिठाचीच किंवा वाऱ्याने उडवून लावलेल्या ढगांचीच. अहो हा वीर पुरुष म्हणावयाचा, ह्याचे अंतःकरण कसे वज्रकठोर असावे पण, कृपेने आच्छादित केल्यामुळे चिखलात रुतलेल्या राजहंसासारखी त्याची स्थिती दयनीय झाली आहे. तो अगदी कोमेजून गेला आहे."

महामोहाने जर्जर झालेल्या त्या पांडुसुताला पाहून शाङ्र्गधर म्हणाला– "अर्जुना, अरे हे काय करतो आहेस तू! तू कोण आणि हे मनात काय आणले आहेस? तुला झाले तरी काय? काही शस्त्रे, अस्त्रे, शिबिरात विसरून आलास की काय? की मंत्रतंत्रात काही चुका झाल्या? हा खेद तुला आता कसा काय निर्माण झाला?

अनुचित गोष्टीकडे तुझे मन कधीच वळत नाही, तुझे धैर्य कंधीही खचत नाही, तुझे नाव कानी पडले की, अपयश बारा वाटा पळते. तू क्षत्रियांचा राजा, शूरवृत्तीचे आश्रयस्थान, तुझ्या पराक्रमाचा धाक तीन्हीं लोकांमध्ये आहे.

पार्था, पाशुपतास्त्राच्या प्राप्तीसाठी तू तप केलेस. शंकराची आराधना केलीस. शंकर किरात झाले आणि त्यांनी आपल्या एका गणास वराह केले. तुम्हा दोघांचेही बाण वराहास एकदम लागले आणि वराह कोणाचा याबद्दल तंटा सुरू झाल्यावर, तू प्रत्यक्ष शिवाशी लढाई दिलीस हे आठवते ना? शंकर आटपेनात तेव्हा अग्निकाष्ठे भक्षण करावयाची असे ठरविलेस व अखेरची पूजा मांडलीस. जे जे फूल शिवाच्या पिंडीस वहावे ते ते फूल किराताच्या मस्तकी पडू लागले. तेव्हा किराताच्या शिवस्वरूपाची तुला ओळख पटून तू किराताचे पाय धरलेस व शिवानी प्रसन्न होऊन तुला पाशुपतास्त्र दिले हेही तू आज विसरलास काय? ती क्षात्रवृत्ति, तो निश्चय, ते धैर्य कुठे गेले तुझे?

हिरण्यकश्यपूचे नातू मायावी राक्षस होते. त्या निवात आणि कवच राक्षसांचे पारिपत्य करणे इंद्रालाही जमेना. तेव्हा त्याने तुझ्या मदतीची याचना केली आणि अत्यंत चातुर्याने तू त्यांचा समुद्रतीरी नाश केलास. असे तुझे अप्रतिम युद्धकौशल्य आज काय झाले?

त्या गंधर्वाचा पराभव तर तू अनेक वेळा केला नाहीस काय? अंगारपर्ण गंधर्व रात्री स्त्रियांसह विलास करत होता. तुम्ही सर्वजण द्रौपदी स्वयंवरासाठी निघाला होतात. "इतक्या रात्री कुठे निघाला?" असे म्हणून त्या गंधर्वाने अडवल्यावर तुम्ही त्याची समजूत घालण्याचा खूप प्रयत्न केलात. ते प्रयत्न निष्फळ झाल्यावर मात्र तू त्याला युद्धाचे आव्हान दिलेस आणि त्याचा पराभव केलास ना? त्या गंधर्वानेही तुझी वाहवा केली आणि

सूक्ष्म पदार्थदर्शक चाक्षुषी विद्या देऊन तुझ्याशी स्नेह जोडला नाही काय?

अरे, तुझ्या जोडीचा वीर ह्या त्रैलोक्यात नाही आणि आज तू या युद्धभूमीवर वीरवृत्ति टाकून अधोमुख होऊन रडतो आहेस? काय म्हणावे तुला?

तू कारुण्याने दीन झालास म्हणजे अंधाराने सूर्य गिळल्यासारखे झाले आहे. वारा ढगांना भ्याला, अमृताला मरण आले, लाकडांनी अग्नि गिळला, मिठात पाणी विरघळले, बेडकाने साप गिळला आणि कोल्ह्याने सिंह जिंकला असे म्हणू काय? ह्या असल्या अघटित अद्भूत गोष्टी तू आज खऱ्या करून दाखविल्यास बाबा.

बरं, असू दे. झाले ते झाले. या दीन कारुण्याला आता यापुढे तरी थारा देऊ नकोस. मन सावध कर. हा मूर्खपणा टाकून दे. ऊठ. तो घे धनुष्यबाण आणि लढाईला सज्ज हो. लढाई ही काय दया दाखविण्याची वेळ आहे? तू तर शहाणा समजला जातोस आणि हे आरंभले आहेस तरी काय? झुंजाच्या वेळी कारुण्य? म्हणजे याचा अर्थ कीर्तीचा नाश आणि पारलौकिकाचा सत्यानाश!”

जगन्निवास श्रीकृष्ण जरा रागावूनच पार्थाला असे म्हणाले. आपण पूर्वी गाजवलेल्या पराक्रमाची आठवण झाल्यामुळे तरी, अर्जुन पुन्हा उत्साहपूर्ण होईल असे देवाना वाटले असावे म्हणून पार्थाच्या पराक्रमाची यशोगाथा देवानी सांगितली पण या बोलण्याचा अर्जुनावर काही परिणाम होईना. हे पाहून देवानी जरा वेगळ्या थाटाचे बोलणे सुरू केले. ते म्हणाले, “मी निक्षून सांगतो आहे. ऐक माझे. असा शोकमग्न होऊ नकोस. या उद्विग्नतेचा त्याग कर. धैर्य पुरतेपणाने स्वीकार आणि लढाईस तयार हो. अरे, असा भ्याडपणा करणे योग्य नाही. आजवर जे मिळवले आहेस ते मात्र अशा वागण्याने घालवून बसशील. अजून तरी आपले हित कशात आहे हे ध्यानात घे. लढाईच्या प्रसंगी कृपाळूपण उपयोगी पडते काय? का म्हणून कृपा करायची ह्यांच्यावर? हे आपले सोयरे धायरे आहेत म्हणतोस, ते काय आज झाले आहेत सोयरे तुझे? हे म्हणे “माझं गोत.” काय रे हे तुला आज कळले काय? जन्मास आपल्यापासूनच तुम्हा सर्वांना एकमेकांशी भांडायची खुमखुमी तर आहे. कशाला अतिशयोक्ती करतोस? अरे भांडायचे निमित्तच शोधणारे तुम्ही आज लढाईला उभे अहा इतकेच! ही लढाई काय अनपेक्षित आहे? आजच एकदम काय झाले तुला? का हा प्रेमाचा पान्हा फुटला एकदम? मला इतर काही कळत नाही पण, आज तू जे हे भ्याडपण दाखवतो आहेस ते मात्र अत्यंत हीन कर्म करतो आहेस हे खास सांगतो. आठव, आठव तो वनवासातला प्रसंग. निष्क्रियतेला कंटाळून तुम्ही दोघे, तू आणि भीम रागारागाने कुटीबाहेर पडलात आणि म्हणत होतात, “दादा, जातो आम्ही जरा वनात. कंदमुळे भरपूर कुठे आहेत ते पाहून येतो. अज्ञातवासात कौरवांनी आपल्याला शोधून काढले म्हणजे आहेच ना पुन्हा बारा वर्षे वनवास. तेव्हा त्यावेळी निदान पोटाचे हाल व्हायला नकोत. थाळीतले अन्न तरी किती दिवस खात बसायचे?”

खिन्न मुद्रेने युधिष्ठिर तुमच्याकडे पहात असतानाच व्यास महर्षि आले. त्यांनी सर्वांना कुशल विचारल्यावर तुम्ही दोघांनी आपली व्यथा त्यांना सांगितलीत. महर्षि म्हणाले, “अरे तुम्ही तर वाघाचे पेटे अहा. शूर क्षत्रिय अहा. तुमच्यासारख्या वीरांनी अशा शांततेच्या काळातच आपले युद्धकौशल्य वाढवावयाचे असते. सोडून द्या त्या कंदमुळाच्या गोष्टी! काढा तुमची शस्त्रास्त्रे बाहेर आणि करा सुरू तुमचा रोजचा अभ्यास. अरे

उत्साहाने आताच ह्या काळात नवी नवी शस्त्रास्त्रे शिकून मिळवून घ्या. लढाईत जय तुमचाच आहे. पण असे भ्याडासारखे जगू नका. सज्ज रहा."

"पार्था, अरे ते सगळे आज विसरलास काय? ज्याच्यासाठी ती सर्व तयारी होती तो संग्रामाचा प्रसंग समोर उभा असताना तू असा बांगड्या भरणार? अरे, धिक्कार असो तुझ्या पराक्रमाचा. असला हा मोह, तुझी असली नसली प्रतिष्ठा नाहीशी करील. तुला परलोकीही सद्‌गती मिळणार नाही. इह परलोकांच्या लाभाची हानी करणारा हा अंतःकरणाचा ढिलेपणा सोडून दे. क्षत्रियांनी लढाई करण्यातच कुचराई केली तर, तो घोर अधःपात होईल. तू हे करू नकोस."

याप्रमाणे नानाप्रकारे देव अर्जुनाला सांगत राहिले, त्याचे मन वळविण्याचा प्रयत्न करत राहिले, समजूत घालत राहिले पण पालथ्या घड्यावर पाणी!! काहीही परिणाम झाला नाही.

उलट अर्जुन देवांना म्हणाला, "देवा, इतकं सगळं बोलण्याची जरूरी नाही. मी काय म्हणतो ते तुम्हीच ऐकून घ्या. हा संग्राम म्हणजे काय हे जरा ध्यानी घ्या. ही लढाई काही आपल्या शत्रूंशी आहे काय? ही खरी लढाईच नव्हे. हे तर उघड उघड महापातक आहे. आमच्याच वडील मंडळींचा उच्छेद आमच्या हातून व्हावयाचा असा हा घोर प्रसंग आमच्यावर येऊन कोसळला आहे आणि तूच मला सांगतो आहेस लढाई करायला? देवा, जरा विचार करा. हे पहा मातापितरांची पूजा करावी, त्यांना संतोष द्यावा, ते सोडून आम्ही त्यांचा वध करायला धावावे? देवा, संतांना, वडिलांना नमस्कार करावा, घडलीच हातून तर सेवा करावी, पूजा करावी की, हे योग्य कर्म न करता त्यांची निंदा करत फिरावे? थोरांची निंदा करणाराच नव्हे तर, ऐकणारासुद्धा पापी ठरतो असे सांगितले जाते ना? मग आम्ही निंदा करून वाचा विटाळावी असे कसे सांगता तुम्ही?"

हे आमचे गोत्र व हे गुरू आम्हाला अत्यंत पूज्य आहेत. ह्या भीष्म, द्रोणांशी माझे नाते कसे सांगू तुम्हाला? देवा, मी ह्यांच्याशी स्वप्नातदेखील वैर करू शकत नाही, मग त्यांचा प्रत्यक्ष वध कसा काय करू? जळो ते जिणे! ह्या सगळ्यांना झाले आहे तरी काय? देवा, आम्ही आजवर जी शस्त्रास्त्रे मिळविली, अभ्यास केला, त्यांच्या जोरावर ह्या गुरूजनांना मारून बढाई मिरवावी असे का तुमचे म्हणणे आहे? हे पितामह भीष्म पहा. श्रीकृष्णा, आमच्या मातेने आम्हा अनाथांना एके दिवशी ह्यांच्या पुढे आणून उभे केले. दोन्ही बाहू पसरून आम्हा पाची जणांना यांनीच ना आपल्या उराशी कवटाळून "या रे माझ्या पंडु पुत्रांनो" असे उच्च स्वराने म्हटले? देवा, पहा पलीकडे उभे आहेत द्रोणाचार्य! पितामह भीष्मानीच ना आम्हा सर्वांना क्षात्रविद्या शिकण्यासाठी त्यांच्या स्वाधीन केले? काय माझ्यावर त्यांची माया! भास पक्षाचा मला फक्त डोळा दिसतो, दुसरे तिसरे काहीही दिसत नाही असे म्हटल्याबरोबर "वा रे माझ्या शिष्योत्तमा, मार बाण" असे म्हणून माझ्या पाठीवर थाप मारली, ती यांनीच नाही काय? काय सांगू देवा, ह्या द्रोणांनीच मला घडविला असे म्हणा. मला त्यांनीच धनुर्वेद दिला आणि आता ते उपकार मी त्यांच्यावर बाण सोडून फेडू काय? ज्यांच्या कृपेने वर मिळाला त्यांच्याशीच मनाने व्यभिचार करायला मी काय भस्मासुर आहे काय? पुन्हा पुन्हा मला आठवतो तो द्रोणाचार्यांच्या मनाचा मोठेपणा आणि गंभीरपणा. समुद्राला गंभीर म्हणतात पण तोही उथळ वाटावा इतका खोलपणा ह्या द्रोणाचार्यांच्या जवळ आहे. त्यांच्या मनाचा क्षोभ आम्ही कधी पाहिलाच नाही. हे अपार आकाशसुद्धा एक वेळ मोजता येईल पण यांच्या अगाध हृदयाचे कुणाला आकलन होणार नाही. अमृत विटेल, कालवशात् वज्र फुटेल

पण यांच्या मनोधर्मामध्ये विकारांचा प्रवेश होणार नाही. प्रेम पहावे तर आईचे अशी म्हण आहे. ते प्रेम मूर्तिमंत पहायचे ते द्रोणाचार्यांच्यामध्ये. देवा, हा करुणेचे आदिस्थान, सर्व गुणांचे निधान व विद्येचा अमर्याद समुद्रच आहे. हे इतके मोठे असून आमच्यावर त्यांची अगाध कृपा आहे. सांगा, सांगा देवा! यांच्या घाताची इच्छा तरी माझ्या मनात मी येऊ द्यावी काय? ह्यांना युद्धात मारावे आणि आपण राज्यसुख भोगावे हे प्रत्यक्ष करणे तर राहोच पण तसे करण्याचा विचारसुद्धा माझ्या मनाला सोसत नाही. हे राज्यभोग दुर्लभ आहेत पण ह्याहीपेक्षा आणखी श्रेष्ठ भोग असले तरी ते, हे महापाप करून भोगण्यापेक्षा भिक्षांदेही केलेली बरी. देशत्याग करावा किंवा अरण्यात निघून जावे पण यांच्यावर शस्त्र धरू नये.

देवा, हे बघा, आताच पाजळलेले तीक्ष्ण बाण. ते यांच्या जिव्हारी खोचायचे आणि त्या जखमातून वहाणाऱ्या रक्ताने भिजलेले विषारी राज्यभोग भोगावयाचे काय? तसले ते भोग आम्हाला काय करायचे आहेत? राज्यासाठी क्षत्रियाने लढाई केलीच पाहिजे हा तुझा युक्तिवाद मला मुळीच पटत नाही."

संजय म्हणाला, "महाराज, अर्जुन त्यावेळी श्रीकृष्णाला "ऐका देवा" अशी सारखी विनवणी करीत होता. पण देव मुळीच लक्ष देईनात. देव काहीच बोलेनात. तेव्हा पार्थाला भीती वाटली. तो म्हणाला, "देवा, ऐका माझे जरा. तुम्ही तर माझ्याकडे पाहीना देखील! तुझ्याशिवाय आमचा दुसरा कोण जिवलग सखा आहे रे? सांग ना माझे काही चुकते आहे का यात? यांच्याशी आमचे वैर आहे, या शब्दांनीच आमचा खरे म्हणजे जीव जावा, असे हे गुरूजन संग्रामाच्या निमित्ताने पुढे उभे आहेत. माझ्या मनात कल्लोळ झाला आहे. आता या पूज्यपादांना मी मारावे की, ह्या संग्रामाचा धिक्कार करून इथून निघून जावे हे मला काही कळत नाही हो देवा. सांगा ना मी काय करू? काय करावे काय न करावे हे तर केवळ तुम्हालाच कळते. तुम्हीच माझ्यावर असे रागावलात तर मी आता विचारू तरी कुणाला?

मोहाने माझे मन इतके गोंधळून गेले आहे की, आम्ही काय करणे उचित होईल हे कळतच नाही आम्हाला. एखादी वस्तूजवळच असते पण डोळ्यावर सारा आला की, दृष्टीचे तेज जाते आणि ती वस्तूजवळ असूनही दिसत नाही तसे माझे झाले आहे. माझे मन भ्रांत झाले आहे. आपले खरे हित कशात आहे हे काही कळत नाही मला."

देवा, तू माझा सखा, माझे सर्वस्व आहेस. सगळ्यांच्यापेक्षा तूच आमचा जिवलग आहेस. तू गुरू, बंधू, पिता, इष्ट देवता आणि सर्व संकटात रक्षणकर्ता आहेस. गुरू शिष्याचा अव्हेर करीत नाही. समुद्र सरितांचा नाही. समजा, आईनेच मुलाचा त्याग केला तर ते जगणार तरी कसे? तेव्हा माझे बोलणे तुमच्या मनास आले नसेल तर तू जाणता आहेस. आम्ही काय करावे ते तूच सांग. पुरुषोत्तमा, जे करायला सांगशील ते उचित असावे आणि धर्मानुसार असावे. तू असा मौन धरून बसू नकोस. बोल रे माझ्याशी.

ह्या मोहाशीच मी सारखा झुंजतो आहे. पृथ्वीतल वा इंद्रपद जिंकणे हे देखील एक वेळ जमेल पण हा माझ्या मनातील मोह मला आटपेना. तेव्हा आता याला उपाय केवळ आपले शब्दच.

भाजलेली बीजे उत्तम भूमीत पेरली तरी पाण्याच्या सिंचनाने उगवत नाहीत. तसे मोहाने आणि पापाच्या

कल्पनेने भाजून निघालेले माझे मन राज्यभोगसमृद्धीच्या कल्पनेने उल्हासित होईना.

आयुष्य संपले की, औषधाचा काही उपयोग होत नाही, परमामृताचा लाभ झाला तरच उपाय होतो. त्याप्रमाणे मला वाटते आहे की, अमृतासारखे तुझे शब्द माझ्या कानी पडले तरच मी जगेन, एरवी हा मोह माझे प्राण व्याकुळ करतो आहे. तुमचा जिव्हाळा आणि प्रेम एवढाच आता मला आधार आहे. सांगा ना मी काय करू?

भ्रान्तीतून जरा सावरलेला अर्जुन देवाकडे बघून "मी काय करू" असे म्हणाला मात्र तोच पुन्हा शोकाकुल झाला आणि म्हणाला, "देवा, नका करू माझी विनवणी. मी ही लढाई कधीही करणार नाही. मी शस्त्र उचलणार नाही. हे पातक मी करणार नाही."

असे एकदा निश्चयपूर्वक बोलून पार्थ स्वस्थ उभा राहिला. ज्ञानदेव म्हणतात, "ह्या ज्या मोहाच्या उर्मी एकसारख्या येत होत्या त्या साध्यासुध्या नव्हत्या असे मला वाटते. काहीतरी वेगळेच घडले होते. महामोहरूपी काळसर्पानेच अर्जुनास डंख केला होता. वेळ भलतीच होती, अर्जुनाच्या हृदयात करूणा उत्पन्न झाली तो प्रकार तिन्हीसांजा झाल्या असताना भुजंगाने मर्मस्थान पाहून कडकडून दंश करावा तसा झाला होता. विषाच्या लहरी त्यामुळे उतरेनातच. दृष्टिक्षेपात जो विष उतरून टाकतो तो गारुडी श्रीहरी हा कठीण प्रसंग पाहून धावून आला. तसे पाहिले तर, तो अर्जुनाच्या जवळच होता पण आता त्याची मोहाने झालेली दीन अवस्था पाहून कृपेने त्याचे रक्षण करण्यासाठी सज्ज झाला."

मालूताई, सिद्धचरित्रात असा प्रसंग आहे की, पंढरपुरात गुंडामहाराजांनी गोकुळ अष्टमीस रात्री भजन करता करता म्हटले, "सुंठवडा करा" संतांच्या घरात संग्रह कुठला? शिष्य बाजारात धावले. वाण्याचा मुलगा दुकानातच झोपला होता पण मध्यरात्री उठेचना. कसाबसा शेवटी एकदा उठला. शिष्यांनी सुंठ, गूळ मागितला तो दिला. त्याला काहीच माहीत नव्हते की, सुंठ व बचनाग एकत्र झाला आहे. शिष्यांनी सुंठ, बचनाग, गूळ एकत्र कालवला आणि सगळ्यांना वाटला आणि पुन्हा भजनाचा कडाका सुरू केला. पहाटे वाणी दुकानात आला आणि मुलाला विचारू लागला, "रात्री कुणी आले होते का गिऱ्हाईक?" मुलगा म्हणाला, "हो तर. मध्यरात्री गुंडामहाराजांच्या शिष्यांनी सुंठ, गूळ नेला. गोकुळ अष्टमीचा सुंठवडा वाटायचा होता ना?" वाणी भयभीत होऊन म्हणाला, "अरे तू सुंठ दिलीस तशीच? बचनाग मिसळला होता त्यात. हाय रे दैवा! काय पातक घडले आपल्या हातून! काय काय अनर्थ झाला आहे संता घरी कुणास ठाऊक!" वाणी धावतच गुंडामहाराजांच्या आश्रमात गेला तर, भजनाचा एकच रंग भरलेला. वाण्याने जाऊन गुंडामहाराजांचे पाय धरले आणि क्षमायाचना केली. महाराजांना कळेना काय झाले ते. वाण्याने सर्व हकीकत सांगितल्यावर समोर पहातात तो काय! पांढरी शुभ्र संगमर्मरी श्रीकृष्णाची मूर्ती काळी ठिक्कर पडलेली! देवाचे हे भक्तवात्सल्य पाहून गुंडामहाराजांना गहिंवर आवरेना. त्यांनी पुन्हा भजनास प्रारंभ केला. माध्यान्ह झाली. शिष्य म्हणू लागले, "महाराज कालचा उपास आहे. पारणे करायचे ना?"

गुंडामहाराजांनी साश्रुनयनांनी म्हटले, "अरे, देवाचे विष उतरल्याशिवाय कुठली पारणा?" देवांनी भक्ताचा निश्चय पाहिला आणि मूर्ती हळूहळू पुन्हा पांढरी होऊ लागली. या प्रसंगाची आठवण म्हणून फक्त कंठाजवळचा भाग काळसर राहिला. सिद्ध्चरित्रात म्हटले आहे की, "ती मूर्ती आजही पंढरपुरात पहायला

मिळते.”

आता इथे तर महामोहासारखे विष भक्तश्रेष्ठाच्या हृदयात भिनलेले, मग देव धावतील यात नवल काय?

पावसाळ्यातील ढगांनी सूर्य झाकून टाकावा तशी अर्जुनाची स्थिती झाली होती. भ्रांति पडल्यामुळे त्याला इतके दुःख झाले होते की, जसा एखाद्या डोंगराला भर उन्हाळ्यात वणवा लागावा. भक्ताची स्थिती पाहून तो भक्तवत्सल करुणाकर भगवान गोपाळ एखाद्या महामेघासारखा त्या डोंगराकडे वळला. त्याच्या सुंदर दातांची झळाळी विजेसारखी चमकू लागली, त्याची गंभीर वाणी मेघगर्जनेसारखी वाटू लागली. आता तो उदार मेघ कसा वर्षाव करील आणि अर्जुनाचलावर नव्या ज्ञानाचे अंकुर कसे फुटतील हे स्वस्थ चित्ताने ऐका असे निवृत्तिदास ज्ञानेश्वर म्हणतात.

देव मनाशी विचार करू लागले की, “अर्जुनाने हे मध्येच काय काढले? काही कळत नाही काय करावे? आता ह्याची समजूत कशी घालावी ह्याला धीर कसा द्यावा?”

मांत्रिक जसा पिशाच्च दूर कसे होईल याचा विचार करतो किंवा व्याधी असाध्य पाहून वैद्य जशी अमृतासारख्या दिव्य औषधीची अखेर योजना करतो त्याप्रमाणे त्या दोन सैन्याच्या मध्यभागी अर्जुनाची भ्रांति जाईल अशा हेतूने देवांनीं रागाने बोलायला सुरवात केली. आईच्या रागाने बोलण्याच्या मागे जसे प्रेम दडलेले असते किंवा कडू औषध जसे अमृतासारखे गुणकारी असते त्याप्रमाणे वरून उपहास, राग, जरी दिसला तरी परिणामी हितकारक असे बोलणे देवानी सुरू केले.

ते अर्जुनाला म्हणाले, “वाहवा! वाहवा! हे तुम्ही जे मध्येच आरंभले आहे ना, हे फार आश्चर्यकारक आहे हं! अर्जुना, तू स्वतःला शहाणा समजून जे बोलतोस त्याचा अर्थ तुझा तुला तरी कळतो का? बरं, मी तुला काही बोध करीन असे म्हटले तर तूच मला नीतिपाठ देतो आहेस. हे तुझे जे शहाणपण आहे ना, ते आंधळ्याला वेड लागून ते सैरावैरा धावत सुटते तसे आहे. अरे तू कोण हे तुझे तुलाच कळत नाही आणि ह्या कौरवांच्याबद्दल मात्र शोक करतो आहेस. पुन्हा पुन्हा मला याचाच विस्मय वाटून राहिला आहे.”

अर्जुना! ही विश्वरचना अनादि आहे असे म्हणतात ते खोटेच आहे म्हणायचे! हल्ली ह्या त्रिभुवनाचे अस्तित्व तुझ्यामुळे आहे काय? एक समर्थ ईश्वर म्हणून कोणी आहे, तो ह्या सर्व प्राणिमात्रास जन्मास घालतो, हे सगळे खोटेच आहे म्हणावयाचे! हल्ली हल्ली सर्व व्यवस्था तुझ्याकडे सोपवली आहे काय? तूच प्राण्यांना जन्मास घालतोस, त्यांचा शास्ता आहेस आणि तूच त्यांचा नाश करतोस काय? तू नाश केलास की, हे त्रिभुवन नाश पावते असे झाले आहे काय?

अरे मी यांना मारतो आहे असा अहंकार धरून त्या पापाच्या भीतीने तू यांना आता मारले नाहीस तर ते काय चिरंजीव होणार आहेत? तू मारणारा, हे मरणारे अशीही भ्रांति तू कधीही मनात आणू नकोस.

हे सगळे अनादिसिद्ध आहे. हे रहाटगाडगे आपोआप असेच चालायचे आहे. त्यात तुला शोक करण्यासारखे आहेच काय?

जे विवेकी असतात ते जगाचे होणे आणि जाणे हाच मुळी भ्रम आहे हे जाणतात आणि त्या दोन्हीचाही हर्ष, शोक मानत नाहीत. तू मात्र मूर्खपणाने ते समजून न घेता ज्याचा विचार करू नये त्याचा करतो आहेस आणि आम्हाला उलट नीतीचे धडे देतो आहेस.

अर्जुना! मी काय सांगतो ते नीट ऐक. तू, मी आणि समोर दिसणारे हे राजे लोक निश्चित आहोत किंवा आपला नाश होणार आहे, हा जो तुला भ्रम आहे तो बाजूला कर. अरे, ह्या पाण्यावरच्या लाटा आहेत. वाऱ्याने संथ पाण्यावर लाट उठली तर नवे काय जन्माला आले म्हणावे? वारा पडला आणि पाणी पुन्हा संथ सपाट झाले तर काय नाश पावले म्हणावयाचे?

मायेच्या योगाने "उपजे आणि नाशे" असा भास होतो. एरवी मगाशी तुला सांगितल्याप्रमाणे लाट दुसरे तिसरे काही नसून जसे आतबाहेर पाणीच पाणी तसेच या सर्व उत्पत्तिस्थितीलयास आधारभूत असलेली "वस्तू" अविनाशी आहे हे समजून घे. एकाच शरीराच्या वयपरत्वे निरनिराळ्या अवस्था होतात ना? तुझ्या नित्य परिचयाचेच प्रमाण आहे हे, कौमार्य तारुण्यावस्थेमध्ये नाश पावते, वृद्धावस्थेत तारुण्यावस्थेचा लोप होतो, अवस्था पालटतात पण देह बदलतो काय? देह तोच असतो तसेच ह्या चैतन्याच्या ठिकाणी अगणित देह येतात, जातात. मूळ चैतन्य अखंडित अबाधितच असते. आता ज्याला हा बोध झाला त्याला भ्रांतिजन्य दुःखाची बाधा होत नाही."

मालूताई, आपण योगसूत्राचा विचार करीत असताना पाच मिनिटे अगदी स्तब्ध झालो होतो ते आठवते ना? विरोधाभास वाटतो आहे खरा पण वृत्तिरहित अवस्था कशी असेल ह्यावर आपण बोलत होतो. आपले मन निरनिराळी रूपे कसे धारण करते हे स्वस्थ राहून पहायचे होते. विमान आकाशात चढल्यावर जमिनीशी असणारा त्याचा संबंध सुटतो. ढग आपल्यावर नाही आपण ढगावर आहो हा जसा एक वेगळा अनुभव आहे तसेच आपले त्या क्षणी झाले. विचार येतात, जातात, उठतात, क्षणार्ध रहातात, जातात, आपण त्यात नाहीच. दुरून आपण पहातो. हा सगळा मनोव्यापाराचा खेळ दुसऱ्याच कोणाचा आहे असे वाटले आणि मग वेगळीच शांती अनुभवली. आपण म्हटलेही की, "ब्रह्मांडामध्ये अशीच नीरव शांतता पहाटे व संध्याकाळी असते. तेव्हा आता उपासनेचे कर्मकांड सोडून ह्या दोन संध्यासमयी ब्रह्मांडाच्या शांततेशी आपल्या शांततेचा सूर जोडून द्यावयाचा." भगवंत देहाच्या जन्ममृत्यूबद्दल बोलत आहेत. तेच आपण आपल्या अंतर्मनात चाललेल्या वृत्तीच्या जन्ममृत्यूबाबत अनुभवायचे आहे. पण ध्यानात ठेवायचे की, ही अलिप्तावस्था सहजासहजी प्राप्त होत नाही. इंद्रिये बंड करतात. आजवर त्यांनी आपल्यावर स्वामित्व गाजवले आहे. ती आपला ताबा सुखासुखी सोडत नाहीत. अखंड सावधानता व अभ्यास हाच ती अलिप्तावस्था गाठण्याचा मार्ग आहे.

म्हणून देव अर्जुनास सांगत आहेत, "पार्था, तुला वाटेल की, जीवाला चैतन्य अविनाशी आहे हे का कळत नाही? त्याचे कारण हे की, इंद्रियांनी अंतःकरण व्यापून टाकले आहे. ही इंद्रिये अत्यंत बलवान आहेत. त्यांचे अस्तित्त्व, महत्त्व कमी होईल अशी कुठलीही गोष्ट ती देहग्रामात घडू देत नाहीत आणि म्हणून

अनुक्रमणिका

अंतःकरणात भ्रम उत्पन्न करून चैतन्याचे जीवास दर्शन होऊ देत नाहीत.

तसे म्हटले तर अर्जुना विचार कर, अंतःकरण विषयसेवन करते काय? इंद्रिये करतात ना? पण त्या विषयाच्या अनुभवाने अंतःकरणात कधी हर्ष, कधी खेद निर्माण होतो. ती इंद्रिये अमुक प्रकारचा भाव नित्य निर्माण करतील असे नाहीच, ती एकनिष्ठ नाहीतच. एकच इंद्रिय कधी सुख, कधी दुःख निर्माण करते. शब्द हा विषय श्रवणाचा. पण शब्दांचे सामर्थ्य बघ. निंदा कानावर पडली की दुःख, स्तुती पडली की सुख निर्माण होते. स्पर्शाचे गुण मृदु, कठीण, शीत, उष्ण, त्वचेशी विषयाचा संयोग झाला की संतोष, खेद निर्माण होतो. भयंकर आणि सुंदर रूपे डोळ्यापुढे आली तर, एकामुळे दुःख दुसऱ्यामुळे सुख वाटतेच. वासाचे प्रकार सुगंध व दुर्गंध. घ्राणेंद्रियाशी त्याचा संयोग झाला की, सुख-दुःख निर्माण झालेच. तसेच रसनेंद्रिय. कडू चव त्रास गोड चव प्रेम निर्माण करते आणि म्हणून ह्या फसव्या दुतोंडी विषयाची संगत अधोगतीस नेणारी आहे. ह्या क्षणी जे त्या इंद्रियास सुखद वाटते आहे तेच जास्त झाले की, नकोसेंही वाटते आणि अशा ह्या इंद्रियांच्या आधीन जीव होतो. शीतोष्णाच्या, सुख-दुःखाच्या तडाख्यात सापडतो. विषयावाचून जगात रम्य काही नाही असे समजणे हा त्या इंद्रियांचा स्वभावच आहे. स्वप्नातील हत्तीच्या कळपासारखे किंवा मृगजळातील पाण्यासारखे हे विषय केवळ भासमात्र आहेत, क्षणभंगुर आहेत. जोवर तू या इंद्रियांवर भरवसा ठेवून ती सांगतील तो भाव तुझ्या अंतःकरणात माजू देशील तोवर तुला त्या अविनाशी चैतन्याची ओळख कशी पटणार? अर्जुना! हे विषय अनित्य आहेत हे जाणून तू त्यांचा अव्हेर कर, त्यांचा संग सर्वथैव सोड.

असे केलेस की, तुला सुख-दुःखाची बाधा होणार नाही. जे विषयात सापडत नाहीत, त्यांना जन्ममृत्यूच्या फेऱ्यात सापडावे लागत नाही, असे पुरुष इंद्रियांच्या कह्यात न गेल्याने ब्रह्मरूप होतात. अर्जुना! तू तसा हो!

आणखी एक सांगू का? ज्ञानी पुरुष विचार करतात आणि ह्या देहाच्या उपाधीमध्ये गुप्त असलेले जे चैतन्य त्या चैतन्याचा फक्त स्वीकार करतात. तत्त्व जाणणाऱ्या त्या पुरुषाचे लक्ष फक्त चैतन्याकडे असते.

पाण्यामध्ये दूध बेमालूम मिसळलेले असले तरी राजहंस पाण्यापासून दूध वेगळे करून फक्त दुधाचा स्वीकार करतो ना? किंवा हिणकस सोने अग्नींत टाकून त्यातील हीण काढून फक्त चोख सोन्याची लगड शहाणा सोनार करतो ना? हुषारीने दही घुसळले की, ताक खाली राहून लोण्याचा गोळा वर तरंगताना दिसतो ना? भूस आणि बी एकत्र असते पण वाऱ्याच्या झोताने फलकट उडून जाऊन धान्याचा ढीग खाली साचतो ना? त्याप्रमाणे ज्ञानी पुरुष विचार करतात, देह उपाधी हा प्रपंच सहज टाकून देतात आणि तो टाकला की, त्यांच्या हाती सहजच ब्रह्मबीज येते. आता ह्या हातात आलेल्या नित्य वस्तुचा अनुभव आला, ज्ञान झाले की टाकलेल्या त्या प्रपंचाच्या खोटेपणाचाही त्यांच्या मनात निश्चय होतो. असारता ही भ्रांती आहे सार हे नित्य आहे, खरे आहे. जिथून ह्या लोकत्रयाचा विस्तार झाला त्या मूळ ठिकाणी नाव, वर्ण, आकार ह्या लक्षणांचे नावसुद्धा नाही. जो नित्य सर्वगत, जन्ममरणातीत, आहे त्याचा कदापीही घात होत नाही.

पंडुकुमरा, चैतन्याचा नाश कधीही होत नाही आणि शरीर म्हणून जेवढे आहे ते मात्र सर्वच स्वभावाने नाशवंत आहे. तेव्हा तू लढाई करावीसच.

अनुक्रमणिका

तू देहाचा अभिमान धरून फक्त ह्या नाशवंत देहाकडेच पाहून मी मारणारा आणि हे मारणारे असे म्हणतो आहेस. अर्जुना तत्त्वतः विचार केला तर, तुझ्या ध्यानात येईल की, तू मारणाराही नाहीस आणि ते मारलेही जात नाहीत.

झोपेत असेपर्यंत स्वप्न पडत असते आणि स्वप्नात आपण असतो तोवर ते खरेही वाटते. पण जाग आली की, जसे काहीच नसते तशी ही सर्व माया आहे. छायेला शस्त्र रुपत नाही, त्याप्रमाणेच ह्या सांसारिक घटना खऱ्या स्वरूपाला शिवू शकत नाहीत. भरलेल्या घागरीत सूर्याचे प्रतिबिंब पडते. घागर उलटली की, ती मोकळी होते आणि प्रतिबिंब नाहीसे होते पण आकाशात तळपणारा सूर्य काही नाहीसा होत नाही. मठात भरून असलेले आकाश बाह्यतः मठाकृती दिसते. मठ मोडला तर आकाशात काय फरक पडतो? आकाशावर त्या विघटनाचा काहीच परिणाम होत नाही ते जसेच्या तसेच रहाते. आकाशाचे मूळरूप मठ बांधला किंवा मठ मोडला म्हणून काही बदलत नाही. जसेच्या तसेच रहाते. तसेच हे आहे. शरीर गेले तरी मूळस्वरूपास भंग नाही. पार्था, तू भ्रमाने नाशाचा आरोप त्या चैतन्यावर करू नकोस. जुने फाटके वस्त्र टाकून द्यावे आणि नवीन सुंदर वस्त्र वेढून घ्यावे त्याप्रमाणे एका शरीराचा त्याग करून हा चैतन्यनाथ दुसरे वस्त्र धारण करतो. तो अनादि, नित्यसिद्ध, निरुपाधिक व विशुद्ध आहे. शस्त्रादिकाचा घाव त्याच्यावर बसतच नाही.

एकदा एक साधु सर्व धर्मांच्या ऐक्याबद्दल उपदेश करीत असे. देवभक्तांचे ऐक्यही विशद करीत असे. राजाला खूप राग आला त्याने हुकूम केला की, “ह्याला सुळावर द्या. आपलाच धर्म सर्वश्रेष्ठ असताना हा असा प्रचार करतो याचा वधच झाला पाहिजे.”

साधूने शांतपणे सुळाकडे चालायला सुरुवात केली. तो गात होता, “मृत्यो! ये मित्रा, मी तयार आहे. माझ्या आणि भगवंताच्यामध्ये या शरीराचाच काय तो आडपडदा होता. तो तू काढून टाकतो आहेस. मी तुझे स्वागत करतो!”

तसे देव सांगत आहेत, “अर्जुना! अरे हे शरीर नाशवंतच आहे. त्याचा कशाला मोह हवा? अरे, प्रेम त्या चैतन्यावर करावे की, जे शाश्वत आहे. निरंतरचे आहे. ते चैतन्य, तो आत्मा कसा आहे सांगू काय? तो प्रलयोदकांतही बुडत नाही. त्याला अग्निदाह होऊ शकत नाही, वाऱ्याने तो वाळत नाही. अर्जुना, तो आत्मा तर्कदृष्टिला दिसत नाही, ध्यान त्याच्या भेटीसाठी उत्कंठित असते. पण ध्यानात तो सापडत नाही. मनाला हा नेहमीच दुर्लभ आहे. साधनानेही मिळणारा नव्हे. अर्जुना, हा पुरुषोत्तम निःसीम आहे, नित्य आहे, अचल आहे, शाश्वत आहे, सर्वत्र आहे, परिपूर्ण आहे हे तू जाणून घ्यावेस. त्याचे सर्वात्मकत्व तू समजून घेतलेस की, तुझा शोक सहजच संपेल.

समज, तू हे जाणत नाहीस आणि म्हणून आत्मा नाशवंत आहे असे मानतोस. तरीही तू त्याच्या नाशाबद्दल शोक करणे उचित ठरणार नाही. गंगेच्या पाण्याचा प्रवाह जसा अखंड असतो तसा ‘आदि-स्थिती-अंत’ या अवस्थांचा क्रम अखंडच आहे. गंगेचे पाणी उगमस्थानी नुसते झिरपत असते, मध्यंतरी त्या पाण्याचा विस्तीर्ण प्रवाह वाहतो आणि शेवटी अथांग समुद्रात ते पाणी लीन होते. मध्यंतरातला ओघ आपण पहातो

त्याप्रमाणे जन्मास आलेल्या ह्या प्राण्यांचे जीवन आपण पहातो. पार्था, काय सांगू, जन्माला आलेला प्रत्येक प्राणी जन्माच्या क्षणीच मरणाची वाटचाल करू लागतो.

आपल्याकडे जन्मास आलेल्या मुलाची नाळ, वार वर नारळ ठेवून पुरली जाते. पूज्य जेरेशास्त्री म्हणतात, "अहो हे परत जाण्याचे प्रस्थानच आहे. प्रस्थानाची सुपारी देवापुढे ठेवायची तसाच हा नारळ असतो. पण मनुष्यास विस्मरण होते."

देव म्हणतात, "अरे हा प्रश्न अनादि आहे. कुठल्याही प्राण्यास तो चुकलेला नाही. स्वाभाविकच असलेल्या ह्या जन्म आणि मृत्यू अवस्था आहेत. याबद्दल शोक मानून काय करायचे? हे सर्व लोक जन्म-मरणाच्या आधीन आहेत हे तुला पटत नाही, पण जन्म-मृत्यू अटळच आहेत, रहाटगाडग्यासारखा हा क्रम चालतो, हे ध्यानात घे आणि त्या अवस्थांचा शोक करू नकोस.

अरे, उदय आणि अस्त जसेजसे अखंड चालू असतात, त्याप्रमाणे जे उत्पन्न झाले त्याचा नाश होतो आणि ज्याचा नाश झाला ते पुन्हा उत्पन्न होते. महाप्रलयात ह्या ब्रम्हांडाचा नाश झाला तरीही त्याची पुन्हा उत्पत्ती होतेच होते. आदि आणि अंत हे चालूच रहाते. धनुर्धरा, हे पटते का तुला? शहाणा असून तू अजाणासारखा शोक काय करतोस?

आणखीही एक विचार तुला सांगतो. तो पटवून घेतलास तरीही शोक करणे किती चुकीचे आहे हे तुला कळेल. अर्जुना, लक्षात घे. हे सर्व जीव जन्माला येण्यापूर्वी निराकार होते. जन्माला आल्यावर त्यांच्या देहांना नामरूप प्राप्त झाले. नाती-गोती निर्माण झाली. जेव्हा देहाचा नाश होतो तेव्हा त्यांचे दुसरे तिसरे काही न होता पूर्वस्थितीचे निराकार स्वरूप प्राप्त होते. झोपलेल्या माणसाला स्वप्न पडावे त्याप्रमाणे सस्वरूप चैतन्याच्या ठिकाणी मायेच्या प्रभावाने आकार भासतो. वाऱ्याने पाण्याला स्पर्श केल्याबरोबर पाणी तरंगाकार भासते किंवा सोनाराच्या इच्छेमुळे सोन्याला दागिन्याचा आकार येतो. पण ह्या बाह्य आकारामुळे पाण्याच्या वा सोन्याच्या मूळ स्थितीत फरक पडत नाही. आकाशात अभ्रे येतात, जातात. तसेच चैतन्यावर हे आकार भासमान होतात, नाहीसे होतात हे समजून घे. जे मुळात खरे नाहीतच त्या आकाराच्या नाशाच्या कल्पनेने तू रडतो आहेत. ते सोडून दे आणि मनात हे पूर्ण बाणून घे की,--

**चैतन्य अविनाशी आहे,**
**चैतन्य निराकार आहे.**

"या चैतन्याचे माहात्म्य काय वर्णन करावे? त्याचा नुसता ध्यास लागला की, विषय त्या संताला आपणहूनच सोडून जातात."

या ओव्या वाचताना लक्षात येते की, विषय सोडण्याची धडपड न करता आत्म्याच्या शोधाचा ध्यास लावून घ्यावा म्हणजे विषयांच्या तावडीतून सुटण्यासाठी वेगळी धडपड करायलाच नको.

अनुक्रमणिका

गुरूदेव रानड्यांना “द मार्के” दांपत्याने प्रश्न विचारला होता त्याची आठवण होते. त्या दांपत्याने विचारले, “नीतिनियम अंगी बाणून घेण्याची साधकाने पराकाष्ठा करायला हवी ना.”

गुरूदेव म्हणाले, “नामस्मरणावर भर द्यायचा. बाकीचे काम आपोआप होते. नामस्मरण नेमाने, कट्टाने सत्कारपूर्वक केले की, साधकाच्या हातून नीतिबाह्य वर्तन घडतच नाही.”

साधकाने जीवनक्रम कसा ठेवावा ह्याबद्दलच्या अशा गर्भित सूचना ज्ञानेश्वरीत पदोपदी आहेत. त्यातीलच ह्या ओवींचा भाग. चैतन्याबद्दल ज्या प्रमाणात आर्तता उत्पन्न होईल, तीव्र होईल, त्या प्रमाणात विषयच आपली संगत सोडून जातील हे केवढे समाधानाचे आश्वासन आहे. नाही का? नाहीतर नेहमी विचार येतो की, एकीकडे नामस्मरण आणि दुसरीकडे विषयांची ओढ ही दोन आघाड्यावरची लढाई कशी लढायची? पण माऊली सांगत आहेत की तसे नाहीच. नामस्मरणाच्या आघाडीवर अखंड झुंजले की, दुसरी आघाडी आपोआप संपतेच. त्या चैतन्याचा ध्यास लागला पाहिजे. कारण ते एकमेव सत्य आहे.

या चैतन्याच्या प्राप्तीसाठी विरक्त वनवासी होतात. मुनीश्वर ब्रह्मचर्यादि व्रतांचे आचरण करतात. दृष्टि असते केवळ त्या आत्म्याची प्राप्ती व्हावी यावर! काहीजण अंतःकरण निश्चल करतात. त्यांना आत्म्याचे दर्शन घडते, आणि मग ते त्या आनंदात संसार विसरूनच जातात. काहीजण आत्म्याचे गुणवर्णन करण्यात तल्लीन होतात. त्यांच्या चित्ताला उपरती होते. नदीचा ओघ जसा एकदा समुद्रात जाऊन मिळाला की, समरस होऊन जातो, परत येतच नाही त्याप्रमाणे ह्या योगीश्वरांचे चित्त त्या आत्म्याशी एकरूप होऊन जाते. परत संसारात येतच नाही. देहाची उपाधि घेतच नाही.

म्हणून म्हणतो पार्था, सर्वदा सर्व देहात रहाणारे हे विश्वात्मक चैतन्य तू जाणून घे. करू म्हटल्यानेही त्याचा घात होऊ शकत नाही. नामरुपात्मक जग मात्र होते आहे, जाते आहे, पुन्हा होते आहे यात शोक कशाचा करायचा?

अर्जुना, अगदी व्यावहारिक दृष्टिने पाहिले तरी हा शोक अनेक प्रकाराने चुकीचा व वाईट आहे.

अरे, ज्या स्वधर्माचे आचरण करून संसारात तरून जावे तो क्षात्रधर्म तू विसरूनच गेलास काय? या कौरवांचे वा तुझे काही भलते सलते झाले किंवा समज, युगांत झाला तरीही तू स्वधर्माचा कधीही त्याग करू नये. दयाळू अंतःकरण असावे पण ते कधी? योग्य ठिकाणी! लढाईला उभे रहायचे आणि दया करण्याच्या गोष्टी बोलायच्या हे उचित आहे काय? गायीचे दूध उत्तम खरे पण नवज्वरामध्ये ते कुपथ्य आहे. त्यातून जबरदस्तीने दिलेच तर विष दिल्यासारखे होईल. भलत्या ठिकाणी भलते केले तर आपल्या हिताचाच नाश होणार. तेव्हा सावध हो! कशाला वृथा व्याकुळ होतोस? आपला जो धर्म असेल त्याचे आचरण करीत असताना दोष लागत नाही. सरळ रस्त्याने चालले तर अडथळा कशाला येईल? हातात दिवा घेऊन चालल्यावर ठेच कशाला लागेल? स्वधर्माचरण करीत गेले की, आपोआपच आपल्या सर्व इच्छा परिपूर्ण होतात. तुम्हा क्षत्रियांना लढाईशिवाय दुसरा धर्मच नाही. मनात शंका न आणता आवेशाने झुंजलेच पाहिजे. तुमच्यासमोर हाच उचित प्रसंग येऊन ठेपला आहे. जास्त काय बोलायचे?

अर्जुना! ही लढाई नव्हे तर तुमचे दैवच उदयास आले आहे. सर्व धर्मांचे भांडारच जणू काही तुमच्यापुढे उघडले आहे. लढाई कशाला म्हणायचे? हा तर स्वर्गच यारुपाने अवतरला आहे. तुझ्या प्रतापसूर्याचा हा जणु काही उदयकालच आहे. सहज जाता जाता चिंतामणी पायाशी यावा, तशी ही लढाई अनेक पुण्यांचे फल म्हणून समोर उभी ठाकली आहे. तुझ्या गुणावर लुब्ध होऊन तुला वरण्याच्या इच्छेने ही कीर्तीच उल्हासाने या रणस्वयंवर मंडपात आली आहे. जांभईसाठी तोंड उघडावे आणि त्यात अवचित अमृताचाच घोट पडावा तसे हे झाले आहे म्हणेनास.

आता ही अशी सोन्यासारखी संधी सोडून जर तू भलत्याच समजूतीने शोक करू लागलास तर तुझ्यासारखा मूर्ख तूच. दुसरी काही उपमा नाही. आज जर तू इथे शस्त्र टाकून दिलेस तर पूर्वजांनी जे जे यश संपादन केले त्याला काळिमा लावलास असे होईल. जग तुला दोष देईल. महादोष तुम्हाला शोधून काढून तुमच्यावर झडप घालतील. पतिहीन स्त्रीप्रमाणे स्वधर्मापासून च्युत झालेल्या पुरुषाचा अनादर होत असतो. रणभूमीवर पडलेल्या प्रेतावर जशी गिधाडे झडप घालतात तसे स्वधर्महीनावर महादोष तुटून पडतात. स्वधर्माचा त्याग करशील तर अशा प्रकारच्या पापांचा धनी होशील. अपयश तर कल्पांतापर्यंत धुतले जाणार नाही. अरे, अपकीर्तीचा डाग अंगास लागला नाही तोवरच शहाण्याने जगावे. तू म्हणतोस इथून परत फिरू या. कुठे जाणार आहेस तू इथून? तू पुष्कळ म्हणशील माझ्या मनात मत्सर नाही. माझे मन दयेने भरून गेले आहे. कोणाला हे खरे वाटणार आहे? तू इथून मागे हटतो आहेस हे पाहिल्याबरोबर समोर उभे असलेले योद्धे एकदम तुला वेढून घेऊन तुझ्यावर बाणांचा, अस्त्रांचा वर्षाव करतील. त्यांच्यावर दया करून पळून चाललास तरी त्यांच्या माऱ्यातून सुटशील म्हणतोस की काय? या प्राणसंकटातून कशीबशी सुटका करून घेतलीस आणि अगदी जगलास तर ते जगणे, मरण बरे, इतके लज्जास्पद असेल. विचार कर लढाई करण्यासाठी तू रणभूमीवर आलास आणि आता शत्रूंची दया येऊन माघारा फिरलास तर या दुर्जन वैऱ्यांना काय तुझी कृपाळू वृत्ति कळणार आहे? ते म्हणतीलच--"बघा, बघा! तो अर्जुन आम्हाला भिऊन कसा पळाला. मारे शौर्याच्या वल्गना करीत होता." हे त्याचे लागट बोलणे तुला सोसेल? धनुर्धरा! तुला काय सांगायला हवे काय की प्राणाची पर्वा न करता अपार कष्ट घेऊन लोक आपली कीर्ति वाढवतात. प्राण संकटात न घालताही अद्वितीय गगनाच्या तोडीची कीर्ति तू जोडली आहेस. तीन्ही लोकात तुझे गुण प्रख्यात आहेत. तुझी सर्वत्र निःसीम ख्याती आहे. देशोदेशीचे राजे भाटाप्रमाणे तुझी स्तुति करतात. प्रत्यक्ष यमासारखा तुझा त्यांना दरारा वाटतो. तुझी थोरवी गंगेसारखी स्वतः पावन व दुसऱ्यास पावन करणारी आहे. मी मी म्हणणारे वीर तुझे शौर्य पाहून चकित होतात. तुझे पौरुष ऐकून त्यांनी रणभूमीवर येण्यापूर्वीच आपल्या प्राणास तिलांजली दिली आहे, ते काय उगीचच? सिंहगर्जनेने जसा हत्तीला युगांतच ठाकला असे वाटते तसा या एकूणएक कौरवांना तुझा धाक आहे. पर्वत वज्राच्या आणि सर्प गरुडाच्या भयात अहोरात्र रहातात तसे तुझ्या भयाच्या छायेत ते वावरतात. पण आता झुंज न देताच जर तू मागच्या मागे पाय काढलास तर कठीण प्रसंग आहे. तुझा दरारा संपेल, इतकेच नव्हे तर हीनत्व अंगी येईल. तू पळून जाऊ लागलास तर ते बरे तुला पळू देतील? घेरून तुला पकडतील, मारा करतील, निंदानालस्ती करतील, अपमान करतील. ती अवकळा कशी काय सहन करशील रे? शौर्यहीन झालास की, ते काय बोलायचे शिल्लक ठेवतील? अरे, काय म्हणून या अवदशेस यावे? काळीज दुभंगून टाकणारी ती अवस्था भोगण्यापेक्षा भले लढता लढता मरून जावे. लढाईत जय मिळाला तर मोठ्या उत्साहाने या पृथ्वीतळावर सम्राटपद भोगावे. लढताना मेलास तर स्वर्गसुख भोगशील, जगलास तर राज्यसुख भोगशील.

अनुक्रमणिका

क्षात्रधर्म तो हाच! लढाई करून जे मिळेल ते क्षत्रियास उचित असे मिळेल. भलभलते विचार मनात येऊ देऊ नकोस. उठ आणि आवेशाने या शत्रूंच्यावर तुटून पड!

तुझ्या मनात एकसारखी अडखळण्याची, बुडण्याची, पडण्याची भीती आहे. अरे, स्वधर्माचरण करीत गेले की, असलेले दोषही नाहीसे होतात. मग नवा कसा लागेल? पातकाची शंका तुझ्या मनात येतेच कशी? नाव बुडवते का? सरळ रस्ता आडरानात नेतो!

अशा अडचणी कधी उत्पन्न होतात सांगू का? अमृत आणि विष मिसळून प्याले तर अपाय होतो. काही वेगळा हेतू मनात धरून धर्माचरण केले तर स्वधर्माचरण पापाला पात्र ठरेल. पार्था! अरे हेतू सोडून क्षात्रधर्म माझा धर्मच आहे असे म्हणून निर्हेतुकपणे झुंज दिली तर पाप लागेल कसे?

सुखाच्या वेळी आनंदाने उन्मत्त होऊ नये, दुःखाच्या वेळी उद्विग्न होऊन हतबल होऊ नये. मनामधे लाभ होईल की, हानी होईल हा हिशोब मांडत बसू नये. या लढाईत जय मिळेल की, प्राण जातील ह्या भविष्याचे चिंतन वा चिंता करू नये. उचित असे स्वधर्माचरण करीत असताना जे जे उत्पन्न होईल ते ते निवांत सहन करून जावे.

**तू मनाने असा विरक्त हो**
**मग पाप होणारच नाही.**
**तू निश्चिंत होशील**
**आणि निकराने लढशील**

तेव्हा ह्या विवेकाने त्या अनुचित कारुण्याचा बीमोड करून क्षात्रधर्मास उचित असे युद्ध कर आणि हेच स्वधर्माचरण आहे.

थोडक्यात तुला हा ज्ञानमार्ग सांगितला. पण अर्जुना ज्ञानमार्गाचा अधिकारी होण्यास कर्ममार्गाची निश्चित कल्पना असायला हवी. म्हणून तुला कर्ममार्गाच्या खुणा सांगतो, युक्ति सांगतो. त्या युक्तिने कर्म केलेस की, तुला कर्माचा बंध काही करू शकणार नाही. वज्रकवच अंगावर चढवले आणि मग लढाईच्या धुमश्चक्रीत शिरले तर शस्त्रांचा वर्षाव झाला तरी अपाय न होता जयाची प्राप्ती होते. त्याप्रमाणे पूर्वी आपण करीत असलेलेच कर्म केले, पण ते करताना कर्मफळावर नजर ठेवली नाहीतर कर्माचे रूप पालटते. तेच कर्म बंधनकारक न होता मोक्षदायक होते. स्वधर्माचरण करीत असल्याने ऐहिकही सुरक्षित रहाते आणि मोक्ष तर ठेवलेलाच असतो. मंत्र जाणणाऱ्याला जशी भूतबाधा होत नाही त्याप्रमाणे निष्काम कर्म करण्याची युक्ति आपल्याला साधली की, संसारात असूनही संसार बुडवू शकत नाही, बाधक होऊ शकत नाही. आता ही युक्ति बुद्धिने स्वीकारली पाहिजे. पण मुळात बुद्धिच दोन प्रकारची असते.

सद्बुद्धि आणि दुर्बुद्धि या दोन्ही प्रकारच्या बुद्धिंचे विवरण करतो म्हणजे तुला स्पष्ट कल्पना येईल.

अर्जुना, जी विकाराधीन असते त्या बुद्धिला दुर्बुद्धि म्हणावयाचे. अविवेकी जीव तिच्या ठिकाणी रमतात. मग ते लोक वेदांचा आधार शोधतात, कर्ममार्गच सर्वश्रेष्ठ आहे असे ठरवितात. खरे म्हणजे त्यातही काही बिघडत नाही पण, ह्या लोकांचे लक्ष त्या कर्मातून उत्पन्न होणाऱ्या फळाकडे लागते. एकदा कर्मफळाची लालसा निर्माण झाली की, मग ते म्हणतात की, "जन्माला येऊन यज्ञयागादि कर्मे करावी. सुंदर स्वर्गसुख भोगावे." या अशा सुखावाचून दुसरे सुखच नाही असे ठरवून कामनेकडून पराभूत झालेले ते कर्मनिष्ठ भोगावर नजर ठेवून कर्माचरण करतात. फल उत्तमात उत्तम मिळावे म्हणून कर्मानुष्ठान बिनचूक, विधिपूर्वक, नैपुण्यपूर्वक असे करतात. धर्माच्या आज्ञेचे रेसभरही उल्लंघन करीत नाहीत. पण एकच वाईट करतात की, मनात ह्या कर्माचे फल मिळावे अशी जी इच्छा करतात ते फल क्षणभंगुर स्वर्गसुख हे असते. ह्या फलाशेच्या नादात यज्ञपुरुष जो प्रत्यक्ष यज्ञभोक्ता परमात्मा त्यालाच विसरतात. उत्तम कापूर आणावा, त्याची रास करावी आणि तो उगीचच पेटवून द्यावा किंवा उत्तम मिष्टान्न तयार करावे आणि त्यात भयंकर विष मिसळावे त्याप्रमाणे ह्या फलाशेने ते सुंदर कर्म बाधित होते. दैवयोगाने त्यांना धर्मफलाचा अमृतकुंभ मिळतो, पण हेतुपूर्वक धर्माचरण केल्याने तो कुंभ त्यांनी लाथेने उडविल्यासारखे होते. सायासाने पुण्य जोडावे आणि त्या पुण्याच्या मोबदल्यात संसारसुखाची अपेक्षा कशासाठी करावी? पण त्या जीवांना सद्बुद्धि प्राप्त झालेली नसल्यामुळे त्यांच्या हातून हे घडते."

पूज्य ब्रह्मचैतन्य गोंदवलेकरमहाराजांची एक गोष्ट आहे. एकदा एक कुष्ठी त्यांच्याकडे आला आणि म्हणाला, "महाराज, हे कोड जाण्याचा काही उपाय सांगाल तर कृपा होईल. आपण जे सांगाल ते मी निष्ठापूर्वक करीन."

महाराजांनी रामनामाचा उपदेश केला आणि राममंदिराची सेवा सांगितली. अत्यंत भाविकपणे तो रोगी अखंड रामनाम घेत असे आणि नेकीने मंदिराची झाडलोट करीत असे. बरेच दिवस झाल्यावर त्याच्या ध्यानी आले की, कोड कमी होते आहे. त्याला खूप आनंद झाला. त्याने जास्तच उत्साहाने नामस्मरण व सेवा सुरू केली. असेही थोडे दिवस गेले व एक दिवस तो महाराजांच्याकडे गेला आणि म्हणाला, "महाराज, आपल्या आशीर्वादाने रोग कमी कमी होतो आहे. रामनामाचा प्रभाव मला कळला. पण आता वाटते नामस्मरणाची पुण्याई ह्या क्षुद्र देहासाठी कशाला खर्च करायची? राहू दे, हा रोग तसाच. पुण्याई साठवतो मग देवच भेटेल की."

महाराज आनंदाने म्हणाले, "शाबास रे, तुझी देहासाठी पुण्याई खर्च न करता देवासाठी साठवतो म्हणतोस काय तुझी सद्बुद्धि ! अरे मी तुला आशीर्वाद देतो की रामराया तुझ्या पुण्याईला हात न लावता व्याजातच तुझा रोग नाहीसा करील."

मालूताई, गोष्ट किती सुंदर आहे ना? देव पुढे सांगत आहेत, "उत्तम स्वयंपाक करून तो पैशाच्या आशेने विकून टाकावा, त्याप्रमाणे हे अविवेकी पुरुष वेदांच्या शब्दज्ञानात गर्क रहातात. धर्माचरण उत्तम करतात आणि मग ऐहिक भोग व स्वर्गीय भोग यासाठी ती पुण्याई विकून टाकतात. अर्जुना, यात चूक मात्र वेदांकडे नाही हे ध्यानात ठेव. वेद सत्त्व, रज, तम या तीन्ही गुणांनी युक्त आहेत. त्यातला रजतमात्मक भाग स्वर्गफल कसे मिळवावे हे सांगणारा आहे. उपनिषदादि भाग पूर्ण सात्विक आहे. त्या रजतमात्मक भागाकडे

लक्ष केंद्रित करून आचरण केले तर ते सुखदुःखाला कारण होते. सूर्य उगवला की, सगळेच रस्ते प्रकाशमय होतात म्हणून काय आपण सगळेच चालावयाचे आहेत काय? पृथ्वीवर सगळीकडे पाणीच पाणी झाले म्हणून काय आपण सगळ्या पाण्याला मिठी द्यावयाची आहे काय? आपल्याला ज्या मार्गाने जावयाचे असेल त्यावरून चालायला सुरवात करायची. बाकीचे मार्ग सोडून द्यावयाचे. आपल्याला हवे असेल तेवढेच पाणी भरून घ्यायचे. त्याप्रमाणे वेदांनी पुष्कळ गोष्टी सांगितल्या, पुष्कळ भेद सांगितले तरी त्यांत जेवढे आपल्या हिताचे असेल तेवढेच आपण घ्यायचे. ज्ञानी पुरुष वेदार्थ पहातात, त्यातले जे शाश्वत आणि इष्ट असेल त्याचा स्वीकार करतात. अर्जुना, अशी ही सद्बुद्धि पुण्याईचे फल म्हणून थोडीशी जरी अंतःकरणात प्रकाशमान झाली तरी सर्व संसार भयाचा नाश करते. लहानसाच दिवा पण पुष्कळ प्रकाश पाडून अंधार गिळून टाकत नाही का? तसेच ही सद्बुद्धि लहानशी, अल्पच, असली तरी फार सामर्थ्यशाली असते. तिला अल्प म्हणूच नये. ही सद्वासना चराचरामध्ये दुर्लभ आहे. विचारी शूर पुरुष तिची फार आशा ठेवून असतात. इतर दगडासारखा परिस विपुल मिळत नाही, अमृत वाटेल तेवढे लाभत नाही. पण तो अल्प लाभच मनोरथ पुरविण्यास समर्थ असतो. ही सद्-बुद्धि थोडीशीच मिळवलीस तरी पुरे. अरे, ज्याप्रमाणे गंगा एकदा हिमालयातून निघाली की, थेट समुद्रापर्यंत जाऊन पोहचतेच. त्याप्रमाणे ह्या सद्वासनेचा शेवट परमात्म्याच्या चरणाजवळच होतो. ईश्वरावाचून जिला दुसरे आश्रयस्थान नाही अशी ही केवळ एकच बुद्धि आहे. म्हणून तू सत्त्व, रज, तम ह्या तिन्ही गुणांचा त्याग कर आणि केवळ आत्मसुखावर नजर ठेव. मी पुष्कळ विचार करूनच तुला सांगतो आहे की, अर्जुना, स्वकर्म फलाशा सोडून करणे हा एकच मार्ग आहे. वाट्याला आलेले कर्म तुला टाकता यावयाचे नाही. निषिद्ध कर्म करू नको. कर्मफळाची आशा धरू नकोस.

**"मनात हेतू न ठेवता पार्था, तू हे सत्क्रियाचि आचरावी"**

निष्काम कर्माची युक्ति तू एकदा का शिकलास की, झाले. मग फलाचा संग सुटेल आणि तरीही तू मनःपूर्वक कर्म करशील. दैव अनुकूल असले तर सुरू केलेले काम सिद्धीला जाईलच पण त्यात तू विशेष संतोष मानू नको. काहीतरी विघ्न येऊन ते पुरे न होता मधेच थांबले तरी त्यामुळे दुःख मानू नको. कर्म सिद्धीला गेले तरी भले, न गेले तरीही भले असे मानायला शीक. जे जे जसे जसे घडेल ते ते तसे तसे त्या आदिपुरुषाला अर्पण कर म्हणजे ते सहजच पूर्ण होईल. पूर्ण व अपूर्ण कर्माविषयी समतोलपणा आणि कर्म घडेल तसे तसे भगवंतास अर्पण करणे, या मनोवृत्तीलाच ज्ञानी पुरुष योगस्थिति म्हणून वाखाणतात.

या योगस्थितीमध्ये मन आणि बुद्धि यांचे ऐक्य असते. असे जे चित्ताचे समत्व तेच योगाचे सार आहे. तुला असे वाटेल की, मग वेद सांगतात की, सकाम कर्मे अगदीच कमी प्रकारची आहेत. पण अर्जुना तसे नव्हे. सकाम कर्मे बिनचूक, उत्तम, धर्माज्ञेप्रमाणे करता करता मग कर्तृत्त्वाचा मद गळून पडतो. फलाची इच्छा नाहीशी होते आणि शुद्ध कर्म हातून घडत जाऊन योगस्थितीची प्राप्ति होते.

हा बुद्धियोग भक्कम पायावर उभा आहे. अर्जुना तू तिथे स्थिर हो आणि फळहेतूचा पूर्ण त्याग करून टाक. ज्यांनी ज्यानी ह्या बुद्धियोगाचा आश्रय घेतला ते संसार तरून पलीकडे गेले. पापपुण्याच्या बंधनातून तेच सुटले. गंमत पहा ते कर्म तर करतातच, पण कर्मफळात गुंतत मात्र नाहीत आणि या युक्तीने जन्ममृत्युच्या येरझारा चुकवतात. आनंदाने परिपूर्ण असलेले अढळपद अशा योग्यांना प्राप्त होते.

अनुक्रमणिका

अर्जुना! तू असा हो रे! मग तुझा तो मोह कुठल्या कुठेच जाईल. मोह गेला की, वैराग्य मनात संचरून राहील आणि निष्कलंक असे गहन आत्मज्ञान तुझ्या मनात उत्पन्न होऊन दुसऱ्या कुठल्याही आशेला मनात जागाच रहाणार नाही. आणखी काही जाणून घ्यावे, भूतकाल आठवावा, हे सगळे थांबेल. इंद्रियांच्या सहवासाने चंचल होणारी तुझी बुद्धि आत्मस्वरूपामध्ये स्थिर होईल. तिला योगस्थिति प्राप्त होईल आणि केवळ समाधिसुखात ती लीन होऊन राहील.

संजय म्हणाला, “महाराज, अर्जुनाच्या मनात अशी शंका आली की, असा ज्ञानी आपल्याला ओळखता येतो का? त्याने देवांना प्रश्न केला, “देवा, तुम्ही कृपानिधीच अहा. माझ्या एका प्रश्नाचे उत्तर द्याल काय?”

अच्युत म्हणाले “हो, हो. वाटेल ते विचार की, तुझ्या मनात जे असेल ते स्पष्ट सांग. भिऊ नकोस.”

अर्जुन भीत भीत म्हणाला, “देवा ही स्थितप्रज्ञता वगैरे ठीक आहे. मनाची अवस्था आहे ती पण अमुक मनुष्य स्थितप्रज्ञ आहे, हे कसे ओळखायचे? जो समाधिसुखाचा अखंड अनुभव घेतो तो कसा काय वागतो? तो कसा असतो? काय लक्षणे आहेत, या स्थितप्रज्ञ अवस्थेची?”

यश, श्री, औदार्य, ज्ञान, ऐश्वर्य, वैराग्य हे सहा गुण ज्याच्या अंगी नांदतात तो भगवंत नारायण म्हणाला, “अर्जुना, मनात असणारी अनिवार अभिलाषा आत्मसुखाच्या अनुभवात अडथळा आणते, ही विषयासक्ती जीवाला आत्मसुख भोगू देत नाही. नित्यतृप्त साधकाच्या मनात शिरून त्याच्या आनंदपूर्णतेचा नाश करून त्याला विषयगर्तेमध्यें “काम” पाडत असतो. असा हा दुर्जय कामही ज्याने जिंकला त्याला स्थितप्रज्ञ म्हणावे.”

एकदा काय झाले, नारद व शुक दोघे श्रीकृष्णाच्या मंदिरात आले. नारदांनी प्रश्न केला, “देवा, आम्हा दोघांपैकी श्रेष्ठ कोण हे सांगा.” प्रश्न फार कठीण होता. परीक्षा कशी करावयाची? ते दोघे देवांच्यासमोर झोपाळ्यावर बसले होते. देवांना काय सांगावे हे कळेना.

रुक्मिणीदेवी जवळच होत्या त्या म्हणाल्या “मी सांगते.” त्या देवांच्या जवळून उठल्या आणि शुक व नारद बसले होते त्या दोघांच्या मधे जाऊन झोपाळ्यावर बसल्या. देवी जवळ बसलेल्या पहाताच नारद जरा बाजूला सरकले. शुक जसे होते तसेच बसून राहिले. देवी उठल्या आणि म्हणाल्या “शुकदेव श्रेष्ठ! त्यांच्या ध्यानीमनी स्त्रीपुरुष हा भेदच राहिलेला नाही.”

त्या गोष्टीची इथे आठवण होते आहे. देव पुढे म्हणाले, “मनातून काम पूर्णतया निघून गेल्यावर त्या पुरुषाचे मन अष्टौप्रहर आत्मसुखात रमलेले असते. दुःख प्राप्त झाले तरी तो उद्विग्न होत नाही. सुखाच्या आशेत अडकून रहात नाही. त्याच्या ठिकाणी काम, क्रोध, नसल्यामुळे भयही त्याला ठाऊक नसते. तो आनंदाने भरलेला असतो. प्रपंचाची उपाधि टाकून तो भेदरहित अमर्याद अवस्थेत नांदतो. आत्मबोधाने भरून गेल्यामुळे हर्ष विषादाच्या पलीकडे गेलेला असतो. ह्या लक्षणावरून स्थितप्रज्ञ पुरुष तुला सहज ओळखता

येईल.

कासव आपल्या इच्छेनुसार आपले अवयव बाहेर काढते, आत नेते, त्याप्रमाणे त्याची इंद्रिये त्याच्या स्वाधीन असतात. तो म्हणेल ते ती इंद्रिये करतात. असा एखादा पुरुष जेव्हा तू पहाशील तेव्हा समज की, हा स्थितप्रज्ञ आहे. अर्जुना, त्याने ही स्थिती कशी प्राप्त करून घेतली हे पहाण्यासारखे आहे. त्याने रसनेंद्रियापासून इंद्रियजयास सुरवात केली."

पूज्य श्रीधरस्वामीमहाराज साधना कालात पाच घरी भिक्षा मागून आणत. मग ती झोळी नदीत बुडवून खुंटीला टांगून साधनेस सुरवात करत. साधना झाली की देव, नदी, गाय ह्यांना भाग अर्पण करून मग उरलेला तो शेष काला भक्षण करीत असत. काय जिभेचे चोचले शिल्लक रहाणार ह्या उग्र तपश्चर्येत!

देव म्हणाले, "कान, डोळे ही इंद्रिये आवरून घेतली आणि रसनेंद्रियाला नियमात जखडले नाही तर, ती पुन्हा हजारो विषयवासनांच्या ताब्यात साधकाला देऊन टाकते. वरवरची पालवी खुडली आणि मुळाला पाणी घातले तर त्या वृक्षाचा नाश कसा होणार? त्या पाण्याच्या जोरावर तो वृक्ष आडवा जास्तच जोमाने फुटतो. तसा रसनाद्वारे विषय मनामध्ये पुष्ट होतात. रसनाजय मात्र खरंच फार कठीण आहे. इतर इंद्रियांचे विषय तोडणे त्या मानाने सोपे पण ज्यावर प्राणाचे अस्तित्वच अवलंबून आहे त्या त्या अन्नाचा आस्वाद घेणारी रसना जिंकणे फार दुर्घट आहे.

मात्र जेव्हा सोहंभाव प्रतिती येते व परब्रह्माचा साक्षात् अनुभव येतो तेव्हा शरीरभावच संपतो, इंद्रिये विषय विसरतात आणि सहजच त्यात रसनाजय होऊन जातो. ही अपरोक्षानुभूति येईपर्यंत मात्र ही इंद्रिये साधनांना दाद देत नाहीत. इंद्रिये इतकी प्रबळ आहेत की, साधक अभ्यासाचा पहारा ठेवतो, यमनियमांचे कुंपण घालतो, मन सदैव मुठीत ठेवतो. अशी शिकस्त करीत असतानादेखील ती साधकाला कासावीस करतात. मंत्रज्ञालासुद्धा कधीकधी पिशाच्चे भ्रमात पाडतात तशी ती इंद्रिये साधकाला भ्रमात पाडतात. विषय फार चतुर आहेत. साधनेच्या मार्गावर साधकाला ऋद्धिसिद्धि प्राप्त होतात आणि कोंडून ठेवलेली इंद्रिये या ऋद्धिसिद्धिंचा हात धरून साधकाच्या मनात प्रवेश करतात. साधकाचे मन मग पेचात धरतात आणि अभ्यास जिथल्या तिथेच रहातो. ह्या ऋद्धिसिद्धि इंद्रियांना सामील होऊन असा घात करतात. त्यांचे सामर्थ्यच तसे असते.

सिद्धचरित्रात असा एक प्रसंग वर्णन केला आहे की, रामचंद्रमहाराज तिकोटेकर अक्कलकोटला असताना अमरगोलकर नावाचे जहागिरदार महाराजांचे पाय दाबण्यासाठी नित्यनियमाप्रमाणे आले. महाराजांना झोप लागली होती व दिव्य वस्त्रालंकार घातलेल्या दोन स्त्रिया महाराजांची पादसेवा करीत होत्या. बापू अमरगोलकार क्षणभर थांबले की, राजस्त्रियाच सेवा करीत आहेत की, काय म्हणून. पुन्हा त्यांच्या मनात आले, "असल्या तर काय झाले? आपल्याच तर मायबहिणी त्या." त्यांनी आत प्रवेश केला आणि विचारले "आपण कोण? प्रश्न विचारून होतो न होतो तोच त्या दोघी अदृश्य झाल्या. महाराज, जागे झाले, बापूंनी तोच प्रश्न महाराजांना केला. महाराज नुसते हसले. मग बापूंच्या लक्षात आले की, जागेपणी समोर येण्याची प्राज्ञाच नाही म्हणून महाराज झोपले आहेत ही संधी साधून ऋद्धिसिद्धिच सेवा करीत होत्या. सत्पुरुष या कामात इतके दक्ष. देव म्हणाले, "म्हणून पार्था ऐक, सर्व विषयांवरील आसक्ती सोडून जो इंद्रियांचे दमन करतो तोच

योगस्थितीचा अधिकारी आहे हे समज. विषयसुख त्यांच्या अंतःकरणाला फसवू शकत नाही. विषयाला अंतःकरणात जागाच कुठे आहे? आत्मबोधाने युक्त होऊन त्याने हृदयात मलाच बसविलेले असते. मला तो क्षणभरही विसंबत नाही. बाहेरचा संसार सोडला आणि मनात थोडासा शिल्लक राहिला तर तो संसार साद्यंत व्यापून टाकतो. विष अगदी थोडे घेतले तरी त्याचा घोर परिणाम होऊन प्राणाचा नाश होतोच ना? या विषयाचा पुसटसा स्पर्श मनात असला तरी सर्वच्या सर्व विवेकाचा घात करतो.

कारण या विषयांची एकमेकात अडकलेली साखळी आहे. हृदयात विषयांचे स्मरण झाले की, निःसंग पुरुषालाही संगत बाधते. विषयाचा असा मानसिक संग झाला की, लगेच अभिलाषा उत्पन्न होते. जेथे काम उत्पन्न झाला तिथे क्रोध आलाच. क्रोध आला की, संमोह ठेवलेलाच. सोसाट्याच्या वाऱ्यात जशी दिव्याची ज्योत टिकत नाही त्याप्रमाणे संमोहाने चित्त व्यापले की, स्मृति बुडून जाते. स्मृति गेली की अस्तमानी रात्र सूर्यप्रकाशाला गिळून टाकते त्याप्रमाणे प्राण्याची अवस्था होते. अज्ञानाचा अंधार पडतो. त्याचे आच्छादन बुद्धीवर पडते आणि ती हृदयात व्याकुळ होऊन जाते. जन्मांध पळापळीत सापडला तर जसा सैरावैरा धावत सुटतो तशी बुद्धिहीनाची भ्रमणावस्था होते. स्मृतिभ्रंशामुळे बुद्धि अवघडून जाते. ज्ञानाचा समूळ नाश होतो. चैतन्य नाहीसे झाले की, शरीर जसे कुचकामी होते तशी बुद्धिनाशाने पुरुषाची अवस्था होते.

अर्जुना, वाळलेल्या लाकडातून आगीचा भडका उडण्यास जशी एक ठिणगी पुरेशी होते आणि मग ती आग त्रैलोक्याचा नाश करू शकते त्याप्रमाणे मनाला जर चुकून विषयाचे ध्यान लागले तर ही एव्हढी अधोगती साधकाला हुडकून काढते. म्हणून हे विषय सर्वथैव मनातून काढून टाकावे. विषय चिंतन थांबले की, राग, द्वेष हे सहाजिकच नाश पावतील.

एकदा मनातून हे विषय नाहीसे झाले की, मग जरी इंद्रिये विषयांत रमली तरी ते विषय बाधक व बंधनकारक होत नाहीत. आकाशातला सूर्य आपल्या रश्मिरूपी हातांनी जगाला स्पर्श करतो पण त्याला संगदोष बाधत नाही. इंद्रियांच्या विषयी जो उदासिन झाला, आत्मरसात जो तल्लीन होऊन राहिला तो कामक्रोधात सापडेल कसा? तो त्यातून सुटतोच. त्याची मजल इथवर आहे की, तो विषयांतही आत्मस्वरूपावाचून दुसरे काही पहातच नाही. मग कुठले विषय आणि कुठली त्यांची बाधा? पाणी पाण्यात कसे बुडणार? आग आगीला कशी पोळणार? जो पूर्णावस्थेला जाऊन पोचला तो विषयाच्या कचाट्यात कसा सापडणार?

अर्जुना, जो असा केवळ शुद्ध आत्मस्वरूपांत रममाण झाला तो स्थितप्रज्ञ आहे असे समज. त्याची प्रज्ञा अचल आहे असे धरून चाल. अरे, जिथे चित्ताला अखंड प्रसन्नता आहे तिथे संसारदुःखाचा प्रवेश होतच नाही. ज्याच्या जठरात अमृताचा झरा आहे, अखंड वहातो आहे त्याला तहानभूकेची बाधा वा भय कधीच असत नाही, त्याप्रमाणे ज्याचे हृदय प्रसन्न आहे त्याला दुःख उरेल कसे?

त्याची बुद्धी तर परमात्मस्वरूपामध्ये आपोआप सहज स्थिर होऊन रहाते. निर्वात अशा ठिकाणी ठेवलेला दिवा जसा न हालता, न डोलता शांतपणे तेवत रहातो तसा तो योगयुक्त पुरुष परमात्मरूपामध्यें स्थिरबुद्धीने रमतो.

या युक्तीचे ज्याला ज्ञान नाही तो मात्र विषयाच्या बंधनात अडकला जातो. पार्था, त्याच्या बुद्धिला स्थिरता नसतेच, स्थिरता असावी अशी इच्छाही नसते. आता सांग, ज्या मनाला निश्चलत्वाची भावना नाही त्याला शांती कशी स्वाधीन होईल पापी माणसाला जसा मोक्ष मिळणे शक्य नाही तसेच जिथे शांतीचा ओलावा नाही तिथे सुख चुकूनही पाऊल टाकत नाही. अग्नीमध्ये घालून भाजून काढलेली बीजे जर तरारून उगवली तरच अशांत मनुष्यास सुखप्राप्ती होणे शक्य आहे. अर्जुना, अरे मनाचे चंचलपण हेच दुःखाचे एकमेव कारण आहे. इंद्रियेच मन चंचल करीत असतात. म्हणून या इंद्रियांचा निग्रह करणेच योग्य आहे."

नदीकिनारी एकीकडे राहून साधना करणारा एक साधक होता. ओले सुके जे मिळेल ते खाऊन तो निग्रहाने साधना करीत असे. एके दिवशी एका प्रापंचिकास वाटले बिचारा कदान्न खाऊन रहातो त्याला चांगले काहीतरी खाऊ घालावे, म्हणून त्याने त्या साधकाला पोटभर रसगुल्ले खाऊ घातले. दुसरे दिवशी दुसरे मिष्टान्न घेऊन तो नदीकिनारी गेला तर तो साधक हात जोडून काकुळतीने म्हणाला, "बाबा नको रे, यात गुंतवू. काल रात्रभर राम आठवला नाही, रसगुल्लेच आठवले! पुन्हा हे पाप मी करणार नाही!"

माऊली म्हणतात, "इंद्रिये जे जे म्हणतील ते ते करणारे पुरुष आम्ही तरलो म्हणाले तरी विषयसिंधू तरून गेले असे मानू नका. काठाच्या जवळजवळ नाव आली आणि एवढ्यात प्रचंड सोसाट्याचा वारा सुटला तर ती उलटते आणि आतापर्यंत ज्या आपत्तीतून सुटून आली त्यातच सापडते. आत्मप्राप्ति झालेल्या पुरुषानेही इंद्रियांचे कोडकौतुक केले तर तो सर्व सांसारिक दुःखांनी वेढला जातोच.

आपल्याला जर आपली इंद्रिये स्वाधीन करून घेता आली तर, धनंजया, आणखी जास्त जगल्याचे सार्थक ते काय? कासव स्वेच्छेने अवयव बाहेर काढते. त्याप्रमाणे ज्याचा आपल्या इंद्रियावर पूर्ण ताबा चालतो तोच स्थितप्रज्ञ मानावा हे मी तुला वारंवार सांगितलेच आहे. आता पोचलेल्या पुरुषाचे आणखी एक लक्षण सांगतो ते ऐक.

जिथे सर्व प्राणी झोपले तिथे हा जागा आणि सर्व प्राणी जागे तिथे हा झोपलेला असतो. आत्मस्वरूप आणि प्रपंच याबद्दलची त्याची व इतरेजनांची अशी भूमिका असते. आत्मस्वरूपाचे त्याला भान असते प्रपंचाचे नसते, तर प्रापंचिकास प्रपंचाचे भान असते व आत्मस्वरूपाचे गाढ अज्ञान असते. तोच पुरुष निरुपाधिक आहे, स्थितप्रज्ञ आहे, हे निश्चित ओळख."

श्री. रामकृष्णांची अशी परीक्षा घेतली गेली. पैशाचा स्पर्शही त्यांना सहन होत नसे. भक्तास वाटले ही अतिशयोक्ती असावी. त्याने परमहंसांच्या बिछान्याखाली रुपाया सरकवून ठेवला. श्री. रामकृष्ण परमहंसांनी बिछान्यावर अंग टाकले मात्र, निखाऱ्याचा चटका बसावा तसे ते उठून बाजूला उभे राहिले. ज्या पैशाचा जगाला मोह त्याचा त्यांना इतका तिटकारा!

प्रापंचिकाची गोष्ट याच्या अगदी उलट, सिद्धचरित्रात अशी कथा आहे की, मच्छिंद्रनाथ व गोरक्षनाथ ही गुरूशिष्यांची जोडी जयपुरास पोहचली. मच्छिंद्रनाथ म्हणाले, "गोरक्षा, आज तू विश्रांती घे. मी भिक्षेला

जातो.”

गोरक्षांनी विनवून पाहिले पण, मच्छिंद्रनाथ ऐकेनात. ते भिक्षेस गावात गेलेच. एक बाई शेतावर भाकरी घेऊन चालली होती. तिच्याजवळ दोन भाकरी नाथांनी मागितल्या आणि सांगितले, “बाई, त्या भाकरीच्या किमतीचे पैसे मजजवळ नाहीत पण कैलासपती जे सुख भोगतो ते तुला भाकरीच्या मोबदल्यात देतो.”

बाई रागावून म्हणाली, “माझ्या मुलाचे लग्न ठरले आहे, सुखसोहाळे भोगीन म्हणते बैरागी बुवा आणि तुम्ही कैलासाच्या अभद्र गोष्टी कशाला बोलता? काही एक भाकरी मिळायची नाही.”

या दोन गोष्टीवरून या ओव्यांचा मतितार्थ नीट ध्यानात येतो नाही का?

देव पुढे म्हणाले, “पार्था, समुद्र अखंड मर्यादा सांभाळून शांत असतो ना! तसा हा योगी निवांत असतो. पावसाळ्यात इतक्या नद्या पाणी समुद्रात ओतत असतात म्हणून त्याला पूर आलेला कधी पाहिला आहेस काय? उन्हाळ्यात नद्या आटून जातात, पाणी वाहून आणत नाहीत म्हणून समुद्राला काही न्यूनता आलेली दिसली का? तो जसाच्या तसा पूर्ण भरलेलाच असतो ना, त्याप्रमाणे ऋद्धिसिद्धि प्राप्त झाल्या म्हणून त्यात त्याला मोठेपणा वाटत नाही. न मिळाल्या तरी आपली साधना चुकते आहे असे वाटून त्याचे धैर्य गळून जात नाही. त्याला ह्या क्षुद्र वैभवाची किंमत तरी काय असणार? महासुखात तल्लीन असणारा तो योगी ऋद्धिसिद्धि आल्या काय आणि न आल्या काय त्याची पर्वाच करत नाही. सूर्याच्या घरी तेलवात करून थोडाच प्रकाश आणायचा आहे? की, असा दिवा न लावला तर तो अंधारात बुडायचा आहे?

अरे, जो आपल्या ऐश्वर्यसंपन्न राजवाड्यात वैभवाने नांदतो आहे तो इंद्रभुवनालाही किंमत देत नाही. असा वैभवशाली श्रीमान भिल्लाच्या झोपडीवर कधीतरी आसक्त होईल काय? जो अमृताच्या चवीतही खोड काढतो तो काय कांजी सेवन करील काय? पार्था, तसाच हा योगी आत्मसुखाचा अनुभव घेत असल्याने ऋद्धिसिद्धिकडे ढुंकून पहातही नाही. स्वर्गसुखसुद्धा जिथे उल्लेखनीय वाटत नाही, तिथे सामान्य ऋद्धिसिद्धिचा पाड लागत नाही यात काय आश्चर्य आहे!

आत्मबोधाने जो संतुष्ट झाला आहे, परमानंदाने जो पुष्ट झाला आहे, तोच खरा स्थितप्रज्ञ आहे. अहंकार नाहीसा करून, सर्व कामना टाकून, विश्वात्मक होऊन तो विश्वात वावरतो.

असे योगी निःसीम ब्रह्मस्थिती अनुभवत निष्काम होऊन अनायासे परब्रह्मापर्यंत पोचतात. अभ्यास करीत असताना जी ब्रह्मस्थिती ते अनुभवतात आणि परत देहभानावर येतात. ती ब्रह्मस्थिती शेवटी त्यांची नित्यस्थिती होते. ते ब्रह्माशी एकरूपच होऊन जातात. देहाचे त्यांना भानच उरत नाही. म्हणून अर्जुना, ज्या मृत्यूच्या नुसत्या कल्पनेने तू इतका भयभीत झाला आहेस तो मृत्यू समोर येऊन ठाकला, प्राण देह सोडून निघाला तरी ते व्याकुळ होत नाहीत. त्यांची ब्रह्मस्थिती अशी की, अखेरच्या क्षणीही ते डगमगत नाहीत.”

संजय म्हणाला, “राजा, ही स्थिती स्वतः आपल्या मुखाने अर्जुनाला सांगत आहेत.”

अनुक्रमणिका

श्रीकृष्णाचे बोलणे अर्जुनाने ऐकले आणि तो म्हणाला, "चला, सुटलो सर्व कामना सोडावी, अहंकार सोडावा, रागद्वेष सोडावे, गुणत्रयाचा त्याग करावा हे देवांनी स्वतःच सांगितले हे किती चांगले झाले! सर्व कर्मावरच देवांनी दोष ठेवला आहे, तेव्हा मी लढाई करावी हा आग्रह संपलाच म्हणायचा." अर्जुन या विचाराने थोडा प्रसन्न झाला. मनातल्या उरल्यासुरल्या शंका विचारायच्या आणि ह्या समस्येचा चुटकीसरशी निकाल लावायचा असे त्याने ठरविले.

आता हा जो प्रश्नोत्तराचा प्रसंग आहे हा फारच उत्तम आहे. निवृत्तिदास ज्ञानदेव म्हणतात की, "धर्माचा साठा, विवेकामृताचा अमर्याद समुद्र असा सर्वज्ञांचा राणा श्रीकृष्ण निरूपण करील ती हकीकत मी सांगेन आपण ऐकावी महाराज."

मालूताई, दुसरा अध्याय इथे संपला. सांख्यशास्त्राच्या खुणा या अध्यायात आपल्याला जागोजागी आढळल्या. पुढच्या अध्यायाचे नाव "कर्मयोग" असे आहे.

कर्म करावे की नाही? कर्म करावयाचे नाही असे ठरविले तरी तसे करणे शक्य आहे काय? जर शक्य नसेल तर कर्मबंधनातून सुटका कशी होईल? या सर्व प्रश्नांची उत्तरे देवांनी तिसऱ्या अध्यायात दिली आहेत.

अर्जुनाच्या संदर्भात देव पुढे म्हणाले आहेत की, "अर्जुना तुला उपदेश करायला मला फार आवडतो. तू लक्षपूर्वक ऐकतोस आणि नुसते ऐकत नाहीस तर त्याप्रमाणे आचरण करतोस."

देवाला आवडते होण्यासाठी काय करायला हवे याची स्पष्ट कल्पना देव आणून देत आहेत. तिसऱ्या अध्यायातील कर्माचे विवेचन आपण फार लक्षपूर्वक ऐकायला हवे आहे आणि त्याप्रमाणे आपल्या हातून त्याचे जास्तीत जास्त अनुष्ठान कसे होईल हे पहायला हवे आहे. आपल्यासारख्या सामान्य प्रापंचिकासाठी तर देवांनी हे भांडारच खुले केले आहे.

आमच्या लहानपणी एक गौळणीचे गाणे आम्ही झोपाळ्यावर बसून म्हणत होतो. गाणे बरेच मोठे होते पण, आज त्या गाण्याचे पालुपद फक्त आठवते आहे.

**सखे साजणी तुम्ही देवाच्या गौळणी**
**तुमच्या अंगणी कृष्ण खेळे शारंगपाणी,**
**खडा, गोटा, कांटा नसावा अंगणी**
**खेळता रुतेल माझ्या गोविंद चरणी सखे साजणी.**

म्हणून म्हणायचे की,

**जीवा ऐक रे!**

**अनुक्रमणिका**

आणि देव सांगतात तसे
देवासाठी जगण्याचा,
देवासाठीच जगण्याचा
निश्चय कर.

***

॥ श्री ॥

## अध्याय तिसरा

# कर्मयोग

॥ ॐ नमो भगवते वासुदेवाय ॥

अर्जुन उवाच—

**ज्यायसी चेत्कर्मणस्ते मता बुद्धिर्जनार्दन ।**
**तत्किं कर्मणि घोरे मां नियोजयसि केशव ॥ १ ॥**

**व्यामिश्रेणेव वाक्येन बुद्धिं मोहयसीव मे ।**
**तदेकं वद निश्चित्य येन श्रेयोऽहमाप्नुयाम् ॥ २ ॥**

श्रीभगवानुवाच—

**लोकेऽस्मिन्द्विविधा निष्ठा पुरा प्रोक्ता मयाऽनघ ।**
**ज्ञानयोगेन सांख्यानां कर्मयोगेन योगिनाम् ॥ ३ ॥**

**न कर्मणामनारंभान्नैष्कर्म्यं पुरुषोऽश्नुते ।**
**न च संन्यसनादेव सिद्धिं समधिगच्छति ॥ ४ ॥**

**न हि कश्चित्क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत् ।**
**कार्यते ह्यवशः कर्म सर्वः प्रकृतिजैर्गुणैः ॥ ५ ॥**

**कर्मेन्द्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन् ।**
**इन्द्रियार्थान्विमूढात्मा मिथ्याचारःस उच्यते ॥ ६ ॥**

**यस्त्विन्द्रियाणि मनसा नियम्याऽरभतेऽर्जुन ।**
**कर्मेन्द्रियैः कर्मयोगमसक्तः स विशिष्यते ॥ ७ ॥**

**नियतं कुरु कर्म त्वं कर्म ज्यायो ह्यकर्मणः ।**
**शरीरयात्राऽपि च ते न प्रसिद्ध्येदकर्मणः ॥ ८ ॥**

अनुक्रमणिका

यज्ञार्थात्कर्मणोऽन्यत्र लोकोऽयं कर्मबन्धनः ।
तदर्थं कर्म कौन्तेय मुक्तसङ्गः   समाचर ॥ ९ ॥

सहयज्ञाः प्रजाः सृष्ट्वा   पुरोवाच प्रजापतिः ।
अनेन प्रसविष्यध्वमेष वोऽस्त्विष्टकामधुक् ॥ १० ॥

देवान्भावयतानेन ते देवा भावयन्तु वः ।
परस्परं भावयन्तः श्रेयः परमवाप्स्यथ ॥ ११ ॥

इष्टान्भोगान्हि वो देवा दास्यन्ते यज्ञभाविताः ।
तैर्दत्तानप्रदायैभ्यो यो भुङक्ते स्तेन एव सः ॥ १२ ॥

यज्ञशिष्टाशिनः सन्तो मुच्यन्ते सर्वकिल्बिषैः ।
भुञ्जते ते त्वघं पापा ये पचन्त्यात्मकारणात् ॥ १३ ॥

अन्नाद्भवन्ति भूतानि पर्जन्यादन्नसम्भवः ।
यज्ञाद्भवति पर्जन्यो यज्ञः कर्मसमुद्भवः ॥ १४ ॥

कर्म ब्रह्मोद्भवं विद्धि ब्रह्माक्षरसमुद्भवम् ।
तस्मात्सर्वगातं ब्रह्म नित्यं यज्ञे प्रतिष्ठितम् ॥ १५ ॥

एवं प्रवर्तितं चक्रं नानुवर्तयतीह यः ।
अघायुरिन्द्रियारामो मोघं पार्थ स जीवति ॥ १६ ॥

यस्त्वात्मरतिरेव स्यादात्मतृप्तश्च मानवः ।
आत्मन्येव च संतुष्टस्तस्य कार्यं न विद्यते ॥ १७ ॥

नैव तस्य कृतेनार्थो नाकृतेनेह कश्चन ।
न चास्य सर्वभूतेषु कश्चिदर्थव्यपाश्रयः ॥ १८ ॥

तस्मादसक्तः सततं कार्य कर्म समाचर ।
असक्तो ह्याचरन्कर्म परमाप्नोति पुरुषः ॥ १९ ॥

कर्मणैव हि संसिद्धिमास्थिता जनकादयः ।
लोकसंग्रहमेवापि संपश्यन्कर्तुमर्हसि ॥ २० ॥

अनुक्रमणिका

यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः ।
स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते ॥ २१ ॥

न मे पार्थास्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किंचन ।
नानवाप्तमवाप्तव्यं वर्त एव च कर्मणि ॥ २२ ॥

यदि ह्यहं न वर्तेयं जातु कर्मण्यतन्द्रितः ।
मम वर्त्मानुवर्तन्ते मनुष्याः पार्थ सर्वशः ॥ २३ ॥

उत्सीदेयुरिमे लोका न कुर्यां कर्म चेदहम् ।
संकरस्य च कर्ता स्यामुपहन्यामिमाः प्रजाः ॥ २४ ॥

सक्ताः कर्मण्यविद्वासो यथा कुर्वन्ति भारत ।
कुर्याद्विद्वांस्तथाऽसक्तश्चिकीर्षुर्लोकसंग्रहम् ॥ २५ ॥

न बुद्धिभेदं जनयेदज्ञानां कर्मसङ्गिनाम ।
जोषयेत्सर्वकर्माणि विद्वान्युक्तः समाचरन् ॥ २६ ॥

प्रकृतेः क्रियमाणानि गुणैः कर्माणि सर्वशः ।
अहंकारविमूढात्मा कर्ताहमिति मन्यते ॥ २७ ॥

तत्त्ववित्तु महाबाहो गुणकर्मविभागयोः ।
गुणा गुणेषु वर्तन्त इति मत्वा न सज्जते ॥ २८ ॥

प्रकृतेर्गुणसंमूढाः सज्जन्ते गुणकर्मसु ।
तानकृत्स्नविदो मन्दान्कृत्स्नविन्न विचालयेत् ॥ २९ ॥

मयि सर्वाणि कर्माणि संन्यस्याध्यात्मचेतसा ।
निराशीर्निर्ममो भूत्वा युध्यस्व विगतज्वरः ॥ ३० ॥

ये मे मतमिदं नित्यमनुतिष्ठन्ति मानवाः ।
श्रद्धावन्तोऽनसूयन्तो मुच्यन्ते तेऽपि कर्मभिः ॥ ३१ ॥

ये त्वेतदभ्यसूयन्तो नानुतिष्ठन्ति मे मतम् ।
सर्वज्ञानविमूढांस्तान्विद्धि नष्टानचेतसः ॥ ३२ ॥

सदृशं चेष्टते स्वस्याः प्रकृतेर्ज्ञानवानपि ।
प्रकृतिं यान्ति भूतानि निग्रहः किं करिष्यति ॥ ३३ ॥

इन्द्रियस्येन्द्रियस्यार्थे रागद्वेषौ व्यवस्थितौ ।
तयोर्न वशमागच्छेत्तौ ह्यस्य परिपन्थिनौ ॥ ३४ ॥

श्रेयान् स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् ।
स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः ॥ ३५ ॥

अर्जुन उवाच—

अथ केन प्रयुक्तोऽयं पापं चरति पूरुषः ।
अनिच्छन्नपि वार्ष्णेय वलादिव नियोजितः ॥ ३६ ॥

श्रीभगवानुवाच—

काम एष क्रोध एष रजोगुणसमुद्भवः।
महाशनो महापाप्मा विद्ध्येनमिह वैरिणम् ॥ ३७ ॥

धूमेनाव्रियते वह्निर्यथाऽऽदर्शो मलेन च ।
यथोल्बेनावृतो गर्भस्तथा तेनेदमावृतम् ॥ ३८ ॥

आवृतं ज्ञानमेतेन ज्ञानिनो नित्यवैरिणा ।
कामरूपेण कौन्तेय दुष्पूरेणानलेन च ॥ ३९ ॥

इन्द्रियाणि मनो बुद्धिरस्याधिष्ठानमुच्यते ।
एतैर्विमोहयत्येष ज्ञानमावृत्य देहिनम् ॥ ४० ॥

तस्मात्त्वमिन्द्रियाण्यादौ नियम्य भरतर्षभ ।
पाप्मानं प्रजहिह्येनं ज्ञानविज्ञाननाशनम् ॥ ४१ ॥

इन्द्रियाणि पराण्याहुरिन्द्रियेभ्यः परं मनः ।
मनसस्तु परा बुद्धिर्यो बुद्धेः परतस्तु सः ॥ ४२ ॥

एवं बुद्धेः परं बुद्ध्वा संस्तभ्यात्मानमात्मना ।

**जहि शत्रुं महाबाहो कामरूपं दुरासदम् ॥ ४३ ॥**

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे “कर्मयोगो नाम” तृतीयोऽध्यायः ॥ १ ॥

श्रीकृष्णार्पणमस्तु ।

\- - - - - - - - - -

अनुक्रमणिका

अर्जुनाने देवांचे सांगणे ऐकले आणि तो म्हणला—

“कमलापती, देवा, तुम्ही जे जे बोलला ना, ते मी सगळे नीट ऐकले.

कर्म आणि कर्ता ही दोन्ही उरतच नाहीत असे तुझे म्हणणे आहे ना नक्की? मग जर ते निश्चित मत असले तुझे तर मला कशाला सांगतो आहेस की “पार्था लढाई कर”.

ह्या घोर कर्मात घालताना तुला काहीच लाज वाटत नाही? तूच ना आता सर्व कर्मांचा निषेध केलास? मग माझ्याकडून हे हिंसक कर्म का म्हणून करवून घेतो आहेस? एकीकडे कर्मलेश मानतो आहेत. दुसरीकडे असली भयंकर हिंसा पण करायला सांगतो आहेस याचा अर्थ तरी काय समजावयाचा? देवा तूच असा उलट सुलट बोलू लागलास म्हणजे आम्ही अज्ञानी जीवांनी करावे तरी काय? विवेक उरलाच नाही मग जगात, याला उपदेश म्हणायचे तर अहिताचा सल्ला कशाला म्हणावयाचे? देवा, आत्मबोधाची आमची हौस छान पुरली बरं का, वैद्याने पथ्य सांगून जावे आणि औषध म्हणून विष पाठवून द्यावे तसेच हे झाले. अरे कृष्णा! तो रोगी मग जगेल तरी काय? आंधळ्याने वाट विचारली तर त्याला आडरानात नेऊन सोडावे तसे केले आहेत तू. माकडाला मद्य मिळावे तसा हा तुझा गोमटा उपदेश मिळाला आम्हाला बाबा!

मला आधीच काही कळत नव्हते म्हणून तुला ह्या मोहातून सुटण्याचा मार्ग विचारला तर तुझे एकेक नवलच! इथे मुळी उपदेशातच घोटाळा. ज्यांनी आम्ही केवळ तुझ्यावरच आपला भार टाकला आहे, जे तुझ्या शब्दावर जगतात त्यांचीही वाट लावायची? ज्यांची शरीरे, मने, प्राण तुझ्या इशाऱ्यावर चालतात त्यांचीही अशी वाट लावायची? त्यांना हा असा द्व्यर्थी उपदेश करावयाचा? आता आमचे सर्व संपलेच म्हणायचे मग. असा बोध करून तू आमचे चांगलेच कल्याण करतो आहेस, आता ज्ञान मिळण्याची, योग्य मार्ग कळण्याची, कल्याण साधण्याची आमची आशाच खुंटली.

ते तर झालेच म्हणा, पण आणखीही अनर्थ झाला आहे. स्थिर असलेले माझे मन ढवळून मात्र निघाले आहे. तुझ्या मनातला हेतूही कळेना. मी हे गुरूहत्येचे पातक करणार नाही असे निश्चित सांगितल्यावर लढाई करणेच योग्य असा हा जो उपदेश तू केलास तो माझे मन पहाण्यासाठी की, मला फसविण्यासाठी? की खरोखरच गूढ तत्त्वाज्ञानाचा बोध केला आहेस? देवा, मी पुष्कळ विचार करून पाहिला पण काहीही उलगडा होईना.

देवा, अहो असे नका करू. मला असा भावार्थ नका सांगू. मला समजेल अशा भाषेत उपदेश करा. विवेक शिकवा. मी आधीच मंद आहे, त्यात गोंधळून गेलो आहे. तरी मला कळेल असा स्पष्ट निर्विवाद बोध करा. एकच निश्चयात्मक सांगा काय करू ते. रागद्वेष चुकीचे तर, लढाई बरोबर कशी? कामना सोडून द्यायची तर राज्यलोभ कशाला? सत्त्व, रज, तम या गुणांचा त्याग करायला सांगतोस तर स्वजनांचा वध करणे हे काय गुणातीत कर्म आहे? तुझा उपदेश आणि आज्ञा यात काहीही मेळ नाही.

देवा, रोगी जगायला हवा असला तर औषध गुणकारी असावेच पण मधुर, रुचकरही असावे. तरच रोगी आवडीने घेईल, आणि व्याधिमुक्त होईल. तेव्हा देवा, सर्वार्थाने भरलेले असावे, उचित असावे, समजण्यास सोपे असावे असे काही ज्ञान सांगा. तुमच्यासारखा गुरू लाभल्यावर मी मनमुराद मागून का घेऊ नये? तुम्ही तर आमची आईच आहा. तुमच्याजवळ संकोच कशाला करू? आणि तुमच्याजवळ संकोच करून तृप्तीसाठी दुसरीकडे जाऊ तरी कुठे? चिंतामणी दैवयोगाने हाती आला आहे. कामधेनुचे दुभते लाभले आहे, मग आता इच्छापूर्ति करून घेण्यास अडचणच काय आहे? आपल्या मनात जे जे असेल ते ते खुशाल मागून घ्यावेच नाही का? अमृतसिंधूजवळ मोठ्या प्रयत्नाने पोहचल्यावर तहानेने जर व्याकूळ व्हावयाचे असले तर पोहचण्यासाठी केलेले मागील प्रयत्न फुकटच म्हणायचे. अनेक जन्म तुझी भक्ति करून ह्या जन्मी तू हाती सापडला आहेस. त्यातून तू आहेस लक्ष्मीपती. मग मनात असेल ते सगळे मागून घ्यायला काय अडचण आहे? माझ्या सगळ्या मनोरथाचे जीवित सफल होण्याची वेळ आली आहे, पुण्य यशाला पोहचले आहे. माझ्या मनोरथांचा जय झाला आहे.

सर्व मंगलाचे निधान असा तू देवदेवोत्तम आहेस. त्यातून तू पूर्णपणे आमच्या स्वाधीन झाला आहेस. आईचे दूध मागायला अवेळ कसली आहे? तेव्हा हे कृपानिधे, आर्त होऊन मनातील शंका विचारतो आहे. राग मानू नको. मनात जे येईल ते बोलायला मला दुसरी जागा आहे का? तुम्हाला प्रथम वाटेल तसे टाकून बोललो त्याचा राग मानू नका. मूल आईला लाथ मारते पण आई न रागावता त्याच्यावर कृपाच करते तसे करा आणि

**परलोकी कल्याणकारक**
आणि
**इहलोकी आचरण्यास उचित**

असे जे असेल ते करायला सांगा."

देव म्हणाले, "अर्जुना, तुझ्या मनाचा गोंधळ पाहून मला फार नवल वाटते आहे. मी तुला ज्ञानमार्ग आणि कर्ममार्ग ह्या दोन्हींची व्यवस्था सांगितली म्हणून माझ्या सांगण्याचा अभिप्राय तुझ्या ध्यानी नीट आला नाही रे. बरं असू दे. पुन्हा सांगतो. लक्षपूर्वक ऐक.

हे बघ, ज्ञान आणि कर्म ह्या दोन्ही निष्ठा माझ्यापासूनच झाल्या. त्या दोन्ही उक्त आहेत. त्या दोन्ही अनादिसिद्ध आहेत.

ज्ञानमार्गाचा प्रवास लवकर संपतो इतकेच. जे ज्ञानी पुरुष ह्या मार्गाने जातात त्यांना तात्काळ तद्रूपता प्राप्त होते. उपदेश झाल्या क्षणीच त्यांची तदाकारवृत्ती होते, ते मुक्कामाला पोहचतात."

सिद्धचरित्रात भवानीची काय अवस्था झाली ते श्रीपतिनाथांनी सुंदर वर्णन करून सांगितले आहे.

ॐकाराचा उपदेश करून डोळे झाकूनच शिवांनी बोलायला सुरवात केली. ते म्हणाले "गिरिजे, या

मूळ एकाक्षराने जीवाचे जीवपण सरते. तो ब्रह्मरूपात लीन होऊन जातो."

पार्वतीकडून काही उत्तर येईना, म्हणून शिव म्हणाले, "दुर्गे, ज्ञानविचार नीट ऐकलास ना?" तरीही उत्तर नाही म्हणून शिवांनी डोळे उघडून पाहिले तर, भवानी भानावर नव्हती. उपदेश झाल्या क्षणीच ती समाधिमग्न झाली होती.

श्रीपतिनाथ म्हणतात--

**ते देहावरी नाही**
**चित्कला मीनली चैतन्यी ॥**

ही त्या जगन्मातेची क्षणार्धात झालेली पूर्णावस्था.

पण रामचंद्रमहाराज तिकोटेकरांचीही पूर्णावस्था ह्याहून फारशी वेगळी नव्हती. त्यांनी गाणगापुरास जाऊन घोर तपश्चर्या सुरू केली. कडुनिंबाचा रस पिऊन गुरूचरित्र सप्ताह, प्रदक्षणाजप असा क्रम सुरू केला. मागणे देवाजवळ एकच. "मला गुरू भेटवा." बरेच दिवस हा क्रम चालल्यावर दृष्टांत झाला. स्वप्नात महादेव महाराजांच्याकडे बोट दाखवून दत्त महाराज म्हणाले, "बाळा आता घरी जा. तुझे काम झाले आहे. ह्यांच्या पदरात तुला घातले आहे." रामचंद्रमहाराज मोठ्या आनंदाने चिंचणीस परत आले. थोडे दिवसांतच महादेवमहाराज चिंचणीस आले आणि त्यांनी रामचंद्रमहाराज तिकोटेकरांच्यावर अनुग्रह केला. श्रीपतिनाथ म्हणतात--

**अक्षर द्वयाच्या गजरी । स्वरूप दाटले बाह्यान्तरी ।**
**दृश्यजात जाहले वोहरी । गुणागुण परी तेथ कैची ॥**

**शेखी पहाते पहाणे तेही । विरोनि गेले ठायींच्या ठायी ।**
**विदेहानंदी स्वरूप डोही । माझी राममाय तटस्थ ॥**

**जीव शिव माया ब्रह्म । कैचे केउते रूप नाम ।**
**वृत्ति निवृत्तपदी विश्राम । पावली निजधाम आपुली ॥**

ही झाली तीव्राधिकारी साधकांची अवस्था. आधीच त्यांची इतकी तयारी झालेली असते की, उपदेश झाल्याक्षणीच कापराची ज्योत पेटते, पक्षी झेपावून एकदम शेंडाच गाठतो आणि फळाला झोंबतो. त्या पक्ष्याप्रमाणे हे ज्ञानमार्गी तात्काळ मोक्ष प्राप्त करून घेतात. पण अशी मंडळी थोडी.

मनुष्य पक्ष्याप्रमाणे एकदम झेपावेल कसा? तो हळूहळू ह्या फांदीवरून त्या फांदीवर पाय ठेवीत ठेवीत त्या मार्गाच्या आधाराने शेंड्याला पोहचतो आणि फळ हस्तगत करतो. त्याचप्रमाणे कर्ममार्गामध्ये साधक होता

अनुक्रमणिका

होता क्रमाने निष्णात होत जातो. वेदाज्ञेप्रमाणे आचरण ठेवून कर्मयोगी पूर्णावस्थेस पोहचतात. पोहचावयास वेळ लागतो इतकेच. बाकी ज्ञानमार्ग व कर्ममार्ग ह्यांचे अंतिम फळ एकच असते. तयार असलेल्या व तयार करावयाच्या स्वयंपाकाचे फळ जसे तृप्ती हेच एक असते किंवा पूर्व आणि पश्चिम या दिशाकडून वहात येणाऱ्या नद्या जशा शेवटी समुद्रातच येऊन मिळतात त्याप्रमाणेच हे दोन्ही मार्ग एकच साध्य सुचवतात. आता ह्यापैकी कोणत्या मार्गाचे आचरण करावयाचे हे शेवटी साधकाच्या योग्यतेवर अवलंबून राहते. ज्ञानमार्गामध्ये संपूर्ण निरिच्छतेची अपेक्षा आहे.

मात्र ही निरिच्छता एकाएकी येत नाही. योग्य कर्माचे आचरण करता करता हळूहळू नैष्कर्म्य अंगी बाणू लागते. प्राप्तकर्म टाकून द्यावयाचे व "मी ज्ञानमार्गास लागलो, मला नैष्कर्म्य साधले" असे म्हणणे मूर्खपणाचे आहे. नदीच्या पलीकडे जावयाचे आहे असा प्रसंग येऊन ठेपला तर अशा वेळी नावेचा त्याग करून चालेल का? भूक लागली आहे, तृप्ती व्हावयास हवी आहे अशा वेळी एक स्वतः स्वयंपाक केला पाहिजे नाहीतर, जे अन्न तयार असेल ते जेवले पाहिजे. भूक आहे पण अन्नाचा मात्र त्याग करावयाचा हे कसे चालेल? ज्याच्या अंगी जेवढी शक्ति असेल तेवढा पल्ला तो गाठू शकतो. भलता अट्टाहास वा घाई चालत नाही.

चैतन्य महाप्रभूंच्या चरित्रात एक गोष्ट आहे की, एकदा जेवण झाल्यावर बेहड्याचा तुकडा तोंडात टाकावा अशी प्रभूंना इच्छा झाली. त्यांच्याबरोबर असणाऱ्या शिष्याने कुठून तरी बेहडा मिळवला आणि प्रभूंना दिला. दुसऱ्या दिवशी प्रभूंचे जेवण झाल्यावर उपरण्याच्या शेवात बांधलेला बेहड्याचा तुकडा सोडून शिष्याने प्रभूंच्या पुढे केला.

प्रभूंनी विचारले, "कुठून आणलास हा बेहडा?" शिष्य म्हणाला, "कालच्या बेहड्यातला उपरण्यात बांधून ठेवला होता, आज आपल्याला लागेल म्हणून." महाप्रभु म्हणाले, "बाबा, माझ्याबरोबर चालायचे तर एवढाही संग्रह खपायचा नाही. तू गृहस्थाश्रमी हो. मी आजवर तुला केलेल्या उपदेशाचा प्रसार कर म्हणजे झाले. तुझी वृत्ती संग्रहाची आणि मी असा निरिच्छ. आपले जमायचे नाही."

शिष्याची परीक्षा पहाण्यासाठीच महाप्रभूंनी बेहडा मागितला असेल. आपल्या कठोर व्रतात आपल्याबरोबर चालायला कोण योग्य आहे. याची त्यांना वरचेवर परीक्षा पहावी लागत असेल.

देव म्हणत आहेत, "पूर्ण निरिच्छता हवी आणि मग मात्र कर्म ह्या आत्मतृप्तीनंतर आपोआप थांबते. त्यासाठी कर्म सोडावे लागत नाही, ते आपोआप सुटते.

अर्जुना, म्हणून म्हणतो की, ज्याला खरेखुरे नैष्कर्म्य साधण्याची तळमळ असेल त्याने आपल्या वाट्यास आलेले उचित कर्म केव्हाही टाकता कामा नये. आपल्या इच्छेप्रमाणे स्वीकार करावा मग घडते, आपल्या इच्छेप्रमाणे त्याग करावा मग घडत नाही अशी का कर्माची स्थिती आहे? मी कर्म करतो, मी कर्म सोडतो हे बोलणे फुकट आहे. नीट विचार करून पाहिले तर तुझ्या ध्यानी येईल की, "मी टाकतो" असे म्हणून कर्म टाकता येत नाही. जोपर्यंत शरीर आहे, चैतन्याचे त्यात अधिष्ठान आहे तोवर कर्म टाकीन, कर्म करीन असे म्हणणे म्हणजे अज्ञानच आहे. कर्म गुणाधीन आहे आणि स्वाभाविक आहे.

अनुक्रमणिका

साखळी लक्षात आली का अर्जुना? प्रकृति त्रिगुणात्मक आहे, देह प्राकृतिक म्हणून त्रिगुणात्मक आहे आणि कर्म हा गुणांचा स्वाभाविक धर्म आहे म्हणून कर्म अटळ विहित कर्म सोडून दिले, तरी या हट्टाने काय इंद्रियांचे धर्म थांबले, कानांनी ऐकायचे सोडले की, डोळ्यांनी पहायचे टाकले की, नाक बुझून जाऊन वास घेईना? काय घडले काय? प्राणापानांची गति थांबली की, बुद्धिने कल्पना थांबवल्या की, क्षुधा तृष्णेच्या पीडा खुंटल्या, जागृति व स्वप्न या अवस्था गेल्या, पाय चालायचे विसरले, की जन्म मरणाची येरझार संपली, यापैकी जर काहीच थांबले नाहीतर, टाकले ते काय टाकले म्हणावयाचे,

प्रकृतिमंत पुरुषाला कर्मत्याग करताच येत नाही. कर्म हे परतंत्र आहे. शरिरातील त्रिगुणाप्रमाणे निर्माण होत असते. टाकीन, घेईन असा जीवाने अभिमान धरणे व्यर्थ आहे. रथामध्ये बसलेला जरी स्वतः निश्चल असला तरी, रथ चालतो त्याबरोबर हालतोच ना? हा जीव शरिराच्या रथात बसला की, परतंत्र झाला. त्या शरिराच्या गुणधर्माप्रमाणे कर्म घडत राहते, वाळलेले पान जसे वाऱ्याबरोबर सैरावैरा उडते, आकाशात भ्रमत रहाते तशी जीवाची कर्मासंबंधी स्थिती आहे. पूज्य जेरेशास्त्री एकदा म्हणाले होते, "जीव कर्माने इतका बांधलेला आहे की, अमुक कर्म जीवाने अमुक दिवशी भोगावयाचे हे कर्मदेवांनीं आधीच ठरविलेले असते. त्या दिवसाचे कर्म भोगून झाले की, मग त्याला झोप लागते. तोवर तो जीव झोपू शकत नाही. हे जर एका दिवसाचे तर तेच पूर्ण आयुष्याचेही. कर्मभोग संपेल तेव्हाच हे शरीर पडेल. तोवर सुखाचे आणि दुःखाचे भोग भोगणे एवढेच जीव करू शकतो." देव म्हणतात, "अर्जुना, नैष्कर्म्यावस्थेपर्यंत पोचलेल्या पुरुषानाही शरिराच्या आधाराने, कर्मेंद्रियांच्या अनुरोधाने, निरंतर कर्म करीत रहावे लागते."

श्रीरामकृष्ण परमहंसांना घशाचा कॅन्सर झाला होता. शिष्यमंडळी वरचेवर विनंती करीत "ठाकुर, आईला सांगा ना हा रोग बरा करायला." ठाकुर म्हणाले, "म्हणजे हा शरीरभोग टाळण्यासाठी आईला सांकडे घालायचे? नको रे बाबा! मी नाही आईला सांगायचा." मागे आईला म्हटले, "आई मला थोडे खाऊ दे" तर आई तुम्हा सर्वांच्याकडे बोट दाखवून म्हणाली, "तू इतक्या तोंडाने खात नाहीस का? मी नाही तिला पुन्हा विचारणार."

पूज्य रमण महर्षींना कॅन्सरच्या गाठी उठत होत्या. असह्य यातना सहन करीत, औषधापासून ते शस्त्रक्रियेपर्यंतचे सर्व उपचार ते मुकाट्याने सहन करीत होते. शेवटी शेवटी शिष्याची व्याकुळता पाहून म्हणाले, "मी आहेच, मी कुठे जाणार आहे?"

तेव्हा तात्पर्य कर्मभोग भोगूनच संपतात. शरिराची संगत जोवर आहे तोवर कर्म टाकू म्हटल्याने टाकता येत नाही. तेव्हा "टाकू" असे जे म्हणतात त्याचा केवळ आग्रह उरतो. कर्म चालू रहाते, कर्मभोग चालू रहातो. अर्जुना, तुला अशी काही माणसे दिसतील की, ज्यांनी कर्मेंद्रियांच्या प्रवृत्तीचा अट्टाहासाने निरोध करून नैष्कर्म्याचा आव आणला आहे. बाहेरून कर्मत्याग आणि आतून कर्मप्रवृत्ती असा झगडा चालतो. कर्मत्यागाचे नाटक करणारी ही मंडळी पूर्ण विषयासक्त असतात हे तू पक्के ओळख. खरा निष्काम पुरुष बाह्यतः सामान्य प्रापंचिकाप्रमाणे सर्व व्यवहार करतो. इंद्रियांना आज्ञा करीत नाही. विषयाचे भय मानीत नाही. कर्मेंद्रिये कर्मे करीत असली तरी त्यांचा निरोध करीत नाही. पण त्यापासून निर्माण होणाऱ्या ऊर्मीने तो लिप्त होत नाही.

पाण्यामध्ये सूर्याचे प्रतिबिंब दिसते तसा तो संसारात आहे असे वाटते. बाहेरून तो सामान्यासारखा दिसत असल्याने त्याची आंतरस्थिती काय आहे हे कुणाला सहज कळत नाही. कमळाचे पान पाण्यात असते पण पाण्याने भिजत नाही. तसा संसारात असूनही तो पुरुष अंतर्यामी निश्चलतेने परमात्म्याच्या स्वरूपात गढून गेलेला असतो.

अशा पुरुषांचे खरे स्वरूप काही काही प्रसंगाने स्पष्ट होत असते, त्यावर तू लक्ष ठेवून रहा. आशापाशरहित असलेला तो पुरुष मुक्त आहे असे तू समज. अर्जुना, तोच खरा योगी आहे. पार्था, तू त्याच्यासारखा हो. त्या योग्यासारखी मनोवृत्ती अलिप्त ठेवून मनाला नियमांची कैद न करताच तू निश्चल हो. बाह्यतः ही कर्मेंद्रिये सुखाने आपआपले व्यवहार करू देत. जे जे उचित असेल, प्रसंगानुरूप समोर येईल, ते ते कर्म मनात काहीही हेतु न धरता कर. कर्मातीत होणे असंभवनीय व निषिद्धकर्म निंद्य. तेव्हा विहित कर्म हेतुविरहित होऊन करायचे एवढेच शिल्लक राहते. कर्मबंधाचे भय राहत नाही.

याचा आणखी एक फायदा असा की, अशा तऱ्हेने हेतुरहित होऊन केलेले कर्म आपोआपच मोचक होते. वर्णाश्रमाप्रमाणे जो स्वधर्माचे आचरा करतो तो त्या आचरणाने मोक्षाला जातो.

बाबा पार्था, आपला धर्म आहे तोच नित्य यज्ञ आहे. त्याचे पालन आपण केले की, पापाचे पाऊलदेखील त्या ठिकाणी पडायचे नाही. आपला धर्म सोडला, कुकर्माची आवड वाढू लागली की, संसाराचा बंध पडलाच. कर्माधिकारी लोक हा नित्य यज्ञ करीत नाहीत म्हणून कर्माने बद्ध होतात आणि देहाच्या स्वाधीन होतात.

पार्था, याविषयी तुला एक कथा सांगतो. ब्रह्मदेवाने सृष्टीची रचना केली. प्राणीमात्र उत्पन्न केले आणि त्याचबरोबर त्यांनी करण्याच्या नित्य यज्ञाची उत्पत्ती केली हा कर्मयज्ञ सूक्ष्म असल्याने जीवांना कळला नाही. त्यांनी ब्रह्मदेवाची प्रार्थना केली की, “देवा आमचे संरक्षण कोण करील, आम्ही कुणाचा आधार शोधावा?” तेव्हा तो कमलोद्भव ब्रह्मा म्हणाला, “वर्णाश्रमाप्रमाणे तुम्हाला तुमचा धर्म दिलेलाच आहे. याची उपासना करा म्हणजे तुमच्या सर्व इच्छा आकांक्षा पुऱ्या होतील. तुम्ही व्रते, नियम, केले नाहीत तरी चालतील. शरीराला पीडा तर देऊच नका. तीर्थक्षेत्रे करीत दूरदूरच्या कष्टप्रद यात्राही केल्या नाहीत तरी चालतील. योग, सकाम आराधना, मंत्रयंत्र विधान मुळीच करू नका. निरनिराळ्या दैवतांची पूजा करू नका. ह्यापैकी काहीही न करता केवळ स्वधर्मयज्ञ करा. तो तुम्हाला अनायासे मिळाला आहेच. पतिव्रता जशी पतीची अनन्य भक्ति करते त्याप्रमाणे मनात फलाशा न धरता या स्वधर्माचे अनुष्ठान करा.” सत्यलोकाचा स्वामी असे ब्रह्मदेव म्हणाला, “हा स्वधर्मरूप यज्ञच तुम्हाला सेव्य आहे. जर ह्या स्वधर्माची एकनिष्ठ भक्ति कराल तर लोक हो, हा कामधेनूसारखा तुमच्या कामना पुरवील. तुम्हाला कधीही टाकणार नाही. स्वधर्मपालन केलेत की, सर्व देवतांना संतोष होईल मग त्या तुमच्या इच्छेचे सर्व विषय देतील.”

पूज्य जेरेशास्त्री सांगत, दीक्षित घराण्यातील एक पुरुष सूर्योपासना करीत असे. “आपल्या पूर्वजांची विद्वत्ता आपल्याजवळ नाही पण, आपल्याला गायत्री उपासना मुंजीत मिळाली आहे तीच एकनिष्ठेने करू” असे म्हणून ते त्रिकाल स्नान संध्या करीत. कालातीत दोष कधी हातून घडू नये म्हणून ते गावातून कुठेही बाहेर जात नसत. माध्यान्ह संध्या झाल्यावर सायंसंध्येच्या वेळेपर्यंत परत येता येईल एवढ्याच अंतरावर ते कामासाठी

जरूर पडल्यास जाऊन येत. असा बराच काळ गेला.

एकदा हरिपंत फडके सैन्य घेऊन गावात मुक्कामास आले. फडक्यांचा प्रघात असा की, आपण ज्या गावात जाऊ तेथे कुणी संतसत्पुरुष असला तर त्याचे आवर्जून दर्शन घ्यावयाचे. चौकशी केली तेव्हा गावातील मंडळी म्हणाली "साधुसत्पुरुष कोणी नाही पण दीक्षितांचे एक वंशज इथे राहतात. त्यांची इतर काही उपासना नाही पण ते नियमित त्रिकाल स्नानसंध्या करतात. संध्येची वेळ कधी चुकू देत नाहीत."

फडक्यांनी ठरविले की, परीक्षा पहावी थोडी. सकाळी उशिरा जाऊन गप्पा करीत बसावे. माध्यान्ह संध्येची त्यांची वेळ टळून गेली की, मगच उठावे. पाहू, काय करतात दीक्षित.

फडक्यांचा निरोप गेला. दीक्षितांनी यथोचित स्वागत केले. चर्चा, गप्पा चालू झाल्या. माध्यान्हकाळ येऊ लागला तसे दीक्षित चुळबूळ करू लागले. फडके काही उठेनात, ऊन अंगणात आले होते त्याच्यापुढे जाईना, बराच वेळ झाल्यावर शेवटी दीक्षित उठले, म्हणाले, "आपण बसा. मी संध्या करून येतो." दीक्षितांचे अर्घ्यप्रदान झाल्याबरोबर एकदम ऊन पुढे सरकले. हरिपंत हा प्रकार पाहून खजील झाले. त्यांनी हात जोडले आणि विचारले, "हा काय प्रकार आहे?"

दीक्षित म्हणाले, "आज चोवीस वर्षे त्रिकाल स्नान संध्या करून अर्घ्य देतो आहे. माझा अर्घ्य घेतल्याशिवाय सूर्य पुढे जातो कसा."

फडके म्हणाले, "मग लगेच इतका झपाट्याने कसा गेला."

दीक्षित म्हणाले, "त्याला संध्याकाळचा मुक्काम वेळेत गाठायला नको का? आता सांगा, आपण काय प्रश्न मनात धरून आला होता? मला इतर काही विद्या येत नसल्या तरी ह्या सूर्यनारायणाच्या कृपेने मी आपल्या कुठल्याही प्रश्नाचे उत्तर देऊ शकतो. विचारा."

एकनिष्ठतेने केलेले स्वकर्म असे फलद्रुप होते. देव म्हणाले, "स्वधर्मपूजेमुळे देवता संतुष्ट होऊन लोकांचा योगक्षेम चालवतात. ब्रह्मदेव म्हणाले, तुम्ही देवतांना भजावे, देव तुमच्यावर संतुष्ट होतील. असे प्रेम जडेल आणि मग तुम्ही जे जे करू म्हणाल ते ते सर्व सिद्धीस जाईल. मनाचे सर्व वांच्छित पुरेल. इतकेच काय तुम्हाला वाचासिद्धी प्राप्त होईल. तुम्ही आज्ञा देणारे व्हाल. महाऋद्धी तुमच्या आज्ञा झेलतील. वसंताच्या दारात सुंदरसा फलभार घेऊन वनश्री तिष्ठत असते त्याप्रमाणे मूर्तिमंत दैव सुखसंभार हाती घेऊन तुमचा शोध घेत तुमच्या पाठीमागे लागेल. स्वधर्मनिष्ठ रहाल तर सगळ्या भोगांनी तृप्त होऊन तुम्ही आशारहित व्हाल.

पण सर्व संपत्ती प्राप्त झाल्यावर इंद्रियांच्या मदाने केवळ विषयस्वादावर लुब्ध झालात तर मात्र कठीण आहे. भोगाची विपुलता असल्यामुळे इंद्रियांचा लोभही वाढेल. संपत्तीचा विनियोग शरिराचे चोचले पुरविण्याकडे झाल्यामुळे परमेश्वर पूजनासाठी ही संपत्ती तुमच्या हाती यज्ञाने संतुष्ट झालेल्या देवांनी दिली आहे याचा पूर्ण विसर पडेल. यज्ञाच्या योगाने देव संतुष्ट झाले व त्यांनी इतकी संपत्ती याच प्रकारे पुढेही

स्वधर्माचरण व्हावे म्हणून दिली खरी पण आता ते लोक अग्नीला आहुति देत नाहीत, देवतापूजन करीत नाहीत, अतिथीचा, ब्राह्मणांचा परामर्ष घेत नाहीत, गुरूभक्तीपासून विन्मुख होतात, आपल्या ज्ञातीबांधवांना संतोष देत नाहीत. स्वधर्माचे आचरण सोडून केवळ विषयासक्त होऊन राहिलेल्या ह्या मत्त लोकांवर मग फार संकटे येतात. त्यांना फार मोठा अपाय होतो. जे भोग समोर आहेत तेदेखील हे लोक भोगू शकत नाहीत."

भली मोठी मोटार घेऊन काही मंडळी एका विद्वानाच्या दारी आली. प्रवचनाचे निमंत्रण दिले. प्रवचनास जाण्यासाठीही विद्वानास नेण्यासाठी गाडी आली. पाहुणचारात कुठेही कमतरता नव्हती. साखर कारखानदार असल्याने दारात हत्ती झुलत होता! जेवणाच्या वेळी हे बडे कारखानदार "नको" म्हणत. मिष्ठान्न कुठलेच घेतले नाही, हे पाहून त्या विद्वानांना रहावेना. त्यांनी विचारले, "हे काय, आपण काहीच घेत नाही?"

घरधनी म्हणाले, "येईल आता आमची भाकरी. मी यातला कुठलाच गोड पदार्थ खाऊ शकत नाही. डॉक्टरांनी मना केले आहे. मधुमेह जास्त आहे" अशी ही कथा!

ब्रह्मदेव म्हणाले, "ज्याचे आयुष्य संपले त्याच्या शरिरात चैतन्य राहू शकत नाही. दुर्दैवी माणसाच्या घरात लक्ष्मी टिकत नाही तसा प्रकार घडतो. दिवा गेला की, प्रकाश संपतो आणि स्वधर्माचरणाचा लोप झाला की, सुखाचा थारा संपतो. जिथे आचार सुटतो तिथे मनुष्य स्वतंत्र रहात नाही. आपत्तीच्या हातात सापडतो. आता प्रपंचातही तो म्हणेल ते घडत नाही. हे नीट ऐका हो प्रजानो." असे ब्रह्मदेव म्हणाले.

अर्जुना, जो स्वधर्माचा त्याग करतो त्याला कालच शिक्षा करतो. कारण "हा मनुष्य त्या संपत्तीचा स्वामी नव्हेतर, त्या वैभवाचा अनधिकाराने उपभोग घेणारा चोर आहे." असे देवता ठरवितात. रात्रीच्या वेळी स्मशानात भुतांनी घेरून टाकावे त्याप्रमाणे सर्व प्रकारची संकटे त्याला झपाटून टाकतात. त्रिभुवनातील दुःखे, नाना प्रकारची पातके आणि जितके जितके म्हणून दैन्य आहे ते सर्व त्याच्या ठिकाणी मुक्कामास येते. अशा उन्मत्त माणसाने मग कितीही आक्रोश केलातरी, कल्पांतापर्यंत तो दुःखातून सुटू शकत नाही. आपला धर्म सोडू नये, इंद्रिये भलतीकडे जाऊ देऊ नयेत, असे चतुराननाने प्रजांना शिकवले.

तो म्हणाला, "अहो, हा स्वधर्म म्हणजे माशांना जसे पाणी तसा तुम्हाला आहे. पाण्याबाहेर काढलेले मासे जसे क्षणार्धात गतप्राण होतात तशी गत स्वधर्माचा त्याग केलात तर तुमची होईल. तुम्ही त्याला जराही विसंबू नका."

स्वधर्मपालन करणाऱ्या माणसाचे आचरण पहा. तो आपल्या जवळच्या संपत्तीचा विनियोग विहित क्रिया निष्काम बुद्धीने करण्यात करतो. गुरू, गाई, गोत्र, अग्नि, ब्राह्मण, पितर यांची पूजा करतो. ज्या ज्या वेळी ज्याचे ज्याचे पूजन विहित असेल ते ते तो करतो. यज्ञामध्ये विधिपूर्वक हवन करून जे जे पवित्र यज्ञशेष राहील ते तो सुखाने आपल्या कुटुंबासहित सेवन करतो. तेही तृप्ती देणारे अन्नच पण ते नुसती क्षुधा शमवत नाही. त्या अन्नाच्या पवित्रपणामुळे हातून कळत न कळत घडलेल्या पातकांचाही नाश होतो.

श्री. शांतारामजी आठवले यांच्या पुस्तकात त्यांनी एक उदाहरण दिले आहे. ते लिहितात, "झोपेत

दात खाणे, दचकणे यासाठी एक गृहस्थ आपल्या मुलाला घेऊन डॉक्टरांकडे गेले. डॉक्टरांनी मुलाला तपासले आणि 'हे औषध द्या' असे म्हणून एक चिठ्ठी वडिलांच्या हातात दिली. घरी येऊन चिठ्ठी उलगडून पहातात तर लिहिले होते, "वैश्वदेव करून उरलेला भात मुलाला खाऊ घालावा." त्यांनी आपल्या पुरोहिताकडून थोडे दिवस हे औषधे आणले. मुलाला बरे वाटू लागल्यावर ते स्वतः वैश्वदेव करायला शिकले. हुतशेष अन्नाचा प्रभाव असा आजही अनुभवास येतो.

देव म्हणाले, "महारोग्यास अमृताची प्राप्ती व्हावी आणि तो रोगमुक्त व्हावा त्याप्रमाणे हे यज्ञावशिष्ट अन्न खाऊन तो अनेक पातकापासून मुक्त होतो. रोगच रोग्याला सोडून जावा तशी ही पातके त्याला सोडून जातात. तत्त्वनिष्ठ पुरुषास भ्रांतीचा लवलेश रहात नाही तसे त्याच्याजवळ दोष उरत नाहीत. म्हणून प्रजाहो, स्वधर्माचरणातून जी संपत्ती मिळेल ती स्वधर्माचरणातून खर्च करावी.

काही लोक आपण देहच आहो असे मानतात. विषयांना ते भोग्य आहेत असे समजतात. किंबहुना याशिवाय दुसरा काही विचारच त्यांना माहीत नसतो. खरे म्हटले तर, सर्व प्रकारची संपत्ति हे यज्ञाचे साधन आहे. पण तसे न समजून घेऊन अहंबुद्धीने केवळ आपल्या देहभोगासाठी ती ते खर्च करतात. इंद्रिय रुचीसारखी निरनिराळ्या प्रकारची पक्वान्ने तयार करून जिव्हालौल्यासाठी त्यांचे सेवन करतात. अर्जुना, असे समज की, ते लोक पातकच सेवन करतात. ज्यामुळे यज्ञ सिद्धीला जातो, परमेश्वरास संतोष होतो, ते अन्न सामान्य मानू नये. ते ब्रह्मरूप आहे हे जाणावे. ह्या विश्वाच्या जीवनाचा आधार असणारे अन्न सामान्य कसे होईल? अर्जुना, मूर्ख माणसे नाना प्रकारचे अन्न केवळ आपल्यासाठी शिजवतात. आपण तसे करू नये. हे संपत्तिजात हवनद्रव्य आहे असे मानावे. स्वधर्मयज्ञ करून ते अन्न आदिपुरुषाला अर्पण करावे.

ह्या ओव्या वाचल्या की, मला आमच्या लक्ष्मीबाई विजापुऱ्यांची आठवण होते. मला लहानपणी ताक करायला फार आवडायचे. ताकघराचे काम लक्ष्मीबाईंच्याकडे होते. ताक करण्याची परवानगी त्यांच्याकडे मागावी लागे. मग त्या घुसळखांबाला दोऱ्या बसवून देत. मग उभ्याने ताक करायचे. नाचणारी रवी, तो कासंडीत होणारा घुम घुम आवाज आणि हाताच्या लयबद्ध हालचाली मजेदार वाटायच्या. लक्ष्मीबाई आवाजावरूनच म्हणायच्या, "आता घुसळू नका आणखी, लोणी आलं." झेलून झेलून लोण्याचे गोळे पाण्यात ठेवले की, त्या शिकवायच्या "थोडे लोणी ताकात ठेवा म्हणजे ताक आंबट व्हायचे नाही."

मग मी म्हणायची "काकू, मी आता लोणी खाईन." की, त्या म्हणायच्या "नाही नाही. हे बघा, त्या गोकुळातल्या कृष्णाला लोणी फार आवडायचे ना? लोण्याचा गोपाळकृष्णाला नैवेद्य दाखवा, घुसळखांबाला लोण्याचा ठिपका लावा आणि मग लोणी खा." अशा उपदेशात लहानपण गेले आणि १९३४ साली प्रतिनिधि घराण्यात प्रवेश केल्यावर पुन्हा याच उपदेशाची उजळणी झाली. यावेळी गुरू झाल्या लहानशा नणंद. एकदा वड्या कापत होते. शेजारी इंदुताई बसल्या होत्या. त्यांना म्हटले, "वडी घेता का"? त्यांनी विचारले, "वैनीसाहेब, वडी अंबाबाईला ठेवली का?" मी म्हटलं "नाही." त्या म्हणाल्या, "मी अंबाबाईला ठेवून येते आणि मग खाते." स्वारी धावत जाऊन देवघरात अंबाबाईला वड्या ठेवून आली आणि मग त्यांनी वडी खाल्ली.

त्यानंतर मात्र मला कधीच विस्मरण झाले नाही. खाद्यपदार्थ, पैसा, कपडा, दागिना काहीही असो

देवघरात श्रीजगदंबेस अर्पण केल्याशिवाय कुणीच त्याचा उपयोग करीत नाही. "हे माझे नव्हे तुझे आहे", असे म्हणण्याची मनाला संवयच पडून गेली आहे.

आणि खरे म्हणजे हे लक्षात ठेवायला सोपे आहे अगदी. आपण देवाला जाताना पेढे घेतो. कुणी विचारले, "हे काय आहे?" तर आपण म्हणतो, "हे ना, देवाला ठेवायला पेढे घेतलेत." ते पेढे देवापुढे ठेवतो. त्यातले पाच पेढे पुजारी आपल्याला देतात. कुणी विचारले, "हातात काय आहे?" आपण म्हणतो, "हा ना? अंबाबाईचा प्रसाद."

तेच पेढे पण त्याचे वैभव देवस्पर्शाबरोबर पालटले. रोज जेवताना "भवानी शंकर प्रसादः" असे म्हणूनच अन्नाला स्पर्श केला जातो आणि प्रसाद म्हणून ते घेतले जाते आणि आमच्या सर्वांच्या मनात हा एक औपचारिक उच्चार नव्हेतर, जाज्वल्य भाव असतो.

देवाला अर्पण केलेल्या भोगांचे स्वरूप असे पालटते.

अगदी एखादा दागिना अंगावर चढवला तरी चढवताना, "हा माझ नाही जगदंबेचा आहे", हे स्मरण राहते आणि ह्या स्मरणात, समर्पणातच आमचे कल्याण आहे, आनंद आहे म्हणून त्या जगदंबेच्या आधाराचा भरवसा आहे. देव म्हणतात, "पार्था, प्राणिमात्र अन्नामुळे वाढतात. पाऊस अन्नाला जन्म देतो. पण पावसाचा जन्म होतो यज्ञामुळे. यज्ञ प्रगट होतो कर्मापासून. वेदरूप ब्रह्म हे कर्माचे मूळ आहे. दूर व जवळ म्हणजेच सर्वत्र असणारे ब्रह्म वेद उत्पन्न करते. म्हणून हे चराचर विश्व ब्रह्माने बद्ध आहे. ब्रह्मांतून वेद, वेदापासून कर्म, कर्मामुळे यज्ञ, यज्ञामुळे पर्जन्य, पर्जन्यामुळे अन्न आणि अन्नावर आधारित प्राणीजीवन अशा ह्या साखळीस पावलापावलागणिक, क्षणाक्षणागणिक त्या ब्रह्माचाच एकमेव आधार आहे. म्हणूनच चराचर सृष्टि ब्रह्मबद्ध मानावी. मात्र मूर्तिमंत कर्मरूप यज्ञामध्ये वेदाचा निरंतर प्रगट वास आहे.

यज्ञाच्या संदर्भामध्ये ही आदि परंपरा मी तुला सांगितली. स्वधर्मरूप यज्ञ समूळ उचित आहे हे ध्यानात ठेव. हा स्वधर्म टाकू नये. सर्व प्रकारे याचेच अनुष्ठान एकनिष्ठेने करावे. कारण शरीर उत्पन्न झाले रे, झाले की, कर्तव्य ओघानेच वाट्यास आले आहे. उचित कर्म टाकून, स्वधर्माचा त्याग करून आपण काय करावयाचे? उन्मत्त होऊन काही लोक स्वधर्माचे अनुष्ठान करीत नाहीत. अशी माणसे पापाची रास आहेत. ती केवळ भूभार आहेत. इंद्रियांनाच फक्त त्यांचा उपयोग आहे. अकाळीच्या अभ्रासारखा त्यांचा जन्मच व्यर्थ, त्यांचे सगळे कर्मच व्यर्थ आहे. त्यांचा जन्म अजागल स्तनासारखा निरर्थक आहे. धनुर्धरा अर्जुना, ध्यानात ठेव की, मनुष्य शरीर मिळाल्यावर जे स्वकर्माचा खेद मानतात ते अगदी अज्ञानी, गांवढळ आहेत.

खरी युक्ति अशी की, देह कर्मामध्ये गढलेला आणि मन स्वरूपात रमलेले असावे अशा रीतीने कर्म केले की, तो कर्मात अडकत नाही. आत्मज्ञानाने तो संतुष्ट झालेला असतो. ज्यासाठी आपण जन्मास आलो ते काम आपण केले आहे याचे त्याला समाधान असते आणि म्हणून एरवी कर्मामुळे उत्पन्न होणारा बंध त्यांच्यापर्यंत पोचू शकत नाही. तृप्ती झाल्यावर जशी स्वयंपाक करण्याची यातायात संपते, त्याप्रमाणे आत्मतुष्टि झाली की, कर्म करण्याची सक्ती उरत नाही. अर्जुना, जोवर पूर्णबोध मनाला भेटलेला नाही तोवर ह्या सर्व साधनांचे

अनुष्ठान करावेच लागते.

तुझ्या मनात हा बोध अजून पूर्ण ठसलेला नसल्याने स्वकर्म तुला करावेच लागेल. आसक्ती टाकून दे, सर्व कामना सोडून दे आणि स्वधर्माचे आचरण कर. अशा प्रकारे निष्काम वृत्तीने ज्यांनी आपल्या धर्माचे पालन केले ते जगात श्रेष्ठ अशा मोक्षपदाला पोहचतात, तसा तूही पोचशील. अशेष कर्मजात करीत करीतच जनकासारखे राजर्षि मोक्षपदाला पोचले.

स्वकर्मावरची अशा प्रकारची आपली निष्ठा आणखी एका प्रकारे उपकारक ठरते. आपल्याला अशा प्रकारचे अनुष्ठान करताना पाहून इतर लोकांना वळण लागेल आणि सहजच कर्मलोपामुळे होणारा अनर्थ टळेल. ज्यांनी सर्व काही मिळविले, जे निष्काम झाले, त्यांनाही इतरांसाठी कर्तव्य उरलेलेच असते. डोळस मनुष्य आंधळ्या माणसाला बरोबर घेवून जाताना जसा त्या आंधळ्या माणसाची अडचण ओळखून त्याला संभाळून नेतो त्याप्रमाणे अज्ञानी माणसाला धर्म नुसता शब्दाने सांगून पुरत नाही. प्रत्यक्ष आचरून दाखवावा लागतो. अज्ञानी माणसांना मार्ग कळावा म्हणून जगातील ज्ञानी माणसे जसे प्रत्यक्ष आचरण करतात त्याला "धर्म" असे म्हणून सामान्य माणसे त्या कित्त्याबरहुकुम आपले आचरण ठेवण्याची खटपट करतात. आणि म्हणूनच ज्ञानी पुरुषाने कर्म सोडून चालणारच नाही. तो स्वतःच जर कर्मभ्रष्ट झाला तर जग सहजच कर्मभ्रष्ट होईल. म्हणूनही संतांना कर्म टाकता तर, येतच नाही पण उलट अत्यंत दक्षतेने कर्माचरण करावे लागते.

अरे, संतांची गोष्ट कशाला, मी स्वतः देखील या नियमानुसार चालतो. मला काही संकट आहे की, कमतरता आहे. माझ्या ठिकाणी पूर्णत्व आहे. माझ्याएवढी सामुग्री कुणाच्याही अंगी नाही. माझ्या बरोबरीचा जगात कोणीही नाही, हे तुला पूर्णपणे ठाऊक आहे ना? गुरूंचा मृतपुत्र मी उठवला हे माझे सामर्थ्य तुला माहितच आहे. पण असा सर्वशक्तिमान मीही शरीर धारण केल्याबरोबर मुकाट्याने स्वकर्माचे विधिपूर्वक आचरण करतो. एखादा सकाम पुरुष ज्या साक्षेपाने फलप्राप्तीसाठी कर्म करतो अगदी तशा तत्परतेने मी कर्माचरण करतो.

हा सर्व प्राणीसमूह माझ्या आधीन आहे. माझ्या तंत्राने चालणारा आहे. मीच आडरस्त्याने चाललो तर हे जगही तसेच चालेल. निरिच्छ होऊन आत्मस्वरूपात रमून विहित कर्मे मीच सोडून दिली तर ही सर्व प्रजा कशी तरेल? लोकांनी, आम्ही कसे वागतो ते पहावे आणि त्याप्रमाणे वागावे ही रीत मोडेल म्हणून सर्वज्ञ समर्थाने विचारपूर्वक कर्माचे आचरणच करावे. कर्मत्याग कधीही करू नये. निष्काम झालेल्या पुरुषानेसुद्धा फळाच्या आशेने कर्म करणाऱ्या पुरुषाप्रमाणे उत्सुकतेने कर्माचरण करावे. कारण ही, लोकसंस्था निःसंशय रक्षणीय आहे. लोकांना स्वधर्माचरणाची रीतच घालून द्यावी, आणि अलौकिक आचरणाचे उदाहरण ज्ञानी पुरुषाने त्यांच्यापुढे ठेवू नये. आईचे दूध कसेबसे पचविणाऱ्या बाळाला जशी पक्वान्ने देऊ नयेत तशी नीटपणे कर्म करण्याची योग्यताही ज्यांच्या अंगी नाही त्यांना सहज म्हणूनसुद्धा नैष्कर्म्याचा उपदेश करू नये. निष्काम पुरुषाने सक्रिया आचरून दाखवावी. तिचीच प्रशंसा करावी.

बहुरूपी स्त्रीपुरुषांची सोंगे आणतो. पण ते स्त्रीपुरुषत्त्व जसे वरवरचे असते, खरेखुरे नसते, तसे त्याचे कर्माचरण उत्तम पण वरकरणी लोकांनी उदाहरण घ्यावे ह्यासाठी असते. त्या कर्माचा लेप त्यांच्या चित्ताला

लागत नाही.

धनुर्धरा, समोर दिसेल ते ओझे ओढून आपण आपल्या डोक्यावर घेतले तर त्याचे सांकडे होणारच. प्रकृतीमुळे म्हणजेच शरीर धारण केल्यामुळे, जी कर्मे आपोआप घडतात ती शुभ आहेत की, अशुभ आहेत याचा विचार करीत, स्वीकार-त्याग करीत, मूर्ख माणसे भ्रमित होऊन “मीच कर्मे करतो, त्याचे फळ मलाच भोगावे लागते” असे म्हणत बसतात. मी कर्ता या अहंकाराच्या भूमिकेवर आरूढ होऊन जे मूर्ख लोक कर्म करतात, त्यांना हा गूढ परमार्थ सांगायला मात्र जाऊ नये. एकतर त्यांना तो कळत नाही आणि कळला तर पटत नाही. शुद्ध निष्काम कर्माचरणाने शरीर, मन, वाणी पवित्र झाल्यावरच ह्या परमार्थाचे बीज रुजते. मला असे वाटते आहे की, तू मात्र या परमार्थाच्या श्रवणास व अनुष्ठानास योग्य झाला आहेस. म्हणूनच तुला मी हा विचार सांगतो आहे. लक्षपूर्वक ऐक.

शरीर धारण केले की, जीवात्मा प्रकृतीच्या पिंजऱ्यात सापडतो. मीच शरीर आहे असे भ्रमाने म्हणू लागतो आणि शरीर, मन, बुद्धि, भावना यांनी केलेले व्यापार आपणच केले असे मानतो. पार्था, हा प्रकृतिभावच कर्म करवीत असतो. तत्त्वज्ञानी पुरुष मुळाशीच घाव चालून शरिराशी एकरूपत्त्व मानतच नाहीत. ते देहाभिमान सोडतात आणि मग सहजच गुणाच्या प्रभावात सापडत नाहीत. केवळ साक्षीभूत होऊन शरिराची सर्व कर्मे पहातात. प्राणिमात्राच्या कर्मांचा लेप जसा सूर्याला होत नाही, त्याच्या प्रकाशात जगाची कर्मे चालतात एवढेच. तसेच हे तत्त्वज्ञानी शरिरांत असतात पण केवळ साक्षी म्हणून रहातात आणि म्हणून त्या शरिराने केलेल्या कर्माचा बंध त्यांना बाधक होत नाही.

या जगात गुणांना वश होणारा आणि प्रकृतिच्या विळख्यात वावरणारा असा पुरुषच कर्मबंधनाने लिप्त होतो. कारण इंद्रिये गुणांच्या आधाराने आपआपल्या व्यवहारात रमतात आणि ते इंद्रियांचे म्हणजेच परक्याचे कर्म जीवात्मा आपल्या डोक्यावर ओढून घेतो आणि थकतो.

अर्जुना, तू असे करू नकोस. तू सगळी उचित कर्मे कर. ती करताना तुझी चित्तवृत्ति माझ्या ठिकाणी ठेव आणि कर्माचे फळ निर्माण झाल्याक्षणी मला अर्पण करून टाक. हे कर्म, मी कर्ता, हे मी करतो ह्या तिन्ही विचारांचा अभिमान चित्तामध्ये कधीही येऊ देऊ नको. पार्था, प्रथम ह्या देहाचा अभिमान सोड, मनातल्या सर्व आकांक्षा टाक, आलेच भोग समोर तर समाधानाने भोग. ना त्यांची अभिलाषा, ना त्यांचा खेद अशी तुझी वृत्ति असू दे.

आणि मग घे ते कोदंड हातात. चढ ह्या रथावर आणि समाधानाने वीरवृत्तीला अलिंगन दे, जगामध्ये कीर्ति वाढव. स्वधर्माचरणाचा कित्ता घालून दे आणि ह्या दुष्टांच्या भाराखाली दडपून गेलेली ही पृथ्वी सोडव. पार्था, आता मनात काहीही शंका ठेवू नको. केवळ ह्या संग्रामावरच लक्ष केंद्रित कर.

मला यापेक्षा जास्त काही सांगायचे नाही. हे यथार्थ मत जे परमादराने स्वीकारतात आणि श्रद्धापूर्वक त्याप्रमाणे वर्तन करतात ते सर्व कर्मे करीत असूनही कर्मरहित असे रहातात कारण कर्म करणीयच आहे अशी त्यांची पक्की खात्री झालेली असते.

अशी काही मंडळी आहेत की, जी प्रकृतीच्या आधीन होऊन इंद्रियांचे लाड करतात आणि माझ्या ह्या मताचा तिरस्कार करून टाकून देतात. ह्या उपदेशाला ते सामान्य बडबड समजतात आणि त्या शब्दांकडे अनादराने पहातात. ते मोहरूपी मदिरेने भ्रमलेले, विषयविषाने भारलेले, अज्ञानरूपी चिखलात बुडलेले आहेत असे खुशाल समज. प्रेताच्या हातात दिलेले रत्न जसे वाया जाते किंवा जात्यंधाला दिवस उगवल्याचे सुख-दुःख नसते त्याप्रमाणे ह्या मूर्खांना विवेक पटतच नाही. चंद्रोदय झाला तरी कावळ्यांना जशी त्याची गोडी नसते तसेच हे होते.

पार्था, हे लोक परमार्थापासून असे विन्मुख असतात त्यांच्याशी बोलणेदेखील मनाला रुचत नाही. ते उपदेश तर मानीतच नाहीत पण उलट निंदा मात्र करतात. पतंगांना प्रकाशाचे तेज सहन होत नाही. मग तो प्रकाश करणारा दिवाच मालवावा ह्या ईर्षेने अचूक त्या दिव्याच्या ज्योतीवर झडप घालतात आणि मरणाला मिठी मारतात. तसेच त्यांचे हे वर्तन असते. विषयाचरण हे त्यांचे मरणच आहे.

म्हणून तुला पुन्हापुन्हा सांगतो की, शहाण्या पुरुषाने कदापि इंद्रियांचे लाड करू नयेत. सापाशी खेळता येईल का? वाघाशी मैत्री करणे जमेल का? हालाहल विष सेवन केले तर ते जिरेल का? अग्नि एकदा सहज पेटला की, भडका उडतो आणि मग आवरता आवरत नाही तसेच इंद्रियांचे लाड करणे बरे नव्हे.

या पराधीन शरीरासाठी नाना प्रकारचे भोग मिळवून आणावे, अपार कष्ट करून सर्व प्रकारचे वैभव जिंकून आणावे आणि रात्रंदिवस या क्षणभंगुर देहाचे चोचले पुरवावे काय. कष्ट करून संपत्ती मिळवायची आणि धर्माचरण सोडून शरिराचे भरणपोषण लाड करावयाचे आणि एक दिवस हा पाचाच मेळावा फुटून पाचीकडे गेला म्हणजे ते अपार कष्ट कुठे शोधायचे? केवळ देहाचे पोषण करणे म्हणजे नुसती नागवण आहे म्हणून या उघडउघड घाताचा विचार तू मनातदेखील येऊ देऊ नकोस. फक्त स्वकर्माचा विचार समोर ठेव."

एका शहरात एक फार सुंदर वेश्या राहत असे. एक साधू रोज तिच्या दारावरून गंगा स्नानास जात असे. एक दिवस त्याच्या मनात आले, "रोज ह्या दारात कोण उभे असते? नुसते पहायला काय हरकत आहे." एक दोन दिवस पहिल्यावर त्याला सवयच लागली की, वेश्येच्या दाराशी आले की, तिच्याकडे पहायचे. स्वरूप सुंदर, उत्तम वस्त्रालंकार ल्यालेली ती स्त्री त्याला पाहून रोज नमस्कार करू लागली. होता होता थोडे बोलणे सुरू झाले, ओळख वाढू लागली. एकदा बाई हात जोडून म्हणाली, "महाराज, माझ्या घरास आपले पाय लागले तर मी धन्य होईन." हाही विचार संन्याशाच्या पचनी पडला. मग तो तिच्या घरी गेला, तिने त्याचे उत्तम आदरातिथ्य केले, पूजा केली. दूध, फळे वगैरे दिली. दुरूनच सुवर्णमुद्रिका दक्षिणा म्हणून दिल्या. अशी पूजा चार दोन वेळा झाल्यावर तिने विनंती केली, "महाराज, मी अगदी निर्लेप स्वयंपाक तयार करते, आपले उष्टे माझ्या घरी पडू दे."

साधूने त्यालाही मान्यता दिली. ताट मांडले आणि साधूबुवा जेवायला बसले. त्यांनी अन्नास हात लावण्यास हात पुढे केल्याबरोबर त्या वेश्येसच आधी उपरती झाली. तिने झटकन पुढे होऊन हात धरला आणि म्हटले, "नका, नका खाऊ हे अपवित्र अन्न! आपली आंजवरची तपश्चर्या वाया जाईल."

या गोष्टीवरून ध्यानात येते की, थोडी भ्रष्टता सहन केली, इंद्रिये म्हणतील ते करत गेले की, त्यांचा पगडा बसतो आणि ती जीवाला कुठल्याही हीन अवस्थेस नेऊन पोहचवतात.

देव म्हणतात, "अर्जुना, इंद्रियांच्या आवडीचा विषय मिळाला की, ती संतुष्ट होणारच पण तो त्यांचा संतोष परिणामी घातक ठरतो. जंगलातून जाण्याचा प्रसंग यावा, आपली एखाद्या ठगाशी मैत्री व्हावी, नगर संपेपर्यंत त्याने सज्जनपणाचा आव आणावा, लटका स्नेह दाखवावा आणि जंगल लागल्याबरोबर तुटून पडून आपल्याला हातोहात लुबाडावे तसा हा प्रकार होतो. बाबा, विष चवीला गोड लागते म्हणून ते खावेसे वाटले तरी खाल्ल्याबरोबर प्राण हरण करत नाही का. तसे हे आहे. इंद्रियांच्या ठिकाणी काम गुप्तपणाने असतो. गळाला लावलेले आमिष माशांना भुलविते, मासा त्याला भुलतो आणि गळ न पाहता आमिष पाहतो आणि खातो. परिणाम ठरलेलाच आहे. गळाला लागून मासा प्राणाला मुकतो. त्याप्रमाणे जीव कामनापूर्ती झाल्याबरोबर होणाऱ्या सुखलेशाला भुलतो आणि अडकतो. सुखलेश तरी नेहमीच मिळतो असे कुठे आहे? अपेक्षाभंगही होतो. अपेक्षाभंग झाला की, क्रोध ठेवलेलाच आहे. आतापर्यंत काम हा एकच शत्रू होता. आता त्याच्या जोडीला क्रोध येतो. त्या क्रोधाच्या ज्वाळेत पडावे लागते. पारधी जसा चहूकडून घेरून टाकून सावजाला बाणाच्या टप्प्यात आणतो तसे हे जीवाचे दोन शत्रू त्याची अवस्था करतात.

अर्जुना, या दुष्टांची सावलीसुद्धा तू स्वतःवर पडू देऊ नकोस. त्यांना चित्तात क्षणमात्र थारा देऊ नकोस. मनात त्यांची आठवणदेखील होऊ देऊ नकोस. त्या दुष्टांची नजर तुझ्या स्वकर्माचरणाच्या जिव्हाळ्यावर पडू देऊ नकोस. ह्या दुष्टांच्या तावडीत न सापडता आपले विहित कर्म निष्ठेने करीत जा. कर्माचरणामध्ये त्यांच्या अस्तित्वाला जरासुद्धा थारा देऊ नकोस. समोरच्या शत्रूंशी आवेशाने लढाई करावयाची, जय मिळविण्याची पराकाष्ठा करावयाची हे तुझे या घडीचे प्राप्त कर्तव्य आहे. मनात राज्यलोभाचा काम न ठेवता आणि राज्यप्राप्तीच्या आड येणाऱ्या कौरवाबद्दल क्रोध न आणता कर्तव्यबुद्धिने फलाशा सोडून लढाई कर. तू ज्या पापाला भीत आहेस ते तुझ्या वाटेलासुद्धा जाऊ शकणार नाही. तुला हा स्वधर्म कठीण वाटतो हे साहजिक आहे.

पण अर्जुना, स्वधर्माचरण कितीही कठीण वाटले तरी त्याचे आचरण करणे आपल्या हिताचे आहे. दुसऱ्याचा आचारविचार दिसायला कितीही साजरा दिसला तरी आचरण करताना आपला धर्म आपल्याला! लोकांचे सुंदर संगमरवरी वाडे पाहून आपल्या मालकीची गवताची झोपडी पाडून टाकून काय उपयोग? आपली धर्मपत्नी जरी कुरूप असली तरी तिच्याबरोबरच संसार करणे योग्य नव्हे काय? तशीच ही स्थिती आहे. वाटेल तितका अवघड अडचणीचा असला तरी आपला स्वधर्मच आचरणीय आहे. तोच परलोकी सुख देणारा आहे. साखर आणि दूध यांचे मिश्रण उत्तम हे खरे, पण कृमिदोष असताना ते कुपथ्य आहे; मग घ्यावे कसे, त्यातून जबरदस्तीने घेतले तर फक्त आपला अट्टाहास सिद्ध होतो. बाकी परिणाम वाईट होणार हे ठरलेलेच आहे.

अर्जुना, या कर्माची अशी काही गुंतागुंत आहे की, दुसऱ्याचे विहित कर्म आपले निषिद्ध कर्मही होऊ शकते."

अनुक्रमणिका

तुलसीरामायणात एक मजेचा प्रसंग तुलसीदासजींनी घातला आहे. राम, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न ह्या चौघांचे विवाह संपन्न होत असताना कन्यादानाची वेळ आली. प्रभू रामचंद्रांनी कन्यादान स्वीकारले. मग लक्ष्मणाची पाळी आली.

"कन्यादान" हा शब्द उच्चारल्याबरोबर लक्ष्मण रागाने म्हणाला, "दान! मी क्षत्रिय आहे. दान देत असतो, घेत नसतो. दान ब्राह्मणाने घ्यायचे असते. क्षत्रियाने नव्हे. मी मुळीच हातावर पाणी घेणार नाही. माझ्या कुळाला बट्टा लावू काय दान घेऊन!"

लक्ष्मणाची समजूत काढता काढता सर्वांना पुरेवाट झाली, तर एकाचे विहित कर्म दुसऱ्याचे निषिद्ध कर्म कसे ठरते ते हे असे. देव पुढे म्हणाले, "दुसऱ्याचे कर्म आपण आपल्यावर ओढून घेणे उचित होणार नाही. हिताचा विचार केला तर ते आचरू नये असेच ठरते. स्वधर्माचे आचरण करीत असताना अगदी प्राण गेलेतरी, इहपरलोकी लाभदायकच ठरते."

अर्जुनाने देवांचे हे सर्व बोलणे ऐकले. मोठेमोठे मुनितपस्वी कामक्रोधाच्या आधीन झाल्यामुळे त्यांची काय काय दुर्दशा झाली त्याचे त्याला स्मरण झाले आणि तो देवांना म्हणाला, "देवश्रेष्ठा श्रीकृष्णा, तुम्ही बोललात ते सर्व मी ऐकले. पण मनात एक शंका आली ती आपल्याला विचारून फेडून घ्यावी म्हणतो. ऐका देवा, आम्ही ज्यांना ज्ञानी पुरुष म्हणतो त्यांची ती परमोच्च स्थिती कधी कधी बिघडते आणि जाऊ नये त्या मार्गाने ते जाऊ लागतात. हा मार्ग अनर्थकारक आहे हेही ते जाणतात. अशी बुद्धि होऊ नये म्हणून काय उपाय करावा हेही त्यांना ठाऊक असते. तरीही नको त्या प्रकारचे आचरण त्यांच्या हातून कशामुळे घडते हो? धान्य आणि कोंडा याचा निवाडा आम्हा आंधळ्यांना कळत नाही हे आपण समजू शकतो; पण ह्या डोळसांना कसा भ्रम पडतो? सर्वसंगपरित्याग करतात, पुन्हा संसारात येतात आणि तो टाकू शकत नाहीत. वनवासात जातात आणि पुन्हा त्या एकांताचा त्याग करून शहराच्या गजबजाटात मिसळतात. पाप हातून घडू नये म्हणून दूर जाऊन लपून बसतात आणि तरीही बलात्काराने पापात ढकलले जातात. ते कशामुळे? ज्यांचा ते मनापासून कंटाळा करतात तेच कामक्रोध मनात उद्भवतात. ज्यांना टाळण्याचा प्रयत्न करतात तेच त्यांना घेरून टाकतात. देवा इथे काही तरी बलात्काराचा प्रकार आहे. कोण ही जबरदस्ती करते ते मला सांगा."

हृदयकमलात विश्रान्ती घेणारा, निष्काम योग्यांचा काम असा पुरुषोत्तम श्रीकृष्ण म्हणाला, "सांगतो ऐक. बाबा, हा बलात्कार करणारे शत्रू दोन! काम आणि क्रोध. त्यांच्या ठिकाणी दयेचा लवलेशही नाही. हे प्रत्यक्ष यमधर्मच आहेत असे समजले जाते.

हे ज्ञानठेव्यावर बसलेले भुजंग, विषयदरीतील वाघ आणि साधनेच्या मार्गावर दबा धरून बसलेले मांग आहेत. देहरूपी किल्ल्याचे हे मोठमोठे दगड आहेत. इंद्रियारूपी गावांचे हे गावकूस आहेत. अविवेकरूपी बंड यांनी सर्व जगात फैलावून दिले आहे. हे मनातल्या रजोगुणाचे बनलेले आहेत. आधीपासूनच आसुरी संपत्तीने युक्त असलेल्या ह्या राक्षसांचे पालनपोषण अज्ञानाने केले आहे. जरी कामक्रोध हे रजोगुणापासून झाले आहेत तरी तमाचे ते फार लाडके मित्र आहेत, त्यामुळे त्याने स्वतःची खास गादी जे प्रमाद आणि मोह ते त्यांना बहाल केले आहेत. जीवनाचे ते शत्रू असल्यामुळे मृत्यूच्या नगरीत त्यांना फार मान आहे. हे भुकेने खवळले की, सर्व

विश्व त्यांच्या एका घासाला पुरत नाही. त्यांचा सगळा कारभार आशा पहाते. कौतुकाने चौदा भुवने जिच्या मुठीत मावतात ती भ्रान्ति आशेची लाडकी धाकटी बहीण आहे. लोकत्रयाचा फराळ ती सहज जाताजाता तोंडात टाकते. तृष्णा तिचे दासीपण करून जगते. कामक्रोधाच्या घरी अर्थातच मोहाला मान असतो. अहंकाराशी त्यांची देवघेव चालते. हा अहंकार तर आपल्या करामतीने जगाला नाचवतो. ज्या दंभाने सत्याचा कोथळा काढून त्यात अकृत्याचा पेंढा भरला त्या दंभाला या कामक्रोधानीच प्रसिद्धीला आणले आहे. एवढ्यानेच त्याचे कारस्थान संपत नाही. पतिव्रता शांतीला वस्त्रहीन करून त्यांनी माया ही भांगी शृंगारली. तिच्याकरवी साधूंचे समुदाय भ्रष्ट केले. विवेकाचा आश्रय नाहीसा केला. वैराग्याची कातडी सोलली. जिवंतपणीच निग्रहाची मुंडी मुरगळली. संतोषवन खणून काढले. धैर्यदुर्ग पाडून टाकले. आनंदाचे रोपटे उपटून टाकले. बोधाचे कोंबच खणून काढले. सुखाची लिपी पुसली. हृदयात तापत्रयाचे निखारे पसरले.

पार्था, हे कामक्रोध शरिराबरोबरच जन्माला आले आहेत. ते अंतःकरणाला विळखा घालूनच बसलेले असतात. धुंडाळावेत तर ते ब्रह्मदेवालासुद्धा सापडत नाहीत. हे चैतन्याच्या शेजारी ज्ञानाच्या पंक्तीला बसलेले असतात आणि एकदा खवळले तर कुणालाही आटोपत नाहीत. हे पाण्याशिवाय बुडवतात, अग्निवाचून जाळतात, न बोलता प्राण्यांना कवटाळतात, हत्यारावाचून मारतात, दोराविना बांधतात, चिखलाशिवाय रुतवतात, पाशाशिवाय गुंतवतात. इतर कुणाला तर ते आवरता येतच नाहीत पण ज्ञानी पुरुषांनाही पैज घेऊन जिंकतात.

तुला वाटेल की, हे इतके बलिष्ठ कसे झाले तर त्याचे असे आहे की, चंदनाच्या मुळीला सापाचा वेढा किंवा गर्भाला उल्बाची खोळ असावी तसे हे ज्ञानाला चिकटूनच असतात. प्रकाशावाचून सूर्य किंवा धुरावाचून अग्नि किंवा धुळीवाचून आरसा जसा कधी असत नाही तसेच ज्ञान आम्ही ह्या दोहोशिवाय पाहिले नाही. कोंड्यासकटच बी उत्पन्न होते, तसे कामक्रोध घेऊनच शान उत्पन्न होते. ज्ञान मुळात शुद्ध पण ह्या दोघांनी आच्छादून टाकल्यामुळे ते मिळण्यास कठीण होऊन राहिले आहे. आधी यांचा पराभव करावा आणि मग ज्ञान संपादन करावे असे म्हणावे तर ह्यांचा पराभवच अशक्य आहे. यांना जिंकण्यासाठी जे बळ अंगी आणावे ते त्यांनाच सहाय्यकारी होते. जसे काही आगीत इंधनच. जो जो उपाय करावा तो तो काम क्रोधांचाच मित्र होतो. हठयोग्यांना हेच जिंकून टाकतात. यांना जिंकायचे काम फार कठीण आहे खरे, पण त्यांनाही जिंकण्याचा उपाय आहे. “मला करता येईल.” असे जर तुला वाटत असले तर सांगतो ऐक.

यांचे आश्रयस्थान आहे इंद्रिये, या इंद्रियांपासूनच कर्माची प्रवृत्ति होते. तेव्हा ती प्रवृत्तिच होऊ नये म्हणून प्रथम या इंद्रियांचे दमन कर. ते झाले की, मनाची धाव थांबेल. बुद्धि मोकळी होईल. बुद्धि मोकळी झाली की, त्या पाप्यांचे ठाणे उठेल.

हे अंतःकरणातून गेले की, मगच निःसंशय गेले असे समज. सूर्यकिरण गेले की, मृगजळ नाहीसे होते ना, तसे रागद्वेष निमाले की, ब्रह्मीचे साम्राज्यच मिळाले! मग वृत्ती आपल्या ठिकाणी सुखाने मुरून रहाते. गुरुशिष्यांच्या संवादात विचाराने उत्पन्न झालेल्या एकतेचा अनुभव ती वृत्ति घेते. एकरूप होऊन जाते. पुन्हा त्या पदावरून ढळत नाही, उतरत नाही.

संजय म्हणाला, “राजा, सर्व सिद्धांचा राजा असा तो लक्ष्मीपती नारायण असे म्हणाला.”

आता पुढच्या अध्यायात तो देवदेवेश्वर अनंत एक आद्य कथा पार्थाला सांगेल आणि तो पंडुसुत प्रश्न विचारील. त्या उपदेशाची योग्यता, त्यातील उत्तमोत्तम रस यामुळे श्रोत्यांना श्रवणसुखाचा महोत्सव होईल. निवृत्तीदास ज्ञानदेव म्हणतात, “बापहो, बुद्धिला जागे करून हा श्रीहरि-पार्थांचा संवाद आपण ऐकावा.”

***

अनुक्रमणिका

॥ श्री ॥

### अध्याय चवथा

## ज्ञानसंन्यासयोग

॥ ॐ नमो भगवते वासुदेवाय ॥

श्रीभगवानुवाच—

**इमं विवस्वते योगं प्रोक्तवानहमव्ययम् ।**
**विवस्वान्मनवे प्राह मनुरिक्ष्वाकवेऽब्रवीत् ॥ १ ॥**

**एवं परंपराप्राप्तमिमं राजर्षयो विदुः ।**
**स कालेनेह महता योगो नष्टः परंतप ॥ २ ॥**

**स एवायं मया तेऽद्य योगः प्रोक्तः पुरातनः ।**
**भक्तोऽसि मे सखा चेति रहस्यं ह्येतदुत्तमम् ॥ ३ ॥**

अर्जुन उवाच—

**अपरं भवतो जन्म परं जन्म विवस्वतः ।**
**कथमेतद्विजानीयां त्वमादौ प्रोक्तवानिति ॥ ४ ॥**

श्रीभगवानुवाच—

**बहूनि मे व्यतीतानि जन्मानि तव चार्जुन ।**
**तान्यहं वेद सर्वाणि न त्वं वेत्थ परंतप ॥ ५ ॥**

**अजोऽपि सन्नव्ययात्मा भूतानामीश्वरोऽपि सन् ।**
**प्रकृतिं स्वामधिष्ठाय संभवाम्यात्ममायया ॥ ६ ॥**

**यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।**
**अभ्युत्थानमधर्मस्य तदाऽऽत्मानं सृजाम्यहम् ॥ ७ ॥**

अनुक्रमणिका

परित्राणाय साधूनां विनाशय च दुष्कृताम् ।
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥ ८ ॥

जन्म कर्म च मे दिव्यमेवं यो वेत्ति तत्त्वतः ।
त्यक्त्वा देहं पुनर्जन्म नैति मामेति सोऽर्जुन ॥ ९ ॥

वीतरागभयक्रोधा मन्मया मामुपाश्रिताः ।
बहवो ज्ञानतपसा पूता मद्भावमागताः ॥ १० ॥

ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम् ।
मम वर्त्मानुवर्तन्ते मनुष्याः पार्थ सर्वशः ॥ ११ ॥

कांक्षन्तः कर्मणां सिद्धिं यजन्त इह देवताः ।
क्षिप्रं हि मानुषे लोके सिद्धिर्भवति कर्मजा ॥ १२ ॥

चातुवर्ण्यमया सृष्टं गुणकर्मविभागशः ।
तस्य कर्तारमपि मां विद्ध्यकर्तारमव्ययम् ॥ १३ ॥

न मां कर्माणि लिम्पन्ति न मे कर्मफले स्पृहा ।
इति मां योऽभिजानाति कर्मभिर्न स बध्यते ॥ १४ ॥

एवं ज्ञात्वा कृतं कर्म पूर्वैरपि मुमुक्षुभिः ।
कुरु कर्मैव तस्मात्त्वं पूर्वैः पूर्वतरं कृतम् ॥ १५ ॥

किं कर्म किमकर्मेति कवयोऽप्यत्र मोहिताः ।
तत्ते कर्म प्रवक्ष्यामि यज्ज्ञात्वा मोक्ष्यसेऽशुभात् ॥ १६ ॥

कर्मणो ह्यपि बोद्धव्यं बोद्धव्यं च विकर्मणः ।
अकर्मणश्च बोद्धव्यं गहना कर्मणो गतिः ॥ १७ ॥

कर्मण्यकर्म यः पश्येदकर्मणि च कर्म यः ।
स बुद्धिमान्मनुष्येषु स युक्तः कृत्स्नकर्मकृत् ॥ १८ ॥

यस्य सर्वे समारम्भाः कामसंकल्पवर्जिताः ।
ज्ञानग्निदग्धकर्माणं तमाहुः पण्डितं बुधाः ॥ १९ ॥

त्यक्त्वा कर्मफलासङ्गं नित्यतृप्तो निराश्रयः ।
कर्मण्यभिप्रवृत्तोऽपि नैव किञ्चित्करोति सः ॥ २० ॥

निराशीर्यतचित्तात्मा त्यक्तसर्वपरिग्रहः ।
शारीरं केवलं कर्म कुर्वन्नाप्नोति किल्बिषम् ॥ २१ ॥

यदृच्छालाभसंतुष्टो द्वन्द्वातीतो विमत्सरः ।
समः सिद्धावसिद्धौ च कृत्वापि न निबध्यते ॥ २२ ॥

गतसङ्गस्य मुक्तस्य ज्ञानावस्थितचेतसः ।
यज्ञायाचरतः कर्म समग्रं प्रविलीयते ॥ २३ ॥

ब्रह्मार्पणं ब्रह्म हविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम् ।
ब्रह्मैव तेन गन्तव्यं ब्रह्मकर्मसमाधिना ॥ २४ ॥

दैवमेवापरे यज्ञं योगिनः पर्युपासते ।
ब्रह्माग्नावपरे यज्ञं यज्ञेनैवोपजुह्वति ॥ २५ ॥

श्रोत्रादीनीन्द्रियाव्यन्ये संयमाग्निषु जुह्वति ।
शब्दादीन्विषयानन्य इन्द्रियाग्निषु जुह्वति ॥ २६ ॥

सर्वाणीन्द्रियकर्माणि प्राणकर्माणि चापरे ।
आत्मसंयमयोगाग्नौ जुह्वति ज्ञानदीपिते ॥ २७ ॥

द्रव्ययज्ञास्तपोयज्ञा योगयज्ञास्तथाऽपरे ।
स्वाध्यायज्ञानयज्ञाश्च यतयः संशितव्रताः ॥ २८ ॥

अपाने जुह्वति प्राणं प्राणेऽपानं तथाऽपरे ।
प्राणापानगती रुद्ध्वा प्राणायामपरायणाः ॥ २९ ॥

अपरे नियताहाराः प्राणान्प्राणेषु जुह्वति ।
सर्वेऽप्येते यज्ञविदो यज्ञक्षपितकल्मषाः ॥ ३० ॥

यज्ञशिष्टामृतभुजो यान्ति ब्रह्म सनातनम् ।
नायं लोकोऽस्त्ययज्ञस्य कुतोऽन्यः कुरुसत्तम ॥ ३१ ॥

अनुक्रमणिका

एवं बहुविधा यज्ञा वितता ब्रह्मणो मुखे ।
कर्मजान्विद्धि तान्सर्वानेवं ज्ञात्वा विमोक्ष्यसे ॥ ३२ ॥

श्रेयान्द्रव्यमयाद्यज्ञाज्ज्ञानयज्ञः परंतप ।
सर्वं कर्माखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते ॥ ३३ ॥

तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया ।
उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः ॥ ३४ ॥

यज्ज्ञात्वा न पुनर्मोहमेवं यास्यसि पाण्डव ।
येन भूतान्यशेषेण द्रक्षस्यात्मन्यथो मयि ॥ ३५ ॥

अपि चेदसि पापेभ्यः सर्वेभ्यः पापकृत्तमः ।
सर्वं ज्ञानप्लवेनैव वृजिनं संतरिष्यसि ॥ ३६ ॥

यथैधांसि समिद्धोऽग्निर्भस्मसात्कुरुतेऽर्जुन ।
ज्ञानाग्निः सर्वकर्माणि भस्मसात्कुरुते तथा ॥ ३७ ॥

न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ।
तत्स्वयं योगसंसिद्धः कालेनात्मनि विन्दति ॥ ३८ ॥

श्रद्धावाँल्लभते ज्ञानं तत्परः संयतेन्द्रियः ।
ज्ञानं लब्ध्वा परां शान्तिमचिरेणाधिगच्छति ॥ ३९ ॥

अज्ञश्चाश्रद्दधानश्च संशयात्मा विनश्यति ।
नायं लोकोऽस्ति न परो न सुखं संशयात्मनः ॥ ४० ॥

योगसंन्यस्तकर्माणं ज्ञानसंच्छिन्नसंशयम् ।
आत्मवन्तं न कर्माणि निबध्नन्ति धनंजय ॥ ४१ ॥

तस्मादज्ञानसंभूतं हृत्स्थं ज्ञानासिनात्मनः ।
छित्वैनं संशयं योगमातिष्ठोत्तिष्ठ भारत ॥ ४२ ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे "ज्ञानसंन्यासयोगो नाम" चतुर्थोऽध्यायः ॥ ४ ॥

अनुक्रमणिका

श्रीकृष्णार्पणमस्तु ।

----------

## अनुक्रमणिका

या अध्यायाचे नाव ज्ञानसंन्यासयोग असे आहे. नावावरूनच ध्यानात येते की, ह्या अध्यायात ज्ञानाचे महत्त्व व संन्यासाचे स्वरूप सांगितले जाईल.

यात सांगितलेला अक्षययोग कर्मयोग आहे. तिसऱ्या अध्यायाला धरून त्याची उभारणी आहे. कर्म अटळ आहे हे ठरले की, ते बंधक होणार नाही एवढीच काळजी जीवाला घेता येते. मात्र कर्म आपल्या वाट्याला कोणते व का येते याचा विचारही या अध्यायात थोडासा येऊन गेला आहे.

वर्णाश्रमाच्या चौकटीत जन्म येतो व जन्माने कर्माचा निर्णय होतो. जन्म कुठे घ्यावा हे आपले पूर्वकर्म ठरवते, जीव ठरवत नाही. म्हणून या समस्येवरही देवांनी अचुक बोट ठेवले आहे. "तुझ्या गुणानुसार तुला कर्माचा अधिकार प्राप्त होतो". असे स्पष्टीकरण देव देत आहेत.

कर्म कसे करावे यासाठी ज्ञानाची अपेक्षा आणि "ज्ञानयज्ञच सर्व यज्ञात श्रेष्ठ" असे देव सांगत आहेत. हे ज्ञान कसे मिळवावयाचे हेही ते सुचवतात.

आपल्या मनातला संशय आपला शत्रू आहे व त्याच्यामुळेच आपण ज्ञानाला वंचित होतो. तेव्हा ह्या संशयाचा प्रथम नायनाट कर असे देव अर्जुनाला स्पष्ट बजावत आहेत.

संन्यासाचे खरे स्वरूपही देव या अध्यायात जागोजागी स्पष्ट करीत आहेत. "कर्मफलाचा त्याग कर आणि दृष्टीमध्ये अभेदत्व ठेव". अशी दोन सूत्रे देव पुन्हा एकदा सांगत आहेत.

पूर्णावस्थेस पोहचलेले पुरुष नित्याचे जीवन कसे जगतात त्याचेही वर्णन देवांनी केले आहे. साधकांच्या दृष्टीने तो भाग अत्यंत महत्त्वाचा आहे. क्षणाक्षणाला आत्मस्थितीचे भान ठेवून प्रपंचाकडे अलिप्ततेने पहाणे याचा जसजसा अभ्यास वाढेल तसतसे या अध्यायाचे महत्त्व कळत जाईल.

एरवी शब्द शब्दच रहातील, जे दृष्टांत दिले गेले आहेत ते पूर्णार्थाने अनुभवास येणार नाहीत.

तेव्हा या अध्यायास सुरवात करताना पुन्हा एकदा

**"शब्दाआधी झोंबिजे**
**प्रमेयासी"**

या ज्ञानदेवांच्या इशाऱ्याची आठवण करून व मनात जागृत ठेवून पुढे जाऊया. माउली म्हणतात, "आज श्रवणेंद्रियाला सुकाळ प्राप्त झाला आहे. गीतेसारखे निधान आपल्या दृष्टीस पडले म्हणजे डोळेही धन्य झाले. स्वप्नात जे पाहिले ते सगळे ऐश्वर्य खरेच प्रत्यक्षात मिळावे तसे झाले आहे."

अनुक्रमणिका

विवेकाच्या गोष्टी प्रत्यक्ष कृष्ण परमात्मा सांगत आहेत आणि अर्जुनासारखा भक्तश्रेष्ठ ऐकत आहे. श्रोता आणि वक्ता समसमान तुल्यबल आहेत. श्रीकृष्णाचे विवेचन ज्या ज्या पातळीवर जाते त्या त्या पातळीवर चढण्याची योग्यता अर्जुनाची होती. किंबहुना देव ती योग्यता देत देत विवेचन करीत होते. मोहाने झाकोळून गेलेली अर्जुनाची बुद्धि सामान्य व्यावहारिक पातळीवरही काम करू शकत नव्हती. ती त्या मोहाच्या अंधारातून वर काढून चित्सूर्याच्या आत्मप्रकाशापर्यंत पोचवून तिथे स्थिर करावयाची होती आणि तिथे स्थिर करून पुन्हा व्यावहारिक पातळीवर कर्माचरण करण्यास समर्थ करावयाची होती. भक्तवत्सल सखा भगवंत चारी हाताने पार्थास उचलून घेण्यास उभा होता आणि म्हणून उपदेशाला वेगळाच रंग चढत गेला.

पंचमाला सुगंध मिळावा, एखाद्या वस्तुला गंध व रुचीबरोबर सुरही लाभावा तसे झाले; ह्या कथेला वेगळाच डौल प्राप्त झाला. काय भाग्य श्रोत्यांचे की, त्यांना ही कथा ऐकावयास मिळाली. त्यांची आजवरची सगळी तपे आणि जप श्रवणाच्या मिषाने फलित झाली. अमृताची गंगाच भेटायला आली असे म्हणावे.

देव बोलत होते अर्जुनाशी पण त्या अंध, लोभी धृतराष्ट्राचे भाग्य असे की, ही कथा ऐकणाऱ्या श्रोत्यासारखे तप, जप, ध्यान, तळमळीची प्रार्थना यापैकी काहीही न करता हा अमृताचा ओघ बसल्या जागी त्याच्यावर वर्षाव करीत होता. संजय निदान ह्या संवादाचे लोकोत्तर महत्त्व जाणून तरी आनंदित होत होता पण धृतराष्ट्र, संजय युद्धाची वार्ता सांगेचना म्हणून केवळ नाईलाजाने संजयाचे बोलणे ऐकत होता. पांडवांची वा देवांची स्तुती ह्या बोलण्यातून आलीच तर नाखूष होत होता आणि कंटाळून, “हे तुला कोणी विचारले आहे? कशाला सांगतोस मला, अरे युद्ध कसे चालले आहे, आपल्या पक्षाची सरशी होते आहे ना? हे सांगशील की नाही?” असे बोलत होता. माउली म्हणतात, “श्रोत्यांनी मात्र तसे करू नये. त्यांनी सर्व इंद्रियांना आपआपल्या जागेवरून उठवावे आणि श्रवणाच्या घरी नेऊन बसवावे आणि “गीता” या नावाच्या संवादाचे महासुख भोगावे.”

असो. “ही अतिशयोक्ति राहू दे. ज्ञानदेवा, कृष्णार्जुनाचा संवाद सांगण्यास आरंभ करा”. असे श्रीनिवृत्तिनाथ म्हणाले.

माउलींनी हात जोडून म्हटले, “जी” संजय मग धृतराष्ट्राला म्हणाला, महाराज दैवगुणाचे अधिष्ठानच असलेल्या अर्जुनाशी देव अतिशय प्रेमाने बोलत होते. देवाचेच गुण बहुतांशी अर्जुनाच्या ठिकाणीही वास करीत असल्यामुळे त्या दोघांचे प्रेम निरुपमच होते. इतके की पिता वासुदेव, माता देवकी, भ्राता बळिराम ह्यांनासुद्धा जे गुह्य कधी सांगितले नाही ते आज देव अर्जुनाला सांगत होते. देवी लक्ष्मी देवाची सहधर्मचारिणी पण, तिलाही ह्या प्रेमाचे सुख मिळाले नव्हते. काय सांगावे असे वाटते आहे की, श्रीकृष्णाच्या प्रेमाचे पूर्ण फळ केवळ अर्जुनाच्या काय ते पदरी पडले आहे. सनकादिक या प्रेमाच्या आशेने तपस्या करीत बसलेले आहेत, त्यांना वाटत होते की, आज ना उद्या आपण देवांच्या ह्या प्रेमाला पात्र होऊच. पण त्या आशांना हे यश प्राप्त झाले नाही. अहो, ह्या पार्थाने काय सर्वोत्कृष्ट पुण्य केले असेल की, त्याला हे जगदीश्वराचे सर्वोत्तम प्रेम प्राप्त झाले असेल? त्याने देवांची तशीच एकनिष्ठ सेवा, भक्ति केली होती असे म्हणावे लागते.

ऐकले आहे की, एकदा तो झोपला होता आणि केस खाली लोंबत होते. ते केस उचलून कानाजवळ नेले तर त्यातून कृष्ण, कृष्ण असा ध्वनी ऐकू येत होता. झोपेत जर ही अवस्था तर जागृतावस्थेत नित्य

कृष्णचिंतन चालू असेल तर काय नवल? या एकनिष्ठेला भुलून तर देव अमूर्त अवस्था सोडून व्यक्तावस्थेत आले. एरवी हा भगवंत वेदार्थात मिळत नाही, योग्यांना सापडत नाही, ध्यानाच्या डोळ्यांना दिसत नाही, तो अर्जुनाच्या मात्र मुठीत कसा अडकला आहे पहा. हा अनादि, अचल, त्रैलोक्याच्या पलीकडे असणारा, आपल्या आत्मस्थितीतच रमणारा भगवंत अर्जुनाच्या प्रेमामुळे कृपावंत होऊन लहानसे स्वरूप घेऊन त्याच्याशी सुखसंवाद करतो आहे. त्रैलोक्यपटाची लहानशी घडी करून अर्जुनाला दिसेल अशी त्याच्यासमोर मांडून ठेवतो आहे, धीर देतो आहे, अर्थ समजावून सांगतो आहे, त्याच्या सर्व शंकांचे निवारण करतो आहे.

आपलेही भाग्य थोरच म्हणावयास हवे की, तो संवाद आपण आज ऐकू शकतो. वरचेवर मनात येते अर्जुनापेक्षाही आपण भाग्यवंत आहो! भारतीय युद्धानंतर बरेच दिवसांनी अर्जुनाला एकदा आठवण झाली. तो म्हणाला, "देवा, लढाई सुरू होण्यापूर्वी तुम्ही मला काहीतरी उपदेश केला होता. नक्की काय सांगितले ते मला आठवत नाही, तेव्हा पुन्हा एकदा सांगा ना?"

देव म्हणाले, "अर्जुना, तो बोध मला पुन्हा कसा करता येईल? तुझी आणि माझी त्या क्षणाला जी भावावस्था होती त्या स्थितीतील ते बोलणे होते. तेच मला आज सांगता येणार नाही. पण दुसऱ्या प्रकाराने समजावून देतो."

आपण मात्र त्या काळात प्रवेश करावा असे वाटले की ज्ञानेश्वरी उघडून कुरुक्षेत्रावर जाऊन उभे राहू शकतो. दोन सैन्यांच्या मधे उभा असलेला तो दिव्य रथ, त्यात बसलेले भगवंत आणि खाली उभा असलेला अर्जुन यांचे दर्शन घेऊ शकतो आणि त्यांचा तो गूढ संवाद ऐकू शकतो. खरे म्हणजे धृतराष्ट्राच्या अंधत्त्वाचे आपण ऋणी आहोत. तो अंध म्हणून संजयाची योजना आणि संजय धृतराष्ट्र संवादातूनच तो श्रीकृष्णार्जुनाचा संवाद आपल्यापर्यंत येऊन पोहचला आहे, पोहचतो आहे. कुणाचे ऋण कुणावर कसे होईल हे सांगताच येत नाही!

देव म्हणाले, "अर्जुना, तू प्रेमाचा पुतळा, भक्तीचा जिव्हाळा आणि सख्यत्वाची जिवंत मूर्ति आहेस. तू माझा जिवाचा सखा आहेस. माझ्या प्रेमाचे ठिकाण आहेस. लढाईचा प्रसंग उपदेशाला योग्य नव्हे हे खरे, पण तुझ्या मनात आलेली ही अज्ञानाची छाया पाहून प्रथम ती दूर करायला हवी असे वाटते. तुला काहीतरी उडवाउडवीची उत्तरे देऊन कसा फसवू मी? ह्या गडबडीचा, गोंधळाचा विचारही न करता मी तुला ह्या अक्षय योगाचा उपदेश करतो आहे. हा भोवतालचा गोंगाट सहन करूनही तुझे अज्ञान घालविण्याचे काम प्रथम करणे आवश्यक आहे.

अर्जुना, हा जो निष्काम कर्मयोग आहे तो अनादि काळापासून चालत आला आहे. अनादि आहे म्हणूनच अनंत कालपर्यंत चालेल. फार दिवसांपूर्वी आम्ही हा योग सूर्याला सांगितला. मग त्या विवस्वान रविने ह्यायोगाची साद्यंत माहिती मनूला दिली. मनूने त्याचे अनुष्ठान केले आणि आपला मुलगा इक्ष्वाकु याला तो शिकवला. अशीही या योगाची आद्य परंपरा आहे. हा योग जाणणारे अनेक राजर्षि होऊन गेले.

पण पुढे पुढे प्राणी विषयाच्या नादी लागले. देहावरच त्यांचा जीव जडून गेला आणि आत्मबोधाचा

त्यांना विसर पडला. सध्यातरी अशी स्थिती आहे की, हा योग कोणी जाणतच नाही.

आत्मबोधनाची तळमळ आडमार्गाला लागली. विषयसुखच सुखाची परिसीमा वाटू लागली. प्रपंच प्राणाइतका प्रिय झाला. देहसुखात बुडल्यावर आत्मसुखाची कोणाला किंमत वाटणार आहे? दिगंबरांच्या गावात पैठण्या, पितांबराचे काय कौतुक, जात्यंधाला सूर्य उगवला काय आणि मावळला काय? बहिऱ्यांच्या सभेत गाणे कुणी ऐकायचे? कोल्ह्यांना चंद्रप्रकाशाचे प्रेम काय असणार? चंद्रोदयापूर्वीच जे कावळे आंधळे होतात त्यांना चंद्र कोणता हे कसे काय ओळखणार? वैराग्याच्या शिवेलासुद्धा जे स्पर्श करत नाहीत, कानावर विवेकाचा शब्दही पडू देत नाहीत ते मला ईश्वराला कसे पाहणार? कसे ओळखणार? मग माझ्यापर्यंत येऊन पोहचण्याचे लांबच राहू दे.

कसा कोण जाणे हा मोह इतका वाढला की, मधला बहुतेक वेळ व्यर्थ गेला. ह्या उत्तम योगाच्या ज्ञानाचा सध्या तर पूर्ण लोपच झाला आहे.

पण अर्जुना तुझा मोह पाहून मात्र मला आता असे वाटते आहे की, पूर्वी विवस्वान सूर्याला मी जो उपदेश केला होता तो तुला पुन्हा करावाच. तुला तो सनातन निष्काम कर्मयोग शिकवलाच पाहिजे म्हणजे तुझा मोह नाहीसा होईल, तू ज्ञानी होशील आणि ज्ञानी पुरुष ज्या संन्यस्तवृत्तीने कर्म करतात त्या वृत्तीने तूही करायला लागशील.

अर्जुना तुझी ही व्याकुळ मनःस्थिती मला अगदी पहावत नाही. तुझ्याकडे पाहून माझेच मन व्याकुळ होते आहे. अर्जुना मन आवर आणि ह्या योगाचा उपदेश ऐक.

अर्जुन म्हणाला, "देवा माझे दुःख पाहून तुम्ही कळवळालात यात नवल काय? तुम्ही तर आमची आईच अहा. त्यातून तू कृपानिधी. संसार दुःखानी पोळलेल्यांची तू सावलीच आहेस. अनाथांची माऊली आहेस. तुझ्या कृपेनेच केवळ आमचा जन्म आणि जीवनयात्रा. एखाद्या पांगळ्या मुलाला जन्म द्यावा आणि त्या मुलाच्या आईने जन्मभर खस्ता खाव्या तसेच हे आहे. तुझेच वर्णन तुझ्या तोंडावर कसे करावयाचे? देवा, माझ्यावर रागावू नका हं, पण मला काही विचारायचे आहे तुम्हाला. नीट ऐकून घ्या देवा. माझी शंका वेडेपणाची असली तरी, तुझ्याशिवाय मी ती कुणाला विचारू?

तुम्ही पूर्वीच्या काळातील म्हणून ज्या काही कथा सांगितल्या त्या मला पटल्या नाहीत. तो विवस्वत म्हणजे कोण हे आमच्या वाडवडिलांनासुद्धा ठाऊक नाही, आणि कृष्णा, तू रे कसा त्याला उपदेश केलास? विवस्वत शेकडो वर्षांपूर्वी होऊन गेला असे आम्ही ऐकतो. तू तर देवा आमच्या काळातला. आमच्या बरोबरीचा तू आणि त्या पुरातन विवस्वताला उपदेश कसा केलास? मला तर हे तुझे सांगणे पटतच नाही. हे सगळे बोलणे विसंगत वाटते. पुन्हा वाटते विसंगत तरी कसे म्हणावे? खोटे तरी कसे ठरवायचे? तुझे साद्यंत चरित्र मला ठाऊक तरी कुठे आहे? सूर्याला तू कसा उपदेश केलास ते मला पटेल असे समजावून सांग."

भगवान हसून म्हणाले, "अरे, विवस्वत होता तेव्हा आम्ही नव्हतो असे जे तुला वाटते आहे ना तेच खरे

नाही. तुझ्या मनाला ती भ्रान्ति आहे. तुला आठवत नाही पण तुझे आणि माझे अनेक जन्म होऊन गेले. तुला आठवत नसले तरी मी ज्या ज्या वेळी जे जे व्यक्त रूप घेऊन आलो ते ते मला आठवते.

अर्जुना, जेव्हा जेव्हा अधर्म धर्माचा पराभव करतो तेव्हा तेव्हा भक्तांच्या कैवारासाठी मला अवतार घ्यावा लागतो, व्यक्त रूप घ्यावे लागते. हे व्यक्त रूप घेतले तरी माझ्या अव्यक्त रूपापासून मी च्युत होतच नाही म्हणून मला माझे जन्म आठवतात, त्या जन्मातले कर्म आठवते.

मी जन्मरहित असूनही जेवढे म्हणून धर्म आहेत तेवढ्यांचे रक्षण करावे असा सहाजिक चालत आलेला आद्यक्रम असल्याने मी प्रकृतिचा स्वीकार करतो आणि जन्म घेतो. तुला शंका येईल की, माझ्या मूळ अविनाशी स्वरूपात काही ढवळाढवळ, फरक होतो की काय? तर तसे काहीच होत नाही. माझी स्वतंत्रता मोडत नाही. मी जन्माला येतो-जातो, ते केवळ प्रतिबिंबभावाने. मायेचा स्वीकार केल्याने माझ्याच ठिकाणी हे अवतार घेणे, संपविणे ह्या क्रिया भासतात एवढेच. आरशात बिंबाची प्रतिमा दिसते म्हणजे काय मूळ वस्तू एकाच्या दोन होतात? आरशात फक्त प्रतिबिंब दिसते त्याप्रमाणे मी निराकार मायेचा स्वीकार करून कार्यासाठी साकार होतो. सगुणरूपाचेच निरनिराळे वेष धारण करतो. भक्तकैवार आणि दुष्टसंहार हे दोन हेतू धरून मी अवतार घेतो. अधर्माची हद्द तोडून काढतो, अधर्माकडून दोषांना मिळालेल्या सनदा फाडून टाकतो. सज्जनांच्या हातून सुखाची गुढी उभी करतो. दैत्यांचा समूळ उच्छाद करतो. सज्जनांची गेलेली प्रतिष्ठा पुन्हा प्रस्थापित करतो. धर्म आणि नीति यांचे ऐक्य घडवितो. अविवेकाची काजळी झाडून विवेकाचा दिवा पाजळतो. एका दिव्यावर दुसरे दिवे लागत लागत योग्यांना जणु काय दिवाळीचा निरंतर योग येतो. आत्मसुखाने विश्व भरून जाते. एक धर्मच जगात स्थिर होतो आणि भक्तांना सात्विकाची पुष्टी येते. माझी मूर्ती प्रगट झाल्याबरोबर पापाचे डोंगरच्या डोंगर भस्मसात् होतात. पुण्याची पहाट उजळते.

या कामासाठी मी युगायुगात अवतार घेतो याची विवेकी लोकांना ओळख पटते. माझे अजत्व कायम ठेवून मी जन्माला येतो, अक्रियत्वास धक्का न लावता क्रिया करतो आणि हे रहस्य ज्याला कळले तो पुरुष परम मुक्त आहे हे ओळख.

असा मुक्त पुरुष माझ्या अशा विलक्षण स्वरूपाचे चिंतन करीत माझ्याच सारखा होतो. व्यवहारात वावरतो, पण त्याला व्यवहाराचा संग बाधक होत नाही. तो माझ्याच सारखा, देहधारी असून देहात गुंतत नाही. देहधारी असतानाच माझ्या स्वरूपाशी एकरूप झालेला असतो, मग देह सोडल्याक्षणी माझ्या स्वरूपाशी एकरूप होऊन जातो हे सांगायलाच नको.

माझे अवतारकार्य आणि खरे स्वरूप ओळखणारे हे पुरुष सहजच कामनारहित होऊन जातात. व्यवहारात स्वतःच्या वा दुसऱ्याच्या दुःखाबद्दल खेद करीत नाहीत. काम नाहीसा झाला असल्याने त्यांना क्रोध येत नाही. क्रोधाची वाटही त्यांना माहीत नसते. त्यांनी विषय जिंकलेले असतात. माझ्या भावनेने ते संपन्न असतात. माझ्या सेवेसाठी ते जगतात आणि आत्मबोधाने संतुष्ट झालेले असतात. ते तपाच्या, तेजाच्या राशीच असतात. ज्ञानाचे आश्रयस्थान असतात. त्यांच्यामुळे तीर्थांना पवित्रता येते. पातकी माणसांची पापे धुवून धुवून अपवित्र झालेली तीर्थे असे भक्त आपल्याकडे कधी येतील आणि आपल्याला पुन्हा पवित्र करतील अशी वाट

पहात असतात. माझ्याबद्दलच्या भावाने भरून गेलेले हे सज्जन मीच होऊन रहातात, त्यांच्यात आणि माझ्यात काही आडपडदाच उरत नाही. पितळेचा काळिमा, कळक दोन्ही नाहीसे झाले की, त्याची झळाळी सोन्यासारखी होते. यमनियमांच्या परीक्षेत उतरलेले आणि तप व ज्ञान यांनी पवित्र झालेले माझे भक्त माझ्या पदवीलाच येऊन पोहचतात यात काय आश्चर्य? काय संशय?

काही भक्त माझ्या त्या मूळ अव्यक्त रूपाकडे न पहाता माझ्या व्यक्त रूपाला श्रेष्ठतम मानतात. फार प्रेमाने माझी त्या स्वरूपात भक्ति करतात. मग मीही त्यांना त्या स्वरूपात पावतो आणि मग असे करीत करीत अभेद भक्तिपर्यंत हसत खेळत आणतो."

हे देवांचे विवेचन ऐकताना पंढरीच्या नरहरी सोनाराची आठवण येते. नरहरी कट्टर शिवभक्त! त्यामुळे पंढरपुरात राहूनही पांडुरंगाचे दर्शन त्याने घेतले नव्हते. अत्यंत कसबी सोनार असल्याने पांडुरंगास दागिने घडविण्याची कुणा भक्तास इच्छा झाली की तो नरहरी सोनाराकडे धाव घ्यावयाचा. एकदा एका परगावच्या भक्तास पांडुरंगाला कडदोरा वहाण्याची इच्छा झाली. नरहरीबुवा म्हणाले, "पांडुरंगाच्या कमरेचे माप आणून द्या. उत्तम कडदोरा घडवून देतो." भक्त देवळात गेला, माप आणून दिले आणि नरहरीने उत्तम बेतशीर कडदोरा घडवून दिला. पांडुरंगाच्या कमरेस घातला तर फारच सैल झाला. नरहरीने पुन्हा माप आणवले पुन्हा दुसरा कडदोरा घडविला तर तो फारच घट्ट झाला. सोनार म्हणे, "तुम्ही माप बरोबर आणतच नाही." भक्त म्हणाला, "तुम्हीच देवळात चला आणि माप घ्या बरं." सोनाराची पंचाईत झाली. माप घ्यायचे म्हणजे दर्शन घ्यायला हवे, आपण तर कट्टर शिवभक्त आणि विष्णूचे दर्शन कसे घ्यायचे? मग तोड निघाली की डोळे बांधून देवळात जावे आणि नरहरीने स्वतःच माप घ्यावे. डोळे बांधून नरहरीस गाभाऱ्यात नेऊन माप घेण्यास उभे केले. माप घ्यावयास जातो तो हाताला पिंडी लागते आहे. आपलेच दैवत समोर आहे म्हटल्यावर त्याचे झटकन पट्टी सोडली तर पांडुरंग उभा. पुन्हा घाईने पट्टी बांधून माप घेतो आहे तो शिवाची पिंडी. मग मात्र त्याला देवाची लीला समजून चुकली. नरहरी सोनाराने पट्टी काढून फेकून दिली आणि त्या भुवन सुंदराच्या पायाला मिठी मारली! आपण सामान्य भक्त शैव, वैष्णव, गाणपत्य, देवीभक्त असे भेद करून देवाची भक्ति एका बाजूसच ठेवतो आणि एकमेकाशी तंटा करून कुणाचे दैवत श्रेष्ठ हे ठरविण्याच्या अट्टाहासात आत्मघात करून घेतो.

देव सांगत आहेत ज्ञान नसल्यामुळे हा अनर्थ होतो. अज्ञानाने भेदाची कल्पना मनात येते आणि देवाच्या स्वरूपात भक्त अनेकत्व मानू लागतात. भेदातीत देवामध्ये भेद भासू लागला की, त्या नामातीताला निरनिराळी नामे भक्त योजू लागतात. एका स्वरूपाला देव, दुसऱ्याला देवी म्हणतात.

सप्तशतीसंबंधी एक कथा प्रचलित आहे. एक पाठक, "नमस्तस्मै नमस्तस्मै" असे म्हणत असे. ऐकणारा दुसरा पाठक म्हणाला "नमस्कार देवीला आहे. तुम्ही नमस्तस्मै कसे म्हणता? अहो, नमस्तस्यै म्हणायला हवे." सप्तशती अनुष्ठान करणाऱ्याने देवीची क्षमा मागितली आणि नमस्तस्यै म्हणायला सुरवात केली. देवी त्या दुसऱ्या पाठकाच्या स्वप्नात जाऊन म्हणाली, "तुला हा उपदेश करण्याचा उपद्व्याप करण्याचे कारण काय? पुरुष हे माझे स्वरूप नाही की काय? त्याला जसे म्हणायचे असेल तसे म्हणू दे."

उजाडताच तो पाठकाकडे गेला आणि म्हणाला, "तुम्ही म्हणता तेच देवीला आवडते आहे. तुम्ही

म्हणत होता तसेच म्हणा.” देव आणि देवी असा सुद्धा भेद करणे चुकीचे आहे हे यावरून कळते आहे. देव म्हणतात, “या अज्ञानी भक्तांची भेदबुद्धि देव आणि देवी असा भेद करूनही थांबत नाही. जे सगळीकडे सारखेच परिपूर्ण भरलेले ब्रह्म आहे त्यांच्यात विभाग पाडतातच, पण त्या भागास भेदबुद्धीच्या घोटाळ्यामुळे उच्च नीच असेही म्हणू लागतात. मग नाना हेतु मनात धरून त्यांना उचितशा उपचारांची कल्पना करतात. वेगवेगळ्या देवता, वेगवेगळ्या उपासना आणि वेगवेगळ्या फळाची याचना करतात. जे जे फळ मिळावे अशी प्रार्थना करतात. ते ते फळ त्यांना मिळते. पण अर्जुना तू ध्यानात ठेव की, फळ ती दैवते देत नाहीत, मी देतो.

कुठल्याही स्वरूपाची कल्पना करून केलेली उपासना मलाच पोचते. एरवी लक्षात घे की, पूजा स्वीकारणारा आणि पूजेचे फल देणारा दुसरा आहेच कोण? जे कर्म ते करतात त्याचे त्यांना फळ मिळते. कर्माचे फळ या स्वरूपात त्यांची कामना पूर्ण होते.

एक विनोदी गोष्ट आठवते. दोन शेजारी तपश्चर्या करीत होते. त्यांचे आपसात वैर होते. शामराव, रामराव असे हे दोन गृहस्थ दुसऱ्यावर मात करावयाची म्हणून अगदी ईर्षेने तपश्चर्या करीत होते आणि ती उत्तमही चालली होती. देव प्रसन्न झाले. रामरावांना म्हणाले, “मी तुम्हा दोघांवर प्रसन्न झालो आहे. काय हवे ते मागून घ्या.”

शामराव म्हणाले, “देवा, शेजारचे रामराव जे मागतील त्याच्या दुप्पट मला द्या. देव म्हणाले, “तथास्तु.”

मग गेले रामरावाकडे. रामराव देवांना म्हणाले, “देवा शामरावानी काय मागितले?” देव म्हणाले, “तुम्ही जे मागाल त्याच्या दुप्पट त्यांना द्यायचे आहे. त्यांनी तसेच मागितले आहे.”

शामराव म्हणाले, “ठीक आहे. मला एका डोळ्याने आंधळा करा आणि माझ्या घरात प्रत्येक खोलीत एकेक विहीर तयार होऊ दे.” झाले! देवांनी दोघांच्या मागण्या पूर्ण केल्या! शामराव एका डोळ्यानी आंधळे झाले, एकेका खोलीत एकेक विहीर तयार झाली पण मनातून अगदी आनंदात होते. मनाशी म्हणत होते. “माझ्या दुप्पट मागतो काय? आपमतलबी कुठला, छान खोड जिरली. बस म्हणावे. दोन्ही डोळ्यांनी आंधळा आणि प्रत्येक खोलीत दोन विहिरी, काय मजा झाली.”

असे हे अजब मागणे!

देव म्हणाले, “शेतामध्ये जे पेरावे तेच उगवणार. आरशात ज्याचे प्रतिबिंब पडेल तेच दिसणार. कड्यासमोर उभे राहून मोठ्याने हाक मारली, बोलले, तर तेच शब्द प्रतिध्वनि होऊन आपल्याला ऐकू येणार, त्याचप्रमाणे कुठल्याही देवतेच्या स्वरूपाची उपासना केली तरी त्या सर्व उपासनांचा साक्षी मीच आहे. आणि उपासनेचे फल म्हणजे उपासकाची फलरूप झालेली भावना असते हे ध्यानात घे. देणारा वा घेणारा दुसरा कोणीही नाही, तू स्वतःच आहेस. ती उपासना होत असताना मी फक्त साक्षी आहे.

ही जी उपासना उपासक करतात ती त्यांच्या त्यांच्या ठिकाणी असलेल्या प्राकृतिक गुणाप्रमाणे करतात. किंबहुना त्या गुणाप्रमाणेच त्यांच्या जीवनाची घडण ठरते, होत जाते, फलित होते.

ज्याच्या ठिकाणी ज्या गुणाचे न्यूनाधिक्य असेल, त्या गुणाप्रमाणे त्याचे कर्म घडते. “तुझ्या ठिकाणी जो जो गुण ज्या ज्या प्रमाणात असेल त्या त्या प्रमाणे हे कर्म तू करावेस” येवढेच मी ठरवतो. त्याला पुढे वर्ण वा जाती हे नाव मिळाले येवढेच. ह्या जातींचा मी कर्ता नव्हे.

मूळ मनुष्यप्राणी इथून तिथून सारखाच, एकच, तो काही अमुक जातीचा नव्हे. पण त्याच्या प्राकृतिक गुणाप्रमाणे एक असूनही कर्मात मात्र अनेक प्रकार होतात. कर्मभेदाने मनुष्यत्त्वात काहीच फरक होत नाही. गुणभेदामुळे कर्मभेद व कर्मभेदामुळे जाती हा क्रम जाणून घेतल्यामुळे जातिभेदाचे कर्तृत्त्व मुमुक्षु माझ्याकडे देत नाहीत. आपल्या वाट्यास आलेले कर्म निष्काम बुद्धिने व अलिप्त वृत्तीने करत रहातात. भाजलेली बीजे काही झाले तरी जशी उगवून येत नाहीत तशी या युक्तीने केलेली कर्मे त्या मुमुक्षूंना बंधनकारक होत नाहीत, उलट मोक्षाला कारण होतात.

अर्जुना, तुला वाटेल ज्या कर्माची मी एवढी प्रशस्ती करतो, विवरण करतो, महत्त्व सांगतो ते कर्म म्हणजे आहे तरी काय? कर्म कशाला म्हणायचे, अकर्म कशाला म्हणायचे? पार्था, तुझ्या मनात हा गोंधळ झाला तर काहीच नवल नाही. दूरदर्शी पुरुषसुद्धा या कर्माच्या विचाराने गोंधळून जातात. खोटे नाणे हुबेहूब खऱ्यासारखे दिसते, डोळ्याचे पहाणे संशयात पाडते. करुणा उत्तम खरी पण क्षत्रियकर्म करताना मनात अचानक उद्भवणारी ही करुणा दोषास्पद आहे. क्षात्रकर्माचे भय उत्पन्न झाल्यामुळे तू जर ह्या करुणेच्या पाठीमागे लपलास तर ते पलायन विपरीत कर्म होईल, बंधक होईल. मी आता नैष्कर्म्याची कास धरली आहे असेही कदाचित तू क्षणभर म्हणशील. नैष्कर्म्यसिद्धीने मोक्ष मिळतो असेही कदाचित मला शिकवशील पण अर्जुना, कर्माचा विचार असा सोपा नव्हे, तो फार गहन आहे. ज्या प्राप्त पुरुषांना मनाने दुसरी सृष्टि उत्पन्न करण्याचे सामर्थ्य आहे ते देखील मला नैष्कर्म्य साधले असे म्हणत म्हणत कर्माच्या जाळ्यात सापडतात. मग मूर्खांची गोष्ट काय सांगावी?

कर्मातून सुटण्यासाठी आधी कर्माचे स्वरूप नीट समजावून घेणे जरूर आहे.

अर्जुना, हे बघ कर्म म्हणजे हे विश्व आकाराला येते ती क्रिया. ही का घडली याचे कारण सांगता येत नाही. विश्व का आकाराला येते याचे कारण जसे सांगता येत नाही तसेच आपण जन्मालाच का येतो याचे आद्यकारण सांगता येत नाही. तेव्हा आपण जन्माला येतो हे गृहीत धरून कर्माचा आकारबंध पाहूया.

पार्था, वर्णाश्रमाला जे उचित ते आपले विहित कर्म वेदाज्ञेला अनुसरून ज्या वर्णात जन्म आला व ज्या आश्रमात सध्याचे जीवन चालू आहे त्या त्या प्रमाणे विहित कर्म ठरते. वर्ण चार, आश्रमही चार. या पटावर आपली सोंगटी सध्या कुठे आहे हे पहाणे आवश्यक आहे आणि असा विचार झाला की, कर्म व अकर्म याचा गोंधळ मनातून जाईल. समज क्षत्रिय जन्माने आहे पण त्याचा ब्रह्मचर्याश्रम चालू आहे. तर त्याला आश्रमातील खडतर जीवन, अभ्यास, सेवाधर्म, करुणा, आज्ञापालन, नम्रता हे सर्व योग्य. त्याच्या पूर्ण मालकीचे असले तरी

राजभोग पूर्णतया वर्ज्य, महत्त्वाकांक्षा वर्ज्य, हुकमत वर्ज्य, आता हा क्षत्रिय आश्रमात राहून शस्त्रास्त्र विद्येत प्रवीण, राजधर्मात पारंगत झाला की, पृथ्वीपति होतो. मग त्याचे भोग, त्याचे मनोधर्म, त्याची कर्तव्ये बदलतात नव्हे, बदललीच पाहिजेत. बरे हेही त्या राजाचे शाश्वत आचारधर्म नव्हेत. त्याचा मुलगा राज्यभार घेण्याइतका मोठा झाला की, लगेच राजाने सिंहासनावरून उतरून आपल्या हाताने मुलाला राज्याभिषेक करून वनाची वाट चालू लागावयाची. कधी सल्ला विचारावासा वाटला तर नव्या राजाने अरण्यात येऊन पित्याला विचारावा, त्या अरण्यवासी अनुभवी पित्याने तो द्यावा. वनवासात ऋषिमुनींच्या सहवासात निवृत्त राजाने आता अध्यात्मशास्त्राचे अध्ययन मुनिवृत्तीने राहून करावे आणि शेवटी योगमार्गाने देहत्याग करावा. अर्जुना, या सर्व जीवनात किती वेगवेगळ्या प्रकाराने त्या क्षत्रियास जगावे लागते बघ. ब्रह्मचर्याश्रमातील विहित कर्म, गृहस्थाश्रमामध्ये निषिद्धकर्म ठरते. तेव्हा कर्माचे स्वरूप आपल्या जीवनातील कालखंड लक्षात घेऊन मोठ्या चातुर्याने ठरवावे लागते. जगच कर्माधीन आहे त्यामुळे त्याचा विस्तार दुर्बोध आहे, तरी कर्माचे स्वरूप ग्रंथांतून, आप्तवचनातून, गुरुमुखातून जाणून घेता येते. मग आपल्याला निर्णय घेता येतो की, सध्या हे कर्म विहित आणि हे कर्म निषिद्ध.

तू म्हणशील की, फारच मोठा घोटाळा आहे. अशा विविध कर्मांतून पार पडताना जीवाची किती त्रेधा उडेल? एका प्रकारच्या कर्माची सवय होते न होते तोवर ते निषिद्ध ठरणार. सर्व जीवनभर अशी उलथापालथ होत राहिली तर किती अडचणी निर्माण होतील?

तर ह्या अडचणीतून ज्ञानी पुरुषांनी एक फार चांगला मार्ग शोधून ठेवला आहे व स्वतः आचरण करून तशी रीतच घालून दिली आहे. ते म्हणतात, "कर्म चालू असतानाच हे कर्म मी करीत नाही" हे अवधान ठेवण्याचा अभ्यास करावा. आता आपण कर्मच केले नाही असे जो जाणतो तो कर्माच्या फलाची आशा ठेवीत नाही हे ओघानेच आले. ज्या ज्या वेळी जे जे कर्म समोर येईल ते ते तो "कर्तव्य" ह्या बुद्धीने करत राहतो. त्यामुळे त्याला खरे नैष्कर्म्य म्हणजे काय ह्याचा उत्तम बोध होतो. मात्र हे नैष्कर्म्य हळूहळू अंगी बाणते आणि त्यामुळे त्या पुरुषाची बाह्य क्रिया सामान्य व्यावहारिकासारखीच वाटते. इतरांपेक्षा काही वेगळी दिसत नाही. फक्त त्याची क्रिया नेहमी उत्तम असते. उत्तम ब्रह्मचारी, उत्तम राजा, उत्तम वानप्रस्थी व उत्तम संन्यासी एवढेच त्याचे प्रगट रूप असते खरे पण तो मनातून कुठल्याही आश्रमात, कुठल्याही क्रियेत गुंतलेला असत नाही. पाण्याच्या काठाशी उभा असलेला मनुष्य आपले प्रतिबिंब पाहतो, ह्या प्रतिबिंबाहून निःशंकपणे मी वेगळा आहे हे जाणतो त्याप्रमाणे निष्काम कर्म करणारा तो पुरुष मी काहीही कर्म करत नाही हे जाणतो. नावेतून जाणारा तीरावरची झाडे झपाट्याने मागे जाताना पाहतो. पण विचार करून मनाशी म्हणतो की, झाडे स्थिरच आहेत ती मागे जातात हा भास आहे. तसे स्वतःचे कर्मात असून नसणे आहे हे तो समजून असतो. उदय आणि अस्त झाला म्हणजे सूर्य एका दिशेकडून दुसऱ्या दिशेला चालत गेला हे जसे खोटे तसे आपले कर्मात असणेही खोटे हे त्याला कळते. म्हणून समोर आलेल्या कर्माचा खेद मानावा किंवा संकल्पपूर्वक मी हे सिद्धीला नेईनच नेईन असे म्हणावे हे चुकूनही त्याच्या हातून घडेनासे होते. "करीन" हाच मुळी संकल्प नाही मग घडले नाही याचा खेद कुठला? आणि घडल्यावर फल मिळण्याची अपेक्षा वा आनंद तरी कुठला? अरे अर्जुना, तो शरिराच्या बाबतीत देखील उदास असतो. त्याला त्या शरीरसुखाची अपेक्षाच नसते. शरिराचे भान नसल्यामुळे त्याला द्वैत वाटत नाही. त्यामुळे मत्सरभावना त्याच्या मनात संभवतही नाही. त्याने हे सर्व विश्व पाहिले असेल असे नव्हे पण ते पाहिले असल्यासारखा त्या विश्वाशी तो एकरूप झालेला असतो. न करताच त्याने सर्व केल्यासारखे

होते. न भोगताच भोगल्याप्रमाणे होते. तो एका ठिकाणी बसलेला असला तरी सगळीकडे फिरून आल्यासारखा असतो. थोडक्यात तो स्वतः विश्वरूपच होऊन जातो. संतोषाच्या गाभाऱ्यात आत्मबोधाच्या पक्वान्नाला तो कधी नको म्हणत नाही. कारण अहंभाव व आशा यांची त्याने कुरवंडी करून टाकलेली असते. केवळ महासुखाची आवड त्याच्या ठिकाणी वाढत जाते. मग काय? “आपले आणि परावे” ही भेदबुद्धी नाहीशी झाल्याने जे जे समोर येईल त्याने त्याने तो सुखावत जातो. जे दृष्टीस पडेल ते तो स्वतःच होऊन जातो.

जे. कृष्णमूर्तीच्या आयुष्यातला एक अनुभव त्यांनी लिहून ठेवला आहे. ते लिहितात. “विश्वाशी एकरूप होण्याचा अभ्यास करीत असताना मी गवताच्या पात्याशी एकरूप झालो. त्या पात्यातून वर चढणारा रस मला माझ्या ठिकाणी स्पष्ट जाणवू लागला. सूर्यप्रकाशाचा स्पर्श मला कळू लागला. मग मी खाली नजर टाकली. एक मोटार घाट चढून येत होती. मी तिच्याशी एकरूप झालो. इतका की, गाडीच्या टायरवर येणारा दाब मला जाणवू लागला.”

आपली जाणीव त्या वैश्विक जाणिवेशी मिसळून टाकून त्या अमर्याद स्वरूपात आपले मर्यादित रूप विरवून टाकण्याची प्रक्रिया ज्ञानदेवानी

**“तो दिठी पाहे,**
**ते आपणचि होऊनि जाये”**

अशा देखण्या मराठीतून व्यक्त केली आहे. देव सांगत आहेत, त्याचे ऐकणे, चालणे, बोलणे किंबहुना सर्वच क्रिया ह्या वैश्विक जाणिवेतून घडत असतात. त्यामुळे हे माझे ऐकणे, माझे चालणे, माझे बोलणे, माझे पाहणे हा भावच नाहीसा होतो. मीच विश्व, विश्व मीच, या जाणिवेतून त्याचे कर्म चालते. ज्ञानाग्निच्या मुखामध्ये तो अशी सर्व कर्मांची आहुती देतच जगत असतो. बाधा करण्यासाठी, बंधक होण्यासाठी तो कर्म उरूच देत नाही. सर्व प्रकारे तो असा कर्मातून मुक्त होतो. कर्म करून कर्मातीत, सगुण असून गुणातीत अशा अवस्थेत तो जगतो. अर्जुना, मनुष्य वेषात ते ब्रह्मच वावरते आहे असे समज, निःशंकपणे समज.

देहसंग असला तरी तो चैतन्यरूपच असतो. परब्रह्माइतकाच तो शुद्ध असतो. अविनाश बुद्धिने कर्म आणि ब्रह्म याची ऐक्यता तो जाणतो आणि कर्म करता करता ब्रह्माचीच उपासना करतो. हे सर्व कर्म मग सहज नैष्कर्म्यावस्थेला जाऊन पोचते.

अर्जुना, कर्म करता करता नैष्कर्म्य साधण्याची ही युक्ती अशी आहे. कर्मसंन्यास हा असा घडला तरच घडला म्हणता येतो. लक्षात आले ना पार्था, नैष्कर्म्य बाह्य त्यागावर अवलंबून नाहीच. ज्या वृत्तीतून कर्म केले जाते त्या वृत्तीवर अवलंबून आहे. हे नैष्कर्म्य घडण्यासाठी आपल्या अंतर्वृत्तीवर अखंड जागता पहारा पाहिजे.

मी तुला आता यज्ञाचे काही प्रकार सांगणार आहे आणि मग म्हणणार आहे की पार्था, ज्ञानयज्ञाची सर या दुसऱ्या कुठल्याही यज्ञाला येत नाही आणि हे ज्ञान म्हणजेच संन्यस्तवृत्तीने विहित कर्म करणे हे होय.

अनुक्रमणिका

आता जन्माला येऊन विरक्ति ज्यांना कधीच माळ घालत नाही, त्यांच्या हातून संयमाग्निची सेवा घडणार नाही हे उघडच आहे. योग वा यज्ञ या क्रिया घडत नाहीत. अशा अविवेकी लोकांची प्रपंचयात्राही धड पार पडत, नाही मग परलोकाची गोष्ट काय विचारतोस?

पण काहींना योग वा यज्ञ करावा अशी इच्छा होते. वेदांनी असे अनेक प्रकारचे यज्ञ सांगून ठेवले आहेत. द्रव्ययज्ञ असे एका प्रकारच्या यज्ञाचे नाव आहे. देवयज्ञामध्ये याज्ञिक, अविवेक ही बाल्यावस्था टाकून देतात, विरक्तिशी विवाह करतात आणि योगाग्निची उपासना करण्यात अहोरात्र गढलेले असतात. देहाचे भरणपोषण दैव करीत असते असा त्यांचा पूर्ण निश्चय झालेला असतो व ते देहरक्षणाची मुळीच काळजी करीत नाहीत. गुरूवाक्यरूपी अग्निमध्ये मनासह ते अज्ञानाची आहुती देत असतात. या अशा गुरूवाक्यावर भरवसा ठेवून जे मनाची आहुती देतात आणि देहभरणाची चिंता दैवावर सोपवतात असे लोक दैवयज्ञ करणारे महायोगी समजावे.

सिद्ध चरित्रात कथा आहे की, एकदा गुंडामहाराज मैलारास निघाले होते. वाटेत त्यांना पीर बाच्छा नावाचे अवलिया भेटले. त्यांनी केलेले अभिवादन गुंडामहाराजांनी पाहिले नाही, ते तसेच पुढे गेले. ध्यानाला बसल्यावर तो फकीरच समोर दिसू लागला. शिष्याला जेव्हा त्यांनी हे सांगितले तेव्हा शिष्याने सांगितले की, मैलारास येताना असा प्रकार झाला. गुंडामहाराजांचा उपदेश घेण्याची फकिराची इच्छा होती पण ती पुरी झाली नाही. इतकेच काय पण गुंडामहाराजांनी आपल्याकडे पाहिलेही नाही याचे फकिरास फार दुःख झाले.

पुढे एकदा फकीर सर्व व्यापाऱ्यांना म्हणाला, “मला अन्नछत्र अन्नाचे व पैशाचे घालायचे आहे. कोण पैसे देणार बोला! फेडीचा तगादा लावायचा नाही.” कोणीच व्यापारी असा पैसा देण्यास तयार होईनात. मल्लाप्पा नावाचा व्यापारी मात्र विचार करू लागला. पत्नीला त्याने विचारले. “आपल्याला मूलबाळ काही नाही. आपल्यामागे ही सगळी संपत्ती सरकारजमा होणार. त्यापेक्षा या अवलियाच्या हाती देऊ या का? करू दे त्याला मनाजोगा दानधर्म.”

पत्नी पण उदार होती. ती म्हणाली, “माझेही मत तसेच.”

मल्लाप्पाने सर्व संपत्ती अवलियाच्या स्वाधीन करून देव सांगत आहेत त्या प्रकारचा दैवयज्ञ केला. मनात आपल्याला पुण्य लाभावे ही कामना नव्हती. मनात हेतू एवढाच की, अवलियाची इच्छा दानधर्म करण्याची आहे ती पुरी व्हावी. अवलियाने द्रव्ययज्ञ सुरू केला. संपत्ती कधीच संपून गेली. मग अवलियाने मल्लाप्पास बोलावले आणि दोनशे रुपये दिले आणि सांगितले, “यातून थोडा थोडा खर्च कर. एकदम खर्च करून टाकू नकोस. दोनशे रुपये सांभाळून ठेव.” पण ही रक्कम मल्लाप्पाच्या घरापर्यंतसुद्धा पोचली नाही. वाटेतच मेहुण्याला सरकारी कर्जातून सोडविण्यासाठी मल्लाप्पास दंड भरावा लागला. फकिरास हे लगेच कळले. तो मल्लाप्पास भेटून म्हणाला, “अरे, हे तू काय केलेस? तुझे ऋण फेडावे म्हणून अक्षय टिकणारे दोनशे रुपये तुला दिले तर तेही तू देऊन टाकलेस? आता तुझ्या पोटी पुत्र म्हणून जन्माला येऊनच तुझे ऋण मला फेडणे भाग आहे. आता इतकेच कर की, तुला मुलगा झाला की, त्याला गुंडामहाराजांच्या पायावर नेऊन घाल.”

असे सांगून फकिराने देहत्याग केला. पुढे यथाकाल मल्लाप्पास मुलगा झाला. फकिरास कबूल केल्याप्रमाणे मल्लाप्पाने मुलास गुंडामहाराजांच्या पायावर घातले. महाराजांनी त्याचे नाव वीराप्पा ठेवून शिष्य म्हणून त्याचा स्वीकार केला. फकिराचे काम याप्रकारे पूर्ण झाले. मल्लाप्पास पुत्रलाभ व फकिरास गुरुपदेश लाभ या द्रव्ययज्ञाने झाला. तसेच गुरूवाक्यावर पूर्ण भरंवसा ठेवून आपल्या चरितार्थाची काळजी दैवावर सोपविण्याची मल्लाप्पाची तयारी पाहून दैवयज्ञ म्हणजे काय हेही ध्यानी येते.

पूज्य गोंदवलेकरमहाराजांच्या चरित्रात एक प्रसंग आहे. त्यांच्या मातुश्री म्हणत, "काशीला जायचे आहे. पण घराची काळजी वाटते. इतके सामानसुमान आहे, उघडे टाकून कसे जावे?" महाराजांनी दोनतीनदा हे ऐकले आणि विचारले, "आई, सामानसुमानाची काळजी संपली तर जायचे का मग काशीला?" आई म्हणाल्या, "हो, बाबा गणू, मला फक्त ह्या सामानाचीच काळजी आहे." महाराजांनी लगेच गोंदवल्यात जाहीर केले की, आमच्या घरातून ज्याला जे सामान हवे असेल ते त्याने घेऊन जावे.

पंधरा मिनिटात घर लख्ख झाले! महाराज म्हणाले, "आई, संपली ना सामानाची काळजी? जायचे ना आता काशीला?"

असे म्हणता येते आहे की, महाराजांनी द्रव्ययज्ञ आणि दैवयज्ञ दोन्ही एकत्र साधून घेतले.

देव म्हणत आहेत, "यज्ञाचा आणखी एक प्रकार असा की, ते लोक ध्यान धारणा समाधिरूप संयम हाच अग्नि पेटवतात. जालंदर, उड्डियान व मूलबंध ह्या बंधत्रयरूपी मंत्राचा उच्चार करतात आणि त्यात पवित्र केलेल्या इंद्रिय द्रव्याची आहुती देतात.

कित्येकजण वैराग्यरूपी सूर्य उगवल्याबरोबर संयमरूपी कुंड बांधतात. इंद्रियरूपी अग्नि पेटवतात. त्या अग्नीतून वैराग्यरूपी ज्वाळा निघते. त्यांच्या चित्तात असलेली वैराग्याची ठिणगी अशी इंद्रियाद्वारा प्रगट होते. त्यात काम क्रोधाची लाकडे धडाडून पेटून उठतात. प्रथम निघणारा आशारूप धूर निघून गेल्यावर वेदातील विधिवाक्याला धरून विषयरूप आहुती त्यात देतात. यज्ञ पुरा होतो आणि त्या लोकांच्या ठिकाणी असलेल्या दोषांचे क्षालन होऊन त्यांना आत्मसुखाची प्राप्ती होते.

काहीजण हृदयाची अरणी करून विवेकाचा मंथा करतात. तो मंथा शांतीने बळकट धरतात. धैर्याने दाबून गुरूवाक्यरूपी दोराने ओढतात. समरसतेने मंथन केले की त्याचा ताबडतोब प्रभाव पडून ज्ञानाग्नि प्रगट होतो. ऋद्धिसिद्धिचा धूर निघून जातो, ज्ञानाचा तेजस्वी स्फुल्लिंग रहातो. यमदमांनी तापवून ठेवलेले मोकळे मन या ठिणगीवर अलगत ठेवत गेले की, अग्नि पेटू लागतो. नाना प्रकारच्या वासनारूपी समिधा आसक्तिरूपी तुपात भिजवून ह्या प्रदीप्त अग्निला अर्पण केल्या जातात. या यज्ञात आहुतीचा मंत्र असतो "सोऽहं."

इंद्रियांची सर्व कर्मे "मी ब्रह्म आहे" या भावातून केली जातात. त्याच आहुती होतात. हा "सोऽहं" मंत्र प्राणक्रियेशी संलग्न असतो. प्रत्येक श्वास निःश्वास या "मी ब्रह्म आहे" या वृत्तीने होऊ लागतो. प्राणाची

जाणेयेणे ही क्रियाच स्त्रुवा होऊन ज्ञानाग्नीमध्ये ऐक्यबोधाची पूर्णाहुति पडते. श्वास आणि निःश्वास यांच्याबरोबर चाललेला साधकाचा जप, श्वासाचाही हात सोडून देऊन ब्रह्मभावावर आरूढ होतो. उरलेसुरले इंद्रियांचे हवनद्रव्य अग्नित पडून आत्मबोध हा पुरोडाश ह्या साधकाला मिळून तो कृतार्थ होतो.

काही यज्ञ तपरूप सामुग्रीने सिद्ध होतात. काही योगयज्ञ म्हणून प्रसिद्ध आहेत. काही शब्दांनी शब्दांचे हवन करतात, वेदांच्या शब्दांचा उच्चार करतात त्याला वाग्यज्ञ म्हणतात. ज्ञानानेच ज्ञेय जाणणे याला ज्ञानयज्ञ म्हणतात. कोणी अभ्यासाने अपानरूप अग्निमुखात प्राणद्रव्याचे हवन करतात. कित्येक अपानवायु प्राणवायुचे ठिकाणी अर्पण करतात. काही प्राण आणि अपान या दोन्हीचाही निरोध करतात. त्यांना प्राणायामी असे म्हणतात. हाही एक प्रकारचा यज्ञ आहे. काही वज्रासनाच्या पद्धतीने ठाण मांडून आहाराचा संयम करून प्राणानेच प्राणाचा लय करतात.

ह्या सर्व प्रकारच्या यज्ञकर्त्यांना इच्छा मात्र मोक्ष सुखाचीच असते. यज्ञ करीत करीत त्यांच्या मनाचा मळ धुऊन काढला जातो. मन शुद्ध होते, अज्ञान झडून जाते आणि मग शेवटी जे उरते त्या अवस्थेत हा अग्नि आणि मी हवनकर्ता हा भेदच उरत नाही स्वरूपज्ञानात मुरून गेल्यामुळे यज्ञकर्त्याच्या सर्व इच्छा पूर्ण होतात. यज्ञक्रिया चालू ठेवण्याचे कारण उरत नाही. क्रियाजात ओसरून जाते. मग त्या ठिकाणी विचार प्रवेश करीत नाही, करू शकत नाही. ब्रह्मस्वरूप वृत्ति झाल्याने तिला द्वैतदोषाचा संपर्कही होत नाही. आजवर वेदांनी सांगितलेल्या एकूण एक विधानांचे यथासांग अनुष्ठान केलेले असले तरी आता दुजाभावच उरलेला नसल्याने अकाळीची अभ्रे जोर न करता जागच्या जागी लय पावून नाहीशी होतात, तशा या सर्व यज्ञक्रिया त्या यज्ञकर्त्यामध्ये विरून नाहीशा होतात. त्याचे प्रयोजनच उरत नाही.

वेदांनी अनेक याग सांगितले ते मीही तुला विस्ताराने सांगितले. कर्माने सिद्ध केलेले हे याग केले की स्वर्गसुखासारखे अपूर्व फळ प्राप्त होते आणि त्या दृष्टीने कर्मसिद्ध असे हे द्रव्ययज्ञही याग खरे आहेत पण ताऱ्यांच्या प्रकाशाचा तोरा सूर्यापुढे चालत नाही, तसा या यज्ञांचा डौल ज्ञानयज्ञापुढे चालत नाही. या ज्ञानयज्ञामध्ये डोळ्यात अंजन घालावे त्याप्रमाणे बुद्धीच्या डोळ्यात ज्ञानाचे अंजन अहोरात्र घालावे लागते. एकदा हे अंजन भेटत गेले की, कर्माची समाप्ति होत जाते आणि तळमळून, भुकेजून केलेल्या आजवरच्या साधनांची तृप्ती होते. नैष्कर्म्य म्हणजे काय ह्या बोधाची खाण उघडते, प्रवृत्ति पांगळी होते, तर्काची दृष्टि जाते, इंद्रिये विषयांचा सहवास विसरून जातात. मनाचे मनपण संपते. शब्दांचा अभिव्यक्ती करण्याचा गुण संपतो आणि जाणावयाची जी वस्तु, ब्रह्म, ती एकरूपत्वाने भेटते. वैराग्य असावे, विवेक असावा, अशा तळमळीचाही लय होतो. न पहाता जे दिसते ते आत्मस्वरूप आपल्याच ठिकाणी आपल्याला भेटते. अर्जुना, हाच तो ज्ञानयज्ञ!

अर्जुना, असे हे ज्ञान मिळावे अशी इच्छा असेल तर, सर्वस्व अर्पण करून या संतांच्या पायाशी बसावे. तन, मन, जीव यासह त्या पायांना मिठी घालावी. गर्व सोडून त्याची सर्व प्रकारची सेवा करावी. ते संत ज्ञानाचा साठा आहेत. त्यांची सेवा हाच त्यांच्या घराचा उंबरठा आहे. सेवा करता करता ते आपल्या स्वाधीन होतात. मग आपल्याला जे विचारावयाचे असेल ते निःशंकपणे विचारावे ते प्रसन्न अंतःकरणाने आपल्याला उपदेश करतात. तो उपदेश इतका प्रभावी असतो की, एकदा त्या उपदेशाने अंतःकरण गेले की, पुन्हा संकल्पाकडे वळतच नाही. गुरूकृपा झाल्याबरोबर त्या ज्ञानप्रकाशाच्या पहाटेमुळे मोहाचा अंधकार नाहीसा होतो. पापाचे आगर,

भ्रान्तीचा सागर किंवा मनाच्या घोटाळ्याचा डोंगर असलेला पुरुष असला तरीही तो या ज्ञानशक्तीच्या सामर्थ्याने तरून जातो. तिन्ही लोकांची राख आकाशात उडवून लावणाऱ्या प्रलयकाळच्या वावटळीपुढे ढग काय टिकणार आहेत? वाऱ्याच्या क्षोभाने जो प्रलयकालचा अग्नि पाण्यानेसुद्धा पेटतो तो गवताने दडपला जाणार आहे काय? त्याचप्रमाणे ज्ञानशक्तीपुढे पाप, भ्रान्ति, मोह ही क्षणार्धसुद्धा टीकू शकत नाहीत. साधकाचे मन निर्भय, शंकारहितच होते. स्वतःसकट ही सर्व भूते ब्रह्मस्वरूप आहेत याची त्याला प्रत्यक्ष अनुभूति येते. मग तो गुरूकृपेमुळे निरंतर याच अवस्थेत राहतो. त्याच्या चित्ताचे मळ कायमचे नाहीसे होतात हे काय आता सांगायला हवे आहे? ह्या जगाचा पसारा ही ज्याची पडछाया आहे त्या ब्रह्माचे ज्ञान त्याला झाले असल्याने त्या महान सामर्थ्यापुढे मनाचे मळ तर कःपदार्थ आहेत. तेव्हा अर्जुना, ध्यानात घे की, ज्ञानासारखी पवित्र वस्तू या जगात नाही.

चैतन्याच्या जोडीला जसे जगात काही नाही तसे हे ज्ञान इतके उत्तम आहे की, त्याच्या बरोबरीचे दुसरे काही नाही. प्रत्यक्ष सूर्यासारखे त्याचे प्रतिबिंब तेजस्वी असेल, आकाश कवटाळून घेईन म्हणणारी आकाशापेक्षा मोठी वस्तू असेल किंवा पृथ्वीचे वजन करण्याएवढे तोलाचे साधन मिळेल तरच ज्ञानाला त्याची उपमा देता येईल. पुष्कळ विचार करून पाहिल्यावर असा निर्णय होतो की, ज्ञानासारखी पवित्र गोष्ट केवळ एक ज्ञानच. ज्ञानाला दुसरी उपमा देता येत नाही. अमृताची चव कशासारखी आहे म्हणावयाचे? अमृतासारखी असेच म्हणावे लागते. म्हणून अर्जुना, ज्ञानाचे महत्त्व तुला शब्दात वर्णन करून सांगणे म्हणजे केवळ वेळ व्यर्थ दवडणेच आहे."

अर्जुनाने देवांचे हे बोलणे ऐकले व मान डोलावून म्हटले, "देवा, हे पटले अगदी माझ्या मनाला. हे ज्ञान संपादन करण्याचा निश्चयही माझ्या मनात होतो आहे. पण पुन्हा पुन्हा वाटते आहे की, हे आपल्याला जमेल का? हा मार्ग आपल्याला चालता येईल काय? ती गुरूकृपा आपल्यावर होईल का? आपल्या हातून गुरूवाक्याचे नीट अनुष्ठान होईल का? मनात असा गोंधळ होतो आहे. ज्ञान संपादन करावे असा निश्चय होतो न होतो तोच संशयाने मन डळमळू लागते. आता काय करू मी?"

देव प्रेमाने भरलेल्या नजरेने अर्जुनाकडे पहात म्हणाले, "अर्जुना, खरे सांगू का हा संशयच तुझा शत्रू आहे. आधी मुळात प्राण्यांना ज्ञानाची आवडच नसते. त्या ज्ञानाची आवड नसणाऱ्या प्राण्यांचे जिणे मरणापेक्षा वाईट आहे बघ. रिकामे घर, प्राणहीन शरीर तसे हे ज्ञानहीन शून्य जीवन! त्या माणसांना ज्ञानाची आस्थाच असत नाही. अमृतही आवडत नाही. अशी अरुचि निर्माण झाली की, मरण जवळ आले असे समजले जाते. त्याप्रमाणेच ज्ञानाबद्दल तिटकारा असला की, ती मनुष्ये पूर्ण अज्ञानी समजावी. संशय त्यांना सर्व बाजूने घेरून, जखडून टाकतो. ज्ञान मिळवण्याची धडपड करू देतच नाही. विषयसुखाच्या गर्तेत आखंड बुडालेले हे लोक मग इहपर सुखाला मुकतात. विषमज्वर झालेल्या माणसाला शीत वा ऊष्ण याचे भान राहत नाही, अग्नि आणि चांदणे सारखेच मानण्याइतका तो बेहोष असतो. तसे हे संशयी लोक खरे, खोटे, विरुद्ध, अनुकूल, प्रतिकूल, हित, अहित यातला फरक, इष्टानिष्टता जाणूच शकत नाहीत. जात्यंध माणसाला जसा रात्र आणि दिवस यातला फरक ठाऊक नसतो तसा मनात संशय असेपर्यंत ज्ञानाची ओळख होत नाही.

म्हणून अर्जुना, संशय हा प्राण्यांच्या नाशाचे जाळेच आहे असे समज. ह्यासारखे दुसरे घोर पाप नाही

बघ. अज्ञानाचा गाढ अंधार पडला की, हा मनात फारच वाढतो आणि अर्थातच श्रद्धेचा मार्ग पूर्ण कुंठित करून टाकतो. हा फक्त हृदयालाच नव्हे तर बुद्धीलाही व्यापून टाकतो आणि त्रैलोक्यांतील सर्वच गोष्टींचे दर्शन या संशयाच्या पडद्यातून होऊ लागते. ज्ञानाच्या अभावामुळे मनात, हृदयात, बुद्धित घुसलेला संशय तू टाकून दे. त्याच्यावर विजय मिळव. हातात ज्ञानाचे हत्यार घे, श्रद्धापूर्वक ते चालव म्हणजे बलिष्ठ झालेला हा संशय तुझ्या हाती सापडेल. ज्ञानशस्त्राच्या प्रखर प्रहाराने तो नाहीसा होईल. तुझ्या मनावरचा, हृदयावरचा, बुद्धीवरचा कलंक फिटून जाईल.

पार्था, मग तुला आपोआपच आत्मसुखाची गोडी लागेल. इंद्रियांना तू मान देणार नाहीस. सर्व विषयांचा तुला कंटाळा येईल. तुझ्या मनात कोणतीही वासना उठणार नाही. प्रकृतिनुरूप हातून घडणाऱ्या कर्माची मालकी आपल्याकडे घेणार नाहीस. श्रद्धेशी एकरूप झाल्याने तू सुखी होशील.

अर्जुना, अरे अशी बळकट श्रद्धा दिसली की, ज्ञान तुला हुडकत येईल. या ज्ञानाच्या पोटीच अपार शांती असते. हे ज्ञान त्या संशयरहित हृदयात स्थिर झाले की, शांतीला अंकुर फुटेल. उत्तरोत्तर त्या ज्ञानबीजाचा विस्तार होत होत आत्मज्ञान प्रगट होईल. त्या आत्मज्ञानाच्या अनुभूतीमध्ये जिकडे पहाशील तिकडे मग शांतीच शांती दिसेल. त्या शांतीच्या अमर्याद विस्ताराचे किती वर्णन करू मी? ते वर्णन करणे देखील अपारच आहे. ज्ञानी पुरुषांनी ही अवस्था गाठलेली असते. अर्जुना, तू असाच ज्ञानी हो." संजय म्हणाला, "राजा, सर्व ज्ञानाचा जनक, ज्ञानदीप असा श्रीकृष्ण कृपावंत होऊन अर्जुनाला म्हणाला की, अर्जुना, सर्व शंका सोडून दे आणि बाबा ज्ञानसंपन्न हो. लढाई कर. हे क्षात्रकर्म निष्काम बुद्धिने करूनच कर्मसंन्यास साध."

या मागच्या बोलण्याचा विचार करून पांडुकुमार पार्थ आता समयोचित प्रश्न विचारणार आहे. ती संगतवार कथा अर्थाची खाण आहे. रसांचा उत्कर्ष आहे. ती कथा इतकी सुंदर आहे, शांत रसाने भरलेली आहे की, उरलेले आठ रस तिच्यावरून ओवाळून टाकावे. उगीच का ती सज्जनांच्या बुद्धिचा विसावा झाली आहे? हे मराठी बोल समुद्राहूनही खोल अशा अर्थाने भरलेले आहेत. सूर्यबिंब बचकेएवढे असले तरी प्रकाशाला त्रैलोक्यही पुरत नाही. त्याप्रमाणे शब्द थोडे असले तरी त्याची व्याप्ती कल्पनातीत आहे. ती किती आहे हे केवळ अनुभवानेच कळणार आहे. कल्पवृक्ष जसा इच्छा करणाऱ्याच्या संकल्पाप्रमाणे फल देतो त्याप्रमाणे हे शब्द आपल्या अवधानाच्या व्याप्तीप्रमाणे व्यापक होतील. श्रोतेही, आपण सर्वज्ञ अहा. आपण हे माहात्म्य जाणताच तरी मी विनंती करतो की, आपण उत्तम अवधान द्यावे, रूपगुणकुलवती, पतिव्रताही असावी त्याप्रमाणे ह्या कथेत सर्व साहित्यगुण आकारामध्ये आणि शांतीरस आशयामध्ये भरलेला दिसेल. साखर आधीच आवडती असावी त्यांत ती औषध म्हणूनही घ्यायला सांगावी मग सुखाने वरचेवर सेवन केली जातेच ना, तसेच हे आहे. मलयानिल मुळात मंद आणि सुगंधित त्यातच त्याला अमृताची गोडी आली आणि दैवगतीने मधुर नादही प्राप्त झाला तर तो मलयानिल स्पर्शाने सर्वांग निववितो, स्वादाने जिभेला नाचवतो आणि कानाकडून "वाहवा, वाहवा" म्हणवून घेतो त्याप्रमाणे ह्या कथेचे श्रवण सर्वोपकारी आहे. कानाचे पारणे फिटेलच पण काहीही त्रास न होता संसार दुःखाचे समूळ उच्चाटन होईल. मैत्रीने जर वैराचा नाश होत असला तर उगीच हत्त्यारबंद होऊन कशाला फिरायचे? दूधसाखर पिऊन रोग जात असेल तर कडुनिंबाचा रस कशाला प्यायचा? मनाला न मारता, इंद्रियांना न दुखवता, केवळ श्रवणानेच मोक्ष मिळणार आहे.

निवृत्तिनाथांचा दास मी, ज्ञानदेव म्हणतो की, समाधानी मनाने हा गीतार्थ लक्षपूर्वक चांगला ऐका.

या अध्यायापासून बाराव्या अध्यायाच्या "अद्वेष्टा सर्वभूतांना" ह्या तेराव्या श्लोकापर्यंत ज्ञानराजांच्या दृष्टीने गीतेतील उपासनाकांड आहे.

प्रत्येकाने कर्म केलेच पाहिजे असा निर्णय भगवंतांनी तिसऱ्या अध्यायात दिला आहे. चवथ्या अध्यायाच्या शेवटी शरीर, मन, बुद्धि यांना ग्रासणारा संशय नष्ट करून श्रद्धायुक्त अंतःकरणाने ज्ञानाची प्राप्ती करून घ्यावी आणि अक्षय अशा विहित कर्मयोगाचे आचरण करीत करीत ब्रह्मवस्तूशी ऐक्य साधावे असा उपदेश देवांनी केला आहे. आता पाचव्या अध्यायात अजूनही "काय करावे" या संभ्रमात असलेला अर्जुन आणि पर्यायाने प्रत्येक अज्ञानी जीव प्रश्न करतो आहे की, "देवा, मला अजूनही उलगडा होत नाही की, मी कर्मसंन्यास करू की, कर्माचरण करू? कोणते उचित आहे?"

सामान्य लोकांना कर्ममार्गच कसा श्रेयस्कर व सुखाचा आहे हे भगवान पुन्हा एकदा समजावून सांगत आहेत. ज्ञानमार्ग थोड्याच जणांना साधणारा आहे, हे देवांनी विहंगमाचे उदाहरण देऊन तिसऱ्या अध्यायात सूचित केलेच आहे. त्यावेळी कर्ममार्ग सोपा आहे असे ते म्हणाले होते. आता पाचव्या अध्यायात त्याचाच विस्तार देव करणार आहेत. साधकांच्या दृष्टिने विशेषतः मंदाधिकारी साधकांच्या दृष्टिने तो महत्त्वाचा आहे.

***

**॥ श्री ॥**

**अध्याय पाचवा**

## संन्यासयोग

**॥ ॐ नमो भगवते वासुदेवाय ॥**

अर्जुन उवाच—

**संन्यासं कर्मणां कृष्ण पुनर्योगं च शंससि ।**
**यच्छ्रेय एतयोरेकं तन्मे ब्रूहि सुनिश्चितम् ॥ १ ॥**

श्रीभगवानुवाच—

**संन्यासः कर्मयोगश्च निःश्रेयसकरावुभौ ।**
**तयोस्तु कर्मसंन्यासात्कर्मयोगो विशिष्यते ॥ २ ॥**

**ज्ञेयः स नित्यसंन्यासी यो न द्वेष्टि न काड;क्षति ।**
**निर्द्वन्द्वो हि महाबाहो सुखं बंधात्प्रमुच्यते ॥ ३ ॥**

**सांख्ययोगौ पृथग्बालाः प्रवदन्ति न पण्डिताः ।**
**एकमप्यास्थितः सम्यगुभयोर्विन्दते फलम् ॥ ४ ॥**

**यत्सांख्यैः प्राप्यते स्थानं तद्योगैरपि गम्यते ।**
**एकं सांख्यं च योगं च यः पश्यति स पश्यति ॥ ५ ॥**

**संन्यासस्तु महाबाहो दुःखमाप्तुमयोगतः ।**
**योगयुक्तो मुनिर्ब्रह्म न चिरेणाधिगच्छति ॥ ६ ॥**

**योगयुक्तो विशुद्धात्मा विजितात्मा जितेंद्रियः ।**
**सर्वभूतात्मभूतात्मा कुर्वन्नपि न लिप्यते ॥ ७ ॥**

**नैव किंचित्करोमीति युक्तो मन्येत तत्त्ववित् ।**
**पश्यञ्श्रृण्वन्स्पृशञ्जिघ्रन्नश्नन्गच्छन्स्वपञ्श्वसन् ॥ ८ ॥**

अनुक्रमणिका

प्रलयन्विसृजन्गृह्णन्नुन्मिषन्निमिषन्नपि ।
इन्द्रियाणीन्द्रियार्थेषु वर्तन्त इति धारयन् ॥ ९ ॥

ब्रह्मण्याधाय कर्माणि सङ्गं त्यक्त्वा करोति यः ।
लिप्यते न स पापेन पद्मपत्रमिवाम्भसा ॥ १० ॥

कायेन मनसा बुद्ध्या केवलैरिन्द्रियैरपि ।
योगिनः कर्म कुर्वन्ति सङ्गं त्यक्त्वाऽऽत्मशुद्धये ॥ ११ ॥

युक्तः कर्मफलं त्यक्त्वा शान्तिमाप्नोति नैष्ठिकीम् ।
अयुक्तः कामकारेण फले सक्तो निबध्यते ॥ १२ ॥

सर्वकर्माणि मनसा संन्यस्याऽऽस्ते सुखं वशी ।
नवद्वारे पुरे देही नैव कुर्वन्न कारयन् ॥ १३ ॥

न कर्तृत्वं न कर्माणि लोकस्य सृजति प्रभुः ।
न कर्मफलसंयोगं स्वभावस्तु प्रवर्तते ॥ १४ ॥

नाऽऽदत्ते कस्यचित्पापं न चैव सुकृतं विभुः ।
अज्ञानेनाऽऽवृतं ज्ञानं तेन मुह्यन्ति जन्तवः ॥ १५ ॥

ज्ञानेन तु तदज्ञानं येषां नाशितमात्मनः ।
तेषामादित्यवज्ज्ञानं प्रकाशयति तत्परम् ॥ १६ ॥

तद्बुद्धयस्तदात्मानस्तन्निष्ठास्तत्परायणाः ।
गच्छन्त्यपुनरावृत्तिं ज्ञाननिर्धूतकल्मषाः ॥ १७ ॥

विद्याविनयसंपन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनि ।
शुनि चैव श्वपाके च पण्डिताः समदर्शिनः ॥ १८ ॥

इहैव तैर्जितः सर्गो येषां साम्ये स्थितं मनः ।
निर्दोषं हि समं ब्रह्म तस्माद् ब्रह्मणि ते स्थिताः ॥ १९ ॥

न प्रहृष्येत्प्रियं प्राप्य नोद्विजेत्प्राप्य चाप्रियम् ।
स्थिरबुद्धिरसंमूढो ब्रह्मविद् ब्रह्मणि स्थितः ॥ २० ॥

बाह्यस्पर्शेष्वसक्तात्मा विन्दत्यात्मनि यत्सुखम् ।
स ब्रह्मयोगयुक्तात्मा सुखमक्षय्यमश्नुते ॥ २१ ॥

ये हि संस्पर्शजा भोगा दुःखयोनय एव ते ।
आद्यन्तवन्तः कौन्तेय न तेषु रमते बुधः ॥ २२ ॥

शक्नोतीहैव यः सोढुं प्राक्शरीरविमोक्षणात् ।
कामक्रोधोद्भवं वेगं स युक्तः स सुखी नरः ॥ २३ ॥

योऽन्तः सुखोऽन्तरारामस्तथान्तर्ज्योतिरेव यः ।
स योगी ब्रह्मनिर्वाणं ब्रह्मभूतोऽधिगच्छति ॥ २४ ॥

लभन्ते ब्रह्मनिर्वाणमृषयः क्षीणकल्मषाः ।
छिन्नद्वैधा यतात्मानः सर्वभूतहिते रताः ॥ २५ ॥

कामक्रोधवियुक्तानां यतीनां यतचेतसाम् ।
अभितो ब्रह्मनिर्वाणं वर्तते विदितात्मनाम् ॥ २६ ॥

स्पर्शान्कृत्वा बहिर्बाह्यांश्चक्षुश्चैवान्तरे भ्रुवोः ।
प्राणापानौ समौ कृत्वा नासाभ्यंतरचारिणौ ॥ २७ ॥

यतेन्द्रियमनोबुद्धिर्मुनिर्मोक्षपरायणः ।
विगतेच्छाभयक्रोधो यः सदा मुक्त एव सः ॥ २८ ॥

भोक्तारं यज्ञतपसां सर्वलोकमहेश्वरम् ।
सुहृदं सर्वभूतानां ज्ञात्वा मां शान्तिमृच्छति ॥ २९ ॥

इति श्रीमद्भगवद्गीतास्पनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे “संन्यासयोगो नाम” पंचमोऽध्यायः ॥ ५ ॥

श्रीकृष्णार्पणमस्तु ।

----------

अनुक्रमणिका

चौथ्या अध्यायाच्या शेवटी भगवंतांनी अर्जुनाला आज्ञा केली की, "पार्था, ज्ञानाने अज्ञानाचा नाश कर. तुझ्या ठिकाणी मी कर्म करणार नाही, प्राप्त कर्म पाप उत्पन्न करणारे आहे अशा प्रकारचा संशय उत्पन्न झाला आहे. तोच तुला बंधनात घालतो आहे. हा संशय छेदून टाक आणि क्षात्रधर्माला उचित असे हे युद्धकर्म तुझ्यापुढे येऊन ठाकले आहे ते उत्कृष्टरीतीने कर."

अर्जुन मनाशी म्हणू लागला, देवानी म्हटले होते की, कर्माची गति गहन आहे. अकर्माच्या ठिकाणी कर्म आणि कर्माच्या ठिकाणी अकर्म पाहतो तो मनुष्यात बुद्धिमान जाणावा, योगी जाणावा हे कसे काय? इतकी सर्व गुंतागुंत जर कर्माच्या आचरणात आहे तर त्या कर्माचाच त्याग केला तर पुढची सगळी अनर्थ परंपरा टळेल की, कर्माला इतका दोष ठेवून, पुन्हा मला मात्र देव युद्ध कर असा उपदेश करतात याचा अर्थ तरी काय? मी युद्ध का करावे? या पापास धनी का व्हावे? मला जर हे पापकर्म वाटते तर केवळ श्रीकृष्ण म्हणतात म्हणून मी ते करावे काय? मग माझ्या बुद्धीचा उपयोग तरी काय? देवांचे बोलणे अगदी असंबध्द आहे. घोटाळ्यात टाकणारे आहे. बहुधा काय करावे हे देवांनाही नीट सूचत नसावे म्हणून मला कसाबसा देव लढाईस उभा करीत आहेत. पण माझ्या मनाची खात्री पटल्याशिवाय मी हे कृत्य करणारच नाही. आता उघडच प्रश्न विचारतो म्हणजे झाले. असे मनाशी म्हणून अर्जुन देवांना म्हणाला;

"काय हे तुमचे बोलणे! अहो त्या बोलण्यात एकवाक्यता तरी असायची होती, तशी असती तर तो बोध मनात ठसवून काही शंका तरी विचारता आल्या असत्या. पण तुमच्या बोलण्यात मुळातच मेळ नाही. मागे एकदा कर्माचा संन्यास सांगितला अशा कर्मसंन्यासाचे पुष्कळ वर्णनही केलेत. आता त्याच कर्मयोगाचे रसपूर्ण विवेचन करून कर्म कर अशी आज्ञा करता. आम्ही आधीच अज्ञानी त्यात हे तुमचे द्वयर्थी बोलणे! आम्हाला समजेल, कळेल असा काही उलगडा यातून होतच नाही. तत्त्व सांगताना जे एक खरे तत्त्व असेल तेच सांगितले पाहिजे. खरे पाहिले तर असे आपल्याला दुसऱ्याने का कुणी सुचविले पाहिजे? माझ्या बुध्दीचा गोंधळ उडला म्हणूनच मी, कृष्णदेवा, आपल्याला म्हटले की मला संदिग्ध सांगू नका. स्पष्ट सांगा. पण आपण तर कर्म करणे आणि न करणे या दोन्ही मार्गांची सारखीच भलावणी केली. आतापर्यंत झाले ते झाले, पण आता तरी सांगा या दोन मार्गांपैकी कर्मत्याग हा मार्ग चांगला की, कर्माचरण हा चांगला? देवा, आमचे बळ ते किती, आम्हाला मार्ग असा हवा की, जसा काही पालखीत बसून केलेला प्रवासच. मार्गावरून चालताना जी उपासना करावयाची ती सरळ, सोपी व अचूक फळ देणारी असावी. पालखीतून जाणाऱ्याला झोपेचे सुख घेता येते आणि रस्ता तर पुष्कळ कापता येतो तसे हे असावे. देवा, तुमच्याशिवाय असा सुलभ मार्ग मला कोण सांगणार? तेव्हा आता पुन्हा एकदा विचार करा आणि मी निश्चित काय करू ते सांगा.

पहा हो, ज्याला कामधेनूसारखी आई आहे त्याने खेळायला चंद्र का मागू नये? शंभु प्रसन्न झाल्यावर उपमन्यूची दूधभाताची आर्ती भागविण्यासाठी महादेवांनी त्याला क्षीरसमुद्रच दिला की नाही, तसा औदार्याचे विश्रान्तीस्थान असलेला श्रीकृष्ण अर्जुनाला वश झाल्यावर मागेल ते सुख बसल्या जागीच त्याच्याकडून पार्थाला का मिळू नये? लक्ष्मीकांतासारखा मालक मिळाल्यावर मागावे ते मिळते यात चमत्कार काय? अर्जुनाचे बोलणे ऐकून श्रीकृष्ण हसले आणि त्याच्या शंकेचे समाधान करण्यासाठी बोलू लागले.

देव म्हणाले, “अर्जुना, संन्यास आणि कर्मयोग तत्त्वतः दोन्ही मोक्ष देणारे आहेत. पण संन्यासाचे सामर्थ्य सर्वांच्याच ठिकाणी नसते. समुद्रात समर्थ आपल्या बाहुबलाने तरून जातो, पण स्त्रिया, बाल यांना जशी नावेची जरुरी असते, त्याप्रमाणे अनुष्ठान करण्यास कर्मयोग सोपा. फल मात्र कर्मयोगाचे यथायोग्य आचरण झाले तर संन्यासाच्या आचरणाने जे मिळावयाचे तेच मिळते. आयास कमी पडतात हा फायदा यात आहे. कर्माचरण करणाऱ्याच्या आणि कर्मसंन्यास करणाऱ्याच्या मनोभूमिकेबद्दल तुला सांगतो म्हणजे पटेल की, वरवर वेगळे दिसणारे हे मार्ग अंतर्यामी एकच आहेत. कर्मयोगी अंतरातून संन्यासीच असतो. जे गेले त्याची तो आठवण करत नाही. जे मिळाले नाही त्याची इच्छा करत नाही. मेरुपर्वत जसा निश्चल असतो तसा तो मनाने ह्या भूमिकेवर ठाम उभा असतो. मी आणि माझे याची त्याच्या मनाला आठवणही नसते. मनातूनच असा निर्लेप झाल्यामुळे आसक्तीच त्याला सोडून जाते आणि अखंडित सुखाने तो सुखात डोलत रहातो. मग तुला असे वाटेल की त्याने गृहप्रंपचाचा त्यागही बाह्यतः केलेला नाही मग हा संन्यासी कसा म्हणायचा? अर्जुना, कापूस आणि अग्नि हे एकत्र नांदू शकतील का? पण अग्नि विझून गेल्यावर जी राख उरते ती चिमटीत घेऊन वात वळता येतेच की नाही? तसेच प्रपंच घेणारे मनच निःसंग झाल्याने त्याला बाह्य त्याग करण्याची जरुरीच उरत नाही. प्रपंच माझा म्हटला तर टाकायचा ना, ममत्वच संपल्यावर टाकायचे उरलेच काय? त्या कर्मयोग्याच्या मनात संकल्पच उठत नाही. त्यामुळे वरवर दिसणाऱ्या उपाधीत तो अडकलाच जात नाही. कल्पनेचाच नाश झाल्यामुळे सहजच त्याच्या हातून संन्याशासारखेच आचरण घडते. संन्यासी आणि कर्मयोगी हे असे एकाच मार्गाने चाललेले असतात. मुर्खांना ह्या दोन्ही मार्गातील ऐक्य समजत नाही. बाह्यतः ज्याने प्रपंच टाकला तोच तेवढा संन्यासी अशी त्यांची कल्पना असते. प्रत्येक दिव्याला काय वेगवेगळ्या प्रकाशाची जात असते काय? दिव्याचा आकार वेगळा असला तरी प्रकाश जसा एकच, तसे सगळ्या अनुभवाअंती ज्यांनी या तत्त्वाचे चिंतन केले ते ज्ञानी पुरुष, हे दोन्ही मार्ग एकाच ठिकाणी जातात किंबहुना एकच आहेत हे निश्चयाने जाणतात.

ज्ञानमार्गाने जे फल मिळते तेच फल कर्ममार्गाने मिळते. पोचण्याचे ठिकाण एकच. ह्या दोन्ही मार्गांचे पूर्ण ऐक्य आहे, हे पार्था, तुझ्या ध्यानी आले काय? आपण ज्याला आकाश म्हणतो तीच पोकळी किंवा अवकाश आहे की नाही? “या दोन मार्गात भेदाला थोडीसुद्धा जागा नाही.” असे जे जाणतात त्यांनाच जगात ज्ञानाची पहाट झाली आहे असे समज. ज्ञान आणि कर्म ह्याचे ऐक्य ज्यांनी जाणले त्यांनीच आत्मस्वरूप पाहिले असे पक्के लक्षात ठेव.

अर्जुना, निष्काम कर्म करण्याची युक्ती साधली पाहिजे रे. ती साधली की मोक्षाचा पर्वत सहज चढून जाता येते आणि महासुखाचे शिखर गाठता येते. कर्ममार्ग सोडून जो संन्यासाचा हव्यास धरतो त्याची सुखाने मार्गक्रमणही होत नाही आणि हट्टाने पत्करलेला कठीण मार्गही पेलत नाही अशी दोन्ही बाजूनी फजिती होते. तेव्हा अमुक मार्गाचा हट्ट धर असे मी म्हणत नाही. सोपा कर्ममार्ग पत्कर आणि भ्रांतीमध्ये गुरफटलेले तुझे मन त्यातून सोडवून घेण्याची पराकाष्ठा कर येवढेच सांगतो आहे.

कारण मार्ग कोणता, बाह्य जीवन कसे यापेक्षा मन भ्रान्तीपासून मुक्त आहे की नाही हे महत्त्वाचे आहे. प्रपंचाच्या संगाने जन्मोजन्मी मनावर मळाची पुटे साठत जातात. मन मलिन म्हणून त्याचा त्याग तरी कसा करणार? मुक्तीचे साधनही मनच असल्याने प्रयत्नपूर्वक ते जास्तीत जास्त स्वच्छ करीत जावयाचे. त्यावर साठलेली काजळी गुरुवाक्याने धुवून टाकायची. गुरूंनी केलेल्या बोधाचे मनन करता करता जुन मळ कमी

कमी होतो व नवा मळ साठण्याची क्रिया पण कमी कमी होते. या सर्व प्रक्रियेस वेळ लागतो. पण मग या अभ्यासातच एक दिवस अचानक आत्मस्वरूप भेटते. एकदा ती आत्मानुभूति आली की मग असा अभ्यास करावयाचा की, मन त्या आत्मस्वरूपातच मुरून रहावे बाहेर पडूच नये. मिठाचा खडा समुद्राहून वेगळा आणि मर्यादित. जिथे त्या खड्याचा जन्म झाला तो समुद्र किती अमर्याद आणि अथांग! मिठाचा खडा जोवर आपले स्वतंत्र, मर्यादित, चिमुकले जीवन जगत असतो, तोवर "मी क्षुद्र" हा भाव त्याच्या चित्तात असतो. पण तोच खडा दैववशात् समुद्रात जाऊन पडला तर मात्र त्या समुद्राशी एकरूप होऊन समुद्रासारखा अथांग, अमर्याद होतो. त्याप्रमाणे क्षुल्लक संकल्पात रमणारे मन त्यातून प्रयत्नाने ओढून काढले आणि आत्मस्वरूपात मिळवले तर त्या मनाचे क्षुद्रपण, एकदेशीयत्व संपते आणि केवळ चैतन्यस्वरूप होऊन तीन्हीं लोकात लीन होते. मी अमुक क्रिया करतो या भावनेतील

| | |
|---|---|
| **मी** | १ |
| **क्रिया** | २ |
| **करतो** | ३ |

ही त्रिपुटीच लयास जाते. कर्ताच शिल्लक रहात नाही. सहज कर्म व क्रियाही संपते आणि मनाच्या अशा अवस्थेत शरीराकडून कर्म घडले असे वरकरणी दिसले तरी तो जीव त्या कर्माचा कर्ता असत नाही. कर्तेपणाची जाणीवच त्या मनाला शिवत नाही. म्हणून बाह्यतः कर्ता असूनही तो अकर्ता असतो.

देहाबद्दल मीपणा नाही म्हणूनच हे घडते नाही का? अर्जुना, कर्म देहाकडून घडते आहे, माझ्याकडून नाही. याची त्याला सतत जाणीव असते. म्हणूनच तो योगी कर्मकर्तृत्वाचा सहज त्याग करू शकतो.

अरे, तो असतो देहातच. देह काही टाकून देत नाही. पण त्या योगी पुरुषाच्या ठिकाणी अमूर्ताचे सर्व गुण मात्र स्पष्ट अनुभवास येतात. इतरांच्या शरीरासारख्याच त्याच्याही शरिराच्या सर्व बाह्य क्रिया चालू असतात. डोळ्यांनी पहातो, कानांनी ऐकतो, नाकाने वास घेतो, स्पर्शज्ञानही त्याला असते. प्रसंगानुसार तो बोलतो, जेवतो, खातो, जे टाकावे त्याचा त्याग करतो. निद्रेची वेळ झाली की तो सुखाने झोपतोही पण ह्या बाह्य शरीरक्रियामुळे तो प्रपंचात अडकत नाही हा एक चमत्कार आहे. पण तो घडतो बाबा. सामान्यासारखेच वरचे जीवन पाहून तो सामान्यच आहे असे पुष्कळांना वाटतेही पण दुसरा ज्ञानमार्गाचा उपासक ह्या बाह्य कर्माने, वेषाने फसत नाही. जसे सिद्धचरित्रातील महादेवमहाराज फसले नाहीत तसे!

नागपूरचे रामचंद्रमहाराज बुटी आणि स्वंतः महादेवमहाराज हे दोघे पंढरपूरच्या गुंडामहाराजांचे शिष्य. बरेच दिवसांनी महादेवमहाराज नागपूरला गेले आणि मित्राकडे उतरले. रामचंद्रमहाराजांचे ऐश्वर्यसंपन्न जीवन तसेच्या तसेच होते. पण त्यांच्या तोंडून महादेवमहाराजांनी ज्ञानेश्वरीचे विवेचन ऐकले, तेव्हा मात्र त्यांच्या मनात खळबळ उडाली. त्यांना जाणवू लागले की, आपल्या मित्राचे स्वरूप आतून पूर्ण पालटले आहे. त्याला काहीतरी वेगळे निधान सापडले आहे. तो पूर्वी कसा होता हे आपल्याइतके कोणास ठाऊक आहे? पण आज पहावे तर त्याचे बोलणे, चालणे, वागणे, ज्ञानेश्वरी सांगणे सगळे बदलले आहे. किंबहुना त्याचे श्वास घेणेदेखील पूर्वीचे नव्हे आणि शेवटी धीर करून त्यांनी रामचंद्रमहाराजांना प्रश्न केला, "तुम्हाला काहीतरी

वेगळे प्राप्त झाले आहे. काय निधान सापडले ते मला सांगाच.”

रामचंद्रमहाराज म्हणाले, “मित्रा काय सांगू? इतके दिवस मी तुझ्याकडून हा प्रश्न यावा म्हणून किती वाट पाहिली? तू कधी विचारतोस आणि मी कधी सांगतो असे मला झाले होते. पण तू विचारल्याशिवाय मी सांगू कसा? आता तू विचारलेस. हातचे काही न ठेवता तुला सांगतो. तुझ्याइतका योग्य श्रोता दुसरा कोण भेटणार मला? मित्रा माझ्यावर चूडामणीमहाराजांची कृपा झाली आणि त्यांनी मला मार्गाला लावले. माझ्यामध्ये झालेल्या बदलाचे कारण केवळ गुरूकृपा आहे.”

मग महादेवमहाराजांनी ह्या ज्येष्ठ गुरूबंधूकडून गुरोपदेश घेतला आणि जन्माचे सार्थक केले. अशा ह्या अंतरीच्या खुणा बाह्य जीवनावर पावले उमटवू लागतात. “मी कर्ता नव्हे” याची प्रत्यक्ष अनुभूती आल्याने कर्म करूनही अकर्ता राहतो. भ्रांतीच्या शेजेवर स्वप्नसुखाने घेरलेल्या अवस्थेत झोपलेला पुरुष ज्ञानाचा उदय झाल्याबरोबर शेजेचा त्याग करतो आणि स्वप्नांतून जागा झाल्यामुळे भ्रांतीने कर्म न करता डोळसपणाने कर्म करतो. म्हणजेच साक्षित्वाने कर्मे करतो.

श्रीमती सुशीलाबाई जावडेकरांच्याकडे रामभाऊ गोडबोले या पूर्वाश्रमीच्या नावाने शिक्षकाच्या पेशात वावरणारे महायोगी स्वरूपानंद त्यांना म्हणत, “मामी, मी तुम्हाला, मुलांना किंवा इतरही सर्व पदार्थांना पहातो ना ते साक्षित्वाने पहातो.”

मामी आज म्हणतात, “असे ते नेहमी म्हणावयाचे, विंचू चावला तरी स्वस्थ बसून त्यांनी वेदना जिरवल्या पण साक्षित्वाने पहायचे म्हणजे काय ह्याचा कधी उलगडा आम्हाला झाला नाही. पुढे ते स्वामी स्वरूपानंद म्हणून प्रसिद्ध झाल्यावर त्यांचे हे बोलणे आठवले.”

घरात दिवा लागला की, घरातली सर्व माणसे त्या दिव्याच्या उजेडात जशी आपआपली कामे करीत असतात, दिवा आपल्या जागी स्वस्थ उभा असतो, कर्मात गुंतलेला नसतो. तसा देहाच्या संगतीने तो रहातो. इंद्रिये आपआपली कामे करीत आहेत हे पहातो. पण कमळाचे पान पाण्यात असून पाण्याने भिजत नाही तसा तो कर्मबंधनात अडकत नाही.

देव पुढे म्हणाले, “अर्जुना, असे पहा काही शारीरक्रिया मन वा बुद्धि यांच्या मदतीवाचून अखंड चालू असतात. रुधिराभिसरण, श्वसन, पचन या आपोआप चालणाऱ्या क्रिया आहेत. काही शारीरक्रिया मन आणि बुद्धीच्या आज्ञेने, सहाय्याने चालतात. योगी या दोन्ही करतात पण ती कर्मे लहान मूल नकळत क्रिया करते, तशी ते हेतूहीन अवस्थेतून करतात. पाचभौतिक असे हे शरीर जेव्हा झोपलेले असते तेव्हा एकटे मनच स्वप्नात निरनिराळे व्यापार करते. वासनेचा विस्तार इतका मोठा असतो की अर्जुना, देह झोपलेला असतानाही मनच शतधा होऊन दैहिक सुख दुःखाचा भोग जिवाला घडविते. हा भोग इतका हुबेहुब असतो की, थोड्या वेळापुरती जनकासारख्या ज्ञानी पुरुषाचीही त्याने फजिती केली.

एकदा असे झाले की, जनकराजा आपल्या शय्येवर झोपला असता त्याला स्वप्न पडले की, आपण

भिकारी आहोत. अंगावर फाटके तुटके कपडे आहेत, पोटात खूप भूक लागली आहे. उन्हाचे चटके पायाला बसत आहेत. अशा स्थितीत आपण एका अन्नछत्रापुढे उभे आहोत.

खिचडी वाटणारा मनुष्य म्हणतो आहे, “अरे किती उशीर केलास? संपली की, खिचडी. आता ही एवढी खरपुडी उरली आहे. हवी तर ती तुला देतो.”

स्वप्नात भुकेने प्राण व्याकुळ झाल्यामुळे आपण त्या खरपुडीसाठी हात पसरला आहे. ती हातात पडताच साम्राज्य मिळाल्यासारखा आपल्याला आनंद झाला. इतक्यात आकाशातून एक घार झपाट्याने आली आणि तिने ही खरपुडी उचलून नेली. हातातला घास घारीने गिळंकृत केलेला पाहून अत्यंत दुःखी झालेल्या आपल्याला तिच्या तीक्ष्ण नख्यांचा स्पर्श जाणवत असतानाच आपण जागे झालो तो राजमंदिरातल्या मंचकावर आहो हे कळले. दासी विचारते आहे, “अरुणोदय झाला. उठायचे ना आता? आपल्याला आवडते तसे उष्णोदक आणले आहे.”

जनक विस्मयचकित झाला. दैन्य नाही, क्षुधा नाही, तृष्णा नाही, काहीच नाही. उलट राजवैभव हात जोडून उभे आहे.

जनक राणीला, प्रधानाला, गुरूंना विचारू लागला, “मला सांगा कुणीतरी की, ते खरे की हे खरे?”

कुणाला काहीच उलगडा होईना. राजा हा काय प्रश्न विचारतो ते कळेना. राजाला वेड लागले की काय अशी देखील शंका राणीला येऊन गेली.

मग अष्टावक्रमुनी दरबारात आले होते तेव्हा राजाने त्यांनाही हाच प्रश्न विचारला. त्यांनी स्वप्नातील हकीकत जाणून राजालाच प्रश्न केला, ते म्हणाले, “राजा, अन्नछत्रापुढे उभा होतास तेव्हा तुला ह्या राजवैभवाची जाणीव होती का?” राजाने उत्तर दिले, “नाही महाराज.” मुनींनी सांगितले, “जे कधी जाणवते, कधी नाही असे हे राजवैभव खोटे. पण राजा, हे राजवैभव भोगताना अन्नछत्रापुढे अनुभवास आले ते दैन्य जाणवते काय?”

राजा म्हणाला, “नाही महाराज. त्या दैन्याची आज प्रत्यक्ष अनुभूति नाही.”

मुनी म्हणाले, “मग राजा कधी असते, कधी नसते ते दैन्यही खोटे.”

विस्मयचकित होऊन राजाने विचारले, “महाराज राजवैभव खोटे, दैन्यही खोटे. मग खरे काय?” मुनी म्हणाले, “राजा, ह्या दोन्ही अवस्थात तुला जाणवणारा “मी” खरा. दोन्ही अवस्था खोट्या.”

देव म्हणतात, “अर्जुना, याप्रमाणे ज्ञानी पुरुषालाही कधी कधी स्वप्नातसुद्धा सुख दुःखाचा भोग घडतो. तो योग्यांनाही चुकत नाही. इंद्रियांच्या गावालाही न जाता हा जो मानसिक व्यापार घडतो तो

योग्यांनाही घडतोच. पण त्यांनी "अशी अवस्था म्हणजे मी" ह्या भावाची संगत सोडली असल्याने ह्याही कर्माचे त्यांना बंधन घडत नाही. पिशाच्च्यांचा संचार झाल्यामुळे इंद्रियांच्या वेगवेगळ्या क्रिया मनुष्य करतो पण त्या क्रियांचे ज्ञान त्याला नसते. योगी पाहतो, बोलतो, ऐकतो पण आपण ह्या ज्या क्रिया करतो त्यापासून आपण वेगळे आहोत याची अखंड जाणीव त्यांना असते. म्हणून क्रिया आणि आत्मतत्त्व ही वेगवेगळी नांदत रहातात. प्रयोजनावाचून तो जे जे करतो ते ते कर्म केवळ त्याची इंद्रिये करतात असे समज.

पार्था, आता सर्व ठिकाणी जाणण्याचे काम बुद्धि करते. योग्यांच्याकडे पाहिले तर असे दिसते की जाणण्याचे काम त्यांचीही बुद्धि करते. पण कर्मरहित झालेल्या पुरुषाहूनही ते मुक्त झालेले दिसतात. देहापासून बुद्धिपर्यंत सर्व साधणारी, घडणारी कर्मे करीत असतानाही "मी करतो" ह्या अहंकाराची त्यांना आठवणही नसते आणि म्हणून अशा अवस्थेत कर्म करत करतच ते शुद्ध होत जातात. अहंकार टाकून केलेले कर्म म्हणजेच नैष्कर्म्य, ही खूण गुरूकडूनच त्यांना कळलेली असते" देवांनी असे सांगितले.

ज्ञानदेव म्हणतात, "शांतरसाचा पूर दोन्ही तट भरून ओसंडतो आहे. बोलण्याच्या प्रांतात जे सापडत नाही ते बोलले जात आहे. इंद्रियाचे आधीनपण ज्यांनी टाकले आहे अशा सज्ञनांनाच केवळ ह्या शब्दांचा अर्थ कळणार आहे."

श्रोते म्हणाले, "ज्ञानदेवा, श्लोकाची संगती मोडेल असे बोलूच नका आता. मनाला जे कळत नाही, घासाघास केली तरी बुद्धीला प्राप्त होत नाही ते बोलणे दैव अनुकूल म्हणूनच तुला सांगता आले, आम्ही ऐकतो आहोत. शब्दात जे कधी अडकायचे नाही ते तुला विस्ताराने सांगता आले ना? मग झाले तर, सांग काय झाला दोघांचा संवाद?"

श्रोत्यांना बोध कळतो आहे आणि आणखी पुढे जाणून घेण्याची तीव्र उत्कंठा आहे हे पाहून निवृत्तीदास ज्ञानदेव म्हणाले, "महाराज ऐकावे, आतापर्यंत चाललेला संवाद आपल्याला विदितच आहे. तेव्हा तो ध्यानात ठेवून पुढचा भाग ऐकावा.

देव म्हणाले, "अर्जुना, अशा भूमिकेतून कर्म करता करता जो मुक्त झाला अशा धन्य पुरुषाचे लक्षण तुला सांगतो. अगदी बारकाईने सांगतो लक्षात घे.

जो ज्ञानसंपन्न झाला त्याला कर्माच्या फलाचा वीट येतो. ज्या शांतीच्या शोधासाठी इतर लोक वने, अरण्ये पार करतात ती शांती त्याला घरच्याघरी चालत येऊन वरते. कर्माची बाह्य स्थिती पाहिली तर ज्याला फलाची आकांक्षा आहे अशा सामान्य प्रापंचिकासारखी दिसते पण प्रापंचिक फलापेक्षेने फलाच्या खुंट्यास बांधला जातो. अभिलाषेने कर्म केले असल्याने कर्मफल पक्व झाले की, त्याला भोगावेच लागते, त्यातून सुटतो म्हणूनहि सुटका होत नाही. पण ज्ञानी पुरुषाने अव्वलपासून अखेरपर्यंत फळाची हाव धरलेली नसल्याने फलभोगाशी तो बद्ध होत नाही. त्याने कर्म केले काय आणि न केले काय सारखेच! अर्जुना, अवस्था कशी आश्चर्यकारक आहे बघ. कर्म अगदी उत्कृष्ट रीतीने करावयाचे आणि फलोन्मुख झाल्याक्षणीच त्या कर्मफलाचा त्याग करावयाचा! हा ज्ञानी त्यामुळे इतका सुखी असतो की विचारू नको. त्याची दृष्टि जिकडे पडेल तिकडे

सुखच पिकते. तो जे जे बोलेल तो महाबोधच होतो. नऊ छिद्रांच्या देहात असूनही तो "देही" नव्हे आणि सर्व कर्म करूनही "कर्ता" नव्हे.

परमेश्वर मूळात क्रियाशून्य पण तो त्रिभुवनाचा विस्तार करतो. पण त्याला कर्ता कसे म्हणावे? तो तर कोणत्याच कर्माचा लेप आपल्याकडे घेत नाही. त्याच्या उदास वृत्तीला अभिलाषेचा, कर्तेपणाचा विटाळच होत नाही. त्याची योगनिद्रा न मोडता, अकर्तेपणास घडी न पडता महाभूतांचे समूह उत्तमप्रकारे तो उत्पन्न करतो. जगाला व्यापून आहे पण केव्हाही कोणाचीही नव्हे आणि म्हणून सहजच जग आहे की, गेले याचे भानही त्याच्या ठिकाणी नाही. पाप आणि पुण्य त्याच्या लेखी अस्तित्वात नाहीत. अगदी जवळ जरी पाप पुण्य उभे येऊन राहिले तरी हे पाप आणि हे पुण्य असेसुद्धा वेगळेपण त्याला जाणवत नाही. साक्षित्वानेसुद्धा त्याची अनुभूति त्याला येत नाही. परमेश्वराची ही अलिप्तवृत्ती ज्ञानी पुरुषाजवळ असते."

गोरक्षनाथांची कथा प्रसिद्धच आहे. कालच्यासारखे आजही मिष्ठान्न घेऊन ये. भोजन करू व मगच इथून निघू अशी मच्छिंद्रनाथ-गुरूंची आज्ञा झाल्यामुळे आदल्या दिवशी ज्या घरी मिष्ठान्न भिक्षा मिळाली तिथेच गोरक्षनाथांनी भिक्षा मागितली. बाईने आणलेले साधे अन्न पाहून गोरक्षनाथ म्हणाले,"माय, गुरूंनी कालच्यासारखे मिष्ठान्न आण अशी मला आज्ञा केली आहे."

बाई म्हणाली, "आज कुठले मिष्ठान्न? काल घरात ब्राह्मणसंतर्पण होते म्हणून गोडधोड केले होते. आज हीच भिक्षा."

गोरक्षनाथ म्हणाले, "बाई मिष्ठान्न घेतल्यावाचून जाणार नाही. गुरूंची मला मिष्ठान्न भिक्षा आण अशी आज्ञा आहे."

मग बाई जास्तच रागावली, म्हणाली, "खरखरमुंड्या साधू दिसतोस की, गुरूंचे उगीच नाव. गोडधोड खावे ही वासना तुलाच असेल. कामक्रोधादि साही रिपू जिंकल्याशिवाय कसला साधू तू? तू तर अजून एकही जिंकलेला दिसत नाही."

शांत चित्ताने गोरक्षनाथांनी उत्तर दिले, "बाई, जो शत्रू मला माहीत नाही त्याला जिंकायचे ते काय? माझ्या मनात मी त्यांना जाणतच नाही. केवळ गुरूंची आज्ञा म्हणून आलो आहे. तुला हवे ते माग. देतो, पण कृपा करून मिष्ठान्न भिक्षा घाल."

सात जन्माचे पाप उभे राहून बाईच्या तोंडून वदविते झाले, "गुरूंना हवे ना गोड जेवण? मग दे डोळा काढून."

आणि मिष्ठान्न पात्र समोर येताच गोरक्षांनी सहज डोळा काढून तिच्यापुढे ठेवला! क्रोध नाही, खेद नाही, खंत नाही. गुरूंची आज्ञा आपण पाळली एवढीच वृत्ती आणि गुरूंनी "दे दुसराही काढून" असे म्हटल्यावर क्षणार्धात दुसऱ्याही डोळ्याचा त्याग अशी ही धगधगीत अनासक्ती! अर्जुना, अशा ह्या योग्यांना परमेश्वरासारखे

अखंड अलिप्तत्व प्राप्त झालेले असते. देव अनेक सगुण रूपे धरतो, इंद्रियगोचर होतो, नाना प्रकारच्या लीला करतो. पण त्या सर्वशक्तिमानाचे निराकारत्व ह्या सगुण आकाराने मळत नाही. इकडे सगुण क्रीडा चाललेली असताना तिकडे तो आपल्या निर्गुण स्वरूपात शांत, स्वस्थ, निराकार असतो. तो उत्पन्न करतो, पालन करतो, संहार करतो असे जे विश्वरचनेसंबंधी बोलले जाते ते अज्ञान आहे असे समज. आता या योग्यांचे हे अज्ञान समूळ नष्ट झालेले असते. भ्रांतीची काजळी झडलेली असते आणि म्हणून ईश्वराचे करून न करणे म्हणजे काय हे त्यांना कळते. इतकेच नव्हे तर हेही प्रचितीस येते की एकटा ईश्वरच अकर्ता नव्हे तर आपण जे ब्रह्मरूपच आहोत तेही अकर्ताच आहो. एकदा या विकेकाचा चित्तात उदय झाला की, त्रिभुवनात त्याच्या दृष्टीला भेद म्हणून कसा तो दिसतच नाही. सगळे जगच मुक्त आहे हे त्याला जाणवते. एकदा का पूर्वेच्या राजवाड्यात सवितृ देवाचे आगमन झाले की, पूर्वदिशा झळकतेच पण इतरही सर्व दिशा शुद्ध होतात. त्याप्रमाणे आपण ब्रह्मरूप आहो हा अनुभव आला की, सगळे ब्रह्मांडच ब्रह्मरूप आहे हा बोध सहजच प्रकट होतो.

ध्यानावस्थेत पाहिलेले आत्मरूप अहोरात्र दिसावे असा ह्या योग्यास ध्यास लागतो. “मी ब्रह्म आहे” या वृत्तीशी तो पूर्णतया एकनिष्ठ रहातो. असे व्यापक ज्ञान त्याच्या हृदयात ठसले की, त्याची जी समता दृष्टि होते तिचे किती म्हणून वर्णन करावे? आपल्या ठिकाणी विश्व आणि विश्वाच्या ठिकाणी आपण अशी साम्यबुद्धि होते आणि मग भाग्याला दैन्य ठाऊक नाही, विवेकाला भ्रांतीची ओळख नाही, सूर्याला स्वप्नातही अंधाराचे दर्शन नाही, अमृताला मृत्यूवार्ता ठाऊक नाही किंवा चंद्राजवळ दाह नाही तसा या ज्ञानी पुरुषाच्या दृष्टीस भूतमात्रामध्ये भेदभाव दिसत नाही.

पार्था, मग हे चिलट, तो हत्ती, हा चांडाळ, तो ब्राह्मण, हा परका, तो पुत्र असे तो पुरुष कधी म्हणेल काय? तो ब्रह्मभावाच्या ठिकाणी जागा असल्यामुळे ही गाय, तो कुत्रा, एक श्रेष्ठ, एक हीन या कल्पनेचे स्वप्नच त्याला पडत नाही. हा भेद दिसायला जागेवर अहंकार असायला हवा, तो तर त्यांना कधीच सोडून गेलेला असतो, मग भेद दिसावा कसा?

सर्व ठिकाणी सारखे अखंड असणारे ब्रह्मच आपण आहो हे समदृष्टीचे वर्म त्याला कळून चुकलेले असते. इंद्रिये विषय भोगतात भोगू देत. त्यांना शिक्षा करावयाची नाही पण आतून भोगेच्छा मात्र समूळ उपटून टाकायची अशी युक्ती करून ते ज्ञानी निःसंगता जोडतात. लोकात रहायचे म्हणून लोकांसारखा व्यवहार करतात पण सामान्य पुरुषाजवळ असणारे अज्ञान त्याच्याजवळ असत नाही. पिशाच्च फिरत असते पण दिसत नाही. तसा तो संसारात वावरतो पण संसाराच्या तावडीत सापडत नाही. वाऱ्याच्या संगतीने पाणी जागेवरून उठते आणि पाण्यावरच लोळण घेते, निरनिराळे खेळ करते आणि ह्या मजेच्या क्रीडेला लोक कौतुकाने लाट म्हणतात पण असते निव्वळ पाणीच. तसेच अर्जुना, त्या योग्यास देह असल्याने नामरूप वरवरचे असते पण खरे म्हणजे तो केवळ ब्रह्मच असतो. त्याच्या मनाने ब्रह्माशी एकरूपता साधलेली असते, साम्यावस्थेस ते मन पोचलेले असते असा पुरुष काही लक्षणांनी युक्त असतो. तुला तो ओळखता यावा म्हणून अर्जुना, त्याची काही लक्षणे तुला सांगतो. घाबरू नको. फार पाल्हाळ लावीत नाही. अगदी थोडक्यात सांगतो ऐक!

मृगजळाच्या पुराने जसा पर्वत ढकलला जात नाही तसा प्रापंचिक सुख दुःखाने त्यातील अनुकूल-प्रतिकूल अनुभूतींचा त्याच्या मनावर परिणाम होत नाही. सुख आणि दुःख या दोहोंचाही अनुभव तो स्थिर बुद्धीने

घेत मन चलित होऊ देत नाही किंबहुना त्याचे मन चलित होतच नाही. पांडुसुता, त्याला ब्रह्मच मानावे.

आपली ब्रह्मपदावरील वसती सोडून तो योगी इंद्रियाच्या गावीही येत नाही मग विषय भोगत नाही यात नवल काय? आत्मसुखाने त्याचे मन इतके ओतप्रोत भरलेले असते की, ते तृप्त मन बाहेर पाऊलच टाकत नाही. कमलाच्या पानावर स्वच्छ सुंदर चंद्रप्रकाश जेवलेला चकोर वाळवंटास चोच लावतो काय? ज्याला आत्मसुखाची प्राप्ती झाली तो आपल्या ठिकाणीच इतका तृप्त असतो की, विषयसुखाची त्याला आठवण देखील होत नाही. विषयसुखाची गोडी आपोआप सहजच संपते.

आणि तसा थोडा विचार केला तर अर्जुना, विषयसुखाने कोण तृप्त होतो? दरिद्री पुरुष दुसरा उपाय नाही म्हणून भूकेची आग शमविण्यासाठी कोंडा खातो. तहानेने व्याकुळ झालेली हरणे खरे पाणी विसरून, बरड रानात दिसणारे फसवे मृगजळ पाहून त्या पाण्याने तहान भागवावी म्हणून धावत सुटतात. तसेच ज्यांना आत्मसुखाची गोडीच माहीत नाही ते अभागी जीवच फक्त दुष्काळात ते कदान्न खावे तसे विषय गोड आहेत असे मानून त्यांच्या अनुभवात रंगून जातात.

अर्जुना, अरे विजेच्या लोळाने जर जगात प्रकाश टिकत असता तरच विषय संयोगाने सुख होते असे म्हणता आले असते. क्षणभर प्रतीत होणाऱ्या ह्या सुखाभासाने जीवाला खऱ्या सुखाचा लाभ होतच नाही आणि म्हणूनच शाश्वत सुखाच्या शोधासाठी जीव यत्न करतो. वारा, पाऊस, ऊन यापासून ढगाच्या सावलीने जर आपले संरक्षण झाले असते तर तीन तीन मजल्यांचे संगमरवरी पक्के वाडे आपण कशाला बांधले असते? तसेच ह्या विषयसुखाचे आहे. ज्यांचा क्षणाचा भरवसा नाही, त्याला सुख म्हणणे म्हणजे विषाचे कांदे वाटून त्याचा रस काढून त्या पेयाला अमृत म्हणण्यासारखे आहे. मंगळाचे नाव मंगळ पण तो पीडाकारकच होतो. मृगजळाला उगीचच जल म्हटले जाते. मंगळास मंगळ असे नाव देऊन तो मंगलकारक होत नाही किंवा मृगजळास जल म्हटल्याने ते तहान भागवू शकत नाही. त्याप्रमाणे विषयास विषयसुख म्हणून ती सुखप्रद होत नाहीत. हे राहू दे! अर्जुना, कितीही कडक उन्हाळा असला तरी उंदराला नागाच्या फडीची सावली कितपत सुखाची होईल. जोपर्यंत माशाने गळ गिळला नाही तोवर आमिष चांगले त्याप्रमाणे विषयाचा संग जोवर होत नाही तोवरच ते चांगले. पंडुरोगाने फुगलेला मनुष्य जसा धष्टपुष्ट म्हणता येत नाही त्याप्रमाणे ज्ञानी पुरुषाच्या दृष्टीस, विषयसुखात सुखाचा लेशही दिसत नाही. हे सुख नव्हे तर खरोखर दुःखच आहे. पण काय करावे? त्याच्या भोगाशिवाय मूर्खांचे भागतच नाही, पूयपंकातील किड्यांना जशी त्या घाणीची किळस येत नाही तसेच ह्या लोकांचे होते.

एकदा एका राजगृहात एक साधू गेला. राजाने त्याचा चांगला आदर सत्कार केला. पण साधूच्या चेहऱ्यावर घृणा दिसत होती. राजाने विचारले, “महाराज, काय झाले? आपल्याला इथे काही त्रास होतो आहे काय?”

साधू म्हणाला, “मला इथे फार घाण येते आहे.”

राजा म्हणाला, “महाराज घाण कशी येईल? राजमंदीर सर्व स्वच्छ धुतलेले आहे. जागोजागी सुगंधी

जलाची कारंजी उडत आहेत. अगरू चंदन कोना कोनात दरवळतो आहे. सुगंधी फुलांच्या माळा सर्वत्र लावल्या आहेत. अंगणातही केशराचा सडा घातला आहे. मग घाण कुठून आणि कशाची येणार?"

साधू म्हणाला, "राजा मला इथे विषयसुखाच्या मग्नतेची घाण येत आहे." राजाने आश्चर्याने पहात म्हटले, "आम्हाला तर इथे कसलीच घाण येत नाही."

साधू म्हणाला, "राजा, उद्या तू माझ्याबरोबर फिरायला ये म्हणजे तुला उलगडा होईल." राजाला जिज्ञासा होतीच. तो साधूबरोबर फिरायला निघाला. साधूने त्याला चांभारवाड्यात नेले. चामड्याचे सर्व प्रकार आणि ते कमविण्याच्या सर्व अवस्था तिथे चालल्या होत्या. दुर्गंधी असह्य होऊन राजाने नाकाला शेल्याचा पदर लावला आणि तो समोरचे दृश्य पाहू लागला. त्या दुर्गंधीतच चांभाराच्या घरातील सर्व माणसे आनंदाने वावरत होती. मुले खेळत पळत होती. बायका गृहकृत्य करीत होत्या. पुरुष कामे करीत होते. दुर्गंधीचे त्यातल्या एकालाही भान होते असे दिसेना. राजाने साधूकडे पाहून म्हटले, "महाराज, ह्या घाणीत ही माणसे इतक्या आनंदाने कशी राहू शकतात? त्यांना घाणीची जाणीवच दिसत नाही."

साधू म्हणाला, "राजा, कालच्या तुझ्या शंकेचे समाधान झाले ना? अहोरात्र ह्या घाणीतच वावरत असल्याने त्यांना घाणीची जाणीवच उरलेली नाही. आपण स्वच्छ हवेतून आल्यामुळेच केवळ आपल्याला ती कळली. विषयात अहोरात्र बुडलेल्यांना विषयाची घाण कशी येईल?" राजाचे डोळे उघडले.

देव म्हणाले, विषयसुखात मग्न असलेल्या जीवाला विषयाची घृणा तर नाहीच पण आवड असते, उत्कंठा असते. त्या विषयभोगात उत्पन्न होणारे दुःख हेच त्यांचे जीवन असते. हे विषयाच्या चिखलात लोळणारे बेडूक त्या अवस्थेत रहाणे भाग्याचे समजतात. मासा पाण्याबाहेर जगू शकत नाही तसेच ते विषयत्यागाचा विचारही सहन करू शकत नाहीत. दुःखयोनी म्हणून जितक्या आहेत तितक्या सर्व ह्या भोगातूनच जीवाला मिळत असतात. आता भाग्यवशात जीवाने विषय त्यागच करून टाकला तर त्या योनी निरर्थकच होतील की नाही? विषयासक्ति मनातून समूळ गेली की गर्भवासाचे दुःख, जन्म-मरणाचे कष्ट संपतीलच ना? ज्या वाटेवर क्षणाचा भरंवसा नाही पण जी अखंड वहातेच आहे ती जन्म-मरणाची रहदारी बंदच पडेल की नाही? विषयभोगच संपले तर महादोषांना रहायला जागाच उरायची नाही आणि संसार हा शब्ददेखील खोटाच म्हणावा लागेल. विषयदुःख सुख म्हणून ज्यांनी आनंदाने, कौतुकाने स्वीकारले आहे त्यांच्या ह्या फसगतीस अज्ञान म्हणावयाचे. अर्जुना, विचार करून पाहिले तर ठरते की विषयच सर्व अनर्थाचे कारण आहे. या भयानक वाटेला अर्जुना, तू चुकूनसुद्धा जाऊ नकोस बरं का! विरक्त पुरुष विषयांचे हे खरे विषमय स्वरूप ओळखून त्याचा झडझडून त्याग करतात. अर्जुना, तू तसा हो रे. तुला त्या ज्ञानी पुरुषांच्या अवस्थेचे पुन्हा एकदा वर्णन करून सांगतो म्हणजे ती प्राप्त करून घेणे तुला सोपे जाईल.

हे ज्ञानी देहात आहेत पण त्या देहाच्या संदर्भात उठणाऱ्या सर्व वृत्ती ते स्वतःच्या ताब्यात ठेवतात. वृत्ती अनुकूल असल्याने विषयांचा गोंगाट त्यांच्या कानापर्यंत पोहचतच नाही. त्यांनी दारेच बंद केली आहेत. आता ह्या अशा एकांतात बाह्य जग अंधुक होता होता नाहीसे होते आणि अंतःकरणात एका नव्या अवर्णनीय सुखाचा उदय होतो. हे सुख त्या मनाचा कोनाकोपरा भरून टाकते. "मी आहे" ही जी शेवटची जाणीव तिचा ही

अनुक्रमणिका

आडपडदा गळून पडतो. पक्षी फळ खातो तसा ह्या सुखाचा त्रयस्थ अनुभव नव्हे तर जसा काही पक्षी पक्षीपण संपून केवळ फळरूप होतो, तसे घडते. मी आहे, मी सुख भोगतो आहे, हा मी, हे सुख, ही भोगण्याची क्रिया हेदेखील संपून तो ज्ञानी सुखरूप, सुखमयच होऊन जातो. ह्या सुखाच्या आलिंगनात पाण्यात पाणी मिसळावे तसा तो मिसळून जातो. काय सांगू तुला अर्जुना, ती अवस्था! आकाशात वायू हरपून जावा आणि वायूही संपावा आणि आकाशही उरू नये तसे घडते आणि ह्या मीलनातले केवळ एक सुखच दुथडी वाहून ओसंडू लागते.

द्वैताची भाषाच संपते. ऐक्य आहे असे म्हणणारा कोणीतरी आस्तित्वात असावा लागतो तोही इथे उरलेला नाही.

पार्था, असू दे हे बोलणे. जे शब्दाने व्यक्त करण्यासारखे नाहीच त्याबद्दल कितीही जरी बोलले तरी काय उपयोग? ज्यांनी आत्मसुखाचा अनुभव घेतला, जे त्यात रंगून गेले त्यांनाच ह्या बोलण्यातील मर्म कळेल.

जे ह्या सुखाने धुंद झाले आणि आपल्या ठिकाणी आपल्या स्वरूपात रममाण झाले ते एकरूपतेचे ओतीव पुतळे असे मी समजतो. ते आनंदाचे प्रतिबिंब, सुखाचे अंकुर आणि महाबोधाचे मंदीरच जसे काही! विवेक ह्या गावी राहतो. परब्रह्माचा ते स्वभावच म्हणावे. ब्रह्मविद्येच्या अंगावरले हे जसे काही दागिनेच आहेत. हे शुद्ध सत्त्वाने घडविलेले सात्त्विक व चैतन्याचे अवयवच आहेत.

यावर श्रीनिवृत्तिनाथ म्हणाले, “ज्ञानदेवा, वर्णन तरी किती कराल? तुम्ही संतांच्या स्तुतीत रंगला की, कथेच्या ओघाचे तुम्हाला स्मरणच राहत नाही. आम्हालाही भान उरत नाही, इतका अपूर्व आनंद मिळतो आहे. तुमच्या ह्या स्तुतीमधील शब्द अगदी अपूर्व, सुंदर असतात पण ज्ञानदेवा, आता गीतेचा अर्थ सांगायला हवा. मनात उचंबळलेला हा संतप्रेमाचा पूर जरा आवरून धरा आणि गीतार्थाच्या दिव्यात तूप घाला. अहो, ही सर्व सज्ञन श्रोते मंडळी आपआपल्या हृदय राउळात तुमच्या बोधाच्या मंगल उषेची वाट पहात तिष्ठत उभी राहिली आहेत.”

गुरूंचा हा इशारा निवृत्तिदास ज्ञानेश्वरांना मिळाला आणि मग ते म्हणाले, “खरे आहे महाराज, आता सांगतोच, श्रीकृष्ण काय म्हणाले ते.” देव पुढे म्हणाले, “अर्जुना, आत्मप्रकाशाच्या झळझळीत प्रकाशात अनंत सुखाच्या डोहामध्ये हे ज्ञानी एकदम तळाशी जाऊन स्थिर झालेले असतात आणि त्या सुखात विरून जातात. देही असूनही तू त्यांना खुशाल परब्रह्म समज. जे पद या पुरुषांनी मिळवलेले असते ते खरोखर परमपद असते. त्याचा क्षय होत नाही की विस्तारही कळत नाही. निष्काम पुरुषच या गावाचे अधिकारी आहेत. महर्षींची ही मिरासदारी आहे आणि जे संशयरहित झाले त्यांच्यासाठी सदैव पिकणारे शेत आहे.

ही एक अपूर्व आनंदाने लागलेली झोपच आहे. विषयांपासून ज्यांनी आपले मन हिसकावून आपल्या ताब्यात घेतले आहे अशा महात्म्यांना ही सुखनिद्रा लागते. अर्जुना, अरे एकदा ते असे झोपले की उठतच नाहीत. हेच ते ब्रह्मज्ञानी पुरुषांचे साध्य, मोक्षरूप ब्रह्म होय.

पाच महाभूतांनी बनलेल्या ह्या क्षणभंगूर देहात असून त्यांनी हे ब्रह्मपद कसे मिळवले असे तुला वाटेल.

थोडक्यात ह्या सुंदर मार्गाचे वर्णन करतो.

ह्या ज्ञानी पुरुषांनी प्रथम जर कसला आधार घेतला असेल तर तो वैराग्याचा! मग मनात बाणलेल्या ह्या वैराग्याच्या जोरावर, विषयाचे चाललेले चिंतन हाकलून देऊन मनाची वृत्ती ते शरीराच्या एका विशिष्ट ठिकाणी एकाग्र करतात. इडा, पिंगला आणि सुषुम्ना ह्या तिन्ही नाड्यांचा भुवयांच्या टोकाला जिथे मिलाफ होतो तिथे ते ज्ञानी दृष्टि स्थिर आणि अंतर्मुख करतात. उजव्या आणि डाव्या नाकपुडीतून जात-येत असलेल्या वायूची गति बंद करून हृदयस्थ वायू व अपानस्थ वायू याची समगति करून चित्त मूर्ध्नि आकाशाकडे जाणारे करतात. ओढे, ओहोळ सामावून घेऊन गंगा जेव्हा समुद्रात प्रवेश करते तेव्हा समुद्राशी एकरूप होऊन जाते आणि मग हे ओढ्याचे पाणी हे गंगेचे पाणी असे वेगवेगळे दाखवताच येत नाही. तसेच मन जेव्हा वायूच्या आधाराने चिदाकाशात प्रवेश करून लीन होते तेव्हा इतर वासनांची विवंचना संपून जाते. वासनांचे आस्तित्वच संपते आणि हे अगदी सहजासहजी घडून जाते. सरोवराचे पाणी आटून गेले की जसे काठावरच्या झाडांचे प्रतिबिंब पाण्याबरोबरच नाहीसे होते त्याप्रमाणे ज्यावर ह्या संसाराचे चित्र उमटते तो मनोरूपी पडदाच फाटून गेल्यामुळे संसारही उरत नाही. मनाचे मनपण मुदलात संपल्यावर शरिरात राहूनच ते अनुभवी ज्ञानी ब्रह्म होतात. आता तो मार्ग तुला सांगितला त्या मार्गाने आल्यामुळेच हे ज्ञानी ब्रह्मपदाची प्राप्ती करून घेतात.

या मार्गात त्यांनी यमनियमांचे डोंगर पार केले आहेत. अभ्यासाचे समुद्र ते पोहून आले आहेत. स्वतःला वासनेचा स्पर्शही होऊ न देता शुद्ध होऊन संसाराचा हिशोबच त्यांनी संपवलेला असतो आणि म्हणून एकमेव सत्य पदार्थ जे ब्रह्म त्याच्याशी एकरूप होतात.

योगाचा हा मार्ग जेव्हा देवांनी सांगितला तेव्हा तो सगळा उपदेश ऐकून अर्जुनाचे मन विस्मयाने भरून गेले. त्याच्या चेहऱ्यावर नवा मार्ग, नवा प्रकाश दिसल्याचा आनंद दिसू लागला. अर्जुनाच्या चेहऱ्यावरचा विस्मय, आनंद भगवंताच्या लगेच लक्षात आला. ते हसले आणि म्हणाले, “पार्था, हा मार्ग तुला आवडला काय रे?”

अर्जुन हात जोडून म्हणाला, “देवा दुसऱ्याच्या मनातले विचार तर तुम्हाला क्षणार्धातच कळतात की. माझ्या मनातील भाव तुम्ही अगदी बरोबर ओळखला. मी जे विचारावे, विचारावे म्हणत होतो ते आपण जाणलेच आहे. आता तो योग मला स्पष्ट करून सांगा ना. पोहण्यापेक्षा पायउतार सोपा. तसा हा मार्ग ऐकून तरी चालायला सोपा असावा, असे वाटते. ज्ञानमार्गाहून हा मार्ग जास्त स्पष्ट आणि सुलभ वाटतो आहे. आमच्यासारख्या दुबळ्या प्रापंचिकांना अभ्यासाला जरा जास्त वेळ लागेल पण तोही सोसू की. देवा, पुन्हा एकदा ह्या मार्गाचे विवेचन करा. होईना का विस्तार, पण अगदी प्रथमपासून अखेरपर्यंत हा योगमार्ग मला समजून सांगाल का?”

देव म्हणाले, “हो का? हा मार्ग तुला इतका आवडला? छान झाले, अर्जुना, सांगतो ना. अरे, विचारणाराच भेटत नाही, अगदी आनंदाने तुला हा योगमार्ग सांगतो. तू ऐकतोस आणि ऐकले असेल त्याप्रमाणे वागतोस मग आमचे सांगायला काय जाते?”

आधीच आईचे मन, त्यात लाडक्या मुलाची मागणी, मग आईला प्रेमाचा उमाळा किती येतो हे काय सांगावे! देवांचे डोळे कृपेचा वर्षाव करू लागले. कारुण्यरसाच्या ह्या वृष्टीने नव्या प्रेमाची सृष्टिच उत्पन्न झाली. हरीच्या त्या दृष्टीचे वर्णनच करता येत नाही. ती जशी काही अमृताचीच ओतली होती. प्रेम पिऊन मत्त झाली होती. अर्जुनाच्या प्रेमाने त्याच्यावर खिळून राहिली. तिथून ती निघेचना.

वर्णन करता करता पुष्कळ बोलता येईल. कथेचा पुष्कळ विस्तारही होईल पण त्या प्रेमाचे स्वरूप शब्दात सापडावयाचे मात्र नाही आणि त्यात आश्चर्य काहीच नाही. त्या परमेश्वरास स्वतःच्या प्रेमाचा स्वतःलाच अंत वा पार माहीत नाही मग दुसऱ्यांना कसा काय कळणार? मागच्या बोलण्यावरून असे वाटते आहे की, देव अर्जुनाच्या प्रेमात इतके गुंतले आहेत की, अर्जुन ऐकत नसता तरीही देवांनी "ऐक रे बाबा", असे म्हणून बलात्काराने ऐकवले असते. आता तर "सांगाच" अशी प्रत्यक्ष अर्जुनाचीच विनंती आली, मग अगदी उल्हासाने देव म्हणाले, "पार्था, तुला या मार्गाचा अगदी साद्यंत बोध होईल या पद्धतीनेच तुला समजावून सांगतो. योगाचे नाव काय, त्याचा उपयोग काय, या योगमार्गाचे अधिकारी कोण हे जे जे यासंबंधी असेल ते ते ज्ञान तुला सांगतो, तू लक्षपूर्वक ऐक.

श्रीहरी आता पुढे तो बोध करीत आहेत. अर्जुनाशी असलेल्या सख्यत्वात बिघाड न होऊ देता देव योगमार्गाचे वर्णन करतील तो प्रसंग पुढच्या अध्यायात वर्णन करतो असे निवृत्तिदास ज्ञानदेव म्हणतात.

***

अनुक्रमणिका

॥ श्री ॥

## अध्याय सहावा

# आत्मसंयमयोग

॥ ॐ नमो भगवते वासुदेवाय ॥

श्रीभगवानुवाच—

अनाश्रितः कर्मफलं कार्यं कर्म करोति यः ।
स संन्यासी च योगी च न निरग्निर्न चाक्रियः ॥ १ ॥

यं संन्यासमिति प्राहुर्योगं तं विद्धि पाण्डव ।
न ह्यसंन्यस्तसंकल्पो योगी भवति कश्चन ॥ २ ॥

आरुरुक्षोर्मुनेर्योगं कर्म कारणमुच्यते ।
योगारूढस्य तस्यैव शमः कारणमुच्यते ॥ ३ ॥

यदा हि नेन्द्रियार्थेषु न कर्मस्वनुषज्जते ।
सर्वसंकल्पसंन्यासी योगारूढस्तदोच्यते ॥ ४ ॥

उद्धरेदात्मनाऽऽत्मानं नात्मानमवसादयेत् ।
आत्मैव ह्यात्मनो बन्धुरात्मैव रिपुरात्मनः ॥ ५ ॥

बंधुरात्माऽऽत्मनस्तस्य येनात्मैवात्मना जितः ।
अनात्मनस्तु शत्रुत्वे वर्तेतात्मैव शत्रुवत् ॥ ६ ॥

जितात्मनः प्रशान्तस्य परमात्मा समाहितः ।
शीतोष्णसुखदुःखेषु तथा मानापमानयोः ॥ ७ ॥

ज्ञानविज्ञानतृप्तात्मा कूटस्थो विजितेंद्रियः ।
युक्त इत्युच्यते योगी समलोष्टाश्मकाञ्चनः ॥ ८ ॥

सुहृन्मित्रार्युदासीनमध्यस्थद्वेष्यबंधुषु ।

साधुष्वपि च पापेषु समबुद्धिर्विशिष्यते ॥ ९ ॥

योगी युञ्जीत सततमात्मानं रहसि स्थितः ।
एकाकी यतचित्तात्मा निराशीरपरिग्रहः ॥ १० ॥

शुचौ देशे प्रतिष्ठाप्य स्थिरमासनमात्मनः ।
नात्युच्छ्रितं नातिनीचं चैलाजिनकुशोत्तरम् ॥ ११ ॥

तत्रैकाग्रं मनः कृत्वा यतचित्तेन्द्रियक्रियः ।
उपविश्यासने युञ्ज्याद्योगमात्मविशुद्धये ॥ १२ ॥

समं कायशिरोग्रीवं धारयन्नचलं स्थिरः ।
संप्रेक्ष्य नासिकाग्रं स्वं दिशश्चानवलोकयन् ॥ १३ ॥

प्रशान्तात्मा विगतभीर्ब्रह्मचारिव्रते स्थितः ।
मनः संयम्य मच्चित्तो युक्त आसीत मत्परः ॥ १४ ॥

युञ्जन्नेवं सदाऽऽत्मानं योगी नियतमानसः ।
शान्तिं निर्वाणपरमां मत्संस्थामधिगच्छति ॥ १५ ॥

नात्यश्नतस्तु योगोऽस्ति न चैकान्तमनश्नतः ।
न चाति स्वप्नशीलस्य जाग्रतो नैव चार्जुन ॥ १६ ॥

युक्ताहारविहारस्य युक्तचेष्टस्य कर्मसु ।
युक्तस्वप्नावबोधस्य योगो भवति दुःखहा ॥ १७ ॥

यदा विनियतं चित्तमात्मन्येवावतिष्ठते ।
निःस्पृहः सर्वकामेभ्यो युक्त इत्युच्यते तदा ॥ १८ ॥

यथा दीपो निवातस्थो नेङ्गते सोपमा स्मृता ।
योगिनो यतचित्तस्य युञ्जतो योगमात्मनः ॥ १९ ॥

यत्रोपरमते चित्तं निरुद्धं योगसेवया ।
यत्र चैवात्मनाऽऽत्मानं पश्यन्नात्मनि तुष्यति ॥ २० ॥

सुखमात्यन्तिकं यत्तद्बुद्धिग्राह्यमतीन्द्रियम् ।

वेत्ति यत्र न चैवायं स्थितश्चलति तत्त्वतः ॥ २१ ॥

यं लब्ध्वा चापरं लाभं मन्यते नाधिकं ततः ।
यस्मिन्स्थितो न दुःखेन गुरुणाऽपि विचाल्यते ॥ २२ ॥

तं विद्याद् दुःखसंयोगवियोगं योगसंज्ञितम् ।
स निश्चयेन योक्तव्यो योगोऽनिर्विण्णचेतसा ॥ २३ ॥

संकल्पप्रभवान्कामांस्त्यक्त्वा सर्वानशेषतः ।
मनसैवेन्द्रियग्रामं विनियम्य समन्ततः ॥ २४ ॥

शनैः शनैरुपरमेद्बुद्ध्या धृति गृहीतया ।
आत्मसंस्थं मनः कृत्वा न किंचदपि चिन्तयेत् ॥ २५ ॥

यतो यतो निश्चलति मनश्चञ्चलमस्थिरम् ।
ततस्ततो नियम्यैतदात्मन्येव वशं नयेत् ॥ २६ ॥

प्रशान्तमनसं ह्येनं योगिनं सुखमुत्तमम् ।
उपैति शांतरजसं ब्रह्मभूतमकल्मषम् ॥ २७ ॥

युञ्जन्नेवं सदाऽऽत्मानं योगी विगतकल्मषः ।
सुखेन ब्रह्मसंस्पर्शमत्यन्तं सुखमश्नुते ॥ २८ ॥

सर्वभूतस्थमात्मानं सर्वभूतानि चात्मनि ।
ईक्षते योगयुक्तात्मा सर्वत्र समदर्शनः ॥ २९ ॥

यो मां पश्यति सर्वत्र सर्वं च मयि पश्यति ।
तस्याहं न प्रणश्यामि स च मे न प्रणश्यति ॥ ३० ॥

सर्वभूतस्थितं यो मां भजत्येकत्वमास्थितः ।
सर्वथा वर्तमानोऽपि स योगी मयि वर्तते ॥ ३१ ॥

आत्मौपम्येन सर्वत्र समं पश्यति योऽर्जुन ।
सुखं वा यदि वा दुःखं स योगी परमो मतः ॥ ३२ ॥

अर्जुन उवाच—

योऽयं योगस्त्वया प्रोक्तः साम्येन मधुसूदन ।
एतस्याहं न पश्यामि चञ्चलत्वात्स्थितिं स्थिराम् ॥ ३३ ॥

चञ्चलं हि मनः कृष्ण प्रमाथि बलवद्दृढम् ।
तस्याहं निग्रहं मन्ये वायोरिव सुदुष्करम् ॥ ३४ ॥

श्रीभगवानुवाच—

असंशयं महाबाहो मनो दुर्निग्रहं चलम् ।
अभ्यासेन तु कौन्तेय वैराग्येण च गृह्यते ॥ ३५ ॥

असंयतात्मना योगो दुष्प्राप इति मे मतिः ।
वश्यात्मना तु यतता शक्योऽवाप्तुमुपायतः ॥ ३६ ॥

अर्जुन उवाच—

अयतिः श्रद्धयोपेतो योगाच्चलितमानसः ।
अप्राप्य योगसंसिद्धिं कां गतिं कृष्ण गच्छति ॥ ३७ ॥

कच्चिन्नोभयविभ्रष्टश्छिन्नाभ्रमिव नश्यति ।
अप्रतिष्ठो महाबाहो विमूढो ब्रह्मणः पथि ॥ ३८ ॥

एतन्मे संशयं कृष्ण छेत्तुमर्हस्यशेषतः ।
त्वदन्यः संशयस्यास्य च्छेत्ता न ह्युपपद्यते ॥ ३९ ॥

श्रीभगवानुवाच—

पार्थ नैवेह नामुत्र विनाशस्तस्य विद्यते ।
न हि कल्याणकृत्कश्चिद्दुर्गतिं तात गच्छति ॥ ४० ॥

प्राप्य पुण्यकृताँल्लोकानुषित्वा शाश्वतीः समाः ।
शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायते ॥ ४१ ॥

अथवा योगिनामेव कुले भवति धीमताम् ।
एतद्धि दुर्लभतरं लोके जन्म यदीदृश्यम् ॥ ४२ ॥

अनुक्रमणिका

**तत्र तं बुद्धिसंयोगं लभते पौर्वदेहिकम् ।**
**यतते च ततो भूयः संसिद्धौ कुरुनन्दन ॥ ४३ ॥**

**पूर्वाभ्यासेन तेनैव ह्रियते ह्यवशोऽपि सः ।**
**जिज्ञासुरपि योगस्य शब्दब्रह्मातिवर्तते ॥ ४४ ॥**

**प्रयत्नाद्यतमानस्तु योगी संशुद्धकिल्बिषः ।**
**अनेकजन्मसंसिद्धस्ततो याति परां गतिम् ॥ ४५ ॥**

**तपस्विभ्योऽधिको योगी ज्ञानिभ्योऽपि मतोऽधिकः ।**
**कर्मिभ्यश्चाधिको योगी तस्माद्योगी भवार्जुन ॥ ४६ ॥**

**योगिनामपि सर्वेषां मद्गतेनान्तरात्मना ।**
**श्रद्धावान्भजते यो मां स मे युक्ततमो मतः ॥ ४७ ॥**

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे "आत्मसंयमयोगो नाम" षष्ठोऽध्यायः ॥ ६ ॥

श्रीकृष्णार्पणमस्तु ।

----------

संजय धृतराष्ट्राला सांगू लागला, “राजा, जो योग तुला सांगतो असे देव अर्जुनाला म्हणाले तो योग या अध्यायात सांगणार आहेत. अर्जुनाची जिज्ञासा आता चांगलीच खवळली असल्याने अर्जुन अगदी लक्षपूर्वक ऐकणार आहे. ब्रह्मरसाच्या मेजवानीचा बेत अर्जुनासाठी देवांनी योजला खरा, पण आमचे भाग्य इतके प्रबळ की, आम्ही अगदी अवचित पाहुणे म्हणून तिथे पोचलो आहो. आता अर्जुनाच्या पंक्तीचा लाभ आपल्याला खासच मिळणार. श्रीमंताघरी मेजवानी आहे तिथे चार-दोन पाने जास्त काय आणि कमी काय? आपल्या भाग्याचे मात्र वरचेवर नवल वाटते आहे. तहानेने व्याकुळ झालेल्या माणसाने पाणी पिण्यासाठी ओंजळ तोंडाजवळ न्यावी आणि चव घेऊन पहावी तर ते अमृतच असावे, तसेच आपले झाले हो! युद्धाची वार्ता ऐकण्यासाठी आणि सांगण्यासाठी आपण इथे राजमहालात दोघे बसलो आहो काय आणि अचानक आपल्याला ब्रह्मज्ञानाचा लाभ होतो काय! वाहवा, कसे दैव अनुकूल!”

संजयाचे हे बोलणे धृतराष्ट्राच्या कानी पडले मात्र! धिक्काराच्या स्वरात तो म्हणाला, “संजया, तुला हे विचारले कुणी पण? युद्धाची वार्ता सांगशील की, उगीच वायफळ बडबड करशील”.

या शब्दामुळे राजाचे मन संजयाला कळले. तो आपल्याशी हसला. मनातच म्हणाला, “म्हाताऱ्याच्या मनात पुत्रमोहाशिवाय काहीच उरलेले नाही. इतक्या उत्कृष्ट बोधाच्या वेळीही हा मोहाने दुहेरी अंध होऊन केवळ मुलांचाच विचार करीत बसला आहे. बिचाऱ्याचा पूर्ण नाश केला या कुपुत्रांवरच्या आंधळ्या मायेने. जात्यंध हा, ह्याला दृष्टि यावी कशी? हे असेच व्हावयाचे. आपण आपला आनंद मुकाट्याने भोगावा झाले.”

धृतराष्ट्रास राग येईल म्हणून संजय यावर प्रकट काहीच बोलला नाही. पण कृष्णार्जुनाच्या संवादाने त्याला मात्र अतिशय संतोष झाला. त्या संतोषाने रंगूनच मोठ्या आदराने संजय धृतराष्ट्राला त्या दोघांचे बोलणे सांगेल.

श्रोते हो, गीतेमधला हा सहावा अध्याय फार महत्त्वाचा आहे. बुद्धिच्या सामर्थ्याने तो समजून घेतला पाहिजे. क्षीरसमुद्रातून उत्तम म्हणून जशी अमृताची निवड झाली; तशीच ह्या अध्यायाची महती आहे. गीतेच्या अर्थाचे सार ह्या अध्यायात आहे. विचाररूपी समुद्राचे परतीर असा हा अध्याय म्हणजे निरनिराळ्या योगमार्गाचे खुले ऐश्वर्य भांडारच आहे. मूळ मायेचे हे विश्रांतीस्थान आहे. वेदांना जे सांगता आले नाही; ते प्रकट करता करता इथून गीतावेल विस्तार पावते आहे. हा अध्याय बोधाच्या दृष्टीने तर सर्वोत्कृष्ट आहेच, पण साहित्याच्या निकषावरही अति उत्तम ठरेल अशाच पद्धतीने सांगितला जाणार आहे. आपण लक्षपूर्वक ऐका. भाषा मराठी म्हणून उपेक्षा करू नका.

अहो, हे मराठीच शब्द; पण इतके गोड जमविलेले असतील की, अमृताबरोबर पैज जिंकतील. गोडपणाने अमृतापेक्षा मधुर आणि गायनातल्या रागदारीपेक्षा नादाने कोमल असतील. सुवासापेक्षाही मन मोहून टाकण्यास समर्थ होतील. इतका रसाळपणा ह्या शब्दांच्यामध्ये असेल की कानाला जिभा उत्पन्न झाल्यामुळे इतर इंद्रियांतही भांडण सुरू होईल. सहज विचार केला तर शब्द हा कानाचा विषय; पण रसना तृप्त होईल. घ्राणेंद्रियांना वाटेल, “ह्या शब्दांना किती अपूर्व गंध आहे; तेव्हा हे शब्द माझाच विषय आहेत.” या बोलण्याचा

आकारबंध इतका रेखीव की रूपाची खाणच डोळ्यापुढे उघडली असे दिसून डोळे तृप्त होतील. संपूर्ण पद जिथे पुरे होईल, तिथे मन बाहेर धावत येईल आणि त्या पदाला उराउरी आलिंगन देण्यासाठी बाह्या पसरील. आपापल्यापरीने ही इंद्रियांची झोंबाझोंबी चालू असताना आकाशात उगवलेला एकुलता एक सूर्य जसा सर्व जग प्रकाशमान करून टाकतो; त्याचप्रमाणे ह्या वाक्याचे असे अद्भूत  सामर्थ्य असेल की ती सर्व इंद्रियांची एकाच वेळी तृप्ती करतील. शब्दांचे व्यापकत्व असे असाधारण असेल. भाव जाणून घेण्याची ज्याला इच्छा असेल; त्याला तर सर्व मनोरथ पूर्ण करणाऱ्या चिंतामणीसारखे ते वरप्रद होतील.

बृहदारण्यकामध्ये अशी हकीकत आली आहे की, एकदा देव, मानव आणि दानव उपदेशासाठी ब्रह्मदेवाकडे गेले. बरीच तपश्चर्या झाल्यावर ब्रह्मदेवांनी प्रसन्न होऊन देवांना उपदेश केला. उपदेश एकाक्षरी होता "द". ब्रह्मदेवांनी विचारले, "कळले का?" देव म्हणाले, "हो कळले". स्वर्गामध्ये भोगांची लयलूट म्हणून आपण सांगितले "दाम्यत" दमन करा, संयम करा. ब्रह्मदेव म्हणाले, "बरोबर कळले तुम्हाला." नंतर पुढे झाले मानव. त्यांनाही तोच उपदेश केला. "द". आणि विचारले, "कळले का?" मानव म्हणाले, "हो कळले." आम्हाला संग्रहाची फार लालसा म्हणून आपण उपदेश केला "दत्त" दान करा. ब्रह्मदेव म्हणाले, "बरोबर जाणले तुम्ही." पाठोपाठ दानव आले. त्यांनाही तोच उपदेश केला "द". दानव म्हणाले, "ध्यानात आले. आम्ही हिंसाचारी आमच्या मनांत क्रोध फार म्हणून आपण उपदेश केला आहे. "दयध्वम्" दया करा. ब्रह्मदेव प्रसन्न मुद्रेने म्हणाले, "बरोबर समजले तुम्हाला."

इथे एकच "द" जसे ज्याच्या त्याच्या स्वभावानुसार फलप्रद झाले; तसेच हे सहाव्या अध्यायातील शब्द सर्व प्रकारच्या श्रोत्यांचे पूर्ण समाधान करतील.

कैवल्यरसाने भरलेली ही शब्दांची ताटे मी निष्काम संतांसाठी वाढली आहेत. हा सर्व खटाटोप विरक्तांसाठी आहे. आता जेवणाराची मात्र परीक्षा आहे. अज्ञानाचा काळाकुट्ट अंधार दाटलेला आहे, अशा स्थितीत आत्मप्रभेचा स्थिर दिवा समोर ठेवून इंद्रियांना दाराबाहेर लोटून देऊन एकान्तात जो जेवील त्यालाच ह्या मेजवानीचा लाभ होईल. शब्दांच्या वरली साल हळूच काढून आतील ब्रह्माशी एकरूप झाले की, मग सुखामध्ये सुखाने रंगून जाता येईल. मनाला जर असा इतका हळुवारपणा आला तरच हे उपयोगाचे आहे. तसे न झाले तर मात्र ह्या सर्व गोष्टी मुक्या-बहिऱ्यांच्या संवादासारख्या होतील. ज्यांनी अभिलाषेचा पूर्ण त्याग केला आहे असे अधिकारी श्रोते इथे बसले असल्याने त्यांची परीक्षा करण्याचे किंवा त्यांना ऐका अशी विनंती करण्याचे काही प्रयोजनच नाही. आत्मबोधाच्या गोडीने ज्यांनी स्वर्गसंसाराची कुरवंडी करून टाकली त्यांच्याशिवाय इतरांना इथे चाललेल्या ह्या संवादाचे वैभव कळणारच नाही, त्यात गोडीच वाटणार नाही. कावळ्याला चंद्रप्रकाशात रस नाही तसाच प्रपंचात रमलेल्या प्राकृत जनास ह्या ग्रंथाविषयी प्रेम नाही. अहो, चंद्रकिरण हे चकोराचे खाद्य आहे; कावळ्याचे नव्हेच. तसे हे आहे. अज्ञानी लोकांना ह्या गावाची वाट चालण्याची इच्छाच होत नाही. तेव्हा त्याबद्दल फारसे बोलावे असे नाही.

तरीही आतापर्यंत जे हे धीटपणाने बोललो ते सज्जनांनी सहन करावे. खरे म्हटले तर हा विषय बुद्धीला कळणे फारच कठीण. शब्दांनी व्यक्त करणे अशक्यच. मग पुढे कळण्याचा प्रश्न! पण निवृत्तिनाथांच्या कृपेचा दिवा उजळला आहे. त्या उजेडात मला या ग्रंथाचा अर्थ दिसेल आणि त्यांच्याच कृपेने मी तो आपल्यापुढे विशद

करीन. श्रीरंगानी काय सांगितले ते आता सांगतो. ऐकावे महाराज, “जे दृष्टीच्या टप्प्यातले नव्हे ते अतिन्द्रिय ज्ञानाच्या बळाने दृष्टीच्या सहाय्याशिवायच दिसेल. किमयेनेही प्राप्त न होणारे सोने परिस मिळाला की विनासायास हस्तगत होतेच की नाही? तसेच येथे होईल. सद्‌गुरूकृपा झाली तर ती काय देणार नाही? आणि ती तर मजवर अपार आहे. मग मला काय कमी आहे?” असे ज्ञानेश्वर म्हणाले.

ऐका, यश, श्री, औदार्य, ज्ञान, वैराग्य आणि ऐश्वर्य हे सहाही गुण ज्यांच्या ठिकाणी आहेत आणि जे विरक्तांचे सखे आहेत असे भगवंत म्हणाले, “पार्था, आता लक्ष देऊन ऐक बरं का! अरे, कर्मयोगी आणि संन्यासी हे वेगवेगळे मानशील. चुकून तसे कधी करू नको बरं का. विचार केलास तर तुला कळेल की, वरवर दोन प्रकारचे वाटणारे हे माझे भक्त आतून सारखेच आहेत. नावे दोन पडली आहेत इतकेच. तो आभास टाकून दिला तर ते एकच आहेत, हे तुला कळेल. एकाच पुरुषाची दोन नावे असावी किंवा एकाच गावात जाण्यासाठी दोन मार्ग असावेत तसे हे आहे. कोणत्याही नावाने हाक मारली तरी एकच पुरुष ओ देतो किंवा कोणत्याही वाटेने गेले तरी एकच गाव येते, त्याप्रमाणे या कोणत्याही मार्गाने गेले तरी ब्रह्मत्वाचीच प्राप्ती होते. ब्रह्माच्या दृष्टीने काही फरक पडत नाही. एकच पाणी सहज दोन निरनिराळ्या आकाराच्या घड्यात भरावे तसे ह्या कर्मयोग व संन्यास यांचे भिन्नत्व आहे. कर्माचे आचरण उत्तमप्रकारे करतो पण कर्मफलाची आसक्ति धरत नाही; तोच योगी असे या जगामध्ये सर्वानुमते ठरले आहे. ही पृथ्वी अहंबुद्धिशिवाय धान्याला जन्म देते आणि धान्य तयार झाल्यावर त्यातले काही आपल्याला मिळावे अशी चुकूनही इच्छा करीत नाही, तसेच या योग्याचे असते.

हा पुरुष कुल आणि जात यांना अनुसरून जे कर्म क्रमाने समोर येते ते उचितपणे करतो. जे शरीर हे कर्म करीत आहे त्या शरिराबद्दल अहंभाव धरत नाही किंवा बुद्धीला त्या कर्माच्या फलापर्यंत पोचू देत नाही. खात्रीपूर्वक सांगतो; अर्जुना, ऐक. अरे, तोच कर्मयोगी, तोच संन्यासी! तोच योगीराज आहे, असे ओळख. प्रसंगाने उचित असलेले कर्म सोडले आणि मनाशी म्हटले की, “हे कर्म मला बंधनकारक होत होते; त्याचा मी त्याग करून टाकतो; आता मी मुक्त आहे.” तर अडचण अशी होते की, त्याच क्षणी दुसरे कर्म त्याच्या मागे लागते आणि तो ह्या नव्या कर्माच्या बंधनात सापडतो. एक लेप काढावा आणि दुसरा चढवावा तसेच हे होते आणि आग्रह धरल्याचे कष्ट मात्र पदरात पडतात. गृहस्थाश्रमाचे ओझे कपाळी आधी आहेच. ते कष्टप्रद म्हणून टाकून दिले आणि आग्रहाने संन्यास घेतला तर, संन्यासी जीवनाची खडतर व्रते पाठीमागे लागतातच. कष्ट, क्लेश चुकतच नाहीत. म्हणून प्राप्तकर्माची रेषा ओलांडली नाही आणि अग्नीची सहज प्राप्त झालेली सेवा करीत राहिले तर, विनासायास आपण आहो तिथेच योग सुखाची आपल्याला प्राप्ती होते.

अनेक शास्त्रांनी गुढी उभारून प्रसिद्ध केले आहे की, संन्यासी आणि योगी हे एकच आहेत. कारण ह्या दोघांनी टाकून दिलेला संकल्प पूर्णतया तुटून जातो आणि मग त्यांना योगाचे सार भेटते. शास्त्राने सांगितलेली ही एकवाक्यता त्यांच्या प्रत्यक्षच अनुभवास येते आणि खरी ठरते. ज्याला ह्या योगमार्गाचे शिखर गाठावयाचे असेल त्याने कर्मयोगाच्या पायऱ्या मुळीच टाळू नयेत. उत्तम कर्म करीत करीत पायरी पायरीनेच वर जावे.

अष्टांग योगाचा विचार केला तर, योगाचळाच्या पायथ्यास पोहचण्यास यम म्हणजे इंद्रियनिग्रह आणि नियम म्हणजे मनोनिग्रह करावयास हवा. अष्टांग योगामध्ये यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा,

ध्यान, समाधी असा क्रम येतो. पातंजल योगसूत्राप्रमाणे यम पाच-अहिंसा, सत्य, आस्तेय, ब्रह्मचर्य व अपरिग्रह आणि नियम-शुचिता, संतोष, तप, स्वाध्याय, ईश्वर प्रणिधान असे पाच सांगितले आहेत. हटयोगप्रदीपिकेत यम दहा व नियम दहा सांगितले आहेत.

ज्ञानदेव म्हणतात, "साधक यमनियमरूपी पायथ्यावरून आसनाच्या पायवाटेवर येतो. प्राणायामाच्या अभ्यासाने योगरूपी डोंगराच्या मध्यभागावर येतो. मग विषय जवळ आला तरी इंद्रिये विषयाधीन न होता मनाधीनच रहातात. त्या प्रत्याहार नावाने प्रसिद्ध असलेल्या भूमिकेच्या तुटलेल्या उभ्या कड्यावरून तो चढावयास सुरवात करतो. हा कडा इतका निसरडा आहे की, बुद्धीचे पाय तिथे सारखे निसटत रहातात आणि कधी कधी हटयोग्यांनाही आपला हट्ट सोडावा लागतो. पण अभ्यासाच्या बळाने प्रत्याहाराच्या कड्यावर वैराग्याची नखी हळूहळू रोवली जाते. प्राण आणि अपान या वायूच्या वाहनाचा आश्रय करून धारणेच्या प्रशस्त प्रांतात ध्यानाचे शिखर मागे टाकेपर्यंत तो चालतो. येथपर्यंत प्रवास झाला की, मार्गावरून चालणे संपते आणि साध्य व साधन यांच्या गाढ मिठीमध्ये दोन्ही एक होऊन जातात. भविष्यकाळ नाहीसा होतो. भूतकाळ पुसला जातो आणि वर्तमानाच्या अतिसूक्ष्म कालामध्ये समाधी स्थिर होते.

श्रीमत् सत्यदेवानंदानी मलकापूरला विचारले होते, "सबंध ज्ञानेश्वरीमध्ये कोणती ओवी तुम्हाला आवडते?" प्रश्न जरा अवघड वाटला पण उत्तर त्याक्षणी तरी फारच सोपे होते. कारण त्या ओवीच्या आधारानेच प्रवास चालला होता. हात जोडले आणि म्हटले, "स्वामीजी—

**ऐशी कर्मसाम्यदशा ।**
**होय तेथे वीरेशा ।**
**मग श्रीगुरु आपैसा । भेटेचि गा ॥**

ही ओवी मला क्षणाक्षणाला आठवते."

स्वामीजी म्हणाले, "माझी सर्वांत आवडती ओवी आहे—

**जेथ पुढील पैस पारुखे ।**
**मागील स्मरावे ते ठाके ।**
**ऐसिये सरसिये भूमिके । समाधि राहे ॥"**

मालूताई, असे या ओवीचे महत्त्व आहे. कृष्णमूर्तींच्या विवेचनाची आठवण होते. भूतकाळ संपला म्हणून खोटा, भविष्यकाळ यावयाचा आहे म्हणून खोटा, सत्य फक्त वर्तमानाचा Split Second! आणि तेवढेच Truth! या सत्याची जाणीव असणे, अनुभव असणे ही समाधी! सर्व थोरांचा अंतिम अनुभव एकच असल्याने अभिव्यक्ती व्यक्तिगत असली तरी आशय एकच असतो. ह्या अनुभूतीस देशकालाचेही बंधन असत नाही.

ज्ञानेश्वर पुढे म्हणतात, "अर्जुना, अशा प्रकारे योगसंपन्न होऊन जो परिपूर्ण झाला, त्याच्या जीवनात

काही चिन्हे स्पष्ट दिसतात. ती कोणती ते तुला सांगतो.

आत्मबोधाच्या खोलीत तो स्वस्थ झोपलेला असतो. इंद्रियरूपी घराची दारे उघडी असतात. पण विषय आत शिरू शकत नाही. एकदा एक भिक्षू आत्मचिंतन करीत चालला असता समोरून एक मनुष्य धावत आला आणि भिक्षूस थांबवून विचारू लागला, “महाराज, माझी बायको हरवली आहे हो. आपल्याला वाटेत एखादी स्त्री जाताना दिसली काय?”

संथपणाने त्या भयभीत माणसाकडे पाहात भिक्षूने उत्तर दिले, “इकडून एक हाडाचा सापळा गेला खरा, पण स्त्री की पुरुष ते काही मला माहीत नाही.”

सुखदुःखे त्याच्या मनाला धक्के देत असतात; पण त्याचे मन जागे होत नाही किंवा विषय जवळ आले तरी हे काय आहे असे उत्सुकतेने पहात नाही. इंद्रिये आपापली कर्मे करतात; पण त्याच्या अंतःकरणात त्या कर्माच्या फलाची अपेक्षा कधीच येत नाही. तो देहधारी असतो, जागाही असतो पण एखाद्या झोपलेल्या माणसाला जसे देहाचे भान नसते तशी त्याची स्थिती असते. जो साधक या अवस्थेला पोहचला तो उत्तमप्रकारे योगारूढ झाला असे समज.

रमणमहर्षींच्या आयुष्यातला प्रसंग आठवतो. सोळा-सतरा वर्षांची ही मूर्ती घर सोडून निघाली. अरुणाचलावर पोहचल्यावर त्यांनी मिठाई, थोडेसे पैसे, जानवे आणि लंगोटीशिवाय उरलेले कपडे तळ्यात फेकून दिले. मनात विचार असा, “To this block why give sweetmeats?”

डोक्याचे केस उतरविले. लगेच स्नान करायला हवे हेही भान उरले नव्हते. पण वरुणराजाने कृपा करून स्नान आपोआप घातले. लोकांचा उपद्रव न व्हावा म्हणून पाताळलिंग नावाच्या एका गुहेत त्यांनी आसन घातले आणि साधना सुरू केली. असे किती दिवस निघून गेले माहीत नाही. त्या अंधारी गुहेतल्या कीटकांनी महर्षींच्या अंगाचे लचके तोडले. अंगभर गळवे झाली पण आत्मानंदात मग्न असलेल्या महर्षींना त्या शारीरदुःखाचे काही भानही नव्हते. एकच झाले की ह्या कठोर साधनेमुळे शेषाद्रिस्वामींचे लक्ष त्यांच्याकडे गेले आणि त्यांनी उनाड मुलांपासून जो उपद्रव स्वामींना होत असे त्याला आळा घातला. पण हे दुसऱ्याने केले. स्वतः स्वामींना त्या यातनांचे भानही नव्हते. अशी ही विदेहावस्था!

देह असून विदेही असणाऱ्या ह्या योग्यांची कथा ऐकून अर्जुनाला फारच चमत्कार वाटला. तो म्हणाला, “अनंता, किती आश्चर्यकारक अवस्था ही! मला सांग अशा ह्या योग्यतेला ह्या योग्यांना कोण नेऊन पोहचवते?”

अर्जुनाचे विचारणे ऐकून देवांना हसू आले. ते म्हणाले, “अर्जुना, काय हा तुझा प्रश्न? हा सर्व अद्वैताचा प्रांत आहे. इथे कोणी कोणाला काही देऊ शकत नाही. सामरस्य साधायचे आहे आणि तेही आपले आपण. हे बघ जीव वस्तुतः परमात्म स्वरूपच आहे. अविवेकाच्या अंथरुणावर त्याला अज्ञानाची गाढ झोप लागते आणि आपण जन्माला आलो, मेलो असली वाईट वाईट स्वप्ने त्याला पडतात. “असत्य, विनाशी असा जो देह तो मी आहे” असा खोट्याचा अभिमान जीव धरतो आणि आपला आपण घात करून घेतो. भ्रम झालेला मनुष्य “अहो,

मला कुणीतरी चोरून नेले आहे, मी इथे नाही, मला शोधायला मदत करा." असा आक्रोश करतो आणि खोटा छंद घेऊन दुःखी होतो. तसा हा जीव स्वतःच निर्माण केलेल्या कोशांत अडकलेल्या किड्याप्रमाणे आपला आपण घात करून घेतो. शरीर हे उत्तम ठिकाण आहे व ते माझे खरे स्वरूप आहे अशी त्याने समजूत करून घेतली आहे. निधान मिळण्याच्या क्षणीच कमनशिबी माणसाला आंधळेपणाचे डोहाळे व्हावे आणि आपले ऐश्वर्य मुक्त मनाने भोगावे त्याऐवजी त्याने डोळे झाकून घ्यावे तसेच हे घडते. अरे, स्वप्नात अंगावर घाव पडला म्हणून कुणी खरोखरच मृत्युमुखी पडतो काय? जीवाचे मुळचे स्वरूप जसे आहे तसेच कायम असते पण काय करावे. त्याच्या बुद्धिने त्याला भलत्याच ठिकाणी भरवसा ठेवण्यास सांगितलेला असतो.

"देह नित्य आहे, देह म्हणजेच मी" अशा विचाराच्या झोपेत असलेला जीव कायमचा झोपलेला मात्र रहात नाही. ही निद्रा कधी तरी संपतेच. जागृती आल्याक्षणीच जन्म व मृत्यू ही दोन्ही खोटी आहेत हे त्याला कळते. धनंजया, आता त्याने देहाहंकार टाकला आहे आणि आपण नित्य आहो असा त्याला अनुभव येत आहे. नित्य वस्तूशी एकरूप होऊन आता त्याने सहजच आपले आपण कल्याण करून घेतले आहे पण हे जोवर घडले नाही तोवर पोपट धरण्यासाठी बांधलेल्या नळीवर पोपट बसतो, लगेच उडून जावे तर तसे न करता आपण बांधले गेलो, अडकलो, अशी समजूत करून घेऊन उलट सुलट गिरक्या घेता घेता गुंतत जातो आणि सहज पारध्याच्या हातात सापडतो; तसा हा प्रपंचवृक्षावर येऊन बसलेला जीवपक्षी स्वतःच निर्माण केलेल्या संकल्पामुळे प्रपंचाच्या जाळ्यात अधिकाधिक गुंतत जातो. अर्जुना, नळीवर बसलेला तो मुक्त पोपट उगीचच मान फिरवितो, भ्यालेल्या मनाने नळीला छाती भिडवितो, चोचीने ती नळी घट्ट धरून ठेवतो. त्याच्या मनातली "आपण बांधले गेलो आहो" ही शंका काही केल्या सुटत नाही. काहीतरी वेडीवाकडी धडपड करता करता आपले मोकळे चवडे देखील तो गुंतवून घेतो. निष्कारण अडकलेला तो दीन पक्षी अर्धा तोडला तरी नळी सोडत नाही. पार्था, अरे त्याला कोणी बांधला आहे काय? तो तर मुक्तच आहे पण तो आपणच आपल्याला बंधनात टाकतो आणि आपण मुक्तच आहो ही जाणीवच विसरतो, तसेच जीवाचे होते. नकळत वाढत जाणारा संकल्प जीवाला बंधात टाकतो. पण एखादा भाग्यवान ह्या भ्रमातून जागा होतो. संकल्पामुळे आपला आपणच शत्रू झालेला हा जीव लगेच आपला आपण मित्र होतो. गुरूकृपेमुळे "देह खोटा आहे, देह मी नव्हे, मी चिरंतन शुद्ध आत्मा आहे" असा त्याला बोध होतो. हिणकस सोन्यातून किडाचा दोष दूर झाला की जसे बावन्नकशी सोनं दृष्टीस पडते तसे संकल्प लोप झाल्याबरोबर जीवाचे ब्रह्मत्व सिद्ध होते. देहाचा अभिमान सुटल्याबरोबर अंतःकरण जिंकले जाते आणि सर्व प्रापंचिक इच्छा विरून जातात. आता त्याच्या चित्तात संकल्पच उरत नाही. अशा पुरुषाला परमात्मा दूर कुठेतरी लांब वाटतच नाही, तो जीवच पण ब्रह्मसंकल्प होऊन जातो.

सिद्धचरित्रात म्हटले आहे, "गुरूंनी मला शिवमंदिरात हात धरून नेले.

**"देऊळी जाऊन शिव पाहिला**
**तव जीवचि माझा गेला."**

श्रीपतिनाथांची अशी अवस्था झाली तीच साधकाची होते. घटामध्ये आजवर सामावलेले चिमुकले आकाश जसे घट फुटल्याक्षणीच आकाशाशी एकरूप होऊन जाते. आता आकाशाला भेटूया असे त्याला म्हणावे लागत नाही त्याप्रमाणे मी देह आहे, हा अहंकार गेला की, जीव आपल्या मूळच्या खऱ्या स्वरूपाशी म्हणजे

अनुक्रमणिका

परब्रह्माशी अनायासे एकरूप होऊन जातो.

ही अवस्था प्राप्त झाली की, थंड, उष्ण हे भेद, सुख दुःख ही निवड, हा मान तो अपमान ही जाणीव त्या पुरुषाच्या ठिकाणी उरत नाही. सूर्य ज्या वाटेने जातो तो तो प्रांत जसा प्रकाशमय होतो तसे त्याला जे जे येऊन भेटते ते ते परब्रह्मरूपच होऊन जाते. ढगापासून निघालेल्या धारा जशा समुद्राला टोचत नाहीत तशी त्या योगीश्वराला सुखदुःखे जाणवत नाहीत. कुठल्याही काळात लहानथोर हा भेद त्याच्या दृष्टीला दिसत नाही. शुद्ध सोन्याचा मेरू एवढा ढीग आणि मातीचे ढेकूळ यांची किंमत त्याला सारखीच वाटते. पृथ्वीचे मोलही कमी पडेल असे अमूल्य शुद्ध रत्न त्याला दगडासारखे वाटते.

मग हा माझा सुहृद, हा माझा शत्रू, हा उदास, हा मित्र, असा भेदभाव त्या योग्याच्या मनात येईल अशी कल्पना कशी करावी? सर्व विश्वात मीच भरून राहिलेला आहे अशी ज्याला प्रचिती आली त्याला बंधु कुठला? आणि शत्रू तरी कुठला? त्याच्या दृष्टीला अधम वा उत्तम हा भेदच दिसत नाही. परिसाचीच कसवटी असल्यावर त्यावर घासलेले सोने कमीअधिक कसाचे होईल काय? उत्तम दर्जाचेच सोने जसे तयार होते त्याप्रमाणे त्या योग्याच्या वृत्तीचे होते. विश्वालंकार जरी वेगवेगळ्या आकाराचे दिसले तरी ते परब्रह्मरूपी एकाच सोन्याचे घडविलेले आहेत, या साम्यबुद्धीचा अखंड उदय त्याच्या ठिकाणी असतो. ही उत्तम प्रकारची जाणीव त्याला लाभलेली असल्यामुळे वरवरच्या आकाराने तो फसत नाही. वस्त्राकडे नजर टाकली तर तंतूंच्या समुदायाची सृष्टि दिसते. तंतूवाचून दुसरा पदार्थच त्या ठिकाणी नसतो. त्याप्रमाणे नजर टाकावी तिकडे त्याला ब्रह्माचेच दर्शन घडत असते. तसा ज्याला रोकडा अनुभव आला तोच समबुद्धि झाला असे निश्चित समज.

**त्याचेच नाव तीर्थराज!**
**त्याच्याच दर्शनात समाधान!**
**त्याच्याच संगतीत अज्ञान्यास ब्रह्मज्ञानाची प्राप्ती!**
**धर्म त्याच्या शब्दात जगतो!**
**सिद्धी त्याच्या दृष्टीत जन्म घेतात!**

स्वर्गसुखादि सुखे त्याच्याजवळ खेळतात. अर्जुना, अरे अशा पुरुषाची सहज आठवण झाली तरी त्याची योग्यता आपल्याला मिळते. त्याची स्तुती करण्यात आपल्याला लाभ होतो.

कधीच मावळत नाही अशा अद्वैत दिवसाचा प्रकाश त्याच्या चित्तात प्रकटला असल्याने तो निरंतर आत्मसुखात मग्न असतो. असा जो विवेकी, तिन्ही लोकात असूनही परिवारशून्य अवस्थेत नांदतो तो अद्वितीयच आहे असे समज."

पूर्णब्रह्म श्रीकृष्णांनी अशी प्राप्त पुरुषाची अलौकिक लक्षणे अर्जुनाला सांगितली. ज्ञानी पुरुषाचे निमित्त करून देवांनी ही कुणाची लक्षणे वर्णन केली हे काही कळत नाही.

ज्ञानदेव इथे त्या परब्रह्माच्या अनुभूतीने उचंबळून म्हणत आहेत, "अहो, तो भगवंत ज्ञानी पुरुषाचा

पिता आहे. पहाणाऱ्यांच्या दृष्टीचा दिवा आहे. त्या समर्थाच्या नुसत्या संकल्पाने ह्या प्रचंड विश्वाची रचना झाली आहे. प्रणवांच्या पेठेमध्ये तयार झालेले शब्दब्रह्माचे महावस्त्र त्या देवाच्या "यश" या पहिल्या गुणाला वेढावयासही पुरले नाही. पुढचे श्री, वैराग्य, औदार्य, ज्ञान व ऐश्वर्य हे पाच गुण उघडेच राहिले. जगाला प्रकाशमान करणारे रवि-शशी त्या परमात्म्याच्या तेजोंशाने प्रकाशित होतात. भगवंताच्या नामापुढे आकाशही ठेंगणे दिसते. मना, अशा त्या देवाचे गुण तू कसे काय जाणू शकशील? तेव्हा आता वर्णन पुरे कर झाले. कृष्णार्जुनाच्या ह्या अभूतपूर्व संवादाचा विचार कर. असा इशारा मी माझ्याच मनाला दिला आणि त्या दोघांच्या प्रेमाचा विस्तार ध्यानी येऊन फार चमत्कार वाटला. खरे म्हणजे दोघातील द्वैत नाहीसे होऊन सामरस्यच व्हावे अशी उभयतांची अवस्था झाली होती पण देवच सावध राहिले.

मनाशी म्हणाले, "मी जर ब्रह्मविद्या याला आणखी उघडपणाने सांगितली तर हा माझा भक्त माझ्यात विरूनच जाईल. मी देव, हा माझा लाडका भक्त ही भाषाच संपेल. ह्याचे अर्जुनपण गेले आणि हा कृष्णरूपच झाला तर तोंड भरून मी कुणाशी बोलू? कुणाला गाढ आलिंगन देऊ? डोळे भरून पहावे असे मला दुसरे कोण आहे? अतिशय सुंदर विचार मनात न मावण्यासारखे आले तर मी ते कुणाला सांगू? हा माझ्याशी एकरूप झाला तर ह्या सख्यसुखास दोघेही पारखे होऊन सोहंभाव ज्यांच्या दृष्टिपलिकडे आहे आणि मोक्षसुखासाठी जे दीन होऊन बसले त्यांची दृष्ट आमच्या प्रेमास लागेल. तेव्हा बोलण्यात थोडा आडपडदा ठेवावा हे बरे."

देवांना अर्जुनाच्या प्रेमसुखास आंचवण्याची कल्पनाही सहन होईना आणि म्हणून स्वतःबद्दलच करुणा उत्पन्न झाल्याने बोध करताना कुणाचे तरी दुसऱ्याचेच आपण वर्णन करतो आहो असे मिष पांघरून एक पातळसा पडदा मध्ये ठेवला. सख्य भोगण्यासाठी दोन मने शिल्लक ठेवली आणि सख्यत्वही कायम रहावे, द्वैताची किंचित भावना जागी असावी आणि तरीही अद्वैताची खूण पटावी अशी बोलण्याची पद्धत योजिली.

आता हे देवांचे कौशल्य ऐकायला गूढ वाटते पण काय करावयाचे? अर्जुनावरचे देवांचे प्रेमच तसे अलौकिक होते. जसा काही देव म्हणजे अर्जुनावरील प्रेमाचा ओतवलेला पुतळाच! वार्धक्यामध्ये वांझोटीला दैवयोगाने मूल व्हावे आणि मग ती जशी त्या मुलावरील प्रेमाने वेडी होऊन नाचू लागते तशी देवाची अवस्था झाली. प्रेमाची तितकीच तीव्रता दिसली नसती तर मी असे म्हटले नसते पण खरोखर भगवंत अर्जुनप्रेमाने वेडे झाले होते. पहा ना युद्धाचा अति दारुण प्रसंग समोर येऊन ठाकलेला आहे आणि देव ह्या प्रिय भक्ताला ब्रह्मज्ञानाचा उपदेश करीत आहेत. ही वेळ उपदेशाला योग्य आहे की नाही याचा क्षणमात्र तरी देवांनी विचार केला का? भक्ताची मोहाने भरलेली व्याकुळ मनःस्थिती देवांनी पाहिली मात्र, देव लगेच धावले. प्रेमाचे हे चित्रच जसे काही नाचते आहे आणि ते बरोबरच आहे. व्यसनात शिणणे, प्रेमात लाजणे आणि भ्रमात न भुलणे हे कसे शक्य आहे? श्रोते हो, माझ्या म्हणण्याचा भावार्थ असा की, अर्जुन देवांच्या मैत्रीचे आश्रयस्थान होता. आपल्या मनात उचंबळणाऱ्या सुखलहरी पहाण्यासाठी देवांनीच जसा काही हा आरसा मांडून ठेवला होता. अहो, तो अर्जुन खरच अतिशय पुण्यवान, अतिशय पवित्र, भक्तीच्या बीजाला अत्यंत योग्य असे क्षेत्रच असा होता म्हणूनच तो देवांच्या मैत्रीचे आश्रयस्थान होता, त्याच्या एवढ्या कृपेला तो पात्र ठरला. देव जणू काही स्वतःशीच सुखसंवाद करीत आहेत. आत्मनिवेदनाच्या शुद्ध भूमीवर देवांनी सख्यत्वाचे पीठ सिद्ध केले आहे आणि वर अधिष्ठात्री देवता म्हणून अर्जुनाची स्थापना केली आहे. आता या उपमेमध्ये अर्जुनाला महत्त्व दिले व देवांना गौणत्व दिले असे कदाचित् चतुर हो, आपण म्हणाल, पण काय आहे की, देव आणि भक्त जवळजवळ

आले की देवांना वाटते की, माझी स्तुती न करता माझ्या भक्ताचीच स्तुती लोकांनी करावी गुरू शिष्याकडून पराभवाची इच्छा करतो की नाही तसेच हे. “माझ्यापेक्षा माझा शिष्य वरचढ आहे असे ठरले” ही घटना गुरूला किती आनंद देते तसाच आनंद भक्तवर्णन केले की देवांना होतो. एखादी स्त्री पतीवर जीवेभावे प्रेम करते आणि पतीही तिचा सन्मान करतो. मग अशा वेळी पतीपेक्षाही पतिव्रतेचे वर्णन करणे योग्य नव्हे काय? म्हणून माझ्या जीवाला वाटले की, अर्जुनाचीच जास्त स्तुती करावी. अहो, काय सांगावे? त्रिभुवनाचे भाग्य ह्या अर्जुनाच्याच ठिकाणी एकवटले आहे. ज्याने आपल्या भक्तीच्या जोरावर अमूर्त परब्रम्हाला सगुण रुप धरावयास लावले आणि त्या निर्गुणाला प्रेमाची उपाधि उत्पन्न केली त्या अर्जुनाचे किती वर्णन करावे?

ज्ञानेश्वराचे हे विवेचन ऐकून श्रोते तृप्त झाले. ते म्हणू लागले, “काय हो, हा चमत्कार! भाषा पहावी तर तुम्ही आम्ही रोजच्या व्यवहारात वापरतो ती मराठीच पण आज त्याच भाषेत ज्ञानदेवांनी काय बहार केली आहे पहा. अलंकार पाहून वाटते आहे की, क्षणाक्षणास नवनव्या रंगांच्या ढगांचे लेणे घालणाऱ्या आकाशासारखे ह्या विवेचनाचे स्वरूप आहे. एका सौंदर्याचा आस्वाद घ्यावा न घ्यावा तोवर त्यापेक्षाही अनुपम सौंदर्य ज्ञानेश्वर समोर मांडत आहेत. ज्ञानाचे चांदणे किती स्वच्छ पडले आहे. त्या विवेचनातले निरनिराळे स्पष्ट आणि गर्भित अभिप्राय हा त्या चांदण्याचा गारवा आहे. त्या चांदण्यामुळे मूळ गीतेतील श्लोकांची चंद्रविकासी कमळे कशी सहजच विकसित होत आहेत. निरिच्छ पुरुषाला देखील हे साहित्य वेड लावील” असे श्रोत्यांच्या मनात येऊ लागले आणि ऐकण्यासंबंधीचे आणखी मनोरथ करीत ते डोलू लागले, त्यांना भानही उरले नाही.

निवृत्तिदास ज्ञानेश्वरांनी श्रोत्यांची ही मनःस्थिती ओळखली आणि ते श्रोत्यांना हाक मारून म्हणाले, “ऐका हं, पुढे सांगतो आहे. पांडवांच्या कुळामध्ये ह्या श्रीकृष्णरूपी दिवसामुळेच प्रकाश आहे. देवकीने नऊ मास त्याचा भार वाहिला, यशोदेने नेत्राचा दिवा करून त्याचे परिपालन केले. पण तो शेवटी उपयोगाला गेला पांडवांच्या. सर्वच पांडव इतके भाग्यवान की, त्यांना त्याची फार दिवस सेवाही करावी लागली नाही की, वेळप्रसंग पाहून, प्रसन्नता साधून हळूच विनवणी करावी हेही करावे लागले नाही. तो आपोआपच त्यांच्या स्वाधीन झाला.”

श्रोते आता फारच अधीर झाले होते. ते म्हणाले, “ज्ञानदेवा, लक्षात आले अर्जुनाच्या भाग्याचे अपूर्वपण. पण आता पुढे काय संवाद झाला तो सांगा.”

श्रोत्यांची ही विनवणी ऐकून ज्ञानेश्वर भानावर आले. देवभक्तांची गाथा गाता गाता तेही स्वतःचे नामरूप पूर्ण विसरून जाऊन लीन होऊन जाण्याच्याच भूमिकेवर आले होते. मालूताई, मला पुष्कळदा वाटते की, अशा प्रकारचे जे संवाद ज्ञानेश्वरीत अधून मधून विखुरले आहेत ते माऊलीनी स्वतःचीच अवस्था खाली उतरविण्यासाठी लिहिले आहेत. मिष केले आहे कधी अर्जुनाचे कधी संजयाचे!

सावध होऊन ज्ञानदेव म्हणाले, “सांगतो. अर्जुन ह्या सगळ्या वर्णनाने चकित झाला. आपल्याला ही योगावस्था प्राप्त व्हावी अशी तीव्र इच्छा त्याच्या मनात उत्पन्न झाली पण मनात लगेच शंका आली की, “मी ह्या मार्गाचा अधिकारी आहे काय?”

मग तो सलगीने देवांना म्हणाला, "देवा, आपण ही जी संतांची लक्षणे सांगितली ती मी ऐकली आणि ते ज्या मार्गाने गेले त्या मार्गाने जावे असेही वाटते आहे पण त्यांच्या अंगची लक्षणे मात्र मला माझ्या ठिकाणी अगदीच दिसत नाहीत हो. लक्षणांच्या तात्पर्याचा विचार केला तर मी किती अपुरा आहे हे प्रत्ययाला येते आहे. पण देवा, तुमचे सामर्थ्य इतके प्रचंड आहे की तुम्ही शब्दाने जो उपदेश मला केला त्यामुळे योगाभ्यास करण्याची योग्यतादेखील माझ्या अंगी येईल अशी आशा मला वाटते आहे. तुम्ही लक्ष घातले आणि मी अभ्यास केला तर मला ब्रह्मपदाची प्राप्ती होईलच की. कुणाच्या गोष्टी आपण मला सांगितल्या कुणास ठाऊक पण माझ्या मनात ह्या गोष्टी ऐकूनही इतका संतोष झाला आहे की, असे वाटते आहे ज्यांना ही अवस्था प्राप्त झाली आहे त्यांना काय वाटत असेल! त्यांना काय आणि किती आनंद होत असेल. देवा काही करा पण मी असा होईन हे करा. तुम्ही आमचे स्वामी अहा. तुम्हाला काय हे अशक्य आहे? मला ही अवस्था मिळायलाच हवी. तुम्ही मनात आणले तर हे नक्की घडेल."

अर्जुनाची ही विनवणी ऐकून देव हसले आणि म्हणाले, "पार्था, तुला आवडला का हा मार्ग? मग करूया की तुझे काम!"

सर्वेश्वर बलवंताचा अर्जुन मनोभावे सेवक झाला. त्याने अनन्य शरणागती स्वीकारली. भक्तांच्या मनाची अशी अवस्था झाल्यावर काय उणीव रहाणार? तो संतोषाने परिपूर्ण होतो आणि संतोष मनात बाणला की मग कशाची कमतरता आहे? कलकत्यास नाग महाशय नावाचे देवभक्त होऊन गेले. खूप पाऊस झाला. सगळे घर भिजून, गळून चिंब झाले. एकच खोली कोरडी राहिली होती. रात्रीची वेळ! इतक्यात एक अतिथी आसरा मागण्यासाठी दारात आला. नाग महाशयांनी तत्परतेने त्या एकुलत्या एक कोरड्या खोलीत पांथस्थाचा बिछाना घालून दिला. पत्नीसह आपण घराच्या गळक्या ओसरीत बसले आणि आनंदाने पत्नीला म्हणाले, "चला आज झोपायला जागाच नाही हे किती छान झाले! बसून रात्रभर भजन घडेल. देवाचीही केवढी कृपा झाली."

अर्जुनाची अशीच अवस्था होती. देवाशिवाय अन्य काही तो जाणत नव्हता आणि म्हणून सहजच त्याला ब्रह्मपदाची प्राप्ती झाली. अर्जुनाच्या दैवाच्या भाराखाली दडपल्यामुळे देव कसे फलद्रूप झाले पहा. इंद्रादिकांनी सहस्त्र जन्म घेतले तरीदेखील ज्याची भेट होणे दुर्लभ तो भगवंत त्या दैववान अर्जुनाच्या इतका स्वाधीन झाला की, अर्जुनाला प्रश्न करण्याचे श्रम पडावे हेही त्याला सहन होईना. पुढे काय झाले ते ऐका. "मी ब्रह्म व्हावे" ही अर्जुनाची विनंती देवांनी ऐकली आणि ती मागणी पुरी करण्याचा विचार आरंभला.

सिद्धचरित्रामध्ये श्रीपतीनाथांनी म्हटले आहे—

**काय सांगू सकळ जना । मुमुक्षत्वचि न घडे मना ॥**
**एरवी अनाथांचा पाहुणा । सद्‌गुरुराणा जवळी असे ॥**

विवेक चुडामणीमध्ये म्हटले आहे—

**दुर्लभं त्रयमेवैतद् देवानुग्रह हेतुकम् ।**
**मनुष्यत्वं मुमुक्षुत्वं महापुरुष संश्रयः ॥**

तीन दुर्लभ पदार्थ ईश्वराच्या प्रसादानेच केवळ मिळतात– (१) मनुष्यदेह, (२) मुमुक्षुत्व, (३) महापुरुषाचा सहवास, सत्पुरुषाचा सहवास. अर्जुनाचे भाग्य असे की मनुष्यदेहातील उत्तमात उत्तम असा देह मिळाला होता. भगवंतांच्या सख्यत्वाचा सहवासही लाभलेला होता. पण उदय झाला नव्हता मुमुक्षुत्वाचा! आप्त, इष्टमित्र, गुरूजन यांना युद्धाच्या निमित्ते "शत्रु" ह्या स्वरूपात समोर पाहिले त्याबरोबर विजेचा लोळ उतरला, अर्जुनाचे मन तळापासून ढवळून निघाले आणि त्याच्या मनात खोलवरच्या स्तरामध्ये आजवर गुप्त असलेले मुमुक्षुत्व जाणिवेच्या प्रांतात आले. अर्जुनाच्या मनाचा त्याने पूर्ण ताबा घेतला. देवांना ते जाणवले. त्यांनी विचार केला.

अर्जुनाला मी ब्रह्म व्हावे असे डोहाळे लागले आहेत. बुद्धिच्या पोटी वैराग्य आले आहे. त्याचाच हा परिणाम आहे. दिवस अपुरे खरे पण वैराग्यरूपी वसंतामुळे "मी ब्रह्मच" या भावाचा मोहोर तरी अगदी फांदी मोडेल इतका दाट आला आहे. तेव्हा ब्रह्मपदावर स्थिर होणे हे फळ पदरात पडण्यास फार वेळ लागावयाचा नाही. असा देवांच्या मनाला भरवसा आला आणि आता पार्थ लौकरच निश्चितपणे विरक्त होईल हे त्यांनी जाणले. मन विरक्त झाल्यावर ह्याने अभ्यास केला की, अभ्यासाचे फळ पदरात पडणारच असा विचार करून देव मनात म्हणाले, "याला आता अभ्यासाची रीत सांगूयाच, उपदेश वाया जावयाचा नाही."

दूरवर दृष्टि ठेवून देवांनी उपदेश करावयाचे ठरविले आणि ते अर्जुनाला म्हणाले, "अर्जुना, या मार्गाला "पंथराजु" म्हणतात. प्रवृत्तीरूपी झाडाच्या बुडालाच निवृत्तीची कोट्यवधी फळे लागलेली दिसतात. या मार्गाचा शेवट कोठे होतो हे कळतच नाही. कारण आदिगुरू शंकर हेही या मार्गाचे प्रवासीच आहेत. अजूनही त्यांनी आपले चालणे थांबवलेले नाही. या मार्गात सुषुम्नेच्या संकोचित वाटेने मूर्ध्नि आकाशाकडे झेप घ्यायची आहे. अगणित योग्यांनी ही वाटचाल केली आहे. आणि त्यामुळे ती वाट मळली गेली आणि मागून येणाऱ्या साधकांना कोणत्या मार्गाने जावयाचे याची कल्पना येऊ लागली. एकदा त्या मार्गाची माहिती झाल्याबरोबर आत्मबोधाच्या ह्या सरळ थेट पोहचवणाऱ्या रस्त्याकडे त्यांनी धाव घेतली. त्यांच्या मनाची खात्रीच झाली की, इतर मार्ग अज्ञानाचे आहेत आणि त्यांचा त्याग केला पाहिजे. महर्षी याच वाटेने असल्यामुळे साधकांना सिद्धपद प्राप्त झाले आणि आत्मज्ञानाची थोरवी त्यांनी हस्तगत केली. अर्जुना तुला या मार्गाची योग्यता काय सांगू? एकदा का वाटचाल सुरू झाली की, तहानभूक हे शरीरधर्मदेखील विसरतात. रात्र आणि दिवस ही कालाची मापे संपतात आणि चालता चालता ज्या भूमिकेवर पाऊल पडेल त्या त्या ठिकाणी मोक्षसुखाची खाणच दृष्टिस पडते. समजा जरासा रस्ता चुकलाच तर स्वर्गसुखाचा लाभ होतो. आत्मज्ञानाचा लाभ तर होतोच होतो. पूर्वेकडून निघाले आणि सरळ चालत गेले तर जसे पश्चिमेच्या घरी मनुष्य निश्चिंत पोहचतोच तसा हा मार्ग उजू घरी पोहचवतो आणि मजा अशी की, मुक्कामाला पोहचले की, ते ठिकाण वेगळे रहातच नाही, साधक आपणच ते स्थान होऊन जातो. हे आता शब्दाने कसे सांगू? पण अर्जुना, तुला हे शब्दाने सांगावे लागणार नाही. तुला आपोआपच कळेल".

देवांचे हे बोलणे ऐकून अर्जुनाच्या मनात या मार्गाविषयी इतकी जिज्ञासा उत्पन्न झाली की, तो

म्हणाला, “देवा पण तो मार्ग मला आपण सांगणार तरी कधी? माझ्या मनात तो पथ जाणून घेण्याची इतकी प्रचंड उत्कंठा निर्माण झाली आहे की, त्या समुद्रात मी बुडून जाईन, असे मला वाटते आहे. मला त्या समुद्रातून लौकर काढा नाहीतर मी त्यात बुडालोच बघा.”

देव हसून म्हणाले, “अर्जुना, अरे किती अधिरेपणा तुझा! मी सांगतच होतो तुला! हे बघ, तुझी ही उत्कंठा पाहूनदेखील मला समाधान वाटते. सांगतो ऐक, पण अनुष्ठान केले तर अनुभव मात्र येतोच.

हा अभ्यास करावा अशी ज्याची उत्कट इच्छा असेल त्याने योग्य जागा शोधून काढणे हे पहिले काम आहे. स्थान असे असावे की सहज बसले तरी समाधान व्हावे. असेच बसावे, इथून उठूच नये असे मनाला वाटावे. वैराग्याला भरती यावी. मुळात अशी जागा शोधणारा वैराग्यशील असतोच पण ही जागा अशी मनोहर असावी की, त्याचे वैराग्य दुप्पट व्हावे. रम्यता आणि वैराग्य ही दोन्ही एका घरी कशी नांदतील असा संशय कदाचित तुझ्या मनात येईल पण पार्था, सज्जनांनी हे ठिकाण स्थापन केले असल्याने असे घडते. साधकावरच्या प्रेमामुळे सज्जन एवढे कष्ट आनंदाने घेतात. त्यांच्या चैतन्याने भारून गेलेल्या स्थानात साधकाने प्रवेश केला की, साधकाचे मन “मी निश्चयाने अभ्यास करीनच” या धैर्याने उत्साहित होते आणि मग अभ्यास करावाच लागत नाही, आपोआपच होतो. ही जागाच इतकी रम्य असते की अभ्यासाची सुलभता साधकाच्या प्रत्ययास येत रहाते. साधक उत्साहित होईल यात नवल नाही, पण एखादा पाखंडी जरी चुकून जाता जाता तिथे आला, तरी त्याला असे वाटेल की, “राहूया इथेच. करूया अभ्यास.” वैराग्यशील साधक तर अशी जागा शोधत शोधत येतो पण विषयासक्त प्रपंची चुकूनच तिथे पोहचलेला आहे तरी पण त्या जागेचे सामर्थ्य असे की, तो प्रपंची प्रपंच विसरतो, विषयी विषय विसरतो आणि तिथेच रमतो. परत फिरायचेही त्याला भान उरत नाही. न राहणाऱ्याला रहाविणारे हे स्थान भटकणाऱ्यास एका जागी बसविते आणि त्याच्या मनात झोपलेले वैराग्य थापटून उठविते. विलासी पुरुषास इथे आल्यावर असे वाटते की, राज्य सोडून द्यावे आणि निवांतपणे इथेच रहावे. स्थानच तसे सुंदर असावे, इतके रम्य आणि पवित्र असले पाहिजे की, या ठिकाणी ब्रह्म प्रगटच झाले आहे असे वाटले पाहिजे. आणखी एक पहावे. इथे साधकाचे तप झालेले असावे. त्याचा वास तेथे झालेला असावा. तसेच लोकांची वर्दळ नाही असा एकांत तिथे असावा. सदा फळे देणारी आणि ज्यांची मुळेदेखील गोड आहेत अशी झाडे अगदी दाट ह्या स्थानात उगवलेली असावी. पावलापावलावर पाणी असावे. पावसाळ्यातदेखील ज्यांचे पाणी अगदी स्वच्छ रहात असेल असे झरे तिथे असावे. ऊनदेखील तिथे सौम्य वाटेल इतकी झाडी असावी आणि इथे वारा थंड आणि मंद झुळकांनी वहात असावा. स्थान बहुतकरून निःशब्द असावे. पोपट किंवा भुंगेदेखील तेथे नकोत. श्वापदे तर नकोतच. पाण्यामुळे आलेले हंस किंवा दोन-चार सारस पक्षी असले तरी चालतील. कधी कधी एखादा कोकीळ आला तर त्याला आम्ही नको म्हणत नाही. नेहमी नव्हे पण येऊन जाऊन असणारे मोर असले तर आमचा विरोध नाही. पण आग्रह असा की, अशा ठिकाणी एखादा निगूढ मठ किंवा शिवालय मात्र असावेच. ह्या दोन्हीपैकी जे तुझ्या मनाला आवडेल तिथे एकांतामध्ये बसावे.

अशा ठिकाणी बसल्यानंतर आपले मन तेथे स्थिर होते की नाही हे पहावे. मन स्थिर होत आहे असे दिसले की, आसन रचावे. खाली साग्र दर्भ घालावे. मधे धूतवस्त्राची घडी घालावी आणि वर मृगचर्म अंथरावे. खाली घातलेले दर्भ कोवळे व सारखे पसरलेले असावे. आसन फार उंच होऊ नये कारण मग अंगाला डोल येईल. अगदीच सखल असेल तर भूमिदोष उत्पन्न होतील. फार उंच वा फार सखल आसन नसावे. समांतर

असावे. फार वर्णन करीत नाही. पण थोडक्यात सांगतो की, आसन अशा प्रकारचे असावे.

मग आपण तिथे एकाग्र अंतःकरण करून सद्‌गुरु स्मरण अनुभवावे. सद्‌गुरू मूर्ती समोर आली की, स्मरणाच्या आदराने अहंकाराचा कठीणपणा नाहीसा होतो आणि मन सात्त्विक भावाने भरून जाते. इंद्रियाची चळवळ थांबते आणि विषयाचा विसर पडतो. मनाची घडी हृदयामध्ये बसते. असे ऐक्य प्राप्त होईपर्यंत थांबावे आणि मग त्याच ऐक्याच्या बोधावर असताना आसनावर बसावे.

आता इंद्रिये, मन, बुद्धि एके ठिकाणी आली आहेत, सद्‌गुरू समोर आहेत अशा अवस्थेत अंग अंगाला सावरून धरले आणि वायू वायूला आपण होऊन आवरतो. आता शरीर स्वस्थ आहे, श्वास संथ लयींत चालला आहे अशी अवस्था प्राप्त झाली की, अनुभवाचा उदय होऊ लागतो. प्रवृत्ति माघारी फिरते, समाधी आटोक्यात येते आणि आसनावर बसताक्षणी "अभ्यास करणे" ही क्रिया संपते. अभ्यास करणारे आपण वेगळे उरतच नाही.

मुद्रेची थोरवी कशी ते आधी सांगतो ऐक. पोटऱ्याला चिकटून मांडी घालावी. दोन्ही तळपाय वाकडे करून आधारचक्राखाली सुस्थिर रहातील असे बळकट बसवावे. उजव्या पायाची टाच खाली घालावी. तिने शिवण दाबावी म्हणजे सहजच उजव्या पायावर डावा पाय बसतो. चार बोटे जागेपैकी दीड बोट वर व दीड बोट खाली जागा सोडून मधे जी एक बोट जागा उरते तेथे उजव्या पायाच्या टाचेने आपले अंग तोलून घट्ट दाबावे. उचलला आहे की नाही कळत नाही अशा स्थितीत पाठीचा खालचा भाग उचलावा. अर्जुना, मग हा शरिराचा आकार जसा काही खालच्या पायाच्या टाचेचा वरचा स्वयंभू भागच आहे असा होऊन जातो. अर्जुना, हा मूळबंध किंवा याचेच नाव वज्रासन असे आहे. आधार चक्रावर मूळबंध बसला की खालचा मार्ग बंद होतो. अपानवायू आतल्याआत संकोचित होऊ लागतो. हाताची ओंजळ द्रोणाकार होऊन डाव्या पावलावर बसते आणि दोन्ही खांदे वर चढलेले दिसतात. पाठीचा कणा ताठ होऊन मस्तक घट्ट रहाते आणि डोळ्याच्या पापण्या झाकावयास लागतात. वरच्या पापण्या खाली उतरतात आणि खालच्या खाली पसरतात, अशी अर्धोन्मिलित दृष्टि होते. दृष्टि आतल्या आतच रहाते. जर कधी बाहेर पडलीच तर नेमकी नाकाच्या शेंड्यावर स्थिर होते. दिशांची भेट घ्यावी रूप पहावे ही इच्छा आपोआप नाहीशी होते. कंठनाळ आकुंचित होतो, हनुवटी अडकून बसते आणि छातीत रुतते. कंठमणी अदृश्य होतो. हा जो असा बंध पडतो त्याला जालंदर बंध असे म्हणतात. आता वोढियाणा बंध सांगतो. बेंबी पुष्ट होते, पोट खपाटीस जाते, हृदयकोश फाकतो. स्वाधिष्ठानाच्या वरच्या काठास आणि नाभिस्थानाच्या खालच्या भागास हा जो बंध पडतो त्याला वोढियाणा म्हणतात.

कंठाला जालंधर, बेंबीजवळ वोढियाणा आणि आधारचक्राजवळ मूळबंध अशा बंधत्रयाने हा योगी आपले शरीर आवळून टाकतो. बाहेरच्या बाजूला शरिरावर अशी अभ्यासाची छाया पडते आणि आत मनाच्या चंचलतेचा जोर नाहीसा होतो. कल्पना संपते प्रवृत्ति शमते, शरीर आणि मन सहजच शांत होतात. क्षुधा काय झाली, निद्रा कुठे गेली, याची आठवणही हरपते. क्षुधेचा आणि निद्रेचा अम्मलच संपतोच.

मूळबंधाने कोंडलेला अपान जो माघारी वळलेला असतो तो सहजच वर अडकून फुगवटा धरतो. खवळून तो वायू मस्त होतो, पसरून गुरूगुरू लागतो, आणि तिथे अडकून मणिपूर चक्राला धक्के देऊ लागतो. बळावलेली ती वावटळ सबंध शरिरात शिरून हुडकून हुडकून लहानपणापासूनची कुचकी घाण बाहेर काढते.

आत वळायला जागा नसल्याने कोठ्यात प्रवेश करते, कफ आणि पित्त यांचा थारा राहू देत नाही. सप्तधातूंचे समुद्र पालथे घालते, मेदांचे पर्वत फोडते, अस्थिगत मज्जा बाहेर काढते, नाड्या खुल्या करते. सगळे अवयव सैल करते. साधकाला भीती दाखवते पण त्याने भिऊ नये. ही भीती रोगांचीदेखील दाखवली जाते. रोग होतात आणि जातात. इकडे आसनाच्या उष्णतेने झोपलेल्या कुंडलिनी शक्तीला जाग येते. आटोपशीर साडेतीन वेढे घेऊन ती एखाद्या नागिणीसारखी अधोमुख होऊन स्वस्थ असते. नागाचे पिलू कुंकवात नाहून झोपावे तशी ते दिसते. विजेचे कडे, अग्निज्वाळाची घडी, चोख सोन्याची लडी ह्यांच्यासारखे तेज तिच्यावर लखलखत असते. दाटीवाटीने व्यवस्थित आकुंचित होऊन बसलेली ती नागीण वज्रासनाने चिमटल्याबरोबर जागी होते. नक्षत्र तुटून पडावे किंवा सूर्याने आपले आसन सोडून उठावे तशी ती उठते. यावेळी तेजाला अंकुर फुटावा तसे तिचे रूप दिसते हळूहळू वेढ सोडीत कौतुकाने अंग मोडीत नाभिस्थानाखालील कंदावरून ती उठू लागते. पुष्कळ दिवसांची ती उपाशी आहे त्यात तिला डिवचून जागे केले याचा तिला राग येतो. फूत्कार टाकीत ती सरळ वर तोंड करून प्रथम खाते वायु! हृदयकोशाच्या खाली जो वायू भरलेला असतो, तो ती प्रथम सगळाच्या सगळा संपवते. मग मुखीच्या ज्वाळांनी खाली आणि वर मांसाचे घास खाऊ लागते. ज्या ज्या ठिकाणी मांसल भाग आहे तो ती संपवते. एक दोन घास हृदयाच्या ठिकाणचे पण घेते. तळवे, तळहात शोधते. वरच्या भागाचे भेदन करते. अंगाचा सांधा आणि सांधा झाडून काढते. आपली राहण्याची जागा न सोडता नखाचेही सत्त्व काढते आणि वरची त्वचा धुऊन सापळ्याला चिकटवून ठेवते. अस्थींचा मध्य भाग ओरपते, शिरांच्या काड्या शोषून घेते. आत इतकी उष्णता होते की, त्वचेवरचे केस करपून कोळपून जातात. मग ती सप्तधातूंचे समुद्र पिऊन टाकते. आता तिला तहान लागलेली असते. त्यामुळे शरिरातील सर्व ओलावा ती संपविते आणि अगदी खडखडीत उन्हाळा करते. बारा अंगुळे नाकपुडीबाहेर वाहणारा वारा ती गच्च धरून मागे फिरवते. खालचा अपान व वरचा प्राण हे दोन्ही वायु जणू काय आलिंगन द्यायला पहातात आणि मधे फक्त चक्रांचे पदरच काय ते शिल्लक रहातात. ते दोन्ही एकरूपच व्हावयाचे पण कुंडलिनी दुश्चित असते आणि म्हणते, “आता तुम्हीच काय ते राहिला!” आणि त्यांना राहू देते. शरिरातील पृथ्वीचा अंश तिने आधीच संपविलेला असतो. आता ती पाण्याचा भागही पिऊन टाकते. ही दोन्ही भूते खाल्ल्यावर तिची पूर्ण तृप्ती होते आणि सौम्य होऊन सुषुम्ना नाडीमध्ये प्रवेश करते. तेव्हा चंद्रांमृताचे तळे कलते होते आणि कुंडलिनीच्या मुखात पडते. तो रस कुंडलिनीच्या नळीवाटे सर्वांगामध्ये भरतो आणि प्राणवायू जिथल्या तिथे मुरतो. तापलेल्या मुशीतून मेण निघून जाऊन ओतलेल्या रसानेच ती भरून रहाते. त्याप्रमाणे शरिराच्या आकाराने त्वचेचा नुसता पदर पांघरलेले तेजच आहे की काय असे वाटते. ढगाचे आच्छादन बाजूला करून सूर्य पूर्ण तेजाने झळकू लागला की, जसे ते तेज डोळ्यांना आवरत नाही तसे होते. वरवरचा त्वचेचा पापुद्रा कोंड्यासारखा झडून जातो मग त्या अवयवाची कांती स्फटिकासारखी किंवा रत्नबीजाच्या कोंबासारखी दिसते. संध्याकाळचे आकाशातील तेजस्वी रंग एकत्र वळून तर हे अंग केले नाही ना असे वाटते. प्रत्यग् आत्म्याचे लिंगच अशी शोभा दिसते. हे रूप पाहिले की केशराचे केले आहे की सिद्धरसाची ही ओतीव मूर्ती आहे की प्रत्यक्ष शांतीच अवयव घेऊन आली आहे असे मनात येते. आनंदरूपी चित्राचा रंग महासुखाचे प्रत्यक्ष रूप किंवा संतोषवृक्षांचे रोप आहे असे वाटते. सोनचाफ्याची कळी, अमृताचा पुतळा किंवा प्रत्यक्ष कोमलतेचा हा मळाच आहे की काय असे वाटते. शरदऋतूतील टवटवीत चंद्रबिंबच किंवा मूर्तिमंत तेजच आसनावर बसले आहे असे वाटते.

पहिल्या शरिराची मलीनता रौद्ररूपाने काढून टाकल्यावर कुंडलिनी चंद्रांमृत पिऊन साधकाला हे असे नवे सुंदर शरीर देते. आता ह्या शरिराला हात लावण्याची त्या मृत्यूची काय ताकद आहे? तो भिऊन मागे

सरतो. शरीर इतके चैतन्यमय होते की वृद्धत्व लांब पळतेच पण तारुण्यही मागे सरते. आणि बाल्यावस्थेप्रमाणे पुन्हा नव्या जोमाने सोन्याच्या झाडाला रत्नाच्या कळ्या लागल्या त्याप्रमाणे नवी सुरेख नखे येतात. दात नवे येतात, हिऱ्याची दुहेरी पंगत बसावी तसे लहानसर व एकसारखे असतात. माणकाच्या कणासारखे तांबूस तेजस्वी केस सर्व अंगावर येतात. हातापायाचे तळवे लाल कमलाप्रमाणे गुलाबी होतात. डोळ्यांची शोभा काय सांगावी. पूर्ण पक्व झालेली टपोरी मोत्ये जशी शिंपल्यात मावत नाहीत आणि त्या शिंपल्याची कड जशी हळूच उसवते त्याप्रमाणे दृष्टि बाहेर पडते, पापण्यांच्या मिठीत मावत नाही. दृष्टि या पापण्यांच्या बाहेर यायला पाहते. असते पहिलीच पण आता ती आकाशाला व्यापणारी होते.

आता शरिरामध्ये वय झाले असले तरी प्रचंड बळ येते आणि धैर्याची थोरी तर निरुपमच असते. देह सोन्यासारखा तेजस्वी होतो. त्याला वायूचे हलकेपण येते. त्यात पृथ्वी आणि आप यांचे अंशही असत नाहीत.

ह्या योग्याला समुद्रापलीकडचे दिसते स्वर्गातील विचार ऐकू येतात. मुंगीचे मनोगत कळते. वाऱ्याच्या घोड्यावर तो बसतो, पाण्यावर चालतो. याप्रमाणे अनेक सिद्धी त्याला प्रसंगानुसार प्राप्त होतात. या सिद्धींचा विचार करण्याचे कारण नाही. कारण हा साधक निघून गेल्यावर मागे जी पावलांची ओळ राहते तिथे ठिकठिकाणी अणिमादीसिद्धी उत्पन्न होतात. खरा योगी सिद्धीच्याकडे वळूनही पाहत नाही. तो अभ्यास करतच राहतो कुंडलिनी चंद्रामृत पिऊन मुखातून विष टाकते पण तेच अमृत होऊन प्राण जगतो. जणू काय शरिरातील अशुद्ध रक्तमांस जलांश भट्टीत पडून शुद्ध होतात व परत शरिरास मिळतात आणि जीवनशक्तीच्या पुढच्या प्रवासाचा मार्ग सुकर होतो.

कुंडलिनीच्या तोंडातून निघणारा अग्नि खरा पण तोच त्या शरीरास आतबाहेर थंडावा आणतो. अशुद्धता नाहीशी झाल्याने आता अवयावात भरू लागणारा रस पूर्ण शुद्ध व चैतन्याने भरलेला असतो. म्हणून अवयवांची शक्ति या पहिल्या प्रक्रियेत गेलेली असते ती परत येण्यास सुरुवात होते. शरिरातील पार्थिव अंश अगदी अल्पच असल्याने नाड्या वहायच्या बंद होतात. शरिरात फिरणारा नऊ प्रकारचा वायू शांत होतो आणि म्हणून शरिराचे धर्म राहत नाहीत. डाव्या-उजव्या नाकपुडीतून वाहणारे वायू नाकापुढे कापसाची वात धरली तर तीसुद्धा हालत नाही इतका मंद होतो. बुद्धिचा आकार चैतन्यात नाहीसा होतो. परिमळ फक्त नाकात उरतो आणि मग तोही कुंडलिनीबरोबर सुषुम्ना नाडीत शिरतो. कुंडलिनी क्षुब्ध असतानाही तिने शिल्लक ठेवलेले चक्राचे पदर आता हलकेच वेगळे होतात. इडा-पिंगला एक होतात. तिन्ही गाठी सुटतात आणि आता कुंडलिनीच्या प्रवासाचा दुसरा टप्पा सुरू होतो. प्राणाचा हात धरून आकाशाचा जिना करून सुषुम्ना मार्गाने आता हृदयात येते. ती कुंडलिनी जगदंबा, चैतन्य चक्रवर्तीची शोभा आणि विश्वबीजाच्या कोंबाला सावली करणारी वत्सल माता आहे. निराकार परमात्म्याची बाह्य खूण आहे, प्रतीक आहे. परब्रह्म शिवाला वेढून असणारी संबळी आहे. प्राणाची तर उघड जन्मभूमी आहे. ती साधकाच्या अभ्यासाने जागी होते. आणि पाहते की, या शरीराच्या अंशाअंशात जन्मजन्मांतरीचा मळ साठलेला आहे. आता प्रथम आपल्याला प्राणशक्तीचा मार्ग स्वच्छ करण्याचे काम करणे जरूर आहे. हे जाणून ती निःशब्दपणे प्रथम हे कार्य उरकते. आता दाहकतेचे, क्षुब्धतचे काम संपते. म्हणून माउली म्हणतात की, ती कुंडलिनी सौम्य होते, तृप्त होते, सुषुम्नेजवळ येते. नाशाचे काम झाले आता कार्य आहे स्वरूपानुभवासाठी कणाकणातून उसळणाऱ्या चैतन्याचे! म्हणून ती खालचा प्रांत जो आता पूर्ण शुद्ध झाला आहे तो प्रकाशमान करीत सुषुम्नामार्गाने वर चढते आणि हृदयाकाशात येते.

ती हृदयाकाशात आली की, मग मात्र बोलकी होते. जाणीवशक्ती कुंडलिनीला चिकटून येथपर्यंत आलेली असते. तिला तो नाद किंचित ऐकू येतो. परावाणीच्या कुंडामध्ये प्रणवाच्या आकारात ही नादचित्रे रेखलेली असतात. हा नाद अनाहत म्हणजे आघाताविना असतो. म्हणून परावाणी म्हटले. उच्चार केल्याविना ह्या वाणीमध्ये ॐकाराचा गजर साधकाला सहज ऐकू येऊ लागतो. आता असे म्हणू नये की, साधक ह्या नादाची कल्पना करतो. कारण कल्पना करणारे मनच आता शिल्लक राहिलेले नाही. देव म्हणतात की अर्जुना, मी तुला सांगायचे विसरलो की, जोवर वायू आहे तोवर आकाशात शब्द राहतोच म्हणून या हृदयाकाशात अजून परावाणीत नादाचा घोष होतो पण तो अनाहत असतो आणि ॐकाराचा असतो.

या अनाहताच्या मेघाने हृदयाकाश दुमदुमू लागले की, त्या आघाताने ब्रह्मस्थानाचे द्वार आपोआप उघडते. ह्या मूर्ध्नि आकाशात दुसरे महदाकाश असते, तिथे चैतन्य अतृप्त, अर्धे भोजन करून असते. ते चैतन्य देवीची वाटच पाहत असते. ब्रह्मस्थानाचे द्वार उघडल्याबरोबर हृदयाच्या आकाशात हाती बुद्धिचा नैवेद्य घेतलेली कुंडलिनी उभी असते ती आत शिरते. ती परमेश्वरी तेजाची आणलेली शिदोरी त्या अतृप्त शिवाला अर्पण करते. एकदा बुद्धिचा हा उत्तम नैवेद्य अर्पण झाला की द्वैत दिसेनासे होते.

कुंडलिनीचे वेगळे तेज विरते आणि ती केवळ प्राणवायुरूप होते. वाऱ्याच्या पुतळीने नेसता सोनसळी पीतांबर सोडून टाकावा किंवा वाऱ्याच्या झोताने दिव्याची ज्योत मालवावी किंवा वीज लखलखून आकाशात नाहीशी व्हावी तशी ती स्वर्णरेखा विरून जाते. हृदयकमळापर्यंत सोन्याची सरी असावी किंवा प्रकाशमय वाहता झरा असावा असे तिचे स्वरुप असते. प्रकाशाचा झरा हृदयाच्या पोकळ जमिनीत जिरून जावा तशी ती कुंडलिनी त्या मूर्ध्नि आकाशात चैतन्याला आपले रूप अर्पण करून नाहीशी होते. शक्तीमध्ये शक्ति जिरते.

अर्जुना, पुन्हा एकदा क्रम सांगतो. कुंडलिनी तीन भूतांचा प्रथम लय करते. पृथ्वीमध्ये आप विरवते, आप तेजामध्ये जिरवते आणि तेज हृदयाकाशातील वायूला जिरवते. आता फक्त हृदयाकाशातील वायूची तिला सोबत आहे. तो शरिराच्या आकाराने शिल्लक असतो. पण तोही घेऊन जेव्हा ती मूर्ध्नि आकाशात प्रवेश करते, तेव्हा वायू ह्या आकाशात विलीन होतो आणि कुंडलिनीचे नाव आता मारुत असे होते. अजून तिचे शक्तीपण शिल्लक असते. मग ती जालंधर बंधाचे उल्लंघन करून टाळ्यावरती नऊ इंद्रियांचे ऐक्य होण्याचे काकीमुख म्हणून स्थान आहे त्याचा भेद करून मूर्ध्न्याकाशरूपी पहाडावर चढते. मघाशी सांगितल्याप्रमाणे त्या अनाहत ॐकारालाही मागे टाकते, पश्यंतीवाचाही मागे टाकते आणि ब्रह्मरंध्राचे ठिकाणी "सोऽहं" मी ब्रह्म आहे, या भावाने बाहू पसरून त्या परमात्म्याशी एकरूप होते. ॐकाराच्या अर्धमात्रापर्यंतच्या मात्रा समुद्रात नद्या येऊन मिळतात तशा विलीन होतात.

पंचमहाभूतांचा पडदा फिटून जातो. शक्ति आणि परमात्मा यांचे ऐक्य होते. शक्तीचे स्वरूप प्राणवायू एवढेच रहाते. नाद, बिंदू, कला, ज्योती हे धर्म त्या शक्तीला आता रहात नाहीत. मेघांच्याद्वारा पाणी समुद्रापासून वेगळे होते, नदीच्या ओघात पडते व पुन्हा समुद्राला मिळते. त्याप्रमाणे शरिरामध्ये शक्तिरूप होऊन वेगळा झालेला शिव पुन्हा शिवरूप होतो. आता हे वेगळे असताना एक होते की दोन होते याचा विचार करण्याइतकेही अंतर शिल्लक रहात नाही. योग्याचा अभ्यास संपतो.

मनाचा निग्रह करावा, प्राणवायूचा निरोध करावा, ध्यान करावे ह्या इच्छा आता त्याला रहात नाहीत. कल्पना घ्यावी, टाकावी ही गडबड उरत नाही. पंचमहाभूतांची पक्की आटणी होते. कुंडलिनीचे कार्य शिवात ऐक्य साधून संपते.

आता ह्या योग्याचे शरीर वायुरूपही होऊ शकते. मग त्या योग्याला जगाच्या डोळ्यात लपता येते. चमत्कार हा आहे की शरीर तर पहिलेच आहे. अवयव पण जिथल्या तिथे आहेत. फक्त आता ते जसे काही वायूचे केलेले असावे इतके नितळ आहेत. केळीच्या पोकळीवरचे सोपट काढून टाकावे आणि ती पोकळीच उभा करावी तसे त्याचे रूप दिसते. त्याचे अवयव जसे काही आकाशाचे केले आहेत असे वाटते. देहधारी असून ते शरीर आकाशगमन करण्याइतके हलके होते हा चमत्कार खरा पण तो घडतो. कारण, अर्जुना, आकाशात आकाश मुरावे तसे ते परब्रह्माशी एकरूप झालेले असतात हे परब्रह्मतत्त्व मनरहित अवस्थेचे लावण्य आहे. तुर्यावस्था ह्या चौथ्या अवस्थेचे तारुण्य आहे. अनादि, अगण्य असे तत्त्व आहे. हे आकाराचा शेवट आहे. ते मोक्षाचे निश्चित ठिकाण आहे. आदि आणि अंत ही दोन्ही तिथे विरून जातात. हे विश्वाचे मूळ आहे. योगद्रुमाचे फळ आहे. आनंदाचे केवळ चैतन्य आहे. हे महाभूताचे बीज आहे. महातेजाचे तेज आहे. ते माझे खरेखुरे स्वरूप आहे. आम्ही हे जे साधन सांगितले त्या साधनाची मूर्तीच असे ज्यांनी आपले शरीर केले ते योगाभ्यासाने शुद्ध झाल्याने ह्या माझ्या परमात्मस्वरूपाच्या तोडीचे होतात. ही परमात्मप्रतीती आली की, देहाकृतीच्या मुशीत परब्रह्माचा रस ओतप्रोत भरून रहातो. मग हे सगळे विश्वच त्या योग्यांना नाहीसे होते, विश्वप्रतीती येतच नाही.

ही स्थिती शब्दांनी वर्णन करून कशी सांगू? अर्जुना, आकाशात आकाश कसे मिसळते हे जो तसा अनुभव घेतो त्यालाच कळते. "मी सर्व अभिप्राय सांगू शकते" असा गर्व वहाणारी वैखरी लपून दूर रहाते अशी ही स्थिती! तिथे शब्दांचे हात पोचू शकत नाही म्हणून संवादाच्या गावात ती स्थिर करता येत नाही. शब्दजात मागे सरते. संकल्पाचे आयुष्य संपते. विचारांचा वाराही शिरत नाही. कुंडलिनी भ्रूमध्य चक्रांत येते तेव्हा ॐकाराची शेवटची मात्रा जी "म" ती देखील विरते. प्राणवायु मोठ्या कष्टाने मूर्ध्न्याकाशात पोचतो आणि मुरतो. शब्दाचा दिवा मावळतो. परब्रह्मरूपी डोहांत त्या गगनाचाही पत्ता लागत नाही. तेथे शब्दाचा काय तागा लागणार? म्हणून माझी पुष्कळ इच्छा ही अवस्था शब्दांत वर्णन करून, उलगडून सांगावी अशी आहे पण ती शब्दांत सांपडतच नाही. काय करू? तुला एकच सांगतो दैवयोगाने ज्याने ही स्थिती प्रत्यक्ष अनुभवली त्यालाच कळेल. ही अवस्था आपल्या आपण भोगण्याची आहे आणि ही तद्रूपता प्राप्त झाली की काही बोलावे, ऐकावे हे उरतच नाही. अर्जुना मघाशी वर्णन केलेले माझे अमूर्तरूप नास्तिकांनी भक्तांचे पराभव केले म्हणून, ह्या चतुर्भुज आकाराने व्यक्त झाले आहे, पण ते भक्तकार्यासाठी झाले आहे.

शब्दातीत असे जे माझे मूळ महासुखरूप स्वरूप तिथे हे योगी पोचतात आणि माझ्या बरोबरीचे होतात. "माऊली म्हणतात की, कुंडलिनीयोग, शिवशक्तीयोग हे नाथपंथाचे वैशिष्ट्य आहे. आपल्यासारखे रसज्ञ श्रोते पाहिले आणि हा विषय मी विस्ताराने मांडला. पिंडाने पिंडाचा ग्रास कसा करावा हे आमचे आदिगुरु शंकर यांनी परंपरेने गुप्तधनच नाथपंथाच्या स्वाधीन केले आहे आणि गीता सांगणारे तर विष्णू अवतार श्रीकृष्ण! पण एखाद्या दुकानदाराने गिऱ्हाईक समजदार, संपन्न आहे असे पाहून शेलक्या शालूपैठण्या बासने सोडून मोठ्या उत्साहाने समोर मांडाव्या तसे मी हे नाथपंथाचे वैभव आपल्यापुढे ठेवले आहे. एरवी श्रीकृष्ण तर एकच वाक्य

बोलले होते पण श्रोते अत्यंत मार्मिक आहेत म्हणून मी ही धिटाई केली आहे. पण अर्जुनालाही ती आवडली.

तो भगवंताला म्हणाला, “महाराज, काय हो आपल्या सांगण्याची ही शैली! ह्या अभ्यासामध्ये जे दृढनिश्चयाने पारंगत होतात त्यांना ब्रह्मत्वाची खास प्राप्ती होते. हे आपल्या सांगण्याच्या पद्धतीवरूनच मला कळले. ब्रह्मप्राप्तीचा हा उपाय आपण किती निश्चयात्मक रीतीने सांगितला हो. देवा, ह्या गोष्टी ऐकता ऐकता माझ्या चित्तांत बोधाचा प्रकाश पडतो आहे. मग अनुभव आल्यावरची ती तल्लीनता कशी असेल हो? आपण आता जे साधन सांगितले त्याच्या सिद्धतेबद्दल काहीच शंका नाही. पण देवा, माझ्या शब्दाकडे लक्ष द्या. आपण सांगितलेला हा योग मला तर फार आवडला पण ह्या योगाचा अभ्यास करावा अशी योग्यता माझ्या ठिकाणी नाही असे मला वाटते. स्वभावतः जी योग्यता माझ्या ठिकाणी आहे त्या योग्यतेच्या जोरावर जर मी हा योग करू शकेन असे आपल्याला वाटत असेल तर मी आनंदाने या मार्गाचा अभ्यास करीन. महाराज, अशा प्रकारचा कठीण अभ्यास जर माझ्या हातून होण्यासारखा नसेल तर मला जो अभ्यास जमेल तो देवांना विचारावा म्हणतो. मला हा अभ्यास जमेल का? की दुसरा काही सांगणार हे विचारावे असे मनाला वाटले म्हणून मी हा प्रश्न केला. विचार केला तर मला सद्‌गुरु भेटण्याची अडचण नाही. पावलोपावली आपण प्रत्यक्ष सावलीसारखे उभे असताना मी दुसरा गुरु शोधण्याचे कारण काय? पण आपण म्हटले शिवालय किंवा गूढ मठ असावा आणि तिथे सद्‌गुरूंचे स्मरण करून आसन घालावे. त्या एकांत स्थळाची महतीहि आपण वर्णन केली. पुढे मग तो अभ्यास! महाराज, आपण तर जाणताच हा युद्धाचा प्रसंग समोर ठाकला आहे. “ह्या गुरुजनांच्यावर हत्यार कसे चालवूं”, अशा कल्लोळांत माझे मन अतिशय क्षुब्ध झालेले आहे. अशा स्थितीत मी युद्ध टाकून वनस्थलामध्ये जाऊन आसन मांडले तरी माझे मन त्या अभ्यासात एकाग्र होईल काय? स्वस्थ झाल्याक्षणींच माझ्यासमोर येईल हे रणांगण, घायाळ झालेले हे माझे बांधव, दुःखित असलेली द्रौपदी आणि अश्रू गाळणारी चिरदुःखी कुंती माता मी किती म्हटले तरी माझे मन आक्रंदून उठेलच असे मला वाटते. पण आपल्याकडून ह्या साधनाचे वर्णन ऐकल्यावर वाटते आहे की, तोडावा हा सगळा पाश आणि जावे निघून तपाचरणासाठी कुठेतरी वनामध्ये! द्यावी टाकून ही शस्त्रास्त्रे आणि जन्माला आल्याचे सार्थक होईल असा हा मार्ग पत्करावा. पण मला हे जमेल का? कुणाला वाटेल त्याला जमतो का हा अभ्यास? की त्यासाठी काही विशेष योग्यता असायला हवी? ती योग्यता अंगी येण्यासाठी खटपट करावी अशीसुद्धा उत्कट इच्छा होते आहे पण देवा आपण या युद्धभूमीवर उभे आहो. या शरिराचा आता क्षणाचा तरी भरंवसा कसा काय धरावा? ती योग्यता अंगी आणावी आणि मग अभ्यास करावा असा आयुष्याचा वेळ उरला आहे की नाही कोण जाणे?

आपल्याकडून हे विवेचन ऐकले आणि काहीही करू हे साधन करावेच असे मनाने घेतले आहे. यादवेंद्रा, वनात न जाता शरिरास क्लेश न देता आणि अंगी योग्यता आणण्यासाठी वेळ न घालवता मला हे साधन करता येईल का? नाही तर असे करा. देवा, माझी योग्यता, गुणावगुण माझ्याहीपेक्षा आपल्याला जास्त माहित आहेत. माझ्याजोगे साधन सांगा. आत्ताच ज्याचे वर्णन केलेत ते जमण्यासारखे असले तर तसे सांगा. पुन्हा पुन्हा शोधून पहातो आहे पण हा योगाभ्यास करण्याची पात्रता माझ्या अंगी नाहीच असे वाटून मन निराश होते आहे. म्हणून मी आपल्यालाच विचारतो आहे. ऐकली ना आपण माझी शंका?”

श्रीकृष्ण म्हणाले, “अरे, असे का म्हणतोस? अधिकार हवा ही गोष्ट खरी आहे. सामान्य व्यावहारिक क्रियाही अधिकार अंगी असल्याशिवाय सिद्धीला जाते काय? ही तर अत्युच्च स्थिती आहे. अधिकाराशिवाय ती

कशी प्राप्त होईल? आधी आरंभ केला पाहिजे. अभ्यासाचे फळ लगेच कसे मिळेल? आणि योग्यता म्हणशील तर प्राप्ती झाल्यावरच पात्रता ठरते. तेव्हा अभ्यासास सुरवात करण्यापूर्वीच योग्यतेची विवंचना करू नको. इथे काही अधिकाराची बाजारपेठ आहे? की योग्यांची वेगळी खाण आहे?

हे बघ मनांत थोडी तरी विरक्ति हवी आणि देहधर्माच्या बाबतीत नियमबद्धता हवी. हेच पहा कुरूंचे केव्हढे साम्राज्य! केव्हढा दरारा! तुमच्या हक्कासाठी समेटाचे पुरेपूर प्रयत्न केल्यावरच तुम्ही पांडवांनी हत्यार उचलले आहे असे असूनही तू समोरच्या वडीलधाकट्यांचा घात करण्याच्या नुसत्या कल्पनेनेच विरक्त झालास ना? शस्त्रे टाकून दिलीस ना? अभ्यासाची भूमिका सिद्ध होण्यासाठी एवढी विरक्ती पुरेशी आहे की.

अर्जुना, ही शस्त्रविद्या, अस्त्रविद्या शिकण्यासाठी तुला शरिरावर किती ताबा मिळावावा लागला. लहानपणापासून अभ्यासाची तुझ्या शरिराला पुरी सवय आहेच. मन एकाग्र कसे करावे हेही तूं उत्तम जाणतोसच की, “भास पक्ष्याचा डोळा फक्त मला दिसतो बाकी कांहीही दिसत नाही” असे तूं उत्तर दिलेस आणि आचार्य किती आनंदित झाले! अरे धनुर्विद्येसाठी मनाची एकाग्रता आणि शरिराचा संयम तूं आत्मसात केलाच आहेस. तोच तुला ह्या योगाभासातही पारंगत करीलच.”

मालूताई, यावरून आठवण झाली की नेमबाजी शिकविण्यासाठी चंद्रू नगारे नावाचा बंदूकबारदार इचलकरंजी सरकारांनी (आमच्या आजोबांनी) नेमला होता. आमच्या आजीसाहेब नेम मारण्यात फार कुशल होत्या. आम्ही ऐकले होते की त्या वेलदोडा उडवीत. आमच्या मनांत ईर्षा असे की आपल्याला तसा नेम मारता आला पाहिजे. तटाला टेकून टारगेट ठेवले जायचे आणि काडतूस उडाले की चंद्रू जाऊन पाहून यायचा. बरोबर मध्य बिंदू ठोकला तर त्याला बरे वाटायचे. कधी म्हणायचा, “असे कसे निशाण मारता? बुल्स आय लागला तर उपयोग! गोळी तटांत घुसलीय.” होता होता पुढचा अभ्यास सुरू झाला. झाडाचा टांगता नारळ, मग तोच नारळ हेलकावे खात असताना, मग नदीत नारळ टाकून होडीतून वहाता नारळ मारायचा असे निशाणबाजीचे प्रकार त्याने शिकविले. मग मडकी रंगवली, चार कामट्यांना बांधली आणि ती गरगर फिरण्याची व्यवस्था केली. तो मडकी फिरवायचा आणि म्हणायचा, “मारा पांढरे” किंवा “मारा तांबडे” शेवटी कोल्हापूरच्या इचलकरंजी बंगल्यात विहिरी शेजारच्या आंब्याच्या झाडाखाली आरसा समोर ठेवून आरशात दिसणारा आंबा बंदूक उलटी धरून मारण्याचा सराव त्याने करून घेतला. ह्या क्रियांना लागणारी मनाची एकाग्रता, शरीराची बैठक व स्थिरता याचा आम्हाला शालेय जीवनांत फार उपयोग झाला. म्हणून मला असे वाटले की आमच्या ह्या छोट्याशा नेमबाजीच्या अभ्यासांत जर इतके शरीर व मन एकाग्र करण्याचा सराव आपण शिकलो तर तो वीराग्रणी धनुर्धर अर्जुन किती शिकला असेल? आमचा गुरु चंद्रू नगारे तर अर्जुनाचे गुरु द्रोणाचार्य “शापादपि शरादपि” दंड देण्याची ज्यांची योग्यता असे! कुठे आम्ही आणि कुठे अर्जुन आणि त्याची तयारी! पण त्या दिव्यतेची थोडी कल्पना येते इतकेच.

तेव्हा सहजच देव अर्जुनाचे समाधान करीत म्हणत आहेत “अर्जुना, अरे अभ्यास करण्याचा अधिकार तुला निश्चित आहे. ज्याची वागणूक अनियमित असते तो मात्र योगाचा अधिकारी नव्हे. जो रसनेंद्रियाचा अंकित आहे, जो झोपेला जीवेभावे विकला गेलेला आहे तो अधिकारी नव्हे. ज्याप्रमाणे वर्तनात अतिशिथिलता नको तसाच अतिनिरोधही नसावा. आग्रहाच्या तुरुंगात तहानभूक घालून तो आहार तोडतो, झोप कितीही थकवा

आला तरी घ्यायची नाही अशा हट्टाने जो नाचतो, त्याचे शरीरसुद्धा त्याच्या स्वाधीन रहात नाही. मग योगाची गोष्ट कशाला हवी? विषयाचे अतिसेवन वा अतिनियमन ही दोन्ही साधकाच्या उपयोगी पडत नाहीत. योगाभ्यासाचे साधन असे हे जे तुझे पार्थिव शरीर हे आधी उत्तम तयारीत असायला हवे.

आहार तर घेतलाच पाहिजे. हा प्राणच अन्नावर अवलंबून आहे. पण तो आहार अगदी नियमित असावा. हे जसे तसेच इतर क्रियांचे. त्या क्रिया नियमित असाव्या.

लहानपणी आमच्या मातोश्री नेहमी सांगत की आपल्या शरिराच्या हालचाली अगदी नियमबद्ध, रेखीव व मोजक्या असाव्या. वडील माणसासमोर बसावे कसे, उभे रहावे कसे, हातपाय किती स्थिर असावे, शब्द किती मोजके असावे, एकदा घातलेली बैठक कशी स्थिर असावी हे सर्व त्या स्वतः आचरण करून आम्हाला शिकवत. शिवाय अहोरात्र जवळ असणारे जुने नोकर आणि डोळ्यांत तेल घालून लक्ष ठेवणारे गुरुजनही प्रत्येक हालचालीवर नियंत्रण करीत. सरकारांच्या बरोबर मी व माझ्या भगिनी ताईसाहेब थट्टीत गेलो होतो. दोघी दोन बाजूला चालत होत्या. जरा खाली पाहून सरकार म्हणाले, "माझ्या कदमाबरोबर कदम पडले पाहिजे. लक्ष ठेवा." त्यांच्या डाव्याबरोबर डावे पाऊल पडावे म्हणून जरा धडपड केल्याबरोबर ते म्हणाले, "अंऽहं असं नाही. दुसऱ्या माणसाला नकळत बदल करायचा आणि चालायचे, अशी धडपड करून नाही."

एकदा इचलकरंजीस पंक्तीत वाढायला गेले तर लगेच विचारले "अक्का, तू तिकडे रोज वाढतेस काय?" मी हळूच म्हटले, "पहिलं वाढप करते." लगेच म्हणाले, "म्हणूनच दोन्ही पावले सारखी ठेवून वाढतेस ती. ज्यांना सवय नाही त्या बायका एक पाऊल मागे आणि एक पाऊल पुढे ठेवून वाढतात." इतके सरकारांचे बारीक लक्ष असे. प्रत्येक शारीरक्रिया नियंत्रित ठेवण्याचा त्यांचा स्वतःबद्दलही फार कटाक्ष असे. त्यांच्या चोपदारापासून ते थेट गुरुजीपर्यंत सर्वांनी त्यांच्या लहानपणापासूनच ते वळण लावले होते. ते म्हणत, "एकदा लहानपणी दरबारांत गादीच्या बाहेर माझा पाय येतो आहे असे पाहिल्याबरोबर जवळ उभ्या असलेल्या चोपदाराने चोपदारकाठी पायावर रेटली. दरबार संपल्यावर चोपदाराने माफी मागितली. तो म्हणाला, "महाराज, मला हे करावे लागले नाहीतर दरबाराची आदब बिघडली असती."

आमच्या वेळी हे चाबुकस्वार, बंदुकबारदार, मास्तर, कुणबिणी, हुजरे, ड्रायव्हर, खेळाचे मास्तर सगळेजण त्या मातीच्या गोळ्यांना आकार देण्यासाठी आजोबा व मातोश्री यांच्या मार्गदर्शनाखाली अपार कष्ट करत होते. आतासुद्धा अनंत आठवणी दाटून येतात की खरोखरच त्यांचे किती उपकार आहेत. चाबुकस्वार सिताराम जामदार म्हणत, "लगाम आवरून धरा. आतापर्यंत घोडा बाहेर होता. आता ठाणावरून वाड्यात जाणार. ठाण उजव्या बाजूस आहे. जनावराला ठाण बरोबर कळते. डाव्या बाजूने लगाम खेचून धरायची त्याला पागेत घुसू द्यायचे नाही. ओढा लगाम. आलेच ठाण. बघा घोडा कसा निघाला. आत्ताच परीक्षा आहे." या शब्दात केवढे शहाणपण भरलेले आहे हे आता मोठेपणी मोहाच्या क्षणी बरोबर लक्षांत येते. आम्ही बहिणी एकमेकींना म्हणतोही, "ठाण आलं. लगाम खेचला पाहिजे." आवडीचे काम सोडून आवश्यक कर्तव्याकडे वळतांना खरेच लगाम खेचावे तेव्हाच घोडे ताब्यात रहाते.

ड्रॉईंग शिकवणारे लिमये मास्तर शामराव जोशी या आपल्या आवडत्या शिष्याच्या चित्रांची भेंडोळी

अनुक्रमणिका

खाली काढत आणि टेबलावर पसरून म्हणत, "बघा आउटलाईन अशी यायला हवी. शामराव तर दोन हातात दोन खडू घेऊन फळ्यावर एकदम दोन्ही बाजू एकसारख्या असलेली फ्री हॅन्ड प्लेट काढायचा. तुम्ही निदान कागदावर पेन्सिलने एक बाजू तरी नीट काढून दाखवा. हं धरा डाव्या हातात रबर. सारखे खाली पडायचे आणि हुजऱ्याने उचलून द्यायचे हे चालणार नाही. रबर पडतेच कसे. आता उचला पेन्सिल. श्वास रोखा. लाइन ठराविक ठिकाणी पोचेपर्यंत श्वास घ्यायचाच नाही, तरच लाइन सारखी येणार."

अगदी कडक कायदा की, कागद फिरवायचा नाही. उभा ठेवूनच रंगविले पाहिजे. वर म्हणायचे, "भिंतीवर चित्र काढायला सांगितले तर काय भिंत उलटी फिरविणार? सवय झालीच पाहिजे. रंग रेषेच्या बाहेर जातोच कसा."

कुणबिणीची शिस्त आणखी वेगळ्या प्रकारची "असे, नेसा, तसे नेसा, लुगडे जमिनीवर टाकायचे नाही, निऱ्या करूनच माझ्या हातात द्यायचे" वगैरे. आणि त्या बायकांनी केलेले संस्कार अजून जागे राहून काम करतात. सर्वच क्रियावर इतकी बंधने, शिस्तबद्धता शिकवली गेली की ह्या ओव्या वाचतांना सारखी त्या उपदेशाची आठवण होते. साधनेसाठीच जणू काही ही सर्व तयारी करून घेतली गेली. व्यवहारात उपयोग होतोच पण पारमार्थिक शिस्तीचे काहीच ओझे वाटत नाही, ते शरीर असे शिस्तीत वाढवले गेल्यामुळेच!!

देव अर्जुनाला या शिस्तीचीच वेगळ्या शब्दात जाणीव करून देत आहेत ते म्हणतात, "हे बघ मोजके शब्द बोलावे. नियमित पावलांनी चालावे. झोपेलाही योग्य वेळी योग्य मान द्यावा. जाग्रण करावे लागले तर तेही करता आले पाहिजे पण ते जागणेही नियमित असावे. येवढ्यांनी कफवातादि धातूंची समता राहते. इंद्रियांना त्यांचे त्यांचे विषय असे प्रमाणबद्ध व नियमित दिले की संतुष्ट होतातच, पण मनालाही संतोष होतो. बाहेर नियमितपणाची मोहोर बसली की आत सुख वाढू लागते आणि शरीर व मन संतोषित असले की अभ्यासाचे कष्ट न वाटता योगाचा अभ्यास सहज होतो. दैवाचा उदय झाला की त्या उद्योगाच्या मिषाने सर्व ऐश्वर्ये आपोपाप घरी चालत येतात. त्याप्रमाणे नियमबद्ध वागणारा मनुष्य ज्या वेळेस योगाभ्यासाकडे वळतो त्यावेळी नियमितपणा आणि योगाभ्यास यांच्या प्रयाग संगमात त्याचे मन क्षेत्रसंन्यास घेते, स्थिर होते. नियतबद्ध आचरण ज्या भाग्यवानाच्या हातून घडते त्याच माणसाच्या हातून योगही घडतो आणि मग तो मनुष्य मोक्षाने अलंकृत होतो.

अडचण अशी आहे की इंद्रियेच ह्या अभ्यासाच्या आड येतात, त्याचे अनिर्बंध साम्राज्य संपुष्टात येईल याची त्यांना धास्ती वाटते. म्हणून हा अभ्यास किती कठिण आहे! जमणे शक्य नाही. कशाला ती यातायात! वेळ तरी कुठे आहे असे नुसते बसायला!" इत्यादि अनंत अडचणी ही इंद्रिये साधकासमोर उभ्या करतात. आयुष्य अढळ करणाऱ्या औषधाला, ते जाणारे आयुष्य परत आणून देणाऱ्या हितकर पदार्थाला जिव्हा वैरी म्हणत नाही काय? तसेच ह्या इंद्रियांचे आहे. आत्महिताचे जे जे असेल त्या त्या प्रत्येक गोष्टीचे मुळातच ह्या इंद्रियांना वावडे आहे. एरवी ह्या प्रकारच्या योगाभ्यासासारखे सोपे काय आहे? तुझे मनोगत जाणूनच मी सांगतो आहे की अर्जुना, तुला जर आत्मप्राप्तीची इच्छा असली तर अभ्यासात दक्ष असायला नको का? अभ्यास कठिण आहे म्हणून भिऊन चालेल काय? हा अभ्यास खरोखर फार कठिण नाही. या इंद्रियांनी उगीचच तुला भीती घातलेली असते. तेव्हा ती सोड आणि अभ्यास करण्याचा दृढ निश्चय करून सुरवात कर.

**अनुक्रमणिका**

आधी आम्ही सांगितलेला आसनाचा अभ्यास कर. त्या बळकट आसनापासून मग पुढच्या मार्गास लागावयाचे. या इंद्रियांचा निरोध ह्या योगाभ्यासाने होईल. प्रथम एक गोष्ट करावी लागेल. विषयवासना ही मनात उठणाऱ्या नानाविध संकल्पापासून निर्माण होते. विषयवासना हा काम संकल्पाचा पुत्र आहे, असे समजूया. संकल्पातून विषयवासना उत्पन्न होते आणि त्या वासना इंद्रियांना प्रेरणा देऊन अभ्यासात स्थिर होऊ पहाणारे चित्त परत इंद्रियभोगाच्या जाळ्यात पकडण्यासाठी पराकाष्टा करतात. आता इंद्रियाचे न ऐकता तू अभ्यासास लागण्याचा निश्चय करणे व त्याप्रमाणे आसन स्थिर करणे हाच इंद्रियावर, मिळविलेला पहिला विजय आहे. मग आसनावर बसले की प्रथम चुळबुळ करत, पण मग निमूटपणे, इंद्रिये गप्प बसायला शिकतात. साधकाने निग्रहाने अभ्यास चालू ठेवला की त्याला कळून चुकते की आता आपले चालत नाही. नियमाच्या खांबासच ह्या धीरपुरुषाने आपल्याला बांधून टाकले आहे. इंद्रिये शरण आली की अर्जुना विषयवासना कमी कमी होत जातात. कारण विषयपूर्तीचे साधन जी इंद्रिये ती बंदीत पडली आहेत. वासनांचा नाश झाला हे कळले की ज्यांचा निर्माता जो संकल्प त्याची निराशा होते, धैर्य खचते आणि कामरूपी पुत्राचा मृत्यू पाहून पुत्रशोकाने तोही प्राणास मुकतो. म्हणून इंद्रियजयास इतके महत्त्व दिले जाते हे ध्यानात ठेवायचे.

आता संकल्प संपला, त्याची मनातील येरझार संपली की, बुद्धि बाह्य प्रपंच चिंतनातून मागे फिरते आणि स्थिर होते. प्रपंचात, व्यवधानात, गोंगाटात, सदा सर्वकाळ भ्रमणारे चित्त इंद्रियांची दारे बळकट लावून घेऊन संकल्पाला बाहेर घालवून जेव्हा आत स्थिर होते तेव्हा एका वेगळ्या प्रकाशाची जाणीव होऊ लागते. आजवर कधी न अनुभवलेल्या एका सुखाची प्राप्ती होऊ लागते. हे सुख खरे म्हणजे योगाचे सौभाग्य आहे, संतोषाचे राज्य आहे. पण संसाराच्या तोंडात मन गुंतलेले होते तोवर त्याला ह्या सुखाची चवही माहित नसते. पण आता त्याला प्रपंचातील विषयसुखाची हळूहळू स्मृति होऊन ह्या अपूर्व आनंदाचा अनुभव येऊ लागतो. या सुखाची गोडी लागली की मन सहजच निर्वात ठिकाणी ठेवलेल्या दिव्याप्रमाणे स्थिर होऊ लागते. मन स्थिर होते आहे, धैर्याच्या राजवाड्यात सुखाने नांदते आहे अशा स्थितीत चित्त चैतन्याच्या भेटीला निघते. विषयाचा संग सुटल्यामुळे निर्मळ झालेले हे चित्त आपल्या खऱ्या स्वरूपाचा शोध घेत आत फिरत असताना नुसते पाठमोरे झाल्याबरोबर आत्मस्वरूपाचेच त्याला दर्शन होते. "हेच माझे स्वरूप, हेच माझे खरे स्वरूप" असे म्हणत म्हणत त्या अनंदात निमग्न होऊन आत्मस्वरूपात समरसून जाते. ही आत्मस्वरूपाची ओळख पटल्याबरोबर सुखाच्या साम्राज्यावर जाऊन बसते. चित्तपणही विरून जाते. मग इंद्रियांना ह्या जागेचा पत्ताही माहित नसतो हे काय सांगावे? अर्जुना, अरे तो आपणच आपल्या ठिकाणी स्थिर झाला. आता तो या अवस्थेतून हालत नाही, ढळत नाही मग भले मेरूहून मोठी दुःखे येऊन अंगावर आदळोत. आत्मभुवनामध्ये तो कायमचा रहिवासी झाला. अर्जुना, आता त्याचा देह एकवेळ दडपला जाईल पण मन दडपले जात नाही. शस्त्राने देह तोडला गेला, आगीमध्ये पडला तरी त्याचे मन अशा अपूर्व सुखात निमग्न असल्याने त्याला ह्या सुखनिद्रेतून जाग येतच नाही. चित्तं आपल्या स्वतःच्या ठिकाणी रमल्यावर देहतादात्म्य घेतच नाही. आणि स्वतः अलौकिक सुखरूप झाल्यामुळे देहाचे त्या चित्ताला पूर्ण विस्मरण होते. आता त्या जीवाने अविनाशी परमात्म्याशी एकरूपता साधलेली असते. तो ह्या क्षणभंगुर विनाशी देहसुखाची कशाला तमा बाळगतो. अरे! तो घरी पोचला.

आता अर्जुना आणखी एक उपाय तुला सांगून ठेवतो. एक अभ्यास जमला नाही तर निराश होऊ नको. प्रत्येक कामात चित्त एकाग्र व्हावेच असा निश्चय कर. निश्चयाच्या बाहेर मन जाणार नाही असे नाही. त्याला

जाऊ दे. सहज जितके स्थिर होईल तितके आपल्या उपयोगाला आले, न राहील तर जिकडे भटकेल तितके भटकू दे. आता तू अभ्यासाला एवढा वेळ बसायचेच हा जो कृतनिश्चय केला आहेस तोच त्या मनाला हळूहळू चुचकारून जागेवर घेऊन येईल. अशाप्रकारे मन पुन्हा पुन्हा एका विषयावर आणण्याचा हा प्रयत्नच अभ्यास होतो. असा अखंड प्रयत्न झाला की, मनाला स्थैर्याची सवय पडेल. मन स्थिर झाले की, एका भाग्याच्या क्षणी ते अवचित आत्मस्वरूपाजवळ सहज हिंडत फिरत पोचेल. ह्या आत्मस्वरूपाचा प्रभाव आणि गोडी इतकी आकर्षक आहे की मन त्याच्याजवळ गेले रे गेले की, त्या आत्मस्वरूपात विरूनच जाते. त्या अद्वैतामध्ये द्वैत बुडून जाते, त्या ऐक्याच्या तेजाने त्रैलोक्य प्रकाशमान होईल, त्रैलोक्याशी ऐक्य साधेल. आकाशात अभ्र येते तेव्हा ते आकाशाहून वेगळे दिसते. पण ते विरून गेले की, विश्वामध्ये जसे आकाशच भरून राहते तसे चित्त लयाला गेल्याबरोबर केवळ चैतन्यच शिल्लक राहते.

अर्जुना, मनोजयाच्या ह्या सोप्या अभ्यासाने साधकाला ही एवढी मोठी सुखप्राप्ती होते.

मघाशी ज्या संकल्पाचा त्याग तुला सांगितला तो ह्या सोप्या योगसाधनाने पुष्कळांनी साधला आहे. संकल्पाच्या संपत्तीचा त्याग करून ते सुखाच्या संगतीने परब्रह्माच्या आत प्रवेश करतात आणि मीठ जसे पाण्यात पडल्यावर पाण्याला सोडू शकत नाही तसे ते परब्रह्मातून वेगळे होऊच शकत नाही. मग त्या ऐक्यात, सामरस्याच्या मंदिरात जगासह महासुखाची दिवाळी होते. आता त्याला जगही सुखरूपच दिसते. आपणच आपल्याला पहायचे, आपणच आपल्याला पाठीवर घ्यायचे असे दुस्तर आहे असे कदाचित् तुला वाटेल म्हणून पार्था, तुला हे सामरस्य साधण्याचा आणखी एक उपाय सांगतो, तो तुला जमतो का पहा. हा अभ्यास सामरस्य पाहण्याचा आहे. सर्व देहामध्ये मला पहायचे आणि माझ्यामध्ये सर्व जग पहायचे. सर्वत्र मी आहे की नाही याची वाटाघाट करण्याचे कारणच नाही. पण माझ्यामध्ये सर्व जग बघण्याचा अभ्यास करावा. हे असेच परस्परात मिसळून बनलेले आहे असा मनाचा निश्चय करावा. आता मग पुढे आपोआप असे घडते की साधक भक्ति करताना ह्या ऐक्याच्या भूमिकेतून मी सर्व भूताना व्यापून राहिलो आहे ही जाणीव ठेवूनच भक्ति करतो. एकदेशीय भाव न ठेवता सार्वदेशीय भावाने त्याचे मन भरून गेलेले असते. प्राणी भिन्न दिसले तरी तो त्यांच्याकडे द्वैतभावाने पाहत नाही. भेद करीत नाही. सर्वत्र केवळ माझे एकत्व अनुभवतो. आता तो माझ्याशी एकरूप आहे हे बोलणेदेखील उचित नाही. कारण धनंजया, तो मीच आहे. दिवा आणि दिव्याचा प्रकाश ही दोन्ही जशी एकरूपाने नांदतात, तसा तो आणि मी एक आहो. मी त्याच्या ठिकाणी आहे, तो माझ्या ठिकाणी आहे. जोपर्यंत पाणी तोवर रस, पोकळी तोवर आकाश, तसा माझ्या रूपाने तो पुरुषस्वरूप होतो. आणि माझ्याप्रमाणेच त्याला सर्वव्यापकत्वाचा मग अनुभव येतो. पंचभूतात्मक शरिरात तो सापडलेला असतो. पण अडकलेला नसतो. सर्वव्यापक शरीर नसले तरी अनुभूती सर्वव्यापक होते. देहधारी असूनही तो देहतादात्म्य घेत नाही, विश्वतादात्म्य घेतो हे नवल आहे पण घडते खरे. मग तो ज्ञानबुद्धीने विश्वाकडे पाहू लागतो आणि म्हणतो हे वस्त्र नव्हे हा तंतूच आहे. हे अलंकार नव्हेत सोनेच आहे. ही झाडाची पाने वेगवेगळी नव्हेत एका वृक्षाचेच हे अवयव आहेत. आजवर त्याच्या दृष्टीपुढे जो द्वैताचा अंधःकार होता तो जातो आणि अद्वैतबोधाची मंगल प्रभात होते. अर्जुना, अरे त्याच्या दृष्टीला आता जग हे जग दिसत नाही. ओतप्रोत भरून राहिलेले परमात्मरूप दिसते आणि तो स्वतःला ना ह्या जगापासून वेगळा मानतो, ना मला!

ही त्याची ऐक्याची स्थिती पार्था, पर्वतासारखी अचल असते, ती कधीही ढळत नाही. फार काय सांगू

सुख-दुःख, पाप-पुण्य ह्या दोहोंचाही त्याच्या मनोधर्माला स्पर्श होत नाही. हे जे सगळे समविषम भाव आणखीही जे जे सर्व विचित्र असेल ते ते सर्व तो आपले अवयव मानतो. चराचर आपल्यासारखे अखंडित मानतो. ऐक्यभाव इतका सहज की हे सगळे त्रैलोक्य मीच आहे असा बोध अंगीभूत होतो. त्यालाही देह आहे हे खरे आहे पण इतर मंडळी त्या देहाला सुखी, दुःखी म्हणतात. आमचा अनुभव असा आहे की तो देह नव्हेच परब्रह्मच आहे.

अर्जुना, आपल्यामध्ये विश्व व विश्वामध्ये आपण पहाणे असा हा साम्याचा अभ्यास केला तरीही परब्रह्मस्वरूपाची प्राप्ती होते हे तुझ्या ध्यानात आले ना? साम्यापलीकडे जगात प्राप्तिविषय नाही म्हणून मी तुला वरचेवर सांगत आलो की मी आणि विश्व वेगळे मानू नको, एकरूपच मान. मग सुख-दुःख, पाप-पुण्य, ह्या जोड्या तुला बंधन करू शकणार नाहीत. सगळ्यात तुला देवच दिसेल." अर्जुन म्हणाला, "देवा आमच्याबद्दल करुणा वाटून आपण मला हे सर्व आपण सांगता अहा, पण महाराज आमच्या मनाच्या ह्या स्वभावापुढे आमचे सामर्थ्य काही टिकत नाही. अहो, हे मन कसे, केव्हढे आहे याचा शोध घ्यावा असे म्हटले तर ते काही आमच्या आवाक्यात येत नाही. पण त्याला हिंडायला मात्र त्रैलोक्य अपुरे पडते आहे. या या माकडाला समाधी कुठून कळायला? सोसाट्याचा वारा आपण थांब थांब म्हणून थांबतो का? तसेच हे अनावर मन एका ठिकाणी थांबणे अशक्य आहे."

आम्ही अभ्यास करू म्हणून काय उपयोग? ते मन बुद्धिला छळते, निश्चयाला टाळते, धैर्याच्या हातावर हात मारून कधीच पसार होते. सारासार बुद्धिला भ्रम पाडते, संतोषाला आशा लावून ठेवते आणि आपण अभ्यासाला बसलो की दहा दिशांना आपल्याला हिंडवते. त्याला जरा आवरावे म्हटले की ते जास्तच उधळते. संयम कराव तो त्या मनाच्या चांचल्यालाच मदत करतो. देवा मन आपला हा स्वभाव सोडील काय? ते मन निश्चय राहील काय? आम्हाला ती साम्यावस्था करून देईल काय? देवा, हे तर फार कठीण दिसते.

देव अगदी करुणापूर्ण दृष्टीने अर्जुनाकडे पहात म्हणाले, "अर्जुना, हे तुझे म्हणणे अगदी खरे आहे. ह्या मनाचा स्वभावच चंचल पण अर्जुना, वैराग्याचा आधार घेऊन त्याला अभ्यासाच्या दिशेला वळवले तर काही वेळाने ते स्थिरावेल."

आपले मन स्थिर होत नाही आणि जपाला सुरवात केल्याबरोबर विचार प्रबळ होतात अशी एकाने ब्रह्मचैतन्य गोंदवलेकरमहाराजांकडे तक्रार केली. ते म्हणाले, "आपल्या जागेत एखादा भाडेकरी बरेच दिवस रहात असला आणि आपण त्याला जागा सोड म्हटले की, तो जागा सोडताना किती त्रास देतो! आपल्या शरिरातल्या वासना व त्याबद्दलचे विचार हे आपले जन्मोजन्मीचे जुने भाडेकरी आहेत. जागा सोडताना ते कटकट करणारच. पण रामाच्या कृपेने ते शेवटी घडते." तसेच अर्जुनाला देव सांगत आहेत की, "हे मन प्रथम अशी गडबड करणारच, पण अभ्यास वाढला, त्या मनाला अनुभवसुखाची चटक लागली की ते आपोआप तिकडे वळेल. कारण आवडत्या जागी पुन्हा पुन्हा जावे असा त्याचा स्वभावच आहे. ते त्या गोडीला सोकावते आणि हळूच तिथे येते."

ज्याच्या ठिकाणी विरक्ति नाही, जे अभ्यासाच्या वाटेला कधी जातच नाहीत त्यांना मन आवरत नाही हे

आम्ही मान्य करतो. यमनियमांच्या मार्गाला न लागता वैराग्याची आठवणही न काढता जे केवळ विषयजळामध्ये बुडून राहिले आहेत, मन उत्पन्न झाल्यापासून त्यांनी त्याला निग्रहाचा चिमटा लावलाच नाही, तर असे मन कसे निश्चल होईल सांग बरे! मनाचा निग्रह करण्याचा जो अभ्यास आहे तो करण्यास आरंभ कर; पाहूया बरे, निग्रह कसा होत नाही? मनाचा निग्रह होत नसेल तर सर्व योगसाधन खोटेच आहे असे म्हणावे लागेल. अर्जुना तसे नव्हे आपल्या हातून अभ्यास होत नाही असे म्हणूया. योगाचे सामर्थ्य इतके प्रचंड आहे की चपळ मनच काय पण महत्तत्वादि सर्व तत्त्वे आपल्या स्वाधीन होतात.

अर्जुन विचार करून म्हणाला, "हे खरे आहे. मनोबळ आणि योगबळ यांच्या तुलनेत मनोबळ टिकणार नाही. पण देवा, हा योग कसा याचे आम्हाला ज्ञानच नव्हते. ते ज्ञान कसे प्राप्त करून घ्यावे याचेही ज्ञान नव्हते. इतके दिवसात या योगाची वार्ताच आम्ही ऐकली नव्हती. म्हणूनच मन अनावर आहे असे आम्ही म्हणतो. पुरुषोत्तमा, तुझ्या प्रसादाने ह्या साऱ्या जन्मात आता आम्हाला योगाचा परिचय झाला.

हे समर्था, पण माझ्या मनात एक शंका आली आहे आणि ती फेडण्याची ताकद तुझ्याशिवाय कुणात आहे? गोविंदा, कुणी एकजण श्रद्धेने पण योग्य उपाय माहीत नसल्याकारणाने आपल्या बुद्धीला सुचेल त्या मार्गाने मोक्षपद मिळविण्याची धडपड करीत होता. इंद्रियाच्या गावाहून निघाला, आस्थेच्या वाटेला लागला, आत्मसिद्धीच्या नगराला पोचावे अशी त्याला इच्छा होती, प्रयत्न चालू होते. पण तो आत्मसिद्धीपर्यंत पोचला नाही आणि परत फिरण्याची तर त्याला इच्छाच नव्हती. अशा परिस्थितीत आयुष्यभानु अस्ताला गेला. उपासनेचे साधन जे शरीर तेच नाहीसे झाले. आकाशात भलत्यावेळी पातळ ढग विरळ ढग चुकून आले तर ते धड वृष्टीही करीत नाहीत किंवा आकाशातून निघूनही जात नाहीत. त्याप्रमाणे या साधकाला भोग आणि मोक्ष दोन्हीही दुरावली. त्याला आत्मप्राप्ती झाली नाही. श्रद्धा मार्ग सोडू देत नाही. योग्य उपाय वेळेवर न कळल्यामुळे तो मुक्कामाला पोचू शकला नाही. पण पूर्ण श्रद्धा ठेवूनच जर मरण पावला तर महाराज त्याला कोणती गती प्राप्त होते ते मला सांगा. त्याला ऐहिक व पारलौकिक दोन्ही सुखांना मुकावे लागत नाही ना?"

देव म्हणाले, "अर्जुना, तुझा प्रश्न अगदी बरोबर आहे योग्य आहे. पण तुला निश्चयात्मक सांगतो की ज्याला मोक्षपदाची आस्था आहे त्याला मोक्षावाचून अन्य गति नाही.

एवढेच आहे की थोडा वेळ मधे जातो. देवांनासुद्धा जे सुख आनंद मिळत नाही ते सुख त्याला ह्या मधल्या विश्रान्तीच्या काळात मिळते. अर्जुना, त्याने जर नेटाने अभ्यास केला असता तर झपाझप चालून तो संध्याकाळ होण्याच्या आत सोहंसिद्धीच्या गावी पोचला असता. त्याच्या चालण्याचा वेग म्हणजेच अभ्यास तितका तीव्र नव्हता म्हणूनच मधे विसावा घेण्याची जरूर पडली. हा विसावा अत्यंत सुखाचा असतो आणि मोक्ष तर त्याच्याकरिता ठेवलेलाच असतो.

काय चमत्कार आहे पहा, शंभर यज्ञ करणाऱ्यास इतक्या कष्टानंतर जी स्थिती प्राप्त होते ती ह्या मोक्षकाम साधकास विनासायास मिळते. त्या ठिकाणचे अलौकिक भाग त्याला भोगावयास मिळतात. त्याने ऐहिक भोगांचा त्याग केलेला असतो तर त्याला स्वर्गीय भोग मिळतात. मात्र त्याच्या मनाची विरक्ती तिथेही कायम असते. तो म्हणतो "देवा, मला कशाला ह्या भोगात घातले आहेस? मी तर कंटाळून गेलो." दिव्य,

स्वर्गीय भोग भोगत असताना त्याला पश्चात्ताप होतो की, “भगवंतापासून माझा वियोग करण्यास हे भोग कारणीभूत आहेत. देवा, मला सोडवा यातून!”

अर्जुना, मग तो योगी आपल्या योगसाधनेसाठी, पूर्ततेसाठी, मृत्यूलोकांत जन्म घेतो. पण तो जन्म सर्व धर्माचे वसतिस्थान आणि वैभवरूप लक्ष्मीचे कुलरूपी क्षेत्र यामध्ये भाताच्या रोपाप्रमाणे वाढतो. जे कुल नीतीच्या मार्गाने व सत्याने पवित्र झालेले असते आणि शास्त्रदृष्टीने सर्व व्यवहाराकडे पहाते, ज्या कुळात वेद हे जागते दैवत आहे, जिथे शास्त्रविहित आचरण हा व्यापार चालतो आणि सारासारविचार हाच जेथे सल्लामसलत देणारा प्रधानमंत्री आहे अशा कुळांत त्याचा जन्म होतो. त्या कुळात चिंता ही ईश्वराची एकनिष्ठ पत्नी झालेली असते. ऋद्धिसिद्धि देवता घरात वावरत असतात. पुण्याईच्या कमाईने सर्व सुखांचा व्यापार जिथे वाढलेला असतो त्या कुळात तो योगभ्रष्ट सुखाने जन्म घेतो.”

योगभ्रष्टाच्या आणि पूर्णतेला गेलेल्या पण लोकोद्धारासाठी मानवी देह धारण करणाऱ्या लोकोत्तर, दयाशील विभूतींच्या जन्मकाळाच्या परिस्थितीकडे लक्ष दिले तर देव जे वर्णन करीत आहेत ते आपल्या नजरेपुढे साकार होते.

अक्कलकोट स्वामी समर्थ, शिर्डीचे साईबाबा आणि शेगावचे गजाननमहाराज यांची चरित्रे पाहिली तर त्यांच्या जन्मस्थलांची, मातापित्यांची, वा मांस वंशपरंपरेची काही माहीतीच मिळत नाही. श्रीस्वामी समर्थांची जन्मकुंडली नानाजी बापू रेखी यांनी तयार केली आणि स्वामीमहाराजांच्या चरणाजवळ ठेवली. त्यांनी ती आपल्या शिष्याकरवी जवळचे माळवदावर टाकून दिली. भजन चालले होते. तो कार्यक्रम संपल्यावर कुंडली आणण्यास सांगितले. त्याप्रमाणे कुंडली आणली तर तीवर गंधाक्षत व तुळशीपत्रे होती. स्वामी समर्थांनी नानाजी रेखी यांना उजवा हात पुढे करण्यास सांगून त्यावर हात मारला तर त्यांचे हातावर विष्णुपद आले. स्वामी समर्थांनी याप्रमाणे मंजूर केलेली पत्रिका पाहिली तर हस्तिनापुरापासून बारा कोस दूर छेली या खेडेगावी धरणी दुभंगून आठ वर्षाची बालमूर्ति प्रकट झाली असे लिहिले आहे.

कुणी प्रश्न विचारला तर व मर्जी सुप्रसन्न असेल तर स्वामी समर्थ, “आपण कोण?” या प्रश्नाचे उत्तर दत्तनगर, मूळ पुरुष, वडाचे झाड, मूळ मूळ असले शब्द उच्चारीत. एके दिवशी गाणगापूरचे पुजारी आले त्यांना समर्थांनी विचारले, “तुमच्या देवाचे नाव काय?” पुजारी म्हणाले “आमच्या देवाचे नाव श्रीनृसिंहसरस्वती.”

हे ऐकून महाराज म्हणाले, “माझे नाव नृसिंहभान आहे बरे.”

पुष्कळदा स्वामी समर्थ म्हणाले, “मीच राम झालो होतो. मीच कृष्ण झालो होतो.” मानवी शरीर तर बाह्याकारावरून दिसते आहे पण मानवांचे कोणतेही नियम अशा लाकोत्तर विभूतींना लागू होत नाहीत, ते असे.

साईबाबादेखील शिर्डीस आले ते तरुण वयात. “या साई” म्हणून त्यांना हाक मारली म्हणून ते नाव त्यांना पडले इतकेच. पण त्यांच्या कुलासंबंधी वा धर्मासंबंधी काहीच माहिती नाही. हिंदू म्हणावे तर मशिदीत वास्तव्य, मुसलमान म्हणावे तर कान टोचलेले. अखंड धुनी, पूजा, आरती हा थाट हिंदू पद्धतीचा. त्यांचा

कुलवृत्तांत भगवंतच सांगू शकणार. तीच गोष्ट शेगावच्या गजानन महाराजांची. उष्ट्या पत्रावळीवर शिते वेचून खाणारी ही तरुणमूर्तीच शेगावला दृष्टि पडली. जन्म कुठे, माता-पिता, कुल, धर्म काय याची काहीच माहिती मिळत नाही. पण ज्यांची मिळते त्यांच्या पूर्वजांचा थोडा शोध घेतला तर त्यांचे जन्मकुळ किती पवित्र व देवभक्त होते ते कळते. मनात येते की, ह्या तीन्ही अवतारी व्यक्तींची जन्मदात्री जर मानवी शरीरधारी असेल तर ते सर्व कुलच भगवंत वर्णन करीत आहेत तसे आचारसंपन्न असलेच पाहिजे.

समर्थ रामदास, एकनाथ, तुकाराम, पावस स्वामी स्वरूपानंद, चित्रकूट माधवनाथ महाराज, सज्ञनगड श्रीधर स्वामीमहाराज, अशा थोर थोर महात्म्यांच्या चरित्राच्या माजघरात डोकावले तर पिढ्यानपिढ्या चाललेल्या देवभक्तीचा सोहळा आपल्या नजरेस पडतो.

पण दैत्य वंशात जन्म घेतलेल्या प्रल्हादाच्या जन्माची गोष्ट तर फारच अद्भूत वाटते. त्याने ती कथा स्वतःच आपल्या मित्रांना ऐकवली आहे.

काय झाले की, शुक्राचार्यांच्या पुत्रांच्या स्वाधीन प्रल्हादाला करण्यात आले. दैत्योचित अर्थनीती, दंडनीती, राजनीति हे विषय त्याला शिकविण्यात यावेत अशी आज्ञा दिली गेली होती. प्रल्हादाबरोबर आणखी दैत्यपुत्र होतेच. शुक्राचार्यपुत्रांनी दिलेल्या पाठात प्रल्हादाचे मन रमत नव्हते. त्याने आपल्या मित्रांना बोलवावे, खेळ सोडून आलेल्या त्या दैत्यपुत्रांना सांसारिक भोगाची निःसारता, संयम, सदाचार, भगवद्भजन यांचा महिमा तो शिकवत असे. एकदा मुलांनी विचारले, “प्रल्हादजी, तुम्ही वयाने लहान अहा, आमच्यासारखेच राजवाड्यात वाढलात ह्या सगळ्या गोष्टी तुम्हाला कळल्या कशा?”

प्रल्हाद म्हणाला, “त्याच्या मागे इतिहास आहे. माझे काका हिरण्याक्ष यांच्या मृत्यूनंतर स्वतःला अमर करून घेण्यासाठी माझे वडील हिरण्यकश्यपु मंदराचल पर्वतावर तप करण्यासाठी निघून गेले. इकडे इंद्राने दैत्यपुरीवर हल्ला केला. पुरी बेचिराख केली. माझ्या गर्भवती मातेला-कयाधूला बंदिवान करून इंद्र घेऊन चालला. वाटेत नारदमुनि भेटले. त्यांनी इंद्राला विचारले, “देवेंद्रा, साध्वी परस्त्रीला तू अशी पकडून नेतोस? हे तर ठीक नाही. तिला सोडून दे.” इंद्र म्हणाला, “नारदमुने इच्या कुशीत दैत्याचा वंश वाढतो आहे. तो जन्माला आला की मी त्याला मारीन आणि मग तिला सोडून देईन.”

नारद म्हणाले, “इंद्रा हा तुझा भ्रम आहे. तिच्या पोटात आहे एक महान भगवद्भक्त! तू त्या बालकाच्या केसालाही धक्का लावू शकणार नाहीस.”

भगवद्भक्ताचे नाव नारदांनी उच्चारल्याबरोबर इंद्राने हात जोडले आणि म्हटले “क्षमा करा मुने, मला हे माहित नव्हते मी आताच तिला बंधमुक्त करतो.”

इंद्राने माझ्या मातेस मग बंधमुक्त केले. नारद म्हणाले, “बाळ, तुला माझ्या आश्रमात घेऊन जातो, तुझा पति तपश्चर्येहून परत येईपर्यंत तू सुखाने तिथे रहा.”

मग माझी माता नारदांच्या आश्रमात राहिली. राणी असल्याने सर्वजण तिची सेवा करीत. तिला काहीच कष्ट झाले नाहीत. ती फक्त ऋषींची सेवा करीत असे. देवर्षि रोज एकदा आश्रमात येत आणि भगवद्भक्तीचा उपदेश करीत. मी तो मातेच्या उदरात असताना ऐकला आहे. माझी माता अन्य व्यवधानांत पुढे तो उपदेश विसरली. पण देवर्षींच्या कृपेने मला मात्र त्या उपदेशाचे उत्तम स्मरण राहिले. मी त्या नारायणाच्या नामाचा कधीही विसर पडू दिला नाही. अग्नि, विष, पर्वतशिखरावरून कडेलोट यांनी मला काहीच झाले नाही. मित्रांनो अशी ही कथा! आणि म्हणूनच तुला भय वाटत नाही का असे पित्याने विचारल्यावर मी म्हटले,

**रामनाम जपतां कुतो भयं सर्व ताप शमनैकभेषजं ।**
**पश्य तात मम गात्र संनिधी पावकोऽपि सलिलायतेधुना ॥**

म्हणून देव सांगत आहेत, "अर्जुना तो योगभ्रष्ट कधी एखाद्या योग्याच्या कुलात जन्म घेतो. या कुलातील लोक ज्ञानाग्निहोत्री असतात. ब्रह्मनिष्ठ व वेदसंपन्न असतात. सिद्धान्ताच्या सिंहासनावर बसून ते त्रिभुवनाचे राज्य करतात. संतोषाच्या वनात गाणारे ते कोकिळच आहेत असे समज. विवेकरूप गावाच्या मुख्य ठिकाणी असलेल्या ब्रह्मरूप फळाचे सेवन करीत ते नित्य बसले आहेत. अशा योग्याच्या कुळात तो जन्म घेतो.

अर्जुना, मागच्या जन्माची सर्व तयारी असतेच त्यामुळे लहानशी देहाकृति उमटल्याबरोबर स्वरूपज्ञान सूर्याचा उदय होतो. सूर्योदयापूर्वी प्रकाश प्रकट होतो त्याप्रमाणे, निरनिराळ्या अवस्थातून न जाता प्रौढ वयाच्या गावी पोचण्यापूर्वीच बाळपणीच सर्वज्ञता त्याला वरते.

चिदंबर दीक्षितांच्या बाळपणीची कथा आहे की, एकदा गजगौरीव्रताच्या पूजेसाठी त्यांना वडिलांनी एका घरी पाठविले, ही बालमूर्ती पूजा सांगण्यासाठी त्या घरी गेली. चिखलाचा हत्ती करून त्यावर अंबारी वगैरे ठेवून पूजेची सर्व तयारी होती. छोटे दीक्षित पूजा कर्मामध्ये पूर्ण पारंगत होतेच. त्यांनी प्रथम प्राणप्रतिष्ठेचे मंत्र म्हणण्यास सुरवात केली. मंत्र म्हणण्याचे सामर्थ्य असे की एकेका क्रियेबरोबर त्या चिखलाच्या गोळ्यात प्राणसंचार होऊ लागून शेवटी ते हत्तीचे छोटेसे पिल्लू घरभर हिंडू लागले. असे हे बाळपणचेच सामर्थ्य! ह्या प्रमाणात पुढील जीवनक्रम!

देव सांगतात, "पूर्वजन्मातच तयार असलेल्या प्रज्ञेच्या लाभामुळे मनच सारस्वत दुभते. सगळी शास्त्रे स्वयंभूच मुखातून निघतात. अरे, असा हा जन्म मिळावा म्हणून स्वर्गस्थ आशा बाळगून असतात त्यासाठी जप, होम करतात. देवांनी भाट होऊन मृत्यूलोकाचे वर्णन करावे असा हा जन्म पूर्वपुण्याईच्या जोरावर त्यांना सहज मिळून जातो. मागच्या जन्माच्या शेवटी ज्ञानाची जी मर्यादा आली होती ती त्यांना लाभते आणि त्याच्या पुढची अवस्था नित्य नूतन स्वरूपात त्यांना मिळते. एखादा मनुष्य दैववान आहे, पायाळू आहे आणि त्यात त्याने डोळ्यात दिव्यांजन घातले आहे मग त्याला जसे पाताळींचे गुप्तधन सहज दिसू लागते, तसे ह्या योग्याला दुर्भेद असे अर्थ सहज समजू लागतात. गुरूने बोध केला तरच कळावे असे ज्ञान त्याच्या बुद्धिला सहज प्रतीत होऊ लागते. यत्न करावाच लागत नाही.

मी तुला अभ्यासाचा क्रम सांगताना म्हटले होते की इंद्रिये आवरावी मग मन ताब्यात घ्यावे मग

श्वासावर जय मिळवावा आणि मग हा प्राणवायू सहज आकाशाशी एकरूप होतो आणि ब्रह्मस्थिती प्राप्त होते. तर ह्या योग्यांची सगळी प्रक्रिया विनासायास घडते आणि अभ्यास घडतो. तो अभ्यास करत नाही अभ्यास त्याची पाईकी करतो आणि समाधि त्याच्या मनाच्या घराचा पत्ता विचारत विचारत स्वतःच येऊन उभी रहाते.

अशा त्या पूर्ण पुरुषांचे काय आणि कसे वर्णन करावे? याचे दर्शन झाले की वाटते हा योगपीठावरील शिवच आहे, हा उत्पत्तिरूप केळीचा खांबच आहे, वैराग्य सिद्धीचा अनुभवच मूर्तिमंत होऊन राहिला आहे. साधकदशेतच हा इतका अपूर्व दिसतो की, हे संसार मोजून टाकण्याचे माप आहे, अष्टांग योगाचा झळझळीत दिवा आहे परिमलाने चंदनाचे रूप धरावे त्याप्रमाणे संतोषाचा पुतळाच आहे, असे वाटते. सिद्धांच्या भांडारातून काढल्याप्रमाणे त्याचे तेज आहे. अर्जुना, ही स्थिती प्राप्त व्हावी म्हणून त्याचे प्रयत्न शेकडो कोटी वर्षांचे आहेत. सहस्त्र जन्माचे प्रतिबंध ओलांडून तो आत्मसिद्धीच्या किनाऱ्याला पोचला आहे. म्हणून या जन्मात त्याला साधनांचे श्रमच पडलेले नाहीत. साधने त्याच्या मागे मागे जातात. त्याच्या हातून सगळी अनुष्ठाने आपोआप विनासायास घडत जातात. आणि तो विवेकाच्या राज्यावर या जन्मी आयता आरूढ होतो. विचारांच्या वेगामध्ये विवेकही मागे मागे राहतो. आणि मग विचारांचाही त्याग होऊन अविचारणीय असे ब्रह्मस्वरूप तो स्वतःच होऊन राहतो. मनाचा मेघ विरून जातो. श्वासाचे श्वासपण संपते. आकाश आपल्या ठिकाणी नाहीसे होते. ॐकाराची अर्धमात्रा बुडून जाते असा सुखाचा लोंढा येतो. ह्या सुखाचे शब्दात वर्णन करता येत नाही म्हणून ही अवस्था पाहून शब्द माघारी फिरतो. ब्रह्माची जी अशी शब्दातीत स्थिती जी सगळ्या गतीमध्ये श्रेष्ठ गती आहे आणि जी अमूर्त आहे त्या ब्रह्मस्थितीचे मूर्तस्वरूप होऊन तो राहतो.

विक्षेपाचा केरकचरा त्याने मागील अनेक जन्मात काढून टाकला असल्याने या जन्मी उपजताक्षणीच लग्नघटका बुडते. कर्मक्षय झालेलाच असल्याने ब्रह्माशी सहज ऐक्य होते.

श्रीरामकृष्ण परमहंसांच्या आयुष्यात एकदा तोतापुरी नावाचे एक महापुरुष आले. त्यांनी गुरूंच्याजवळ राहून योगसाधन केले होते. त्यांनी गदाधराकडे पाहून म्हटले, "तू वेदांत साधनेला उत्तम अधिकारी आहेस असे मला वाटते. तुला वेदांत साधना करण्याची इच्छा आहे काय?"

गदाधर म्हणाले, "मी करीन की नाही मला माहीत नाही. ते सगळे माझ्या आईला माहीत आहे. तिला विचारून येतो." गदाधर कालीमंदिरात गेले आणि कालीमातेला विचारले तेव्हा ती म्हणाली, "जा वेदांत शीक, त्यासाठीच त्या संन्याशाला इथे आणले आहे." गदाधर धावतच परत आले. मंदिरातल्या कालीमातेला ते "आई" म्हणतात याचे तोतापुरींना फार नवल वाटले. त्यांना भक्तिमार्गातल्या ह्या क्रिया व भावना आवडत नव्हत्या.

त्यांनी गदाधराला शास्त्रोक्त संन्यासदीक्षा दिली व "रामकृष्ण" असे त्यांचे नाव ठेवले आणि निर्विकल्प समाधीचा अभ्यास शिकविण्यास सुरुवात केली. जगदंबेची मूर्ती रामकृष्णांच्या डोळ्यापुढून हालेना. तेव्हा तोतापुरींना राग आला. त्यांनी एक कांचेचा तुकडा घेऊन भ्रूमध्यामध्ये टोचला आणि म्हटले, "ह्या ठिकाणी मन एकाग्र कर." त्याबरोबर रामकृष्णांची समाधी लागली. तीन दिवस ती अवस्था तशीच राहिली. तोतापुरींचा आपल्या डोळ्यावर विश्वास बसेना. ते मनाशी म्हणू लागले, "जी अवस्था प्राप्त होण्यासाठी मला चाळीस वर्षे

परिश्रम करावे लागले ती ह्यांनी तीन दिवसात मिळवली काय आश्चर्य आहे!"

अशी प्राग्जन्माची  साधना क्षणार्धात सिद्ध होऊन जाते. देव म्हणू लागले, "अर्जुना, तद्रूपतेशी त्या योग्याचे लग्न लागते. तो ब्रह्माशी अभिन्न होऊन राहतो. विश्व जिथून निर्माण होते आणि पुन्हा ज्या ठिकाणी लयास जाते अशा अवस्थेला शरीरधारी असूनही तो पोचतो. ही अवस्था पोचायला सोपी नव्हे अर्जुना."

कर्मनिष्ठ लोक अध्ययन, अध्यापन, यजन, याजन, दान, प्रतिग्रह ह्या षट्कर्माच्या   प्रवाहामध्ये आपल्या धैर्य बाहूचा भरंवसा धरून स्वतःला झोकून देतात. ज्ञानाचे वज्रकवच घालून ज्ञाननिष्ठ प्रपंचाशी झुंजत असतात. तपोनिष्ठ तपाचा निसरडा, निराधार कडा चढून जाण्याची शिकस्त करतात. भजननिष्ठांचे भज्य, याज्ञिकांचे यज्य असे हे स्वरूप आहे. ह्या स्वरूप प्राप्तीसाठी कर्मनिष्ठांची ती धडपड असते, ज्ञाननिष्ठांची ती लढाई असते आणि तपोनिष्ठांची ती चढाई असते.

अर्जुना, हा योगी ती स्वरूपस्थिती आपण स्वतःच होतो. साधकाचे साध्य, आणि एकच एक सिद्धतत्त्व तो झालेला असतो. म्हणून तो कर्मनिष्ठांना बंध आणि तपोनिष्ठांना आद्य तपोनाथ होतो. जीव परमात्म्याच्या संगमावर त्याच्या मनोवृत्तीचे येणे झाले असल्याने तो देहधारी असून ह्या योग्यतेला पोचतो.

पंडुकुमरा, यासाठी मी तुला म्हणतो आहे की तू अंतःकरणाने असा योगी हो. अरे, तो योगी देवांचा देव जाणावा. माझे सुखसर्वस्व मानावा. तो तर माझे चैतन्यच आहे. अर्जुना, भजन, भज्य आणि भजक या त्रिपुटींचा निरास माझ्याशी एकरूप होऊन कसा करावयाचा हे भक्तीचे परमोच्च साध्य त्याने अपरोक्षानुभूतीने साध्य करून घेतलेले असते. अरे, तो अखंड मीच झाला आहे. आता त्याच्या आणि माझ्या प्रेमाचे स्वरूप तुला शब्दात वर्णन करून कसे सांगू? ते शब्दांत सांगावे असे नाहीच मुळी. त्याच्या आणि माझ्या एकवटलेल्या प्रेमाला उपमा द्यावयाची झाली तर ती सांगू का रे, तो आत्मा आणि मी देह! आणखी काय सांगू?

संजय म्हणाला, "महाराज, तो भक्तचकोरचंद्र त्रिभुवननरेंद्र, गुणसमुद्र असा भगवान अर्जुनाला ह्याप्रमाणे म्हणाला."

प्रथमपासूनच पार्थ फार आस्थेने ऐकत होता पण आता हे विवेचन ऐकताना आणखी ऐकावे ही पार्थाची इच्छा दुणावली. त्या यादवेंद्राला ते जाणवले त्याला वेगळाच आनंद झाला. तो मनाशी म्हणाला, "अहो, हा तर माझ्या बोलण्याला आरसाच मिळाला की, मी जे जे बोलतो त्याचा ठसा त्याच्या मनात आता जशाचा तसा उमटत चालला."

ज्ञानदेव म्हणाले, "देव आता आणखी निरूपण करतील. तो निरूपण प्रसंग आता पुढे आहे. त्यात शांतरस भरून राहिला आहे. प्रमेय बीजांचा मुडा सोडून तो श्रोत्यांच्या मनात पेरला जाईल. सत्त्वगुणाच्या दृष्टीने मानसिक तापरूपी डिखळे तापून फुटली आणि आता योग्य चित्ताचे वाफे तयार झाले. श्रोतेहो, त्यात आपल्या अवधानाचा वाफसा साधला आहे. आता निवृत्तीनाथांना पेरण्याचा धीर येतो आहे.

**अनुक्रमणिका**

महाराज, मी ज्ञानदेव कुळवाचे चाडे आहे. सद्‌गुरूंनी कौतुकाने डोक्यावर हात ठेवला ते उघड उघड बीजच घातले आणि म्हणून माझ्या मुखाने जे जे निघते ते ते सज्ञनांना आवडते आहे. संतांच्या हृदयात ते बी लागू होते आहे. श्रीरंग पुढे काय म्हणाले ते सांगतो. आपण ऐकावे.

मनाच्या कानांनी ऐकावे शब्दबुद्धिच्या डोळ्यांनी पहावे. चित्त मला द्यावे आणि बोध आपण घ्यावा.

अवधानाच्या हाताने बोल हृदयात न्यावे. मग ते सज्ञनांच्या बुद्धिला संतोष देतील. ते शब्द आत्महिताला स्थिर करतील. पूर्णावस्थेला नेतील आणि जीवाला सुखाची लक्षावधी बिल्वपत्रे वहातील.

मुकुंदाने अर्जुनाला सुसंस्कृत शब्दात जे डौलदार विवेचन करतील ते ओवी छंदाने मी ज्ञानदेव सांगेन. आपण ऐकावे महाराज."

***

॥ श्री ॥

अध्याय सातवा

## ज्ञानविज्ञानयोग

॥ ॐ नमो भगवते वासुदेवाय ॥

श्रीभगवानुवाच—

मय्यासक्तमनाः पार्थ योगं युञ्जन्मदाश्रयः ।
असंशयं समग्रं मां यथा ज्ञास्यसि तच्छृणु ॥ १ ॥

ज्ञानं तेऽहं सविज्ञानमिदं वक्ष्याम्यशेषतः ।
यज्ज्ञात्वा नेह भूयोऽन्यज्ज्ञातव्यमवशिष्यते ॥ २ ॥

मनुष्याणां सहस्रेषु कश्चिद्यतति सिद्धये ।
यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्त्वतः ॥ ३ ॥

भूमिरापोऽनलो वायुः खं मनो बुद्धिरेव च ।
अहंकार इतीयं मे भिन्ना प्रकृतिरष्टधा ॥ ४ ॥

अपरेयमितस्त्वन्यां प्रकृतिं विद्धि मे पराम् ।
जीवभूतां महाबाहो ययेदं धार्यते जगत् ॥ ५ ॥

एतद्योनीनि भूतानि सर्वाणीत्युपधारय ।
अहं कृत्स्नस्य जगतः प्रभवः प्रलयस्तथा ॥ ६ ॥

मत्तः परतरं नान्यत्किंचिदस्ति धनंजय ।
मयि सर्वमिंद प्रोतं सूत्रे मणिगणा इव ॥ ७ ॥

रसोऽहमप्सु कौन्तेय प्रभाऽस्मि शशिसूर्ययोः ।
प्रणवः सर्ववेदेषु शब्दः खे पौरुषं नृषु ॥ ८ ॥

पुण्यो गंधः पृथिव्यां च तेजश्चास्मि विभावसौ ।

जीवनं सर्वभूतेषु तपश्चास्मि तपस्विषु ॥ ९ ॥

बीजं मां सर्वभूतानां विद्धि पार्थ सनातनम् ।
बुद्धिर्बुद्धिमतामस्मि तेजस्तेजस्विनामहम् ॥ १० ॥

बलं बलवतामस्मि कामरागविवर्जितम् ।
धर्माविरुद्धो भूतेषु कामोऽस्मि भरतर्षभ ॥ ११ ॥

ये चैव सात्त्विका भावा राजसास्तामसाश्च ये ।
मत्त एवेति तान्विद्धि न त्वहं तेषु ते मयि ॥ १२ ॥

त्रिभिर्गुणमयैर्भावैरेभिः सर्वमिदं जगत् ।
मोहितं नाभिजानाति मामेभ्यः परमव्ययम् ॥ १३ ॥

दैवी ह्येषा गुणमयी मम माया दुरत्यया ।
मामेव ये प्रपद्यन्ते मायामेतां तरन्ति ते ॥ १४ ॥

न मां दुष्कृतिनो मूढाः प्रपद्यन्ते नराधमाः ।
माययाऽपहृतज्ञाना आसुरं भावमाश्रिताः ॥ १५ ॥

चतुर्विधा भजन्ते मां जनाः सुकृतिनोऽर्जुन ।
आर्तो जिज्ञासुरर्थार्थी ज्ञानी च भरतर्षभ ॥ १६ ॥

तेषां ज्ञानी नित्ययुक्त एकभक्तिर्विशिष्यते ।
प्रियो हि ज्ञानिनोऽत्यर्थमहं सच मम प्रियः ॥ १७ ॥

उदाराः सर्व एवैते ज्ञानी त्वात्मैव मे मतम् ।
आस्थितः स हि युक्तात्मा मामेवानुत्तमां गतिम् ॥ १८ ॥

बहूनां जन्मनामन्ते ज्ञानवान्मां प्रपद्यते ।
वासुदेवः सर्वमिति स महात्मा सुदुर्लभः ॥ १९ ॥

कामैस्तैस्तैर्हृतज्ञानाः प्रपद्यन्तेऽन्यदेवताः ।
तं तं नियममास्थाय प्रकृत्या नियताः स्वया ॥ २० ॥

यो यो यां यां तनुं भक्तः श्रद्धयाऽर्चितुमिच्छ्ति ।

**तस्य तस्याचलां श्रद्धां तामेव विदधाम्यहम् ॥ २१ ॥**

**स तया श्रद्धया युक्तस्तस्याराधनमीहते ।**
**लभते च ततः कामान् मयैव विहितान् हि तान् ॥ २२ ॥**

**अंतवत्तु फलं तेषां तद्भवत्यल्पमेधसाम् ।**
**देवान्देवयजो यान्ति मद्भक्ता यान्ति मामपि ॥ २३ ॥**

**अव्यक्तं व्यक्तिमापन्नं मन्यन्ते मामबुद्धयः ।**
**परं भावमजानन्तो ममाव्ययमनुत्तमम् ॥ २४ ॥**

**नाहं प्रकाशः सर्वस्य योगमायासमावृतः ।**
**मूढोऽयं नाभिजानाति लोको मामजमव्ययम् ॥ २५ ॥**

**वेदाहं समतीतानि वर्तमानानि चार्जुन ।**
**भविष्याणि च भूतानि मां तु वेद न कश्चन ॥ २६ ॥**

**इच्छाद्वेषसमुत्थेन द्वन्द्वमोहेन भारत ।**
**सर्वभूतानि संमोहं सर्गे यान्ति परंतप ॥ २७ ॥**

**येषां त्वन्तगतं पापं जनानां पुण्यकर्मणाम् ।**
**ते द्वन्द्वमोहनिर्मुक्ता भजन्ते मां दृढव्रताः ॥ २८ ॥**

**जरामरणमोक्षाय मामाश्रित्य यतन्ति ये ।**
**ते ब्रम्ह तद्विदुः कृत्स्नमध्यात्मं कर्म चाखिलम् ॥ २९ ॥**

**साधिभूताधिदैवं मां साधियज्ञं च ये विदुः ।**
**प्रयाणकालेऽपि च मां ते विदुर्युक्तचेतसः ॥ ३० ॥**

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रम्हविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे "ज्ञानविज्ञानयोगो नाम" सप्तमोऽध्यायः ॥ ७ ॥

श्रीकृष्णार्पणमस्तु ।

----------

**अनुक्रमणिका**

या अध्यायाचे नाव ज्ञानविज्ञानयोग असे आहे. मागच्या म्हणजे सहाव्या अध्यायाचे नाव कुठे अभ्यासयोग तर कुठे आत्मसंयमयोग असे दिले आहे.

असे वाटते की संयमातून आत्मप्राप्ती असा उपदेशाचा रोख असल्यानेच सहाव्या अध्यायास आत्मसंयमयोग हे नाव दिले आहे. नाथपंथी ज्ञानेश्वरांनी श्रोते अधिकारी आहेत असे पाहून अष्टांगयोगाचे पूर्ण वर्णन, हातचे काही एक न राखून ठेवता केले आहे. कुंडलिनीबद्दलचे माऊलींचे निरूपण उद्धृत केल्याखेरीज कुठल्याही भारतीय लेखकाचे योगासंबंधीचे लिखाण पूर्ण होऊ शकत नाही.

सहाव्या अध्यायाच्या शेवटी शेवटी देवांनी अर्जुनास विनवून पुन्हा पुन्हा सांगितले की, "अर्जुना, अरे जो योगी आहे तो देवाचा देव होतो रे. तू एकदा आला होतास तेव्हा मी ध्यानास बसलो होतो. तुला आश्चर्य वाटून तू मला विचारलेस ना की, "कृष्णा तू कुणाचे ध्यान करतोस?" तेव्हा मी म्हटल होते, "भीष्मांचं!" आठवतं ना तुला? देव अशा योग्यांच ध्यान करतो इतकी योग्यता त्यांना प्राप्त होते. म्हणून मी तुला म्हणतो की, "अर्जुना, तू योगी हो."

त्याच्याच संदर्भात सातव्या अध्यायात देव सुरवातीस म्हणत आहेत—

"अर्जुना, ऐक रे. तू तर आता योगयुक्त झालास. पण तळहातावर घेतलेल्या रत्नाप्रमाणे माझे समग्राचे तुला ज्ञान व्हावे म्हणून प्रपंचज्ञान म्हणजे काय आणि स्वरूपज्ञान म्हणजे काय हे तुला समजावून सांगतो. पार्था, तुला माहितच आहे की, रत्न तळहातावर घेतल्याखेरीज त्याची पारख होत नाही, खरी किंमत होत नाही.

एकदा सराफबाजारात एक अंगठी विकायला आली. किंमत फार होती आणि रत्नही तसेच मोलाचे होते. एका चतुर जवाहिऱ्याने भिंग न लावताच ती आंगठी नीट पाहिली, "किंमत दहा हजार म्हणता ना? मी त्या किंमतीस हे रत्न घ्यायला तयार आहे. पण एक अट आहे. ही अंगठी बांधलेली आहे अशी घेणार नाही. तुम्ही मला खडा सोडवून माझ्या हातात द्यावा मी तुम्हाला तुम्ही मागता ती किंमत मोजावी," जवाहिऱ्याने सांगितले. सौदागराला बोलता येईना. अंगठी सोडविल्याबरोबर त्या रत्नाची दोन छकले निघाली. बेमालूम सांधून कोंदणात ते दोन खडे जडवले होते. किंमत त्या मोठ्या आकाराची होती!

देव म्हणत आहे "अंगठी नव्हे, सोडवून तुझ्या हातात रत्नच ठेवतो. म्हणजे सर्व बाजूंनी पारखून तुला घेता येईल".

तू असे म्हणशील की "आत्मज्ञान सांगणार होतात, ते सोडून प्रपंचज्ञान सांगतो असे का म्हणता? मला ते काय करायचे आहे? पण अर्जुना, आत्मज्ञान होण्यासाठी प्रपंचज्ञानाची प्रक्रिया कळणे आवश्यक आहे. आंबी लोक नाव चालवतात. त्यात तू बसला आहेस ना? तीराला नाव लावताना ते जोराने तीराच्या चिखलात घुसवतात. मग तीं टेकलेली नाव हलत नाही, डोलत नाही, जागा सोडत नाही. स्थिर रहाते आणि मग आपण तिचा त्याग करून खुशाल काठावर उतरू शकतो. तशीच ज्ञानाची गोष्ट आहे. तिथे जाणीव उरलेली नसते,

विचार मागच्या पावली निघतो आणि तर्काचे चातुर्य उपयोगी पडत नाही. जाणीव, तर्क, विचार ही प्रपंचज्ञानाची साधने आत्मज्ञानासाठी कुचकामाची ठरतात. तो त्यांचा प्रांतच नाही. एखादी मुलगी सासरी जाते. तिच्याबरोबर जाते पाठराखीण! तिचे नावच पाठराखीण, ती सगळीकडे नवरीच्या मागे मागे रहाते. पण स्वामीभेटीच्या वेळी उंबरठ्याच्या बाहेर थबकते. त्या उंबऱ्याच्या आत जाण्याचा तिला अधिकार नाही. तशीच अवस्था, जाणीव, तर्क, विचार यांची आहे.

एखादा डॉक्टर रोग्याची तपासणी करतो. Text-book case आहे म्हणतो. म्हणजे त्याला Text-book आठवते, तो रोगाची लक्षणे पहातो. तंतोतंत जमतात असे त्याला दिसले की तो म्हणतो, "हां बरोबर अमुक रोगाची ही लक्षणे, त्याला उपाय हा." मी डॉक्टर, हा रोगी. हा रोग, हा उपाय. ही सर्व जाणीव त्याला असते. ज्याला ही सर्व जाणीव आहे. त्यालाच भेदाची जाणीव असे आपण म्हणू. पुढे तो ह्या भेद जाणिवेतून विचार करतो, जे दुवे प्रत्यक्षात सापडत नाहीत ते तर्काने जोडतो, आणि उपाययोजना करतो. हे प्रपंचज्ञान आहे, की ज्यात जाणणारा, जाणणे व जाणावयाची वस्तू हे तीन्ही पदार्थ आस्तित्वांत आहेत. पण हे तीन्ही पदार्थ ज्या ठिकाणी उरत नाहीत त्याला आत्मज्ञान म्हणावयाचे.

श्री. अरविंदांच्या आयुष्यात वासुदेवानुभवास अनन्यसाधारण महत्त्व आहे. माणिकतोळा खटल्याच्या संदर्भात ब्रिटीश कारावासात गेलेले आणि वर्षाने उत्तरपारा या ठिकाणी कारावासातून सुटलेले व भाषणास उभे राहिलेले अरविंद या दोन वेगवेगळ्याच व्यक्ती आहेत असे वाटण्या इतके परिवर्तन कारावासातील त्यांच्या एका वर्षाच्या अनुभवाने घडून आले होते. १८९३ साली स्वामी विवेकानंद सर्वधर्म परिषदेसाठी अमेरिकेस गेले आणि अरविंद आपले शिक्षण संपवून त्याच साली मायदेशी परत आले. ४ जुलै १९०२ ला विवेकानंदांनी महासमाधी घेतली. अरविंद ५ मे, १९०८ रोजी कारावासात गेले आणि ६ मे, १९०९ रोजी सुटले. या काळात विवेकानंद आपल्या मागे येऊन उभे आहेत अशी अनुभूति अरविंदांना येत होती. अलीपूरच्या ह्या तुरुंगात पंधरा दिवस सतत स्वामी विवेकानंदांचे प्रत्यक्ष सान्निध्य व मार्गदर्शन त्यांना लाभले—त्याचीच परिणती हे विश्व वासुदेवमय असल्याचा प्रत्यक्ष अनुभव येण्यात झाली. "उत्तरपारा स्पीच" ह्या नावाने ते भाषण प्रसिध्द आहे. तुरुंगाच्या कोठडीत, देवडीत, पहारेकऱ्यात, कैद्यात, वकिलात, न्यायाधिशात सगळीकडेच प्रत्यक्ष वासुदेवाचे दर्शन त्यांना झाले. जीवाच्या आकांताने भगवंताची करुणा आपण कशी भाकली व शेवटी आपला धावा ऐकून द्रवलेल्या वासुदेवाने कसा प्रतिसाद दिला हे सभेमध्ये ते सांगत होते. आणि देशभक्त अरविंदांच्या ठिकाणी भगिनी निवेदितांना प्रेषित अरविंदांचे दर्शन झाले. त्या म्हणतात—

He is the successor to the Spiritual Masters of the past.

अर्थात पुढे राजकारण सोडून पाँडेचेरी येथे एकांतवास करून श्री. अरविंदांनी अत्युच्च स्थिती प्राप्त करून घेतली. म्हणजेच विज्ञानातून बाहेर पडून ज्ञानाच्या कक्षेत प्रवेश केला. त्यांच्या लेखी प्रपंच उरलाच नाही. एकच एक चिद्विलास भरलेला अनुभवास आला. यावरून ज्ञान व विज्ञान या शब्दांचे अर्थ आपण समजावून घेण्याचा प्रयत्न करावयाचा.

देव पुढे म्हणाले, "अर्जुना, जाणीव, विचार, तर्क यांच्या आधारावाचून जे मिळते ते ज्ञान; बाकीचे सर्व

प्रपंचज्ञान किंवा विज्ञान. अशा विज्ञानास जे सत्य मानते ते अज्ञान असे समज.”

शिर्डीबाबांच्या चरित्रात एक प्रसंग आहे की, शिष्यवर्ग बाबांच्या सेवेत मग्न असताना एकजण गीता म्हणत होता. श्लोक होता—

**तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया ।**
**उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिस्तत्त्वदर्शिनः ॥**

बाबांनी विचारले, ह्या श्लोकाचा अर्थ काय? शिष्याने रूढार्थ सांगितला, “प्रणिपात, प्रश्न, सेवा केल्याने ते ज्ञानसंपन्न व तत्त्वदर्शी आचार्य ज्ञानाचा उपदेश करतात.” बाबा म्हणाले, “अरे, ज्ञानाचा कधी उपदेश करता येतो काय? ज्ञान देण्याघेण्याची वस्तू होऊच शकत नाही. श्लोक “उपदेक्ष्यन्ति तेऽज्ञान” असा आहे. ते (ज्ञानी पुरूष) अज्ञान दाखवतात. त्याचे स्वरूप सांगतात आणि त्यामुळे ज्ञानाचा उदय होतो.” देव म्हणत आहेत, “अज्ञान जाते विज्ञान अशेष करपते, आणि शिष्य स्वतःच ज्ञानस्वरूप होतो.”

आता हे जे ज्ञानाचे वर्म आहे ते शब्दाने जितके सांगता येईल तितके सांगतो. ही वस्तू अशी आहे की थोडी जरी लाभली तरी मनातील अनेक इच्छा तृप्त होतात. सांगणारा आणि ऐकणारा अशा एका अवस्थेत जातात की, सांगणाऱ्याचे बोलणे संपते, ऐकणाऱ्याचे ऐकणे थांबते. आणि ज्ञान विज्ञान या लहानमोठ्या ज्ञानाच्या सीमारेषा पुसल्याच जातात. किंबहुना ज्ञानही जाते, विज्ञान संपते, आणि ज्ञानोदयाने आधीच अज्ञानाचा नाश झालेला असतो.

पण दुर्दैवाने या ज्ञानाची इच्छा असणारेच विरळा. सहस्रामध्ये एखाद्यास इच्छा होते. माणसांनी भरलेल्या ह्या जगात एकेक, एकेक निवडून लक्षावधी सैन्य होते, आणि ते सैन्य मग रणधुमाळीत पाठवले जाते. जेव्हा का तरवारींचा खणखणाट आणि बाणांचा वर्षाव सुरू होतो, तेव्हा रक्तमांसाचा डोंगर उठतो. पण विजयश्रीच्या पाटावर ह्या सैन्यातून एखादाच भाग्यवंत बसतो, तसेच हे आहे. आस्थेच्या महापुरात सहस्रावधी माणसे पोहायला पडतात. पण पलीकडील तीरावर पोहून बाहेर निघणारा धैर्यवान एखादाच असतो. अध्यात्मज्ञान ही अशीच असामान्य गोष्ट आहे. ती शब्दात सापडणारीही नव्हे. पण आता ती सांगितली जाईल. नीट ऐक मात्र.

महत् किंवा बुध्दितत्त्व तुझ्या नित्य परिचयाचे आहे. कोणत्याही गोष्टींचा निर्णय घेताना तुला तुझ्यातील ते तत्त्व स्पष्ट जाणवते. ते बुध्दितत्त्व हे अंगाच्या छायेप्रमाणे पडलेली माझ्या अंगाची पडछाया आहे.

या पडछायेस प्रकृति असे नाव आहे. ती आठ प्रकारची आहे. तिच्यामुळेच ह्या लोकत्रयीची उभारणी होते. पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश ही पंचमहाभूते आणि मन, बुध्दि, अहंकार ही तीन अशी एकंदर आठ तत्त्वे सृष्टिरचनेस कारणीभूत होतात.”

एखाद्याने मोहरीएवढे वडाचे बी आपल्या तळहाती देऊन म्हटले की, “हे घ्या वडाचे झाड.” तर आपण

विचारू ना की, “अहो, हे कसले वडाचे झाड? वडाला मुळे, खोड, फांद्या, पारंब्या, पाने, फळे सगळी हवी. हा तर मोहरीएवढा एक कण, यात, मोहरीत, वडाचे झाड कसे असेल?” देणारा म्हणेल, “पहा पेरून.” तसेच हे देवाचे सांगणे आहे. गर्भवती स्त्री आहे. गर्भाला हात, पाय, डोळे, कान सर्व काही आहे किंबहुना एक पूर्ण व्यक्तिमत्त्व मन, बुध्दि, अहंकारासहित विद्यमान आहे पण दृश्य मात्र नाही. तशी ही सूक्ष्म प्रकृति! जडाला चेतना देते, चेतना वाढवते, मन निर्माण करते, आणि शोकमोहाचे प्रसंग त्या मनाला भोगवते. तीच प्रकृति बुध्दिच्या ठिकाणी जाणण्याची, निर्णय घेण्याची शक्ती होते आणि अहंकाराच्या रूपाने जग तोलून धरते.

प्रकृतीने असे स्थुलस्वरूप घेण्यास सुरवात झाली की जणू काय भूतसृष्टीची टांकसाळ उघडते. अंडज, स्वेदज, जारज, उद्भिज या चार प्रकारचे जीव उत्पन्न होऊ लागतात. जीवांचे लोटच्या लोट निर्माण होतात. आकृतींची किंमत सारखीच पण ठसा वेगवेगळा होतो. बुध्दिबळाच्या खेळातील मोहरी एकीकडील चंदनी व दुसरीकडील शिसवाची असतात. पण प्रत्येकाची चाल वेगळी. उंट तिरपा, घोडा अडीच घरे, राजा शह लागलाच तर एक घर, वजीर आडवा उभा तिरपा कसाही आणि प्यादे एकच घर पण फक्त तिरपे! समोर असले तर काही करू शकत नाही. पण वेळप्रसंगी वजिराचा घास घेते आणि राजाला शह देते. पण हे सर्व गुण वरच्या आकाराचे, खेळासाठी मानलेले, बाकी सर्वांची घडव चंदनाचीच. तसेच हे होते. पंचमहाभूताच्या ह्या नाण्याचा हिशोब एक त्या प्रकृतीसच ठाऊक असतो. इतरांस कळत नाही. एक दिवस प्रकृति ही सगळी नाणी आटवून टाकते. बुध्दिबळाची सगळी मोहरी पेटीच्या कप्प्यात टाकून द्यावी त्याप्रमाणे.

अर्जुना, हे रूपक असू दे. आता उघड सांगतो की, नाम आणि रूप यांचा विस्तार प्रकृति करते, ती प्रकृति तर माझे प्रतिबिंब आहे. तेव्हा ह्या जगास वास्तविक आदि आणि अंत मीच आहे हे ध्यानात घे. प्रकृतीला स्वतःचे असे वेगळे अस्तित्व नाही, “माया” असे तिचे नाव म्हणजे “नाही जी” भगवंताच्या अधिष्ठानाने ती वरवर भासते इतकेच.”

सिध्दचरित्रात मच्छिंद्रनाथ व गोरक्षनाथ यांच्या संवादात गोरक्षनाथांचा प्रश्न आहे.

**अतींद्रिय ज्ञानिया**
**दृश्य माया दिसते**
**की वाया आघवेंचि**?

बाळाचा हा मार्मिक प्रश्न ऐकून संतुष्ट झालेले मच्छिंद्रनाथ उत्तर देत आहेत.

**बारे पाडसा, दिसते,**
**परि मिथ्याभासा**
**जाणोनि, वर्तवी विदेहदशा**
**प्रारब्धरेषा समसाम्ये**

अनुक्रमणिका

माया ज्ञान्यास दिसते पण ते ती प्रतिबिंबात्मक आहे हे जाणून तिचा त्याग करतात. देव पुढे म्हणाले, "जग प्रकृतीने केले असले तरी प्रकृति केवळ माझ्या ठिकाणी भासमान होते, अन्यत्र नाही. म्हणून जगाचा आदि, मध्य, अंत मीच आहे हे समजून घे. अर्जुना, मृगजळाची उत्पत्ती कुठे झाली हे शोधू गेले तर किरणांपासून झाली असे वाटते पण किरणे निघतात सुर्यापासून. तेव्हा मृगजळ सूर्यामुळे दिसते असे म्हटले पाहिजे. सृष्टि निर्माण करणाऱ्या प्रकृतीचे मूळ माझ्या ठिकाणी आहे. त्याचप्रमाणे संहारकाळी प्रकृति ज्या ठिकाणी विश्रान्ती घेते, लीन होते, ते विश्रान्तिस्थान मीच आहे. सृष्टिचे जन्माला येणे, असणे, नाश पावणे ह्या तीन्ही अवस्था माझ्याच ठिकाणी आहेत. एखाद्या दोऱ्यामध्ये मणी ओवावे त्याप्रमाणे हे विश्व मी धरले आहे. सोन्याचे मणी सोन्याच्या साखळीत ओवावे त्याप्रमाणे ह्या जगाला अंतर्बाह्य मीच व्यापून राहिलो आहे. ज्या त्या वस्तूचा स्वभाव मी आहे असे समज."

एका माणसाकडे सोन्याचा खंडोबा आणि त्याच्यासाठी सोन्याचा घोडा होता. घोडा चांगला घाटदार आणि वर बसलेली खंडोबाची मूर्तिही चांगली सुबक होती. भरभराट संपली. अडचणीचे दिवस आले. मित्राने सल्ला दिला, "बाबा, कशाला उगीच हाल काढतोस? घोडा, खंडोबा सोन्याचा आहे ना? विकून टाक. ने सराफ कट्ट्यावर. चांगली किंमत येईल." भक्ताला हा सल्ला मानवला. त्याने दोन्ही मूर्ती सराफाकडे नेल्या. सराफाने निर्विकारपणे त्या वजन केल्या आणि सांगितले, "खंडोबाची किंमत पाचशेहे, घोड्याची दोन हजार" भक्ताच्या मनात कणभर भक्ति शिल्लक होती. तो कळवळून म्हणाला, "छे, छे, असे कसे होईल हो? देवाची किंमत घोड्यापेक्षा कमी? असे कसे होईल?"

सराफ म्हणाला "अहो, देव आणि घोडा हा फरक तुमच्या नजरेचा आहे. मला काय? मी दोन्हींचे ताजव्यात वजन करणार आणि सोन्याच्या वजनाप्रमाणे किंमत देणार. मला फक्त सोन्याच्या वजनाचा विचार करायचा. देव का घोडा मी कशाला बघू?"

भगवंत म्हणत आहेत, "बाह्यतः जगात वस्तू भिन्न भिन्न दिसल्या तरी त्या सर्व एका परब्रम्हाचे प्रतिबिंब आहेत. सगळ्यांची किंमत एकच आहे. वस्तूच्या ठिकाणी असलेला स्वभाव हे त्या भगवंताचे दृश्य रूप आहे.

पाण्याचे पातळपण, वाऱ्याचे स्पर्शरूप, चंद्रसूर्याचा प्रकाश हे सगळे माझेच रूप आहे. पृथ्वीचा गुण गंध, हा गंध शुध्द व नैसर्गिक आहे. ते माझे रूप आहे. आकाशामध्ये मी शब्द, वेदामध्ये मी ॐकार, माणसाच्या ठिकाणी मनुष्यपण, अहंभाव, पौरुष मी आहे. पाण्याचे पातळपण, वायूचा स्पर्श, पृथ्वीचा गंध, गगनाचा ध्वनी हे गुण आपल्या स्थूल इंद्रियांच्या अनुभवास येतात, पण मनुष्याच्या मनुष्यपणाचा साक्षात्कार त्याच्या कृतीतून प्रगट होत असतो. क्रियेवर लक्ष ठेवून ध्यानात घ्यावा लागतो."

रामशास्त्री प्रभुणे दक्षिणा वाटण्यासाठी बसले होते. जवळच नाना फडणीस बसले होते. दक्षणा घेण्यासाठी भिक्षुक, वैदिक समोर येऊन दक्षणा घेऊन जात असताना समोरच्या ब्राम्हणास पहाताच रामशास्त्र्यांनी तबकातले दोन रुपये उचलले. नाना फडणीस हळूच म्हणाले, "आपण ह्यांना जास्त दक्षणा दिली तरी चालेल."

रामशास्त्री दृढ स्वरात म्हणाले, "नाना, मी इथे पेशव्यांचा दानाध्यक्ष म्हणून बसलो आहे. हा माझा भाऊ असला तरी त्याची विद्वत्ता मी जाणतो. त्याला दोन रुपयेच देणे योग्य आहे. भाऊ असला तरी तो घरी. इथे नाही. जास्त काही द्यायचे ते मी पाहीन. या ठिकाणी एव्हढेच!" अशी ही परखड स्वभावाची माणसे, त्यांचे गुण प्रसंगाने प्रगट होत असतात.

ह्याला पौरुष म्हणावयाचे, देवत्व म्हणावयाचे. माणसात दिव्यत्वाचे जे दर्शन होते ते अशा ठिकाणी. देह मानवाचा पण आत राहणारे चैतन्य मधूनच आपले प्रकाशमय ज्वलंत शुध्द स्वरूप डोळ्यांना दिसेल असे प्रकर्षाने प्रगट करते. बाकी देह पंचमहाभूतात्मक! तोही भगवंताच्या कृतीतूनच झालेला. पंचमहाभूतांचे सर्व धर्म मृण्मय देहात आहेतच आणि ती सर्वच भगवंताची छाया आहेत.

देव म्हणाले, "अग्नि असे प्रकाशाला वरवरचे नाव आहे, ते केवळ वरचे कवच आहे. पण ते बाजूस केले की अग्नीचे स्वयंसिद्ध स्वरूप प्रकाश तो मी आहे."

श्रीमत् शंकराचार्यांचे एकश्लोकी अध्यात्म प्रकरण आहे.

| | |
|---|---|
| **कि ज्योतिस्तव** | (कोणता प्रकाश तुझ्या उपयोगास येतो?) |
| **भानुमानहनि मे** | (सूर्याच्या प्रकाशाने दिवसा दिसते.) |
| **रात्रौ प्रदीपदिकं** | (रात्री दिव्याच्या उजेडात दिसते.) |
| **स्यादेवं** | (ते असू दे पण........) |
| **रवि दीप दर्शन विधौ किं ज्योतिराख्याहि मे** | (सूर्य, दीप दाखवणारा प्रकाश मला सांग.) |
| **चक्षुः** | (डोळा) |
| **तस्य निमीलनादि समये किं** | (पण डोळे बंद करून) |
| **धीः** | (बुध्दिने दिसते) |
| **धियोदर्शने किं** | (बुध्दिला ज्ञान कोणामुळे होते?) |
| **तत्र अहं** | (तिथे मी) |
| **अतो भवान् परमकं ज्योतिः** | (अरे तूच सर्वश्रेष्ठ प्रकाश आहेस.) |
| **तदस्मि प्रभो** | (महाराज तो मी आहे.) |

तिन्हीं त्रिकाल म्हणण्यासारखा हा श्लोक आहे.

**किं ज्योतिस्तव भानुमानहनि मे रात्रौ प्रदीपादिकं**
**स्यादेवं रवि दीप दर्शन विधौ किं ज्योतिराख्याहि मे**
**चक्षुस्तस्य निमीलनादि समये किं धी धियोदर्शने**
**किं तत्राहमतो भवान्परमकं ज्योतिस्तदस्मि प्रभो**

**अनुक्रमणिका**

आत्म्याचे दर्शन पृच्छकास एकाच श्लोकात संभाषणातून करून दिले आहे. देव आपल्याला ते स्वतः सांगत आहेत की, "ह्या प्रकाशास प्रकाशमान करणारा तो मीच आहे."

बाह्य आकार मात्र प्राण्यांचे कोट्यवधी असतात. नानाविध योनीमध्ये प्राणी आपआपल्या स्वभावानुरूप आपले जीवन जगतात. आहाराचे तरी किती प्रकार! काही नुसत्या वाऱ्यावर जगतात, काही गवतावर राहतात, काही पाण्यात राहून पाणीच पिऊन असतात. प्रकृति सत्ता गाजवते. तिच्या सत्तेखाली तिच्या सांगण्याप्रमाणे प्राणी निमूटपणे जगत असतात. पण अर्जुना, हे लक्षात घे की, ते प्राणी जसे माझे स्वरूप तसेच ते खातात ते अन्न, पितात ते पाणी, श्वासोच्छ्वास करतात ती हवा हे सगळे काही मीच आहे.

सृष्टीच्या उत्पत्तिकाळी आकाश हा अंकुर प्रथम येतो. जेव्हा प्रलय होतो तेव्हा ॐकाररुपी पटाच्या अक्षराचा लोप होतो. तो अंकुर आणि तो ॐकार मीच आहे. स्थितीकाळी विश्वासारखे दिसणारे आणि प्रलयकाळी निराकर स्वरूप पावणारा असे जे विश्वबीज आहे ते मीच आहे आणि ते मी आज तुझ्या हातात देतो आहे. ते नीट सांभाळून ठेव, त्यावर विचार कर, म्हणजे जेव्हा तू ज्ञानाच्या गावी जाशील तेव्हा त्याचा उपयोग काय हे तुला नीट कळेल.

हे जरा विषय सोडून बोलणे झाले. पण आता जास्त विचार न करता संक्षेपाने तुला माझे स्वरूप समजावून देतो.

**तपस्व्यांचे तप तो मी**
**बलवंताचे बल तो मी**
**बुध्दिमंतांची बुध्दि ती मी**

आणि जीवाच्या ठिकाणी इच्छा नावाची जी शक्ती आहे ती मी आहे."

आत्माराम असे श्रीकृष्ण पुढे म्हणाले, ""अर्जुना, ही इच्छा किंवा काम या स्वरूपात मी जीवामध्ये असल्याने धर्माचा उत्कर्ष होतो. ह्या कामांचे शुध्द स्वरूप तो मी हे मात्र लक्षात ठेव. मलिन इच्छा जीवाला प्रपंचाकडून खेचत असते, त्यात बुडवते, अधोगतीस नेते. पण शुध्द काम त्यांना तारतो. विकाराच्या जोराने इंद्रिये स्वतःला गोड वाटणारी कामे जीवाला करावयास लावतात खरी पण हा शुध्द काम तिथेही जीवाचे संरक्षण करतो. जीवाच्या हातून फार काळ अधर्माचरण करू देत नाही. हळूहळू वाईट प्रवृत्तीची आडवाट सोडून विधिमार्गाने जीवाला राजरस्त्याला नेतो इतकेच नव्हे तर त्या राजमार्गात कोठे अस्पष्टता, अंधार असला तर स्पष्ट नियमांची मशाल घेऊन त्याला नीट वाट दाखवतो.

आत्मारामाचा सखा असलेला हा शुद्ध काम ही इतकी व्यवस्था ठेवतो, काळजी घेतो, म्हणून धर्माची पूर्णता होते. आचरण धर्मास धरूनच होते."

महात्माजी तुरुंगात असताना कस्तुरबा तिथे त्यांना भेटायला गेल्या. जेलरच्या समक्षच कैद्याने बोलावे या नियमानुसार दोघे जेलरच्या साक्षीने बोलत होते. जेलरच्या मनात आले आपण जरा बाजूस झालो तर दोघे मोकळेपणाने बोलतील. म्हणून तो बाहेर गेला आणि वेळ संपताक्षणी हजर झाला. पहातो तो दोघे स्तब्ध बसले आहेत.

जेलरने आश्चर्याने विचारले, “बोलला नाही?”

महात्माजी म्हणाले, “जेलचा नियम आहे ना की, बोलणे जेलरसमोर व्हावे? तुम्ही बाहेर गेल्यावर बोलणार कसे?”

असे नीतिनियमांचे कठोर पालन. देव म्हणतात, “मग धर्म पूर्णत्व पावतो. संसारातच मोक्षाचे मोती सापडते. संसाराचा वेल वेदगौरवाच्या मांडवावर चढतो. कर्मफलाची पालवी मोक्षाला जाऊन टेकते.

अर्जुना, मघाशी तुला सांगितलेच की सगळ्या पदार्थांच्या आकाराचे कारण मी आहे त्याप्रमाणेच मोक्ष मिळवावा ही इच्छादेखील मीच आहे. धर्मपालन करून जीवन जगावे हा संकल्प मीच आहे आणि ह्यातून निर्माण होणारे कर्मफल जेथे घेऊन जाते ते मोक्षस्थानही मीच आहे. सत्त्व, रज, तम या गुणांपासून निर्माण झालेले आणि एकमेकांपासून विलक्षण वेगळे असलेले पदार्थ माझ्यापासूनच उत्पन्न होतात.

पण मी मात्र त्यात सापडलेला नाही हे समजून घे. जागृतीतून स्वप्न निर्माण होते पण जागृती स्वप्नात बुडून जात नाही. जागृती ही वेगळी शुद्ध अवस्था शिल्लक असतेच. भरीव बी म्हणजे गोठलेला वृक्षरसच असतो. ते पेरले की त्याला अंकुर फुटतो आणि त्या रसाचे लाकूड तयार होते पण त्या लाकडामध्ये बीजपण शिल्लक असते काय? आकाशात मेघ येतात पण मेघांत केवळ आकाश असत नाही. ढगात पाणी असते पण पाण्यात ढग असत नाही. ढगामधल्या पाण्याने लखलखीत वीज निर्माण होते पण त्या विजेमध्ये पाणी असत नाही. अग्निमुळे धूर निर्माण होतो पण धुरात अग्नि असत नाही. त्याप्रमाणे माझ्या ठिकाणी विकार निर्माण होतात, जन्म घेतात पण त्या विकारांमध्ये मी असत नाही. पदार्थ माझ्यापासून निर्माण होतात पण त्या पदार्थात मी असत नाही. पदार्थांना माझी ओळखही असत नाही.

पाण्यामध्ये निर्माण झालेले गोंडळ पाणी झाकते. आकाशात निर्माण झालेले मेघ आकाश झाकतात. स्वप्न खोटे असते हे खरे पण जोवर झोपेचा अम्मल आहे तोवर ते स्वतःची स्वतःला आठवण होऊ देत नाही. डोळ्यांतच निर्माण झालेला सारा डोळ्यांची पहाण्याची शक्ति गिळून टाकतो तसेच हे घडते की माझीच पडलेली ही त्रिगुणांची सावली माझ्या व जीवांच्या मध्ये अंतराय निर्माण करते. पाण्यातच निर्माण झालेली मोत्ये जशी पाण्यात विरून न जाता वेगळी रहातात तशी ही जीवसृष्टी माझ्यापासून निर्माण होते पण मायेमुळे मला ओळखत नाही. मातीचा घडा एकदा भाजून निघाला की मग पुन्हा मातीशी एकरूप होऊ शकत नाही तसेच हे घडते आणि माझ्यापासून निर्माण झालेला जीव मलाच अंतरतो.

पण वस्तुतः सर्व प्राणिमात्र माझेच अवयव. मेंढराच्या कळपात एकदा एक सिंहाचा छावा मिसळला

आणि मग मेंढरांच्या संगतीने में में करू लागला. मेंढरू म्हणून जगू लागला, स्वतःचे सिंहरूप विसरला. तसेच जीव मला विसरून जातात. मायेच्या योगाने जीवदशा हेच आपले स्वरूप असे समजून चालतात. ते माझे असून माझे रहात नाहीत, मला ओळखत नाहीत. विषयांच्या ताब्यात पूर्णपणे जातात. एकदा का विषयांचा पगडा बसला की मी व माझेपण यांत गुरफटून आंधळे होतात. देह म्हणजेच मी ही अंधारी रात्र होते. हा सुद्धा सगळा माझ्याच मायेचा खेळ आहे. त्यामुळे ती माया तरून जाऊन माझ्यापर्यंत पोहचणे हे काही सोपे नव्हे. सहज अन्य उपायाने ते शक्य नाही. किंबहुना जे जे अन्य उपाय करशील ते ते जास्त बंधनात पाडतील. या दुस्तर मायेतून तरून जाण्याचा एकमेव मार्ग म्हणजे मला अनन्यभावाने शरण येणे."

यापुढे माऊलींनी या दुस्तर माया नदीचे एक प्रचंड उग्र स्वरूप आपल्यापुढे उभे केले आहे. एखाद्या मोठ्या नदीच्या भोवऱ्यात सापडून आपण कधी गरगरत तर कधी प्रवाहाबरोबर झपाट्याने वाहत चाललो आहो असा खराखुरा प्रत्यक्ष अनुभाव माऊलींच्या शब्दात येतो.

माऊली म्हणतात, "लोक मी आणि माझे या भ्रान्तीमध्ये गुरफटून जाऊन विषयांध होतात आणि वहावटीस लागतात. ब्रह्माचळाच्या तुटलेल्या कड्यापासून संकल्पाची पहिली उकळी येते. त्यावर महाभूतांचा लहानसा बुडबुडा येतो. सृष्टिविस्तार सुरू होतो. काळाची ग्रास करण्याची शक्ति वाढत जाते, सृष्टिविस्तारही वाढतो आणि प्रवृत्ती आणि निवृत्ती या दोन्ही उंच तटाच्या बाहेर ती माया नदी वाहू लागते. त्रिगुणांच्या मेघांची अपार वृष्टी झाल्यामुळे मोहाचा महापूर येतो, यमनियमांची नगरेच्या नगरे ती प्रवाहाबरोबर वाहून नेते. द्वेषाचे भोवरे पाण्यात निर्माण होतात. मत्सररूपी वळणे ती घेत असते. सुंदर स्त्रियांरूपी मोठमोठे मासे जीवांना ग्रासण्याच्या तयारीने त्या महानदीत झळकत असतात. प्रपंचाची वाकडी वळणे घेत ही महानदी वाहत असते आणि एकदा कर्म आणि एकदा अकर्म यांचा तिला पूर येत रहातो. सुखदुःखाची पुराडे तरंगत असतात. जिथे रतिरूपी बेटावर कामाच्या लाटा आपटतात तिथे जीवाच्या फेसाचे समुदायच्या समुदाय दिसतात. अहंकाराच्या मोठाल्या धारा पात्राच्या पोटात वाहत असतात. विद्या, धन, कुल या तीन मदाच्या उकळ्या प्रवाहात फुटत असतात. विषयरूपी प्रचंड लाटा उठतच असतात. उदय आणि अस्त यांचे लोंढे जन्ममृत्युरूप खळगे पाडतात. त्यात पाच भौतिक शरिरांचे बुडबुडे होतात, जातात. अविवेक आणि गोंधळ हे मासे धैर्यरूपी आमिष गिळून टाकतात. पात्रात अज्ञानाचे भोवरे गरगरत असतात. भ्रान्तीच्या गढूळपणाने आशारूप प्राणी फसतात. रजोगुणाच्या खळबळीचा आवाज स्वर्गलोकांपर्यंत गाजू लागतो. रजाची ती खळखळ, तमाची ती प्रचंड धार आणि सत्त्वाचे ते खोल पाणी ह्या सगळ्या अडचणीमुळे ही माया नदी तरून जाण्यास अगदी दुस्तर झाली आहे. पुनर्जन्मरूपी लाटांची उसळी सत्यलोकांच्या बुरुजावर जाऊन आदळली की पुनरावृत्तीच्या आघाताने ब्रह्मांडाचे धोंडे कोसळून पडतात. जोराचा पूर आल्याने या माया नदीच्या वेगाने वाहणारा प्रवाह अजूनही थांबत नाही. आता ही अशी भयंकर नदी कोण तरून जाईल?

इथे आणखी एक चमत्कार आहे. या माया नदीच्या भयंकर प्रवाहातून बाहेर पडावे अशी इच्छा पुष्कळांना होते पण फारच थोडे लोक पैल तीराला पोहचतात. कारण या बाबतीत अडचण ही आहे की जे जे उपाय करावे त्या त्या उपायातच अपायांची बीजे दडलेली असतात. उपाय अगदी खात्रीचा म्हणून ते लोक प्रयत्न करू पाहतात आणि पदरात पडते दुसरीच अनपेक्षित गुंतवणूक. स्वतःच्याच बुद्धिच्या भरवशावर जे ह्या नदीच्या पलीकडे जाण्याच्या ईर्षेने हात मारत निघाले ते कुठे बुडले याची नावनिशाणीही मागे उरत नाही.

काहींना ज्ञानाच्या डोहात गर्वानेच गिळून टाकले. किती एकांनी वेदत्रयाच्या सांगडीचा आश्रय केला पण मीपणाचे धोंडेही बरोबर घेतले. मग ती सांगड बुडत, तरत पुढे जाताजाता मदरूपी मोठ्या माशांनी त्यांना सबंधच गिळून टाकले. किती एकांनी तारुण्याचा कासपेटा कमरेला बांधला होता आणि ते मदनाच्या कासेला लागले होते तर विषयमगरांनी त्यांना चघळून टाकले. काहीजण म्हातारपणी लाटेत लपून असणाऱ्या बुद्धिभ्रंशरूपी जाळ्याने चहू बाजूंनी वेढले जात शोकरूपी कड्यावर आपटतात. क्रोधरूपी भोवऱ्यातून ज्या ज्या ठिकाणी वर येतील त्या त्या ठिकाणी संकटरूपी गिधाडाकडून टोचले जातात. काहीजण दुःखरूपी चिखलाने भरून जाऊन मरणाच्या जाळ्यात फसतात. कामाच्या कासेला लागलेले वाया जातात. यज्ञरूप पेटी बांधून माया नदी तरून जाण्याची कोणी कामना करतात. थोडा वेळ पाण्यावर तरंगतातही पण मग स्वर्गसुखाच्या कपारीतच अडकून पडतात. कर्मठपणाच्या बाहूंचा भरवसा धरून काही लोक पोहण्याचा प्रयत्न करू लागतात. पण विधिनिषेधाच्या अवार्तातच फिरत रहातात, पुढे प्रवासच घडत नाही. माया नदीत वैराग्याची नाव टिकवून धरून पलीकडे नेणे फार कठीण आहे. विवेकाच्या वेळूला ह्या नदीच्या खोलपणाचा अंदाज येणे दुरापास्त आहे. अष्टांग योगाची अंगे यम, नियम, आसन, प्रत्याहार, प्राणायाम, धानधारणा, समाधी ही आहेत. तर त्यांच्यायोगे थोडाफार तरणोपाय होतो.

एकट्या जीवाच्या प्रयत्नाने ही माया नदी तरून जाता येणे हे अशक्यप्राय आहे. अपथ्यशील माणसाची व्याधी बरी होणे, सज्ञनास दुर्जनाची बुद्धि कळणे, लोभी पुरुषाने चालून आलेल्या ऐश्वर्याचा अव्हेर करणे हे जसे अशक्य तसेच हे आहे. चोरांना सभा जिंकता येईल काय? मासा गळ पचवू शकेल काय? भित्रा मनुष्य पिशाच्चावर हल्ला करील काय?

लहान पाडसाने पारध्याचे जाळे तोडले, मुंगीने मेरू पर्वत ओलांडला, तरच मायेचा पैलतीर जीवांना पहाता येईल. पंडुसुता, कामुक जसा स्त्रीच्या पाशातून सुटू शकत नाही तसाच जीव ह्या माया नदीतून केवळ आपल्या प्रयत्नाने तरून जाऊ शकत नाही.

माझी भक्ति करावी, तीही माझे स्वरूप खरे काय आहे हे ओळखून अनन्यभावाने करावी आणि मला सर्वथैव शरण यावे एवढाच मायेतून तरण्यास उपाय आहे.

सर्वभावासहित ज्यांनी माझी भक्ति केली ते मात्र या मायाजलातून सहज तरून जातात. आता तरून जातात असे म्हटले म्हणून तुला वाटेल की ते त्या मायेत शिरतात आणि मग भक्तिबळाने त्या मायेतून बाहेर पडतात. तर पार्था तसे नव्हे. असा चमत्कार घडतो की त्या ज्ञानी पुरुषांना अलीकडील तीरावरच मायाजाल संपल्याचा अनुभव येतो. मायेचे मिथ्यत्व त्यांच्या प्रत्यक्षानुभूतीचा विषय असतो."

सिद्धचरित्रात असा प्रसंग आहे की, बत्तीस शिराळ्यास मच्छिंद्रनाथांची स्वारी ज्या बाईस पुत्रप्राप्तीसाठी विभूति दिली होती तिच्या घरी बारा वर्षांने आली आणि मोठ्या आनंदाने आणि उत्सुकतेने विचारले, "बाई, आमचा बंड्या कुठे आहे?"

बाईस ब्रह्मांड आठवले. रडत रडत पाय धरून ती म्हणाली, "महाराज, अंगारा लाभलाच नाही.

मैत्रिणीच्या सल्ल्याप्रमाणे मी तो उकिरड्यावर टाकला."

नाथ हसले आणि उकिरड्याजवळ जाऊन प्रेमाने हाक मारीत म्हणाले, "आईये लरके, कितनिये दिन हुँवा बैठिये?" आणि भस्मातील निखाऱ्यासारखा बारा वर्षांचा तो बालक बाहेर येऊन हात जोडून उभा राहिला.

मच्छिंद्रनाथांनी बाळाला कवटाळून घेतले. त्यांचे डोळे पाण्याने भरून आले. त्याला कुरवाळून म्हणाले, "मी किती रे विवेकशून्य! या मूर्ख बाईला विभूति देऊन तुला मात्र बारा वर्षे शिणवले."

बाळ म्हणाला, "महाराज, तेच बरे झाले. मला गर्भागाराचे कष्ट तरी भोगावे लागले नाहीत."

मायेचे पाणी अलीकडच्याच तीरावर बाळासाठी संपले होते.

भक्तालाही ते असेच सरते.

देव म्हणत आहेत, "माझ्या भक्तांना स्वप्न 'स्वप्न आहे' हे कळते कारण समजा ह्या दुस्तर नदीतून तरून जाण्याचा प्रसंग आलाच तर त्यांनी सगळी सामुग्री नीटनेटकी जमवलेली असते. आत्मानुभवाचा कासोटा घट्ट बांधलेला असतो. आत्मानिवेदनरुपी तराफा हस्तगत करून ठेवलेला असतो. सद्‌गुरुरूपी तारू पुढे चाललेले असतेच. अहंभावाची ओझी ते टाकून देतात. विकल्पाच्या वाऱ्याच्या झळुका चुकवतात आणि संसारातील प्रेमाच्या ओहोटीचे पाणी तपासून पोहतात. जीव आणि परमात्मा यांच्या ऐक्यबोधाचा उतारा त्यांना सापडतो. बोधाचा तारा दिशा दाखवत असतो आणि अशा रीतीने ते निवृत्तिच्या पैलतीरावर निघतात. वैराग्याच्या हाताने पाणी तोडत 'सोऽहं' भावाच्या बळावर सुलभतेने ते निवृत्तिकाठावर निघतात. पण ह्या उपायाने ज्यांनी माझी भक्ति केली व करतात, जे मायेतून तरून जातात असे भक्त थोडे आहेत फार नाहीत.

कारण इतर बऱ्याच साधकांमध्ये अहंकाराचा भूतसंचार झालेला असल्याने आत्मबोधाचा त्यांना विसर पडतो. नियमांच्या वस्त्रांची आठवण रहात नाही. वेदांनी जी कर्मे करू नये असे म्हटले ती ते करत रहातात. किंबहुना अयोग्य तेच योग्य असा त्यांचा आग्रह होत रहातो. शरिराच्या गावी ज्या कामासाठी ते आले ते काम पार सोडून देतात. इंद्रियरूपी गावाच्या राजरस्त्यावर मी आणि माझे याविषयी बडबड करत नाना प्रकारच्या विचारांची गर्दी जमवतात, आणि या सर्वांचा परिपाक म्हणून अंगावर पडणाऱ्या दुःख-शोकांचे आघात पुनःपुन्हा सोसत रहातात पण आपले कर्म बदलत नाहीत. मायेने ग्रासून गेल्यामुळे सुटकेचा मार्गच त्यांच्या ध्यानी येत नाही आणि म्हणून माझी आणि त्यांची भेटच होत नाही.

काहीजण मात्र माझ्या भक्तिच्या मार्गाने चालू लागतात आणि वर्धिष्णु अशा स्वरूपात आत्महित प्राप्त करून घेतात. असे भक्त चार प्रकारचे आहेत.

पहिल्यास आर्त, दुसऱ्यास जिज्ञासू, तिसऱ्यास अर्थार्थी व चौथ्यास ज्ञानी या नावाने ओळखावे. आर्त संकटातून सुटका व्हावी म्हणून भक्ति करतो. जिज्ञासुला जाणण्याची इच्छा असते, अर्थार्थीला अर्थप्राप्ती व्हावी

अशी तळमळ असते पण शेवटचा जो ज्ञानी आहे त्याला कशाचीच अपेक्षा नसते म्हणून तोच एक खरा भक्त आहे असे समज. या ज्ञानी भक्ताच्या अंतःकरणात ज्ञानाचा प्रकाश इतका ओतप्रोत भरलेला असतो की भेदाभेदाचा अंधार औषधालाही तिथे उरलेला नसतो. 'मी ब्रह्म आहे.' ह्या भूमिकेवर आरूढ झालेला हा भक्त माझ्यापासून वेगळा उरलेलाच नसतो. एकरूपच झालेला असतो. स्फटिकच पाण्यासारखा वाटतो तसा माझ्याशी एकरूप असलेला तो भक्त शारीरक्रियामुळे सामान्यसारखा व माझ्याहून भिन्न असल्यासारखा दिसला तरी तो आभास आहे. तो व मी वेगळा नाही ही किती कौतुकाची गोष्ट आहे! वारा आभाळात विरला की कुठे वेगळा रहातो? फक्त हालवला तरच आकाशाहून भिन्नसा प्रत्ययाला येतो. तसा शरीरकर्मानेच तो केवळ वेगळा दिसतो. मनाने, प्रतीतीने, तो माझ्यात पूर्णतया मिसळून गेलेला असतो. ज्ञानाचा उदय झाल्यामुळे तो मला आत्मा समजतो आणि त्या प्रेमाने उंचबळून जाऊन मोठ्या आनंदाने मीही 'ज्ञानी माझा आत्मा' असे म्हणतो. इतर तीन प्रकारचे भक्त आपआपल्या हितासाठी मला झोंबतात पण मी ज्याच्यावर प्रेम करतो असा भक्त म्हणजे ज्ञानी भक्त. जीवाच्या पलीकडील खूण मिळाल्यावरही व्यवहार कसा करावा हे तो जाणतो. देह वेगळा असला तरी तो माझ्यापासून वेगळा होतच नाही. दुभत्याच्या आशेने जग गायीच्या पायाला दोर बांधते पण वासराचा भाग त्याला दोरी न बांधताच मिळत असतो ना? तसे हे घडते. ते वासरू तनुमनप्राणाने आईपेक्षा दुसरे कोणी जाणत नाही. समोर दिसते ती माझी आई एवढेच ते जाणते. त्या आईजवळच त्याची सर्वार्थाने तृप्ती होते. याप्रमाणे ते अनन्यशरण असल्याने गायही त्याच्यावर तशीच प्रीती करते. व्यवहारात जर हे असे दिसते तर देवाने भक्ताबद्दल तीच भावना व्यक्त केली हे बरोबरच आहे."

देव सांगत होते, "पार्था, तीन प्रकारचे जे आणखी भक्त आहेत ते पण मला आवडतात. पण हा ज्ञानी भक्त भक्तशिरोमणी आहे. तो मला जाणल्यानंतर मागे वळून पहायचेसुध्दा विसरतो. समुद्राला एकदा येऊन मिळाल्यावर गंगा परत फिरणे विसरून जाते तशी ह्यांची अवस्था असते. त्यांच्या अंतःकरणाच्या गुहेतून बाहेर पडलेली प्रतीतीगंगा माझ्यामध्ये एकरूप होऊन जाते. तो मीच होतो यापेक्षा तुला आणखी काय सांगू? अर्जुना, मी ज्याला ज्ञानी ज्ञानी म्हणतो तो केवळ माझे चैतन्य झाला. ह्या गोष्टी खरे म्हणजे बोलण्यासारख्या नाहीत पण तुझ्याजवळ बोलल्याशिवाय रहावेना म्हणून बोलतो इतकेच.

प्रपंचापासून माझ्यापर्यंत पोहचण्याचा प्रवास ह्या भक्ताने कसा केला ते सांगू का? विषयांची खूप झाडी होती, त्या दाट झाडीत कामक्रोधांची संकटे होती. त्यांना चुकवून प्रसंगी लढाई करून तो सद्वासनेच्या डोंगरावर आला."

बार्शीच्या एका भक्ताची गोष्ट. त्याचा नेम असा की देवळात रोज न चुकता आरतीला जावयाचे. पण कसे? रस्त्यावर साष्टारंग नमस्कार घालत. घरातून नमस्कार घालत निघावे ते आरतीच्या वेळी देवळात पोहचावे. अंगावरचे वस्त्र फाटके तुटके आहे याचे त्याला भान नसावयाचे. आरतीला येणाऱ्या दुसऱ्या एका कनवाळु भक्ताला दया आली. फाटकी तुटकी वस्त्रे पाहून त्याने एक पीतांबर त्या साष्टांग नमस्कार घालणाऱ्या भक्ताला दिला. दुसरे दिवशी तो भक्त पीतांबर नेसला आणि नित्यनेमाप्रमाणे रस्त्याने साष्टांग नमस्कार घालत निघाला. रोज वस्त्राचे भान नसायचे. एक भगवंताचा ध्यास असावयाचा.

पण आज त्या महावस्त्रास घाण लागेल म्हणून दर नमस्कारास पाऊल आडखळू लागले. जपून

नमस्कार घालता घालता इतका उशीर झाला की, आरतीची वेळ टळून गेली. भक्तांच्या डोळ्यातून अश्रुधारा वाहू लागल्या. त्याने हात जोडले आणि म्हटले "देवा अपराध झाला रे. ह्या वस्त्राच्या नादात तुला देखील विसरलो. नको ते वस्त्र मला." आणि त्याने तो पीतांबर तात्काळ दान करून टाकला. ह्या गोष्टीप्रमाणे देव सांगतात "अंगावर आलेली मोहाची श्वापदे त्याने चुकवली. मनाचा असा निश्चय केला की "भगवंताखेरीज मला काही नको."

पण एकट्याच्या बळावर हा प्रवास होत नाही. साधे देशाटनसुध्दा भल्याच्या संगतीने करणेच योग्य. हा तर मोक्ष प्रसादाकडे नेणारा रस्ता. या रस्त्यावर उत्तम सोबत हवीच. म्हणून तो भक्त संतांची संगत धरतो. संत नुसते बोलत नाहीत स्वतः खरा धर्म आचरून दाखवतात. त्यामुळे निषिध्द कर्म कोणते, सत्कर्म कोणते हे त्याला आपोआप कळते. तो सत्कर्माची वाट चालायला सुरवात करतो. फलाची आशाहि मनात न धरता शेकडो जन्म अनवाणी पायाने माझ्या प्राप्तीसाठी तो धावत असतो. फलाच्या आशेमुळे धांवण्याचे श्रम कर्मकर्त्यास कमी कष्टदायक वाटतात पण ह्या माझ्या मुमुक्षु भक्ताच्या पायात फलहेतूच्या वहाणाही नसतात. त्याने त्या जाणूनबुजून बाजूस टाकलेल्या असतात. आणि अशा रितीने धावत असताना त्याला जगाचे भानही नसते."

एका संताजवळ एक दासी तीस वर्षे काम करीत होती. एक दिवस संतांनी वर पाहून म्हटले "अक्का, आत जाऊन जरा आमच्या दासीला बोलावतेस काय?"

दासीने हात जोडून म्हटले "महाराज आज तीस वर्षे आपल्याजवळ राहून सेवा करणारी मीच ती दासी."

संतांनी हळूच म्हटले "हे बघ तीस वर्षात मी भगवंताशिवाय कुणाकडे स्थिर दृष्टीने पाहिलेच नाही त्यामुळे मी तुला ओळखले नाही."

अशी ही भगवंताच्या चरणी मनाची स्थिर अवस्था.

देव सांगत आहेत, फलाचा हिशेब न करता केल्या जाणाऱ्या ह्या भक्तीमुळे शरिराच्या संयोगाची रात्र हळूहळू संपून देहतादात्म्य नाहीसे होते. कर्मक्षयाची पहाट होऊ लागते. हातून घडणारे कर्म अलिप्त वृत्तीने होत असल्याने ते फल देण्यास असमर्थ झाल्याबरोबर गुरुकृपेचा उषःकाल होतो. कोवळे ऊन पडावे तसा ज्ञानाचा प्रकाश पडतो आणि त्या ज्ञानी भक्ताच्या दृष्टिपुढे साम्याचे ऐश्वर्य उभे रहाते. अर्जुना, आता त्या माझ्या भक्ताला जिकडे दृष्टि टाकावी तिकडे मीच दिसतो. काही न पाहता तो निवांत बसला तरी मी समोर आहेच. डोहामध्ये बुडून राहिलेल्या घागरीत जसे आत बाहेर पाणीच भरलेले असते तसा त्या भक्ताला मी सर्वत्र ओतप्रोत भरलेला दिसतो. याप्रमाणे तो माझ्यात आणि मी त्यांच्यात असतो. पण ही अवस्था शब्दांत व्यक्त करण्यासारखी नाही. त्यांची प्रत्यक्ष अनुभूतीच हवी. ती प्रचीती आली की ज्ञानाच्या वैभवाच्या जोरावर सर्व विश्व आत्मसात होते. हे सगळे जग वासुदेवमय आहे असा त्याच्या बुध्दिचा निश्चय झालेला असतो, तसा त्याला अनुभवही येतो. म्हणून अर्जुना हा ज्ञानी सर्व भक्तांचा राजा आहे. त्याच्या अनुभवाच्या भांडारात सर्व चराचराचा गौरव केलेला असतो. अर्जुना असा महात्मा दुर्लभ मात्र आहे.

अनुक्रमणिका

भोगासाठी भजन करणारे भक्त पुष्कळ मिळतात. पण आशेच्या अंधाराने त्यांची दृष्टी मंद झालेली असते. फल मिळावे ही इच्छा तीव्र होऊन तिने ह्रदयात प्रवेश केला की, तिच्या स्पर्शाने ज्ञानाचा दिवा शांत होतो. आणि मग आत अज्ञान व बाहेर आशा अशा दुहेरी अंधारात सापडून ते अगदी जवळ असणाऱ्या मला विसरतात. मग क्षुद्र फल देणाऱ्या इतर देवतांची उपासना सुरू करतात. आधीच देहाचे दास, त्यात भोग मिळावा ह्या आशेने दीन झालेले हे लोक किती कौतुकाने ह्या क्षुद्र देवतांची पूजा आरंभतात बघ. आराधनेचे नियम समजावून घेतात, लागणारे उपचार, सामुग्री कटाक्षाने जमवितात यथाविधि अर्पण करतात. भोग प्राप्त व्हावे यासाठी हे सगळे पूजन असते. आता अशा प्रकारची उपासना करावी ही त्यांची इच्छा पुरविणारा मीच आणि मांडलेल्या त्या भिन्न भिन्न देवताही मीच. पण ते त्यांच्या मनात येत नाही. या देवता कुणी वेगळ्याच आहेत अशी त्यांची समजूत असते. श्रध्देने केलेले योग्य आराधन पूर्ण होते आणि त्याचे फलही मिळते. ज्याने जशी इच्छा केली असेल तसे फळ देण्यास मी बांधलेलाच आहे. पण माझ्यामुळेच आराधना घडते व फलप्राप्ती होते हे त्या भक्तांना कळत नाही. कल्पनेच्या बाहेर ते निघूच शकत नाहीत, नाशवंत असे इच्छित फल पदरात घेत रहातात. फार काय सांगू पण असे हे फल संसाराचे साधन आहे. मरणाच्या फेऱ्यात गुंतवणारे हे साधन आहे. क्षणमात्र दिसणाऱ्या स्वप्नासारखा हा लाभ असतो. पण ते असो.

संकल्पाची सिध्दि झालीच पाहिजे हा नियम आहे आणि त्याप्रमाणे दैवतांची भक्ति करणाऱ्यास देवत्व प्राप्त होते. कारण सर्व दैवते मीच आहे. दुसरे जे भक्त आहेत ते माझे स्वरूप जाणून शरीर-मन-प्राणे करून अहोरात्र माझी भक्ति करतात ते देह पडल्याबरोबर मीच होतात. सगळे प्राणी असेच का करत नसतील रे. आपले हित त्यांना कळतच नाही. उगीचच हितामध्ये कमीपणा आणतात आणि तळहातावरील पाण्यात पोहत रहातात. अमृताच्या समुद्रात पडायचे आणि ओठ घट्ट मिटून घेऊन आपल्या परसांतल्या डबक्याची आठवण करायची असा हा त्यांचा उद्योग होतो. असं कां रे करावं? अमृत होऊन सुखाने अमृतातच बुडी मारून का राहू नये? आपल्या आवडीप्रमाणे खुशाल सगळ्या आकाशाच्या प्रशस्त रस्त्याने उडावे असा सुखसंचार करता येण्यासारखा असताना फळ हेतूचा पिंजरा मोडून काढून अनुभवाच्या पंखानी झेप घेत ह्या चिदंबराचा राजा का होऊ नये रे? धनुर्धरा, अरे अमर्याद स्वरूपाला आपल्या तोकड्या बुध्दिचे माप कशाला घालावे? अव्यक्तास व्यक्त का मानावे? अरे मी स्वयंसिध्दच असताना साधने करण्याकरिता का बरे मरणप्राय कष्ट घ्यावे? मी तर जवळच आहे. पण या सगळ्याचा विचार जीवांना सहसा आवडत नाही. योगमायेच्या पडद्याने ते आंधळे झालेले असल्याने माझे स्वरूप दिवसाच्या प्रकाशासारखे स्पष्ट दिसत असले तरी मला पाहू शकत नाही. एरवी मी नाही अशी वस्तू जगात आहे काय? पाणी पातळ नाही असे कुठे दिसेल काय? वारा कोण एकाला शिवत नाही हे घडेल का? आकाशाचा शिरकाव नाही अशी जागा सापडेल का? त्याचप्रमाणे मी नाही अशी वस्तू या जगात असेल काय? अर्जुना, अरे मी ह्या सगळ्या विश्वाला व्यापून उरलो आहे?

ह्या विश्वात जितके प्राणी झाले ते, आज आहेत ते, व भविष्यकाळात येणार आहेत ते सगळे मीच आहे. माझ्याहून यातले वेगळे कोणीच नाहीत. प्राणी माझ्याहून वेगळे जन्मास येतात, जगतात, मरतात, हा सगळा अभासच आहे बरं का! दोरीवर भासणाऱ्या सापाच्या जातीची डोंबा, बडी, गव्हाळ, अशी चर्चा करावी, वाद करावा, हिशोब करावा तसा हा प्रकार आहे. प्राण्याचा बाह्याकार मिथ्या आहे. मीच सगळीकडे अखंडित अशा स्वरुपात आहे. बाह्यकारावरच हे जन्ममरणाचे चक्र का आभासित होते ते सांगतो ऐक.

देह जन्माला आला की, “मी देह” हा अहंकार जीवाला चिकटला. ह्या जोडप्यास इच्छा नावाची मुलगी झाली. कामरूपी तारुण्यात आल्यावर तिने द्वेषाशी लग्न लावले. त्या दोघांना द्वंद्वमोह नावाचा मुलगा झाला. आणि मुळातला जो अहंकार आजोबा त्याने त्याला वाढवले. हा मुलगा असा निघाला की सात्त्विक धैयाच्या तो नेहमी विरुध्दच असावा. आशारसाने पुष्ट झालेला तो द्वंद्वमोह नियम झुगारून देतो आणि असंतुष्टतेची मदिरा घेऊन विकृति या आपल्या स्त्रीबरोबर पंचविषयंरूपी खोलीत रहातो. बरे तिथेही स्वस्थ रहातो म्हणतोस? अंतःकरणशुध्दिच्या मार्गावर विकल्परूपी काटे पसरून निषिध्द कर्माची आडवाट वहाती करतो मग काय? इतर लोकही भांबावून त्याच वाटेने चालू लागतात आणि संसाराच्या आडरानात महादुःखाचे प्रहार घेत रहातात. हा सर्व अनर्थ पाहून काही शहाणे सावध होतात. ती आडवाट ते निग्रहाने सोडून देतात. त्यांची बुध्दी त्यांना वेगळी वाट दाखवते.

एकनिष्ठ ईश्वरभक्तीच्या पावलांनी धैर्याने चालत ते हे विकल्प काटे रगडून टाकतात. महापातकाचे अरण्य सोडून पुण्यरूपी धाव घेत थेट माझ्याजवळ येऊन पोचतात. काम, द्वंद, मोह या वाटमाऱ्यांच्या तावडीतून ते कायमचे सुटतात.

एका राजाने एकदा एका सत्पुरुषास विचारले की, महाराज, “मला पुढला जन्म कोणाचा व कुठे येईल? कोणत्या देशाचा मी सम्राट हाईन?” असा राजाच्या मनातला हेतू! सत्पुरुषानी क्षणभर डोळे मिटून घेतले आणि सांगितले, “राजा, अमुक माणसाच्या परसात तुला डुकराचा जन्म येणार आहे. बाकीची पिले काळी असतील आणि तू पांढरा शुभ्र असशील. जन्माचा काळ अमुक अमुक असेल.”

राजा अगदी खिन्न झाला. त्याने युवराजास बोलावून आणले आणि सांगितले “बाळा मला वचन दे की, मी दिलेली आज्ञा पाळीन.” युवराजाने वचन दिल्यावर सर्व वृत्तांत सांगून राजा म्हणाला, “या अमुक वेळी त्या माणसाच्या परसांत जाऊन त्या पांढऱ्या पिलाचा वध तू आपल्या हाताने करावास. मला त्या ठिकाणी रहावयाचे नाही.”

युवराजाने आज्ञा मान्य केली. कालांतराने राजाचे देहावसान झाले. दुसऱ्या जन्माचा काळ आला. आता राजा झालेला तो युवराज तलवार घेऊन त्या माणसाच्या परसात गेला. तो खरेच एक डुकरीण आपल्या पिलासह फिरत होती. त्या पिलात बाकीची काळी आणि एक पांढरे होते. राजाने तलवार उपसल्याबरोबर त्या पिलास मानवी वाचा फुटली. ते म्हणाले “बाळा, अरे नको मला मारूस. मी इथेसुध्दा सुखांत आहे, इतर काळे तर मी पांढरा म्हणजे मी यांचा राजाच आहे की. मी अगदी आनंदात आहे.”

माणसाची नैसर्गिक प्रवृत्ति ही अशी असते पण एकदम एका शुभ क्षणी त्याला विरक्ति निर्माण होते. तो मनाशी म्हणतो, पुरे हे क्लेश, किती वेळा ही सुख-दुःखे भोगायची? यातून सुटण्याचा काही मार्ग असेल. तर मी प्रयत्न करीन आणि सुटेन. ही प्रयत्नांची इच्छा “शुभेच्छा” या नावाने प्रसिध्द आहे. जन्ममरणांतच आनंद मानणाऱ्या जीवाला या चक्रातून सुटावे अशी जबर इच्छा होणे हे फार महत्त्वाचे पाऊल आहे. आता हे पाऊल ह्या बदललेल्या रस्त्यावर पडले की शुभेच्छा प्रखर होत जाते. त्याला प्रयत्नाची दिशा कळते आणि मग तो

मोक्षार्थी प्रयत्नाची पराकाष्ठा करू लागतो. जीवाच्या कराराने केलेले हे प्रयत्न एक दिवस सफल होतात आणि परब्रम्हाचे फळ पिकून त्याच्या पदरात पडते. हे फळ अगदी परिपक्व असल्याने त्यांतून पूर्णतेचा रस गळत असतो. एका माणसाचेच जीवन कृतकृत्य होते असे नाही तर त्या जीवाच्या पूर्णतेने सगळे जग धन्य होते.

त्याची अध्यात्माशी आतापर्यंत असलेली अनोळख संपून त्याच्याशी ऐक्य होते. मला भांडवल करून केलेल्या ह्या उद्योगांत त्याला असा **अध्यात्म** हा नफा होतो. **कर्माचे** कारणच उरत नाही. मन शांत होऊन जाते, नाहीसेच होते.

साम्याच्या वाढीमुळे ऐक्याचा व्यापार त्याला साधतो. तो इतका साधतो की क्षणोक्षणी जाणवणारे भेदाचे दारिद्र्य आता त्याला जाणवतच नाही. तो सामान्य प्राकृतिक जीव म्हणून जगत नाही. तर परमवैभवशाली परमात्मा होऊन जगतो. परमात्म्याशी पूर्ण ऐक्य अनुभवतो.

आता देव तीन पदे उच्चारीत आहेत. ह्या तीन्हीचा अर्थ आठव्या आध्यायात स्पष्ट करून सांगितला आहे. तीन पदे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १ | अधिभूत | याचा अर्थ शरीर |
| २ | अधिदैव | याचा अर्थ जीव |
| ३ | अधियज्ञ | याचा अर्थ शिव शरिरात रहाणारा परमात्मा. |

देव म्हणत आहेत, "अर्जुना शरिराच्या जोरावर अनुभवाने जीवात्म्याचे दर्शन घेऊन जे ज्ञानाच्या योगे माझी अनुभूती घेतात ते शरिराचा त्याग होत आहे, अशा मरणाचे वेळेही शरिराचा आता वियोग होणार या जाणिवेने दुःखी होत नाहीत. सहज विचार केला, पाहिले तर, आयुष्याची दोरी तुटली की जाणाऱ्या जीवाची खळबळ उडते. प्रलयकाळच ओढवला असे त्या प्राण्यास वाटते. पण माझ्या स्वरूपाशी जे जिवंतपणे एकरूप होऊन गेले त्यांना कसे कोण जाणे पण मरणाच्या धांदलीतही माझे विस्मरण होत नाही. असे जे निष्णात आहेत ते माझ्याशी समरस झालेले योगी आहेत असे समज."

श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, "देवांच्या शब्दांच्या कुपीखाली अर्जुनाच्या अवधानाची अंजुळी केली गेली नाही. अर्जुन मागेच राहिला. ब्रम्हाचे वर्णन करणारी ही वाक्ये नाना अर्थरसांनी भरलेली होती. अभिप्रायाच्या सुगंधाने दरवळत होती. कृष्णरूपी झाडाला लागलेली ही अमृत फळे कृष्णाच्याच कृपारूपी मंद वाऱ्याने अर्जुनाच्या कानरूपी खोळीत अचूक गळून पडली. अर्जुनाला कुठलेही श्रम पडले नाहीत. श्रीकृष्णकृपेने बसल्या जागी हे ब्रम्हनिरूपण केले जात होते, समजावून दिले जात होते. ती वाक्यफळे पाहिली तर तत्त्वज्ञानाच्या सिध्दांतानी बनवलेली ब्रम्हरसात बुडवून काढलेली आणि परमानंदात घोळलेली अशी होती. त्या फळांच्या शुध्द चांगलेपणाने अर्जुनाला ज्ञानाचे डोहाळे लागले. विस्मयरूपी अमृताचे तो घुटके घेऊ लागला. ही एवढी सुखसंपत्ती हाती आल्यावर अर्जुन स्वर्गाला वेडावू लागला. ह्रदयाच्या जीवात त्याला आनंदाच्या गुदगुल्या होऊ लागल्या. ब्रम्हवाक्यफळाच्या वरच्या रूपाने मोहून गेलेला अर्जुन मग खोळीत पडलेल्या त्या फळांचा आस्वाद घ्यावा असे म्हणू लागला. ती वाक्ये त्याने पुन्हा पुन्हा मनात आणली. त्यातील

पदांची रचना पाहिली. शब्दार्थ पाहिला, ध्वन्यार्थावर विचार केला. त्यातील अर्थ आपल्या आजवरच्या अनुभवांशी कसा काय व कुठे जुळतो हे पहाण्याचा प्रयत्न केला तेव्हा मात्र त्याची पूर्ण निराशा झाली.

विचारांच्या तोंडात ती फळे मावेनात. हेतूच्याही दातांनी फुटेनात. तेव्हा अर्जुनाला ती खाता येईनात. त्या ब्रह्मवाक्यांचा पूर्ण अर्थ कळेना आणि त्यातला आनंद अनुभवता येईना.

मग तो मनाशी म्हणू लागला. मी कसा फसून गेलो हो! शब्द सोपे वाटले पण त्यांचे वरवरचे सोपेपण पाहून पाण्यात पडलेले तारांगणाचे प्रतिबिंब हातात आलेले पाहून संपूर्ण तारांगणच प्रत्यक्ष हातात आले असे मानणाऱ्या मूर्खासारखा मी फसलो. मला वाटले शब्द सोपे आहेत, अर्थ सोपाच असेल. मला लगेच कळेल.

पण ही कसली वाक्ये म्हणावयाची, अहो ह्या तर आकाशाच्या घड्याच आहेत. आम्हांला यांचा काय पत्ता लागणार, नुसता वरवरचा शब्दार्थ देखील कळेना. अभिप्राय कळण्याची गोष्ट कशाला?

अर्थ न कळल्यामुळे मनातून निराशा झालेल्या अर्जुनाने यादवेंद्र कृष्णाकडे आशेने पाहिले. हात जोडले आणि म्हटले, “देवा अहो हे सातही शब्द मला अगदी कळले नाहीत हो.”

१. ब्रह्म

२. अध्यात्म

३. कर्म

४. अधिभूत

५. अधिदैव

६. अधियज्ञ

७. प्रयाणकाळी भगवंताचे स्मरण.

काय या शब्दांचा अर्थ? विचार करता करता जीव थकून जातो. आणि शब्दांचा अद्भूतपणा जाणवून केवळ आश्चर्यच आश्चर्य वाटत रहाते. अगदी लक्षपूर्वक एकाग्रचित्त करून ऐकले की कळेल असे मला उगीचच वाटले. त्यांच्याबद्दल तुझ्याशी बोलता येईल, शंका विचारात येतील, चर्चा करता येईल असे देखील मी मनाशी म्हणत होतो पण हे त्यातले नव्हेच. देवा अक्षरांचा मेळावा नुसता बघूनच विस्मयाच्या जीवाला विस्मय झाला आहे. कानाच्या खिडकीतून या बोलांचे किरण आत अभ्यंतरात शिरले मात्र, माझे अवधानच थकले.

देवा हो, याचा अर्थ मला कळायला हवा आहे. जीव व्याकुळ होतो आहे. या सात पदांचे आपण कधी एकदा विवरण कराल असे झाले आहे. तेव्हा वेळ न लावता तात्काळ मला समजेल असा अर्थ सांगा हो. शब्द कानावर पडल्यापासून अर्थ कळेपर्यंत लागणारा हा वेळही आता सहन होईना.

अनुक्रमणिका

माऊली म्हणतात “देवांनी आतापर्यंत केलेला उपदेश लक्षात ठेवून आता पुढे काय सांगणारा यावर लक्ष एकाग्र करून आणि आपली इच्छा मध्ये शिरकावून प्रश्न विचारण्याची अर्जुनाची चतुराई किती वर्णन करावी! भिडेची मर्यादा अगदीच सोडली नाही तरी पण श्रीकृष्णाच्या अंतःकरणाशी एकरूप होण्याइतकी अर्जुनाची तयारी झाली, गुरूंना प्रश्न विचारला तर उत्तर ऐकण्यासाठी किती व कसे तत्पर असायला हवे हे एक अर्जुनच जाणे. आता अर्जुन प्रश्न करील, परमात्मा त्याचे उत्तर देईल आणि हा संवाद मोठ्या आवडीने ऐकणारा संजय धृतराष्ट्रास समजावून सांगील. हा सर्व सोहळा साध्या सोप्या मराठीतून श्रोत्यांना सहज कळेल अशा बेताने मी सांगीन. शब्द असे असतील की त्याचे रूपच आपणा सर्वांना तृप्त करील. कानापूर्वीच डोळ्यांचे फावेल. अभिप्राय कळण्यापूर्वी शब्द सौंदर्य सुखवील. अभिप्रायाची चव कळण्यासाठी बुध्दिच्या जिभेचा उपयोग करावा लागेल पण त्याच्या आधीच रचनेच्या सौंदर्याचा प्रत्यय येईल. आणि दोन्ही इंद्रिये त्या सुखावर जगतील. मोगरीच्या कळ्या वासाने नाकाला आनंद देतात खऱ्या पण त्या डोळ्यांना देखील आनंद देतात, सुरेख दिसतात, तसे मराठीच्या शब्दवैभवाने तृप्त झालेली इंद्रिये सिध्दांताच्या गावाला सहज पोचतील. मधुर भाषेत ज्ञान दिले जाईल. शब्द जिथे विलीन होऊन जातो त्या अवस्थेबद्दल मी सुंदर रीतीने सांगतो. आपण ते ऐकावे अशी मी निवृत्तीदास ज्ञानदेव विनंती करतो आहे.

***

॥ श्री ॥

## अध्याय आठवा

# अक्षरब्रह्मयोग

**॥ ॐ नमो भगवते वासुदेवाय ॥**

अर्जुन उवाच—

किं तद्ब्रह्म किमध्यात्मं किं कर्म पुरुषोत्तम ।
अधिभूतं च किं प्रोक्तमधिदैवं किमुच्यते ॥ १ ॥

अधियज्ञः कथं कोऽत्र देहेऽस्मिन्मधुसूदन ।
प्रयाणकाले च कथं ज्ञेयोऽसि नियतात्मभिः ॥ २ ॥

श्रीभगवानुवाच—

अक्षरं ब्रह्म परमं स्वभावोऽध्यात्ममुच्यते ।
भूतभावोद्भवकरो विसर्गः कर्मसंज्ञितः ॥ ३ ॥

अधिभूतं क्षरो भावः पुरुषश्चाधिदैवतम् ।
अधियज्ञोऽहमेवात्र देहे देहभृतां वर ॥ ४ ॥

अन्तकाले च मामेव स्मरन्मुक्त्वा कलेवरम् ।
यः प्रयाति स मद्भावं याति नास्त्यत्र संशयः ॥ ५ ॥

यं यं वाऽपि स्मरन्भावं त्यजत्यन्ते कलेवरम् ।
तं तमेवैति कौन्तेय सदा तद्भावभावितः ॥ ६ ॥

तस्मात्सर्वेषु कालेषु मामनुस्मर युध्य च ।
मय्यर्पितमनोबुध्दिर्मामेवैष्यस्य संशय ॥ ७ ॥

अभ्यासयोगयुक्तेन चेतसा नान्यगामिना ।
परमं पुरुषं दिव्यं याति पार्थाऽनुचिंन्तयन् ॥ ८ ॥

अनुक्रमणिका

कविं पुराणमनुशासितारमणोरणीयांसमनुस्मरेद्यः ।
सर्वस्य धातारमचिंत्यरूपमादित्यवर्णं तमसः परस्तात् ॥ ९ ॥

प्रयाणकाले मनसाऽचलेन भक्त्या युक्तो योगबलेन चैव ।
भ्रुवोर्मध्ये प्राणमावेश्य सम्यक् स तं परं पुरुषमुपैति दिव्यम् ॥ १० ॥

यदक्षरं वेदविदो वदन्ति विशन्ति यद्यतयो वीतरागाः ।
यदिच्छन्तो ब्रह्मचर्यं चरन्ति तत्ते पदं संग्रहेण प्रवक्ष्ये ॥ ११ ॥

सर्वदारणि संयम्य मनो हृदि निरुध्य च ।
मूर्ध्न्याधायात्मनः प्राणमास्थितो योगधारणाम् ॥ १२ ॥

ओमित्येकाक्षरं ब्रह्म व्याहरन्मामनुस्मरन् ।
यः प्रयाति त्यजन्देहं स याति परमां गतिम् ॥ १३ ॥

अनन्यचेताः सततं यो मां स्मरति नित्यशः ।
तस्याहं सुलभः पार्थ नित्ययुक्तस्य योगिनः ॥ १४ ॥

मामुपेत्य पुनर्जन्म दुःखालयमशाश्वतम् ।
नाप्नुवन्ति महात्मानः संसिद्धिं परमां गताः ॥ १५ ॥

आब्रह्मभुवनाल्लोकाः पुनरावर्तिनोऽर्जुन ।
मामुपेत्य तु कौन्तेय पुनर्जन्म न विद्यते ॥ १६ ॥

सहस्त्रयुगपर्यन्तमहर्यद्ब्रह्मणो विदुः ।
रात्रिं युगसहस्त्रान्तां तेऽहोरात्रविदो जनाः ॥ १७ ॥

अव्यक्ताद्व्यक्तयः सर्वाः प्रभवन्त्यहरागमे ।
रात्र्यागमे प्रलीयन्ते तत्रैवाव्यक्तसंज्ञके ॥ १८ ॥

भूतग्रामः स एवायं भूत्वा भूत्वा प्रलीयते ।
रात्र्यागमेऽवशः पार्थ प्रभवत्यहरागमे ॥ १९ ॥

परस्तस्मात्तु भावोऽन्योऽव्यक्तोऽव्यक्तात्सनातनः ।
यः स सर्वेषु भूतेषु नश्यत्सु न विनश्यति ॥ २० ॥

अनुक्रमणिका

**अव्यक्तोऽक्षर इत्युक्तस्तमाहुः परमां गतिम् ।
यं प्राप्य न निवर्तन्ते तद्धाम परमं मम ॥ २१ ॥**

**पुरुषः स परः पार्थ भक्त्या लभ्यस्त्वनन्यया ।
यस्यान्तःस्थानि भूतानि येन सर्वमिदं ततम् ॥ २२ ॥**

**यत्र काले त्वनावृत्तिमावृत्तिं चैव योगिनः ।
प्रयाता यान्ति तं कालं वक्ष्यामि भरतर्षभ ॥ २३ ॥**

**अग्निर्ज्योतिरहः शुक्लः षण्मासा उत्तरायणम् ।
तत्र प्रयाता गच्छन्ति ब्रह्म ब्रह्मविदो जनाः ॥ २४ ॥**

**धूमो रात्रिस्तथा कृष्णः षण्मासा दक्षिणायनम् ।
तत्र चान्द्रमसं ज्योतिर्योगी प्राप्य निवर्तते ॥ २५ ॥**

**शुक्लकृष्णे गती ह्येते जगतः शाश्वते मते ।
एकया यात्यनावृत्तिम् अन्ययाऽवर्तते पुनः ॥ २६ ॥**

**नैते सृती पार्थ जानन्योगी मुह्यति कश्चन ।
तस्मात्सर्वेषु कालेषु योगयुक्तो भवार्जुन ॥ २७ ॥**

**वेदेषु यज्ञेषु तपःसु चैव दानेषु यत्पुण्यफलं प्रदिष्टम् ।
अत्येति तत्सर्वमिदं विदित्वा योगी परं स्थानमुपैति चाद्यम् ॥ २८ ॥**

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे “अक्षरब्रह्मयोगो नाम” अष्टमोऽध्यायः ॥ ८ ॥

श्रीकृष्णार्पणमस्तु ।

\-\-\-\-\-\-\-\-\-\-

अनुक्रमणिका

अर्जुन म्हणाला “महाराज मी काय प्रश्न केला ते आपण ऐकले ना? मग आता मला सांगा ना त्याचे उत्तर, हे बघा.

१ ब्रह्म

२ कर्म

३ अध्यात्म

४ अधिभूत

५ अधिदैव

६ अधियज्ञ

७ प्रयाणकाळी तुझी स्मृति

या सात कुटांची उत्तरे मला हवी आहेत. ती उत्तरे मला समजतील अशी असू देत. आपण सांगितल्यापासून मी विचार करतो आहे पण अर्थ कळेना, अनुमानही करता येईना. ज्ञानी पुरुषांना मृत्युसमयी तुझी आठवण कशी रहाते, हे तर फार मोठे आश्चर्य आहे.”

अजामीळाने सर्व आयुष्य दुष्कृत्ये करण्यात घालविले. धाकटा मुलगा फारच लाडका होता. त्याचे नाव ठेवले नारायण. मृत्यूचा फास गळ्याशी रुतल्याबरोबर अजामीळ धाकट्या मुलाला व्याकुळ होऊन हाक मारू लागला, “नारायणा, अरे नारायणा.”

यमदूत आलेच होते पण प्राण हरण करणार इतक्यात विष्णुदूत येऊन पोचले आणि म्हणाले, “याने नारायण नामाचा उच्चार केला आहे याला नेता येणार नाही तुम्लाला.”

यमदूत पराभूत होऊन यमधर्माकडे परत गेले आणि त्यांनी वृतांत सांगितला आणि म्हटले, “अजामीळाने मुलाला हाक मारली होती भगवंतांना नव्हे! तरीही तिथे आमची सत्ता चालू नये?” यमधर्माने हात जोडले प्रभूंची मनोमन क्षमा मागितली आणि म्हटले, “अरे भलत्या मिषाने कोणी जरी त्या सर्वशक्तिमान भगवंताचे स्मरण केले तरी मला मुकाट्याने परत फिरावे लागते.” अर्जुन म्हणाला, “देवा मला चमत्कार वाटतो आहे हे घडते तरी कसे? अंतकाळच्या बुद्धिप्रमाणे पुढील गती मिळते हे ऐकल्यासारखे वाटते पण अंतकाली देहाच्या यातनात बुडून गेलेला जीव तुझे स्मरण कसे करू शकेल? माझ्या मनात एकच गोंधळ उडून गेला आहे. तेव्हा सोप्या शब्दांत मला कळेल असे हे सगळे गूढ उकलून सांगा.

माऊली म्हणतात, “चिंतामणीच्याच दगडांनी बांधलेल्या वाड्यात दैववशात् एखादा भाग्यवंत झोपला आणि झोपेतच असंबद्ध बडबडू लागला तर ते देखील खरे होईल, फुकट जावयाचेच नाही.” त्याप्रमाणे अर्जुनाच्या शंका व उत्तराची जिज्ञासा फुकट गेली नाही. लगेच देव आनंदाने म्हणाले, “किती छान प्रश्न केलास रे अर्जुना! प्रश्न कसा करावा, शंका कशी आणि कोणती विचारावी ते तुझ्याकडून शिकावे.” सांगतो ना,

तुला सर्व पदे उलगडून सांगतो.

ज्ञानेश्वर म्हणतात, “अहो, अर्जुन त्या कामधेनु श्रीकृष्णाचा पाडा, त्यात तो उभा आहे कल्पवृक्षाच्या मांडवाखाली. मग अशा स्थितीत त्याचे सर्व मनोरथ साकल्याने परिपूर्ण व्हावे यात नवल ते काय? अहो, कृष्ण रागावून ज्यांना मारतो तेही मोक्षाला जातात. ब्रह्माचा त्यांना साक्षात्कार होतो. मग कृपेने ज्याला उपदेश करील तो ब्रह्मपदाला पोचेल यात नवल काय? कृष्णाला सर्वस्व अर्पण करून जीवन कृष्णमय केले की त्या भक्ताच्या संकल्पाच्या अंगणात अष्ट महासिद्धि राबतात. अर्जुनाबद्दल देवाना जे निस्सीम प्रेम होते त्यामुळे त्याचे सगळे मनोरथ फलद्रूप होत होते. अर्जुनाचे असे असे प्रश्न येणार हे ओळखून देवानी त्यांच्या उत्तरांचे पंचपक्वान्नाचे ताट तयारच करून ठेवले होते. तान्ह्याची भूक आईला आपोआप कळतेच की नाही? “मला प्यायला घे” असे ते थोडेच सांगते? कृपाळू गुरु असेच शिष्याची भूक जाणतात आणि शिष्याला जसजसा पचेल तसा अधिकाधिक गूढबोध करीत जातात. अर्जुनाची मनोभूमिका तयार करीत करीत त्याच्यात घडून येत चाललेल्या बदलाचा अंदाज घेत घेत देव भांडार खुले करीत आहेत. देव काय म्हणाले ते सांगतो ऐकावे.

देव म्हणाले, “अर्जुना, या गळक्या शरिरात गच्च भरलेले असूनही कोणत्याही वेळी जे गळून जात नाही ते परब्रह्म आहे. हे परब्रह्म इतके सूक्ष्म व नाजूक आहे की ते शून्यच आहे की काय असे वाटावे, पण ते तसे नव्हे. आकाशाच्या पदरात गाळून घेतलेले हे सूक्ष्म तत्त्व प्रपंचरूप झिरझिरीत वस्त्रातून मात्र गळून जात नाही. परब्रह्माचे स्वरूप हे असे आहे?

ह्या परब्रह्माच्या अखंडत्वास अध्यात्म असे नाव आहे. हे अखंडत्व असे असते की, आकारवान पदार्थांच्या बरोबर जन्माला येत नाही, किंवा त्याच्या नाशाबरोबर नाश पावत नाही. आकार जावो, राहो, ते अखंड असते. त्याच्या स्थितीत फरक पडत नाही. परब्रह्माच्या ह्या अखंडित अवस्थेस अध्यात्म अशी संज्ञा आहे हे ध्यानात ठेव.

वर्षाकाळ आला की निरभ्र अशा आकाशात ढग जमू लागतात. कसे येतात, कुठून येतात, का येतात हे काहीच कळत नाही. जिथे उत्पन्न होतात त्या आकाशात तर त्यांच्या निर्मितीचे कारण सापडत नाही. रंग अनेक, आकार अनेक अशा ढगांच्या फळ्या आकाश व्यापून टाकतात. त्याप्रमाणे अमूर्त व विशुद्ध अशा परब्रह्मात आदिसंकल्प उठतो आणि महत्तत्त्व वगैरे भूतभेदाने ब्रह्मांडा चे आकार उत्पन्न व्हावयास लागतात. हे ब्रह्मगोल पुन्हा बीजाने भरलेले असतात. निर्विकल्प परब्रह्मरूपी माळावर आदिसंकल्प “मी एकटा आहे, पुष्कळ होतो” या विचाराचा अंकुर फुटतो. संकल्प फलित झाल्याबरोबर ब्रह्मगोल जन्माला येऊ लागतात. हे ब्रह्मगोल अगणित बीजांनी ओतप्रोत भरलेले असल्याने त्यापासून निर्माण होणाऱ्या जीवांची गणतीच करता येत नाही. मूळसंकल्पापासून निर्माण झालेल्या ह्या ब्रह्मगोलकांतील बीजांचे अंशांश पुन्हा आदिसंकल्प “बहुस्यां” करू लागले व निरनिराळ्या प्रकारच्या जीवांना जन्म देऊ लागले. मग सृष्टि वाढायला काय उशीर आहे? लक्ष लक्ष योनी दिसू लागतात. त्यांच्यामध्ये फरकही होतात. एका जीवासारखा दुसरा जीव नसतो. रंग, रूप, आकार, जीवन सगळेच काही चित्रविचित्र असते. त्यात आणि निर्जीव पदार्थाचीही निर्मिती होते आणि बहुरंगी जग नटते. बाहेरचा आकार जरा बाजूला केला तर ह्या सर्व भिन्नत्वांत एकच एक परब्रह्म कोंदले आहे असा अनुभव येतो. एकत्वालाच हा अनेकत्वाचा पूर आला आहे हे कळते आणि आणखी खोल पाण्यात शिरावे आणि ढांडोळा

घ्यावा तर हाती पुन्हा शून्य येते. जसा काही केळीची सोपटे सोलून काढत गाभ्याचा शोध! मग पुन्हा दृष्टी बाहेर टाकावी तर दिसते की ह्या शून्यत्वातच ह्या जगाचा जन्म! अर्जुना, कर्ता दिसत नाही, कारण सापडत नाही, पण कार्य मात्र होते आहे, वाढते आहे असे दिसते. न करताच डोळ्याला स्पष्ट दिसेल असा हा प्रपंचाचा पसारा निर्माण होतो. कारणाशिवाय, कर्त्याशिवाय उत्पन्न होणाऱ्या ह्या कार्यास **कर्म** असे नाव आहे.

आता सांगतो अधिभूत शब्दाचा अर्थ. थोडक्यातच सांगतो कारण विस्तार करावा तर तुझ्या ध्यानी येईल की नाही कोण जाणे. पंचमहाभूते एकत्र येऊन एक आकार निर्माण होतो. हा आकार आकाशातल्या अभ्राप्रमाणे दिसतो आणि नाहीसा होतो. त्याचे असणे केवळ वरवरचे आणि नाहीसे होणे अगदी खरे असते. पंचमहाभूतांचा मेळावा सुखाने एकत्र नांदतो; तोवर ते अस्तित्व असते आणि त्यांची मैत्री संपली की संपते; आणि संपते ते इतके संपते की त्या आकाराचे नाव, रूप कशाचीही नावनिशाणी, खूण मागे शिल्लक रहात नाही. अशा ह्या पार्थिव देहाला **अधिभूत** असे नाव आहे. हा देह तुझ्या पूर्ण परिचयाचा आहे.

पण ह्या प्राकृतिक देहाने जमवलेले भोग जो भोगतो तो एक वेगळाच पुरुष आहे. तो तू प्रत्यक्ष पाहिलेला नाहीस. पण कधी कधी त्याची अंधुक जाणीव तुला होते. त्या पुरुषास अधिदैव असे म्हणावे. तो खरे म्हणजे माझा अंश आहे. पण द्वैताचा आभास झाल्याने तो स्वप्नात वावरल्यासारखा देहात वावरतो आणि देहाला असलेल्या खिडक्यांतून प्रपंचाचा अनुभव घेतो. त्या अनुभवामुळे सुखी किंवा दुःखी होतो. ह्या सगळ्या इंद्रियावर त्याचीच सत्ता चालते. पंचमहाभूतांनी बांधलेल्या ह्या शरिरांत तो रहातो. ते घर उभे आहे तोवर तो तिथे रहातो आणि ते घर नष्ट झाले की देह पडण्याच्या वेळच्या सर्व संकल्पांना आधार देणारा वृक्ष होतो. पुढील जन्माची उभारणी ह्या संकल्पानुसार होते. नवे घर व जुना वस्तीकर आणि नवे नवे सुखदुःखाचे प्रत्यय असे रहाटगाडगे चालते. देहाकडून येणारे अनुभव भोगणारा, त्यांच्या इष्टानिष्टतेनुसार सुखदुःखाची भावना भोगणारा जो अंशात्मक परमात्मा त्या पुरुषास **अधिदैव** किंवा जीव अशी संज्ञा आहे.

आता ह्याच शरिराच्या गावात रहाणारा पण शरीरभाव नाहीसा करणारा असा जो मी त्याचे नाव अधियज्ञ असे आहे. पांडवा! खरे म्हटले तर अधिभूत काय, अधिदैव काय किंवा अधियज्ञ तरी काय, ही सर्व खरोखर माझीच रूपे आहेत. देहसंसर्गाने ती दूषित होतात. अस्सल सोन्यात हीण मिसळले की त्याचा कस उतरतो, किंमत कमी होते, तसेच हे घडते. मात्र हीण आहे म्हणून सोने आपल्या मूळच्या स्वरूपापासून ढळत नाही. मुशीत टाकल्यावर कीड जळून जाते. आणि उत्कृष्ट शुद्ध सोने दृष्टीस जसेच्या तसे पडते तसे हे आहे. अज्ञानाच्या पडद्याने झाकले आहेत तोवर अधिभूत, अधिदैव, अधियज्ञ हे तीन प्रकार भासतात. पण तो पडदा दूर झाल की द्वैत फिटते आणि अखंड परमात्माच प्रत्ययास येतो. भेदभावाच्या खुणाच पुसल्या जातात. पण पार्था लक्षात घे की हा भेदाचा प्रत्यय येतो यात दोष त्या वस्तूकडे पहाणाऱ्याचा आहे. मुळात ती एक असताना पहाणाऱ्याच्या बाजूने त्रिधा दिसते. पण तिचे तीन तुकडे वेगवेगळ्या स्वरूपाचे वा वेगवेगळ्या मूलधातूचे नसतात. स्फटिक शिलेच्या खाली केस गेला की ती वरून पहाणाऱ्यास भंगलेली दिसते. केस कढून टाकला की ती अभंग आहे हे कळते. डाक देऊन ती शिळा कुणी सांधली आहे काय? आता ती छेद भेद कुठे गेला म्हणायचा? मुळात ती अखंडच होती. केस खाली होता तेव्हाही अखंडच होती. केस बाजूस केल्यावर तिच्याकडे पहाणाऱ्याला झालेला भंगाचा आभास गेला आणि शिळेचे अखंडत्व प्रत्ययास आले असेच म्हणायचे नाही का?

अर्जुना, अहंभाव गेला की ब्रह्मभाव सिद्ध होतो. ब्रह्मस्वरूपाशी एकरूप होण्यासाठी किंबहुना आपण एकरूपच आहोत हे तुला प्रतीत होण्यासाठी अहंभाव हा केसांचा गुंता दूर करायला हवा. आणि ही प्रक्रिया जिथे घडते ती अवस्था म्हणजेच अधियज्ञ होय. सर्व यज्ञ कर्मापासून झाले हे मी तुला चौथ्या अध्यायात सांगितले. तो हा अधियज्ञ सर्व जीवांचा विसावा आणि नैष्कर्म्य सुखाचा ठेवा आहे. इतर यज्ञांना जशी साधनसामुग्री लागते तशीच याही यज्ञास लागते.

वज्रासन ही पृथ्वी समजावी. यज्ञासाठी प्रथम भूमी स्वच्छ केली पाहिजे. त्याचप्रमाणे या यज्ञास वज्रासन हे भूमिशुद्धीचे साधन असते. शरीररूपी मांडवांत आधार मुद्रारूपी ओटा घालतात. ध्यानधारणा समाधीचा अग्नि प्रज्वलित करून तीन बंधांच्या मंत्रघोषाने इंद्रियरूपी विपुल द्रव्याच्या सहाय्याने यजन केले जाते. वैराग्यामुळे ही इंद्रिये चांगली शुष्क झाली असल्याने शब्दादी जे जे विषय त्या इंद्रियाशी संयोग पावतात ते ते धडाडून पेटून यज्ञकर्म चालू होते. मन, प्राण आणि त्यांचा संयम ही या यज्ञातील यज्ञसंपत्ती आहे. या संपत्तीमुळे धूमरहित ज्ञानरूप अग्नि संतुष्ट होतो. ह्या सगळ्याचा ज्ञानामध्ये होम झाल्यावर ज्ञानाचाही ज्ञेयामध्ये लय होतो. केवळ ज्ञेयच शिल्लक रहाते. ह्या सगळ्या क्रियांचा जो परिपाक त्याला अधियज्ञ म्हणावयाचे. ते माझे स्वरूप आहे.

हे देवांचे बोलणे अर्जुन अगदी मनापासून ऐकत होता. त्याने चित्त अगदी एकाग्र केले असल्याने हे देवाचे सांगणे त्याला नीट कळलेही.

अर्जुनाची एकाग्रता आणि ग्रहणशीलता देवांच्या ध्यानी येत होती. म्हणून देव आनंदाने म्हणाले, "अर्जुना, इतका अवघड विषय पण तू किती आनंदाने आणि मन लावून ऐकतोस!"

श्रीकृष्णांना आनंद वाटला हे पाहून अर्जुनदेखील संतुष्ट झाला, देव संतोषित झाले यात नवलच नाही. मुलाच्या तृप्तीने तृप्त होणे आणि शिष्याच्या पूर्णत्वाने कृतार्थ होणे हे कसे काय घडते हे केवळ जन्मदात्री आई जाणते आणि मोक्षदाते गुरु जाणतात. अर्जुनास ज्ञान होत आहे, त्याची वृत्ती बदलत चालली आहे, त्याचा आनंद अर्जुनाच्या आधी देवांना झाला.

इचलकरंजीस राजवाडे नावाचे अम्मलदार होते. आईवडिलांच्या मागे बालविधवा मावशीने त्यांना वाढवले होते. पुढे मागे पट्टेवाले घेऊन राजवाडे कचेरीस निघाले की, म्हातारी दारात येऊन उभी रहायची. डोळ्यावर आडवा हात धरून निरखून पहात शेजारणीस म्हणायची, "बघ कसा दिसतोय माझा वाशा." शेजारीण म्हणायची, "मावशी, अहो आता ते रावसाहेब झाले. तुम्ही त्यांना आताही वाशाच म्हणणार?" मावशी म्हणायच्या, "गप्प ग, तो तुमचा रावसाहेब असेल, माझा वाशाच." राजवाड्यांपेक्षाही ऐश्वर्याचा आनंद मावशीला जास्त व्हायचा. तसेच सात्त्विक भावाचे ऐश्वर्य अर्जुनाच्या आधीच देवाच्या अंगावर शोभू लागले. तो आनंदाचा कल्लोळ बुद्धिच्या जोरावर कसा बसा आवरून धरून देव बोलू लागले, ते बोलले ते शब्द पिकलेल्या सुखाचा परिमल का थंडगार अमृताच्या लाटा असे गोड होते. देव म्हणाले, "श्रोत्यांच्या राजा अर्जुना" या अधियज्ञात जाळणारेच जळून जाते. हे तुझ्या ध्यानात आले ना? असे झाले की, माया नाहीशी होते. ह्या माझ्या अधियज्ञ स्वरूपास जाणणारे लोक जिवंतपणी त्या वृत्तीतच जगतात. त्यांचे जीवन मायेच्या स्पर्शाने दूषित

होतच नाही व मृत्युसमयीही ती त्यांना ग्रासू शकत नाही. देह खोटा आहे हा त्यांचा निश्चय देहात वावरत असतानाच झालेला असतो. माझ्याशी एकरूप झाले असल्याने त्यांचे देहभान जिवंतपणीच सुटलेले असते. ते आत्मस्वरूपाच्या ठिकाणी स्थिर बुद्धिने राहिलेले असतात. त्यांना मरणाचे भय कसले? जो बांधलेलाच नाही तो सुटायचा कसला?

पूज्य सत्यदेवानंदसरस्वती स्वामीजींनी मलकापूरला श्रीब्रह्मचैतन्याच्या शिष्योत्तमाची तात्यासाहेब केतकरांची गोष्ट सांगितली. ते म्हणाले, "शेवटच्या दुखण्यात केतकरांना कुणीतरी विचारले आपल्याला मरणाचे भय वाटत नाही काय?" तात्यासाहेबांनी उत्तर दिले, "मी आताही महाराजांच्या जवळ आहे आणि मगही त्यांच्याच जवळ असणार मला मरणाचे भय कसले?"

पुढे स्वामीजी म्हणाले, "माझ्यापुरते म्हणाल तर मी मनाचा निश्चय केला आहे की मी आलोच नाही तर जाणार कुठे आणि कोण?"

भगवंतमय झाल्यामुळे सर्व चराचरास जो व्यापून उरला तो देह पडला म्हणून जाणार कुठे? घराच्या आत आकाश भरलेले असते. पण घर असते आकाशातच. अंतर्बाह्य त्या घराची वस्ती आकाशातच असते. त्याप्रमाणे ह्या ज्ञानी पुरुषांना देव अंतर्बाह्य भरलेला आहे. असा अखंड प्रत्यय येत असतो. त्या प्रचीतीच्या निश्चयात ते सुखनिद्रा करीत असतात. अनुभवाचे माजघर, त्यात पुन्हा निश्चयाची खोली त्यांच्या निवांत झोपेस मिळाल्यामुळे बाह्य जगात काय चालले आहे याचे त्यांना भान नसते. बाह्य जगाची त्यांना आठवण नसते. याप्रमाणे अंतर्बाह्य ऐक्यच साठून राहिले असल्यामुळे, सर्वभावांनी ते मद्रूपच झाले असल्याने पाच भूतांची ही वरची खपली कधी गळून पडली याचे त्यांना भान नसते. नकळत त्या कवचाचा त्याग होतो. जिवंतपणी शरीर उभे असतानाच त्याचे ममत्व त्यांच्या मनात उरले नसल्यामुळे त्यांना ते शरीर गेल्याचे दुःख कुठून आणि कसे होणार? त्यांच्या प्रचीतीच्या पोटातील पाणी हालतच नाही. ती प्रचीती जशी काही ऐक्याने ओतली आहे. त्रिकालाबाधित जे स्वरूप ते त्याच्या हृदयामध्ये जसे काही घालून ठेवले आहे. समरसतेच्या समुद्रात ती इतकी स्वच्छ धुतलेली आहे की तो कधीकाळी जरासुद्धा मळत नाही. एखाद्या खोल पाण्यात घडा बुडवावा, तो आतबाहेर पाण्याने भरावा आणि दैवयोगाने तो मातीचा घडा फुटला कीं आतबाहेरचे पाणी सहज एकमेकात मिसळावे तसे हे घडते. सापाने कात टाकावी, उकडते म्हणून वस्त्र फेडावे, तितक्याच सहजतेने ते देहाचा त्याग करतात. वस्त्र बाजूस ठेवले म्हणून हातापायात जसा काही कमीपणा येत नाही, तसाच देहत्यागाने त्यांच्या अनुभूतीत खंड पडत नाही. ती जशीच्या तशी अभंग राहते. देह हा एक वरवर भासणारा आकार आहे, वस्तु अविनाशी सत्य आहे या भावावर त्यांची बुद्धि स्थिर झालेली असते. त्यामुळे मृत्यूच्यावेळी ते थोडेसेसुद्धा विचलित होत नाहीत.

म्हणून अंतकाळीही ते मला जाणू शकतात. माझे स्मरण ठेवू शकतात. मरण येऊन ठेपल्यावर ज्या वस्तूचे स्मरण होईल ती वस्तू तो प्राणी होतो. अखंड माझेच स्मरण करीत असल्यामुळे देह पडल्याक्षणी ते ज्ञानी भक्त माझ्याशी एकरूप होतात.

आता ज्याचे चिंतन जन्मभर करावे तेच मरणकाळी आठवते. मरणकाळ तर कधी येणार हे कळत नाही.

**अनुक्रमणिका**

एखादा मनुष्य भयाने पळत सुटतो, वाऱ्याप्रमाणे धावता धावता अचानक एखाद्या विहिरीच्या तोंडाशी येतो आणि पळण्याचा वेग न सावरल्यामुळे दोनच पावलावर ठेपलेल्या विहिरीत कोसळतो. त्याप्रमाणे मृत्यूच्या वेळी जे जे क्लेश व्हावयाचे ते समोर येऊन अकस्मात् उभे राहतात. वाटेल ते केले तरी त्यातून सुटता येत नाही. दिवसभर ज्याच्या ध्यासामध्ये आपण जगलो असू तेच डोळे मिटल्याबरोबर स्वप्नात दिसू लागते. त्याप्रमाणेच अर्जुना जन्मभर जिचे चिंतन केले तीच गोष्ट मरणकाळी आठवते. मृत्यूसमयी गत जीवनातील चिंतन तीव्र होते आणि मग मरणोत्तर जीवाला चिंतनास अनुसरून देह मिळतो.

राजा भरताचे उदाहरण माहिती आहे ना? तपाचरण करण्यासाठी भरताने राज्य, पत्नी, पुत्र यांचा त्याग केला आणि जंगलामध्ये कुटी बांधली. अनाथ झालेल्या हरिणबालकाची त्याला दया आली. सर्वसंगपरित्याग केलेल्या त्या राजास पाडसाने परत ममतेमध्ये ओढून आणले. तपाचरण नीट होईना. शेवटी अंतकाळीही मृगशावकाची आठवण व काळजी करीत राजाने प्राण सोडला. आणि अंतकाळीच्या चिंतनामुळे हरिणाचाच जन्म घ्यावा लागला. देव म्हणाले, "म्हणून मनात ठसवून घ्यावे की, जिवंतपणीच फार काळजीपूर्वक जगावयास हवे. डोळ्यांनी पहाणे, कानानी ऐकणे, जिभेने बोलणे, मनात चिंतन करणे हे सगळे माझ्याविषयीच असावे. आतबाहेर सर्वकाळ माझेच ध्यान असावे. अर्जुना, असे झाले की, देह गेल्यामुळे मरण येतच नाही. मरणकाळी माझे स्मरण का राहते ते ध्यानी आले काय? आता तूला आश्चर्य वाटत नाही ना? अरे, हा बोध तुझ्या चित्तात पूर्ण ठसला की ज्या लढाईच्या भयाने तुला ग्रासले आहे ते भय तुला वाटले तरी काय?

तू आपले मन आणि ही बुध्दी ही दोन्ही मलाच अर्पण करून टाकलीस की तू माझ्याशी एकरूपच होशील, हे तुला मी शपथेवर सांगतो. असे कसे घडले अशी शंका जर तुझ्या मनात येत असेल तर अभ्यास करून तरी पहा. अभ्यास करूनही जर ही अवस्था प्राप्त झाली नाही तर मग माझ्यावर खुशाल रागाव.

"एखादा पांगळा मनुष्य रोज थोडा थोडा सराव करून डोंगर चढून जातो की नाही? मनाची या अभ्यासाची गाठ घालून दे. चित्ताला परम पुरुषाची मोहर कर, निरंतर अभ्यास कर, शरीर जावो वा राहो त्याचा विचार करू नको. पार्था, अरे, जगभर भ्रमंती करणारे मन जर आत्म्याच्या ठिकाणी असे अखंड रमले तर त्याला देहाचा आपोआप विसर पडतो. मग देह गेला की आहे ह्याची त्या माणसाला आठवण पण होत नाही. एखाद्या नदीचा प्रवाह एकदा वेगाने समुद्रात जाऊन मिळाला की मग मागे काय आहे हे ती नदी वळून पहाते काय? जे नदीचे पाणी समुद्राशी एकरूप होऊन गेले, ते कशाला परतून येईल?"

एकनाथमहाराजांनी रुक्मिणीपत्रिकेवर फार सुंदर कोटी केली आहे. पत्रिका घेऊन द्वारकेस श्रीकृष्णाकडे गेलेला ब्राह्मण अजून परत कसा येत नाही? असा विचार चिंतातूर मनाने करीत असलेली रुक्मिणी स्वतःशी म्हणते आहे, "मी तरी किती वेडी! श्रीकृष्णाच्या चरणाजवळ गेलेला जीव परतून येईलच कसा?"

श्रीज्ञानेश्वरांनी तशाच थाटाचे वर्णन केले आहे. ते म्हणतात देव म्हणाले, "अर्जुना, अरे नित्य परमपुरुषाच्या चिंतनात राहणाऱ्या ह्या पुरुषाचे चित्तचैतन्य स्वरूपच होऊन जाते. ते चैतन्य ब्रह्म एकसंधी आनंदरूप असल्यामुळे एकदा तिथे पोहचले की जन्ममरणाची येरझार संपून नुसता आनंदच रहातो.

शब्दात ह्या ब्रह्माचे स्वरूप सांगणे फार कठीण आहे. कारण ते “आहे” पण त्याला विशिष्ट आकार नाही. ते जन्मालाच आले नसल्याने त्याचा नाश होत नाही. सगळीकडे भरून राहिले असल्याने त्याला सर्व काही विदित आहे, ज्ञात आहे. ते गगनाहून जुने, परमाणुहून लहान आहे. पण त्याच्याच सानिध्यात विश्वाची हालचाल होते. विश्वाची सर्व गती त्या ब्रह्माचे अधिष्ठान आहे की नाही यावर अवलंबून आहे. या ब्रह्मांडास ते जन्म देते. त्याच्या आधाराने ब्रह्मांड जगते व शेवटी पुन्हा त्याच्याच ठिकाणी लीन होते. तर्कास मात्र त्याच्या ठिकाणी थारा नसतो. कारण ते अचिंत्य आहे. सूर्य किरणांच्या तेजोमय राशीप्रमाणे ते प्रकाशमय दिसते. ते इतके तेजःपुंज आहे की जशी इंगळाला वाळवी लागत नाही. तशी त्या ब्रह्माच्या संदर्भात अज्ञानाच्या अंधाराची कल्पनाही करण्यासारखी नाही. पण हा जाज्वल्य प्रकाश देहाच्या आत लपलेला असल्यामुळे अज्ञानी पुरुषांच्या डोळ्यांना ओल्या चिखलाचा देह फक्त दिसतो. आतले प्रकाशमय चैतन्य दिसत नाही. त्या प्रकाशाचेच दर्शन ज्ञानी पुरुषांना होत असते. उदयास्त नसलेली ज्योतीच ते पहातात.

पुण्याच्या दामले ताई सांगत असत, “मनुष्य समोर आला की, प्रथम प्रकाशच दिसतो. मग थोड्या वेळाने पहायचे कोण आहे ते.”

कुणीतरी गुरूदेव रानड्यांना प्रश्न विचारला, “गुरुदेव, हे सांगलीकर, मिरजकर, औंधकर आले की आपल्याला इतका का आनंद होतो?”

प्रश्न विचारणाऱ्याच्या प्रश्नातील खोच स्पष्ट होती पण त्याकडे लक्ष न देता गुरुदेव म्हणाले, “मला त्यांच्यामागे पुण्याईचा लालभडक गोळा दिसतो आणि त्यामुळे मला आनंद होतो. आनंद, पुण्याईच्या दर्शनाचा असतो.”

ज्ञानी पुरुषांना ब्रह्माचे, तेजाचे, असेच सतत दर्शन होत असते आणि मग असा ज्ञानी पुरुष प्रयाणकाली त्या अव्यंग ब्रह्माचे जाणून स्मरण करतो, पद्मासन घालतो, मुख उत्तरेकडे करतो, आजवर उत्तम प्रकारे केलेल्या कर्माचरणाचे समाधान मनात आणतो. अशा पूर्ण सुखाच्या अवस्थेत भ्रूकुटीतील द्विदल चक्रातुन प्राण ब्रह्मरंध्राकडे नेतो. अष्टांग योगाच्या अभ्यासामुळे सुषुम्ना नाडीचा मार्ग खुला करून ठेवलेला असल्याने प्राण सहज मूर्ध्न्याकाशात प्रवेश करतो. तिथे प्राणाचा व चित्ताचा वरवर संबंध झालेला दिसतो पण तसे घडत नाही. योग्याने आपला प्राण योगाच्या बळाने सावरून धरलेला असतो. आणि अशा त्या प्रखर प्राणतेजाने चेतन व अचेतन पदार्थांचा नाश करून टाकलेला असतो. मग क्षणार्धात तो प्राण भ्रुमध्यांच्यावर विरून जातो. घंटेचा नाद घंटेमध्ये विलीन व्हावा किंवा घटाखाली ठेवलेला दिवा आपोआप नकळत शांत व्हावा, तो कधी शांत झाला हे कळूसुद्धा नये. त्याप्रमाणे तो ज्ञानी पुरुष कधी देहाचा त्याग करून गेला हे कळत नाही. असा पुरुष परब्रह्म स्वरूपच आहे, असे समजावे. अर्जुना, तो ज्ञानी, परमपुरुष असे जे माझे विशेष स्वरूप आहे, त्याच्याशी एकरूप होतो.

अर्जुना, अशी एक अवस्था की जी वेदांनाही कळली नाही. वेदांनी ती अवस्था जाणून घेण्याचा प्रयत्न केला पण ते अलीकडच्या तीरावरच गटांगळ्या खात राहिले. पलीकडच्या तीराला पोचू शकले नाहीत. ही

ज्ञानावस्था सर्व ज्ञानाचा शेवट आहे. ज्ञानाची खाणच अशा ज्ञानी पुरुषांनी ह्या अवस्थेस अक्षर असे नाव दिले आहे.

चंडवात सुटल्याबरोबर ढग नाहीसे होतात, पण गगन ढग नव्हे म्हणून टिकते, जे मोजले जाऊ शकते, जाणले जाऊ शकते त्याला क्षर व वृत्तीज्ञानाचा जे विषयच होऊ शकत नाही त्याला अक्षर असे ज्ञानी पुरुषांनी नांव दिले आहे. मग वेद जाणणारे पुरुष त्यास अक्षर या नावानेच ओळखू लागले व प्रकृतीच्या पलीकडे असलेल्या ह्या परमात्मस्वरूप प्राप्तीसाठी उत्कंठीत झाले.

प्रथम ते विषयसुखाचा विषाप्रमाणे त्याग करतात व इंद्रियांना प्रायश्चित देतात. हे देहरूपी वृक्षाच्या तळाशी बसतात आणि विरक्त अंतःकरणाने निष्काम होऊन त्या अक्षर परब्रह्माची सदा वाट पहात असतात. वाट पहात असतानाच ब्रह्मचर्य यासारखी कठोर व्रते आचरून इंद्रिये दीनदुबळी करून सोडतात. परब्रह्मप्राप्तीचीच आवड चित्तात धरून त्या अक्षर ब्रह्मपदाची आशा धरून राहतात. शेवटी मघाशी सांगितल्याप्रमाणे शांत चित्ताने देहाचा त्याग करतात. असे पुरुष मृत्यूनंतर ब्रह्मपदास पोहचतात.

अर्जुना, तुला हे सगळे नीट कळले का? जर कळले नसेल तर तुला पुन्हा समजावून सांगू का?

प्रभूची ही करुणापूर्ण वाणी अर्जुनाच्या कानांवर येताच त्याने हात जोडले आणि नम्रपणे म्हटले, “देवा, मी तेच म्हणणार होतो. देवानीच हा विषय पुन्हा सांगायचे योजले मग आणखी काय हवे? पण देवा, आपण इतकी कृपा करताच अहा तर आणखी थोडीशी कृपा करा आणि हा विषय अगदी सोपा करून सांगा. हे विचार आमच्या बुद्धिच्या पलीकडचे आहेत शिवाय प्रथमच आता आपल्या तोंडून ऐकतो आहे. कितीही मन एकाग्र केले तरी नीट कळेना तेव्हा मला कळेल असे सांगा.”

देव उत्तरले, “अरे, सोपा करूनच सांगतो, तुला काय कळेल आणि काय न कळेल हे काय मला माहित नाही? थोडक्यात पुन्हा सांगतो नीट ऐक. कारण देहाची ही शेवटची अवस्था फार महत्त्वाची आहे. मन सारखे बाहेर धावत असते ना ती त्याची सवय मोडून टाकून हृदयाच्या डोहामध्ये ते बुडेल असे करावयाचे. आयुष्यभर सर्व इंद्रियांच्या उंबरठ्यावर निग्रहाची दारे कळासून लावलेली असली तर हे शेवटी जमेल मात्र. हातपाय मोडलेला मनुष्य जसा घरदार सोडून बाहेर जाऊ शकत नाही. एका जागी स्वस्थ पडून राहतो तसे मन कोंडले की हृदयाच्या ठिकाणी उगीच बसते. मग श्वासामध्ये ॐकाराचे चिंतन करीत प्राणवायु सुषुम्ना मार्गाने मूर्ध्न्याकाशापर्यंत आणावयाचा. मूर्ध्न्याकाशामध्ये प्राणवायूचा लय होईल न होईल अशा अर्धवट अवस्थेत धारणेच्या जोरावर धरून ठेवावयाचा. अकार, उकार, मकार या तीन मात्रा अर्धमात्रा रुप ॐकार बिंदूमध्ये लीन झाल्या नाहीत तोवर प्राणवायू मूर्ध्न्याकाशांत निश्चल करावयचा. मात्रात्रयाचे ऐक्य झाल्यावर जसा ॐकार अर्धमात्रेत लीन होतो. तसा तो प्राण मूर्ध्न्याकाशांत शोभतो आणि ॐ हे स्मरण्याचे संपून मग प्राणवायू संपतो. ॐकार स्मरण संपले की, जे पूर्ण परब्रह्म तेच काय ते शिल्लक रहाते.

ॐ हे एकाक्षर ब्रह्म माझे स्वरूप असल्याने त्याचे स्मरण करीत जो पुरुष देहाचा त्याग करतो तो मला येऊन मिळतो. हे मी तुला त्रिवार सांगतो. दुसरीकडे जाण्यास जागाच उरलेली नसते.

अनुक्रमणिका

पूज्य श्री सिद्धेश्वरमहाराजांच्या प्रयाणकाळी त्यांनी आपले शिष्योत्तम छत्रपती शिवाजी महाराज, ज्येष्ठ चिरंजीव व आणखी एक शिष्य यांना समोर बसवले आणि "योगी देहत्याग कसा करतो ते पहा" असे सांगितले. महाराज आसनावर बसले. प्रणवोच्चर करीत खालचे अवयव क्रमाने निश्चेष्ट करीत भ्रूमध्यात प्राण आणून प्रणवोच्चार करीत त्यांनी देह सहज सोडून दिला.

देव पुढे म्हणाले, "अर्जुना, तुला कदाचित अशी शंका येईल की, आत बाहेर मृत्यूचिन्हे उघडल्यावर कुठले देवाचे स्मरण! इंद्रिये असमर्थ झाली आहेत, जीवनाचे सुख बुडुन गेले आहे, अशा घोर समयी आसन कोण घालणार? निरोध कोण करणार? कुणाच्या अंतःकरणास स्मरण होणार?" पण अर्जुना, अशी शंका मनात तिळमात्र आणू नको बरे. जन्मभर जे माझी सेवा करीत आले त्यांच्या अंतकाळी मी त्यांची सेवा करतो. अरे, माझ्यासाठी त्यांनी जन्मभर थोडे का कष्ट भोगलेले असतात? ज्या विषय सुखाच्या मागे जग धावत असते त्याला त्यानी तिलांजली दिलेली असते, प्रकृतीला बेडी घालून स्थानबद्ध केलेली असते आणि मला हृदयामध्ये कोंडून क्षणाक्षणास माझा अनुभव घेतलेला असतो. त्या अनुभवसुखाची त्यांना इतकी तळमळ असते की तहान भुकेचीही त्यांना आठवण होत नाही. मग इतर गोष्टी पहाणे, ऐकणे दूरच. माझ्या सहवासाचे सुख किती भोगले तरी त्यांना पुरेसे वाटत नाही. अखंड माझ्याशी एकरूप होऊन ते स्वतःच्या रूपाची आटणी करून टाकतात. जिवंतपणीच त्यांनी अशी एकरूपता साधलेली असल्याने देहत्यागाच्यावेळी त्यांनी स्मरण केले तरच मी धावावे हे घडेल काय? मग त्यांनी आजवर केलेल्या भक्तिचा उपयोग तरी काय? तेव्हा अर्जुना, मी त्यांना हा त्रासही पडू देत नाही. कोणी एखादा दीन संकटकाळी नडून माझा धावा करतो तेव्हासुध्दा "आता माझे स्मरण झाले काय?" असे न म्हणता, मनातही न आणता, मी धावतो आणि त्यालाही संकटमुक्त करतो आणि पार्था, हा तर माझा अनन्य भक्त! त्यानेही कळवळून हाक मारेपर्यंत मी वाट पहायची तर त्याने जन्मभर माझी भक्ति काय म्हणून करावी रे?

अर्जुना, नाही रे! मी अशी वाट पहात बसत नाही. अंतकाळी भक्ताला स्मरणाचे श्रम व्हावे या विचारांचे देखील ओझे माझ्या मनाला सहन होत नाही. अनन्य भक्ति करून त्याने माझ्यावर जे अगणित उपकार केले त्यातून थोडेसे उतराई व्हावे म्हणून देहत्यागाच्या वेळी मीच त्याची शुश्रुषा करतो. देह सोडताना माझ्या भक्ताला कदाचित क्लेश होतील म्हणून मी आत्मबोधाचा पिंजऱ्यात त्याला ठेवतो. माझे स्मरण हीच थंडगार प्रशस्त सावली त्या पिंजऱ्यावर करतो आणि आत्मा नित्य आहे या भावात तो असताना त्याला सहज माझ्याकडे घेऊन जातो. माझ्या भक्तांना देहांतीचे कष्ट कधीच पडू देत नाही. मी अगदी सुखाने ह्या माझ्या लाडक्यांना माझ्याकडे घेऊन जातो. देहाचे टरफल गळेल, अहंकाराची धूळ उडेल आणि उरलेली शुद्ध वासना मला येऊन मिळेल असे मी करतो.

भक्ताने माझ्या या देहाशी जिवंतपणीही विशेष करून तादात्म्य ठेवलेले नसते. "देह मी आहे" असे त्यांना कधी भानच नसते. त्यामुळे देह सोडताना आपण काही विशेष करतो आहो असे त्यांना वाटतच नाही. देहाच्या वियोगाचे दुःख त्यांना जाणवत नाही. देहांती मी यावे मग त्या माझ्या भक्तांना न्यावे हेही त्यांनी शिल्लक ठेवलेले नसते. सर्व जीवनभर अहोरात्र ते माझ्याशी एकरूप होऊनच वावरतात. चंद्राचे प्रतिबिंब पाण्यात पडते, पण चंद्रिका चंद्राशी एकरूप असते. ती पाण्यात पडली हा जसा केवळ भास, तसेच त्यांचे ह्या मर्त्य शरिरात

रहाणे भासमय असते. ते माझ्यातच स्थिर झालेले असतात आणि त्यांची सावली जशी कांही प्रपंचात वावरत असते. मी असा त्यांना निरंतर प्राप्त असल्याने देहत्यागाबरोबर ते मद्रूप होतात. यात नवल नाही. त्यांच्या आणि माझ्यामध्ये त्यांच्या जिवंतपणीच त्यांच्या देहाचा आडपडदा उरलेला नसतो. मृत्यूसमयी माझे स्मरण ह्या पदाचा अर्थ ध्यानात आला ना आता अर्जुना? ते नित्य माझ्यातच रमलेले असतात आणि देहत्यागानंतर माझ्या अपार स्वरूपात मिसळून जाऊन पुन्हा देहाच्या गावी फिरकत नाहीत. येरझारा संपतात.

पार्था, अरे हे शरीर किती क्लेश देते बघ. शरिराचा कुठला भाग कधी क्लेश देईल हे सांगता येते काय? हे क्लेश कसकसे व कुठपर्यंत वाढतील हे सांगता येते काय? अंकुरासारख्या लहानशा रोपाचे झाड होऊन शेवटी काय फळ पदरात पडेल याचा अंदाज करता येतो काय? म्हणून कधी कधी वाटते की हे शरीर म्हणजे क्लेशरूपी वृक्षांची बागच आहे.

आध्यात्मिक, अधिभौतिक, अधिदैविक अशा तीन प्रकारच्या दुःखानी पेटलेली ही शेगडी जीवाला अहोरात्र भाजत असते. जन्माला आल्याबरोबरच मरणरूपी कावळ्याला उतरून टाकलेला हा बळी आहे. जन्माच्या क्षणापासून मरणाची वाट देह चालू लागत असतो. शरीर दीनतेला जन्म देते. कुत्र्याचे मांस भक्षण करण्याचा मोह एखाद्या तपोधनास उत्पन्न करणारी भूक या शरिरात कायम वास करून असते. महाभयाने त्याच्यासाठीच मनाला व्यापून टाकलेले असते. सर्व दुःखांना पुरून उरण्याएवढे भांडवल या ठिकाणी आहे. दुष्टबुद्धिचे उत्पत्तिस्थान, वाईट क्रियांचे परिपक्व फल आणि प्रत्यक्ष गाढ अविवेकच आहे. संसाराची ही बैठक आहे. या पायावरच बंधन उत्पन्न करणारा हा संसार उभा आहे. निरनिराळे विकार उत्पन्न करणारे जसे वनच आहे. सगळ्या रोगांचे वाढलेले ताट आहे. मृत्यूने खाऊन राहिलेले हे उष्टे आहे. मूर्तिमंत आशा आहे. जन्ममृत्यूची वाहती वाट आहे. हे भ्रमाने आणि संशयाने भरलेले स्थान आहे. किंबहुना हे विंचवाचे भरलेले पेवच आहे. वाघाच्या वसतिस्थानासारखे भयप्रद आणि वेश्येच्या मैत्रीप्रमाणे दिखाऊ आहे. विषयांचा अनुभव आणून देणारे असे हे सुशोभित यंत्रच आहे. लावसटीचे प्रेम, निवालेल्या विषाचा घोट किंवा सावाचे सोंग घेतलेल्या चोराची मैत्री जशी घातक असते. तसाच ह्या देहावरचा आपला विश्वास घातक ठरतो. रक्तपित्याचे आलिंगन, काळसर्पाचे मृदुपण किंवा हरिण धरण्यासाठी पारध्याने म्हटलेले गाणे जसे परिणामी घातक असते तसे हे शरीर आहे. हा शत्रूने केलेला विषमय पाहुणचार आहे. दुर्जनाने दाखवलेला आदर आहे. किंबहुना अर्जुना, हे शरीर म्हणजे अनर्थाचा समुद्रच आहे. त्याचा फसवेपणा तर अपूर्वच आहे. स्वप्नात पाहिलेले स्वप्न, मृगजळाच्या पाण्याने भरास आलेले वन, धुराच्या कणांनी झालेले आकाश जसे खोटे, तसेच हे खोटे. या सर्व संकटातून हे माझे भक्त सुटतात, मला येऊन मिळतात आणि त्यांना पुन्हा या अनर्थमय देहाचा कधीही आश्रय घ्यावा लागत नाही.

अर्जुना, लक्षात घे की, मेलेल्या माणसाचे पोट दुखत नाही, स्वप्नात आलेल्या महापुराने जागा झाल्यावर मनुष्य बुडत नाही, तसे जे भक्त मला येऊन एकरूप होऊन जातात ते मात्र या संसारचक्रात पुन्हा सापडत नाहीत. बाकी ब्रह्मदेवपदाचा थोरपणा प्राप्त झाला तरी पुनरावृत्तीचे वळसे चुकत नाहीत.

कुणाला असे वाटले की, सर्व जगदाकाराचे शिर आणि स्वर्गादी लोकरूपी पर्वताचे शिखर असा जो ब्रह्मलोक तिथे आपण पोचले तर ह्या पुनरावृत्तीतून सुटून जाऊ, अक्षय्य ह्या ब्रह्मलोकातच सुखाने राहू. पण पार्था, हा ब्रह्मलोक कुठे अक्षय्य आहे? इंद्रलोक कदाचित तुला शाश्वत वाटेल, पण खरे सांगू का ब्रह्मलोकाच्या

एका दिवसात चौदा इंद्रांची पंगत उठून जाते. ब्रह्मलोकातल्या एका प्रहराचे देखील एका इंद्राचे आयुष्य नाही. यावरून इंद्रलोकाच्या मानाने ब्रह्मलोकातील कालमानाची तुला थोडी कल्पना येईल. चार युगांच्या हजार फेऱ्या झाल्या की ब्रह्मदेवाचा एक दिवस आणि आणखी हजार फेऱ्या झाल्या की एक रात्र होते. हे दिवस रात्र पहात जगणारे त्यांना स्वर्गातील चिरंजीव असे म्हटले जाते. इंद्र तर ब्रह्मदेवाच्या एका दिवसात चौदा मग इतर देवांचे काय सांगू? पण हे काही चिरंजीव ब्रह्मदेवाचे आठ प्रहर डोळ्यांनी पहाणारे असतात. ब्रह्मदेवाच्या दिवसारंभी मोजदाद करता न येण्यासारखे विश्व आकाराला येते. अव्यक्तास व्यक्त स्वरूप येते. हजार चौकड्यांचा काल संपेपर्यंत ही भूतसृष्टि निर्माण होत रहाते. मग दिवसाचे चार प्रहर संपतात. रात्रीचा अम्मल सुरू होतो, नाशकाळ सुरू होतो आणि हे व्यक्त झालेले जग अव्यक्तात लीन होऊ लागते. हा प्रकार पुन्हा हजार चौकड्या संपेपर्यंत चालतो आणि पहाट होत होत आली की, पुन्हा जग अव्यक्तात लीन झालेले असते ते परत व्यक्त होण्यास उद्युक्त होते, ब्रह्मदेवाचा दुसरा दिवस उजाडतो. शरद् ऋतू आला की, ढग आकाशात जिरतात आणि ग्रीष्म संपला की, आकाश ढगाने भरून जाते तसे हे घडते. सांगण्याचे कारण असे की, विश्वाची उत्पत्ती आणि संहार ब्रह्मदेवाच्या एका दिवस रात्रीत होतात. अशा ब्रह्मदेवाच्या मोठेपणाचा हिशोब कोण मांडणार? पण पार्था, त्यालाही पुनरावृत्ती चुकत नाही. उत्पत्तिसंहाराचे रहाटगाडगे फिरतच रहाते. त्याची त्यातून सुटका होत नाही. दिवस उगवल्याबरोबर विश्वाची निर्मिती आणि रात्रीची वेळ आली की संहार! हा विश्वाचा पसारा जिथल्या तिथे लीन होऊन जावयाचा असा क्रम चालतो. बीजच वृक्षपण घेते. ढगाचेच आकाश होते. त्याप्रमाणे अनेकत्व संपून ऐक्य झाले त्या स्थितीस साम्यवस्था म्हणावे. या साम्यावस्थेत समविषम, लहान थोर असा काही भेदभाव नसतो. म्हणून निरनिराळी भूते ही भाषाही नसते. दूध विरजले की त्याचेच दही होते आणि मग "दूध" हे त्याचे पहिले नाव वा रूप उरत नाही तसेच हे होते.

विश्वाचा आकार लोपल्यामुळे त्याला अव्यक्त आणि निरनिराळे नामरूप प्राप्त झाले की व्यक्त असे म्हणावयाचे. मूळात वस्तू एकच, परब्रह्म! आता अवस्था एकमेकापासून वेगळ्या दाखविण्यासाठी व्यक्त व अव्यक्त अशी नावे द्यावयाची. बाकी मुळात त्यात भेद नाही. व्यक्तही परब्रह्म, अव्यक्तही परब्रह्मच. अलंकार आटवला की सोन्याची लगड म्हणावयाचे. तीच लगड वापरून निरनिराळे दागिने केले की त्यांना वेगळी वेगळी नामे रूपे आली इतकेच. मूळच्या सोन्यावरच हे आकार वरवर भासतात, सोने मुळात एकच. तसे ह्या परब्रह्माच्याच ठिकाणी व्यक्त आणि अव्यक्त असे हिशोब होतात. ह्या दोन्ही अवस्थास आधारभूत असलेले जे परब्रह्म ते पाहिले तर ना व्यक्त, ना अव्यक्त! ना नित्य, ना नाशवंत! त्याला उत्पत्ती नाही, नाश नाही. उत्पत्ती आणि नाश या दोन्ही भावापलिकडे अनादि सिद्ध अशा स्वरूपात नांदते. ते विश्वात संचरून असते पण विश्वाचा नाश झाला म्हणून त्याचा नाश होत नाही. अक्षरे पुसली म्हणून अर्थ नाहीसा होत नाही. अप्रिय वार्ता घेऊन येणारे पत्र फाडून टाकले म्हणून ती घटना पुसता येणार नाही. ती आहेच, तसेच हे समजावे. पाणी कायम असते, लाटा येतात-जातात. त्याप्रमाणे नाशवंत भूतामध्ये क्षणमात्र भासमान होणारे चैतन्य मात्र अविनाशी असते. दागिने आटवले तरी सोने शिल्लक राहतेच. त्याप्रमाणे मरणाऱ्या जीवामध्ये ते परब्रह्म अमर असते. फक्त वरच्या भासमान होणाऱ्या आकाराचा त्याग होतो. ज्ञानी पुरूषांनी जिवंतपणीच शाश्वत काय आणि क्षणभंगुर काय याचा पूर्ण विचार करून शाश्वतावरच अहोरात्र नजर ठेवलेली असते. त्यामुळे मरणकाळची स्थिती त्यांना काही वेगळी वाटतच नाही हे ध्यानी आले ना अर्जुना?

मी आता तुला परब्रह्मास अव्यक्त, व्यक्त अशा संज्ञा दिल्या त्या कौतुकाने दिल्या. खरे म्हणजे ही त्या

परब्रह्माची स्तुती नव्हे किंवा स्थितीही नव्हे. त्याचे हे खरे वर्णनच नव्हे. त्याचे खरे स्वरूप मन वा बुध्दी यांच्यामध्ये कधी सापडतच नाही. बुध्दी त्याच्या स्वरूपाचा निर्णय करू शकत नाही. मन त्याचे स्वरूप जाणू शकत नाही. मन आणि बुद्धी यांच्या जाणिवेची कक्षा दृश्य आकारापर्यंतच असते. इंद्रियांना कळण्याजोगे स्वरूप असेल तितकेच त्यांच्या टप्प्यात येते. पण ते परब्रह्म असे आहे की आकारला येऊनही त्याचे निराकार स्वरूप मोडत नाही किंवा आकाराचा लोप झाला म्हणून त्याचा लोप होत नाही. आकार येवो, राहो, जावो त्याचे नित्यत्व अखंड असेच राहते. या त्याच्या स्वभावामुळे त्याला "अक्षर" असे म्हणावे. अक्षर म्हटल्याने त्याचे नित्यत्व आपल्या ध्यानी येते. याच्या पलिकडे जाण्यासारखी जागाच उरत नाही म्हणून त्याला परमगती असेच म्हणावे. ह्या देहपुरीमध्ये तो अक्षरपुरूष झोपलेला असतो म्हणून त्याला "पुरूष" म्हणावे.

अर्जुना, या सर्व देहामध्ये तो आहे त्याच्या आस्तित्वामुळेच देहाचे सर्व व्यापार होतात. परंतु तो स्वतः हे व्यापार करीत नाही वा करवीतही नाही. दहा इंद्रियांच्या वाटेने विषयांची येरझार चालू असते. मनाच्या चव्हाट्यावर विषयांचे बाजार उघडलेले असतात. राजा राजवाड्यात सुखाने ऐश्वर्यात झोपलेला असतो, प्रजा आपआपल्या कामात उत्तम प्रकारे गढलेली असते आणि निमूटपणे खजिन्यात कारभार पोचता करते. त्याप्रमाणे सुखदुःखाचा वाटा आता जीवापर्यंत पोचतो. पण ह्या सर्व क्रियात पुरूष काहीही भाग घेत नाही, हे ध्यानात ठेव. बुद्धि जाणण्याचे व निर्णय घेण्याचे काम करते, मन अनुभव देते-घेते, इंद्रिये आपआपली कामे करतात, वायुशक्ति शरिरात संचरून त्याचे चलनवलन चालू ठेवते. पण देहाचा, मनाचा, बुद्धिचा सर्व व्यापार पुरूष करीत नाही; तर त्याच्या नुसत्या साक्षित्वाने होतो. जसा सूर्य उगवतो आणि त्या प्रकाशात लोकांच्या क्रिया चालतात. पण त्यात सूर्याचा काहीच संबंध नसतो, केवळ साक्षित्व असते. त्याप्रमाणे हे घडते. परमपुरुषाचा आणि क्रियांचा कांहीच संबंध नसतो. पुरुषाकडे क्रियेचे कर्तृत्वच नसते. तो स्वस्थ आपल्या स्वरूपात निद्रिस्त असतो.

अर्जुना, त्या परमतत्त्वाला पुरुष हे नाव पडण्यास आणखी एक कारण आहे. तो प्रकृतीचा भर्ता म्हणूनही त्याला "पुरुष" असे म्हणतात.

आता त्या चैतन्याला योशीश्वरांनी आणखी नाव दिले आहे. चारी वेदांचा विस्तार याच्या अंगणापर्यंतही पोचत नाही. हे आकाशालाही पांघरूण होऊन राहिले आहे म्हणून ते त्याला सर्वांत पलीकडची गती "परमपर" असे म्हणतात.

**अक्षर**
**पुरुष**
**परमगती**
**परमपर**

या निरनिराळ्या नावांनी ते एकच परमात्मस्वरूप ओळखले जाते. योगीश्वर त्या एकाच वस्तूचा ध्यास घेतात. अनन्य शरण होतात. आपला देह, आपली वाचा, आपले चित्त ह्या तीन्ही क्षेत्रात एक त्या परमात्म्यावाचून दुसरी गोष्ट येऊ देत नाहीत. एकनिष्ठेने अशी शेतीची मशागत झाली की तिथे परमात्मरूपी पीक येते. आता त्या

योगीश्वरांच्या दृष्टिपुढे फक्त भगवंत असतो आणि तेथून दृष्टी काढून जरी त्यांनी प्रपंचाकडे पाहिले तरी तिथेही त्यांना भगवंताचेच रूप दिसते. आणि मग त्यांच्या बुद्धिचा निश्चय होतो की हे सर्व त्रैलोक्य भगवंतस्वरूपच आहे. दुसरी, तिसरी कुठलीच वस्तू अस्तित्वात नाही आणि मग ते अहोरात्र त्या परमात्मस्वरूपात आकंठ बुडून राहिलेले असतात. ज्या स्वरूपात हे योगी अहोरात्र मग्न होऊन गेले आहेत ते स्वरूप गर्वरहित पुरुषांचे वैभव आहे, निर्गुण परब्रह्माची जाणीव आहे आणि या निरिच्छ पुरुषांच्या सुखांचे राज्यपद आहे. तिथे संतोषी पुरुषांना सतत ताट वाढूनच ठेवलेले आहे. त्या ठिकाणी स्वतःची चिंता न करणाऱ्या त्या अनन्य भक्ताची सर्व चिंता वाहणारे माहेरघर आहे. भक्तिची सरळ वाट थेट ह्या गावापर्यंत जाते. तुला काय सांगू आणखी पार्था? अरे, जो ह्या गावाला पोचेल तो कायमचा त्या गावाचाच होऊन जातो. तेथून परत येण्याची गोष्टच बोलत नाही.

मुनिवाहन हा एका अंत्यजाला शेतात सापडलेले मूल! अंत्यजाने घरी नेऊन त्याचे लालन-पालन केले. मुनिवाहनास लोक अंत्यजच समजूं लागले. तो उत्तम वीणावादन करी. रंगनाथ हे त्याचे दैवत. अहोरात्र तो त्याचे गुणगान करी, पद्यरचना करी आणि गात असे. शेवटी निशुलापुरी ही अंत्यजांची वस्ती सोडून रंगनाथ क्षेत्रात कावेरीच्या तीरावर त्याने एक झोपडी बांधली. अंत्यजास मंदिरात कोण जाऊ देणार? मुनिवाहन मनातून दर्शनासाठी तळमळत असे. देवाची व देवभक्तांची सेवा करावी म्हणून रोज रस्ता झाडून काढीत असे आणि आपल्या झोपडीत राहून रंगनाथ भक्तिपर रचना करून गात असे बरेच दिवसानंतर एक महात्मा झोपडीत आला आणि म्हणाला, "मुनिवाहन, मला रंगनाथाने दृष्टांत दिला आहे की, तुला खांद्यावर घेऊन रंगनाथाच्या मंदिरात जावे. माझ्या खांद्यावर बैस. मी तुला मंदिरात घेऊन जातो."

मुनिवाहनाने पुष्कळ आढेवेढे घेतले पण महात्मा ऐकेना. त्याने मुनिवाहनास खांद्यावरून रंगनाथाच्या मंदिरात नेले.

देवाचे दर्शन झाले मात्र! मुनिवाहनाच्या डोळ्यातून धारा वाहू लागल्या. तो म्हणू लागला, "देवा, अहो तुम्ही किती करुणामय हो! माझ्या कर्माचे बंध तुम्ही तोडलेत. धन्य आहे मी." आणि इतक्यात सर्वत्र प्रकाश दिसू लागला. रंगनाथाचे चरण मुनिवाहनाच्या मस्तकी दिसू लागले आणि क्षणार्धात मुनिवाहन त्या तेजात विलीन होऊन गेला. त्याचे काहीही मागे शिल्लक राहिले नाही. रंगनाथाची भेट झाल्यावर मुनिवाहन परतून आलाच नाही. अशी ही अनन्य भक्ताची कथा! देव पुढे म्हणाले, "अर्जुना, अरे, अगदी कढत पाण्याला थंडीच्या झुळका लागल्या की ते हळूहळू त्या झुळुकाइतके गार होऊन जाते. सूर्य उगवला की, ज्या ब्रह्मांडकुपीत काळाकभिन्न अंधार भरलेला होता तिथेच प्रकाश पसरतो. संसार ह्या परब्रह्माच्या गावाला गेला की त्याचे बंधनकारक हे रूप नाहीसे होते. आणि तोच मोक्षदाता होतो, मोक्षरूप होतो. एकदा असे झाले की, संसाराचे रूपच पालटते. अग्नीमध्ये पडण्यापूर्वी लाकूड, लाकूड असते पण एकदा का धडाडून पेटले आणि निखारा झाला की त्याचे लाकूडपण संपते, अग्निरूप उरते. शोधूनही लाकडाची ढलपीसुद्धा त्या निखाऱ्यात सापडत नाही. कितीही बुद्धिमान मनुष्य असू दे उसाची एकदा साखर झाली की पुन्हा त्या साखरेचा त्याला ऊस करता येत नाही. एकदा परिसाने लोखंडाचे सोने केले की, दूर दवडलेले लोखंडपण पुन्हा माघारी आणता येत नाही. एकदा तूप झाले की जरी ते दूधापासूनच तयार झाले असले तरी आपले जे पूर्वरूप दूध ते परतून घेऊ शकत नाही. त्याप्रमाणे जे त्या ब्रह्मास येऊन मिळाले त्यांना ह्या संसारचक्रात पुन्हा सापडावे लागत नाही. अशी जी जागा ते खरोखर माझे सत्य स्वरूप आहे. ही गुह्य गोष्ट आज तुला मी प्रगट करून सांगतो.

देह सोडल्याबरोबर योगी जिथे जाऊन मिळतात ती जागा माझे वस्तीचे ठिकाण आहे. एवढेच जरी सोपे मर्म ध्यानात ठेवलेस तरी पुरेल. सगळेच योगी देह सुटल्याबरोबर पुनरावृत्तीच्या फेऱ्यातून सुटतात असे मात्र समजू नको. जर चुकून अकाली देह सुटला तर योग्याला पुन्हा देह धारण करून मर्त्यलोकात यावे लागते. कालशुद्धी पाहून जे देह ठेवतात ते सुटतात, देहत्यागाच्या क्षणीच ब्रह्म होतात. पण भलत्याच वेळी जर देहपात झाला तर संसार पुन्हा मागे लागतो. अर्जुना, मुक्ति आणि पुनरावृत्ति ह्या दोन्ही गोष्टी काळाधीन पण आहेत. त्या काळाच्या खुणा तुला सांगतो त्या ऐक आणि ध्यानात ठेव.

अर्जुना, मरणाची गुंगी आली की, पंचप्राण आपआपल्या वाटेने जाण्यास सिद्ध होतात, असा प्रसंग येऊन ठेपला तरी बुद्धिला भ्रम पडत नाही, आठवण आंधळी होत नाही किंवा मन निष्क्रिय होत नाही, इंद्रियांचा समुदाय टवटवीत असतो, आणि ब्रह्माचा घेतलेला अनुभव ताजा असतो. अग्निचे सहाय्य असले की, इंद्रिये अखेरच्या क्षणापर्यंत सावध असतात.

कर्नाटकातील एक संत मरणोन्मुख झाल्यावर त्यांनी आपल्या संत भगिनीस निरोप पाठवला. त्या आल्यावर ते म्हणाले, “आक्का येतो आता मी. तुला नमस्कार करतो शेवटचा.” तेव्हा त्या म्हणाल्या, “अण्णा, आता कुठे निघालात अजून अवकाश आहे. मी आता घरी जाते, उद्या सकाळी येईन.” मग त्या घरी गेल्या व दुसऱ्या दिवशी सकाळी आल्या. संतांना म्हणाल्या, “उठा, आता जाण्याची वेळ झाली.” संत उठले, पद्मासन घातले व प्रणवोच्चार करून देह सोडला. देवांनी प्रथम अशा प्रयाणाचे वर्णन केले. जाणारे संत व अचूक वेळ सांगणारी संत भगिनी यांची योग्यता काय असेल? संत भगिनीने प्रयाणाची वेळ कशी सांगितली असेल? आणि इतक्या शांत मनाने देहाचा सहज त्याग करणाऱ्या व ते तितक्याच अलिप्ततेने पहाणाऱ्या त्या दोघांनी जन्मभर कसा अभ्यास केला असेल? अशी तळमळ वाटते.

देव पुढे सांगत आहेत, “पार्था, पाण्याने वा वाऱ्याने दिव्याचा प्रकाश नाहीसा झाला की आपल्या डोळ्याची शक्ति शाबूद असली तरी जसे अंधारात आपल्याला काहीच दिसत नाही तसे अग्निचे सहाय्य नसले तर देह आतबाहेर कफाने व्यापला जातो. आत अग्निचे तेज नसल्याने प्राणाची क्रियाशक्ती संपते, बुद्धि असून तिचे सामर्थ्य संपते आणि देहाची ज्ञानकला नाहीशी होते. अग्निच गेला की तो देह कसला? नुसता ओल्या चिखलाचा गोळाच तो, आयुष्य आहे तोवर हा अंधारातला वेळ कसातरी काढावयाचा इतकेच. आता आयुष्यभर केलेली उपासना आठवावी, त्या क्षणी ती संभाळावी, तिच्या जोरावर देहाचा त्याग करून परब्रह्मास जाऊन मिळावे. हे सगळे खरे, पण देहातील कफाच्या चिखलात चेतना बुडून गेल्यावर मागची पुढची आठवण सहजच संपते. जे निधान शोधण्यासाठी हातात दिवा घेतला होता ते न सापडताच ज्योत विझून गेली की, नुसते अंधारात चाचपडणे शिल्लक रहाते तसे हे होते. केलेला अभ्यास मरणकाळी उपयोगी न पडताच विसरला जातो. देहाच्या मरणापूर्वीच त्या अभ्यासाला मृत्यू येतो असे समज.

ज्ञानाला मूळ अग्नि. मरणकाळी त्या अग्निचे संपूर्ण बळ आपल्या पाठीशी असावे. म्हणजे तो काळ मृत्यूस उत्तम. देहात अग्नि आणि बाहेर प्रकाश असावा. कफाने देह घेरलेला नसावा, बुद्धि जागी असावी. बाहेर प्रकाश म्हणजे प्रकाशपूर्ण दिवस, शुक्लपक्ष व सहा महिन्यांतील उत्तरायणाचा महिना असावा. एकत्र जुळून

आलेल्या ह्या उत्तम योगावर जर योग्यांनी देह ठेवला तर ते ब्रह्मवेत्ते परब्रह्म होतात. या मृत्यूच्या क्षणामध्ये असे सामर्थ्य असते की तो क्षण आत्मस्वरूपाकडे पोचवणारा रस्ताच होतो.

पार्था, लक्षात घे अग्नि ही पहिली पायरी, ज्योती ही दुसरी, दिवस ही तिसरी, शुक्लपक्ष ही चवथी पायरी व त्यावर उत्तरायणापैकी महिना ही पाचवी पायरी आहे. या जिन्याने ते योगी सुखाने मोक्षसदनात पोचतात. हा उत्तम मरणकाळ जाणावा. या मार्गाने जो जीव देह टाकतो तो अर्चिरा मार्गाने गेला असे म्हणावे. तो अर्चिरा मार्ग वहाता रस्ता आहे. सुगम आहे व मोक्षप्राप्ती करून देण्यास समर्थ आहे.

आता जो दुसरा मार्ग आहे त्याला धूम्रमार्ग म्हणतात व त्या मार्गाने जीव गेला तर पुन्हा मृत्युलोकात जन्म घ्यावा लागतो. पुनरावृत्ती ठेवलेलीच आहे. त्या मृत्युकाळास अकाळ असे म्हणतात. मरणाच्या वेळी देहात कफ आणि वात भरलेला असतो. त्यामुळे अंतःकरणात अंधार पडलेला असतो. सगळी इंद्रिये लाकडासारखी निचेष्ट झालेली असतात. आठवण भ्रमामध्ये बुडून गेलेली असते. मन वेडे होते, आणि प्राण कोंडला जातो. अग्नीतील ज्योत संपली की, धूर आणि काजळी मागे रहाते त्याप्रमाणे शरीराची चेतना मूढ होऊन जाते. काळे कभिन्न ढग चंद्रावर आले की जसा अर्धवट उजेड अर्धवट काळोख होतो तसे अंधुकपण जिवास येते. धड मरण नाही किंवा धड जीवन नाही अशा अवस्थेत प्राण घुटमळत रहातो आणि आयुष्य मरणाच्या वेळेची नुसती वाट पहात रहाते. मन, बुद्धी आणि इंद्रिये यांच्याभोवती असे दाट धुके पसरले की जन्मभर केलेल्या अभ्यासाचा रस्ता दिसेनासा होतो, त्याच्या खुणा पुसल्या जातात. नवे काही मिळवावे ही गोष्टच बोलायला नको. आजवर जे जोडलेले असते तेही हातातून निसटून जाते. त्यात बाहेर कृष्णपक्ष आणि रात्र! भरीला भर म्हणून सहा महिन्यांपैकी दक्षिणायन, पुनरावृत्तीची ही सगळी घराणी एकत्र मिळाल्यानंतर देहत्यागानंतर स्वरूपप्राप्तीची गोष्टच ऐकायला मिळत नाही. असा योगी देह ठेवल्यावर चंद्रलोकावर जातो आणि मग पुन्हा मृत्यूलोकात जन्म घेतो. पांडवा, मी ज्याला अकाळ म्हटले तो असा असतो. ह्या धूम्रमार्गाने गेलेल्या जीवाला पुन्हा जन्म घ्यावा लागतो.

अनादि अशा या दोन्ही वाटा मी तुला दाखविल्या. एक आहे मोक्षाचा राजरस्ता; दुसरी आहे संसारात परत आणणारी आडवाट. आपल्या हिताचा मार्ग कोणता हे कळावे, खरे खोटे कसे ओळखावे याची कल्पना यावी म्हणून मी हे दोन्ही तुला इतक्या बारकाईने वर्णन करून सांगितले. चांगली नाव समोर असताना अथांग समुद्रात उडी कोण घेईल? उत्तम रस्ता समोर दिसत असताना मुद्दाम आडरानात कोण जाईल? विष आणि अमृत या दोन्हीची नीट ओळख पटल्यावर अमृताचा कोण त्याग करील? ज्याला वाट कळली तो रस्ता चुकत नाही.

खरे खोटे पारखून घ्यावे म्हणजे फसण्याचा प्रसंगच येत नाही. मरणसमयी या अकाळाचे फार भय आहे. कारण जन्मभर केलेला अभ्यास वाया जाण्याचे संकट आहे. अर्चिरा मार्ग चुकला आणि या धूम्र मार्गात सापडले तर जन्ममरणाच्या फेऱ्यात जीव सापडलाच म्हणून समजावे. आम्ही पुष्कळ विचार केला की हे संकट कसे टळेल? आणि शेवटी हे दोन मार्ग शोधून काढले. एकाने ब्रह्मत्व व दुसऱ्याने पुनरावृत्ति अशी त्याची विश्रान्तिस्थाने आहेत.

पण पार्था, अडचण अशी की, देहांती जीवाने कोणत्या मार्गाने जावयाचे हे प्रारब्ध ठरविते आणि ते काय आहे हे आपल्याला आधी कळतच नाही. तेव्हा यातून सुटका कशी होणार? जीवाने काय करावे?

तेव्हा जीवाने मरणसमयीची घटका कशा प्रकारची असेल, कधी येईल याचा विचार न करता “सोऽहं” मी ब्रह्म आहे या भूमिकेवर दृढ व्हावे. योगी प्रत्येक श्वासाबरोबर मी ब्रह्म आहे अशा भावनेवर आरूढ झालेला असतो. म्हणजे क्षणाक्षणास, निमिषानिमिषास ब्रह्मच होतो आहे. प्राण म्हणजे श्वास. हा बाहेर गेला मी मृत्यूच नव्हे काय? हा वायू पुन्हा परत येतो म्हणून आपण देह जिवंत आहे असे म्हणतो. तो परत येत नाही तेव्हा मृत्यु. योगी मी ब्रह्म आहे या बैठकीवरूनच क्षणाक्षणास मृत्यूला सामोरा जात असतो. तो मनाशी म्हणत असतो, “देह असो की जावो मला काय त्याचे? या दोरीवर सापाचा आरोप आला आहे पण तो दोरीकडून! मी तर केवळ ब्रह्मच आहे. पाण्यावर लाटा येतात पण उदकपण हे आपले स्वरूप आहे, लाटापण हे नव्हे. हे ते पाणी विसरत नाही. पाणी तरंगासहित असले काय किंवा तरंगाविरहित असले काय पाणी ते पाणीच असते. तरंगाच्या आकाराने ना ते जन्माला आहे ना तरंगलोपाबरोबर मृत्यू पावले. त्याप्रमाणे देह असला नसला तरी मी ब्रह्मच आहे. ब्रह्मावाचून दुसरे काही नाही. घटामधले आकाश घट फुटल्याबरोबर नीट रस्त्याने गेले तरच आकाशाला भेटते. एरवी वाट चुकते की काय? घट असतानही ते आकाशाशी एकरूप आहे. घट फुटलावरही जिथचे तिथेच. देश काल जर सर्व मीच आहे तर मार्ग शोधावयाचा तो काय आणि कोठून कोठे जावयाचे ते काय? घट फुटला म्हणजे काय झाले? बाहेरचा आकार जो थोडा वेळ भासत होता त्याचा नाश झाला. आकाशाला त्याचे काय? मी तर घट नव्हेच. आकाश आहे.”

या बोधावर ते सोहंसिद्ध योगी इतके दृढ झालेले असतात की प्रयाणास काळवेळ पहाण्याचे त्यांना प्रयोजनच उरलेले नसते. त्यांच्या लेखी अर्चिरा वा धूम्र हे दोन्ही मार्ग उरलेलेच नसतात. घटाशी त्याचा काहीच संबंध उरलेला नसल्याने घट दगडावर पडला काय किंवा घटावर दगड पडला काय दोन्हीचे त्यांना सुखदुःख राहिलेले नसते.

अर्जुना, त्यांची ही अवस्था ध्यानी घे आणि तू अशा प्रकारचा योगी हो. मग सगळेच काळ तुला शुभ होतील. देहाचा बंध असो, तुटो, वाटेल त्या क्षणास तुटो, तुझ्या ब्रह्मभावास घडी पडणारच नाही. मग कल्पाच्या आरंभी तू जन्मात सापडणार नाहीस किंवा कल्पान्ती मृत्यु गाठणार नाही आणि मध्यंतरीच्या काळात प्रपंच वा स्वर्ग यांच्या मायाजालात तू फसणार नाहीस.

कारण, या बोधावर राज्य करणारा योगीराज भोगाची पूर्ण परीक्षा करून त्यांचा विचारपूर्वक त्याग करून या गावी आलेला असतो. आत्मस्वरूपाची खरी किंमत त्याने जाणलेली असते. इंद्रादिक देव सर्वस्व पणाला लावून ज्या राज्यपदाची प्राप्ती व्हावी म्हणून जंग जंग पछाडतात त्याचा त्याने ओवाळून टाकलेल्या भाकरीच्या तुकड्यासारखा त्याग केलेला आहे. त्याची खात्री झालेली आहे की वेदाध्ययन केले, यज्ञाचे शेतच्या शेत पिकले, तप, दान यांची पराकाष्ठा केली, आणि या सर्वांचा एकत्र मळा पिकला तरी त्यांतून मिळणारे फळ आणि त्या परब्रह्माच्या निर्मळ स्वरूपप्राप्तीचे फळ यांची तुलनाच होऊ शकत नाही.

वेदाध्ययन, यज्ञ, दान, तप यांनी प्राप्त होणारे स्वर्गसुख तसे पाहिले तर काही कमी योग्यतेचे नव्हे.

त्याचे फळ विटत नाही, संपत नाही, भोगणाऱ्याच्या सर्व इच्छा तृप्त करते. ब्रह्मसुखाचे धाकटे भावंड असावे तसे ते शोभते. बारिक दृष्टीने पाहिले तरी त्याला धर्माची बैठक असते, आधार असतो, नित्यानंदाशी तुलना करण्यासाठी तागडीत घातले तर फार कमीही भरत नाही.

पण शंभर यज्ञ करूनही एखाद्याला मिळत नाही अशा प्रकारचे हे सुख जर ह्या सोहंसिद्ध योग्यास प्राप्त झाले तर मात्र ते आपल्या अलौकिक दृष्टीच्या हातात घेऊन ते त्याचे वजन अजमावतात आणि ते वजनात हलके आहे असे ठरवून ते सुख पायाखालची पायरी करून परब्रह्माच्या पाटावर बसतात आणि तिथेच स्थिर होतात." असे देव अर्जुनाला म्हणाले.

काय त्या अर्जुनाचे भाग्य वर्णावे? ब्रह्मदेव व शंकर यांचे पूजास्थान आणि योग्यांनी भोगण्याचे भोगधन त्याला सख्यत्वाने बोध करते आहे. सर्व कलांची कला, परमानंदाची साक्षात मूर्ती आणि सर्व जगाचा जिव्हाळा असा तो यादवकुळीचा कुलदीपक कृष्ण किती प्रेमाने अर्जुनाशी बोलतो आहे! कुरुक्षेत्रावर घडणारा हा सर्व वृत्तांत संजय धृतराष्ट्राला सांगत आहे. निवृत्तिदास ज्ञानदेव पुढे काय काय घडले त्यांचे वर्णन करीत आहेत. आपण कृपा करून ऐकावे.

***

॥ श्री ॥

## अध्याय नववा

# राजविद्याराजगुह्ययोग

॥ ॐ नमो भगवते वासुदेवाय ॥

श्रीभगवानुवाच—

इदं तु ते गुह्यतमं प्रवक्ष्याम्यनसूयवे ।
ज्ञानं विज्ञानसहितं यज्ज्ञात्वा मोक्ष्यसेऽशुभात् ॥ १ ॥

राजविद्या राजगुह्यं पवित्रमिदमुत्तमम् ।
प्रत्यक्षावगमं धर्म्यं सुसुखं कर्तुमव्ययम् ॥ २ ॥

अश्रद्दधानाः पुरुषा धर्मस्यास्य परंतप ।
अप्राप्य मां निवर्तन्ते मृत्युसंसारवर्त्मनि ॥ ३ ॥

मया ततमिदं सर्वं जगदव्यक्तिमूर्तिना ।
मत्स्थानि सर्वभूतानि न चाहं तेष्ववस्थितः ॥ ४ ॥

न च मत्स्थानि भूतानि पश्य मे योगमैश्वरम् ।
भूतभृन्न च भूतस्थो ममात्मा भूतभावनः ॥ ५ ॥

यथाकाशस्थितो नित्यं वायुः सर्वत्रगो महान् ।
तथा सर्वाणि भूतानि मत्स्थानीत्युपधारय ॥ ६ ॥

सर्वभूतानि कौन्तेय प्रकृतिं यान्ति मामिकाम् ।
कल्पक्षये पुनस्तानि कल्पादौ विसृजाम्यहम् ॥ ७ ॥

प्रकृतिं स्वामवष्टभ्य विसृजामि पुनः पुनः ।
भूतग्राममिमं कृत्स्नमवशं प्रकृतेर्वशात् ॥ ८ ॥

न च मां तानि कर्माणि निबध्नन्ति धनंजय ।

अनुक्रमणिका

उदासीनवदासीनमसक्तं तेषु कर्मसु ॥ ९ ॥

मयाध्यक्षेण प्रकृतिः सूयते सचराचरम् ।
हेतुनानेन कौन्तेय जगद्विपरिवर्तते ॥ १० ॥

अवजानन्ति मां मूढा मानुषीं तनुमाश्रितम् ।
परं भावमजानन्तो मम भूतमहेश्वरम् ॥ ११ ॥

मोघाशा मोघकर्माणो मोघज्ञाना विचेतसः ।
राक्षसीमासुरीं चैव प्रकृतिं मोहिनीं श्रिताः ॥ १२ ॥

महात्मानस्तु मां पार्थ दैवीं प्रकृतिमाश्रिताः ।
भजन्त्यनन्यमनसो ज्ञात्वा भूतादिमव्ययम् ॥ १३ ॥

सततं कीर्तयन्तो मां यतन्तश्च दृढव्रताः ।
नमस्यन्तश्च मां भक्त्या नित्ययुक्ता उपासते ॥ १४ ॥

ज्ञानयज्ञेन चाप्यन्ये यजन्तो मामुपासते ।
एकत्वेन पृथक्त्वेन बहुधा विश्वतोमुखम् ॥ १५ ॥

अहं क्रतुरहं यज्ञः स्वधाहमहमौषधम् ।
मन्त्रोऽहमहमेवाज्यमहमग्निरहं हुतम् ॥ १६ ॥

पितामहस्य जगतो माता धाता पितामहः ।
वेद्यं पवित्रमोंकार ऋक्साम यजुरेव च ॥ १७ ॥

गतिर्भर्ता प्रभुः साक्षी निवासः शरणं सुहृत् ।
प्रभवः प्रलयः स्थानं निधानं बीजमव्ययम् ॥ १८ ॥

तपाम्यहमहं वर्षं निगृह्णाम्युत्सृजामि च ।
अमृतं चैव मृत्युश्च सदसच्चाहमर्जुन ॥ १९ ॥

त्रैविद्या मां सोमपाः पूतपापा ।
यज्ञैरिष्ट्वा स्वर्गतिं प्रार्थयन्ते ।
ते पुण्यमासाद्य सुरेंद्रलोक–
मश्नन्ति दिव्यान्दिवि देवभोगान् ॥ २० ॥

ते तं भुक्त्वा स्वर्गलोकं विशालं
क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति ।
एवं त्रयीधर्ममनुप्रपन्ना
गतागतं कामकामा लभन्ते ॥ २१ ॥

अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते ।
तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥ २२ ॥

येऽप्यन्यदेवताभक्ता यजन्ते श्रद्धयान्विताः ।
तेऽपि मामेव कौन्तेय यजन्त्यविधिपूर्वकम् ॥ २३ ॥

अहं हि सर्वयज्ञानां भोक्ता च प्रभुरेव च ।
न तु मामभिजानन्ति तत्त्वेनातश्च्यवन्ति ते ॥ २४ ॥

यान्ति देवव्रता देवान्पितृन्यान्ति पितृव्रताः ।
भूतानि यान्ति भूतेज्या यान्ति मद्याजिनोऽपिमाम् ॥ २५ ॥

पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति ।
तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मनः ॥ २६ ॥

यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत् ।
यत्तपस्यसि कौन्तेय तत्कुरुष्व मदर्पणन् ॥ २७ ॥

शुभाशुभफलैरेवं मोक्ष्यसे कर्मबन्धनैः ।
संन्यासयोगयुक्तात्मा विमुक्तो मामुपैष्यसि ॥ २८ ॥

समोऽहं सर्वभूतेषु न मे द्वेष्योऽस्ति न प्रियः ।
ये भजन्ति तु मां भक्त्या मयि ते तेषु चाप्यहम् ॥ २९ ॥

अपि चेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक् ।
साधुरेव स मन्तव्यः सम्यग्व्यवसितो हि सः ॥ ३० ॥

क्षिप्रं भवति धर्मात्मा शश्वच्छान्तिं निगच्छति ।
कौन्तेय प्रति जानीहि न मे भक्तः प्रणश्यति ॥ ३१ ॥

**मां हि पार्थ व्यपाश्रित्य येऽपि स्युः पापयोनयः ।**
**स्त्रियोवैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यान्ति परां गतिम् ॥ ३२ ॥**

**किं पुनर्ब्राह्मणाः पुण्या भक्ता राजर्षयस्तथा ।**
**अनित्यमसुखं लोकमिमं प्राप्य भजस्व माम् ॥ ३३ ॥**

**मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु ।**
**मामेवैष्यसि युक्त्वैवमात्मामं मत्परायणः ॥ ३४ ॥**

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे “राजविद्याराजगुह्ययोगोनाम” नवमोऽध्यायः ॥ ९ ॥

श्रीकृष्णार्पणमस्तु ।

----------

अनुक्रमणिका

नववा अध्याय हा गीतेच्या पूर्वखंडातील शेवटचा व भक्तिप्रधान असा अध्याय आहे.

**आणि जो अभिप्राय सातेशती ।**
**तो एकलाचि नवमी ॥**

अशी ज्ञानेश्वरांनीच त्याची महती दहाव्या अध्यायात सांगितली आहे. इतकेच काय पण ह्या नवव्या अध्यायावर अभिप्राय देण्याचे धारिष्ट मला होत नाही कारण हा अध्याय केवळ निरुपम आहे असे त्यांनी—

**राम रावण झुंजिन्नले कैसे ।**
**राम रावण जैसे । मीनले समरी ॥**

ह्या ओवीने प्रगट केले आहे.

ज्ञान व विज्ञान या दोन्हींचे स्वरूप तुला उलगडून सांगतो म्हणजे तू अशुभापासून मुक्त होशील असे देव पहिल्याच श्लोकात सांगत आहेत.

म्हणून सातव्या अध्यायामध्ये ज्ञान व विज्ञान यांच्या ज्या व्याख्या देवांनी निःसंदिग्ध शब्दात करून ठेवल्या त्या पुन्हा पहाणे आवश्यक आहे.

आधी ज्ञानाची व्याख्या देवांनी केली. ते म्हणाले—

**जाणीव जेथ न रिघे ।**
**विचार मागुता पाउली निघे ।**
**तर्कु आयणी ने घे । आंगी जयाचा ।**
**अर्जुना तया नाव 'ज्ञान' ।**
**येर प्रपंचु हे 'विज्ञान' ॥**
**एखाद्या मनुष्याचे तो बुद्धिमान नाही.**
**तो तर्कनिष्ठ नाही.**
**त्याला जाणीव नाही.**

असे जर त्याचे वर्णन केले तर तो व्यवहारात कुठल्याही लहानसहान कामासही योग्य नव्हे असे आपण म्हणू आणि जो बुद्धिमान आहे, तर्कनिष्ठ आहे व ज्याची जाणीव प्रखर आहे असा मनुष्य व्यवहारात "विद्वान" ह्या पदवीस योग्य आहे असे ठरवू. बुद्धि, तर्क, जाणीव ही ज्ञान मिळविण्याची साधने आहेत व ही असणे हे विद्वत्तेचे लक्षण आहे असे आपण म्हणतो.

पण देव म्हणत आहेत की, अर्जुना, जिथे बुद्धिचा प्रवेश होत नाही, जिथे विचार पोचत नाही आणि जिथे तर्काचे चातुर्य उपयोगी पडत नाही अशी जी स्वरूपज्ञानाची अवस्था त्याला ज्ञान म्हणावयाचे.

जीथे बुद्धि, विचार, तर्क चालतात ते विज्ञान वा प्रपंचज्ञान.

नाथांच्या घरची उलटी खूण ती हीच. नवव्या अध्यायामध्ये देव हा विषय सांगोपांग मांडत आहेत. मुख्य म्हणजे "निषेध" सांगून थांबत नाहीत तर "विधि" सांगत आहेत, आग्रहाने सांगत आहेत, आज्ञा करत आहेत आणि मग अशा तऱ्हेने माझी भक्ति केलीस तर तू पूर्णतया माझ्याशी एकरूप होऊन जाशील असे आश्वासन देत आहेत. भक्तिचे निरनिराळे प्रकार देवांनी वर्णन करून सांगितले आणि त्या भक्तिचे फल काय मिळते हेही सांगितले आहे.

दैवासुरसंपत्तीचे विवेचन सोळाव्या अध्यायात देवांनी विस्ताराने केले. पण नवव्या अध्यायातही भक्तिचे प्रकार सांगताना सात्विक, राजस, तामस अशी नावे न सांगता, राक्षसी व आसुरी प्रकृतिचे लोक, त्यांची भक्ति व त्या भक्तिचे फल, यज्ञयाग करणाऱ्या याज्ञिकांची भक्ति व त्या भक्तिचे फल आणि सात्विक किंवा दैवी प्रकृतिचे भक्त, त्यांची भक्ति व त्या भक्तिचे फल असा विषय मांडला आहे. हे सर्व श्लोक जर जसेच्या तसे म्हणजे जसे आहेत त्या क्रमाने घेतले तर समजण्यास थोडे दुर्बोध होतात म्हणून एकाच प्रकारच्या विवेचनाचे श्लोक एकत्र घेऊन त्यावरील ज्ञानेश्वरीचे विवरण त्या क्रमाने घ्यावे असा विचार केला आहे. विषय ध्यानात येण्यासाठी हा बदल, एरवी दुसरा हेतू नाही.

भगवंताना कशा प्रकारची भक्ति प्रिय आहे हे ह्या अध्यायात स्वतः भगवंत सांगत आहेत. पण मनात येते आहे की, हा अध्याय समजण्यासाठी आपल्या हातून देव सांगतात तशा प्रकारची भक्ति थोडी तरी होणे आवश्यक आहे. सहाव्या अध्यायात कुंडलिनी योगाचे वर्णन आले आहे. ते आधारभूत ग्रंथातून पाहून नुसते नकलता येईल, किंबहुना नुसते तसे वर्णन करता येईल. पण ज्या निर्हेतुक सोज्वळ प्रेमभक्तिचे देव वर्णन करीत आहेत. ती प्रत्यक्ष जमायला काय अडचण आहे? देव केवळ प्रेम करायला शिकवत आहेत, की जे म्हटल्यास कठिणात कठीण पण म्हटल्यास सोप्यात सोपे.

दोन वर्षांपूर्वी मुंबईस माझ्या पाठीचे आपॅरेशन झाले. पाठीच्या कण्याचे ऑपरेशन. वळतानासुद्धा दुसऱ्याची मदत घ्यावी लागे. दुखत तर होतेच. भेटायला येणारी मंडळी इतका त्रास सोसून येतात, त्यांना आपली दुखण्याची गाथा सांगून आणखी त्रास द्यायचा नाही हा निग्रह. दिवस कसाही संपे पण रात्री झोप यायची नाही. निरनिराळे आवाज, रस्त्यावरून जाणाऱ्या वहानांच्या दिव्यांचे छतावर फिरणारे प्रकाश झोत, शारीरदुःख या सर्वांचे काही एक वेगळेच रसायन तयार व्हावयाचे. तिसऱ्या दिवशी फारच त्रास झाला. तेव्हा पावसाच्या पूज्य स्वरूपानंद स्वामींची प्रार्थना केली की, "स्वामी, आपण चाळीसच्या वर वर्षे शारीरदुःख सोसत बिछान्यात पडून इतकी सुंदर काव्यरचना केलीत. आपण मला आपले बळ थोडेसे द्या. यावेळी थोडी काव्यशक्ति द्या. त्या बळावर हे देहदुःख मी सहज झेलीन."

मनात विचार येत होते की, या जन्मात त्या देवाचा शोध घेत आपण इतकी वणवण केली, जप, पूजा,

अनुक्रमणिका

अनुष्ठान, वाचन केले पण तो भगवंत भेटलाच नाही की, त्याचे दर्शन झालेच नाही. कधी कधी वाटायचे तो जवळच कोठे तरी असावा. जीव तळमळत असावा पण समाधान होत नव्हते. आता ह्या ऑपरेशननंतर तर आपली देहस्थिती ही अशी. पुन्हा आयुष्यात तासभर ताठ बसून जप तरी करता येईल की नाही कोण जाणे! एक जन्म फुकटच गेला. प्रपंचात मन रमत नाही आणि देव तर भेटत नाही अशा तळमळीला या विकल अवस्थेत उधाण आले. ह्या विचारातच स्वामींची काव्यशक्ति देण्याबद्दल प्रार्थना केली होती.

दोघी मुली जवळ बसलेल्या असत. चवथ्या दिवशी सकाळी त्यांना म्हटलं, "लिहून घ्या ग. मला सध्या लिहिता येत नाही. कोणी तरी लिहून घ्या, कुणी तरी चाल लावा आणि कुणीतरी म्हणून दाखवा."

पण पावस गुरुदेवांनी ती देखील तसदी मुलींना पडू दिली नाही. कविता आली ती सूर घेऊनच. शब्द होते.

**कदंबाच्या झाडाखाली उभी किती राहू**
**रणरणत्या ह्या ऐन दुपारी वाट किती पाहू**
**मोहना वाट किती पाहू**

**वाळवंटी शोधित फिरले पाउलखूण तुझी**
**शून्यचि आहे परिसर सारा दया न तुज माझी**
**मोहना दया न तुज माझी**

**थोरा घरचा मूल म्हणोनी केला अविचार**
**तुझिया चरणी सर्व वाहिला पूजासंभार**
**मोहना पूजासंभार**

**सख्या बोलती माझा चाले हरिशी श्रृंगार**
**असतील दोघे तरि ते शोभे हा तर अभिसार**
**मोहना हा तर अभिसार**

**पाण्यावांचुन जशी तळमळे व्याकुळ मासोळी**
**दीपावरती अविचाराने झडपे पाकोळी**
**मोहना झडपे पाकोळी**

**लपविसि आता रूप आपुले हृदय कठिण केले**
**परि एकदा तरी दाखवी वदन तुझे काळे**
**मोहना वदन तुझे काळे**

**या तीराशी त्या तीराशी नौका आंदोळे**
**बुडवुन टाकी शमेल वादळ सुटशिल, मी सुटले**
**मोहना सुटशिल, मी सुटले.**

अशी ही कविता! मनाला इतका आनंद झाला आणि त्या तंद्रीत देह दुःखाचा किती तरी विसर पडला. मुली कुमारसाहेब चालीवर म्हणत आणि त्यातच कुणी भेटायला आले की, ती मंडळीही त्या गाण्यात सामील होत, गुणगुणत.

तेव्हा सांगण्याचा भावार्थ असा की, हा अध्याय लिहिताना ही आर्तता, ही निःसंग भावावस्था, ही आतुरता त्यांनीच द्यावी ज्यांनी चौदा वर्षांपूर्वी मलकापूरला आज्ञा केली—

**"ज्ञानेश्वरी वाच"**

ती अवस्था त्यांनी कृपावंत होऊन दिली तरच नवव्या अध्यायाचे उचित चिंतन होणार आहे. तेव्हा पुन्हा पुन्हा त्यांच्या चरणावर माथा ठेवून प्रार्थना—

**"स्वामी, बळ द्या"**

श्रोत्यांना उद्देशून माऊली म्हणतात, "महाराज, आपले एकाग्र अवधान द्यावे. आपण जर ते दिले तर मी प्रतिज्ञा करतो की, मी आपल्याला सर्व सुखाला विवेचनाने प्राप्त करीन. ही प्रतिज्ञा मी अगदी छातीठोकपणाने करतो आहे. पण आपल्यासारख्या सर्वज्ञांच्या सभेमध्ये मी हे प्रौढीने बोलतो आहे असे मात्र समजू नका. महाराज, हे माझे बोलणे केवळ सलगीचे आहे. माझ्या बोलण्याकडे, विवेचनाकडे लक्ष द्यावे व तेही अगदी पुरतेपणी द्यावे ही माझी सलगीची विनंती आहे.

आपल्यासारखे माहेर मिळाले की, त्या श्रीमंता घरी लाडकीचे सगळे हट्ट पुरविले जातात. मनोरथांचे उंच मनोरे पूर्ण केले जातात.

वाईला गोखले रास्त्याकडून पेशव्यांच्या घरी हळदीकुंकवाचे निमंत्रण गेले. पेशव्यांच्या कन्येने हट्ट केला की, "आपल्या वाड्यापासून रास्त्यांच्या वाड्यांपर्यंत त्यांनी रुपये आंथरावे. त्या पायघड्या त्यांनी घातल्या तरच मी हळदीकुंकवास जाईन." थोरा घरची लेक! रास्त्यांकडे रीतसर वर्दी गेली. रास्तेही काही कमी मातब्बर नव्हते. त्यांनी निरोप पाठवला, "ते तर सोपे आहे पण ताईसाहेबांना विचारा की कोणत्या शिक्क्याचे रुपये असावे म्हणजे तसे रुपये अंथरायला बरे."

आणि आमच्या रास्तेकाकूसाहेब सांगत पायदळी अंथरलेले ते रुपये रास्त्यांनी परत आपल्या भांडारात न नेता त्यातून वाईस घाट बांधले. नित्य कृष्णास्नानास जाणाऱ्यांची सर्वांची वाट सुलभ करून दिली. अशी श्रीमंती माहेरे! मग उणे काय? माऊली पुढे म्हणतात, "आपल्या दृष्टीच्या ओलाव्याने प्रसन्नतेचे मळे पिकले

आणि त्या मळ्याच्या गारव्यामध्ये सावली पाहून थकला भागलेला माझा जीव लोळतो आहे. प्रभु, आपण सुखांमृताचे डोह आहात आणि म्हणून आम्ही यथेच्छ ओलाव्याची आशा केली आहे. अशा समृध्द ठिकाणी संकोच केला, सलगी केली नाही तर आमची ही तृष्णा निवविण्यासाठी आम्ही जाणार तरी कुठे? लहान मुले बोबडे बोलते, वाकड्या बिचूक पावलांनी चालते पण आई त्या बोबड्या बोलांनी आणि त्या वाकड्या पावलांनी किती सुखावते की नाही? स्वतःची स्पष्ट बोली सोडून ती त्या बाळासारखे बोलते देखील! तुम्हां सज्ञनांचे आमच्यावर किती प्रेम आहे! ते प्रेम वाढावे, माझ्यावर आपली कृपादृष्टि व्हावी ह्या हेतूनेच महाराज, मी आपल्याशी सलगी करतो आहे. कुणीकडून आपण मला आपला म्हणा की माझे काम झालेच.

खरे म्हटले तर आपल्यासारख्या सर्वज्ञ श्रोत्यांपुढे मी काय बोलणार? सरस्वतीच्या मुलाला पाटीवर कुणी धडा घालून द्यावयाचा काय? जन्मतःच तो विद्वान असतो. तशी आपली थोरवी, असे असताना मी आपल्याला अवधान द्या आणि सर्व सुखाला पात्र व्हा असे उद्धटपणाने म्हणतो आहे. ते सर्व प्रेमापोटी! सूर्याच्या महाप्रकाशामध्ये काजवा काय प्रकाश पाडणार? अमृताच्या ताटात वाढावे असे कोणते पक्वान्न आहे? सज्ञनहो, चंद्राला विंझणवारा, नादापुढे शब्द, अलंकाराला अलंकार तसेच हे माझे आपल्यापुढे बोलणे आहे. आपल्या अवधानाची तृप्ति व्हावी. "वाहवा, वाहवा, काय वक्तृत्व आहे" असे म्हणावे अशासारखे आपल्याला संतोष होण्यासारखे वाक्चातुर्य कुणाजवळ आहे? पण महाराज, विश्वाला प्रकाशित करणाऱ्या सूर्याला काडवातीने ओवाळावे किंवा समुद्रास त्याच्याच पाण्याच्या ओंजळीने अर्ध्य द्यावे असे होतेच ना? प्रभू, आपण प्रत्यक्ष करूणाकर शिवदेव अहा! मी दुबळा बेल म्हणून निर्गुडी वहातो आहे. त्याचा आपण स्वीकार करालच कारण माझे हे समर्पण मी पूर्ण भक्तिने करतो आहे. परिमळाने कशाचा सुगंध घ्यावा? समुद्राने स्नानासाठी कुठे जावे? सर्व आकाश मावेल एवढी पोकळी कोठे मिळणार? पण बाळ वडिलांच्या ताटात जेवायला बसते पुढे पुढे सरकून वडिलांनाच घास भरवूं लागते आणि वडिल मोठ्या आनंदाने त्या बाळाच्या हातचा घास घ्यावा म्हणून खाली झुकून तोंड पुढे करीत नाही का? आपण माझे आई-वडिल अहा. बालबुद्धिने मी काही बडबड केली ती ऐकून आपण कौतुक कराल, आनंदित व्हाल, माझ्याकडे कृपादृष्टिने पहाल असेच हे आपले प्रेम आहे. माझ्यावरच्या मायेने आपण पूर्णतया गुरफुटून गेले आहात म्हणून आपल्यालाही ही माझी सलगी नकोशी वाटत नाही. वासराने ढुशी दिली की गाईला जास्तच पान्हा फुटतो. माझ्या सलगीचा चुकून कधी आपल्याला राग आला तरीही माझ्यावरच्या आपल्या प्रेमाला जास्तच भरती येईल. आपले कृपाळूपण निजले होते ते माझ्या शब्दानी जागे झालेले मला कळले आणि म्हणून मी "महाराज, इकडे लक्ष द्या" असे धिटाईने म्हटले.

गीतार्थ सांगण्याचे धारिष्ट मी करतो आहे. खरे पण हे काम आपल्या कृपेच्या जोरावर आरंभले आहे. चांदणे आढीत घालून पिकवावे, वाऱ्याला गती द्यावी, अवकाशाला गवसणी घालावी तसे हे काम कठीण आहे. दह्यात पाणी घालून घुसळून पुरे होते. आता पाणी आणखी पातळ करावे लागत नाही. रवी नुसती हलकेच फिरवली की ती लोण्यात न घुसता लोण्याचा गोळा वर आणते त्याप्रमाणे माझ्या मनात लाजून लपून बसलेले व्याख्यान आपली कृपादृष्टि पाहून वर येते आहे. प्रगट होत आहे. आपण पाहिल्याबरोबर माझे काम झाले. वेद बोलून बोलून थकले आणि त्यांना पुढे काय सांगावे हे कळेना. शब्द अपुरे पडू लागले, अर्थ व्यक्त होईना. तेव्हा त्यांनी विचार केला की पुरे ही धडपड आता. जरा स्वस्थ पडूया. वेद पुरुषास झोपण्यासारखी बाज गीतेशिवाय कुठे मिळणार? तेव्हा वेद ज्या पलंगावर निवांत झोप घेतात, जी त्यांच्या विश्रांतिचा आधार झाली ती गीता मी समजावून सांगतो म्हणणे म्हणजे केवढी धिटाई पण मी ती करतो आहे. ह्या माझ्या धिटाईचे आपण कौतुक

अनुक्रमणिका

कराल. मी आपला लाडका होईन एवढीच आशा मी मनात बाळगली आहे आणि अर्थ सांगतो असे म्हणतो आहे.

मनोरथ मी केला, पुरा करणे आपल्या हाती आहे. चंद्रापेक्षाही शांतिदायक व अमृतापेक्षाही स्फूर्तिदायक असे आपले अवधान आपण मला द्यावे म्हणजे माझे मनोरथ सहज पूर्ण होतील. आपल्या दृष्टीचे सामर्थ्य काय वर्णावे! आपण कृपेने पाहिले की त्या वर्षावाने माझ्या बुद्धिमध्ये ह्या गीतेच्या अर्थाचे अंकुर फोफावतात. उदास राहिलात तर तो वर आलेला कोवळा अंकुर करपून जातो. ऐका महाराज, माझ्या वक्तृत्वाला आपल्या अवधानाचा चारा मिळाला की माझी अक्षरे प्रमेयांनी पुष्ट होतात. अर्थ माझ्यासमोर शब्दांची वाट पहात उभा असतो, अभिप्रायातून अभिप्राय वाढत जातो आणि माझी बुद्धि भावाच्या फुलोऱ्याने भरून जाते. माझे वक्तृत्त्व आणि आपले श्रोतृत्व ह्यांचा सुखसंवाद होतो. ह्या संवादाचा अनुकूल वारा सुटला की हृदयाचे आकाश सारस्वताच्या ढगांनी भरून जाते. माझ्या बोलण्याकडे आपले दुर्लक्ष झाले की माझा वीणा बेसूर होतो. मांडलेला रस वितळून जातो. सुसंवाद घडत नाही. चंद्रकांत मणी मुळात पाषाण खरा पण तोही पाझरतो. पण ती शक्ति.त्या सुजाण पाषाणापेक्षा दगडालाही पाझर फोडणाऱ्या चंद्रकलेची असते. श्रोत्यांच्या सहानुभूतीविना, अवधानाविना वक्ता हा वक्ता होऊच शकत नाही.

पण "आम्हाला गोड मानून घ्या", अशी तांदळांनी शिजविणाऱ्याची प्रार्थना करावी किंवा कळसूत्री बाहुलीने सूत्रधाराची विनवणी करावी तसा हा प्रकार होतो आहे. माझे गुरुदेव मला बोलवत आहेत. मी कशाला काळजी करू? तो लीलालाघवी सूत्रधार त्या बाहुलीच्या कामासाठी तिला नाचवतो की आपल्या ज्ञानाची कक्षा वाढविण्यासाठी लीला करतो याची उठाठेव बाहुलीला कशाला हवी आहे? वरून माझे गुरुदेव जसे सूत्र चालवतील तसे माझे बोलणे होईल.

मालुताई, हा प्रसंग आपल्या डोळ्यापुढे जशाचा तसा उभा राहतो. सर्व पेशाचे अबालवृध्द, ज्ञानी, अज्ञानी त्या नेवाशाच्या देवालयात दाटीवाटीने बसले आहेत आणि चैतन्याच्या मुशीतून आताच बाहेर काढल्यासारख्या दिसणाऱ्या त्या चार बालमूर्तींच्या दर्शनाने तृप्त होऊन मोठ्या उल्हासाने ज्ञानेशांच्या मुखमंडलाकडे एकटक पहात आहेत असे वाटते ना इथे? श्रोत्यांचा केव्हढा मोठा गौरव ज्ञानेशांनी केला आहे. मुख्यतः श्रोता आणि वक्ता यांचा सुखसंवाद चालतो ही कल्पना किती हृद्य आहे! संवादात दोघे बोलतात असे धरून चालतो, न बोलताही नजरेशी नजर भिडवून दोघे बोलतात हे आपण जाणू शकतो, कधी कधी अनुभवूही शकतो. पण वक्ता बोलतो आहे, श्रोता नुसता ऐकतो आहे, त्याच्या मनात वक्त्याच्या बोलण्याप्रमाणे भावतरंग उठत आहेत, इतकेच नव्हे तर अनुरूप पण अबोल उत्तरे दिली जात आहेत, श्रोत्याच्या मनांतल्या मनांत येणारे प्रश्न जाणूनच वक्ता त्याची उत्तरे देत आहे असा हा संवादाचा अपूर्व सोहळा आहे. ज्ञानेश्वरांची किमया अशी की, हा हा म्हणता आपल्या बोटाला धरून ते आपल्याला सातशे वर्षांपूर्वीच्या कालात आजही घेऊन जातात आणि मोहिनीराजाच्या मंदिरात त्या भाग्यवंत श्रोत्यांच्या समुदायात बसवतात आणि म्हणतात, "हं, मग काय झालं की मी ग्रंथार्थ सांगण्यास सुरवात करायची ना! असे विचारण्यासाठी माझ्या गुरुदेवांच्याकडे पाहून हात जोडले तर ते माझा अभिप्राय जाणून म्हणाले, "ज्ञानेशा, तुमच्या भावना आम्हाला कळल्या बरे! सर्व काही पोचले, पण आता उशीर करू नका श्रीमन्नारायण पुढे काय म्हणाले ते सांगा."

गुरुदेवांची ही आज्ञा ऐकून मला निवृत्तिदास ज्ञानदेवास फार आनंद झाला! "जी, जी, आताच सुरवात

करतो. महाराज, आपली आज्ञा होण्याचीच काय ती खोटी होती.”

ज्ञानदेव श्रोत्यांना उद्देशून म्हणाले, “ऐकावे महाराज, श्रीकृष्ण असे म्हणाले की, अर्जुना नाही तर आता असे करतो की माझ्या मनातील अगदी जीवाभावाची एक गुह्य गोष्ट तुला सांगतो. तुला एखादे वेळी वाटेल की, इतकी गुप्त गोष्ट तुला मी का सांगतो आहे? हृदय उकलून तुला हे सांगावेसे का वाटते आहे? अर्जुना, खरे सांगू का? आजवर तुझ्याइतका आस्थावान श्रोता मला भेटला नाही. शिवाय सांगितलेल्या बोधाची तू अवज्ञाही करीत नाहीस. तेव्हा असे वाटले की, इतक्या आस्थेने ऐकणारा व त्याप्रमाणे वागणारा आपला सखा आपल्याजवळच्या गुह्य ज्ञानाचा अधिकारी आहे. विषयाचा गुप्तपणा गेला तरी चालेल, न बोलता येण्यासारखा विषय बोलून दाखविण्याची पराकाष्ठा करावी लागली तरी चालेल, पण आमच्या जीवातील ही ठेव तुझ्या जीवाच्या स्वाधीन करूनच टाकावी. आचळात दूध गुप्त असते पण त्याचा आचळाला काय उपयोग? सेवन करणारा कुणी अनन्य भेटला की, मग त्याची भूक भागवून दुधाच्या गोडीचे सार्थक होते. ते दूध तृप्ति देऊन नाहीसे होते पण फुकट गेले असे म्हणता येत नाही. कणगीतून जपून ठेवलेले बी बाहेर काढले आणि नांगरून तयार केलेल्या जमिनीत पेरले तर सांड-लवंड होऊन बी फुकट गेले असे म्हणता येत नाही. उलट लक्षपटीने कालांतराने ते पेरणाऱ्याच्या हाती परत येते. तसेच माझ्याजवळ गुप्त असलेले हे ज्ञान मी तुला प्रकट करतो. जो शुद्धमति आहे, ज्याचे मन तयार झालेले आहे, जो अनिंदक आहे आणि अनन्यशरण आहे त्याला ह्या गुप्त ज्ञानाच्या गोष्टी खुशाल सांगाव्या. आता सध्या माझ्यासमोर ह्या गुणांनी युक्त असा दुसरा कोणी मला दिसत नाही. योग्य घेणारा भेटला की, गुप्त ज्ञान प्रकट करून सांगण्यास काही हरकत नाही. तेव्हा अर्जुना, मी वरचेवर “गुप्त, गुप्त” म्हणतो आहे, म्हणून तुला कदाचित चमत्कारिक वाटेल. पण ते खरेच योग्य मनुष्य भेटल्याशिवाय देण्यासारखे नव्हेच. अनुष्ठान करणारा भेटल्याशिवाय नुसता उपदेश करून काय उपयोग आहे? तू मात्र श्रवण करण्यास योग्य आणि आचरण करण्याची आस्था असणारा आहेस. तुला ज्ञान आणि विज्ञान ही दोन्ही समजावून देतो.—

लक्षात ठेव की, ज्ञान म्हणजे स्वरूपज्ञान आणि विज्ञान म्हणजे प्रपंचज्ञान. या दोन ज्ञानात फार फरक आहे रे. पण ती दोन्ही बेमालूम मिसळली आहेत. खरी आणि खोटी नाणी मिसळलेली असावी आणि मग वाजवून परीक्षा करून खरे नाणे घ्यावे तसे ज्ञान आणि विज्ञान मी तुला स्पष्ट वेगवेगळी करून दाखवितो. चोचीच्या चिमट्याने राजहंसाने दूध आणि पाणी वेगवेगळी करावी त्याप्रमाणे आम्ही करू. वाऱ्याच्या झोताने धान्यातील कोंडा उडून जावा आणि निव्वळ धान्याची रास खाली रहावी त्याप्रमाणे या विचारधारेने प्रपंचज्ञान उडून जाऊन तुझ्या हाती आपोआपच फक्त स्वरूपज्ञान उरेल. मग संसारास कुठे बसवायचे आणि मोक्षश्रियेचा पाट कोणचा हे सहज तुला कळेल. तू या ज्ञानाच्या योगे मुक्तीचा स्वामी होशील. तुला संसाराची बाधाच होणार नाही.

अर्जुना, हे जे स्वरूपज्ञान मी तुला सांगणार आहे ते सर्व विद्यांच्या गावामध्ये श्रेष्ठत्वाच्या गुरुस्थानी आहे. सर्व गुह्यामध्ये श्रेष्ठ गुह्य आहे. पवित्र गोष्टीचा राजा आहे. हे ज्ञान धर्माची रहाण्याची जागा आहे. उत्तमात उत्तम आहे. आणि त्याची प्राप्ती झाली की, पुन्हा जन्माला येण्याची यातायात नाही. जन्म-मरणाचा फेराच संपतो.

गुरुमुखातून त्याचा थोडासा उदय होतो खरा, पण पार्था जीवाच्या हृदयात ते मुळात स्वयंभू असतेच. गुरुपदेश झाल्याबरोबर ते अनुभवास येऊ लागते इतकेच.

साधन कठिण असले तर साधक कष्टाने मार्गक्रमण करतो. पण तसा इथे प्रकार नाही. इथे पावलोपावली सुखाची प्राप्ती होत असते आणि त्या ज्ञानाची भेट झाली की, खरोखर त्या साधकाला आपण ज्ञानाचा अनुभव घेतो आहो याचेही भान उरत नाही. बरे, अगदी पूर्णावस्थेपर्यंतही सुखाची वाट पहावी लागत नाही. अनुभवाच्या अलिकडच्या बांधावर जरी चित्त जाऊन पोचले तरी ते उभ्याउभ्या तिथेच सुखाने भरून जाते. हे साधन इतके सुलभ, सोपे असूनही प्रत्यक्ष परब्रह्म आहे.

पूज्य गुरुदेव रानड्यांना एकदा विचारले गेले की, “गुरुदेव, आता आपल्याला साधन, नेम करण्याची जरुरी आहे?” तेव्हा गुरुदेव म्हणाले, “पण एवढ्या सुखाचा मार्ग कोण सोडील,” अशी ही सुखाची वाटचाल. साध्यामध्ये सुखाची प्राप्ती ठेवलेलीच आहे पण साधनही सुखमय असा हा सुखाचा राजमार्ग आहे.

ज्ञानदेव म्हणतात, “देव म्हणाले, अर्जुना, या मार्गाचा आणखी एक गुण म्हणजे हे साधन एकदा हातात आले की, हरवत नाही, अनुभव घेत असताना संपत नाही की, त्याचा वीटही येत नाही.”

तू तर्काने जाणणारा चतुर आहेस. म्हणशील की, “ही एवढी अमोल वस्तू लोकांना माहीत कशी नाही? शेकडा एक रुपाया व्याज मिळाले तरी त्यासाठी आगीत उडी टाकणारी ही माणसे! त्यांनी ही अनायासे मिळणारी सुखाची गोडी टाकली कशी? ते ज्ञान जर इतके उत्तम आहे तर तुझ्याजवळ गुप्त राहिली कशी? या सुखाची तू किती प्रकारे स्तुती केलीस? ते पवित्र आहे, रम्य आहे, सुखाने मिळते, धर्म्य आहे, आपल्याच ठिकाणी अनायासे असते. असे इतके गुण त्याच्या ठिकाणी असताना लोकांच्या तावडीतून ते आजपर्यंत सुटले तरी कसे? ह्या सर्व शंका तुझ्या मनात येणे साहजिकच आहे, पण त्या तू येऊ देऊ नकोस.

हे बघ, दूध पवित्र आहे, गोड आहे अगदी जवळच त्वचेच्या पदराआड आहे पण गोचिड दूध न घेता रक्तच पितात. कमळाचा कांदा आणि बेडूक एकाच घरात राहतात. पण भ्रमर त्या कमळातील पराग सेवन करतात तर त्या बेडकाच्या नशिबी कायम चिखलच असतो. निदैवी पुरुषाच्या घरात हजारो मोहरा पुरून ठेवलेल्या असतात पण ते माहीत नसल्याने तो मालक तिथेच बसून उपास काढत असतो. हृदयामध्ये सर्व सुखाचे निधान असा मी असताना लोकांना माझी आवड नसते, त्यांचे चित विषयातच गुंतलेले असते.”

एकदा कशा कोण जाणे माळणी आणि कोळणी आपआपला माल घेऊन बाजारात चालल्या होत्या. सुवासिक फुलांनी भरलेले हारे घेऊन गेलेल्या त्या माळणी रात्र झाली म्हणून शहराबाहेरच्या एका फुलबागेत हारे उशाला घेऊन झोपल्या, कोळणी पण माल विकून आल्या आणि तिथेच झोपल्या. सुवासाची सवय असलेल्या त्या माळणींना बागेत फुललेल्या फुलांच्या वासात लगेच गाढ झोप लागली. पण कोळणींचे डोके चढले. त्यांना झोप येईना. त्यांनी आपल्या माशांच्या टोपल्या जवळ ओढल्या आणि रोजचा तो सवयीचा वास येऊ लागल्यावर मगच त्यांना झोप लागली. अर्थात् त्या माळणींच्या झोपेच काय झाले ते गोष्टीत सांगितलेले नाही!

अनुक्रमणिका

देव सांगत आहेत, “विषयांध जीवांना परमात्मा अप्रिय आणि विषयच प्रिय असतो. मृगजळ पाहून अमृताचा अर्धवट गिळलेला घोट थुंकून टाकावा किंवा शिंप सापडलीं ह्या आनंदात गळ्यात बांधलेला परिस तोडून फेकून द्यावा त्याप्रमाणे “मी आणि माझे” या विचारांच्या गडबडीत ते बापुडे जीव माझ्यापर्यंत येऊन पोचू शकत नाहीत आणि मग एकदा जन्म, एकदा मरण या दोन तीरांना थडकत संसाराच्या नदीत डुंबत रहातात. तुझे तसे होऊ नये म्हणून अर्जुना, तुला स्वरूपज्ञान व विज्ञान यातील फरक समजावून देतो आणि मला येऊन पोचण्याचा राजमार्ग दाखवतो. म्हणजे आडरानात न घोटाळता तू थेट मोक्षप्रासादात येऊन पोचशील आणि माझ्याशी एकरूपच होऊन जाशील.

लक्षात घे पार्था की माया ह्या सर्व जीवमात्रांना उत्पन्न करते, त्यांचा नाश करते. ही माया उत्पन्न होते माझ्यापासूनच ती साम्यवस्थेत असताना तिला अपरा प्रकृति म्हणवयाचे. तीच पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश, मन, बुद्धि आणि अहंकार अशा आठ प्रकारांनी व्यक्त झाली की, तिला परा प्रकृति म्हणावयाचे. माझ्या निकटवर्ती असते ती अपरा प्रकृती आणि अष्टधा झाली की तीच परा प्रकृति हे रूप व नाम तिला मिळते. सातव्या आध्यायात हा विषय सांगून झाला आहे म्हणून विस्तार करीत नाही. एवढेच सांगतो की, माझ्या मायेचा मी स्वीकार केला की प्रपंचरचनेस सुरवात होते. तंतुनी भरलेल्या वस्त्राकडे पाहिले की, विणकर दिसते, उभ्या आडव्या धाग्याच्या सहाय्याने लहान लहान चौकटी तयार होतात आणि वस्त्र तयार होते. त्याप्रमाणे अपरा प्रकृति अष्टधा होते आणि पंचमहाभूतात्मक असलेले हे जग आकारास येते. मूळात दूध खरे पण त्यात विरजण पडले की, हळूहळू घट्ट होऊन त्याला दही हे रूप येते. त्याप्रमाणे मायाच सृष्टिपण घेते. बीजाला पाण्याची संगत लाभली की बीज भुईतून वर येऊन शाखा उपशाखा होते. त्याप्रमाणे हा प्रपंचविस्तार करते मायाच. माझी फक्त संगत असते. अमुक शहर अमक्या राजाने वसविले असे म्हटले जाते. त्याचा अर्थ असा असतो का की राजाचे हात शिणले? भूतसृष्टी निर्माण करण्यात माझा काहीच भाग नसतो. ते सगळे कार्य प्रकृतीचे असते. एखादा मनुष्य झोपलेला असतो. त्याला स्वप्न पडते. थोड्या वेळाने तो जागा होतो. आपल्याला वाटते का कधी की झोपेतून जागृतीत योग्यास त्याने काही प्रवास केला असे? त्याचे ह्या प्रवासाने कधी पाय दुखतात काय? अरे, त्याने काहीच केले नाही. तसे हे आहे. राजाच्या सत्तेखाली प्रजा आपआपले व्यापार आपआपल्या ठिकाणी करत असते. त्याप्रमाणे माझ्या सत्तेखाली प्रकृती उत्पत्तिसंहाराचे कार्य करत असते. मी काही करत नाही. प्रकृति करत असते हे ध्यानात घे. पौर्णिमेची आणि चंद्राची भेट झाली की समुद्राला अलोट भरती येते. पण भरती यावी म्हणून चंद्राला काही श्रम होत नाहीत. तसाच माझा या कार्याशी संबंध आहे.

मी माझ्या प्रकृतीचा अंगीकार केला की, ती प्रकृति एकसारखी भूतांना जन्म देऊच लागते. बीजापासून वृक्ष, वेली, पाने उत्पन्न करण्यास भूमी समर्थ आहे. त्याप्रमाणे हा सर्व प्राण्यांचा समुदाय उत्पन्न करण्यास प्रकृति समर्थ आहे. तो समुदाय पूर्णतया प्रकृतिच्या आधीन असतो. देहामध्ये जशा बाल्य, तारुण्य, वृद्धावस्था ह्या अवस्था येतात किंबहुना या अवस्थांचा स्वामी जसा हा देह आहे त्याप्रमाणे मायेमध्येच हे सर्व जीव विद्यमान असतात. आकाशात मेघांची फळी धरण्यास वर्षाऋतूचा आधार, स्वप्नाला निद्रा हे कारण त्याप्रमाणे ह्या अशेष भूतसमुद्राचे आद्य कारण व स्वामिनी प्रकृती आहे. स्थावर, जंगम, सूक्ष्म, स्थूल अशा या यच्चयावत् जीवांना प्रकृति मूळ आहे, मी नाही. भूतांना जन्म द्यावा, त्यांचा प्रतिपाळ करावा, त्यांचा संहार करावा ही कुठलीच कामे आमच्याकडे येत नाहीत. मी ह्या सर्व कर्मापासून अलिप्त असतो. पाण्यामध्ये चंद्राच्या वेली पसरल्यासारख्या

दिसतात. त्याची लावणी वा वाढविण्याचे काम चंद्राने केलेले नसते. त्याप्रमाणे ही सर्व कर्मे माझ्यापासून दूर राहिलेली असतात. समुद्राच्या पाण्याचा लोट सुटला असला तर मिठाचा घाट त्याला थोपवू शकत नाही. तशी ही सर्व कर्मे माझ्यापासून दूर राहिलेली असतात. मला बांधू शकत नाहीत. कर्माची समाप्ति जर माझ्या स्वरूपात होते तर ती मला काय बांधून ठेवतील? धुराच्या कणांचे छत सोसाट्याचा वारा आडवू शकेल, सुर्यबिंबामध्ये अंधाराचा प्रवेश होऊ शकेल तरच हे प्रकृतिने निर्माण केलेले कर्म मला बांधू शकेल! डोंगराच्या पोटातला पदार्थ जसा पावसाच्या धारेने झोडपला जात नाही तसे प्रकृतिकार्य माझ्यापर्यंत येऊन पोचू शकत नाही.

विचार करून पाहिले तर माझ्या सत्तेविना प्रकृति काहीच करू शकत नाही, हे खरे आहे. पण मी स्वतः काहीच करीत नाही. करवीत नाही. केवळ उदासीन असतो. घरात लावून ठेवलेला दिवा फक्त प्रकाश देण्याचे काम करतो. कुणाला अमुक काम कर, अमुक करू नको असे सांगत नाही. कोण काय काम करतो हेही त्याला माहित नसते. तो दिवा त्या सर्वांच्या कर्माचा केवळ साक्षी असतो. त्याच्या उजेडात सर्वजण आपआपली कामे उरकत असतात तसा मी प्रकृतिरूपाने म्हटल्यास सर्व भूतात असून अनासक्त असतो. त्यांची कर्मे पहातो इतकेच.

युक्तिप्रयुक्तीने हाच अभिप्राय तुला पुन्हा काय सांगू? अर्जुना, हे पक्के लक्षात ठेव की लोकांच्या व्यापारांना जसा सूर्य निमित्तमात्र असतो, तसा जगाच्या उत्पत्तीला मी हेतू आहे. प्रकृतीचा अंगीकार मी केल्यावर ती चराचराच्या उत्पत्तीस समर्थ होते म्हणून जगाच्या निर्मितीस मी हेतू आहे असे म्हणावे.

आता तुझ्या मनात असे येईल की, भगवंतापासून अपरा व परा प्रकृति निर्माण होते आणि ही परा प्रकृति प्रपंच निर्माण करते. पुन्हा प्रपंच नाहीसा होतानाही त्याच क्रमाने नाहीसा होत होत भगवंतामध्ये लीन होतो. मग असे म्हणण्यास काय अडचण आहे की प्रपंच वा जीवमात्र भगवंतरूपच आहेत? तर अर्जुना, तुझा हा विचार अगदी बरोबर आहे. तसा खोलवर विचार केला तर माझ्याच विस्तारलेल्या स्वरूपास जग हे नाव आहे. दूध विरजले की, तेच दूध दही होते, बीजाचाच वृक्ष होतो, सोन्याचाच अलंकार होतो. तेव्हा हे जग म्हणजे माझा एकाचाच विस्तार आहे. अव्यक्तपणाने संकोचित होऊन थिजते तेच विश्वाकाराने पातळ होऊन पसरते. अमूर्त असलेला माझा विस्तार म्हणजे जग. हे सर्व त्रैलोक्य म्हणजे व्यक्त झालेला मी हे ध्यानात घे. महत्तत्त्वापासून ते देहापर्यंत ही सर्व भूते पाण्यावर फेस दिसावा तशी माझ्यावर भासमान होतात. फेसामध्ये समुद्र नसतो तसा मी भूतांच्या ह्या भिन्न भिन्न आकारामध्ये नाही. स्वप्नात जसे आपण एकटे असून अनेक रूपाने नटतो त्याप्रमाणे ह्या भूतांचा माझ्या ठिकाणी भास होतो. मी वेगळा, ही भूते वेगळी असेही वाटते पण माझे स्वरूप आपल्या तोंडासमोरच्या सूर्यासारखे साक्षात आहे. कधी आहे, कधी नाही अशा प्रकारचे नाही. भूतांचे आकार मात्र आता आहेत, आता नाहीत असे असतात. म्हणून बोललेल्याच गोष्टींचा विस्तार न करता तुला सांगतो की, माझ्या खऱ्या स्वरूपात तुझी दृष्टि प्रवेश करू दे. त्या दृष्टिने तुझ्या मनातील कल्पना टाकून तू ह्या प्रकृतिपलीकडील माझ्या शुध्द स्वरूपाचे दर्शन घेतलेस की, तुझी खात्री पटेल की सर्व त्रैलोक्य हे माझे स्वरूप असल्याने तुझ्या स्थूल दृष्टीला दिसणारी ही भूते माझ्या ठिकाणी आहेत असे म्हणणे चुकीचे आहे. वासनांच्या संध्याकालीन अस्पष्ट उजेडात बुद्धिच्या डोळ्यांना मांद्य येते. मग माझे अखंड स्वरूप न दिसता भूते निरनिराळी आहेत असे प्राण्यांना चुकीचे दृश्य दिसते. आता ही वासनांची संध्याकाळ नाहीशी झाली की माझे अखंड स्वरूप त्याच्या

दृष्टीस पडते. जमिनीवर पडलेला सुंदर हार अंधारात सापासारखा दिसत होता पण उजेडात पाहिल्यावर त्या माळेचे सापपण नाहीसे झाले तसेच हे घडते.

माऊली म्हणतात, “हे सगळे नीट समजावून घेण्यासाठी काही दृष्टांत घेऊया. मातीमध्ये मोठा खड्डा खणला की आत गाडगी, मडकी सापडतात का? तर नाही. कुंभार माती चांगली तयार करतो, मनाशी ठरतो, असा घडा, असा परळ, अशी लोटी आणि त्याच्या बुद्धितून मग ही भांडी तयार होतात. आकार नुसता पाहिला तर भिन्न भिन्न पण भांडी कशाची म्हटली तर मातीची. एकाच मातीची. तसे विश्वात आकार वेगवेगळे पण मूल वस्तू एक-परब्रह्म.

समुद्रावर मोठमोठ्या लाटा येतात. मग काय समुद्राच्या पोटात लाटांची खाण का आहे? वारा आला त्याने सहज पाणी वर उडवले, लाट तयार झाली, वारा थोडा पुढे गेला की, परत समुद्राचे पाणी समुद्रात! तसा जग हा त्या परमात्म स्वरूपावर क्षणमात्र उठणारा तरंग!

कापसाच्या पोटात काय कापडांची पेटी होती? पण त्याचे सूत होऊन कापड तयार झाल्यावर नेसणाऱ्याच्या दृष्टिला कापड म्हणून दिसले. पण मुळात कापूसच ना?

सोन्याचे अगदी उत्तमोत्तम दागिने केले, पाहणारीला कंठी, साखळी, गोट, तोडे दिसतात. घालणारी हौसेने निरनिराळ्या अवयवांत ते घालते पण म्हणून सोने हे त्याचे मूळ स्वरूप मोडते काय? गोटही सोन्याचे, साखळीही सोन्याची.

डोंगरापुढे उभे राहून हाक मारली तर प्रतिध्वनि उठतो, आरशात पाहिले की, आपले रूप दृष्टिस पडते. मग डोंगराकडून येणारा तो प्रतिसाद, आणि आरशात दिसणारे ते प्रतिबिंब ही दोन आहेत की, मुळात एकच असलेले समोर दोन या स्वरूपात भासमान होत आहे? ह्या सर्व दृष्टांतामध्ये जसे दुणेपण केवळ कल्पनेत, भासात, अज्ञानात असते त्याप्रमाणे भगवंत म्हणतात की अरे, माझ्या ह्या निर्मळ स्वरूपामध्ये भूतभिन्नता समजणे हा पहाणाऱ्याचा दृष्टिदोष आहे. त्याच्या संकल्पाचा, कल्पनेचा तो खेळ आहे आणि ही तरी कल्पना जीव का करतो? तर तो प्रकृतित वावरतो म्हणून. एकदा त्या प्रकृतिचा संग सुटला की, संग सुटण्याक्षणीच भूताभास संपलेला असतो आणि मग माझे निखळ रूप उरते.

आपण गरगर फिरत असलो की, भोवतालच्या भिंती, दरडी गोल फिरत आहेत असे वाटते. त्याप्रमाणे जीवाला कल्पनेमुळे माझ्या अखंड स्वरूपात वेगवेगळे प्राणीसमुदाय भासतात. कल्पना सोडून देऊन पाहिले तर भूते माझ्या ठिकाणी किंवा मी भूतांच्या ठिकाणी इत्यादी कल्पना स्वप्नातही येणार नाहीत. मी भूतांना धारण करतो किंवा मी भूतांमध्ये असतो ही बोलणी संकल्परूप सन्निपात झालेल्या मनुष्यासारखी आहेत. विश्व माझ्याहून वेगळे नाही हे, प्रियोत्तम प्राणसख्या, ऐकून ठेव. मी ह्या सगळ्या विश्वाचा आत्मा आहे. त्या लटक्या भूतसमुदायाचा आधार आहे पण तो कशा प्रकारचा? तर मी सूर्यप्रकाश आहे. माझ्या किरणाच्या आधाराने मृगजळासारखे जग भासते. मृगजळास त्या सूर्यकिरणाविना काही वेगळे अस्तित्व असते का? जोवर ते चंडकिरण पृथ्वीवर तळपतात तोवर हा मृगजळाचा आभास असतो. त्याप्रमाणे जग ह्या कल्पनेचा मी आधार

आहे. प्रभा आणि सूर्य ही दोन्ही एकच तसा हा आधार! आणखी एक दृष्टांत देतो. हे पहा, गगन जसे जेव्हढे तसा वारा त्यात भरून राहिलेला असतो. सहज हलविला तर वेगळा दिसतो. एरवी गगनाशी एकरूपच असतो. ह्या प्राणीमात्राची माझ्या ठिकाणी कल्पना केली तर काही अस्तित्व आहे, पण कल्पना संपली की अवघा एकटा मीच! तेव्हा अर्जुना, कल्पनेप्रमाणे जगाचे असणे-नसणे. कल्पना गेली की, ते असणे-नसणे आहेच कुठे? माझ्यापासून प्राणी वेगळे नाहीत हे खास आणि अर्जुना, मलाही त्यांच्यापासून वेगळा मानू नको हो.

सूर्य जसा लोकव्यवहाराचे निमित्त तसा मी जगाच्या उत्पत्तीला हेतू आहे. प्रकृतीचा अंगिकार केल्याने चराचराची उत्पत्ती होते हेही ठीक आहे. पण मी आतापर्यंत तुला समजून सांगितले तेच सांगतो की, भूते माझ्या ठिकाणी भासतात पण मी भूतांच्या ठिकाणी नाही अथवा भूते माझ्या ठिकाणी नाहीत, मी भूतांच्या ठिकाणी नाही हे वर्म विसरू नको.

हे जोवर नीट ध्यानी येत नाही तोवर भुशात धान्य सापडत नाही. तसा खरोखर मी सापडत नाही. तर्काच्या विस्ताराने तुला वाटेल "आता कळले बरे का? पण अर्जुना, तर्कात सापडणारे हे ज्ञान नव्हे. मृगजळाच्या पाण्याने जमीन भिजत नाही. पाण्यात जाळे टाकले की, त्यात चंद्रबिंब सापडले या आनंदात जाळे ओढून तीरावर झाडले तर त्यात काय ते आकाशातले बिंब आहे? वक्तृत्वाच्या जोरावर कित्येकजण प्रतिपादन करीत असतात, स्वरूपज्ञान झाले असे ते सिद्ध करण्याचा प्रयत्न करतात. पण अर्जुना, प्रतीतीची ती नुसती फसवणूक आहे. खऱ्या बोधाच्या वेळी कळते की, बोध झालेलाही नव्हता आणि आताही होत नाही आहे.

तेव्हा असे कर की, स्वरूपज्ञान मी तुला उघड करून दाखवले आहे. आता इंद्रियांची द्वारे बंद कर, वृत्ति हृदयात स्थिर कर, कल्पना सोडून दे, प्रकृतिचा संग सोड आणि माझ्या मूळ स्वरूपाचा, माझ्या ऐश्वर्य योगाचा विचार कर. एकदा कल्पना सुटली की, भूतांचे असणे-नसणे हा व्यवहार संपेल आणि तू व मी फक्त राहू. मग अनुभूति येईल की मी समुद्र आणि तू माझ्यावरची लाट आहेस. ही प्रतीति आली की तू स्वतःचे तरंगत्वही सोडून दे आणि माझ्याशी एकरूप हो.

अर्जुना, तू हे करच रे. तुझे हे प्रपंचज्ञान पूर्ण विरून जाऊ दे. तू फक्त माझ्या निखळ अखंड स्वरूपाचे चिंतन कर आणि माझ्याशी एकरूप हो. "ह्या ओव्या वाचल्या की हात जोडलेला, डोळे मिटलेला तो प्रभुसखा पार्थ डोळ्यापुढे उभा रहातो. देव किती नानाप्रकारे विनवणी करीत आहेत त्याची!

आपला बोध शिष्याच्या ठिकाणी स्थिर झाला ना हे पहाण्याची देवाना इतकी घाई झाली होती की, त्यांनी पुन्हा अर्जुनाला हाक मारली. ते म्हणाले, "पार्था, कळला का रे उपदेश तुला? अरे, मी तुला खात्रीने सांगतो की, तुला हा उपदेश कळला की सगळीकडे आपण भरून राहिलो आहो ह्याची तुला प्रतिति येईलच. ह्या जाणिवेची जागृती आली ना रे? द्वैतस्वप्न मिथ्या झाले काय? कल्पनेची झोप पुन्हा येऊ देऊ नको बरं का? जर का झोपलास तर परत द्वैताचे स्वप्न पडेल पहा. अरे, ह्या संसाराची भीती आहे ना तुझ्या मनात? माझी प्राप्ति व्हावी अशी आहे ना तुला तळमळ? मग मी सांगितलेली उपपत्ति नीट लक्षात ठेव. जरासुद्धा कल्पनेची बाधा झाली की संसारबुद्धि व्यापून टाकील, आणि मग काविळीने ज्याची दृष्टि दोषयुक्त केली आहे, तो रोगी चांदणे पिवळे दिसते म्हणतो. त्याप्रमाणे माझ्या निर्मळ स्वरूपात दोष दिसू लागतील. तापाने तोंड कडू झाले

की, तापकरी दूध कडू आहे असे म्हणू लागतो. त्याप्रमाणे मी देहधर्माच्या पलीकडचा असून मी देहधर्मयुक्त आहे असे मानू लागशील. लोक तसे मानतातही.

अर्जुना, तुला पुन्हा पुन्हा सांगतो. तू जर माझ्याकडे स्थूल दृष्टीने पाहशील तर ते पहाणे वाया जाईल. माझे खरे स्वरूप तुला दिसणारच नाही. तेव्हा माझ्या सत्य स्वरूपाचा अभिप्राय तुला सांगितला तो चुकूनसुद्धा विसरू नकोस बरं का? स्वप्नात अमृत पिऊन कोणी अमर झाला आहे का? तसेच स्थूल दृष्टिने पाहून माझे दर्शन होईल का?

पण मूर्ख लोक माझ्याकडे स्थूल दृष्टिने पहातात आणि मला मानुषधर्म चिकटवतात. त्या तशा स्थूल स्वरूपात आपण देव पाहिला असे समजून त्यातच अडकून राहतात. सांग बरे, हे त्यांचे पहाणे खऱ्या पहाण्याला प्रतिबंध करते की नाही? पाण्यामध्ये प्रतिबिंबित झालेल्या नक्षत्रांकडे पाहून ती रत्नेच आहेत असे समजून हंस जोराने पाण्यात शिरतो आणि त्या प्रतिबिंबावर रत्ने म्हणून चोंचीने प्रहार करतो आणि पाण्यात दडलेल्या खडकावर आपटून आत्मघात करून घेतो. गंगा गंगा म्हणून जर मृगजळाच्या काठी येऊन उभे राहिले तर काय फळ मिळणार? आहे मूळात बाभुळ पण आपण तिला “कल्पतरु” असे नाव दिले आणि तिची अगदी मनोभावे खूप सेवा, पूजाअर्चा केली तर ती का आपले मनोरथ पूर्ण करणार? नीलमण्याची दुपदरी कंठी आहे असे समजून सापाला हात घालावा किंवा रत्ने समजून गारा वेचाव्या तसा हा प्रकार आहे. द्रव्याचा साठा सापडला म्हणून खदिरांगार पदरात भरून घ्यावे किंवा प्रतिबिंब पाहून सिंहाने विहिरीत उडी घ्यावी तशी ह्या लोकांची स्थिती आहे. माझ्या स्वरूपाची प्राप्ती व्हावी म्हणून ते लोक या प्रपंचातच मी आहे असा मनाचा निश्चय करतात आणि प्रपंचात खोल बुडी मारतात. आकाशातला चंद्र धरण्यासाठी पाण्यातले प्रतिबिंब कवेत घ्यावे तशी त्याची फसगत होते. त्यांचा तो कृतनिश्चय वाया जातो. उघडच आहे. अरे, एखाद्याने कांजी प्यावी आणि अमृताचा परिणाम होईल अशी वाट पहात बसावे तसेच ह्या वाट चुकलेल्या प्राण्याचे होते. ह्या नाशवंत स्थूल आकाराचा ते भरवंसा धरतात आणि त्या अशाश्वतात ते अविनाशी शाश्वत भेटेल अशी आशा बाळगतात. माझ्याबद्दल त्यांच्या ठिकाणी पूर्ण अज्ञान असते.

काहीनी तर मोहमयी प्रकृतीचाच स्वीकार केलेला असतो. त्यातच ते रमलेले असतात. अर्जुना, तुला काय सांगू? त्यांचे जन्माला येणेच फुकट असते. पावसाळ्यावाचून आकाशात आलेले ढगाप्रमाणे किंवा मृगजळाच्या लाटाप्रमाणे त्यांचे जगणे व्यर्थ असते. मातीचे घोडेस्वार किंवा गारुडी, विद्येचे दागिने किंवा आकाशात ढगांच्या आकृतीमुळे दिसणारी गंधर्वनगरी ह्या गोष्टी जशा केवळ आभासमय असतात तसे त्या लोकांचे जिवंतपण भ्रममय असते. काटे निवडुंग सरळ वाढते पण आत पोकळ आणि फळहीन किवा अजागलस्तन जसे निकामी तसे त्यांचे आयुष्य असते. सावरीला आलेले फळ जसे देण्याघेण्याच्या उपयोगाचे नसते तसे ह्या मूर्खांचे जगणे आणि कर्म करणे निरुपयोगी असते.

त्यातले काहीजण शास्त्राच्या अध्ययनाच्या मागे लागतात. माकडाने नारळ पाडावे, किंवा आंधळयाच्या हाती मोती पडावे तशी ही शास्त्रे त्यांच्या हाती पडली तरी त्यांचे मोल खऱ्या स्वरूपाने त्यांना कळतच नाही. लहान मुलीच्याहाती लढण्यासाठी प्रखर शस्त्रे द्यावी किंवा अशुद्ध माणसाला बीजमंत्र सांगावा तसे हे सगळे शास्त्रज्ञान त्यांच्या हाती कुचकामाचे ठरते. त्यांतूनही ते लोक थोडेबहुत जे आचरण करतात त्यात त्यांचे

सर्वार्थाने लक्ष नसल्यामुळे ते आचरणही फुकट जाते. म्हणून म्हणतो ते जगणे फुकट आहे.

बरे आणखी एक मुर्खाचा प्रकार असा की, ते तर सद्बुद्धि खाऊन टाकणाऱ्या आणि विवेकाचे नाव गाव पुसून काढणाऱ्या राक्षसीच्या म्हणजे तमोगुणाच्याच पूर्ण आहारी गेलेले असतात. त्या आसुरी प्रकृतीच्या स्वाधीन झाल्यामुळे चिंतेच्या गालात सापडतात आणि तामसी वृत्तीच्या आहारी पडतात. ह्या तामसी वृत्तीच्या तोंडात आशेच्या लाळेत हिंसेची जीभ लोळत असते. संतोषरूपी चघळ ती अखंड चघळत असते. नाहीसे करीत असते. प्रमादरूपी पर्वताच्या दरीत ती सदाच माजलेली असते. अनर्थाच्या कानापर्यंत ओठाचे काठ चाटीत ती त्या दरीतून बाहेर पडते आणि द्वेषाच्या दाढानी ज्ञानाचा खसाखसा रगडा करते. अगस्तीऋषीना जसे कुंभाचे आवरण असते तसे ह्या मूढांच्या स्थूल बुद्धिला ह्या आसुरी वृत्तीचे आवरण असते. ते तिच्या तोंडात पडले की जसे काही भुताला टाकलेल्या बळीप्रमाणे निषिद्ध होतात. भ्रांतीच्या कुंडात बुडून जातात. एकदा ह्या तमाच्या गर्तेत पडले की मग ते जीव विचारांच्या हाती कधी लागत नाहीत. ते कुठे बुडाले याची नाव निशाणीसुद्धा रहात नाही. हे निष्फळ वर्णन आणखी कशाला करू? ह्या मूर्खांचे वर्णन आणखी कशाला वाढवू? उगीच बोलत राहिलो तर वाचेला शीण मात्र होईल.

आता असेही काहीजण आहेत की जे माझ्या स्थूलाकाराची भक्ति करतात. काही विशिष्ट कार्यासाठी आकाराला आलेले हे शरीर म्हणजेच मी असे मोहित झालेल्या मनोवृत्तीने भ्रमाने मानतात. एकदा अवतारकृत्यासाठी धारण केलेले हे मनुष्य शरीर म्हणजेच मी, तेवढाच मी, असे मानण्याची चूक त्याने केली की पुढच्या सगळ्या चुका अपरिहार्यच आहेत.

मग अनाम असा मी! त्या मला नाम दिले जाते.
अक्रिय असा मी! त्या मला कर्माची योजना केली जाते.
विदेह असा मी! त्या मला देहधर्म आरोपीत केले जातात.
मला आकारशून्याला, आकार
निरुपाधिकाला, उपचार
विधिविवर्जिताला, व्यवहार
मला वर्णहीनाला, वर्ण
अचरणाला, चरण
आपाणियाला हात दिले जातात.
मी अमेय, माझे मोजमाप काढले जाते.
अश्रवणाला श्रवण
अचक्षुला चक्षु
अगोत्राला गोत्र

अरूपाला रूप आहे असे मानले जाते. अर्जुना, मी अव्यक्त असून मला व्यक्त मानतात. अनार्त असून माझ्या ठिकाणी आर्तीची कल्पना करतात. स्वयंतृप्ताला तृप्ती कल्पितात. मी वस्त्रात गुंडाळण्यासारखा नसताना मला वस्त्रे नेसवतात. भूषणातीताला अलंकार चढवितात. मी सर्वांचे कारण असताना माझ्याच अस्तित्वाचे

अनुक्रमणिका

कारण सांगतात. मी सहज असताना मला निर्माण करतात. स्वयंभू असून माझी प्राणप्रतिष्ठा करतात. मला आवाहन करतात, माझे विसर्जन करतात. मी सर्वदा सर्वसिद्ध असताना बाळ, तरुण, वृद्ध असे समजतात. मी एकसंधी एकरूप असताना माझा ह्या अवस्थांशी संबंध जोडतात. मला अद्वैताला द्वैत समजतात. अकर्त्याला कर्म आणि अभोक्ता असताना मी भोग भोगतो असे समजतात. मी कुलरहित असताना माझ्या कुलाचे वर्णन करतात. मी नित्य असताना माझ्या निधनाची कल्पना करून दुःखी होतात. प्राणीमात्रांच्या अंतरात असणाऱ्या मला शत्रु मित्र आहेत असे गृहीत धरतात. मी स्वानंदात रमणारा असताना मला अनेक सुखांची इच्छा आहे असे समजतात. मी सगळ्यामध्ये सारखा असताना एके ठिकाणी आहे दुसरीकडे नाही असे धरतात. अरे, इतकेच काय पण स्थावर जंगमाचा मी एकमेव आत्मा असताना मी एकाचा कैवार घेतो, दुसऱ्याला रागाने मारतो अशाच कथा जगात वाढवितात. अर्जुना, स्वतःच्या मर्यादित जीवनातले सर्व भाव माझ्या ठिकाणी ते आरोपित करतात आणि मनुष्यांचे सामान्य धर्म माझ्या ठिकाणी आहेतच असे ठामपणे सांगतात. अर्जुना, लोकांच्या ह्या अशा प्रकारच्या ज्ञानाला मी अज्ञान म्हणतो. विपरीत ज्ञान म्हणतो. हे लोक माझी भक्ति अशी चुकीच्या मार्गाने करतात. एक आकार पुढे दिसला की त्याला देव म्हणतात. त्या मूर्तिला काही कमीपणा आला, धक्का लागला की आता ह्यात देव नाही म्हणतात. आणि मूर्ति टाकून देतात. इतर देहधाऱ्यासारखाच मी एक मनुष्य आहे असे समजल्यामुळे त्यांचे हे विपरीत ज्ञान माझ्या शुद्ध यथार्थ ज्ञानाला झाकून टाकते.

मालूताई, इथे रामकृष्ण परमहंसांच्या जीवनातील एक घटना आठवते. त्याची पार्श्वभूमीही ध्यानात घेऊया म्हणजे ठाकुरांच्या सांगण्याचे विशेष आश्चर्य वाटते.

एकदा ठाकूर कालीमंदिरात गेले आणि देवीचे दर्शन घेऊन बाहेर सभामंडपात उभे राहून एक स्तुतिपर पद्य म्हणता म्हणता समाधिमग्न झाले. त्या अवस्थेत उभे असताना तोल जाऊन पडतील म्हणून छोटा नरेंद्र त्यांना सावरण्यासाठी पुढे झाला. पण त्याच्या हाताचा स्पर्श होताच श्रीरामकृष्णांनी किंकाळी फोडली. काय झाले याचा उलगडा बऱ्याच वेळाने त्यांच्याकडून झाला. नरेंद्राच्या डोक्याला फोड झाला होता. डॉक्टरांनी तो नुकताच कापून काढला होता.

“क्षत शरीराने देवमूर्तीला स्पर्श करू नये” हे भोवतालच्या मंडळीना माहित होते पण ते अशा प्रकारे ठाकुरांना झालेल्या असह्य वेदनांमुळे सर्वांना प्रत्यक्ष दिसले. देवतेचा पूर्ण अविर्भाव त्यावेळी त्यांच्या ठिकाणी असल्याने त्यांना त्या क्षत शरिराचा स्पर्श सहन झाला नाही. एरवी जखम होती तरी नरेंद्र ठाकूराच्याबरोबर उठत बसत होता. त्यांना स्पर्श करत होता. त्याच्या स्पर्शाने रामकृष्णांना त्रास झाला नव्हता पण भावावस्थेत तो स्पर्श त्यांना सहन झाला नाही.

या कथेनंतर देवाच्या मूर्तीसंबंधीचा जो अभिप्राय ठाकुरांनी दिला तो अद्भूत वाटतो. दक्षिणेश्वरी एका मूर्तीचा पाय दुखावला. “भग्नमूर्तीची पूजा निषिद्ध आहे तेव्हा ती काढून दुसरी त्या ठिकाणी बसवावी.” अशा शास्त्रार्थाची चर्चा सुरू झाली. ठाकुरांना निर्णय विचारला, तेव्हा ते म्हणाले, “हो बसवावी. उद्या राणीच्या जावयाचा पाय मोडला की तेव्हाही नवा धड जावई आणावा मग!” इतके परखड उत्तर! मूर्ति अखंड आहे तोवर देवत्व, मूर्ति भंगली की त्यातले देवत्व संपले हा विचार देखील त्यांना सहन होण्यासारखा नव्हता. ते म्हणत देवत्व भावात आहे, आकारात नाहीत. तरीही त्या मूर्तीवर इतके नितांत प्रेम त्यांच्या चित्तात असे.

अनुक्रमणिका

भगवंत अर्जुनाला समजावून देत ओहत की अशा भक्तांचे प्रेम मूर्तीवरही नसते आणि भावही शुद्ध अढळ नसतो. अमूर्ताची मूर्ति करणारे हे लोक भक्तिची रीतच जाणत नाहीत. देव म्हणाले, "अर्जुना, मी नाही अशी जागा आहे का कुठे? सूर्य होऊन मी पाण्याचे शोषण करतो आणि इंद्र होऊन पुन्हा वर्षाव करतो. जलाशय भरून टाकतो. अग्नि लाकडे खातो तर ती लाकडेच अग्नि होतात. त्याप्रमाणे पार्था, मरते आणि मारते ही दोन्ही माझीच रूपे आहेत. मृत्यूने जे जे घेरलेले आहे तेही माझेच रूप आणि न मरणारे असे जे अविनाशी तेही माझेच रूप. आता जास्त काय बोलावे? पण एकदाच समजावून घे की विनाशी आणि अविनाशी ही दोन्ही माझीच रूपे आहेत. म्हणून तुला म्हटले की माझ्याशिवाय दुसरी वस्तुच जगात नाही. मी नाही अशी जागाच नाही.

एका गोष्टीची आठवण होते. म्हणतात की, बादशहाकडे सरदारांनी तक्रार केली की, "आपण नेहमी बिरबलाचा सल्ला घेता, आम्हाला कधी विचारतच नाही. आम्हीही आपल्याला सांगू शकू की काही."

बादशहा म्हणाला की, "ठीक आहे. तुम्हाला विचारतो त्या प्रश्नाचे उत्तर द्या. एवीतेवी आज बिरबल दरबारात नाहीच आहे. माझा प्रश्न आहे तुम्हाला की, "मी मोठा की देव मोठा?" सरदार एकमेकाकडे पाहू लागले. काय उत्तर देणार या प्रश्नाचे? त्यांनी एक दिवसाची मुदत मागून घेतली. दुसरे दिवशीही त्यांना उत्तर देता येईना. बिरबल हजर होता. बादशहाने बिरबलास तोच प्रश्न विचारला. बिरबलाने हात जोडले आणि म्हटले, "हुजूर, आपण मोठे." बादशहा म्हणाला, "मी देवाहून मोठा?" बिरबल म्हणाला, "होय खाविंद, देव करू शकत नाही ते आपण करू शकता म्हणून आपण मोठे."

बादशहाला फारच उत्सुकता वाटू लागली. त्याने विचारले, "ते कसे काय बिरबल?" बिरबल म्हणाला, "शहेनशहा, एखाद्याने काही गुन्हा केला तर आपण त्या गुन्ह्याबद्दल त्याला हद्दपार करू शकता. देव कुठे हद्दपार करणार? त्याची हद्द नाही अशी जागा कुठे आहे? तेव्हा आपणच देवापेक्षा मोठे."

बादशहासहित सर्वच निरूत्तर झाले. थोड्या वेळाने बादशहा सरदारांच्याकडे वळून म्हणाला, "कळले ना बिरबलचाच सल्ला आम्ही का घेतो ते?"

गर्दन झुकवून मुजरे करण्यापलीकडे दरबारी दुसरे काय करणार?

तर देव सांगत आहेत की, "अरे, प्राण्यांचे दैव असे की माझ्याशिवाय दुसरे काहीच जगात नसताना ते प्राणी मलाच ओळखत नाहीत. लाटा पाण्याशिवाय सुकाव्या, सूर्यकिरणांना दिव्याशिवाय दिसू नये तसे हे जीव मद्रूप असूनही आपण भगवद्रूप आहोत असे त्यांना. वाटत नाही. हे केवढे आश्चर्य आहे? जग केवळ माझेच ओतलेले रूप आहे. मी आत बाहेर ते कोंदून टाकले आहे. पण काय त्यांचे कर्म ओढवले आहे की ते माझे अस्तित्वच मानत नाहीत. काय ह्यांच्या नशिबाला म्हणावे? अरे, ते अमृताच्या विहिरीत पडतात आणि "मला काढा रे काढा मी बुडतो आहे" असे म्हणत काठावर येऊन बाहेर पडतात. आंधळा एका घासासाठी पळत असताना आंधळेपणाने पायात आलेला चिंतामणी ढकलून बाजूला करतो. तसे त्यांचे हे दुर्दैव आहे. काय करावे

अनुक्रमणिका

ते त्यांना अप्राप्यच पद असते. कोण काय करणार त्या दुर्भाग्याला? ज्ञान जेव्हा जीवाला सोडुन निघून जाते तेव्हा त्याची ही अशी दशा होते. गरुडाला पंख मजबूत आहेत पण डोळ्यांनी मात्र जर तो आंधळा असला तर त्याला त्या पंखांचा काय उपयोग आहे? तसेच त्या लोकांनी कितीही उत्तम कर्म केले तरी ज्ञानाशिवाय केलेल्या त्या कर्माचे श्रम अनाठायी होतात. उदाहरणच सांगतो, हे बघ याज्ञिक आश्रमधर्माच्या आचरणात चूक होऊ देत नाहीत. यांच्या वागण्यावरून इतरांना वागण्याचा विधी कळतो. ते सहज लीलेने यज्ञ करतात. तिन्ही वेद मान डोलवतात इतकी यज्ञक्रिया उत्तम होते. आता इतका उत्तम यज्ञ केल्यावर यज्ञफल मूर्तिमंत समोर येऊन उभे रहाते यात काय आश्चर्य? प्रत्यक्ष यज्ञदेव अशी ज्यांची योग्यता ते हे सोमपानाचे अधिकारी याज्ञिक! पण त्यांनी पुण्याच्या नावाखाली पापच जोडले असे मी निःसंदेह म्हणतो. तिन्ही वेदांचे अध्ययन करून शेकडो यज्ञ करून ते माझी इच्छा करीत नाहीत, तर स्वर्गसुखाची भिक्षा मागत असतात. मग त्यांनी जोडलेल्या पुण्याला पाप म्हणू नको तर काय करू? कल्पतरूच्या सावलीत बसून भीक मागण्यासाठी फाटक्या झोळीला गाठी माराव्या आणि त्या अभागी माणसाने ते आपले दैन्य मिरवायला निघावे तशी ह्यांची स्थिती असते. शंभर यज्ञ करून माझी प्राप्ती व्हावी असा त्यांचा हेतू नसतो. तर त्यांच्या मनात सुखाची अभिलाषा असते. आता त्यांनी हे पाप जोडले की पुण्य जोडले सांग बघू. माझी प्राप्ती न होता स्वर्ग मिळाला तर तो अज्ञानी माणसाच्या दृष्टिने पुण्यमार्ग खरा पण ज्ञानी पुरुष त्याच लाभाला विघ्न व हानी समजतात. नरकाचा विचार केला तरच स्वर्गात सुख आहे असे मानता येते.

कारण तिथे अमरत्व हे सिंहासन असते. ऐरावतासारखे वाहन असते. रहायला अमरावतीसारखी राजधानी मिळते. अमृताने कोठारे भरलेली असतात. तिथे कामधेनूचे कळप फिरत असतात. देवांचे समुदाय तुमची सेवा करतात. जमिनी तर चिंतामणीच्याच केलेल्या असतात. कल्पतरूंचे बगीचे करमणुकीसाठी केलेले असतात. गाणे बजावणे प्रत्यक्ष गंधर्व करतात. तर रंभेसारख्या अप्सरा नृत्य करीत असतात. विलास करण्यासाठी उर्वशी प्रमुख असलेल्या स्त्रिया आहेत. शय्यागृहात मदन सेवा करतो. चंद्र सडे शिंपतो आणि वारा जासुदाचे काम करतो. आशीर्वाद देणारे व कल्याण इच्छिणारे जे ब्राह्मण त्यामध्ये बृहस्पती मुख्य आहे. पंक्तीला देव असतात. घोडेस्वार लोकपालांच्या बरोबरीचे असतात. उच्चैःश्रवा नावाचा घोडा ह्या. स्वारात पुढे चालतो, आणि दमतो. असे हे स्वर्गीचे भोग त्या याज्ञिकांना भुरळ घालतात आणि मग यजन करता करता स्वर्गातील दिव्य पदार्थांची याचना करतात, माझ्या प्राप्तीची इच्छा करीत नाहीत.

माझ्याकडे येणाऱ्या ज्या वाटा आहेत त्यात नरक ही वाट नव्हे हे उघड आहे. पण अर्जुना, स्वर्गही आडवाटच आहे. ह्या दोन्ही वाटा चोरांच्याच आहेत. बाहेरून पाप आणि आतून पाप अशा कृतीने जीव खासच नरकात जातो, आणि बाहेरून पुण्य पण आतून पाप अशा ह्या अभिलाषायुक्त यज्ञकर्माने जीव स्वर्गास जातो पण त्याला माझी प्राप्ती होत नाही. म्हणून तोही पापमार्गच ठरतो. ते याज्ञिक अशा प्रकारच्या पापरूप पुण्यमार्गाने त्या योग्यतेच्या जोरावर स्वर्गात येतात. इंद्रसुखासारखे भोग भोगतात. पण हे कुठवर? अर्जुना, अरे हे भोग जोवर पुण्यलेश आहे तोवरच! पुण्य संपले की तो स्वर्गवास संपलाच. ती इंद्रपणाची उटी उतरते आणि हे मूर्ख जीव पुन्हा ह्या मृत्युलोकांत उतरतात. वेश्येच्या नादाने सर्वस्व घालवावे, आणि मग तिच्या दारावर थाप मारण्याचीही पत राहू नये, तशी या दीक्षितांची लाजिरवाणी अवस्था होते. तिथेच जवळ असलेल्या मला ते मुकतात. त्यांचे ते औटघटकेचे देवपण संपते आणि मृत्युलोकाच्या यातना पुन्हा सुरू होतात. पुन्हा मातेच्या उदरात विष्ठेच्या थरात नऊ मास उकडून जन्माला येणे आणि मरणे, पुन्हा जन्माला येणे ही भ्रमंति सुरू होते.

स्वप्नात खजिना सापडावा आणि जागे झाल्यावर त्या क्षणी तो नाहीसा व्हावा, तसे या प्रकारच्या वेदज्ञांचे स्वर्गसुख पुण्याई संपल्याबरोबर नष्ट होते. वेदांचे अध्ययन झाले पण माझे स्वरूप कळले नाही तर ते अध्ययन कण टाकून कोंडा घेतल्यासारखे होते. मला जाणले नाही आणि तिन्ही वेदांनी सांगितलेले यज्ञकर्मच फक्त जाणले तर त्याचा काहीही उपयोग होत नाही. उलट ते अनर्थास कारण होते. माझे निर्दोष नित्यानंदस्वरूप त्या जीवांना कळतच नाही. कारण निष्काम भक्ति हा माझ्याकडे येण्याचा एकमेव मार्ग आहे हेच त्यांना माहित नसते. सकाम उपासनेचा मार्गच ते चालत रहातात. स्वर्गसुखाच्या आशेने जवळच असणाऱ्या माझा विसर पडून हे याज्ञिक पुण्यरूप पापच स्वर्गसुखाच्या अभिलाषेमुळे करीत असतात. अर्जुना, अरे हे ह्या याज्ञिकांचे पुण्यकर्म इतके गर्ह्य आहे की, त्या कर्मास पुण्यकर्म म्हटले तर जीभ तुटेल! नीट लक्षात ठेव.

ही झाली याज्ञिकांची स्थिती! आणखी काही संप्रदाय सर्वत्र समान असणाऱ्या मला न समजून घेता इंद्र, अग्नि, सोम यांच्यासाठी यजन करतात. सगळे काही मीच आहे त्यामुळे या यजनाचा स्वामी मीच पण ती यजन पद्धती सरळ नव्हे विषम होते. झाडाच्या फांद्या, पाने हे सर्व झाडाचेच भाग खरे पण पाणी मुळाना द्यावयास हवे. ते मूळातच घातले पाहिजे. दहा इंद्रिये आहेत ती सर्व एकाच देहाची आहेत, या दहाही इंद्रियातून सेवन केलेल्या विषयांचे ज्ञान शेवटी एकाच ठिकाणी जाते. पण म्हणून उत्तम स्वयंपाक करून कानात भरावा काय? फुले सुवासिक म्हणून आणून डोळ्यांना बांधावी काय? रस मुखानेच घ्यावा, वास नाकानेच घ्यावा, त्याप्रमाणे माझ्या स्वरूपाचे ज्ञान करून घेऊन माझ्यासाठी यजन केले पाहिजे. अर्जुना, मला न जाणता केलेले भजन अनाठायी असल्याने व्यर्थ होते. अरे कर्माचे डोळे म्हणजे ज्ञान, ते निर्दोष असायला हवेत. आपण जे कर्म करतो ते कुणाला उद्देशून करतो हे न कळल्याने कर्म आंधळेपणाने होते. या सर्व यज्ञसामुग्रीचा भोक्ता माझ्याशिवाय कोण आहे? मी यज्ञाचा आदि आणि यजनाचा अवधि असताना माझी भक्ति न करता हे लोक मला टाळून इतर दैवतांची भक्ति करतात. गंगेचे पाणी हाती घेऊन देव आणि पितर यांच्या नावाने संकल्प करून गंगेतच सोडावे, त्याप्रमाणे हे प्राणी माझे मलाच देतात. पण वेगवेगळ्या भावनेने वेगवेगळ्या दैवतांच्या नावे देतात आणि मग ते माझ्या ठिकाणी कदापि पोचत नाहीत. ज्यांची आस्था मनात धरून ते ही कर्मे करतात त्या त्या लोकाला जातात.

मनाने, वाचेने, इंद्रियांनी ज्यांची भजने इंद्रादि देवांच्या उद्देशाने असतात ते देवलोकाला जातात. श्राद्धपक्षादि व्रते जिवाभावाने जे आचरत असतात ते आयुष्य संपल्यावर पितृलोकास जातात. जारण, मारण, उच्चारण इत्यादि तामसी उपासना ज्यांनी केली असेल आणि ज्यांना शूद्रदेवतेच परमप्रिय वाटतात त्यांच्या जीवनाचा पडदा पडला की देहाचे बंधन गळले की, त्यांना भूतत्वाची प्राप्ती होते. संकल्प जसा असेल तसतशी फळे कर्मानुसार प्राप्त होत असतात.

आता तुला योग्याची रीत सांगतो. अर्जुना हे योगी पाच प्राण व मन यांना वाटाडे करतात. बाहेर यमनियमाचे कुंपण घालतात. वज्रासनाचा कोट बांधतात आणि त्यावर प्राणायामाच्या जिवंत तोफा चढवतात. कुंडलिनीच्या प्रकाशाने मन आणि प्राण यांच्या सहाय्याने सहस्रार चक्रामध्ये असलेले सतराव्या जीवनकळेचे तळे हस्तगत करतात. प्रत्याहाराचा पराक्रम इतका परिणामकारक होतो की विकार मुके होतात. कारण इंद्रियांच्या मुसक्या बांधून योग्याने त्यांना ताब्यात घेतलेले असते. धारणेच्या घोडदळाच्या सहाय्याने पंचमहाभूते एकत्र आणून मन, बुद्धि, चित्त, अहंकार हे संकल्पाचे चतुरंग सैन्य तो योगी ठार करतो. "जय झाला

रे. जय झाला" असे सांगणारी ध्यानाची नौबत बाजू लागते आणि तन्मयतेचे छत्र डोक्यावर झळकू लागते. समाधीरूपी लक्ष्मीचे जे आत्मानुभवरूपी राज्यसुख त्या सिंहासनावर मग योग्याला पूर्णाभिषेक होतो.

अर्जुना, तो हा आष्टांग योगाचा मार्ग कठिण मात्र आहे. काही धीर गंभीर शूर महात्मेही ही कष्टमय वाटचाल करीत माझ्यापर्यंत येऊन पोहचतात. पण अर्जुना, तुझ्या ध्यानात आले ना की या मार्गात बाह्य सामुग्री काही नाही. यज्ञाला किती साहित्य जमवावे लागते. यज्ञकर्त्याच्या मदतीस कितीजण तत्पर असतात काही विघ्न आलेच तर संरक्षणाची योजनाही असते. मुख्यतः यशाचे फल काय, हे यज्ञकर्त्यास माहित असते. फल समोर साध्य ठेवूनच यज्ञाचा संकल्प केला जातो. मग ते फल स्वर्ग कामेच्छेसारखे क्षुद्र का असेना!

पण अर्जुना, हा एकाकी योगी जेव्हा यमनियम ही पहिली पायरी चढतो तेव्हापासूनच त्याची स्वतःशी लढाई सुरू होते. मित्र कुणीच नाहीत. शत्रू मात्र पावलोपावली आहेतच! सामरस्य म्हणजे काय याची त्याला ती अवस्था प्राप्त होईपर्यंत कल्पना नसतेच त्यामुळे हा खडतर प्रवास तो स्वतःच्या हिंमतीवर करत रहातो. अखेरपर्यंत शत्रूशी झुंजत रहातो आणि जय मिळवतो पण तो जय त्याला अपार कष्ट भोगून मिळवावा लागतो.

आता माझ्या भक्तिची आणखी एक तऱ्हा ऐक. केवळ एका नम्रतेच्या जोरावर ते भक्त माझी प्राप्ती करून घेतात. माझ्याशी एकरूप होतात.

डेहराडूनमध्ये लाला बलदेवसिंह नावाचे एक जमीनदार रहात असत. प्राणिमात्रावर प्रेमाचा वर्षाव करवा, नम्रतेने असावे व विरोधकावर तर विशेष माया करावी असे त्यांचे वर्तन असे.

एकदा त्यांना एक निनावी पत्र आले की, "आम्ही अमुक तारखेस आपल्या घरावर दरोडा घालणार आहो." त्यांना इतका आनंद झाला की, विचारू नका. मेवा मिठाई आणून ते तयार राहिले. त्याच्या पुतण्यासही तशीच चिठ्ठी  आली होती. तो घाबरून गेला आणि डी. एस. पी. वगैरे अधिकाऱ्यांना त्याने वर्दी देऊन ठेवली. बलदेवसिंग म्हणाले, "अरे असे भ्यावे कशासाठी? भगवान कोणत्या रूपाने आपल्या घरी येतो हे कळत नाही. येऊ देत. आपण त्या दरोडेखोरांचे स्वागत करू. त्यांना ज्या वस्तूंची कमतरता असेल त्या वस्तू ते घेऊन जातील आणि आनंदित होतील. शेवटी डाकू आलेच नाहीत. आप्तेष्टांनी मेवामिठाईचा समाचार घेतला.

पण ह्या नम्रतेचा कुणाला कधी विसर पडला नाही व तो पडू नये अशी एक घटना पुढे घडली. पुतण्याचे व रयतेचे काही भांडण झाले. रयतेने फौजदारी खटला दाखल केला. पुतण्या अनिरुद्धकुमारने बदलेवसिंहाचा सल्ला विचारला. ते म्हणाले, "हे बघ, तू ज्यांना रयत समजतोस आणि ज्यांचा तू अपमान केलास ते प्रत्यक्ष भगवंताचे रूप आहे. तुला माफी मागितली पाहिजे."

बलदेवसिंग कोर्टात गेले. त्यांना पाहताच कोर्टाने त्यांना सन्मानपूर्वक बसवले. दोन्ही पक्षाच्या वकिलांना बोलावून, बलदेवसिंग म्हणाले, "आपण व्यर्थ इतका त्रास सोसला. अनिरुद्धकुमारने वसुलासाठी रयतेला त्रास दिला आहे. रयत मामुली नव्हे, भगवंतरूप आहे अनिरुद्धकुमारने हात जोडून नम्रतेने रयतेची माफी मागितली पाहिजे." आणि मग अनिरुद्धकुमारने रयतेसमोर हात जोडल्याबरोबर ते लोक विरघळून गेले

अनुक्रमणिका

आणि त्यांनी चुलता-पुतण्याचे पाय धरले. कब्जा काढून घेतला गेला. असे नम्र लाला बलदेवसिंग!

देव सांगत आहेत, “ब्रह्मदेवापासून घुंघुरट्यापर्यंत हे सर्व जग माझा अविष्कार आहे हे ते जाणतात. लहान, मोठे, सजीव, निर्जिव असे न म्हणता समोर दिसणारी वस्तू मी भगवंत आहे असे समजून सरळ लोटांगण घालतात. आडव्या उभ्या विणकरीत वस्त्रामध्ये जसा तंतूच असतो त्याप्रमाणे ह्या जगात ओतप्रोत मीच भरलो आहे असे म्हणतात. माझ्यावाचून जगात दुसरी वस्तूच नाही असा त्यांचा दृढ भाव असतो. आपण उत्तम आहोत. समोरची वस्तू अयोग्य आहे असा विचारदेखील त्यांच्या मनात येत नाही. समोर आलेल्या प्राणिमात्रास नमस्कार करणे, त्याच्यापुढे नम्र होणे हेच त्यांना आवडते. उंचावर पडलेले पाणी जसे सहज सखल जागी वहात येते त्याप्रमाणे जीव पाहिला की नम्र व्हावे, अभिवादन करावे हाच त्यांचा स्वभाव असतो. झाडाला खूप फळे लागली की त्या भाराने लवून फांदी जमिनीला टेकते तसे ते अशेष जीवमात्रासमोर लवतात, अखंड गर्वहीनतेने वागतात. विनय हीच त्यांची संपत्ति असते. ही संपत्ति माझा जयजयकार करीत ते माझ्या ठिकाणीच अर्पण करतात, नमस्कार करता करता त्यांच्या मनातून मान आणि अपमान ह्या कल्पना गळून पडतात आणि ते अवचित माझ्या स्वरूपात मिसळून जातात. अशी ही माझी निरंतर उपासना काही निगर्वी भक्त करतात.

अर्जुना, भक्तिची एक श्रेष्ठ अवस्था तुला सांगितली. आता तुला ज्ञानयज्ञाने जे माझी भक्ती करतात त्यांची रीती सांगावी म्हणतो. पण हाविषय तुला माहितच आहे. तू तो आधीच जाणतोस.”

तेव्हा अर्जुन म्हणाला, “देवा, ते खरे आहे. मी तो विषय आपल्याकडून ऐकलेला आहे पण देवाच्या प्रसादाचे हे देणे आहे. अमृताचे वाढप किती झाले तरी “आता पुरे” असे कोण म्हणेल? सांगा तो विषय मला पुन्हा देवा.”

अर्जुनाचे हे प्रेमाचे सलगीचे बोलणे देवांना फारच आवडले. त्यांच्या मनाला अतिशय संतोष झाला. मान डोलावून ते म्हणाले, “शाब्बास रे, असा असावा श्रोता. खरे पाहिले तर युद्ध प्रसंग ही काय उपदेश करण्यास योग्य वेळ आहे? पण तुझी ही आस्था पाहिली की बोलतच रहावेसे वाटते.”

अर्जुन म्हणाला, ‘देवा हे काय बोलणे? चंद्राचा स्वभाव असा की जगाला शांत करावे. चकोर पक्षी समोर असो, नसो चंद्र उगवतोच आणि जगाला आनंद देतोच. चातक पक्षी केवढा, त्याची तहान ती केवढी पण तो त्या तहानेसाठी चातक आपली लहानशी चोच मेघाकडेच करतो. तो उदार मेघ त्याची तृष्णा तर भागवतोच पण जगाला तृप्त करतो. देवा आपण कृपेचा समुद्र अहा. आपल्या दानास काही मर्यादा नाही. मेघ उदारपणाने वृष्टि करतात. चातकाची तहान भागतेच पण त्या वर्षावाने जगाला जीवदान मिळते. तसेच आपण माझ्यासाठी सांगता आणि जगावर उपकार होतो. चुळकाभर पाण्याची इच्छा असली तरी जावे लागते गंगाकिनारीच! आमची आर्ती थोडी असो की जास्त असो त्या आर्तीची तृप्ती व्हावी अशी जागा एकमेव आपणच आहा.”

देव म्हणाले “राहू दे रे पार्था, ते तू ऐकतोस याचाच इतका संतोष झाला आहे की तुझ्याकडून वर स्तुती ऐकावी अशी सहनशक्ती राहिली नाही! तू लक्षपूर्वक आस्थेने ऐकतोस हाच माझ्या वक्तृत्वाला पाहुणेर आहे.” देवानी अर्जुनाला अशी शाबासकी दिली आणि ज्ञानयज्ञाचे रूपक मांडण्यास सुरवात केली. ते म्हणाले “पार्था,

अनुक्रमणिका

ह्या ज्ञानयज्ञाचे स्वरूप असे आहे की परमात्म्याच्या ठिकाणी मी एकटा आहे पुष्कळ रूपाने प्रगट होतो." "एकोऽहं बहुस्यां" हा जो आदिसंकल्प झाला हाच यज्ञीय पशु बांधण्याचा खांब आहे, महाभूते हा मंडप आहे, आणि द्वैत हा पशु आहे, पाच महाभूतांचे जे गुण विशेष शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध हे इंद्रिये आणि प्राण ही यज्ञाची सामुग्री आहे, अज्ञान हे तूप आहे, सुख-दुःखाची समता मानण्याची जी वृत्ति ती शुध्द अशी यज्ञवेदी आहे. त्यावर मनबुद्धिचे कुंड करून ज्ञानग्नि प्रज्वलित केलेला आहे. आत्मानात्म विचार करण्याची बुद्धिची कुशलता हीच मंत्राची शोभा आहे. शांती ही स्रुकस्त्रुवा नावाची यज्ञपात्रे आहेत. जीव या यज्ञामध्ये यज्वा म्हणजे यज्ञ करणारा आहे. यज्ञकर्ता हा जीव स्वरूपानुभवाची प्रतीती घेतो. त्या पात्राने ब्रह्मविचाररूप महामंत्राने ज्ञानाच्या ह्या अग्निहोत्रामध्ये जीव व ईश्वर हा भेद आहुती देऊन नाहीसा करतो. अज्ञान हे तूप संपते. यज्ञकर्ता व यज्ञकर्म संपते आणि जीव ब्रह्माशी एकरूप होऊन अवभृतस्नान करून तृप्त होतो. आता प्राणिमात्र, विषय, इंद्रिये, ह्यातील वेगळेपण तो मानतच नाही, त्याच्या ते प्रत्ययालाच येत नाही. आत्मबुद्धिमुळे ह्या सर्वांचा एकजिनसीपणा त्याला कळून चुकतो. अर्जुना, एखाद्या निद्रिताला स्वप्नात प्रचंड सेना दिसावी आणि झोपेतून उठल्यावर त्याने म्हणावे की. "कुठली सेना आणि काय? झोपेच्या भरात मीच सेना झालो होतो. आता सेना नाही आणि काही नाही. मीच एकटा काय तो आहे" तसे घडते. जगाचे वेगळेपण त्याच्या लेखी उरतच नाही. विश्वाच्या एकत्वाची त्याला साक्षात अनुभूति येते. मग जीव ही भाषा संपते. आब्रह्म परमात्माच आहे ह्या बोधाने तो भरून जातो. ज्ञानयज्ञाने उपासना करणारे अशा प्रकारे माझ्यापर्यंत येऊन पोचतात. या ज्ञानयज्ञद्वारा माझ्याशी पूर्ण ऐक्य पावतात. अर्जुना, अशा प्रकारच्या माझ्या भक्तांचे वर्णन करीत असताना वाणीला विश्रान्ती मिळते. ती साधुकथा तुला सांगतो. माझ्या जिव्हाळ्याच्या भक्तांची पहिली खूण असते वैराग्य! त्यांच्या त्या वासना व संकल्परहिंत मनामध्ये मी क्षेत्रसंन्यासी होऊन रहातो. त्यांचे मन सोडून मी कुठेच जात नाही. अरे जागेपणी वैराग्य त्यांची सेवा करते यात आश्चर्य काही नाही पण ते झोपले तरी वैराग्य जागे राहून त्यांची उपासना करते.

श्रीरामकृष्ण परमहंसाची गोष्ट ते स्वतःच सांगत असत. ते म्हणत, "काही दिवसापूर्वी महेंद्र इथे आला होता. परत जाताना त्याने रामलालजवळ पाच रुपये दिले. मला काहीच माहित नाही. तो गेल्यावर रामलालने सांगितले, मी म्हणालो, "हे पैसे तो कोणासाठी देऊन गेला?" रामलाल म्हणाला, "आपल्यासाठी, प्रथम मला बरे वाटले." "मनाशी म्हटले बरे झाले. दुधाचे पैसे द्यावयाचे आहेत तेवढे तरी देऊन टाकू." पण काय? रात्री जरा कुठे डोळ्याला डोळा लागतो तोच धडपडून उठलो. छातीवर जणु काय एखादे मांजरच ओरबडत आहे असे होत होते. तसाच रामलालकडे गेलो आणि त्याला विचारले, "अरे ते पैसे तुझ्या चुलतीसाठी (श्रीरामकृष्णांच्या पत्नी) तर नाही दिले?" तो म्हणाला "नाही" तेव्हा त्याला म्हणालो, "तू आताच्या आता ते पैसे त्याला परत नेऊन दे बघू." पैसे त्याने परत दिले तेव्हा वाचलो.

अशा प्रसंगामुळे वैराग्याची वृत्ति ठाकुरांच्या इतकी रोमरोमांत मुरली होती की एकदा ते कलकत्त्यास गेले असताना भक्ताने थोडी मिठाई बरोबर घेऊन जाण्याचा खूप आग्रह चालवला. ठाकूर गयावया करीत म्हणाले, "बाबूजी, माझ्यावर दया करा. तुम्ही हे काहीही माझ्याबरोबर देऊ नका. यात मला दोष आहे. मी आपल्याबरोबर एखादा जिन्नस संचय करून कसा नेऊ? तुम्ही त्याबद्दल काही वाईट वाटून घेऊ नका."

त्यांच्या अंगावरील वस्त्राला कुठे एखाद्या टोकाला एखादी लहानशी गाठ मारावयाची सोय नसे. कारण

गाठ मारली की संचयाची कल्पना आलीच. त्यातून चुकून कुठे गाठ मारलीच तर त्यांचा श्वास गुदमरून जाई आणि हातपाय वाकडे तिकडे होऊन जात. असे हे धगधगीत वैराग्य, देव अशा वैराग्यशील भक्तांची कथा सांगत आहेत. देव पुढे म्हणाले, “अर्जुना, त्यांच्या आस्थेच्या सद्भावात धर्माचे राज्य असते. विवेकाला त्याच्या मनात ओलावा सापडतो. त्यात त्या विवेकाची उत्तम वाढ होते. त्यांनी ज्ञानगंगेमध्ये स्नान केलेले असते. त्या भक्तांच्या मनात जो काही उरला सुरला मळ असेल तोही त्या गंगेने क्षालून टाकलेला असतो. पूर्णतेचे भोजन करून ते तृप्त झालेले असतात. शांतिरूपी वेलीला कोवळी पानेच फुटली आहेत असे त्यांच्याकडे पाहून वाटते. पूर्णावस्थेला फुटलेला अंकुर, धैर्यमंडपाचे खांब, आनंदसमुद्रातून तुडुंब भरून काढलेले कुंभ असेच त्यांना नाव द्यावेसे वाटते. पूर्णावस्था, धैर्य आणि आनंद त्यांना कधी विसंबतच नाही. त्यांना भक्तितून एवढी मोठी प्राप्ती झालेली असते की ते मोक्षाला, “पलीकडे सरका, भक्तिला जरा अडचण होते आहे तुमची” असे म्हणतात. अर्जुना, काय सांगू त्यांच्या सहज कर्मात नीती जगलेली दिसते. त्यांची इंद्रिये म्हणजे तर त्यांनी शांतीचे अलंकार धारण केले आहेत असे दिसते. आणि मनाकडे पाहिले तर त्यांच्या चित्ताने मला गवसणी घातली आहे असे आढळून येते. त्या महानुभवनांनी माझे स्वरूप पूर्णतया जाणलेले असते. दैवी प्रकृतिचे दैवच त्यांच्या रूपाने प्रकट झालेले असते. ते सर्व ठिकाणी मला एकाला पहातात आणि असा व्यापक अनुभव मनात भरून घेऊन माझ्याशी एकरूप होऊन माझी सेवा करतात. आता ती सेवा कशी आहे म्हणून सांगू! अर्जुना, अरे तो एक अदभुतच प्रकार आहे.

काय नवल आहे पहा, ते महात्मे चढत्या वाढत्या प्रेमाने माझी भक्ति करतात पण देव आणि भक्त हे द्वैत त्यांच्या मनातच येत नाहीत. माझ्यापासून ते स्वतःला वेगळे मानीतच नाहीत. हे कसे घडत असेल कदाचित तुझ्या मनात येईल. पण पार्था, भक्तिच्या अमर्याद वेगवान प्रवाहात देव आणि भक्त हे द्वैत कधी आणि कसे वाहून गेले आणि एकसंधी परब्रह्मच फक्त कसे उरले याचे भान त्या माझ्या परमप्रिय भक्तांनाही उरत नाही आणि मलाही उरत नाही रे! मी स्वतःला भक्त समजतो आणि भक्त स्वतःला देव समजतात. आणि ह्या ऐक्यात अलंकार सोन्यात मिसळतो, मीठ समुद्रात विरघळते, लाट पाण्याशी विरून जाते असे हे वैभव!

तुझ्या मनात सहजच असे येईल की, या भाग्यवंतांनी ही अवस्था कशी प्राप्त करून घेतली? तुला साद्यंत सांगतो.

प्रथम त्यांनी नामसंकीर्तन करण्यास सुरुवात केली. ह्या नामस्मरणाचे असे सामर्थ्य आहे की, त्यांचा सर्व मल तर क्षालन होऊन जातोच पण जगाचे पापही धुतले जाते आणि पापक्षालनाच्या प्रायश्चित्तास काही कामच उरत नाही. पापच घडत नाही तर प्रायश्चित्त कशाचे घ्यावयाचे? अशी अवस्था होते.”

श्रीरामकृष्ण परमहंस म्हणत, “कलियुगात नामस्मरणासारखे सोपे साधन नाही. त्या साधनाने मनुष्याचे मन आणि शरीर शुद्ध होते.” मात्र नुसता उपदेश करून ते थांबत नसत. स्वतः नामस्मरण करून ते कसे करावे हे दाखवून देत. पहाटे उठून भाववशात श्रीचैतन्यदेव, बुद्धदेव, येशू ख्रिस्त यांच्या तसबिरीजवळ जाऊन अत्यंत तन्मयतेने नाचत नाचत टाळ्या वाजवत. आपल्या मधुर आवाजात नामस्मरण करीत. सायंकाळी तसेच, ते कलकत्त्यास भक्ताच्या घरी असोत की, दक्षिणेश्वरी आपल्या खोलीत असोत, सायंकाळ झाली की, ते नामस्मरण करू लागत. त्यांच्या ह्या नामस्मरणाचे वा प्रार्थनेचे एकच स्वरूप ठरलेले नसे. ज्यावेळी जो भाव

इतका उत्कट असेल त्या भावाची प्रार्थना होईल. त्या प्रार्थनेत भाव इतका उत्कट असे की, ऐकणाऱ्याच्या मनावर त्याचा कायम ठसा उमटत असे. एकदा टाळ्या वाजवीत अत्यंत मधुर स्वराने म्हणत होते, "हरि बोल, हरि बोल, हरि हरि बोल." मग थोड्या वेळाने, "राम, राम, राम. राम," असे नामस्मरण झाले. मग करूणरवाने प्रार्थना करू लागले, "रामा मी भजनहीन, साधनहीन! रामा, कृपा कर. मला देहसुख नको, लोकमान्यता नको, अष्टसिद्धि नकोत, केवळ तुझ्या पादपद्मी शुद्ध भक्ति दे. तुझ्या भुवनमोहिनी मायेने मला गरफटून टाकू नको. रामा, मी तुला शरण आलो आहे. कृपा कर." अशी ही उत्कंट करुणसुंदर प्रार्थना ऐकून ऐकणाऱ्याच्या डोळयांस धारा लागल्या. देव अशा प्रकारच्या नामस्मरणाबद्दल सांगत आहेत.

ते म्हणाले, "पार्था, या नामस्मरणाच्या प्रभावाने यमदमांना अवकळा येते. तीर्थे जागेवरून उठतात. यमलोकातील येरझार संपते. दोष नाही, पाप नाही मग त्या यमलोकाला शासनाचे कामच उरत नाही. मन आत्मरूप झालेले असते मग त्याचा निग्रह कसा करावा म्हणून यमाचे काम उरत नाही आणि इंद्रिये मनाबरोबर भगवन्नामात तल्लीन झाल्यामुळे त्यांचे दमन करण्याची आवश्यकता संपते.

**यम म्हणू लागतो काय यमावे**?
**दम म्हणू लागतो काय दमावे**?

इथे तर जागेवर कुणीच नाही. मनही नाही आणि इंद्रियेही नाहीत. तीर्थे बिचारी उपाशी राहतात. दोष खाऊन त्यांचा निर्वाह चालावयाचा पण आता दोषच उरत नाहीत."

अर्जुना, अशारीतीने ते माझे भक्त माझे नामस्मरण करीत साऱ्या विश्वाची दुःखे नाहीशी करतात. इतकेच नव्हे तर सगळे जग महासुखाने भरून टाकतात. जग नामघोषाने दुमदुमु लागते. सूर्याचा उजेड असो वा नसो, त्यांच्या राज्यात ज्ञानाचा प्रकाश अपरंपार भरलेला असतो. अमृत असो वा नसो, प्रपंचदुःखांनी मृतप्राय झालेल्या जीवांना ते नामामृताने जगवतात आणि योगाचे कष्ट पडू न देता मोक्ष प्रत्यक्ष डोळ्यांनी दाखवतात. राव आणि रंक हा भेद त्यांच्या मनात येतच नाही. अजाण आणि सुजाण यांच्यामध्ये निवड करून सुजाणांना जवळ करू असे ते म्हणत नाहीत. जगासाठी आनंदाचे आवार ते होतात. एखादा उपासक वैकुंठास पोचावा तर ह्या माझ्या भक्तांनी भूलोकीच वैकुंठ आणून उभे केले आहे आणि नामघोषाच्या महतीने विश्व पवित्र करून सोडले आहे. त्यांना उपमा तरी कशी द्यावी? ते सूर्यासारखे सोज्वळ खरे, पण सूर्याचा अस्त होतो. हा दोष त्यांच्यामध्ये नाही. चंद्राची उपमा द्यावी तर तो फक्त पौर्णिमेस पूर्णावस्थेत असतो, हे तर निरंतर पूर्णच आहेत. मेघांची द्यावी तर ते उदार खरे पण वृष्टि झाल्यावर ओसरतात, सदाच औदार्याने युक्त असतात. त्यांची उदारता कधी ओसरत नाही. पात्रापात्रतेचा विचार न करता भक्ताला निःशंकपणे वरदान करणाऱ्या भोळ्या शिवशंकराप्रमाणे ते उदार असतात. एकाग्रतेने जे नाम मुखात येण्यासाठी सहस्त्र जन्यांची तपश्चर्या हवी ते माझे नाम त्यांच्या वाचेपुढे आनंदाने नाचत असते. जिभेने त्या नामाचा उच्चार करण्याचीही जरूरी नसते. अर्जुना, नामसंकीर्तन करणारे ते माझे भक्त माझे इतके लाडके असतात की मी एक वेळ वैकुंठात सापडणार नाही, भानुबिंबामध्येही दिसणार नाही, योग्यांची मनेही ओलांडून जाईन पण हे माझे लाडके जिथे माझा नामघोष करीत तल्लीन होऊन नाचत असतात, तिथे मात्र नक्की तुला सापडेन. इतर ठिकाणी हरवलेला असलो तर तू ह्या भक्तांच्या मेळाव्यात माझा शोध घे. कसे ते माझ्या गुणवर्णनात तृप्त झालेले असतात! देशकाळ कसे रे विसरून जातात.

कीर्तनसुखात रंगून जाऊन ते आत्मानंदातच कसे रमून गेलेले असतात! कृष्ण, विष्णू, हरि, गोविंद या नामाचीच गाथा गात आणि त्यातच आत्मचर्चा करीत चराचरामध्ये संचार करीत असतात.

देवांनी बोलता बोलता अर्जुनाच्या चेहऱ्यावरचा भाव निरखून पहात म्हटले. "पार्था, तुझ्याकडे पाहून मला असे वाटते की तुझा काही या माझ्या सांगण्यावर विश्वास बसत नाही. "ह्या साध्या भोळ्या भक्तांनी काय साधन केले तर नुसते नाम घेतले!

त्यांनी यज्ञयाग केले नाहीत, शास्त्र श्रवण शास्त्राभ्यास केला नाही, रानावनात जाऊन योगसाधना केली नाही मग हा एवढा आत्माज्ञानाचा लाभ त्यांना विनासायास, सुखात रंगत, बसल्या जागी कसा झाला? त्यांना स्वतःला तर एवढ्या सुखाची प्राप्ती झालीच पण त्यांनी जगाला निष्पापी केले, सुखी केले, भूमीवर वैकुंठ आणले यावर कसा काय विश्वास ठेवावयाचा असे तुला वाटते आहे ना?

पण पार्था, खर सांगतो, की त्यांना रमत गमत मोक्ष मिळतो. त्यांनी प्रपंचाला प्रपंच न म्हणता भगवंत मानले आहे. एका देहाचेच अनेक अवयव असावे तसे विश्वातले भिन्नभिन्न पदार्थ केवळ आकाराने वेगळे पण तत्त्वतः एकच आहेत. हे ज्ञान त्यांनी मनात पक्के बाणून घेतले आहे. नव्हे तो त्यांचा सहजस्वभाव झालेला असतो. पदार्थ अनादिकालापासून अनेक आहेत, भिन्न आहेत, पण त्यात एकच परब्रह्म भरून राहिलेले आहे व त्या परब्रह्म स्वरूपात कुठेही भेद छेद नाही हे ते जाणून असतात. फांद्या लहानमोठ्या असतील पण त्या एकाच वृक्षाच्या आहेत, सूर्यकिरण वेगवेगळे वाटले तरी एकाच सूर्यापासून निघतात. हे त्यांच्या सतत ध्यानात असते आणि अनेक प्रकारच्या व्यक्ति, अनेक प्रकारच्या वृत्ति, अनेक प्रकारची नामे असली तरी त्याकडे अलिप्ततेने पहात ते आपले लक्ष अभेदत्वाने माझ्याकडे लावतात. भूतामधील बाह्य भेदाकडे ते आपले चित्त जाऊ देत नाहीत.

जिथे जिथे त्यांची दृष्टि पडेल तिथे तिथे त्यांना मीच दिसतो. जे जे काही आहे आणि नाही ते माझेच स्वरूप आहे. माझ्यावाचून काही नाही असा बोध त्यांना झालेला असतो.

मालू, पाठीच्या ऑपरेशनच्या वेळी स्फुरलेली एक कविता इथे आठवते. अशा ऑपरेशनंतर रोज सहासात तरी इंजेक्शन्स दिली जातात. कधी सहा तर कधी पाच म्हणजे कमी म्हणावी. तीच नर्स इंजेक्शन्स द्यायची, जेवणखाण घेऊन यायची, प्रेमाने आग्रह करायची, शरीर साफसूफ करून पांघरूण घालायची. शरिराला क्षणात सुखाचा तर क्षणात दुःखाचा अनुभव यावयाचा. वाटायचे नर्स भगवंत, डॉक्टर भगवंत, शरिराला येणारे सुखदुःखाचे अनुभवही भगवंत असे त्या भगवंताचे दर्शन होईल का? हे सगळेच त्यांचे दर्शन आहे आणि विचार काव्यरूप घेऊन आले.

**कृपा करावी हे प्रभूराया**
**अशीच देई काया**
**लगटुनि राहिल सर्वांगाने सदैव तुझिया पाया ॥**

कान ऐकती रागरागिणी
कुजबुज कधि आक्रोश
मंजुळ बेसुर भेसुर चाले एकच जल्लोष ॥

परी त्यांतुनी मला रहावे
सावध अनुसंधान
तुझीच क्रीडा, तुझीच लीला, तुझेच हे गान ॥

रंग त्वचेला असो नसो दे
नाही त्याची खंत
परी तियेच्या ठायि असावा जागृत भगवंत ॥

कधी पश्मिनी कधी रेशमी
कधी कांबळी साधी
अनुभव यावा तव स्पर्शाचा हेच एवढे साधी ॥

असेच देई डोळे देवा
भावजलाने भरले
ज्यांच्या पुढती स्वच्छंदाने रूप तुझे खेळे ॥

उग्र असो विक्रान्त असो
वा कोमल विष्णुक्रान्त
मला दिसू दे तुझ्या कृपेने सगळे पादाक्रांत ॥

गंधाचेही देसी देवा
जरि तूं मज वरदान
तरी मागते तिथेही एका कृपाकणाचा मान ॥

सुगंध येवो किंवा
येवो भीषण दुर्गंध
मला तिथेही यावा केवळ तुझा कस्तुरी गंध ॥

षड्रस चाखे जिव्हा देवा
तिला जागती ठेवा
परस्परांचा तिने करावा कधी न परि हेवा ॥

अनुक्रमणिका

**जे जे येइल तिजसामोरी**
**सन्मानाने घ्यावे**
**प्रसाद मानुन आनंदाने तृप्त तिने व्हावे ॥**

**अशीच काया देता तरि मी**
**पदरी घेईन**
**नाही तर मग तुझ्या पदीची धूली होईन ॥**

असे वाटते की किंचित् लाभलेली ही मानसिक अवस्था त्या भक्तांना अखंड लाभत असावी आणि म्हणूनच प्रपंचदुःखाची बाधा त्यांना होत नसावी.

ज्या अंतरंग भक्तांना सर्वत्र सर्व अवस्थात भगवंताचेच दर्शन घडत असते अशा भक्तांचे देव वर्णन करीत आहेत. पुढे म्हणाले, "त्या भक्तांनी मनोमनी हे स्वरूप भरून ठेवले आहे." प्रपंचाकडे पहात ते म्हणत असतात, "हा तर बुडबुडा आहे. जिथे जातो तिथे तो पाण्यावर आहे आणि विरलात तर पाण्यात विरेल. दुसरीकडे कुठे जाणार तो? पाण्याशीच एकरूप होणार. हे धुळीचे कण वाऱ्याने आकाशात उचलून नेले आहेत, वारा आकाशात फिरवील तोवर ते फिरतील. वारा शांत झाला की खाली पडतील. पृथ्वीत मिसळतील. बुडबुड्यांचे "पाणी" हे स्वरूप आणि धुळीचे "पृथ्वी" हे स्वरूप कधी कुठल्याही अवस्थेत पालटलेच नाही. तसाच हा प्रपंच केवळ एक परब्रह्मस्वरूपच आहे मग त्याची बाह्य अवस्था काहीहि असो."

अर्जुना, त्या माझ्या भक्तांची दृष्टि अशी स्वच्छ असते. म्हणून वाटेल त्या स्थितीत वाटेल ते होवो अगर न होवो विश्व परब्रह्मरूपच आहे ह्या बोधावरून ते कधी ढळतच नाहीत. लहानमोठ्या अनुभवात मीही लहानमोठा होतो हे त्यांना कळत असते.

प्रा. दामले म्हणत होते की, "अहो खूप तहान लागली आहे. अशावेळी थंडगार पाणी मिळाले की, तहान शमून आनंद वाटतो. मग अशावेळी ते गार पाणीच भगवंतरूप आहे की." अशी ह्या भक्तांची स्थिती अनुभवाच्या अंगाने भगवद्रूप होऊन ते अनेक होऊन अनेक रुपाने वावरतात, पण आतले सूत्र अखंड असते. भानुबिंब जसे कुठल्याहि बाजूने समोर असते त्याप्रमाणे ते वैश्विक अनुभवास सरळ सामोर जातात. त्यातून पाठ फिरवीत नाहीत. त्यांचे ज्ञान सर्वंकष असते. आकाशात वायु तसे हे अभेदत्वाचे ज्ञान त्यांच्यामध्ये ओतप्रोत भरलेले असते. त्याला पाठपोट असत नाही. मी जसा जेवढा आहे तसाच त्याचा अनुभव अनंत, अमर्याद असतो. त्यांची उपासनाकृती पाहिली तर तुला असे वाटेल की, "हे काय? नुसते देवाचे नामसंकीर्तन मोठ्या आवडीने करतात. बस्स! इतकेच साधन करतात ना?" पण पार्था, त्यांच्या मनातील अनुभवाचे वजन माझ्या तोलामोलाचे असते.

सहज विचार करून पाहिले तर जगातील यच्चयावत् पदार्थ मीच असल्याने कोणीही कुठेही कशाही प्रकारे उपासना, भजन केले तरी माझ्याच उपासना, माझेच भजन होते. पण भजकाला हे ज्ञान नसल्यामुळे हे सर्व सर्वांच्याद्वारे सदोदित मला एकालाच अर्पण होत आहे याचे त्याला भान रहात नाही. त्यांनी मागितलेले

अल्पस्वल्प फळ त्यांना मिळते. पण माझ्या प्राप्तीची इच्छाच केलेली नाही म्हणून मी मिळत नाही. पण हे जे माझे ज्ञानी भक्त आहेत त्यांनी बाह्य साधन साधेबाधे केलेले असले तरी अंतर्यामी ते केवळ माझे प्रेम ठेवून असतात. म्हणून मी त्यांच्या सहज स्वाधीन होत असतो. हेच माझे राजगुह्य!

अगदी स्पष्ट शब्दात सांगतो पार्था, अरे ह्या जाणिवेचा उदय झाला की कळते की मूळात वेद मीच आहे. ते वेद ज्या यज्ञकर्माचा उपदेश करतात तोही मीच आहे. वेदांनी सांगितलेल्या कर्मापासून जो सांगोपांग यज्ञ प्रगट होतो तोही मीच आहे. देवांना द्यावयाच्या आहुतीचे अन्न आणि पितरांना द्यावयाच्या आहुतीचे अन्न मीच आहे. सोमादि विविध औषधी, तूप, समिधा, चरू हे सगळे मीच आहे. ह्या आहुती देताना म्हणावयाचे मंत्र मीच आहे यज्ञकर्ता मीच, जिथे आहुती द्यावयाच्या तो अग्नि मीच आहे. हवनद्रव्य मीच आहे.

अरे, ज्याच्या अंगसंगाने या अष्टधा प्रकृतिपासून जगाचा जन्म होतो तो जगाचा पिता मीच आहे. अर्धनारीनटेश्वरामध्ये जो पुरुष तोच जसा स्त्री असतो तसा प्रकृतिरूपाने ह्या जगाची माता मीच आहे. उत्पन्न झालेले जग जेथे रहाते व ज्याच्या योगाने जगाचे आयुष्य वाढते तो माझ्यावाचून अन्य कोणी नाही. प्रकृति व पुरुष ही दोन्ही ज्याच्या मनरहित असलेल्या मूळ संकल्पात उत्पन्न झाली तो त्रैलोक्याचा राजाही मीच आहे. सर्व ज्ञानरूपी वाटा ज्या गावालाच शेवटी येऊन पोचतात तो मीच आहे. वेदांच्या चव्हाट्यावर समजून घेण्याची गोष्ट मीच आहे. सर्व शास्त्रे प्रथम एकमेकांशी वाद घालत असतात. अनेक प्रकारची ज्ञाने आपआपला दृष्टीकोन समजावून सांगत असतात पण ही सगळीजणे अशा एका ठिकाणी येऊन पोचतात की त्यांचे तंटे संपतात, नाना मतांची एकवाक्यता होते आणि ज्या पवित्र स्थानाबद्दल आपण तर्कवितर्क करीत होतो तो परमात्मा तर एकाच स्वरूपात सर्वांना सारखाच अनुभवास येतो आहे असे कळते.

अर्जुना, आता ध्यानी आले ना माझ्या भोळ्या भक्तांनी कृष्ण, विष्णू, हरि गोविंद, राम देवी या नामांचा घोष करताना कधी भेदभाव मनात आणलाच नव्हता? सगळीच नामे प्रिय, सगळीच त्या एका परमात्म्याची हाच भाव त्यांच्या चित्तात होता. तंटेबखेडे होते ते नाना शास्त्रे आणि नाना मते यांच्यामध्ये होते. पण हे भेदभावसुद्धा अर्जुना, एका अत्युच्च अनुभवाच्या क्षणी नाहीसे होतात. ज्या वेदवाक्याबद्दल, यज्ञक्रियेबद्दल तंटे, नाना मते होती ते तीन वेद ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद हे ॐकाराच्या अ-उ-म् ह्या तीन मात्रापासून झाले आणि तो आद्य ध्वनि तर भगवंतस्वरूपच आहे. ब्रह्मरूपी बीजाला अंकुर फुटला तो ॐकार आणि त्यापासून परा, पश्यंती, मध्यमा, वैखरी या चार वाचातून तो ध्वनि प्रगट झाला आणि त्यातून वेदांचा जन्म झाला, म्हणजे वेदाची संपूर्ण परंपरा मीच आहे ना?

पार्था, तुला मी सांगितलेच की प्रकृति जग निर्माण करते, शिणली की जग पुन्हा आपल्या पोटात सामावून घेऊन विश्रांती घेते. ती जिथे विश्रांती घेते ते स्थान मी आहे, ती परमगती मी आहे. माझ्या योगाने प्रकृति जगते, मी अंगीकार केला की जगाला जन्म देते. ती स्वतः त्रिगुणात्मक आहे. ती जेव्हा ह्या गुणाचा आविष्कार करते आणि गुणाचा भोग घेते तो भोगही शेवटी येतो माझ्याच ठिकाणी.

अर्जुना, मी विश्वलक्ष्मीचा स्वामी आहे. मी त्रैलोक्याचा मालक आहे, कसा तो तुला समजावून सांगतो. तू म्हणशील एकीकडे जग प्रकृतीने केले असे मी म्हणतो, माझ्याशी त्याचा काही संबंध नाही असे म्हणतो आणि

अनुक्रमणिका

दुसरीकडे मालक आहे म्हणतो आधारभूत आहे म्हणतो. तेव्हा याचा मेळ कसा घालावा?

त्याचे असे आहे की प्रकीत वस्तू निर्माण करते पण आतून आणि बाहेरून त्या वस्तूवर सत्ता माझी चालते. कशी ते सांगतो. हे बघ, आकाशाने सगळीकडे रहावे, वाऱ्याने क्षणभर एका जागी गप्प बसू नये, अग्निने दाह करावा, पाण्याने वर्षाव करावा, पर्वतांनी बैठक सोडू नये, समुद्राने मर्यादा ओलांडू नये, पृथ्वीने भूतांचा भार वहावा, ही त्या भूतमात्रांना माझी आज्ञा आहे. मी बोलवतो म्हणून वेद बोलतो, मी चालवतो म्हणून सूर्य चालतो, मी हालवतो म्हणून प्राण हालतो, जगाचे चलनवलन करतो. मी नियम घालून दिल्याप्रमाणे काळ प्राण्यांना ग्रासतो. ही सर्व मंडळी माझ्या आज्ञेप्रमाणे वागतात. असा मी ह्या जगाचा समर्थ नाथ आहे. फक्त ते स्वामित्व वस्तूंत मिसळून नव्हे तर आकाश मिसळूनही अलिप्त असते. त्याप्रमाणे उदासीन, केवळ साक्षीभूत आहे.

या नामरूपाच्या मागे जो ओलावा तो मीच. पाण्यावर लाटा आणि लाटेत पाणी त्याप्रमाणे हे सगळे वसवणारा मीच आणि आत रहाणारा मीच. गुणाप्रमाणे अनेकरूपाने नटणारा मीच आणि त्या गुणाप्रमाणे वागणारा, जगणारा मीच!

पार्था, समुद्र किंवा डबके असा फरक न करता सूर्य जसा सगळीकडे त्या त्या वस्तूच्या आकारमानाप्रमाणे प्रतिबिंबित होतो. त्याप्रमाणे ब्रह्मदेवापासून गवताच्या काडीपर्यंत मी सर्वांचा सारखाच सुहृद आहे, या त्रिभुवनाचे मीच जीवन आहे, ओलावा आहे, सृष्टिक्षय प्रभवाला मीच मूळ आहे. अरे, पहा बीजातून वृक्ष निर्माण होतो, वृक्षाला फळ येते, त्या फळामध्ये बीजरूपाने पुन्हा वृक्षपण सामावते त्याचप्रमाणे जग आदिसंकल्पातून जन्माला येते आणि प्रलयकाली त्या आदिसंकल्पात विलीन होते.

जगाचे बीज असलेला हा आदिसंकल्प दुसरे तिसरे काही नाही, मी आहे. हा संकल्प अव्यक्त वासनारूप असतो. कल्पान्ती हा संकल्प जिथे येऊन रहातो ती जागा मी आहे. अर्जुना, कल्पान्त झाला की, नामरूप जाते. वर्ण, व्यक्तिही नाहीशा होतात. प्राण्यांच्या जातीतील भेद नाहीसे होतात. आकाशदेखील उरत नाही. कल्पाच्या सुरवातीला आकार रचण्यासाठी संकल्प, वासना, संस्कार अमर अशा स्वरूपात माझ्याच ठिकाणी येऊन रहातात.

म्हणून तुला पुन्हा सांगतो आहे अर्जुना, की शरणागताला शरण्य असा केवळ मीच आहे. जो मला अनन्य शरण येतो त्याचे जन्ममरण मी निवारून टाकतो. तो शरणागत वासना वा संकल्परूपानेही माझ्यापासून वेगळा रहात नाही. आणि म्हणून नव्या कल्पातही इतर जग पुन्हा स्थूल आकार धारण करते. पण तो अनन्य भक्त मद्रूप झाला असल्याने ह्या भ्रमणात तो सापडत नाही. त्याची पुनरावृत्ती टळते.

अरे ज्याने अशी शरणागती दिली आहे तो सर्वभावांनी मला आपले चित्त देऊन टाकतो एकदा का त्याने आपले चित्त मला अर्पण केले की त्याला कोणतीच काळजी उरत नाही. मातेच्या उदरातील गर्भ आपल्या उदरनिर्वाहासाठी कोणता उद्योग करतो? माताच आपल्या त्या अजून न पाहिलेल्या अपत्याचे आपल्या जीवनरसाने पालनपोषण करते ना? अर्जुना, मी ह्या माझ्या भक्ताची तशीच सगळी काळजी वहातो. त्यांनी जगणे म्हणजे माझी अनन्य भक्ति करणे असे ठरविलेले असते. ते अखंड माझ्या चिंतनात, माझ्या सेवेत

असतात आणि मीही मग त्यांच्या मागेपुढे रहात त्यांना संभाळतो. ते काम ओघानेच माझ्याकडे येते.

श्रीरामकृष्ण परमहंस म्हणत, “तिकडे आमच्या गावी एक माळ आहे. जवळपासच्या गावाना जाण्यासाठी त्यावरून एक अरुंदशी पाऊलवाट आहे. एकदा एक आई आपल्या दोघा मुलांना घेऊन त्या माळावरून चालली होती. लहान मुलाला तिने कडेवर घेतले होते. मोठा मुलगा तिचा हात धरून चालला होता. वाटेत गम्मत दिसली म्हणून टाळ्या वाजविण्यासाठी त्या मोठ्या मुलाने आईचा हात सोडला आणि टाळ्या वाजविण्यापूर्वीच तो अडखळून खाली पडला. कडेवर असलेले ते लहान मूल तीच गंमत पहात टाळ्या वाजवून निर्धास्तपणे हसत होते. अनन्य शरण भक्त असाच भगवंताच्या भरवशावर निर्भयपणाने जीवन जगतो. सर्व काळजी देवाच्याच चरणी वाहून टाकतो.

देव पुढे आश्वासन देत आहेत, “पार्था, मन आणि इंद्रिये एकवटून ज्या क्षणी ते भक्त माझ्या मार्गाला लागले त्याच क्षणापासून मी त्यांचा सेवक होतो रे. पंख न फुटलेल्या पिलांना जगविण्यात पक्षिणी जगते तसा मी त्यांच्या जीवनात प्रगट होतो. त्यांनी जे जे काम करायला हवे असते ते मीच करतो. आपली तहानभूक कशी नी कुठे शमवायची ह्याची काळजी बाळाला असते काय? ते काम तर आईच जाणून, न कंटाळता, करत असते ना? जे मला जीवेभावे अनुसरले त्यांचे सगळे काम मी करतो, त्यांना कष्ट पडू देत नाही. असे काम करण्यास मला लाज वाटत नाही. त्यांचे मनोरथ जसेच्या तसे पुरविण्याची मला हौसच आहे. त्यांना सायुज्याची, एकरूपतेची आवड असली तर माझ्याशी मिळवून टाकतो. त्यांना द्वैतभाव ठेवून माझी सेवा करण्यात आनंद वाटत असला तर माझे प्रेम देतो. त्यांना माझी मनसोक्त सेवा करू देतो. जे जे त्यांच्या मनात येईल ते ते त्यांना लगेच देऊच लागतो. ते भक्तिच्या ज्या ज्या भूमिकेवर आरूढ होतील त्या त्या भूमिकेचे पूर्ण संरक्षण मीच करतो. त्यांच्या सर्व वृत्तीनी माझा आश्रय केला आहे. तेव्हा त्यांच्याजवळ नसलेले ज्ञान देणे आणि जे दिले त्यांचे संरक्षण करणे हे सगळे काम मी मोठ्या आनंदाने करतो.

पार्था, काय सांगाव मी त्यांना संभाळतो, त्यांचे मनोरथ पूर्ण करतो यात नवल काहीच नाही. त्यांनी माझी भक्ति तशाच एकनिष्ठतेने केलेली असते. त्यांच्या डोळ्यांना माझ्याशिवाय कोणी दिसतच नाही. कानांनी ते जे जे ऐकतात तेही माझेच शब्द आहेत असे त्यांनी ठरविलेले असते. मनामध्ये भाव मज एकाबद्दलच ते ठेवतात. वाचा माझीच स्तुती करते, सर्वांगाने सर्व ठिकाणी ते मला उद्देशून नमस्कार करतात. दान आणि पुण्य जे जे करावयाचे ते ते माझ्या उद्देशाने देतात व करतात. अध्ययन करतात तेही माझेच. त्यांच्या अनुभवास आत बाहेर सर्वत्र माझे अस्तित्व येत असल्याने ते सतत तृप्त असतात. ज्यांचे आयुष्य माझ्यासाठीच आहे असे ते माझे प्रिय भक्त अर्जुना, माझ्यावर एकनिष्ठ उत्कट प्रेम करतात.

एक महात्मा गुहेत रहात असत. वर्षातून एकदा ते गुहेतून बाहेर येत आणि जे कोणी रोगी आले असतील त्यांना औषधोपचार करीत असत. एका भक्तास हे कळले. तो नेमका त्या दिवशी तिथे पोचला. रोग्यांना औषधे देऊन झाल्यावर तो पुढे झाला आणि त्याने त्या महात्म्याच्या वस्त्राचा पदर धरला आणि काकुळतीने म्हणाला, “महाराज, आपण ह्या लोकांच्या शरीराचे रोग बरे केले. माझा भवरोग बरा कराना?

महात्म्यांनी घाईघाईने वस्त्राचा पदर सोडवून घेतला आणि म्हटले, “अरे, सोड सोड पदर, तो भगवंत

पहातो आहे ना? त्याचा पदर धरायचा सोडून तू दुसऱ्याचा पदर धरलेला त्याला कसा रे आवडेल?"

या महात्म्यांनी इतका देव ओतप्रोत भरून ठेवलेला आणि भवरोगाचा वैद्य ठरवून घेतलेला. असा पुण्यमार्ग ते ज्ञानी भक्त चालत असतात.

दानाबद्दल विचार करताना एक गोष्ट आठवते.

एका गावी एक मनुष्य सतत दानधर्म करीत असे. दान देताना त्याचे हात वर असत पण नजर पायाशी खिळलेली असे. त्याच्या मित्राने एक दिवस विचारले, "मित्रा दान देताना तुझी मान झुकलेली का? तू तर दान कोण घेतो आहे हे पाहतच नाहीस. नुसता समोर कोण येईल त्याला देतच रहातोस. काही माणसे दोन-दोनदा दान घेतील की?"

तो दानी नम्रतेने म्हणाला. "त्याची काळजी तो भगवंत करील. तो मालक आहे. मी कशाला चिंता करू? आणि वर पाहण्याचे म्हणशील तर लोक भगवंताला दाता न म्हणता मला दाता म्हणतात. म्हणून शरमेने माझी मान खाली झुकते. देणारा मी कोण आहे रे?"

भगवंतांनी पुण्य आणि दान माझ्या उद्देशाने खरे भक्त करतात असे म्हटले ते ह्या अर्थाने.

पूज्य श्रीधरस्वामीजी केवळ रामनामाचा लिखित जप करून शाळेतील परीक्षेत पहिले आले. मास्तरांना खरे वाटेना. ते म्हणाले, "हा कसा पहिला येईल? तो कधी नियमित शाळेला येत नाही की कधी मन लावून अभ्यास करीत नाही." परीक्षक म्हणाले, "खरेच त्याचा पहिला नंबर आला. त्याची उत्तरेच इतकी उत्तम आहेत."

अध्ययनाचा अर्थ साधा. शालेय अभ्यास असा केला तरी त्यात देवाच्या कृपेचा अनुभव येतो, तो असा.

देव म्हणतात, "त्यांनी इंद्रिये, मन, वाचा माझ्याकडे लावून दिली. अहंकार, लोभ, इच्छा यांचे देखील दैवीकरण करून टाकले. पावलोपावली अडचणीत आणणारा अहंकार त्यांनी "आम्ही हरीचे दास आहोत." हे भूषण मिरवण्यासाठी जोडून दिलेला असतो. लोभाला ते म्हणतात. "अरे. आम्ही तुला टाकत नाही. तू आता देवाकडे वळ म्हणजे झाले." मग लोभ केवळ दैवाचाच ह्या स्वरूपात त्यांच्या घरी अगदी सुखात रहातो. त्यांची कामना माझ्या प्राप्तीकडे वळलेली असते. आणि प्रेम केवळ माझेच शिल्लक ठेवलेले असते. भ्रमामध्ये देवपिसे भरून टाकून ते त्याचाही स्वीकार करतात. माझ्या नादात त्यांना जगाचे भानही उरलेले नसते. लोखंडाला परिसाचा एकादा स्पर्श झाला की त्या अशेष लोखंडाचे सोने होते. त्याप्रमाणे देह, मन, बुद्धि, अहंकार, प्रेम, इच्छा, आकांक्षा, लोभ, मोह, भ्रम ही सर्व त्यांनी मला अर्पण करून टाकल्याने उजळून निघतात. त्यांच्या जीविताचा श्वासन्श्वास आणि क्षण-नी-क्षण परब्रह्ममय होतो. अर्जुना, त्यांची शास्त्रे म्हणजे मला जाणणे आणि मंत्र म्हणजे माझी प्राप्ती करून देणारे नाम या निश्चयाने क्रिया करत करत, असे साधन अहोरात्र प्रेमाने करत करत जे जगले ते मरणापूर्वीच मद्रूप होऊन गेले आहेत. मग मरणोत्तर दुसरीकडे कुठे जातील सांग?

**अनुक्रमणिका**

उपचाराच्या मिषाने त्यांनी आपले सर्वस्वच अर्पण केलेले असते. हातचे काही न ठेवता ज्यांनी मला आत्मसमर्पण केले ते मोक्ष मिळवतात, माझ्याशी एकरूप होतात यात नवल ते काय?

पण धनुर्धरा, ह्या आत्मसमर्पणाखेरीज इतर उपचारांनी मी वश होत नाही हे ध्यानात ठेव. मला फक्त ह्या अनन्य भक्तिची आवड आहे. पुष्कळ लोक देवाचे स्वरूप मला कळले असे म्हणतात. पण अशा अहंकारी मनुष्यास काहीच कळले नाही हे निश्चित आहे. दान, ज्ञान, तप, यज्ञ यांना अशा निरहंकारी भक्तिची जोड नसेल आणि ह्या क्रिया करताना पूर्ण समर्पणभाव नसेल तर माझ्या ठिकाणी त्या सर्वांस गवताच्या काडीइतकीही किंमत नाही. अरे, माझ्याजवळ गर्व कशाचा वहायचा? पण वाट चुकलेले हे लोक तो वहातात.

तसे पाहिले तर वेदापेक्षा कोण शहाणे आहे? पण त्यांना माझे स्वरूप कळत नाही. ते म्हणतात, “नेति, नेति, “शेषाला सहस्त्रमुखे आहेत, तो बोलकाही आहे पण त्यालाही माझे संपूर्ण गुणवर्णन करता येत नाही, मग तो भिऊन लाजून माझ्या अंथरुणाखाली दडतो. सनकादिक मोठमोठे ऋषीमुनी माझ्या शोधात वेडेपिसे होऊन अरण्यात भटकतात. सर्व तापसांचा शोध घेऊन त्यात सरस निरस ठरवायचे तर शंकराएवढा तपस्वी कोण आहे? पण तोही अभिमान टाकून माझ्या पावलाचे पाणी ती गंगा आदराने मस्तकावर धारण करतो. लक्ष्मीकडे बघ. तिच्याएवढी संपन्न कोण आहे? श्रियेसारख्या दासी तिच्या घरी पाणी भरतात. दासींनी खेळता खेळता केलेली घरकुले अमरावती होते. त्यात ठेवलेल्या बाहुल्यांना इंद्रादिक देव हे नाव दिले जाते. त्या दासी कंटाळून ही भातुकली मोडून टाकतात. तेव्हा महेन्द्र रंक होतो. त्या दासी ज्या झाडाकडे दृष्टि टाकतात तो कल्पवृक्ष होतो. अर्जुना, लक्षात घे, हे तिच्या घरी राबणाऱ्या दासींचे सामर्थ्य आहे. लक्ष्मी ह्या सर्वांची स्वामिनी आहे. पण तिचे माझ्याजवळ महत्त्व चालत नाही. सर्वस्व अर्पण करून, सेवा करून अभिमान टाकून देऊन जेव्हा मला ती शरण आली तेव्हा माझे पाय धुण्याचे दैव तिला प्राप्त झाले. सहस्त्रकिरण सूर्यापुढे चंद्रही फिका पडतो. तिथे काजव्याच्या तेजाची काय बढाई आहे? तेव्हा अर्जुना, लक्षात घे की जिथे लक्ष्मीच्या संपन्नतेस किंमत मिळत नाही, जिथे शंभूचे तप पुरेसे पडत नाही तिथे ह्या सामान्य अजागळ आणि प्रौढी मिरवणाऱ्या लोकांचा काय पाड लागणार? थोरपण पलीकडे टाकून दिले पाहिजे. शास्त्राध्ययनाचा गर्व सोडला पाहिजे, ते सगळे विसरूनच गेले पाहिजे, जगात सर्वार्थाने आपल्याकडे धाकटेपण घ्यावे म्हणजेच माझी जवळीक साधते अर्जुना, एरवी नाही.

शरीर ओवाळून टाकावे, सर्व गुणांचे निंबलोण उतरावे, संपत्तीचा गर्व टाकावा आणि निस्सीम भाव ठेवून उल्हासाने मला एखादे फळ मग ते कसलेही असो द्यावे. भक्ताने असे ते फळ माझ्याकडे देण्यासाठी पुढे केले की, मी दोन्ही हात पुढे करून ते घेतो आणि देठही न काढता खातो जशी शबरीची बोरे.

भक्तिपूर्वक मला एखादे फूल द्यावे. खरे म्हणजे मी त्याचा वास घ्यावा पण घाईघाईने मी ते तोंडातच घालतो. अरे, फुलेच काय पण पान मग ते ताजे असो की सुकलेले असो, भक्ताने मनःपूर्वक मला अर्पण केले तर भक्तिभावाने ओथंबलेले ते पान भुकेजलेल्या माणसाने अमृताचा घोट उतावळेपणाने घ्यावा तसे खाऊ लागतो. कधी कधी असेही घडते की पालासुद्धा मिळत नाही. पण पाण्याची तरी अडचण नाही ना? ते तर कुठेही, पैसे न देता, कुठलीही खटपट न करता सहज मिळते. एखाद्या भक्ताने आपल्याजवळ दुसरे काही नाही म्हणून जर ओंजळभर पाण्याचे अर्घ्य मला दिले तर त्याने वैतुंठाहून विशाल अशी देवळे माझ्यासाठी

बांधली असे मी समजतो. कौस्तुभापेक्षाही निर्दोष अलंकार त्याने मला अर्पण केले असेच मला वाटते. दुधासारखी फेनधवल, शय्या व क्षीराब्धीसारखी प्रचंड शय्यागृहे त्याने मला अर्पण केली असे मी समजतो. त्याने सुंगधासाठी चंदन अगरूचा महामेरू अर्पण केला आणि दीपमाळ म्हणून सूर्यच आपल्या हाताने उजळला इतकी योग्यता त्याच्या उपचारास देतो. अरे, मला असे वाटते की गरुडासारखी वाहने, कल्पवृक्षांच्या बागा, कामधेनूंची खिल्लारे त्याने मला अर्पण केली की काय! अमृताहून गोड अशी पक्वान्ने त्याने मला अर्पण केली अशीच माझी भावना असते. काय सांगू पार्था, भक्ताने दिलेल्या ह्या पाण्याच्या ओंजळीने मला इतके संपन्न उपचार अर्पण केल्यासारखा आनंद होतो. तू स्वतः पाहिलेस ना अर्जुना, की सुदाम्याने मूठभर पोहे आपल्या उपरण्यात लपवून आणले होते, मी त्या पोह्यासाठी त्याच्याशी कशी झोंबाझोंबी केली, कसे त्याच्या उपरण्याच्या गाठी सोडून सोडून ते मिळवले आणि आनंदाने खाल्ले?

पार्था, अरे मी एक भक्ति मात्र जाणतो. सान, थोर असा हिशोब करीत नाही. आम्ही भावाचे पाहुणे कुठल्याही पंक्तीस हजर!

पत्र, पुष्प, फळ हे भक्ति दर्शविण्याचे केवळ बाह्य साधन आहे रे. माझे नाते त्या उपचारामागील भक्तीशी आहे. भक्ताने काय अर्पण केले हे पहाण्याचे मला काय कारण आहे? मी पहातो फक्त त्या भक्ताचा भाव!

मी तुला प्रथमच म्हटले ना की तुला अगदी सोपा मार्ग सांगतो. तो मार्ग हाच! मला हस्तगत करण्याची अगदी सोपी युक्ती तुला सांगतो आहे.

पुन्हा नीट ऐकून घे रे. फक्त तुझ्या मनोमंदिरात मला ठेव. बुद्धिला अनुकूल करून ठेवलेस की ते सहज शक्य होईल. माझी प्राणप्रतिष्ठा आपल्या मनोमंदिरात केलीस की मग मात्र मला विसंबू नको, क्षणमात्र विसरू नको.

आता तू विचारशील की विसंबायचे नाही म्हणजे काय करायचे? तुला तेही समजावून देतो. तू जी जी क्रिया जेव्हा जेव्हा करशील ती ती करताना माझ्याप्रीत्यर्थ करतो आहेस अशा भावाने कर. क्रिया करताना, भोग भोगताना, यज्ञात आहुती देताना, विशिष्ट योग्यता जाणून दान देताना. जप-तप साधन करताना, अरे सेवकांना वेतन देतानाही हे मी भगवंतासाठी त्याच्या आज्ञेने करतो आहे अशी तुझी भावना असू दे.

मी अमूक कर्म केले अशी कल्पना तू आपल्या मनात चुकूनही येऊ देऊ नको. कर्म अशा प्रकारे ममत्व सोडून धुवूनच माझ्या हाती देत जा.

पूज्य श्रीधरस्वामीजींच्या आयुष्यातील साधनाकालाचा दिनक्रम ध्यानी येतो. परमार्थपंथ स्वीकारून श्रीसमर्थकृपा संपादन करण्यासाठी स्वामीजी गडावर आले. आणि त्यांनी समर्थांच्या सेवेला अत्यंत नम्रतेने सुरवात केली. त्यांचे कुठलेही काम मनापासून उत्तमच करावयाचे, हलके मानायचेच नाही असा त्यांच्या मनाचा निग्रह होता.

"माझे स्वामी समर्थ इथे येतील, त्यांच्या पायाला केर लागेल" म्हणून गडावर झाडलोट करताना कस्पटही शिल्लक ठेवायचे नाही. पाणी भरताना तें समर्थांच्यासाठी आहे त्यात शेवाळ येता कामा नये, म्हणून दुहेरी फडके घेऊन पाणी गाळायचे, गुरुमाउली वस्त्र वापरणार म्हणून वस्त्रे स्वच्छ धुऊन सुरकुत्या काढून, झाडून, झटकून वाळत घालयची. पुजेला फुले काढताना त्या फुलांचा वास आपल्याला येऊन ती उच्छिष्ट होती म्हणून नाकाला फडके गुंडाळायचे अशी त्यांची सेवावृत्ति होती आणि ही सेवा करताना मनातून अखंड अनुसंधानही.

देव अर्जुनाला अशा रीतीने कर्म करण्यास शिकवीत आहेत. ते म्हणाले, "अर्जुना, कर्म कुठलेही कर, पण मी सांगतो तसे कर. अग्निकुंडामध्ये बी घातले आणि मग ते भाजलेले बी भूमीत पेरले तर जसे उगवत नाही तसे ते मला अर्पण केलेले कर्म शुभाशुभ फल देऊ शकत नाही. तुला राजगुह्य म्हणून जे मी सुरवातीस सांगितले ते हे! जन्ममरणाच्या फेऱ्यात भ्रमत रहाणे हे अशुभ आहे. कर्मफलाचा स्वीकार केला की त्या अशुभाच्या पंजात जीव सापडतो. मग ते कर्म कितीही उत्तम असो.

एकदा काय झाले की, राजा बृहदत्ताने यज्ञ करण्यास आरंभ केला. त्याचे गुरू जिवंत नव्हते पण राजाच्या कल्याणाची त्यांना चिंता होतीच. राजाचा यज्ञ पाहून ते विचार करू लागले की, राजाने शंभर यज्ञ पुरे केले की, स्वर्गास जाईल. त्याला इंद्रपद मिळेल. ह्या यज्ञांच्या पुण्याईच्या जोरावर ययेच्छ स्वर्गसुख भोगेल, पण पुण्याई संपली की, पुन्हा
मृत्युलोकात येईल आणि जन्ममरणाच्या चक्रात फिरत राहील. आत्मोन्नतीचा रस्ता त्याला कसा सापडेल?"

त्यांनी मनाशी विचार पक्का केला आणि एका ब्राह्मणकुलात जन्म घेतला. राजाने जेव्हा शंभराव्या यज्ञास सुरवात केली तेव्हा ते वामदेव नावाचे उपनीत ब्राह्मण बटू यज्ञ मंडपात आले आणि राजापुढे उभे राहिले. त्यांचे तेज पाहून राजा ताडकन उठून उभा राहिला. त्याने हात जोडून म्हटले, "महाराज आज्ञा व्हावी."

वामदेव म्हणाले. "मी याचक आहे."

राजा म्हणाल, "आपल्याला हवे ते मागा."

वामदेव म्हणाले, "मी मागितलेले तू दिले नाहीस तर काय करायचे? मी मागेन ते तू देशील असा आधी संकल्प सोड."

राजाने विचार केला. यज्ञाचा संकल्प सोडतानाच याचक मागेल ते देण्याचा संकल्प सोडलेलाच आहे. तेव्हा या बटूने काहीही मागितले तरी द्यावे लागणारच आहे. राजाने संकल्प सोडला, "आपण जे मागाल ते मी आपल्याला दिले."

वामदेव म्हणाले, “जे जे तुझे आहे ते ते मला दे. ह्या संकल्पाप्रमाणे ते माझे झाले.”

राजा सिंहासनावरून उतरून बाजूला झाला. वामदेवांनी दानाची दक्षिणा मागितली. तेव्हा राजा अंगावरचे अलंकार उतरू लागला. वामदेव म्हणाले, “राजा, ही दक्षिणा कशी चालेल? हे अलंकार तू मला आधीच दिले आहेस. दुसरे काही राहिले असेल तर ते मला दक्षिणा म्हणून द्यायला हवे.”

राजा मनाशी विचार करू लागला. यज्ञाचे पुण्यही ह्यांच्या मालकीचे झाले. आता करावे काय?

वामदेव म्हणाले, “हां, हां, विचार करावयाचा नाही. तुझ्या मनावरही माझीच मालकी आहे. मी तुला विचार करू देणार नाही.”

हा आघात सहन न होऊन राजा मूर्च्छित होऊन पडला. त्याला दिसू लागले की, आपण मरून मृत्युलोकास गेलो आहो. पुण्याई पुष्कळ म्हणून आपला तिथे सन्मान झाला. मग यमराजानी विचारले, “राजा, पुण्याई पुष्कळ आहे. पण थोडे पापही आहे. पाप आधी भोगणार का पुण्य?”

राजाने विचार केला कष्ट भोगून टाकू म्हणजे मग पुण्याईने स्वर्गसुख भोगायला मोकळीच होईल राजाने म्हटले, “मी आधी पापाचे फळ भोगतो.” त्याबरोबर राजाला वाटू लागले की, अगदी वैराण वाळवंटात आपल्याला आणून टाकले आहे. उन्हाने राजा व्याकूळ झाला. खालून तापलेल्या वाळूचे चटके बसत होते. असह्य तापाने पोळलेल्या राजा मनाशी म्हणाला, “मी वामदेवांना माझे सर्वस्व दान केले. पुण्य दान केले त्याबरोबर माझे पापही आपोआप दान झालेच की, मग ह्या यातना मला का भोगाव्या लागत आहेत?” हा विचार मनात आल्याबरोबर त्या वाळवंटाची थंडगार बाग झाली. वामदेव प्रगट झाले आणि म्हणाले, “राजा मघाशी यमाच्या दरबारात जर तू हे सांगितले असतेस तर एवढ्याही यातना तुला भोगाव्या लागल्या नसत्या. पुण्य भोगावे ही इच्छा राहिली होती म्हणून पाप भोगावे लागले. “राजाची मूर्च्छा गेली. तो भानावर येऊन पहातो तर वामदेव उभे! क्षणार्धात वामदेवरूपी आपल्या गुरुंना त्याने ओळखले आणि त्यांचे पाय धरले.

अशा प्रकारच्या अलिप्त भावाने कर्म केले, भक्ति केली, की साधकाला ना भोगावे लागते पाप, ना भोगावे लागते पुण्य! हा धडा बृहदत्त राजा अशा रीतीने शिकला आणि मुक्त झाला. देव अर्जुनाला तीच युक्ति सांगत आहेत.

ते म्हणाले, “अर्जुना, जीवाने कर्म मला अर्पण केले, त्यावेळीच त्याचे जन्ममरण संपले. जन्मच पुसून गेल्यामुळे पुढचे श्रमही संपले. पार्था, माझ्या प्राणसख्या रे, ह्या देहाच्या बंदीखान्यात पडू नकोस. सुखदुःखाच्या सागरात बुडू नकोस. माझ्याशी ऐक्य साधून घे आणि सुखात विरून जाऊन सुखरूपच हो. हे शिकण्यासाठी आता मधे वेळ घालवू नकोस. शिकून घे आणि त्याप्रमाणे वागायला सुरवात कर नाही तर आयुष्यातला काळ फुकट जाईल. अर्जुना, हा खरा संन्यास आहे. ही संन्यासाची सोपी युक्ति तुझ्या हाती दिली आहे.

सर्व कर्मे मला अर्पण कर असे मी तुला सांगतो आहे. पण अर्जुना, माझे स्वरूप तुझ्या ध्यानी आले आहे

ना? माझ्या ठिकाणी आपपर भाव नाही. मी सर्वत्र सारखा आहे. माझे हे स्वरूप जाणून अहंकाराचे ठाणे उठव, मनोभावाने कर्म कर आणि त्या कर्माचे फल मला अर्पण करून मोकळा हो.

अरे, अशा रीतीने कर्म करून जे माझी भक्ति करतात, ते वरकरणी देहामध्ये आहेत असे वाटले तरी ते देहात नसतातच. माझ्या ठिकाणी असतात. मी त्यांच्या ठिकाणी पूर्णपणाने असतो. बीजाच्या कणामध्ये विस्तारासहित संपूर्ण वटवृक्ष असतो आणि वटवृक्षात बीज असते, त्याप्रमाणे बाह्यतः ह्या भक्तांच्यामध्ये आणि माझ्यामध्ये नामाचे अंतर असले तरी त्यांचे आणि माझे अंतरंग एकच असते. विचाराने ते मला येऊन मिळालेलेच असतात. भले बाह्यतः कितीही कर्मे करोत, दागिना उसना आणावा आणि तो अंगावर घालून मिरवावा पण घालणाऱ्याच्या मनात, “हा उसना आहे, दुसऱ्याचा आहे, माझ्या मालकीचा नव्हे.” हा भाव सतत जागृत असावा त्याप्रमाणे ह्या माझ्या निष्काम कर्म करणाऱ्या भक्तांमध्ये “देह माझा नाही, देहाचा मी नाही,” हे स्मरण मनोमनी अखंड असते. उदासीन वृत्तीने ते देह धारण करतात. वाऱ्याने वास वाहून नेला आहे, फूल सुकलेच आहे, अशा स्थितीत जसे धरत न धरत फूल देठाला किंचित धरून असते, कधी गळेल हे सांगता येत नाही तसे आयुष्याच्या मुठीत त्यांनी देह सोडून दिलेला असतो. राहिला “वाहवा” गेला “वाहवा” त्यांचा देहभाव कधीच माझ्या ठिकाणी येऊन स्थिर झालेला असतो. भक्तिने, प्रेमाने, माझे भजन करीत ते भक्त देह प्रारब्धभोग आहे तोवर धारण करतात. प्रारब्धभोग संपला की, देह पडतो. त्या भक्ताला पुन्हा देहबंधन पडत नाही, तो मुक्त होतो.

तुझ्या मनात येईल की अशी भक्ति साधण्यासाठी श्रेष्ठ जातीमध्ये जन्म हवा, उत्तम आचरण हवे, तरच त्याची भक्ति सफल होईल. तर अर्जुना, तसे मनात आणू नको. माझा भक्त कोणत्याही जातीत जन्माला येऊ दे. त्याचे आचरण अगदी दुष्कृत्याचा शेलका नमुना असू दे. पण जर त्याला पश्चाताप होऊन त्याने माझी भक्ति केली तरी पुरे. मरणसमयी जी त्याची बुद्धि असेल त्याप्रमाणे त्याला पुढील गीत मिळेल. म्हणून ज्याने शेवटी शेवटी भक्तिला आयुष्य वाहिले तर तो आधी दुराचारी असला तरी सर्वोत्तम समजावा. एखादा मनुष्य बुडतो की काय असे वाटता वाटता दैवयोगाने सुखरूप पलिकडच्या काठावर पोचतो आणि त्याचे बुडालेपण वाया ठरते. त्याप्रमाणे आजवरचे त्याचे आयुष्य जरी पापकर्मात गेले असले तरी शेवटी केलेल्या भक्तिने ते सर्व पाप धुऊन जाते. मनुष्य अनुताप तीर्थात न्हावून सर्वभावाने मला शरण आला की त्याचे कुळ पवित्र समजावे. तेच अस्सल समजावे. जन्माला आल्यास त्यानेच आयुष्य सार्थकी लावले असे म्हणावे. ज्याची आस्था माझ्या ठिकाणी आहे तो सर्व कर्मांतून पार पडला असे समजावे. कारण त्याच्या मनाने आणि बुद्धिने सर्व व्यवहार पेटीत घालून ती. पेटी माझ्या स्वरूपात खोलवर पुरून टाकली आहे.

अर्जुना, असा हा एकनिष्ठ भक्त कालांतराने माझ्यासारखा होतो असे तर तुला वाटले नाही ना? असे होत नाही. एका दिव्यावर दुसरा दिवा लावावा आणि यातला पहिला कोणता हे ओळखूदेखील येऊ नये. त्याप्रमाणे सर्वस्व अर्पण करून माझी तात्काळ मत्स्वरूप होऊन राहतो. माझी स्थिती आणि त्याची स्थिती यात अंतरायच राहत नाही. माझी नित्य स्वरूपशांती हीच त्याची स्थिती होते आणि त्याचे तेज होते. हे बघ, ज्याने अमृतात प्रवेश केला त्याला मरण कसे येईल? रात्र असते, सूर्य उदयास आला नाही तोवर, महापाप घडते माझ्या भक्तिशिवाय कर्म केले तर त्याच्या चित्ताला माझी जवळीक घडली की त्याच्या हातून पाप घडतच नाही तो माझ्यासारखा होऊन जातो. माझ्या जगण्यात जगतो. पार्था, तुला पुन्हा पुन्हा किती समजावून सांगू? अरे,

माझ्या प्राप्तीची इच्छा असेल तर माझ्या भक्तिला विसंबू नको.

अर्जुना, तुलाच नव्हे तर सर्वांनाच माझा निरोप आहे की बाबानो, आमचे कुल श्रेष्ठ असा गर्व मिरवू नका. शास्त्राध्ययन करण्याची हाव बाळगू नका. अरे, वय आणि रूप यांच्यामुळे माजू नका. तारूण्याची मस्ती, रुपाचा डौल दाखवू नका. ह्या सगळ्या गोष्टी असून जर माझी भक्ति नसेल तर ते सगळे फुकट आहे. हे ध्यानात घ्या.

धान्यावाचून पिशा आलेली कणसे अगदी दाट आली आहेत, सुंदर दिसत आहेत पण त्यांचा काय उपयोग? मोठमोठे वाडे, रस्ते, बागा आहेत पण शहर ओस पडले आहे तर त्याला काय शोभा? आटलेले सरोवर, रानात एका दुःखी माणसाला भेटलेले दुसरे दुःखी मनुष्य, वांझ फुलांनी भरलेले झाड तसे हे सगळे वैभव भक्तिशिवाय व्यर्थ आहे. व्यर्थ कुळ, जात, गौरव आहे. इतका व्यर्थ आहे की सावयव शरीर आहे पण त्यात प्राण मात्र नाही!

अर्जुना, माझ्या भक्तिशिवाय जगलेले जीवन! अरे कसले ते जीवन! पृथ्वीवर पाषाण काय कमी आहेत म्हणून ह्या भक्तिहीन माणसांची त्यात भर? हिंवराच्या झाडाची सावली जशी सज्जन टाळतात, त्याप्रमाणे अशा अभक्तांना सगळी पुण्ये डावलून जातात. निंब अगदी फळाने भरून गेला, फांद्या भाराने भुईला टेकल्या तर सुकाळ होतो फक्त कावळ्यांना! तशी ही भक्तिहीन माणसे जसजशी वाढतील तसतशी दोषांना पात्र होत जातात. षड्रस पक्कान्ने करावी आणि ती खापरात वाढून चव्हाट्यावर ठेवावी, आणि मग ती पक्काने जशी कुत्र्यांना मेजवानी व्हावी तसे त्या भक्तहिनांचे जिणे असते. पुण्य करावे हे त्यांना कधी स्वप्नातही वाटत नाही. अर्जुना, त्यांचे हे जगणे म्हणजे सर्व संसारदुःखाना आग्रहाचे आमंत्रण असते.

म्हणून तुला सांगतो कुळ उत्तम नसले, नसू दे. जाती अंत्यजादी असली, असू दे. देह पशूचा असला, असू दे. पण फक्त माझी भक्ति जीवाच्या हातून होऊ दे. मगराने गजेंद्राला धरले तेव्हा त्याने काकुळतीने माझे स्मरण केले आणि याप्रमाणे तो माझ्यापर्यंत पोचला आणि त्याचे पशुत्व संपले ना? ज्या पापयोनीचे नाव देखील घेऊ नये, असे अवघ्या अधमातील अधम योनीत जे जन्माला आले. जे त्या पापयोनीला अनुरूप असे मूढ व मूर्ख आहेत. इतके मूढ की दगड बरे. पण त्यांचा माझ्या ठिकाणी मात्र दृढभाव आहे असे असेल तर अर्जुना, ते मला प्रियतम होतात.

त्यांच्या भक्तिची उत्कटता सांगू का अर्जुना? ते वाणीने माझेच संकीर्तन करतात. त्यांच्या मनात माझ्या प्राप्तीचाच संकल्प असतो. त्यांच्या दृष्टीपुढे माझेच रूप असते. त्यांचे कान माझी कीर्ति ऐकल्यावाचून मोकळे रहात नाहीत. त्यांनी आपल्या सर्वांगावर माझी सेवा ही भूषणे चढवलेली असतात. त्यांचे ज्ञान विषय जाणतच नाही. फक्त मलाच काय ते जाणते. याप्रमाणे जगावयास मिळाले तरच आपण जगलो असे त्यांना वाटते, एरवी त्यांना जगणे हे मरणच वाटते. पांडवा, जगण्याचा ओलावा म्हणजे परब्रह्म असा त्यांच्या जीवाचा कृतनिश्चय झालेला असतो. अरे, ते पापयोनीत जन्माला येईनात, शास्त्राभ्यासविहित असेनात त्यांची योग्यता माझ्याबरोबर आहे. ते माझ्याहून कणभरही वजनात कमी नाहीत हे लक्षात घे. दैत्यकुळात येऊन देवानीही लाजावे एवढी भक्ति करणाऱ्या माझ्या भक्त प्रल्हादाची योग्यता अशी की मला त्याच्यासाठी नृसिंहावताराचे लेणे अंगावर

चढवावे लागले. आणि मग माझ्याऐवजी प्रल्हादाची भक्ति करणाऱ्यांना मी द्यावे ते ते सगळे तो देवू लागला. पहायला गेले तर वंश दैत्याचा! पण प्रल्हादाची योग्यता त्या इंद्रालाही मिळू शकली नाही. पार्था, जाती प्रमाण नव्हे, भक्ति प्रमाण मानावी. राजाज्ञेची अक्षरे जर चामड्याच्या तुकड्यावर असली तर तो चामड्याचा तुकडा बाजारात देऊन वाटेल त्या वस्तू विकत मिळतात. सोन्या रुप्याचा नसेना. राजाज्ञेचा जोर त्या चामड्याच्या तुकड्याला असतो. ती राजाज्ञा लाभली की देवघेव करण्याचे सामर्थ्य त्याच्यात येते. जाति, कुळ, वर्ण हे सगळे अप्रमाण आहे. माझ्या ठिकाणी अनन्य झाले तरच सार्थकता आहे. उत्तमत्व टिकते, सर्वज्ञतेला मान मिळतो, जेव्हा मन आणि बुद्धि भक्तिने भरलेली असतात.

अर्जुना, ही भक्ति अमक्याच भावनेतून व्हावयास पाहिजे असा माझा मुळीच आग्रह नाही. कुठल्याही भावातून मन माझ्या स्वरूपात यावे म्हणजे मागील सर्व कर्मे पुसली जातात. जोवर गंगाजळात येऊन मिसळले नाहीत तोवरच पाण्याच्या ओघाना वहाळ, ओहळ म्हणावयाचे. एकदा का त्यांचा गंगेत प्रवेश झाला की त्यांना गंगारूप प्राप्त होते. त्यांचे मलिनत्व, क्षुद्र नामरुप उरतच नाही. खैर, चंदन, बाभूळ इत्यादि लाकडाची वेगवेगळी नावे अग्नि जोवर त्यांना ग्रासून टाकत नाही तोवरच! एकदा का ती अग्नीत पडली की अग्निरूपच होतात, वेगळेपण संपते. क्षत्रिय, वैश्य, स्त्रिया, शूद्र, अंत्यज हे भेद हे लोक जोवर मला येऊन मिळत नाही तोवरच. त्यांचे भाव समुद्रात मीठ पडावे तसे माझ्यात येऊन मिळाले की जाति, व्यक्ति, यावर शून्य पडते. त्याची किंमत शून्य होते. पूर्व पश्चिमेकडून येणारे नद आणि नदी यांना ते सगळे ओघ समुद्रात येऊन मिळत नाहीत तोवरच वेगवेगळी नावे असतात. एकदा ते सगळे ओघ समुद्रात पडले की मग त्या ओघाना आता समुद्र हे एवढेच नाव रहाते. तसे भक्त मला येऊन मिळाले की जाति, व्यक्ति, भेद नाहीसे होतात आणि परब्रह्म हेच एक नाव रहाते.

मघाशी मी म्हटलेच की कोणत्याही भावाने, मिषाने, माझी भक्ति करावी असे बघ, लोखंड आदबीने परिसाला लावले तरी त्याचे सोने होते. परिस फोडण्यासाठी लोखंडाची कांब त्या परिसावर आपटली तरी परिस आपला गुण न सोडता त्या घावासरशी कांबीचे सोने करतोच. त्याप्रमाणे कोणत्याही हेतूने, भावाने, माझी भक्ती, माझे चिंतन घडले की त्या मनुष्याचे काम होते.

गोपी माझ्यावर अत्यंत प्रेम करीत. त्यांची मने नित्य माझ्या चिंतनात असत. कधी कधी त्या रागारागाने यशोदा मातेकडे येत आणि म्हणत, “बाई, तुझा हा कृष्ण तू किती ग लाडावून ठेवला आहेस? किती खोड्या करतो? आता एकदा सांगा तरी आम्हाला की आम्ही व्रजात रहावे की जावे दिगंतराला गुरेढोरे घेऊन? अग, यमुनेला पाण्याला जा हा तिथे आहेच. मधुरेला दहीदूध घेऊन जा हा झाडाआड लपून दगड मारून घडे फोडतो. शिंक्यावरचे लोणी खातो, आपण खातो तो खातो पण त्या बरोबरच्या सवंगड्यांना वाटतो. ताकाचे डेरे फोडतो, यमुनेला स्नानाला जावे तर हा झाडावर बसून खोड्या काढतो. कसा हा बाई! आणि काही बोलायला गेले की हसत हसत पळून जातो. कसा हा तुझा मुलगा? आता अगदी कहर झाला. काही तरी शिस्त लावशील की नाही? आम्हालाही मुले आहेत की, तो तुझा कान्हा आमच्या मुलांनाही देतो चिथावून आणि ते सगळे त्यालाच सामील.

आणि काय सांगू अर्जुना, हे सगळे रागाचे बोलणे संपले की हळूच एखादी पदरा खालून झाकून

आणलेला पेढा काढीत म्हणे, “हे बघ, हा एवढा त्याला दे. मी दिला आहे असे सांगू मात्र नको हं. अग ती सगळी वानरसेना माझ्या घरावर तुटून पडेल. कृष्णाला दिल्याशिवाय घास गिळत नाही म्हणून त्याच्यापुरता आणला आहे.” दुसरी गोपी म्हणाली, “आणि हे बघ, नुसती आपली रागावत जा त्याला मारू बिरू नकोस. एवढंसं कोवळं लेकरू, मार बीर नाही सोसायचा त्याला, अर्जुना, असे रे त्यांचे माझ्यावरचे प्रेम! दिवस-रात्र असे निरनिराळ्या भावातून माझे चिंतन चालायचे. ह्या प्रेमातूनच त्या माझ्या स्वरूपात मिळून गेल्या. लोक म्हणत ही कामभावना पण पार्था, त्याचे केवळ शुद्ध, वासनारहित प्रेम होते. थोडक्यात त्या व्रजांगना अशा नुसते प्रेम करीत तरून गेल्या.

कंस मामांनी “वैरी गोकुळात वाढतो आहे.” ही आकाशवाणी ऐकली मात्र ते भयातून माझे चिंतन करीत होते. माझा नाश कसा करावा याचाच त्यांना ध्यास लागला होता. एका राक्षसाचा मी वध केला की दुसऱ्या कुणाची योजना करावी याचे चिंतन सुरू व्हावयाचे. शेवटी जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी त्यांना मीच दिसत होतो. अर्जुना, अक्रुराला पाठवून त्यांनी आम्हाला मधुरेस नेले. मृत्यूलाच आमंत्रण होते ते. पण शेवटपर्यंत वैर माझे केले, ध्यास माझा होता, मृत्यू माझ्याच हातून आला. त्यामुळे माझी विरोध भक्ति केल्याचे श्रेय मिळून भक्तिचे फळ जे मुक्ति ते त्यांना मिळाले.

शिशुपाल माझा आतेभाऊ. जन्माला आला तेव्हा त्याला तीन डोळे होते, चार हात होते. आता ह्या विचित्र मुलाचा त्याग करावा अशा विचारात असताना आईबापांना अशी आकाशवाणी ऐकू आली की, “हा फार पराक्रमी होईल. याचा त्याग करू नका. याच्या शत्रूच्या मांडीवर ठेवले की त्याचे दोन हात आणि तिसरा डोळा नाहीसा होईल.” आणि त्याला माझ्या मांडीवर ठेवल्याबरोबर तसे झाले. आत्त्याबाईने वर मागून घेतला की, शंभर अपराध होईपर्यंत मी शिशुपालास मारू नये. राजसूय यज्ञात तुम्हा सर्वांसमक्ष त्याला शंभर अपराध भरल्याची जाणीव देऊन मी मारलेले तू पाहिलेसच. अर्जुना, जन्मभर माझे शत्रुत्व करणारा शिशुपाल वैरभावाने का होईना पण माझे स्मरण, चिंतन केल्यामुळे मुक्त झाला. सोयरेपणाने पांडव, नातेपणाने यादव, ममत्वाने वसुदेव यांना माझी प्राप्ती झाली. नारद, ध्रुव, अक्रुर, शुक, सनत्कुमार या सर्वांना भक्तीने मी प्राप्त झालो. गोपींना प्रेमाने, कंसाला भयाने, शिशुपालादिकांना वैरभावाने माझी जवळीक मिळाली. अरे, सर्व प्रवासाच्या मुक्कामाचे ठिकाण मीच आहे. भक्ति, विरक्ति, प्रेम, वैर या कुठल्याही मार्गाने माझ्याकडे आलेल्याला मुक्ति हेच फळ मी देतो. माझ्या स्वरूपात प्रवेश करण्यास अमुक एक साधन आहे. अमुक नाही असे काही बंधन नाही.

कुठल्याही जातीत जन्माला यावे, भक्ति, प्रेम करावे वा विरोध करावा, पण वैर वा भक्ति माझीच करावी, अन्य कुणाची करू नये. कोणत्याही निमित्ताने माझ्याशी दृढसंबंध आला की मद्रुपता हाती आलीच असे खास समजावे. पापयोनीत जन्माला आलेले किंवा वैश्य, शूद्र स्त्रियाही यांनी माझी भक्ति केली की माझ्या घरी येऊन पोचतात.

मग चारही वर्णांमध्ये छत्रचामराप्रमाणे सर्वांच्यावर छाया धरणारे, स्वर्ग ज्यांना इनाम आहे आणि मंत्राचे जे माहेरघर आहेत ते ब्राह्मण माझ्या ठिकाणी अतिशय तत्पर असतील तर मला येऊन मिळतील यात काय संशय आहे? अर्जुना, तपोधन ब्राह्मण पृथ्वीवरचे देव आहेत. त्यांच्या ठिकाणी यज्ञाचे वास्तव्य असते. ते वेदांच्या अंगावरचे चिलखत आहेत. त्यांच्या दृष्टीच्या मांडीवर मांगल्य वाढते. त्यांच्या ठिकाणी सर्व तीर्थांचे दैव उदयास

आलेले असते. त्यांच्या आस्थेच्या ओलाव्यात सत्कर्म हाच उत्तम वेल वाढतो. त्यांच्या संकल्पात सत्य जगत असते. श्वेतकी राजाच्या यज्ञात अखंड बारा वर्षे तुपाच्या धारा धरल्या गेल्यामुळे अग्निला जाड्य होऊन तो आजारी पडला. ब्रह्मदेवाने त्याला खांडववन खाण्याचा सल्ला दिला. इंद्र पाऊस पाडून वन खाऊ देईना म्हणून अग्नि आपणा दोघांकडे आला आणि मग आपण दोघांनी इंद्राशी लढाई करून खांडववन अग्निला खाऊ दिले आणि त्या वनातील पशुपक्षी वनौषधी खाऊन अग्नि रोगमुक्त झाला हे आठवते ना तुला? अग्नि ब्राह्मणवेषाने आल्यामुळे तुलाही लढाई करावीच लागली, याचकाची इच्छा पूर्ण करावीच लागली. अरे, नुसत्या वेषाचा असा महिमा आहे. अग्निच्या ह्या ब्राह्मण वेषामुळेच समुद्र आपल्या पोटातील वडवाग्निला विझवत नाही. पार्था, भृगुऋषी आल्याबरोबर लक्ष्मीला बाजूस करून, त्याचा पायाला कौस्तुभ टोचेल म्हणून हातात काढून घेऊन मी त्यांच्या चरणाची धूळ धारण करण्यासाठी वक्षस्थळाचा खळगा पुढे केला. आपल्या दैवसमुद्राचे जतन व्हावे म्हणून मी त्या ब्राह्मणाच्या पदमुद्रा अजून अभिमानाने छातीवर वागवतो. त्यांचा राग काळाग्नि नावाच्या प्रलयकालच्या रुद्र देवतेचे वसतिस्थान आहे. त्यांचा प्रसाद झाला की सर्व सिद्धिंची प्राप्ती होते. असे हे ब्राह्मण माझी भक्ति त्यांनी केली तर मला येऊन पोचतात. यात काय आश्चर्य आहे? उघडच आहे ते, असे बघ चंदनाच्या झाडाशेजारी दुसरी झाडे असतात, चंदनाच्या झाडावरून येणाऱ्या वाऱ्यामुळे त्या अन्य झाडांची खोडेही सुवासिक होतात. त्यांना त्यामुळे देवांच्या निढळावर विराजमान होण्याचे भाग्य त्यांच्या गंधउटीला मिळते. मग प्रत्यक्ष चंदन त्या देवांच्या भाळी पोचतो यात नवल ते काय? तो पोचणार नाही असे म्हणावे तरी कसे? किंवा पोचाला हे वेगळे सिद्ध करण्याची जरूरी तरी काय? शंकरांनी विष प्राशन केल्यावर होणारी आग थंड होईल अशा आशेने चंद्रकोर मस्तकावर धारण केली. चंदन तर चंद्राहून शीतल आणि त्यातून पुन्हा सुवासिक मग तो सहज सर्वांगी बसणार नाही असे कसे घडले? लहानसहान ओढे ओहोळ ह्यांनी गंगेचा आश्रय केला की ते समुद्रात जाऊन मिळतात. तर स्वतः गंगेला जाऊन मिळण्यास समुद्राशिवाय दुसरी जागा कुठली? म्हणून राजर्षि असो वा ब्राह्मण असो, ज्यांची क्रिया आणि बुद्धि मला शरण आली आहेत, त्यांचे अस्तित्व माझ्या स्वरूपात आहे आणि त्यांची निर्वाण स्थितीही मीच आहे.

अर्जुना, मला एक नवल वाटते की माझी भक्ति न करणारे लोक कशाच्या जोरावर, कशाच्या भरवशावर जगतात? जीवनाच्या शेकडो ठिकाणी खिळखिळ्या झालेल्या ह्या जुन्या नावेत बसून हे ह्या प्रवाहात इतके निश्चिंत कश्याच्या जोरावर राहतात रे? शस्त्रांचा वर्षाव होत असतांना उघड्या अंगाने कसे वावरतात? अंगावर दगड पडत असताना मध्ये ढाल घालून आपले संरक्षण करावे अशी त्यांना इच्छा तरी कशी होत नाही? रोग तर वाढतोच आहे अशा वेळी हे औषधाच्या बाबतीत इतके उदासीन कसे काय रहातात? चहूकडून वणवा पेटलेला असताना त्यातून ते बाहेर पडण्याची धडपडसुध्दा कशी करत नाहीत? अनेक दुःखातून बाहेर पडण्याचा मार्ग म्हणजे माझी भक्ति! पण हे त्यांना कळत कसे नाही? या मृत्यूलोकात येऊन माझी भक्ति न करता ह्यांना कशाचे बळ प्राप्त झालेले असते? अरे घराच्या, भोगाव्या जोरावर ते बेफिकीर आहेत काय? विद्या, वय यांची त्यांना घमेंड आहे काय? माझी भक्ति न करता त्यांनी यातल्या कोणत्या सुखाची शाश्वती धरली आहे? दुसरे कोणते सुख त्यांना सापडले आहे?

अर्जुना, अरे त्यांची सगळी सुखे देहाच्या संदर्भात आहेत आणि देह तर उत्पन्न झाल्यापासून काळाच्या तोंडात चालाला आहे. बाप रे बाप! अरे, ह्या मृत्युलोकाच्या दुकानात दुःखाचा माल खच्चून भरलेला आहे. तो माल मरणाच्या मापाने मोजला जातो आहे. मृत्युलोकाच्या शेवटच्या बाजारात नरदेहाने येऊन सुखाने जगणे हा

माल कसा खरेदी करता येईल? राख फुंकून विस्तव पेटतो काय? दिवा लागतो काय? विषाचे कांदे वाटावे, ते पिळून रस काढावा आणि त्याला अमृत हे नाव देऊन तो प्यावा आणि अमर होण्याची आशा करावी तसे हे आहे. अरे, विषयांचे सुख हे परम दुःखच आहे. पण काय करावे हे ह्या मुर्खांना कळतच नाही. आपले मस्तक तोडून पायाच्या जखमेला औषध म्हणून बांधावे तसे हे आहे. अशा प्रकारचे हे मृत्यूलोकीचे कल्याण आहे. इंगळाच्या अंथरुणावर सुखाची झोप कुणी ऐकली आहे काय? मृत्युलोकात सुखाची प्राप्ती झाली अशी कथा कुठे प्रसिद्ध आहे काय?

अरे, हा मृत्युलोक असा आहे की इथला चंद्र क्षयरोगी आहे, सुर्याचा उदय होतो तो अस्त होण्यासाठी. सुखाचा अंगरखा घालून इथे दुःख जगाला छळत असते. मंगल गोष्टींच्या अंकुरावरच अमंगलाची कीड पडलेली असते. गर्भ उदरात असल्यापासूनच मुत्यू त्यावर घिरट्या घालत असतो. जे नाही त्याचे इथे चिंतन चालते, बरे जे आहे ते गंधर्व घेऊन जातात. ते कसे, कुठे, कुणी, कधी नेले याचा पत्ता देखील लागत नाही. सगळ्या वाटेने शोध घेतला तरी मृत्युलोकीची वस्तू परत आली असे एकतरी पाऊल दिसते काय? इथल्या पुराणातही मेलेल्या लोकांच्या गोष्टी खच्चून भरलेल्या असतात. अरे, ह्या अनित्यतेची व्याप्ती अशी आहे की हा मृत्युलोक उत्पन्न करणारा ब्रह्मदेवसुद्धा क्षणभंगुर आहे. त्याचे अस्तित्वसुद्धा कधी ना कधी एक दिवस संपतेच. अशी ही सर्वव्यापक क्षणभंगुरता! सरसकट सगळेच निपटून नाहीसे होते हे दिसत असून कशी ह्या मूर्खांची वागणूक बघ. अशा विनाशी अवस्थेत जन्म घेऊनसुद्धा ते त्या क्षणभंगुर जीवनावर विसंबून निवांत बेफिकीर असतात. ह्यांच्या ह्या उदासिनतेचे नवलच आहे.

अरे, काय सांगू? ह्यांच्या सर्वच क्रिया अशा विपरीत आहेत. सर्वस्वाची हानी होते तिथे कोट्यवधि रुपये खर्च करतात. पण इहपरलोकीचा लाभ करून देणाऱ्या भगवद्भक्तीसाठी कवडी खर्च करणे त्यांच्या जिवावर येते. एखादा मनुष्य विषयविलासाच्या ऐश्वर्यात गुंग असला की सध्या तो सुखात लोळतो आहे असे हे मूर्ख म्हणतात. जो अभिलाषेने ग्रस्त असतो त्याला ज्ञानी समजतात. ज्याचे आयुष्य थोडे राहिले, बलबुद्धि नाहीशी होत चालली त्याला वडील म्हणून पूज्य मानून नमस्कार करतात. बाळ मोठमोठे होत चालले की कौतुकाने नाचतात, वाढदिवस साजरे करतात, गुढ्या उभ्या करतात पण इकडे त्या जीवाचे आयुष्य एकेका वर्षाने कमी कमी होत चालले आहे. जन्मल्या दिवसापासून मरणाच्या दिशेने पावले पडू लागली आहेत याचे त्यांना भानही नसते.

अरे, "मरण" हा शब्दसुद्धा त्यांना सहन होत नाही. पण असलेले आयुष्य फुकट चालले आहे हे त्यांना समजत नाही. ते संपले की मग मात्र रडत बसतात. बेडकास एकीकडे साप गिळत असतो, तर बेडूक माशी पकडण्यासाठी जीभ वेटाळत असतो. तसे एकीकडून मरण त्यांना असते पण ते मात्र आपली विषयतृष्णा वाढवीतच असतात. काय हा अनर्थ आहे रे! कसे ह्या लोकांना समजावून सांगावे? ह्यांना ह्या गर्तेतून कोण सोडवील बरे?

हाय, हाय, अर्जुना, अरे हे किती उफराटे जगणे आहे ह्या लोकांचे? आणि माझे मन पाळते आहे तुझ्याकडे पाहून! तू अकस्मात इथे कसा रे जन्माला आलास? आणि या सामान्य मूर्खांसारखा प्रपंच ज्ञानाने कसा रे ग्रासला गेलास? तुलाहि ही प्रपंचातील सुखदुःखे हे भोग विलास, हे प्रेम, हे वैर सगळे खरे वाटते काय

रे? आता ह्या पेटत्या वणव्यातून तुला मी वाचवू तरी कसा? कसा ह्या प्रपंचरूपी भुजंगाचा विळखा तुला पडला रे? तुझे शरीर, मन, बुद्धि, अहंकार, भावना या सगळ्यांचाच ह्या काळोखाने ग्रास केलेला मला दिसतो आणि दुर्दैव असे की हे सगळे घडते आहे माझ्या समक्ष! माझ्या सान्निध्यात? मी तुझा सखा असताना! मी आता तुला यातून वाचवू तरी कसा?

अरे, मी काय सांगतो आहे हे तुझ्या लक्षात तरी आले का? मी इतके सगळे तुला पुन्हा पुन्हा सांगतो आहे पण तू मला एवढा वेळ ना एक शंका विचारलीस ना एक प्रश्न केलास? किती मार्मिक तुझे प्रश्न! तुझ्या प्रश्नांनी मला किती स्फुरण येते सांगण्याचे पण तू एकाग्र चित्ताने ऐकलेस तरी का मी काय सांगितले ते? सख्या रे, मी तुला पुन्हा पुन्हा विनवतो की पार्था, आता नको रे वेळ घालवूस. झटकून टाक त्या प्रपंचाची भ्रान्ती, तोड ते मृत्युलोकीचे बंध! ऊठ आणि झपाट्याने या भक्तीच्या वाटेला लाग. मी प्रतिज्ञापूर्वक सांगतो की तू एकदा ह्या वाटेला लागलास की थेट माझ्या अव्यंग, शाश्वत, सुखपूर्ण, निर्दोष अशा परमधामामध्ये येऊन पोचशील. दोन्ही बाहू पसरून, परमप्रिया, मी तुझी वाट पहात कधीचा इथे दाराशी तिष्ठत उभा आहे रे."

पूज्य गुरुदेव रानडे एकदा गणपतराव कारखानिसांना म्हणाले होते, "गणपतराव, ज्ञानेश्वरीत एकच ओवी आहे,

**तरि झडझडोनि वहिला निघ ।**
**इये भक्तिचिया वाटे लाग ।**
**जिया पावसी अव्यंग ।**
**निजधाम माझे ॥** (अ. ९-ओ. ५१६)

इतके या ओवीचे मोल आहे.

देव म्हणतात, "अर्जुना, भक्ति करावयाची म्हणजे मी काही तुला एखादा कठीण मार्ग सांगत नाही रे, तू बाह्य जीवन जसे आहे तसे ठेव. मी तुला प्रपंच सोड म्हणतो तो शरीराने नव्हे, तुझे क्षात्र जीवन जसे चालले आहे तसेच चालू दे. फक्त मन माझ्याकडे लाव. माझे भजन अगदी प्रेमाने कर. सर्वत्र मला पहा आणि त्या वैश्विक रूपापुढे तू नतमस्तक हो. माझे अनुसंधान लागले की इतर संकल्प उरणारच नाहीत. संकल्पाचा सहज साधणारा हा यज्ञ कर. माझ्या योगाने तू असा संपन्न झालास की, माझ्या स्वरूपात येऊन मिळशील. तू आणि मी एकच होऊन जाऊ.

बाबारे, सर्वांच्या पासून लपवून ठेवलेले हे माझे सर्वस्व मी तुझ्याजवळ बोलतो आहे. आता तू हे अंतःकरणात साठवून ठेव. सुखपूर्ण होऊन रहा. सुखाचा दुसरा रस्ताच अस्तित्वात नाही रे माझ्या लाडक्या!

संजय धृतराष्ट्राकडे पहात म्हणाला, "महाराज, अहो तो मेघःशाम परब्रह्म श्रीकृष्ण भक्तांना जसा काही कल्पवृक्षच! तो अर्जुनाला असे म्हणाला ऐकता अहा ना महाराज आपण? मी तर आपल्याला त्यांच्या संवादातील शब्द न शब्द सांगितला. अहाहा, काय हो त्या अर्जुनाचे भाग्य की माझा भक्त हो असे म्हणून तो

आत्मराज किती हो त्या भाग्यवानाच्या विनवण्या करतो आहे! चुकीच्या मार्गाने त्याने कधीही जाऊ नये म्हणून किती कळवळ्याने त्याला बोध पटवतो आहे! प्रपंच ज्ञानाचा त्याने कसा उलगडला केला आहे पहा. किती खुबीने त्याने स्वरूपज्ञान अर्जुनाच्या पदरी बांधले आहे!"

संजयला इतका गहिंवर आला की, त्याच्या तोंडातून शब्द फुटेना. मग धृतराष्ट्राच्या मनावर काही परिणाम झाला की नाही हे पहाण्यासाठी त्याने त्याच्याकडे नजर टाकली तर तो आपला आधी होता तसाच! पाषाण नुसता! काहीच पाझर नाही. पुत्रमोहात गटांगळ्या खात जय आपलाच होईल ना या चिंतेतच मग्न! हे पाहून बिचाऱ्या संजयाने मान खाली घातली. मनाशी म्हणू लागला, "अहो, कसा हा म्हातारा निवांत बसला आहे! इथे अमृताचा वर्षाव होतो आहे आणि हा गेला आहे निघून शेजारच्या गावी! नुसते इथे बसून काय होणार आहे? देवाच्या आरतीच्या वेळी कापूर लावल्यावर उठून उभे राहून टाळीही न वाजविणाऱ्या मस्त माणसासारखा हा मठ्ठपणाने कसा बसून राहिला आहे पहा.

करता काय पण? हा आमचा अन्नदाता आहे. याची निंदा करावी तर आमच्याच वाचेला दूषण लागायचे! वाचा मळायची! त्याचे नशीब त्याच्याबरोबर! हा असला भक्तिहीन स्वभाव आहे त्याचा, काय करील तो तरी?

पण माझे भाग्य कसे उदयाला आले आहे बघा. वृत्तांत सांगण्याच्या निमित्ताने मला व्यासदेवांनी इथे बसविले खरे पण माझ्या जन्माचे सार्थक केले. मला हा संवाद ऐकवून त्या महाभागानी जन्ममरणातून माझी सुटका केली. वाहवा, वाहवा, काय ते भगवंताचे रूप काय ते त्याचे सांगणे! देवा, अहो त्या पार्थाबरोबर मीसुद्धा ह्या संसारसमुद्रातून तरलो हो."

मोठ्या प्रयासाने मन आवरून संजय, "वाहवा, वाहवा" असे म्हणण्याच्या प्रयत्न करतो न करतो तोच अष्टसात्विक भाव उत्पन्न होऊन त्यांनी त्याला व्यापून टाकले. ते भाव आतल्या आत जिरवून टाकण्याचे सामर्थ्य त्याला राहिलेच नाही.

चित्त चकित होऊन त्याची आटणी सुरू झाली. वाचा जिथल्या तिथेच पांगळी झाली. अंगावर रोमांच उभे राहिले. अर्धे मिटलेले आणि अर्धे उघडे डोळे अश्रू गाळू लागले. आत उठणाऱ्या सुखांच्या ऊर्मीचे बळ इतके वाढले की तो थर थर कापू लागला. केसाकेसांच्या मूळात घामाचे थेंब उभे राहिले आणि जाळीदार अंगरखा घातल्यासारखा संजय शोभू लागला.

आता जीवदशेची आटणीच झाली असती इतका त्या महासुखाचा प्रचंड ओघ होता. पण युद्धवृत्तांत धुतराष्ट्रास सांगण्याची व्यासांची आज्ञा ती आटणी होऊ देईना. "मालूताई, मनात येते की सौधावर बसलेल्या त्या संजयाची जर ही अवस्था तर त्या घनःश्यामाजवळ उभ्या असलेल्या भक्त अर्जुनाचे काय झाले असेल? मघाची माउलींचीच उपमा घ्यायची तर चंदनाच्या वासाने गंधित झालेले खोड जर देवाच्या भाली तिलक म्हणून मिरवते आहे तर प्रत्यक्ष चंदनाचे काय झाले असेल?"

मात्र ध्यानात हे घ्यायचे की माऊली सुचवत आहेत की संजयाची जीवदशा व्यासाज्ञाने रोखून ठेवली. पार्थही जीवदशा उल्लंघून चाललाच होता पण देवांनी दुष्टसंहाराचे काम
अजून व्हावयाचे आहे म्हणून पंख पसरून नीलाकाशाच्या अनंत पोकळीत झेपावण्यासाठी उत्सुक झालेल्या त्या गरुडास प्रपंच भानाच्या जाळ्यात धरून ठेवला.

संजयाला देहाची आठवण आली. भान परत आले. श्रीकृष्ण व अर्जुन यांचे बोलणे पुन्हा गर्जना करीत संजयाच्या कानी पडू लागले. त्याने खांद्यावरील उत्तरीयाने डोळे पुसले, अंगावरचा घाम टिपला आणि तो धृतराष्ट्राला म्हणाला, "ऐकावे महाराज"

कृष्णाअर्जुनाच्या संवादाचा अप्रतीम बीजाला संजयाची उत्तम पिकणारी जमीन मिळाली आहे. त्याचा भाव इतका सात्विक आहे की, त्यात प्रमेयाचे असंभाड पीक येईल आणि आता श्रोत्यांना सुकाळ होईल.

श्रोते हो, काय अपूर्व दैव तुमचे! श्रवणेंद्रियांचे भाग्यच उघडले की हो! कानाना दैवाने माळच घातली. आता थोडके लक्ष द्यावे तेवढ्या अवधानानेही आपण सुखाच्या राशीवर बसाल.

विभूतीची स्थाने आता तो सिद्धांचा राजा अर्जुनाला दाखवील. महाराज, मी निवृत्तीचा दास ज्ञानदेव आपल्याला प्रार्थना करतो की, "ऐकावे महाराज."

***

॥ श्री ॥

### अध्याय दहावा

## विभूतियोग

॥ ॐ नमो भगवते वासुदेवाय ॥

श्रीभगवानुवाच—

भूय एव महाबाहो श्रृणु मे परमं वचः ।
यत्तेऽहं प्रीयमाणाय वक्ष्यामि हितकाम्यया ॥ १ ॥

न मे विदुः सुरगणाः प्रभवं न महर्षयः ।
अहमादिर्हि देवानां महर्षीणां च सर्वशः ॥ २ ॥

यो मामजमनादिं च वेत्ति लोकमहेश्वरम् ।
असंमूढः स मर्त्येषु सर्वपापैः प्रमुच्यते ॥ ३ ॥

बुद्धिर्ज्ञानमसंमोहः क्षमा सत्यं दमः शमः ।
सुखं दुःखं भवोऽभावो भयं चाभयमेव च ॥ ४ ॥

अहिंसा समता तुष्टिस्तपो दानं यशोऽयशः ।
भवन्ति भावा भूतानां मत्त एव पृथग्विधाः ॥ ५ ॥

महर्षयः सप्त पूर्वे चत्वारो मनवस्तथा ।
मद्भावा मानसा जाता येषां लोक इमाः प्रजाः ॥ ६ ॥

एतां विभूतिं योगं च मम यो वेत्ति तत्त्वतः ।
सोऽविकम्पेन योगेन युज्यते नात्र संशयः ॥ ७ ॥

अहं सर्वस्य प्रभवो मत्तः सर्वं प्रवर्तते ।
इति मत्वा भजन्ते मां बुधा भावसमन्विताः ॥ ८ ॥

मच्चित्ता मद्‌गतप्राणा बोधयन्तः परस्परम् ।

अनुक्रमणिका

कथयन्तश्च मां नित्यं तुष्यन्ति च रमन्ति च ॥ ९ ॥

तेषां सततयुक्तानां भजतां प्रीतिपूर्वकम् ।
ददामि बुद्धियोगं तं येन मामुपयान्ति ते ॥ १० ॥

तेषामेवाऽनुकम्पार्थमहमज्ञानजं तमः ।
नाशयाम्यात्मभावस्थो ज्ञानदीपेन भास्वता ॥ ११ ॥

अर्जुन उवाच—

परं ब्रह्म परं धाम पवित्रंपरमं भवान् ।
पुरुषं शाश्वतं दिव्यमादिदेवमजं विभुम् ॥ १२ ॥

आहुस्त्वामृषयः सर्वे देवर्षिर्नारदस्तथा ।
असितो देवलो व्यासः स्वयं चैव ब्रवीषि मे ॥ १३ ॥

सर्वमेतदृतं मन्ये यन्मां वदसि केशव ।
न हि ते भगवन् व्यक्तिं विदुर्देवा न दानवाः ॥ १४ ॥

स्वयमेवात्मनात्मानं वेत्थ त्वं पुरुषोत्तम ।
भूतभावन भूतेश देवदेव जगत्पते ॥ १५ ॥

वक्तुमर्हस्यशेषेण दिव्या ह्यात्मविभूतयः ।
याभिर्विभूतिभिर्लोकानिमांस्त्वं व्याप्य तिष्ठसि ॥ १६ ॥

कथं विद्यामहं योगिंस्त्वां सदा परिचिन्तयन् ।
केषु केषु च भावेषु चिन्त्योऽसि भगवन्मया ॥ १७ ॥

विस्तरेणात्मनो योगं विभूतिं च जनार्दन ।
भूयः कथय तृप्तिर्हि शृण्वतो नास्ति मेऽमृतम् ॥ १८ ॥

श्रीभगवानुवाच—

हन्त ते कथयिष्यामि दिव्या ह्यात्मविभूतयः ।
प्राधान्यतः कुरुश्रेष्ठ नास्त्यन्तो विस्तरस्य मे ॥ १९ ॥

अनुक्रमणिका

अहमात्मा गुडाकेश सर्वभूताशयस्थितः ।
अहमादिश्च मध्यं च भूतानामन्त एव च ॥ २० ॥

आदित्यानामहं विष्णुर्ज्योतिषां रविरंशुमान् ।
मरीचिर्मरुतामस्मि नक्षत्राणामहं शशी ॥ २१ ॥

वेदानां सामवेदोऽस्मि देवानामस्मि वासवः ।
इंद्रियाणां मनश्चास्मि भूतानामस्मि चेतना ॥ २२ ॥

रुद्राणां शंकरश्चास्मि वित्तेशो यक्षरक्षसाम् ।
वसूंना पावकश्चास्मि मेरुः शिखरिणामहम् ॥ २३ ॥

पुरोधसां च मुख्यं मां विद्धि पार्थ बृहस्पतिम् ।
सेनानीनामहं स्कंदः सरसामस्मि सागरः ॥ २४ ॥

महर्षीणां भृगुरहं गिरामस्म्येकमक्षरम् ।
यज्ञानां जपयज्ञोऽस्मि स्थावराणां हिमालयः ॥ २५ ॥

अश्वत्थः सर्ववृक्षाणां देवर्षीणां च नारदः ।
गंधर्वाणां चित्ररथः सिद्धानां कपिलो मुनिः ॥ २६ ॥

उच्चैःश्रवसमश्वानां विद्धि माममृतोद्भवम् ।
ऐरावतं गजेंद्राणां नराणां च नराधिपम् ॥ २७ ॥

आयुधानामहं वज्रं धेनूनामस्मि कामधुक् ।
प्रजनश्चास्मि कन्दर्पः सर्पाणामस्मि वासुकिः ॥ २८ ॥

अनन्तश्चास्मि नागानां वरुणो यादसामहम् ।
पितृणामर्यमा चास्मि यमः संयमतामहम् ॥ २९ ॥

प्रल्हादश्चाऽस्मि दैत्यानां कालः कलयतामहम् ।
मृगाणां च मृगेंद्रोऽहं वैनतेयश्च पक्षिणाम् ॥ ३० ॥

पवनः पवतामस्मि रामः शस्त्रभृतामहम् ।
झषाणां मकरश्चास्मि स्त्रोतसामस्मि जाह्नवी ॥ ३१ ॥

अनुक्रमणिका

सर्गाणामादिरन्तश्च मध्यं चैवाहमर्जुन ।
अध्यात्मविद्या विद्यानां वादः प्रवदतामहम् ॥ ३२ ॥

अक्षराणामकारोऽस्मि द्वंद्वः सामासिकस्य च ।
अहमेवाक्षयः कालो धाताऽहं विश्वतोमुखः ॥ ३३ ॥

मृत्युः सर्वहरश्चाहमुद्भवश्च भविष्यताम् ।
कीर्तिः श्रीर्वाक्च नारीणां स्मृतिर्मेधा धृतिः क्षमा ॥ ३४ ॥

बृहत्साम तथा साम्नां गायत्री छन्दसामहम् ।
मासानां मार्गशीर्षोऽहमृतूनां कुसुमाकरः ॥ ३५ ॥

द्यूतं छलयतामस्मि तेजस्तेजस्विनामहम् ।
जयोऽस्मि व्यवसायोऽस्मि सत्त्वं सत्त्ववतामहम् ॥ ३६ ॥

वृष्णीनां वासुदेवोऽस्मि पाण्डवानां धनंजयः ।
मुनीनामप्यहं व्यासः कवीनामुशना कविः ॥ ३७ ॥

दण्डो दमयतामस्मि नीतिरस्मि जिगीषताम् ।
मौनं चैवास्मि गुह्यानां ज्ञानं ज्ञानवतामहम् ॥ ३८ ॥

यच्चापि सर्वभूतानां बीजं तदहमर्जुन ।
न तदस्ति विना यत्स्यान्मया भूतं चराचरम् ॥ ३९ ॥

नान्तोऽस्ति मम दिव्यानां विभूतीनां परंतप ।
एष तूद्देशतः प्रोक्तो विभूतेर्विस्तरो मया ॥ ४० ॥

यद्यद्विभूतिमत्सत्त्वं श्रीमदूर्जितमेव वा ।
तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंऽशसंभवम् ॥ ४१ ॥

अथवा बहुनैतेन किं ज्ञातेन तवार्जुन ।
विष्टभ्याहमिदं कृत्स्नमेकांशेन स्थितो जगत् ॥ ४२ ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे “विभूतियोगो नाम” दशमोऽध्यायः ॥ १० ॥

अनुक्रमणिका

श्रीकृष्णार्पणमस्तु।

----------

## अनुक्रमणिका

या अध्यायाच्या सुरवातीस माऊली गुरूंना नमन करीत आहेत. आतापर्यंच्या अध्यायात इतकी संस्कृतप्रचुर रचना दुसऱ्या कुठल्याच अध्यायात नाही. इथे सर्व पदे उलगडूनच वाचावी लागतात, समजून घ्यावी लागतात, सहाव्या अध्यायाच्या शेवटी गुरूंनी माझ्या मस्तकावर हात ठेवला आणि चाड्यांतून धान्य पेरावे तसे आत्मज्ञानाचे बोल माझ्या तोंडातून वदवून श्रोत्यांच्या मनोभूमीत पेरले असे म्हटले आणि इथे गुरूंना निरनिराळ्या बिरुदांनी गौरवून नमस्कार केला आहे.

ते म्हणतात, “महाराज आपण स्पष्ट बोध करण्यात चतुर अहा. शिष्याच्या मनांत ज्या शंका येण्याची शक्यता वाटेल त्या ध्यानी घेऊन त्या शंकांचे आधीच निरसन करून पूर्ण बोध स्पष्टतेने करण्यात आपण चतुर अहा.”

“गुरोऽस्तु मौनं व्याख्यानं शिष्यस्तु छिन्नसंशयः!” अशी ह्या बोधाची महती असते. विद्यारूपी कमलाचा विकास करणारे आपण अहा. कमलापासून सूर्य किती दूर असतो पण सूर्योदय झाल्याबरोबर अंधारात पाकळ्या मिटवून रहाणारे कमल प्रफुल्लित होते. त्याच्या अंतरंगात असणारा सुगंध दशदिशांना पसरू लागतो. आपल्या विद्यादानाची तशी चातुरी आहे. शिष्याच्या हृदयात सुप्त असलेले ज्ञान आपण आपल्या कृपादृष्टीने पाकळ्या उमलवून प्रगट करतात. परावाणीचा विषय असलेले जे स्वरूपज्ञान, त्या प्रमदेशी, आपण विलास करता, नित्य रममाण झालेले असता. त्या स्वरूपज्ञानावर स्त्रीवर, जशी पतीची सत्ता चालते तशी, आपली सत्ता चालते. महाराज, हे आपले स्वरूप! आपण माझ्या नमस्काराचा स्वीकार करावा.

संसाररूपी अंधःकाराचा नाश आपण सूर्याप्रमाणे प्रकाशमान होऊन करता. ज्याला उपमा देता येत नाही असे परम वीर्य आपल्या ठिकाणी वास करते आहे. तूर्या ही चौथी अवस्था जागृती, स्वप्न, सुषुप्तीच्यापलीकडची. त्या तूर्यारूपी यौवनात असलेल्या अवस्थेचे स्नेहाने पालन करणे ही आपली क्रीडा आहे. माझा आपल्याला नमस्कार असो.

सर्व जगाचे पालन आपणच करता. मांगल्यरूपी रत्नाची खाणच आपण अहा. भक्तरूपी वनातील चंदनवृक्ष अहा. मी आपल्याला नमस्कार करतो.

चतुरांच्या चित्ताला आनंद देणारे आपण चकोरचंद्र अहा. आत्मानुभवाचे राजे अहा. वेदगुणांचे समुद्र अहा. मन्मथालाही मोहित करणारे आपण अहा. मी आपल्याला नमस्कार करतो.

शुद्ध भावाने भजन करण्यास आपण योग्य अहा. संसाररूपी हत्तीच्या गंडस्थळाचा भेद करणारे सिंह अहा. विश्वाच्या उत्पत्तीचे आपण ठिकाण अहा. आपल्याला माझा नमस्कार असो.

हे गुरुराया माझ्या ह्या नमस्कारांचा आपण स्वीकार करून माझ्यावर अनुग्रह करावा. आपली कृपा हा प्रत्यक्ष गणेशच आहे. त्या वरदहस्ताने बालकास विद्येमध्ये गती मिळते. तो भाग्यवान अबोध, व्युत्पन्न होतो.”

अनुक्रमणिका

एकदा असे झाले की श्रीमत् शंकराचार्य शिष्यांना पाठ देण्यासाठी आसनस्थ झाले. सुरेश्वराचार्य, पद्मपादाचार्य वगैरे शिष्योत्तम समोर बसले. पोथीचे पान हातात घेऊन प्रत्येकजण मोठ्या आतुरतेने आचार्यांकडे पाठाच्या अपेक्षेने पहात होते. पण आचार्य पाठ सुरू करीनात. गिरी नावाचा शिष्य आचार्यांची छाटी धुवत होता, आला नव्हता. आचार्य त्याची वाट पहात होते. पद्मपादाचार्य म्हणाले, "महाराज, सर्व विद्यार्थी आले आहेत आपण कोणाची वाट पहात अहा?"

आचार्य म्हणाले, "अहो, तो आपला गिरी अजून आला नाही."

पद्मपादाचार्य म्हणाले, "त्याच्याकरिता एवढे कशाला थांबायचे? तो वेळेवर आला काय आणि न आला काय? सारखेच आहे. नाहीतरी त्याला कुठे काय कळते आहे? पाठ सुरू करावा.

आचार्य म्हणाले, "थांबा जरा."

इतक्यात गिरी आलाच. साष्टांग नमस्कार घालून तो आपल्या जागेवर बसणार इतक्यात आचार्य म्हणाले, "अरे गिरी, आजचा पाठ तूच सांगावास अशी आमची इच्छा आहे." सगळेजण हे ऐकून आश्चर्यचकित झाले. मठ्ठ म्हणून ठरलेला हा गिरी पाठ कसा काय घेणार, हे काही कुणाला कळेना. आचार्यांची आज्ञा झाली, त्यांची कृपादृष्टी पडली आणि गिरीचे भाग्य उदयाला आले त्याची बुद्धि प्रगल्भ झाली, प्रकाश फाकला, वाग्देवता प्रसन्न झाली. गिरीने हात जोडले व नम्रतेने व भक्तिपूर्ण अंतःकरणाने अत्यंत खड्या आवाजात तोटक वृत्तामध्ये आचार्यांचेच स्तवन स्तोत्र रचून म्हणावयास सुरवात केली,

**विहिताखिलशास्त्रसुधाजलधे ।**
**महितोपनिषत्कथितार्थनिधे ।**
**हृदये कलये विमलं चरणं ।**
**भव शंकर देशिक मे शरणं ॥ १ ॥**

हे सद्गुरो, सर्व शास्त्ररूपी अमृताचा महासागर आपण आकलन केला आहे. अत्यंत पूज्य व आदरणीय उपनिषदांचा गंभीर अर्थनिधी लोकांना प्रगट करून दिला आहे. आपले निर्मल चरणकमल मी हृदयात धरले आहेत. हे गुरो शंकराचार्य महाराज, आपण माझे रक्षण करावे, आधार द्यावा, उद्धार करावा.

करुणरसाने भरलेले हे स्तोत्र ऐकून ऐकणारे विरघळून गेले. पुढे गिरीने त्या दिवशीचा पाठही तोटक वृत्तांतच शिकवला. आचार्य विनोदाने त्याला तोटकाचार्य म्हणाले पण ते नाव रूढ झाले. उत्तरेकडील ज्योतिर्मठाचे आद्य आचार्य म्हणून पूज्यपाद शंकराचार्यांनी त्यांची योजना केली. गुरुकृपा खरोखरच काय न करील?

माऊली म्हणतात, "आपली उदार वाचा जेव्हा "भिऊ नकोस" असे वचन देते तेव्हा नवरसरूपी दिवे प्रज्वलित होतात. आपले प्रेम म्हणजे प्रत्यक्ष सरस्वती आहे. त्या प्रेमाने एखाद्या जीवाचा स्वीकार केला की, तो

मनुष्य पैजेने बृहस्पतीबरोबर वादविवाद करील, आपली कृपादृष्टी क्षणमात्र जरी कुणावर पडली किंवा आपला पद्मकर जर कुणाच्या मस्तकी लाभला तर तो जीव सामान्य जीव रहातच नाही. त्याची योग्यता प्रत्यक्ष महेशाबरोबरीची होते. एवढे हे अपूर्व सामर्थ्य! त्या आपल्या सामर्थ्यांचे मी वाचेने वर्णन तरी करणार कसे! सूर्यापर्यन्त हात पोचून त्याच्या त्या चंड प्रकाशरूप शरिराला उटणे कोण लावणार? क्षीर समुद्रला पाहुणचार कोणी आणि कोणत्या पक्वान्नाने करावयाचा? कापराला सुवास द्यावा असा वास कुठे मिळणार आहे?

महाराज, कल्पतरू आपल्या कुठल्याही अंगाने मनोरथ पूर्ण करू शकतो. त्याला मोहरच यायला हवा असे नाही. त्याप्रमाणेच आपले सामर्थ्य आहे.

चंदनाला लेप कशाचा द्यावा? अमृत शिजवून आटवून काय करावयाचे? गगनावर मांडव कसा उभा करावा? मनात आले तरीही हे सगळे करणे जसे अशक्य आहे त्याप्रमाणेच श्रीगुरूंचा महिमा कळण्याचे साधन मिळणे अशक्य आहे.

करता येण्यासारखे एकच आहे की, त्यांच्या चरणावर निवांतपणे मस्तक ठेवायचे आणि हे जाणून मी त्यांना मनोभावे नमस्कार करतो आहे.

पुष्कळ विचार केला की, बुद्धीच्या जोरावर आपण श्रीगुरूंचे रूप प्रगट करू शकू. पण तसे केले तर मोत्याला तेज येण्यासाठी अभ्रकाचे पूट दिल्यासारखे होईल. बावनकशी सोन्याला चांदीचा मुलामा द्यावा तशी ही स्तुतीची बोलणी अनुचित होतील. मुकाट्याने गुरूंच्या पायावर माथा ठेवावा हेच भले.

नमस्कार करून ज्ञानदेव म्हणाले, "अहो स्वामी, अतिशय आपुलकीने आपण माझ्याकडे पाहिले म्हणून या कृष्णार्जुन संगमाच्या प्रयागक्षेत्रामध्ये मी वटवृक्ष झालो आहे. "मला दूध दे" अशी उपमन्यूची प्रार्थना ऐकून क्षीरब्धीची वाटीच महादेवांनी त्याच्यापुढे ठेवली. ध्रुव रुसून वनात गेला. तर त्याच्या हाती ध्रुवपदाचा खाऊ देऊन वैकुंठाधिपतींनी त्याचा रुसवा काढला. माझ्यावरही माझ्या गुरूंनी अशीच अपार कृपा केली आहे. ब्रह्मविद्येचा राजा आणि सर्व शास्त्रांचे विश्रांतीस्थान असलेली गीता मी प्राकृत ओवी छंदात गावी असे माझ्या गुरूंनी केले. शब्दरूपी अरण्यात हिंडले असता अशी वार्ता ऐकली नाही की, "बोललेले सर्व शब्द खरे होतात." पण या बाबतीत त्यांनी माझी वाचाच विचारांचा कल्पवृक्ष केली. माझे देहाशी असलेले तादात्म्य सोडवले आणि माझ्या बुद्धीचे आनंदभांडारच केले. त्या गीतार्थ सागरात मनाला पोहण्याचेही श्रम ठेवले नाहीत. ते माझे मन गुरुकृपेने त्या सागरात सहज तरंगत झोपले!

श्रीगुरुंच्या लीला अशा अगाध, अनंत आहेत. शब्दांनी मी त्याचे वर्णन तरी कसे करणार? मी धीटपणाने त्यांच्या सामर्थ्यांच्या जोरावर गीतार्थाचा अनुवाद करतो आहे आणि वर विनंती करतो आहे की महाराज माझी ही धिटाई आपण सहन कराच.

आता थोडे मागे वळून पहातो. आपल्या कृपाप्रसादाने मी आतापर्यंत गीतेचे पूर्वखंड आनंदाने वर्णन केले आहे.

अनुक्रमणिका

पहिल्यापासून नवव्या अध्यायापर्यंत वेगवेगळे विषय आले आहेत. पहिल्या अध्यायात अर्जुनविषाद, दुसऱ्यामध्ये ज्ञानयोग व बुद्धियोग यांतील फरक दाखवून निष्काम कर्मयोग सांगितला. पाचव्यात गूढपणाने अष्टांगयोग सांगितला. सहाव्यामध्ये आसनापासनू ते ब्रह्मैक्यभाव समाधीपर्यंत विषय स्पष्ट केला. योगस्थिती म्हणजे काय, योगभ्रष्टाची स्थिती काय होते, अभ्यास करताना मरण आले तर काय घडते हे सर्व वर्णन त्यात आले. सातव्यात प्रकृतीचे रूप सांगून भगवंताच्या चार प्रकारच्या भक्तांचे वर्णन केले. सातव्या अध्यायात आलेल्या प्रश्नांची उत्तरे व प्रयाणसिद्धीचे विवरण आठव्या अध्यायात आले.

असंख्य शब्दब्रह्माचा अभिप्राय एक लक्ष महाभारतात आला. अठरा पर्वे महाभारतातील अभिप्राय सातशे गीतेच्या श्लोकात आला आणि सातशे श्लोकांचा अभिप्राय नवव्या अध्यायात आला आहे.

गुरुदेव रानड्यांच्या मताचा विचार केला तर नवव्या अध्यायातील—

**तरि झडझडझैनि वहिला निघ ।**
**इये भक्तीचिये वाटे लाग ।**
**जिया पावसी अव्यंग ।**
**निजधाम माझे ॥** (अ. ९-ओ. ५१६)

ही ओवी सर्वोत्कृष्ट आहे. आताच मांडलेल्या हिशोबाप्रमाणे पाहिले तर असंख्य शब्दब्रह्माचा अर्क म्हणजे ही ओवी असे म्हणायला हरकत नाही.

माऊली म्हणतात, कृष्णार्जुन संवादातील हा नववा अध्याय इतका मान्यवर आहे की ह्यात काय सांगितले हे सांगण्याचेही मला धारिष्ट होत नाही. मी उगीच गर्व कशाला करू? खरोखरच ह्या अध्यायाचे महत्त्व वर्णन करता येत नाही त्याला दुसऱ्या कशाचीही उपमा देता येत नाही. गूळ, साखर, काकवी ही तीन्हीं उसाच्या रसाचीच बांधणी खरी पण त्यांची चव जशी भिन्न भिन्न त्याप्रमाणे ह्या गीतेच्या अध्यायांचे आहे एक परब्रह्मस्वरूप जाणून त्याचे वर्णन करतात, एक ठिकठिकाणी ब्रह्मस्वरूपाची ओळख करून देतात, तर काही आपण जाणतो आहो या कल्पनेचाही निरास करून परब्रह्माशी एकरूपच करून सोडतात. नववा अध्याय तसा आहे. गीतेचे असे हे अध्याय! मी आपल्या कृपेने त्यांचा अनुवाद करू शकलो हे खरे, पण नवव्या अध्यायाचा अनुवाद करणे हे फारच कठीण होते.

पण महाराज, आपल्या सामर्थ्याचा हा प्रभाव आहे की, मी नवमाध्यायाबद्दल बोलू शकलो. आपण वसिष्ठ ऋषींच्या छाटीचा सूर्याप्रमाणे प्रकाश पाडला, विश्वामित्राकडून या सृष्टीसारखी दुसरी सृष्टी निर्माण केली गेली. एकाकडून आकाशातला सूर्य पकडून ठेवला, एकाकडून समुद्राचे आचमन करविले. ह्या सर्व अघटित करणीप्रमाणे माझ्यासारख्याकडून अनिर्वचनीय अशा ह्या नवव्याच्या अनुवाद करून घेतला.

ते असो, पण राम रावण कसे झुंजले, हे सांगण्यास राम रावण लढले तसे. असेच म्हणावे लागते.

दुसरी उपमाच देता येत नाही.

नवव्यामध्ये कृष्णाचे बोलणे कसे, तर नवव्यात आहे तसे असेच सांगावे लागते. केवळ अनुपमेय असा हा अध्याय आहे. ज्यांच्या हाती गीतार्थ आला आहे त्यांना हे माझे म्हणणे निश्चित पटेल.

याप्रमाणे या नऊ अध्यायांवर माझ्या बुद्धीप्रमाणे मी व्याख्यान केले आहे. गीता ग्रंथाचे उत्तरखंड आता दहाव्या अध्यायापासून सुरू होते आहे. या दहाव्या अध्यायात सामान्य व विशेष विभूति देव अर्जुनास समजावून सांगत आहेत ती कथा कौशल्याने व रसपूर्ण शब्दात सांगितली जाईल. भाषा मराठीच असेल पण तिचा डौलदारपणा असा असेल की त्या ओव्या साहित्याचा अलंकार ठरतील. रस असे असतील की शांतरस श्रृंगाराला जिंकेल. ओव्यात अभिप्राय इतका तंतोतंत उतरेल की मूळ ग्रंथातील संस्कृत श्लोकांशी तुलना करून पाहिले तर मूळ ग्रंथ कोणता हे कळणारसुद्धा नाही. सुंदर स्त्रीने अमोल अलंकार अंगावर घातले की कुणी कुणाची शोभा वाढविली हे ठरविणे कठीण आहे. निर्णय करताच येत नाही तसे घडेल. मराठी आणि संस्कृत ह्या दोन्ही भाषा एकाच सुंदर सुखासनावर इथे बसलेल्या आहेत. काय ते निर्मळ रूप! आपण ते दोघींचे रूप डोळे भरून पहावे आणि त्याच्या दोघींच्या तोंडून निघणारा एकच अभिप्राय जीवाच्या कानाने ऐकावा. त्याच्या त्या शब्दा शब्दातून भाव रूप घेऊन उठू लागला की मग आपल्यावर नवरसांचा जणू वर्षाव होऊ लागतो. चातुर्य म्हणू लागते, “काय सांगावे ह्या सोहळ्यात आज आम्हाला प्रतिष्ठा की हो प्राप्त झाली!”

हा गीतार्थ सांगताना मी मराठीचे सगळे लावण्य एकत्र केले आहे. रसरशीत जीवनरसाने ऐन तारुण्यात असलेली ही देखणी देशी बोली गीतेचा अर्थ सहज सांगू शकली आहे. महाराज, म्हणून मी आता आनंदाने दहाव्या अध्यायाकडे वळतो.

मी निवृत्तीचा ज्ञानदेव सांगतो आहे की, संपूर्ण जगाचा श्रेष्ठ गुरु असलेला व शहाण्यांच्या चित्तालाही चकित करणारा तो यादवश्रेष्ठ अर्जुनाला म्हणाला, “अर्जुना, मी तुला आतापर्यंत जे ज्ञान सांगितले ते तू फार चांगल्या एकाग्रतेने ऐकले आहेस. तू जे प्रश्न विचारलेस ते ऐकले की, ज्ञान तुझ्या मनात ठसले आहे, आणखी जाणून घेण्याची तुला इच्छा आहे उत्सुकता आहे व योग्यताही आहे हे मला समजले.”

आतापर्यंत मागे मी जे निरूपण केले ते तुझे लक्ष किती आहे हे अजमावून घेण्यासाठी! ते अपुरे नाही पूर्ण आहे, तेव्हा आता आणखी विवेचन करण्यास हरकत नाही असे मला वाटते. घड्यातून पाणी गळते आहे की काय हे पाहण्यासाठी थोडे पाणी घालून पहावे आणि गळत नाही असे समजल्यावर मगच तो पुरता भरावा त्याप्रमाणे तू नीट ऐकतोस हे कळल्यावर तुला आणखी तत्त्वज्ञान ऐकवावे. एखाद्या अवचित जवळ आलेल्या माणसावर थोडी जबाबदारी टाकून पहावी, आणि त्याचे वर्तन चोख आहे हे ठरल्यावर त्यालाच खजिनदार करावे त्याप्रमाणे मी तुझी पारख केली आहे. अर्जुना, अरे तू निजधामच आहेस.

मोठा पर्वत पाहून मेघ गळू लागावा त्याप्रमाणे त्या सर्वेश्वराने त्या अर्जुनाकडे पाहिले आणि त्याच्या अवधानाचा पूर्ण भरवसा धरून बोलायला सुरवात केली.

तो कृपाळूंचा राजा म्हणाला, “हे महाबाहो, मी सांगितलेलाच अभिप्राय तुला पुन्हा एकदा सांगतो. दरवर्षी शेत पेरावे आणि पिकले की मग कष्टमशागतीचा कंटाळा करू नये म्हणजे मग अधिकाधिक पीक येऊ लागते. सोन्याला पुन्हा पुन्हा पुटे दिल की हीण जाऊन सोन्याचा कस वाढत जातो आणि म्हणून सोने आणखी आणखी शुद्ध करावेसे वाटते त्याप्रमाणे इथे तुला पुन्हा पुन्हा सांगण्यात माझाच आनंद वाढतो. तू उपदेश नीट ऐकतोस, तुला वाढते ज्ञान होते, आणि ते पाहिले की मी आनंदित होतो.

तुझ्यावर माझ्या ह्या पुन्हा पुन्हा सांगण्याच्या उपकाराचे मुळीच ओझे नाही. आम्ही आमच्या स्वार्थासाठी बोलतो रे. लहान मुलाला आई दागदागिने घालते, पुन्हा पुन्हा त्याच्याकडे पहाते, कौतुक करते, दृष्ट काढते, हे सगळे सोहळे आईच्या नजरेला आहेत. दागिने अंगावर वागवणाऱ्या मुलाला त्याचे काय सुख आहे? सुख भोगणारी तर आईची दृष्टी असते. पण हे अलंकारिक बोलणे राहू दे. पार्था, तू माझ्या इतका आवडीचा आहेस की तुझ्याशी किती बोलले तरी पुरे होत नाही. तृप्ति होतच नाही. तुझ्याशी फिरून फिरून तोच विषय बोलण्याचे कारण तरी तेच आहे. पण सख्या, तू अगदी मनापासून लक्ष दे बर का. तुला वाटेल मी तुला नीट ऐक, लक्ष दे, अवधान दे कळले की नाही असे सारखे का विचारतो पण अर्जुना विषयच तसा गुंतागुंतीचा आहे. हे सगळे जग जसे असते तसे दिसत नाही आणि दिसते तसे असत नाही. म्हणून फार काळजीपूर्वक ऐकून समजावून घेतले पाहिजे.

एकतर हा विषय शब्दात सापडत नाही. पण अर्जुना, माझे हे श्रेष्ठ बोलणे नीट ऐक, कारण प्रत्यक्ष परब्रह्मच शब्दांचा अंगरखा घालून तुला आलिंगन देण्यास आले आहे.

किरीटी, आता हे परब्रह्म म्हणजे तुझ्यापुढे उभे असलेले हे चतुर्भुज स्वरूप तेव्हढेच असे नव्हे तर हे सगळे विश्वच मी आहे. त्या विश्वातच मला पहायला हवे. विश्वात्मक अशा मला पहाण्यासाठी आधी काही ठळक जागी पाहून मग हळूहळू संवय करून घ्यायला हवी. माझे स्वरूप कुठल्याच बाजूने मर्यादित नाही. माझ्याशिवाय जगात वस्तूच नाही पण ही समजूत प्राप्त होण्यास आधी अभ्यास करायला हवा.

मग अशा अभ्यासासाठी मला कुठे पहावे, अशी शंका तुझ्या मनात येईल म्हणून तुला सांगतो की, माझे भाव असे आहेत, मी असा आहे. अर्जुना, लक्षात घे की, हे भाव भिन्न भिन्न प्राण्यामध्ये त्यांच्या त्यांच्या प्रकृतीसारखे बनून संपूर्ण त्रैलोक्यांत पसरले आहेत.

त्या भावामध्ये मुख्य आहे “बुद्धि” भवानी सहस्र नामामध्ये सुरवातीस देवीला नमस्कार करताना “सर्वस्य बुद्धिरूपेण जनस्य हृदि संस्थिते । स्वर्गापवर्गदे देवि नारायणि नमोस्तुते” असे म्हटले आहे.

देवांच्या ह्या सांगण्याप्रमाणे ही बुद्धि प्रत्यक्ष भगवंताचा भाव आहे. स्वर्ग आणि मोक्ष हे दोन्ही मिळवून देण्याचे सामर्थ्य म्हणून ह्या भावाच्या ठिकाणी आहे.

देव पुढे म्हणाले, अगाध ज्ञान हाही माझा भावच. समोर असलेल्या पदार्थाकडे विवेकपूर्ण दृष्टीने पहावयास हे ज्ञान शिकवते. सहज सहन करण्याची शक्ति, क्षमा आणि सत्य तसेच मनोनिग्रह, इंद्रियनिग्रह,

लोकांत असलेले सुख आणि दुःख असणे आणि नसणे, यांचा अंतर्भाव माझ्याच भावामध्ये कर. भय आणि निर्भयता, अहिंसा आणि समता ही माझीच रूपे आहेत. दान यश, इतकेच काय पण अपकीर्ती हे विकार प्राण्यांच्या ठिकाणी माझ्यापासूनच उत्पन्न होतात. हे प्राणिमात्र जसे निरनिराळे आहेत तसेच हे भाव वेगवेगळाले आहेत असे समज. कित्येक भाव माझ्या ज्ञानात उत्पन्न होतात तर कित्येक भाव मला न जाणल्याने म्हणजे माझ्या अज्ञानाने होतात.

अर्जुना, मी असे म्हटले म्हणून तुला आश्चर्य वाटेल पण प्रकाश आणि अंधार ही दोन्ही एका सूर्यापासूनच होतात ना? सूर्य असला की, प्रकाश पडतो आणि सूर्य नसला की अंधार पडतो तसेच हे घडते म्हणून प्राण्यांनी मला जाणले की, माझ्या ज्ञानामुळे दिसणारे भाव प्रगट होतात आणि मला जाणले नाही की माझ्या अज्ञानामुळे दिसणारे भाव प्रगट होतात म्हणजे त्या प्राण्यांच्या क्रियेद्वारे मग ती भावनिक असो, मानसिक असो, बौद्धिक असो वा शारीरिक असो, कोणता भाव प्रगट व्हावयाचा हे त्या व्यक्तीच्या माझ्याबद्दलच्या ज्ञानाच्या वा अज्ञानाच्या पातळीवरून ठरते.

साधुसंतांच्या चारित्रावरून ह्या देवांच्या सांगण्याचा थोडा उलगडा होतो. श्री. स्वामी समर्थ अक्कलकोट यांच्या चरित्रातील एक प्रसंग आठवतो. बंबगार्डसाहेबाजवळ एक वानरी होती. ती माणसाच्या अंगावर जाऊन चावत असे. साहेबांच्या अंगावर धावून चावण्यास गेल्यावर त्यांनी रागाने तिला गोळी घालण्याचा हुकूम केला. दोन चार माणसे व शिपाई तिच्या पाठीस लागले. ती पळत पळत खंडोबाच्या देवळाच्या भिंती आड लपली. समर्थांचा सेवेकरी भुजंगा समर्थांकडे धावत जाऊन म्हणाला, “महाराज, शिपाई वानरीला ठार मारत आहेत. तिला इकडे आणू का? महाराज म्हणाले, “घेऊन ये तिला”. भुजंगा गेला आणि म्हणाला, “सुंद्रे, तुला स्वामी समर्थ बोलवत आहेत. चल ये.” पाळीव कुत्र्याप्रामणे वानरी समर्थांच्यासमोर गेली आणि त्यांच्या पायावर गडबडा लोळू लागली. महाराज तिला म्हणाले, “काय ग? लोकांना चावतेस काय? तुला मस्ती आली? आजपासून कुणाला चावू नकोस. चावलेस तर लाख लाख कोरडे मारू.”

यानंतर वानरी कुणालाही चावली नाही. स्वामी समर्थ असतील तेथे ती झाडावर बसे. कधी कधी माणसांतही येऊन बसे. महाराज कधी कधी तिच्या डोक्यावर आपली टोपी घालत. कधी तिला पेढे खाऊ घालत. शेवटी त्या वानरीने समर्थांच्या पायाजवळ देह ठेवला.

देव सांगत आहेत की, त्या वानरीच्या देहातून प्रथम प्रगट होणारे दुःखदायक वर्तन हाही माझाचा भाव पण तो प्रगट होत होता, माझ्याबद्दलच्या अज्ञानाने! समर्थांच्या दृष्टीतून माझ्या ज्ञानाचा प्रकाश त्या वानरीच्या बुध्दीत मावेल एवढा पडल्याबरोबर तिचे वर्तन सुखदायक होऊ लागले. इतकेच नव्हे तर त्या देवमूर्तीच्या पायाजवळ तिला मरण लाभले.

शेगावच्या गजानन महाराजांच्या चरित्रात असेच परिवर्तन घोड्याच्या वृत्तीत झाल्याचा प्रसंग आहे. हरदासाचे घोडे अत्यंत नाठाळ! टापांच्या लाथा मारणार, चावे घेणार, असे त्याचे वर्तन, त्याला रात्री बळकट बांधावे लागे. एकदा महाराज त्या घोड्याच्या चारी पायांच्या मधे जाऊन झोपले. हरदासबुवा सकाळी उठून पहातात तो घोड्यांच्या टापांच्यामध्ये तर गजानन महाराज! हा देखावा पाहून ते खूप घाबरले. पण जवळ

जाऊन पहातात तर गजानन महाराज आनंदात झोपले आहेत आणि घोडा अगदी शांतपणे मोकळा उभा. त्याच्या स्वभावतच क्रांती झाली आणि ह्या प्रसंगानंतर हरदासाला घोड्याला कधी साधी काढणीही लावावी लागली नाही! संतांच्या सहवासाने घोड्याच्या मनाचा भाव बदलून गेला.

एकदा भगवान बुद्ध राजगृहामध्ये असताना भाऊ देवदत्त त्यांच्याशी ईर्षा करीत होता. बुद्धदेव नगरात भिक्षेसाठी जात असता देवदत्ताने नालागिरी नावाचा प्रचंड हत्ती रस्त्यावर सोडला. माहुताला आज्ञा होती की हत्ती बुद्धदेवांच्या थेट अंगावर घालावा. मस्तीत असलेला तो हत्ती कान फडफड करीत जोराने चाल करून बुद्धदेवांच्या अंगावर येऊ लागला. इतर भिक्षूंनी प्रार्थना चालवली, “भंत्ते, हत्ती मस्तीत आहे. प्राण घेईल, आपण रस्त्यातून बाजूला व्हावे महाराज, त्वरा करा हत्ती चाल करतो आहे” तथागतांनी आश्वासन दिले, “भिक्षू हो, अहिंसेचे बल श्रेष्ठ आहे.”

हत्ती तर जवळजवळ येत चालला. भगवानांनी करुणादृष्टीने त्याच्याकडे नजर लावली. असे वाटले की त्यांनी त्या पशूच्या डोळ्याला डोळा भिडवून त्याच्या हृदयात प्रवेश केला आणि त्याचे हृदय तमोगुणाने भरले होते, अंधार होता तिथे प्रकाशच नेला. हत्ती आता मोहरा करणार असे सर्वांना वाटले तोच त्याने सोंड खाली केली, गुडघे टेकले आणि बुद्धदेवांच्या श्रीचरणाजवळ मस्तक टेकवले. अहिंसा हा देवाचा भाव असा प्रगट झाला. हिंसेने नतमस्तक होऊन आत्मसमर्पण केले. देवाच्या स्पर्शाच्या अभावात ते जे तामस गुण त्या हत्तीच्या स्वभावात प्रगट होत होतेच ते देवाची जाणीव झाल्या क्षणी सत्वभावात उत्क्रांत झाले. ह्या तिन्ही गोष्टी पशूंचे स्वभाव बदलण्याच्या आहेत. यावरूनच लक्षात घ्यावयाचे की देवाची पावले आपल्या अंतःकरणास लागली की आपल्या तामस व राजस वृत्तीचा लोप होऊन सात्विकाचा अलोट प्रकाश पडण्यास किती वेळ लागणार? असेही मनात येते की जोवर भगवंताचे नाम मुखात आणि रूप मनात असेल तोवर तामस वृत्ति उठणारच नाही. म्हणूनच साधुसंत नाम व स्वरूप ध्यान याबद्दल सारखे बोलत असावे. अखंड नाम मुखात असू दे, ध्यान देवाकडे असू दे असे म्हणत असावे.

देव पुढे म्हणाले, “अर्जुना, प्राण्यांच्या दैवाप्रमाणे हे भाव प्राण्यांच्यामध्ये कमी जास्त प्रमाणात व्यक्त होतात पण ही सगळी जीवसृष्टि माझ्या ह्या विकारात म्हणजे ह्या ना त्या भावात सापडलेली आहे.

या सृष्टीचे पालन करण्यासाठी व जीवांचे नियमन करण्यासाठी मी माझ्यामनापासून अकराजण निर्माण केले आहेत. कश्यपादि, सप्तर्षि सर्व गुणांनी श्रेष्ठ असे ज्ञाते मी उत्पन्न केले. चौदा मनुंपैकी स्वायंभू, स्वारोचिष, उत्तम, तामस, रैवत, चाक्षुष वैवस्वत, सावर्णिक, दक्षसावर्णि, ब्रह्मसावर्णि, धर्मसावर्णि, रुद्रसावर्णि, देवसावर्णि, इंद्रसावर्णि यापैकी चार मनू उत्पन्न केले. सृष्टीच्या व्यापारासाठी सप्तर्षि व चार मनू हे अकराजण प्रथम माझ्या मनापासून उत्पन्न झाले. स्वर्गादि लोकांची व्यवस्था लागली नव्हती. या त्रिभुवनापैकी काहीच अस्तित्वात आले नव्हते. महाभूतांचे समुदायही झाले नव्हते. त्यावेळी अकरा जणांची निर्मिती झाली. त्यांनी लोकपाल निर्माण केले. इंद्र, अग्नि, यम, वरुण, नैऋति, वायु, कुबेर, ईशान हे आठ लोकपाल आठ दिशांचे स्वामी केले व त्या लोकपालांनी नानाप्रकारचे लोक उत्पन्न केले. वर सांगितलेले अकरा हे अकरा राजे आहेत व बाकीचे अष्ट दिग्पाल त्यांची प्रजा आहे हा असा माझाच विस्तार आहे हे समजून घे.

अनुक्रमणिका

हे पहा आरंभी बी एकच असते ते अंकुरले की, त्याचे खोड होते. त्या खोडाला फांद्या फुटतात, मोठ्या फांद्यापासून शाखोपशाखा निघतात, शाखांना पुढे पालवी आणि पाने फुटतात. पालवीनंतर फुले व मग फळे आली की, पूर्ण वृक्षत्व झाले, पण विचार करून पाहिले तर सगळे मूळात बीज असते. त्या बीजाचा हा सगळा विस्तार असतो. खोड, शाखा, पालवी, पान, फूल, फळ या रूपाने बीजच विस्तार पावते. त्याप्रमाणे प्रथम मी एकटाच! माझ्या मनापासून सप्तर्षी मनू झाले, त्यांनी लोकपाळ निर्माण केले, त्या लोकपाळांनी लोक व नंतर प्रजा निर्माण केली. याप्रमाणे मीच ह्या सर्व विश्वाला जन्म दिला आहे. पाहणाऱ्याने त्या दृष्टीने पाहिले की सहज पटेल. किरीटी मीच विश्व झालो आहे हे तू जाणतोस काय? जाणणे फार कठीण आहे.

महर्षि आणि देव यांचा मी आदि असल्याने त्यांनाही मला जाणणे कठीण आहे. पर्वतावरून खळखळ करीत खाली आलेले पाणी जर आपोआप पुन्हा वर चढले, उंच वाढलेले झाड जर पुन्हा मूळाकडे आले, सूक्ष्म अंकुरात जर वटवृक्ष सापडला, तरंगामध्ये जर समुद्र साठवला गेला, परमाणूमध्ये जर भूगोल मावला, तरच माझ्यापासून निर्माण झालेल्या जीवांना, महर्षिंना वा देवांना मला जाणण्याची शक्ति येईल.

मला जाणण्यासाठी पुष्कळांनी पुष्कळ प्रयत्न केले पण त्यांना माझे ज्ञान झाले नाही.

वेदांनी माझे स्वरूप जाणण्याचा प्रयत्न केला पण ते मुके होऊन राहिले. त्यांना माझे स्वरूप कळलेही नाही आणि सांगताही आले नाही.

मन आणि प्राण यांनी यत्न केला पण त्यांची गती चालेना. चंद-सूर्य यांच्या प्रकाशात माझे स्वरूप दिसेना.

उदरातील गर्भाला जसे आपल्या मातेचे वय सांगता येत नाही तसे देवादिकांना माझे ज्ञान होत नाही. समुद्रातील माशांना समुद्राचा अंतपार लागत नाही, चिलटाला समुद्र ओलांडून जाता येत नाही, त्याप्रमाणे महर्षींनाही माझे ज्ञान होत नाही. त्यांच्या ज्ञानाच्यापलीकडे मी आहे. मी कोण, केवढा, कधी माझी उत्पत्ती झाली, याचा निर्णय करण्याच्या त्या महर्षींच्या प्रयत्नात युगेच्यायुगे संपली, पण त्यांना निश्चयात्मक काही सांगता आले नाही. तुझ्या मनात येईल की, "कुणालाच जे जाणता आले नाही ते मला कसे येईल? जाणून घे, जाणून घे या देवाच्या म्हणण्यात तथ्यच नाही." पण तसे नाही. मला जाणण्याचा मार्ग आहे, मला जाणणारेही आहेत.

"अर्जुना, मी जाणण्यास कठीण आहे हे खरे आहे. पण काहीजण बाह्यवृत्ति टाकून देतात, देह प्रपंच ह्या आत्म्याव्यतिरिक्त असणाऱ्या गोष्टीकडे जाणारी वृत्ति आवरून धरतात. देहाची आणि प्रपंचाची आठवण इंद्रियाद्वाराच येते म्हणून ते वृति इंद्रियांकडे जाऊच देत नाहीत. माझ्या स्मरणात देह विसरूनच जातात."

भाऊसाहेब महाराज उमदीकर यांच्या शिष्यांनी एकदा विचारले, "महाराज, नामस्मरण कसे करावे?" ते म्हणाले "सांगू या केव्हा तरी." मग पुढे एकदा शिष्यांसह जंगलात गेले, आणि तिथेच आसन घातले आणि शिष्यांना म्हणाले, "पहा रे बुवा, नामस्मरण असे करावे." शिष्यमंडळी उत्सूकतेने पाहू लागले. महाराजांनी

डोळे मिटून नामस्मरण सुरू केले मध्यान्ह रात्र झाली, उलटली, उजाडले आणि मग महाराजांनी डोळे उघडले. शिष्याला म्हणाले, “जरा पाठील झुमझुमते आहे पहा बरे.” शिष्य जाऊन पहातो तो काय सगळी पाठ तांबड्या मुंगळ्यांनी फोडून काढली होती. तो म्हणाला, “काय हो ह्या पाठीची दशा झाली महाराज! खाऊन टाकली की पाठ मुंगळ्यांनी!”

भाऊसाहेब महाराज म्हणाले “असे झाले काय बाबा?” पण मला तर काही कळले नाही.” थोड्या वेळाने महाराज शिष्यांना म्हणाले, “असे नामस्मरण करावे बरं का?”

इतके देहाचे भान विसराचे किंबहुना आपोआप देहाचा इतका विसर पडावा. लक्ष नामात इतके रंगावे असे महाराजांनी सुचविले. वाटते की नामाचाही पूर्ण विसर पडून जेव्हा का वृत्ति परब्रह्मस्वरूपच होऊन जाईल तेव्हाच ही अवस्था होणे शक्य आहे.

देव सांगत आहेत, “अरे, असे जे माझे भक्त ते देहाकडे मनाला जाऊ न देता माझे स्मरण, चिंतन करतात ते माझे स्वरूप जाणू शकतात. कधी त्या भक्तांची वृत्ति देहाकडे गेलीच तर ती तात्काळ वेगाने मागे फिरते. देह कुठल्या कुठेच मागे टाकते, पंचमहाभूतांच्या माथ्यावर पाय देते आणि मग ते भक्त उत्तम प्रकारे स्थिर होऊन शुद्ध आत्मप्रकाशात माझे जन्मरहित अस्तित्व प्रत्यक्ष पाहतात. ते माझे रूप प्रत्यक्ष डोळ्यांनी पहातात याचा अर्थच ते माझ्याशी एकरूप होतात. आरंभापलीकडील आणि सर्व लोक महेश्वर असा मी त्याची त्यांना प्रत्यक्ष अनुभूति येते ते मला जाणतात आणि त्याच अवस्थेत स्थिर राहतात, तिथून हालत नाहीत.”

पूज्य भाऊसाहेबमहाराजांची आणखी एक गोष्ट. एकदा ते नेमास बसले असताना खूप उशीर झाला, आरतीची वेळ टळून जाऊ लागली. शिष्यांनी नामगजर केला, झांजा, टाळ वाजविले. काहीच हालचाल होईना. मग दाराला कडी होती ती खूप जोरजोराने वाजविली व शेवटी हाक मारली.

महाराज थोड्या वेळाने बाहेर आले आणि म्हणाले, “अरे मला सगळे ऐकू येत होते. तुमचा गजर, टाळ, मृदंग सगळे मी ऐकले. पण मी अशा एका जागी जाऊन बसलो होतो की तिथून खाली येण्याची मला इच्छाच होईना. काय करू? तर अशी ही स्थिती!

देव कौतुकाने सांगत आहेत, “पार्था, असा जो माझा भक्त आहे ना, त्याला बाह्याकार माणसाचा म्हणून मनुष्य म्हणावयाचे एवढेच. अरे, ते माझेच चालते बोलते रूप आहे असे मानावे. तो पाषाणात परिस, रसामध्ये अमृत, चालते बोलते ज्ञानाचे बिंब मानावे. त्याचा वरवरचा माणुसपणा हा लोकांच्या दृष्टीचा भ्रम आहे. त्याचे अवयव म्हणजे साधे अवयव नव्हेतच. ते तर सुखाला फुटलेले कोंबच आहेत रे.”

मनुष्याकृतीमुळे तो जगात सापडलेला दिसू दे पण त्याला प्रकृतिधर्म बाधक होतच नाहीत. प्रकृतितून सहज निर्माण होणारे दोष त्याच्या ठिकाणी दिसतच नाहीत. अवचित कापरात हिरा पडला आणि मग तो जरी त्या कापराबरोबर पाण्यात पडला तरी कापराबरोबर पाण्यात विरघळतो थोडाच!

अनुक्रमणिका

अर्जुना, प्रकृतिदोष कुठे निर्माण होतो सांगू का? तो होतो संकल्पामध्ये. चंदनाच्या झाडाला सर्प वेढून असतात. कुठवर? जोवर त्या झाडाला आग लागली नाही तोवर! एकदा अग्नि पेटला की ते इतके दिवस झाडाला वेढून राहिलेले साप भराभरा विळखे काढून निघून जातात. त्याप्रमाणेच त्या ज्ञानी पुरुषाने मला जाणल्याबरोबर संकल्प त्याला सोडून निघून जातात आणि अर्थात्च  संकल्पाबरोबर पापही!

या जगात माझ्याच भावांनी हे विश्व व्यापले आहे हे तो माझा भक्त जाणतो. वेगवेगळ्या भूतामध्ये वेगवेगळे भाव प्रगट झाले तरी ते सगळे माझेच आहेत हे त्याला कळते आणि म्हणून मुंगीपासून ब्रह्मदेवापर्यंत माझ्याशिवाय दुसरे काहीही नाही असे तो म्हणतो. त्याने हे माझे अमर्याद रूप जाणले असल्यामुळे त्याच्या ठिकाणी ज्ञानाची पूर्ण जागृतावस्था आहे असे म्हणावे. जन्ममृत्यूचे स्वप्न आता त्याला कसे पडेल? तो तर पुरा जागा झाला त्याच्या दृष्टीत आता उत्तम, मध्यम, कनिष्ठ असाही भेद उरत नाही. मी माझ्या विभूति आणि प्राणी ह्या सर्वांना तो ऐक्य भावानेच पहातो. आता ह्या संशयरहित महायोगाने तो मनाच्याद्वारे माझ्याशी एकरूप झाला, कृतार्थ झाला यात संशय नाही. असा हा माझा भक्त मग मलाच आपल्या भजनाच्या छंदात गोवतो. त्याच्या त्या अभेद भक्तीत मग कधीच खंड पडत नाही. जन्मोजन्मी तो आनंदाने ह्या भक्तीची वाट चालतो. त्याचे माझे ऐक्य कशाप्रकारचे आहे हे सांगू का अर्जुना? ऐकायचे आहे का तुला?

तो भक्त वाटेल तिथे मला पहातो. म्हणतो, “अहो ह्या जगताला उत्पन्न करणारा आणि पालन करणारा तर हा एकटाच आहे. पण त्याने उत्पन्न केले म्हणजे काय केले? तर तो स्वतःच ती ती वस्तु झाला. कीड, मुंगी, पशुपक्षी, वृक्ष, पाषाणापासून माणसापर्यंत तर तो तोच झाला आहे. दुसरे आहे काय जगात?

मीराबाई एकदा एका संताच्या दर्शनाची इच्छा करीत होत्या. त्यांनी तशी परवानगी विचारली तेव्हा ते म्हणाले, “मी फक्त पुरुषांना भेटतो. स्त्रियांचे दर्शन मला वर्ज्य आहे.”

मीराबाईंनी उत्तर पाठविले, “आपण हा दुसरा पुरुष कोठून आणला? जगात एक तो पुरुषोत्तमच, एकटा पुरुष आहे. आपण तर सगळ्या स्त्रियाच!”

देव म्हणत आहेत, “त्या भक्ताला वाटते की, लाटांचे स्वरूप पाणीच. त्यांचा जन्म पाण्यापासून पुन्हा त्या विरणार पाण्यातच. त्याप्रमाणे ह्या जगाचे आस्तित्व त्या परब्रह्मातच आहे लाटांच्या माळात जसे पाणीच तसा ह्या विश्वात एक मीच असे माझे व्यापक स्वरूप जाणून त्यांची भक्ति चालते. मग अशा भक्तिला काळवेळ कुठला रे? माझ्या भक्ताच्या हृदयात माझ्याबद्दल इतके प्रेम उदित झालेले असते की, वायू आकाश होऊन आकाशात मुरावा त्याप्रमाणे तो माझ्यात विरत विरत भजन करतो. देश, काळ, वर्तमान सर्व काही मलाच समजतो.

माझ्या ह्या विश्वरूपाशी खेळत, त्रिभुवनात रमत, गमत, माझे ते जगद्रूप मनात साठवत तो भक्त माझी भक्ति करतो.

आता हे भगवद्रूप जगात तो कसे पहातो असे कदाचित तुझ्या मनात येईल म्हणून सांगतो.

“पार्था, जो जो प्राणी भेटेल तो तो भगवंत आहे असे तो समजतो. सख्या रे, हा असा माझा भक्तियोग खराखुरा भक्तियोग आहे हे नीट लक्षात घे बर का.

जी स्वरूपाची जाणीव देवाना किंवा महर्षींनाही झाली नाही, होत नाही, होणार नाही, ती जाणीव आपणहून कशी त्या भक्तांच्या स्वाधीन होते बघ. ह्या महर्षीची, देवांची, काय चूक होते सांगू का अर्जुना? ते शोधत रहातात बाहेर आणि मी लपलेला असतो त्यांच्याच हृदयात! हा भक्त बाहेरची दारे बंद करतो, आणि मी जिथे असेन तिथून मला शोधून काढतो आणि मी सापडलो की माझ्याशी एकरूपच होऊन जातो. अर्जुना आता तो मला सोडून कुठे जात नाही आणि मी तरी त्याला सोडून जाऊ कुठे? कुठल्याही आकृतीत लपलो तरी तो मला क्षणार्धात शोधून काढतो आणि मला कवटाळतो. अरे तो चित्ताने मीच झाला आहे. माझ्यामुळेच तो जीवेभावे तृप्त झाला आहे. आणि या जाणिवेच्या धुंदीमध्ये जन्म-मरण ह्याचेही त्याला विस्मरण झाले आहे, तो त्या बोधाच्या आनंदाने नाचतो आहे असे होते.

आणि अर्जुना, असे माझे भक्त जर एकत्र आले तर मग तो सोहळा विचारूच नको आधी बोध झाल्याने एकटाच नाचत असलेला या भक्ताला आपल्यासारखाच दुसरा भक्त भेटला की त्या दोघांच्या संवादाचे सुख नाचू लागते. माझ्याच कथा एकमेकांना सांगत ते इतके काही रंगून जातात की, जवळजवळ असलेली दोन सरोवरे उचंबळून एकमेकांत कालवतात आणि मग त्या तरंगाना तरंगाचीच प्रचंड देवालये होतात तशी त्या भक्तांच्या भेटीत आनंद कल्लोळाची वेणी पडते. बोधाची लेणी बोधाच्या आनंदात बोधावर चढतात. सूर्यानेच सूर्याला ओवाळावे, चंद्राने चंद्राला अलिंगन द्यावे, दोन सारखे ओघ वहात येऊन एकमेकांत मिसळावे तसे घडते. तशी त्यांची भेट होते. ऐक्य भावाचे प्रयागच होते, त्या संगमात सात्विक भावाचे जहाज तरंगू लागते. संवादाच्या चव्हाट्यावरचे ते गणपति होतात. अरे, मग त्या महासुखाच्या भराने ते देहाच्या गावाबाहेर धावत येतात आणि माझ्यामुळे तृप्त झालेले ते माझे भक्त गर्जना करू लागतात. एकांतामध्ये हळूंच फक्त त्याला ऐकू जाईल अशा गुप्ततेने गुरु शिष्याला एकाक्षराचा, ॐकाराचा बोध करतात. तो ॐकार ते प्रगटपणे सर्व जगांत मेघाच्या गडगडाटाप्रमाणे गर्जू लागतात. कमळाची कळी उमलली की हृदयात असलेला तो सुवास ती लपवून ठेवत नाही. राजाला, रंकाला सुगंधाचे पारणे घालते त्याप्रमाणे माझ्या कथा जगाला सांगतात, सांगण्याच्या आनंदात कथा सांगणेच विसरून जातात, आणि त्या विस्मरणात आंगे जीवे स्वतः विरूनच जातात.

रामानुजाचार्यांना राममंत्राचा उपदेश गुरूंनी केला आणि सांगितले की, “हा तारक मंत्र आहे. हा कुणाला सांगायचा नाही. अगदी गुप्त ठेवायचा. हा तुला तारून नेईल.”

रामानुजाचार्य मंत्र जपू लागले. मग काही दिवसांनी त्यांच्या मनात आले की हा जर तारून नेणारा मंत्र आहे तर सर्वांना कळलाच पाहिजे. त्यांनाही तो तारक होईल. “मोठमोठ्याने त्या मंत्राचा उच्चार करून सर्वांना त्याचा उपदेश करण्यास त्यांनी सुरुवात केली. गुरूंच्या कानी हे गेले तेव्हा ते रामानुजाचार्यांना रागावले. पण त्यांनी गुरूंचीच यथायोग्य समजूत घातली व उपदेश चालू ठेवला. ते गुरूंना म्हणाले की, “एवढ्या मोठ्या लाभापासून लोकांना वंचित ठेवणे बरोबर आहे काय?” गरूंनाही ते म्हणणे पटले.

देव म्हणाले, “त्यांचे माझ्यावरचे प्रेम असे भक्त सहवासात इतके वाढते की त्यांना रात्र आणि दिवस कळेनाशी होतात. माझे अव्यंग सुख ते पूर्णपणे अव्यंग सुख ते पूर्णपणे आपलेसे करून घेतात.

मग मी त्यांना द्यायचे ते काय शिल्लक राहिले? मी द्यावा असा जो शेलका सुखाचा वाटा तो तर त्याने कधीच हस्तगत करून घेतला! पार्था, ते ज्या वाटेने निघाले आहेत त्या वाटेचा सुखानुभव पाहिला तर स्वर्ग व मोक्ष ह्या देखील तुलनेने आडवाटा ठरतील?

अरे, मी त्यांना प्रेमसुख द्यावे, हे माझे देणे असावे पण ते ते आपल्या सामर्थ्यने मिळवतातच मात्र म्हणताना म्हणतात, “हे तर आम्हाला देवाने दिले.”

मग मला एवढेच काम राहते की ते प्रेमसुख वाढवावे आणि काळाची दृष्टि त्यावर पडू नये म्हणून जपावे. पुनर्जन्म घेऊन पुन्हा भक्ति करावी अशी त्याची इच्छा असेल तर या जन्मातील त्या भक्ताची भक्ति जशीच्या तशी संभाळून पुढच्या जन्माच्या पहिल्या क्षणातच त्याच्या स्वाधीन करावी, कुठे काही अपूर्णता अजून त्या भक्तित शिल्लक असली तर जन्मांतरात पूर्णावस्था द्यावी हे काम मी मोठ्या आनंदाने करतो. लाडके मूल असले की किरीटी, आई त्याला आपल्या देहाची गवसणी घालते, अहोरात्र त्याच्यावर पहारा करते, ते मूल खेळत असले तरी आगे मागे धावते, त्याला जो खेळ हवा असेल तो सोन्याचा करून त्याच्यापुढे ठेवते. अर्जुना, त्याप्रमाणे माझ्या भक्तांना जी जी भूमिका प्रिय असेल ती ती देतो. मालुताई, ह्या ओव्या वाचताना मला आमच्या लहानपणाची आठवण येते. हत्ती, अंबारी, त्यात बसवायच्या मोर्चेले घेतलेल्या दासी चांदीच्या होत्या. ताटे, वाड्या, तांबे, भांडी चांदीची, जाळीची ट्रंक चांदीची आणि राजाना मोटारीची आवड तर ती सोन्याचे काही भाग असलेली चांदीची! आमच्या पणजीबाईसाहेबांनी आमच्या आजोबांच्या, सरकारच्या स्वयंपाकासाठी चांदीची भांडी घडवली होती हे वरचेवर ऐकल्यामुळे आपला खेळ काही वेगळ्या प्रकारचा आहे हे ध्यानात यायचे नाही. देवांच्या मूर्ति, ही चांदीची भांडी वगैरे खेळ हुजरे रोज एवढा मोजून जपून का कपाटात ठेवतात हेही कळायचे नाही. आणखी एक गंमत आठवते. आमच्या खेळातल्या देवाची पालखी दर एकादशीस निघायची पागेतील स्वार व नोकर कौतुकाने भजने म्हणायला यायची.

**आला माझा अवधूत ।**
**पायि खडावा गर्जत ।**
**गुरुदत्ता गुरुदत्ता प्रेमानंदे अवधूता ॥**

असे भजन शंकर भोई एकतारीचा चढा सूर लावून गर्जुन म्हणायचा. तो पालखीपुढे भजन म्हणत निघाला की, नाचावेसे वाटायचे. रोज संध्याकाळी सरकारच्याकडे नमस्कारास गेले की, सरकार दिवसभराच्या कार्यक्रमाची चौकशी करत कधी शाबासकी देत, कधी रागावत पण एकादशीस आम्ही नमस्कार केला की म्हणायचे, “या आता. आज एकादशी. आज तुमची पालखी निघायची ना?” इचलकरंजी, कोल्हापूर वगैरे ठिकाणच्या वाड्यांना चौक आहेत. त्या चौकाला पालखी घेऊन प्रदक्षिणा व्हावयाच्या. मातुःश्री, आजी ही मोठी माणसेही पालखी पहायला उभी रहायची इतके त्या पालखीचे कौतुक. पण पालखी होती जिनगरी आणि त्यात असायचे आमचे जड गणराज! पालखी डुगूडूगू करायची, अगदी सांभाळून आणावी लागे. मग आम्ही सरकारांना म्हटले,

अनुक्रमणिका

“आमच्या देवाला पालखी हवी आहे. जिनगरी पालखीला देव जड होतात.” सरकार म्हणाले. “बरं. सावंतवाडीस मनुष्य पाठवू”.

आता इतकी लहान पालखी तयार कुठून मिळणार? दांडा तर लाकडीच करावा लागला, रंगरंगोटी चित्रे तरी निघाली पाहिजेत. पण आम्हाला घाई, एकादशी आली की वाटे पालखी कधी येणार देवाची! मग राजाना म्हणावे “राजे, विचाराना तुम्ही सरकारांना पालखी कधी येणार मग ते सरकाराना म्हणायचे” पालखी कधी येईल? सरकार म्हणायचे “येईल आता” मग शेवटी एकदा ती आली. खुतनीची सुंदर पिंजरी, गादी लोड गिरद्या असलेली पालखी पाहूल आमचा आनंद गगनात मावेना. ती पालखी आल्यावर मग आमचे गणराय, महादेव वगैरे देव अगदी आरामाने मिरवू लागले आणि आमची “गुरुदत्ता गरुदत्ता” ही टीप आणखीच वरच्या पट्टीला गेली. आई बाळाला हवा असलेला खेळ कसा पुरवते हे राजांनी “मला हत्ती हवा” म्हटल्याबरोबर सरकारांनी बंगलोरहून त्याच्याजोगा हत्ती आणवून त्यांचे लाड पुरवले. त्यामुळे ह्या ओव्या वाचल्या की आमचे लहानपण आठवते. माऊलीनी असे लहानपण प्रत्यक्ष पाहिले असेल काय असे वाटते.

“माझे भक्त जे मागतील ते मी त्यांना देतो” असे देव म्हणत आहेत. “पार्था अरे, समर्थाघरी उणे तरी काय? उपासनेच्या ज्या ज्या अवस्थेत ते असतील ती ती भक्तांची अवस्था मी सुवर्णमय करून त्यांच्यापुढे ठेवतो. ते सुखाने माझ्यापर्यंत पोचतील असे मी पहातो. हे करणे तर मला फार आवडते. अर्जुना, भक्ताला माझे कौतुक तर मला त्यांच्या अनन्यगतीची आशा! माझ्या घरी सर्व ऐश्वर्य पाणी भरते आहे पण वाण काय ती प्रेमळाची आहे आणि म्हणून आम्ही आमच्या उपासकासाठी स्वर्ग व मोक्ष हे दोन्ही मार्ग मोकळे केले आहेत. त्यांनी ह्या दोन्ही रस्त्यावरून खुशाल यावे जावे असे केले आहे. आमचे आंग लक्ष्मी आणि शेष यांच्या स्वाधीन केले आहे पण स्वार्थाचा लवलेशही ज्यात नाही असे साजूक प्रेमसुख ह्या प्रेमळ भक्तांसाठी लपवून जतन करून ठेवले. मी प्रेमळपणा देतो आणि मोबदल्यात भक्त घेतो पण अर्जुना ह्या जिवलग कथा शब्दांनी सांगण्यासारख्या नाहीतच. मी जो आत्मा त्याला त्यांनी जगण्याचे एकमेव ठिकाण केले आहे. माझ्यावाचून सर्व व्यर्थ आहे असे त्यांनी पक्के ठरविले आहे. अर्जुना, काय सांग अरे, त्या शुद्ध तत्त्वज्ञानापुढे मशालजी होऊन मी ज्ञानरूपी पोत घेऊन वाट दाखवीत चालतो. अज्ञानाच्या रात्री पडलेला घनदाट काळोख काढून टाकून त्या रात्रीचा नाश करतो आणि त्यांच्या दृष्टीपुढे कायमचा ज्ञानोदय करतो”.

प्रेमळांचा प्रियोत्तम अर्जुनाला असे म्हणाला. अमृतासारखी ही अक्षरे ऐकून अर्जुन आनंदित झाला. त्याच्या मनाला धीर आला. देव आपला त्याग करून जाणार की काय अशी जी भीती त्याला प्रथम वाटत होती ती गेली. देवाच्या कृपेचा भरवसा आला आणि अत्यंत उत्साहाने तो म्हणाला देवा, तुमच्या ह्या अमृतासारखा शब्दांनी माझे मन अगदी शांत झाले आहे. जन्मजन्मांतरी तुझी भक्ति करून आमचा सखा म्हणून या जन्मात तू आमच्या हाती आला आहेस. आता तू भक्तांचे आणि त्यांच्या भक्तीचे कसे संरक्षण करतोस हे ऐकून फारच आनंद झाला आहे. आता आम्ही कशाला भीत नाही. महाराज, माझ्या मनात आता पापपुण्याची भीती राहिली नाही की जन्ममरणाची काळजी उरली नाही. मातेच्या उदरांतील अग्निकुंडापासून आज आपण मला मुक्त केले आहे. आत्मज्ञान होणे हाच नवा जन्म आहे. तो मी आज माझा जन्म प्रत्यक्ष माझ्या डोळ्यांनी पाहिला. आता माझे जीवन मला हवे तसे माझ्या हाती आले असे मला वाटते आहे. आज माझे दैव खरेच उदयास आले आहे. माझे आयुष्य आता सफल झाले आहे. देवाच्या मुखांतून मला उपदेश झाला हे माझे केवढे भाग्य आहे! आता ह्या

वाक्यांच्या प्रकाशाने आतील अंधार फिटला आहे. म्हणून तुझे खरे रूप मला दिसत आहे. तू साक्षात् परब्रह्म आहेस. पंचमहाभूतांचे विश्रान्तिस्थान आहेस. जगन्नाथा, तू परमश्रेष्ठ, पवित्र आहेस तू त्रैलोक्याचे परम दैवत आहेत. चोवीस तत्त्वापलीकडील पंचविसावे तत्त्व तू आहेस. प्रकृतिभावाच्या पलीकडील, पैलप्रांतातील तू देव आहेस, दिव्य आहेस. स्वामी, तू तर अनादिसिद्ध आहेस हे मला कळून चुकले आहे. जीवास तुझे रूप कळत नाही असा तू आहेस हे मला समजले आहे. तू या काळयंत्राचा सूत्रधार आहेस. तू जीवानाचे आश्रयस्थान आहेस. ब्रह्मांडरूपी कढईस तू आधार आहेस. हे सर्व मला निश्चितपणे कळले आहे.

आणखीही एका प्रकाराने या अनुभवाचा थोरपणा वाटतो आहे. तुझे स्वरूप अमुक प्रकारचे आहे असे ऋषीश्वरांनी मागे सांगितले होते. त्यावेळी त्यांनी जे सांगितले त्याचे खरेपण माझ्या अंतःकरणास आज पटले आणि तेही आपणच कृपा केली म्हणून! एरवी नारद अखंड आमच्याकडे येत, अशाच अर्थाची काव्ये गात, पण त्यांचा अर्थ कधी आम्हाला समजलाच नाही. त्या काव्यांतील संगीताच्या भागाचे श्रवण सुखच फक्त आम्ही घेत असू. अहो महाराज, आंधळ्यांच्या गावात सूर्य प्रकाशमान झाला तर त्यांना फक्त प्रकाशातील ऊब तेव्हढी जाणवणार, प्रकाशाचा अनुभव त्यांना येणारच नाही तसे आमचे होत होते. देवर्षि गात होते अध्यात्म! आम्ही त्या गाण्यांतील मधुरता ऐकत होतो, वाखाणत होतो. तेव्हढीच आम्हांला मिळाली. बाकी त्यांतील तो गंभीर भाव आमच्या कधी ध्यानी आलाच नाही. असित, देवल इत्यादी ऋषींच्या तोंडून “तू अशा स्वरूपाचा आहेस” हे ऐकत होतो. पण बुद्धी विषय विषाने व्यापली होती. त्यावेळी त्या विषाचा इतका अम्मल होता की जीवाला गोड अध्यात्म कडू लागत होता आणि कडू विषय गोड वाटत होते. आणखी दुसऱ्यांचे काय सांगू पण देवा प्रत्यक्ष व्यासदेव राजवाड्यांत येत आणि तुमचे साद्यंत वर्णन करून माहात्म्य सांगत. पण अंधारात चिंतामणी पहावा, तो चिंतामणी नाही असे म्हणून त्याची उपेक्षा करावी आणि दिवस उगवल्यावर त्याची ओळख पटावी तसे आज झाले. ह्या ज्ञानरूपी खाणी माझ्याजवळ होत्या पण कृष्णा, तुझ्या प्रकाशाविना त्या वाया जात होत्या. तुझ्या सूर्याचा प्रकाश आता पडला, तुझे वाक्यरूपी किरण फाकले आणि ऋषींनी जे मार्ग सांगितले होते त्याचे अनोळखपण आज फिटले. माझ्या हृदयभूमीमध्ये त्यांनी खोलवर ज्ञानाचे बीज पेरले होते. आता त्या भूमीला तुझ्या कृपेची ओल लाभली आणि तुझा-माझा संवाद हेच ज्याचे फळ असे पीक आले. नारदादिक संत यांच्या बोधरूपी नद्यांना मी आता महोदधि झालो आहे. अनंत सुखाचा समुद्र झालो आहे. प्रभु, आजवरच्या सर्व जन्मात मी जी जी उत्तम पुण्ये केली त्यांच्याकडे माझे काही येणे राहिले नाही. त्यांनी तुझ्यासारखा सद्‌गुरु मला जोडून दिला आणि ती माझ्या ऋणांतून मुक्त झाली. वाडवडलांच्या तोंडून तुझ्याबद्दल ऐकले होते. पण तू कृपा केलीस तेव्हाच त्या बोलण्याचा खरा अर्थ मला कळला. भाग्य अनुकूल असेल तरच केलेले उद्योग यशास जातात. गुरुकृपा होते तेव्हाच वाचलेले व ऐकलेले ज्ञान सफळ होते. महाराज, जिवापाड कष्ट करून माळी झाडे वाढवितो. जन्मभर श्रम करतो पण वसंत आला की मगच त्याला फळ मिळते. विषमज्वर जेव्हा ओहोटीस लागतो तेव्हाच गोड पदार्थाची चव गोड लागते. देहात आरोग्य येऊं लागले की मगच मात्रा, भसमे परिणामकारक आहेत असे ठरते. इंद्रिये वाचा, प्राण यांचे सार्थक होते जेव्हा चैतन्य आपण होऊन येऊन प्रवेश करते तेव्हाच. त्याप्रमाणेच शब्दजाताचा अभ्यास, योगशास्त्राचा अभ्यास हा आपलासा होतो गुरुकृपा होते तेव्हाच. आता मला गुरु भेटले, मी कृतार्थ झालो असे म्हणत अर्जुन प्रेमाने, आनंदाने, नाचू लागला, म्हणू लागला देवा, तुमचे वाक्य मला आवडले. तू देवदानवांना कळण्यासारखा नव्हेसच. हे अगदी खरे आहे, याची कैवल्यपती मला पुरती प्रचीति आली. जर कुणी मी माझ्या बुद्धीने देवाला जाणून घेईन असे म्हणत असेल तर ते कधीच घडण्यासारखे नाही हे मला खात्रीपूर्वक आता कळले आहे.

अनुक्रमणिका

आता माझ्या ध्यानात आले की आकाशाला आपण किती मोठे आहो हे कळणे कठीण आहे. पृथ्वीला आपले वजन किती आहे हे कळणे अशक्य आहे. त्याप्रमाणे वेदादिकांना तुझे स्वरूप कळणे केवळ अशक्य आहे. ते आपले बुद्धिवैभव वृथाच मिरवित असतात. तुझे स्वरूप एकटा तूच काय तो जाणतोस. बाकीच्यांच्या सर्व शक्ती तुला आपल्या सामर्थ्यावर जाणण्यास पूर्ण असमर्थ आहेत.

देवा, मनाला मागे कसे टाकावे? वारा वावेने कसा मोजावा? आपल्या बाहुबलाने आदिशून्य कसे उतरून जावे? तुला जाणावयाचे हे काम तसेच अत्यंत कठीण आहे. कोण तुला जाणू शकेल? कोणत्या साधानाने जाणू शकेल? देवा तुला जाणण्याचे साधन म्हणजे केवळ तुमची कृपा. दुसरे काहीही नाही. तूच काय तो स्वतःला जाणू शकतोस. इतकेच नव्हे तर स्वतःचे स्वरूप दुसऱ्यालाही समजावून देऊ शकतोस. तेव्हा समर्था, आता व्याकुळतेच्या निढळावरचा घाम आणखी एकदा पुसा.

सर्व भूतांची उत्पत्ती आपण केली आहे. त्रिभुवनरूपी हत्तीला आपण सिंहासारखे अहा. सर्व देवांना आपण पूजास्थान अहा. जगाचे स्वामी अहा. आपण माझी विनंती ऐकाल का?

आपण इतके थोर अहा की आपल्याजवळ उभे रहावे अशीसुद्धा आमची योग्यता नाही. पण त्या अनधिकाराने भिऊन विचारायचे नाही असे जर आम्ही ठरविले तर आम्ही विचारणार तरी कुणाला? आम्हाला तुझ्याशिवाय आधार तरी आहे कुणाचा? नद्या, समुद्र पाण्याने भरलेले असले तरी चातकाला मेघांतून जो थेंब पडेल तेवढाच मिळणार. तसे गुरु जरी सगळीकडे असले तरी आम्हाला तुझ्याशिवाय दुसरी गती नाही. तेव्हा विचारतोच. देवा दर्याद्र होऊन आपण मला आपल्या विभूती सांगा.

महाराज सर्व विभूति आपल्याच आहेत. त्या अनंत आहेत, त्यांनी विश्व व्यापून टाकले आहे पण ह्या अनंताचे मी कसे चिंतन करू? सगळीकडे तूच भरला आहेस असे म्हटले की श्रीकृष्णा काहीच चिंतन माझ्या हातून होईना. तेव्हा मला आपल्या प्रधान नामांकित विभूति प्रगट करून सांगा. आताच काही विभूति तुम्ही सांगितल्या ना तशाच पुन्हा एकदा विस्ताराने आणखी काही सांगा. त्या विभूति अशा असाव्या की, त्यांचे चिंतन करण्यास मला काहीच सायास पडू नयेत. तो विभूतियोग मला स्पष्ट करून सांगा. विचारलेल्या विभूति तर सांगाच पण आणखीसुद्धा सांगा बरं का. वारंवार काय विचारतोस, काय सांगायचे पुन्हा पुन्हा, असे म्हणू नका. कृष्णा सामान्य अमृतसुद्धा पुन्हा पुन्हा प्यावे अशी इच्छा होते, नको म्हणवत नाही. हे तर उपदेशामृत! पुनरावृत्ति कशी करावी हा भाव जनार्दना मनात आणूसुद्धा नका.

मगाशी मी जे अमृत म्हटले ते खरे म्हणजे काळकूट विषाचे भावंड आहे. मृत्यूच्या भीतीने देव अमृत प्याले. तरीसुद्धा ब्रह्मदेवाच्या एका दिवसात चौदा इंद्र होऊन जातात. इतके थोडे अमरत्व देण्याचे सामर्थ्य असलेला क्षीरसमुद्रातला तो एक पातळ गोड पदार्थ पण तोदेखील आपल्या गोडीने पिणाऱ्याला “पुरे” म्हणू देत नाही. त्या अमृताची अशी अवीट गोडी आणि आपले बोलणे तर प्रत्यक्ष परमामृत! मंदराचल न उपटता, क्षीरसमुद्र न ढवळता अनादि आणि सहज सिद्ध आहे, ते द्रव नव्हे, घन नव्हे, त्याची गोडी आणि सुवास सांगता येत नाही पण आठवल्याबरोबर कोणालाही प्राप्त मात्र होते. त्याच्या गोष्टी ऐकूनच सगळा संसार व्यर्थ वाद

लागतो. आपोआप मनाला गाढ स्थिरता प्राप्त होऊ लागते. जन्ममृत्यूची भाषा समूळ नाहीशी होऊ लागते. आत-बाहेर महासुख वाटू लागते. आता तुझ्या बोधामृताच्या नुसत्या गोष्टी ऐकून जर हा लाभ होतो तर ते सेवन करून, प्रत्यक्ष अनुभूति घेऊन आपण त्या बोधाशी एकरूप झालो तर केवढे भाग्य! देवा म्हणूनच आपल्या मुखातून मिळणारा हा बोध "आता पुरे" असे माझे चित्त म्हणून शकत नाही. आधी तुझे नाव आम्हाला प्रिय. त्यात तुझी भेट होऊन मैत्री झाली आणि आनंदाच्या उत्कर्षात तू आम्हाला बोध करतोस हे सुख मी कशासारखे आहे म्हणून सांगू? मला तर काही सांगता येत नाही. इतकेच म्हणतो की, ह्या ज्ञानाच्या कथा आपल्याकडून पुन्हा पुन्हा आम्हाला सांगितल्या जाव्या.

सूर्य पुन्हा पुन्हा उगवतो म्हणून मग त्याला काय शिळा म्हणावयाचे, अग्नि कधी ओवळा असतो काय, गंगा वहातच असते तिला कधी पारोशी म्हणता येते काय? देवा तसे तुमचे शब्द शिळे, ओवळे, पारोसे, जुने होऊच शकत नाहीत. तुमच्या श्रीमुखांतून येणारे शब्द नित्य सुंदरच वाटतात. आम्हाला तर त्या नादाला रूप दिसू लागते! चंदन तरूच्या फुलांचा सुवास घ्यावा तसा हा अपूर्व लाभ आम्हाला वाटतो आहे. सांगाल ना देवा पुन्हा त्या विभूती?"

अर्जुनाचे हे शब्द ऐकून देव सर्वांगाने डोलू लागले. मनाशी म्हणाले "अहो, काय सांगावे हा तर भक्तिज्ञानाचे आगर झाला की. छान छान."

आवडत्या भक्ताला ह्या भक्तिज्ञानाने झालेल्या आनंदाचा संतोष देवाच्या मनात मावेना. कसाबसा तो प्रेमाचा वेग सावरत अनंत म्हणाले "बाबा, सांगतो रे."

माऊली म्हणतात तो ब्रह्मदेवाचा पिता अर्जुनाला "बाबा" म्हणतो आहे. देव आपण स्वतः पितामहाचा पिता आहो हे देखील विसरले अशी ही भक्तप्रेमाची किमया! पण त्याचेही आश्चर्य वाटून घ्यायचे नाही. कारण तो नंदाचे मूल झालाच आहे. आवडीची अतिशयोक्ती आहे ती! तिचा काय विचार करावयाचा!

देव म्हणाले "तू विभूति विचारल्यास आणि मी सांगतो असेही म्हटले पण सुभद्रापति ह्या विभूति अपार आहेत. इतक्या अपार आहेत की त्या सगळ्या माझ्या मलाही आठवत नाहीत की मोजता येत नाहीत. अंगावर केस किती असे कुणी विचारले तर काय सांगायचे? ते जसे सांगणे अशक्य आहे तसेच माझ्या विभूति सांगणे कठीण आहे. माझा विस्तार किती, केव्हढा, हे माझे मलाही नीटसे ठाऊक नाही.

तेव्हा आता असे करतो की ज्या रूढ प्रधान विभूति आहेत त्या सांगतो. बी मुठीत आले की वृक्ष हातात आल्यासारखाच आहे. ह्या प्रधान विभूति तू जाणून घेतल्यास की सर्व विभूति जाणल्यासारख्याच होतील. उद्यान हातात आले की त्यांतील फळे, फुले आपोआपच हस्तगत होतात. त्याप्रमाणे ह्या विभूति कळल्या की, सगळे विश्वच तुझ्या हाती आल्यासारखे होईल. एरवी आकाशासारख्या अमर्याद पदार्थास जिथे सहज लपून बसता येते असा माझा विराट विस्तार कसा वर्णन करावा? त्या माझ्या विराट रूपास आरंभही नाही आणि शेवटही नाही. तेव्हा त्या रूपाचे वर्णन कसे करावे. तेव्हा मुख्य मुख्य काही विभूति सांगतो त्यावरून तुला थोडी कल्पना येईल.

अर्जुना तुझ्याकडे पाहिले की तुझे रूप आणि गुण दोन्हींचे मला फार कौतुक वाटते. तुझे हे सुंदर कुरळे केस तुला किती शोभून दिसतात रे. तुझे सगळे शरीरच देखणे! गुण पहावे तर धनुर्विद्येत तू त्रिंबकासारखाच वाटतोस मला. त्यात तू आता ज्ञानाचाही अधिकारी झाला आहेस. तू म्हणशील ते ज्ञान मी तुला देतो. मग ह्या विभूतियोगाचीच काय कथा?

अर्जुना ह्या सर्व भूतांच्या ठिकाणी मी आत्मा ह्या स्वरूपात रहातो. आत त्यांच्या अंतःकरणात मीच आणि भूतांची ही शरीराची गवसणी पण मीच आहे. या मेघांच्याकडे पाहिले तर त्यांच्या खाली-वर आकाशच असते, आत-बाहेर आकाशच, जन्म आकाशातच असतो आणि लयही आकाशातच! त्याप्रमाणे या भूतांना आदिमध्यअंत सगळ्या स्थिती मीच आहे. विभूति आणि आता भूतांची संख्या कोण मोजणार? स्थावरांची गणती कोण करणार? माझे व्यापकत्व आणि अनेकत्व विभूति योगाने कळेल म्हणून जीवाचा कान करून ऐक आणि त्यावर चिंतन कर. व्यापक स्वरूपाची कल्पना दिल्यावर आता वेगळ्या विभूति सांगण्याची खरी आवश्यकता नाही पण मी सांगतो म्हटले आहे म्हणून चिंतनासाठी प्रमुख विभूति सांगतो त्या ऐक.

अर्जुना, बारा आदित्यांमध्ये मी विष्णु आहे. अकरा रुद्रांमध्ये मदनाचा संहार करणारा शंकर मी आहे यात शंका धरू नको. देवामध्ये मरुद्‌गणाचा भाऊ महेंद्र मी आहे. यक्षराक्षसांच्या समुदायात शंकराचा सखा जो कुबेर तो मी आहे. आठ वसूमध्ये अग्नि ही माझी विभूति आहे. स्वर्गाच्या राज्याला साह्य करणारा, सर्वज्ञामध्ये अग्रगण्य आणि कुलोपाध्यायामध्ये सर्वश्रेष्ठ असा शुक्राचार्य मी आहे. शंकराच्या वीर्यापासून अग्निच्या संगतीने कृत्तिकांच्या ठिकाणी उत्पन्न झालेला कार्तिक स्वामी त्रिभुवनातील सेनापतीमध्ये माझी विभूति आहे. गंधर्वामध्ये चित्ररथ हे माझे स्वरूप आहे. महर्षीमध्ये तपोराशी भृगु ही माझी विभूति आहे. देवर्षीमध्ये नारद ही माझी विभूति तर अशेष सिद्धामध्ये कपिलाचार्य ही माझी विभूति आहे. जन्म देणाऱ्यामध्ये मदन ही माझी विभूति समजावी. जलचरामध्ये पश्चिम दिशेचा स्वामी जो वरुण तो मी आहे. पितरांच्या समुदायात अर्यमा नावाची पितृदेवता मी आहे. जगाची शुभाशुभे लिहिणाऱ्या, प्राण्यांच्या मनाचा झाडा घेणाऱ्या, कर्माप्रमाणे प्राण्यांना सुखदुःखाचा भोग देणाऱ्या नियमनकर्त्या देवतामध्ये सर्व कर्मांचा साक्षी यम मी आहे. मुनीमध्ये मी व्यासदेव आहे. धैर्यवानाचा राजा कविश्वर शुक्राचार्य ही माझी विभूति आहे असे तो यादवेंद्र म्हणाला.

शस्त्रधरामध्ये श्रीराम ही माझी विभूति आहे. त्या रामाने संकटात सापडलेल्या धर्माच्या कैवाराने धनुष्यास आपला साह्यकर्ता करून त्रेतायुगात विजयलक्ष्मीला आपल्याकडे खेचून आणले. सुवेळ पर्वताच्या माथ्यावर उभे राहून प्रतापलंकेश्वराची त्या रावणाची मस्तके वरच्यावर उडवून आकाशात फिरणाऱ्या पिशाच्चांचा बळी म्हणून हाती दिली आणि "उदो, उदो" असे त्यांच्याकडून म्हणविले. त्या रामचंद्राने देवांची गेलेली प्रतिष्ठा पुन्हा मिळवून दिली. धर्माचा जीर्णोद्धार केला. त्याच्या पराक्रमाने सूर्यवंशात जसा काही पुन्हा सूर्यच उगवला. अजिंक्य शस्त्रे हातात धरणाऱ्या शूरवीरात जानकीकांत रामचंद्र ही माझी विभूति आहे असे समज.

यादवकुळामध्ये ऐश्वर्यसंपन्न असा यादव मी आहे आणि श्रीकृष्ण ही माझी यादवातील विभूति आहे. मी जन्मास आलो वसुदेव देवकीच्या पोटी पण यशोदेच्या मुलीच्या बदली गेलो गोकुळात. बाळपणाची दशा संपते

न संपते तोच अनेक दानवांना मारून सृष्टि अदानवी केली. पर्वत करंगळीवर उचलून इंद्राचा महिमा मोजून बाजूस टाकून दिला. कालिंदीच्या ह्रदयात असलेले कालियाचे शल्य फेडले. पेटते गोकुळे राखले. वासरांसाठी त्या ब्रह्मदेवाला खुळे पिसे करून सोडले. त्याने गायी, वासरे, गोपाळ चोरून नेऊन त्यांना लपवून ठेवले आणि मीच झालो दुसरी गायी-वासरे, गोपाळ. बाळपणाच्या सुरवातीसच कंसासारखी अचाट महाधेंडे सहज संपवून टाकली. आता ह्या माझ्या गोष्टी तुला किती सांगाव्या? तू आणखीही कितीतरी कथा पाहिल्या, ऐकल्या आहेसच. एव्हढेच ध्यानात ठेव की यादवांमध्ये श्रीकृष्ण ही माझी विभूति आहे.

सोमवंशामध्ये जन्मलेल्या तुम्हा पांडवामध्ये तू अर्जुन हे माझे स्वरूप जाणावे. आपल्या एकमेकाच्या प्रेमात त्यामुळे कधीच विकल्प येत नाही. संन्याशाचे सोंग घेऊन माझी बहीण सुभद्रा चोरून नेलीस म्हणून मी तुझ्यावर रागावलो नाही, माझ्या मनात काही विकल्पहि आला नाही कारण तू आणि मी फक्त देहाने भिन्न पण विभूतिच्या दृष्टीने एकरूपच आहे.

ज्याची सेवा सर्व प्रजा करते तो राजा ही माझी विभूति आहे. दैत्यकुळात जन्मल्यांपैकी दैत्यभावाचा ज्याच्या मनाला स्पर्शही झाला नाही असा प्रल्हाद मी आहे.

प्रकाश देणाऱ्यामध्ये रश्मिवेत सूर्य ही माझी विभूति तर गगनरंगी नक्षत्रामध्ये चंद्र ही माझी विभूति मानावी.

इंद्रियांमध्ये अकरावे इंद्रिय जे मन ती माझी विभूति आहे. सजीवांमध्ये जे सजीवत्व ते मी आहे.

सुप्रसिद्ध अशा सर्व घोड्यांमध्ये उच्चैश्रवा हे माझे रूप समज. राज्याचे भूषण असणाऱ्या हत्तीमध्ये अमृत मंथनातून निघालेला ऐरावत तो मी, धेनूमध्ये कामधेनु आणि सर्पकुळामध्ये मुख्य वासुकी हे माझे स्वरूप आहे. नामामध्ये अनंत ही माझी विभूति, श्वापदामध्ये मी आहे सिंह आणि पक्षीजातीमध्ये मी आहे गरुड. अर्जुना, असे आहे म्हणूनच तो पक्षिराज मला पाठीवरून वाहून नेऊ शकतो.

उंच उंच शिखरांनी युक्त असलेल्या पर्वतांमध्ये मी मेरु आहे. अचल असलेल्या मोठ्या पुण्यवान पर्वत श्रेष्ठांमध्ये मी हिमालय आहे.

सगळ्या जलाशयामध्ये पाण्याचा सर्वश्रेष्ठ साठा जो समुद्र तो मी आहे. भगीरथाने खाली आणत असताना जन्हु ऋषीनी गंगा गिळून टाकली आणि भगीरथाच्या प्रार्थनेवरून मांडी फाडून मोकळी केली ती जान्हवी माझे स्वरूप आहे.

कल्पवृक्ष, पारिजात, चंदन हे वृक्ष आप-आपल्या गुणांनी प्रसिद्ध आहेत खरे पण अश्वत्थ ही माझी विभूति आहे.

गतिमंतामध्ये पवन मी आहे. तो मी वायु एक क्षण न लागता पृथ्वीच्या विस्ताराला साती समुद्रावरून

उडत जाऊन प्रदक्षिणा घालतो.

वेदामध्ये मी सामदेव आहे. वेदामध्ये असलेल्या रथंतरादि सामांमध्ये बृहत्साम ही माझी विभूति आहे. सगळ्या छंदामध्ये गायत्रीछंद हे माझे स्वरूप आहे हे तू निश्चित समज.

सर्व बोलण्यामध्ये ज्या अक्षरात सत्याचा उत्कर्ष असतो ते एक अक्षर ॐ हे मी आहे." असे वैकुंठप्रिय श्रीकृष्ण म्हणाले.

या लोकांमध्ये कर्मत्याग करून प्रणवादिक जपाने जो यज्ञ केला जातो तो जपयज्ञ सर्व यज्ञामध्ये श्रेष्ठ आहे. या यज्ञात स्नानादी कर्मे बांधू शकत नाहीत. नामाने धर्माधर्म पवित्र होतात. वेदाच्या सांगण्याप्रमाणेही नाम परब्रह्मच आहे. म्हणून अत्यंत पवित्र सुलभ असा जो जपयज्ञ ती माझी विभूति आहे.

समासांमध्ये द्वंद्व नावाचा समास मी आहे.

नियमन करणाऱ्यामध्ये मुंगीपासून ब्रह्मदेवापर्यंत अनिवार्य शासन मी आहे. सारासार विचार करणाऱ्या धर्मज्ञानाचा पक्ष घेणाऱ्या, सर्व शास्त्रामध्ये मी नीतीशस्त्र आहे. सर्व गुढामध्ये राजा अर्जुना, मी मौन आहे आणि म्हणून न बोलणाऱ्यापुढे ब्रह्मदेवसुद्धा अज्ञानी होतो. ज्ञानांच्याठिकाणी जे ज्ञान ते मी आहे.

"शंभर यज्ञ करणाऱ्याच्या हाती जे वज्र येते ते धनुर्धरा सर्व आयुधांमध्ये माझी विभूति आहे. ग्रासणाऱ्यांमध्ये अर्जुना, मी महाकाळ आहे असे समज. चिलटापासून ब्रह्मदेवापर्यंत जो सर्वांना ग्रासून टाकतो, मेरुमंदारापासून सर्व पृथ्वीला जो विरवून टाकतो, जलरूप झालेल्या जगाला जो जेथल्या तेथे आटवून, गिळून टाकतो आणि ज्याच्या पोटात आकाश सहज सामावून जाते असा जो अपार काळ तो मी आहे" असे श्रीकृष्ण म्हणाले.

सर्व विद्यांमध्ये अध्यात्म विद्या हे माझे रूप आहे. अक्षरांमध्ये स्पष्ट अक्षर जे "अ" ते मी आहे. शास्त्रांचे कधी एकमत होत नाही, त्यांच्यामध्ये वादविवाद चालतो. निश्चय करायला गेले की तो वाढतो, तो ऐकून तर्काला जोर येतो. त्या तर्कावर बोलणाऱ्यांची गोड भाषणे होतात. प्रतिपादनामध्ये ही जी वाटाघाट होते ती माझी विभूती आहे.

सृष्टीचा मेळ उत्पन्न करणारा मीच, उत्पन्न झालेल्या भूतांना धारण करणारा मीच आणि शेवटी या सर्वांचा संहारकर्ताही मीच असे निश्चयात्मक ओळख.

स्त्रीवर्गापैकी माझ्या सात विभूति सांगितल्या जातील. नित्य नवी जी कीर्ति ती अर्जुना माझी मूर्ति आहे. औदार्य आणि संपत्ति हे माझेच रूप. जी वाचा न्यायाच्या सुखानुसार बसून विवेकाच्या मार्गाने चालते ती माझी विभूति आहे. कोणताही पदार्थ पाहिल्याबरोबर जी माझी आठवण करून देते ती स्मृति ही निश्चयाने माझी विभूति आहे. स्वहिताला अनुकूल अशी जी बुद्धि ती या लोकांमध्ये मी आहे, धैर्य आणि क्षमा मी आहे. संसाररूपी

हत्तीला सिंहासारखा भयप्रद असलेला श्रीकृष्ण म्हणाला, या सातही शक्ति मी आहे.

अर्जुना, बारा महिन्यांमध्ये मी मार्गशीष मास आहे आणि ऋतूमध्ये फुलांना प्रफुल्लित करणारा वसंत आहे.

छलकारक कारस्थानात द्यूत ही माझी विभूति आहे. उघडउघड चव्हाट्यावर ही द्यूतरूप चोरी चालते पण ते माझे स्वरूप असल्याने कुणी द्यूताला प्रतिकार करू शकत नाही. एकूणएक तेजोमय पदार्थांमधील तेज मी आहे याची तू आठवण ठेव. सगळ्या कार्यांत येणारे यश मी आहे. ज्या व्यवसायात शुद्ध स्वरूपात न्याय असतो तो व्यवसाय मी आहे. सत्त्वगुण संपन्नातील सत्त्व हे माझे रूप आहे.

अर्जुना, अशा प्रकाराने जगातील वेगवेगळ्या विभूतींची नांवे घेऊ लोगलो तर पूर्ण आयुष्य असलेल्या सहस्त्र जन्मात अर्ध्याही विभूति सांगून होणार नाहीत. सगळी नक्षत्रे वेचावी अशी इच्छा झाली तर एकेक नक्षत्र वेचून कसे भागेल? ह्या सबंध आकाशाचे गाठोडेच बांधावे लागेल. पृथ्वीवरील परमाणूंचा हिशोब मांडायचा झाला तर मग सगळा पृथ्वीगोलच काखेत मारावा लागेल. तेव्हा माझा हा पूर्ण विस्तार तू पहाणार तरी कसा? पर्जन्याच्या धारा एकवेळ मोजता येतील, पृथ्वीवरच्या तृणांकरांची गणती करता येईल, महोदधीच्या लाटांचा हिशोब ठेवता येईल पण माझ्या विशेष विभूतींचे मोजमाप करता येणार नाही.

झाडाच्या शाखा, फूल फळ एकदम हाती याव्या असे वाटले तर मूळ उपटून हातात घ्यावयास हवे. माझ्या विशेष विभूति समजून घ्यावयाच्या तर विभूति वेगवेगळ्या मोजत न बसता माझे निर्दोष स्वरूप जाणून घेतले पाहिजे. वेगवेगळ्या विभूति किती म्हणून तू ऐकणार? हे एकदाच जाणून घे की सर्व दृष्टादृष्टा पदार्थ मीच आहे. या सगळ्या सृष्टीला आदिमाध्यांती एकटा मीच आहे, जसा वस्त्रामध्ये तंतू! माझ्या विभूति विस्ताराला मर्यादा नाही, सांगाव्या किती आणि ऐकाव्या किती? यासाठी तुला एकच वर्म सांगून ठेवतो की, मी बीज आणि सर्व भूते माझे अंकुर आहेत. पांडुसुता, यासाठी भूतासंबंधीचा उच्चनीय हा भेद मनातून काढून टाकावा, वस्तूमात्राला मीच मानावे.

तुझ्या ध्यानात आले का? सुभद्रापति, माझे एवढे व्यापक स्वरूप तुझ्या आता ध्यानात आले का?

तुझ्या जाणिवेला हा एवढा प्रचंड भाव झेपेल की नाही म्हणून तुला काही एक ठळक खूण सांगतो?

संपत्ती आणि दया ही दोन्ही तत्त्वे ज्या ठिकाणी मैत्रीने नांदतात असे तुला दिसेल ते स्थान माझी विभूति आहे असे समज."

दिल्लीमध्ये लाला महेशदास अत्यंत प्रतिष्ठित घराण्यातले सधन जमीनदार. वैभवसंपन्न लाला त्यांच्या परोपकारी वृत्तीबद्दल फार प्रसिद्ध होते.

एकदा त्यांच्या घरच्या मालकिणीने पाहिले की झाडूवाली फारच उदास मुद्रेने काम करते आहे.

मालकीणीने कारण विचारले तर ती रडूच लागली. म्हणाली, “बाईसाहेब काय सांगू? घरधन्यांनी करू नये ते केले म्हणून त्यांच्यावर बहिष्कार घालण्यासाठी आज जमातीतील पंच जमणार आहेत. आम्हाला जमातीबाहेर काढले म्हणजे आम्ही काय करणार? कुठे जाणार? काय खाणार? माझ्या तोंडानेच धन्याचा अपराध कसा सांगू? कोण अपराध करीत नाही मालकीण. पोराबाळांचा भरवसा तर आता लालाजींच्यावरच आहे. एरवी आता आम्हाला पाठीराखा तरी कोण आहे?

मालकीणबाई लालाजींच्याकडे गेल्या. सर्व वृत्तांत सांगितला आणि म्हटले, “आपण यात काहीतरी कराच. नाहीतर मी पाण्याचासुद्धा घोट घेणार नाही.”

लालाजींना उत्तम अंगरखा घातला, डोक्यावर पगडी चढवली जरीकाठी उपरणे खांद्यावर टाकले आणि जिथे झाडूवाल्यांची पंचायत होती तिथे आले. अपराध्याला जातीबाहेर काढण्याचा निकाल जवळजवळ झालाच होता. लालांना पहाताच आश्चर्यचकित होऊन सगळे झाडूवाले उठून लालांना नम्रपणे नमस्कार करू लागले. लाला जे आले ते थेट अपराधी झाडूवाल्याजवळ बसले. त्यांनी आपली पगडी पंचासमोर उतरली. हात जोडून ते म्हणाले, “बाबानो, ही पगडी डोक्यावर चढवायाची की नाही हे आता तुम्ही ठरवा. हा अपराधी तर आहेच पण मी त्याच्यावतीने गोतगंगेची माफी मागतो. ह्याचे कुटुंब माझ्या घरी काम करते मी ह्याच्या वर्तनाची हमी घेतो. पण ह्याला तुम्ही एकदा क्षमा करावी.”

सगळे झाडूवाले व पंच विरघळून गेले. त्यांनी बहिष्कार मागे घेतला आणि लालाजींना पगडी चढविण्याची विनंती केली.

अपराध्याने तर लालाजींचे पायच धरले, लालाजी म्हणाले, “अरे, माझ्या काय पाया पडतोस? त्या पंचांच्या पाया पड. आता तरी नीट वाग म्हणजे झालं”.

लालाजी घरी आल्यावर सर्व हकीकत ऐकून मालकीणबाईंनी इतका आनंद झाला की विचारू नये. त्या म्हणाल्या, “आपण आज ह्या गरिबावर किती दया केली! केव्हढी कामगिरी केली आपण!”

मालकीणबाईंचे उद्गार ऐकून लालाजीनी खुंटीला लावलेल्या पगडीकडे बोट दाखविले आणि म्हटले, “अग, मी काहीच नाही केले. तिने केले सगळे काम!”

असे हे दयावन्त श्रीमन्त. देव म्हणत आहेत असे महाभाग माझे स्वरूप आहे. त्यांच्याजवळ संपत्ती आहे आणि दयाही आहे. देव पुढे म्हणाले, अर्जुना सूर्यबिंब आकाशात एकटेच असते पण त्याची प्रभा त्रिभुवनात फाकते. त्याप्रमाणे तुला कधी कधी दिसेल की एखाद्या माणसाची आज्ञा जग शिरोधार्य मानते. असा मनुष्य निर्धन आहे असे चुकूनही म्हणू नये. तो एकटा आहे म्हणू नये. कामधेनू काय कोठी बरोबर घेऊन फिरते? तिच्या नुसत्या इच्छेने हवे ते पदार्थ क्षणार्धात निर्माण होत असतात. तेव्हा लोक ज्याची आज्ञा पाळतात त्याला एकटा वा निर्धन म्हणू नये. तो जणूकाय दुसरी कामधेनूच आहे. जेव्हा जेव्हा जे जे मागावे ते ते ती कामधेनू देत असते त्याप्रमाणे विश्वातील ऐश्वर्ये त्याच्या ठिकाणी अंगभूत होऊन रहातात. त्याची आज्ञा जग शिरसावंद्य

मानते हीच त्याला ओळखण्याची खूण आहे. अर्जुना, असा पुरुष जेव्हा पहाशील तेव्हा तो माझा अवतार आहे असे समज.

माझ्या विभूति म्हणून काही विशेष प्राणी, वनस्पती, पर्वत, ऋषि, अवतार, आकाशस्थ, ज्योति, शास्त्रे मी तुला सांगितली. पण ह्या सर्व गोष्टी विशेष म्हणजे इतर तुच्छ असे मानण्याची चूक तू करू नकोस. उच्चैश्रवा श्रेष्ठ आणि इतर घोडे नीच, कनष्ठि असे कदाचित तुझ्या मनात येईल. ऐरावत उच्च, इतर हत्ती नीच असे तुला वाटेल पण तसे करू नकोस. एक मुख्य, इतर गौण अशी वाटणी या वैश्विक पदार्थात करणे चुकीचे आहे कारण मीच सर्वत्र आहे. हा भेदाचा कलंक आपल्या बुद्धिला लागू देऊ नको. ह्या मूळ स्वरूपातच मग भेद मनात येऊन पुन्हा अज्ञानाचा अंधःकार पडेल. उत्तम तूप आहे ते घुसळणे किती चुकीचे ठरेल? अमृत मुळातच सिद्धरस. त्याला जास्त चव यावी म्हणून शिजवून अर्धे आटवणे किती वेडेपणाचे आहे! वायूचे डावे अंग, उजवे अंग असा भेद करून काय उपयोग?

सूर्यबिंबाची पाठपोट शोधायला जाण्यासारखे हे माझ्या स्वरूपात सामान्य विशेष पहाण्याच्या गोष्टी करणे आहे. त्यात आपली दृष्टि बिघडण्यापलिकडे काय पदरात पडणार आहे? निरनिराळ्या विभूति मी सांगितल्या म्हणून तू त्या मोजू शकशील पण माझे स्वरूप अपार ते कसे कास मोजशील? अर्जुना, विभूतीचा विचार सोड, मला अपाराला जाणण्याची खटपट कर. मी किती अपार आहे सांगू का? माझ्या एका अंशाने हे जग व्यापून टाकले आहे. तेव्हा भेद सोडून दे आणि सगळीकडे समदृष्टीने पाहून माझी भक्ति कर."

ज्ञानी पुरुषरूपी वसंत आणि वैराग्यशील पुरुषांचे एकांतस्थल अशा श्रीमंत कृष्ण देवांनी अर्जुनाला असा उपदेश केला आणि आत यावर अर्जुन काय म्हणतो हे पहाण्यासाठी ते थांबले. अर्जुन म्हणाला, "किती विनोद करावा देवा. आम्ही वेगळे, भेद वेगळा आणि आम्ही तो टाकायचा? असे कसे हे बोलणे? सूर्याने जगाला म्हणावे की, लोक हो, तो अंधार तेवढा आमच्या वाटेतून बाजूला करा बरं. देवा, तुमचे हे भेदाचे बोलणे तसेच चमत्कारिक आहे. तुमचे नाम जेव्हा एखाद्याच्या कानी पडते, मुखात येते तेव्हाच भेद त्यांचे हृदय सोडून पळून जातो. खरोखरच सूर्य आल्यावर अंधार उरत नाही त्याप्रमाणे आपण हृदयात प्रवेश केल्यावर भेद उरतच नाही. श्रीकृष्णा, तुला परब्रह्माला दैवाने माझ्या हातावर उदक सोडून माझ्या स्वाधीन केले आहे. आता भेद कुणी आणि कसा मानावा? चंद्रबिंबाच्या माजघरात शिरून "उकडते इथे" असे कुणी म्हणेल काय?

पण आपण मोठे अहा. त्या मोठेपणाच्या जोरावर घ्या माझी अजून परीक्षा. माझ्या मनात अजून कुठेतरी भेदाचा कण लपला आहे की काय अशीच शंका आहे ना आपल्याला?"

देवांनी हसून मोठ्या प्रेमाने अर्जुनाला अलिंगन दिले. त्यांना मनापासून आनंद झाला. ते म्हणाले, "अर्जुना, चुकलो बाबा. पण तू माझ्यावर रागावू नकोस. काय झाले की तू विचारल्यास विभूति मी त्या सांगितल्याही. माझ्या मनात तुला अभेदाचा उपदेश करावयाचा होता तोहि केला. पण तुझ्या मनात भेद ठसला की अभेद पक्का झाला हे पाहण्यासाठी विनोदाने वरवर आपले म्हटले इतकेच. तुला खरच सांगतो विभूति म्हणजे काय हे खरोखरच तुझ्या ध्यानी आले आहे बरं का".

अर्जुन म्हणाला, "देवा, ते आपले आपल्याला माहीत. हे सर्व विश्व तू भरून टाकले आहेस हे मात्र मला कळले आहे."

संजय धृतराष्ट्राला म्हणाला, "राजा, अर्जुनाला अशाप्रकारची प्रतीति आली. तो फारच आनंदात आहे."

संजयाच्या या बोलण्याचा धृतराष्ट्रावर काहीच परिणाम झाला नाही. तो काहीच बोलला नाही. अर्जुनाला प्रतीति आल्याचा आनंद त्याच्या मुद्रेवर मुळीसुध्दा दिसेना.

संजय फार उदास झाला. मनाशी म्हणू लागला, "काय हो हा चमत्कार? पूढे चालून आलेले दैव कसे ह्या राजाने ढकलून दिले आहे! मला वाटत होते की राजा फक्त चर्मचक्षूकडून आंधळा, पण हा तर बाहेरून आंधळा आणि आतूनही आंधळा. काय करावे?"

ज्ञानदेव म्हणतात, "पण अर्जुन मात्र बाहेरून डोळस आणि आतूनही डोळस! दैवयोगाने आपल्या हाती आलेल्या ज्ञानाची किंमत तो पुरेपूर जाणत होता. आपले आणखी हित करून घ्यावे असा याने विचार केला. विभूति ऐकावयास मिळाल्या, अपार स्वरूपाच्या गोष्टीही ऐकावयास मिळाल्या पण तेवढ्यावरच न थांबता आणखी अनुभूति मिळावी अशी एक अचाट इच्छा त्याच्या मनात आली.

तो म्हणू लागला, "ही अपार स्वरूपाची प्रतीति मला हृदयात आली. आता हे स्वरूप मला माझ्या डोळ्यांनी प्रत्यक्ष दिसेल काय? माझी तळमळ आता त्या इच्छेच्या पावलांनी चालू लागली आहे.

मला ह्या दोन डोळ्यांनीच सर्व विश्वरूपाला साक्षात झोंबता यावे" अशी हाव आता त्या भाग्यवंताच्या मनात उत्पन्न झाली. अर्जुन आज कल्पवृक्षाची शाखा झाला आहे. त्या फांदीला वांझ फुले कशी लागतील? त्याच्या मुखातून जे जे येईल ते ते खरे करणारा तो समर्थ भगवंत जवळच होता.

प्रल्हादाच्या हाकेबरोबर जो विषयापासून नरसिंहापर्यंत आपण स्वतः झाला तो भगवान त्या किरीटीने सद्‌गुरु म्हणून प्राप्त करून घेतला होता मग इच्छा पूर्तीस उशीर काय?

मी निवृत्तीचा ज्ञानदेव अर्जुन विश्वरूप दर्शनाबद्दल देवांना कशी विनंती करील हे पुढच्या अध्यायात आपल्याला सांगतो.

***

॥ श्री ॥

## अध्याय अकरावा

# विश्वरूपदर्शनयोग

॥ ॐ नमो भगवते वासुदेवाय ॥

अर्जुन उवाच—

मदनुग्रहाय परमं गुह्यमध्यात्मसंज्ञितम् ।
यत्त्वयोक्तं वचस्तेन मोहोऽयं विगतो मम ॥ १ ॥

भवाप्ययौ हि भूतानां श्रुतौ विस्तरशो मया ।
त्वतः कमलपत्राक्ष माहात्म्यमपि चाव्ययम् ॥ २ ॥

एकमेतद्यथाऽऽ त्थ त्वमात्मानं परमेश्वर ।
द्रष्टुमिच्छामि ते रूपमैश्वरं पुरुषोत्तम ॥ ३ ॥

मन्यसे यदि तच्छक्यं मया द्रष्टुमिति प्रभो ।
योगेश्वर ततो मे त्वं दर्शयात्मानमव्ययम् ॥ ४ ॥

श्रीभगवानुवाच—

पश्य मे पार्थ रूपाणि शतशोऽथ सहस्रशः ।
नानाविधानि दिव्यानि नानावर्णाकृतीनि च ॥ ५ ॥

पश्याऽऽ दित्यान्वसून्रूद्रानश्विनौ मरुतस्तथा ।
बहून्यदृष्टपूर्वाणि पश्याऽऽश्चर्याणि भारत ॥ ६ ॥

इहैकस्थं जगत्कृत्स्नं पश्याद्य सचराचरम् ।
मम देहे गुडाकेश यच्चान्यद्द्रष्टुमिच्छ्सि ॥ ७ ॥

न तु मां शक्यसे द्रष्टुमनेनैव स्वचक्षुषा ।
दिव्यं ददामि ते चक्षुः पश्य मे योगमैश्वरम् ॥ ८ ॥

अनुक्रमणिका

संजय उवाच—

एकमुक्त्वा ततो राजन्महायोगेश्वरो हरिः ।
दर्शयामास पार्थाय परमं रूपमैश्वरम् ॥ ९ ॥

अनेकवक्त्रनयनमनेकाद्भुतदर्शनम् ।
अनेकदिव्याभरणं दिव्यानेकोद्यतायुधम् ॥ १० ॥

दिव्यमाल्याम्बरधरं दिव्यगन्धानुलेपनम् ।
सर्वाश्चर्यमयं देवमनन्तं विश्वतोमुखम् ॥ ११ ॥

दिवि सूर्यसहस्रस्य भवेद्युगपदुत्थिता ।
यदि भाः सदृशी सा स्याद्भासस्तस्य महात्मनः ॥ १२ ॥

तत्रैकस्थं जगत्कृत्स्नं प्रविभक्तमनेकधा ।
अपश्यद्देवदेवस्य शरीरे पाण्डवस्तदा ॥ १३ ॥

ततः स विस्मयाविष्टो हृष्टरोमा धनंजयः ।
प्रणम्य शिरसा देवं कृताञ्जलिरभाषत ॥ १४ ॥

अर्जुन उवाच—

पश्यामि देवांस्तव देव देहे सर्वांस्तथा भूतविशेषसंघान् ।
ब्रह्माणमीशं कमलासनस्थमृषींश्च सर्वानुरगांश्च दिवान् ॥ १५ ॥

अनेकबाहूदरवक्त्रनेत्रं पश्यामि त्वां सर्वतोऽनन्तरूपम् ।
नान्तं न मध्यं न पुनस्तवादिं पश्यामि विश्वेश्वर विश्वरूप ॥ १६ ॥

किरीटिनं गदिनं चक्रिणं च तेजोराशिं सर्वतो दीप्तिमन्तम् ।
पश्चामि त्वां दुर्निरीक्ष्यं समन्ताद्दीप्तानलार्कद्युतिमप्रमेयम् ॥ १७ ॥

त्वमक्षरं परमं वेदितव्यं त्वमस्य विश्वस्य परं निधानम् ।
त्वमव्ययः शाश्वतधर्मगोप्ता सनातनस्त्वं पुरुषो मतो मे ॥ १८ ॥

अनादिमध्यान्तमनन्तवीर्यमनन्तबाहुं शशिसूर्यनेत्रम् ।

पश्चामि त्वां दीप्तहुताशवक्त्रं स्वतेजसा विश्वमिदं तपन्तम् ॥ १९ ॥

द्यावापृथिव्योरिदमन्तरं हि व्याप्तं त्वयैकेन दिशश्च सर्वाः ।
दृष्ट्वाऽद्भुतं रूपमुग्रं तवेदं लोकत्रयं प्रव्यथितं महात्मन् ॥ २० ॥

अमी हि त्वां सुरङ्घस विशन्ति केचिद्भीताः प्राञ्जलयो गृणन्ति ।
स्वस्तीत्युक्त्वा महर्षिसिद्धसङ्घ स्तुवन्ति त्वां स्तुतिभिः पुष्कलाभिः ॥ २१ ॥

रूद्रादित्या वसवो ये च साध्या विश्वेऽश्विनौ मरुतश्चोष्मपाश्च ।
गंधर्वयक्षा सुरसिद्धसङ्घा वीक्षन्ते त्वां विस्मिताश्चैव सर्वे ॥ २२ ॥

रूपं महत्ते बहुवक्त्रनेत्रं महाबाहो बहुबाहूरुपादम् ।
बहूदरं बहुदंष्ट्राकरालं दृष्ट्वा लोकाः प्रव्यथितास्तथाहम् ॥ २३ ॥

नभःस्पृशं दीप्तमनेकवर्णं व्यात्ताननं दीप्तविशालनेत्रम् ।
दृष्ट्वा हि त्वां प्रव्यथितान्तरात्मा धृतिं न विन्दामि शमं च विष्णो ॥ २४ ॥

द्रंष्ट्राकरालानि च ते मुखानि दृष्ट्वैव कालानलसन्निभानि ।
दिशो न जाने न लभे च शर्म प्रसीद देवेश जगन्निवास ॥ २५ ॥

अमी च त्वां धृतराष्ट्रस्य पुत्राः सर्वे सहैवावनिपालसङ्घैः ।
भीष्मो द्रोणः सुतपुत्रस्तथासौ सहास्मदीयैरपि योधमुख्यैः ॥ २६ ॥

वक्त्राणि ते त्वरमाणा विशन्ति दंष्ट्राकरालानि भयानकानि ।
केचिद्विलग्ना दशनान्तरेषु संदृश्यन्ते चूर्णितैरुत्तमाङ्गैः ॥ २७ ॥

यथा नदीनां बहवोऽम्बुवेगाः समुद्रमेवाभिमुखा द्रवन्ति ।
तथा तवामी नरलोकवीरा विशन्ति वक्त्राण्यभिविज्वलन्ति ॥ २८ ॥

यथा प्रदीप्तं ज्वलनं पतंगाः विशन्ति नाशाय समृद्धवेगाः ।
तथैव नाशाय विशन्ति लोकास्तवापि वक्त्राणि समृद्धवेगाः ॥ २९ ॥

लेलिह्यसे ग्रसमानः समन्ताल्लोकान्समग्रान्वदनैर्ज्वलद्भिः ।
तेजोभिरापूर्य जगत्समग्रं भासस्तवोग्राः प्रतपन्ति विष्णो ॥ ३० ॥

आख्याहि मे को भवानुग्ररूपो नमोऽस्तु ते देववर प्रसीद ।

अनुक्रमणिका

विज्ञातुमिच्छामि भवन्तमाद्यं न हि प्रजानामि तव प्रवृत्तिम् ॥ ३१ ॥

श्रीभगवानुवाच—

कालोऽस्मि लोकक्षयकृत्प्रवृद्धो लोकान् समाहर्तुमिह प्रवृत्तः ।
ऋतेऽपि त्वां न भविष्यन्ति सर्वे येऽवस्थिताः प्रत्यनीकेषु योधाः ॥ ३२ ॥

तस्मात्त्वमुत्तिष्ठ यशो लभस्व जित्वा शत्रून् भुङःदव राज्यं समृद्धम् ।
मयैवैते निहताः पूर्वमेव निमित्तमात्रं भव सव्यसाचिन् ॥ ३३ ॥

द्रोणं च भीष्मं च जयद्रथं च कर्ण तथान्यानपि योधविरान् ।
मया हतांस्त्वं जहि मा व्यथिष्ठा युध्यस्व जेतासि रणे सपत्नान् ॥ ३४ ॥

संजय उवाच—

एतच्छ्रुत्वा वचनं केशवस्य कृताञ्जलिर्वेपमानः किरीटी ।
नमस्कृत्वा भूय एवाह कृष्णं सगद्‌गदं भीतभीतः प्रणम्य ॥ ३५ ॥

अर्जुन उवाच—

स्थाने हृषीकेश तव प्रकीर्त्या जगत्प्रहृष्यत्यनुरज्यते च ।
रक्षांसि भीतानि दिशो द्रवन्ति सर्वे नमस्यन्ति च सिद्धसङ्घाः ॥ ३६ ॥

कस्माच्च ते न नमेरन्महात्मन् गरीयसे ब्रह्मणोऽप्यादिकर्त्रे ।
अनंत देवेश जगन्निवास त्वमक्षरं सदसत्तत्परं यत् ॥ ३७ ॥

त्वमादिदेवः पुरुषः पुराणस्त्वमस्य विश्वस्य परं निधानम् ।
वेत्तासि वेद्यं च परं च धाम त्वया ततं विश्वमनन्तरूप ॥ ३८ ॥

वायुर्यमोऽग्निर्वरुणः शशांकः प्रजापतिस्त्वं प्रपितामहश्च ।
नमो नमस्तेऽस्तु सहस्रकृत्वः पुनश्च भूयोऽपि नमो नमस्ते ॥ ३९ ॥

नमः पुरस्तादथ पृष्ठतस्ते नमोऽस्तु ते सर्वत एव सर्व ।
अनंतवीर्यामितविक्रमस्त्वं सर्व समाप्नोषि ततोऽसि सर्वः ॥ ४० ॥

सखेति मत्वा प्रसभं यदुक्तं हे कृष्ण हे यादव हे सखेति ।

अजानता महिमानं तवेदं मया प्रमादात्प्रणयेन वापि ॥ ४१ ॥

यच्चावहासार्थमसत्कृतोऽसि विहारशय्यासनभोजनेषु ।
एकोऽथवाप्यच्युत तत्समक्षं तत्क्षामये त्वामहमप्रमेयम् ॥ ४२ ॥

पितासि लोकस्य चाराचरस्य त्वमस्य पूज्यश्च गुरुर्गरीयान् ।
न त्वत्समोऽस्त्यभधिकः कुतोऽन्यो लोकत्रयेऽ प्यप्रतिमप्रभाव ॥ ४३ ॥

तस्मात्प्रणम्य प्रणिधाय कायं प्रसादये त्वामहमीशमीड्यम् ।
पितेव पुत्रस्य सखेव सख्युः प्रियः प्रियायार्हसि देव सोढुम् ॥ ४४ ॥

अदृष्टपूर्वं हृषितोऽस्मि दृष्ट्वा भयेन च प्रव्यथितं मनो मे ।
तदेव मे दर्शय देव रूपं प्रसीद देवेश जगन्निवास ॥ ४५ ॥

किरीटिनं गदिनं चक्रहस्तमिच्छामि त्वां द्रष्टुमहं तथैव ।
तेनैव रूपेण चतुर्भुजेन सहस्त्रबाहो भव विश्वमूर्ते ॥ ४६ ॥

श्रीभगवानुवाच—

मया प्रसन्नेन तवार्जुनेदं रूपं परं दर्शितमात्मयोगात् ।
तेजोमयं विश्वमनन्तमाद्यं यन्मे त्वदन्येन न दृष्टपूर्वम् ॥ ४७ ॥

न वेदयज्ञाध्ययनैर्न दानैर्न च क्रियाभिर्न तपोभिरुग्रैः ।
एवंरूपः शक्य अहं नृलोके द्रष्टुं त्वदन्येन कुरुप्रवीर ॥ ४८ ॥

मा ते व्यथा मा च विमूढभावो दृष्ट्वा रूपं घोरमीदृङ्भमेदम् ।
व्यपेतभीः प्रीतमनाः पुनस्त्वं तदेव मे रूपमिदं प्रपश्च ॥ ४९ ॥

संजय उवाच—

इत्यर्जुनं वासुदेवस्तथोक्त्वा स्वकं रूपं दर्शयामास भूयः ।
आश्वासयामास च भीतमेनं भूत्वा पुनः सौम्यवपुर्महात्मा ॥ ५० ॥

अर्जुन उवाच—

दृष्ट्वेदं मानुषं रूपं तव सौम्यं जनार्दन ।

अनुक्रमणिका

**इदानीमस्मि संवृत्तः सचेताः प्रकृतिं गतः ॥ ५१ ॥**

श्रीभगवानुवाच—

**सदुर्दर्शमिदं रूपं दृष्टवानसि यन्मम ।**
**देवा अप्यस्य रूपस्य नित्यं दर्शनकांक्षिणः ॥ ५२ ॥**

**नाहं वेदैर्न तपसा न दानेन न चेज्यया ।**
**शक्य एवंविधो द्रष्टुं दृष्टवानसि मां यथा ॥ ५३ ॥**

**भक्त्या त्वनन्यया शक्यः अहमेवंविधोऽर्जुन ।**
**ज्ञातुं द्रष्टुं च तत्त्वेन प्रवेष्टुं च परंतप ॥ ५४ ॥**

**मत्कर्मकृन्मत्परमो मद्भक्तः सङ्गवर्जितः ।**
**निर्वैरः सर्वभूतेषु यः स मामेति पाण्डव ॥ ५५ ॥**

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे "विश्वरूपदर्शनयोगो नाम" एकादशोऽध्यायः ॥ ११ ॥

श्रीकृष्णार्पणमस्तु ।

----------

अनुक्रमणिका

आतापर्यंत देव अर्जुनाला सांगत आहेत की, “मी स्थिरचर सृष्टीला व्यापून राहिलो आहे. उत्पत्ति, स्थिति आणि लय, भूत, वर्तमान, भविष्य ह्या सर्व माझ्याच अवस्था आहेत. माझ्या इच्छेनेच जगाचे असणे आणि नसणे आहे. तेव्हा पार्था, तू फक्त मला शरण ये. माझी अनन्य भक्ति कर. मी तुझे रक्षण करतो. सुखाने माझ्यापर्यंत घेऊन येतो. पार्था, “मी करतो” असे म्हणशील तर फसशील, “देव करतो” म्हणशील की सुटशील. पण ही अवस्था वाटते तेव्हढी सोपी नाही. कारण “मी करतो” ही कुबुद्धिरेषा आहे हे माहीत असूनही माणूस तसेच म्हणत जन्ममरणाच्या चाकात भ्रमत असतो. हा अहंभाव देहाला चिकटलेला, त्या क्षणभंगुर संसारास चिकटलेला आहे. तो तिथून सोडवून माझ्याकडे लाव म्हणजे मद्रूप होशील आणि या जन्ममृत्यूच्या पुनरावृत्तीतून सुटशील.”

प्रभूंचे हे बोलणे एकाग्र चित्ताने ऐकून अर्जुन निःशंक झाला होता पण त्यांच्या मनात इच्छा उत्पन्न झाली की देव प्रसन्न आहेत तोवर आणखी काही लाभ पदरात पाडून घ्यावा. अर्जुन आता प्रार्थना करणार आहे की, “देवा, ज्या अपार स्वरूपाची कथा मला आपण सांगितली ते आपले मूळ स्वरूप ह्या डोळ्यांनी पहावे अशी मला फार तीव्र इच्छा आहे. दाखवाल का?”

आणि ती कथा अकराव्या अध्यायामध्ये आहे. माऊली म्हणतात, “या अकराव्या अध्यायात शांत आणि अद्भुत रसांनी भरलेली कथा सांगितली जाईल. या अध्यायात पार्थ आणि ते अद्भुत विश्वरूप यांची भेट होणार आहे. शांताच्या घरी अद्भुत पाहुणा आला आहे आणि म्हणून अद्भुताच्या पंक्तीला इतरही रस बसतील आणि त्यांचाही मान केला जाईल. वधूवरांचे लग्न लागते आणि त्यांची वरात तर निघतेच पण वऱ्हाडातील मानकरणींना वस्त्रे, अलंकार देऊन त्यांनाही पालखीत बसवून मिरवतात ना तसे देशी भाषेच्या पालखीतून सर्वच रस डौलाने मिरवतील. शांत आणि अद्भुत हे दोन्ही रस हरिहरांच्या भेटीप्रमाणे उराउरी भेटतील आणि डोळ्यांच्या ओंजळीत घ्यावे इतके स्पष्ट दिसतील. अमावास्येच्या दिवशी चंद्रबिंब आणि सूर्यबिंब जसे एकाच दिशेला असते त्याप्रमाणे शांत व अद्भुत ह्यांचे ऐक्य या अध्यायात दिसेल. गंगा आणि यमुना यांचा संगम होऊन क्षेत्र झाले आहे तसे हे दोन्ही रस एकत्र मिसळून अकरावा अध्याय प्रयागक्षेत्र झाला आहे. इथे आता जगाने स्नान करून पवित्र व्हावे. ह्या दोन ओघांच्यामध्ये सरस्वतीसारखी गीता गुप्तपणाने वहाते आहे. या तीन नद्यांचा संगम म्हणून याला त्रिवेणी संगम म्हणावे. तीर्थास जाणे सामान्यास कष्टप्रद असते. कित्येक जीव जाऊ जाऊ म्हणता निजधामासच जातात. पण माझे गुरु निवृत्तिनाथ हे समर्थ दाता आहेत. त्यांनी या तीर्थाला जाणे सर्वांना सुलभ करून टाकले आहे. श्रवणाच्याद्वारे जाऊन या त्रिवेणी संगमात स्नान करणे सर्वांना सोपे झाले आहे. धर्माचे निधान निवृत्तिनाथ यांच्या ध्यानात आले की वाटेतल्या निरनिराळ्या अडथळ्यांना भिऊन लोक ह्या गीतेकडे वळतच नाहीत. मग त्यांनी संस्कृताचे कठीण खडक फोडले. मराठी भाषेत माझ्याकडून गीतेचा अर्थ वदवला आणि गीतेपर्यंत पोचण्यासाठी सुबक पायऱ्यांचा घाट बांधला. आता ह्या त्रिवेणी संगमात नहाणे कुणालाही शक्य झाले आहे. सद्भावाने सहज जावे. पायऱ्या सोप्या आहेत. घाट उतरावा की संगम आलाच. मनमुराद स्नान करावे आणि प्रयागमाधवाचे दर्शन घ्यावे. पाण्यातून बाहेर येता येताच संसाराला तिलांजली द्यावी. कदाचित आपणहून द्यावीच लागणार नाही. अकराव्या अध्यायाच्या डोहात डुबत असताना शरीर व मन याचा शतजन्माचा मळ धुतला जाऊन संसार उरणारच नाही, ममत्व रहाणार नाही, त्या विश्वरूपाशीच नाते जडेल आणि आभासात्मक वैश्विक भेदाचा संबंधच संपेल.

हे असो, इथे रसभाव सावयव होऊन भराला आले आहेत. श्रवणसुखाचे राज्यच जगाला मिळाले आहे. शांताद्भुत  रस मूर्तिमंत आणि इतर रस शोभेला उभे आहेत. श्रवणसुखाचे राज्यच जगाला मिळाले आहे," हे अध्यायाचे वर्णनसुद्धा अपुरेच आहे. असे म्हणावे की या अध्यायात प्रत्यक्ष परब्रह्म उघडपणे आले आहे. मोक्ष स्पष्ट दिसतो आहे.

अकरावा अध्याय हे देवांचे खास विश्रान्तीचे शयनगृह आहे. अर्जुन दैववान म्हणून त्या जागी जाऊन पोचला.

युद्धापूर्वी तो तसाच देवांच्या शयनगृहात पोचला होताच. तो नम्रतेने देवांच्या पायाजवळच हात जोडून उभा राहिला. दुर्योधन आला तो थेट देवांच्या उशाला बसला. देवांना जाग आल्यावर देव उठून बसले. सहाजिकच पायाशी उभा असलेला अर्जुन त्यांच्या प्रथम दृष्टीस पडला व नंतर दुर्योधन दिसला.

देवांनी दोघांचाही यथोचित सत्कार करून येण्याचे कारण विचारले.

दुर्योधन हसत हसतच म्हणाला, "श्रीकृष्णा, आता येऊन ठेपलेल्या युद्धात मला तुमचे सहाय्य हवे आहे म्हणून आलो आहे. अर्जुनही त्याच कामाला आला असणार. पण मी आधी आलो आहे. आपण सज्ञनांचीच रीत अनुसरणार. जो प्रथम येईल त्याचा अंगीकार करावा अशी ती रीत आहे. तेव्हा आपण माझ्या पक्षास आले पाहिजे."

श्रीकृष्णांनी म्हटले, "दुर्योधना, तू आधी आलास आणि अर्जुन मला आधी दिसला. तेव्हा तुमचा दोघांचा माझ्यावर सारखाच अधिकार झाला. आता तोड अशी काढू की मी निःशस्त्र, लढाई न करणारा, एकटा एकीकडे आणि दहा कोटी सशस्त्र व लढणारे गोपाल एकीकडे. अर्जुन धाकटा आहे. तू मोठा आहेस. "प्रवारणं तु बालांना पूर्व कार्य" या न्यायाने लहानाची समजूत आधी काढूया. त्याला वाटणी उचलू दे."

अर्जुनाने हात जोडून म्हटले, "श्रीकृष्णा, तुम्ही एकटे माझ्या बाजूस या."

दुर्योधनाने मोठ्या आनंदाने वाटणी मान्य केली. तेव्हा अर्जुन जसा त्या शयनगृहात गेला तसा ह्या अध्यायाच्या शयनगृहातही त्याने प्रवेश केला आणि ते परब्रह्म हस्तगत केले. तिथेही त्याने वाटणीत देवच घेतला आणि या रणभूमीवरही देवच घेतला.

पण मी ज्ञानदेव म्हणतो की, हा लाभ केवळ अर्जुनालाच झाला असे कुठे आहे? तो दैववान तसे आपणही दैववानच आहो. आता गीतार्थ मराठीत आला आहे. कुणीही तो कवटाळावा, आत्मसात करावा आणि अर्जुनाची तन्मयता अनुभवावी. म्हणून सज्ञन हो, मी आपल्याला विनंती करतो आहे की, "महाराज, आपण आता माझ्या शब्दांकडे अवधान द्यावे. तुम्हा सज्ञनांशी सभेमध्ये अशी सलगी करणे योग्य नव्हे पण आपण मला प्रेमाने आपले लेकरू माना. पोपटाला आपणच बोलायला शिकवावे आणि त्याने तसे शब्द उच्चारून दाखवले की

आपणच त्याचे कौतुक करावे किंवा लहान मुलाला मजेने हावभाव करायला शिकवून मग त्याने तशी नक्कल केली की आईने मोठ्या कौतुकाने “किती माझं बाळ शहाणे” म्हणून त्याला कुशीत घ्यावे त्याप्रमाणे मी जे जे बोलतो ते ते खरे म्हणजे महाराज, आपणच मला शिकवले आहे. तरीही मी मात्र आपल्यालाच म्हणतो आहे की, “ऐका, मी काय सांगतो ते” आपण ते ऐका आणि त्या आईसारखे संतुष्ट व्हा. आपलेच ज्ञान मी आपल्याला ऐकवतो आहे. क्षमा करावी पण ऐकावेच.

हे सारस्वताचे झाड, प्रभु, आपणच लावले आहे. आता त्याला अंकुर फुटतो आहे. आपणच अवधानाचे अमृत शिंपून ते मोठे करा. त्या अमृताच्या वर्षावाने ते रसभाव फुलांनी फुलेल. नाना अर्थांनी फलद्रूप होईल आणि तुमच्या ह्या अवधानरूपी धर्मामुळे जगाला सुकाळ होईल. कोणाही श्रान्त पांथस्थावर ते सावली करील आणि मधुर अर्थाची विपुल फळे देईल.

संतांना ह्या बोलण्यामुळे फार आनंद वाटला. ते म्हणाले, “बाबा ज्ञानदेवा, आम्ही अगदी संतुष्ट आहो. आतापर्यंतचे अध्याय फार चांगले झाले आहेत. आता अर्जुनाने कशी कशी विनंती केली आणि देवांनी काय काय केले ते सगळे सांगा.”

तेव्हा निवृत्तिदास ज्ञानदेव म्हणाले, “महाराज, तो कृष्णार्जुनाचा संवाद मी कसा काय सांगणार. माझ्यात इतके सामर्थ्य कुठून येणार? आपणच मला बोलवायचे आहे. मी तर बोलून चालून अजाण आहे. काही सांगावयाचे ते आपणच माझ्या तोंडून सांगवा. अहो, रानामध्ये पाला खाऊन रहाणारी ती वानरे पण त्यांच्याकडून त्या लंकेश्वराचा पराभव करवला. एकट्या अर्जुनाकडून पुढे ह्या महायुद्धात अकरा. अक्षौहिणी सैन्य जिंकवले. हा सगळा समर्थांचा पराक्रम आहे. ते जे करतो म्हणतील ते घडत नाही असे कसे होईल? चराचराकडून अघटित कृत्ये करून घेण्याचे सामर्थ्य समर्थामध्ये असते. आपण संत आता मला बोलवा. वैकुंठनायकाच्या मुखातून जो उत्कृष्ट गीताभाव निघाला तो मी सांगतो आहे. आपण ऐकावे महाराज, आधी गीतेसारखा महान ग्रंथ! वेदांना प्रतिपाद्य देवता असलेला श्रीकृष्ण वक्ता! अशा ग्रंथाचा गौरव मी किती सांगू? ह्या गीतातत्त्वाचा पूर्ण उलगडा तर प्रत्यक्ष शंकरानाही होत नाही. जीवाभावाने गीतेला नमस्कार करावा हेच चांगले नमस्काराने प्रसन्न झालेली गीतामाऊली आपणा संतांचे अवधान व माझ्या गुरूंचे सामर्थ्य पाहून आपले अंतरंग मला उलगडून सांगेलच. ऐका महाराज! काय झाले की अर्जुनाला प्रथम संकोच वाटला. तो मनात म्हणू लागला, “माझ्या जीवाला तर अशी ओढ लागली आहे की देवांचे ते विश्वरूप ह्या डोळ्यांनी पहावे, सगळे जगच परमात्मरूप आहे. ह्या गोष्टी कानांनी ऐकल्या पण तेवढ्याने समाधान वाटत नाही. ते रूप मला दिसेल काय अशी तळमळ लागली आहे. हृदयात प्रतीत होणारा हा प्रियकर भगवान बाहेर विश्वरूपात कसा दिसतो हे मला पहायचे आहे. पण मी देवाला हे विचारू कसे? ते विश्वरूप किती गूढ रहस्य असेल! आजवर अशी मागणी देवाच्या लाडक्यांनीसुद्धा केलेली ऐकली नाही. मी एकाएकी तुमचे विश्वरूप मला दाखवाच असे म्हणू कसा? यशोदेने चुकून एकदा ते रूप थोडा वेळ पाहिले असे ऐकतो. पण जन्मदात्या देवकीने पाहिल्याचे ऐकले नाही. तिने “दाखवा” असे म्हटल्याचेही ऐकले नाही. मला वाटते ही मागणी करण्यास ती घाबरली असावी.

मी देवांची थोडी थोडी सेवा केली असेल पण ती गरुडाएवढी नक्कीच केली नाही. त्या गरुडानेही हे बोलणे कधी काढले नसेल. मी काय त्या सनकादिकांपेक्षा मोठा आहे काय? त्यांनासुद्धा देवाजवळ हा हट्ट

धरता आला नाही. गोकुळातल्या प्रेमळ भक्तांएवढा मी देवांना आवडेन काय? पण खरे म्हणजे त्या गोकुळातल्या प्रेमळांना तरी देवांनी कुठे हे रूप दाखवले? बाळपणाचे सोंग आणून फसवले. अंबऋषि राजा दानशूर, पराक्रमी, भगवद्भक्त! एकादशीचा उपवास करून साधनद्वादशी करण्याचा त्याचा नेम! एकदा दुर्वास ऋषी अतिथी म्हणून घरी आले. आपण नदीवर जाऊन आन्हिक उरकून भोजनास या असे राजाने पाद्यपूजा वगैरे करून नम्रतेने सांगितले. दुर्वास नदीवर गेले पण लवकर येईनात. द्वादशी उलटून चालली म्हणून राजाने देवाला नैवेद्य अर्पण केला आणि आपण तीर्थ फक्त घेतले. दुर्वास नदीवरून आल्यावर हा वृत्तांत त्यांना कळल्याबरोबर ते संतापले. त्यांनी जटेतून कृत्या काढली, ती जाराच्या मागे सोडली आणि वर शापही दिला की, “राजा, ह्या तुझ्या उद्धटपणासाठी तुला अनेक योनीत जन्म घ्यावे लागतील.”

देवांना हे सगळे कळतच होते. त्यांनी कृत्येवर सुदर्शन सोडले. कृत्येचा नाश करून ते दुर्वासांच्या मागे लागले. कोणीही देव दुर्वासांचे रक्षण करण्यास समर्थ नव्हता. शेवटी दुर्वास श्रीविष्णूकडे गेले. देव दुर्वासांना म्हणाले, “अंबऋषि तुमची वाट पहात एक वर्ष उपाशी आहे. आधी त्याच्याकडे जाऊन क्षमा मागा. मगच सुदर्शन सुटेल”.

दुर्वासांनी अंबऋषीची क्षमा मागितली. राजाने दुर्वासांना पंक्तीला घेऊन आनंदाने भोजन केले. सुदर्शन परत गेले व दुर्वासांचा शाप अंबऋषीला बाधू नये व खोटाही ठरू नये म्हणून भगवंतांनी आपणच नाना योनीत, जन्म घेऊन भक्तासाठी गर्भवास सहन केले.

पण त्या अंबऋषि राजालाही हे गूढ विश्वरूप दाखविले नाही. मला दाखवा असे मी म्हटले तर देव मला दाखवतील का? आणि विचारूच नये हा विचारही सहन होत नाही. सुखाची तर गोष्टच बोलायला नको पण ही आर्ति पुरी झाली नाही तर जीव तरी वाचेल की नाही कुणास ठाऊक इतके दुःख होते आहे. आता बेताबेताने देवांची मर्जी पाहून विचारतोच. मग देवांच्या इच्छेला येईल ते करू देत झालं.” असे म्हणत अर्जुनाने विचारावेच असे ठरविले.

आणि विचारले ते इतक्या गोडीने की एक दोन वाक्यातच देवांनी झाडा देऊन विश्वरूप प्रगट करावे! वासरू नुसते दृष्टीस पडताच गाय त्याची भूक जाणून खडबडून उठून उभी रहाते. मग आचळास वासराच्या मुखाची भेट झाल्यावर काय पान्हा यायचा रहातो? पांडवांनी हाक मारण्याचीच फुरसद की जो श्रीकृष्ण त्यांचे संरक्षण करण्यासाठी रानावनात धावला तो काय अर्जुनाने विचारले तरच सांगावे असे म्हणेल? त्याला हा विलंब तरी सहन होईल काय? तो परमात्मा श्रीकृष्ण मुळातच सहज प्रेममूर्ति! त्यात अर्जुनाच्या प्रेमाचा मादक पदार्थ मिसळल्यावर त्या दोघांचे वेगळेपण या संगमात उरले हेच जास्त.

माऊली म्हणतात, “अर्जुनाच्या बोलण्याबरोबर देव विश्वरूप धारण करतील तोच पहिला प्रसंग मी वर्णन करतो. ऐकावा.”

अर्जुन देवाला म्हणाला, “हे कृपासागरा, जे वाच्य नव्हे ते आपण उघड करून मला सांगितले. महाराज, ब्रह्मामध्ये पंचमहाभूते आटून जातात, जीव, महतत्त्व यांचा पत्ता लागत नाही असे शेवटचे

विश्रान्तिस्थान हे आपले स्वरूप! ही आपली स्वरूप स्थिती एखाद्या कृपणाने धन पुरून ठेवावे तशी आपण हृदयात खोलवर ठेवली होती. शब्दब्रह्मापासून चोरून ठेवलेले ते आपले रूप आज माझ्यासाठी प्रगट केले. शंकरांनी ज्या अध्यात्मज्ञानावरून आपले ऐश्वर्य ओवाळून टाकले ते ज्ञान आपण एका क्षणात मला दिलेत. देवा, तुझ्यापासून आम्ही वेगळे नाहीच असा विचार आला की ज्ञान दिलेत हे म्हणणे देखील चुकीचे ठरेल. पण देवा, खरे सांगतो महामोहाच्या पुरामध्ये मी डोक्यापर्यंत बुडलो होतो. तू स्वतः हे पाहून त्या खोल पाण्यात उडी घातलीस आणि त्यातून मला वर काढलेस.

आता माझ्या ध्यानात येत आहे की तुझ्याशिवाय जगात दुसरी वस्तूच नाही. आमचेच कर्म असे की याचा विसर पडून "आम्ही आहो" असा आम्ही हट्ट धरून बसतो. माझेच पहा. देवा, देहाचा अभिमान धरून मी स्वतःला "अर्जुन" म्हणवून घेत होतो आणि ह्या कौरवांना स्वजन म्हणत होतो. आता हे एकदा झाल्यावर म्हणू लागलो की मी यांना मारीन, मला त्यामुळे पाप लागेल. हे दुःस्वप्न मी पहात होतो. देवा, आपण कृपाळू! मला ह्या दुःस्वप्नातून आपण जागे केले. गंधर्वनगरीमध्ये वस्ती करत होतो. मृगजळाचे पाणी तहान भागविण्यासाठी पीत होतो. कापडाचे किरडू खरे पण विषाच्या लहरी मात्र खऱ्याखुऱ्या येत होत्या. आता मी ह्या सगळ्या भासातून बाहेर पडलो. देवा, मरणाऱ्या जीवाला वाचविण्याचे श्रेय आपल्याला आले आहे. एखाद्या सिंहाने विहिरीत डोकावावे आणि आपले प्रतिबिंब पाहून दुसरा सिंहच आत आहे असे वाटून त्या विहिरीतल्या सिंहाशी लढण्यासाठी आत उडी घालण्याच्या तयारीत असताना त्याला कुणीतरी मागून धरावे त्याप्रमाणे अनंता, आपण मला ऐनवेळी रोखले. नाहीतर मी मनाशी निश्चय केला होता की युगांत होवो, आकाश तुटून पडो पण आपल्या गोत्राशी लढायचे नाही. हा प्रसंग आपल्यावर येऊ द्यायचा नाही. भले ते साती समुद्र एकत्र मिळाले तरी चालेल. अहंकार इतका वाढला होता की ह्या आग्रहाच्या डोहात मी खोलवर बुडी मारूनच बसलो होतो. देवा, आपण चांगलेच म्हणून धाडसाने त्या भोवऱ्यात उडी घालून बुडणाऱ्या मला वर काढलेत! नाहीतर मला कोण वर काढणार होते? नसलेल्याच माझ्या ठिकाणी आत्मभाव आणि नसलेल्याच कौरवाच्या ठिकणी स्वकुलभाव मानून मी वेडा झालो होतो. देवा, तुम्ही माझे रक्षण केले. सर्व संकटात आपणच आमचे रक्षणकर्ते अहा. वारणावतास लाक्षागृहामध्ये आम्ही दग्धच होऊन जावयाचे पण आपण त्यावेळेही आमचे रक्षण केले. विदुरकाकांना बुद्धि दिली की, युधिष्ठिर दादांना बर्बरभाषेमध्ये दुर्योधनाच्या कारस्थानाची कल्पना द्यावी. भिल्लीण आणि तिचे पाच मुलगे आमच्या आश्रयास त्याच रात्री यावे ही प्रेरणा आपलीच. त्यामुळे लाक्षागृहात आम्ही पाच पांडव व कुंतीमाताच दग्ध झाली असे वाटून कौरव निष्काळजी राहिले. तुमच्या ह्या सगळ्या रचनेचे फार आश्चर्य वाटते.

पण देवा, आताचा हा मोहाचा वणवा त्या लाक्षागृहापेक्षा जास्त भयंकर होता. तिथे देहाला संकट होते. पण इथे देहासकट चैतन्यालाच घेरले होते. देह शाबूत असताना आत पेटलेला तो मोहाचा वणवा जास्तच भयंकर वाटत होता. दुराग्रहरूपी हिरण्याक्ष दैत्याने माझी बुद्धिरूपी पृथ्वी काखेत मारून मोहरूपी समुद्रात बुडी मारली होती. माझी बुद्धि आपल्या सामर्थ्याने पुन्हा ठिकाणी आणण्यासाठी आपल्याला दुसरा वराहावतार घेणे भाग पडले. आपण माझ्यासाठी अपार केले आहे. मी कोणत्या शब्दात ते वर्णन करू? पण थोडक्यात आपण माझ्यासाठी पाच प्राणांची कुरवंडी केली आहे. देवा, आपण जेवढे कष्ट घेतले ते वाया गेले नाहीत एवढेच मी सांगतो. जास्त काय बोलू? माझ्या मनाला पडलेली भ्रान्ती साद्यंत निरसून गेली एवढेच सांगतो.

अनुक्रमणिका

महाराज, आपले डोळे म्हणजे आनंद सरोवरातील कमळे आहेत. त्या डोळ्यांनी ज्याला कृपाप्रसादाचे घर आंदण दिले त्याची आणि मोहाची गाठ पडेल ही शक्यता तरी आहे काय? ती तर एक दुबळी कल्पना होईल. समुद्राच्या पोटात असून जो वडवानळ समुद्राच्या पाण्याने विझत नाही तो काय मृगजळाच्या वृष्टीने विझेल का? महाराज, माझे भाग्य असे की मी आपल्या कृपेच्या माजघरात ब्रह्मरसाचे भोजन घेतो आहे. माझा मोह गेला यात आश्यर्च काय आहे?

आपल्या पायावर हात ठेवून सांगतो की अहो दातारा, मी त्या मोहाच्या विळख्यापासून मुक्त झालो. आता त्याची आपण काळजी करू नका.

कमलनेत्रा, कोटिसूर्यभास्करा, मी आज आपल्याकडून ऐकले की प्रकृति कशी? तिच्यापासून सर्व भूतांची उत्पत्ती होते कशी? सर्व भूते त्या प्रकृतिमध्ये लयाला जातात कशी, इतकेच काय पण ती प्रकृतिही जिथे लीन होते त्या पुरुषाचेही ठिकाण आपण मला दाखविले. प्रकृतिचा हिशोब मला सांगितलाच पण वेद, ज्याचा महिमा पांघरून सवस्त्र झाला त्याचेही दर्शन आपण मला शब्दांतून घडविले. देवा, मी धन्य झालो, कृतार्थ झालो.

महाराज, मला आता कळून चुकले की वेद उत्कर्ष पावतो, जगतो, धर्मासारख्या रत्नाला जन्म देतो तो केवळ आपल्या सामर्थ्याचे पाय धरतो म्हणूनच.

मला कळले की कुठल्याही साधनमार्गाने गेले तरी मुक्कामाचे ठिकाण आपणच अहा व आपले हे माहात्म्य अनुभूति आल्यावरच कळते. आकाशात ढग असेपर्यंत सूर्यदर्शन होत नाही. पण ढगांची पांगापांग झाली की दृष्टि सहज त्या भानुमंडलात प्रवेश करते. पाण्यावर शेवाळे असते तोवर खालचे पाणी दिसत नाही. पण शेवाळे बाजूला सारले की निर्मळ पाणी सहज भेटते. चंदनाच्या झाडाला सर्पाचे विळखे असतात तोवर चंदनाला हात लावता येत नाही पण वेढे सुटले, सर्प बाजूला झाले की आपोआप चंदन जवळ करता येते. पुरलेल्या धनावर पिशाच्च असते तोवर ते धन घेता येता येत नाही. पण पिशाच्च्याचा बंदोबस्त झाला की ते गुप्तधन आत्मसात होते, हस्तगत होते. परतत्त्वाचा आणि माझ्या बुद्धिच्या आड प्रकृति येत होती. देवांनी आपल्या सामर्थ्याने ती दूर केल्याबरोबर ते परतत्त्व माझ्या बुद्धिचे शेजघर झाले, आता माझी बुद्धि त्या परतत्त्वात निवांत झाली आहे. आणि म्हणून माझ्या जीवाला भरवसा आला. पण खरं सांगू का देवा, इतके झाले तरीही माझ्या मनात आणखी एक इच्छा उत्पन्न झाली आहे. आपल्याजवळ मला आणखी काही एक मागायचे आहे. मनात येते आहे की मागावे की न मागावे?

पण पुन्हा वाटते आपल्याजवळ जर मी भीड केली तर मागायला जाऊ तरी कुठे? तुमच्याशिवाय आम्हाला दुसरा जिवलग सखा दुसरा कोणी आहे काय? पाणी हेच ज्यांचे जीवन आहे अशा जलचरांना जर पाण्याच्याच उपकाराचे ओझे वाटू लागले तर त्यांनी जावे तरी कोठे? आईजवळ दूध कसे मागावे असे जर बाळाने म्हणायला सुरवात केली तर त्याने जगावे तरी कसे? तेव्हा आता भीड, संकोच न धरता माझ्या जीवाची आवड आपल्यापुढे सांगतोच.

देव म्हणाले, "अर्जुना, तू आणि माझ्यापुढे संकोच करावास काय? अरे तुझी इच्छा मला कळू दे तरी. ती पुरी कशी करावी ते मी मग पहातो. सांगशील तरी खरी."

अर्जुन म्हणाला, देवा, सांगतोच. तुम्ही विभूतियोगाच्या ज्या गोष्टी सांगितल्या त्या मी ऐकल्या. माझ्या अनुभवाची दृष्टि निवाली पण मनात मात्र एक अचाट इच्छा उत्पन्न झाली आहे.

देवा, आपण सहज जाता जाता एका अगाध विश्वरूपाचे थोडेसे वर्णन केले. ज्या स्वरूपाच्या संकल्पाने ही लोकपरंपरा निर्माण होते आणि जिथून निर्माण झाली त्या संकल्पातच लोप पावते त्या रूपास आपण आपले मुद्दल रूप म्हटले. दोन हातांची, चार हातांची रूपे घेऊन ह्याच मूळ स्वरूपातून आपण देवांचे कार्य करण्यासाठी वारंवार अवतार घेता. क्षीरसमुद्रात झोप घेणार रूप, मस्त्य, कूर्म, वराहादि रूपे घेते. पण हे केवळ तुझे तात्पुरते वरवर धारण करण्याचे अलंकार ते तू त्या मूळ ठिकाणी साठवतोस. उपनिषदे त्या मूळ स्वरूपाची स्तुतीस्तोत्रे गातात. ऋषि, मुनी आपल्या हृदयात शिरून त्याचा साक्षात्कार करून घेतात. सनकादिक ते रूप पोटाशी कवटाळून असतात. महाराज, ते आपले मुद्दल रूप मला पहायचे आहे. मी कधी ते रूप पाहीन असे मला झाले आहे. "संकोच न करता इच्छा सांग" असे म्हणाला म्हणून मी माझी तळमळ आपल्याला सांगितली आहे.

देवा, कानांनी ऐकणे आणि प्रत्यक्ष डोळ्यांनी पहाणे यात फरक आहे हो. आपण जसजशा विभूति सांगत गेला ना तसतशी माझ्या मनाला ह्या विश्वरूपाची ओढ लागली आहे. या सगळ्या विश्वात तूच एक भरून राहिला आहेस हे मी कान भरून ऐकले आहे. पण डोळे अतृप्त आहेत. ह्या सर्व विश्वात तूच कसा भरून राहिला आहेस, उरला आहेस हे मला माझ्या डोळ्यांनी पहायचे आहे. आता यापुढे मी आपल्याजवळ दुसरे मागणार नाही पण माझी ही इच्छा मात्र पुरी कराच.

पण देवा, ध्यानात घ्या हं. विश्वरूप पहावे ही योग्यता माझ्या अंगी आहे की नाही हे मात्र मला कळत नाही. ते आपले आपण पाहून घ्या. आपण म्हणाल लगेच की न कळायला काय झाले? पण सांगा देवा, रोगी आपल्या रोगाचे निदान करू शकतो काय? तहानेने व्याकुळ झालेला मनुष्य पाणी किती हवे ते सांगू शकतो काय? समुद्राएवढा पाण्याचा साठासुद्धा माझी तहान भागवू शकणार नाही असेच म्हणतो ना?

विश्वरूप दर्शनाची अनिवार इच्छा झाल्यावर मला माझ्या शक्तीचा अंदाज येईनासा झाला आहे. बाळाला किती पचेल, काय पचेल हे ती आईच जाणते. त्या अबोध बाळाला कुठे ठाऊक असते? त्याप्रमाणेच माझ्या योग्यतेची कल्पना मला नाही केवळ आपल्याला आहे. आपल्याला जर वाटले की विश्वरूप पहाण्याइतके सामर्थ्य मजजवळ आहे तर देवा कृपा करा आणि आपले विश्वरूप मला दाखवा.

आता माझ्या अंगी योग्यता नसली तर "नाही दाखवत" म्हणा. मी जास्त काय बोलू मग? बहिऱ्या माणसापुढे उत्तम गायन केले तर त्या पंचमालापाची त्याला काय गोडी कळणार आहे? एकट्या त्या चातकाची तहान ती केवढी पण मेघ त्याच्यासाठी वर्षाव करतात. चातक तृप्त होतोच पण जगाचीही तहान भागते. पण तीच वृष्टि जर खडकावर झाली तर फुकट जात नाही का? चकोराला चंद्रामृत मिळते आणि इतरांना मिळू नये

अशी काही शपथ घातली आहे काय? पण आंधळ्या माणसाच्या नजरेवर चंद्रकिरण पडले तरी तो त्याचे दृष्टिसुख कसे काय घेणार?

म्हणून विश्वरूप दाखवा अशी माझी विनवणी आहेच पण ते रूप पहाण्याचे सामर्थ्यही द्या. एरवी आपण रूप प्रगट केले तरीही मला पहाता यावयाचे नाही मग आपण विश्वरूप दाखवले न दाखवले तरी सारखेच आहे की देवा, आपण विश्वरूप प्रगट कराल आणि ते पहाण्याचे सामर्थ्यही द्याल अशी मला फार आशा लागून राहिली आहे.

कारण आपले औदार्यच तसे आहे. जाणते आणि नेणते हा भेद आपल्या दृष्टित नाही. देवा रे, तुझ्यासारखे दातृत्व जगात दुसरीकडे कुठेही दिसत नाही. पात्रापात्र न पहाता मोक्षासारखी उत्तम व पवित्र वस्तू तू तुझ्याशी वैर करणाऱ्यासही सहज देऊन टाकतोस. मोक्ष मिळणे हे दुरापास्त आहे खरे पण तो तुझ्या पायाची आराधना करतो आणि तू जिथे पाठवशील तिथे मुकाट्याने जातो. तो जसा काही तुझा पाईकच आहे. स्तन विषाने माखून तुला पाजून मारावे म्हणावे पूतना राक्षसी गोकुळात आली आणि घोटभर दुधाच्या मोबदल्यात सनकादिकांच्या बरोबरीने तू तिला मोक्षाची अधिकारी केलेस. तुझ्या नुसत्या स्पर्शाने तिचा उद्धार झाला. राजसूय यज्ञाच्या सभा मंडपात त्रिभुवनातील लोकासमक्ष त्या अपराधी शिशुपालाने तुझा शेकडो प्रकारच्या दुर्वाक्यांनी पाणउतारा केला. शंभर अपराधांची क्षमा करण्याचे अभिवचन आपण आपल्या मातेस दिले होते. ते अपराध भरल्यानंतर वचनमुक्त झाल्याचे बजावून आपण सुदर्शनाने शिशुपालास मारले पण मुक्ति दिली. इथे तर त्याला अपराधाच्या मोबदल्यात मुक्ती मिळाली. उत्तानचरणाचा बाळ ध्रुव पित्याच्या मांडीवर बसायला मिळावे म्हणून वनात तप करण्यासाठी आला. त्याला ध्रुवपद मिळावे ही इच्छा नव्हती. पण त्याने केलेल्या तपामुळे आपण त्याला ध्रुवपद दिले आणि आपली जागा सोडून भ्रमण करणाऱ्या चंद्रसूर्यापेक्षाही प्रसिद्ध केले.

देवा, ध्रुवबाळाने तप तरी केले, त्या अजामिळाने आपले स्मरणही केले नव्हते. तो आपल्या मुलाला, “नारायण, नारायण” अशी आर्त हाक मृत्युशय्येवरून मारत होता. तेवढ्या त्या अप्रत्यक्ष भक्तिच्या मोबदल्यात आपण त्याला मुक्ति दिलीत. जे जे दुःखी, कष्टी असतील, जे जे आर्त असतील, त्यांना तुझे देणे असेच हिशोबाच्या बाहेरचे असते, अपरंपार असते.

ज्या भृगुऋषींनी तुझ्या वक्षस्थलावर लाथ मारली त्यांची पदमुद्रा तू अजूनही मानाने वक्षस्थलावर मिरवतोस. शंखासुराचा वध केलास पण त्याच्या अस्थीचा शंख तू निरंतर जवळ बाळगतोस. अजून ते कलेवर विसंबत नाहीस. अपकार करणाऱ्यावरसुद्धा उपकार करणारा, अपात्रालाही उदारपणे देणारा असा तुझ्याशिवाय जगात दुसरा कोण आहे?

देवा, बळीकडे वामनरूपाने जाऊन दान घेतले खरे पण त्याचा पहारेकरी होऊन राहिलास, ती गणिका पोपटाला “राम, राम” म्हणायला शिकवत होती. पोपटही “राम, राम” म्हणायला शिकला. गणिकेच्या मुखातून, शिकविण्याच्या आणि पोपटाच्या मुखातून शिकण्याच्या निमित्ताने रामनाम येत असताना दोघांना मृत्यू आला. गणिका आपल्या मनोरंजनासाठी पोपटाला नाम शिकवत होती. देवाचे नाव घ्यावे म्हणून नव्हे! पण

तरीही यमधर्मांनी भगवन्नामाचा अधिकार शिरसावंद्य मानून गणिका आणि पोपट दोघांनाही विष्णुदूतांच्या स्वाधीन केले, आणि आपण त्या दोघांनाही मुक्ति दिली. तिला वैकुंठपदाची जोड करून दिली. अजामीळ, गणिका यांनी दुसऱ्या मिषाने तुझे नाव घेतले तरी तू त्या अपात्रांनाही निजपद दिलेस त्याची मी मनाशी आठवण करतो आहे आणि म्हणतो आहे की देव माझाच हट्ट का बरे पुरवणार नाहीत? दुभत्याच्या विपुलतेने जगाची गरज दूर करणारी ती कामधेनू काय आपल्या पाड्याला उपाशी ठेवील? म्हणून पुन्हा म्हणतो की आपण विश्वरूप दाखवाल यात मला शंका नाही पण "ते रूप पहाण्याची पात्रता आधी द्या."

आता माझे हेच चर्मचक्षू विश्वरूप पहाण्यास समर्थ आहेत असे तुला वाटले तर सख्या, "माझ्या डोळ्यांची आर्ती पुरवा. विश्वरूप पहाण्याच्या उत्कंठतेचे डोहाळे पुरवाच देवा."

अर्जुनाने कळवळून केलेली प्रार्थना त्या भक्तवत्सलास सहन होईना. कृपाजलाने भरलेला तो मेघ आणि अर्जुन समोर आलेला वर्षाकाळ असे वाटू लागले. भगवान कृष्ण कोकिळ, आणि अर्जुन त्या कोकिळास गाण्याची स्फुर्ती देणारा वसंत, असेच क्षणभर भासले.

आपल्या लाडक्या पुत्राचे-चंद्राचे वाटोळे बिंब पाहून क्षीरसमुद्राला भरती यावी त्याप्रमाणे अर्जुनाची आर्ती पाहून श्रीकृष्णप्रेमाला दुप्पट भरती आली. त्या प्रसन्नतेच्या आवेशात गर्जना करून तो कृपावंत म्हणाला, "पार्था, ही पहा माझी अनंत रूपे!"

विश्वरूप पहावे हा एकच मनोरथ अर्जुनाने सांगितल्याबरोबर देवांनी सगळे त्रैलोक्य विश्वरूपमय करून टाकले. खरोखर देवासारखा उदार काय तो देवच! याचकाच्या मागणीच्या सहस्त्रपट सहज आपल्या इच्छेने देतो.

शेषाच्या डोळ्यापासून जे लपवले होते, वेदानाही न दाखवता जे गुप्त ठेवले होते, लक्ष्मीजवळही जे जीवाचे गुह्य कधी प्रगट केले नाही ते विश्वरूप देवांनी पार्थाच्या प्रेमापोटी अनेक प्रकारे प्रगट करण्याचा व्यवहार केला. काय त्या पार्थाचे भाग्य! अहो, खरोखरच ते भाग्य अगाधच म्हटले पाहिजे.

जागा मनुष्य झोपला आणि त्याला स्वप्न पडू लागले की स्वप्नातील यच्चयावत् पदार्थ जसा तो स्वतः होऊन जातो त्याप्रमाणे तो परमात्मा अनंत ब्रह्मांडे होऊन राहिला.

देवांनी स्थूल दृष्टीचा पडदा फाडला विश्वरूपाची मोहर काढली आणि आपले योगवैभव प्रगट केले. देवांना अर्जुनाची हौस पुरविण्याची इतकी घाई झाली की अर्जुनाच्या चर्मचक्षूंना हे दिव्य रूप दिसेल की नाही याची आठवण देखील राहिली नाही. तो स्नेहातुर भगवान पुन्हा पुन्हा अर्जुनाला म्हणू लागला, "पहा, पहा, पार्था, माझी ही अनंत रूपे पहा."

मालुताई, देव विश्वरूपाचे वर्णन करीत आहेत. आतापर्यंतच्या अध्यायात कानांची एकाग्रता व मनाचा लय यांच्या ऐक्याची जरूरी होती. ह्या अकराव्या अध्यायात कान एकाग्र हवेतच पण डोळे सजग असायला हवे.

अर्जुनाची स्वतःची मागणी आहे की माझे डोळे तृप्त व्हावे. आपण तर अर्जुनाच्या भूमिकेतून जगतो आहो तेव्हा आता डोळे जागे असावयास हवे. भावविश्व साकार व्हावयास हवे. भगवंत जसजसे रूप प्रगट करतील तसतसे ते आपल्या डोळ्यापुढे उभे रहावयास हवे. देवांनी अर्जुनाला दिव्यदृष्टि दिली. आपण ती आपल्या भावनेच्या बळावर प्राप्त करून घ्यावयाची आहे. तरच अर्जुनाबरोबर आपल्याला विश्वरूपदर्शन सर्वार्थाने घडेल.

श्रीनिवासजी नावाचे एक श्रीराधेचे भक्त होते. ते रोज ध्यानास बसत. एकदा ध्यान करीत असताना त्यांना असा देखावा दिसला की राधा सखीमेळाव्यासहित राधाकुंडामध्ये विहार करीत आहे. विहार करता करता राधेच्या कानातील कुंडल पाण्यात पडले. ते कुंडल शोधून आणून देण्याची आज्ञा राधेने श्रीनिवास यांना दिली. श्रीनिवास हुडकू लागले. सात दिवस ते ध्यानावस्थेत कुंडल शोधत होते. मग श्रीरामचंद्रजी नावाच्या श्रीनिवासाच्या मित्राला घरच्या मंडळींनी बोलावून आणले. रामचंद्रजीनी पण बैठक घातली व ध्यानावस्थेत प्रवेश केला व जिथे श्रीनिवास राधाकुंडात कुंडलाचा शोध घेत डुंबत होते तेथे ते पोचले. दोघांनी शोधण्यास सुरवात केली. तेव्हा एका दिव्य कमलाखाली अडकलेले कुंडल त्यांना सापडले. दोघांनी ते कुंडल राधेला परत दिल्यावर राधेने आपल्या मुखातला अर्धा विडा श्रीनिवास व अर्धा विडा श्रीरामचंद्रजी यांच्या मुखात घातला. दोघे ध्यानातून भानावर आले तर दोघांच्या मुखात तो दैवी विडा प्रत्यक्ष होता! आता हे विश्वरूप पहाताना अशी तन्मयता आपल्याला साधायची आहे.

या तन्मयतेवरून एका बॅन्क अधिकाऱ्याची गोष्ट आठवली. असे सांगतात की, ते गृहस्थ ऑफिसच्या वेळेपूर्वी पाऊण तास बॅन्केत येत व आपल्या खुर्चीमध्ये स्वस्थ बसून रहात. डोळे मिटून बसत आणि ऑफिसची वेळ झाली की कामाला सुरवात करीत. हे गृहस्थ असे लौकर का येतात आणि खुर्चीत कां बसून रहातात हे कुणालाच माहित नव्हते. तोंडावर विचारण्याचे धैर्यही कुणाला होईना. मग हाताखालच्या त्या उपद्व्यापी मंडळीनी गुप्तपणे वरिष्ठास कळविले की हे गृहस्थ ऑफिसमध्ये असे पाऊण तास आधीच का येऊन बसतात याची चौकशी व्हावी. वरिष्ठांनाही नवल वाटले की “हा काय प्रकार आहे?” आपण समक्ष जाऊन पहावे असे ठरवून वरिष्ठ न कळवताच ऑफिसच्या वेळेपूर्वी अर्धा तास केबिनमध्ये येऊन उभे राहिले. तर बँक अंमलदार खुर्चीत डोळे मिटून स्वस्थ बसले आहेत. आणखी पंधरा मिनिटे जाऊ देऊन वरिष्ठांनी त्यांना हाका मारल्या. डोळे मिटून बसणाऱ्याने डोळे उघडले तर समोर वरिष्ठ उभे! त्यांना विचारले, “आपण कधी आलात?” वरिष्ठ म्हणाले, “अर्धा तास येऊन झाला. तुम्ही रोज पाऊण तास ऑफिस वेळेच्या आधी इथे येऊन बसता अशी तक्रार आली म्हणून मग चौकशीस आलो.”

बँक अंमलदार म्हणाले, “सर, त्याचे असे आहे की, माझी रहाण्याची जागा लहान आहे. शांतपणाने मानसपूजा करण्यासारखी परिस्थिती नाही. इथे ऑफिसमध्ये शांतता असते, हवा तसा एकान्त असतो. मनासारखी मानसपूजा करता येते. इथे मला देवाला सगळे उपचार मनाजोगे अर्पण करता येतात. हा पहा माझ हात.”

आणि हाताला खरोखरच वरणभात लागला होता. मग ते उठले. हात धुवून आले आणि राजिनामा लिहून वरिष्ठांच्या हाती दिला. “देवपूजेच्या आड येणारी नोकरी मला नको आहे” असे त्यात म्हटले होते.

तर अशी ही तन्मयता भक्तांना येते व त्या गाढ तन्मयतेचा पुरावाही ह्या पार्थिव शरिरापर्यंत पोचतो हे ध्यानात घ्यावयाचे. मानसपूजा चालू असताना पंचामृताचे ओहळ भक्ताच्या देहावरून खोलीच्या बाहेर आल्याची गोष्टही ऐकू येते.

मानसपूजा करणाऱ्या एका भक्ताच्या भेटीस दुसरे त्याच्याच योग्यतेचे मित्र आले होते. मानसपूजा संपल्यावर भक्त बाहेर आले व मित्राला म्हणाले, "वा! तुम्ही कधी आलात? मित्र म्हणाले, "तुम्ही मघाशी देवाला गुलाबाचे फूल वहात होता तेव्हाच आलो." मानसपूजेत वाहिलेले फूल मित्राला कळले म्हणून दोघांनाही आनंद झाला.

मालूताई, विश्वरूपदर्शनाचे वर्णन ऐकताना आपल्या मनाची काय अवस्था, काय एकाग्रता व्हावयास हवी ते आपण ह्या गोष्टीवरून ध्यानात घ्यायचे व ती उत्कट तन्मयता जास्तीत जास्त कशी साधेल ते पहायचे आणि तसे झाले की, "भलत्यानेही विश्वरूपदर्शन घ्यावे अशी सुलभता केली आहे" हे माऊलीचे सांगणे आपल्या बाबतीत खरे ठरेल.

माऊली म्हणतात, "देवांना अर्जुनाने विश्वरूप दाखवा असे म्हटले तर देवांनी असे रूप प्रगट केले की सर्व विश्वच त्यांच्या रूपात सामावले आहे. देव अर्जुनास म्हणाले "पहा रे पार्था!"

किती त्या आकृती! किती ते प्रकार! काही रूपे रोडकी तर काही लठ्ठ, काही काही प्रशस्त पुष्ट अवयवांची व खूप मांसल तर कांही शुष्क वाळलेली! काही अतिशय भयंकर, ऊंच मानेची किती! मोठ्या मोठ्या टाळूची किती! काही तर अगदी हिडीस दिसणारी. काही सडपातळ, आटोपशीर, तर काही अमर्याद आकाराची. त्या आकृतींच्या चेहऱ्यावरचे भाव तर किती प्रकारचे! काही रूपे अनावर, तर कही मदोन्मत्त, काही आनंदित, काही आशाखोर, तर काही निराश, काही तामसी, काही अतिशय कृपाळु, काही भयंकर तर काही समाधीत असलेली. काही धुंद तर काही सावध, काही उघड तर काही गूढ, काही करूण तर काही रागावलेली, काही स्तब्ध तर काही गर्जना करणारी, काही शब्दरहित आणि शांत तर काही आनंदित, काही जागी तर काही झोपलेली, काही सर्व बाजूंनी संतुष्ट तर काही पीडित, काही बिनहत्यारी तर काही हत्यारबंद, काही रूपे उत्पत्ती करण्याच्या तर काही पालन करण्याच्या लीलेमध्ये तर काही रूपे संहार करण्याच्या आवेशात! तर काही केवळ साक्षीभूत होऊन राहिलेली!

असे नाना प्रकारचे आकार! काय त्यांचा तो दिव्य प्रकाश! आणि काय त्यांचे ते अलौकिक रंग! एकासारखा एक रंग नाही. काही रूपे उत्तम चोख सोन्याच्या लगडीसारखी झळकत आहेत तर काही पिंगट रंगाची आहेत. काहींचा रंग आकाश शेंदराने माखावे तसा आहे. काही रूपे ब्रह्मकटाह तेजस्वी माणकांनी जडवून मांडावा तशी दिसतात तर काही अरूणोदयाच्या आरक्तवर्णाची आहेत. काही शुद्ध स्फटिकासारखी सोज्वळ तर काही इंद्रनीळ मण्यासारखी निळ्या रंगाची, काही काजळाच्या पर्वतासारखी तर काही कुंकवासारखी लालभडक! चकाकत्या सोन्यासारखी काही पिवळी धमक तर काही वर्षाऋतूमधल्या नव्या मेघाप्रमाणे सावळी. काही चाफ्यासारखी पांढरी तर काही हिरवीगारसुद्धा आहेत. तापलेल्या तांब्याच्या रंगासारखी काही आहेत तर काही पांढऱ्या शुभ्र चंद्रबिंबासारखी आहेत. किती रूपे, किती नानाविध रंग!

आकृती तर इतक्या सुंदर की, मदन लाजून शरण यावा! तशाच असुंदरही तितक्याच! ह्या सुंदर आकृतीची सुंदरता, स्निग्ध कांती पाहिली की शृंगार लक्ष्मीने आपले भांडारच उघडून ठेवले आहे असे वाटते आहे.

देव अर्जुनाला सांगू लागले, "सुभद्रापति, या बघ माझ्या नाना आकृति! पहाता पहाता तू थकशील. या आकृतीचा परतीर तुला कधी दिसायचा नाही अशा त्या अमर्याद आहेत. या एकेका आकृतीवरच काय पण एकेका शरीरभागावर तुला जग दिसेल."

माऊली सांगतात, "देवाचे स्वरूप पहाता पहाता असे दिसू लागले की विश्वरूपाने डोळे उघडले की सूर्याचे समुदाय दिसावे, डोळे मिटले की ते सूर्यही मावळून नाहीसे व्हावे. तोंडातून निघणाऱ्या वाफेबरोबर ज्वालांचे लोट येताना दिसू लागले. अग्नि आदिकरून वसूंचा समुदाय प्रगट होऊ लागला. भुवयांची टोके रागाने एकत्र होऊ लागल्याबरोबर रुद्रगणांचे समुदाय अवतीर्ण होऊ लागले. असे दिसू लागले की विश्वरूपाच्या सौम्यतेच्या ओलाव्यात अगणित अश्विनौदेव निर्माण होत आहेत, विश्वरूपाच्या कानातून अनेक वायू निर्माण होत आहेत व या स्वरूपाच्या एकेक लीलेमध्ये देवांचे व सिद्धांचे समुदाय जन्मास येत आहेत.

देव अर्जुनाला म्हणाले, "अर्जुना, बघ रे, ही माझी अपार आणि विशाल रूपे पहा. ह्या रूपांचे वर्णन करता करता वेद बोबडे झाले. पहाता पहाता काळाला आयुष्य पुरेना. सर्वज्ञ ब्रह्मदेव या स्वरूपाचा शोध घेण्यास असमर्थ झाला.

पार्था, तिन्ही देवांनी या स्वरूपाची वार्ताही ऐकलेली नाही. ही दुर्लभ अनंत रूपे तू प्रत्यक्ष इथे पहा आणि ऐश्वर्याचे मोठे निधान सहज कौतुकाने भोग.

अर्जुना, नीट पाहून घे. किरीटी या विश्वरूपाच्या अंगावरील केसांच्या मूळाकडे नीट न्याहाळून पहा. कल्पवृक्षाच्या मुळाशी तृणांकूर असावे तसे तुला अगणित सृष्टिसमुदाय त्या रोममूळाशीं दिसतील. वाऱ्याने उडणारे परमाणू जसे सूर्यप्रकाशात तरंगताना दिसतात त्याप्रमाणे ह्या रूपाच्या अवयवांच्या सांध्यांत अनेक ब्रह्मांडे वर खाली जाताना तुला दिसतील. या रूपांच्या एकेक भागावर तुला विस्तारासह सगळे विश्व दिसेल. या विश्वाच्या पलीकडेच काही आणखी पहाण्याची तुला इच्छा आहे का! पहा ना इथे या ठिकाणी कुठल्याही गोष्टीचे उणे नाही. तुला जे जे पहावेसे वाटेल ते ते सगळे तू इथे सुखाने पाहून घे."

कारुण्यपूर्व वाणीने प्रेमभराने श्रीकृष्ण वर्णन करत गेले. अर्जुन पहातो आहे की नाही हे जाणून घेण्यासाठी त्याच्यावर देवानी नजर फिरवली तर काय? अजून जशाच्या तसा नुसता व्याकुळ मुद्रेने उभा आहे! "हा असा मुकाट्याने का उभा आहे? पहात का नाही?" असा विचार देवांच्या मनात आला आणि उत्कंठेची लेणी अंगावर घातलेला तो अर्जुन त्यांना अतृप्तच दिसला. अजून त्याला सुखाचा रस्ता सापडलेला नाही, त्याची उत्कंठा कमी होतच नाही असे पाहून देव हसून म्हणाले, "पार्था, अरे मी तुझ्यापुढे विश्वरूप प्रकट केले आहे आणि तू तर पहातच नाहीस. अरे, असाच देखणारा काय तू? तुला आता काय करावे.?"

अर्जुन चतुर होता. काय घडले आहे हे तो पूर्ण जाणूनच होता. पण वर वर रागाचे अवसान आणून

रूसवा दाखवत तो म्हणाला, “करा चेष्टा देवा. तुमचा तर तो अधिकारच आहे. आम्हाला तुमचे दिव्यरूप ह्या चर्मचक्षूंनी पहाता येणार नाही हे का मी तुम्हाला समजावून सांगायचे आहे का? गोकुळातल्या त्या भोळ्याबापुड्या गोपींची तुम्ही किती थट्टा करीत होता ते आम्ही सगळे काही ऐकले आहे. आज मी बापुडा आपल्या हाती सापडलो आहे, करून घ्या छळ, आरसा स्वच्छ घासून पुसून ठेवा आंधळ्यासमोर आणि सांगा त्याला “रूप बघ” म्हणून! हृषिकेशा, एखादा बहिरा धरून आणा, त्याच्यापुढे उत्कृष्ट रागदारी गाऊन दाखवा आणि उपहासाने वर म्हणा त्याला “मान डोलवताही येत नाही का तुला.” कमल परागांतील मकरंद बेडकापुढे वाढा आणि विचारा की त्याला, “किती मधुर आहे ना मकरंद?” अतींद्रिय म्हणून ज्याची व्यवस्था, जे केवळ ज्ञानदृष्टिलाच फावणार आहे, ते ह्या आमच्या चामड्याच्या डोळ्यापुढे मांडा आणि घालवा वाया! कोण बोलणार आपल्याला?

पण देवा, तुमच्यावर तरी काय राग धरायचा? आमची योग्यता आम्ही जाणूनच असायला हवे होते. तुम्ही ज्ञानाच्या गोष्टी सांगितल्या त्या ऐकून मी गप्प बसायचे ते तुमच्याजवळ विश्वरूपदर्शनाचा हट्ट घेऊन बसलो. मग अशी ही शिक्षा व्हावयाचीच. देवा, माझी आता काही तक्रार नाही. तुमचे उणे न काढता आपल्या स्वतःच्या आंगचे उणे सहन करावे हेच शहाणपणाचे! तुमच्याजवळ भलता हट्ट धरला हे तर माझेच चुकले.”

डोळ्यात आलेली आसवे हळूच पुसून घेऊन अर्जुनाने मान फिरवली. पार्थाचे दुःख देवांना बघवेना. दोन्ही हातांनी त्याचे मुख आपल्याकडे वळवून त्यांनी अंगावरच्या शेल्याने अर्जुनाचे डोळे पुसले आणि सद्‌गदित होऊन म्हणाले, “पार्था, माझ्यावर असा रागावू नको रे. तू विश्वरूप दाखवा म्हणालास त्याबरोबर मला रहावेना मी प्रगट होतच गेलो. ते विश्वरूप तुला दिसणार नाही हे मुळी माझ्या ध्यानातच आले नाही रे. खरे स्वरूप दाखवावयाचे तर ते पहाण्याचे सामर्थ्य आधी द्यावे हे प्रेमाच्या भरात मला भानच राहिले नाही, जमिनीची मशागत न करता बी पेरले आणि बी आणि पाणी घालण्याचा वेळ फुकट घालवला. खरं सांगतो अर्जुना, तुझी चेष्टा करावी म्हणून मी हे केले नाही. मी जर विश्वरूप प्रगट करण्यास उशीर लावला असता तर तुला वाटले असते ना की माझ्या मनात तुला ते रूप दाखवावयाचेच नाही, म्हणून रे मी घाईघाईने रूप दाखवण्यास सुरूवात केली. तुझी उत्कंठा पाहून मला हसू आले एवढेच काय ते माझे चुकले बाबा.

अर्जुना, हे विश्वरूप तुला सहज पहाता येईल अशी दिव्यदृष्टि तुला तात्काळ देतो बघ. अर्जुना, त्या दृष्टिने आमचा ऐश्वर्ययोग पाहून अनुभवाच्या गाभ्यात घालून ठेव.

वेदांनी जाणण्याचा विषय, सकल लोकांचा आदि आणि सकल लोकांना वंद्य असा तो भगवंत पार्थाला किती हळुवारपणे ह्या सर्व गुह्य गोष्टी समजावून देतो आहे!

संजयाला हे सगळे दृश्य पाहून व संवाद ऐकून फार चमत्कार वाटला. तो धृतराष्ट्राला म्हणाला, “कौरव कुळातील सर्व श्रेष्ठ महाराज, काय ह्या पांडवांचे दैव उघडले आहे पहा! लक्ष्मीपेक्षा जगात जास्त दैववान कोण असणार? तत्त्वाची गोष्ट सांगण्याचे सामर्थ्य वेदाहून कुणामध्ये जास्त असणार? शेषापेक्षा सेवकपण कुणामध्ये असणार? अष्टौप्रहर भगवंताच्या प्राप्तीसाठी शिणणारे योग्यांच्यापेक्षा कोण आहे? देवास पाठीवर वाहून नेणाऱ्या गरुडापेक्षा एकनिष्ठ कोण असणार? पण महाराज ते सगळे एकीकडे राहिले. ज्या

दिवशी पांडव जन्माला आले, त्या दिवसापासून देवानी आपले सर्व मित्रसुख पांडवांना देऊन टाकले. त्यातल्यात्यात पुन्हा एखादा कामुक पुरुष स्त्रीच्या पूर्ण आधीन होऊन रहातो तसे देव अर्जुनाच्या अंकित होऊन गेले. अहो महाराज, अर्जुन जे जे म्हणेल ते ते श्रीकृष्ण करीत आहेत. शिकवलेले पाखरूसुध्दा असे "बोल" म्हटल्याबरोबर बोलायचे नाही. क्रीडामृगसुद्धा इतका आज्ञेत वागत नाही. पण भक्तीच्या जोरावर अर्जुनाने हा देव इतका वश करून घेतला की, अर्जुनाचे सर्व हट्ट देव पुरवतच जातात. अर्जुनाच्या दैवाचा उत्कर्ष काही शब्दाने सांगता येत नाही. परब्रह्म सगळेच्या सगळे एका वेळी त्या अर्जुनाने पाहिले. काय भाग्याचे त्याचे डोळे हो! अर्जुनाने इच्छा सांगण्याचा अवकाश की देवानी तात्काळ त्याच्या शब्दांप्रमाणे करावे हा केवढा चमत्कार आहे! फक्त मागण्याचीच फुरसद की देव देतच आहेत. अर्जुनाचे रागाचे बोलणे देव शांतपणाने ऐकून घेतात, रुसला की त्याची समजूत घालत मागे मागे फिरतात. महाराज, देवाना पार्थाचे वेडच लागले आहे.

विषय जिंकूनच जे जन्माला आले आहेत ते देवांचे फक्त बाह्यरूप वर्णन करून देवांचे भाट झाले. त्यांना ह्या विश्वरूपाचे प्रत्यक्ष दर्शन झाले नाही. खरे म्हणजे योगाचे सगळे कष्ट सहन करून जेव्हा योगी समाधीची प्राप्ती करून घेतात तेव्हा त्या विश्वरूपदर्शनाचे धन त्यांना प्राप्त होते. पण हे योगाचे कष्ट सहन न करता ते मूळ रूप पार्थाच्या कसे काय आपणहून स्वाधीन झाले आहे कोण जाणे? माझ्या मनाला ह्या भगवंताच्या कृपेचे राहून राहून आश्चर्य वाटते आहे."

संजय थोडा वेळ स्तब्ध राहिला आणि विचार करून म्हणाला, "पण कौरवेशा, यात आश्चर्य तरी कसे काय वाटून घ्यावे? श्रीकृष्णांनी ज्याचा स्वीकार केला त्याचा असा भाग्योदय व्हावयाचाच. आताचेच पहा ना, अर्जुन रुसला तर देवानी किती मायेने त्याची समजूत काढली!

काय सांगू महाराज, भगवंताच्या तोंडून "तुला दिव्यदृष्टि देतो" ही अक्षरे निघाली मात्र! अज्ञानाचा अंधःकार जाऊच लागला."

माऊली म्हणतात, "ती अक्षरे नव्हतीच. ब्रह्मसाम्राज्य दाखविणारी ज्योतच होती. देवानी आपली चित्कला अर्जुनासाठी उजळली असे झाले."

देवानी म्हटल्याबरोबर अर्जुनाला दिव्यदृष्टि मिळाली, ज्ञानदृष्टिचे सामर्थ्य वाढले आणि देव आपले जे जे ऐश्वर्य प्रगट करू लागले ते ते पार्थाला दिसू लागले.

देव जेथून सर्व अवतार घेतात ते मूळ स्वरूप म्हणजे त्या अवतार कल्लोळास आधारभूत असलेला समुद्रच! विश्व हे मृगजळ ह्या स्वरूपाच्या किरणामुळे दिसते. ह्या अनादि भूमिकेवर ह्या चराचर विश्वाचे चित्र उमटते. ती मूळ भूमिका, ते मूळ रूप देव अर्जुनाला प्रगट करून दाखवू लागले.

एकदा लहानपणी गोकुळात देवानी माती खाल्ली होती. यशोदामाता रागावली आणि तिने देवाचे हात बांधून घातले आणि ती रागानेच देवाना म्हणाली "उघड बघू तोंड, किती माती खातोस रे?" देवानी भयभीत झाल्याचे मिष केले, तोंड उघडले आणि दीनवाणी मुद्रा करून यशोदेपुढे उभे राहिले. यशोदा तोंडात पहाते तो

चौदाही भुवने सामावली आहेत! देवानी कृपाळूपणे तिला चौदाही भुवने सावकाश पाहू दिली.

ध्रुव मधुबनात गेल्यावर नारदमुनीच्या सांगण्याप्रमाणे तपाचरणास बसला. देव प्रसन्न होऊन प्रकट झाले. ध्रुवबाळाने हात जोडले आणि म्हटले, "देवा तुझे वर्णन करावेसे वाटते पण कोणत्या शब्दात करू? मला तर काही सुचत नाही."

देवानी ध्रुवाच्या गालास आपल्या हातातील शंखाने स्पर्श केला आणि वेदांच्याही मति जिथे कुंठित होतात ते ज्ञान तो बोलू लागला. अशा प्रकारचा अनुग्रह ह्या ठिकाणी देवानी अर्जुनावर केला. आता "माया" ही भाषा कुठल्याकुठेच गेली. भगवंताच्या ऐश्वर्याचे तेज दृष्टीसमोर आल्याबरोबर प्रलयकाली जसे जग जलमय होऊन जाते तसे त्याचे चित्त चमत्काराच्या प्रवाहात बुडून गेले. ब्रह्मलोकापर्यंत परिपूर्ण झालेल्या पाण्यात मार्कंडेय जसा एकाकी पोहत होता तसा अर्जुन त्या विश्वरूपाच्या कौतुकात तल्लीन होऊन गेला.

मार्कंडेय हे महान ऋषि होते. त्यांनी परमेश्वराजवळ त्याची माया पहाण्याची इच्छा दर्शवली. भगवंताने "तथास्थु" म्हटले. एकदा ते आश्रमात बसले असता जोराचा वारा सुटून पृथ्वी जलमय झाल्याचे त्यांना दिसले. त्या जलप्रवाहात ते एकटेच पोहत असताना एका वटपत्रावर एक सुंदर बालक निजलेले त्यांना दिसले. या बालकाच्या श्वासाने ते त्याच्या पोटात ओढले गेले व तेथे त्याना बाहेरच्या सृष्टीप्रमाणेच दुसरी सृष्टि दिसली. बाळाचा श्वास बाहेर पडल्याबरोबर मार्कंडेय मुनी बाहेर आले तर आपण आपल्या आश्रमातच आहो असे त्यांना दिसले. आपण पाहिली ती सर्व भगवंताची माया होती हे त्यांना कळले. मुनी आश्चर्ययुक्त मनःस्थितीत असतानाच भगवंतानी त्यांना पुन्हा दर्शन दिले व माया पहाण्याची त्यांची इच्छा पुरी केल्याचे पटवून दिले.

विश्वरूपदर्शनाची इच्छा पार्थाने केली आणि त्याप्रमाणे त्याला विश्वरूपदर्शन झाले. त्या दर्शनाच्या कौतुकात तो मार्कंडेयाप्रमाणे पोहतच राहिला.

मनाशी म्हणू लागला. "आता इथे आकाश होते ते कुणी आणि कुठे नेले हो?" ती चराचरभूते, ती पंचमहाभूते झाली तरी काय? अहो, इथे तर दिशांचाच ठावठिकाणा नाही. वर खाली हेसुद्धा काहीच उमजेना की. जागे झाल्यावर स्वप्न नाहीसे व्हावे तसे हे सृष्टीचे सगळे आकारच नाहीसे झाले. आकाशातल्या चंद्रासह सर्व नक्षत्रे जसा सूर्याच्या तेजाचा प्रताप गिळून टाकतो तशी ह्या विश्वरूपाने ही प्रपंचरचना गिळंकृत करून टाकली आहे की.

काय माझ्या मनाची आणि बुद्धीची अवस्था झाली ही. मनाला मनपण स्फुरेना, बुद्धिला बुद्धि सावरेना, इंद्रिये माघारी फिरून हृदयात दडली की. त्यांची सगळी किरणे उलटी अंतःकरणात भरून राहिली आहेत. तटस्थतेला ताटस्थ्य आले. एकाग्रतेलाही एकाग्रता आली. सगळ्या विचारावर जसे काही कुणीतरी मोहनास्त्रच सोडले आहे." असे विचार करीत अर्जुन मोठ्या उत्सुकतेने इकडे तिकडे पाहू लागला तर काय? त्याच्या पुढ्यात जे चतुर्भुज सावळे रूपडे होते तेच नाना रूपे घेऊन उभे ठाकलेले दिसले. वर्षाकाळातील प्रचंड मेघ किंवा महाप्रलयकालचे तेज आपणच सगळीकडे भरून राहून दुसरा पदार्थच आपल्याशिवाय उरू देत नाहीत त्याप्रमाणे त्या विश्वरूपाने त्रैलोक्य व्यापून टाकले आहे असे अर्जुनाला दिसले.

अनुक्रमणिका

दिलेल्या दिव्यदृष्टीने त्याने त्या विश्वरूपाचे मनसोक्त दर्शन घेतले आणि तृप्तीने त्याचे डोळे मिटले. आता दिव्यदृष्टि वेगळी राहिली नव्हती. अंगभूतच झाली म्हणून त्याने डोळे उघडले तर त्याच्या स्वतःच्या दृष्टिपुढेही ते विश्वरूप आहेच! याच दोन्ही डोळ्यांना विश्वरूप दिसावे अशी त्याची इच्छा देवानी हा सोहळा दाखवून पुरी केली.

अर्जुन आता जास्त निरखून पाहू लागला तर त्याला अनेक मुखे दिसू लागली. काय त्या मुखांचे सौंदर्य वर्णन करावे? ती मुखे लक्ष्मीकांताचे राजवाडे किंवा लावण्यलक्ष्मीची निधानेच आहेत असे वाटत होते. देवांची ती मुखकमले आनंदाच्या बहरलेल्या वनासारखी दिसत होती. सौंदर्याचे राज्यच तेथे वसत होते.

त्यातली काही मात्र फारच भयानक होती. काळरात्रीच्या सैन्याने उठाव करावा तशी ती दिसत होती. इतके भय उत्पन्न होत होते की, ही मृत्यूचीच मुखे वाटत होती. भयाचे दुर्गम किल्ले असावे, प्रलयकाळच्या अग्नीची कुंडे धडधडावी तशी अद्भूत  भयासुर काही मुखेही त्या वीराग्रणी अर्जुनाला दिसली. काही असाधारण अलंकारानी युक्त अशी ही मुखे होती तर पुष्कळ सौम्य पण होती. ज्ञानदृष्टीच्या जोरावर ही मुखे कुठेपर्यंत आहेत हे पहावे म्हणून तो चहूबाजूंनी पाहू लागला पण त्या मुखांचा शेवट त्याला दिसेचना.

आता डोळे तरी पाहूया असे मनाशी म्हणून तो कौतुकाने डोळे पाहू लागला तर, डोळ्यांचे तरी किती प्रकार असावे! निरनिराळ्या रंगाची कमले फुलावी तसे डोळे त्याने पाहिले. दुसऱ्या बाजूस पहातो तो सूर्याचे समुदाय बसावे असे लखलखणारे प्रकाशमान डोळे दिसले. कृष्णमेघांची दाटी असावी आणि त्यात कल्पांतसमयीच्या विजा चमकाव्या तशा दृष्टि अर्जुनाला दिसल्या. विश्वरूपाच्या भुवयाखाली धगधगत्या अग्निच्या ज्वाळा उठाव्या तसे ह्या दृष्टीचे तेज होते. अधूनमधून त्यात पिंगट रंगाच्या छटाही उमटत होत्या. हे एकेक आश्चर्य पहाता पहाता त्या विश्वरूपाच्या दर्शनात अनेक रूपांच्या दर्शनाचा लाभ अर्जुनाला झाला.

तो मनाशी म्हणाला, "कशी ही इतकी मुखे! कसे हे डोळे! किती प्रकारचे! आता पाय कुठे आहेत, मुकुट कुठे आहे, त्या बळकट भुजा कुठे आहेत ते तरी पाहू या."

सगळे रूप पहाण्याची त्याची इच्छा अशी वाढू लागली.

पार्थ भाग्यनिधी! त्याची इच्छा सफल झाल्याशिवाय कशी राहील? जो जो मनोरथ तो करील तो तो सिद्धीस जावयाचाच! शिवाच्या हातात पिनाक नावाचे धनुष्य आहे. त्या धनुष्याला जोडण्यासाठी जो बाणांचा भाता शिवदेव बाळगतात त्यात निष्फळ बाण कसे असतील? ब्रह्मदेवाच्या वाचेमध्ये लटक्या अक्षरांचे साचे कसे रहातील? अर्जुनाचे मनोरथ तसेच निष्फळ झाले नाहीत. त्याने ह्या अमर्याद विश्वाचा आदि अंत पाहिला. वेदांनासुद्धा या स्वरूपाचा रस्ता माहीत नव्हता. त्या विश्वरूपांची एकूण एक अंगे अर्जुनाच्या दोन्ही डोळ्यांनी पाहिली.

चरणापासून मुकुटापर्यंत त्या विश्वरूपाचे विशालत्व त्याला प्रतीत झाले. मग तो देवांच्या अंगावरचे

नाना रत्नांचे अलंकार पाहू लागला. ज्ञानदेव म्हणतात, “अहो, त्या अमौलिक दागिन्यांचे मी वर्णन तरी कसे करू? आपल्या अंगावर चढविण्यासाठी त्या परब्रह्माने स्वतःच अलंकाराचे रूप धारण केले होते. आता त्या अलंकाराना उपमा तरी कशाची द्यावी? अलंकार परब्रह्मासारखे होते असेच म्हणावे लागते. ज्या तेजाच्या झळाळीने चंद्र व सूर्य मंडळाना प्रकाश प्राप्त होतो आणि ज्या महातेजाच्या कृपेने विश्व प्रगट होते त्या दिव्य तेजाची शोभा कुणाच्या बुद्धिला दिसणार? तर अशा प्रकारच्या तेजाने युक्त अलंकार देवानी धारण केले आहेत असे अर्जुनाने पाहिले. काय सांगावे, अंग, अलंकार, हात, हत्यार, जीव, शरीर असे सर्व चराचर देवानीच भरून टाकले होते.

ज्ञानदृष्टीने अर्जुन देवाच्या सरळ अशा करपल्लवाकडे पाहू लागला तर कल्पांतीच्या ज्वाळा तोडणारी शस्त्रे देवांच्या हाती दिसली. त्या शस्त्रांचे तेज इतके प्रखर होते की, त्या नक्षत्रांचे फुटाणे होतील की काय असे त्याला वाटले. त्या प्रकाशाला भिऊन “समुद्रात उडी घालावी” असे अग्नि म्हणू लागला. उगारलेल्या शस्त्रासहित इतके अपार हात दिसू लागले की, काळकूटाच्या लाटा उठत आहेत की महाविजांचे अरण्य प्रकट झाले आहे असे वाटले.

शस्त्रे हातात घेतलेल्या त्या विश्वरूपाकडे पाहून आणि त्या हातांचा आवेश पाहून अर्जुन घाबरला. त्याने त्या हातावरून आपली दृष्टि काढून घेतली आणि ती कंठ व कुकुट यावर लावली.

शिणलेली लक्ष्मी जिथे विश्रान्ती घेते आणि जी महासिद्धींची मूळपीठे आहेत अशी दिव्य कमळे वासासाठी देवांनी स्वीकारली होती. मुकुटावर फुलांचे घोस रुळत होते आणि देवांच्या अंगावर ठिकठिकाणी हार गजरे दिसत होते. गळ्यात अलौकिक माळा रुळत होत्या. स्वर्ग सूर्याच्या तेजाने माखावा, किंवा मेरु पर्वत बावनकशी सोन्याने मढवावा तसा सोनसळी पीतांबर देव कसून नेसले आहेत असे पार्थाने पाहिले. देवानी आपल्या निळसर अंगावर पांढऱ्या शुभ्र चंदनाची उटी लावली होती. महादेवानी अंगाला कापूर लावावा, किंवा कैलास पर्वतावर पारा ओतावा किंवा क्षीरोदकाने क्षीरार्णव पांघरावा तशी त्या चंदनचर्चित देवांची शोभा पार्थाला दिसली.

चंद्राची घडी उलगडावी आणि आकाशाला त्याची कुंची घालावी तशी देवांच्या अंगावर चंदनाची उटी दिसत होती पण आता त्या चंदनाच्या अपूर्व सुगंधाचे कसे वर्णन करावे? स्वप्रकाशाला कांती चढविणारा, ब्रह्मानंदाची उष्णता घालविणारा आणि आपल्या अस्तित्वाने पृथ्वीला जीवित्व देणारा तो सुगंध प्रत्यक्ष मदन आपल्या अंगावर धारण करतो. साक्षात् परब्रह्मही आपल्या निर्लेप अंगावर आनंदाने त्याचा लेप चढविते असा तो अलौकिक सुंगध!

ही अशी एकेक शृंगार शोभा पहाता पहाता अर्जुन अगदी गडबडून गेला. त्याला देव बसले आहेत, उभे आहेत की झोपले आहेत हेही कळेना.

डोळे उघडून बाहेर पहावे तर देव आहेत. सर्व विश्वच मूर्तिमय आहे आणि पहायचे नाही म्हणून डोळे मिटून स्वस्थ बसावे तर आतही तोच देखावा. समोरची अनावर मुखे पाहून पाठमोरे होऊन उभे रहावे तर त्या

बाजूलाही देवांची मुखे, करचरण आहेतच.

पाहिल्यावर दिसावे ह्यात खरोखर काही आश्चर्य आहे का? पण चमत्कार असा की विश्वरूप पहायचे नाही असे ठरविले तरीही दिसतच होते. पहा काय अनुग्रहाची करामत आहे? अर्जुनाचे पहाणे आणि न पहाणे देवानी व्यापून टाकले आहे. एका चमत्काराच्या पुरात पोहता पोहता जरा कुठे काठाकडे पोचतो तोच अर्जुन दुसऱ्या चमत्काराच्या महापुरात पडत होता. आपल्या असाधारण स्वरूप दर्शनाच्या कौशल्याने त्या अनंताने अर्जुनास कवटाळून घेतले. देव ज्याला सर्व बाजूस मुखे आहेत असा, त्यात अर्जुनाने ते स्वरूप समग्र दाखविण्याची प्रार्थना केलेली! मग काय? तो श्रीकृष्ण परमात्मा आता ते आपले विश्वतोमुख रूप घेऊन प्रत्यक्षच समोर उभा राहिला. दिव्यामुळे किंवा सूर्यामुळे पहाता यावे, दिवा आणि सूर्य नसल्यावर पहाता येऊ नये अशी ती देवानी दिलेली दृष्टि नव्हतीच.

आश्चर्यचकित झालेला संजय हस्तिनापुरात धृतराष्ट्राला म्हणाला, “महाराज, उजेडात, अंधारात, डोळे झाकून, उघडून, कुठल्याही अवस्थेत ते विश्वरूप पार्थास दिसतच होते.”

धृतराष्ट्राच्या चर्येवर काहीच विकार संजयाला दिसेना. तो जरा उतावीळ होऊन पुन्हा पुन्हा विचारू लागला, “मी काय म्हटले ते आपण ऐकले काय? महाराज, अहो अर्जुनाने विश्वरूप पहाण्याचा हट्ट धरला तो देवानी पुरवला की, दिव्यालंकार घातलेले विश्वतोमुख असलेले ते आजवर कुणी न पाहिलेले विश्वरूप देवानी पार्थासाठी रणभूमीवर उभे केले आहे पहा. काय सांगू? अर्जुनालाच काय पण त्या व्यासमुनीच्या कृपेने ह्या क्षणी मलाही ते रूप स्पष्ट दिसते आहे. अहो त्या श्रीकृष्णाच्या अंगकांतीचे तेज काय वर्णन करावे? प्रलयकाळी आकाशात बारा सूर्य एकदम एका वेळी उगवतात असे आम्ही वाडवडिलांच्या तोंडून ऐकले होते. पण महाराज आज ते दृश्य ह्या रणभूमीवर मी साक्षात् पहातो आहे. बारा आदित्यांची मी ह्या तेजाशी तुलना केली खरी पण तीसुद्धा चुकलीच. सहस्र सूर्य जरी एकाच वेळी उगवले तरीही ह्या तेजाच्या प्रखरतेशी बरोबरी करू शकणार नाहीत. पहा, पहा, ते तेज तर आणखी वाढतेच आहे. जगातल्या सगळ्या विजा एकत्र केल्या, त्यात प्रलयाग्निची सगळी सामुग्री आणून ओतली आणि महातेजाची दसकडी जरी ह्यात मिसळली तरी ते तेज ह्या अंगप्रभेच्या मानाने अल्पस्वल्प येईल न येईल! खात्रीपूर्वक सांगतो की हे मिश्र तेज ह्या अंगप्रभेइतके कधीच होणार नाही.”

ह्या ओव्या वाचताना असे मनात येते की अर्जुनाच्या दिव्यदृष्टीला हे तेज सहन झाले असेल कारण देवानीच ती त्याला दिली होती पण ते तेज संजयाला कसे सहन झाले असेल? व्यासाना हा सगळा वृत्तांत कसा घडणार आहे हे माहित असल्यामुळे त्यांनी दुर्बिणीची काच जशी समोरच्या दृश्याप्रमाणे मागे पुढे सरकविण्याची सोय असते तशी सोय असलेली दृष्टि संजयला देऊन ठेवली असेल काय? महर्षि अण्णासाहेबांची एक गोष्ट सांगातात की त्यांनी जवळ बसलेल्या एका गृहस्थांना विचारले “काय? अफगाण युद्ध पहायचे आहे काय?” तो गृहस्थ म्हणाला, “हो, हो, इथे बसून पहाता येईल?” तर अण्णासाहेबांनी कागदाला भोक पाडले आणि म्हटले, “पहा ह्या भोकातून.” आश्चर्याची गोष्ट अशी की त्या गृहस्थास अफगाण युद्धाचा देखावा त्या भोकातून दिसू लागला. कागदाचे भोक हे त्या गृहस्थाचे चित्त एकाग्र व्हावे म्हणून केलेले निमित्त! बाकी अण्णासाहेबांनी आपल्या सामर्थ्यावर क्षणमात्र दिव्यदृष्टि त्या गृहस्थास दिली होती.

त्यावरून देव मामलेदारांची गोष्ट आठवते. सटाण्यास ते मामलेदार असताना न्यायमूर्ति म. गो. रानडे, सरदार गोपाळराव देशमुख वगैरे मंडळींनी सटाण्यास भेट देण्याचे ठरविले. ज्या दिवशी दुपारी ही मोठमोठी मंडळी सटाण्यास पोचणार त्या दिवशी सकाळी ध्यानातून उठल्याबरोबर देव मामलेदारांनी हाताखालच्या मंडळींना बोलावून सांगितले, “हे पहा आज आम्हाला फार मोठ्या मंडळीचे दर्शन होणार आहे. शेजारच्या वाड्यात उत्तम जेवणाचा बेत करा. बैठकी घाला. आम्ही दूध, फळे, पेढे-बर्फी, हारतुरे घेऊन वाटेतल्या खेड्यात त्यांचे स्वागत करून त्यांना घेऊन येतो.”

देव मामलेदार वाटेवरच्या खेड्यात आले. चावडीमध्ये सगळा बंदोबस्त केला. चार टांग्यातून न्यायमूर्ति, सरदार वगैरे मंडळी खेड्यात पोचताच देव मामलेदार पुढे झाले. त्या मंडळीना उतरून घेतले. चावडीत नेऊन उत्तम आदरातिथ्य केले. हे इतके अगत्य पाहून न्यायमूर्तिही गहिवरले. सटाण्यास तर जेवणाचाच बेत होता! ही मंडळी येणार असल्याची रीतसर वर्दी नसताना देव मामलेदारांना ही वार्ता कशी कळली हे शेवटपर्यंत कुणाला कळले नाही. खोदून विचारले तरी त्यानी नुसते हसून विषय पालटला.

तपोसामर्थ्याने देव मामलेदारांनी ही दिव्यदृष्टि, हे दिव्य श्रवण, ह्या शक्ति मिळवल्या होत्या. संजयाचे भाग्य असे की, धृतराष्ट्राच्या निमित्ताने व्यासांनी ती शक्ति त्याला प्रदान केली होती आणि म्हणूनच तो त्या तेजापुढे टिकला आणि ते विश्वरूप पाहू शकला. संजय धृतराष्ट्रास म्हणाला, “महाराज, ह्या विश्वरूपात कुठे तरी एका कोपऱ्यात हे सर्व जग आपल्या विस्तारासह दिसते आहे. समुद्रावर बुडबुडे यावे, आकाशात एखादे लहानसे गंधर्वनगर असावे, जमिनीवर एखाद्या मुंगीने घर बांधावे किंवा मेरू पर्वतावर एखादा सूक्ष्म परमाणू पडावा तसे हे सगळे जग ह्या विश्वरूपाच्या अमर्याद शरिरावर कुठेच्या कुठेच दिसते आहे.

संजय हा वृत्तांत धृतराष्ट्राला सांगत असताना त्याचवेळी अर्जुनाने हे सगळे विश्व त्या देव चक्रवर्तींच्या शरिरात पाहिले. हे दृश्य पहाता पहाता विश्व आणि आपण यात जे काही थोडेसे दुजेपण आतापर्यंत त्याच्या अंतःकरणात होते ते विरून गेले. मी विश्वरूप पहातो आहे हे त्याचे भान हरपले. अंतःकरणाची आटणी झाली आणि तो त्या विश्वरूपात मिसळूनच गेला. त्या ऐक्यामध्ये त्याच्या अंतःकरणात ब्रह्मानंद जागृत झाला. आतल्या आनंदाचे लोंढे वाहून बाहेर आले. इंद्रिये ढिली पडली. अर्जुनाचे आपाद मस्तक शरीर रोमांचित झाले. पहिल्या पावसाने पर्वताचे आंग भिजवून टाकले की जसे गवताचे कोवळे अंकुर त्याच्या गात्रागात्रातून उभे रहातात त्याप्रमाणे अर्जुनाच्या सर्वांगावर रोमांच उभे राहिले व त्याला शोभा देऊ लागले. चंद्रकिरणाचा स्पर्श झाला की चंद्रकांत मणि पाझरतो तसे घामाचे बारीक बारीक थेंब अर्जुनाच्या अंगावर दाटले. भुंगा कमळाच्या कळीत सापडतो आणि बाहेर पडण्यासाठी धडपड करू लागतो. त्या आतल्या धक्क्याने कळी जशी पाण्यावर डोलू लागते तसा अर्जुन आतल्या सुखोर्मि अनावर झाल्यामुळे डोलू लागला. कापूरकेळीत कापूर साठला की गाभ्याची सोपटे उकलून कापराचे कण कण बाहेर गळू लागतात त्याप्रमाणे पार्थाच्या डोळ्यातून नकळत अश्रु ओघळू लागले. अष्टसात्विक भावामध्ये जशी काही चढाओढच लागली.

चंद्रोदय झाल्याबरोबर आधीच भरलेल्या समुद्राला भरतीवर भरती यावी तशा आनंदाच्या लहरीवर लहरी अर्जुनाच्या अंतःकरणात उठू लागल्या. त्याच्या जीवाला ब्रह्मानंदाचे जणु काही राज्यच प्राप्त झाले.

सुखाच्या ह्या अनुभूतीमध्ये बुडून गेलेला पार्थ देवानी पाहिला. आता हा आपल्याहून वेगळा रहाणारच नाही अशी भीती देवाना वाटली. वाऱ्याच्या झोताने डगमगणारी ज्योत दोन्ही ओंजळीचा आडोसा करून तेवत ठेवावी त्याप्रमाणे देवानी कृपादृष्टीने त्याच्याकडे पाहिले. आपल्यापासून त्याला थोडा अलग केला आणि त्याच्या मनातील भक्तपण शाबूत ठेवले.

आणि मग त्यामुळे अर्जुन त्या सुखाच्या अगाध डोहातून थोडासा वर आला. त्याने एक दीर्घ निश्वास सोडला. श्रीकृष्णाकडे पाहिले आणि तो होता तिथूनच त्याने देवास लवून नमस्कार केला. दोन्ही हात जोडून, अतिशय संतुष्ट होऊन, गहिवरून स्निग्ध शब्दात तो देवाना म्हणाला, "देवा, मी आज कृतार्थ झालो. आपल्या कृपेला खरोखरच मर्यादा नाही. मी एक आपला सामान्य मित्र पण आपण मजवर अशी कृपा केली की मी हे आपले विश्वरूप पाहू शकलो. देवा तुम्ही हे फार चांगले केले हो. मला अगदी आनंदी आनंद झाला. या सर्व सृष्टीला तुझाच आधार कसा हे मी आज माझ्या दृष्टीने पाहिले. काय ते अमर्याद रूप देवा!"

अर्जुन पुन्हा पुन्हा आठवून म्हणाला, "मंदार पर्वताच्या अंगावर ठिकठिकाणी श्वापदांचे समुदाय असावे तशी असंख्य भुवने मी आपल्या ह्या शरिरावर पाहिली. आकाशाच्या खोलीत ग्रहगणांची कुळेच्या कुळे असावी किंवा एखाद्या महारुखावर पक्ष्यांनी घरटी बांधावी त्याप्रमाणे या आपल्या विश्वात्मक शरिरावर देव समुदायासह स्वर्गलोक मला दिसतो आहे. प्रभु, पहा, पहा, आपल्या शरिरावर पंचमहाभूतांच्या असंख्य पंचकड्या दिसत आहेत. कित्येक भूतसृष्टीचे प्राणीसमुदाय तिथे आहेत. हा ब्रह्मदेवच ना? तो सत्यपालासह देवा, ह्या तुझ्या देहातच नांदतो आहे की, आणि या इकडे हे काय? अहो हा तर प्रत्यक्ष कैलासच! श्रीमहादेव, भवानी मी तुझ्या एका अंशामध्ये इथे पहातो की आणि हृषिकेशी, अरे तू सुद्धा स्वतः इथे दिसतोच आहेस. कश्यपादि, ऋषिकुळे, पाताळ, सर्पकुळे, सगळेच्या सगळे मला इथे स्पष्ट दिसते आहे. किंबहुना त्रैलोक्यपति, तुझ्या एकेका अवयवाच्या फलकावर ह्या चौदा भुवनाच्या आकृती चित्राप्रमाणे काढलेल्या दिसतात. त्या लोकांतील प्राणीसुद्धा त्या चित्रात रेखाटलेले आहेत की.

देवा, तुमचे हे अलौकिक गंभीर रूप मला तुम्ही दाखवले. मी अपात्र असून आपण केवढे दान केले मला.

आपण दिलेल्या ह्या दिव्यदृष्टिने मी इकडे तिकडे पहातो आहे तर त्या दृष्टिच्या सामर्थ्यामुळे मला आता दिसते आहे की आभाळालाच कोंब फुटावे तसे तुम्हाला असंख्य बाहु आहेत, ते सगळे हात एकाचवेळी अनेक व्यापारात कसे गुंतवले आहात देवा?

आपली ही अपार पोटे पाहिली की वाटते आहे महाशून्याच्या विस्तारासारखी ब्रह्मकटाहाची भांडारेच उघडली आहेत. आपली मस्तके हजारो आहेत असे श्रुतींनी वर्णन केले आहे पण मी पहातो आहे की ती कोटीच्या कोटी आहेत. मी त्या दर्शनाचा अनुभवच घेतो आहे. एखाद्या झाडाला फळे अगदी लगटून जावी तसा हा आपल्या अपार मस्तकांचा देखावा दिसतो आहे. विश्वमूर्ति परमेश्वरा, जिकडे पहावे तिकडे मस्तकेच मस्तके दिसत आहेत. डोळ्यांच्या तर पंक्तीच्या पंक्ती थाटल्या आहेत. इथे आता स्वर्ग, भूमी, पाताळ, दिशा, अंतराळ ही वाटाघाटच उरली नाही. सगळीकडे भगवंता तुम्हीच दिसता अहा. सख्या तरी कसे म्हणू आता? पण देवा

तुझ्याशिवाय कुठेतरी एखादा परमाणु तरी सापडेल म्हणून कौतुकाने पहातो आहे तर तोही सापडेना. देवा, इतके सगळे हे विश्व तू व्यापून टाकले आहेस. नानाप्रकारचे प्राणी, पंचमहाभूते यांनी अपरंपार विस्तार केला आहे खरा पण तो सगळा विस्तार तू सहज व्यापून टाकला आहेस.

"अरे अनंता, तू आलास तरी कोठून? तू बसला आहेस की उभा आहेस? तुझी ही आकृती आहे तरी केवढी? कोणत्या आईच्या पोटात तू मावलास ते तरी सांग. तुझे रूप कसे? तुझे वय तरी काय? तुझ्या पलीकडे काय आहे? तू कशावर उभा आहेस?" असे सगळे विचार माझ्या मनात पिंगा घालू लागले आणि मग हळू हळू उलगडा होऊ लागला आहे.

मला आता कळले की तू अनादिसिद्ध आहेस. ना तू कुठून आलास, ना तू कुठे जाणार, तुझे ठिकाण तू स्वतःच आहेस. तू उभा नाहीस आणि बसलेलाही नाहीस. उंच नाहीस आणि ठेंगणाही नाहीस. वैकुंठा, अरे तुझ्या खाली वर केवळ तूच एक आहेस. तू रूपाने तुझ्याचसारखा आहेस. परेशा, अरे तुझे पाठपोट तर सगळे तूच आहेस. फार काय सांगू वारंवार विचार करून मला कळले की तुझे सर्व काही तूच आहेस.

देवा, मला तुमच्या स्वरूपात एक उणीव मात्र सापडली. तुम्हाला आदि, मध्य, अंत ह्या तिन्ही अवस्था नाहीतच! मी या विश्वरूपात सगळीकडे शोधले पण आदि, मध्य, अंत सापडेनातच. मग मी मनाशी निश्चय केला की देवांना ह्या अवस्थाच नाहीत. विश्वेश्वरा, आदिमध्यांतररहित अपरिमित असे जे तत्त्वतः तुझे स्वरूप ते मी खरोखरच माझ्या डोळ्यांनी ह्या विश्वरूपात पाहिले याची खात्री पटली.

देवा, तुमचे हे गोमटे स्वरूप मला फार आवडले. नाना रंगाची वस्त्रे धारण करावी त्याप्रमाणे अनेक प्रकारच्या मूर्तींच्या रंगाकृती ह्या तुमच्या देहावर दिसत आहेत. ह्या विविध प्रकारच्या मूर्ती तुझ्या स्वरूपरूपी प्रचंड पर्वतावर वृक्षवेलीसारख्या दिसत आहेत. त्या मूर्तींना म्हणजे वृक्षवेलींना, दिव्यालंकाराची फळे पण आली आहेत. देवा, आपण अहा एक महासमुद्र आणि या मूर्ती आहेत आपल्यावरचे तरंग! आपण अहा एक महारुख आणि आपल्याला ही मूर्तिरूपी फळे लागली आहेत. पृथ्वीवर प्राणी भरलेले आहेत, आकाशात नक्षत्रांनी दाटी केली आहे, त्यासारखी तुमच्या रूपामध्ये ह्या मूर्तीची शोभा दिसते आहे. ह्या मूर्तीचे वैभव एवढे आहे की त्या प्रत्येकीमध्ये त्रैलोक्ये निर्माण होत आहेत आणि लयाला जात आहेत. पण ह्या एवढ्या प्रचंड पराक्रमी मूर्ती तुमच्या ह्या विश्वरूपाच्या देहावरचे नुसते केस आहेत.

हा एवढा विश्वाचा पसारा मांडून तू येथे उभा आहेस आणि मी ते रूप निरखून पहातो आहे तो काय आश्चर्य, तू तर आमचा सखा, सारथी, यादवच! भगवंता, आता माझ्या ध्यानात आले की तू सर्व व्यापकच आहेस पण भक्तांवर अनुग्रह करण्यासाठी हे लहानसे रूपडे घेतले आहेस. केवळ मायेच्या पोटी ते अवाढव्य विश्वरूप बाजूस सारून दोन्ही भुजा पसरून हृदयाशी धरावा असा सानुला केवळ आमच्यासाठी रे तू झालास. चार भुजांचे ते सावळे रूप आमचे डोळे, आमचे मन आनंदाने भरून यावे म्हणून तू घेतले आहेस.

देवा रे, आमच्यावर कृपावंत होऊन या अप्रतीम, देखण्या, लहान देहाकृतीचे बंधन तू केवळ आमच्यासाठी पत्करतोस, आमच्याशी बोलतोस, चालतोस, आमचा रुसवा काढतोस आमच्यासाठी वाटेल ते

कष्ट सहन करतोस.

पण काय रे आमचे दुर्दैव! आम्ही तुला आमच्यासारखाच एक सामान्य जीव समजतो. तुझ्या अनंत स्वरूपाचे भानही आम्हाला रहात नाही. भगवंता, आतापर्यंत आम्ही हा अपराध केला. आपल्या चरणावर मस्तक ठेवतो. महाराज, आपण क्षमा करा. आता माझ्या दृष्टीचा विटाळ फिटला. आपण दिव्यचक्षु दिलेत म्हणून आपला अगाध महिमा मला पहाता आला.

आता मी आपल्या वरवरच्या लहान आकृतीने फसणार नाही. जे आपण ह्या रथाच्या धुरेवर माझ्याजवळ अहा तेच समोर दिसणारे हे विश्वरूप झाला अहा हे मला समजून चुकले आहे. अगदी हा असाच मुकुट त्या विश्वरूपाच्या मस्तकावर आहे. पण त्या विश्वरूपाच्या मकुटाचा आकार व तेज काही विलक्षण आहे. देवा, तुमच्या ह्या हातात जे चक्र आहे तसेच चक्र ह्या विश्वरूपाच्या हाती आहे. फक्त ह्या रूपामध्ये आपण ते अगदी सोडण्याच्या तयारीत अहात. दोन्ही चक्रे अगदी सारखी आहेत ही खूण काही मोडत नाही. अशीच हीच गदा त्या विश्वरूपाच्या हाती आहे आणि श्रीकृष्णा, माझ्या रथाचे लगाम सावरण्यासाठी खालचे दोन्ही हात शस्त्र न घेता मोकळेच पुढे सरसावले आहेत तसेच त्या रूपाचेही खालचे हात मोकळे आहेत. ह्या सगळ्या खुणावरून मला कळून आले की माझ्या मनोरथासरशी वेगाने आपणच माझ्यासाठी हे विश्वरूप धारण केले आहे.

देवा, ह्या आश्चर्याने माझे मन इतके गोंधळून गेले आहे की आता त्या मनात आश्चर्य करावयालादेखील अवकाश उरला नाही काय ह्या अंगप्रभेचा चमत्कार आहे! विश्वरूप इथे आहे की नाही या विचाराने श्वासही घेता येईना. श्वास घ्यायला जागाच नाही. इथे नुसते तेजच भरून राहिले आहे. भगवंता, ह्या विश्वरूपाच्या तेजामध्ये सूर्य काजव्यासारखे हरवून जात आहेत आणि मला आपण दिव्यदृष्टि दिली खरी पण तीही ह्या तेजामध्ये करपेल की काय असे वाटू लागले आहे.

काय करावे? अहो महाराज, ते तेज आणखी वाढू लागले की. देवा, जरा ह्या दैवी तेजाला आवर तरी घाला. पहा पहा हो या महातेजाच्या समुद्रात सगळी सृष्टि बुडाली. युगांत आला की काय? ह्या विजा कल्पांतीच्या आहेत की काय? काय प्रखरता आहे त्यांच्या झगझगाटात! सगळे आकाश पहाता पहाता त्या विजासारख्या तेजाने झाकून गेले की. आता तर वाटते आहे की, संहार तेजाच्या ज्वाळा तोडून त्यांचा आकाशाला मांडव घातला की काय? देवा, जरा शांत व्हा हो. ह्या ज्ञानदृष्टिलाही आताचे हे आपले तेजोमय रूप पहावेना.

पण हे काय? ह्या तेजाने तर आणखीच उग्रस्वरूप घेतले की! ते तेज धडाडून वर उठते आहे. माझी ही दिव्यदृष्टिही दिपून गेली. मला हे पहावेना आता हो. काळाग्निरुद्राच्या ठिकाणी महाप्रलयाचा अग्नि गुप्त होता. शंकराच्या तिसऱ्या डोळ्याची कळी उमलावी तसा तो गुप्त अग्नि आता सगळीकडे पसरतो आहे. ह्या पसरलेल्या पाच अग्निंच्या ज्वाळांनी ह्या ब्रह्मकटाहाला आता वळसे घातले की!

पहा हो अनंता, त्या महाप्रखर तेजाने ब्रह्मांडाचे कोळसे होऊ लागले आहेत. महाराज, ह्या तेजाच्या व्याप्तीला आणि कांतीला काही सीमाच दिसेना. सर्व रूपच अद्भुत  प्रकाशमय झाले आहे. जन्मास आल्यास, हे

तेजोराशिरूप मी आजच पाहिले खरे पण देवा, ह्या प्रकाशाचा उग्रपणा मला आता सहन करता येईना. देवा, कृपा करा आणि हे तेज आवरा.

माझ्या मनात विचारांचे प्रचंड कल्लोळ उठत आहेत. देवा, आपण परब्रह्म अहा. ॐकाराच्या साडेतीन मात्रांच्यापलीकडे आपले ठिकाण आहे. वेद ते ठिकाण शोधत आहेत पण त्यांना ते अजून सापडले नाही. सगळ्या आकाराचे घर, हे सर्व विश्व साठविण्याची जागा असा तू गहन आणि अविनाशी आहेस. तू धर्माचा जिव्हाळा, अनादिसिद्ध असा नित्य नवा छत्तीस तत्त्वाहून वेगळा असा सदतिसावा पुरुष आहेस. तुला आदि, मध्य, अंत ह्या उपाधीच नाहीत. स्वसामर्थ्याने तू अनंत आहेस, अपरिमित आहेस. सगळ्या जगाचे हात-पाय हे खरे म्हणजे तुझेच हात-पाय आहेत. तुझ्या रूपाला देवा, मर्यादाच नाही. चंद्रसूर्य हे तुझे डोळे! चंद्राच्या शांत, शीतल किरणांनी तू विश्वाचे पालनपोषण करतोस, सूर्याच्या प्रखर किरणांनी पृथ्वीवरील जलांश शोषण करतोस आणि वृष्टीच्या रूपाने ते पाणी सगळ्या जगाला परत देतोस. अंधकाराचा नाश करून टाकतोस. एका डोळ्याने कोप तर दुसऱ्याने कृपा करतोस असे वर वर वाटले तरीही त्या दोन्हीमुळे जगाचे कल्याणच होत असते.

मी आपल्याला शांत व रौद्र स्वरूपात पहातो आहे पण आता आपण जास्त जास्त प्रखर स्वरूप धारण करू लागला अहा असे वाटते आहे. देवा, आता तर आपल्या मुखांकडे मला पहाताही येईना. पेटत्या प्रलयाग्निसारखी ही मुखे उग्र का दिसू लागी आहेत? सांगा ना! पर्वताला वणवा लागला की ज्वाळांचे लोट वरवर जावे त्याप्रमाणे दात आणि दाढा चाटत त्या मुखांमध्ये जिभा लोळत आहेत. या मुखांच्या धगीने आणि सर्वांगकांतीच्या वाढत्या प्रकाशाने ह्या जगाला आता ताप होऊ लागला आहे. ते क्षोभू लागले आहे.

भूलोक, पृथ्वी, पाताळ, आकाश, दशदिशा व सर्व क्षितिज हे सर्व तुझ्या स्वरूपाने व्यापून टाकलेले मी अगदी कौतुकाने पाहिले होते पण आता मात्र एखाद्या भयानक वस्तूने ते बुडविले आहे असे वाटून माझा थरकाप होतो आहे.

अद्भुतरसाच्या भयानक लाटांनी चौदा भुवनांना वेढा घातला आहे. मी आश्चर्य तरी कशाकशाचे मानू आता? ही असामान्य व्याप्ति मला आवरेना. ह्या रूपाचे उग्रपण मला सहन होईना. अहो देवा, सुख तर आटूनच गेले आहे. आता हे असले महाभयंकर रूप पाहून भयाचे भरते कसे काय आले हे काही कळेना. ह्या दुःखाच्या लाटात त्रिभुवने बुडत आहेत. तुझ्यासारख्या महात्म्याच्या दर्शनाने भय आणि दुःख यांचा मेळ ह्या जगाच्या वाट्यास का यावा बरे? काही कळेनासेच झाले आहे मला! कळले ते एवढेच की, जोपर्यंत तुझे ते रूप दृष्टीस पडत नाही तोवरच जगाला विषय आनंदकारक वाटतात आणि एकदा ते रूप दृष्टीस पडले की, विषयापासून उलट त्रास वाटतो, दुःख वाटते. त्यातून सुटावेसे वाटते. तुझे प्रचंड विश्वरूप पहाताक्षणी तुला जाऊन मिठी मारावीशी वाटते खरी पण ते काय शक्य आहे? आमचे हात केव्हढे आणि देवा तुझे रूप केव्हढे! बरं, तुला मिठी न मारता तळमळत दूर रहाण्याचे संकट तरी कसे सोसावे? मागे सरावे तर अनिवार संसार आडवतो आहे, पुढे सरावे तर तूही अनिवार! तू कसला हाती सापडतो आहेस? तेव्हा ह्या अशा कात्रीत सापडल्यानेच त्रैलोक्याचा हुरडा होऊन भय आणि दुःख जगाला निर्माण होत असावे असे मला वाटते आहे. हाच विचार मला बरा वाटतो आहे. तसेच असेल. एखादा मनुष्य आगीने होरपळतो, अंग निववावे म्हणून समुद्रापाशी येतो आणि त्या

खवळणाऱ्या लाटांनी भेदरून जातो तसेच या जगाचे झाले असावे. जग तसेच तळमळत दूर राहिले आणि ज्ञानसंपन्न देवांच्या समुदायांनी मात्र पलीकडे जाऊन तुझ्या स्वरूपाशी जाऊन मिळण्याचा निश्चय केला आहे. त्यांनी आपल्या कर्माची बीजे तुझ्या अंगच्या तेजामध्ये जाळून टाकली आहेत. अज्ञान, वासना हे सगळे अशुद्धांश नष्ट करून टाकले आहेत आणि असे अत्यंत पवित्र झालेले हे देवांचे समुदाय तुझ्या ह्या विश्वरूपात मिळून जाताना मला दिसत आहेत. जगातील काही लोक संसाराने भयभीत होऊन तुला शरण आले आहेत. त्यांनी आपले सर्वस्व तुझ्याकडे लावून दिले आहे. ते हात तुझी प्रार्थना करीत आहेत. "देवा, वाचवा हो. आम्ही या अज्ञानाच्या समुद्रात बुडतो. आम्हाला वर काढा. विषयांच्या पाशांनी आम्हाला जखडले आहे त्यातून आमची सुटका करा. आम्ही तुम्हाला प्राणासह शरण आलो आहो. आमचे रक्षण करा, देवा. तुमच्यावाचून आम्हाला कोण आहे? तुमच्यावाचून आमची सुटका कोण करणार आहे?"

महर्षि, सिद्ध, विद्याधर हे तुझी स्तोत्रे गात आहेत. "तुझे कल्याण असो" म्हणत आहेत. अकरा रुद्र, बारा आदित्य, आठ वसु, साध्य नावाचे बारा देव, दोन अश्विनीकुमार, वैभवयुक्त विश्वदेव आणि वायुदेवता उत्कंठतेने आपल्या मूर्तिचे दर्शन घेत आहेत. अग्नि, गंधर्व आणि पलीकडे असलेले यक्षांचे व राक्षसांचे समुदाय इंद्रादि देव आणि सिद्ध आपआपल्या लोकात आपली दिव्यमूर्ती पहात पहात प्रत्येक क्षणाला मनामध्ये चकित होऊन आपल्या मुकुटांनी ओवाळणी करीत आहेत. मोठमोठ्याने जयजयकार करीत त्यांनी अवघा स्वर्गलोक दुमदुमून टाकला आहे. आपले सुरेख हात जोडून निढळाजवळ नेत ते तुला वारंवार नमस्कार करीत आहेत. विनयरूपी अरण्यात सात्विकभावाचा वसंत प्रकट झाला आहे, देवांच्या ह्या जोडलेल्या हातांना पालवीचे रूप आले आहे आणि मग देवा सहजच तुझी प्राप्ती हे फळ त्यांना प्राप्त होत आहे. महाराज, आपले दर्शन हे त्यांच्या डोळ्यांचे भाग्यच उगवले आहे. जीवाला सुखाच्या सुकाळाची पहाट झाली आहे. ह्या अगाध विश्वरूपाचे दर्शन झाल्यावर असा सुखोदय होणारच.

देवा, तुमचे हे रूपडे लोकव्यापक आहे. त्यामुळे देवादिकांनासुद्धा ह्या रूपाचा धाक वाटत आहे. जिकडे पहावे तिकडे तुम्ही समोर अहातच त्यामुळे त्यांना भय वाटते आहे.

हे सगळे जरी खरे असले तरी आपली विचित्र, भयानक मुखे पाहून माझ्या मनात मात्र भीती उत्पन्न झाली आहे. मगाशी मी म्हटले की जग क्षुब्ध झाले आहे पण आता म्हणतो की मीही भयभीत झालो आहे.

कारण आपले अनंत नेत्र आता रागीट दिसू आगले आहेत. आपल्या अनंत भुजांतील शस्त्रे जास्तच चमकू लागली आहेत. आपले अनंत मनोहर चरण, मनोहर उदरे, नाना प्रकारची नाना रंगाची शरीरे आता आवेशाने मत्त होऊ लागली आहेत. महाप्रलयकालच्या शेवटी बळावलेल्या यमाने जिकडे तिकडे प्रलयाग्निच्या आगट्या पेटवाव्या तशी तुझी प्रचंड उघडी तोंडे दिसू लागली आहेत. संहारकर्त्या शंकराचा तोफखाना सज्ज व्हावा, प्रलयकालच्या भैरवांचे समुदाय एकत्र व्हावे किंवा सर्व प्राण्यांची खिचडी शिजत लावण्यासाठी शक्तीचे हांडेच्या हांडे चुलीवर रसरसत असावे तशी ही तुझी उग्र मुखे दिसत आहेत. आतापर्यंत पहावी तिकडे तुझी तोंडे दिसत होती पण आता ती उघडलेली आहेत. दरीमध्ये मावत नाहीत इतके सिंह असावे त्याप्रमाणे तुझ्या तोंडात दांत रागीट दिसत आहेत. काळरात्रीचा अंधार पडला की संहारक पिशाच्च्ये उल्हासाने बाहेर पडावी तशा ह्या तोंडातल्या दाढा प्राण्यांच्या रुधिराने माखलेल्या दिसत आहेत.

अनुक्रमणिका

काळानेच युद्धास आमंत्रण दिले काय? सर्व संहारच मृत्युरूपाने इथे उभा ठाकला आहे काय? सांगा ना देवा! अहो, हे आहे तरी काय? आपल्या मुखावर एकाएकी ह्या भयानक उग्रपणाची सावली काय म्हणून पसरली आहे? बघा तरी ह्या त्रैलोक्याकडे! कसे बापुडे दुःख कालिंदीच्या तीरावर झाड होऊन दीनवाणे उभे आहे ते!!

उभे तरी कसे म्हणू देवा! शोकाच्या प्रतिकूल वाऱ्यावर ह्या त्रैलोक्याच्या जीविताची होडी आंदोळते आहे. काय होणार आता ह्या जगाचे! आपले हे उग्रपण त्या त्रैलोक्याला क्षणमात्रही सहन होईना आता. काहीतरी करा ना देवा! वाचवा हो हे जग! आपण का एवढे निष्ठुर झाला अहा? त्रैलोक्याची ही एवढी दुर्दशा आपण होऊ देणार काय? आपणच निर्माण केलेला हा ब्रह्मांडगोल असा क्षणात बुडवून टाकणार काय? असे नका करू देवा. रागाने आपण असे म्हणाल सुद्धा की तुला का त्या जगाची एवढी उठाठेव? तू सुरक्षित आहेस ना? मग झाले तर. मुकाट्याने तू आपल्यापुरते ध्यानसुख भोग. इतरांची काळजी करण्याचे तुला काय कारण?"

महाराज, खरे सांगू का? मी आपले जगाचे उगीच निमित्त पुढे केले आहे. हे आपले भयंकर रूप पाहून मीच थरथर कापतो आहे. या भयाने माझे तरी प्राण जातात की रहातात असे वाटते आहे. प्रौढीने सांगत नाही पण देवा, संहाररुद्रदेखील मला भिऊन असतो. माझ्या भीतीने मृत्यू लपून बसतो. तो मी इथे थराथरा कापतो आहे, तुमचे हे आताचे रूपच तसे आहे.

मला तर वाटू लागले आहे की, हे विश्वरूप कसले? ही तर महामारीच आहे. हिच्या भयंकरपणामुळे प्रत्यक्ष भयाचा पराभव झाला आहे.

देवा, ह्या तुझ्या प्रचंड उघड्या तोंडानी महाकाळाशी पैज घेतली आहे की काय? त्या मुखांनी आपल्या विस्ताराने आकाशही धाकटे करून टाकले आहे. महाराज, ह्या सगळ्या चेहऱ्यावर भाव तरी किती रागीट आहे हो? आता तर त्यांचा आकारही वाढू लागला!

ती मुखे आता आकाशातही मावत नाहीत. त्रिभुवनातील सोसाट्याच्या वाऱ्याचे लोट त्या मुखाच्या भोवती घोंघावत आहेत, पण त्या विस्ताराला वेढा घालू शकत नाहीत. मुखातला प्रदीप्त अग्नि धडाडून पेटवण्याचे आणि त्या ज्वाळा लवथवत वर वर नेण्याचे काम ते वाऱ्याचे लोट करीत आहेत. मुखे तरी एकासारखी एक कुठे आहेत? प्रत्येकाच्या रंगात फरक आहे. पण प्रलयाग्निसारखा अग्नि मात्र सगळ्या मुखांत सारखाच धडाडतो आहे. याच अग्निचे सहाय्य त्या प्रलयकाळच्या अग्निला होत असेल. नुसत्या ह्या विश्वरूपाच्या अंगाची कांती व दीप्ति इतकी प्रखर झाली आहे की तेव्हढ्यानेसुद्धा त्रैलोक्याची राखुंडी होईल. त्यात ह्या दीप्तिला ह्या भयानक मुखांची आणि दात दाढांची जोड! मग ह्या त्रैलोक्याची दशा तरी आता काय होणार? ह्या भयंकर दृश्याकडे पाहून वाटते आहे की वाऱ्याला धनुर्वात झाला की समुद्र महापुरात पडला, विषाग्नि वडवानळावर मारा करण्यासाठी उठला की हलाहल विषाग्नि प्याले? झाले तरी काय?

मरणच मारण्यास तयार व्हावे तशी ह्या संहारतेजास मुखे प्राप्त झाली आहेत. आकाश तुटून पडून एक भली मोठी खिंड पडावी तशी ही मुखे प्रचंड दिसत आहेत. एकेका मुखाकडे पाहिले. काय हा विस्तार! हिरण्याक्ष दैत्य पृथ्वी काखोटीस मारून विवरात निघाला तेव्हा हाटकेश्वराने पाताळरूपी गुहेचे द्वार उघडले ते हेच आहे की काय! मुखांचा विस्तार तर अवाढव्य आहेच पण आत जिभांचा आवेश आणखी काही वेगळाच दिसतो. "विश्व विश्व काय? कधीही त्याचा एक घास करता येईल? काय घाई आहे?" असा त्यांचा अभिप्राय असावा. त्या जिभा पाताळातील सर्पाप्रमाणे ह्या तोंडाच्या दरीत नुसत्या वळवळत पसरून राहिल्या आहेत. सर्पाच्या तोंडातून निघणाऱ्या फुत्काराबरोबर विषाच्या ज्वाळा जशा आकाशापर्यंत जाव्यात तशा ह्या जिभा अधूनमधून दातावरून फिरत आहेत. प्रलयकाळच्या विजांचे समुदाय एकत्र करावे आणि आकाशाचे बुरूज शृंगारावे तशी ही तीक्ष्ण दाढांची टोके ओठांच्या बाहेर येऊन वाकडी वळली आहेत, मोठी भयंकर दिसत आहेत. आतल्या अग्निचा प्रकाश त्या वळलेल्या दातावर पडून तेही झळकत आहेत. कपाळपट्टीच्या खाली खोबणीत लपलेले डोळे म्हणजे भयालाही भय दाखवणारे असे मृत्यूचे उमाळेच आहेत. भिवयांचा अंधार त्यांच्यावर पडला आहे म्हणून गुहेत फिरणाऱ्या हिंस्त्रश्वापदासारखे ते भयप्रद झाले आहेत.

देवा, हे महामृत्यूचे कौतुक धारण करून आपण करायचे योजले तरी आहे काय? आपला ह्या भयानाक स्वरूपाचा आवेश आणण्यात काय हेतू आहे हे मला कळत नाही. पण मरण पुढे उभे ठाकल्यासारखे भय मात्र वाटते आहे. विश्वरूप पहाण्याची आर्ति मला लागली होती ती आपण पुरवली हे खरे पण हे भय आता काय म्हणून त्यातून उपस्थित झाले आहे? ते अद्वितीय रूप पाहून माझे डोळे निवाले होते. पण ह्या भयंकर रूपाकडे पाहून या क्षणास पार्थिव देह तर वाचत नाहीच पण चैतन्याची तरी काही धडगत आहे की नाही, या भयाने मी थरथर कापतो आहे. देह गेला तरी जाणीव रहाते, आत्मा रहातो असे आपण म्हटले, मी ते मानलेही पण या आपल्या क्रोधावेशापुढे तो आत्मासुद्धा उरायचा नाही अशी भीती माझ्या मनात उत्पन्न झाली आहे. भयाने अंग कांपते आहे. तेच भय थोडे वाढले की मन क्षोभू लागते आहे, बुद्धि दचकते आहे, अभिमानाचा विसर पडतो आहे. पण या सर्वांहून वेगळा व जो केवळ आनंदकळा आहे अशा त्या शांत आत्म्याला भयाने शहारे येत आहेत.

देवा, मी साक्षात्काराचा छंद धरला. आपणासारखे गुरू दुसरीकडे कसे भेटतील म्हणून मी आपल्याजवळ हट्ट घेतला. माझ्यासारख्या अज्ञानी शिष्याला आपण तो साक्षात्कार घडवलाही. माझे प्रपंचज्ञान आपण देशोधडीस लावले, देहभान हारपून टाकले आणि आनंदाचा ठेवाच मला दिला.

पण आताच्या ह्या आपल्या क्रोधावेशाने माझ्या अंतःकरणातला आनंद तर होरपळूनच गेला आहे पण मन सावरण्यासाठी मी त्याला धैर्याची गवसणी घालण्याचा प्रयत्न करतो आहे तो देखील फुकट जातो आहे. उपदेशामध्ये मला आपण चांगले गुंतवून टाकले होते. मी ह्या विश्वरूपदर्शनात धन्यता मानत होतो. पण ह्या उग्र दर्शनाने मझ्या मनात धैर्याचे नावदेखील उरले नाही. जीवाला कुठे विसावा मिळेल काय म्हणून धावाधाव करतो आहे पण बापड्याला कुठे थोडीसुद्धा सावली दिसेना हो. महाराज, ह्या विश्वरुपाला मी आता महामारी म्हणतो. चराचराचा ग्रास करण्यासाठी उद्युक्त झालेल्या ह्या विश्वरूपाला दुसरे काय म्हणायचे आता? मी असे म्हणू नको तर काय करू? बोलू नको तर काय करू?

देवा, आता काय करूं मी? पहा पहा महामृत्यूची भांडी फुटावी तशी माझ्या डोळ्यापुढे अखंड अशा

अनुक्रमणिका

स्वरूपांत ही तुझी भयानक तोंडे मला दिसत आहेत. प्रलयकाळच्या शस्त्रांनी कुंपण करावे तशी देवा तुमच्या ह्या दात दाढांची गर्दी ओठावर आली आहे आणि ते दात आणि त्या दाढा खालच्या आणि वरच्या ओठात मावतसुद्धा नाहीत की.

भयंकर विषारी तक्षकाच्या दातात विष भरावे, अमावस्येच्या काळ्याकभिन्न रात्रीत पिशाच्च्यांच्या संचाराची भर पडावी किंवा जहाल वज्राग्निने अग्नेयास्त्र हातात घ्यावे त्याप्रमाणे आधीच देवा तुझी तोंडे एवढी प्रचंड त्यात हा त्यांचा आवेश आत न मावून बाहेर ओसंडतो आहे. देवा, अहो आमच्यावर तर हे मरणरसाचे लोंढेच येत आहेत.

संहारकाळचा चंडानिल आणि महाप्रलयकालचा प्रलयानल अशी दोन महाभूते खवळून एकदम आवेशाने उठली तर जगात अशी कोणती वस्तू आहे की जी भस्मसात होणार नाही? देवा आपली ही संहारक मुखे पाहून माझा तर धीरच सुटला हो. या दिशांचे भान मला राहिना, माझे मला भान राहिना.

देवा मी आपले सुखद विश्वरूप जरासे पाहिले नाही तोवर हा असला भयानक दुष्काळ पडला. देवा आपले हे अस्ताव्यस्त रूप आवरा हो आवरा.

मला काय माहीत की आपण असे काही कराल! हे आपले दर्शन असे भयंकर असते अशी मला थोडी जरी कल्पना असती तरी मी कशाला हा विश्वरूपदर्शनाचा हट्ट धरला असता! माझेच चुकले. भलती गोष्ट मी मागावी कशाला? पण देवा आपण तरी थोडा विचार करायचा होता? भलतेच काही मागितले तर ते लगेच असे द्यायचे की काय?

पण महाराज आता हे पुरे करा. या आपल्या स्वरूप प्रलयापासून मला वाचवा. आपण जर माझे मालक असाल तर माझ्या जीवाच्या आड ढाल घाला आणि महामारीचा हा पसारा आवरून साठवा पुन्हा आपल्या स्वरूपात.

सर्व देवांपेक्षा श्रेष्ठ देवा, तुम्ही या सर्व देवांची माता माऊली अहा. तुमच्या चैतन्याने तर हे जग अस्तित्वात आले. हे सगळेच तुम्ही विसरला काय? आपणच जन्माला घातलेले हे जग आपणच संहारावयास निघाला काय?

देवराया, लौकर प्रसन्न व्हा. आपल्या मायेचा संहार करा. माझे ह्या महाभयापासून संरक्षण करा हो. किती आपल्या विनवण्या करू! ह्या विश्वरूपदर्शनाने मी किती घाबरलो आहे हे नाही का आपल्या ध्यानात येत? मी वारंवार आपली प्रार्थना करतो आहे. स्वर्गावर राक्षसांचा हल्ला आला तर तो एकट्यानेच मी परतविला. साक्षात मृत्युमुखालाही एरवी कधी मी घाबरलो नाही पण ह्या विश्वरूपाने माझी दाणादाण उडवली आहे.

आतापर्यंत मी अनेक लढाया केल्या आणि जिंकल्याही पण समोर असलेले हे संकट त्यातले नव्हेत मुळी. मृत्यूवरही ताण करून ह्या अखिल ब्रह्मांडाचा आमच्यासह घास घ्यावा असाच तुझा विचार असावा असे

अनुक्रमणिका

मला वाटते देवा.

अरेरे, प्रलयाचा काळ नसताना तू असा मधेच कसा उपस्थित झालास? हा त्रैलोक्यगोल अल्पायुषीच झाला की देवा, आपण असे का कोपला आमच्यावर? थोडी तरी दया करा ना.

हाय रे दैवा विपरिता! आता हा भगवंत कसली दया दाखवणार? मी शांत व्हा म्हणून प्रार्थना करतो आहे तर देवा, आपण हे विश्व गिळायलाच सुरवात केली. आता आपण शांत कसले होणार विश्वाचा अंतच येऊन ठाकला आहे! हे काय मला प्रत्यक्षच दिसते आहे की. देवा आपण ती भयंकर तोंडे पसरून ही सैन्ये चहूबाजूनी गिळायला सुरवात केलीत की. अहो हे काय! आंधळ्या धृतराष्ट्राचे पुत्र ते कौरववीर निघाले की नव्हे, नव्हे, गेलेसुद्धा त्या तोंडामध्ये. परिवारासह, देवा आपण त्यांना गिळूनही टाकले. यांच्या मदतीस आलेले देशोदेशीचे राजे झपाट्याने त्या प्रचंड हिंस्र मुखात गेलेही. त्यांची नावनिशाणीही मागे उरली नाही. सरसकट आपण गिळावयास सुरवात केली की. अरे देवा, तू मदोन्मत्त हत्तीचे समुदाय घटाघटा गिळतो आहेत. युद्धभूमीवरील सेना समुदायही चालला तुझ्या मुखामध्ये! देवा, तोफखान्यावरचे गोलंदाज, तोफखाना, पायदळ यांचे भारेच्या भारे तुझ्या तोंडात गडप होत आहेत ना! हे सगळे शस्त्रसंभार असे आहेत की जशी काही यमाची भावंडे! त्यातले एकेक शस्त्र जगाचा घास करण्यास समर्थ आहे. पण अशा सगळ्या शस्त्रांचा तू तर एकच घास घेतला आहेस. हत्ती, घोडे, रथ, पायदळ हे चतुरंग सैन्य त्या घोड्यांना जोडलेल्या घोड्यासह खुशाल तुझ्या तोंडात प्रवेश करीत आहे. तुझा दातसुद्धा त्यांना लागत नाही असा जबडा तू पसरला आहेस. किती आनंदाने तू हा सगळा संहार आरंभला आहेस रे.

भीष्माचार्यांसारखे सत्य आणि शौर्य यात निपुण असणारे दुसरे कोण आहे जगात? पण पहा पहा ते गेले तुझ्या मुखामध्ये! हाय हाय देवा तुम्ही तो शूर ब्राह्मण द्रोणाचार्यही संपवला की. सूर्यपुत्र कर्णही गेला. तो तर सहस्रकराचा कुमर पण त्यांतला एकही हात त्याला वाचवायला समर्थ झाला नाही. आमच्याकडील सगळ्या वीरांचाही देवा तुम्ही धुरळा उडवला.

हाय हाय ब्रह्मदेवा, मी प्रार्थना करून तुमच्या ह्या सृष्टीवर हे मरण ओढवून घेतले. हा कसला अनुग्रह म्हणावयाचा! मागे देवानी थोड्याबहुत विभूति सांगितल्या, उपदेश केला, तो ऐकून गप्प बसावे तर ते न करता विश्वरूप दाखवा म्हणून हट्ट धरून बसलो, आणखी पुढे सांगा म्हणत गेलो आणि हा प्रसंग ओढवला.

ते भोगायचे नशिबी असेल ते चुकेल कसे? ह्या त्रैलोक्याचा नाश माझ्या हट्टामुळे झाला असा डांगोरा व्हावयाचा हे जर विधिलिखित असेल तर ते टळेल कसे? पुढे घडणार तशी बुद्धि व्हावयाचीच! माझाच भोग आहे हा.

पूर्वी अमृत हाती आले तरीही लोभाने देव अमृतमंथन करीतच राहिले, स्वस्थ बसलेच नाहीत आणि मग ते काळकूट विष उठले पण त्यावेळी ते संकट शंभुदेवांनी निवारण केले. निवारण करण्यासारखी तरी ती आपत्ती होती. आता हा जळता वारा कोण आवरणार आहे? विषाने भरलेले हे आकाश आता कोण गिळणार आहे? महाकाळाबरोबर कोण खेळणार आहे? असले अचाट सामर्थ्य कुणाजवळ असणार आहे? खरोखरच हे

संकट आता निवारणार तरी कोण? काय करून बसलो हे मी?”

अशा प्रकारचा शोक अर्जुन करू लागला. दुःखाने अत्यंत कष्टी झाला. मनामध्ये उद्वेगाचे कढावर कढ येत होते. देवांचा खरा अभिप्राय त्याच्या ध्यानातच आला नाही. सांप्रत देवांना काय सांगायचे आहे हे त्याला कळलेच नाही.

“मी ह्या कौरवांना मारणारा आणि हे कौरव मरणारे” अशा ह्या मोहाचा विळखा अर्जुनास पडला होता. तो विळखा सुटावा व मारणारा कोण हे अर्जुनाला दाखवून द्यावे म्हणून देवांनी विश्वरूप प्रकट केले पण देवांचा हेतू अर्जुनाच्या ध्यानात आला नाही.

“अरे, कोणी कोणाला मारत नाही. येथे मीच सर्वांचा संहारकर्ता आहे” हे विश्वरूप दर्शनाच्या द्वारे देवानी अर्जुनाला प्रत्यक्ष दाखवले पण तो हेतू न कळल्यामुळे अर्जुनाचा शोक उफाळून आला अणि त्याचे मन कापू लागले. जसजसा संहार समोर दिसू लागला तसतसे त्याचे भय व दुःख पराकोटीस गेले.

तो वरचेवर म्हणू लागला “शस्त्रे आणि चिलखते घातलेले हे दोन्ही पक्षांचे वीर एकाच वेळी आकाशात ढग पांगावे तसे ह्या अजस्त्र मुखामध्ये हा हा म्हणता गडप झाले. महाकल्पाच्या शेवटी कृतांत सृष्टीवर कोपतो आणि पाताळासह एकवीस स्वर्गांना ग्रासून टाकतो तसे हे झाले आहे. दैव फिरले की कृपणांच्या ठेवी जिथल्या तिथे नाहीशा होतात. तशी ही सैन्ये एकत्र होऊन एकदमच ह्या तोंडात चालली आहेत. काय कर्म आहे पहा. एक जीव देखील ह्या तोंडाच्या सपाट्यातून सुटेना. उंटाने अशोकाच्या झाडाचे डहाळे चघळावे त्याप्रमाणे हे तीन्ही लोक ह्या विश्वरूपाने चघळून गिळूनसुद्धा टाकले! मुकुट घातलेली ही योद्ध्यांची मस्तके दाढांच्या चिमट्यात सापडून त्यांचे पीठ होते आहे. दातांच्या फटीमध्ये मुकुटांतील काही रत्ने सापडली आहेत आणि रत्नांचे पीठ जिभेच्या बुडाला लागले आहे. काही दातांची अग्रे त्या पिठाने माखली आहेत. विश्वरूपरूपी काळाने लोकांचे देह आणि बळ खाऊन टाकले पण त्या जीवांच्या देहांची उत्तमांगे जी मस्तके ती राखून ठेवली आहेत की काय असे वाटते आहे.”

ह्या भयानक दृश्याने गांगरून गेलेला अर्जुन कळवळून म्हणाला “अहो हे काय? जन्माला आलेल्या प्राण्याला याशिवाय दुसरी गतीच नाही की काय? हे सगळे जग या विश्वरूपाच्या मुखरूपी डोहाच्या वाटेला सहजपणाने लागले आहे की! हे विश्वरूप जागच्या जागीच ह्या जगाला कसे गिळून टाकते आहे हो. एखाद्या महानदीचे ओघ सर्व बाजूंनी समुद्रात प्रवेश करतात तसे हे जग सगळ्या दिशांनी कसे हो या मुखांत चालले आहे! कुणीच त्यातून सुटत नाही की. ब्रह्मदेव आदिकरून सगळे उंच असलेल्या मुखांत जातात तर सामान्य जीव अलीकडे असलेल्या मुखात पडतात इतकेच. उत्पन्न झालेल्या ठिकाणीच ह्या सगळ्या प्राण्यांना ते विश्वरूपी मुख गिळून टाकते आहे. आयुष्याच्या मार्गावर रात्र आणि दिवस यांच्या पायऱ्या करून अतिशय वेगाने ह्या मुखाच्या दिशेनेच जन्माला आलेले यच्चयावात् लोक चालले आहेत.

पेटलेल्या पर्वताच्या दरीत पतंगांच्या झुंडीच्या झुंडी जशा उड्या टाकतात तसे हे सगळे प्राणी ह्या मुखात पडत आहेत. पण तापलेल्या लोखंडावर पडलेले पाणी नाव निशाणीसुद्धा मागे न ठेवता नाहीसे होते तसे

अनुक्रमणिका

हे सगळे प्राणी कधीच होत्याचे नव्हते झाले की त्यांचा कुठे पत्तासुद्धा लागेना. काय हो ह्या विश्वरूपाची अचाट भूक! येव्हढे सगळे खाऊनही त्याची भूक शमलेलीच नाही. एखादा रोगी तापातून उठला किंवा एखादा दरिद्री दुष्काळातून येऊन पानावर बसला की जसा आधाशीपणाने खातो तसे हे विश्वरूप इतका मोठा फराळ करूनही ओठ चाटतेच आहे. तसे पाहिले तर खाण्याचा कुठलाही पदार्थ ह्या आहारातून सुटलेला नाही. कुठली अवाढव्य भूक आहे ही! देवा काय हो ही तुमची हांव! आता काय समुद्राचा घोट भरता की सगळा ब्रह्मांड गोलच दाढेखाली घालता? दिशा सगळ्या गिळूनच टाकता की, आकाशातल्या सगळ्या चांदण्या चाटून घेता? अहो ही हांव तरी कशी म्हणावयाची? सर्वनाशच ओढवला म्हणायचा. भोगाने काम वाढतो ना तशी ही तुमची तोंडे खाता खाता आणखीच खादाड झाली आहेत. एकाच तोंडाकडे मी पहातो आहे तर ते किती अजस्र पसरले आहे! हे त्रिभूवन ह्या विश्वरूपाच्या जिभेच्या टोकावर वडवानळांतल्या कवठासारखे टेकले आहे आणि अशा प्रकारची मुखे सगळीकडे पसरली आहेत ती तर अगणितच! देवा अहो ह्या इतक्या तोंडाना पुरतील अशी त्रिभुवने तरी कुठून येणार आहेत? ज्यांना खाण्यासाठी पदार्थच शिल्लक नाहीत अशी ही तोंडे तू काय म्हणून इतकी वाढवली आहेस? त्या तोंडाचे उग्रपण नुसते पहाणेसुद्धा आता अशक्य आहे रे बाबा! ही तुझी तोंडे, तोंडे नव्हेतच! तो तर वणवाच आहे. हे बापुडे दीनवाणे लोक आता काय करतील? तुझ्या मुखातील ज्वाळांनी ते होरपळून निघत आहेत. वणव्याच्या वेढ्यात सापडलेल्या श्वापदांसारखी त्यांची दीनवाणी अवस्था झाली आहे. देवा तूच जर जगाचा काळ झालास तर त्याला आता तारणार तरी कोण? जगरूपी माशांना टाकलेले हे काळरूपी जाळेच आहे. जगाचे सगळे अनिष्ट कर्म आज शासन करण्यासाठी इथे उभे ठाकले आहे. तुझ्या अंगाच्या तेजाच्या जाळ्यांतून चराचरांत कुणालाही निसटून जाता येणार नाही. देवा तुम्हाला या जगाची काहीसुद्धा दया येत नाही काय? बरोबर आहे ते, अग्नि जाळतो पण त्याला आपल्या दाहकतेची उग्रता कुठे माहीत असते? जे त्या वणव्यात सापडतात त्यांच्या नशिबी यमयातना असतात. अग्नि कशाला त्या यातनांची पर्वा करील? कोण जगतो मरतो याचे त्याला काय सुखदुःख? शस्त्राला आपल्या धारेने कसा कुठे घाव पडतो हे कुठे कळते? विषाला आपण प्राणघात कसा करतो ह्याची कुठे कल्पना असते? श्रीकृष्णा, तशीच तुला आता जगाची पर्वाच नाही. जगाचे काय होईल याचा विचारच नाही. तुला स्वतःच्या ह्या भयंकर उग्रपणाची आठवणदेखील नाही. अहो देवा सगळी मुखे तरी कशाला? अलीकडच्या एकाच मुखांत सर्व जगाचा नाश होऊन राहिला आहे.

देवा, सगळ्या जगाला व्यापून राहिलेला आत्मा तू एकटा आहेस. असे मला सांग की आता आमचाच प्राण घेणाऱ्या यमासारखा का झाला आहेस? मी तर माझ्या जिवाची आशाच सोडून दिली आहे. तुझ्या मनात आहे तरी काय? काय असेल ते खरे एकदा उघड बोलून टाक.

अरे, आपले उग्रपण आता आणखी वाढवशील तरी किती? आपल्या अंगी असलेले भगवंतपण आठव तरी जरा. तू आमचा पालनकर्ता ना? मग असे का करतोस? आता निदान माझ्यापुरती तरी कृपा कर.

महाराज, ह्या जगाचा सर्वनाश करण्यापूर्वी माझी एक विनंती तरी ऐका.

देवा, आपण वेदांनीच जाणण्याच्या योग्यतेचे अहा. ह्या त्रैलोक्याचे मूळ कारण अहा. विश्ववंद्य अहा. तरीपण माझे एकदा ऐका तरी."

अनुक्रमणिका

असे विनवून अर्जुनाने देवांच्या पायावर डोके ठेवले. हात जोडून तो बोलू लागला. म्हणाला, “देवा, मी माझे पूर्ण समाधान व्हावे म्हणून आपले मूळरूप दाखवा असे आपल्याला म्हटले. आपण क्षणमात्र ते रूप मला दाखवलेही पण लगेच रागावून आपण विश्वाचा नाश करावयासच उठलात.

मला सांगा देवा, तुम्ही आहा तरी कोण? ही इतकी भयंकर मुखे आपण कशासाठी निर्माण केली आहेत? ह्या सगळ्या हातात ही पराजलेली शस्त्रे आपण कशासाठी घेतली आहेत? ही भयानक शस्त्रे घेऊन आपण काय करणार अहा? जेव्हा तेव्हा आवेशाने, रागीटपणाने आकाशापर्यंत वाढून आपण डोळे वटारून आमच्याकडे का पहाता अहा? मी पाया पडतो देवा, मला सांगा देवा, आपल्या मनात तरी काय? अर्जुनाच्या या बोलण्यावर देव आवेशाने म्हणाले, “मी कोण हे विचारतोस? येव्हढी उग्रता का वाढवली आहे असा तुझा प्रश्न आहे ना? थांब, सांगतो. अरे मी काळ आहे. हे पक्के समज की, ह्या जगाचा संहार करण्यासाठी ही माझी तोंडे चहूकडे पसरली आहेत. आता मी ह्या जगाचा ग्रास करीन.”

हे बोलणे अर्जुनाच्या कानी पडले मात्र! त्याचे उरलेसुरले धैर्य खचले. तो मनाशी म्हणू लागला, “हाय रे हाय देवा, मागच्या संकटाला त्रासलो म्हणून देवांची विनवणी करायला गेलो तो हे मध्येच भलतेच अरिष्ट उभे राहिले. देव तर आता ह्या जगाचा संहारच करायला निघाले की.”

अर्जुनाची दुःखी मुद्रा देवांनी पाहिली. तो किती निराश झाला आहे हे जाणले आणि अर्जुनाचे समाधान व्हावे म्हणून देव म्हणाले, “किरीटी, पण एक आहे बरं का! ह्या सगळ्या संहारातून तुम्हाला पांडवांना मात्र बाहेर ठेवले आहे. तुमचे तेव्हढे मी रक्षण करीन.”

धनुर्धर अर्जुनाचे प्राण चाललेच होते. पण देवांच्या वाक्याने तो सावरला. मरणाच्या महामारीत सापडला होता तो सावध झाला आणि देव काय सांगतात तिकडे लक्ष देऊ लागला.

तेव्हा देव पुढे म्हणाले, “अरे, तुम्ही पांडव माझे भक्त अहा. तुमच्याशिवाय जे दुसरे कोणी आहेत त्यांचा मात्र मी पूर्ण संहार करीन. विजेच्या प्रचंड अग्नित जशी लोण्याची उंडी पडावी तसे हे जग माझ्या तोंडी पडले आहे हे तू पक्के समज. आता ह्या सैन्याच्या ज्या सगळ्या वल्गना चालल्या आहेत, त्या सगळ्या व्यर्थ आहेत हे तू समजून रहा. हे इथे समोर जमलेले शुरांचे समुदाय बढाया मारत आहेत. पण त्या सगळ्या व्यर्थ आहेत. हे शूर वीर आवेशाने कुंथत आहेत, “आमचे हत्तीचे थवे यमाच्या वरताण आहेत. आम्ही प्रतिसृष्टि निर्माण करू. शपथ वाहून मृत्यूला मारू. जगाचा घोट भरू. पृथ्वी सगळीच्या सगळी गिळून टाकू. आकाश तर वरच्या वर जाळून संपवू. वाऱ्याला हा हा म्हणता बाणांच्या योगाने एका जागी खिळून टाकू.”

चतुरंग सैन्याच्या गर्वाने फुगून जाऊन हे वीर महाकाळाशी अशी स्पर्धा करीत आहेत. पराक्रमाच्या मदाने चढून गेले आहेत. त्यांचे हे गर्विष्ठ उद्‌गार हत्याराहून तिखट आणि अग्निहून दाहक आहेत. मारण्यामध्ये काळकूट विषालाही ते मधूर ठरवतील. पण अर्जुना, हे सगळे गंधर्वनगरीमधले लोट आहेत. पोकळ भेंड आहेत. चित्रामधल्या फळासारखे हे सगळे वीर खोटे आहेत, त्यांच्या वल्गनाही खोट्या आहेत. हे सैन्य नव्हे, केवळ कापडाचा साप खाली मांडून ठेवला आहे. अरे, हा तर सगळा मृगजळाचा पूर आहे.

अनुक्रमणिका

ह्यांच्या हालचालीला आधारभूत असलेले बळ मी कधीच ग्रासून टाकले आहे. आता मातीच्या चित्रातील वेताळाप्रमाणे ते निर्जीव उरलेले आहेत. कळसूत्री बाहुल्यांच्या दोऱ्या तोडून टाकल्या की मग त्या वाटेल त्याला सहज उलथून टाकता येतात. त्याप्रमाणे ह्या सैन्याचा आकार मोडायला आता काहीही वेळ लागणार नाही. अर्जुना, अरे असा भयभीत होऊन बसू नको. ऊठ! ऊठ! झटकन ऊठ आणि शहाणा हो. आठवण कर त्या गोग्रहणाच्या वेळची! अरे, ह्या कौरवांचे सैन्य तू मोहनास्त्र घालून झोपवलेस आणि भ्याडाहून भ्याड असलेल्या विराट पुत्र उत्तराने बहिणीच्या बाहुल्यासाठी त्या सैन्याची वस्त्रे हिसडून आणली नाहीत काय? आता समोर दिसणारे हे सैन्य तू मोहनास्त्र घातलेल्या त्या सैन्याहूनही तेजोहीन झाले आहे. आयता युद्धाचा प्रसंग आहे. एकट्या अर्जुनाने शत्रू जिंकले अशी किर्ती मिळव. कोरडे यशच नव्हे तर त्याबरोबर राज्यपदही हाती येणार आहे. सव्यसाची हो. केवळ निमित्तमात्र हो. लक्षात घे की, हे सगळे घडलेच आहे."

अरविंदबाबूंच्या आयुष्यातला प्रसंग इथे आठवतो. १२ ऑगस्टपासून आठशे विमाने व शंभर बॉम्बर्स इंग्लंडमधील नगरानगरावर बॉम्ब वर्षाव करू लागली. धडाधड वास्तू पेटल्या. भस्मसात होऊन भुईसपाट होऊ लागल्या. हे युद्ध असेच खेळले गेले तर इंग्लंडचा पराभव अटळ होता.

"१५ ऑगस्ट, १९४० रोजी इंग्लंड आमच्या ताब्यात असेल. तेव्हा मी बकिंगहॅम पॅलेसमध्ये असेन." अशा घोषणा हिटलर करत होता. युद्धाचा रंगच तसा भीषण होता. अवघ्या जगाचे लक्ष ह्या दारुण दुर्घटनेकडे लागले होते.

ध्यानभूमीत काळ कंठणाऱ्या विरागी अरविंदांना युद्धाची वार्ता हवी कशाला पण आसुरी शक्तीचा पराभव झाला तरच मानवजात तगेल तेव्हा आपल्या दैवी शक्तीचे हत्यार उचलणे जरूर आहे असे अरविंदांना वाटले आणि त्यांनी अदृश्य अशी तिसरी आघाडी उघडली. हिटलर, चर्चिल लोकांना दिसत होते, त्यांची सैन्ये, त्या सैन्याच्या हालचाली दिसत होत्या. अरविंदांचे सामर्थ्य अज्ञात, अदृश्य व अपूर्व होते. हिटलरचा विजय म्हणजे माणुसकीचा पराभव होता. जगाचे विघटन व विनाश आसुरी शक्तींनी करावा आणि पारमार्थिकांनी स्वस्थ राहून ते पहावे हे श्री. अरविंद व माताजी यांना पटत नव्हते. त्यांनी आपल्या शक्ति पणाला लावल्या, मग हिटलर पराभूत झाला, जपान शरण आले, इंग्लंडचा जय झाला. यामागे श्री. अरविंदांचे दैवी सामर्थ्य उभे होते.

त्यांनी १९१८ सालीच श्री. पुराणी ह्या गुजराथी क्रांतीकारकास आश्वासन दिले होते की, "देश स्वतंत्र होणार हे निर्विवाद आहे. सूर्यप्रकाशाइतकी ही गोष्ट स्वच्छ आहे. नियतीचा निर्णय झाला आहे, अंमलबजावणीस काय वेळ लागेल तेव्हढाच.!"

आणि १९४८ साली १५ ऑगस्टला श्री. अरविंदांच्या जन्मदिवशी ही भविष्यवाणी खरी झाली. ब्रिटीश साम्राज्याच्या दोऱ्या १९१८ सालीच तुटल्या होत्या व तसे श्री. अरविंदांना तेव्हाच कळले होते.

आता ही शक्ति ज्याला श्री. अरविंद My Force असे म्हणत ती आजही अस्तित्वात आहे याचा पुरावा

फारच अनपेक्षितरित्या मानवाच्या हाती पडला आहे. अपोलो १२ हे यान पृथ्वीवर उतरत असताना कॉन रॅड व त्याचे सहकारी यांना पृथ्वीतलावर एक अद्भुत  प्रकाश दिसला. ब्रह्मदेशाच्या व पूर्व भारताच्या दक्षिणेस आसमंत व्यापणारा प्रकाश दिसत असल्याचे त्यांनी सांगितले. २६ नोव्हेंबर, १९६९ मध्ये पाहिलेल्या ह्या प्रकाशाचे वृत्त इंडियन एक्सप्रेसमध्ये छापले गेले व असे आढळून आले की प्रकाशाच्या स्थळाचे वर्णन पांडेचरीसच फक्त लागू पडते. समाधीतून कार्याची घडण जास्त चांगल्या रीतीने होईल असे ठरवून त्यानी महासमाधी घेतली व कार्य चालू ठेवले. १९६९ चा पुरावा ग्राह्य मानला की १९१८ ची त्यांची भविष्यवाणी व १९४० ची अदृश्य युद्ध आघाडी याचा अर्थ कळतो व देव अर्जुनाला काय सांगत आहेत याचा उलगडा होतो.

देव म्हणत आहेत, “अरे पार्था, मी ह्यांना मारलेच आहे. आता तू भीष्मांची पर्वा करू नको, द्रोणांचे भय धरू नको, कर्णावर शस्त्र कसे उगारू म्हणू नको. या जयद्रथाला मारण्याचा काय उपाय योजावा अशी चिंता करू नको. आणखीही पुष्कळ नावाजलेले वीर तुला समोर दिसतील पण ते सगळे चित्रातील सिंह आहेत हे लक्षात ठेवून ओल्या हाताने पुसून टाक. अरे, हा आता लढाईचा फक्त देखावा व्हावयाचा आहे. कसला आला आहे युद्धाचा मेळावा? मी ह्यांना गिळलेलेच आहे आता उरला आहे फक्त आभास! तू आत्ताच ते सगळे माझ्या तोंडात पडलेले पाहिलेस ना? तेव्हा लक्षात घे की यांचे आयुष्य संपले आहे. आता ह्यांना मारणे काय? अरे, सोपेच आहे.

म्हणून अर्जुना, उल्हासाने उठ. मी मारलेले हे योद्धे निपटून काढ. नसत्य शोकात पडू नकोस. आपणच निशाण मारण्यासाठी बाहुले उभे करावे आणि ते सहज मारून पाडावे तसे तू ह्यांना बाणाने मार. आता केवळ तुझे निमित्त व्हावयाचे आहे. बाबा अर्जुना, तुझ्या हिताला जे बाधक होते ते उपजताच वाघाने नेले आहे. आता राज्यानिशी यश येणार आहे ते आनंदाने भोगून घे. तुझे भाऊबंद स्वभावतःच मातलेले होते. जगात बलाने मदोन्मत्त झाले होते, त्यांना सहाय्यकारी पुष्कळ इष्ट मित्र होते पण मुळीच सायास न पडता तू त्यांना समूळ नाहीसे केलेस अशी तुझी किर्ती होऊं दे. पार्था, तुझ्या शौर्याची ही गाथा जगताच्या वाचारूपी पटावर लिहून ठेव.”

माउली म्हणतात, “ज्याचे मनोरथ पूर्ण झालेच नाहीत त्या कुरुराजा धृतराष्ट्राला ही हकीकत संजयाने साद्यंत सांगितली. त्याने ती जसजशी देवांच्या तोंडून निघाली तसतशी राजाला निवेदन केली, कारण त्याने शब्द-न्-शब्द स्पष्ट ऐकला होता. देवांचा आवाजच तसा होता. गंगेचे पाणी सत्यलोकांतून निघून खळाळत जसे खाली येते तसा देवांच्या आवाजाचा घडघडाट होता! काय तो घनगंभीर आवाज! विश्वकंद श्रीकृष्ण बोलत होते. त्या अनंतरूपातून निघणारा शब्दध्वनी अनेक महामेघ एकाचवेळी गर्जना करू लागले की, जसा होईल तसा होता. मंदराचलाची रवी करून जेव्हा देवांनी क्षीराब्धी घुसळला तेव्हा असाच आवाज घुमला असेल असे वाटत होते.

अर्जुनाने तो थोडासा ऐकला. संजयाने पण ऐकला. निवेदन करावयाचे म्हणून तो पुष्कळच स्थिर मनाने ऐकत होता. पण अर्जुनाची स्थिती वेगळी होती. देवांच्या शब्दाशब्दाबरोबर त्याचे मन हेलावत होते. त्याचे सुख वाढले की भय दुणावले हे माहीत नाही, पण सर्वांग थरथर कापत होते एवढे खरे. तो अगदी खालपर्यंत लवला. त्याने दोन्ही हात जोडले आणि तो पुन्हा पुन्हा देवांच्या पायावर मस्तक ठेवू लागला. माऊली म्हणतात,

"त्याला बोलायचे होते पण कंठ दाटून आल्यामुळे शब्द फुटेना. आता हे सुखाने झाले की भयाने झाले हे तुम्ही ठरवा. पण देवांच्या बोलण्यामुळे अर्जुनाची ही अशी स्थिती झाली हे गीतेच्या श्लोकातील अर्थावरून मी जाणले. मला तरी वाटते आहे की त्याचे भयच वाढले."

भीतभीतच त्याने पुन्हा देवांच्या चरणाला नमस्कार केला आणि तो म्हणाला, "महाराज, आपण मला सांगितले की प्रत्यक्ष काळ तो मी आहे आणि जगाला ग्रासणे ही माझी लीला आहे. आम्ही आपले हे म्हणणे शिरोधार्य केले पण खरे सांगू का? स्थितीकाळी तू काळ होऊन जगाला ग्रासून टाकलेस हे विचाराला पटेना. जग आहेच की, स्थितीकाली संहार होईल कसा? अंगात तरूणपण असताना ते घालवून देऊन एकदम वृद्धावस्था आणावी हे कसे शक्य आहे? ती अवस्था क्रमानेच प्राप्त होणार की, मला तरी वाटते बहुधा स्थितीकाली संहार होणार नाही. श्रीअनंता, दिवसाचे चार प्रहर लोटून गेले की मगच सूर्य मावळतो एकदम माध्यान्ही तो मावळेल कसा? मी कबूल करतो तू अखंडित एकसंधी आहेस. पण देवा, उत्पत्ति, स्थिति, संहार या तिन्ही अवस्था आपआपल्या काळी बलवान असणारच. ज्यावेळी उत्पत्ति होते तेव्हा स्थिती आणि संहार या दोन्ही अवस्था मिटलेल्याच असतात ना? स्थितिकाळी उत्पत्ति आणि संहार या दोन्ही अवस्था आपले सामर्थ्य मिरवू शकतात काय? शेवटी जेव्हा प्रलयकाळ प्राप्त होतो, तेव्हा उत्पत्ति आणि स्थिति मावळूनच जातात की नाही? हा तर अनादिक्रम आहे यात बदल कसा काय होईल बरे? जग आज तरी भोगाच्या भरात स्थितिकालात वावरत आहे. अशा वेळी ह्या जगाचा आपण ग्रास करूनच टाकला आहे हे मी कसे पटवून घेऊ? माझ्या जीवाला तरी हे योग्य वाटेना.

तेव्हा देव अर्जुनाला संकेत करून म्हणाले, "अरे, ह्या दोन्ही सैन्यांचे आयुष्य संपले आहे हे मी तुला प्रत्यक्ष दाखवले आहे. त्यांना यथाकाळीच मरण येईल."

हा इशारा देण्यास जेव्हढा वेळ लागला तेव्हढ्या वेळात ते रौद्र संहारक रूप दिसेनासे झाले आणि सगळे लोक आपआपल्या जागी आहेत असे अर्जुनाने पाहिले.

त्याची भीति गेली. मन शांत झाले, तो म्हणू लागला, "देवा, तू या विश्वलाघवाचा सूत्रधार आहेस. अरे, तू नुसते म्हटल्याबरोबर हे सगळे जग पूर्वस्थितीला आले की, खरंच देवा सर्व घटनांची सूत्रे तूच आपल्या हाती वागवतोस. दुःखसागरात पडलेल्यांना तू बाहेर काढतोस, ही तुझी कीर्ति मी आठवतो आहे. कीर्ति आठवता आठवता महासुखाचा सोहळा भोगतो आहे. भगवंता, हर्षामृताच्या लाटावर लाटा येत आहेत आणि मी त्यावर लोळतो आहे. जगाला आपण जीवदान दिलेत. जगाला खरोखरच आपल्याबद्दल अपार प्रेम वाटते आहे आणि दुष्टांचा अधिकाधिक नाश होतो आहे. त्रिभुवनातील राक्षसांचा तर तू साक्षात् मृत्यूच आहेस. म्हणून हृषीकेशा, समोर आहे की ते राक्षस भिऊन जाऊन दशदिशांना सैरावैरा पळत आहेत. देव, सिद्ध, किन्नर, इतकेच काय पण सगळे स्थावर जंगम जग आनंदाने तुला नमस्कार करीत आहे.

देवा नारायणा, हे राक्षस तुझ्या पायावर लोहण घ्यायची सोडून असे धावत का सुटले आहेत? पण हे तुला काय विचारावे? सूर्योदय झाल्यावर अंधार तिथे राहिलच कसा? आम्हाला हे कळायला हवे. तू तर प्रकाशाची खाण आहेस. आमच्यासाठी तू दृश्यस्वरूप धारण केले आहेस. म्हणूनच तू प्रगट झाल्याबरोबर हा

राक्षसाचा पालापाचोळा उडून गेला.

श्रीरामा, काय सांगू? इतके दिवस आपला हा महिमा ठाऊकसुद्धा नव्हता. आपली ही गंभीर कीर्ति आजच आम्ही ऐकली. आपले ते अद्भूत  मूळ स्वरूप पाहिले. आता मला कळले की ह्या नाना सृष्टि भूत समुदायाच्या वेली, महद्ब्रह्मापासून उत्पन्न होतात आणि त्या महद्ब्रह्माचा जन्म तुमच्या दैवी इच्छेतून होतो. देवा, तुमच्या स्वरूपाचे वर्णन तरी कसे करू मी! आपण सर्वच बाबतीत सीमारहित अहा. आपल्या गुणांना अंत नाही. आपल्या तत्त्वाला अंत नाही, आपल्या व्यापकतेला अंत नाही, आपण सर्व देवांचे राजे अहा. अरे, तू त्रैलोक्याचा ओलावा आहेस. सदाशिवा, तू अविनाशी आहेस. सत् आणि असत्, ही दोन्ही रूपे आपलीच आहेत. ह्या सर्वांपलीकडील तत्त्व आपण अहा.

देवा, आपणच प्रकृति, आपणच पुरुष आणि ह्या दोन्हींच्याही पलीकडील तत्त्व अहा. आपण मला हे शब्दांनी सांगितले होते. आपला शब्द मी प्रमाणही मानला पण आपण आज हे सगळे ज्ञान प्रत्यक्षानुभूति देऊन पटवून दिले आहे. महत्त्वाचा शेवटही आपणच अहा. स्वतः आपण अनादि, पुरातन अहा. भूतभविष्याचे ज्ञान आपल्याच हाती आहे. देवा, आपण श्रुतीच्या डोळ्यांना दिसता. त्रिभुवनाच्या घराचेही घर अहा. ह्या जीवाशीही अभिन्न अहा. देवा, आपल्याला परम महाधाम म्हणतात कारण कल्पांती ते महद्ब्रह्म आपल्या मांडीवर येऊन झोपते किंबहुना अनंतरूपा, आपले वर्णन करणेच अशक्य आहे.

भगवंता, हे सगळे जग तुझाच विस्तार आहे. तूच हे व्यापून भरून उरला आहेस. मी तुला नमस्कार करतो पण काय म्हणून करू रे! तू नाहीस अशी वस्तूच नाही जगात. कोणत्या ठिकाणी तू नाहीस? देवा, अरे तू जसा असशील तसाच मी तुला नमस्कार करतो.

अनंता, तू वायु नियमन करणारा यम आहेस. प्राण्यांमध्ये असणारा अग्नि आहेस, तू वरुण, सोम, जगत्पिता ब्रह्मदेव आणि त्या ब्रह्मदेवाचाही आदि जनक आहेस. देवा, तुझे वर्णन कोणत्या शब्दांनी करू? जे जे म्हणून रूप असेल किंवा नसेल ते सर्व तूच आहेस, त्या तशा तुला, जगन्नाथा माझा नमस्कार असो."

प्रेमभरित अंतःकरणाने पांडुसुत अर्जुनाने असे देवाचे स्तवन केले, आणि "प्रभो, नमस्ते, नमस्ते," असे म्हणू लागला. त्याला मनातून फार वाटत होते की भावना व्यक्त कराव्या पण शब्दच बाहेर फुटेनात. तो वरचेवर श्रीकृष्णाकडे पाही आणि म्हणे "प्रभो, नमस्ते, नमस्ते प्रभो."

पहाता पहाता त्या श्रीमूर्तीच्या साद्यंत दर्शनाने त्याला फार समाधान होऊ लागले. आणि तो पुन्हा पुन्हा म्हणू लागला, "नमस्ते, नमस्ते." या चराचर भूतांमध्ये हा भगवंत अखंड भरून राहिला आहे याची जाणीव होऊन तो पुन्हा पुन्हा, "नमस्ते, नमस्ते" म्हणू लागला. अद्भूत  अशी ती अनंत रूपे त्याला आठवत होती. आश्चर्य दाटून येत होते, पण तोंडातून शब्द येत होते "नमस्ते, नमस्ते" इतकेच. आणखी स्तुती करावी असे भरते आतून येत होते पण स्तुती कशी करावी हेच आठवेना, बरं निवांत रहावे हेही सोसेना, म्हणून एकसारखा गर्जत राहिला, "प्रभो नमस्ते, नमस्ते."

किंबहुना याप्रमाणे त्याने सहस्रवेळा नमस्कार केले मग म्हणाला, “माझ्या सन्मुख असलेल्या भगवंता तुला नमस्कार असो. देवांना पाठ-पोट आहे की नाही याचा विचार करून आम्हाला काय उपयोग आहे? तू मला पाठमोरा असलास तरी नमस्कार असो. तू माझ्या पाठीशी म्हणून तुला माठमोरा म्हणायचे बाकी जगाला सन्मुख विन्मुख असणेच संभवत नाही कारण तू जगद्रुपच आहेस. तुझ्या वेगवेगळ्या अवयवांचे वर्णन कसे करावे हे पण मला कळत नाही तेव्हा तुला सर्वात्मकाला एवढेच म्हणता येते की देवा जसा असशील तसा तुला “नमस्ते, नमस्ते प्रभो.”

देवा, अनंतबलाच्या अवेगाचे तू ठिकाण आहेस. तुझा पराक्रम न मोजता येण्यासारखा आहे. तू तिन्ही काळी सारखा असतोस. सर्व देवांच्या रूपाने तूच आहेस. ज्याप्रमाणे सर्व पोकळीत आकाश हे पोकळी या स्वरूपात असते त्याप्रमाणे तू सर्वांना व्यापून सर्व झाला आहेस. किंबहुना हे सर्व केवळ तू एकच आहेस. क्षीरसमुद्रावर जशा क्षीराच्या लाटा त्याप्रमाणे हे त्रिभुवन तुझ्या स्वरूपावरील तरंग आहे. म्हणून देवा, तू ह्या जगापासून वेगळा नाहीस हे माझ्या खरोखर अनुभवास आले.

स्वामी, आम्हाला हे आजपर्यंत कधी कळलेच नाही. तुझे हे खरे परब्रह्मरूप लक्षात न आल्याने आम्ही तुझ्याकडे पाहिले एक जिवलग सखा, जवळचा आप्त म्हणून! तुझ्याशी वागलोही तसेच. काय केले हे आम्ही! देवा, अरे आमचे अपराध तरी किती म्हणून सांगावे! आम्ही फारच अनुचित गोष्ट केली रे. अमृत हाती आले तर त्याने सडा-संमार्जन केले. कामधेनूच्या बदल्यात घोड्याचे शिंगरू घेतले. आम्हाला परिसाची खाण मिळाली तर आम्ही त्या दगडांनी पायाभरणी केली. कल्पतरूच्या फांद्या तोडल्या आणि शेताला कुंपण घातले. चिंतामणी रत्नाची खाण सापडली तर गुरे हाकलण्यासाठी ढेकळांसारखा त्या अमोल मण्यांचा उपयोग केला. तुझी जवळीक मिळाली तर आंधळ्या स्नेहभावनेने तो स्नेह फुकट घालवला. तुझी योग्यता न जाणून केवळ एक मित्र म्हणून तुझी आम्ही उपेक्षा केली. देवा, आजचेच बघा ना. देवा, अहो ही लढाई कसली आणि काय किंमतीची पण आम्ही तुला केले आहे सारथी! या दुष्ट पापी कौरवांच्या घरी तुला आमची शिष्टाई करण्यासाठी धाडून दिले. केव्हढा दारूण अपमान केला आम्ही तुझा! तू आमचे जागते दैवत असून तडजोडीच्या सामान्य व्यवहारासाठी आम्ही तुला विकला रे! तू योग्याचे समाधीसुख आहेस. मी मूर्ख हे जाणतच नव्हतो. तुझ्या तोंडावर तुला वर्मी लागेल असे बोलत होतो. तू विश्वाचे अनादि मूळ, पण तू सभेमध्ये बसलास की इतर सभासदांशी आप्तपणाने विनोदाने बोलावे तसे बोलत होतो. तुझी थट्टा करत होतो. कधी तुझ्या वाड्यात यावे आणि तुझ्याकडून मानसन्माची अपेक्षा करावी, मान दिलास तरी तुझ्यावर रुसून निघून जावे असे सुद्धा आम्ही केले. तुझ्या पायावर डोके ठेवून तुझी समजूत करावी, क्षमा करावी, असे कितीतरी अपराध आम्ही केले आहेत. सलगी सलगीमध्ये मी किती वेळा तुझ्याकडे पाठ फिरवूनही बसलो आहे. श्रीकृष्णा, ती काय आमची योग्यता होती काय? पण चुकून केले आम्ही हे देवा, अपराध तरी किती आठवावे! तुझ्याजवळ एखादी चांगली वस्तू दिसली की आम्ही ती तुझ्याजवळून मागून घेतलीच. श्रीकृष्णा, अरे आम्ही किती वेळा तुलाच शहाणपण शिकवले. वर आणि प्रौढीने म्हणत होतो “आम्ही काय देणे लागतो तुझे?” आमचे हे जे सगळे अपराध आहेत ते त्रिभुवनात मावायचे नाहीत. पण आपल्या पायावर हात ठेवून शपथ घेऊन सांगतो देवा, हे सगळे अज्ञानातून झाले. आठवते ना देवा, फराळाच्यावेळी आपल्याला माझी आठवण व्हावी पण मी निर्लज्ज गर्वाने फुगून बसत होतो. तुमच्या अंतःपुरात घुसून खेळत होतो. तुमच्या शय्येवर तुमच्या शेजारी जाऊन निजत होतो. “कृष्णा”, अशी एकेरी हाक मारीत होतो. तुला यादवांपैकी एक यादव समजत होतो. जायला निघालास की आमची शपथ

घालून तुला ठेवून घेत होतो. तुझ्या बरोबरीने एका आसनावर बसत होतो. तू काही सांगितलेस तर ऐकत नव्हतो. हे सगळे अतिपरिचय आणि तुझ्या खऱ्या स्वरूपाबद्दलचे अज्ञान यातून घडले. आता सांगू तरी काय? क्षमा तरी किती अपराधांची मागू? मी सर्व प्रकारच्या अपराधांची केवळ रास आहे.

तेव्हा देवा, आता असे करा की, आम्ही आपल्यासमोर आणि आपल्या पश्चात् जे जे अपराध केले ते ते आईच्या मायेने पोटात घाला आणि क्षमा करा. कोण्या एका वेळी नदी गढूळ पाणी घेऊन समुद्रात प्रवेश करते. समुद्राचे पाणी त्या अशुद्ध पाण्याला सामावून घेतेच ना? दुसरा काय मार्ग आहे त्या समुद्राला? प्रेमाने किंवा प्रमादाने माझ्याकडून जे जे बोलले गेले ते देवा, आपण उदारपणाने सोसावे बरं का. देवा, भूतांना धारण करणारी ही पृथ्वी तुझ्या अंगच्या क्षमा ह्या गुणामुळे "क्षमा" झाली आहे. पृथ्वीने तो गुण आपल्याकडून घेतला आहे. तेव्हा मी विनवणी करावी तेव्हढी थोडी आहे. असे जरी असले तरी आपण माझ्या अपराधांची क्षमा करा. अगम्य श्रीकृष्णा, मी आपल्याला शरण आलो आहे. या सगळ्या अपराधांची क्षमा कराल ना?

महाराज, आता यापुढे असा अपराध होणार नाही. आपले माहात्म्य मी जाणले आहे. या चराचराचे जन्मस्थान आपण अहा. विष्णू, शंकर या सर्व देवांची आपण परम देवता अहा. वेदांना शिकवणारा आदिगुरू आपण अहा. श्रीरामा, तू अगाध आहेस. तू सर्व प्राण्यांमध्ये सारखाच असतोस. गुणांमध्ये तू अप्रतिम आणि केवळ अद्वितीय आहेस. तुझ्या बरोबरीचे कोणी नाही हे सांगावयास कशास हवे? तुझ्यापासून झालेल्या आकाशात जग सामावले आहे. तुझ्या बरोबरीचे जगात कुणी आहे हे म्हणावयासही लाज वाटते आहे. मग तुझ्यापेक्षा कुणी श्रेष्ठ आहे ही गोष्टच बोलायला नको. त्रिभुवनात तुझ्यासारखा तूच आहेस. तुझ्या बरोबरीचाही कुणी नाही मग अधिकाची गोष्टच बोलायला नको. तुझा महिमाच असा अलौकिक की मी त्याचे वर्णन कसे करू हे मला समजत नाही."

अर्जुनाने असे म्हटले आणि देवापुढे दंडवत घातले. सात्त्विकाचा जसा काही पूरच त्याच्या मनात लोटला.

"देवा कृपा करा प्रसन्न व्हा." असे म्हणता म्हणता त्याचा कंठ दाटून आला. शब्द फुटेना. कसाबसा म्हणू लागला "देवा, मला क्षमा करा. अपराधसमुद्रातून मला वर काढा. किती हो अपराध आमच्या हातून घडले! आठवण झाली तरी लाज वाटते आहे. यादवेश्वरा, तू विश्वाचा सुहृद तर तुला आमचा सोयरा मानून तुझा योग्य सन्मानही आम्ही कधी केला नाही. तू ईश्वरेश्वर तर तुझ्यावरच स्वामित्त्व गाजवून सारथी केले. खरे म्हणजे वर्णन करण्यास योग्य काय तो तूच पण तू कौतुकाने सभेमध्ये माझेच वर्णन करीत होतास आणि मी गर्वाने फुगून जाऊन आणखी बडबड करीत होतो. अशा प्रकारच्या आमच्या अपराधांना मर्यादाच नाही रे मुकुंदा! आता ह्या प्रमादापासून तूच आमचे रक्षण कर. तूच आमचे रक्षण कर.

आता ही विनवणी करावी अशीसुद्धा योग्यता माझ्या अंगी नाही. पण आपल्या वडिलांशी मूल जसे सलगीने बोलते तसा मी बोलतो आहे. पुत्राचे सहस्त्र अपराध पिता दुजेपणा न दाखवता जसे पोटात घालतो त्याप्रमाणे महाराज, हे आपण सहन करा. मित्राचा उद्धटपणा मित्र सहन करतो त्याप्रमाणे आपण हे सर्व सहन करा प्रिय माणसाकडून मानसन्मान घेण्याची जसा स्नेही अपेक्षा करीत नाही त्याप्रमाणे आमच्या यज्ञात आपण

उच्छिष्टही काढले ते सहन करा आणि आम्हाला क्षमा करा." गहिंवरलेला अर्जुन अश्रुभरल्या नेत्रांनी देवाकडे पहात म्हणाला, "प्राणसखा भेटला की भोगलेल्या संकटाचे प्रसंग जसे त्याला सांगाताना काही संकोच वाटत नाही तसा मी बोलतो आहे. ज्या पतिव्रतेने आपले शरीर, मन ही पतीला भक्तिभावाने अर्पण कले आहे, ती पतीची भेट झाल्यावर सगळे हृदय मोकळे करून त्याच्याशी बोलते त्याप्रमाणे मी आपल्याला-माझ्या स्वामींना-अपाराधांची क्षमा करा असे म्हणतो आहे."

देवा, अशी विनंती करण्याचे आणखी एक कारण आहे. मी आपल्याशी सलगी केली आणि मला विश्वरूप दाखवाच असा हट्ट धरला. आपण तो हट्ट आईवडिलांच्या प्रेमळपणाने पुरवला. माझ्या अंगणात देवा, आपण कल्पवृक्षाची झाडे लावली. कौतुकाने खेळायला कामधेनूचे पाडे दिले. नक्षत्रांच्या फाशानी मी डाव खेळणार, चंद्राचा चेंडू करणार अशाप्रकारचा हा माझा हट्ट आपण क्षणमात्र न लावता आईसारखा पुरवला. ज्या अमृताचा थेंब मिळावा म्हणून जग वाटेल ते कष्ट सहन करायला तयार असते त्या अमृताचा चार महिने आपण माझ्यावर वर्षाव केला. पृथ्वीवर सऱ्या पाडून तासातासात चिंतामणि पेरलेत. स्वामी, अहो, आपण मला कृतकृत्य केले. माझे इतके लाड पुरविले की जे शिव किंवा ब्रह्मा यांनी कानांनी ऐकलेसुद्धा नसतील. मला जे दाखवले ते त्यांच्या कानावरही नाही. उपनिषदांनासुद्धा ज्या रूपाची भेट नाही किंवा दर्शनाची गोष्टच नाही अशा गुह्य गोष्टींचे भांडार आपण माझ्यापुढे उघडे केले. कल्पांदीपासून माझे जेव्हढे जन्म झाले ते सगळे आजच्या घडीपर्यंत मी धांडोळून पाहिले पण विश्वरूप पाहिले किंवा विश्वरूपाच्या गोष्टी ऐकल्या असे काही मला आढळले नाही. बुद्धि आणि अंतःकरण ह्या दोन्हीचाही इथे काही उपयोग नाही. अंतःकरण याची कल्पना करू शकत नाही आणि बुद्धि यांच्या अंगणातसुद्धा शिरू शकत नाही. अशा स्थितीत हे विश्वरूप डोळ्यांनी पहावे ह्याबद्दल काय बोलावे? ते कुणी कधी ना ऐकले ना पाहिले! पण ते आपण मला दाखवले. दिव्यदृष्टि देऊन दाखविले. ते अपूर्व दर्शन घेऊन माझे हृदय आनंदाने भरून गेले. मी तृप्त झालो, कृतार्थ झालो.

पण सांगू का आता मनातली आशा देवा? जीवाची तळमळ होते आहे की सख्याशी चार गोष्टी जवळ बसून बोलाव्या. तुझ्या सहवासात रहावे, तुला उराउरी भेटावे. काय ते महासुख! माझा जीव त्या आनंदासाठी उत्सुक झाला आहे, तळमळतो आहे. देवा, त्या सुखाशिवाय मी जगू शकत नाही रे!

मला माहीत आहे, भगवंता, तुम्ही उडवाउडवी करणार. नीट उत्तर देणार नाही. माझी चेष्टा करणार आणि मी मागतो ते देणार नाही. म्हणाल की, काय बोलायचे, बसायचे, सहवास घ्यायचा तो ह्या विश्वरूपाशीच साधून घे. पण देवा, काय करू मी इथे? अहो, बोलावे म्हटले तर कोणत्या तोंडाशी बोलू? दशदिशांना असंख्य मुखे पसरली आहेत. मी आपल्या कोणत्या रूपाला अलिंगन देऊ? आपल्या ह्या रूपांना काही हिशेब आहे काय? देवा, ह्या आपल्या रुपाच्या गुडघ्यापर्यंत तरी माझे वर उंच केलेले हात पोचतील काय? बघा की! मी मग गळ्याला मिठी कशी घालू? वाऱ्याबरोबर धावू कसा? समुद्राला वेढून घेऊ कसा? खवळलेल्या समुद्रात सुखाने जलक्रीडा करू तरी कसा? ह्या आपल्या अपरंपार विश्वरूपाकडे पाहिले की मनात भयाचे कल्लोळच कल्लोळ उठत आहेत.

तेव्हा मी पाया पडतो देवा, आपल्या, आपण हे आपले विश्वरूप आवरून घ्या. विश्वरूप पाहण्याचा माझा हट्ट आपण पुरवला आता हाही हट्ट पुरवा. उत्सुकतेने प्रवास करून निरनिराळे देश पहावे आणि मग परत

आपल्या घरी निवांत येऊन रहावे तशी मला ओढ लागली आहे. तुझे ते सोज्वळ, मनोहर, चतुर्भुजरूप हाच माझ्या जीवाचा विसावा आहे. तो माझा ठेवा मला परत द्या.

मी ते विश्वरूप घटकाभर पहायला मागितले, पाहिले. आता माझी तृप्ती झाली.

मला पुन्हा त्या चतुर्भुज सौम्यरूपात आपल्याला पहायचे आहे. माझे सगळे सुख केवळ त्या मूर्तीच्या दर्शनात आहे. श्रीकृष्णा, जेव्हा जेव्हा तू द्वारकेला परत जायला निघायचास तेव्हा तेव्हा तुझ्या विरहाच्या कल्पनेने जी दारूण व्याकुळता मनात दाटून यायची तीच आज माझ्या मनाला व्यापून राहिली आहे. ह्या विश्वरूपाच्या दर्शनाने झालेला सगळा आनंद संपला आहे. आता त्या आमच्या सुखनिधानाच्या भेटीची आर्तता मात्र आहे. देवा, ऐकाल ना हे माझे प्रश्न? कराल ना एवढी कृपा?

आम्ही योगाचा अभ्यास करावा आणि त्या चतुर्भुजरूपाचा अनुभव घ्यावा, शास्त्रांचा मागोवा घ्यावा आणि शेवटचा मुक्काम ह्या शामसुंदर मूर्तीच्या दर्शनाच्या ठिकाणी व्हावा, आम्ही तीर्थयात्रा कराव्या आणि ह्या मूर्तीच्या दर्शनाने ते पुण्य फलित व्हावे, आम्ही यज्ञयाग करावे आणि त्या मूर्तीच्या सहवासाचा लाभ आम्हाला मिळावा, देवा, आम्ही जे जे दान पुण्य करू त्याचे फळ तुझ्या ह्या चतुर्भुज स्वरूपाची प्राप्ती व्हावी हेच असावे अशी आम्हाला त्या रूपाची गोडी आहे. तेव्हा आता उशीर न करता तुमच्या दर्शनाची कृपा करा आणि माझी तळमळ शांत करा. देवा रे, आता उशीर नको करू.

जगाचे मनोगत जाणणाऱ्या आणि सगळ्या जगाला जन्म देणाऱ्या देवदेवेश्वरा, माझ्यावर प्रसन्न हो आणि त्या आमच्या नित्य परिचयाच्या स्वरूपात प्रगट हो.

## अहो, कसे ते सुंदर रूप!

देवा, तुझा तो कोमल सौम्य निळा रंग ही कमळे रंगवतो काय रे? का ह्या आकाशाला डूब देतो? त्या त्या निळ्या रंगाची झळाळी तर इंद्रनील मण्याच्या तेजासारखी आहे. पाचेच्या रत्नाला सुगंध प्राप्त व्हावा किंवा प्रत्यक्ष आनंदाला भुजा फुटाव्या तसा तुझा हा मनोहर देह दिसतो. मदन सुंदर आहे असे म्हणतात पण ते सौंदर्य तो तुझ्या मांडीवर खेळल्यामुळे त्याला प्राप्त झाले आहे यात संशय नाही. मस्तकावर मुकुट ठेवताच तुझ्या मस्तकामुळे मुकुटास शोभा आली आहे. वस्त्रालंकारांनी शोभा तुला आणण्याऐवजी तू धारण केल्यामुळे त्यांनाच शोभा आली आहे. आकाश मंडळात इंद्रधनुष्य असावे आणि त्याने सावळ्या मेघाला आवरून धरावे त्याप्रमाणे वैजयंती माळेने आपल्याला पायापर्यंत वेढले आहे. देवा, तुझी ती प्रतापशाली गदा! वेळप्रसंगी असुरावर तिचा प्रहार करून त्याचा नाश करता पण मृत्यूच्या बदल्यात त्या अपराध्याला मोक्ष देता. काय ते आपले दैदीप्यमान चक्र! कसे आपल्या हाती शोभून दिसते! किती सौम्य तेजाने ते तळपत असते.

स्वामी, खरे सांगू का? ते तुझे कोमल, स्निग्ध, मनोहर, सावळे रूप पहायला माझे डोळे अधीर झाले आहेत. विश्वरूप पाहून, तो सोहळा भोगून निवालेले डोळे तुझी श्रीकृष्णमूर्ति पहायला अतिशय आतूर झाले आहेत. त्यांना कृष्णाचे ते आवडते रुपडे पाहिल्याशिवाय दुसरे काहीच पहायला आवडेनासे झाले आहे. ते रूप

पहायला मिळाले नाही तर या विश्वरूपाचीही काही महती त्या डोळ्यांना वाटत नाही. भोग आणि मोक्ष ह्या दोन्ही ठिकाणी आम्हाला कृष्णमूर्तीइतके प्रिय जगात काहीच नाही, तेव्हा महाराज हा अवाढव्य पसारा अवरा आणि आम्हाला प्रिय आणि चिरपरिचित असे सुंदर सौम्यरूप पुन्हा धारण करा.

अर्जुनाचे हे बोलणे देवांनी ऐकले. ते आश्चर्यचकित झाले आणि अर्जुनाला म्हणाले, "काय अविचारीपणा तुझा हा पार्था! तुला म्हणावे तरी काय आता? मी तरी असा अविचार कुठे पाहिलेलाच नाही. कसा रे तू? तुला काय वस्तू मिळाली याची कल्पना तरी आहे काय? लाभाचा संतोष राहिला बाजूलाच आणि भय मानून घेतोस आणि हे विश्वरूप मला नको असे म्हणतोस? किती एककल्ली आहेस तू!

आम्ही जेव्हा वेगळेच प्रसन्न होतो तेव्हा भक्ताला आमच्या शरिरापर्यंत सगळे देतो पण अरे जीवसुद्धा वेचावा ही काय सामान्य गोष्ट आहे का? तुझ्या हट्टासाठी माझ्या जीवाचे सामर्थ्य एकवटून तुझ्यासाठी ह्या ध्यानाची रचना केली. कशी काय, कोण जाणे माझी तुझ्यावर एवढी माया जडली की, आमची प्रसन्नता वेडीपिशी झाली आणि तिने तुझ्यासाठी गौप्याची ही गुढी जगात उभी केली. अजून भक्तांसाठी मी माझा जीव गहाण ठेवला नव्हता तोही मी तुझ्यासाठी गहाण ठेवला. तू हे जे रूप पहातोस हे मायेच्या पलिकडचे आहे. अमर्याद वस्तूपेक्षा अमर्याद आहे. माझे कृष्णादिक अवतार ह्या मूळ रूपातूनच प्रगट होत असतात. हे स्वरूप केवळ ज्ञानतेजाने बनलेले आहे. विश्वात्मक आहे, अनंत आहे. सगळ्यांचे आदिकारण आहे. साधने करून त्या रूपाचे दर्शन होणे अशक्य असल्याने अर्जुना, आजपर्यंत त्याची वार्ता कुणाच्या कानी नाही, त्याचे दर्शन कुणाच्या डोळ्यांना नाही.

अरे, वेद ह्या रूपाच्या मार्गाला लागले आणि मुके झाले. यज्ञ स्वर्गापर्यंत जाऊन माघारी आले. योगाभ्यासाचे कष्ट पाहून साधकांनी योगाभ्यास सोडला आणि अध्ययन सुरू केले. तरी त्यांना ह्या विश्वरूपाची भेट होईना. उत्तमप्रकारे आचरलेली सत्कर्मे धावतच निघाली पण बहुतेकांनी सत्यलोकापर्यंतचाच पल्ला गाठला. विश्वरूपाचे ऐश्वर्य पाहून तपानी उग्रपणाच सोडून दिला. ते रूप कुठल्या कुठेच अमर्याद अंतरावर राहिले. अरे, तुला अनायासे बसल्या ठिकाणी ह्या विश्वरूपाचे दर्शन घडले ते तर मनुष्य लोकात कुणालाच घडलेले नाही. हे परमभाग्य त्या ब्रह्मदेवालाही मिळालेले नाही. जी ध्यानसंपत्ती तुला लाभली आहे ती आजवर केवळ तुला एकट्यालाच लाभली आहे.

ह्या लाभाने तू स्वतःला धन्य मानून घे. त्या विश्वरूपाचे भय मुळीच वाटून घेऊ नको आणि यापेक्षा अधिक काही चांगले असू शकेल हे कधीही मनात आणू नको.

बाबारे, अमृताने भरलेला समुद्र आपल्या स्वाधीन झाला तर त्यात मी बुडून मृत्यू पावेन ह्या भीतीने कोणी त्याचा त्याग करील का? नाहीतर सोन्याचा डोंगर मिळाला तर एवढा मोठा कोणी वाहून न्यावा. मला नको असे म्हणून कुणी टाकेल काय? चिंतामणि सुदैवाने अंगावर घालायला मिळाला तर ओझे होते म्हणून कुणी काढून टाकील काय? कामधेनु घरात आली तर "कुणी पोसावे तिला" म्हणून कुणी हाकलून देईल काय?

अनुक्रमणिका

अर्जुना, चंद्र घरी आल्यावर तू उबारा करतोस. माझ्या घराबाहेर हो असे कुणी म्हणेल काय? तू सावली पाडतोस, पलीकडे हो असे चंद्राला कुणी म्हणेल का? पण तू मात्र हे सगळे करतो आहेस.

एवढे महातेजाचे ऐश्वर्य तुझ्या हाती अनायासे सहज आले असता तुझ्या मनाची अशी गडबड उडावी काय? अरे, तू किती अडाणी! किती गावंढळ! तुझ्यावर रागावू तरी कसा! तुला तर काही कळतच नाही. काय म्हणावे तुला? अंग सोडून देऊन छायेला अलिंगन देतोस काय? माझे विश्वरूप हे खरे रूप आहे हे तुला कळत नाही काय? ह्या विश्वरूपाचा त्याग करून क्षुल्लक असे जे माझे चतुर्भुज रूप त्याच्याबद्दल प्रेम धरतोस, त्याच्या दर्शनासाठी अधीर होतोस, व्याकुळ होतोस तुला म्हणावे तरी काय रे!

अर्जुना, तुला किती समजावून सांगू, ह्या लहानशा सगुण रूपाबद्दल प्रेम धरू नकोस. अरे, असे कधीच करू नकोस. मनाला लावून ठेवलेली ही सवय सोडून दे. विश्वरूप भयंकर, अक्राळ विक्राळ आणि अवाढव्य असले तरी हेच उपासनेला योग्य असा कृतनिश्चयी हो.

एखादा कृपण आपला ठेवा पुरून ठेवतो, देहाने इकडे तिकडे वावरतो पण त्याचे मन त्या ठेव्यापाशीच पुरलेले असते.

पंखही फुटलेले नाहीत अशी अजाण पिले घरट्यात ठेवून पक्षिणी अंतराळात उडत असते. पण ते केवळ देहाने! तिचा जीव त्या घरट्यातच बांधलेला रहातो.

नाहीतर गाय डोंगरामध्ये चतूर असते पण तिचे चित्त आपल्या शेजारच्या खुंट्यास वासराने बांधून घातलेले असते.

ह्या सगळ्या उदाहरणाप्रमाणे अर्जुना, तू आपले प्रेम त्या विश्वरूपाशी जडवून घर करून ठेव आणि मग बाह्यात्कारी चतुर्भुज श्रीमूर्तीचे सुख खुशाल भोग पण मी तुला पुन्हा पुन्हा सांगतो अर्जुना, माझे बोलणे विसरू नको, तुझा सद्भाव ह्या विश्वरूपापासून क्षणमात्रही दूर जाऊ देऊ नकोस बरं! तू हे रूप कधी पाहिले नव्हतेस ना म्हणून तुला भय वाटले रे! हे भय दूर धाडून दे आणि ह्या विश्वरूपाच्या ठिकाणी तुझे प्रेम रोवून ठेव. ऐकलेस ना अर्जुना?

तुझ्या म्हणण्याप्रमाणे आता पूर्वीचे रूप धारण करतो. तुझ्या परिचयाच्या रूपदर्शनाचे सुख आनंदाने भोग. न्याहाळून पहा."

संजय म्हणाला, "देवांच्या तोंडून हे वाक्य बाहेर पडते न पडते तोच देवानी मनुष्यरूप धारण केले. देव मनुष्य झाले. यात काही नवल नाही पण त्यांच्या अर्जुनावरच्या प्रेमाचा मात्र नवलावच आहे.

श्रीकृष्ण हे साक्षात परब्रह्म! पण त्यांनी अर्जुनाने मागितल्याबरोबर विश्वरूप दर्शनाचा ठेवा त्याच्या हाती दिला, पण आश्चर्य हे की ते रूप अर्जुनाला आवडले नाही असे पाहिल्याबरोबर देवानी विश्वरूप टाकले आणि

कृष्णरूप धारण केले. काय अपार भक्तप्रेम आहे ह्या देवाचे! एखादी वस्तू घ्यावी आणि पसंत नाही म्हणून परत करावी, अस्सल रत्न हाती घ्यावे आणि त्यात दोष काढावा, मुलगी पहायला जावे आणि पसंत नाही म्हणावे तसेच अर्जुनाने केले. देवांनी त्याच्या हट्टाप्रमाणे रूपे पालटून प्रगट केली. विश्वरूपाच्या दर्शनाचा छंद अर्जुनाने घेतल्याबरोबर आपले सगुणरूप देवांनी विश्वरूपाएवढे करून दाखविले आणि नुसते रूपच दाखविले असे नाही तर वर शेलका उपदेश केला! प्रेमाची केव्हढी थोरवी ही! सोन्याची लगड मोडून दागिना करावा. हौसेप्रमाणे झाला नाही म्हणून मोडून पुन्हा लगड करावी त्याप्रमाणे शिष्याच्या प्रेमापोटी कृष्णत्व होते. त्याचे विश्वरूप केले आणि ते पार्थाला पसंत पडले नाही म्हणून विश्वरूपत्व टाकून पुन्हा कृष्णत्व अंगी आणले. इतक्यापरीने शिष्याचा जाच सहन करणारे गुरू इतर कोणत्या देशात आहेत कोण जाणे! पण इथे आमच्या समोर मात्र अपूर्व गुरुशिष्याची जोडी नांदते आहे. वाहवा! आमच्या डोळ्यांनी हे आम्ही पाहिले! काय योग आहे पहा" असे म्हणून संजय आनंदाने डोलू लागला.

संजय पुढे म्हणाला, "महाराज, पहा पहा हो विश्वरूप व्यापून जे दिव्य योगतेज प्रगटले होते ते सगळे कृष्णरूपामध्ये देवांनी सामावून घेतले. अल्पज्ञ, अल्प शक्तिमान परतंत्र जीवातील चैतन्यात सर्वज्ञ सर्वशक्तिमान स्वतंत्र ईश्वर तत्त्व जे ब्रह्म त्याचा समावेश होतो, वृक्षाकार लहानशा बीजात साठवला जातो किंवा स्वप्नातील प्रचंड विस्तार जागृतावस्थेच्या पोटात साठवला जातो त्याप्रमाणे श्रीकृष्णांनी आपला सगळा विस्तार चतुर्भुज मानवाकृतीत आवरून घेतला. राजा, सूर्याच्या तेजाने सूर्य बिंबात प्रवेश करावा किंवा ढगांची संपत्ती आकाशात विरून जावी किंवा समुद्राची भरती समुद्राच्या पोटात जिरावी त्याप्रमाणे विश्वरूप रूपी वस्त्राची घडी कृष्णाकृतीच्या रूपाने मिटलेली होती ती अर्जुनाच्या मागणीप्रमाणे उलगडून दाखवली. वस्त्राची लांबी, रुंदी, पोत गिऱ्हाईकाला आवडला नाही तर त्या वस्त्राची पुन्हा नेटकी घडी घालावी त्याप्रमाणे अर्जुनाला विश्वरूप आवडले नाही असे पाहून देवांनी ते कृष्णाकृतीत आवरून घेतले. विश्वरूप दर्शनाच्या वेळी ज्याच्या विस्ताराने सगळे जग व्यापून टाकले होते त्यानेच सौम्य गोजिरवाणे रूप घेतले. थोडक्यात सांगू का महाराज, त्या अनंताने धाकटेपणाचा स्वीकार केला.

दोन्ही हात अर्जुनाच्या खांद्यावर ठेवले आणि अत्यंत प्रेमळपणाने त्याच्याकडे पहात विचारले, "भ्यालास काय रे पार्था? नको भिऊ, बघ ना माझ्याकडे. आहे ना मी तुझा सखा पूर्वीसारखा? बघ तरी माझ्याकडे नीट. नाही आता माझी भीती वाटायची तुला."

गुरुकृपा झाली की, प्रपंचज्ञान ओसरून जाते आणि केवळ त्या परब्रह्म तत्त्वाचे स्फुरण काय ते शिल्लक रहाते. त्याप्रमाणे अर्जुनाने देवाकडे पाहिले. तो विश्वरूप नाहीसे होऊन चिरपरिचित श्रीकृष्णमूर्ती दिसली. ते भयदायक विश्वरूप कुठच्या कुठेच विरून गेलेले पाहिल्यावर अर्जुनाचे मन स्थिर, शांत झाले, जीवात जीव आला. एक मोठा सुस्कारा टाकून तो म्हणाला, "सुटलो देवा. विश्वरूपाचा आडपडदा तुझ्यामाझ्यामध्ये होता तो गेला आणि तू मला पुन्हा भेटलास. छान, छान झाले हो, श्रीकृष्णा!"

एखादा मनुष्य काळवाताला जिंकून यावा किंवा त्याने महावाताला मागे टाकावे किंवा सात समुद्र पोहून सुखरूप पलीकडच्या किनाऱ्यावर पोचावे अशा प्रकारचा संतोष पार्थाच्या चित्ताला झाला. विश्वरूपानंतर श्रीकृष्णाचे दर्शन झाल्यानंतर पार्थ फारच आनंदित झाला. सूर्यास्त झाल्यावर आकाशात तारा उगवलेल्या

दिसाव्या त्याप्रमाणे पृथ्वी तिच्यावरील लोकांसहित अर्जुनाला पुन्हा दिसू लागली. त्याने पाहिले कुरुक्षेत्र आहे तेथेच आहे. दोन भागात विभागून गोत्र उभे आहे आणि दोन्हीकडील वीर बाणांचे समुदाय एकमेकांवर सोडत आहेत. बाणांच्या वर्षावाखाली, जणू काही मांडवाखाली आपला रथ आहे तसाच उभा आहे आणि घोडे हाकण्याच्या जागी तो लक्ष्मीकांत बसलेला आहे. आपण खाली उभे आहो. पराक्रम हाच ज्याचा खेळ आहे असा अर्जुन म्हणाला, "जसे होते तसेच सगळे आहे. आता मात्र खास जगलो. नाहीतर काय अवस्था झाली होती! भयाने व्याकुळ झालेली बुद्धि ज्ञान सोडून रानोमाळ धावत होती. मन अहंकारासहित देशोधडीस लागले होते. इंद्रिये विषयाकडे धावेनात. वाचा प्राणास मुकली होती. शरिराच्या गावात ही अशी सगळी दुर्दशा झाली होती. आता मन, बुद्धि, अहंकार, इंद्रिये, सगळी आपआपल्या ठिकाणी येऊन ताजीतवानी झाली. श्रीकृष्णा, त्यांना पुनर्जन्मच मिळाला."

मनाला अत्यंत आनंद वाटून पुढे अर्जुन देवाना म्हणाला, "जी, आपले हे मनुष्यरूप पुन्हा दृष्टीस पडले आणि माझ्या जीवात जीव आला. देवराया, एखादे मूल चुकावे, त्याने आईसाठी आकांत करावा आणि आईने त्याला स्तनपान देऊन त्याची समजूत घालून त्याला शांत करावे तशी माझी समजूत आपण आपले हे पूर्वीचे रूप दाखवून घातली आहे. त्या विश्वरूपाच्या समुद्रात लाटावर लाटा येत होत्या. मी कसाबसा हात मारीत होतो. तो आपल्या कृष्णमूर्तीच्या दर्शनाने तीराला लागलो. आता निवांत झालो, निर्भय झालो. द्वारकेश्वरा, मी म्हणजे एक सुकलेले झाडच झालो होतो. विश्वरूपाच्या प्रखर तेजात होरपळत होतो. आपण भेट दिली नाही तर त्या सुकत चाललेल्या झाडावर मेघांचा वर्षाव केलात. मी तहानेने पीडित झालो होतो, मला अमृताचा सिंधूच भेटला. मी जगेन की नाही असेच वाटू लागले होते पण देवा, मला आता धीर आला. माझ्या हृदयाच्या रंगणात आनंदाच्या वेलीची लावणी होते आहे. सुखाची आणि माझी मिठी पडली आहे."

अर्जुनाचे हे बोलणे देवांच्या कानावर आले मात्र! त्याच्या त्या सुंदर मुखावरचे हास्य जरा विषादाच्या छायेने क्षणभर झाकले गेले. अंतःकरण जरा व्यथितच झाले देवांचे! आपण उपदेश काय केला आणि त्या प्राज्ञ शिष्याच्या मनात त्याचे रूप कितपत उतरले याचा त्यांना अंदाज आला आणि थोडी निराशा झाली.

ते म्हणाले, "पार्था, काय रे हे? मी तुला सांगितले काय आणि तू बोलतोस काय? अरे मनापासून ह्या विश्वरूपावर प्रेम ठेव आणि मग सगुणमूर्तीला नुसत्या देहसामुग्रीने भेट अशी मी तुला शिकवण दिली ती क्षणात विसरलास काय? अविचारी अर्जुना, एवढा मोठा सोन्याचा पर्वत तुझ्या हाती दिला पण त्याचे तुला काहीच महत्त्व वाटत नाही काय? वस्तू हस्तगत झाली की लगेच तिचे महत्त्व नगण्य वाटावे हा मनाचा भावच चुकीचा आहे. पार्था, तुला कशाची प्राप्ती झाली हे तरी तुला कळले आहे का? जे विश्वात्मक रुपेडे आम्ही तुझ्याकडे मांडले ते शंभुमहादेवांनी तप केले तरीही त्याला प्राप्त झालेले नाही. अष्टांग योगाचे अपार कष्ट करताना हे योगी अहोरात्र शिणत असतात. पण त्यांना ह्या रूपाची भेट होत नाही. हे विश्वरूप आम्हाला दिसेल काय ह्या ध्यासाचा काळ निघून जातो. चातक पक्षी जसे आकाशाकडे टक लावून मेघाची वाट पहातात तसे देव आणि मानव आठही प्रहर ह्या विश्वरूपाच्या भेटीसाठी तळमळत असतात. हृदयाच्या निढळावर आशेची अंजुळी जोडून, उत्कंठानिर्भर होऊन हे सुरनर वाटेल ते कष्ट करण्यास तयार असतात. पण विश्वरूपाचे दर्शन ह्यापैकी कुणालाही स्वप्नातसुद्धा होत नाही.

असे हे दुर्लभ दर्शन तुला सुखाने विनासायास घडले आहे. बरोबरच आहे, तुला कशी त्याची किंमत कळेल? तपस्या केलीस? की योगाचे कष्ट सहन केलेस? अनायासे अमोल वस्तू प्राप्त झाली की असे घडायचेच. सामान्यांच्या बाबतीत तर हा नियमच! पण मी आशा धरली होती की तू ह्या नियमास अपवाद ठरशील, आपल्याला काय अपूर्व लाभ झाला हे तुला कळेल. पण बाबा, तू माझी निराशा केलीस रे.

सुभटा, ध्यानात घे की, ह्या विश्वरूपापर्यंत पोचण्यास मार्ग सापडतच नाही. सहा शास्त्रे आणि वेद मार्ग न सापडल्याने निराश होऊन मागे फिरतात. तपाच्या निरनिराळ्या प्रकारांना तर माझ्या ह्या विश्वरूपापर्यंत येऊन पोचण्याचे सामर्थ्यच नाही. तू ज्या विस्तारासहित ते रूप पाहिलेस तो विस्तार निरनिराळी दाने देऊन वा यज्ञ करूनही दिसत नाही.

अर्जुना, तुझ्या मुद्रेवरील भाव मला कळले. दान, यज्ञ, तप, शास्त्रे, वेद यांना सर्वांना जे अगम्य ते विश्वरूपदर्शन तुला कोणत्या अधिकाराच्या बळावर झाले असे तुला वाटते ना? सांगतो त्याचे उत्तर.

या सर्व साधनांच्यापेक्षा

**"भक्ति"**

हे साधन माझ्या ह्या विश्वरूपापर्यंत आणून पोचवते. भक्ति येऊन तिने जर चित्ताला वरले तर मी हातात सापडलोच असे समज आणि म्हणून अर्जुना, तुझ्या भक्तिबळामुळे मी तुला ह्या देवदुर्लभ विश्वरूपात भेटलो.

पण ती भक्ति कशी असावी सांगू का? अरे, ती अनन्य असली पाहिजे. पावसाच्या धारा जशा एकदा आकाशातून सुटल्या की थेट पृथ्वीला येऊन भेटतात, पृथ्वीशिवाय त्या धारांना अन्य गतीच नसते तशी भक्ति असावी.

आपले सगळे पाणी घेऊन गंगा अनन्यपणे समुद्राचा शोध घेत समुद्रापर्यंत पोचते आणि तिथे पोचली की तिच्या पाण्याचे लोटच्या लोट त्या समुद्रात प्रवेश करीत रहातात. त्याप्रमाणे त्या भक्ताचे प्रेम सर्व भावांच्या समुदायासह माझ्यामध्ये प्रवेश करते आणि मीच होऊन रहाते. क्षीराब्धीमध्येही क्षीर, तीरालाही क्षीरच, असा समभाव जसा असतो तसा त्या भक्ताला माझ्यापासून मुंगीपर्यंत सर्व चराचरांमध्ये माझ्याशिवाय दुसरे कोणी आहे असे वाटतच नाही.

अर्जुना, ह्या एवढ्या प्रचंड अठरा अक्षौहिणीवीर समुदायात हे युद्ध केले, ज्येष्ठांचा वध केला तर पाप लागेल काय अशी शंका तरी कुणाच्या मनी, मुखी आली काय? तू माझा भक्त! तुला हा विवेक लगेच सुचला ना? आणि हे घडते कारण भक्ता, चराचरामध्ये मी आहे याची अंधुक का होईना जाणीव असतेच. तू माझा प्रियतम भक्त म्हणून हे विश्वरूप तुला प्रत्यक्ष दाखवून माझे सर्वव्यापकत्व तुला पटवून दिले ऐवढेच.

अनुक्रमणिका

पार्था, सगळे चराचरच माझ्या भक्तांचे उपासनेचे स्थान असते, हे सर्व विश्व भजनास योग्य असे तो समजतो.

इंधनामध्ये अग्नि असतोच, तो पेटला, प्रकट झाला की थोड्याच वेळात इंधन नाहीसे होते आणि केवळ अग्नि हे स्वरूप उरते. जोपर्यंत सूर्योदय झाला नाही तोवर आकाशभर अंधार असतो पण एकदा का सूर्योदय झाला की सगळीकडे प्रकाशच प्रकाश होतो त्याप्रमाणेच माझ्या भक्ताला माझा साक्षात्कार झाला की त्याचे मीपण वेगळे उरत नाही. अहंकार म्हणजे "मी आहे"! हे "मी आहेपण" गेले की द्वैत संपते. मी आणि भक्त असा भेद उरत नाही. केवळ मी शिल्लक रहातो. तो भक्त ऐक्य भावाने माझ्याशी एकरूप होतो. तुला वाटेल की असा ऐक्य भाव झाला की, त्याचा वैश्विक व्यवहार संपतो की काय? पण तसे होत नाही. त्याच्या वाट्यास आलेल्या कर्मांचा तो त्याग करत नाही. बाह्यतः त्याचा आयुष्यक्रम बदलत नाही. तो नित्याप्रमाणे कर्म करीतच असतो पण आता त्याची सर्व कर्मे तो माझ्यासाठी करतो. जगात माझ्याशिवाय दुसरे काही सुंदर नाही असा त्याचा निश्चय झालेला असतो. त्याला इहपर लोक केवळ मीच होऊन राहिलेला असतो. जगण्याचे प्रयोजन म्हणजे माझी प्राप्ती असे तो समजतो. प्राणिमात्राकडे पहाताना, त्याच्या दृष्टिला प्राणी न दिसता मीच दिसतो. अशी त्याची दृष्टि देवमयच होऊन जाते. ह्या सगळ्या विश्वात तो केवळ माझेच रूप पहातो. माझ्या अशा विश्वरूपाची भक्ति करतो. त्याला खरेखुरे विश्वरूप दर्शन असे होते रे. त्याचे स्थूल शरीर असो वा जावो तो माझा भक्त माझ्या विश्वरूपाशी एकरूप होऊन रहातो.

अर्जुना, विश्वरूप दर्शनाचा खरा अर्थ आता तुला कळला का रे? तुला दिव्यदृष्टि देऊन जे विश्वरूप दर्शन घडविले ते या हेतूने की तू ह्या माझ्या विश्वात्मक रूपाची अनन्य भक्ति करणारा निवैर भक्त व्हावास. तू माझा भक्त म्हणूनच मी हे रूप तुला दाखवले खरे पण माझी इच्छा अशी की तुझ्या भक्तिचे तेज अप्रतिम झळाळून उठावे त्यात रेसभरही उणीव राहू नये. तुझ्या भक्तिला ज्ञानाची जोड मिळावी. माझे ते मुद्दल रूप पाहिले नाही तर तू माझी भक्ति कशी करणार? म्हणून तुला हा ठेवा दिला.

"अर्जुना, आता ह्या प्रकाशमयतेतून तू पुन्हा त्या अंधारात मात्र कधीही प्रवेश करू नकोस."

"सर्व जग ज्याच्या उदरात साठवले आहे आणि म्हणून दोंदिल असलेल्या त्या श्रीकृष्णांनी करुणरसपूर्ण वाणीने अर्जुनाला बोध केला." असे संजयाने राजा धृतराष्ट्राला सांगितले.

हा उपदेश ऐकून तो पांडुकुमार अर्जुन आनंदाच्या संपत्तीने संपन्न झाला. श्रीकृष्णाच्या चरण सेवेमध्ये निष्णात असलेला अर्जुन जगातला खराखुरा एकमेव भक्त होता. देवांच्या दोन्ही मूर्ती त्याने लक्षपूर्वक न्याहाळून पाहिल्या विश्वरूपापेक्षा कृष्णाकृतीमध्ये त्याला जास्त लाभ आहे असे वाटले. पण या त्याच्या विचारांना देवांनी मान दिला नाही. व्यापकाहून एकदेशीरूप चांगले हे अर्जुनाचे म्हणणे देवांनी चुकीचे ठरविले आणि विश्वरूपाचा खराखुरा अर्थही अर्जुनाला समाजवून सांगितला.

जगातील अणुरेणूमध्ये भगवंताला पाहणाऱ्या अनन्य भक्तालाच फक्त विश्वरूप कसे दिसते आणि ते पाहिल्याने व्यवहारात असा भक्त कसा वागतो हेही देवांनी समजावून सांगितले पण तरीही अर्जुनाला काही

अनुक्रमणिका

शंका राहिल्याच! देवांनी उपपत्ती सांगितली पण दोन्ही रूपामध्ये चांगले रूप कोणते याबद्दल अर्जुन अजूनही साशंक होता. तो मनाशी म्हणाला, “पुन्हा एकदा शंका देवांना विचारतोच. दोन्ही रूपातले व्यापक रूपच ध्यानास योग्य कसे हे काही निटसे ध्यानात आले नाही.”

यापुढे आता अर्जुन मनाशी चांगला विचार करून पुन्हा देवांना प्रश्न करील ही कथा आहे. तो मोठ्या खुषीने आणि आदराने प्रश्न विचारणार आहे.

निवृत्तीनाथांच्या पायांच्या कृपेने मी, ज्ञानदेव सोप्या अशा ओवीछंदामध्ये ती कथा मजेने सांगणार आहे. श्रोते हो, आपण ती ऐकावी.

मी शुद्ध भावनारूप ओंजळीत ही ओव्यांची मोकळी फुले घेतली आहेत आणि त्या विश्वरूपाच्या चरणयुगुलावर मोठ्या आनंदाने अर्पण करतो आहे. विश्वात्मक भगवंताने त्याचा स्वीकार करावा.

***

अनुक्रमणिका

॥ श्री ॥

## अध्याय बारावा

# भक्तियोग

॥ ॐ नमो भगवते वासुदेवाय ॥

अर्जुन उवाच—

एवं सततयुक्ता ये भक्तास्त्वां पर्युपासते ।
ये चाप्यक्षरमव्यक्तं तेषां के योगवित्तमाः ॥ १ ॥

श्रीभगवानुवाच—

मय्यावेश्य मनो ये मां नित्ययुक्ता उपासते ।
श्रद्धया परयोपेतास्ते मे युक्ततमा मताः ॥ २ ॥

ये त्वक्षरमनिर्देश्यमव्यक्तं पर्युपासते ।
सर्वत्रगमचिंत्यं च कूटस्थमचलं ध्रुवं ॥ ३ ॥

संनियम्येंद्रियग्रामं सर्वत्र समबुद्धयः ।
ते प्राप्नुवन्ति मामेव सर्वभूतहिते रताः ॥ ४ ॥

क्लेशोऽधिकतरस्तेषामव्यक्तासक्तचेतसाम् ।
अव्यक्ता हि गतिर्दुःखं देहवद्भिरवाप्यते ॥ ५ ॥

ये तु सर्वाणि कर्माणि मयि संन्यस्य मत्पराः ।
अनन्येनैव योगेन मां ध्यायन्त उपासते ॥ ६ ॥

तेषामहं समुद्धर्ता मृत्युसंसारसागरात् ।
भवामि नचिरात्पार्थ मय्यावेशितचेतसाम् ॥ ७ ॥

मय्येव मन आधत्स्व मयि बुद्धिं निवेशय ।
निवसिष्यसि मय्येव अत ऊर्ध्वं न संशयः ॥ ८ ॥

अनुक्रमणिका

अथ चित्तं समाधातुं न शक्नोषि मयि स्थिरम् ।
अभ्यासयोगेन ततो मामिच्छाप्तुं धनंजय ॥ ९ ॥

अभ्यासेऽप्यसमर्थोऽसि मत्कर्मपरमो भव ।
मदर्थमपि कर्माणि कुर्वन् सिद्धिमवाप्स्यसि ॥ १० ॥

अथैतदप्यशक्तोऽसि कर्तुं मद्योगमाश्रितः ।
सर्वकर्मफलत्यागं ततः कुरु यतात्मवान् ॥ ११ ॥

श्रेयो हि ज्ञानमभ्यासाज्ज्ञानाद्ध्यानं विशिष्यते ।
ध्यानात्कर्मफलत्यागस्त्यागाच्छन्तिरनंतरम् ॥ १२ ॥

अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एव च ।
निर्ममो निरहंकारः समदुःखसुखः क्षमी ॥ १३ ॥

संतुष्टः सततं योगी यतात्मा दृढनिश्चयः ।
मय्यर्पितमनोबुद्धिर्यो मद्भक्तः स मे प्रियः ॥ १४ ॥

यस्मान्नोद्विजते लोको लोकान्नोद्विजते च यः ।
हर्षामर्षभयोद्वेगैर्मुक्तो यः स च मे प्रियः ॥ १५ ॥

अनपेक्षः शुचिर्दक्ष उदासीनो गतव्यथः ।
सर्वारंभपरित्यागी यो मद्भक्तः स मे प्रियः ॥ १६ ॥

यो न हृष्यति न द्वेष्टि न शोचति न कांङःक्षति ।
शुभाशुभपरित्यागी भक्तिमान्यः स मे प्रियः ॥ १७ ॥

समः शत्रौ च मित्रे च तथा मानापमानयोः ।
शीतोष्णसुखदुःखेषु समः सङ्गविवर्जितः ॥ १८ ॥

तुल्यनिंदास्तुतिर्मौनी संतुष्टो येन केनचित् ।
अनिकेतः स्थिरमतिर्भक्तिमान्मे प्रियो नरः ॥ १९ ॥

ये तु धर्म्यामृतमिदं यथोक्तं पर्युपासते ।
श्रद्दधाना मत्परमा भक्तास्तेऽतीव मे प्रियाः ॥ २० ॥

अनुक्रमणिका

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे “भक्तियोगो नाम” द्वादशोऽध्यायः ॥ १२ ॥

श्रीकृष्णार्पणमस्तु ।

----------

**अनुक्रमणिका**

आता भक्तियोग या बाराव्या अध्यायास सुरवात होते आहे,

पुष्कळदा मनात यावयाचे की, नववा अध्याय राजविद्याराजगुह्ययोग या नावाने प्रसिध्द असला तरी त्याला अनन्यभक्तियोग असेही नाव आहे. शिवाय भक्तिचे माहात्म्य सांगूनच देवांनी या अध्यायाचा शेवटही केला आहे. दहावा विभूतियोग, अकरावा विश्वरूपदर्शनयोग, तर बारावा पुन्हा भक्तियोग का?

या क्रमाचे माहात्म्य विश्वरूपदर्शनयोगाचा अध्याय निरखून पाहिल्यावर लक्षात येते.

अर्जुनाला विश्वरूपदर्शनाचा लाभ करून दिल्यावर भगवंतानी त्याला असे म्हटले की, ह्या माझ्या स्वरूपाच्या दर्शनाची प्राप्ति वेद, शास्त्र, दानी, तपी, अष्टांग योगी ह्या कुणालाही झालेली नाही, होणारही नाही. फक्त भक्ती चित्ताला वरते तेव्हाच अशा भक्ताला हे दर्शन घडते.

आता विचार असा येतो की, परमभाग्याने पार्थाला देवाचे सख्यत्व मिळाले आणि ते अपूर्व दर्शन झाले. आपण सामान्य माणसे आपल्याला देव कसा भेटेल? देव आपल्याशी कसा बोलेल? त्याचा स्पर्श आपल्याला कधी होईल? आपण तर दानी, ज्ञानी, तपी, योगाभ्यासी काहीच नाही. संसारात गुंतलेली, आर्त, पण प्रपंच त्यागाचे सामर्थ्य अंगी नसलेली माणसे, अजून पाश मागे ओढत आहेत, नाना प्रकारचे विकार मनात थैमान घालत आहेत, प्रपंचातून अनेक संघर्ष, अनेक आव्हाने येत आहेत, अशा आमच्यासारख्या अनधिकाऱ्यांना देवाचे सगुण रुपही दिसणे अशक्यप्राय मग विश्वरुपाची गोष्टच बोलायला नको. मनात असे निराशेचे विचार येतात पण आपल्याला प्रकाश दाखवतो आहे हा बारावा अध्याय! सामान्यातला सामान्य प्रापंचिकही करू शकेल अशी अनेक साधने देवानी या अध्यायात दिली आहेत. आपल्याला जमेल ते घ्यावयाचे. पुन्हा देवाचे आश्वासन धीर द्यायला आहेच. देव म्हणत आहेत, "अरे मी दोनावर दोन भुजा तुला भेटण्यासाठीच धारण केल्या आहेत. तू कधी भेटशील म्हणून निढळावर हात ठेवून मी तुझी वाट पहातो आहे. सख्या रे, तू कोणत्याही मार्गाने ये, मी तुझ्यासाठी उभा आहे, अष्टौप्रहर उभा आहे. तुझ्यासारख्या प्रेमळांची माझ्या घरी वाण आहे. तेव्हा आता विचार करत वेळ घालवू नकोस. पाऊल उचल. तुला आवडेल तो रस्ता घे आणि माझ्याकडे ये, मला भेट. तू चार पावले पुढे आलास की मी दहा पावले धावत येतो. खरं सांगू का रे, मी तुझ्या मागेपुढे, आतबाहेर आहेच पण तू फक्त माझ्याकडे बघ म्हणजे झाले."

देवांनी आणखी कृपाळूपण ते काय करावे? बाराव्या अध्यायात भक्तांसाठी अनेक साधने सांगून भगवंत थांबले नाहीत, त्यांनी भक्तांचे संपूर्ण जीवन अंतर्बाह्य कसे असावे याचा नकाशाच काढून दिला आहे. भक्तिच्या आंतरिक विश्वाबरोबर बाह्य जीवनात साधकाच्या बाबतीत कसे बदल होतात तेही सांगून ठेवले आहेत. भक्तिचे ऐश्वर्य आपल्या डोळ्यापुढे साक्षात उभे केले आहे.

अकराव्या अध्यायात देवानी अर्जुनाचे प्रपंचभान नाहीसे करून विश्वरूप दाखविले. तर बाराव्या अध्यायात साधकाने प्रपंचभान ठेवून इंद्रियद्वारा येणारा प्रत्येक अनुभवच भगवंतमय कसा करावा हे सांगून वेगळ्या प्रकारचे विश्वरूपदर्शनच घडविले आहे.

अनुक्रमणिका

अर्जुनाला दिलेली दिव्य दृष्टि शेवटी त्याला नकोशी झाली. देवाचे ते उग्ररूप त्याला पहावेना देखील या बाराव्या अध्यायात परम दयाळू भगवंत चर्मचक्षूमध्ये अशी किमया करीत आहेत की भक्ताला जगातल्या सर्व पदार्थात देवच दिसतो आणि हे दर्शन नित्य सुखमयच असते.

देवच ऐकू येतो,
देवाचीच चव लागते,
देवाचाच गंध येतो,
देवच दिसतो,
देवाचाच स्पर्श होतो.

सगळे जीवन भगवंतमय होते, अमृतमय होते.

असेच विचार मुंबईस ऑपरेशन झाल्यावर येत होते. त्या विचारमंथनातच एक दिवस ओळी आल्या होत्या.

**कृपा करावी हे प्रभुराया ।**
**अशीच देई काया ॥**

त्यावेळी आलेला हा विचार पुढे जीवनात कायमचा उतरला असे म्हणणे नाही पण बीज पडले इतकेच.

मग मनात येते पावलापावलाला, श्वासोच्छ्वासाला त्या भगवंताची स्मृति राहिली की, वेगळे विश्वरूपदर्शन ते काय आहे? भले संसार करीत रहावे, काय बाधक होणार आहे तो. ज्याचे सर्व जीवनच प्रभूमय झाले त्याला कशाची भीति आहे?

आणि म्हणून या बाराव्या अध्यायाचे अनन्यसाधारण माहात्म्य!

या अध्यायामध्ये योगमार्ग अत्यंत कष्टाचा असल्याने तो आचरणे किती कठीण आहे व भक्तिमार्गात कष्ट नसून सर्व प्रवास सुखाचाच आहे याचे वर्णन आहे. पण ह्या अध्यायाची सुरुवात मात्र योगसुखाच्या सर्व सोहळ्यांच्या वर्णनाने केली आहे. गीतेतील चवथ्या श्लोकामध्ये योगमार्गाची कष्टप्रदता वर्णन केली आहे. त्याचा परिहार म्हणून माउलींनी आधीच त्यातील सुखाचे वर्णन करून घेतले आहे की काय असे वाटते.

स्वतः ज्ञानदेवांनी गीतेतील अध्यायाची जी संगती लावली आहे त्यानुसार ह्या अध्यायातील बाराव्या म्हणजे -

**श्रेयो हि ज्ञानमभ्यासाज्ज्ञानाद्ध्यानं विशिष्यते ।**

**ध्यानात्कर्मफलत्यागस्त्यागाच्छान्तिरनन्तरम् ॥ १२ ॥**

या श्लोकापर्यंत उपासनाकांड व

**अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करूण एव च ।**
**निर्ममो निरहंकारः समदुःखसुखः क्षमी ॥ १३ ॥**

या श्लोकापासून ते पंधराव्या अध्यायाच्या अखेरीपर्यंत ज्ञानकांड आले आहे.

उपासनाकांड व ज्ञानकांड यातील दुवा म्हणूनही या अध्यायास फार महत्त्व आहे. भक्तिमार्गी लोकांना तर गीतेचा व ज्ञानेश्वरीचा बारावा अध्याय अत्यंत जिव्हाळ्याचा वाटतो.

ज्ञानेश्वरीतील प्रत्येक ओवीच सिद्धमंत्र समजली जाते.

पण या अध्यायातील

**विषयव्याळे मिठी । दिधलिया नुठी ताटी ।**
**ते तुझिये गुरूकृपादृष्टि । निर्विष होय ॥**

ही ओवी सर्पाचे विष उतरविण्यासाठी उपयोगीही पडते असे म्हटले जाते.

प्रथम माउली गुरुकृपेचे माहात्म्य वर्णन करीत आहेत, ते म्हणतात, "गुरुकृपादृष्टि माते, तुझा जयजयकार असो. तू शुद्ध, उदार, करुणामय म्हणून प्रसिध्द आहेस. तू अखंड आनंदाची वृष्टि करणारी आहेस."

श्रीरमण महर्षींच्या निकटवर्ति शिष्याची गोष्ट आहे. त्या गृहस्थाची दूर बदली झाली. रमण महर्षींच्या नित्य दर्शनाची त्यांना संवय झाली होती. आता ही गुरुकृपादृष्टि आपल्याला अंतरणार असे मनात येऊन त्यांना फारच दुःख झाले. त्यांनी श्रीरमणांचे छायाचित्र घेतले व ते बरोबर न्यायचे ठरविले.

"हे मला बरोबर घेऊन जात आहेत" असे उद्गार महर्षींनी काढले. त्या गृहस्थांना हे ऐकून फारच आनंद झाला. त्यांनी ते छायाचित्र आपल्या खोलीत त्या नव्या गावी लावले, त्यांनी आपल्या अनुभव लिहून ठेवला आहे की, त्या छायाचित्राकडे पाहिले की, श्रीरमणांच्या डोळ्यांतून कृपेचा वर्षाव होत आहे व ते आपल्याला सर्व प्रसंगातून संभाळून नेत आहेत असे वाटे. छायाचित्रातल्या डोळ्यांचे जर हे सामर्थ्य तर प्रत्यक्ष गुरुकृपादृष्टिची शक्ति काय वर्णाची?

माउली म्हणतात, "विषयरूपी सर्पाने दंश केला की, जी मूर्च्छा येते ती दुसऱ्या कुठल्या उपायाने

उतरत नाही. फक्त गुरुकृपादृष्टिने उतरते, आणि त्या माणसाच्या अंगात भिनलेल्या विषाचा परिहार होतो. आई गुरूकृपे, प्रसादरसरूपी लाटांची भरती येऊन जर तू तापत्रयाने पीडित असलेल्या जीवाल भेटलीस तर त्याला ताप कसा पोळील? शोक कसा जाईल? तुझ्या त्या प्रसादरसात तापत्रय आणि शोक शमून जातील. तुझे कर्तृत्वच तसे आहे. हे स्नेहाळ माते, तू आपल्या भक्तांना योगसुखाचे सगळे सोहाळे दाखवतेस. "मी ब्रह्म आहे" ह्या जाणिवेने स्वरूपसिद्धी व्हावी ही त्यांची हौस तू पुरवतेस. त्यांना तो अनुभव आणून देतेस. योगाच्या ज्या ज्या भूमिकेवर ते आरूढ होतील त्या त्या भूमिकेवर तू त्यांना अहोरात्र संभाळीत असतेस. आधार चक्रावर असलेल्या कुंडलिनीच्या मांडीवर तू त्यांना कौतुकाने वाढवतेस. हृदयकाशाच्या पाळण्यात घालून झोप यावी म्हणून झोके देतेस. आत्मप्रकाशरूप ज्योतीनी त्या साधकबाळांना ओवाळतेस. मन आणि प्राण यांच्या नियमनाची खेळणी त्यांच्या हाती देतेस, आत्मसुखाची बाळलेणी त्यांच्या अंगावर घालतेस, त्यांना नटवतेस, सहस्र दलांतील अमृताचे स्तन्य त्यांना पाजतेस, अनाहताची अंगाई गीते गातेस आणि समाधि बोधाने त्यांची समजूत घालून स्वस्वरूपात निजवतेस.

आई, तू खरंच साधकांची माउली आहेस. सर्व विद्या तुझ्या चरणाजवळ जन्म घेतात. म्हणून माये मी, तुझा आश्रय कधीही सोडणार नाही. हे सद्‌गुरुची कृपादृष्टि, तू ज्याला आश्रय देतेस तो भाग्यवंत सगळ्या विद्यासृष्टीचा ब्रह्मदेवच होतो.

हे श्रीमंत अंबे, तू आपल्या अश्रितांचे सर्व मनोरथ पुरविणारी कल्पलताच आहेस. मला "आता ग्रंथाचे निरुपण कर" अशी आज्ञा दे माय.

माझ्याकडून नवरसांचे सागर भरून घे. उचित अशी भाषा मला सुचव म्हणजे ते निरूपण केवळ रत्नांची खाणच होईल. आई, त्या निरूपणात भावार्थाचे पर्वत असतील असे कर. ह्या देशी भाषेच्या भूमीत साहित्य सोन्याच्या खाणी उघडकीस आण. जिकडे तिकडे विवेकवेलींची दाट लावणी कर. सिद्धान्ताची दाट झाडे असलेले निरंतर बगीचे लाव आणि त्या झाडांना प्रश्नोत्तर चर्चेची सुंदर फळे येऊ देत. नास्तिकपणाच्या दऱ्या मोडून टाक. वितंडवादाच्या वाटा बुझवून टाक. कुतर्कांच्या दुष्ट सावजांचा नाश करून टाक. श्रीकृष्ण गुणवर्णन करण्यास मला सगळ्या प्रकारचे सामर्थ्य दे. श्रोत्यांना श्रवणाच्या राज्यावर बसव. ह्या मराठीच्या नगरीमध्ये ब्रह्मविद्येचा सुकाळ कर आणि ह्या जगामध्ये ब्रह्मसुखाचीच देवघेव होईल असे घडवून आण.

आई हे सगळे करण्याचे कष्ट मी तुला नाही पडू देणार ग. तुझ्या प्रेमाच्या पदराने मला पांघरूण घाल की, त्या सामर्थ्यांच्या जोरावर मी हे सगळे निर्माण करीन. उशीरदेखील लावणार नाही. फक्त तुझी कृपादृष्टि माझ्यावर असू दे.

एकदा गुरुदेव रानडे इंचगिरीहून भाऊसाहेबमहाराजांचा निरोप घेऊन निघाले. रामभाऊनी नमस्कार केला व गुरुवियोग असह्य होऊन कळवळून म्हटले, "आपली कृपादृष्टि असावी." त्यावर गंभीर होऊन महाराज म्हणाले. "कृपा करून दृष्टि ठेवा म्हणजे कृपादृष्टि आहेच."

माउलीनी आपल्या गुरुदेवांना तशीच विनंती केली. त्या विनवणीप्रमाणे गुरूंनी कृपादृष्टीने त्यांच्याकडे

पाहिले आणि म्हटले, “ज्ञानदेवा, गीतार्थ सांगायला सुरवात करा. इतकी विनवणी कशाला?

गुरुदेवांची ही आज्ञा ऐकून अत्यंत आनंदाने ज्ञानदेव म्हणाले, “जी, जी, आता हा महाप्रसादच झाला माझ्यावर. मी लगेच निरूपण सुरू करतो. अवधान द्यावे महाराज.”

सर्व वीरांचा सार्वभौम राजा, चंद्रवंशाचा विजयध्वज असा पांडुनृपाचा पुत्र अर्जुन देवांना म्हणाला, “ऐकावे महाराज, आपण मला विश्वरूप दाखविले. कधी न पाहिलेले ते रूप बघून मी फारच भिऊन गेलो. माझे चित्त थाऱ्यावर राहीना. आम्हाला तर आपल्या मनोहर चतुर्भुज रूपाची सवय त्यामुळे माझ्या जीवाला त्याचेच दर्शन प्रिय वाटत होते पण आपण तसे करू नको म्हटले. मला चतुर्भुज रूपाच्या छंदापासून परावृत्त केले. आता व्यक्त आणि अव्यक्त ही निश्चितपणे तुझीच दोन रूपे. भक्तिने व्यक्त रुपाची आणि योगाने अव्यक्त रूपाची प्राप्ती होते, या दोन्ही वाटा थेट तुझ्या उंबऱ्यापर्यंत नेऊन पोचविणाऱ्या आहेत, हेही मी जाणले. शंभर भाराच्या लगडीतून वालभर सोने काढले तर जो कस शंभर भाराचा तोच कस वालभर सोन्याचा, या न्यायाने तुझे व्यापक आणि एकदेशी ह्या दोन्ही रूपात कमी जास्त योग्यतेचा प्रश्नच येत नाही. दोन्ही सारख्याच तोडीची. अमृताच्या समुद्रात सामर्थ्याचे थोरपण तेच थोरपण त्या अमृतलहरीतून घेतलेल्या घोटभर अमृतात असणार. खरोखर सांगतो या साम्याची प्रतीति मला आली आहे. तरीसुध्दा मला एक प्रश्न आपल्याला विचारायचा आहे. देवा, तुम्ही विश्वरूप दाखवून मला बजावले की, “हे व्यापक रूप खरे आणि कृष्णमूर्ति ही त्या मूळ रूपाची छाया.” आपण मला हे जे सांगितले ते मनापासून होते की केवळ विनोदाने बोलला?

तेव्हा आता मला पुन्हा स्पष्ट समजावून सांगा. माझ्या डोळ्यापुढे दोन प्रकारचे भक्त आहेत. एक आहेत ज्ञानमार्गाने जाणारे योगी आणि दुसरे जे केवळ तुझ्यासाठी कर्म करतात, ज्यांनी आपले सगळे मनोधर्म भक्तिला विकून टाकले आहेत असे साधे भक्त! ज्ञानी भक्त योगमार्गाने जातात आणि प्रणवापलीकडे असलेल्या वाचेमध्ये न सापडणाऱ्या व कशासारखेही नसलेल्या अक्षर, अव्यक्त, अनिर्देश्य अशा परब्रह्माची “मी ब्रह्म आहे” ह्या भावाने उपासना करतात. भक्त आपले सगळे मनोधर्म तुला अर्पण करतात, देव आणि भक्त हे द्वैत ठेवत ठेवत तुला ते जिव्हारी बांधून ठेवतात आणि तुझी उपासना करतात. देवा, एक तुझ्याशी एकरूप होऊन जातात तर एक वेगळे राहून तुझे सुख भोगतात.

अनंता, देवाशी एकरूप करणाऱ्या, जोडून देणाऱ्या क्रियेला मी योग म्हणतो आहे. तेव्हा देवा, मला पुन्हा सांगा ह्या दोन्हीपैकी योग खराखुरा कुणी जाणला असे म्हणावयाचे? माझ्या शंकाना कंटाळू नका देवा. पण माझे मन त्या विशाल विश्वरूपाशी एकरूप होतच नाही हो. पुन्हा पुन्हा ते आपल्या पायाशी येऊन गुंतते आहे आणि मनात शंका येतात तेव्हा न रागवता हे सांगाल काय?

ते जगद्बंधु हसून म्हणाले, “अर्जुना, तू खरच फार हुशार आहेस, प्रश्न कसा विचारावा हे तुला फारच चांगले कळते. तुझ्या प्रश्नाचा रोख माझ्या ध्यानात आला बरं का. हा प्रश्न तू तुझ्यासमोर असणाऱ्या ज्ञानी आणि भक्त साधकांच्याकडे पाहून विचारलेला नाहीस. मी कोणता मार्ग स्वीकारू हा तुझा खरा प्रश्न आहे आणि तोही फार जिव्हाळ्याचा आहे. अर्जुना, आपली किती दिवसांची मैत्री आहे! मी तुला आतून-बाहेरून चांगल्याप्रकारे ओळखतो. तुझ्या मनाची चाललेली घालमेल मला स्पष्ट जाणवते आहे. तुझ्या प्रकृतीस जुळेल असे साधन मी

तुला सांगतो. एकच का? साधने अनेक आहेत. प्रथम तुझी शंका निवारण करतो आणि मग अनेक साधनमार्ग तुझ्यापुढे मांडून ठेवतो.

प्रथम हे नेहमी ध्यानात घ्यावयाचे की कोणत्याही मार्गाने गेले तरी मुक्कामाचे ठिकाण "मी" हे एकच आहे. वेगवेगळ्या मार्गाचे वाटसरू माझ्याशिवाय कुठे जाणार?

पण अर्जुना, ज्ञानमार्गाने जाणारे साधक, "मी ब्रह्म आहे" ह्या भावनेवर आरूढ होऊन ज्याला अवयव नाहीत व ज्याचा नाश होत नाही अशा ब्रह्माला धरावयाचा प्रयत्न करतात. ब्रह्माच्या ठिकाणी मन जाऊ शकत नाही, बुद्धिची दृष्टि पोचू शकत नाही आणि ते गुणरहित, आकाररहित, अव्यक्त, इंद्रियांना साध्य होत नाही. साधकाची उपासनेची साधने प्रथम इंद्रिये, मग मन, नंतर बुद्धि व शेवटी अहंकार पण ज्ञानमार्गात यातल्या एकाचाही उपयोग नाही. इंद्रिये म्हणणार या ब्रह्माला रंग, वास, चव, आकार, नाद जर काहीच नाही तर आम्ही त्याची वार्ता कशी जाणावी? मन फार तर विचार करील पण विचार शेवटी इंद्रियज्ञानावरच अवलंबून! इंद्रियाकडून काहीच बातमी कळत नाही तर मन कंटाळून बाजूला बसते. बुद्धि हे तर बोलून चालून निर्णय करणारे, निश्चय करणारे हत्यार. पण त्या बुद्धिने निर्णय कशाचा करावयाचा? इंद्रिये निमूट, मन गप्प, मग बुद्धि पण हात टेकते. राहिला अहंकार. त्याला देहातून, बुद्धितून येणारे संदेश कळतात व तो त्यांच्याशी एकरूप होऊ शकतो. पण इथे गाठ आहे शून्याशी! शून्याशी एकरूप व्हायचे म्हणजे या सर्वांनीच आपले अस्तित्व संपविणे आहे. त्यामुळे त्या अभ्यासास ती सर्वजण एकवटून विरोध करत राहतात. ध्यान करावे म्हटले तर ध्यान कशाचे करावे हा प्रश्न येतो. जे कुठेही सापडत नाही, ज्याला काहीच आकार नाही त्याचे ध्यान घडत नाही, जे सर्व ठिकाणी, सर्व काळी असते त्याचे ध्यान चिंतन करावे तर चिंतनच खजील होते, ते ब्रह्म आहे म्हणावे तर नाही आणि म्हणावे तर आहे! त्याच्या प्राप्तीचे उपाय निष्फळ होतात. जे चळत नाही, हालत नाही, संपत नाही, मळत नाही अशा त्या परब्रह्माला केवळ आपल्या अंगच्या बळावर फार कष्ट सोसून स्वाधीन करून घेतात. पण असे योगी फार थोडे!

पूज्य परमहंस रामकृष्णांना निर्गुण ध्यानाचा मार्ग शिकविण्याच्या हेतूने एक महात्मा पंचवटीस पोचला. त्याचे नाव परमहंस तोतापुरी. अर्थात् श्रीजगदंबेचीच ती योजना होती. स्वतः तोतापुरीचा दोन दिवस दक्षिणेश्वरी रहावे आणि पंजाबातील आपल्या मठाकडे जावे असा विचार होता. घाटावर रामकृष्ण ईश्वरचिंतनात तन्मय होऊन बसले होते. तोतापुरींची दृष्टि त्यांच्याकडे गेली व त्यांची योग्यता जाणून ते रामकृष्णांना म्हणाले, "तू वेदांत साधनेला उत्तम अधिकारी आहेस असे मला वाटते. तुझी वेदांत साधना करण्याची इच्छा आहे काय"? ठाकुर म्हणाले, "मी करीन की करणार नाही हे मला काहीएक समजत नाही. ते सारे माझ्या आईला माहित आहे. तिने सांगितले तर करीन." तोतापुरी म्हणाले, "तर मग जा. आपल्या आईला विचारून लवकर ये, कारण मला येथे फार दिवस राहण्यास सवड नाही.

श्री. रामकृष्ण यावर काही बोलले नाहीत. ते थेट जगदंबेच्या मंदिरात गेले. तेथे भावाविष्ट अवस्थेत जगदंबेने सांगितले, "जा वेदांत शीक. तुला शिकविण्यासाठीच त्या संन्याशाला आणले आहे."

मग ठाकुरांनी तोतापुरींच्याकडून विधिपूर्वक संन्यास घेतला व त्यांच्याजवळ निर्गुण ध्यानाचा अभ्यास

सुरू केला. पण ध्यानास बसले की ती जगन्मोहिनी समोर येऊन उभी रहायची. ठाकुर त्यांगटाना (तोतापुरी) म्हणाले, “आई समोर येऊन उभी रहाते निर्गुण ध्यान लागतच नाही.” तीन दिवस असा प्रकार चालल्यावर तोतापुरी रागावले. त्यांनी तिथे पडलेला काचेचा एक तुकडा घेतला आणि दोन्ही भुवयांच्यामध्ये टोचले व ठाकुरांना म्हणाले, “इथे ध्यान धर. पाहू कसे लागत नाही” आणि त्यानंतर क्षणार्धात ठाकुर समाधिमग्न झाले.

पण ही अवस्था फारच क्वचित् भक्तांची होते. ठाकुरांच्या बाबतीत सगुणभक्तिचा पूर्णतया साक्षात्कार झाल्यावर नंतर तोतापुरी दक्षिणेश्वरी पोचले व त्यांनी ठाकुरांना सगुणभक्तिच्या प्रांगणातून काढून निर्गुणाच्या अमर्याद आकाशात पाठवले.

म्हणूनच देव अर्जुनाला सांगत आहेत की ज्याला कशाचेही आलंबन नाही अशी ही निर्गुण भक्ति ज्ञानी पुरुष साधावी असे म्हणतात पण ती फारच थोड्यांना साध्य होते.

योग्यांची स्थिति आणखी कष्टमय असते. वैराग्याचा अग्नि प्रदीप्त करून विषयांची सैन्ये जाळून टाकावी लागतात. होरपळलेली इंद्रिये धैर्याने आवरून धरावी लागतात.

सुजाण अर्जुना, निग्रहाच्या पाशात घातलेली ही इंद्रिये अंतर्मुख करण्यासाठी बळजोरीने उलटी फिरवावयाची आणि हृदयाच्या बंदीखान्यात कोंडायची. मग ते योगी मूळबंधाचा किल्ला तयार करतात. आशेचे बंध तोडून टाकतात, भित्रेपणाचे कडे ढासळून देतात आणि झोपेचा अंधार नाहीसा करून टाकतात. वज्राग्निच्या ज्वाळांनी अपानधातुची होळी करतात आणि रोगरूपी मुंडक्यांनी प्राणायामरूपी तोफांची पूजा करतात. मग इतक्या कष्टमय प्रवासानंतर कुंडलिनीचा टेंभा पाजळून आधार चक्रावर उभा रहातो आणि ब्रह्मारंध्रापर्यंतच्या मार्गावर प्रकाश पडतो. वर जाताना खालचा मार्ग अडसर घालून बंद करणे जरूर आहे म्हणून नऊ द्वारांना संयमाचा अडसर घालून मगच ते योगी पुढच्या प्रवासास निघतात. आता त्यांचा सुषुम्ना नाडीत प्रवेश होतो. प्राणशक्तिरूपी चामुंडा देवीला संकल्परूपी मेंढे आणि मनरूपी महिषाचे मस्तक ते बळी देतात. इडापिंगला यांना एकत्र करून सुषुम्नेमध्ये घालून ते अनाहताचा गजर खुला करतात आणि सहस्रदलांतील चंद्रामृताचे तळे जिंकून घेतात. सुषुम्नानाडीच्या मधील कोरीव अशा विवररुपी दादरावरून ब्रह्मरंध्राचे शिखर प्राप्त करून घेतात. आज्ञाचक्रातून मकाररूपी जिन्याचा बिकट शेवट म्हणजे ॐकारातील शेवटची मात्रा ती ओलांडून मूर्ध्न्याकाशात प्रवेश करतात आणि त्याला बगलेत मारून ब्रह्माशी ऐक्य साधतात. आता मिळालेली ती सोहंसिद्धि टिकविण्यासाठी ते योगी योगाचे अमर्याद किल्ले काबीज करून ठेवतात.

सर्वस्वाच्या मोबदल्यात त्वरित शून्य घेणारे हे योगी शेवटी येऊन मिळतात मलाच! योगाच्या बळावर त्यांना आणखी काही मिळते असे नाही. कष्ट मात्र अतिशय पदरात पडतात. कारण या मार्गात विरोधही फार सहन करावा लागतो.

सगुणभक्तिस डावलून निरालंब अव्यक्त पण सर्व भूतांना हितप्रद अशा परब्रह्माच्या प्राप्तीची आसक्ति धरणाऱ्या योग्यांच्या मार्गात, मोह, विघ्ने निर्माण करतो. कधी इंद्रपद मिळवावे अशी इच्छा उत्पन्न करतो. कधी ऋद्धिसिद्धिपासून उत्पन्न होणारी सुखदुःखे मोक्षाच्या वाटेत आडवी येतात. काम आणि क्रोध हे त्या योग्यांनी

निग्रहाने दडपून टाकलेले असतात. ते कधीतरी एकदम खवळून उठतात आणि अभ्यासाचा घात करतात. निराकाराच्या ध्यानात अहोरात्र शरीर झुंजवावे लागते. हा योगाभ्यास करण्यासाठी एकांतात, वनात रहावे लागते. तहानेने तहान प्यावी, भुकेने भूक खाऊन टाकावी अशी अवस्था होते. वारा रात्रंदिवस मोजावा लागतो. वारा मोजणे म्हणजे काय सांगतो अर्जुना. मनात थोडी चलबिचल झाली की श्वासाची गती जोराने होत नाही ना याची अहोरात्र दक्षता घ्यावी लागते.

योग्यांना जाग्रण हेच निजणे, इंद्रियदमन हेच विषयसेवन असे जगावे लागते. वनाच्या एकांतात त्याला कोणीही मित्र नसतो. कुणाशी बोलावेसे वाटले तर झाडाझुडपांची मैत्री करावी लागते. नेसायला थंडी, पांघरायला ऊन आणि रहायला पावसाचे घर अशी त्यांची जगण्याची व्यवस्था असते. अर्जुना, अरे एखादी पतिव्रता सती जाते तेव्हा तिला अग्निमध्ये पतीचा देह तरी सोबत करतो. पण योग्यांचा हा अग्निप्रवेश भर्त्यावाचूनच सतीने अग्निप्रवेश करावा तसा असतो. योद्धा लढत असतो स्वामीकार्यासाठी नाही तर कुलाचारसाठी पण ह्या योग्यांची मृत्यूशी नित्य नवी लढाई चालू असते. त्या लढाईला निमित्त ना स्वामीकार्याचे ना कुलाचाराचे! योगाचे दुःख मृत्यूहून तीक्ष्ण आहे. कढत विषाचे घोट पिणे शक्य आहे का? डोंगर गिळायचा ठरवला तर मुख फाटल्याशिवाय राहील का? इतका हा योग कष्टमय आहे.

वीरा अर्जुना, हा योगमार्ग सोपा नव्हे, अत्यंत बिकट आहे. जे ह्या वाटेने निघतात त्यांनी अपार कष्ट सोसण्याची मनाची तयारी ठेवावी लागते. त्यांच्या वाट्याला ते दुःखभोग येतातच. दात नसलेल्या माणसाने लोखंडाचे चणे खाण्याचा प्रयत्न करावा आणि मग पोट भरणे बाजूसच राहून प्राण जाण्याची वेळ यावी तसे घडते. समुद्रात बाहुबलाने परतीर गाठणे किंवा आकाशात आपल्या पायांनी चालणे हे जसे अशक्य आहे तसेच देहधारी जीवास योगमार्गाने ब्रह्मप्राप्ती करून घेणे अतिशय कठीण आहे. युद्धाच्या गर्दीत शिरल्यावर अंगावर वार न पडता शौर्य गाजवून सूर्यमंडळाचा भेद करून कसे जाता येईल? तेव्हा घाव घेण्याची तयारी ठेवूनच युद्धात पडावे तसे हे अमर्याद कष्ट सहन करण्याची सिद्धता करूनच मग योगमार्गास लागावे. पांगळ्याने वायुबरोबर स्पर्धा करू नये आणि ज्याचा देहामध्ये जीव गुंतला असेल त्याने योगमार्गाकडे चुकूनही जाऊ नये. ह्या मार्गात पडले की आकाशाशी झोंबी करणाऱ्या योग्यांना अमर्याद व्यथा सोसाव्या लागतात हे ध्यानात असू द्यावे.

भक्तिमार्गास लागणाऱ्यांना हे कष्ट पडत नाहीत. किंबहुना माझे भक्त ते कष्ट आहेत असे मानत नाहीत, त्यांना ते कष्ट असे जाणवत नाहीत. योग्यांनी स्वतःच्या सामर्थ्यावरच वाटचाल सुरू केलेली असते पण भक्ताने सर्वच भार माझ्यावर सोपवलेला असतो त्यामुळे समजा कष्ट पडू लागले तर त्या भक्ताच्या कष्टाचा परिहार मला धावत येऊन करावा लागतो.

जगन्नाथपुरीच्या राजाचा नित्यनेम होता की श्रीजगन्नाथाचा प्रसाद आल्यावरच मग भोजन करावयाचे. देवभक्त राजा प्रसादास नेहमीच फार मान देत असे.

पण एकदा असे घडले की जगन्नाथाचा पुजारी प्रसादाचे ताट घेऊन आला. राजा सोंगट्या खेळण्यात गर्क होता. त्याने अनवधानाने प्रसादाच्या ताटास डाव्या हाताने स्पर्श करून त्याचा स्वीकार केला.

पुजाऱ्याला प्रसादाचा हा अपमान सहन झाला नाही. दुसरे दिवशी राजाला प्रसाद आलाच नाही. प्रसाद नाही म्हणून भोजन नाही. राजा पश्चातापाने जळू लागला. शेवटी त्याने निर्धार केला की "प्रसादाचा अपमान करणारा अवयव अनावश्यक आहे."

सोंगट्या खेळणारा उजवा हात तोडण्यासाठी राजाने एक युक्ति योजली. मंत्र्याला सांगितले की "खिडकीतून हात आत घालून एक प्राणहीन शरीर मला रोज रात्री भीती दाखवते आहे." मंत्री म्हणाला, "महाराजांनी निर्धास्त झोपावे. मी बंदोबस्त करतो."

मंत्र्याने राजाच्या शयनगृहाच्या खिडकीतून लोंबणारा हात एका घावात तोडला व तो स्वस्थ झोपला. दुसरे दिवशी पहातो तो त्याला कळून चुकले की आपण महाराजांचाच हात तोडला. त्याला अतिशय खेद झाला, पण राजा आनंदात होता. रोजच्याप्रमाणे पुजारी प्रसादाचे ताट घेऊन येताना पाहिल्याबरोबर राजा धावतच ताट घेण्यासाठी पुढे गेला आणि हात पुढे करतो तो दोन्ही हात आहेत.! जगन्नाथाने उजवा हात पूर्वीपेक्षाही सुंदर करून दिला होता.

तुटलेला हात जगन्नाथाच्या दृष्टांतानुसार पुजाऱ्याने देवाच्या शेतात पुरला आणि त्या शेतात येणाऱ्या भाताचा नैवेद्य जगन्नाथास दाखविला जाऊ लागला. असे भक्ताचे प्रभुप्रेम आणि प्रभूचे भक्तप्रेम!

देव पुढे म्हणाले, "अर्जुना, मी माझ्या भक्ताला पावलोपावली संभाळतो आणि म्हणून त्याला पदोपदी सुखाची प्राप्ती होते. योगी इंद्रियांचे दमन करता करता थकून जातात तर माझे भक्त इंद्रियासहित आपले चित्त माझ्यामध्ये घालून ठेवतात आणि माझी उपासना सुखमय असल्याने उपासना करताना रात्र आणि दिवस असं काही म्हणतच नाहीत. संध्याकाळच्या वेळी सूर्य अस्तगिरीच्या काठावर आला की त्याच्याबरोबर त्याची किरणेही तेथे येऊन त्याच्याबरोबरच बुडतात त्याप्रमाणे ह्या भक्तांचे मन इंद्रियासहित माझ्या मागे मागे येते. पावसाळ्यात नदीला जसा भरभरून वरचेवर पूर येतो तशी श्रध्दा नित्य नवी आणि वाढती असते. गंगानदी समुद्राला जाऊन मिळते आणि मागून अनिवार पूर येत राहातो आणि समुद्राला मिळतच रहातो त्याप्रमाणे ह्या भक्तांचा प्रेमभाव मला येऊन मिळतो आणि वाढतच रहातो.

अर्जुना, तुला खरे सांगू का, हे माझे लाडके भक्त खरेखुरे योगीच आहेत. फक्त ते योग्याप्रमाणे इंद्रियांचे दमन न करता त्यांना वेगळे वळण लावून देतात त्यामुळे ती इंद्रिये आनंदाने त्यांची ताबेदारी पत्करतात. वर्णाश्रम धर्माप्रमाणे जी जी कर्मे जन्मानुसार त्यांच्या वाट्याला येतात ती ती कर्मे त्या कर्मेन्द्रियांना ते सुखाने करू देतात. विधिनिषेध कोणता हे ते शास्त्रास विचारून घेतात. विधिपूर्वक आचरण करतात आणि निषेध गाळून टाकतात. मग ह्या कर्माचरणापासून निर्माण होणारे फळ ते पूर्णतया मला अर्पण करून टाकतात आणि त्यामुळे फळ निष्फळ होते! फळाचे भोग देण्याचे सामर्थ्य नाहीसेच होते. अर्जुना, कर्मफलत्याग केल्याने त्या दृष्टिने पाहिले तर कर्म करून अकर्ते झाल्याने तेच खरे सन्यासी होत.

कोणकोणत्या कर्माचे फळ मला अर्पण करावे, कोणकोणत्या कर्माचे फळ स्वतःसाठी राखून ठेवावे

ह्याचा ते विचारदेखील करीत नाहीत. त्यांचे कायिक, वाचिक, मानसिक हे सर्व भाग केवळ माझ्याकडे धावत येतात. अन्य जागा त्यांना माहितच नसते.

एकदा एका मुमुक्षूने गुरूंना प्रश्न केला "प्रभो, मी कोणती साधना करू?"

गुरूदेव म्हणाले, "तू खूप जोराने पळत जा. पळण्याच्या आधी मनाचा पूर्ण पक्का निश्चय कर की मी भगवंतासाठी पळतो आहे बस्स. तुला एवढी साधना पुरे."

शिष्याने विचारले, "महाराज, बसून करण्याजोगी काही साधना नाही का?" गुरू म्हणाले, "आहे ना. बसून रहा आणि मनाचा निश्चय कर की मी भगवंतासाठी बसलो आहे."

शिष्याने पुन्हा विचारले, "काही जप नको करू?"

गुरूंनी म्हटले, "अरे कुठल्याही नामाचा जप कर ना. फक्त मनात म्हण की मी जप देवासाठी करतो आहे."

शिष्य म्हणाला, "म्हणजे याचा अर्थ क्रियेला काहीच महत्त्व नाही. भाव हीच साधना आहे म्हणायची."

गुरूदेवांनी उत्तर दिले., "भैय्या, क्रियेलहि महत्त्व आहेच. क्रियेने भाव निर्माण होतो. भावातून क्रिया घडते यासाठी दृष्टि लक्ष्यावर हवी. मग तुम्ही जी क्रिया करता ती साधनाच होते. लक्ष्य व्यवस्थित राहिले की आपोआप साधना व्यवस्थित होते आणि भगवंतावर लक्ष्य राहिले की ती सर्वांना सर्वत्र सर्वदा मिळणे शक्य होते."

ह्या गोष्टीतील गुरूप्रमाणे भगवंत सांगत आहेत की, "ज्यांनी माझ्या ठिकाणी असा भाव स्थिर केला, माझी निरंतर उपासना केली, ते ध्यानाच्या मिषाने माझे रहाण्याचे ठिकाण होतात. ऐहिक भोग व पारत्रिक मोक्ष या बापुड्या दोन्ही कुळांचा त्याग करून त्या भक्तांनी फक्त माझ्याशीच प्रेमाची देवघेव केलेली असते आणि अनन्य भक्तिने त्यांनी जीव, शरीर, मन सगळे काही आनंदाने मला विकून टाकलेले असते. अशा भक्तांचे मी काय काय करतो म्हणून सांगू? अरे, सर्वच काही करतो आणि यात आश्चर्य ते काय? आईच्या पोटी आलेल्या बाळाचा आईला किती कळवळा आहे ही काय प्रश्न विचारण्यासारखी गोष्ट आहे का? अर्जुना, काय सांगू? आई त्या बाळाचा जसा प्रेमाने ते बाळ जसे असेल तसा स्वीकार करते तसा मी त्या भक्तांचा ते जसे असतील तसेच्या तसे स्वीकारतो, पदरात घेतो, कळिकाळाचासुद्धा त्यांच्यासाठी पराभव करतो.

प्रल्हादाचा किती प्रकारे छळ झाला तुला माहित आहे ना अर्जुना? त्याच्यावर शस्त्रप्रहार केले, त्याला समुद्रात बुडविले, विष पाजले, शेवटी अग्निमध्ये फेकले. हिरण्यकश्यपूने आश्चर्यचकित होऊन प्रल्हादाला विचारले, "तुला भय वाटत नाही का?"

अनुक्रमणिका

प्रल्हाद म्हणाला,

**"रामनाम जपतां कुतो भयं । सर्वतापशमनैक भेषजम् ।**
**पश्य तात मम गात्र संनिधौ । पावको ऽ पि सलिलायतेधुना ॥** (विष्णु पुराण)

बाबा, अहो रामनाम जपतो त्याला कसले भय आहे? सर्व ताप शमन करणारे ते औषध आहे. माझ्या गात्रांच्या जवळच्या अग्निचे आत्ताच पाणी पाणी होते आहे पहा."

अर्जुना, माझ्या निस्सीम भक्ताचे मी असे संरक्षण करतो.

एरवी तरी माझ्या भक्तांनी संसाराची चिंता का करावी सांग. समर्थाची स्त्री काय कोरान्न मागून आपला निर्वाह चालवते? हे भक्त माझी प्रिय पत्नी आहेत. त्यांचे कुठलेही काम करताना मला संकोच वाटत नाही.

अर्जुना, आधी मी त्यांच्या साधनेची नीट व्यवस्था लावतो. जन्ममृत्यूच्या लाटांमध्ये हे सगळे जग गटांगळ्या खात आहे हे पाहून माझ्या पोटात कळवळले. विचार आला की माझे भक्तही या भवसिंधूला भिऊन जातील, हा समुद्रच तसा प्रलयकारी आहे. मग सगुणमूर्तीचा मेळावा करून मी त्या भक्तांच्या गावाला आलो. धावतच आलो. सहस्त्रनामाच्या नावा सज्ज केल्या. ज्याला जी नाव आवडेल ती त्याने घ्यावी असे केले आणि ह्या घोर संसारातून माझ्या भक्तांना तारून नेणारा नावाडी झालो.

मी अंतर्बाह्य परिग्रहरहित झालेले सडे भक्त असतात त्यांना ध्यानरूपी कासेला लावतो. संसारी भक्तांना नामरूपी नावेत बसवितो. काहीच्या पोटाला सांगड बांधतो आणि त्यांना मोक्षाच्या किनाऱ्यावर आणतो. पण एकदा माझे भक्त झाले की मग मानवच काय पण पशुपक्ष्यांनाही वैकुंठीच्या राज्यावर बसवितो. पार्था, अरे माझ्या भक्तांना कसलीही चिंता नसावी. मी त्यांचा सदा उद्धारकर्ता आहे. ज्यावेळी त्यांनी आपली चित्तवृत्ति माझ्याकडे लावली, त्यावेळीच त्या भक्तांनी मला आपल्या छंदात घातले.

अर्जुना, तू तर भक्तश्रेष्ठच आहेस. तुझ्या प्रश्नाचे उत्तर असे की,

**"तू भक्तिमार्गाने जावेस पण ते विश्वरूपाचे स्मरण ठेवूनच"**

बुद्धिचा निश्चय कर आणि मन माझ्या ठिकाणी वतनदार कर. मन अखंड माझ्या स्वरूपात रमलेले असू दे. त्याला तिथून हलू देऊ नकोस. मन आणि बुद्धि यांनी माझ्या ठिकाणी प्रेमाने प्रवेश केला की तू माझ्याजवळ येऊन पोचशील. मन व बुद्धि यांनी माझ्या ठिकाणी घर केले की, मीतूपण उरेल काय?

अरे क्रम असा की, बुद्धि निश्चय करते की देवासारखे उचित प्राप्तव्य जगात काही नाही. मग मन, बुद्धिचा निश्चय मान्य करून, त्या निश्चयाचा हात धरून चालू लागते. पदराने दिवा घालवला की तेज जाते, सूर्य मावळला की प्रकाश संपतो, प्राण गेल्याबरोबर इंद्रिये त्याच्याबरोबर निघून जातात त्याप्रमाणे बुद्धि आणि मन

ईश्वर भेटीसाठी त्याच्या घराची वाट चालू लागल्याबरोबर अहंकारही त्याच्या मागोमाग जातो. म्हणून मी तुला सांगतो की, हे वाक्य अन्यथा होणार नाही. तुझे मन माझ्याजवळ असले की मग तू इतर काय क्रिया करतोस याचा विचार करण्याची जरूरी नाही.

सुशील नावाच्या ब्राह्मणास दोन मुलगे होते. वडील मुलाचे नाव होते सुवृत्त व धाकट्याचे होते वृत्त. दोघे गुणसंपन्न आणि विद्याविभूषित होते. जन्माष्टमीच्या दिवशी दोघे प्रयाग क्षेत्री पोचले. वेणी माधवाच्या देवळात मोठा उत्सव भजनकीर्तन चालू होते. दोघे चालत निघाले असताना जोराची वृष्टि सुरू झाली. दोघे रस्ता चुकले. सुवृत्त पोचला वेश्यागृहात आणि वृत्त पोचला माधवजीच्या मंदिरात. वेश्यागृहात पोचलेला सुवृत्त शरिराने गाणे बजावणे, नृत्य यांच्या मैफलीत होता तरी मनाने मंदिरातील पूजा, आरती, भजनकीर्तन यात दंग होता. वृत्त मंदिरात असला तरी मनाने त्या वेश्यागृहातील मैफलीत रंगलेला! सकाळी दोघे भेटले आणि रात्रीचा वृत्तांत एकमेकांस विचारणार तोच वरून वीज कोसळली आणि दोघे मृत्यूमुखी पडले. सुवृत्ताला विष्णुदूतांनी आणि वृत्ताला यमदूतांनी पकडले. सुवृत्त घाबरून म्हणाला, "अहो तुम्ही हे काय करता! आम्ही कालपर्यंत शुद्धाचरणी होतो. मी मात्र कालची रात्र वेश्यागृहात काढली आणि माझ्या ह्या धाकट्या भावाने माधवजीच्या मंदिरात काढली. त्याने पुण्याचरण केले आणि मी पापाचरण केले! यमदूतांनी न्यायचेच तर मला नेले पाहिजे. वृत्ताला का? तुमची काही तरी चूक होते आहे."

सगळे दूत हसून म्हणाले, "बाबा, आम्ही कधी चूक करीत नाही. तू शरिराने वेश्यागृहात असलास तरी मनाने मंदीरात होतास आणि वृत्त शरिराने मंदिरात असला तरी मनाने त्या वेश्यागृहात रमला होता. जिकडे मन तिकडे मनुष्य असतो. आम्ही मनाचा हिशोब करून पापाचरण व पुण्याचरण ठरवणार."

सुवृत्त म्हणाला, "मी भावाशिवाय वैकुंठास येणार नाही. जिकडे तो तिकडे मी,"

मग दूतांनी सुवृत्ताकडून वृत्तास आपल्या वाट्यातील पुण्यांश देऊ दिला व मग दोघांना वैकुंठास नेले.

म्हणून भगवंतानी भक्ताने आपले मन निरंतर भगवद्भजनात, ध्यानात घालून ठेवण्याचा अर्जुनाला उपदेश केला.

पण अर्जुनाच्या चेहऱ्यावर उल्हास दिसेना. त्याला अखंड चिंतनाचा मार्ग फार कठीण वाटू लागला. संसारातील लाखो समस्यांना तोंड देता देता देवाचे चिंतन अष्टौप्रहर कसे करावयाचे ते त्याला कळेना. मन इतके निश्चयाच्या स्वाधीन होईल याचा त्याला भरवसा वाटेना.

अर्जुनाच्या मनातील विचार देवांना तात्काळ कळत होते. ते म्हणाले, "अर्जुना, आपले चित्त वासनारहित करून माझ्या हाती देऊ शकत नसशील तर मग असे करावे की, ह्या आठ प्रहरांपैकी थोडेकेसे निमिष तुझे चित्त माझ्यासाठी देत जा. या थोड्याच वेळात त्या चित्ताला एक वेगळा आनंद प्राप्त होईल आणि तेवढ्या वेळेपुरता त्या मनाला विषयाचा विसर पडेल. त्याला त्या वेळेपुरती विषयाची अरूचि निर्माण झाली की, शरत्काल संपला की, नदीला हळूहळू ओहोटी लागते त्याप्रमाणे हळूहळू चित्त प्रपंचातून निघेल. पौर्णिमा झाली

की चंद्रबिंब कमी कमी होत अमावास्येला जसे पूर्णच नाहीसे होते त्याप्रमाणे चित्त भोगांतून निघता निघता आणि माझ्यामध्ये प्रवेश करता करता एक दिवस विषयाचा पूर्ण त्याग करून माझ्याशी एकरूप होईल. अर्जुना, हे एकदम घडणार नाही पण अभ्यासाने जमू लागेल. अभ्यासयोग ज्याला म्हणतात तो हाच. अभ्यासाने जमत नाही असे जगात काही नाही. अभ्यासाने एकजण अंतराळप्रवास करतात, तर एकजण व्याघ्र, सर्प यासारखे दुष्ट प्राणी स्वाधीन करून घेतात. अभ्यासाने विष आहारात जिरू शकते, समुद्रात वाट सापडते. वेदांचा अभ्यास करून काहींना ब्रह्मही आटोक्यात आणलेले असते. म्हणून म्हणतो आठ प्रहरांपैकी थोडावेळ माझ्यासाठी वेगळा काढ. त्यावेळी विषय सोडून देऊन केवळ माझेच चिंतन कर. असा अभ्यास दृढ झाला की, हळूहळू हे चिंतन तुझा इतर वेळ व्यापू लागेल. प्रपंचातही ह्या चिंतनाचे भान तुला राहील आणि मग तू विनाकष्ट मला येऊन मिळशील."

देवांना तरीही अर्जुनाच्या चेहऱ्यावर अस्वस्थता दिसत होती. आष्टौप्रहर तर नाहीच पण प्रत्येक दिवसाचा थोडावेळ अशाप्रकारे देवासाठी म्हणून काढून ठेवता येईल का? आणि त्या वेळात तरी मन विषय सोडण्यास तयार होईल का? असा प्रश्न त्याच्या मनात येत होता.

देव, म्हणाले, "अर्जुना, हाही उपाय तुला कठीण वाटतो का? शूर राज्यकर्त्याच्या जीवनात त्याला स्वतःच्या खास मालकीचा वेळ असणे कठीण आहे हे मी समजू शकतो. प्रजापालनात वा राज्यरक्षणात कसूर होताच कामा नये. उपासनेचा वेळही एखाद्या राजाने प्रजाकार्यास दिला तर मी त्याचे हे कृत्य आनंदाने मान्य करीन. तेव्हा, तुला दुसरा आणखी एक उपाय सांगतो.

अभ्यास करण्याचे सामर्थ्य तुझ्या अंगी नाही असे तुझे म्हणणे असले तर अभ्यास राहू दे. तू जसा आज वागत असशील तसाच वाग. इंद्रिये कोंडू नको, भोग तोडू नको, आपल्या जातीचा अभिमानही सोडू नको. कुलधर्माचे पालन कर, विधिनिषेधांचे पालन कर म्हणजे तुझा सुखाचा मार्ग मोकळा होईल.

फक्त एकच पथ्य संभाळ. मनाने, वाणीने, देहाने जे जे कर्म घडेल ते ते, "मी करतो" असे म्हणू नकोस. जो परमात्मा ह्या जगाचे पालनपोषण करतो, नियमन करतो, तो कोणती गोष्ट तू करावीस, कोणती न करावीस हे जाणतो. कर्मामध्ये काही अधिक उणे झाले तरी त्याचा खेद वा संतोष मानू नकोस. जीवनाचा ओघ जसा येईल तसा आत्मसात करून घे. माळी जिकडे नेईल तिकडे पाणी निमूटपणे जात असते, त्याप्रमाणे तू आपले जीवन कर. स्वतःला पूर्णपणे त्या भगवंताच्या स्वाधीन करून टाक. आडवाट आहे की राजमार्ग आहे, याची वाटाघाट रथ कधी करत असतो का? सारथी नेतो तिकडे तो निमूटपणाने जात असतो. म्हणून प्रवृत्ति वा निवृत्ति असे ओझे वृत्तिवर न ठेवता तुझी चित्तवृत्ति अखंड माझे स्मरण करू दे. जे जे कर्म जसे जसे घडेल तसे तसे थोडे किंवा जास्त न म्हणता माझ्या ठिकाणी निवांतपणाने अर्पण करून टाक.

अर्जुना, अशा उत्तम भावनेने जगल्यावर देहत्याग झाला की, तू सायुज्यमुक्तिरूप माझ्या घरी सुखाने येशील.

आता अर्जुना, तुला जर हेही करता येत नसेल तर पांडुकुमरा, तू मी पुढे सांगतो तशी साधना कर.

कर्माच्या आधी आणि शेवटी आणि बुद्धिच्या पाठीपोटी मला बांधणे तुला अवघड वाटत असेल तर ज्या ज्या वेळी जे जे कर्म घडेल त्याचे फळ जिथल्या तिथेच टाकून दे. वृक्ष किंवा वेली आलेली फळे जशी लोटून देतात त्याप्रमाणे कर्मे सिद्ध झाली की ते फळ सोडून दे. देवाला अर्पण करावे किंवा देवांचा विचार तू मनात ठेवावास असेसुद्धा मी म्हणत नाही. सगळे शून्यात जाऊ दे. खडकावर झालेली वृष्टी जशी निष्फल होते किंवा आगीत पेरलेले बीज जसे उगवत नाही, स्वप्न जसे प्रत्यक्षात उतरत नाही तशी कर्माची गति समज. ते सगळेच निष्फळ समज. आपली स्वतःची मुलगी किती सुंदर असली तरी बापाला जशी तिच्याबद्दल अभिलाषा उत्पन्न होत नाही त्याप्रमाणे अशेष कर्मफलाबद्दल तू निरासक्त हो. अग्निची ज्वाळा जशी आकाशात लोपून जाते त्याप्रमाणे तुझ्या एकूणएक क्रिया शून्यामध्ये जाऊ देत. अर्जुना, तुझ्या चेहऱ्यावरचा आनंद मला सांगतो आहे की, हा मार्ग तुला आवडला. आहे ना सोपा अर्जुना? जमेल ना तुला? थोडा प्रयत्न कर की तो तुला जमेलच बघ.

पण तो तुला सोपा वाटला तरी सामान्य मात्र समजू नकोस. अरे, हा तर योगामध्ये पहिल्या आसनावर बसणारा योग आहे, कारण साधकाचा हेतू जी मोक्षप्राप्ती ती ह्या योगाने सहज साध्य होते.

साधक कर्म करीत जातो. फलत्याग तात्काळ करीत जातो. फलत्याग झाला की भोगायला कर्मच उरत नाही. वेळूचे झाड एकदा व्यायले की जसे पुन्हा वीत नाही तसे ते कर्म पुन्हा अंकुरत नाही, तिथल्या तिथेच संपून जाते, शरिरात राहूनच कर्म करीत असतानाच ह्या शरिराच्या येरझारातून जीवाची सुटका होते. जन्ममृत्यूच्या फेऱ्यावर चिरा पडतो.

किरीटी अर्जुना, अभ्यासाच्या पावलांनी चालत ज्ञानापर्यंत पोचावे. ज्ञानाच्या जोरावर ध्यानाची भेट घ्यावी. ध्यानाला आलिंगन पडले की, सर्व भाव तिथे लीन होतात आणि सर्व कर्मे दूरच्या दूर राहतात. कर्म दुरावले की, मगच फलत्याग संभवतो आणि त्यागामुळेच परब्रह्म शांती हस्तगत होते. आता शांती हा शेवटचा टप्पा आहे. शांती मिळविण्यासाठी आता मी सांगितला हा क्रम आहे. ब्रह्मप्राप्तीच्या मार्गाची सुरवात अभ्यास आणि शेवट शांती हे ध्यानात असू दे.

आता ह्या क्रमापैकी अभ्यासापेक्षा ज्ञान गहन, ज्ञानाहून ध्यान विशेष, ध्यानापेक्षा कर्मफलत्याग चांगला आणि त्यागाहूनही शांतिसुखाचा अनुभव श्रेष्ठ अशा ह्या चढत्या पायऱ्या आहेत.

या वाटेने सुखाने येत येत साधक शांतीचा मध्य गाठतो आणि त्याचे अंतर्बाह्य स्वरूप पालटते.

अर्जुना, काय सांगू तुला त्या भक्ताचे मन! तो सर्व प्राणिमात्रासारखे मानतो. तो आपणच विश्व होऊन रहातो त्यामुळे त्याच्या मनातील भेदभाव नष्ट होऊन जातात. त्याच्या लेखी कुणाचा द्वेष करावा हा भावच उरत नाही. चैतन्याला जसा आपपरभाव नाही तसा त्या भक्ताच्या मनात हा माझा, हा परका हा विचारच येत नाही. उत्तमाला आधार द्यावा, अधमाचा अव्हेर करावा हे पृथ्वी जाणतच नाही, राजाच्या शरिराचे चलनवलन करावे आणि रंकाला दूर लोटावे असे तो कृपाळू प्राण कधीच करीत नाही. गायीची तृषा शमवावी आणि वाघाला विष होऊन मारावे हे पाणी कधीच "करावे" असे म्हणत नाही. त्याप्रमाणे त्या माझ्या भक्ताचे कुणाशीही वैर असत नाही. तर जगातील यच्चयावत् जीवांशी, वृक्षवेलींशी, दगडमातीशी त्याची मैत्री असते. आणि ही मैत्री नुसती

मैत्री असत नाही त्या त्या क्षणी त्या त्या वस्तूशी तो एकरूप होऊन मैत्री करतो. तो कृपेची जन्मभूमी असतो. एखाद्या मेघासारखा तो कृपेचा वर्षाव करीत असतो. अर्जुना, घरच्यांना उजेड करावा आणि परक्यांना अंधार पाडावा असे दिवा करत नाही. तोडण्यासाठी आलेला लाकूडतोड्या आणि लावणी करणारा माळी या दोघांवरही वृक्ष अखेरपर्यंत सारखीच सावली करीत असतो. लावणाऱ्याला, पाळणाऱ्याला आणि गाळणाऱ्याला ऊस सारखाच गोड असतो. अर्जुना, हा माझा भक्त त्याप्रमाणे द्वेषरहित असल्याने राव आणि रंक या दोघांनाही चंद्रिका सारखीच मधुर असते, तसा शत्रू, मित्र, हा भावच नसल्याने सर्वांशी प्रेमाने वागतो. सर्व प्राण्यांशी समभावाने करूणापूर्ण व प्रेमपूर्ण असतो.

अर्जुना, सर्वांशीच मैत्री असल्याने "मी" आणि "तू" ही भाषा त्याच्याजवळ असत नाही. हे "माझे" असे तो कशालाही म्हणत नाही. माझे ही भावना संपल्यामुळे "तुझे" ही भाषाही खुंटली आणि सुख आणि दुःख जाणणे हा व्यापार राहिलाच नाही. कुणी अपराध केल्याची जाणीवच नसल्यामुळे क्षमा हा जसा आंगिकभाव पृथ्वीजवळ असतो तसा त्याचा भाव आंगिक असतो आणि म्हणून संतोष त्याच्या मांडीवर निरंतर खेळत असतो. हा संतोष कुठल्याही बाह्य उपचारावर अवलंबून असत नाही. समुद्राची भरती जशी पर्जन्यवृष्टीवर अवलंबून नसते, तो सर्वकाळ पूर्णच भरलेला असतो त्याप्रमाणे हा माझा भक्त संतोषाने भरलेलाच असतो. अंतःकरणाला शपथ घालून त्याने आवरून धरलेले असते. त्याचा निश्चय पक्का असतो. त्यामुळे जीव आणि परमात्मा हे दोघे त्याच्या हृदयामध्ये एका गादीवर बसून शोभत असतात.

ऐक्यरूपी ऐश्वर्याने संपन्न होऊन जो आपले मन आणि बुद्धि माझ्या ठिकाणी सर्वकाळ अर्पण करतो तो माझा फार लाडका भक्त आहे. आत आणि बाहेर योगाने शुद्ध होऊन मनात माझे अत्यंत प्रेम धरून जो आपले जीवन जगतो तो माझ्या दृष्टिने माझा खरा भक्त आहे. तोच भक्त, तोच योगी आणि तोच मुक्त! अर्जुना, फार काय सांगू? तो वल्लभा आणि मी त्याचा कांत! इतके माझे त्या भक्तावर प्रेम असते.

अर्जुना, माझ्या भक्ताचे आणखी एक लक्षण तुला सांगून ठेवतो. ह्या उन्मत जगामुळे त्याला खेद होत नाही आणि त्याच्यापासून जगाला त्रास पोचत नाही.

नागमहाशयांची गोष्ट आहे, ते जणूकाय दयेची मूर्ती होते. त्यांच्या घरासमोर तलाव होता. पुष्कळदा कोळी त्या तलावात मासे पकडत. नागमहाशय ते मासे खरेदी करत आणि परत तळ्यात सोडून देत.

एकदा त्यांच्या बागेत एक साप आला. त्यांच्या पत्नीने हाका मारून सांगितले, "काळा साप आहे बागेत, लवकर काठी आणा." नागमहाशय आले. पण मोकळ्या हाताने. ते पत्नीला म्हणाले, "जंगलातला साप काय कुणाला डसतो का? अहो, मनाचा सापच डंख मारून माणसाचा घात करतो."

त्यांनी मग हात जोडून सापाला म्हटले, "प्रभो, आपल्याला पाहून लोकांना फार भीती वाटते आहे आपण कृपा करून परत जंगलात जावे." आणि खरोखरच तो साप नागमहाशयांच्या मागे-मागे बाहेर पडला आणि जंगलात निघून गेला.

देव म्हणत आहेत की, “माझा खरा भक्त असा असतो. त्या भक्ताला बसण्यासाठी मी माझे अंतःकरण पसरतो. समुद्रातील जीवांना समुद्राच्या लाटांचे भय कसले? आणि समुद्राला त्या जीवांचा कुठे कंटाळा येतो? शरिरास जसा अवयवांचा कंटाळा येत नाही तसा भक्ताला जगाचा कंटाळा येत नाही. सर्व जीवांमध्ये आपणच आहो असे त्याने पूर्णतया जाणले असल्याने हे सगळे जग त्याला स्वदेहाइतके निकटवर्ती वाटते. आणि म्हणून सर्व अवस्थांतही त्याला भेदभाव उरत नाही. सुखदुःखादि द्वंद्वापासून मुक्त झालेला, भय आणि उद्वेग ह्यांनी रहित असलेला आणि माझ्या ठिकाणी अनन्यभाव ठेवणारा हा भक्त मला किती प्रिय आहे म्हणून सांगू! त्याचा मला मोह पडतो आणि तो माझ्या प्रेमाखातर जगतो. आत्मानंदाने तो तृप्त असतो. त्याच्या रुपाने सर्वाचा शेवट असलेले ब्रह्मच जन्माला आलेले असते. आणि ब्रह्मस्थितीरूपी स्त्रीचा तो प्रिय पती होतो.

अर्जुना, तो भक्त मला जिवाइतका प्रिय होतो हेही थोडकेच वर्णन झाले. प्रेमळ भक्तांच्या गोष्टी मला भुरळ पाडतात. त्या गोष्टी बोलून दाखवू नयेत खऱ्या पण अर्जुना, तुझी माझ्यावरची श्रद्धा ह्या न बोलण्याच्या गोष्टी माझ्याकडून बोलवते आहे. आणि म्हणून मी झटकन पतिपत्नी प्रेमाची उपमा दिली. एरवी या प्रेमाला उपमा नाही.

अर्जुना, ते असू दे, पण झाले काय की आधी या प्रेमळांच्या कथा, त्यात आवडीमुळे अवसान दुप्पट झाले. त्यात आणि चर्चा करण्यासाठी तुझ्यासारख्या प्रेमळ भक्त भेटला मग त्या गोष्टीला काही मोजमाप काही आहे का? पांडूसुता, ह्या माझ्या प्रिय भक्तांच्या कथा सांगण्यासाठी तुझ्यासारखा प्रिय भक्त आणि श्रोता मिळाला आणखी काय हवे? हा मोठ्या आनंदाचा सुखसंवाद झाला रे” असे म्हणत म्हणत देव डोलू लागले.

त्याच आनंदात भक्तांच्या आठवणी काढीत ते अर्जुनाला म्हणाले, “पांडवा, हे माझे भक्त कुठलीही आशा, इच्छा, आकांक्षा न धरता जगतात बघ, ते असतात त्या परिसरात सुखाचा एकसारखा उत्कर्ष होत रहातो. त्यांच्याशी उपमेला जगातील कुठलीही वस्तू टिकत नाही. ते उदार आहेत. काशीक्षेत्रही उदार आहे, मोक्ष, प्रदान करते पण त्या गावी शरीर द्यावे लागते. मग त्या काशीक्षेत्राची उपमा संतांना कशी द्यावी? संतांना तर मोबदल्याची अपेक्षाच नाही.

सज्ञनांच्यामुळे दोष नाहीसे होतात. हिमालयही दोषपरिमार्जन करतो पण तिथे जीविताची हानी होते. मग ह्या सज्ञनांना हिमालयाची उपमा कशी द्यावी?

गंगेचे पाणी अत्यंत पवित्र आहे. पाप आणि ताप दोन्ही त्या पाण्यात बुडी मारली की, जातात पण बुडण्याचे भय आहे. गंगेसारखीच ह्या सज्ञनांच्या ज्ञानाची खोली असते पण साधक त्यात बुडून जात नाहीत. न मरता साधकाला ह्या संतांच्या संगतीत रोकडा मोक्ष मिळतो. ह्या संतांच्या संगतीने गंगा पातक्यांचे पाप क्षालन करण्यास समर्थ होते, मग ह्या संतांच्या संगतीत नित्य रहाणारे किती पवित्र होत असतील? हे संत शुचित्वाने तीर्थाचे आश्रयस्थान होतात आणि साधकाच्या मनातील अज्ञानादिक मळ देशोधडीस लावतात.

अर्जुना, अरे तो भक्त आतबाहेर निर्मळ, सुर्यासारखा तेजस्वी आणि पायाळू माणसासारखा ब्रह्मरूपी गुप्त धन पहाणारा असतो. आकाश जसे सगळीकडे भरून राहूनही वस्तूपासून अलिप्त असते तसा तो मनाने

अनुक्रमणिका

व्यापक आणि उदास असतो. संसाराच्या व्यथेपासून मनाच्या ह्या अलिप्ततेमुळे सुटलेला असतो. जसा काही व्याधाच्या हातून निसटलेला पक्षीच.

एक बाई आपल्या माहेरून आल्या आणि आपल्या यजमानास म्हणाल्या, "ऐकलेत काय? माझा भाऊ अगदी विरक्त झाला आहे. पुढच्या दिवाळीला तो दीक्षा घेऊन साधू होणार आहे. त्याने यंदापासूनच तयारी सुरू केली आहे. तो आपल्या पैशा अडक्याची नीटनेटकी व्यवस्था लावण्यात गर्क आहे. ती व्यवस्था झाली की, पुढच्या दिवाळीला दीक्षा. काय विलक्षण विरक्ति आहे की नाही?

यजमान हसू लागले. साहजिकच बाईंना राग आला. त्या म्हणाल्या, "हसायला काय झाल? ही काय हसण्यासारखी गोष्ट आहे?"

यजमान म्हणाले, "अग, हसू नको तर काय करू, त्याग असा होतो काय? त्यागाची तिथी पुढची दिवाळी आणि चालू क्षणाला संपत्तीची व्यवस्था! वाहवा, वाहवा! अग त्याग तर तात्काळ झाला पाहिजे."

बाई फुरंगटून म्हणाल्या, "तुम्ही जर एवढे ज्ञानी अहा तर दाखवा की काही तरी करून"

एवढे शब्द कानावर पडल्याबरोबर ते गृहस्थ म्हणाले, "छान! कामच झाले की, माझे. मी तर या तुझ्या संमतीचीच वाट पहात होतो."

त्यांनी तात्काळ वेष उतरला, धोतर अंगावर घेतले आणि उंबरठा ओलांडला. बाईंना वाटले की, जातात कुठे, येतील संध्याकाळी निमूटपणे! पण तो खरा विरक्त पुरुष काही परत येण्यासाठी बाहेर पडला नव्हता. तर ह्या भक्तांची विरक्ति अशी आहे असे देव सांगत आहेत.

ते पुढे म्हणाले, "पार्था, ह्या पुरुषाला सतत सुखाची प्राप्ती होत असते. मेलेल्या माणसाला जशी लज्जा वाटत नाही तसा तो माझा भक्त दुःख जाणतच नाही. ज्यामध्ये इंधन नाही असा अग्नि जसा हलके हलके आपला आपण विझून जातो त्याप्रमाणे अमुक एक काम मी करीन, अमुक कामाचा आरंभ करीन, अशी अहंकारवृत्ति त्या भक्ताच्या ठिकाणी उरलेलीच नसते. त्याच्या सर्व वृत्ति शांत झालेल्या असतात आणि ह्या शांतीमुळे त्याचे नाव मोक्षाच्या बाजूला लिहिलेले असते.

अर्जुना, त्याची स्थिती इतकी असते की, "मी ब्रह्म आहे" या भावानेच तो निरंतर भरलेला असतो. द्वैताच्या पलीकडच्या तीरावर निघून तो परब्रह्माशी एकरूपच होऊन जातो.

पण इतके झाले तरी भक्तिसुखासाठी तो स्वतःला पुन्हा दोन ठिकाणी विभागून तो स्वतःच्या ठिकाणी सेवाधर्म बाणून घेतो. अद्वैतसिद्धी झालेली असली तरी भक्ति कशी करावी हे लोकांना कळावे म्हणून तो आपल्या एका भागाला देव असे नाव देतो, दुसऱ्याला भक्त असे म्हणतो आणि भक्तिची उत्तम पद्धत लोकांना घालून देतो. अर्जुना, अरे असा योगीभक्त मला वेड लावतो, तो आमचे निजध्यान होतो, तो भेटेल तेव्हाच

माझ्या मनाचे समाधान होते. पांडवा, ह्या अशा अनन्य भक्तांसाठीच मी सगुणरूप घेतो. त्यांच्याचसाठी माझे लीलाचरित्र असते. तो मला इतका आवडतो की, मी त्यावरून माझा जीव आणि प्राण ओवाळून टाकतो.

अर्जुना, त्याची निःसीम निष्ठा माझ्या ध्यानी येते म्हणून हे नाते जडते. आत्म लाभाशिवाय त्या भक्ताला दुसरे काहीही गोमटे वाटत नाही. कितीही उत्तमोत्तम भोग त्यापुढे आले तरी त्याला त्याचा मोह पडत नाही. त्यापासून त्याला संतोष होत नाही. तो त्या भोगाविषयी काळजी पण करत नाही. जे खरेखुरे आपले आहे ते कल्पान्तीही कुठे जात नाही अशी त्याची श्रद्धा असते. बरे जे नाहीसे झाले त्याचा तो शोकही करत नाही. त्याला आता कशाची आकांक्षाही उरलेली नसते. ज्याच्या पलीकडे काहीच मिळवावयाचे उरत नाही ते परब्रह्म तो स्वतः होऊनच रहातो. मग तो आकांक्षा तरी कशाची धरणार? रात्र आणि दिवस हे दोन्ही प्रकार सूर्याच्या ठिकाणी घडतच नाहीत त्याप्रमाणे सुख आणि दुःख यांचा परिणाम त्याच्यावर होतच नाही. असा अखंड बोधरूप असून जो नित्य माझ्या सगुणरूपाचे भजन करतो त्याच्यासारखा लाडका सोयराच माझा कोणी नाही. अगदी तुझी शपथ घेऊन सांगतो.

अर्जुना, सुख आणि दुःख यांच्या ठिकाणी जसा त्याच्या मनात समभाव स्थिर झालेला असतो तसाच मान आणि अपमान याविषयी त्याच्या चित्तात समत्वच असते. तो मानासाठी आशा धरून असत नाही किंवा अपमानाचे दुःख मानत नाही.

तिन्ही ऋतूमध्ये आकाशाला जसा काही विकार होत नाही त्याप्रमाणे शीत आणि उष्ण यांचा त्याच्या मनावर काही परिणाम होत नाही. दक्षिण दिशा किंवा उत्तर दिशा कुठूनही वारा येवो मेरू पर्वत जसा मध्यस्थ व स्थिर असतो तसा सुखदुःखामध्ये तो अचल असतो.

सगळ्या जगाला पाणी जसे सेव्यच असते त्याप्रमाणे ह्या माझ्या भक्ताला सगळे लोक प्रिय मानतात आणि त्याची कांक्षा करतात.

मनातून आणि बाहेरूनही तो जगाचा संग सोडून जीवस्वरूपाचा ब्रह्मस्वरूपात प्रवेश करून एकाकी असतो.

आता जगाचा संग त्याने सोडला आहे. ह्याची स्पष्ट खूण अशी दिसते की, कुणी त्याची निंदा केली तरी तो उदास, खिन्न होत नाही. कुणी स्तुती केली तरी आनंद मानत नाही. निंदा आणि स्तुती तो दोन्ही आपल्याकडे घेत नाही. आकाशात कधी विजा चमकतात, कधी काळेकभिन्न ढग येतात, कधी वावटळ भिरभिरते, कधी सूर्य अग्निचा वर्षाव करत असतो, कधी थंडगार वृष्टि चालू असते तर कधी इंद्रधनुष्य डौलाने उभे असते पण त्या आकाशाला ह्या कुठल्याही बऱ्यावाईट घटनेचा लेप लागत नाही. तसा निंदा आणि स्तुती यामुळे होणाऱ्या दुःखद वा सुखद भावनेचा त्याच्या मनाला स्पर्श होत नाही. ह्या दोन्हीला सारखाच मान देऊन तो माझा प्राणसखा निर्लेपवृत्तीने जनामध्ये आणि वनामध्ये वावरत असतो. तो उन्मनी अवस्था अखंड भोगत असतो आणि खरे किंवा खोटे न बोलता आपोआप सहज मौनी होतो.

ज्यावेळेला जे मिळेल त्यामुळे तो संतोष मानत नाही. नाही मिळाले तर खिन्न होत नाही. पाऊस पडला नाही म्हणून समुद्र आटत नाही. तो परिपूर्ण असतो त्यामुळे बाह्य लाभ, हानी त्याच्या हिशोबात नसते. तो आत्मानंदामध्ये निमग्न असतो.

वायूला ज्याप्रमाणे कुठेही एके ठिकाणी बिऱ्हाड नाही त्याप्रमाणे तो कुठेही आश्रय घेऊन कायम रहात नाही. सगळ्या आकाशातच वायूचे वसतिस्थान असते. अर्जुना, "हे सगळे विश्व माझे घर आहे, हे सगळे चराचर मीच आहे" अशी त्याची दृढभावना झालेली असते आणि अशा ज्ञानी भमिकेतून तो माझी भक्ति करीत असतो.

अर्जुना, ज्या विश्वरूपाची तू धास्ती घेतली होतीस, जे पहायला नको असे म्हणत होतास ते विश्वरूप माझा भक्त अशा प्रकारे क्षणाक्षणास पहातो, आनंदित होतो आणि हसत खेळत माझ्याकडे येऊन मला मिठी मारतो आणि माझ्यात मिसळून जातो.

पार्था, अशा भक्ताला मी माझ्या माथ्यावर मुकुट करतो यात काय आश्चर्य आहे? उत्तम भक्तापुढे मी मस्तक लववितो यात काय विशेष आहे? पण पार्था, त्याच्या चरणोदकालाही तिन्ही लोकांत मान असतो.

अर्जुना, शंकराची माझ्या ठिकाणी किती भक्ति आहे बघ. त्यांनी माझ्या चरणोदकापासून निघालेली गंगा आपल्या मस्तकावर धारण केली आणि भक्ति कशी करावी हे सगळ्या जगाला दाखवून दिले. श्रद्धावस्तूचा आदर कसा करावा, हे शिकण्यासाठी श्रीसदाशिवानाच गुरू करावयास हवे. पण हे बोलणे मी वाढवीत नाही, कारण शंकराची स्तुती करण्यात मी माझीच स्तुती करतो असे होईल. यासाठी ह्याबद्दल मी आणखी जास्त काही बोलत नाही. पण थोडक्यात सांगतो की, मी त्या भक्ताला शिरावर वाहतो.

अर्जुना, मोक्ष हा चवथा पुरुषार्थ आहे. हा माझा भक्त भक्तिमार्गाने जाता जाता हा मोक्ष हातात घेऊन जगाला वाटत जातो. तो स्वतः कैवल्याचा अधिकारी आहे. मोक्ष कुणाला द्यावा, कुणाला न द्यावा हे ठरविण्याची योग्यता त्याच्या ठिकाणी आहे. पण पाणी जसे सहज खोलगट भागाकडे जाऊन स्थिर होते तसा तो सहज नम्र असतो. अधिकार आणि नम्रता ही दोन्ही माझ्या भक्ताच्या ठिकाणी नांदताना पाहून मला किती आनंद होतो त्याचे वर्णन कसे करू? आम्हाला तो इतका आदरणीय आहे की, मी त्याला नमस्कार करतो. त्याला आमच्या शिरावरच मुकुट करतो आणि त्याचे पाय हृदयाशी धरतो. माझ्या वाणीला त्या भक्ताच्या गुणांची लेणी चढवतो, कानाला त्यांच्या कीर्तीची भूषणे करतो. त्याला पहावा या इच्छेनेच मला अचक्षुला चक्षू येतात रे. माझ्या हातातील लीला कमळाने मी त्यांची पूजा करतो. अर्जुना, त्यांना नीट आलिंगन देता यावे म्हणूनच मला दोन्हीवर आणखी दोन भुजा आहेत. त्यांच्या सहवासाचे सुख मिळावे म्हणूनच मी अव्यक्त असूनही देह धारण करतो. किंबहुना त्यामुळे मला हे देह धरणे आवडते. पांडवा, त्या सहवास सुखाला कशाचीही उपमा देता येत नाही.

अरे, त्यांच्याशी माझी मैत्री आहे यात काहीच आश्चर्य नाही. पण जे लोक त्या माझ्या भक्तचरित्राचे वर्णन करतात, ती चरित्रे ऐकतात तेही मला प्राणापेक्षा प्रिय आहेत. भक्तिची ही अवस्था ज्यांनी प्राप्त करून घेतली ते मला किती आवडतात, मी त्यांना शिरावर कसे धारण करतो, त्यांच्यावर किती प्रेम करतो हे तुझ्या

ध्यानी आले ना?

मी तुला हा भक्तियोग साद्यंत सांगितला आहे. हा सांगताना देखील मला आनंद होतो आहे. त्यातून तू मनापासून ऐकत होतास आणि मला कळत होते की, ऐकताना तुला आनंद होतो आहे. तू ज्या श्रद्धेने आणि आदराने हा योग ऐकलास त्या श्रद्धेने जे जे ऐकतील त्यांच्या मनात तो स्थिर होईल. चिंतनाने त्याचा विस्तार होईल आणि मग त्यांच्या हातून जास्त जास्त अनुष्ठान होऊ लागेल. मनाची स्थिती मी जसे आता निरूपण केले तशी असली की, उत्तम मशागत केलेल्या जमिनीत पेरणी करावी तसे घडते आणि प्राप्त करून घेण्याचे सर्वश्रेष्ठ ठिकाण मी आहे अशी त्यांची पूर्ण खात्री पटते आणि मला सर्वस्व मागून माझ्यावर प्रेम करतात.

अर्जुना, असे हे माझे सर्व परमभक्त तेच योगी असे मी समजतो. त्यांचीच मला अखंड उत्कंठा आहे.

सख्या अर्जुना, तुझ्या प्रश्नाचे उत्तर तुझ्या मनासारखे स्पष्ट मिळाले का? तू सोपा सुखदायक मार्ग विचारलास, माझ्या सगुण रूपाबद्दल तुला प्रेम आहे, अपरंपार निष्ठा आहे हे जाणून मी तुझ्या ह्या निष्ठायुक्त प्रेमाला जुळेल असा हा योगमार्गच सांगितला आहे. आता कुणाचा द्वेष न करता वाट्यास आलेले कर्म अलिप्त बुद्धिने करत माझ्या ह्या सगुण ध्यानाच्या चिंतनात रहाणे तुला काय कठिण आहे? पण प्रज्ञावंता, हे वेगळ्या स्वरूपातले विश्वरूपदर्शनच आहे हे मात्र कधीही विसरू नको.

भविष्यकाळ तुला प्रत्यक्ष दाखवलाच आहे. त्याला तू भयप्रद मानलेस पण खरा भक्त जे प्राप्त होईल ते निर्भयतेने स्वीकारतो आणि तेथेही माझ्यावरील नजर ढळू देत नाही. हे ध्यानी आले का? असा भक्त तू हो.

अर्जुना, असे भक्त माझे तीर्थक्षेत्र, परमपवित्र स्थान आहे. अशा भक्तांचे चरित्र गाणारे देखील माझे परमप्रिय सखे आहेत. त्या प्रेमळ भक्तांची कथा गाणारे ते आमची परमदेवता आहेत असे आम्ही मानतो. त्या भक्तांचे मी ध्यान करतो. तोच आमचे देवतार्चन आहे. त्यांच्याशिवाय आणखी काही उत्तम आहे असे मला वाटत नाही. त्याचे मला व्यसन आहे ते आमचे सर्वस्व निधान आहे. किंबहुना ते भेटतात तेव्हाच मला समाधान मिळते ते भक्त म्हणजे माझे बहिश्चर प्राणच आहेत असे समज आणखी काय सांगू?

"राजा, आपल्या भक्तांचा आनंद असलेला तो जगाचे मूळ कारण परमात्मा अर्जुनाला असा बोध करून थांबला", असे धृतराष्ट्राला सांगून संजयही गहिंवरून स्तब्ध झाला. दोन्ही प्रकारच्या ह्या विश्वरूपदर्शनाने तृप्त झालेला संजय रणभूमीवर दिसणाऱ्या श्रीकृष्णाच्या सगुण मूर्तीच्या ध्यानात तल्लीन होऊन गेला.

त्या मूर्तीकडे वरचेवर पहात आनंदित होत संजय धृतराष्ट्राला म्हणाला, "महाराज, काय हो हा श्रीकृष्ण परमात्मा! काय त्याचे निर्मळ स्वरूप! कसे त्याचे लोकांवर कृपा करणारे पूर्णत्व! कसा तो शरणागतांना शरण जाण्यास एकमेव स्थान आहे. राजा, धर्मरक्षक म्हणून त्याची कीर्ती उज्ज्वल आहे. त्याचे कर्तृत्व अगाध आहे. तो वैषम्यभावरहित आहे. अतुल बळाने प्रबळ असून त्या बळीच्या बंधनात कसा सहज कौतुकाने नांदतो आहे हो."

देवांना सहाय्य करावे हा त्याचा स्वभाव आहे, त्रैलोक्याचे संगोपन करावे ही त्याची लीला आहे, शरणागतांचा प्रतिपाळ करावा हा त्याचा खेळ आहे. तो भक्तवत्सल, प्रेमळांना सहज वश होणारा, कलानिधी आणि त्या मूळ स्वरूपाकडे घेऊन जाणारा सोपा पूलच आहे. तो भक्तांचा सार्वभौम राजा आणि वैकुंठीचा श्रीकृष्ण परमात्मा भक्तियोग सांगतो आहे आणि परमभाग्याचा तो अर्जुन जीवाचे कान करून ऐकतो आहे. “आता भगवंत आणखी काय सांगतात ते ऐकू या”. असे संजय धृतराष्ट्राला म्हणाला. “श्रोतेहो, रसाने भरलेली ती कथा आपल्यापर्यंत मराठी भाषेच्या माध्यमातून आणली जाईल. आपण कृपा करून ती ऐकावी अशी मी आपले लेकरू ज्ञानदेव प्रार्थना करतो आहे.

श्रोतेहो, आमचे स्वामी निवृत्तिदेव यांनी मला, “या ज्ञानदेवाला संतांची सेवा करावी” असे शिकवले आहे. तेव्हा सेवा स्वीकारावी महाराज.”

***

अनुक्रमणिका

॥ श्री ॥

## अध्याय तेरावा

# क्षेत्रक्षेत्रज्ञविभागयोग

॥ ॐ नमो भगवते वासुदेवाय ॥

श्रीभगवानुवाच—

इदं शरीरं कौन्तेय क्षेत्रमित्यभिधीयते ।
एतद्यो वेत्ति तं प्राहुः क्षेत्रज्ञ इति तिद्विदः ॥ १ ॥

क्षेत्रज्ञं चापि मां विद्धि सर्वक्षेत्रेषु भारत ।
क्षेत्रक्षेत्रज्ञयोर्ज्ञानं यत्तज्ज्ञानं मतं मम ॥ २ ॥

तत्क्षेत्रं यच्च यादृक्च यद्विकारि यतश्च यत् ।
स च यो यत्प्रभावश्च तत्समासेन मे श्रृणु ॥ ३ ॥

ऋषिभिर्बहुधा गीतं छन्दोभिर्विविधैः पृथक् ।
बह्मसूत्रपदैश्चैव हेतुमद्भिर्विनिश्चितैः ॥ ४ ॥

महाभूतान्यहंकारो बुद्धिरव्यक्तमेव च ।
इन्द्रियाणि दशैकं च पञ्च चेन्द्रीयगोचराः ॥ ५ ॥

इच्छा द्वेषः सुखं दुःखं संघातश्चेतना धृतिः ।
एतत्क्षेत्रं समासेन सविकारमुदाहृतम् ॥ ६ ॥

अमानित्वमदंभित्वमहिंसा क्षान्तिरार्जवम् ।
आचार्योपासनं शौचं स्थेर्यमात्मविनिग्रहः ॥ ७ ॥

इंद्रियार्थेषु वैराग्यमनहंकार एव च ।
जन्ममृत्युजराव्याधिदुःखदोषानुदर्शनम् ॥ ८ ॥

असक्तिरनभिष्वङ्गः पुत्रदारगृहादिषु ।

नित्यं च समचित्तत्वमिष्टानिष्टोपपत्तिषु ॥ ९ ॥

मयि चानन्ययोगेन भक्तिरव्यभिचारिणी ।
विविक्तदेशसेवित्वमरतिर्जनसंसदि ॥ १० ॥

अध्यात्मज्ञाननित्यत्वं तत्त्वज्ञानार्थदर्शनम् ।
एतज्ज्ञानमिति प्रोक्तमज्ञानं यदतो ऽ न्यथा ॥ ११ ॥

ज्ञेयं यत्तत्प्रवक्ष्यामि यज्ज्ञात्वाऽ मृतमश्नुते ।
अनादिमत्परं ब्रम्ह्य न सत्तन्नासदुच्यते ॥ १२ ॥

सर्वतःपाणिपादं तत्सर्वतोऽ क्षिशिरोमुखम् ।
सर्वतःश्रुतिमल्लोके सर्वमावृत्य तिष्ठति ॥ १३ ॥

सर्वेन्द्रियगुणाभासं सर्वेन्द्रियविवर्जितम् ।
असक्तं सर्वभूच्चैव निर्गुणं गुणभोक्तृ च ॥ १४ ॥

बहिरन्तश्च भूतानामचरं चरमेव च ।
सूक्ष्मत्वात्तदविज्ञेयं दूरस्थं चान्तिके च तत् ॥ १५ ॥

अविभक्तं च भूतेषु विभक्तमिव च स्थितम् ।
भूतभर्तृ च तज्ज्ञेयं ग्रसिष्णु प्रभविष्णु च ॥ १६ ॥

ज्योतिषामपि तज्ज्योतिस्तमसः परमुच्यते ।
ज्ञानं ह्रयं ज्ञानगम्यं हृदि सर्वस्य धिष्ठितम् ॥ १७ ॥

इति क्षेत्रं तथा ज्ञानं ज्ञेय चोक्तं समासतः ।
मद्भक्त एतद्विज्ञाय मद्भावायोपपद्यते ॥ १८ ॥

प्रकृतिं पुरुषं चैव विध्द्यनादी उभावपि ।
विकारांश्च गुणांश्चैव विद्धि प्रकृतिसंभवान् ॥ १९ ॥

कार्यकारणकर्तृत्वे हेतुः प्रकृतिरूच्यते ।
पुरुषः सुखदुःखानां भोक्तृत्वे हेतुरुच्यते ॥ २० ॥

पुरुषः प्रकृतिस्थो हि भुड;क्ते प्रकृतिजान्गुणान् ।

अनुक्रमणिका

कारणं गुणसङ्गोऽस्य सदसद्योनिजन्मसु ॥ २१ ॥

उपद्रष्टानुमन्ता च भर्ता भोक्ता महेश्वरः ।
परमात्मेति चाप्युक्तो देहेऽस्मिन्पुरुषः परः ॥ २२ ॥

य एवं वेत्ति पुरुषं प्रकृतिं च गुणैः सह ।
सर्वथा वर्तमानोऽपि न स भूयोऽ भिजायते ॥ २३ ॥

ध्यानेनात्मनि पश्यन्ति केचिदात्मानमात्मना ।
अन्ये सांख्येन योगेन कर्मयोगेन चापरे ॥ २४ ॥

अन्ये त्वेवमजानन्तः श्रुत्वान्येभ्य उपासते ।
तेऽ पि चातितरन्त्येव मृत्युं श्रुतिपरायणाः ॥ २५ ॥

यावत्संजायते किंचित्सत्त्वं स्थावरजङ्गमम् ।
क्षेत्रक्षेत्रज्ञसंयोगात्तद्विद्धि भरतर्षभ ॥ २६ ॥

समं सर्वेषु भूतेषु तिष्ठन्तं परमेश्वरम् ।
विनश्यत्स्वविनश्यन्तं यः पश्यति स पश्यति ॥ २७ ॥

समं पश्यन्हि सर्वत्र समवस्थितमीश्वरम् ।
न हिनस्त्यात्मनात्मानं ततो याति परां गतिम् ॥ २८ ॥

प्रकृत्यैव च कर्माणि क्रियमाणानि सर्वशः ।
यः पश्यति तथात्मानमकर्तारं स पश्यति ॥ २९ ॥

यदा भूतपृथग्भावमेकस्थमनुपश्यति ।
तत एव च विस्तारं ब्रम्ह्य संपद्यते तदा ॥ ३० ॥

अनादित्वान्निर्गुणत्वात्परमात्मायमव्ययः ।
शरीरस्थो ऽ पि कौन्तेय न करोति न लिप्यते ॥ ३१ ॥

यथा सर्वगतं सौक्ष्म्यादाकाशं नोपलिप्यते ।
सर्वत्रावस्थितो देहे तथात्मा नोपलिप्यते ॥ ३२ ॥

यथा प्रकाशयत्येकः कृत्स्नं लोकमिमं रविः ।

**क्षेत्रं क्षेत्री तथा कृत्स्नं प्रकाशयति भारत ॥ ३३ ॥**

**क्षेत्रक्षेत्रज्ञयोरेवमनारं ज्ञानचक्षुषा ।**
**भूतप्रकृतिमोक्षं च ये विदुर्यान्ति ते परम् ॥ ३४ ॥**

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे "क्षेत्रक्षेत्रज्ञविभागयोगो नाम" त्रयोदशोऽ ध्यायः ॥ १२ ॥

श्रीकृष्णार्पणमस्तु ।

तेराव्या अध्यायाचे नाव प्रकृतिपुरुषयोग असे आहे. प्रकृति कशाला म्हणावे, पुरुष कशाला म्हणावे, या परस्परांचा एकमेकाशी कसा व काय संबंध आहे याचे सूक्ष्म विवेचन या अध्यायाच्या उत्तरार्धात येते. पूर्वार्धामध्ये

**“देह म्हणजे क्षेत्र**
**या, देहाला जाणणारा तो क्षेत्रज्ञ”**

असे सूत्रमय विधान केले आहे.

क्षेत्र व क्षेत्रज्ञ याना वेगवेगळे जाणणे म्हणजे ज्ञान असे म्हटले आहे.

पुढे क्षेत्रासंबंधी नाना मते असून त्यांचे एकमेकाशी कसे पटत नाही याचे वर्णन येते. या मतांचा परामर्ष घेताना

१. जीववादी
२. प्रकृतिवादी
३. संकल्पवादी
४. स्वभाववादी
५. काळवादी

या सर्वांची मते स्पष्ट करून दाखविली आहेत व क्षेत्राचे खरे स्वरूप काय हे भगवंतांनी सांगितले आहे.

छत्तीस तत्त्वांचा मेळावा म्हणजे क्षेत्र असे देवांनी म्हटले आहे. गुणांचा विचार पुढे करू असे म्हणून ह्या क्षेत्रामध्ये पापपुण्य पिकते असे सांगितले आहे. या चक्रातून सुटण्याचा मार्ग म्हणजे ज्ञान आणि ज्ञान झाले की, त्या पुरुषाचे वर्तन कसे कसे होते त्याचे देवानी वर्णन केले आहे.

ज्ञानी पुरुषाची एकंदर अठरा लक्षणे सांगितली आहेत. याच्या उलट अज्ञानी पुरुषाच्या खुणाही ते दिग्दर्शित करतात. अज्ञान दूर होत चालले, ज्ञानाच्या खुणा उमटू लागल्या की, मग पुढे काय करावयाचे, काय जाणावयाचे ते सांगतात. जाणावयास योग वस्तू एक परब्रह्मच. तेव्हा आदिरहित परब्रह्माचे शब्दात जेव्हढे वर्णन करता येईल तेव्हढे देव करीत आहेत.

नंतर मग प्रकृतिपुरुष विभाग हा विषय येतो.

प्रकृतिपुरुष विभाग सांगून झाल्यावरचा संजयाचा अभिप्राय संजयाच्या शब्दांतच सांगितला पाहिजे. संजय म्हणतो आहे, -

**ऐसा हा जी आघवा ।**
**श्रीकृष्णें तया पांडवा ।**
**उगाणा दिधला जीवा । जीवाचिया ॥ ११४४ ॥**

अनुक्रमणिका

**येर कलशींचों येरीं ।**
**रिचविजे जयापरी ।**
**आपणपें तया श्रीहरी । दिधलें तैसें ॥ ११४५ ॥**
**"किंबहूना दिधलें सर्वस्व देवें" ॥**

असा हा अध्याय.

आता हे पहिले जे पाच मतवाद वर्णन केले आहेत ते आपण फक्त समजून घ्यावयाचे इतकेच. ज्ञानदेवांनी त्या मतभेदांचे इतके सुंदर वर्णन केले आहे की, विद्वानांची सभा भरली आहे, मोठ्या आवेशाने जो तो आपले म्हणणे मांडत आहे, आपल्याच मताचा आग्रह धरून दुसरा किती चुकतो आहे हे सांगताना त्याचे मत कसे उपहासाने फेटाळून लावतो आहे तो सर्व देखावा ज्ञानदेवांनी मोठ्या कौशल्याने आपल्यापुढे उभा केला आहे. पण त्यावेळी अबोध प्रेक्षक व अनधिकारी श्रोते एवढीच आपली भूमिका रहाते.

पण ज्ञानाची लक्षणे सुरू झाली की, मात्र तो विषय काळजास जाऊन भिडतो. ही लक्षणे ज्या प्रमाणात आपल्या अंगी असतील, येऊ लागतील त्या प्रमाणात आपण ज्ञानी असा उलटा सिद्धांत मनात येतो आणि प्रत्येक लक्षणाबरोबर प्रखर आत्मनिरीक्षण सुरू होते. कधी कधी तर हे लक्षण आपल्या अंगी ह्या जन्मी तरी बाणण्याची शक्यता नाही अशी खात्री वाटू लागते.

होमेपाथी किंवा बाराक्षारासंबंधीचे पुस्तक हातात घेतले की, त्यातील लक्षणे वाचता वाचता हा प्रत्येक रोग आपल्याला झाला आहे असे वाटू लागते. अज्ञानी जीवाची लक्षणे वाचताना तशी अवस्था होते. अतिशय दुःख होते. ह्या अवगुणांच्या विळख्यातून आपण कसे काय बाहेर पडणार असा विचार मनात येतो.

पण बाराव्या अध्यायात देवांनी आश्वासन दिले आहे की, "तू जसा असशील तसाच्या तसा मी तुझा स्वीकार करतो. माझा भक्त हो म्हणजे झाले."

श्रीगुरुदेव रानडे म्हणत, "आपल्या अंगच्या गुणावगुणांची काळजी करू नये. कट्टाने नेम करीत रहावे. आपोआप वृत्ति बदलते." तेव्हा साधकाच्या दृष्टिने बाराव्या अध्यायानंतर तेराव्या अध्यायातील ज्ञानी पुरुषाच्या लक्षणांचे माऊलींचे विवेचन सहजच ओघाने आले आहे.

"आपण निष्ठेने, निग्रहाने वाट चालायची." माऊली म्हणतात, "आत्मरूप म्हणजेच गणेश, हा गणेश सर्व विद्यांचे आश्रयस्थान आहे. हा गणेश माझ्या दृष्टिने श्रीगुरुचरण आहेत. त्या गणेशाचे स्मरण व पदवंदन करतो.

सद्‌गुरू स्मरण केले की, शब्दसृष्टि स्वाधीन होते. अवघे सारस्वत जिव्हेवर येते. वक्तृत्व आपल्या गोडपणाने अमृताला म्हणते, "पलीकडे सर" अक्षरांची सेवा नवरस करतात. ह्या रसपूर्ण अक्षरांच्या मागे भाव

अवतरतो. अर्थांच्या छटा ध्यानात येतात. तत्त्वांतत्त्वामधील साम्य व भेद आपल्या हाती येतात. श्रीगुरूंचे पाय जेव्हा आपल्या हृदयात येऊन स्थिर होतात तेव्हा ज्ञानाला शब्दापासून ते अर्थापर्यंत सर्व भाग्य प्राप्त होते.

मी ज्ञानदेव गुरुचरणांना नमस्कार करतो आणि विवेचन पुढे चालू करतो.

ब्रम्ह्यदेवाचा पिता व लक्ष्मीपती श्रीकृष्ण असे म्हणाले, "अर्जुना, तुला भक्ती कर असे मी सांगितले. आता भक्तिचे साधन म्हणजे हा देह आहे." जप, ध्यान, योग कुठलीही साधना करावयाची ठरविली तरी शरीर, मन, बुद्धी ही सर्व जीवात्म्याच्या स्वाधीन असली पाहिजेत. पुष्कळदा असा अनुभव येता की, शरीर, मन व बुद्धी यांच्यामध्ये संघर्षच असतो. बुद्धिचा निश्चय मन मानत नाही आणि मनाचा आदेश शरीर जुमानत नाही.

सतारीचे उदाहरण घेतले तर ध्यानात येते की, तारा उत्तम झळझळीत असल्या पाहिजेत. खुंट्यांचे ताण, पीळ व्यवस्थित हवेत, पडदे जागच्याजागी ठाकठीक बांधलेले हवे, भोपळ्याची अवस्था, दांडीची अवस्था उत्तम असली पाहिजे. सतारीची जवारी उत्कृष्ट असली पाहिजे हा सगळा सरंजाम जमला आणि नखी नीट बांधलेली नाही असे झाले तरी मेळ साधत नाही. आता हे सगळे नुसते साधन आहे. सतारीतून मधुर बोल काढावयाचे हे त्या सतारियाचे वेगळेच कसब आहे. नुसते उत्तम हत्यार वा नुसता कसबी सतारिया उपयोगी पडत नाही. हत्यार उत्तम व वाजवणारा उत्तम भेटले की, गानसमाधी अवतीर्ण होते. त्याप्रमाणे हा जीवात्मा ह्या देहाच्या सतारीतून मधुर बोल काढीत तल्लीन व्हावयाचा असेल तर देह सुसंस्कृत असला पाहिजे. जीवात्म्याच्या सुराबरोबर देहाची सतार झंकारली पाहिजे. तेव्हा देव प्रथम त्या हत्याराचे वर्णन आणि त्यावर साधकाच्या चिंतनामुळे स्पष्ट होत जाणारे संस्कार समजावून देत आहेत. गवसणीतून सतार निघाली की, लगेच रियाझ चालू आहे की नाही आणि वादक काय योग्यतेचा कलाकार आहे हे जसे ध्यानात येते तसेच इथे सांगितले जात आहे.

देव म्हणत आहेत, "अर्जुना, ऐक रे. भक्तिचे साधन असणाऱ्या ह्या देहाचे माहात्म्य तुला सांगतो. ह्या देहाला क्षेत्र म्हणावयाचे आणि ते अशासाठी की लागवडीस आणलेल्या जमिनीसारखे ह्या देहात पापपुण्याचे पीक येते.

या क्षेत्राला जाणणारा तो क्षेत्रज्ञ आणि अशा सर्व क्षेत्रांचे संगोपन करणारा जो क्षेत्रज्ञ तो मी हे समजून घे.

क्षेत्र कोणते आणि क्षेत्रज्ञ कोणता हे यथार्थ जाणणे याला ज्ञान म्हणावयाचे. हे ज्ञान झाले की, त्या क्षेत्राचे रूप पालटते. जमिनीत येणाऱ्या पिकाच्या भरघोसपणावर जसे शेतकऱ्याचे कौशल्य दिसते तसेच हे आहे, पण तो विषय नंतर समजावून सांगतो.

क्षेत्र या नावाने मी तुला हे शरीर असे सांगितले त्याचा सर्व अभिप्राय उलगडून सांगण्यापूर्वी क्षेत्र का म्हणावयाचे? त्याची निर्मिती कशी होते? कुठे होते? कोणकोणत्या विकारांमुळे याची वाढ होते? हे मोजके साडेतीन हाताचे आहे का याचा आणखी विस्तार आहे? हे बरड माळ आहे की, पिकाऊ चांगली जमीन आहे? ह्याची मालकी कुणाकडे आहे? हे सर्व भाव तुला सांगतो. त्याबद्दल असणारे मतभेद दाखवतो. पार्था

अवधानपूर्वक ऐक.

या क्षेत्राबद्दल श्रुति सारखी बडबड करत असतात. याबद्दल तर्क वाटाघाट करीत असतो. याविषयी बोलता बोलता दर्शनांनी हात टेकले पण वेद, तर्क, दर्शने यांचे मतभेद अजून मिटलेले नाहीत. शास्त्राचे एकमेकाशी असणारे नाते या वादामुळेच तुटते आणि याच्या एक निश्चयासाठी जगात वादविवाद चालतात. एकाचे प्रतिपादन दुसऱ्याच्या प्रतिपादनाशी जमत नाही. एकाचा अर्थ दुसऱ्याच्या अर्थाशी जुळत नाही. या भिन्न भिन्न प्रतिपादनामुळे बडबडीला मात्र बळ आले आहे. हे क्षेत्र कोणाचे हे कळतच नाही.

पण माझाच निर्णय बरोबर हा प्रत्येकाचा हट्ट असल्याने त्या हट्टाच्या बळाने घरोघर काथ्याकूट मात्र चालू असतो. नास्तिकांना तोंड देण्यासाठी वेदांना मोठे बंड उभारले पण ते पाहून पाखंडी लोकांनी वेगळीच बडबड सुरू केली. ते वेदांना म्हणू लागले तुम्ही आधी निर्मूळच अहा. तुमचे हे सगळे वाग्जाळ खोटे आहे. तुम्ही ते खोटे नाही असे म्हणणार असाल तर हा पहा पैजेचा विडा समोर ठेवला आहे, तो उचला आणि आपले म्हणणे सिद्ध करून दाखवा.

वेदोक्त कर्माची निंदा करता करता पाखांड्यातील जैन अंगावरचे केस उपटू लागतात. आणि दिगंबर होऊन वितंडवाद घालत रहातात. वेद मानत नाहीत. चर्चा केल्यावर मात्र त्यांना ताळ्यावर यावे लागते.

मृत्यूच्या तडाख्यात सापडून हे शरीर फुकट जाईल म्हणून योगी निघतात. मृत्यूला भिऊन वनात जाऊन रहातात. यमनियमांचे मेळावे जमवतात आणि क्षेत्राचा निर्णय करण्याचा प्रयत्न करतात. या क्षेत्राच्या अभिमानाने क्षेत्र निर्णयाच्या आड हे कैलासाचे राज्य येईल असे वाटून शंकरांनी कैलासाचा त्याग केला आहे व स्मशानात वास केला आहे. इथे राहून तरी आपण ह्या क्षेत्राचा निर्णय करू शकू असे त्यांना वाटले. क्षेत्रनिर्णय करण्याच्या प्रतिज्ञेच्या योगाने शंकरांना सर्वसंगपरित्याग करावा लागला. काम हा क्षेत्रनिर्णयाच्या आड येणारा लांचखाऊ आहे हे जाणून त्याला जाळून टाकावे लागते. हे सर्व करूनही क्षेत्राचा निर्णय करता आला नाही.

ब्रह्मदेवाने आपल्या चारी मुखांचे सामर्थ्य एकवटले, क्षेत्राचे स्वरूप सांगण्याचा प्रयत्न केला पण क्षेत्राचा निर्णय त्याला मुळीच कळला नाही. प्रत्येकाचे मत आणि युक्तिवाद वेगवेगळा होता व आहे.

जीववादी म्हणतात, “हे स्थळ संपूर्णपणे जीवाच्या मालकीचे आहे. प्राण हे त्याचे कूळ आहे. प्राणाच्या घरी त्याचे चार भाऊ अपान, व्यान, उदान, समान हे स्वतः राबणार आहेत. मनासारखा चपल कारभारी आहे. त्या प्राणाजवळ इंद्रियरूपी बैलाचा समुदाय आहे. तो प्राण रात्र आणि दिवस न म्हणता अहोरात्र राबतो आणि विषयरूपी शेतात चांगली मेहनत करतो. आता ह्या तयार झालेल्या शेतात कर्तव्य करण्याची संधी दवडून अन्यायाचे बी पेरून कुकर्मरूपी आटोकाट मेहनत केली तर पेरलेल्या बीजाच्या अनेकपट पापांचे पीक येते. जीव कोटी जन्म अनेक दुःखे भोगतो. विधीची योग्य वाफ साधून सत्क्रियारूपी बीज पेरले तर शतजन्म सुखे भोगतो असे हे क्षेत्र आहे.”

प्रवृत्तिवादी लगेच उठून म्हणतात, “अहो ह्या जीववादी लोकांना काही कळत नाही. ते सांगतात ते

काही बरोबर नाही. हे क्षेत्र जीवाचेच आहे असे मुळीच म्हणू नका. ह्या शेताचे काय ते सगळे आम्हाला विचारा. आम्ही उलगडून सांगतो की सगळे. अहो, जीव हा आगंतुक वाटसरू ह्या क्षेत्रामध्ये वस्तीस आला आहे. प्राण हा ह्या क्षेत्राचा बलुतेदार आहे आणि म्हणून तो रात्रंदिवस जागतो, क्षेत्राचे संरक्षण करतो, सांख्यशास्त्र जिचे वर्णन करतात त्या प्रकृतीचे हे वतन आहे. हिच्याजवळ शेतकी चालविण्याचा सर्व बारदाना आहे. म्हणून ही स्वतःच शेत पिकविते. कुळाला देत नाही. या जगात क्षेत्र वाहण्याचे कामी मुख्य खटपट करणारे, सत्त्व, रज, तम हे तिन्ही गुण हिच्या पोटी उत्पन्न झाले आहेत. रजोगुण हे शेत पेरतो, सत्त्वगुण रक्षण करतो आणि तमोगुण कापणी करतो. महत्तत्त्वाचे खळे तयार करून एकट्या काळ नावाच्या पोळाकडून तो मळणी करतो. तेव्हा तेथे सूक्ष्म सृष्टीची चांगली रास तयार होते, पुन्हा पेरणी करण्यासाठी बीजांचा संग्रह तयार होता. हे चक्र असेच चालू रहाते आणि याप्रमाणे प्रकृति ह्या क्षेत्राचा उपभोग घेते.

संकल्पवादी लगेच पुढे होऊन म्हणतात, "काय बोलता हे? आम्हाला या तुमच्या बोलण्याचे फारच दुःख होते. हे तुमचे सगळे ज्ञान अगदी अलिकडचे आहे. अहो, परब्रह्म स्वरूपाच्या ठिकाणी तुमच्या ह्या प्रकृतीची वार्ता आहे कुठे?

ह्या क्षेत्राचा खराखुरा वृत्तांत काय आहे हे आम्ही सांगतो. निमूटपणाने ऐका. शून्य जे ब्रह्म त्या ब्रह्मरूपी शय्यागृहात पूर्ण लीन अवस्थेच्या गादीवर या बलवान संकल्पाने निद्रा केली होती. तो संकल्प कसा कोण जाणे एकाएकी जागा झाला. तो जबर उद्योग करणारा असल्याने त्याने इच्छा केल्याबरोबर त्रिभुवनाएवढा ठेवा त्याला प्राप्त झाला. त्याने जोड दिल्याबरोबर त्या निराकारातून त्रिभुवनाएवढी विशाल बाग व्यक्त दशेस आली. प्रथम ही पंचमहाभूते अशीच इकडेतिकडे निरुपयोगी अशा अवस्थेत पडून होती. ह्या आदिसंकल्पाने ती पंचमहाभूतांची पडजमीन मशागत करून लागवडीस आणली. प्रथम स्वेदज, जारज, अंडज, उद्भिज अशा निर्मितीच्या चार हद्दी पक्क्या केल्या. यानंतर आधी वेगवेगळ्या पंचमहाभूतांच्या योगाने पंचात्मक मिश्रणाची शरीरे तयार केली. शेतांच्या दोन्ही बाजूस कर्म आणि अकर्म ह्यांचे दगडी बांध घातले आणि ती निकस जमीन सुपीक केली. त्या संकल्पाने कोणालाही कळणार नाही असे जन्ममृत्यूचे भुयार ह्या जमिनीत येण्याजाण्यासाठी तयार करून ठेवले. मग त्या निर्मितीतील प्रत्येकाबरोबर त्याचे आयुष्य आहे तोवर ऐक्य साधण्याचे कौशल्याचे काम त्या संकल्पाने केले. तो त्या प्रत्येकाचा अहंकार झाला आणि त्याने भेदबुद्धितून चराचराची लावणी केली. याप्रमाणे निराकारातून ह्या संकल्पाची डहाळी खाली येऊन ह्या प्रपंचाचा विस्तार होतो.

संकल्पवाद्यांच्या तोंडून ही मुक्ताफळे बाहेर पडतात न पडतात तोच स्वभाववादी त्यांचा उपहास करीत म्हणाले, "तुम्ही तर चांगलेच विचारवंत दिसता!"

परब्रह्मरूपी संकल्पाची लीन अवस्था जर मानायची तर प्रकृतिवादी लोकांची प्रकृतीच मानावी की, पण ते राहू दे. तुमचे म्हणणे काही बरोबर नाही. तुम्ही या क्षेत्राचा निर्णय करण्याच्या भानगडीत पडूच नका. आम्ही सगळे समजावून सांगतो. अहो, हे सगळे स्वभावतःच तसे आहे. आकाशातील मेघांमध्ये पाणी कोणी भरले, ह्या पोकळीत ताऱ्यांचे समुदाय कुणी धारण केले, गगनाचे छत कुणी उभारले, कधी नि कसे उभे केले, वाऱ्याने सर्वकाळ हिंडत असावे हे कुणाचे मत आहे, कुणाची आज्ञा आहे. शरिरावर केसांची लावणी कोण करते, समुद्र कोण भरतो, पावसाच्या धारा कोण निर्माण करतो? कोणी काही करत नाही. हे क्षेत्र स्वभावतःच असे आहे.

कोणी घडवत नाही, कोणी मोडत नाही. ते कोणाचे वतन नाही आणि काही नाही. जो याला जपेल त्याला त्याचा उपभोग मिळतो एरवी नाही इतकेच."

हे स्वभाववादी लोकांचे म्हणणे काळवादी लोकांना मुळीच आवडले नाही. ते रागावून म्हणाले, "वाहवा, काय पण मांडणी. अहो तुमचे म्हणणे खरे मानावयाचे मग एकटा काळच ह्या क्षेत्राचा उपभोग घेतो त्याचे स्पष्टीकरण कसे करावयाचे? मृत्युरूपी रागीट सिंहाची ही दरी आहे. महाकल्पाच्या पलीकडे एकदम झडप घालून तो सत्यलोकरूपी हत्तीचे समुदाय लोळवतो ते? हा काळरूपी सिंह स्वर्गाच्या अरण्यात शिरून नित्य नवे लोकपाल आणि दिग्गज नाहीसे करतो की. याच्या नुसत्या अंगच्या वाऱ्याने जीवमृग निर्जीव होऊन जन्म-मृत्यूच्या गर्तेमध्ये भ्रमत रहातात. अहो, ह्याचा पंजा तरी केव्हढा आहे बघा! सर्व आकारमात्र पदार्थ त्याने सहज आपल्या नख्यांमध्ये कवळून घेतले आहेत. पण हे सगळे तुम्हाला सांगून काय उपयोग आहे? तुम्हा स्वमताभिमानी लोकांचा दुराग्रहच विलक्षण आहे. तुमच्या व्यर्थ बडबडीला कोण पुरे पडणार आहे? तुम्हाला काळाची सत्ता पटली तरीसुध्दा तुम्ही आपल्या मताचा अभिमान धरून बसणार हे आम्हाला माहीतच आहे पण लक्षात ठेवा की, ह्या क्षेत्रावर फक्त काळाचीच सत्ता चालते, मग ते तुम्ही माना किंवा मानू नका."

अर्जुना, याप्रमाणे या क्षेत्रासंबंधाने अनेक वाद आहेत. नेमिषारण्यामध्ये ऋषींनी याविषयी पुष्कळ वादविवाद केला, चर्चा केली असे पुराणाचे साक्षीभूत आधार आहेत. या क्षेत्रासंबंधी अनुष्टुप् इत्यादी छंदात पुष्कळ काव्यरचना झाली आहे. त्याचा गर्वही केला जात आहे. वेदाचे बृहत्सामसूत्र ज्ञानदृष्टिने पवित्र पण त्यालाही हे क्षेत्र म्हणजे काय याचा निर्णय करता आला नाही. आणखी पुष्कळ युक्तियुक्त महाकवींनी आपली बुद्धिमत्ता ह्या कामात खर्च केली पण उपयोग झाला नाही. हे क्षेत्र केव्हढे आहे, हे नक्की कोणाच्या मालकीचे आहे, याचा काही निर्णय कुणाला करता आला नाही.

ही सर्व मते तुझ्या कानावर असावी म्हणून सांगितली. आंधळ्यांनी हत्तीच्या आकाराचा निर्णय करावा, तसा प्रकार इथे झाला. ज्याच्या हातास हत्तीचे पोट लागले तो म्हणे हत्ती भिंतीसारखा. पाय लागले तो म्हणे खांबासारखा. कान लागले तो म्हणे सुपासारखा आणि ज्याच्या हाती शेपूट आले तो म्हणे अहो काय सांगता काही तरी? हत्ती तर आहे दोरीसारखा. तर सोंड हाती आलेला आंधळा मनुष्य म्हणाला अहो हत्ती तर अजगरासारखा!

ह्या सगळ्या आंधळ्यांना हत्तीचे पूर्ण रूप जसे कधी कळलेच नाही, त्यांच्या हाती आलेल्या अवयवाचेच एकांगी ज्ञान त्यांना झाले. आपलेच म्हणणे बरोबर असा आग्रह जसे ते आंधळे धरतात, त्याप्रमाणे इथे घडले आहे. त्यांना क्षेत्राचे पूर्ण ज्ञान झालेले नाही.

अर्जुना, हे क्षेत्र कसे आहे, काय आहे हे मी तुला साद्यंत सांगतो ऐक. हा देह म्हणजेच हे क्षेत्र छत्तीस तत्त्वांचे बनलेले आहे. ही छत्तीस तत्त्वे जेव्हा एके ठिकाणी मिळतात तेव्हा त्या समूहास क्षेत्र असे नाव दिले जाते. आत तुला छत्तीस तत्त्वे सांगतो—

**५ पंच महाभूते**

अनुक्रमणिका

**१ अहंकार**

**१ बुद्धी**

**१ अव्यक्त म्हणजे निराकार प्रकृति**

**१० दहा इंद्रिये (५ ज्ञानेंदिये, ५ कर्मेंद्रिये)**

**१ मन**

**१० दहा विषयांचा मेळावा**

**१ सुख**

**१ दुःख**

**१ द्वेष**

**१ चेतना**

**१ धृति**

**१ संघात**

**१ इच्छा**

३६ याप्रमाणे ही छत्तीस तत्त्वे होतात. आता प्रथम महाभूते कोण, विषय कोणते, इंद्रिये कोणती, कशी हे निरनिराळे एकेक सांगतो.

पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश ही पाच महाभूते आहेत. ह्या पाचांची गाठ पडली की देहाचा आकार व्यक्त होतो. अहंकार जशी काही त्यांचा मेळ होण्याचीच वाट पहात असतो. जागृती आली की स्वप्न लपते, अमावस्येचा चंद्र गुप्त असतो, लहान बालकामध्ये तारुण्य गुप्त असते, कळीमध्ये सुवास लपून असतो, काष्ठांमध्ये अग्नि अव्यक्त असतो त्याप्रमाणे प्रकृतीच्या पोटात लपून गुप्त असलेला अहंकार देहाकृति तयार झाल्याबरोबर तिचा ताबा घेऊन ती व्यापून टाकतो. हाडांत गुप्त असलेला ज्वर जसा कुपथ्याची वाट पहात असतो आणि कुपथ्य झाल्याबरोबर शरीर व्यापून टाकतो तसा हा अहंकार पंचभौतिक मेळावा झाल्याबरोबर त्या घराचा ताबा घेतो, आणि त्या देहाला चहूंकडे नाचवतो. ह्या अहंकाराचे असे आश्चर्य आहे की, तो अज्ञानी जीवांच्या फारसा वाटेला जात नाही. सज्ञानी जीवांच्या गळ्याला मात्र मिठी घालतो आणि त्यांना आपल्या लहरीप्रमाणे हिंडवतो, नाना संकटात घालतो.

पंचमहाभूते, अहंकार आणि मग बुद्धि. अर्जुना, बुद्धि, आत्मा आणि अहंकार यांच्यामधील जागेत रहाते. ज्ञान ह्या पदार्थाचे बुद्धि, हे उत्पत्तिस्थान आहे. ती सत्त्वगुणाची वृद्धि आहे. आता तिचे कार्य काय असे पाहिले तर दिसते की, कामाच्या जोरावर वृत्तिसह इंद्रिये विषयांचे समुदाय लुटून आणतात. त्या लुटीमध्ये उत्तम, मध्यम, अधम सर्व पदार्थाचा समावेश असतो. सामान्यतः इंद्रिये निवड करीत नाहीत. आत आलेल्या मिश्र लुटीचा हिशोब बुद्धि पहाते. तिला हा हिशोब जीवापुढे मांडावा लागतो. इंद्रियांनी आणलेली वस्तू, निरखून-पारखून हे पाप, हे पुण्य, हे सुख, हे दुःख हे मलिन, हे चोख अशी योग्य निवड ती करते आणि जीवापुढे ठेवते.

निंद्य, उत्तम, लहान, थोर ह्याबद्दलचा बुद्धिचा निवाडा जीव मान्य करतो. किंबहुना असे म्हणावे की असा निवाडा करण्याचे जीवाचे साधन म्हणजे बुद्धि! अर्जुना, हे जे पदार्थाविषयी निश्चय करणारे तत्त्व त्याला बुद्धि म्हणावयाचे हे ध्यानी घे.

आता तुला अव्यक्ताचे लक्षण सांगतो, अर्जुना, सातव्या अध्यायात सांख्यमताचे विवेचन करताना परा आणि अपरा अशी दोन प्रकारची प्रकृति तुला सांगितली होती. त्यातील परा म्हणजे जीव दशा नामक पराप्रकृति तीच इथे अव्यक्त या नावाने सांगतो आहे. ही परा प्रकृति जीवरूपाने व्यक्त होते, आणि स्थूल धर्म टाकून हे जीव पुन्हा तिच्या ठिकाणीच लीन होतात. रात्र संपली की तारा आकाशात लोपून जातात. रात्र झाली की प्राण्यांच्या क्रिया थांबतात. देह गेला की देहादिक उपाधि केलेल्या कर्माच्या पोटात लीन होतात. बीजाच्या लहानशा आकारात समस्त वृक्षपण साठवले जाते किंवा वस्त्रपण तंतूरूपाने रहाते तसे स्थूळ धर्म सोडून पंचमहाभूते आणि त्यांच्यापासून निर्माण झालेले प्राणिसमुदाय ह्या परा प्रकृतीत लीन होतात. लोपून जातात लपून रहातात. ह्या परा प्रकृतीलाच अव्यक्त असे दुसरे नाव आहे.

आता इंद्रियभेद सांगतो. कान, नाक, डोळे, त्वचा आणि जिव्हा ही पाच ज्ञानेंद्रिये आहेत. ह्या पाच ज्ञानेंद्रियाच्या मार्फत बुद्धि सुखदुःखाची वाटाघाट करते.

“वाचा, हात, पाय, उपस्थ आणि गुद” ही पाच कर्मेंद्रिये आहेत असे मोक्षाचे स्वामी श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणाले, “या शरिरांत प्राणाची स्त्री जी क्रियाशक्ति ती या पाच द्वारांनी शरिराच्या आत बाहेर येरझारा करते.” ही दहाहि इंद्रिये किंवा “करणे” मी तुला सांगितली. आता मन म्हणजे काय आणि त्याचे स्वरूप काय हे समजावून सांगतो. अर्जुना हे ध्यानात ठेव की मन ही वेगळी वस्तू नाही. दहा वायूंनी शरिरातील दहा जागांचा आश्रय केला पण वायूचे चांचल्य आश्रयरहित राहिले म्हणून त्यान रजोगुणाचा आधार शोधला. ह्या चांचल्याला मन हे नाव आहे. ती एक कल्पना आहे, त्या कल्पनेच्या संगतीनेच ब्रह्माला जीवदशा आली आहे. हे मन इंद्रिये आणि बुद्धि यांच्या मधल्या जागेत रजोगुणाच्या खांद्यावर चंचलपणाने तरळत असते. आकाशाचा नीलिमा किंवा मृगजळाच्या लाटा जशा केवळ आभासात्मक असतात त्याप्रमाणे ह्या मनाचे अस्तित्व आभासात्मक आहे. पण शुक्रशोणिताचा मेळ झाला की पंचमहाभूते एकत्र येतात, वायुतत्त्व दहा ठिकाणी विभागले जाते, आणि त्या वायूचे चांचल्य बुद्धिच्या बाहेर पण अहंकाराच्या उरावर बळकट होऊन बसते आणि बुद्धिचे दार झाकून टाकते. ते प्रवृत्ती उत्पन्न करते, कामाला सामर्थ्य देते, अहंकाराला डिवचून उठवत रहाते, इच्छा वाढवते, आशेला चढवते आणि भयाची पाठराखण करते. त्याच्यामुळेच द्वैताची उत्पत्ती होते. अविद्या त्याच्या जोरावर बलवान होते. ते चांचल्य किंवा मनच जीवाला इंद्रियात ढकलून देते. संकल्पाने सृष्टिची रचना करते, विकल्पाने ती रचना मोडून टाकते. मनोरथाच्या उतरंडी रचते, उतरते ते भ्रान्तीचे कोठार आहे. ते वायुतत्त्वाचा आतला गाभा आहे.” भगवंतांनी मनाचे हे असे वर्णन केले.

गुरूदेव रानडे म्हणत “नेमासाठी जागा निर्वात असावी. वायु हे पृथ्वीचे मन आहे, तो आपल्या ठिकाणीही असलेल्या वायुशक्तीत आणखी चांचल्य निर्माण करतो.” भाऊसाहेब महाराज नेमाला बसत त्या जागा पाहून त्या सर्व निर्वात आहेत हे त्यांनी जाणले. जमिनीत खड्डा काढून त्यात उपकरणे टाकूनही महाराज कधी कधी नेमास बसत व नेम इतक्या एकाग्र चित्ताने चालावयाचा की त्या उपरण्याखाली एकदा एक नाग

वेटोळे घालून स्वस्थ बसलेला आढळला.

देव पुढे म्हणाले, “अर्जुना, आता विषयांचे प्रकार ऐक. शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध हे पाच ज्ञानेन्द्रियांचे पाच विषय आहेत. हिरवा चारा पाहून जसा पशु भांबावून धावत सुटतो तसा ह्या पाच द्वारांनी ही ज्ञानेंद्रिये आपआपले विषय लुटण्यासाठी बाहेर पडतात. लूट आत आणत असतात. स्वरवर्णाचा उच्चार, हाताने घेण्याची, टाकण्याची क्रिया, पायाने चालण्याची क्रिया, व मलमूत्राचा त्याग हे पाच कर्मेंद्रियांचे पाच विषय आहेत. त्या विषयांचा पहाड बांधून क्रियेचा व्यवहार चालू असतो. अर्जुना, याप्रमाणे ह्या देहात असे दहा विषय असतात.

आता इच्छा म्हणजे काय हे सांगतो. अर्जुना, मागे भोगलेल्या गोष्टीची आठवण होऊन किंवा दुसऱ्याच्या तोंडून अगदी उडी मारून कानाने उत्सुकतेने ऐकलेल्या गोष्टीमुळे, वृत्ति चेतवली जाते त्याचे नाव इच्छा. इंद्रियांची आणि विषयांची भेट झाल्याबरोबर कामाचा हात धरून इच्छा झपाट्याने उठते. ह्या इच्छेला इष्टानिष्ट काही कळत नाही. ती बुद्धिला भ्रम पाडते, वेड लावते, आणि मन त्या इच्छेच्या तावडीत सापडून सैरावैरा धावते. इंद्रिये जेथे प्रवेश करू नये तिथे तोंड घालतात. त्या वृत्तीची मनाला आणि बुद्धिला आवड उत्पन्न होते आणि मग विषयाची अपार गोडी लागते. ह्या वृत्तिलाच इच्छा म्हणावयाचे.

इच्छा उत्पन्न झाली आणि इंद्रियांना हवेसे विषय प्राप्त झाले नाहीत की मग जी वृत्ति उठते त्याला द्वेष म्हणावे.

अर्जुना, आता सुखाची व्याख्या करावयाची. जीवाला जे प्राप्त झाले की इतर सगळ्याचा विसर पडतो. त्याला सुख म्हणावयाचे. ते मनाला, वाचेला, देहाला शपथ घालून स्तब्ध करून सोडते. देहाची स्मृति मोडत मोडत आणते. जे प्राप्त झाले की प्राण पांगळा होतो. सात्त्विकवृत्ति दुप्पट होते, सर्व इंद्रियवृत्तिंना हृदयाच्या एकांतामध्ये सुषुप्तीची गाढ झोप ते लावते. फार काय पार्था सांगू, जीवाला आत्म्याची भेट झाल्यावर जे होते ते “सुख” म्हणावयाचे.

आता दुःखाची व्याख्या सोपी आहे. अशी अवस्था प्राप्त न होता जगणे याचे नाव दुःख. मनोरथ रचल्याने ते सुख प्राप्त होत नाही. मनाने मनोरथ करण्याचे सोडले की सुख आहेच. मन स्थिर असले तर सुख, अस्थिर झाले की दुःख, हे ध्यानात ठेवायचे. थोडक्यात मनाची चंचलता सुखदुःखाला कारणीभूत आहे.

असंग आणि साक्षीभूत अशी जी चैतन्याची सत्ता देहामध्ये चालते तिला चेतना म्हणावयाचे. ही चेतना पायाच्या नखापासून डोक्याच्या केसापर्यंत खडखडित जागी असते. जागृति, स्वप्न, सुषुप्ति या तीन्ही अवस्थामध्ये ती पालटत नाही. ती ह्या जड शरिराला आत्मसंगति, सजीवत्व आणते. जडालाचे तनदशा आणते म्हणून तिला चेतना म्हणावयाचे. पण ती मुळात आत्मसंगति आहे. ही चेतना जड व चेतन पदार्थात सारखीच वावरत असते हे मी तुला खोटे सांगत नाही. राजाला आपले हत्ती घोडे, सैन्य किती आहे ते तपशीलवार माहीत नसते. पण त्याची नुसती आज्ञा झाली की ह्या सैन्याच्या झपाट्याने हालचाली होतात आणि परचक्र जिंकले जाते. चंद्र पूर्ण तेजाने आकाशात उगवला की समुद्राला भरती येते. लोहचुंबक आपल्या सान्निध्याने लोखंडाची हालचाल करविते. सूर्याची संगती मिळाली की, जग आपआपली कामे करू लागते. पिलाच्या तोंडाचा स्पर्श न

होताच कासवी नुसत्या दृष्टिने त्याचे भरणपोषण करते. त्याप्रमाणे त्या चेतनेला आपण काय काय कार्य घडवितो हे माहितच नसले तरी तिने जडामध्ये प्रवेश केला की निरनिराळी कार्ये सुरू होतात. शरिराची तर हालचाल सुरू होतेच पण मन आणि बुद्धि यांना ती चेतनाच टवटवी आणते. प्रकृतीच्या वनामध्ये जशी काही चेतना ही माधवीच आहे, वसंत आहे.

आता धैर्य कशाला म्हणावयाचे? ज्या पाच महाभूतांनी एकत्र येऊन तयार केलेल्या शरिरात ती स्वभावतःच एकमेकांचे शत्रू असलेली भूते सलोख्याने ज्या वृत्तिच्या जोरावर रहातात त्याला अर्जुना, मी धृति किंवा धैर्य म्हणतो. एरवी पाणी पृथ्वीचा नाश करते, पाण्याचे शोषण तेज करते, तेज आणि वायू यांची कायमची झुंज चालते आणि वायूला आकाश सहज गिळून टाकते. ते आकाश शरिरात प्रवेश करूनही कोणत्याही वेळी कशाचीही एकरूप न होता अलग रहाते.

ही पाच महाभूते बाहेर एकमेकाचा नाश करण्यासाठी टपलेली असतात, पण ह्या देहामध्ये ऐक्यभावाने रहातात, एकमेकास साह्यकारी होतात. वैराची भाषा सोडून देतात. एकत्र राहून एकजण दुसऱ्याचे पोषण करतो. शरिराच्या बाहेर त्यांचे एकमेकाशी पटत नाही पण शरीरात मात्र मैत्रीने राहून ती पाची महाभूते कार्य करतात. हे ज्या धैर्याच्या जोरावर घडते त्याला मी धृति असे म्हणतो.

वर सांगितलेल्या पस्तीत तत्त्वांचा जो मेळावा त्यास संघात हे छत्तीसावे तत्त्व म्हणावयाचे. मी तुला ही छत्तीस तत्त्वे वेगवेगळी करून दाखवली. या सर्व तत्त्वांचे मिळून झालेले हे शरीर त्याला क्षेत्र असे नाव आहे. चाके, धुरा, छत वगैरे रथांगे मिळून रथ होतो. त्याप्रमाणे शरिराच्या खालच्या वरच्या अवयवांना मिळून देह हे नाव आहे. हत्ती, घोडे, पायदळ, रथ या सर्वांच्या समुदायास सेना म्हटले जाते. अक्षरांचे पुंजे एकत्र झाले की वाक्य तयार होते, ढगांच्या समुदायास अभ्र म्हटले जाते, नाना प्रकारच्या सर्व जीवांना मिळून जग ही संज्ञा प्राप्त होते. पार्था, ह्या छत्तीस तत्त्वांच्या समुदायास निरनिराळी नावे दिली जातात. कुणी देह म्हणतात, कुणी शरीर म्हणतात, आम्ही त्यालाच इथे पापपुण्याचे पीक येते म्हणून “क्षेत्र” म्हणतो. स्थावरापासून ते परब्रम्ह्माच्या अलिकडच्या टप्प्यापर्यंत जे जे काही आहे त्याला क्षेत्र हेच नाव आहे. ते उत्पन्न होते आणि नाहीसे होते.

गुण आणि कर्म यांच्या संगतीत पडल्यावर देव, मनुष्य, सर्पादि योनी अशा वेगवेगळ्या प्रकारच्या क्षेत्रांची रचना त्या दोहोप्रमाणे वेगवेगळी होते. गुण व कर्म यांची चर्चा पुढे करू या.

क्षेत्राचे सविस्तर रूप मी तुला आता सांगितलेच आहे. आता ज्ञानाचे रूप सांगतो. कोणी ह्या ज्ञानासाठी मूर्ध्निआकाशाचा लय करतात म्हणजे आकाश गिळतात. स्वर्गाला आडमार्ग समजून डावलून जातात. सिद्धीची आशा धरत नाही, ऋद्धीची आकांक्षा बाळगत नाही, योगाचे कष्ट तुच्छ मानतात कोणी तपरूपी डोंगरी किल्ले ओलांडून जातात. कोणी कोट्यवधी यज्ञ करतात, कर्मरूपी वेलींची उलथापालथ करून कर्मत्याग करतात. कित्येक अंतर्बाह्य संग सोडून भजन मार्गास लागतात आणि सुषुम्ना भुयारात शिरतात. या ज्ञानाची मुनीश्वरांना इतकी तहान लागते की, ते वेदरूपी वृक्षाचे पान आणि पान त्याच्यासाठी शोधतात. काहीजण गुरुसेवेने आपल्याला हे ज्ञान प्राप्त होईल असे समजून जन्मभर गुरुसेवा करतात आणि जन्म ओवाळून टाकतात.

अनुक्रमणिका

या ज्ञानाचा प्रकाश पडला की, अज्ञान दूर होते. जीव व ब्रम्ह्म यांचे ऐक्य होते. ते ज्ञान इंद्रियांची द्वारे बंद करते. प्रवृत्तीचे पाय मोडते आणि मनाचे दैन्य घालवून देते. अशी स्थिती या ज्ञानाच्या प्राप्तीने होते. हे ज्ञान उन्मत्तपणाचा ठावठिकाणा उरू देत नाही, संसार उन्मळून टाकते. संकल्परूपी चिखल धुवून टाकते. महामोहाचा ग्रास करून टाकते. आपपर अशी भाषाच उरू देत नाही. अनावर ज्ञेय जे परबम्ह्म ते वेटाळून घेते. त्या ज्ञानाच्या प्रकाशाने बुद्धिचे डोळे उघडतात. जीव आनंदाच्या पोटावर लोळतो. पवित्रपणाचा ठेवाच असलेले हे ज्ञान विटाळलेल्या मनाला चोख करते. देह, बुद्धि वगैरे अनात्म पदार्थांच्या सान्निध्याने आत्म्याला भ्रमाचा क्षयरोग लागलेला असतो तो ज्ञानाचा सहवास मिळाला की बरा होतो. अर्जुना, हे ज्ञान निरूपणाचा विषय होण्यासारखे नव्हे. पण तरीही त्याचा परिणाम निरूपण करण्यासारखा आहे. ते ज्ञान डोळ्याला दिसत नाही. पण ज्ञानाचा प्रभाव पहाता येतो.

कारण हे ज्ञान झाले की त्याच्या खुणा शरिरावरच उमटू लागतात आणि त्या ज्ञानी पुरुषाची इंद्रिये ज्या क्रिया करतात त्यावरून त्या पुरूषाच्या ज्ञानाची खोली कळते. झाडे सुंदर दिसू लागली की, वसंतऋतूचे आगमन झाले असे आपल्याला कळते, त्याप्रमाणेच बाह्य क्रियावरून ज्ञानी पुरुषाच्या ज्ञानाची कल्पना येते.

अरे बाबा, वृक्षाच्या मूळाना पाताळात पाणी सापडते. ते पाणी आपल्या डोळ्याना दिसत नाही पण फांद्याचा विस्तार पाहून आपल्याला कळते ना की मुळांना पाणी सापडले?

कोंब टवटवीत दिसला की जमीन ओली, मृदू आहे हे समजतेच ना? उत्तम आचार पाहिला की, त्या कुळवंताच्या कुळाचा थोरपणा कळतो ना? आदरातिथ्याच्या लगबगीवरून पाहुण्यावरचे प्रेम व्यक्त होते ना? नुसते दर्शन झाले की त्यामुळे झालेल्या समाधानावरून पुण्यपुरूषाचे दर्शन झाले हे समजते ना? केळीत कापूर उत्पन्न झाल्याचे सुवासावरून कळते ना! ज्याप्रमाणे भिंगाच्या आत ठेवलेला दिवा प्रकाशाने समजतो. त्याप्रमाणे हृदयामध्ये ज्ञान झाले की त्याच्या पदमुद्रा देहावर उमटू लागतात, देहाच्या क्रियावर उमटू लागतात.

अर्जुना, आता ज्ञानी पुरुषांच्या बाह्यक्रिया तुला वर्णन करून सांगतो. त्या क्रियांचा मागोवा घेत आपल्याला त्याच्या मनापर्यंत पोहचायचे आहे. तेव्हा मी सांगतो आहे त्याकडे तू लक्ष दे, सांगतो ही चिन्हे लक्षपूर्वक ऐक.

प्रथम असे दिसते की, अमानित्व हा गुण त्या ज्ञानी पुरुषाच्या ठिकाणी सहज भावाने भरून रहातो. कोणत्याही बाबतीत दुसऱ्याची बरोबरी करणेसुद्धा त्याला आवडत नाही. मग वरचढपणा करण्याची तर गोष्टच नको. आपल्या ठिकाणी मोठेपणा आहे ह्याची त्याला जाणीवसुद्धा नसते. आणि कुणी तशी जाणीव करून दिलीच तर त्या संभावितपणाचे त्याला ओझे वाटू लागते.

अशी कथा आहे की, श्रीभूदेव मुखोपाध्याय यांनी आपली एक लाख साठ हजाराची संपत्ति दान करून आपले वडील श्री. विश्वनाथ तर्कभूषण यांच्या स्मृत्यर्थ “विश्वनाथ फंड” स्थापन केला. दरवर्षी विद्वान, सदाचारी व्यक्तींना प्रत्येकी पन्नास रूपये पाठविले जाते. विद्वानांना कुठलीही तोशीस पडू नये अशी काळजी घेतली जात असे. ऑफिसमधल्या एका कारकुनाने ज्याना पुरस्कार पाठविला त्यांची यादी केली आणि वर

शीर्षक घातले "यावर्षी ज्या अध्यापकांना व विद्वानांना विश्वनाथवृत्ति दिली गेली त्यांची यादी.

ही यादी गॅझेटमध्ये छापली जावयाची म्हणून कर्मचाऱ्याने यादी भूदेवांच्या समोर ठेवली. भूदेवांनी शीर्षक पाहिले आणि थोडे रागावूनच ते म्हणाले, "अहो, हे तुम्ही काय लिहिले आहे? असे लिहा यावर्षी ज्या ज्या अध्यापकांनी व विद्वानांनी विश्वनाथवृत्ति स्वीकारण्याची कृपा केली त्यांची नामावली."

देव म्हणाले, "अर्जुना, असलेले गुण वर्णन केले, मानास योग्यच म्हणून कुणी मान देऊ लागला, लोकांनी मान द्यावा अशी योग्यता प्रकट झाली की, पारध्याने धरलेल्या मृगासारखी त्याची तडफड होते. पोहणारा भोवऱ्यात सापडला की कधी यातून सुटेन अशी त्याची तळमळ होते, तसा मान घेण्याचा प्रसंग आला की तो गडबडून जातो.

डी. लिट. ची पदवी घेण्याच्या प्रसंगी श्रीगुरूदेव रानड्यांचे तसे झाले. ते पदवी घेण्यास उठले, समोर गेले आणि पदवी न घेताच गडबडीने परत आपल्या खुर्चीवर जाऊन बसले. विद्यार्थीदशेत चॅन्सेलरचे सुवर्णपदक मिळाल्यावर ते पदक लावून फोटो काढावा अशी मित्रांची आग्रहाची मागणी त्यांनी फेटाळली. वर म्हणाले, "पदक लावून फोटो काढायला मी काय बेंदराचा बैल आहे?"

एका फोटोत सगळी मंडळी बसलेली आहेत व गुरुदेव उभे आहेत. ते म्हणावयचे, "हा फोटो मला सर्व फोटोत आवडतो."

ज्ञान असे सहज क्रियेतून प्रकट होते असे देव सांगत आहेत. ते पुढे म्हणाले, "सन्मानाची चाहूल लागली तरी त्याला संकटप्राय वाटते. तो आपल्याकडे मोठेपणा येऊच देत नाही. आपली पूज्यता आपल्या डोळ्यांनी आपण पाहूच नये, आपली कीर्ति आपल्या कानांनी ऐकूच नये, हा अमुक, ही आठवणदेखील लोकांना राहू नये अशी त्याची इच्छा असते, खटपट असते, स्वतःचे मोठेपण कसकसे झाकता येईल हे तो पहात असतो. आणि हे झाकून घेऊन त्याचवेळी लोकांवर उपकार करत असतो.

मालूताई गंमतीची गोष्ट आहे. माझे आजेसासरे पूज्य आबासाहेब सरकारांचे सर्वच आचरण ऋषितुल्य होते. माझे सासरे बाबासाहेब सरकार पदवीधर झाल्याक्षणीच त्यांच्या हाती राज्यकारभार सोपवून ते श्रीजगदंबेच्या सेवेसाठी मोकळे झाले होते. दिवस निम्मा होईपर्यंत स्वारी सोवळ्यात असायची. वाड्यात खालच्या मागच्या चौकात ते उभे होते. एक नव्यानेच नोकरीस ठेवलला नोकर दुधाचा तांब्या घेऊन घरी जाण्याच्या उद्देशाने निघाला होता. सरकार पहात होते की, नोकर, चोरी करून चालला आहे. नोकराने स्वारीला ओळखले नाही. त्याला वेषावरून कुणी व्यक्ति, आश्रित मंडळीपैकी असेल असेच वाटले. अनुष्ठान संपले असेल आणि उभे असतील. आता तो पुढच्या चौकांत येणार तोच सरकारांनी त्याला हाक मारली आणि म्हटले, "हे बघ, तू ह्या मागच्या दाराने जा. पुढच्या थोरल्या दरवाजात पहारेकरी आहेत. तुला ते धरतील." असे हे जगावेगळे अमानित्व आणि त्याचबरोबर उदारपण!

देव म्हणाले, "आपला मोठेपणा तो पुरुष इतका झाकून घेतो की, त्याला सत्कार करून घ्यावा,

अनुक्रमणिका

मानसन्मान घ्यावा असे वाटणे अशक्यप्राय आहे. कुणी नुसता नमस्कार केला तरी त्याला मरणप्राय दुःख होते. तो स्वतः बृहस्पतीसारखा विद्वान असतो. पण कदाचित महिमा वाढेल म्हणून वरवर आवडीने वेड पांघरतो. चातुर्य लपवतो, महत्त्व दवडतो आणि वेडच मिरवतो. लौकिकाचा त्याला उबग असतो, शास्त्रांचा वादविवाद करण्याचा त्याला कंटाळा असतो आणि काही न करता स्वस्थ रहाण्यावर त्याचा भर असतो. जगाने आपली अवज्ञा करावी, नातलगांनी आपल्या नादी लागू नये. अशी त्याच्या जीवाची इच्छा असते. ज्या कृतीने नम्रता बाणेल, स्वतःचा कमीपणा हेच भूषण होईल. अशाच गोष्टी तो बहुतांशी करतो.

एका गावामध्ये कुळशेखर आणि नंबियार असे दोघे विद्वान होते. कुळशेखर आपल्या घराच्या मागे असलेल्या मंदिरात पुराण सांगत असे. नंबियाराची गणना विद्वानांत होती. पण कुळशेखरचे पुराण गावकऱ्यांना जास्त आवडत असे. अर्धाअधिक गाव रोज पुराण ऐकण्यास जमावयाचा. बरेच दिवस हा क्रम चालला. एक दिवस नंबियारच्या मनात मत्सर उत्पन्न झाला. तो मनात म्हणू लागला, “हाच कोण एवढा विद्वान? लोक त्याच्याच पुराणाला काय म्हणून गर्दी करतात. माझ्याकडे का नाही येत?”

होता होता त्या मत्सराने चांगलेच उग्ररूप धारण केले. त्या दिवशी नंबियार खूप भुकेजून घरी आला तर पत्नी घरी नाही. हे पाहिल्याबरोबर तो खवळला. मनात शंका आली की, आपली पत्नीही कुळशेखराच्या प्रवचनास गेली की काय? तो रागारागाने देवळात गेला. पत्नी कुळशेखराचे रामायण प्रवचन ऐकण्यात तल्लीन झालेली पाहून तर त्याच्या रागाला सीमाच राहिली नाही. तो मोठ्याने ओरडून कुळशेखरास म्हणाला, “मुर्खा, तुला कथा कशी सांगायची हे तरी माहित आहे का? तू सांगणारा एक मूर्ख आणि हे ऐकणारे शतमूर्ख!”

हे रागाचे बोलणे ऐकूण कुळशेखर गप्प राहिला. सर्व श्रोतेही स्तब्ध झाले. नंबियारची पत्नी बिचारी उठून मुकाट्याने नंबियारच्या मागे चालू लागली. कुळशेखराने पोथी गुंडाळली आणि तोही देवळाबाहेर पडला.

नंबियार घरी आला पण इतका रागावलेला होता की, पत्नीने कितीही विनवण्या केल्या तरी त्याने अन्नाला स्पर्शही केला नाही. उपाशीच बिछान्यावर जाऊन पडला. आणि मग हळूहळू त्याचा राग कमी होऊ लागला आणि विचार येऊ लागले. तो मनाशी म्हणू लागला, “मी आज काय केले हे, कुळशेखर विद्वान आहे. त्याचे जीवन पवित्र आहे. मी विनाकारण आज त्याचा अपमान केला.” पश्चातापाने त्याचे मन व्याकुळ झाले. मग त्याने निश्चय केला की, उठल्याबरोबर सकाळी जाऊन कुळशेखराचे पाय धरून क्षमा मागायची हा निश्चय झाल्यावर त्याला थोडे बरे वाटले पण झोप येईना. अगदी पहाटे तो उठला आणि शुचिर्भूत होऊन घराबाहेर पडला. त्याला वळचणीजवळ कोणीतरी कांबळे पांघरूण बसलेला मनुष्य दिसला. नंबियारने विचारले, “कोण आहे ते भाऊ”?

तो अज्ञात मनुष्य झटकन उठला आणि नंबियारच्या पायावर त्याने डोके ठेवले. पाय मागे घेत नंबियारने पुन्हा विचारले, “कोण बाबा तू, काय झाले.? तो होता कुळशेखर!

कुळशेखरने हात जोडून म्हटले, “आपण मला दोष दिला याचा मला फार आनंद झाला. पण माझा अपराध काय हे मात्र मला पुष्कळ विचार करूनसुद्धा कळत नाही. माझ्या हातून काही अपराध नक्की झाला आहे

म्हणून आपण रागावला. मी पापी आहे. दयाभाव ठेवून माझ्यावर कृपा करा. माझा अपराध काय ते मला सांगा. मी आता पहाटे येऊन आपल्या कोणत्या कामात व्यत्यय आणला हे मला माहित नाही पण माझ्या अपराधाची क्षमा करा. मला अपराध काय ते सांगा आणि मग जा."

हे कुळशेखरचे बोलणे ऐकून नंबियारच्या काळजाचे पाणी पाणी झाले. त्याने झटकन कुळशेखराचे पाय धरले आणि क्षमायाचना केली आणि कुळशेखराच्या अमानित्वाचा गौरव केला. देव अशा अमानित्वाचे वर्णन करीत आहेत.

देव म्हणाले, "पार्था, ज्याच्या योगाने हा जीवंत आहे की नाही असे लोकांना वाटावे असा त्याचा आयुष्यक्रम असतो, असावा अशी त्याची सारखी खटपट असते. आपण इतक्या बेताने चालावे की हा मनुष्य चालतो आहे की वाऱ्यावर तरंगत आहे असा भ्रम जगाला व्हावा, असे त्याला वाटते, माझ्या अस्तित्वाचा लोप व्हावा, नाव आणि रूप हरवून जावे. कुणालाही माझी भीती वाटू नये, असे त्याचे नवस असतात तो नित्य एकांतात जात असतो. एकांतात जाणे हेच त्याच्या दृष्टिने खरे जगणे असते. वायूचे आणि त्याचे पटते, आकाशाशी बोलणे त्याला आवडते. झाडे त्याला प्राणप्रिय असतात, अर्जुना असा एखादा पुरुष जेव्हा तू पहाशील तेव्हा तू खुशाल समज की तो आणि ज्ञान एका शय्येवर झोपतात. अमानित्व असे मी ज्याला म्हणतो ते अशा प्रकारचे असते."

आता अदंभित्वाचे वर्णन करतो.

एकदा एका देवदूताने देवांना प्रश्न केला, "प्रभो, जगात दगडापेक्षा कठीण वस्तू कोणती आहे?" प्रभु म्हणाले, "लोखंड, कारण ते दगड फोडू शकते." देवदूत म्हणाला, "लोखंडापेक्षा कठीण वस्तू कोणती? देव म्हणाले, "अग्नि कारण अग्नि लोखंड वितळवू शकते."

देवदूताने पुन्हा विचारले, "अग्निपेक्षा बलवान कोण?" देव म्हणाले, "पाणी. पाणी अग्निला विझवू शकते." देवदूताने पुन्हा प्रश्न केला "प्रभो, पाण्यावर मात करणारी वस्तू कोणती?"

देव म्हणाले, "वारा, तो पाण्याला इकडून तिकडे ढकलू शकतो. इतकेच काय पाण्याने उत्पन्न झालेले मेघ त्यांचीही आकाशात दाणादाण करून टाकतो."

देवदूताने पुन्हा प्रश्न केला, "देवा वाऱ्यापेक्षा कोणती वस्तू जास्त बलवान आहे?"

देव म्हणाले, "हो, हो आहे ना, दयाळू हृदय. ते अंतःकरण उजव्या हाताने दिलेले दान डाव्या हाताला कळू देत नाही. सगळ्या जगात हे हृदय सर्व शक्तिमान आहे"

देव सांगत आहेत, "अर्जुना, हा मनुष्य आपण केलेले पुण्यकर्म कधीही सांगत नाही. प्राण गेला तरी प्रकट करीत नाही. लोभी मनुष्य धन पुरून ठेवतो आणि जीव गेला तरी ती जागा कुणाला कळू देत नाही.

अनुक्रमणिका

खोड्याळ गाय आलेला पान्हा चोरते. वेश्या आपले वय उतार आहे हे कळू देत नाही. श्रीमंत मनुष्य अरण्यात सापडला की आपली श्रीमंती लपवतो. कुलवधू आपले अवयव शालीनतेने झाकून घेते, शेतकरी बी पेरले की त्यावर माती पसरतो. त्याप्रमाणे अदंभी मनुष्य आपण केलेले दानपुण्य लपवून ठेवतो. बाह्य वेष कुणाच्या डोळ्यात भरेल असा करत नाही. लोकांची हांजी हांजी करत नाही. आपण केलेला धर्म वाचेच्या ध्वजाला लावून मिरवत नाही. केलेला परोपकार सांगत नाही. केलेल्या अभ्यासाचा डौल मिरवत नाही. भरभराट व्हावी, ऐश्वर्य मिळावे म्हणून केलेले पुण्य विकत नाही. असा हा ज्ञानी पुरुष आपण दंभ करीत नाही आणि दुसऱ्याचे चालू देत नाही.

द्वारका नदीच्या तीरावर तारापीठ नावाचे एक स्थान आहे. एक सज्जन तारादेवीचे दर्शन घेण्यासाठी आला होता. त्याने नदीत स्नान केले व तो नदीच्या किनारी आन्हिक करण्यासाठी बसला. वामक्षेपा नावाचे संत नदीमध्ये स्नान करीत होते. स्नान करताना त्यांनी हसत हसत त्या आन्हिक करणाऱ्या सज्जनाच्या अंगावर पाणी उडवण्यास सुरवात केली.

तो सज्जन रागावून म्हणाला, “तुम्ही का आंधळे अहा की काय? मी आन्हिक करतो आहे हे दिसत नाही तुम्हाला?” फार मोठा जमीनदार असल्याने त्या सज्जनाला वामक्षेपाच्या वर्तनाचा फारच राग आला होता.

आणखी जोरात पाणी उडवत वामक्षेपा म्हणाले, “बाबा रे तू आन्हिक करतो आहेत की कलकत्त्यास मूर कंपनीत बसून जोडे खरेदी करतो आहेत?”

मग मात्र जमीनीदाराचे डोळे उघडले. तो त्या महात्म्याच्या पाया पडत म्हणाला, “महाराज, आपले म्हणणे खरे आहे. खरंच विचार करत होतो की मूर कंपनीत जोडे खरेदी करून मग घरी जावे.”

महात्मा वामक्षेपा पुन्हा एकदा हसले आणि म्हणाले, “अरे, देवाच्या कामात दंभ चालत नाही.” एवढेच एक वाक्य बोलून वामक्षेपा तारापीठला निघून गेले.

देव पुढे सांगू लागले, “हे बघ पार्था, त्या माणसाकडे पाहिले की तो कृश दरिद्री दिसतो. अंगभोगाकडे पाहिले तर तो अगदी कृपण वाटतो. पण धर्माच्या कामी म्हणशील तर आपल्या जवळचे सर्वस्व देण्यास तो मागेपुढे पहात नाही.”

जपानच्या देवालयात एक मोठी घंटा बांधण्याचा विचार ठरला व भिक्षू मदत मागण्यासाठी बाहेर पडले. पुष्कळ पैसे जमा झाले. घंटा ओतली गेली. पण मुशीतून बाहेर काढल्याबरोबर भंगली! दोन तीन वेळा असाच प्रकार झाला. देवालयातील मुख्य भिक्षूंनी सर्वांना बोलावून विचारले, “तुम्ही कुणी एखाद्या दानाचा धिक्कार तर केला नाही ना? घंटा अशी वरचेवर भंगते आहे का बरे?”

सर्वजण विचार करू लागले. शेवटी एक भिक्षू उठला आणि म्हणाला, “प्रभो, मी अपराधी आहे. एका श्रीमान घरी मोठी रक्कम मिळाली. बाहेर येत असताना फाटके तुटके कपडे घातलेली एक मोलकरीण रस्ता

झाडत होती. मला पहाताच पदराच्या शेवटास बांधलेले एक लहानसे तांब्याचे नाणे सोडून तिने माझ्यापुढे धरले व मला म्हणाली, "माझ्याजवळ एवढेच आहे. देवाच्या घंटेसाठी कराल का याचा स्वीकार?" मला हसू आले. या एवढ्याशा नाण्याने घंटेच्या रकमेत का भर पडणार असे वाटून मी तिला म्हटले, "बाई, रस्ता सोड. तुझे हे एवढेसे नाणे घेऊन काय करायचे आहे? प्रभो, माझ्या हातून चूक झाली हे मला कळते आहे आता."

मुख्य भिक्षू कळवळून म्हणाले, "अरे बाकीच्यानी आपल्या संपत्तीपैकी काही अल्पस्वल्प भागच दिला होता. त्या बिचारीने आपल्याजवळचे सर्वस्व देऊ केले होते बाबा, तू त्या घरी पुन्हा जा आणि तिच्याकडून ते नाणे मागून आण. तिने ते अजून पदरात बांधून जपले असेलच. ते नाणे आण तरच घंटा नीट निघेल."

भिक्षूने मुकाट्याने जाऊन ते नाणे मागून आणले. ते नाणे घंटेच्या रसात घातले, घंटा मुशीतून अखंड, उत्तम निघाली पण ते नाणे तिच्या डेऱ्यावर जसेच्या तसे चमकत होते. वितळलेसुद्धा नाही!

देव अशा सर्वस्वदानाच्या गोष्टी सांगत आहेत. ते म्हणतात, "त्याच्या घरी पहावे तर सर्वच वस्तूंचा अभाव!" देह पहावा तर आमचा सुदामदेव बरा पण दान देताना कल्पतरूशी तो पैजा जिंकतो.

पार्था, स्वधर्मामध्ये थोर प्रसंगी अत्यंत उदार आत्मचर्चा करण्यात अगदी हुषार पण इतर बाबतीत वेडा असा हा पुरुष असतो. केळीचे सोपट हलके पोकळ वाटते पण त्या केळीची फळे रसाने भरलेली असतात. मेघाचे शरीर हलके, इतके हलके की वारा त्यांना सहज उडवून लावील. पण एकदा का त्यांनी वृष्टि सुरू केली की सगळे जग जलमय होऊन जाते. इतर सर्व बाबतीत तो दरिद्री असला तरी पूर्णतेच्या बाबतीत तो रेसभरही उणा नसतो. पूर्ण तृप्त असतो. हे असो अर्जुना, अशा चिन्हाचा उत्कर्ष तुला ज्या ठिकाणी दिसेल त्याच्या हाताला ज्ञान चढले आहे असे तू समज.

अर्जुना, अदंभपण म्हणजे काय हे मी तुला सांगितले आता अहिंसेचे लक्षण ऐक. आपआपल्या मते पुष्कळ लोकांनी अहिंसेचे विवेचन केले आहे. पण ती अहिंसा अशी असते की एखाद्या झाडाच्या फांद्या तोडाव्या आणि त्या फांद्यानी त्या झाडाला कुंपण करावे. भुकेची पीडा निवारावी म्हणून आपले हात तोडून विकून निर्वाह करावा किंवा देवाचे देऊळ पाडून त्या दगडांनी देवळाच्या आवाराला कोट करावा.

त्याप्रमाणे हिंसा करून अहिंसा साधावी असा निर्णय कर्मकांडाने केला. अवर्षण पडले. सगळ्या जगाला पीडा उत्पन्न झाली म्हणून पर्जन्येष्टी नाना याग करावे आणि त्या इष्टीच्यावेळी पशुहत्त्या करावी हा कुठला न्याय? अशाने अहिंसेचे परतीर कसे दिसणार? हिंसा पेरून अहिंसा उगवेल काय? पण ह्या याज्ञीकाचे धारिष्ट्यच मोठे! त्याला तसे घडले असे वाटते.

आयुर्वेदही त्याच प्रकारचा. एक जीव वाचविण्यासाठी दुसरा जीव घेण्यास त्यांना काही वाटत नाही. रोगी तळमळताना पहातात, लोळताना पहातात आणि त्याची पीडा दूर व्हावी म्हणून चिकित्सा करतात. उपाय करतात. पण ते उपाय कसे असतात? एका झाडाचे कंद खणून काढतात. एक झाड मुळासकट, पानासकट उपटून काढून त्याचे रसायन तयार करतात. काही झाडांची साल सोलून काढतात तर काही फळे देण्याच्या

बेतात असताना क्षाराचे थर देऊन उकडतात. ज्या वृक्षांनी कधीही कुणाशीही शत्रुत्व केले नाही त्याच्या सर्वांगाला चिरे देऊन त्यांचा चीक घेऊन ती झाडे कोरडी करून सोडतात. मग त्याचा मोहरा वळतो हालचाल करणाऱ्या प्राण्यांच्याकडे.

माऊलींचे साऱ्या जगावर अत्यंत प्रेम आहे पण वृक्षांच्याविषयी बोलताना तर त्यांच्या शब्दांना वेगळीच कोवळीक येते. वृक्षांच्या अजातशत्रुत्वाबद्दल त्यांच्या मनात सदा ओलावा असतो, कणव असते.

एक चिनी कविता आहे. त्याचा अर्थ असा--

**विहिरीवर पाणी आणायला गेलो,**
**पण दोराला वेलीने नाजुक वेढा दिला होता.**
**मग तसाच मोकळा घरी आलो,**
**आणि शेजाऱ्याकडून पाणी मागून आणले.**

कविता लहानशीच पण माऊलींची वृक्षवल्लरीवरची माया सांगणारी! त्यांनी असेच केले असते असे आपल्याला वाटावयास लावणारी!

ज्ञानदेव पुढे म्हणतात, म्हणतात, "ही बिचारी झाडे बळी जातातच पण आयुर्वेद प्राण्यांचेही बळी घेतो. त्या प्राण्यांना पकडून त्यांचे पित्त काढून घेऊन आयुर्वेद रोगांनी पीडित अशा लोकांचे रक्षण करतो. अर्जुना, अरे रहाती घरे, वाडे पाडून त्या सामानाने देव्हारे देवळे बांधावी, व्यवहारात लोकांना लुबाडून फसवून अन्नछत्र घालावे, तसा हा प्रकार आहे. डोक्यास गुंडाळण्यासाठी नेसलेले वस्त्र सोडायचे, घर मोडायचे आणि पुढे मांडव घालावयाचा, पांघरूणे जाळून शेकोटी करून शेकत बसायचे, हत्तीला आंघोळ घालायची तसे ह्यांचे वर्तन असते. बैल विकून टाकून त्या पैशाने गोठा बांधावा काय? पोपट सोडून देऊन पिंजरा तयार करावा काय? पण आयुर्वेद ते करत असतो. एक जीव वाचविण्यासाठी दुसऱ्या जीवाची हत्त्या केली तर त्या वाचविण्याला काय किंमत आहे?

काहीनी धर्ममार्ग म्हणून पाणी गाळून घ्यायला सुरवात केली. त्यांना वाटते आपण अहिंसा पाळतो. पण पाणी गाळताना किती जीव मेले? मग पाणी गाळण्याची क्रिया म्हणजे हिंसा म्हणावी की अहिंसा म्हणावी? हिंसेच्या भयाने काही लोक अन्न न शिजविता खातात. त्यांना ते अन्न न पचल्याचे जीव व्याकुळ होतो. मग ही कसली अहिंसा? मी तर तिला हिंसाच म्हणतो.

सुमना अर्जुना, कर्मकांडाचा सिद्धान्त पाहिला तर अहिंसेसाठी केलेली हिंसा न्याय्य आहे असा अर्थ निघतो.

आम्ही "अहिंसा" हा शब्द उच्चारला तेव्हाच बुद्धिला अशी स्फूर्ती झाली की, ह्या विषयावरची वेगवेगळी मते तुला समजावून दिली. आता ही मते कशी गाळावी म्हणून तुला बोलावे हे अपरिहार्य झाले. अहिंसेबद्दल

इतके सूक्ष्म विवेचन का याचा उलगडा तुला व्हावा म्हणून हे सांगितले. अर्जुना, असे दिसते की हा अहिंसेचा विषय निघाला की, हिंसेचेच व्याख्यान होत असते. नाहीतर मी ह्या अहिंसेच्या विवेचनाच्या आडरानात कशाला शिरलो असतो? पण आपल्या मतांचा निर्धार करताना प्राप्त मतांतरे विचारात घेणे आवश्यक असते. निरूपण करण्याची ती मान्य रीतच आहे म्हणून हिंसेचा विषय व मतांतरे तुझ्यासमोर मांडली आहेत.

आता अहिंसेबद्दलचे माझे मत सांगतो, अहिंसेचे लक्षण सांगतो. चित्तात अहिंसा ठसली की बाह्य व्यापार कसे घडतात आणि बाह्य व्यापारावरून चित्तात ज्ञान प्रगट झाले आहे हे कसे कळते ते सांगतो. कसोटीचा दगड जसा सोन्याचा कस सांगतो त्याप्रमाणे अहिंसेने वास्तव्य केलेल्या शरिराच्या आचरणाच्या रीतीवरून त्या शरिरात अहिंसा रहात आहे हे जाणले जाते.

भक्तिविजयात अशी गोष्ट आहे की गढमंडलचा राजा पीपाजी राज्य कारभार सोडून देऊन रामानंदांचा शिष्य होऊन त्यांच्या आज्ञेवरून द्वारकेला देवदर्शनास गेला होता. द्वारकेहून परत येताना वाटेत त्याला एक भला मोठा वाघ भेटला. राणी बरोबर होती वाघ पाहून ती घाबरून गेली.

राजा म्हणाला, “राणी घाबरतेस कशाला? गुरुदेवांनी सगळीकडे हरिरूप पहाण्याचा केलेला उपदेश विसरलीस काय? मला तर त्याच्या ठिकाणी भगवंतच दिसतो आहे.”

राजा पुढे झाला. आपल्या गळ्यातील तुळशीची माळ वाघाच्या गळ्यात घालून तो वाघाला म्हणाला, “मृगेंद्रा मी सांगतो त्या कृष्णमंत्राने मोठमोठे ऋषिमुनी तरून गेले. तू अहिंसा पालन कर. प्राणी मारून खाऊ नकोस. तुळशीपत्रे खाऊन हा जप करीत रहा.”

वाघ तेथून गेला. आठ दिवस राजाच्या आज्ञेप्रमाणे तपाचरण करून त्याने देहत्याग केला. पुढच्या जन्मी तो जुनागढला प्रसिद्ध वैष्णव नरसी मेहता म्हणून प्रसिद्ध झाला. अहिंसा मनात बाणली की आचरण बदलते. त्या आतल्या ज्ञानाचा प्रकाश असा बाहेर फाकतो व बाह्य जगावरही त्याचा प्रभाव पडतो.

ज्ञान आणि मन यांची भेट झाल्याबरोबर अहिंसेचे चित्र बाहेर उमटते ते असे.

अर्जुना, त्या माणसाचे साधे चालणे पाहिलेस तरीसुद्धा तुला वाटेल की मनुष्य काही वेगळा आहे. बगळा माशावर दृष्टि ठेवतो, लाटा न ओलांडता, त्या न मोडता, पाण्याचा आवाज न होऊ देता जसा झपाट्याने पण जपून पाऊल टाकतो तसा तो चालतो. भुंगा कमळावर पाय ठेवताना केसर दुखावतील म्हणून जसा हळुवारपणाने पाय ठेवतो तसा पृथ्वीवरील परमाणुमध्ये लहानसहान जीव आहेत त्यांना पीडा होईल म्हणून तो आपली पावले कारुण्यामध्ये लपवून चालतो. जीवांच्या खाली तो आपला जीव अंथरतो. तो ज्या रस्त्याने जातो तो रस्ताच कृपेने भरून जातो.

अर्जुनमाली नावाचा एक मनुष्य एका यक्षाची मनोभावे पूजा करीत असे. एकदा पूजा करून उठला तर सहा चोर आले. त्यांनी त्याला धरून मारले, बांधले, लूट केली आणि अर्जुनमालीच्या पत्नीस त्रास देण्यास

सुरुवात केली.

अर्जुनमाली मोठ्याने ओरडून म्हणाला, “अरेरे! यक्षा मी फुकट इतके दिवस तुझी पूजा केली. हा सगळा प्रकार पहात तू स्वस्थ बसला आहेस काय? थांब तुझी प्रतिमाच पार फेकून देतो.”

यक्ष जसा काही जीवंत आहे असे तो बोलत होता. यक्ष या त्याच्या भावाने संतुष्ट झाला. त्याने अर्जुनमालीच्या देहात प्रवेश केला. त्याबरोबर त्याला अद्भूत बळ आले, त्याने दोऱ्या तोडल्या, मूर्तीच्या जवळ ठेवलेली लोखंडी गदा उचलली आणि त्या सहाही चोरांना त्याने मारून टाकले. मात्र त्या यक्षाचा आवेश त्या शरिरातून उतरेचना. तो अर्जुनमाली माणसे मारतच राहिला. रोज सहा माणसे तो मारायचा. एक दिवस अर्जुनमाली राजगृहाजवळ येऊन पोचला. तो आल्याची बातमी सुदर्शन शेट यांना मिळाली. महावीराच्या प्रवचनासाठी निघालेले सुदर्शन शेट म्हणाले, “मी पहाततो मला काय काय करता येईल ते. तो तरी मनुष्यच आहे.” लोक म्हणाले, “तो रोज सहा माणसे मारतो. आज पाच मारली आहेत. एखादे वेळी सहावा मनुष्य आपणच व्हावयाचे.”

सुदर्शन तरीही अर्जुनमालीसमोर जाऊन उभे राहिले. अर्जुनमालीने त्यांच्यावर गदा उगारली. पण त्या यक्षाला सुदर्शनांच्या अंगचे अहिंसेचे सामर्थ्य सहन झाले नाही. तो पळून गेला आणि अर्जुनमाली गदेसहित जमिनीवर पडला. त्याला हात देत शेट म्हणाले, “अर्जुनमाली, ऊठ. माझ्याकडे काय पहातोस? चल, आपण दोघे तीर्थकारांची पवित्र वाणी ऐकूया.”

शेटजीनी हात धरून अर्जुनमालीला उठवले आणि तीर्थंकाराच्यासमोर नेले. अर्जुनमाली त्यांना शरण गेला आणि दीक्षित झाला. “मा हतो” हा उपदेश त्याने शिरोधार्य मानून जन्मभर तसे आचरण केले. जिकडे हा अहिंसा बाणून घेतलेला ज्ञानी जातो त्या दिशेवर कृपेचा वर्षाव करतो. तीर्थंकर शिष्य सुदर्शनांनी तसे केले.

देव म्हणाले, “अर्जुना, त्याच्या चालण्याला मी बगळ्याची आणि भ्रमराची उपमा दिली खरी पण माझ्या मनाचे समाधान झाले नाही. आणखी थोडे वर्णन करून सांगतो. हे बघ, मांजरी मोठ्या प्रेमाने आपली पिले तोंडात धरून इकडून तिकडे नेते. एरवी तीक्ष्ण असलेले आपले दात ती पिलाना टोचू देत नाही. प्रेमळ आई आपल्या तान्ह्याची वाट पहात असते तेव्हा तिच्या डोळ्यांत जगावेगळे हळुवारपण असते. वारा घेण्यासाठी कमळाचे फूल हळूहळू हालवले तर तो वारा बुबुळांना टोचत नाही. या सगळ्यामध्ये असलेले मृदुपण आपल्या पावलात आणून तो भूमीवर चालतो. ते पाय ज्या वस्तूंवर पडतील त्यांना सुखच वाटत जाते. लोक सुखीच होत जातात. चालताना कृमिकीटक दिसले तर तो पुढे जात नाही. पाय चुकून पडला तर ह्या भीतीने मागे फिरतो. त्याला वाटते ह्या लहानुल्या जीवामध्ये जो माझा स्वामी भगवंत झोपला आहे त्याची झोप मोडेल. त्याच्या स्वस्थतेत व्यत्यय येईल, याची काळजी वाटून तो कारुण्याने दुसऱ्या मार्गाने जातो. कोणत्याही प्राण्याला दुखवत नाही. अहो तृणामधेही जीव आहे ह्या जाणीवेने तो गवतही तुडवत नाही. मग प्राण्यांना त्रास देत नाही ही कुठली गोष्ट आहे.”

मालूताई, मलकापुरात रामू गुरव नावाचा पहारेकरी होता. विश्वेश्वराची पूजा करावयचा आणि गंध

लावून सकाळी पहाऱ्यावर हजर व्हावयाचा. त्याची परिस्थिती बिकट होती पण काही किती मार्ग सुचविले तरी त्याला काही करावेसे वाटायचेच नाही. आम्ही म्हटले, "तुला शेळी घेऊन देतो तू दरडावर तिला चरायला सोड. तिचे दूध तुला, मुलाबाळांना होईल." त्यावर तो म्हणावयाचा, "ते आणि कुणी करायचं." पहाऱ्यावर बसावे आणि तासाचे टोल द्यावे एवढेच काम त्याला पुरावयाचे.

एकदा भाताची पोती अंबाबाईच्या मंडतात पुढे रचली होती. चिमण्या यायच्या पोत्यावर चोची मारून भात खायच्या फोल खाली पडायचे. एकदा मी देवाला जाणार म्हणून देवघराची किल्ली घेऊन तो उभा होता. मी म्हटले, "रामू, हे सगळे भात एकदा पेट्यांतून भरून घेतले पाहिजे. चिमण्या पोती फोडतात, भात खातात, आपले नुकसान आणि अंबाबाईच्या मंडपात कचरा."

तो मला म्हणाला, "त्या भातांत चिमण्यांचाही वाटा असतोच की, खाईनात जरा."

एरवी व्यवहारात निर्बुद्ध, आळशी, रामू गुरव हे वाक्य मला ऐकवत होता. म्हटलं, "रामू अरे तू तर आज माझा गुरू झालास की! खरे आह तुझं म्हणणं."

संसारात पशुपक्षांचाही हक्क मान्य करणे हे ज्ञानी पुरुषाचे लक्षणे आहे असे देव सांगत आहेत. अहिंसेचे ते एक चिन्ह आहे असे त्यांचे सांगणे आहे. आता रामू गुरवाच्या मनात हा विचार कसा आला असेल असे आजही वाटते आणि निरनिराळ्या प्रसंगात त्यांच्या ह्या शब्दांची आठवण होते.

अहिंसा ज्याच्या मनात बाणली आहे त्या पुरुषाचे चालणे वर्णन करताना देव म्हणत आहेत, "मुंगीला मेरू पर्वत ओलांडता येत नाही. चिलटाला समुद्र उल्लंघून जाता येत नाही. त्याप्रमाणे कोणीही प्राणी भेटला की त्याला ओलांडून जाणे अशा अहिंसापूर्ण पुरुषाला शक्य होत नाही. त्याची चालण्याची पद्धतच तशी असते.

आता त्याच्या बोलण्याचे वर्णन करावयाचे तर त्याच्या वाचेच्या रूपाने दयाच जगत असते. तो जे जे बोलतो त्याचे फल कृपा हेच असते. त्याचे श्वास म्हणजे सुकुमारपणा. त्याचे मुख प्रेमाचे माहेरघर अणि दात म्हणते मधुरपणाला फुटलेले अंकुरच वाटतात. त्याच्या वाणीतून प्रेम पाझरत असते आणि अक्षरे त्या प्रेमाच्या मागे धावत असतात. तो आधी कृपा करतो आणि मग आशीर्वादाचे शब्द उच्चारतो. तसे म्हटले तर तो जास्त बोलतच नाही. बोलावे असे मनात आले की, तो प्रथम विचार करतो की, हा शब्द कुणाला खुपेल काय? एखादा शब्द जास्त गेला तर कुणाच्या वर्मी लागेल काय? कोणाच्या मनात शंका येईल की काय? काही लोक बोलत आहेत, विषय मांडत आहेत तर तो विषय आपल्या बोलण्याने मोडणार तर नाही? आपल्या शब्दाने कुणी भिऊन जाईल, दचकून उठेल, बोलणे ऐकूण उपेक्षा करील असे अनेक प्रकारचे विचार, शंका मनात येऊन तो बोलतच नाही. आपल्या बोलण्याचे कुणालाही क्लेश होऊ नयेत. कुणाचीही भिवई उचलू नये असा भाव चित्तात आणून तो गप्प बसतो.

त्यातून कुणी प्रार्थना केलीच तर मोठ्या प्रेमाने तो थोडासा बोलतो. पण ऐकणाऱ्यास वाटते की, जसे काही आपले मायबापच बोलत आहेत."

अनुक्रमणिका

पूज्य स्वामी स्वरूपानंदांची गोष्ट आठवते. स्वामीजी प्रकृतीने अगदी क्षीण. थोडेच बोलत व तेही अगदी हळू. त्यांच्या एका अनुग्रहीत कन्येने विचारले, "आपण मला तो मार्ग दाखवला तो मी आता दुसऱ्यांना सांगू का?"

स्वामी अगदी हळुवारपणाने म्हणाले, "हो. आणखी बारा वर्षांनी."

आणि म्हणतात की ह्या स्वामीजींच्या या शब्दात उपहासाची सूक्ष्म छटाही नव्हती. आपल्या शब्दांनी दुसऱ्याचे मन कधी दुखवायचे नाही याचा तो वस्तुपाठच होता.

देव पुढे म्हणाले, अर्जुना, त्या माझ्या भक्ताचे, त्या ज्ञानी पुरुषाचे बोलणे प्रेमळ आणि पवित्र असते. नादब्रह्मच आकाराला आले आहे किंवा गंगाजळच उसळते.

तेव्हा जसे मन तशी क्रिया हातून घडत असते. अहिंसा शरिराने पाळू म्हणून भागत नाही. ती पूर्णतया मनात रुजली पाहिजे, पक्क झाली पाहिजे, तो मनाचा सहजभाव झाला पाहिजे असा देवांचा अभिप्राय आहे.

देव म्हणाले, "अहिंसा त्या ज्ञानी पुरुषाच्या मनात इतकी अपार भरलेली असते की इंद्रिये अहिंसेचा व्यापार इतक्या प्रचंड प्रमाणात करीत असतानाही आतून भांडवल कमी पडत नाही. एकसारखे पुरविले जाते. समुद्राला भरती आली की खाड्या भरून जातात, तशी अहिंसा चित्तात भरली की ती सर्व इंद्रिये भरून टाकते. जास्त काय सांगू? पंडित बाळाचा हात धरतो आणि ओळी आपण स्वतःच गिरवतो. त्याप्रमाणे मन आपले दयालुत्व हातापायात आणते आणि तिथे अहिंसा निर्माण करते. मग इंद्रियांच्याकडून अहिंसेचे आचरण आपोआप घडते. मनाच्या आज्ञेचीसुद्धा गरज रहात नाही. इंद्रिये आपणहूनच अहिंसेने वागायला शिकतात. म्हणून अर्जुना, त्या ज्ञानी पुरुषाच्या इंद्रियक्रियांचे वर्णन करून तुला त्याच्या मनाच्याच अहिंसा धर्माची कल्पना स्पष्ट केली आहे. देह, वाचा, मन या सर्वांनी हिंसेचा त्याग केला आहे असे जेव्हा दिसेल तेव्हा तो पुरुष ज्ञानाचे विस्तृत मंदीर आहे असे तू समज. किंबहुना तो केवळ मूर्तिमंत ज्ञानच आहे असे समज. अहिंसेचे वर्णन कानानी ऐकले, ग्रंथाधार घेऊन त्यावर निरूपण केले आणि ती अहिंसा कशी दिसते हे डोळ्यांनी पहावे अशी इच्छा झाली तर त्या पुरुषाचे दर्शन घ्यावे असे देव म्हणाले.

माउली म्हणतात, "खरे म्हणजे मी एका शब्दात सांगावे पण फार विस्तार केला याबद्दल आपण मला क्षमा करावी. आपण म्हणाल "हिरवा चारा दिसला की जनावर परत फिरण्याचा विचार न करता चाऱ्याच्या लोभाने पुढे पुढे धावत असते. पंखात वारे भरलेले पाखरू आकाशात उडू लागले की त्याला घरट्याचे भान रहात नाही. तसा हा ज्ञानोबा प्रेमाच्या स्फूर्तीने, रसवृत्तीच्या उल्हासाने सांगतच गेला आहे. त्याला निरूपण आवरेचना!" पण महाराज तसे नाही. विस्ताराला थोडे कारण आहे. पद आहे तीनच अक्षराचे "अ-हिं-सा." पण शब्द लहानसा असला, पटकन् म्हणूनही झाला पण कोट्यवधी मतांचे खंडन केल्यावरच अहिंसेचे खरे स्वरूप स्पष्ट होते. एरवी जी निरनिराळी मते अस्तित्वात आहेत. त्याचा समाचार न घेता आपल्या मताचेच आवेशाने समर्थन केले असते तर आपल्यासारख्या प्राज्ञ श्रोत्यांच्या पुढे ते टिकले नसते. रत्नपारख्यांच्या गावी जाऊन

अनुक्रमणिका

गंडकी शिला विकली जाईल असे वाटले तरच ती सोडून विक्रीला बाहेर काढावी. स्तुति करून सरस्वती प्रसन्न होईल असे वाटले तर स्तुती करावी. ज्या बाजारात अस्सल कापराबद्दल "वास थोडा कमी आहे" असा अभिप्राय पडतो तिथे कापूर म्हणून पीठ कसे विकले जाईल?

आपल्या सभेत नुसत्या बोलकेपणाला पसंती मिळणार नाही हे मी जाणून आहे. सामान्य आणि विशेष असे दोन्ही अभिप्राय जर मी आपल्या पुढे ठेवले तर प्रभो, आपण कानाच्या मुखाकडे माझे शब्द नेणारच नाही. शुद्ध प्रमेय शंकेच्या गदळाने मलिन झाले की येणारे अवधान मागच्या पावलानेच पळते. ज्या ठिकाणी पाण्यावर शेवाळाची खोळ आहे. त्या पाण्याच्या वाटेस राजहंस कधी जातात काय? अभ्रापलीकडून येणाऱ्या चांदण्यासाठी, त्या मलिन चंद्र प्रकाशासाठी चकोर चोच उघडतात काय? माझे निरूपण निर्विवाद नसेल तर आपण ग्रंथ उचलून घेणार नाही. इतकेच काय ते निरूपण आपण ऐकणारही नाही. उलट असे निरूपण केल्याबद्दल माझ्यावर रागावाल. निरनिराळ्या मतांचे निराकरण केले नाही, आक्षेप दूर केले नाहीत, तर तसले व्याख्यान मला आपली जोड करून देणार नाही. एरवी आपण गीतार्थाचे सोयरे अहा म्हणूनच मी ही गीता जीवाभावाने हातात धरली आहे. हा ग्रंथ नव्हे खरोखर हे तारण आहे. आपण आपले सर्वस्व द्याल आणि मग हा ग्रंथ सोडवून न्याल अशी मी वाट पहातो आहे. तुम्ही आपल्या सर्वस्वाचा लोभ धराल तारणाचा अव्हेर कराल तर ऐका महाराज, माझी आणि गीतेची एकच गती होणार. आपण माझाही अव्हेर केलात असेच होणार आहे. ते तर मला होऊ द्यायचे नाही. माझे काम आपल्या कृपेशी आहे. आपली कृपा कुणीकडून लाभावी म्हणून मी हे ग्रंथाचे निमित्त केले आहे.

तुम्हा रसिकाजोगे व्याख्यान शोधावे लागते. निरनिराळी मते त्यासाठी मी आपल्याला बोलून दाखविली या कारणासाठी विस्तार झाल्याबद्दल आणि श्लोकार्थ दूर गेला म्हणून आपण लेकराला उदार मनाने क्षमा करावी. घासात खडा आला तर तो काढूनच जेवले पाहिजे. वेळ लागला हे काही दूषण नव्हे. अन्नात केरकचरा आला तर काढला पाहिजेस ना? महाराज एरवी मुलाने घरी यायला उशीर केला तर आईने खुशाल रागवावे, पण वाटेत चोर भेटल्याने त्याना चुकवून यावे लागल्यामुळे मुलाला रात्र झाली तर आईने रागावू तर नयेच पण जीव वाचवून तो सुखरूप घरी आला म्हणून मीठ-मोहऱ्यानी दृष्टच काढली पाहिजे ना? आता त्यासारखे माझे बोलणे पाल्हाळाचे होते असे मी म्हणणे बरोबरच नाही. पण आपण माझा हा विस्तार आनंदाने सहन केलात हेच म्हणणे जास्त चांगले. पण ते असूदे.

श्रोते हो, देव पुढे म्हणाले उत्तम ज्ञान दृष्टि असलेल्या अर्जुना, तुला आता ज्ञानाची ओळख आणखी करून देतो. मघाशी तुला म्हटलेच आहे की गुण मनात बाणतात ज्ञान मनात रुजते आणि इंद्रियद्वारा प्रकट होते. वेगवेगळ्या स्वरूपाने होते. आता ज्या लक्षणाचे मी वर्णन करतो आहे त्याचे नाव आहे क्षमा. तुला माहीत आहे की क्षमा म्हणजेच पृथ्वी. ती प्राण्यानी केलेले सर्व अन्याय, आघात सहन करते. त्याला क्षमा करते म्हणून तिचे नाव क्षमा. अपराध सहन करण्याचा जो ज्ञानी पुरुषांचा गुण त्याला क्षमा म्हणावयाचे. आता सज्जनांची ही क्षमा सहजभावातून झालेली असते. आकांडतांडव करून ओढून ताणून आणलेली नसते. कोणी आपला अपराध केला आहे असा विचार मनात आला तर ना पुढे क्षमा करण्याच्या गोष्टी. क्षमेने त्यांचे चित्त इतके परिपूर्ण असते की, अपराधाची जाणीवच त्यांच्या चित्ताला होत नाही.

अनुक्रमणिका

नाथांच्या अंगावर एकशे आठ वेळा थुंकणाऱ्या पठाणाची इथे आठवण येते. पारावर बसून पठाण थुंकत होता आणि नाथ गोदावरीत उतरून स्नान करून येत होते. एकशे आठ वेळा हा प्रकार झाल्यावर मात्र पठाणाचे डोळे उघडले. त्याला पश्चाताप झाला. तो त्याच्या पायाशी लोळत म्हणाला, "महाराज, मला क्षमा करा. मी आपला फार मोठा अपराध केला आहे."

नाथ शांत चित्ताने म्हणाले, "क्षमा कशासाठी करावयाची? ह्या तुझ्या कृत्याने मला एकशे आठ गोदास्नाने घडली. नाही तर मी आज इतकी स्नाने कशाला केली असती?

नाथ खरोखरच शांतिसागर होते. त्यांना राग कसा तो माहीतच नव्हता. पैठणच्या मंडळींनी एकदा एका ब्राह्मणाला सांगितले की, "तू नाथांच्या वाड्यात जा. असा काही अपराध कर की, ज्याची क्षमा करणेच शक्य नाही. नाथांना जर तू राग आणून दाखवलास तर तुला शंभर रूपये बक्षीस देऊ."

ब्राह्मण म्हणाला, "पैसे बांधून ठेवा. हे काय अगदी सोपे काम आहे. आता जातो नाथांच्या वाड्यांत."

ब्राह्मण थेट वाड्यात गेला जसा होता तसाच थेट नाथ देवपूजा करीत होते तिथे देवघरात घुसला आणि मांडीवर जाऊन बसला. नाथ म्हणाले, "वाहवा तुम्हाला पाहून फारच आनंद झाला. तुमचे प्रेम फारच विलक्षण आहे."

ब्राह्मण हे ऐकून हिरमुसला पण डोळ्यापुढे शंभर रूपयाची थैली दिसत होती. जेवायच्या वेळी नाथांच्या शेजारच्या पानावर जाऊन बसला. गिरजाबाई तूप वाढायला आल्या आणि त्या वाकल्याबरोबर ब्राह्मण उडी मारून त्यांच्या पाठीवर बसला. नाथ म्हणाले, "अहो संभाळा हं, ब्राह्मण पडेल बिडेल."

गिरजाबाई हसून म्हणाल्या, "हरिपंडिताला पाठीवर घेऊन काम करायची सवय आहे मला. मी बरी ब्राह्मणाला पडू देईन." मग मात्र ब्राह्मणाला खरा पश्चाताप झाला. त्याने नाथदंपत्तीचे पाय धरले. गावातील हकीकत सांगितली. नाथांनी फक्त स्मित केले. अशी ही क्षमा. चित्तात पूर्ण बाणलेली वृत्ति. ज्ञानाचा प्रकाश बाहेर पसरवणारी. असा पुरुष ज्ञानाचा ओलावा असतो. अर्जुना, ध्यानात आली ना क्षमेची व्याप्ती?

आता तुला आर्जव ह्या गुणाचे स्पष्टीकरण सांगतो. प्राण सर्वांवर सारखेच प्रेम करतो. मग तो प्राणधारी कितीही दोषी असो वा गुणी असो. त्यांचे चलनवलन करण्यात तो प्राण काहीही भेदभाव करीत नाही. त्या साम्यभावाला वा सौजन्याला आर्जव असे नाव आहे. सूर्य काही तोंड पाहून प्रकाश पाडत नाही. आकाश सर्व जग सारखेच पोटाळून घेते. त्याप्रमाणे त्या ज्ञानी पुरुषाचे मन भिन्न भिन्न प्राण्यांशी भिन्न भिन्न प्रकारचे होत नाही. सर्व जगाशी त्याचे प्रेमाचे नाते असते. अगदी जुनी सोयरीक असते. आपले आणि परक्याचे हा भावच त्याच्या मनात डोकावत नाही. जे प्रेम, माया, कणव, सहानुभूती आपल्या निकटवर्तियावर असते तोच भाव सगळ्या जगाबद्दल त्याच्या मनात नांदत असतो. वाटेल त्याच्याशी त्याचे पटते. पाण्यासारखी त्याची वागण्याची रीत असते. कोणाविषयीही त्याच्या मनात विकल्प येत नाही. वारा सरळ वहात जातो. तसे त्याचे भाव सरळ असतात. त्या मनात शंका किंवा हाव असत नाही.

लोकहितवादी रावबहाद्दूर  गोपाळ हरी देशमुख यांच्या लहानपणाची गोष्ट आहे. त्यांना शाळेत पोचवायला-आणायला नोकर जात असे. पावसाळ्याचे दिवस होते. बाळ देशमुख भिजू नयेत म्हणून नोकराबरोबर कांबळे पाठविले. देशमुखांनी पाहिले की पाऊस पडतो आहे आणि नोकर घोंगडे घेऊन भिजत आला आहे. त्यांनी घोंगडे पांघरून घेण्याची नोकराला ताकीद केली. आपण स्वतः भिजत घरी आले.

आईंनी विचारले, “हे काय? तुम्ही भिजत का आला? नोकराने घोंगडे आणले नव्हते?”

देशमुख निर्भयतेने म्हणाले, “आईसाहेब, मी भिजलो तर मला बदलायला दुसरे कपडे तरी आहेत. गडी भिजला तर तो काय घालीन? त्यालाही घोंगडे देणार असाल तरच मी पांघरीन नाहीतर मी रोज असेच करणार.”

असा हा सरळ हिशोब आणि तोही अगदी बालवयापासून. न्यायमूर्ति माधव गोविंद रानडे यांच्या लहानपणाची गोष्ट अशीच. खांबाला भिडू करून खेळायचे. एक दान आपले आणि दुसरे खांबाचे. मग आपण हरलो, खांब जिंकला तरी त्याचा विचार नाही. ज्याचे दान त्यालाच मिळायला हवे. आजूबाजूची माणसे हा प्रकार पाहून हसली तरी त्याचा परिणाम करून घ्यायचा नाही की मनात विकल्प आणायचा नाही.

ह्या अशा आर्जवासंबंधीची म्हणजे सौजन्याची गोष्ट मारवाडातच नव्हे तर सर्व भारतीय इतिहासात प्रसिद्ध आहे. दुर्गादास राठोड याचे नाव त्यामुळे अजरामर झालेले आहे. औरंगजेबाच्या धमकीस भीक न घालता दुर्गादास कुमार अजितसिंहाच्या संरक्षणास तत्पर होता. औरंगजेबाने आपले मुलगे आझम व अकबर मोठ्या सैन्यानिशी मेवाड व मारवाड जिंकण्यासाठी पाठविले. अकबर दुर्गादासच्या सौजन्याने प्रभावित झाला व त्याच्या भेटीस गेला. औरंगजेबास हे आवडले नाही. तो हात धुवून त्या दोघांच्या मागे लागला. अकबर पळून इराणला गेला पण त्याचा मुलगा बुलंद अख्तर व मुलगी सफायतुन्निसा जोधपूरमध्ये दुर्गादासच्या ताब्यात होते. औरंगजेबाने ह्या नातवंडांना दिल्लीत आणण्यासाठी ईश्वरदास नागर याला पाठवले. दुर्गादास म्हणाला, “जसवंतसिंहाचा पुत्र अजितसिंह याला जोधपूरच्या राजसिंहासनावर बसवत असाल तरच मुले स्वाधीन करतो.” बुलंद अख्तरला जोधपूरला ठेवून घेऊन सफायतुन्निसा बेगमेस दुर्गादासने दिल्लीस पाठविले.

सोळा वर्षाच्या आपल्या नातीला औरंगजेब म्हणाला, “बाळ तुझे जीवन वेगळ्या धर्माच्या लोकांमध्ये बंदीत गेले आहे. तुला आपल्या धर्माचे काहीच ज्ञान असणे शक्य नाही. तेव्हा तू आता ताबडतोब कुराणाचा अभ्यास सुरू केला पाहिजेस.”

ती मुलगी म्हणाली, “काय म्हणता हे, आपण बडे अब्बा! पूज्य दुर्गादासनी माझे केवळ मुलीसारखे लालनपालन केले नाही. त्या स्वाभिमानी राजपूत सरदाराने मला कुराण शिकविण्यासाठी एका मुसलमान बाईची नेमणूक केली होती. मला सर्व कुराण पाठ आहे. वाटल्यास म्हणून घ्या.”

औरंगजेब आश्चर्यचकित होऊन गेला. म्हणाला, “वाहवा, आज काय ऐकले हे मी. ह्या हिंदूंच्या

सौजन्याची तारीफ करावी तेव्हढी थोडीच आहे. आतिथ्य कसे करावे हे त्यांच्यापासूनच शिकले पाहिजे." असे बोलून दिल्लीपतीने आदराने मान झुकवली.

शिबिरात प्रवेश करणाऱ्या दुर्गादासने हे ऐकले. त्याने उत्तर दिले, "दिल्लीश्वर, सर्व प्राणिमात्र ईश्वराची लेकरे आहेत. सर्व धर्मांवर त्याचीच तर सत्ता चालते. राजपुत्रीस तिच्या धर्माचे शिक्षण देणे हे माझे कर्तव्यच होते. माझे वैर अन्यायी राजसत्तेशी आहे. औरंगजेबाशी व त्याच्या नातीशी नाही."

दुर्गादासच्या सौजन्याने दिपून गेलेल्या औरंगजेबाने अजितसिंहाचा जोधपूर सिंहासनावरील अधिकार मान्य केला आणि मग दुर्गादासने बुलंद अख्तरला सन्मानपूर्वक दिल्लीस पोचवले. देव अशा सौजन्याने वर्णन करीत आहेत. ते पुढे म्हणाले, "पार्था, आईपुढे येण्यास मुलाला जसा संकोच वाटत नाही. त्याप्रमाणे आपले मन उघड करताना त्याला लोकांचा संकोच वाटत नाही. कमळ उमलले की, आपला सुवास जसे ते कुठे लपवून ठेवत नाही. त्याप्रमाणे तो पुरुष आपल्या अंतःकरणात कानाकोपऱ्यात काहीच दडवून ठेवत नाही. रत्नाचा प्रकाश आधी दिसतो आणि मग रत्न दिसते. त्याप्रमाणे त्याचे मन आधी प्रकट होते आणि मग कृती घडते. कृती एका प्रकारची मनात दुसरेच काही कपट असा प्रकारच घडत नाही. मनात काहीतरी विचार करून ठेवावा आणि मग क्रिया करावी असे त्याचे नसते. तो सदा आत्मानुभूतिमध्ये डुलत असतो. मनाने तो कशाला चिकटत नाही आणि कशाचा त्याग करायलाही जात नाही. दृष्टिमध्ये कपट, बोलण्यामध्ये संदिग्धता, लोकांच्याशी वागण्यामध्ये हीन बुद्धि याचा लवलेश त्याच्या ठिकाणी नसतो. त्याची दहाही इंद्रिये प्रांजळ, निष्कपट व शुद्ध असतात. त्याचे पंचप्राण अष्टौप्रहर मोकळे-चाकळे असतात. अमृताची धार असावी तसे त्याचे अंतःकरण सरळ असते किंबहुना तो पुरुष सरळपणा ह्या गुणाचे माहेरघर असतो. सुभटा, तो पुरुष आर्जवाची मूर्तीच आहे. असा पुरूष जेव्हा पहाशील तेव्हा पक्के समज की इथे ज्ञानाने घर बांधले आहे.

हे चतुरनाथा अर्जुना, आता तुला गुरुभक्तिचा प्रकार सांगतो. काय होते की अदंभित्व, अमानित्व, अहिंसा, शांति, आर्जव हे गुण साधकाच्या अंगी बाणले की मग त्याला गुरू भेटतातच. तोवर त्याची एकट्याची धडपड चालू असते. पण एकदा गुरू भेटले की मार्ग सुकर होतो आणि त्या गुरूभक्तिच्या आनंदात तो ज्ञानी पूर्ण बुडून जातो. ही गुरूसेचा अवघ्या भाग्याची जन्मभूमी आहे. शोकग्रस्त जीवाला ती ब्रम्हपदास नेऊन पोचवते.

पूज्य गुरुदेव रानड्यांच्या चरित्राचा मागोवा घेतला तर गुरुभक्तिचे सर्व रंग तिथे आपल्याला भेटतात. त्यांनी पंधराव्या वर्षी श्रीमंत भाऊसाहेबमहाराज उमदीकरांकडून परमार्थाची दीक्षा घेतली व नामस्मरणास सुरवात केली. नामस्मरण केले की परीक्षाही उत्तम प्रकारे पास होता येते या आपल्या गुरूंच्या वचनावर विश्वास ठेवून मॅट्रिकच्या परीक्षेच्यावेळी जगन्नाथ शंकरशेट स्कॉलरशिप मिळावी म्हणून नेमाने काही माळा करण्याचा उपक्रम केला व त्याप्रमाणे ती स्कॉलरशिप मिळाली आणि ऐहिक व पारमार्थिक जीवनाची बैठक ठरून गेली.

१९०९ मध्ये गुरूदेवांची प्रकृति ढासळली. मुंबईच्या नामांकित युरोपियन डॉक्टरांनी या आजाराचे निदान मेंदूचा क्षय असे केले. प्रि. बेन, डायरेक्टर शार्प वगैरे मंडळी गुरूदेवांच्या शुश्रूषेची सोय पुण्यात सिव्हिल सर्जन तर्फे युरोपियन वॉर्डमध्ये करण्याची तयारी दाखवत असताना गुरुदेव गावात रहावयास आले आणि बाळशास्त्री लागवणकरांचे औषध त्यांनी सुरू केले. शारीरिक व्याधींनी व मानसिक वैफल्याने आत बाहेर पोळून

निघालेले गुरूदेव परमार्थसाधना दुप्पट करू लागले व १९१० मध्ये इंचगेरीस सद्‌गुरुंच्या सहवासात दोन महिने राहिले. तिथे त्यांचा परमार्थ तर दृढ झालाच पण प्रकृतीही बरीच सुधारली.

गुरुदेवांच्या आयुष्यात त्यांच्या मातेने परमार्थसाधनात फार मोलाची मदत केली. प्रकृति अतिशय अशक्त झाल्यामुळे रामभाऊना साधनेला बसवत नसे. परंतु ती माउली पहाटेस त्यांना उठवून म्हणे, "रामू उठ, जेवढा होईल तेवढा नेम कर मग पुन्हा वाटले तर नीज पण ही वेळ वाया घालवू नको".

आईचे हे शब्द पुन्हा पुन्हा आठवून रामभाऊ म्हणत, "माझ्या आईचे हे उपकार मी कसे विसरू तिने मला परमार्थाला लावले." ते नेहमी म्हणत, "सद्‌गुरूंच्या खालोखाल आईचे उपकार आहेत. तिने जन्म दिला नसता तर साक्षात्काराचे भाग्य कसे लाभले असते?

१९२० साली रामभाऊ इंचगेरीस गेले. देहाचे काय बरेवाईट होणार असेल ते येथे गुरूचरणाशी होवो अशा निश्चयाने त्यांनी इंचगेरीस ठाण मांडले.

प्रकृति आसन्नमरण, आप्तेष्ट व इतर स्वजन पारखे झालेले, सहकारी दुरावलेले व जगात फजिती झालेली अशी त्यांची अवस्था होती. पण परमार्थाचा आधार होता. दीड वर्ष रामभाऊ इंचगेरीस राहिले व अनेक पारमार्थिक अनुभव तिथे त्यांना आले. ते दिवस आठवून ते म्हणत, "महाराजांच्या कृपेने काही सामर्थ्य मिळाले. आम्ही दुर्बल नाही. काही तरी करता येईल व हातून ईश्वर सेवा घडू शकेल इतकी कृपा महाराजांनी केली. पण आताच मृत्यू आला तर या सेवेला मी मुकेन म्हणून वाईट वाटत होते." पण सद्‌गुरूकृपेने हळूहळू प्रकृति सुधारू लागली. शरीरदुःखातून आत्मसुख जन्माला आले. रामभाऊ म्हणत, "देव संसारात दुःखही देतो आणि त्या दुःखाच्या पाठोपाठ साधकाचा परमार्थही वाढवतो. दुःख आणि परमार्थातील वाढ ही एकमेकास लागून आहेत." आणि खरोखरच यानंतर त्यांचा परमार्थ गुरूकृपेने इतका पक्का झाला की ते रामभाऊंचे गुरूदेव झाले आणि ते निःशंकपणे "माझ्यापुरते काम झाले आहे" असे म्हणू लागले. ह्या सगळ्या वाटचालीचा आराखडा पाहिला की परमार्थप्राप्तीचे श्रेय त्यांच्या गुरुभक्तिला किती होते ते ध्यानी येते. आणि मग माउलींनी केलेले गुरूभक्तिचे वर्णन स्वतःच्या भावावरून आणि गुरुदेवासारखे गुरुभक्त पाहून केले असेल हे कळते.

माउली म्हणतात, "आपली सगळी जलसंपत्ती घेऊन गंगा समुद्राला जाऊन मिळते. वेद ब्रह्मपदावर प्रतिष्ठित होतात. आपल्या अंगच्या गुणावगुणासहित पतिव्रता आपल्या प्रिय पतीस आपले सर्वस्व अर्पण करते. त्याप्रमाणे तो पुरुष आपले अंतर्बाह्य सर्व जीवन गुरुकुलास अर्पण करतो आणि स्वतःला गुरुभक्तिचे घरच करतो. विरहिणी जशी वल्लभाचे अहोरात्र चिंतन करते. त्याप्रमाणे ज्या ठिकाणी गुरुगृह असेल तोच देश त्याच्या मनात वस्ती करतो. त्याचे त्या प्रदेशावर इतके प्रेम असते की गुरुगृहावरून वारा आला तरी तो धावत त्याला सामोरा जातो आणि म्हणतो, "आपण माझ्या घरी यावे." तो आपला जीव गुरुगृही स्थानापती करून घालतो आणि खऱ्या प्रेमाने भुलून जाऊन ज्या दिशेला गुरुगृह असेल त्या दिशेशी आनंदाने गोष्टी करतो. गुरूंच्या आज्ञेमुळे गुरूपासून दूर एखाद्या गावी रहावे लागले तर गायीपासून दूर बांधून घातलेल्या वासरासारखी त्याची तळमळ होते. तो मनात म्हणत असतो "हे माझ्या गळ्यातले दावे कधी सुटेल, मी त्या माझ्या स्वामींना कधी भेटेन? 'गुरुविरहाच्या काळातील निमिष त्याला युगाहून मोठे वाटते. अशाच स्थितीत जर गुरूंच्या गावचे कुणी

आले किंवा गुरूंनी स्वतःच कुणाला पाठवले तर मरावयास टेकलेल्या माणसाला आयुष्य प्राप्त व्हावे तशी त्याची स्थिती होते. सुकत चाललेल्या अंकुरावर अमृताच्या धारा पडाव्या, थोडकेच पाणी ज्यात उरले आहे अशा डबक्यातील मासा सागरात जाऊन पोचावा तसा त्याला आनंद होतो, नवे जीवन प्राप्त होते. दरिद्र्यास खजिना मिळावा, आंधळ्याला डोळे प्राप्त व्हावे, भिकाऱ्यास इंद्रपद मिळावे तसा तो सुखावतो. गुरुकुलाचा लाभ झाल्याने त्याचा आत्मविश्वास इतका वाढतो की तो मनाशी म्हणतो ह्या गुरुकृपेच्या जोरावर मी हे आकाशसुद्धा सहज कवेत घेईन. अशी गुरुभक्ति दिसली की त्या पुरुषाचे दास्य ज्ञान स्वतः करते आहे असे समज.

त्याच्या बाह्य क्रियेवरून त्याची गुरुभक्ति स्पष्ट होतच असते. आता त्याच्या मनाचे व्यापार सांगतो. तो अंतःकरणात प्रेमाच्या जोरावर श्रीगुरूंच्या मूर्तीची ध्यानाने उपासना करतो. शुद्ध अंतःकरणाच्या आवारात तो आपल्या गुरुमूर्तीची प्राणप्रतिष्ठा करतो आणि कायावाचामनाने गुरूंचा लवाजमा आपणच होतो. चैतन्याच्या आवारात आनंदाच्या देवालयात गुरुलिंगावरती ध्यानामृताने अभिषेक करतो. बोधाचा सूर्य उगवताक्षणी सात्त्विक भावाच्या बिल्वपत्रांनी डालगे भरून गुरू त्रिंबकास त्या बेलाची लाखोली वहातो. पवित्र काल ह्याच कोणी शिवपूजेच्या तीन वेळा समजून जीवदशारूपी धूप जाळतो आणि निरंतर ज्ञानदीपाने गुरुमूर्तीला ओवाळतो. समरसतेचा उत्तम स्वयंपाक सिद्ध करून अखंड अर्पण करीत जातो. आपण पूजा करणारा गोसावी होतो. गुरूना शंकराची पिंडी करतो. नाहीतर जीवरूपी शय्येवर गुरूंना प्राणपति करून ऐक्यानुभव घेतो. प्रेमाचे हे निरनिराळे अविष्कार त्याची बुद्धि वहाते. कधी प्रेमाने चित्त भरून टाकतो. तिथे क्षीरसमुद्राची कल्पना करतो. क्षीरसमुद्रात आपल्या ध्येयध्यानसुखाची शेषाची शय्या तयार करतो. त्यावर श्रीगुरू शेषशायी भगवान विष्णूच आहेत अशी कल्पना करून आपण त्याचे पाय चुरणारी लक्ष्मी आहो असे समजतो. मग आपण गरूड होतो. हात जोडून उभा रहातो. कधी कधी आपण ब्रह्मदेव आहो देवांच्या नाभिकमलामध्ये आपण जन्म घेतला आहे अशी कल्पना करतो. गुरुमूर्तीवरील प्रेमाचे असे वेगवेगळे प्रकार करून ते अनुभव घेतो. ध्यान सुखाचा अनुभव घेतो. एखादे वेळी गुरूंना आई समजतो आणि स्तन्यसुख घेतो, मांडीवर लोळतो. नाहीतर किरीटी, कधी गुरूंना गाय करतो, आपण तिचे वासरू होतो आणि चैतन्याच्या वृक्षातळी मातृसुख भोगतो. गुरुप्रेमाच्या पाण्यात आपण मासोळी होऊन स्वच्छंदाने विहार करतो आहो अशी तो कधी कधी कल्पना करतो. गुरुकृपामृताची वृष्टि होते आहे, त्याखाली आपण सेवावृत्तीचे रोप आहो असे समजतो. कधी गुरूंना पक्षिणी करतो, त्यांच्या चोचीतून चारा घेतो, आपण पंख न फुटलेले पाखरू आहो असे तो समजतो. त्याच्या प्रेमाच्या अपारपणाचे वर्णनच करता येत नाही. कधी गुरूंना पोहणारा करून आपण त्याच्या कासेला धरून पोहतो. पूर्ण भरलेल्या समुद्रात जशा प्रचंड लाटा एका मागोमाग येत फुटत असतात, त्याप्रमाणे एका ध्यानातून दुसऱ्या ध्यानाची निर्मिती होते आणि प्रेम उत्तरोत्तर वाढत रहाते. याप्रमाणे मनामध्ये गुरूसहवासाचे सुख तो दोन्ही हातांनी भरभरून लुटत असतो. अर्जुना, आता तो गुरूंची बाह्य सेवा कशी करतो सांगू का? अरे तो म्हणतो "गुरूंनी माझ्या सेवेमुळे प्रसन्न होऊन "हवे ते माग" असे म्हटले तर मी म्हणेन, "दातारा, आपण माझ्या सेवेने प्रसन्न झाला आहा आणि कौतुकाने माग म्हणता तर मला एक द्या. हा जो आपला सगळा परिवार आहे तो सगळा मीच एकट्याने व्हावे असे करा." गुरू प्रसन्न असल्याने मला तो वर देतील आणि मीच एकटा सर्व परिवार होऊनही माझे समाधान झाले नाहीतर आपल्या सेवेची जी जी साधने आहेत, उपकरणे आहेत ती देखील मीच व्हावे असे गुरूंना मागेन, पुन्हा "तसे होऊ दे म्हणतील," मग माझ्या भाग्याला काय उणे? परिवार मीच आणि उपकरणे मीच. आता उपासनेचे खरे कौतुक मला भोगायला मिळेल. गुरू अनेकांची माता आहेत. पण मी त्यांना शपथ घालून माझ्या एकट्याच्या स्वाधीन करून घेतले आहेत. मग मी श्रीगुरूंना माझ्या प्रेमाचा छंद लावीन. त्यांच्या प्रेमाचा मीच एकटा मालक

होईन. माझा लोभही त्यांना सोडून दुसरीकडे कुठे जाणारच नाही असा त्याला क्षेत्रसंन्यास घ्यायला लावीन. वारा कितीही वाहिला तरी चार दिशांच्या बाहेर जाऊ शकत नाही. तसा मी गुरूकृपा कोंडून घालणारा पिंजरा होईन. गुरुसेवा हीच माझी मालकीण होईल. तिला मी माझ्या गुणाचे अलंकार घालीन. गुरुभक्तिला मी गवसणीच होईन. अर्जुना, त्या गुरुभक्ताचे असे मनोरथ असतात. तो म्हणत असतो गुरूप्रेमाच्या वृष्टीखाली पसरलेली पृथ्वी मी होईन."

मनोरथांच्या सृष्टिच्या सृष्टि तो निर्माण करीत असतो.

तो पुढे मनाशी म्हणतो, "मी गुरूंचा वाडा होईल. मग मीच त्यांचा चाकर होऊन अहोरात्र त्यांची सेवाचाकरी करीन. दास होऊन सर्व दास्य मी करीन. मी त्यांचा भालदार चोपदार होईन आणि स्वामींच्या पुढे पुकारत चालेन. माझे स्वामी जे जे उंबरठे ओलांडून वाड्यात जा-ये करत असतील ते ते सगळे मी होईन. त्या पावलांचा ओझरता स्पर्श मला होतच राहील. मीच द्वारपाल होईन आणि पहारा करीन. स्वामींच्या पादुका मीच हाईन. सेवक होऊन मीच त्या पादुका त्यांच्या पायात चढवीन, छत्र मीच होईन, छत्र धरणारा पण मीच होईन, शागीर्द मीच होईन, चूळ भरण्यासाठी पाणी मी घालीन आणि लगेच चूळ टाकण्यासाठी पुढे केलेले तस्तही मीच होईन, श्रीगुरूंना विडा मीच देईन, मीच विड्याचा चोथा घेईन, आंघोळीचे तयारी मीच करीन, गुरूंचे आसन, चंदन, वस्त्र, अलंकार सगळे उपचार मीच होईन, स्वामींचा स्वयंपाक करणारा आचारी मीच होईन, मीच त्यांना वाढीन. देव जेवायला बसले की मीच त्यांच्या पंक्तीला बसेन आणि देव उठले की मीच पुढे होऊन विडा देईन, आपलेपणाने मीच त्यांना ओवाळीन, मीच ताट काढीन, बिछाना मीच घालीन, चरणसेवा मीच करीन, त्यांचे सिंहासन मीच होईन, श्रीगुरू त्यावर चढून बसले की, माझ्या सेवेची पूर्तता होईल.

श्रीगुरूंचे मन जिकडे जाईल तो तो विषय मीच होईन. असा चमत्कार करीन, त्यांच्या कानाच्या अंगणात असंख्य शब्द मीच होईन, त्यांचे अंग जिथे जिथे घासेल तो तो स्पर्शविषय मीच होईन, श्रीगुरुंचे डोळे आपल्या प्रेमपूर्ण नजरेने जी जी वस्तू पहातील ती ती मी होईन, तितकी सगळी रूपे मी घेईन. त्यांच्या जिभेला जो जो रस हवासा वाटेल तो तो मी होईन. निरनिराळ्या गंधाचे रूप घेऊन त्यांच्या नाकाची सेवा करीन, सर्व वस्तुमात्र आपण व्हावे आणि गुरूंची सर्व सेवा वेटाळावी असे माझे मनोगत आहे. माझा देह उभा आहे तोवर मी गुरूंची अशी अनन्य सेवा करीन."

या संदर्भात एक सुंदर गोष्ट आहे. हजरत इब्राहिम बलखचे बादशहा होते. त्यांनी एक गुलाम विकत घेतला. आपल्या स्वाभाविक उदारतेस अनुसरून त्यांनी विचारले, "बाबा, तुझे नाव काय?"

गुलाम म्हणाला "आपण ज्या नावाने मला हाक माराल ते माझे नाव."

बादशहांनी विचारले, "तू काय खाशील?"

गुलाम म्हणाला, "आपण जे द्याल ते."
बादशहांनी विचारले, "अरे तुला कपडे कसले आवडतील ते तरी सांगशील?"

गुलाम म्हणाला, “आपण जे कपडे द्याल ते.”
बादशहांनी विचारले. “तू काम काय करशील?”
गुलाम म्हणाला, “आपण सांगाल ते काम करीन.”
बादशहा हैराण होऊन म्हणाला, “अरे, तुला आवडते तरी काय मग?”

शांतपणाने स्वस्थ उभा राहून गुलाम म्हणाला, “शहेनशहा, गुलामाला आवड निवड कुठली?” बादशहा हे ऐकून चकित झाला. तो गादीवरून उठला आणि गुलामाच्या खांद्यावर हात ठेवत म्हणाला, “अरे, तू तर आज माझा गुरू झालास. परमात्म्याची भक्ती कशी करावी हे तू मला आज शिकवलेस.”

ह्या गोष्टीतील गुलामाला बादशहाने विकत घेतले होते पण गुरुभक्त आपखुषीने गुरूंना आपले सर्वस्व अर्पण करतो. देह असेतोपर्यंत तो त्यांचे दास्य करतोच पण नंतरही त्याच्या समर्पणाच्या अद्भुत कल्पना आहेत.

“अहो, देहाचा अंत झाला तरी मी गुरूंचे चरण सोडणार नाही. माझ्या आराध्याचे पाय ज्या जमिनीवर उभे असतील त्या जमिनीच्या मातीत माझ्या देहाची माती मिसळून टाकीन. माझे स्वामी सहज ज्या पाण्याला स्पर्श करतील त्या पाण्यात माझ्या शरिरातील पाणी मी लयाला नेईन. श्रीगुरू आरती करण्यासाठी नीरांजन लावतील किंवा गुरूमंदिरात दिवे लावतील त्या तेजामध्ये मी माझे तेज मिसळून देईन. चवरी, पंखा यांच्यामुळे गुरुदेवांना जो वारा घातला जाईल त्यात मी माझा प्राणवायू लीन करीन आणि त्यांच्या शरिराची सेवा करणारा वारा होईन. आपल्या परिवारासह जिथे माझे गुरुदेव असतील तेथील आकाशात माझ्या शरिरातील आकाश एकरूप करीन. जिवंत असल्यावर तर गुरूदेवांची सेवा करीनच पण मेल्यावरही करीन, करीतच राहीन, सोडणार नाही. निमिषभरसुद्धा सेवा दुसऱ्यावर विसंबणार नाही. कोट्यवधी कल्पांचा काल गेला तरी माझी सेवा चालूच राहील.” त्या गुरुभक्ताच्या मनाचे धारिष्ट्य गुरूसेवेबद्दल असे अपार असते. सेवेच्या कामात तो रात्र किंवा दिवस काहीही म्हणत नाही. आपल्याला जास्त काम पडते असे त्याला कधीच वाटत नाही. काम जास्त असले की, तो जास्तच प्रसन्न असतो. मोठ्या आनंदात गर्क असतो. त्याचे शरीर आणि मन सेवा करण्याच्या बाबतीत एकमेकाशी चढाओढ करतात. गुरूसेवा म्हटली की, तो गुरुभक्त आकाशाहून मोठा होतो आणि सर्व कामे एकटाच उरकतो. एखादेवेळी श्रीगुरुंनी काही लीला आरंभली तर त्या खेळावरून तो आपल्या जीवाचे लिंबलोण उतरतो. तो कृश असतो तो गुरुदास्यामुळे, पुष्ट होतो गुरुकृपेने आणि रहात असतो गुरूंच्या आज्ञेच्या घरांत. गुरुकुळामुळे कुलीन, गुरूबंधुसौजन्यामुळे सुजन आणि गुरूसेवेच्या व्यसनाने व्यसनी ठरतो. निरंतर त्याला तेव्हढेच व्यसन असते.

त्याचे वर्णाश्रम म्हणजे गुरूसंप्रदायाचे नियम, त्याचे नित्यकर्म म्हणजे गुरूंची सेवा. गुरूपूजेशिवाय त्याला दुसरा मार्गच माहित नसल्याने क्षेत्र, देवता, माता, पिता सगळे काही तो गुरूंनाच मानतो. श्रीगुरूंचे दार हे त्याचे सारसर्वस्व असते. गुरूसेवकाच्यावर सख्ख्या भावाप्रमाणे त्याचे प्रेम असते.

गुरूवाक्याचे मंत्रच त्याची जिव्हा सतत उच्चारत असते. गुरुवाक्यावाचून दुसरे शास्त्र तो जाणत नाही. दुसऱ्या शास्त्रास शिवत नाही. गुरुचरणाचा ज्या पाण्याला स्पर्श झाला ते पाणी कुठलेही, कसलेही असो त्या

पाण्याच्या यात्रेला तो त्रैलोक्याची तीर्थे आणतो. गुरूंचे उच्छिष्ट हाती पडले तर त्या प्रसादाच्या गोडीपुढे तो समाधीही तुच्छ मानतो. श्रीगुरू चालू लागले की त्यांच्या पावलांनी जे धुळीचे कण उडतील तो ते मोक्षसुखाच्या तोडीचे मानतो. ह्या गुरूभक्तीचे वर्णन तरी किती करावे? माझ्या बुद्धिला गुरुभक्ति म्हटल्याबरोबर जसे काही भरतीचे उधाण आले म्हणून मी बोलतच गेलो एरवी या भक्तीचे वर्णन करणेच शक्य नाही. गुरूवरील प्रेमाला खरोखरी अंत नाही.

अर्जुना, अरे गुरूभक्तिची ज्याला खरी खुरी इच्छा आहे तो गुरूसेवेवाचून जगात दुसरी काही चांगली गोष्ट आहे असे तो मानीतच नाही. असा जो गुरूभक्त असेल तो तत्त्वज्ञानाचे रहाते घर आहे. ज्ञानाला महत्त्व त्याच्यामुळे आहे. किंबहुना असे समजावे की ज्ञान भक्त आहे व तो गुरूभक्त त्या ज्ञानाचा गुरू आहे. अर्जुना अशी गुरूभक्ति तुला जिथे दिसेल तिथेच ज्ञान उघड्या दाराने जगाला पुरून उरेल अशा प्रकारे नांदते आहे असे निःशंकपणाने समज."

माउली म्हणतात, "सज्जन हो अशा प्रकारची गुरूसेवा माझ्या हातून व्हावी अशी माझ्या जीवाला अभिलाषा आहे म्हणून मार्ग सोडून इतका विस्तार केला आहे.

मला अशी गुरूसेवा जमते, घडते असे मी म्हणत नाही. सेवेविषयी माझे हात खुळे, भजनावर लक्ष ठेवण्यात डोळे आंधळे आणि गुरुसेवेच्या कामात पाय पांगळे अशी माझी स्थिती आहे. गुरूवर्णन कसे करावे हे न कळल्याने माझी जमा मुक्यातच आहे. माझ्यासारख्या आळशाला माझे स्वामी फुकट पोसत आहेत. पण मनांत गुरूंच्या विषयी अपार प्रेम मात्र आहे. त्या प्रेमानेच मला बोलके केले आहे. जे जे करावे असे प्रेमापोटी वाटते पण हातून घडत मात्र मात्र नाही, त्या सेवेचे वर्णन मी शब्दात केले. इतका विस्तार केला भानच राहिले नाही. पण महाराज आपण मला ह्या विस्ताराबद्दल क्षमा करा आणि आपल्या सेवेची पुन्हा एकदा संधी द्या.

यापुढे आता मी माझ्या पदरची भर न घालता व्यवस्थित फक्त उत्तम ग्रंथार्थ सांगतो ऐकावे. भूतांचा भार सहन करणारा तो श्रीविष्णु पुढे बोलू लागला. अर्जुन जीवाचे कान करून ऐकत होता.

देव म्हणाले, "अर्जुना, आचार्योपास्ती किंवा गुरूभक्ति तुला वर्णन करून सांगितली. ह्या गुरूभक्ताच्या सर्वांगाभोवती, मन, बुद्धी, अहंकाराभोवती गंगेच्या प्रवाहाप्रमाणे गुरुभक्तिच्या लाटा उचंबळत असतात. त्याचे शरीर आणि मन दोन्ही कापराप्रमाणे पवित्र, शुद्ध होऊन जाते. गुरुवाक्य त्याच्या मनात घोळत असते, शरीर गुरूसेवेमध्ये कष्टत असते. त्यामुळे एखादे अमोल रत्न आत बाहेर चोख असावे त्याप्रमाणे तो ज्ञानी आतून ज्ञानामुळे शुद्ध होतो. बाहेरून कर्मामुळे शुद्ध होतो. याप्रमाणे दोन्ही बाजूंनी तो शुद्धच होऊन जातो.

मृत्तिका आणि जल याचा उपयोग करून तो बाह्य शरीर धूत जातो, स्वच्छ करीत जातो. वेदांच्या वचनात विचार चिंतन करीत तो आपले मन निर्मळ करीत जातो. आरशावरचा मळ माती लावून काढून टाकतात तसा शरीराचा मळ मातीने तो काढून टाकतो आणि वस्त्रांचा मळ परटाच्या भट्टीत टाकून काढावा तसा मनाचा मळ वेदांच्या भट्टीत घालून काढतो. याप्रमाणे आतून बाहेरून स्वच्छ झाल्यावर अंतरात ज्ञानाच दिवा लावून ठेवतो आणि मनाची शुद्धता निरंतर कायम ठेवतो. ह्या मनाच्या शुद्धतेमुळेच बाहेरच्या कर्माच्या शुद्धिला

महत्त्व आहे. एरवी आत मनाने अशुद्ध आणि बाहेर कर्मशुद्धिचा मात्र डामडौल म्हणजे ही खरोखर विटंबनाच आहे.

मृताला शृंगारावे, गाढवाला तीर्थात स्नान घालावे, कडू दूधभोपळा गुळाने माखावा, ओस घराला तोरण बांधावे, उपवासी माणसाला अंगावर अन्न लिंपावे, कांतहीन स्त्रीने कुंकू शेंदराचा डौल दाखवावा तसे ते अर्थहीन होते. आतून पोकळ आणि वरून सोन्याची झळाळी असलेले कळस काय करायचे? चित्रांची फळे बाहेरून साजरी दिसतात पण आत शेणच असते अशा ह्या खोट्या दिमाखाला आग लागो.

कर्माच्या नुसत्या बाह्य देखाव्याला काही किंमत नाही. वाईट निकृष्ट पदार्थाला मोठी किंमत लावून तो खपत नाही. मदिरेने भरलेला घडा नुसता गंगेत बुडवून पवित्र होत नाही.

आतून ज्ञान झाले पाहिजे. मग बाह्य शुद्धि आपोआप होत जाईल.

ज्ञान आणि कर्म यांच्या योगाने अंतर्बाह्य झालेली शुचिता सहज कुठे मिळणार आहे? ती फारच दुर्मिळ आहे पार्था. पण ती ज्यांनी साध्य केली आहे असेही पुरुष आहेतच! त्या पुरुषांनी कर्मानी बाह्य विभाग चांगला धुतलेला असतो, अंतराचा मळ ज्ञानाने फेडलेला असतो आणि मग आत आणि बाहेर असा भेदच रहात नाही. दोन्हीकडील शुचिता एकच होतात. अंतर्बाह्यता जाते, केवळ शुचिता उरते. स्फटिकाच्या घरात ठेवलेला दिवा जसा आपला प्रकाश सहज बाहेर टाकत असतो. तसे त्याच्या जीवाशी एकरूप झालेले सद्भाव इंद्रियद्वारा स्पष्ट दिसून येतात. जीवनातल्या बऱ्यावाईट गोष्टी त्याच्यासमोर येत असतात. इतर माणसांच्या मनात त्या विपरीत गोष्टी संशय उत्पन्न करतात. मुळात नसलेली विकृती निर्माण करतात. अपप्रवृत्तींच्या बीजांना अंकुर आणतात. पण ह्या शुद्ध ज्ञानी पुरुषाच्या मनात ह्या विपरीत गोष्टींच्या सहवासाचा काहीही परिणाम होत नाही. तो ऐकतो, पहातो, भेटतो पण त्याचे मन विचलित होत नाही. मनावर काही ठसाच उमटत नाही. मेघांच्या रंगाचा डाग जसा आकाशावर पडत नाही तसे हे होते. तसे पाहिले तर इंद्रियांच्या संगतीने विषयाशी त्याचा संबंध येतच असतो. परंतु, त्या विषयाच्या संसर्गाने त्याच्या मनात विकार उत्पन्न होत नाहीत.

किती मनाची निर्मळता? रांका बांका हे पतिपत्नी भगवंताचे निस्सीम भक्त. अत्यंत निस्पृह म्हणून त्यांची ख्याती! ते दोघे जंगलात जात, लाकडे तोडून आणत आणि गुजराण करीत. देवाच्या मनात आले एकदा त्यांच्या निस्पृहतेची परीक्षा पहावी. त्या दोघांना रानात जाताना पाहिले आणि देवांनी एक सोन्याचे कडे त्यांच्या वाटेत टाकून ठेवले. रांकाच्या पायाला ठोकर लागली म्हणून त्याने खाली पाहिले तर सोन्याचे कडे. त्याने भराभरा त्यावर माती लोटली. तेव्हढ्यात बांका येऊन पोचली. तिने विचारले, “हे काय करता?” रांका म्हणाला “सोन्याचे कडे होते. तुझे त्यावर मन जाईल म्हणून त्यावर माती सारीत होतो.”

बांका हंसून म्हणाली, “अहो, मातीवर माती टाकून काय फरक पडायचा आहे? माती आणि सोने यात काय फरक आहे म्हणून तुम्ही सोने दडवून ठेवता अहा? सोने ही ही मातीच आणि माती ही तर मातीच.” असे हे खंदे वैष्णव वीर.

अनुक्रमणिका

श्रीरामकृष्ण परमहंस एका बाजूस रुपयांचा व दुसऱ्या बाजूस खड्यांचा ढीग करत आणि दोन्ही मुठी भरून घेत. खड्यांच्या मुठीकडे पाहून म्हणत, “पैसे.” पैशाच्या मुठीकडे पाहून म्हणत “खडे” आणि दोन्ही मुठी एकदम गंगेत विसर्जित करीत. या अभ्यासामुळे पुढे पुढे परमहंसाना धातूचा स्पर्शही सोसेना. चुकून स्पर्श झाला तर ते मूर्च्छित होऊन पडत. यावरून ज्ञानी पुरुषांना विषयसंग झाला तरी विकार उठत नाहीत म्हणजे काय नेमके घडते हे ध्यानात येते.

एखाद्या वाटेवरून ब्राह्मण स्त्री व महार स्त्री गेली तरी ती त्या दोघींच्यापासून अलिप्त असते. तिला त्याचे सुखदुःख वाटत नाही त्याप्रमाणे अलिप्ततेने व्यवहारात कसे जगावयाचे हे त्या ज्ञानी पुरुषास कळते. पती आणि पुत्र ह्या दोघांना तरुण स्त्री आलिंगन देते. पण पुत्राला आलिंगन देताना तिच्या मनात कामाचा लवलेश नसतो. तसे त्या ज्ञानी पुरुषाचे चित्त संकल्पविकल्पापासून अलिप्त असते.

तसे पाहिले तर त्या दोहोशी त्याची ओळख असते. कृत्य काय आणि अकृत्य काय हे देखील तो चांगल्या प्रकारे जाणतो पण त्याचे हृदय इतके शुध्द असते की, पाण्यात हिरा विरघळत नाही, आधणात भातातला खडा भाताबरोबर शिजत नाही. त्याप्रमाणे त्याच्या मनाला विकल्पाचा विटाळ होत नाही. या अशा शुद्ध वृत्तिला शुचित्व म्हणावयाचे ही अशी वृत्ति पार्था जिथे तुला दिसेल तिथे ज्ञान आहे असे ओळख.

आता स्थैर्याचे वर्णन करतो. मूर्तिमंत स्थिरता ज्यांच्या घरात येऊन राहिली आहे तो पुरुष ज्ञानाचे आयुष्य आहे, ज्ञान त्याच्या रूपाने जगते आहे असे ओळख. त्याचा देह वर वर जरी हिंडता फिरताना दिसला तरी त्याच्या मनाची बैठक मोडत नाही. गाय चरण्यासाठी रानात जाते पण तिचे वासरावरचे प्रेम रानात जात नाही. ते त्या गोठ्यातल्या वासरावर पहारा करीत असते. सती जाणारी स्त्री वस्त्रालंकार घालते पण त्याकडे तिचे लक्ष असत नाही. तिचे लक्ष केवळ पतीभेटीकडे असते. लोभी मनुष्य दूर जातो, पण त्याचा जीव ठेवा पुरून ठेवलेल्या जागी गुंतलेला असतो. त्या ज्ञानी पुरुषाचे चित्त देहाचे चलनवलन झाले तरी चंचल होत नाही. जाणाऱ्या अभ्राबरोबर आकाश धावत सुटत नाही. ग्रहचक्राबरोबर ध्रुवतारा फिरत नाही. वाटसरू रस्त्यावरून ये-जा करतो म्हणून रस्ता काही कुठे जात-येत नाही. वारा आला म्हणून झाडे काही जागा सोडून जात नाहीत, फक्त जागच्या जागीच डोलतात. हा ज्ञानी चळणवळण करणाऱ्या पाचभौतिक शरिरात वास करीत असला तरी त्या एकाही भूताच्या उर्मीने हालत नाही. वावटळ आली तरी पृथ्वी ढळत नाही तसा तो उपद्रवाच्या लोंढ्याने वाहवून जात नाही.

दैन्यदुःखाने तो तापत नाही. भयशोक प्राप्त झाले म्हणून कापत नाही. शरिराला मृत्यु येण्याची वेळ आली तरी तो भयभीत होत नाही.

आत्मज्ञानामध्ये स्थिर झालेले त्याचे चित्त आर्ति, आशा, वृद्धत्व, व्याधी अशी वेळ आली तरी मागे वळून पहात नाही. नीट त्या आत्मज्ञानाशी एकरूप होऊनच रहाते. निंदा, अपमान यांचे तडाखे बसले, काम आणि लोभ अंगावर धावून आले तरी त्याच्या मनाचा केससुद्धा वाकडा होत नाही. आकाश ओसरून जावो, पृथ्वी विरून जावो, पण त्याची मनोवृत्ति आत्म्यास सोडून माघारी फिरणे, मोहरा फिरवणे जाणत नाही. हत्तीला फुलांनी मारले तरी तो जसा माघारी फिरत नाही. तसा दुर्वाक्याचा मारा केला तरी वळून पहातही नाही,

निस्तेज होत नाही. क्षीरसमुद्राच्या लाटांनी मंदार पर्वताला कंप सुटत नाही, वणव्याच्या जाळाने समुद्र पेटत नाही. शोक, मोहादी उर्मी आल्या-गेल्या म्हणून त्याच्या मनोधर्मात गजबज होत नाही. कल्पांत समय आला तरी तो धैर्यवान तो प्रसंगही सहन करून जातो. हे डोळस अर्जुना, अशी जी मनाची विशिष्ट अवस्था दिसते तिला स्थैर्य असे नाव आहे. हे निधडे स्थैर्य ज्या पुरुषाच्या शरिराला आणि मनाला प्राप्त झाले असेल तो ज्ञानाचे उघडे भांडार आहे असे समज."

महाराज युधिष्ठिरांनी अश्वमेध यज्ञ करण्याचे ठरवून घोडा सोडला होता. त्याच वेळी रत्नपुराधीश्वर मयूरध्वजानेही घोडा सोडला होता. पांडवांच्या घोड्याबरोबर कृष्ण व अर्जुन होते. मयूरध्वजाचा पुत्र ताम्रध्वज याने त्यांचा पराभव केला. दोन्ही अश्व घेतले व तो मयूरध्वजासमोर येऊन उभा राहिला. अर्जुन मूर्च्छित झाला होता. मयूरध्वज हा कृष्णाचा भक्त असल्याने त्याला कृष्णार्जुनाचा पराभव झाल्याचे ऐकून विषादच झाला. एव्हढ्यात श्रीकृष्णानी ब्राह्मणाचे रूप घेतले व शुद्धीवर आलेल्या अर्जुनाला आपला शिष्य केले. दोघे दरबारात आले. ब्राह्मणाचे तेज पाहून मयूरध्वज चकित झाला. नम्रतापूर्वक नमस्कार करून तो ब्राह्मणाला विचारू लागला. "भूदेव, मी आपले काय काम करू?" ब्राह्मण वेषधारी देव म्हणाले, "माझ्या मुलाला सिंहाने घायाळ केले आहे. पकडून नेले आहे. तो सिंह म्हणतो आहे की मयूरध्वज राजाच्या पत्नीने व मुलाने करवतीने त्याचे उजव्या व डाव्या भागाचे दोन तुकडे केले आणि उजवा भाग मला आणून दिलास तर मी तुझ्या मुलाला सोडीन आणि तो सिंह असेही म्हणाला आहे की हे दान राजाने आनंदाने दिले पाहिजे."

राजा तयार झाला. शीर कापत असताना राजाच्या डाव्या डोळ्यातून पाणी येऊ लागले. ब्राह्मणरूप देव म्हणाले, "दुःखाने देत असशील तर मला ते दान नको आहे." राजा म्हणाला, "हे अश्रु वेदनेचे नाहीत. उजव्या अंगाप्रमाणे ब्राह्मणाला आपला काहीच उपयोग नाही म्हणून डावा डोळा रडतो आहे." ह्या वाक्यासरशी देव प्रकट झाले. त्यांनी मयूरध्वजाचे शरीर पूर्ववत केले व त्याला वर मागण्यास सांगितले. राजा हात जोडून म्हणाला, "महाराज अशी कठोर परीक्षा यापुढे कुणाचीही घेतली जाऊ नये एवढाच वर मला द्यावा."

भगवंतानी तो वर दिला, त्याच्या आतिथ्याचा स्वीकार केला. कृष्णार्जुनांना राजाने अश्वमेधाचा घोडा परत केला व कृष्णार्जुन पुढे गेले. मयूरध्वजाच्या मनाचे स्थैर्य असे विलक्षण होते. ज्ञानी पुरुषाच्या मनाचे स्थैर्य वर्णन करीत असताना माऊलींच्या पुढे राजा मयूरध्वजाचे उदाहरण असावे. सगळ्यात आश्चर्य म्हणजे राजाने वर मागून घेण्यातही मनाचे स्थैर्य दाखविले. त्याने स्वतःसाठी काहीही मागितले नाही. आपल्या भक्तबांधवांची अशा कठोर सत्त्वपरीक्षेतून कायमची मुक्तता केली. हाही अलौकिक स्थैर्याचा आणखी एक आदर्शच म्हणावा.

देव सांगू लागले, "अर्जुना, आता आत्मनिग्रहाचे रूप प्रकट करतो. त्याचा अर्थ असा की, तो पुरुष आपल्या अंतःकरणावर सतत पहारा करतो आणि त्याला इंद्रियांच्या द्वारात उभे राहू देत नाही. साप घर सोडून कुठे जात नाही. योद्धा आपली हत्यारे गंजू देत नाही. लोभी आपले भांडार दृष्टिआड होऊ देत नाही. मधावर लुब्ध असलेल्या मधमाशीप्रमाणे आपल्या एकुलत्या एक मुलावर जशी त्याची आई अष्टौप्रहर नजर ठेवून असते तसा तो ज्ञानी आपल्या अंतःकरणावर लक्ष ठेवतो. ते इंद्रियांच्या दारात गेले, जर चुकून कामाच्या कानावर गेले तर आशा डाकीण धावत येईल आणि जीवाला असे झपाटून टाकील की, मग ते आपल्याला आवरणारच नाही अशी त्याला भिती वाटते. एखाद्या ढालगज बाईला तिचा दांडगट नवरा ती बाहेर फिरून बिघडेल म्हणून

बंदोबस्ताने घरात कोंडून ठेवतो तसा तो आपली प्रवृत्ति कुठे नको तिथे जात नाही ना हे डोळ्यात तेल घालून पहातो. त्याला माहीत असते की थोडे जरी अनवधान झाले तरी अनर्थ होतो.

तीन हजार वर्षांपूर्वी मगध देशात माही नदीच्या काठी वनामध्ये उद्ररामपुत्र नावाचा योगी रहात असे. तो उच्चकोटीचा योगी होता. मगधेश्वराच्या निमंत्रणाप्रमाणे तो रोज आकाशमार्गाने उडत जाऊन राजवाड्यात भिक्षा ग्रहण करीत असे.

एकदा काही कामासाठी राजाला बाहेर गावी जावे लागले. आपल्या एका दासीवर त्याने उद्ररामपुत्राच्या भिक्षेची व्यवस्था सोपवली. रोजच्याप्रमाणे उद्ररामपुत्र राजांगणात उतरला. "महाराज, आपले स्वागत असो." दासीने योग्याचे स्वागत केले.

त्या दासीचे लावण्य पाहून योगी मनात म्हणाला, "किती सुंदर आहे ही आवाज तरी किती गोड."

सेवातत्पर दासीने त्याच्या भोजनाची व्यवस्था उत्तमरीतीने केली.

"नको, नको, आता आणखी काही नको" असे योगी म्हणाला व आपल्या आश्रमात जाण्यासाठी उडण्याचा प्रयत्न करू लागला, पण व्यर्थ! एवढ्याशा मोहाने त्याची योगसिद्धि संपली होती. तो पुन्हा कधीही आकाशमार्गाने फिरू शकला नाही. आणि म्हणून देव म्हणत आहेत -

"अर्जुना, तो ज्ञानी असा कठोर निग्रह करून जगतो. चित्ताचा संकोच व्हावा म्हणून तो देहाची आटणी करतो. इंद्रियांना चुचकारून आपल्या स्वाधीन करून घेतो. मनाच्या महाद्वारात अंतर्मुखतेच्या पहाऱ्याच्या जागेवर यम आणि दम म्हणजे इंद्रियनिग्रह व मनोनिग्रह हे पहारेकरी उभे ठेवतो. आधारचक्र, नाभीचक्र व कंठचक्र या ठिकाणी मूलाधार, उड्डियान व जालंधर या तीन बंधांची ठाणी जागती ठेवतो. चंद्रनाडी व सूर्यनाडी यांच्या संपुटात चित्त अडकवून ठेवतो. समाधीच्या शय्येवर ध्यानाला बांधून टाकतो आणि चित्त व चैतन्य यांचे सामरस्य अनुभवितो. अर्जुना, ह्याला आत्मनिग्रह म्हणावयाचे. तेथेच ज्ञानाचा विजय आहे. त्याचे अंतःकरण त्याची आज्ञा शिरोधार्य मानते. अशा पुरुषाच्या आकाराने ज्ञानच आपण पहातो आहो असे तू समज. पार्था, विषयभोगासंबंधी ज्याच्या चित्तात वैराग्याचा जिवंत झरा भरभरून वहात असतो तो ज्ञानी आहे असे समज.

ओकून टाकलेल्या अन्नावर वासना जात नाही, प्रेतास आलिंगन देण्यास कुणी आंग टाकत नाही. त्याप्रमाणे विषयवार्ता टाकून त्याची इंद्रिये तिकडे धावतच नाहीत. त्याच्या मनात अत्यंत आलस्य आहे कारण क्षणाक्षणास उठून मन हालवणारे संकल्प आता पूर्ण शांत झाले आहेत. देहाचे चोचले न पुरविल्यामुळे त्याला अत्यंत कृशता आलेली आहे आणि यमदमांच्या सहवासात तो रमून गेलेला आहे असे दिसले की तो ज्ञानी समजावा.

कुणी समजून उमजून विष खात नाही. जळत्या घरात डोळे उघडून कुणी प्रवेश करत नाही. वाघाच्या गुहेत कुणी कधी बिऱ्हाड थाटत नाही. उकळत्या लोखंडाच्या रसात कुणी उडी टाकत नाही किंवा अजगराची

अनुक्रमणिका

उशी करून कुणी झोपत नाही. अर्जुना, ह्या सर्व क्रिया अनर्थकारक म्हणून शहाणा माणूस झटकून टाकून देतो. त्याप्रमाणे तो ज्ञानी पुरुष विषयसेवन अनर्थकारी आहे हे जाणून त्याचा पूर्ण त्याग करतो आणि त्याऐवजी देह आणि मन, तप आणि व्रत यांच्या अगणित अनुष्ठानांचे आचरण करीत एकांतवासात रहातो. लोकांनी गजबजलेल्या शहरात येणे त्याला युगान्तासारखे दुःखदायक वाटते. योगाभ्यासाची त्याला हाव असते. वनाकडे त्याची धाव असते. जनसमुदायाचे त्याला नावही सहन होत नाही. ऐहिक भोग भोगणे म्हणजे पूयपंकांत लोळणे किंवा शरशय्येवर झोपणे आहे असा त्याने मनाचा पूर्ण निश्चय केलेला असतो. कुत्र्याचे कुजलेले मांस जितके तिरस्करणीय तितकेच स्वर्गसुख तिरस्करणीय आहे असे तो मानतो. म्हणजे ऐहिक भोगही नकोत आणि स्वर्गभोगही नकोत असा त्याच्या वैराग्याचा प्रखरपणा असतो. विषयवैराग्य आले की आत्मलाभाचे भाग्य चालत येते आणि जीव ब्रह्मानंदाला योग्य होतो. ह्या ज्ञानी पुरुषाने तर त्या स्वर्गसुखाच्या इच्छेचीही आहुती टाकली असल्याने तू खास असे समज की या पुरुषाच्या ठिकाणी ज्ञानाची नित्य वसती आहे.

ह्या ज्ञानी पुरुषाच्या ठिकाणी आणखी एक लक्षण स्पष्ट दिसून येते. तो पूर्णतया अनहंकारी असतो. तो यज्ञादिकर्मे ज्यांना इष्ट म्हटले जाते ती करतो. सकाम पुरुषांनी करावी तशी करतो. पण ती केल्याचा अहंकार उरू देत नाही. ती कर्मे "मी केली" असे म्हणत नाही. वर्णाश्रमाला पोषक अशी कर्मे बिनचूक वेळच्यावेळी साक्षेपाने करतो त्यात काही कमतरता ठेवत नाही. पण ही कर्मे मी केली असा भाव मनात लेशभरही ठेवत नाही. वायु एकसारखा फिरता राहून जीवांचे रक्षण करत असतो पण त्याचा अहंकार ठेवत नाही. सूर्य निरभिमान राहूनच उगवत असतो. वेद स्वभावतःच बोलत असतात. गंगा कामाशिवायच वहात जाते. त्याप्रमाणे मनात अहंकार न धरताच तो जगत असतो. योग्य ऋतू आला की झाडांना सहजच फळे येतात. पण आम्हाला फळे आली. आम्ही लोकांना तृप्त केले. असा अहंकार वृक्षाला नसतो. कर्म करीत असताना ज्या पुरुषाची वृत्ति अशी अहंकारहीन असते. त्याचे मन, कर्म, वाचा ह्या तिन्ही ठिकाणी अहंकाराचा अंशही उरत नाही."

श्री. गुरुदेव रानड्यांची पुन्हा आठवण येते. अहंकाराचा वास-वारासुद्धा लागू नये म्हणून ते किती जपत असत ते ह्या प्रसंगाने कळते. एका साधकाने, "उत्सव केव्हा करणार?" अशा पृच्छेचे पत्र पाठवले. निंबाळहून त्या पत्राचे उत्तर तयार झाले. त्या लिहिले होते, "अमुक तिथी पासून उत्सव करणार आहे" असे पत्र गुरुदेवांना दाखविण्यासाठी व मजकुरास संमती घेण्यासाठी नेल्यावर गुरुदेव म्हणाले, "उत्सव करणार आहे असे लिहू नका, होणार आहे असे लिहा." पोहचलेल्या मंडळींची ही जागरूकता! ही अनहंकारता!

देव म्हणाले, "एखाद्या रेशमी धाग्यात मोती ओवलेले असावे आणि तो सर मखमलीवर ठेवून धागा बेताने काढून घ्यावा म्हणजे तो सर आहे असा केवळ भास रहातो, त्या मोत्यांना एकत्र ठेवणारा दोरा आस्तित्वात असत नाही. त्याप्रमाणे तो पुरुष वेगवेगळी कर्मे करताना पाहिला की सामान्य व्यवहारी पुरुषासारखा भासेल, पण तसे असत नाही. ह्या कर्माशी सांधून टाकणारी अहंवृत्ति त्याने अशा खुबीने काढून घेतलेली असते की हा त्याग कोणाच्या ध्यानातही येत नाही.

आकाशात ढग असतात पण आकाशाची आणि ढगांची काही सांधेजोड नसते. मद्यपी माणसाच्या अंगावर वस्त्र असते, पण त्याला त्याचे भान नसते. चित्रातल्या माणसाच्या हातात शस्त्र असते, पण ते चित्र लढाई करू शकत नाही. बैलाच्या पाठीवर शास्त्रांच्या पोथ्या बांधलेल्या असतात पण बैलाला त्याचा काही

उपयोग नसतो. तसा हा पुरुष कर्म शरिराने करत असतो, मन पूर्णतया अलिप्त असते. देहाचे “आहेपण”च त्याच्या लेखी मांडलेले नसल्याने तो त्या देहाच्या कर्मास मी केले असे म्हणत नाही हे ओघानेच आले. त्याला देह म्हणजे मी याची कधी आठवणच नसते. अशा पुरुषाजवळ ज्ञान नांदते याविषयी शंका बाळगू नये.

जन्म, मृत्यू, दुःख, व्याधी आणि वार्धक्य ही अंगाशी येऊन झटण्यापूर्वीच त्याची नजर त्यांच्यावर रोखलेली असते.

श्री. भाऊसाहेबमहाराज उमदीकर नेहमी म्हणत, “मरणाचे स्मरण असावे.”

देव म्हणत आहेत, “अर्जुना, तो जन्माचे दुःख कधी विसरू शकत नाही. आजवरच्या सर्व जन्मांचे दुःख तो मनात बाळगत असतो.”

एक सुंदर मोठे घर होते. तळमजल्यावर धान्याचे दुकान होते. त्या दुकानात तांदळाची भली मोठी रास घातलेली होती. एक बकरा आला आणि त्याने त्या ढिगात तोंड घातले. त्या दुकानाचा तरुण मालक तिथे बसला होता. त्याने हातातील छडी त्या बकऱ्याच्या तोंडावर मारली. बकरा में में करत पळून गेला. नारद व अंगिरा असे दोघे ऋषी रस्त्याने चालले होते. नारदांनी ती घटना पाहिली आणि ते हसले. अंगिरा ऋषींनी विचारले, “नारदा, का हंसू आले तुम्हाला?” नारद म्हणाले, “हे दुकान प्रथम अगदी लहान होते. मालकाने अपार कष्ट केले आणि व्यापार वाढविला. ह्या दुकानापासून आपली भरभराट झाली अशी त्याची भावना असल्याने त्याने दुकान होते तिथेच ठेवले, व्यापारी खूप श्रीमान झाला. आता तो नुसता येऊन बसू लागला, नोकर कामे करीत. मुलगाही कर्तासवरता झाला. पुढे त्या व्यापाऱ्याला मुत्यू आला आणि काही पूर्वकर्मानुसार आता हा बकऱ्याचा जन्म आला आहे. आता ह्या इमल्याचा, दुकानाचा एकवेळ मालक असलेला जीव ह्या दुकानातल्या मूठभर धान्यालाही महाग झाला आहे आणि ज्या मुलाचे जीवापाड कष्ट काढून पालन पोषण केले त्याच्याच हातची छडी खाण्याची वेळ आली म्हणून मला हसूं आले. जगाचे रूप हे असे आहे.”

आता ही तर जन्माची शोककथा. अशा असंख्य कथा त्याच्या मनात घोळत असतात आणि “देवा, नको रे पुन्हा जन्म” असे तो ज्ञानी घोकत असतो. योगमार्गात अडथळे येतात हे जाणून योगी दक्ष असतो आणि भिंत वेडीवाकडी होऊ नये म्हणून ओळंबा खबरदार असतो, सर्प वैर विसरत नाही, तसा जन्मजन्माचे दुःख तो विसरत नाही. डोळ्यात धुळीचा कण विरघळत नाही. जखमेत शस्त्र जिरत नाही. त्याप्रमाणेच मागील जन्माचे दुःख तो विसरत नाही. गर्भावस्थेतील जन्मकाळची आणि बाळपणीची अशुद्धता त्याला सारखी आठवत असते. आणि त्यामुळे पुन्हा जन्म यावा ही कल्पनाही त्याला सहन होत नाही. तो मनाशी म्हणत असतो, “आता मी असे प्रयत्न करीन मला पुन्हा जन्मच येणार नाही. जुगारात हरलेले द्रव्य पुन्हा परत जिंकून घेण्याच्या इर्षेने जुगारी जसा पुन्हा डाव खेळायला बसतो किंवा वडिलांच्या वैराबद्दल मुलगा सूड घेण्यासाठी जसा हात धुवून मागे लागतो किंवा वडील भावास मारल्यामुळे त्याच्या पाठच्या भावास जशी बदला घेण्याची ईर्षा असते तसा तो जन्माच्या मागे हात धुवून लागतो. संभावित मनुष्य अपमान गिळू शकत नाही तसा जन्माला आल्याची लाज तो विसरू शकत नाही. त्यामुळे आपण पुन्हा जन्माला येऊ नये यासाठी काय करावे. कर्म कसे करावे याचे तो अहोरात्र चिंतन, मनन करतो आणि आपल्या जीवनाची वाटचाल ठरवितो. त्या भूमिकेला अनुरूपच वागतो.

जसे जन्माचे दुःख तसेच त्याला मरणाचे नित्य स्मरण असते. मरण कल्पान्ती येणार असले तरी ते जवळ आले आहे असे समजून तो सावध रहातो."

मालूताई, आमच्या बंगल्यासमोर सध्या महावीर कॉलेज आहे. तो आमच्या माहेरचा इचलकरंजीकरांचा बंगला. त्या बंगल्याच्या बागेत १९५४ साली आमच्या आजी आईसाहेब, आई वहिनीसाहेब व मी बसलो होतो. सहज बोलता बोलता आईसाहेब म्हणाल्या, "अक्का, हा बंगला कुणी बांधला माहीत आहे ना तुला?" मी म्हटलं, "हो. पणजीबाईसाहेबानीच सांगितले होते की पणजोबा सरकारांनी हा बांधला. किती भक्कम आणि छान मांडणी आहे. पण मनात येते किती बंगले, किती वाडे बांधले तरी एक दिवस हे इथल्या इथे टाकून बरोबर काही न घेता चालू लागायचे आहे." आता विचार केल्यावर वाटते आहे खरे म्हटले तर किती लहान तोंडी मोठा घास होता हा! पण आईसाहेब काही राग न दाखवता म्हणाल्या, "खर गं अक्का, तू म्हणतेस ते पण माणसाच्या ते ध्यानात रहात नाही."

हा प्रसंग आत्ता आठवण्याचे कारण असे की ह्या ओव्या वाचताना मनात यावयाचे की,जन्मकाळाची अशुद्धता वा मरणकाळचे दुःख कोण सांगू शकतो? जन्मकाळी वा अर्भकपणी तर पूर्ण अज्ञानच आहे. मृत्यू पावलेला मनुष्य दुःख कसे होते हे सांगायला आलेला माहीत नाही मग ह्या दोन अवस्थात क्लेश आहेत असे कसे म्हणावे? तर ध्यानात येते की दुसऱ्याचा जन्ममृत्यू पाहूनच तो ज्ञानी पुरुष सावध होतो. हा जन्माचा प्रसंग आपल्यावर येऊन गेला आहे आणि मृत्यूचा येणार आहे हे पक्के समजून तो कष्टाने, ह्या भ्रमणातून सुटण्याच्या प्रयत्नास लागतो.

श्रीबुवामहाराज, सिद्धेश्वरमहाराजांना जेव्हा पहिला मुलगा झाला तेव्हा त्यांच्या आई त्यांना म्हणाल्या, "महाराज, उठा. तुम्हाला मुलगा झाला. स्नान करा."

स्थिर नजरेने पहात बुवामहाराज म्हणाले, "दोन्ही स्नाने एकदमच करू." खरोखरच थोड्या वेळाने तो मुलगा गेला आणि दोन्ही स्नाने एकदम करण्याचीच वेळ आली. मनात येते या ज्ञानीपुरुषांना ह्या दोन्ही अवस्थांचे ज्ञान, परोक्ष व अपरोक्ष दोन्ही प्रकारचे असते आणि म्हणून स्वतःवर तो प्रसंग येण्यापूर्वीच त्यांनी तो अनुभवून टाकलेला असतो आणि त्याच्या परिहाराचे निकराचे प्रयत्न सुरू केलेले असतात.

देव सांगत आहेत, "नदीमध्ये अथांग पाणी आहे असे बघूनच नदीच्या काठावर असणारा पोहावयास पडण्यापूर्वी कास बळकट करतो. युद्धाच्या जागेवर पोचण्यापूर्वीच योद्धा आपले अवसान संभाळतो किंवा घाव अंगावर पडण्यापूर्वीच ढाल समोर धरतो. उद्याचा मुक्काम वाटमाऱ्याचा आहे म्हणून आजच सावध रहावे, प्राणांत होण्यापूर्वीच औषधासाठी धावाधाव करावी, तसा तो मृत्यूचे स्मरण ठेवून जागरूक रहातो. जळत्या घरात सापडल्यावर विहीर खणायला सवड कुठली? एखादा दगड खोल पाण्यात बुडाला आणि मी बुडलो असा त्याने आक्रोशही केला तरी तो बुडल्याची वार्ता त्या निर्जन रानातून येऊन कोण सांगील? ज्याचे बलिष्ठाशी वैर पडले तो अष्टौप्रहर शस्त्रास्त्रे घेऊन लढाईस सज्ज रहातो. तसा तो ज्ञानी नेहमी सावध असतो. गडगनेर झालेली नवरी माहेराबद्दल उदासीन असते, संन्यासी प्रपंचाबद्दल असतो. त्याप्रमाणे तो मरण येण्यापूर्वीच मरणाचे चिंतन

करून त्याबद्दल उदासीन झालेला असतो. आता जन्म नको म्हणून त्याने उपाय योजून ठेवलेले असतात. जन्मच आला नाही की पुन्हा मरण येण्याचे कारणच उरत नाही. तेव्हा अशा रीतीने तो ज्ञानी पुरुष जन्माला येऊन पुनर्जन्म निवारून टाकतो आणि मरणाच्या ध्यासातून हे उपाय योजले असल्याने मरणानेच मरण मारून टाकतो. ज्याच्या मनात जन्ममृत्यूचे शल्य अखंड रुतते आहे. त्याच्या घरी ज्ञानाला काही कमतरता नाही.

आता मरण येण्यापूर्वीच मरणाचा विचार तसा तो पुरुष म्हातारपण येण्यापूर्वीच म्हातारणाचा विचार करून ठेवतो."

मालूताई, सबंध ज्ञानेश्वरीत बीभत्स वर्णनाच्या एकमेव ओव्यांचा गट यापुढे आहे. वृद्धपणात होणारी शरिराची दुर्दशा या ओव्यात उघड वर्णन केली आहे. मला वाटते की, ती नित्य परिचयाची, अनुभवाची व खेदाची गोष्ट आहे. तेव्हा त्याबद्दल जास्त लिहू नये. त्यातला जो शेवटचा भाग तेव्हढाच घेते आहे.

देव म्हणतात, "शेजारीपाजारीसुद्धा म्हणू लागतात की, हा म्हातारा आता मरणार तरी कधी? किती माणसांना शिणवणार आहे हा!"

तरूणपणीच तो ज्ञानी ह्या शेवटच्या घृणास्पद स्थितीचा विचार करून मनातून विटून जातो. वरचेवर चिंतन करतो की, हे तारुण्य भोग भोगण्यात हातातून गळून पडेल आणि अशा प्रकारचे हे वार्धक्य येऊन उभे राहील. मग माझे हित मी कधी साधून घेणार? ह्या चिंतनातून तो आपल्या क्रियाही ठरवून टाकतो जे जे चांगले हिताचे ऐकण्याची इच्छा असेल ते ते बहिरेपणा येण्यापूर्वीच ऐकून घेतो. जेथे जावयाचे असेल तेथे पांगळेपण येण्यापूर्वीच जाऊन येतो. वाचा बंद होण्यापूर्वीच चांगले बोलावयाचे त बोलून घेतो. पुढे हात लुळे होणार म्हणून दानादिक गोष्टी करून घेतो. पुढची अवस्था त्याला कळतच असते. आपले मनसुद्धा पुढे वेडे होणार, चिंतनास निरुपयोगी होणार आहे हे जाणून चिंतन करून ठेवतो. आत्मज्ञानाचा विचार आत्मसात करतो. चोर उद्या द्रव्यावर तुटून पडतील म्हणून आजच संपत्ती सुरक्षित ठिकाणी हालवावी किंवा दिवा आहे तोवरच झाकपाक करावी त्याप्रमाणे वार्धक्यातील कष्टदशा मनात आणून ती येऊन पोचण्यापूर्वीच तारुण्यातच ती सगळी अशी व्यवस्था लावून ठेवतो. जिकडे जिकडे किल्लेच किल्ले आहेत अशा प्रदेशात पक्षी घरट्यात परतण्यापूर्वीच एखाद्या किल्ल्याचा आश्रय केला आणि पुढचा प्रवास थांबवला तर तो प्रवासी चोरांकडून लुटला जात नाही. तसा तो ज्ञानीपुरूष आत्मसंरक्षणाचे उपाय तरुणपणीच योजून स्वस्थ रहातो. आपण शतायु आहो की, नाही हे कुणास ठाऊक आणि असलो तरी तरुणपण मौजमजेत घालवून एकदम म्हातारपण आले की जन्माला येणेच फुकट जावयाचे. तेव्हा वेळ फुकट न घालवता आत्मज्ञानाचे सर्व उपाय तो निकराने करत रहातो. तिळाची झाडलेली बोंडेच पुन्हा झाडली की मग बोंडातून आणखी तीळ निघत नाहीत किंवा राखेला अग्नि जाळत नाही. त्याप्रमाणे वृद्धत्त्वाची सतत टोचणी असल्याने जो वृद्धत्त्वाच्या कचाट्यातून सुटतो, त्याच्या ठिकाणी ज्ञान आहे असे समजावे.

पुढे नाना रोग येऊन शरिरावर झडप घालतील त्याची आठवण ठेवून एखादा शहाणा औषधाची आधीच योजना करून आरोग्याचे रक्षण करतो किंवा सापाच्या तोंडात पडलेली उंडी शहाणा मनुष्य तात्काळ टाकून देतो. त्याप्रमाणे स्नेहाच्या बंधनामुळेच दुःख, शोक, विपत्ती ही संकटे येतात हे जाणून आपण स्नेहाच्या

विळख्यात सापडूच नये म्हणून तो उदासच रहातो, अलिप्तच रहातो. निषिद्ध आचरण इंद्रियांच्या छिद्रातून प्रवेश करीत असते. म्हणून तो त्या छिद्रात नियमांचे दगड घालून बिळे बुजवितो. अशा सामुग्रीने तो जगत असतो. अर्जुना, असा पुरुष ज्ञानरूपी ऐश्वर्याचा मालक असतो.

आणखी एक लक्षण त्या ज्ञानीपुरुषाच्या ठिकाणी दिसते. वाटसरू धर्मशाळेत अलिप्त वृत्तीने रात्रभर रहातो तसा तो संसारात अलिप्तपणाने राहतो. तो मुळात देहावरच आसक्त असत नाही. वाटेने जाताना कुठेतरी थोडावेळ झाडाची सावली भेटावी आणि तिच्याबद्दल आसक्ती वाटवी तेव्हढीदेखल त्याची घरावर आसक्ती नसते. सावली आपल्याबरोबरच असते, पण आपल्याला सावलीची जाणीव नसते. त्याप्रमाणे स्त्री बरोबर असली तरी तिच्याबद्दल त्याच्या मनात अभिलाषा असत नाही. वृक्षाच्या तळाशी गुरे विश्रांतीला बसतात, त्यांचे सुखदुःख त्या वृक्षाला जसे नसते तशी त्याला आपल्या मुलाबाळाविषयी आसक्ती नसते. वाटेचे वाटसरू भेटावे असा भाव त्यांच्याबद्दल त्याच्या मनात असतो. संपत्तीमध्ये असताना तो त्या संपत्तीचा जसा काही वाटेने जाताना धरून आणलेला साक्षीदार आहे की काय असे वाटावे असा उपभोग अलिप्तपणे घेतो. पिंजऱ्यातला पोपट जसा गजाआड निमूटपणाने रहातो तसा तो वेदाज्ञेला भिऊन तिच्या धाकात रहातो, वागतो. ज्याला स्त्रीपुत्रगृहासंबंधी मनातून आसक्ती नाही तो ज्ञानाची पालनकर्ती धात्री आहे असे समज.

आता ही अवस्था कठीण खरी पण त्याने साध्य केलेली असते. त्या अवस्थेला समचित्तत्व म्हणावयाचे. उन्हाळ्यात वा पावसाळ्यात महासमुद्र जसा सारखाच भरलेला असतो, ऋतुचक्राचा त्याचा पूर्णापूर्णतेशी काही संबंध नसतो तशी त्या पुरुषाच्या ठिकाणी इष्टानिष्टतेची भावना नसते. इष्टानिष्ट काहीही समोर आले तरी तो स्थिरचित्त रहातो. तीनही काळात सूर्याचे जसे तीन तुकडे वेगवेगळे होत नाहीत तसे इष्टानिष्टतेमुळे त्याची शांती भंग पावत नाही. आकाश सगळीकडे सारखे भरून राहिलले असते त्याप्रमाणे सर्व अवस्था तो त्रयस्थ राहून भोगतो आणि असे जो पुरूष करतो त्याच्या ठिकाणी ज्ञान परिपूर्ण आहे असे समजावयाचे.

अर्जुना, माझ्या ठिकाणी ज्याची अनन्य भक्ति आहे तो ज्ञानी आहे असे समज. त्याने मनाचा असा पक्का निश्चय केला आहे की एका भगवंतावाचून जगात दुसरे काहीही सुंदर नाही. शरिराने, वाणीने, मनाने त्याचा हा निश्चय क्षणाक्षणाला प्रगट होत असतो. अर्जुना, ह्या तिघांनी शपथ घेऊनच हा निश्चय केला आहे रे. काय सांगू असा भक्त माझ्यावाचून दुसऱ्या कशाचीही इच्छा करीत नाही."

देव म्हणतात, "फार काय सांगू अर्जुना, ज्याने अशारितीने आपले मन पूर्णतया मला अर्पण केले त्याची आमची शय्या एक झाली असे समज. आपल्या पतीला भेटताना जशी एखादी स्त्री निःशंकपणे भेटते, सर्वस्व अर्पण करून समरस होते. त्याप्रमाणे तो भक्त मला भेटतो. गंगाजल वहात वहात समुद्रामध्ये येऊन निरंतर समुद्रास येऊन मिळते. पाण्याचे लोट येऊन पुन्हा पुन्हा मिळतच रहातात. त्याप्रमाणे सर्व भावांनी तो माझ्याशी एकरूप होत रहातो.

ह्या ज्ञानी पुरुषाचे मन देवस्वरूप झाले तरी क्षणाक्षणास पुन्हा तो देवाचे चिंतन करीत असतो. त्याच्या चित्ताचा तो स्थायीभाव होऊन रहातो. सूर्याची प्रभा सूर्याबरोबर प्रकट होते आणि सूर्याबरोबर लुप्त होते. हे अनन्य सामरस्य त्या प्रभेला शोभूनच दिसते. पाण्यावर सहज पाणी तळपत असते, उठत असते. व्यवहारात

त्याला लाटा असे म्हटले जातेही पण विचार केला तर लाटा काहीएक वेगळा पदार्थ आहे काय? ते निव्वळ पाणीच नव्हे काय? त्या लाटा पाण्याच्याच असतात. पाण्यातच रहातात. पाण्यातच विरतात तसा तो पुरुष देहाने वेगळा दिसला तरी माझ्यातच असतो. माझ्यातच जगतो आणि देह नाहीसा झाला तरी माझ्यातच मिसळून जातो. अर्जुना, अशा अनन्यतेने जो पुरुष मला येऊन मिळाला तो मूर्तिमंत ज्ञानी आहे. देहधारी ज्ञानच आहे.

असा तो ज्ञानी पुरुष जास्त करून एकांतात असतो. तीर्थे, नदीतट, समुद्रतट, तपोभूमी किंवा गुहा यात रहाणे त्याला आवडते. पर्वताच्या बगलेत गुहा किंवा सरोवराचा परिसर पाहून तो तिथे रहातो, सहसा नगरात येतच नाही. एकांताची आवड आणि लोकांताची खंत जिथे तुला दिसेल तिथे मनुष्याच्या आकाराने ज्ञानच नांदते आहे असे समजावे.

अर्जुना, ज्ञानाची आणखीही काही लक्षणे आहेत ती तुला सांगतो.

परमात्म्याचा अनुभव ज्या ज्ञानामुळे येतो ते ज्ञान खरे आणि बाकी सगळे ज्ञान व्यर्थ आहे असा त्याच्या मनाचा निश्चय झालेला असतो. स्वर्ग व संसार यासंबंधीच्या ज्ञानाविषयी त्याच्या मनात तिळमात्रही प्रेम नसते. आपण स्वर्गाला जावे हा विचार तो टाकून देतो. संसारासंबंधीच्या गोष्टी कानावर येऊ देत नाही. सद्भावना चित्तात ठेवून तो आत्मज्ञानात बुडी मारून बसतो. एखादा मनुष्य प्रवासास निघाला की त्याने आडवाटा कुठे कुठे आहेत याचा शोध घेऊन ठेवून त्या टाळून थेट राजमार्गाने जावे तसा तो इतर सर्व प्रकारचे ज्ञानमार्ग टाळून केवळ आत्मज्ञानाचा राजरस्ता चालत रहातो. त्याच्या मनाचा असा पक्का निश्चय झालेला असतो की आत्मज्ञान हेच एक तारक आहे. इतर काहीही जाणणे ही भ्रान्तीच आहे. असा तो मनाने मेरू होतो. ध्रुव जसा आकाशात एका जागी स्थिर असतो तसा त्याचा आत्मज्ञानाचा निश्चय अढळ असतो. त्याच्या ठिकाणी ज्ञान आहे असे मी म्हटले तर अर्जुना, मी आडपडद्याने बोलतो असे वाटेल. म्हणून तुला स्पष्ट सांगतो की जेव्हा त्याचे मन ज्ञानाविषयी इतके अचल होते तेव्हा तो पुरुष त्याचवेळी ज्ञानच होऊन जातो.

मालूताई, यापुढील ओव्या ज्ञान, ज्ञेय व अनुभव यावर आधारलेल्या आहेत. क्रम असा की अध्यात्मज्ञान हेच एक खरेखुरे ज्ञान असा त्या पुरुषाचा निश्चय होतो. ते ज्ञान व्हावे म्हणून तो उपासना करू लागतो. उपासनेचे फल म्हणजे ब्रह्माचा साक्षात अनुभव त्याला येतो. ब्रह्माचा असा अनुभव येईपर्यंत ज्ञान झाले असे म्हणता येत नाही.

श्रीगुरुदेवांच्या चरित्रात असा उल्लेख आहे की १९०९ साली मेंदूच्या विकाराने गुरुदेवांची प्रकृति फारच बिघडली. शैक्षणिक क्षेत्रात अनुपम यश संपादून प्रगतिपथावर असलेल्या गुरुदेवांना क्षयाने गाठले. नासिकाग्री दृष्टि ठेवून नामस्मरण करणेसुद्धा त्यांना अशक्य वाटू लागले. मस्तक हलके झाले. वैद्य लागवणकरांचे औषध चालू होते. "दवा मेरा दया तेरी" अशी शास्त्रीबुवांची श्रद्धा होती. अत्यंत त्रस्त व चिंताग्रस्त मनःस्थितीतून गुरुदेवांनी श्री. भाऊसाहेब महाराजांना पत्र लिहिले. त्यात लिहिले आहे, "प्रकृतिमुळे नेम होत नाही." "माझा अहंभाव असे शरिरी। तथापि तो सद्गुरू अंगिकारी॥" ह्या न्यायाने स्वस्वरूपाची प्राप्ती कशी होईल या विवंचनेत पडलो आहे. मनात अभ्यासाची फार इच्छा आहे.

**सद्गुरू वाचोनी सापडेना सोय । धरावे ते पाय आधीं आधीं ॥**

ह्या व्याकुळ मनःस्थितीतून लिहिलेल्या पत्रास महाराजांनी उत्तरी लिहिले आहे.

"आपल्यास सवड असलेवेळी निष्ठेने नियम ठेवावा. अखंड नाम व दृष्टि अशी आठवण निरंतर असावी.

**आठव तो ब्रह्म । नाठव तो भवभ्रम ॥**

या समर्थ वाक्याप्रमाणे समजून अहा. कोणते प्रकारे काळजी करू नये. सर्व समर्थांनी मनोरथ पुरवून देत आहे. ज्याची आठवण त्यांनी आपोआप सर्व गोष्टी सांभाळ करीत आहे व मनोरथ पुरवीत आहे."

आपल्या सद्गुरुंच्याकडून अशा तऱ्हेचे पत्र आल्यामुळे गुरुदेवांनी रा. सावळगी लिंगाप्पा व रा. मल्लारपंत जोशी यांच्या समवेत खूप जोराने नेम करण्यास सुरवात केली. निरनिराळ्या प्रयत्नांनी परमेश्वरी साक्षात्काराचे एकच ध्येय डोळ्यापुढे ठेवून इतर जीवनक्रम आखला. प्रकृति बिघडली तरी नेम जास्त कट्टाने, असे केल्यावर पारमार्थिक अनुभव स्थिर होण्यास सुरवात झाली. गुरुमातेसह गुरुदेव मग भाऊसाहेब महाराजांच्या सान्निध्यात इंचगेरीस जाऊन राहिले. या संप्रदायात परमेश्वरी अनुभवाच्या प्रतिकास "वस्तू" म्हटले जाते. एके दिवशी महाराजांनी गुरुदेवांना विचारले "इथे टांगलेल्या दिव्याच्या ज्योतीवर तुम्हाला दिवसा दिसणारी वस्तू रात्री दिसते का?" गुरुदेवांनी होकारार्थी उत्तर दिले. नंतर तिथेच त्यांना विविध रंगाचा अनुभव येऊ लागला. नादानुभवास तर भरतीच आली.

**आरती विठ्ठलाची । पूर्ण उजळली अंतरी ॥**
**प्रकाश थोर झाला । सांठवेना अंबरी ॥**

अशी स्थिती झाली. "इंचगेरीस राहून प्रकृति सुधारली. हवा चांगली आहे आणखी काही दिवस इथेच राहू का" असे गुरुदेवांनी विचारल्यावर महाराज म्हणाले, "प्रकृति हवेने सुधारली नाही. नामस्मरणाने सुधारली पुण्यास जावे. नामस्मरण करीत जावे. हवा तरी देवच करतो."

सद्गुरुंच्या आज्ञेप्रमाणे गुरूदेव पुण्यास गेले व त्यांचा परमार्थ स्थिर झाला.

गुरुदेवाचे एक जिवलग मित्र सावळगी लिंगाप्पा यांनी गुरूदेवांना एक पत्र लिहिले आहे. त्यावरूनही आत्मज्ञान मिळविण्याचा निश्चय त्या दिशेने कटून प्रयत्न व प्रत्यक्ष वस्तुलाभानंतर येणारा अनुभव लिंगाप्पांनी पत्रात लिहिला आहे.

लिंगाप्पा शेतकी कॉलेजमध्ये शिकत होते. घरून पुण्यास जाण्यासाठी कुडची स्टेशनवर रेल्वेच्या डब्यात पासोडी पांघरून नेमास बसले की पुणे स्टेशन येईपर्यंत कोणत्याही परिस्थितीत नेमातून उठत नसत.

साधना इतक्या निष्ठेने चालली होती. त्यांनी गुरुदेवांना ५ जानेवारी १९१० रोजी लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे "रसायनशास्त्रातील एक उदाहरण सोडवीत माझ्या खोलीबाहेर मी उन्हात बसलो होतो. भोवताली कॉलेजचे इतर विद्यार्थी होते. एकदम. अत्यंत तेजस्वी प्रकाशमान व चकाकणारी एक आकृती मोत्यासारख्या गोलकांनी युक्त अशी माझ्या पुस्तकाच्या रसायनशास्त्राच्या पानावर नेहमीप्रमाणे दिसू लागली. उदाहरण सोडविण्याचे मी विसरून गेलो. त्या आकर्षक आकृतीकडे पहाण्यातच रंगलो. अचानक मला कानडी पदाची पुढील ओळ आठवली. "डोळे मिटले तरी ॐकार स्वरूप दिसते." म्हणून मी डोके वरती करून सूर्याभिमुख करून डोळे घट्ट मिटले तरीदेखील ती आकृती मला पापण्याच्या आत डोळ्यात दिसत होती. मला फार आनंद झाला. मी माझ्याशीच हसत होतो. भोवतालचे विद्यार्थी माझ्या मूर्खपणाबद्दल हसले असतीलच.

मला जे वाटते ते सांगून टाकतो. देव सर्वत्र आहे हे बरोबर नाही, देव स्वर्गात किंवा पवित्र क्षेत्रात वसत नाही. तो आपल्या भक्तांच्या समोर तेवढा असतो.

माझ्या गुरुमहाराजांनी मला आज एक पाऊल पुढे नेले आहे. माझ्या आनंदाला सीमा नाही. आज सुट्टी."

ह्या दोन उदाहरणावरून समजून घ्यावचे की आत्मज्ञान प्राप्त करून घेण्याचा निश्चय ही पहिली पायरी. कट्टाने प्रयत्न ही दुसरी व प्रत्यक्ष ब्रह्मवस्तू हस्तगत होणे ही तिसरी पायरी आहे. हा अखेरचा टप्पा आहे. पण देव म्हणत आहेत की जेव्हा त्याचे मन ज्ञानाविषयी निश्चित झाले तेव्हाच त्याची व ज्ञानाची बरोबरी झाली. फक्त पूर्णत्व आले असे म्हणता येत नाही.

तत्त्वज्ञानाचे निर्मळ फळ ब्रह्माचा अपरोक्ष साक्षात्कार हे आहे. ज्ञेयावर सरळ नजर गेली पाहिजे-जशी लिंगाप्पांची गेली असे वाटते.

म्हणून देव म्हणत आहेत, "ज्ञानाचा बोध झाला तरी अजून ज्ञेय समोर दिसत नाही असे असेल तर ज्ञानाचा लाभ झाला असे म्हणणे आम्हाला बरोबर वाटत नाही. हातात दिवा आहे पण तो माणूस पूर्ण आंधळा आहे त्याला दिसत नाही असे असेल तर दिव्याचा काय उपयोग? ज्ञाननिश्चय ज्ञेयाचा अनुभव प्रत्यक्ष येईपर्यंत वायाच गेला असे म्हणावे लागते. ज्ञानाचा प्रकाश पडला की परतत्त्वात बुद्धिचा प्रवेश झालाच पाहिजे. तसे न झाले तर बुद्धि आंधळी होऊन राहिली आहे असे म्हणावे लागते. ज्ञान जेवढे दाखवील तेवढे सगळे ब्रह्मरूपच आहे हे कळले पाहिजे. बुद्धि अशी शुद्ध झाली पाहिजे. निर्मळ ज्ञानाने दाखविलेले ज्ञेय जो शुद्ध बुध्दिने पहातो तो ज्ञानी आहे असे समजावे. जेवढा ज्ञानाचा विकास तेवढी त्याची बुद्धि फाकलेली अशी अवस्था असेल तेव्हा तो पुरुष ज्ञानी आहे हे शब्दाने वर्णन करण्याची जरूरी नाही. ज्ञानाच्या प्रकाशाबरोबर त्याची बुद्धि ज्ञेयाला मिळते तो परब्रह्माला हातोहात जाऊन भेटतो.

असा पुरुष ज्ञानी आहे हे वेगळे सांगावयासच नको. सूर्याला सूर्य असे शब्दात वर्णन कशाला करावयास हवे? त्याचा प्रकाशच त्याचे रूप सांगतो. त्याप्रमाणे त्या ज्ञानी पुरुषाची स्थिती शब्दातीत अशा प्रकारची पण उघड असते.

श्रोते म्हणाले, “ते असू दे. त्या पुरुषाचे अतिशयोक्तीचे वर्णन करू नकोस. ग्रंथ सांगण्याच्या आड हे वर्णन यायला नको. तरी पण ज्ञानासंबंधी तू सविस्तर उहापोह केलास हे चांगले केलेस. ज्ञानविषयाचा विस्तार केलास हा आमचा फार चांगला पाहुणचार केलास. होते काय आहे की काही कवि रसाचा परिपोश अतिशय उत्तम करतात पण त्यात ज्ञानाच्या विषयाचा उल्लेख नसतो. खरे म्हणजे असा रसपरिपोष काय कामाचा? एखादी गाय सगळ्या बाजूंनी उत्तम आहे पण संध्याकाळी धारेला कुणी कासेला हात लावला की लाथेचा फटकारा मारते. आता अशी मारकी गाय कोण पोशील? उत्तम स्वयंपाक करावा, पाहुणा बोलावून पानावर बसवावा आणि मग स्वयंपाकाची भांडी घेऊन त्या सुगरणीने पळून जावे असा प्रकार या ज्ञानविषय न मांडणाऱ्या कवींचा असतो. पण तू त्यांचा हा मंत्र घेतला नाहीस. ज्ञानाचा विषय प्रामुख्याने मांडून मग रसपरिपोषही केलास म्हणून आम्ही म्हणतो उत्तम पाहुणचार केलास. नाहीतर आमंत्रण देऊन शत्रू व्हावयाचे असा प्रकार व्हावयाचा.

ज्ञानामध्ये बुद्धि प्रवेश करीत नाही आणि इतर विषयात ती फाकते असा विस्तार इतर कवि करतात तू केला नाहीस हे फार चांगले केलेस. ज्ञानदेवा, विस्ताराचा कोण कंटाळा करील? योगासारखे अपार कष्ट करून जे मिळवावे लागते अशा ज्ञानाचा विषय, त्यात तुझे तृप्त करील असे रसाळ निरूपण! अमृताचा पाऊस एकसारखा सात दिवस पडला म्हणून कुणाला कंटाळा येईल का? सुखाचा काळ असताना, “किती दिवस असे सुखात जायचे” असा हिशोब कुणी करतो का? पूर्ण चंद्राच्या रात्री एक युगभर न उजाडणारी पहाट असली तर चकोरांना काय ती नकोशी वाटेल? त्याप्रमाणे हे ज्ञानाचे बोलणे आणि ह्यात ते इतके रसाळ मग आम्हाला कंटाळा कसा येईल? आणि तुझी पण तशीच अवस्था झाली आहे. भाग्यशाली पाहुणा घरी आला आणि भाग्यशाली गृहिणी अगत्याने वाढू लागली की, भोजनाला संपणे माहितच होत नाही. तसे तुझ्या निरूपणास अपूर्व भरते आले. आम्हाला ज्ञानाविषयी जिव्हाळा आणि ज्ञानदेवा, तुम्हाला ज्ञानाबद्दल अत्यंत प्रेम! मग तो सोहळा काय विचारावा? तुझ्या निरुपणास चौपट भरती आली. तुझी दृष्टि ज्ञानाच्या विषयात चौफेर पोचणारी आहे यात शंकाच नाही.

आता आम्हाला हा विषय कळला आहे. बुद्धिचा असाच विकास करीत पुढील श्लोकांतील पदांचे यथार्थ निरुपण करावेस अशी श्रोत्यांची आज्ञा झाली. संतांचे हे वाक्य आल्याबरोबर निवृत्तीदास ज्ञानदेव म्हणाले, “महाराज, आपण माझेच मनोगत बोललात. पुढच्या विषयाकडे आता वळतो. विस्तार न करता आता पुढच्या विषयाचे निरूपण करतो. महाराज, ऐकावे. त्या धनुर्धर अर्जुनाला देवांनी ज्ञानाची अशी अठरा लक्षणे सांगितली आणि म्हटले करतलावर डोलणारा आवळा जसा सर्व बाजूनी निरखून पहाता येतो तसे ज्ञान पहाता येईल अशाप्रकारे तुला सांगितले. एखाद्यास ज्ञान झाले आहे हे असे निरखून पहाता येईल. ज्ञान या प्रकारे जाणता येईल असे माझे तर मत आहेच पण ज्ञानी पुरुषांचेही आहे.

अर्जुना, तू फार बुद्धिमान आहेस. ज्ञानीपुरुषाची लक्षणे कळल्यावर त्याविरुद्ध दिसणारी सर्व लक्षणे अज्ञानी पुरुषांची हे तू सहज ओळखू शकशील. पण तरीही काही काही चिन्हे सांगून ठेवतो. दिवस पूर्ण संपला की, रात्रीची पाळी आलीच. मधे दुसरे, तिसरे काही असू शकत नाही. तसे जिथे ज्ञान नाही तेथे अज्ञान आहेच हे ओघाने येतेच आहे, पण विषय आणखी स्पष्ट व्हावा म्हणून लक्षणे सांगून ठेवतो.

अनुक्रमणिका

अज्ञानी पुरुष तो की, जो मान आणि सन्मान यांची वाट पहात राहतो. तो आपला सन्मान व्हावा म्हणूनच जगत असतो. कुणी सत्कार केला की, त्याला संतोष होतो. पर्वताची शिखरे जशी ताठ असतात कधी लवत नाहीत. अर्जुना, तसा तो गर्वाने ताठलेला असतो. अशा पुरुषाच्या ठिकाणी अज्ञान नांदते आहे असे समज. पिंपळाची मुंज केली की, मोळाची दोरी सर्वांना उघड दिसेल अशी बांधून ठेवतात त्याप्रमाणे आपण केलेल्या धर्माचा डांगोरा पिटण्याची त्याला सवय असते.

पुण्यास एका मंदिरात देणगी देताना धनिकाने अट घातली होती की, माझ्या नावाची पाटी संगमरवरी दगडात कोरून देवाच्या डोक्यावर बाहेरच्या बाजूस लावणार असाल तर पाच हजार रुपयांची देणगी देतो!"

देवाला देताना पूर्ण समर्पण नसतेच. हातचे राखून आणि दिल्याचा अहंकार ठेवूनच दिले जाते. आमचे आजोबा इचलकरंजी सरकार म्हणाले होते, "वाडीला गेलो आणि पेढे घेतले. सगळेच कशाला देवाला ठेवायचे म्हणून अर्धेच देवाला ठेवले. त्यातलेसुद्धा प्रसादाचे म्हणून काही परत आलेच. पहिले अर्धे आणि प्रसादाचे पेढे घरी आणले पण देवाने शिक्षा केली. सगळे पेढे वाईट निघाले."

परवा मलकापूरला देवाला गुळाची पहिली शेरणी ठेवण्याच्यावेळी तसेच झाले. देशमान्यांनी मोठी शेरणी आणली म्हणाले, "अर्धी ठेवतो" मीही अनवधानाने "हो" म्हटले. गुरुजी तीर्थ देण्यास वर आले तेव्हा रागावले. म्हणाले, "देवाला देताना निम्मं का? गूळ तर आम्हालाच मिळायचा पण तो ठेवताना निम्मा ठेवायचा नाही. पूर्णच ठेवला पाहिजे. देव फळही निम्मेच देतो मग, "मी म्हटलं, तुमचं म्हणणं बरोबर आहे. पुढच्या वेळी खबरदारी घेतली जाईल."

देव सांगत आहेत, "पार्था, दिलेलं मिरवणं हे तर पूर्ण अज्ञानाचे लक्षण आहे. देवळात मोर्चेल, सर्वांना उघडउघड दिसेल असे मुद्दामच ठेवलेले असते तसा तो आपण केलेला धर्म लोकांना वाचेने सांगत सुटतो. विद्येचे दुकान घालतो. आपल्या पुण्यकर्माची दवंडी पिटवतो आणि जे जे करतो त्याचा मोहरा आपली कीर्ति व्हावी इकडे असतो. अंगाला भस्म, गंधाचे लेप लावतो, थाटामाटाने पूजा करतो आणि ह्या देखाव्याने लोकांना फसवितो. तो मनुष्य अज्ञानाची खाण आहे असे समज.

अर्जुना, अज्ञानी पुरूषाचे आणखी एक लक्षण सांगून ठेवतो. त्याचा आचार असा असतो की, त्यामुळे अरण्यात अग्निचा संचार व्हावा आणि स्थावर जंगम पोळून, जळून जावे तसा जगाला दुःखद होत असतो.

अरुणाचलावरील एका बाईचा नेम असा होता की, बेलाची हजार पाने शिवास वाहिल्यावर मगच जेवायचे. मिळेल तेथून, मिळेल तसा बेल ओरबडून आणण्याचा तिचा क्रम श्रीरमणमहर्षीच्या ध्यानात आल्यावर ते म्हणाले, "बाई, का त्या बिचाऱ्या झाडांना दुःख देतेस? तुझे अवयव कुणी असे तोडले तर तुला काय वाटेल? काय यात तुला पुण्य लागणार?"

तर देव म्हणत आहेत की, "पार्था, स्थावर जंगमास आपल्याकडून कुठल्याही प्रकारे दुःख पोचत

असेल तर तो आचार जरी देवाच्या नावाने केलेला असला तरी त्याज्यच आहे. अज्ञानी कृती आहे असेच समजावे. अरे, त्या माणसाची सर्वच कृती अशी अज्ञानी असते, दुःखदायक असते तो जे सहज बोलतो ते भाल्याहून तीक्ष्ण असते, भाल्यापेक्षाही ऐकणाऱ्याला खोल जखमा करणारे असते. त्याच्या मनातले संकल्प विषापेक्षाही मारक असतात. अर्जुना, असे ध्यानात घ्यावे की संकल्प मारक, वाचा दुःखदायक आणि कृती घातक असा ह्या माणसाच्या कृतीचा मेळ असतो. त्याच्या ठिकाणी अज्ञानाचा खजिनाच असतो. त्याचे सर्व जीवन हिंसेचे वसतिस्थान असते.

भाता जसा फुंकल्याने फुगतो, वारा सोडला की खाली बसतो तसा तो मनुष्य वस्तूंच्या लाभ हानीने सुखी किंवा दुःखी होत असतो. कोणी जराशी स्तुती केली की, धूळ जशी वाऱ्याच्या लोटाने आकाशात वर चढून बसते तसा तो चढून बसतो. जरा निंदा कानी पडली की, डोक्याला हात लावून बसतो. चिखल जसा पाण्याने विरघळतो, वाऱ्याने वाळतो तशी त्याची स्थिती असते. मान आणि अपमान यांच्या चपेट्याने त्याच्या मनाची तशी अवस्था होते आणि कशाचीच उर्मी तो सहन करू शकत नाही.

एक साधुपुरुष गावाबाहेर एका मंदिरात रहात असत, एका मुलीवर नको तो प्रसंग ओढवला. तर तिने त्या साधूचे नाव घेतले. मुलीच्या आईवडिलांनी मुलीला मंदिरात नेले. साधुबुवांची यथेच्छ नालस्ती कली आणि मुलीला तेथेच सोडून ती दोघे परत आली. साधुबुवा फक्त म्हणाले, “तरी बरे” मग त्यांनी भिक्षा मागून त्या मुलीचा प्रतिपाळ केला. योग्यवेळी तिला मुलगा झाला. साधुबुवा म्हणाले, “तरी बरे” भिक्षा मागून सांभाळ करणे चालूच होते. काही दिवसांनी गावातल्या त्या अपराधी तरुणास पश्चात्ताप झाला. साधुबुवाकडे गेला, पाय धरले, क्षमा मागितली आणि म्हणाला, “मी ह्या दोघांना घेऊन जातो. माझीच जबाबदारी आहे ती.” साधुबुवा म्हणाले, “तरी बरे” ही ज्ञानीपुरुषाची अवस्था. याउलट हा अज्ञानी कुठलीही उर्मी सहन करू शकत नाही.

अर्जुना, अज्ञानी जीवाची आणखी एक खूण अशी की तो मनुष्य आतून एका प्रकारचा आणि बाहेरून दुसऱ्याच प्रकारचा असतो. त्याच्या मनात कपट असते. बाह्यक्रिया तो चांगली दाखवत घात करतो. त्याची दृष्टी मोकळी, वाचा मैत्रीची असते पण ती मैत्री केवळ शरिराची असते. मनाने तो वैरच करीत असतो. पारधी जसा जनावरे पकडण्यासाठी त्यांना चारा घालतो त्याप्रमाणे मनात घात करण्याच्या योजना करून तो बाह्यतः मित्रत्व दाखवतो. चांगल्या अंतःकरणाच्या माणसाशी तर त्याचे वैरच असते. त्याचे बाह्य आचरण हिरव्यागार शेवाळात गुंडाळलेल्या गारगोटीसारखे किंवा पिकलेल्या निंबोळीसारखे असते. शेवाळ्यामुळे ती गारगोटी मृदू असेल असे वाटते आणि निंबोळीचे बाह्य रंगरूप पाहून ती गोड असेल अशी कल्पना हाते. पण गारगोटी कठीण व निंबोळी कडू तसा तो मनुष्य बाहेरून सुष्ट पण आतून दुष्ट असतो आणि पार्था, असा दुटप्पी मनुष्य अज्ञानी आहे असे खुशाल समज. शल्य मामांचा उत्तम आदरसत्कार करून त्यांच्याकडून, “मी पांडवांच्याविरूद्ध तुझ्या बाजूने लढेन” असे वचन ह्या लढाईपूर्वी दुर्योधनाने घेतलेले तुला माहीत आहे ना? ही कपटगर्भमैत्री हे अज्ञानाचे लक्षण आहे व ही वृत्ति अंती आपलाच घात करते हे ध्यानात ठेवावयाचे. पण काय करणार अज्ञानी जीव आपण काय बहादुरी केली या आनंदातच असतात, जसा आज दुर्योधन आहे. या कपटनाट्याचा शेवट काय आहे हे त्याला माहीत नाही म्हणून हा आनंद! तू माझ्यावर विश्वास ठेव की अशा ठिकाणी अज्ञान परिपूर्ण स्वरूपात वास करते.

अरे, त्या अज्ञानी जीवास गुरुकुळाचीही लाज वाटते. तो गुरुभक्तिला कंटाळतो. गूरूकडून विद्या घेतो आणि त्याच्यावरच उलटतो. अशुद्ध अन्न घेतल्यावर जसे जिभेला पाप लागते त्याप्रमाणे हे अज्ञानाचे लक्षण सांगूनही जिभेला पाप लागते. पण अज्ञानाची लक्षणे सांगताना त्याचे नाव घेणे भाग पडले. आता गुरुभक्तांची नावे घेऊनच वाणीला प्रायश्चित देऊ. सूर्य जसा सर्व दोषांचा परिहार करतो तसे गुरुभक्तांचे नाव पापहारक आहे."

मालूताई, या ठिकाणी आमच्या गुरुदेवांनी निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई, एकनाथ, नामदेव, तुकाराम असा त्रिवारघोष करून मगच पुढच्या ओव्या वाचाव्या असा दंडक घालून दिला आहे व आम्ही सर्वजणी कटाक्षाने पाळतो.

गुरुभक्तांच्या नामघोषामुळे गुरुलोपकाच्या नामोच्चाराने उत्पन्न झालेल्या वाचादोषाचा परिहार झाला. गुरुभक्तांच्या नामांचा उच्चार येथपर्यंत भय हरण करणारा आहे.

अर्जुना, अज्ञानाची आणखी चिन्हे सांगतो. तो मनुष्य शरिराने कर्म करण्याच्या बाबतीत अत्यंत ढिला असतो. त्याचे मन विकल्पाने भरलेले असते. रानातला दगडधोंड्यानी भरलेला खड्डाच जसा काही! त्या आडाच्या तोंडावर काटे आणि आत हाडे असतात. पाण्याचे नावही नसते. तो अज्ञानी त्या आडाप्रमाणे आतबाहेर अमंगळ असतो. पोट भरण्याच्या नादात कुत्रे जसे अन्नाबद्दल झाकलेले किंवा उघडे टाकलेले असा विचार न करता जे दिसेल ते खात असते त्याप्रमाणे द्रव्याच्या कामात तो आपले किंवा दुसऱ्याचे हा विचार न करता झडप घालत असतो. कुत्र्याला जसा संगाबद्दल योग्यायोग्यतेचा विचार शिवत नाही तसा स्त्रीविषयी तो वागतो. कर्माची वेळ चुकते आहे, नित्यनैमित्तिक करायचे रहाते आहे हे त्याच्या जीवाला टोचतच नाही. पाप करण्यात लाज वाटत नाही आणि पुण्य करण्याची त्याला चाड असत नाही. विकल्पाचे वारे त्याच्या मनात नित्य घोंघावत असते. द्रव्याची इच्छा जशी काही त्याच्या डोळ्यापुढे निरंतर बांधलेली असते. अर्जुना, असा पुरुष खरोखर केवळ अज्ञानाचा पुतळा आहे असे समजावे.

गवताचे बी मुंगीच्या धक्क्यानेही आपली जागा सोडते, तसे त्याचे मन स्वार्थाचा जरासा विचार आला की चांगल्या निश्चयापासून ढळते. लहान डबक्यात कुणाचे पाऊल पडले रे पडले की चिखल कालवतो तसे भयाचे नाव कानावर पडले की, तो गजबजतो. वायूच्या संगतीने धुराचा लोट आकाशात चढतो तसे त्याचे मन दुःखवार्ता ऐकल्याबरोबर व्याकुळ होऊन जाते. पुरात पडलेला भोपळा जसा पाणलोटाबरोबर इकडून तिकडे वहात असतो तसे त्याचे मन मनोरथाच्या धारेबरोबर भटकत असते. वावटळ जशी एका जागी रहात नाही तसा तो क्षेत्रे, तीर्थ किंवा सप्तपुरीमध्ये एखादी पुरी येथे स्थिर राहू शकत नाही.

माजलेला सरडा शेंड्यापासून बुडक्यापर्यंत येरझारा घालत असतो तसे त्याचे व्यर्थ भटकणे असते. नुसता हिंडणवारा असतो. रांजण रोवला तरच स्थिर तसा तो पडला तरच स्थिर असतो. नाहीतर एकसारखा भटकत असतो. चांचल्यात माकडाचे भावंड शोभेल अशा त्या मनुष्याच्या ठिकाणी उदंड अज्ञान असते.

अर्जुना, त्याच्या मनाला संयम कसा तो ठाऊकच नसतो. ओहळाला पूर आला की, मग तो वाळूच्या

बांधाला न जुमानता फोफावत जातो. तसा तो निषिद्धकर्माला तोंड देण्यास भीत नाही. व्रते मधेच मोडतो. धर्म पायाने ओलांडतो आणि नियमाने वागण्याची आशासुद्धा त्याच्या क्रियेवरून वाटत नाही. त्याला पुण्याचा जिव्हाळा नाही का पापाचा कंटाळा नाही. लाज तर त्याने समूळ खणून काढली आहे. कुळाचे आचार तो मानत नाही. वेदाज्ञा झुगारून देतो. कोणते कर्म करावे, कोणते न करावे याच्या विवेकाशी त्याची ओळखच नाही. सोडलेला पोळ, अफाट वारा आणि रानातला पाट हे जसे वाटेल तसे स्वैर हिंडतात तसा तो स्वैराचार करतो. आंधळा हत्ती माजावा, रानात वणवा लागावा तसे त्याचे चित्त विषयात भरकटत असते. उघड्यावर काय काय पडत नाही? मोकळे सुटलेले जनावर कुणाला सापडत नाही? गावच्या वेशीचा उंबरा कोण ओलांडत नाही? तसे त्याचे मन बऱ्यावाईट कल्पनांना मुक्तद्वार असते. अन्नछत्रातील अन्न, सामान्य पुरुषाचा अधिकार व वेश्येचा उंबरा हा जसा कुणाच्याही मालकीचा होऊ शकतो तसे त्याचे अंतःकरण कुठल्याही बऱ्यावाईट विचारास संकल्पास थारा देते. अशा माणसाच्या ठिकाणी अज्ञानाची भरभराट आहे असे समजावे.

असा अज्ञानी पुरुष जिवंत वा मृत असतानाही विषयाचे चिंतन सोडत नाही. स्वर्गात गेल्यावर खाण्यापिण्याची ददात पडू नये या बुद्धीतून जिवंत असताना सकाम कर्मे करून सामुग्री करून ठेवतो. अखंड भोगासाठी कष्ट करतो. काम्यकर्माचे त्याला व्यसनच असते. विरक्ताचे तोंड पाहून तो सचैल स्नान करीत असतो. इतका त्याला विरक्तिचा कंटाळा आहे. विषय त्रासून जातील, कंटाळतील, पण हा विषयी त्रासत नाही. कुष्ठी मनुष्य सडलेल्या हातांनी खातो, कंटाळत नाही तसा तो विषय सेवन करताना कंटाळत नाही. गाढवी तिरस्कार करते, खुराने गाढवाचे नाकाडे फोडते तरीही गाढव आपला प्रयत्न सोडत नाही. तसा तो विषयासाठी जळत्या आगीत उडी घालतो, व्यसनांची लेणी अंगावर मिरवतो. मृगजळामागे धावताना मृग छातीत फुटतो पण ही माया आहे खरे पाणी नव्हे हे ऐकायला तयार नसतो. तसा तो जन्मापासून मृत्यूपर्यंत विषयाचा त्रास झाला तरी तसे न मानता त्या विषयावरच अधिकाधिक प्रेम करतो. लहानपणी प्रथमदशेत त्या जीवाला आईवडिलांचे वेड असते. तो जीव तरूणपणी स्त्रीच्या देहावर लंपट होतो. तारूण्याच्या भरात स्त्रीसुखात रममाण होणारा तो जीव वृद्धपण येऊ लागले की तोच प्रेमभाव पुढच्या मुलाबाळावर आणून ठेवतो. आंधळ्या मुलाला जन्म दिल्यावर आई जशी त्या मुलाला अहोरात्र जपते तसा तो मुलाबाळांना धरून रहातो. मरतो पण विषयाचा कंटाळा करीत नाही. अर्जुना, अशा माणसाच्या ठिकाणी किती अज्ञान आहे याचा अंतपार लागत नाही.

आणखी अज्ञानाचे लक्षण असे की देह हाच आत्मा अशा मनोधर्मावर स्वार होऊन तो कर्माचा आरंभ करतो. त्याच्या हातून मग जे काही थोडे फार कर्म घडते त्याच्या अविष्काराने तो कुंथायला लागतो.

मांत्रिकाच्या डोक्यावर पिशाच्च्याच्या बंदोबस्ताचे काम सोपवल्यावर त्या जबाबदारीने तो जसा फुगून बसतो. तसा विद्या आणि वय यांचा माज आल्याने तो उताणा चालतो. मग वल्गनांना तोटा काय? तो म्हणतो, “जगात आहे म्हणायला काय तो मीच! माझ्याच घरी काय ती संपत्ती! माझ्या आचरणाची रीत कुणाच्यातरी घरी पहायला मिळेल काय? माझ्याएवढा बरोबरीचा काय तो मीच आहे.” अशा वल्गना करीत गर्वाने संतुष्ट होऊन तो ताठरपणाने वागतो.

व्याधी लागलेल्या माणसाला जसे विषयाचे दर्शन दुःखदायक होते, आपण हे भोग भोगू शकत नाही

म्हणून जसा तो तळमळतो तसा तो अज्ञानी दुसऱ्याचे बरे झालेले पाहून दुःखी होतो. त्याला दुसऱ्याचे सुख पहावतच नाही. एखादा दिवा वात खातो, तेल जाळतो, पाणी उडले की तडतड करतो, वारा आला की विझून जातो आणि जर चुकून कोठे त्या दिव्याचा स्पर्श झाला तर काडीसुद्धा उरू न देता भस्मसात् करतो. प्रकाश पहावा तर असतो थोडकाच पण तेवढ्यानेच उष्णता वाढवितो. अर्जुना, अशा दिव्यासारखेच त्याचे जीवन असते. किंचित् विद्वत्ता अंगी असते तिच्या जोरावर तो एवढा अहंकार धरतो, अनर्थ करतो. नवज्वरात दूधच विष ठरते. सापाला दूध घातले की त्या दूधाचे विष होते. त्याप्रमाणे जी काही थोडी विद्या त्याच्या अंगी असेल त्याचा अमर्याद गर्व त्याला होतो. दुसऱ्याची जास्त विद्या किंवा जास्त गुण त्याला सहन होत नाहीत. आपल्या तपाचा आणि ज्ञानाचाही दोन्ही अपुरती असली तरी-त्याला ताठा चढतो.

गर्वाने तो इतका फुगलेला असतो की जसा काही एखादा अंत्यज राजपदावर बसला आहे किंवा अजगराने उभा खांब गिळला आहे. लाटणे लवत नाही, दगड पाझरत नाही, फुरसे मांत्रिकाला उतरवता येत नाही तसा ज्ञानी पुरुषदेखील त्याचा ताठा कमी करू शकत नाही. अर्जुना, खरोखर सांगतो असा गर्विष्ठ मनुष्य अज्ञानी आहे असे तू खुशाल समज.

या गर्वासंबंधी गुरुदेव रानडे म्हणत, “अहंकार जितक्या सूक्ष्म गुणांचा तितका तो नाहीसा होण्यास कठीण. स्थूल गुणांचा अहंकार लवकर नाहीसा होतो. उदाहरणार्थ सुंदर रूप अगर पैसा अगर शक्ति याबद्दलचा अहंकार लवकर सुटतो. विद्येचा अहंकार त्यापेक्षा खोल असतो. पण सर्वांत खोल अहंकार “मी परमार्थी आहे” हा! हा नाहीसा होणे फार कठीण आहे.

इंचगेरीस असताना गुरूदेवांना स्वप्न पडले. श्री. भाऊसाहेब महाराज स्वप्नात येऊन म्हणाले “अभिमान अभिमान अंदर एनु अद इदर चमत्कार ऐद दिवस दोळग तोरसतिनु” अभिमान म्हणजे काय आहे याचा चमत्कार पाच दिवसांत दाखवतो.” हा स्वप्नवृत्तांत गुरुदेवांनी श्री. शिवलिंगव्वांना सांगितला. त्यांनाही आश्चर्य वाटले.

बरोबर पाच दिवसांनी शिवलिंगव्वांनी कानोले (करंज्या) तयार करून व देवास नैवेद्य दाखवून ते खाण्याकरिता रामभाऊंना बोलावले. रामभाऊ प्रकृति ठीक नव्हती म्हणून “नको” म्हणाले. शिवलिंगव्वा जरा रागाने म्हणाल्या, मी केलेले देवाच्या प्रसादाचे कानोले खात नाही म्हणजे काय?”

रामभाऊ म्हणाले, “अक्का मी ते कसे खाऊ? मी आजारी म्हणून मठातदेखील जात नाही आणि असले पदार्थ खाऊ कसे?”

शिवलिंगव्वांनी हा माझे ऐकत नाही हा अभिमान धरला. तर रामभाऊंनी माझी प्रकृति नीट नाही, मी खाणार नाही हा देहाचा अभिमान धरला. अशा रीतीने भाऊसाहेब महाराजांच्या स्वप्नदृष्टांताप्रमाणे दोघांनाही अभिमानाचा अनुभव पाच दिवसात आला.

देव पुढे म्हणाले, “अर्जुना, मागल्या जन्मात या सगळ्या पसाऱ्याने आपल्याला किती दुःख दिले आहे

याचे अज्ञानी माणसाला पूर्ण विस्मरण होते. तो पुन्हा गृह, देह या साहित्यात पूर्ण रममाण होतो. झालेले दुःख विसरून पुन्हा नव्या दुःखाची तयारी करतो. कृतघ्न मनुष्य उपकार विसरतो. चोर भांडवल दिले आहे ते विसरतो आणि कोडगा मनुष्य केलेली स्तुती विसरतो. तसा हा अज्ञानी पुरुष आसक्तीमुळे येणारे दुःख विसरून जातो. कुत्र्याचे शेपूट, कान कापले तरी ओल्या जखमा विसरून कुत्रे जसे घरात खोड्या करण्यासाठी शिरते किंवा सापाच्या तोंडात सापडलेला बेडूक माशीसाठी जिभा चाटतो आणि आपले मरण विसरतो. तसा तो अज्ञानी नऊ दारांनी मळाने पाझरणारे शरीर कुष्ठाने भरले आहे हे पहातो पण ही असली स्थिती ज्या जन्मामुळे प्राप्त झाली त्या जन्माचा मात्र कंटाळा मनात आणत नाहीत. त्याच्या मनास हे शल्य बोचत नाही. स्वतःचे आईच्या पोटातील व जन्माच्या वेळेचे क्लेश याचे त्याला स्मरण नसते हे ठीक पण समोर लहान मुले मांडीवर घाणीत लोळत पडलेली पाहिली तरी त्याला वीट येत नाही. मागचा जन्म आताच संपला दुसरा जवळ येतो आहे असे काही त्याच्या लक्षातच येत नाही. जीवनात होणाऱ्या भरभराटीत तो इतका रमून गेलेला असतो की आता मृत्यू येईल याची चिंताच त्याला वाटत नाही. जगण्यावर त्याचा एवढा दृढ विश्वास असतो की मृत्यू अटळ आहे हे मानायला त्याचे मनच तयार होत नाही. डबक्यात रहाणारा मासा हे पाणी कधीतरी आटून जाईल असे न मानल्यामुळे अगाध डोहात जावे असा विचारच करीत नाही. व्याधाच्या गाण्याला भुलून हरिण व्याधाकडे न पाहिल्याने अचूक त्याच्या पाशात सापडते. गळ न पाहिल्यामुळे मासा सरळ आमिष गिळून प्राणाला मुकतो. दिव्याच्या उजेडाचा झगमगाट पाहून पतंग ही ज्योत आपल्याला जाळील हे न कळल्यामुळे दिव्यावर निःसंकोचपणे उडी घालतो. एखादा आळशी, मूर्ख मनुष्य झोपेत इतका बुडालेला असतो की, ज्या घरात तो झोपलेला असतो त्याला आग लागली तरी त्याचे भान नसते. आपण जेवतो आहो त्या अन्नात विष घातलेले आहे हे जेवणाराला माहितच नसते. आयुष्याच्या मिषाने मृत्यूच रोज जवळ चालून येतो आहे हे तो राजस सुखात गढलेला मनुष्य जाणतच नाही. रात्रंदिवसाची जोडी आपले आयुष्य वाढवते आहे व विषयसुखाला प्रौढपण येत आहे हे तो जाणतो पण ही वाढ क्षयासाठी आहे हेच ध्यानात घेत नाही. त्या बापड्याला हे कळत नाही की वेश्या सर्वस्व देते याचाच अर्थ आपले सर्वस्व हरण करते. चोराची मैत्री म्हणजेच त्याने आपले प्राण घेणे. भिंतीवर काढलेले चित्र धुणे म्हणजेच ते पुसून टाकणे, ते स्नान म्हणजे त्या चित्राचे मरणच असते. पंडुरोगाने येणारा स्थूलपणा म्हणजेच त्याचे आयुष्य संपल्याची खुण! ह्या अज्ञानी पुरुषाच्या ध्यानात येत नाही की हे सुख म्हणजेच नाशाचा राजरस्ता. खांद्यावर सूळ घेऊन धावणाऱ्या कैद्याचे मरण दर पावलास जवळ येत असते. त्याप्रमाणे देहाची जसजशी वाढ होईल तसतसा मृत्यू जवळजवळ येत असतो. भोगांची जसजशी वाढ होते तसतसा देहाचा नाश होत असतो. मिठाला पाण्याने घासत जावे तसतसा देहाचा नाश होत असतो. दिवसानुदिवस आयुष्य संपत जाते आहे आणि मरण जवळ येते आहे ही अगदी सरळ सरळ हातात असलेली गोष्ट त्याला उमजत नाही. विषयाच्या मायेमुळे त्याला शरिरावर नकळत होत चाललेले मरणाचे आक्रमण ज्या अज्ञानी माणसाला कळत नाही तो अज्ञानाचा राजाच आहे असे समजावे. अज्ञानाची जवळजवळ सर्व लक्षणे सांगून झाली. आणखी काही फार बोलायचे राहिले नाही.

तरीपण अर्जुना, काही लक्षणे सांगतो. जीविताच्या आशेत गुंतल्याने जसा हा अज्ञानी मृत्यूची आठवण विसरतो तसाच तारूण्याच्या भरात म्हातारणाचा हिशोब ध्यानात घेत नाही. तारुण्यातील सर्व प्रकारचे शारीरबळ तसेच कायम राहणार या भ्रमातच रहातो. कड्यावरून खाली लोटून दिलेला गाडा किंवा पर्वत शिखरावरून सुटलेला धोंडा जसा घसरतच जातो व त्याचे त्याला भान नसते अगर अधःपतनाची ती गती रोखण्याचे सामर्थ्यही त्याच्या अंगी नसते तसाच तो वृद्धत्त्वाकडे क्षणाक्षणाला घसरत असतो पण त्या वृद्धत्त्वाचे

स्मरण ठेवीत नाही. तारुण्याच्या मदातच रहातो जगत असतो. आडरानातील ओढ्याला येणारा अनावर पूर किंवा रेड्यांची अविचारी झुंज असावी तशी त्याला तारुण्याची भुरळ पडते. एखादा अशक्त कुबडा वृद्ध पाहिला की तो त्याची स्वतःच्या तरुणपणच्या बळाच्या गर्वाने फुगून जाऊन कुचेष्टा करु लागतो. आपलीही हीच दशा होणार असे त्याच्या चुकूनही मनात येत नाही. आंधळ्या माणसाला समोरची वस्तू उरावर येऊन आपटेपर्यंत दिसत नाही. आळशी माणसाला डोळे चिकटले तरी झोपेच्या सुखात त्याची खंत वाटत नाही तसा हा अज्ञानी पुरुष वृद्धपण येऊन ठेपले तरीसुद्धा तारुण्याच्या मदात धुंद राहून पसारा वाढवतच रहातो. खरे म्हणजे अंगाची पुष्टी विरघळून गेली आहे, शरिराची कांती काळवंडली आहे, डोक्यावरचे केस, दाढी पांढरी झाली आहे, डोक्याला कंप सुटला आहे, मान नाही नाही म्हणते आहे पण त्या अज्ञानी पुरुषाची हाव मात्र कमी झालेली नाही. अशी स्थिती दिसली की तिथे अज्ञान भरपूर नांदते आहे असे समजावे. मरणाचे लक्षण जे वृद्धत्व हे आले तरी तारुण्याची भ्रांती फिटत नाही आणि म्हणून व्याधीसंबंधीही तो तसाच निष्काळजी रहातो. आरोग्य आहे तोवर तो मानतो की ते तसेच कायम टिकणार आहे. एखादा बैल वाघाच्या अरण्यात चरून चुकून सुखरूप परत येतो आणि तेवढ्याने भुलून रानात वाघ नाहीच ह्या भ्रांतीने पुन्हा तिथेच चरायला जातो. पुरलेल्या द्रव्यावर सर्प आहे हे माहीत असून एखादा मनुष्य धिटाईने जातो, सर्प नाही अशावेळी पुरलेला ठेवा काढून आणतो आणि "पुरलेल्या ठेव्यावरचा सर्प द्रव्य काढू देत नाही" हे खोटे आहे. मी स्वतः काढून आणले" अशा बढाया मारतो. तसाच हा अज्ञानी एक दोनदा रोगाच्या तावडीतून सुटतो आणि रोग आपल्याला काही करत नाही असेच मानू लागतो. वैरी झोपला आहे अशा वेळी आपले भांडणच मिटले असे मानून जो बेसावध रहातो तो मुलाबाळासह प्राणास मुकतो. असाच तो अज्ञानी आहारनिद्रेच्या व्यवस्थित क्रियेवरून व्याधीची चिंता सोडून देतो. चोरट्या पावलानी प्रवेश करणाऱ्या पण सध्या निद्रित असलेल्या रोगाची तो मनात भीती ठेवत नाही. स्त्री-पुत्र यांच्या मेळाव्यात आणखी संपत्तीचीही भर पडत जाते आणि राजस सुखाने तो जसा काही आंधळा होतो. लौकरच कदाचित वियोग होईल, तात्काळ विपत्ती येईल हे पुढचे संभाव्य दुःख तो ध्यानात घेत नाही. आता अशा प्रकारे विपत्ती व व्याधी यांची पर्वा न करणारा हा अज्ञानी पुरुष आणखीही एक चूक करतो.

वयाच्या उत्कर्षाने व संपत्तीच्या जोरावर त्याची इंद्रिये मोकाट सुटतात. त्यांना तो काही धरबंध घालीत नाही. सेव्य कोणते व असेव्य कोणते याचा विवेक त्याच्या ठिकाणी उरत नाही. न करावे ते करतो, होणार नाही ते करीन म्हणतो, चिंतन करू नये त्याचे चिंतन करतो, जिथे प्रवेश करू नये तिथे करतो. जे घेऊ नये ते मागतो. ज्याला स्पर्श करू नये तिथे तो स्पर्श करतो. पाहू नये ते पहातो. धरू नये त्याचा संग धरतो. जिथे करू नये तिथे संबंध करतो. ज्या रस्त्याने जाऊ नये तिथे तो जातो. ऐकू नये ते ऐकतो. न बोलावे ते मोठ्याने बडबडतो. पण अशा प्रकारे वागल्याने आपल्याला दोष लागतो आहे हे मानीत नाही. शरिराला, मनाल जे गोड वाटेल ते तो करतो. विवेक ठेवत नाही. क्रियेच्या नावाखाली भलती सलती क्रिया करीत रहातो. मला पाप लागेल नरकयातना होतील असे भवितव्य त्याला दिसतच नाही. अशा पुरुषाच्या आश्रयाने अज्ञान इतके बलिष्ट होते की, ते सज्ञानी पुरुषाशी देखील झगडा देऊ शकेल.

अज्ञानी पुरुषाचे आणखी एक लक्षण असे की त्याचे सर्व लक्ष घरात गुंतलेले असते. ताज्या सुवासिक कमळाच्या केसरात भ्रमरी गुंतून पडते तसा तो घरात गुंतून पडलेला असतो. साखरेच्या राशीवर बसलेली माशी जशी उठत नाही तसे त्याचे मन स्त्रीसुखामधून बाहेर पडू शकत नाही. बेडूक, माशी किंवा जनावर ही जशी निरनिराळ्या घाणीत पूर्ण अडकून पडतात तसे त्याचे मन विषयात रुतून बसते. जिवंतपणीच त्या घरात

अडकून पडतो असे नाही तर मेल्यावरसुद्धा सर्प होऊन त्या घराच्या आवारात फिरत रहातो. एखादी तरुण स्त्री नवऱ्याच्या गळ्यात लगडून पडावी तसा तो जीवेप्राणे त्या झोपडीला चिकटलेला असतो. म्हातारपणी झालेल्या एकुलत्या एक मुलाला जसे ते वृद्ध माता-पिता डोळ्यात तेल घालून सांभाळतात तसा तो घराल जपतो. मध मिळावा म्हणून मधमाशी जशी कष्ट करीत रहाते तसा तो घरासाठी शिणत असतो. घरावर तर त्याची अशी पुरी आस्था असतेच पण स्त्रीवरही त्याची पुरी पुरी आसक्ती असते. महापुरुषाचे चित्त जसे ब्रह्मानंदात निमग्न झाले की इतर कशाचीही आठवण करीत नाही तसाच तो स्त्रीशिवाय दुसरे काही जाणत नाही. त्या स्त्रीदेहावर त्याचे मन इतके आसक्त झालेले असते की मी कोण, मी काय करावे याचे त्याला भानही उरत नाही. लाभ हानी, तो नाही. त्याची सर्व इंद्रिये केवळ स्त्रीसुखास लालचावलेली असतात. गारुड्याच्या माकडासारखा तो स्त्रीच्या चित्ताची आराधना करतो आणि तिच्या तालावर नाचतो. स्वतः तर शिणत असतोच पण इष्टमित्रांनाही दूर करून लोभी पैशासाठी प्राण टाकतो तसा तो स्त्रीलंपट पुरुष दान पुण्य कमी करतो, गोत्र कुटुंबाला फसवतो पण स्त्रीला कमी पडू देत नाही. तिची खाच भरतच जातो. पूज्य दैवताची पूजा कशीबशी उरकतो. गुरूला ठकवितो आणि आईबापांना दैन्य दाखवत दाखवत स्त्रीविषयी भोगाची व ऐश्वर्याची साधने जमवीत जातो. जी जी वस्तू सुंदर दिसेल ती ती त्या स्त्रीसाठी तो आणत रहातो. एखादा प्रेमळ भक्त जसा आपल्या कुलदेवतेची एकाग्र चित्ताने भक्तिपूर्वक उपासना करतो तसा तो पुरुष स्त्रीची पूजा करतो. उत्तम उत्तम वस्तू आणून स्त्रीला देतो आणि इतर कुटुंबियांच्या निर्वाहाचीही व्यवस्था करीत नाही. तिला कोणी वाकड्या नजरेने पाहील की काय? तिच्याविरुद्ध कुणी वागेल की काय? आणि समजा असे चुकून घडलेच तर युगांतच होईल अशा भयानेच तो जगत असतो. नायट्याच्या भीतीने देवीची शपथ पाळावी, तसा तो त्या स्त्रीची मर्जी राखत असतो. किंबहुना धनंजया, स्त्रीच त्याचे सर्वस्व असते. तिच्यापासून झालेल्या मुलाबाळांवर त्याचे तसेच अपरंपार प्रेम असते. तसेच तिची जी जी चीजवस्तू असेल ती तो प्राणापलीकडे जपत असतो. जीवाहूनही ती संपत्ती तो आपली आप्त मानतो. असा मनुष्य अज्ञानाचे मूळ आणि अज्ञानाचे बळ समजावे. अशा पुरुषाच्या आश्रयानेच अज्ञान विस्तार पावत असते. त्या पुरुषाच्या रूपाने केवळ अज्ञानच वावरत असते असे समजावे.

अर्जुना, त्याचे चित्त कसे असे विचारशील तर काय सांगू! अरे, खवळलेल्या समुद्रात एखादी लहानशी तरी लाटावर आंदोळते तसे त्याचे मन सतत चांचल्याने व्यापलेले असते. आवडती वस्तू मिळाली की, चित्ताचा झोका सुखाच्या आकाशाला भिडतो. अप्रिय वाट्यास आले तर त्याच मनाने पाताळ गाठलाच. सम-विषमाचे ओझे ज्याचे चित्त असे अहोरात्र वहाते तो पुरुष अज्ञानी समजावा.

आता अशा पुरुषाची भक्ति तरी शुद्ध कशी असेल? पैसा मिळविण्यासाठी विरक्तीचे सोंग आणावे तसा फलाच्या उद्देशाने तो माझी भक्ति करतो. एखादी वाईट चालीची बाई नवऱ्याचा विश्वास संपादन करून हळूच प्रियकराकडे जाण्यास निघते त्याप्रमाणे विषयावर नजर ठेवून हा अज्ञानी पुरुष माझी भक्ति केल्याचे नाटक करतो. आता अशी भक्ति कधी फलदायी होते? कधी नाही. भक्तिचे इष्ट व्यावहारिक फल मिळाले नाही की तो म्हणतो, “हे भजन मी सोडून देईन. खोटेच आहे ते.” अडाणी शेतकरी जसा नवीन नवीन उद्योग करतो तसा तो अज्ञानी पुरुष नवे नवे देव मांडतो. पहिल्या इतक्या निष्ठेने ह्या नव्या देवांचीही पूजा सुरू होते. थाटमाट पाहून मग त्या गुरुमार्गाचा अनुदायी होतो. त्या गुरूचा गुरुमंत्र घेतो प्राणिमात्राशी तो निष्ठुरपणाने वागतो. पाषाण प्रतिमेवर त्याचा पुष्कळ भर असतो. पण त्याच्या वागण्यात एकनिष्ठा असत नाही. मूर्ती तयार करून घेतो. ती घराच्या कोपऱ्यात बसवितो आणि आपण देव आणि देवी यांच्या यात्रा करीत फिरतो. नित्य माझे पूजन करतो.

कामानिमित्त कुलदेवतेची पूजा करतो. पर्वकाळी आणखी एखाद्या वेगळ्याच देवाचे पूजन करतो. घरात माझे अधिष्ठान, व्रते आणखी दुसऱ्या देवांची आणि पितृकार्याच्या वेळी पूर्ण पितरांचा असा तो होतो. एकादशीला जितका आम्हाला मान, तितकाच नागपंचमीस नागाला, चतुर्थीस गणपतीला! आणि चतुर्दशीस दुर्गेला तो म्हणतो, "दुर्गे मी तुझाच." नित्य नैमित्तिक विहित कर्मे करतो. मधूनच नवचंडी पाठास बसतो तर रविवारी बहिरोबाला पात्रात नैवेद्य वाढतो. सोमवार आला की महादेवाला बेल आणण्यासाठी धावतो. अशारीतीने एकटा धावत धावत कशीबशी सर्व दैवते वेटाळतो. वेशीतील वेश्या जशी अखंड सौभाग्यवती असते तसा तो अखंड भजन करीत असतो. क्षणभरही निवांत रहात नाही. असा सैरावैरा धावणारा भक्त जेव्हा पहाशील तेव्हा अज्ञानी पहातो आहेत हे ओळख. अज्ञानाचा तो मूर्तिमंत अवतार आहे असे समज.

आता असा हा भटका भक्त चोख एकांतस्थळे, तीर्थे, नदीतट, तपोवने पाहून अगदी कंटाळून जातो. लोकांतात रहाणेच त्याला बरे वाटते. गजबज असावी अशी त्याला आवड असते. त्याला लौकिकाचे वर्णन ऐकायला फार आवडते.

आत्म्याचा साक्षात्कार घडविणारी ब्रह्मविद्या त्याला नकोशी होते. इतर सर्व विद्या तो हौसेने शिकतो पण अध्यात्मविद्येचा कंटाळा करतो, उपहास करतो. उपनिषदाकडे चुकूनही वळत नाही. योगशास्त्र त्याला आवडत नाही. अध्यात्मज्ञानामध्ये त्याचे मन रमत नाही. आत्मचर्चा ही एक जिव्हाळ्याची चर्चा आहे ह्या मर्यादेची भिंत पाहून त्याची बुद्धि स्वैर भटकणारी होते.

कर्मकांड त्याला पाठ आहे. पुराणे मुखोद्गत आहेत. तो म्हणेल ते घडते इतके अचूक ज्योतिषशास्त्र आहे. शिल्पशास्त्रात तो निपुण आहे. पाकशास्त्रात निष्णात आहे. जारण-मारण-उच्चाटन हे मंत्रशास्त्र त्याने हस्तगत केले आहे. नीतीशास्त्रात शिकायचे काही राहिलेले नाही. तो वैद्यकशास्त्र जाणतो, काव्यनाटकात त्याचा हात धरणारा कुणी नाही. स्मृतींची चर्चा तो करतो. इंद्रजालही जाणतो. वैद्यकशास्त्राचा ग्रंथ निघंटु त्याची सेवाचाकरी करतो. व्याकरणात चोख, तर्कशास्त्रात गाढा विद्वान असा आहे पण अध्यात्मशास्त्रात मात्र जन्मांध आहे. अर्जुना, असा पुरुष सर्व शास्त्रांत निष्णात असूनही माझ्या दृष्टिने अत्यंत अडाणी आहे. अध्यात्मशास्त्राखेरीज इतर सर्व शास्त्रांत जरी तो सर्व सिद्धातांची जन्मभूमी असला तरी त्याच्या त्या ज्ञानाला आग लागो! मूळ नक्षत्रावर जन्मलेले मूल आईबापांनी पाहू नये तसे ते त्याचे इतर शास्त्रांचे ज्ञान निष्फळ मानावे. मोराच्या अंगावर पुष्कळ पिसे आहेत पण तो मोर जर आंधळा असला तर त्या इतक्या पिसांवर असंख्य डोळे असून त्यांचा त्या मोराला पहाण्यासाठी काय उपयोग आहे? पहाण्याची दृष्टि नाही आणि पिसांवर मात्र असंख्य दिखाऊ डोळे ह्यासारखी त्या अज्ञानी जीवाची स्थिती होते.

परमाणूएवढे संजीवनी मूळ मिळाले की मग त्या गाडीभर वनस्पती घेऊन काय करावयाच्या? शरिरावर सामुद्रिक लक्षणे उत्तम पण आयुष्य नाही, अंगावर अलंकार पुष्कळ पण धडावर शीर तेव्हढे नाही. वर्धावा काढलेला आहे पण नवरा-नवरी मात्र नाहीत तसे हे आहे. ही केवळ विटंबना आहे. एकटे अध्यात्मशास्त्र नसेल तर इतर बाकीची सगळी शास्त्रे अप्रमाण आहेत. अर्जुना, त्या शास्त्रमूढाला अध्यात्मज्ञानाचा नित्यबोधच नाही. त्याचे शरीर म्हणजे अज्ञानाचे रुजलेले बी आहे. त्याची विद्वता म्हणजे त्या अज्ञानाचाच वाढलेला वेल आहे. तो जे बोलतो ते अज्ञान फुललेले आहे. त्याचे पुण्य फळते तेही अज्ञानातच फळते.

अध्यात्मशास्त्रच तो मानत नाही. मग त्याला ज्ञानार्थ कळत नाही हे काय वेगळे सांगावयास हवे? अर्जुना, अरे अलीकडच्या तीराला जो पोचला नाही माघारीच पळून गेला त्याला पैलद्वीपाची वार्ता कशी कळावी? ज्याचे शीर दाराच्या उंबऱ्यातच पुरले आहे, तो घरात ठेवलेला खजिना कसा पहाणार? अध्यात्मज्ञानाचेच अज्ञान असल्यामुळे ज्ञानार्थ त्याला दिसला की काय ह्याची चर्चाच करायला नको. त्या अज्ञानी पुरुषाला ज्ञानाचे तत्त्वच समजले नाही हे काही आता तुला आकडेमोड करून सिद्ध करून दाखवायला नको." ज्ञानदेव म्हणतात की, अज्ञानी पुरुषाची लक्षणे खरे म्हणजे सहजच सिद्ध होतात. गर्भिणीस वाढले की पोटातील मूल आपोआपच तृप्त होते किंवा आंधळ्या माणसास आमंत्रण दिले की त्याला धरून आणणाऱ्या माणसाला आमंत्रण दिल्यासारखेच आहे. त्याप्रमाणे ज्ञानी पुरुषांची लक्षणे सांगितली की अज्ञानी पुरुषाची आपोआपच सिद्ध होतात. वेगळी सांगण्याची तशी जरूरी नाही. पदे उरफाटी केली की काम भागते आणि म्हणून श्रीमुकुंदाने याच्या उलट जे जे असेल ते अज्ञान असे श्लोकार्धात सांगून विषय संपवला. पण मी जरा विस्ताराने मांडणी केली, फार विस्तार केला नाही. नाहीतर एकपट दूध चौपट पाणी व्हावयाचे. श्लोकांतील पदांची हद्द न ओलांडता मूळ ध्वनीचा थोडा विस्तार केला याबद्दल क्षमा असावी.

तेव्हा श्रोते म्हणाले, "कविपोषका ज्ञानदेवा, अगदी भिऊ नका. परिहार देण्याची काय आवश्यकता आहे? तुला श्रीमुरारीनीही आज्ञा केली आहे की, जे अभिप्राय आम्ही गुप्त ठेवले आहेत ते तू प्रगट करून सांग." देवाचे मनोगत तुम्ही उघड करून सांगता याचा फार संतोष वाटतो असे आम्ही म्हटले तरी तुला संकोच वाटेल, म्हणून ते काही आम्ही बोलतच नाही. पण एवढेच म्हणतो की, श्रवणसुखाच्या ज्ञानतरीतून आम्हाला तू परतीर दाखवलेस. त्यामुळे आम्ही संतोषित झालो. आता यानंतर पुढे श्रीहरी काय म्हणाले ते आम्हाला लवकर सांगा."

ह्या संतवाक्याबरोबर ज्ञानदेव म्हणाले, "मी निवृत्तिदास सांगतो ऐकावे महाराज. देव असे म्हणाले की, "पांडवा अज्ञानाची लक्षणे तू नीट ऐकलीस ना? त्या अज्ञान विभागाकडे पाठ फिरवून ज्ञान विषयामध्ये उत्तमरीतीने स्थिर होऊन रहा."

अज्ञानाची सर्व लक्षणे काढून टाकून ज्ञानी पुरुषांची लक्षणे अंगी बाणून घेतली की, मग ज्या ब्रह्मवस्तूमध्ये त्या ज्ञानी पुरुषाचा प्रवेश होतो ती ब्रह्मवस्तू कशी आहे हे जाणण्याची अर्जुनाची उत्कट इच्छा देवांना कळली. तो सर्वज्ञांचा सम्राट अर्जुनाची ही उत्कंठा जाणून ज्ञेयाचे स्वरूप सांगू लागला. तो म्हणाला, "अर्जुना, तुझी उत्कंठा मला कळते. दुर्गुणांचा ठाव उठवून भूमी शुद्ध करून तेथे सद्‌गुणांची वस्ती वसवून तिची भरभराट झाली की काम भागते असे मात्र नव्हे. तूही ते जाणलेस याचाच मला आनंद आहे. ज्यासाठी हे साधन महाप्रयासाने सिद्ध झाले. त्याचे साध्य काय हे कळून घेणे हे क्रमप्राप्तच आहे. एरवी मनात येणारच की हे एवढे कष्ट कशासाठी करावयाचे? अर्जुना हे कष्ट क्लेशकारक आहेत हे मी जाणतो. पण पार्था अपत्यमुख पाहिल्याबरोबर माता प्रसूतिवेदना क्षणात विसरते तसेच इथे घडते.

अर्जुना, ज्ञानावाचून इतर कोणत्याही उपायांनी ते मिळत नाही म्हणून त्या मिळणाऱ्या वस्तूला ज्ञेय असे म्हणावयचे. मात्र हे ज्ञेय जाणवल्याक्षणीच पुढे काही करावयाचे उरतच नाही. ज्याक्षणी ते जाणवले जाते

त्याचक्षणी तन्मयता प्राप्त होते. संसाराचे कुंपण ओलांडून नित्यानंदाच्या पोटात जीव जिरून जातो. ज्याला आदि नाही असे हे ज्ञेय होय. त्याला परब्रह्महीम्हटले जाते.

आता ह्या परब्रह्माचे वर्णन करणे मात्र अशक्य आहे. त्याला नावरूप नाही म्हणून ते नाहीच असे म्हणावे तर विश्वाकाराने व्यक्त आहे. विश्व म्हणजेच परब्रह्म म्हणावे तर ती माया आहे. रूप, वर्ण, व्यक्ति किंवा दृश्य, द्रष्टा, स्थिति ही काहीच नाहीत तर कुणी "ते आहे" असे तरी कसे म्हणावे? आणि जर खरोखरच नाही म्हणावे तर असा प्रश्न पडतो की, महत्तत्त्वादिक तत्त्वांचे स्फुरण कुठे होते? त्याच्यावाचून जगात कुठली वस्तू आहे? म्हणून आहे आणि नाही ह्या दोन्ही शब्दांची चोरांची वाट मोडूनच जाते. शब्द मुके होऊन रहातात. शब्दही नाहीत तर विचारही नाहीतच. मग ती वस्तू ते परब्रह्म आहे म्हणावे की नाही म्हणावे? डेरा, परळ, घागर यामध्ये माती जशी त्या त्या आकाराची होऊन राहिली आहे तशी ती वस्तू, ते परब्रह्म, सर्व जगतात सर्व पदार्थ होऊन राहिली आहे आणि यासाठी एकदा तो ज्ञानी तन्मय झाला की, जगातले सर्व पदार्थ मीच आहे असा त्यास अपरोक्ष अनुभव येतो. त्यापुढची स्थिति अशी की, तन्मयावस्थाच निरंतर रहाते आणि कधीकधी क्षणभर विश्वाचे भान येते."

मालूताई, यापुढच्या श्लोकामध्ये विश्वबाहु, विश्वांघ्रि, विश्वतश्चक्षु, विश्वमूर्धा, विश्वतोमुख आणि सर्व ऐकणारे अशी जी पदे, वेद, श्रुति यांनी या परब्रह्माबद्दल बोलण्याचा प्रयत्न करण्यात योजिली आहेत. आता तसा विचार केला तर त्या अव्यक्तास हात, पाय, मुख, कान, डोळे व शीर हे कोठून येणार? परंतु गुरू-शिष्य परंपरेत बोध करण्याच्या व होण्याच्या सोईसाठी ही पदे निरुपायाने योजावी लागतात. एरवी गुरू सांगणार काय आणि शिष्य ऐकणार काय? जी वस्तू शब्दात सापडणारी नाहीच तिचे वर्णन अशा कशाच्या तरी आधाराने करावे लागते. शून्य दाखवतानासुद्धा एक बिंदूले खूण म्हणून काढावे लागते. तसेच हे समजावयाचे. हात, पाय, मुख इत्यादि अवयव सामान्य अवयव न मानता त्या त्या अवयवांची विश्वात्मक शक्ति असा अर्थ लक्षात ठेवूनच देवाचे विवेचन ऐकावयाचे आहे.

देव म्हणत आहेत, "अर्जुना, देहाकडून वा मनाकडून जेव्हा जेव्हा जी जी क्रिया घडते ती ब्रह्मशक्तिच्या अस्तित्वानेच होते म्हणून ती क्रिया हेच ब्रह्माचे हात मानले जातात. आता ही चैतन्यशक्ति त्या त्या काळी त्या देहावेगळी वा मनावेगळी जाणवत नाही हेही ध्यानात ठेवावयाचे अशी ही जी क्रियाशक्ति हेच ब्रह्माचे हात असल्याने त्या मूळ वस्तूला विश्वबाहु असे म्हटले आहे. आत ही क्रिया एका शरिराची होते असे नव्हे तर विश्वात जेथे जेथे अशी क्रिया घडते तिचे स्वामित्व या मूळ वस्तूकडे असल्याने सर्वांच्या सर्व क्रिया सर्वकाळ ती शक्तिच करते असे समजावयाचे.

एकाचवेळी सर्व ठिकाणी ते ब्रह्म निरंतर आहे म्हणून ज्याचे चरण सर्वत्र आहे अशा अशा अर्थाचे विश्वांघ्रि हेही नाव त्यास दिले आहे.

सूर्याच्या सर्वांगालाच डोळे आहेत. डोळे आणि अंग वेगवेगळे नाहीत. तसेच जिथे जिथे पहाण्याची क्रिया घडते तिथे तिथे ती ब्रह्मशक्तिच काम करते म्हणून ब्रह्माला स्थूल नेत्र नाहीत तरीही वेदांनी लक्षतेने विश्वतश्चक्षु असे नाव दिले आहे.

सर्वांच्या शिरावर सर्व प्रकारचे निरंतर अशा स्वरूपात ते ब्रह्म नांदत असल्याने सर्वत्र मस्तके असलेला अशा अर्थाचे विश्वमूर्धा हे नाव त्यास दिले गेले.

अग्निचे अंग हेच मुख तसेच ह्या ब्रह्मास वेगळे मुख नाही पण सर्वच अंगानी ते भोगत असते म्हणून त्यास विश्वतोमुख-ज्याला सर्वत्र मुख आहेत असे नाव पडले आहे. श्रुतींनीच विचार करून हे नाव दिले आहे.

आता आकाश जसे सर्वत्र सर्व वस्तूंना व्यापून असते तसे हे ब्रह्म व्यापून असल्याने ऐकण्याची क्रिया सर्वकाल सर्वत्र करीतच असते. म्हणून सर्व ऐकणारे असे त्या ब्रह्माचे वर्णन केले जाते. बुद्धिमान अर्जुना, श्रुतींनी विश्वतश्चक्षु असे त्याचे वर्णन केले आहे. आणि त्या वर्णनातून त्या ब्रह्माची व्याप्ती सुचवली आहे पण हात, पाय, डोळे ही भाषा त्या ब्रह्माच्या बाबतीत अशक्य आहे. "शून्य आहे" हा निष्कर्ष देखील त्याला सहन होत नाही. लाटांनी लाटा गिळल्या असे जर म्हटले तर कुणी कुणाला गिळले असे समजावे? तसेच हे आहे. ग्रासणारे त्या ग्रासले जाणाऱ्याहून वेगळे नाहीच. हे जसे लाटांबद्दल आपल्या ध्यानी येते तसेच ह्या ब्रह्मास अमुक एक नाव देणे अशक्य आहे हे कळावे.

पण मघाशी म्हटल्याप्रमाणे अर्जुना, बोलण्याकरिता व्याप्य व व्यापक असा भेद क्षणभर करावा लागतो. श्रुतींनी द्वैताचे सहाय्य यासाठी घेतले की अद्वैताचे निरूपण करण्याची वाट मोकळी व्हावी. शब्दांनी जाणून घ्यावयाचे आणि तन्मय होऊन प्रत्यक्ष अनुभूति घ्यावयाची अशी ही प्रक्रिया आहे."

आता हे देवांचे विवेचन आपण पूर्ण समजून घेण्याच्या दृष्टिने संत चरित्राकडे पाहिले तर प्रत्यक्ष पुरावा मिळतो. एकच ब्रह्मशक्ति हात, पाय, डोळे, कान इत्यादि सूक्ष्म व स्थूल इंद्रियद्वारा काम करते हे प्रथम मनात बिंबले पाहिजे.

गुरुदेव रानड्यांच्या चरित्रात म्हटले आहे, "आत्मानुभवाचे अतींद्रियत्व हे एक निर्णायक लक्षण आहे. रानडे म्हणत आपली पाच ज्ञानेंद्रिये आपआपल्यापरीने स्वतंत्र असून त्यांना एकमेकाचे ज्ञान नाही. उदाहरणार्थ डोळे ऐकू शकत नाहीत. कान पाहू शकत नाहीत, "जो देखे सो कहै नही" असे कबीर म्हणतो, परंतु ही इंद्रिये सृष्टीतील वस्तुस्थिति झाली. साक्षात्काराच्या अतींद्रिय सृष्टीस ती लागू नाही. तेथे एका इंद्रियाचे काम दुसरे करू शकते. कारण त्या सर्वांमध्ये एक प्रकारचे अदृश्य तारायंत्र निर्माण होते. त्यामुळे एका ज्ञानेंद्रियास होणारे ज्ञान इतर ज्ञानेंद्रियासही आपोआप होते. म्हणून कबिराच्या डोळ्यांना तहान लागते, वाणीला सुवास येतो, एकनाथास सर्वांग डोळा झाल्याचा अनुभव येतो. श्री. भाऊसाहेब महाराज, "सुगंध वार्ता कानी पडो" असे म्हणत.

म्हणून गुरूदेव म्हणत "साक्षात्कारातील अनुभूति ही केवळ अतींद्रिय नसून ती आंतरइंद्रियही आहे. उपनिषदे परमेश्वराचे वर्णन "श्रोत्रस्य श्रोत्र चक्षुषः चक्षु" असे करतात. साक्षात्कारात येणारी ही अनुभूति प्रत्यक्ष ज्ञानाच्या स्वरूपाची असते. कल्पनारूप नसते व ते अनुभव अविनाशी व चिरंतन स्वरूपाचे असतात. असे अनुभव घेतल्याने गुरूदेवांनी एकदा उद्‌गार काढले होते की "या जडसृष्टीत दिसणारे सत्य व सौंदर्य म्हणजे

साक्षात्कार सृष्टीचे एक पुसट प्रतिबिंब (faint replica) आहे."

१९२७ मध्ये अलाहाबादला प्रयागक्षेत्री गुरुदेवांनी देवांचा देव अनंतरूपांनी, अनंत वेषांनी पाहिला. Infinity within infinity मध्ये ते अक्षरशः बुडून गेले. नंतर १९५२ च्या ऑक्टोबरमध्ये इंचगेरीस वगैरे जाऊन निंबाळला परत आले. सहाजिकच ते अगदी थकून गेले होते. पण परत आल्यावर त्यांनी कापूर लावून आरती केली आणि क्षणार्धात ते पुन्हा ताजेतवाने झाले. ते मागाहून म्हणाले, "कापूर लावल्याबरोबर माझा सारा शीण पार गेला कारण त्या दोन मिनिटात मला फार मोठे अनुभव आले. विश्वरूपाचा अनुभव जो फार वर्षांपूर्वी गंगेकाठी आला होता तो आला. लक्ष नयनांचा अनुभव आला असे सर्वांना सांगा."

गुरुदेवांची अनुभूति, "दिन दिन अधिक चली" अशा कोटीतील होती. "मी अनुभवात स्थितप्रज्ञ आहे" असे त्यांनी म्हटले होते. त्याचा खुलासा करताना त्यांनी म्हटले होते की, "जो काही अनुभव असेल तो चोवीस तास अखंड असणे याचे नाव अनुभवातील स्थितप्रज्ञता किंवा स्थिरता. २६ वर्षापूर्वी जो काही अनुभव मला आला तो आजपर्यंत अखंड आहे. झाली तर त्यात वाढच होईल परंतु तो कदापि कमी होणार नाही."

चोवीस तास ते अनुभवात असत. ते म्हणत, "माझ्या डोक्यातून सतत अनाहत नाद सुरू असतो त्यामुळे कोणाशी बोलताना बोलणाऱ्याचे ओठ दिसतात पण शब्द ऐकू येत नाहीत. इतका प्रचंड अनाहत नाद त्यावेळी होत असतो."

आणि अशा ह्या संताच्या अनुभवाचे चिंतन करून आपण करायचे काही उरत नाही, आपण ज्ञेय स्वरूपच होऊन जातो व ज्ञेयाच जे विश्वात्मक रूप ते प्रत्ययास येऊन इंद्रियातील अनुभूति निरंतर येतात, याचा पुरावा हाती येतो. अठरा ज्ञानलक्षणे अंगी बाणल्यावर हाती पडणाऱ्या फळाचे रूप हे असे असते असे संत सांगतात.

आता "सर्व विश्वाला व्यापून टाकणारे हे चैतन्य तुला आता आणखी स्पष्ट करून सांगतो" असे देव म्हणत आहेत. ते म्हणाले, "अर्जुना, विश्व व्यापण्याची ही ब्रह्माची रीत अशी आहे की, जसे अवकाशात आकाश किंवा वस्त्रात तंतू! पाण्यामध्ये पाणी रस होऊन, दिव्यामध्ये तेज होऊन, सुगंधी कापरात कर्पूरत्व घेऊन, शरिरामध्ये कर्म शरीर होऊन नांदत असते. अर्जुना, सोनेच सोन्याचा तुकडा या स्वरूपात असावे तसे ते या सर्वांच्या सर्वांगी असते. सोन्याचा तुकडा हे तात्पुरते स्वरूप असले तरी मुळात सोने हेच त्याचे खरे रूप असते. वाकड्या ओघाने आले तरी पाणी सरळच असते. अग्नित टाकलेले लोखंड विस्तवासारखे लालभडक होते पण अग्नि लोखंड होत नाही. आकाश घटाकारात सापडले की वाटोळे, खोलीच्या आकारात सामावले की चौकोनी होतच नाही पण दिसते. त्याचे स्वरूप आहे तेच निराकार कायम राहते. तसे ते ब्रह्म विकारात विकारासारखे दिसले तरी विकारी नव्हे, मनादि इंद्रियांमध्ये वा सत्वादि गुणामध्ये त्या त्या वेळी त्या त्या संसर्गाप्रमाणे दिसले तरी त्या ब्रह्माच्या अवस्थेस काहीही लेप लागत नाही. गुळाची गोडी ढेपेत असली तरी गोडीला काही ढेपेचा आकार प्राप्त झालेला नाही. त्याप्रमाणे गुण व इंद्रिये यात ब्रह्म सापडले तरी त्या ब्रह्म वस्तूच्या ठिकाणी इंद्रिये वा गुण ही संभवत नाहीत. हे कपिध्वजा अर्जुना, दुधाच्या अवस्थेत तूप दुधाच्या आकाराचे असते पण दूध म्हणजे तूप नव्हे. त्याप्रमाणे ब्रह्म या विकारात आहे पण विकार नव्हे हे ध्यानात ठेव. आकाराला नाव बुगडी पण

मुळात सोने ते सोनेच. उघड सोप्या मराठीत सांगावयाचे म्हटले म्हणजे या गुणेंद्रियापासून ब्रह्म वेगळे आहे. नाम, रूप, संबंध, जाति, क्रिया, भेद हा सगळा प्रवाद आकाराला आहे, वस्तूला नव्हे, गुणाचा आणि त्याचा संबंधही नाही पण गुण व इंद्रिये ही त्याच्या ठिकाणी भासमान होतात म्हणून अज्ञानी पुरुषास असे वाटते की वस्तूच गुणाला धारण करते. अरे, त्या वस्तूचे या विकारांना धरणे, आकाशात अभ्रे किंवा आरशात प्रतिबिंब अशा प्रकारचे आभासात्मक आहे. पाण्यात सूर्याचे प्रतिबिंब पडते. सूर्यकिरणामुळे मृगजळ उत्पन्न होते. तसे ते निर्गुण परब्रह्म संबंध न येता अलिप्तपणे या सर्वांना धारण करते. ह्या सर्वांना त्या ब्रह्माचा आधार आहे पण त्या विकारामुळे त्या ब्रह्माच्या अलिप्तपणास जराही अंतराय येत नाही. एखाद्या रंकाला आपण राजा झाल्याचे स्वप्न पडावे आणि मग त्याने स्वप्नात राज्यकारभार सुरू करावा त्याप्रमाणे त्या निर्गुणाचे हे गुणभोग आहेत. म्हणून अर्जुना, गुणाचा संबंध वा गुणाचा भोग त्या परब्रह्मास आहे असे कधीही बोलू नये.

निरनिराळ्या अग्निमध्ये उष्णता जशी एकच असते त्याप्रमाणे पांडुसुता, ह्या चराचर भूतांच्या ठिकाणी ते ब्रह्म अभेदाने नांदते. अविनाशरुपाने व सूक्ष्मस्थितीने जे ब्रह्म स्थावर जंगम व्यापून आहे तेच ज्ञेय असे समजावे. ते ब्रह्म आत, बाहेर, जवळ, दूर सगळीकडेच आहे आणि त्याच्यावाचून जगात दुसरी गोष्टच नाही. क्षीरसागरामध्ये एक प्रकारची गोडी मधे, एक प्रकारची तीराला असे कमीजास्त प्रमाण असतच नाही. तो जसा सगळीकडे निरंतर सारखाच गोड असतो. त्याप्रमाणे स्वेदज प्रभृती भेदामुळे त्याच्या व्यापकतेस मुळीसुद्धा न्यूनता येत नाही. ते ब्रह्म सगळीकडे सारखेच पूर्णांशाने भरलेले असते आणि इतके असूनही त्याच्या ब्रह्माच्या स्वरूपाला मात्र भंग संभवत नाही. हजारो घागरीच्या पाण्यात चंद्राची हजारो प्रतिबिंबे पडली म्हणजे काय चंद्राचे हजारो तुकडे झाले? तो आहे तसाच पूर्ण प्रकाशाने आकाशात तळपतच असतो. समजा ते हजारो घडे काही प्रसंगाने फुटून गेले तरी त्या चंद्राचे स्वरूप जसेच्या तसेच रहाते. मिठाच्या राशी कितीही असल्या तरी क्षारता सगळीकडे एकच किंवा कोट्यवधी ऊस असले तरी त्यातील गोडी जशी एकच त्याप्रमाणे विश्वकार्याला कारण असलेले ते ब्रह्म अनेक भूतमात्रांना सारखेच व्यापून असते आणि भूतांच्या आकाराला आधारभूत असते. त्या भूतांच्या आकारास ब्रह्म आधारभूत असते ते लाटांना समुद्राचा आधार असतो तशा प्रकारचे असते. सकाळ दुपार संध्याकाळ जशी त्या एकाच आकाशात होतात तरी आकाश काही त्या त्या अवस्थात बदलत नाही, तशीच ब्रह्माची निर्विकार अवस्था असते. प्रियोत्तमा अर्जुना, जगाच्या उत्पत्तिकाली ब्रह्मा, स्थितिकाली विष्णू हा विश्वाकार हारपतो तेव्हा रूद्र अशी नावे त्या एका ब्रह्मालाच प्राप्त होतात. आता हे तीन्ही गुण म्हणजे उत्पत्ति, स्थिति, लय ह्या तीन्ही अवस्था लोपल्या की ते ब्रह्म शून्य होऊन रहाते. वेदवचन म्हणते की आकाशाचे शून्यत्व गिळून तीन्ही गुणांचा निरास करून जे उरते त्या शून्याला महाशून्य असे म्हणतात.

असे हे महाशून्य ब्रह्म अग्निला चेतविणारे आहे. चंद्राचे अमृत देणारे आहे. त्या ब्रह्मामुळेच सूर्याला डोळे आहेत. त्याच्या प्रकाशाने सूर्यही सुखाने वावरतो. ते ब्रह्म आरंभाचा आरंभ आहे, जीवाचा जीव आहे, मनाचे मन, डोळ्यांचे डोळे, कानाचे कान, वाचेची वाचा, प्राणाचा प्राण, गतीचे पाय, क्रियेचे कर्तेपण हे सगळे त्या ब्रह्माचेच कर्तृत्व आहे. आकार त्याच्यामुळे आकारतो, विस्तार त्याच्या आधाराने विस्तारतो, संहार त्याच्यामुळेच संहारतो. हा पृथ्वीचे पृथ्वीपण, पाण्याचे पाणीपण आणि तेजाची दिवेलागणी आहे. ते वायूचा श्वासोच्छ्वास , गगनाची पोकळी आहे. थोडक्यात हा जगद्रूपी भास त्याच्या रुपावर आभासतो. किंबहुना पांडवा असे म्हणावे की हे ब्रह्मच एकटे सर्व काही आपणच झाले आहे. इथे द्वैतभावाला थोडासुद्धा थारा नाही. त्या ब्रह्माचे दर्शन झाले की दृश्य व द्रष्टा ही समरसभावात एकत्र कालवून जातात. वेगळी उरतच नाहीत. जोवर त्याचे दर्शन झाले नाही

तोवरच द्वैत संभवते. पण एकदा का ज्ञेयाचा साक्षात्कार झाला की ब्रह्मच ज्ञाता, ज्ञेय, ज्ञान होऊन जाते. ज्ञानाचे जाणण्याचे ठिकाण तेच होऊन जाते. हिशोब करून झाला की हिशोबातील रकमा एक होऊन जातात. त्याप्रमाणे साध्य आणि साधन एकवटतात. आता हे सामरस्य झाले की द्वैताचा व्यवहार संपतो आणि अर्जुना हे नीट लक्षात ठेव की, ते ब्रह्म शोधण्याची यातायातही नसते. ते सर्वांच्या हृदयात सर्वकाल नांदतच असते.

सुजाण अर्जुना, तुला पूर्वी म्हटल्याप्रमाणे प्रथम हे क्षेत्र तुला स्पष्टपणाने व्यक्त करून सांगितले. त्या क्षेत्राचे स्वरूप सांगितल्यावर तुझ्या दृष्टिला स्पष्ट दिसेल असे ज्ञानाचे स्वरूप सांगितले. तुझी बुद्धी पुरे पुरे म्हणेपर्यंत जाता जाता सहज अज्ञानाचे रूपही प्रकट केले. अर्जुना, आताच विचाराच्या विस्ताराने ज्ञेयही तुला समजावून दिले आहे. आता हा सर्व विचार मनात चांगल्याप्रकारे ठसवून घेऊन जे माझ्या स्वरूपसिद्धीला येतात ते मद्रूप होतात. देहादि संगाचा त्याग करून ज्यांनी आपला जीव माझ्या ठिकाणी स्थिर केला तेही शेवटी ह्याच विचाराने स्वतःचा मोबदला देऊन मद्रूप होतात. अर्जुना, मद्रूप होण्याचे जे वेगवेगळे प्रकार आहेत त्यात हा सोपा प्रकार आम्ही तयार केला आहे. कडा चढण्यासाठी पायऱ्या बांधाव्यात, आकाशात चढण्यासाठी माचा बांधावा किंवा अथांग पाण्यातून पलिकडे जाण्यासाठी नाव घ्यावी तसे हे आम्ही केले आहे. एरवी हे सर्वच आत्मा आहे. पण तो विचार तुला सांगावा तर तुझ्या बुद्धीला गिळता आला नसता. तुझ्या बुद्धीचा अल्पज्ञपणा पाहून आम्ही एकच परब्रह्म चार प्रकारच्या निमित्ताने सांगितले. एकाला क्षेत्र, दुसऱ्याला ज्ञान, तिसऱ्याला अज्ञान आणि चवथ्याला ज्ञेय अशी नावे दिली आणि लहान बाळाला जेवू घालताना एक घास वीस ठिकाणी करावा तसे आम्ही तुला लहान लहान घास भरवले आहेत.

आता हा अभिप्राय अजूनही तुला कळला नसला तर अर्जुना तो पुन्हा सांगतो. पण आता त्याचे चार भाग करणार नाही किंवा हे सगळे ब्रह्मच आहे असे सांगूनही विषय संपवणार नाही. आत्मा आणि अनात्मा यांची योग्यता सारखीच धरून विवेचन करू आणि अभिप्राय पुन्हा स्पष्ट करू.

मात्र पार्था, तू आम्ही मागू ते दिले पाहिजेस. तू आता स्वतःला कानाचे नाव ठेव. इतर सर्व इंद्रियांचे काम बंद करून नुसते ऐकण्याचे काम कर.

ह्या श्रीकृष्णाच्या शब्दाबरोबर अर्जुनाच्या सर्वांगावर रोमांच उभे राहिले. देव ते पाहून त्याला म्हणाले, “पार्था, असा हर्षाने उचंबळून येऊ नकोस. खरोखरच तू फार चांगले श्रद्धेने ऐकतोस रे, पण असा भावनेच्या आहारी जाऊ नकोस.” देवांनी अर्जुनाच्या हर्षाला थोडा पायबंद घातला आणि मग श्रीरंग प्रकृति आणि पुरुष विभाग विस्ताराने त्याला समजावून देऊ लागले.

मालूताई, आता यापुढील भाग समजावून घेताना एक सूत्र ध्यानात घ्यावे असे वाटते. आत्ताच देवांनी सांगितले की आम्ही क्षेत्र, ज्ञान, अज्ञान, ज्ञेय, असे चार भाग करून सांगितले. अभिप्राय असा विभागून न सांगता अनात्मा व आत्मा असे दोनच भाग करून सांगणार आहे.

सहजच क्षेत्र आणि अज्ञान व ज्ञान व ज्ञेय अशा जोड्या होणार किंवा क्षेत्र व ज्ञेय आणि अज्ञान व ज्ञान अशा होणार. आता देव, आत्मा आणि अनात्मा अशी जोडी घेऊन बोलणार आहेत. थोडा विचार केला तर ह्या

जोड्या प्रकाश व अंधार यांच्यासारख्या पूर्ण परस्पर विरोधी पण अभिन्न अशा आहेत. ज्ञानाचा अभाव म्हणजेच अज्ञान व अज्ञान म्हणजेच ज्ञानाचा अभाव. तेव्हा यापुढील विवेचनात आतापर्यंतचे विवेचन नव्या बाह्य स्वरूपात मांडले जाणार आहे. पण मूळ गाभा कायम रहाणार आहे. म्हणून अवधान पूर्ण असणे जरूर आहे. ज्या दोन वस्तू स्वभावात विरोधी पण कार्याच्या प्रकटीकरणासाठी परस्परपूरक आहेत त्यांचे प्रथम वेगळे असतानाचे व नंतर एकत्र आल्यानंतरचे रूप स्पष्ट केले जाईल आणि ज्ञानी पुरुष त्यांचे वेगळेपण लक्षात ठेवून एकत्वाचा अनुभव घेऊन परब्रह्माशी सामरस्य कसे साधतात हे देव सांगतील.

देव म्हणाले, “अर्जुना, मी तुला आता हा विषय वेगळ्या थाटाने समजावून सांगतो ऐक. अरे, साध्य एकच आहे पण साधने प्रकृतिधर्मानुरूप अनेक आहेत. आता मी जो मार्ग तुला सांगतो त्याला योगी “सांख्य तत्त्वज्ञान” म्हणतात. जगामध्ये ह्या मार्गाची प्रसिद्धी करण्यासाठी मी कपिलमुनि होऊन तो प्रकट केला. प्रकृतिपुरुषाचा शुद्ध विचार ह्या सांख्यमार्गास धरून तुला सांगतो ऐक.

अर्जुना, सांख्य प्रकृति आणि पुरुष ही दोन तत्त्वे अनादि व अनंत मानतात. दिवस आणि रात्र जशी एकमेकास चिकटून वाढतात त्याप्रमाणे त्या अनादि पुरुषास चिकटलेली प्रकृतिही अनादीच आहे. शरीर तर सावलीप्रमाणे आभासात्मक नव्हे खरेखुरे आहे पण त्या रूपाला सावली बिलगलेलीच असते. दाणे येण्यापूर्वीच कणीस, भूस आणि दाणे यांच्यासह वाढत असते. भूस हे तर सारहीन आहे पण ते कणाबरोबरच वाढत असते तसाच हा प्रकार आहे.

तुला क्षेत्र ह्या नावाने जो ३६ तत्त्वांचा समुदाय सांगितला ती सांख्य मताप्रमाणे प्रकृति आहे आणि ज्याला क्षेत्रज्ञ असे नाव दिले तो पुरुष ह्या नावाने ते ओळखतात. ह्या दोन्हीस पुष्कळ लोक पुष्कळ वेगवेगळी नावे देतात पण निरूपणाचा विषय वेगळा नसतो हे वर्म तू चुकू नकोस.

आता जी केवळ सत्ता तिला पुरुष म्हणावे आणि सर्व क्रियेला प्रकृति असे संबोधावे.

अर्जुना, बुद्धी, इंद्रिये, अंतःकरण हा विकारांचा समुदाय आणि सत्त्व, रज, तम हे त्रिगुण ह्या प्रकृतिपासून होतात. प्रकृतिमध्ये इच्छा होते, मग त्या इच्छेला बुद्धीचे सहकार्य मिळते. इच्छा आणि बुद्धी अहंकार चेतवितात आणि मग जीवाला ते इच्छित साध्य करण्याच्या नादी लावतात. आता हे साध्य प्राप्त करून घेण्यासाठी शारीरिक क्रियेचे सूत्र जीव हाती घेतो त्याला **कार्य** म्हणावयाचे. मदाच्या धुंदीत जीवाला इच्छा होते ती इंच्छा मनाला उठवते आणि अहंकाराच्या जोरावर इंद्रिये राबवते ह्या प्रेरणेस **कर्तृत्व** असे नाव आहे. इच्छित वस्तूच्या प्राप्तीसाठी मनाकडून होणारी प्रेरणा म्हणजे कर्तृत्व, ज्याविषयी इच्छा उत्पन्न होते तो पदार्थ किंवा इच्छित वस्तू म्हणजे **कारण** व प्रेरणेप्रमाणे इच्छित वस्तू मिळवण्यासाठी इंद्रियाकडून होणारी हालचाल म्हणजे **कार्य.** आता कार्य, कारण, कर्तृत्व ही तीन्ही प्रकृतिपासून उत्पन्न होतात. सिद्धांचा राणा तो भगवान श्रीकृष्ण पुढे म्हणाला, “अर्जुना, या तिघांच्या समुदायाने प्रकृति कर्मरूप होते. पण त्या कर्माचे स्वरूप मात्र ज्या गुणांचे आधिक्य असेल त्याप्रमाणे असते. सत्त्वगुणाचा उत्कर्ष असेल तेव्हा घडणारे कर्म उत्तम सत्कर्म म्हणावे. जेव्हा रजोगुणाच्या आधिक्यातून कर्म घडते तेव्हा ते मध्यम कर्म जाणावे व जी कर्मे केवळ तमोगुणाच्या उत्कर्षाने घडतात ती कर्मे अधम आणि निषिद्ध समजावी. अरे, बरीवाईट कर्मे अशी ह्या प्रकृतिपासून घडतात आणि त्या

त्या कर्मानुसार सुख दुःखाची निर्मिती होते. वाईट कर्मापासून दुःख व चांगल्या कर्मापासून सुख उत्पन्न होते.

प्रकृतिमुळे उत्पन्न झालेले हे सुखदुःख तसा विचार केला तर केवळ एकट्या प्रकृतिस भोगावे लागावे पण तसे घडत नाही. तो अनादि पुरुष प्रकृतिच्या स्वाधीन झालेला असतो म्हणून ते सुखदुःखाचे घाव प्रकृतिस चिकटून असलेल्या पुरुषासही बसतात असे वाटते.

या प्रकृतिपुरुषाच्या विस्मयकारक प्रपंचात सांगितले तर अद्भूत  वाटेल. पण आहे खरे की स्त्री मिळवते आणि नवरा बसून खातो. ह्या पतिपत्नीचा एकमेकाशी काही संबंध नसतो, मेळही नसतो पण ती पतिपत्नी जगाला जन्म देतात. पुरुष अंगहीन म्हणजे निराकार, पांगळा, द्रव्यहीन, एकटा, वृद्धापेक्षा वृद्ध आहे. त्याला आडनाव पुरुष. पण तो पुरुष, स्त्री, नपुंसक यापैकी नक्की काय आहे हेही सांगता येत नाही. तो अचक्षु, अश्रवणु, अहस्तु, अचरणु आहे. त्याला रूप, वर्ण, नाव काहीही नाही. त्याच्याजवळ काहीच नाही पण तो प्रकृतिचा भर्ता मात्र आहे आणि त्यामुळे प्रकृतिमुळे जे जे सुखदुःख निर्माण होते ते त्याला भोगावे लागते असे वाटते. तो स्वतः मुळात अकर्ता, उदास, अभोक्ता आहे खरा पण ती पतिव्रता त्याला हे सुखदुःख भोगणे भाग पडते. व्यवहारातही असे दिसते ना की एखाद्या स्त्रीजवळ थोडेबहुत रूप, गुण असले की आपले वाटेल ते हट्ट ती नवऱ्याकडून पुरवून घेते. मग ही तर काय स्वतः गुणमयीच! प्रकृति म्हणजे मूर्तिमंत गुणच. ती क्षणाक्षणाला नित्य नवे रूप धारण करते. ती रूपाने भरलेलीच असल्याने आपल्या मदाच्या जोरावर अचेतनालाही हालवून सोडते. हिच्या जोरावर स्नेह प्रेमळ होतो, इंद्रिये प्रबळ होतात आणि वस्तुमात्र प्रसिद्धीस येते. मन खरे म्हणजे नपुंसक नव्हे काय पण त्याच्याकडून ती त्रैलोक्य भोगवते असे तिचे अलौकिक करणे आहे.

ही प्रकृति भ्रमाचे महाद्वीप आहे, मूर्तिमंत व्याप्ति आहे. ही कामरूपी वेलाचा मांडव आहे. मोहरूपी वनातील ती माधवी आहे. तिचे दैवी माया हे नाव प्रसिद्ध आहे. वाङ्मयाची वाढ तिच्यापासून होते. ती साकारपणा प्राप्त करून देते. ती प्रपंचाची मूर्तिमंत धाडच आहे. कला तिच्यापासून निघाल्या आहेत, विद्या तिनेच निर्माण केल्या आहेत, इच्छा, ज्ञान आणि क्रिया यांना तीच जन्म देत असते. नादांची तर ती टांकसाळच आहे. चमत्काराचे ती घरच आहे. फार काय सांगू अर्जुना, हा सगळा पसारा तिचाच खेळ आहे.

उत्पत्ति आणि प्रलय हे तिचे उदय आणि अस्त आहेत. ही प्रकृति म्हणजे एक अद्भुत  भुरळ आहे. विश्वाचा पसारा तर ती सहज निर्माण करतेच पण त्या अनावर पुरुषालाही ती आवरते. एकाकी असणाऱ्या पुरुषाची ही जोडीदारीण त्या निःसंगाची संबंधी असते आणि निराकर पुरुषाचे घर चालवते. तिच्या सौभाग्याचे अपारपण एवढे मोठे असते की त्या पुरुषाजवळ स्वतःचे काहीही नसले तरी ती आपणच त्याचे सर्व काही होते. स्वतः सिद्ध असणाऱ्या पुरुषाची उत्पत्ति ती होते. त्या अमूर्ताची मूर्ति ती होते. आपणच त्याची स्थिती, ठिकाण होते. त्या अनार्ताची आर्ति होते. त्या अकुळाची जाती गोत्र होते. त्या निराकाराचा आकार, निर्व्यापाराचा व्यापार, निरहंकाराचा अहंकार होऊन रहाते. त्या अचर्चाचे लक्षण होते, अपाराचे मोजमाप होते. त्या अमनस्काचे मनबुद्धि होते. त्या अनामाचे नाम, अजाचा जन्म होते, आपणच त्या अकर्त्याचे कर्म क्रिया सर्व काही होते. त्या निर्गुणाचे गुण, अचरणाचे चरण, अश्रवणाचे श्रवण, अचक्षुचे चक्षु, त्या भावातीताचे भाव, निरवयवाचे अवयव हे सगळे ती प्रकृति होते, किंबहुना पांडवा ती त्याचे सर्व काही होते.

अनुक्रमणिका

याप्रमाणे त्या अनादि अनंताला चिकटून असणारी प्रकृति आपल्या व्यापकपणाने त्या अविकारी पुरुषाला विकारी करून सोडते. आता प्रकृतिच्या संगतीमुळे त्या पुरुषाचे पुरुषत्व झाकून जाते. चंद्र अवसेत पडला की तेजोहीन होतो. अतिशय शुद्ध सोन्यात जर हिणकस धातु मिसळली तर त्या सोन्याचा कस पंधरावरून पाचावर घसरतो. चांगल्या माणसाच्या अंगात पिशाच्च संचार करते आणि त्याच्याकडून पापकर्म घडविते. चांगल्या स्वच्छ दिवसाचा अभ्रे येऊन दुर्दिन करून सोडतात. तसा तो पुरुष प्रकृतित सापडल्यामुळे तेजोहीन झाल्यासारखा वाटतो.

दूध पशूच्या पोटात असावे, अग्नि लाकडात गुप्त असावा किंवा रत्नदीप कापडात गुंडाळून घ्यावा तशी त्या पुरुषाची स्थिती होते. सिंह रोगामुळे हीन दीन होऊन खिळून पडावा किंवा राजा पराधीन होऊन रहावा तसा तो पुरुष प्रकृतिच्या तावडीत निष्प्रभ होतो. जागा असलेला पुरुष झोपेने घेरला गेला की स्वप्नातील सुखदुःखे मुकाट्याने भोगू लागतो. तसा तो पुरुष स्त्रीच्या आधीन एखादा विरक्त व्हावा तसा प्रकृतिच्या आधीन होतो आणि प्रकृतीच्या गुणामुळे उत्पन्न झालेली सुखदुःखे भोगू लागतो. पुरुष अज आहे, नित्य आहे खरा पण गुणसंगाने पापपुण्य निर्माण होऊन सुखदुःखाच्या हिशोबाप्रमाणे जन्म-मृत्यूचे घाव बसू लागतात.

आता हे घाव बसतात म्हणण्यापेक्षा बसल्यासारखे दिसतात असे म्हणणे जास्त योग्य ठरेल. तापलेल्या लोखंडावर घाव बसतात ते घाव अग्निवर बसतात असे म्हणतात पण बसत नाहीत. पाणी हालू लागले की त्यात पडलेले चंद्राचे प्रतिबिंबही हालते व चंद्राच्या अनेक प्रतिमा त्यात तयार होतात. आणि अनेक चंद्र झाले असे वाटते पण तसे खरे नसते. आरसा पुढे ठेवल्यामुळे एका चेहऱ्याचे दोन चेहरे दिसतात. पण चेहरे एकाचे दोन झालेले नसतात. केशरावर स्फटिक ठेवला तर तो लाल दिसतो पण लाल नसतो. तसा हा अजन्मा गुणाच्या संगतीमुळे, प्रकृतिच्या संगतीमुळे जन्माला आल्यासारखा वाटतो. पण खरा जन्माला येतच नाही. संन्यासी जसा स्वप्नात अंत्यज इत्यादी जाती भोगतो त्याप्रमाणे अधमोत्तम योनी त्याला प्राप्त होतात असा भास होतो. पण मुळात तसे होत नाही. पुरुषाला जन्मणे, भोगणे ह्या कुठल्याही अवस्था नाहीत. गुणांची म्हणजेच प्रकृतिची संगती झाल्याने गुणावर पडणारे घाव त्याच्यावर पडल्यासारखे वाटतात. गुणाचा संग ह्या भासाला कारणीभूत आहे.

कारण तो प्रकृतिमध्ये उभा असतो खरा पण जुईच्या वेलाला आधारासाठी एखादा खांब उभा करावा तसा केवळ आधार म्हणून पुरुष स्थित असतो. पृथ्वी आणि आकाश ही जशी जवळजवळ पण अलिप्त नांदत असतात तसा तो प्रकृतिपासून अलिप्त असतो. प्रकृतिरूपी नदीच्या तीरावर मेरूपर्वतासारखा तो अचल अशा अवस्थेत उभा असतो. त्याचे प्रतिबिंब त्या नदीच्या पाण्यात पडते, ते प्रतिबिंब हालते, वहात गेल्यासारखे वाटते पण मेरू हालत नाही, वहात नाही. प्रकृति होते जाते पण हा असतोच असतो. आणि नुसत्या अस्तित्वाने आब्रह्मावर सत्ता चालवितो. प्रकृति याच्यामुळे जगते, त्याच्या सत्तेने जगास जन्म देते. हा तिचा स्वामी आहे. अनंत काळात ज्या ज्या सृष्टि निर्माण होतात त्या त्या कल्पान्ताच्यावेळी त्याच्या ठिकाणी येऊन मिळतात. हा महदब्रह्माचा मालक, ब्रह्मगोलाचा निर्माता आपल्या अपारपणाने संसाराचे माप मोजून टाकतो.

अर्जुना, असा हा प्रकृतिपलीकडे असणारा एक जो कोणी आहे त्यालाच तत्त्वतः पुरुष अशी संज्ञा आहे. तो ह्या देहामध्ये रहातो. त्यालाच परमात्मा असे म्हटले जाते. आता काही भाग्यवान ज्ञानाच्या जोरावर हे

समजून चुकतात की हा परमात्मा आपल्याच ठिकाणी रहातो. तो काही करत नाही. जे जे कर्म ह्या शरिराकडून घडते ते ते ती प्रकृति त्या त्या वेळी गुणोत्कर्षाप्रमाणे करते. तेव्हा परमात्मा हे रूप आणि प्रकृति, ही छाया हे पाणी, हे मृगजळ असा निवाडा ते करतात. त्यांच्या मनापुढे प्रकृति आणि पुरुष ही वेगवेगळी आहेत हा विवेक निरंतर दृग्गोचर असतो.

असे पुरुष शरिराच्या संगतीमुळे सर्व कर्मे करू देत पण त्या कर्माचा मळ त्यांना शिवत नाही. धुळीने आकाश मळत नाही त्याप्रमाणे कर्म करूनही ते निर्लेप रहातात. देह असतानाच ते त्या देहाच्या मोहातून सुटले असल्यामुळे देह गेला की पुन्हा त्यांना देह धारण करावा लागतच नाही.

हा प्रकृतिपुरुष विवेक त्याच्यावर असा असाधारण उपकार करतो.

आता हा विवेक आपल्या अंतःकरणात सूर्याप्रमाणे प्रकाशमान व्हावा म्हणून अनेक उपाय आहेत. त्यापैकी काहीचा उल्लेख करतो. वीरा, अर्जुना, कोणी आपल्या विचारांची आगटी पेटवतात आणि आत्मा व अनात्म पदार्थाची जी आपल्या मनात भेसळ झालेली असते. तो सर्व मेळ त्या तप्त अग्नित टाकतात. तीव्र विचारामुळे अनात्माचे हीण जळून जाते आणि ही प्रक्रिया वारंवार करीत गेल्यामुळे शेवटी त्या विचारवंताच्या हाती आत्मभावाचे चोख सोने तेवढे उरते.

अनात्मरूपाचे छतीसही भेद छत्तीस प्रकारचे हीन निर्विवादपणे निरखून टाकून आपला शुद्ध आत्मभाव निवडतात. त्या आत्मभावाच्या पोटी आत्मध्यानाच्या दृष्टिने स्वतःच स्वतःला पहातात. कित्येक भाग्यवंत सांख्य तत्त्वज्ञानाच्या सहाय्याने तर कित्येक कर्ममार्गाचे आचरण करून आत्म्यास पहातात. आणखी काही जण हे संसार भय खरोखर निस्तरून टाकतात. हे करण्यासाठी ते प्रथम अभिमान देशोधडीला लावून एका माणसाच्या शब्दावर पूर्ण विश्वास ठेवतात. ज्यांच्या शब्दावर ते असा विश्वास टाकतात तेही तशाच योग्यतेचे असतात. ते शिष्याचे हिताहित पहातात. शिष्याची हानी पाहून दयेने कळवळतात, दुःख कशाने होते ते नीट विचारून घेऊन ते दुःख दूर करून सुखाची जोड करून देतात. शिष्यही त्यांच्या तोंडून जे निघेल ते आदराने चांगले ऐकून घेऊन मनात तो बोध ठसवून घेऊन त्या उपदेशाप्रमाणे आचरण ठेवतात. ऐकणे हेच जन्मास आल्याचे सार्थक आहे असे समजतात. आणि गुरुवाक्यावरून जीवाचे लिंबलोण उतरवितात. असे हे गाढे शिष्य कपिध्वजा, मरणरूपी समुद्राच्या समुदायापासून चांगल्याप्रकारे बाहेर पडतात. परमात्मा ही वस्तू जाणण्यासाठी हे असे अनेक उपाय आहेत.

आता हा विस्तार पुरे. सर्वार्थाचे सार असे सिद्धान्तरूपी लोणी तुझ्या हाती देतो. पांडुसुता, तेवढ्याने जर तुला आयता अनुभव मिळाला की ब्रह्मानुभवानंतर होणारा आनंद, शांती वगैरे मिळण्यास सायास पडणार नाहीत. म्हणून या सिद्धान्ताची बुद्धिने पुन्हा एकदा मांडणी करतो. इतर मतांच्या दुराग्रहाचे खंडन करू आणि स्वच्छ फलितार्थ विस्ताराने तुला सांगू.

मी तुला क्षेत्राचे स्वरूप विस्ताराने सांगितले. क्षेत्रज्ञ या शब्दाने मी आपले स्वरूपही तुला उलगडून दाखवले. अर्जुना, ह्या दोघांच्या मिलाफाने सगळी भूते निर्माण होतात. पाण्यावर वाऱ्यामुळे लाटा उठतात तसे

हे घडते. बरड रान उन्हाने तापले की वीरा, या भेटीनेच मृगजळाला पूर येतो. पावसाच्या धारांचा वर्षाव पृथ्वीवर झाला की नाना प्रकारची बीजे अंकुरतात आणि सारी पृथ्वी माखून जाते. त्याप्रमाणे जीव असे ज्याला म्हटले जाते ते सर्व चराचर या दोघांच्या संयोगाने जन्मास येते हे ध्यानात ठेव. जगातील कुठलाही पदार्थ ह्या प्रकृतिपुरुषाहून वेगळा नाही.

वस्त्रपणा हे जरी सूत नाही तरी वस्त्रपणा तंतूवरच आहे. अशा सूक्ष्म विचाराने हे ऐकून घे, समजावून घे यच्चावत् भूते जरी एका वस्तूपासूनच झाली असली तरी भूते पहाणाऱ्यास ती वेगवेगळी आहेत ही प्रतीती येतेच. या भूतांची नावे वेगवगळी, वेष वेगवेगळे, वर्तन वेगवेगळ्या प्रकारचे असते आणि वरवरचा भेद पाहून जर तुझ्या मनांत त्यांचा भेदच आला तर कोट्यावधि जन्म घेतलेस तरी त्यातून तू बाहेर निघू शकणार नाहीस. अनेक कारणामुळे एकाच दुध्या भोपळ्यापासून झालेली फळे लांब, वाकडी, गोल अशा आकाराची होतात. बोरीची लाकडे काही सरळ, काही वाकडी असतात पण ती बोरीचीच असतात. कोणताही आकार असो भोपळे दुध्याच्या वेलांचे आणि लाकडे बोरीची हे जसे मोडत नाही त्याप्रमाणे प्राणी वेगवेगळ्या प्रकारचे असले तरी ब्रह्मवस्तू एकचएक सरळ भरलेली असते. विस्तवाच्या ठिणग्यामध्ये उष्णता सगळीकडे सारखीच असते. त्याप्रमाणे अनेक जीवराशीत एक परमात्माच असतो.

आकाशभर धारा पसरलेल्या असतात पण त्या सगळ्या धारात पाणी एकच असते. तसा तो परमात्मा ह्या जीवांच्या सर्वांगामध्ये भरलेला असतो. घागरीत आणि घरात एकच आकाश असते त्याप्रमाणे ह्या विषमाकृती जीवांना ती एकच ब्रह्मवस्तू व्यापून असते. हा वरवरच्या भिन्नत्वाचा आभास नष्ट झाला की, आत्मा अविनाशी आहे तो उरतो. सोन्याचे बाहुभूषणे, केयूर, हे दागिने केले की एकाच कसाचे सोने वेगवेगळ्या आकाराचे होते पण त्यातील सुवर्णाचा कस काही बदलत नाही. जीवधर्महीन आणि जीवाजीवामध्ये अभिन्न असा आत्मा ज्याला दिसतो तोच ज्ञानी पुरुषामध्ये डोळस पुरुष असे म्हणावे. ज्ञानाच्या डोळसामध्ये तो पुरुष डोळस असे मी म्हणतो. ही काही त्याची वारेमाप स्तुति नाही. अर्जुना, अरे तो खरोखरच भाग्यवंत!

देह खरे म्हणजे इंद्रिये आणि गुण ह्यांची रहाण्याची धोकटी आहे. कफ, वात, पित्त या त्रिकुटीने बनवलेला हा देह, पंचमहाभूतांचा हा समुदाय फार भयंकर आहे. तो पाच नांग्यांची व पाच वेगवेगळ्या ठिकाणी दंश करणारी इंगळी आहे. जीवरूपी सहाला सांपडलेली ही हरणाची कुटीच आहे. पण असे असून हा जीव आपण नित्य, शुद्ध, स्वतंत्र आहोत या नित्यभावाची सुरी अनित्यभावाच्या उदरात का खुपसत नाही आणि त्याचा नाश का करीत नाही हे एक आश्चर्यच आहे. ज्ञानी पुरुष मात्र देहात असूनही देहभाव आपल्याकडे घेऊन आत्मघात करून घेत नाहीत. नेहमीच ब्रह्मभावात रहातात आणि देहाचा नाश झाला तरी त्या ब्रह्मातच लीन होतात. योग ज्ञानाच्या बलाने संपन्न होऊन कोट्यवधि जन्म ओलांडून मग तो योगी आता ह्या ब्रह्मभावातून बाहेर यावयाचेच नाही असा पक्का निश्चय करून त्यात बुडी मारून रहातो.

भूते वेगवेगळी आहेत या विषमबुद्धिचा त्यांनी पूर्ण त्याग केलेला आहे आणि ते सुखाने या शरिरात नांदत असतात. तिथेच त्यांना पाय धुण्याला सुद्धा विपुल सुख मिळते. ते सुख आकाररूप नदीचे पैलतीर आहे. म्हणजे निराकार आहे. ब्रह्मनादाची पलीकडील कड आहे म्हणजे शब्दातीत आहे. ही स्थिती परब्रम्ह्माच्या तुर्यावस्थेचे माजघर आहे. गंगादि नद्या जशा समुद्राला येऊन मिळतात तशा मोक्षासकट सगळ्या गती इथे येऊन विश्रांती

घेतात. दीपांच्या कोट्यवधि रांगा असोत त्या सगळ्यामध्ये तेज एक एकच व सारखेच आहे, तसा तो परमात्मा सर्व भूतांच्या ठिकाणी अभिन्नत्वाने नांदतो अशा समत्वाने ते योगी जगाकडे पहातात. एकदा हे समत्व अंगी बाणले की, ते योगी खरोखरच जन्ममरणाच्या स्वाधीन होतच नाहीत. अभेदभावरूपी बिछान्यावर ते सुखाने झोपलेले असतात म्हणून अर्जुना मी त्यांचे पुन्हा पुन्हा वर्णन करतो आहे.

जगाकडे पहाण्याची त्याची दृष्टि अशी अभेदाची असते पण स्वतःकडे पहाताना ते आपली मनबुद्धि प्रमुख अशेष कर्मेंद्रिये जे कर्म करतात ते प्रकृति करते हे पक्के समजून रहातात व आपला आत्मा ह्या खेळात सापडलेला नाही, तो केवळ खांबासारखा नुसता आधारभूत आहे, होणाऱ्या कर्माशी त्याचा काहीही संबंध नाही ह्याचे सतत स्मरण ठेवतात.

"घरामध्ये अनेक माणसे रहातात, नाना व्यापार करतात, घर काहीच करीत नाही. ढग आभाळात धावत असतात पण ते आकाश निमूटपणे उभे असते. त्याप्रमाणे आत्म्याच्या प्रकाशात ही प्रकृति नाना प्रकारच्या खेळांचा आरंभ करून खेळते पण तो खांबासारखा अचल आत्मा कर्म कोण करते आहे याची दखलही घेत नाही." अशा निर्णयाप्रत ते ज्ञानी पुरुष येतात आणि राजहंसाप्रमाणे नीरक्षीर विवेक करून प्रकृतिचा खेळ दुरून पहातात आणि आत्मरूपाशी क्षणाक्षणास सामरस्य साधतात. त्यांच्या अंतःकरणात कर्म कोण करते याचा स्वच्छ प्रकाश पडलेला असतो. आपले खरे आत्मरूप अकर्ता आहे हे ते जाणतात आणि अर्जुना असे ते ब्रह्म संपन्न झाल्यामुळे ह्या सगळ्या भिन्न-भिन्न भूताकृतींचे मूळरूप एकच आहे व आपणही तेच आहो हे त्यांच्या सारखे अनुभवास येत रहाते. आपण सर्व एका पाण्याच्या लाटा आहो, एका पृथ्वीचे परमाणु आहो, एका सूर्यमंडलाची किरणे आहो ही त्याची अपरोक्ष अनुभूति असते. आपण सर्व एका देहाचे अवयव, एका मनातील वेगवेगळे भाव, एका अग्निचे स्फुलिंग आहो असा त्यांना निश्चय होतो. हे सगळे भूताकार एका ब्रह्माचीच लेकरे आहेत असा अभेद सर्वार्थाने डोळ्यात उतरला की ब्रह्म संपत्तीचे तारू बंदरास लागले असे खुशाल समजावे. मग पहावे तिकडे डोळ्याना ब्रह्मच दिसते आणि अपार सुखाची प्राप्ती होते.

अर्जुना, हे विवेचन तू एकाग्र चित्ताने ऐकतो आहेस असे मला दिसते आणि वाटते की प्रकृतिपुरुष व्यवस्था कशी हे कळण्याच्या व प्रत्यक्ष अनुभविण्याच्या मार्गावर तू उभा आहेस. अर्जुना, सख्या रे, हाताच्या ओंजळीत अमृत आले तर त्याला आपण किती जपू? आपल्या डोळ्यांना प्रत्यक्ष अपरंपार द्रव्यनिधान दिसले व ते आपल्या मालकीचे आहे असे कळले तर आपण त्याचे किती निर्धाराने जतन करू? पांडवा, तितका साक्षेप तू ह्या विवेचनाबद्दल मनात ठेव. आता तुला ही प्रत्यक्ष प्रतीति येईल. तिथे तुझ्या चित्ताने घर बांधावे. आणखी एकदा ह्या आत्म्याचे रूप तुला समजावून देतो, मग तू त्या बोधापासून आपले चित्त कधीही ढळू देऊ नकोस. तुझे मन माझ्याजवळ गहाण ठेव आणि तो अमोलिक बोध घेऊन जा."

अर्जुन प्रथमपासून सावधान चित होताच पण देवांनी खुंटा हालवून बळकट करावा तसे सावध केले. अर्जुनही सर्वांग अवधानरूप होऊन देवांचे हे स्पष्ट सखोल विवेचन ऐकण्यास सज्ज झाला.

देव म्हणाले, "अर्जुना, आत्म्याचे स्वरूप प्रकट होत आहे. शब्दाशब्दावर तू लक्ष्यवेध कर. जे मी सांगतो आहे त्या शब्दाबरोबर तुझ्या अंतःचक्षुपुढे ते चित्र जसेच्या तसे उभे राहू दे. कारण तो आत्मा सांगण्यासारखा,

ऐकण्यासारखा, विवेचन करण्यासारखा नव्हेच. ऐकता ऐकता तुझ्या मनाने प्रपंचाचा प्रांत सोडून दिला आणि अशा एका अज्ञात निगूढ प्रदेशात सहज प्रवेश केला तर ते मनच विलीन होऊन त्या आत्म्याची प्रत्यक्षानुभूति तुला येईल. शब्दांचा व अवधानाचा हा एवढा व एवढाच उपयोग आहे." अर्जुनाचे चित्त असे आणखी एका पातळीवर चढवून देव म्हणाले, "अर्जुना, सूर्याचे पाण्यात प्रतिबिंब पडते. प्रतिबिंब भिजले तरी बिंब भिजत नाही. परमात्मा ज्याला म्हणावयाचे तो प्रकृतिमध्ये प्रतिबिंबित होतो पण लिप्त होत नाही. समज जमिनीवर पाणी साठलेले नव्हते तेव्हा सूर्य आकाशात तळपत होताच. मग पाऊस पडला, डबके तयार झाले आणि त्यात आकाशातल्या सूर्याचे प्रतिबिंब पडले तर ते प्रतिबिंब पाहून सूर्य पाण्यात पडला असे म्हणता येते काय? आत्मा देहात आहे असे म्हटले तरी आत्मा काही येऊन देहात शिरलेला नाही. तो आहे तेथेच आहे. देहात आत्मतत्त्व केवळ प्रतिबिंब रूपाने असते हे ध्यानात असावे. आरशात मुखाचे दर्शन झाले की आपण त्याला मुखाचे प्रतिबिंब पडले असे म्हणतो तसा तो आत्मा देहात प्रतिबिंबरूपाने आहे. देह गेला तरी प्रतिबिंब गेले म्हणता येईल. बिंबरूपात काहीच कमीजास्त झाले नाही.

देहाची आणि आत्म्याची भेट होते असेही म्हणता येत नाही. वाऱ्याची आणि वाळूची गाठ कधी बांधता येईल का? आग आणि पीस ही दोन्ही एका दोऱ्यात ओवता येईल का? आकाश आणि पाषाण यांची सांधेजोड होऊ शकेल काय? एक निघाले पूर्वेकडे तर एक पश्चिमेकडे मग त्याची भेट जशी अशक्य तशी देह आणि आत्मा यांचा संबंध अशक्य आहे.

अंधार आणि उजेड, जिवंत आणि मृत यांचा जसा मिलाफ होणे नाही तसाच देह आणि आत्मा यांचा मेळ सुतराम शक्य नाही. रात्र-दिवस, सोने-कापूस ही जशी परस्पर विरुद्ध तत्त्वे आहेत तशी ही आहेत.

अर्जुना, काय ह्या देहाचे सांगू रे, देह झाला आहे पाचाच्या मेळाने! तो गुंफलेला आहे कर्माच्या दोऱ्यात! आणि टाकलेला आहे जन्ममृत्यूच्या गरगर फिरणाऱ्या चाकावर! अरे काळरूपी अग्निकुंडात टाकलेली ही लोण्याची उंडी आहे. माशीने पंख फडफडावे तोवर तो देह नष्ट होऊन जातो आहे. अग्नित पडला तर राख होऊन उडून जाते. कुत्र्याच्या तावडीत सापडला तर त्याची विष्ठा होते. या दोन्हीतून सुटला तर कृमीचा पुंजका होतो. अर्जुना, असा ह्या देहाचा शेवट फार वाईट आहे.

मालूताई, आम्ही सर्व मैत्रिणी पाच वर्षापूर्वी वाडीस गेलो होतो. ज्ञानेश्वरी पारायण करण्यासाठी एका पुजाऱ्याच्या घरी संध्याकाळी पोचलो. दुसरे दिवशी कुठे पारायण करावे याची चर्चा करीत असताना निवांत जागा कोणती हे पाहिले आणि प. पू. टेंबे स्वामीमहाराज मंदिरात बसावयाचे असे ठरले. पहाटे उठून कृष्णास्नानास गेलो. काय सांगू त्या स्नानाची अपूर्वाई! ज्या नदीत घोट्याएवढे पाणी दोन दिवसांपूर्वी होते तिथे कोयना धरणातून अचानक पाणी सोडल्याने सुंदर डोह झाला होता. जणू ज्ञानेश्वरकन्यांना भेटण्यासाठीच कृष्णाबाई धावत आली होती. पहाटे पाचला कृष्णाबाईच्या डोहात स्नान करणे हा एक आगळा आनंद आहे. आईने प्रेमाने मिठी मारावी तसे वाटले. दत्तमहाराजांच्या दर्शनानंतर सर्वजणी टेंबेमहाराज मंदिरात जमलो आणि प्रार्थना ध्यान जप झाल्यावर सर्वजणींनी एकमुखाने घोष केला.

**"ॐ नमो जी आद्या ।"**

अनुक्रमणिका

पहिल्या दिवशी नियमाप्रमाणे अकरा अध्याय पूर्ण केले. दुसरा दिवस उजाडला. बारावा अध्याय अगदी नाजुकपणाने संपला आणि तेराव्याचा घोष सुरू झाला. दुपारी साडेबाराच्या सुमारास तेराव्याचा शेवट आला. अखंड वाचनाने वृत्ति तरल झाल्याच होत्या पण काय सांगू मालूताई

**आणि आत्मा तो एथ ऐसा ।**
**पै नित्य सिद्ध आपैसा । अनादिपणे ॥**

या ओवीशी आलो मात्र!

माझ्या जीवाने खरोखरच अंतराळात उडी मारली. शरीर नुसते कापसासारखे झाले. पुढच्या आठ ओव्या वाचताना आपण कुठल्यातरी वेगळ्याच जगात आहो असे वाटले. अहो, त्या ओव्यांचे वाचन म्हणजे जसे काही सारंगीवरचे सूरच असे वाटू लागले. काय त्या ओव्यांचा नाद, काय त्या ओव्यांची लय! जणू काय प्रत्यक्ष भगवंताच्या त्या नयनमनोहर मुखकमलातूनच तो अमृतरस आपल्यावर सर्वांगाने वर्षाव करतो आहे असे वाटले. मालूताई, असे हे आठ ओव्यांचे वाचन आजही अंगावर काटा उभे करते आहे.

पूज्य जेरेशास्त्री वहिनीसाहेब सुर्व्यांना म्हणाले होते, “तुम्ही सर्वजणी एखाद्या निवांत ठिकाणी ज्ञानेश्वरी पारायण करता हे फार चांगले आहे. अशा सामुदायिक पारायणाच्यावेळी अचानक एखादा महात्मा अदृश्य रूपाने येऊन साधकास आशीर्वाद देऊन जातो. प्रत्यक्ष डोळ्यांना रूप दिसले नाही तरी तुम्हाला असा काही एक अपूर्व आनंद मिळेल की तो कधी अनुभवलेलाच नाही.”

आणि म्हणून माझी पूर्ण खात्रीच झाली की त्या क्षणास कुणीतरी विभूति आम्हा सर्वांना आशीर्वाद देण्यासाठी उपस्थित होती. मालूताई, पारायणाच्या श्रमाची जाणीवसुद्धा राहिली नाही. तो अमृतलेश आजन्म मनात साठवून ठेवण्यासाठीच दिलेला आहे आणि साठवलेलाही आहे. ह्या ओळी लिहितानाही मी तो आनंद प्रत्यक्ष अनुभवते आहे. देव सांगत आहेत,

“अर्जुना, त्या देहाची अशी भयानक गति आहे आणि आत्मा म्हणशील तर कसा वर्णावा?

अरे, तो नित्य सिद्ध आणि सहज आहे,
आपल्या अनादिपणामुळे.
अरे, तो सकळ नव्हे, निष्कळ नव्हे,
क्रियाशील नव्हे, अप्रिय नव्हे,
कृश नव्हे की स्थूल नव्हे,
आपल्या निर्गुणपणामुळे.
अरे, तो आभास नव्हे, निराभास नव्हे,
प्रकाश नव्हे की अप्रकाश नव्हे,

अनुक्रमणिका

अल्प नव्हे किंवा बहु नव्हे,
आपल्या अरूपपणे.
अरे, तो रिता नव्हे की भरलेला नव्हे,
रहित नव्हे की सहित नव्हे,
मूर्त नव्हे की अमूर्त नव्हे,
आपल्या शून्यपणाने.
अरे, तो आनंद नव्हे की निरानंदु नव्हे,
एक नव्हे की विविध नव्हे,
मोकळा नव्हे की बद्ध नव्हे,
आपल्या आत्मपणामुळे.
अरे, तो इथला नव्हे की तिथला नव्हे,
आयता नव्हे की रचलेला नव्हे,
बोलका नव्हे की मुका नव्हे,
आपल्या अलक्ष्यपणामुळे.
अरे, तो मोजला जात नाही, चर्चेत सापडत नाही,
वाढत नाही किंवा कमी होत नाही,
विटत नाही की संपत नाही,
आपल्या अव्ययपणामुळे.

अर्जुना, असा तो अनादि, निर्गुण, अरूप, शून्य, आत्मरूप, अलक्ष्य व अव्यय आत्मा सृष्टि झाली म्हणून निर्माण होत नाही किंवा सृष्टिचा संहार झाला म्हणून नष्ट होत नाही. आहे आणि नाही या दोन्ही अवस्थांचा त्याच्या ठिकाणी अभाव आहे.

प्रियोत्तमा, एवढ्यासाठी देहामध्ये आत्मा आहे असे जे म्हटले जाते ते आकाश घराच्या आकाराचे झाल्याने मठाकाश म्हणावे तसे आहे. त्याच्या अखंड अस्तित्वावर देहाकृती होतात, जातात. तो त्या आकृति घेतही नाही आणि टाकतही नाही. जशाचा तसाच राहतो. आकाशात दिवस आणि रात्र येतात-जातात त्याप्रमाणे आत्मसत्तेवर देह येतात आणि जातात.

आणि म्हणून या शरिरातही तो काही करीत नाही, करवीत नाही. सहज घडणाऱ्या व्यापाराला, “मी केला” असे म्हणतही नाही आणि म्हणून स्वरूपाने उणा वा पुरा हे काहीही घडत नाही. देहात असूनही, तो देहात सापडत नाही हे अर्जुना, कधीही विसरू नकोस.

विचार केला तर आकाश नाही अशी जागा कुठे आहे? ते प्रवेश करीत नाही अशी जागा कोणती आहे? ते सगळीकडे प्रवेश करून आत शिरते, सगळ्या जागा व्यापून रहाते पण कशानेही लिप्त होत नाही, मळत नाही. सर्वच्यासर्व देहात आत्मा असतो पण कुठल्याही शरिराच्या संगाने त्याचे रूप मळत नाही. तो आहे तसाच शुद्धस्वरूप रहातो. विकाराने तो विटाळत नाही.

अनुक्रमणिका

अर्जुना, तुला वारंवार सांगतो की, मी जे तुला देहादि संघात क्षेत्र या नावाने सांगितले त्या क्षेत्रात असून त्या क्षेत्रामुळे लिप्त न होणारा जो क्षेत्रज्ञ तेच आत्म्याचे खरे लक्षण आहे. लोहचुंबकाच्या संसर्गाने लोखंड हालचाल करते पण लोहचुंबक लोखंड होत नाही तसा ह्या क्षेत्रक्षेत्रज्ञ यांचा संबंध आहे.

दिव्याची ज्योत घराचा व्यवहार चालविते पण घर आणि ज्योत यांचा तसा संबंध नसतो. लाकडाच्या पोटात अग्नि म्हणजे काष्ठ नव्हे याच दृष्टिने देह आणि आत्मा यांच्याकडे पहावे. आकाश आणि ढग, सूर्य आणि मृगजळ यातला फरक जसा तुझ्या बुद्धिला तात्काळ पटतो तसाच ह्या दोन्हीतील फरक तुझ्या दृष्टिला दिसू दे.

पार्था, तू आता निःशंक झालास काय रे? एकटा सूर्यच सर्व जगाला प्रकाशित करतो त्याप्रमाणे हा क्षेत्रज्ञ या क्षेत्राच्या आभासाचा प्रकाशक आहे हे तुझ्या ध्यानी आले काय? अरे, तुला शब्दाशब्दाचा अर्थ कळतो. तुला आणखी किती उघड करून सांगू की क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ यांचा संबंध अशाप्रकारचा आहे? त्यांच्यामधील फरक तुझ्या चित्तात पूर्ण ठसावा असा ह्या सविस्तर विवेचनाच हेतू आहे हे तुला कळले काय?

या दोन्हीमधील अंतर कळावे म्हणून चतुर पुरुष ज्ञानीपुरुषांच्या घराच्या दाराची आराधना करतात. सुमति अर्जुना, या ज्ञानाच्या आशेने चांगले लोक शांतिरूपी संपत्ती मिळवतात. शास्त्ररूपी दुभत्या गाई घरी पाळतात, त्यांची सेवा करतात. क्षेत्रक्षेत्रज्ञातील फरक कळावा म्हणूनच योगासारख्या आकाशमार्गाने जाण्याची धिटाई योगीपुरुष करतात आणि भक्त शरीर कस्पटासारखे मानून याच ज्ञानाच्या आशेने संतांचे जोडे उचलतात. या सगळ्या प्रयत्नानंतर इतक्या सायासानंतर ते ज्ञान त्यांना मिळते आणि ते निश्चिंत होतात.

अर्जुना, क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ यातील अंतर जे खरोखर जाणतात त्यांच्या ज्ञानाला आम्ही आमच्या ज्ञानाची ओवाळणी करतो.

पोपट नळीवर बसतो. नळीला आपले पाय बांधले आहेत अशा भ्रमाने जागच्याजागीच भ्रमत राहतो. नळीने आपल्याला धरलेले नाही हे ज्या क्षणी त्या पोपटाला कळते त्या क्षणीच तो पंख पसरून अनंतात झेप घेतो. तसे हे ज्ञानीपुरुष जाणून घेतात की महाभूतादिकांनी भेदलेली प्रकृति खोटीच आहे. तिने आपल्याला बांधलेले नाही, आपण बद्ध नाही, मुक्तच आहो.

आजपर्यंत आपण ज्याला सर्प मानत होतो, तो सर्प नव्हे मण्यांची माळ आहे हे कळले की, सर्पाची भीती नाहीशी होऊन माळेचे ज्ञान होते तशी त्याची प्रपंचभीती नाहीशी होते. शिंप, रूप्यासारखी दिसत होती पण निरखून पाहिल्यावर रूपे नव्हे, शिंप आहे असे ज्ञान होते त्याप्रमाणे त्या ज्ञानीपुरुषास यथार्थ ज्ञान होते. ते आत्म्याहून प्रकृति वेगळी आहे हे जाणून तिला ब्रह्माहून वेगळी पहातात आणि ब्रह्मरूप होऊन जातात. भ्रान्ती संपते, छाया संपते, भास संपतो आणि त्या शाश्वत परमात्म्याच्या कंठी मिठी पडते.

देव म्हणाले, “काय सांगावी त्या ज्ञानीपुरुषांची योग्यता पार्था! ते मीच होतात आणखी काय सांगू? अरे, जे ब्रह्म आकाशाहून मोठे आहे, जे ब्रह्म अव्यक्ताचे पैलतीर आहे जे भेटले की वेगळेपणा उरूच देत नाही ते

ते होतात. मग आकार संपतो, जीवदशा विरते आणि त्या अद्वैतात विलीन झाल्याने द्वैत लयाला जाते. पार्था, आत्मा आणि अनात्मा यांची व्यवस्था जाणणारा तू राजहंस आहेस. तुला हे वेगळे सांगावयास नकोच की असे जे परमतत्त्व आहे त्यात ते ज्ञानीपुरुष विलीन होतात.

संजय धृतराष्ट्रास म्हणाला, "महाराज, अहो त्या आपल्या आवडत्या सख्याला श्रीकृष्णांनी आपल्या जीवाचा जीव समजून प्रकृतिपुरुष विचाराचा झाडून हिशोब दिला. एका कळशीतील पाणी दुसऱ्या कळशीत ओतावे त्याप्रमाणे देवांनी आपले ज्ञान सर्वस्व त्या पार्थाच्या ठिकाणी अर्पण करून टाकले. आता कुणी कुणाला दिले म्हणावयाचे! तो नर हा नारायण! दोघेही एकरूपच पण श्रीकृष्णांनी अर्जुनाला ज्ञान दिले असे मी आपला म्हणतो इतकेच. महाराज, आपण मला काही प्रश्न विचारला नाही तरी मी बोलतोच आहे. याची क्षमा करा पण मला रहावेना म्हणून सांगतो. देवांनी आपले सर्वस्व आज अर्जुनाच्या स्वाधीन केले. संजय पुढे म्हणाला, "पण पार्थाच्या मनाची अजूनही तृप्ती झालेली मात्र दिसत नाही. त्याची हा विषय ऐकण्याची तहान अजून वाढतेच आहे.

उदार सुगरण वाढते आहे आणि रसिक जेवणारे जेवायला बसले आहेत असा योग आला की जेवण्यास आणि वाढण्यास हात सरसावतो तसे इथे झाले आहे. अर्जुनाची ऐकण्याची वाढती उत्कंठा पाहून देवांना तसे झाले. किती सांगू आणि किती नाही असे त्यांना वाटत आहे. या व्याख्यानाला चौपट जोर आला आहे. अनुकूल वारा सुटला की मेघ जमतात, पौर्णिमेच्या चंद्रप्रकाशाने समुद्रास भरती येते आणि श्रोत्यांच्या श्रवणाच्या आदरामुळे वक्त्याच्या व्याख्यानास रसांचा पूर येतो. महाराज, अहो आता हे सगळे विश्व देव आपल्या बोधाने आनंदित करतील. आपण अगदी एकाग्र चित्ताने तो बोध श्रवण करावा स्वामी" अशी संजयाने धृतराष्ट्राची विनवणी केली.

श्री ज्ञानेश्वर म्हणतात, "अप्रांतमति व्यासांनी महाभारतात भीष्मपर्वात शांत रसाने भरलेली कथा सांगितली. तो कृष्णार्जुनांचा संवाद सुसंस्कृत शब्दात सांगून ओवीबद्ध काव्यरचना करू. केवळ शांत रसाने भरलेली ही कथा वाणीच्या मार्गाने जाईल आणि शृगांराच्याही माथ्यावर पाय ठेवील. ही नाजुक देशी, मराठी भाषा साहित्याला अलंकार चढवील. आपल्या गोडीने अमृतासही मागे सारील. शांत करण्याच्या बाबतीत माझे शब्द चांदण्याच्यावर ताण करतील. आपल्या रसातील रंगाच्या मोहकपणाने नादब्रह्माला लोपवतील. पिशाच्याच्या मनालासुद्धा सात्त्विकाचा पान्हा येईल. सज्जनांच्या मनाला तर समाधीच घडेल.

अशाप्रकारचा वाग्विलास विस्तारू. गीतार्थाने विश्व भरू. जगामध्ये आनंदाचे आवार मांडू. आत्मानात्मविवेकाचा कमीपणा नाहीसा होवो. कानामनाच्या जगण्याचे सार्थक होवो. वाटेल त्याच्या डोळ्याला ब्रह्मविद्येची खाण दिसो. परब्रह्म सर्वाच्या डोळ्यांना दिसो. सुखाचा उत्सव उदयास येवो, ब्रह्मबोधाच्या सुकाळात विश्वाचा प्रवेश होवो.

श्रेष्ठ देव निवृत्तिनाथ यांनी माझा अंगीकार केला आहे. त्यांच्या कृपाप्रसादाने मी हे सगळे निर्माण करीन. अशाच प्रकारचे बोलीन. मर्म स्पष्ट करणारे शब्द योजीन. उपमा आणि काव्य यांची रेलचेल करीन आणि गीता ग्रंथातील प्रत्येक पदाचा अर्थ स्पष्ट करीन. माझ्या श्रीमंत गुरूरायांनी मला इतक्या पूर्णविद्येने युक्त केलेच आहे.

त्यांच्या कृपाप्रसादाने मी जे बोलतो ते आपणा संतांना मान्य होते आहे. आपल्या सारख्यांच्यापुढे गीतार्थ सांगण्याचे सामर्थ्य त्या गुरूकृपेनेच मला आले आहे. मी तुम्हा संतांच्या पायाजवळ येऊन पोचलो आहे. आता काही अडचण राहिली नाही. सरस्वतीचा मुलगा मुका नाही किंवा लक्ष्मीच्या शरिरावर उत्तम सामुद्रिक लक्षणे आहेत यात आश्चर्य ते काय आहे? तुम्हा संताजवळ अज्ञानाचे नाव तरी कसे असेल? आपण ज्ञानाने परिपूर्ण अहा. आता मी नवरसांचा सहज वर्षाव करीन.

फार काय सांगावे? गुरूदेवांनी मला संधी द्यावी. मी चांगल्या रीतीने ग्रंथ सांगतो असे ज्ञानेश्वर म्हणतात.

***

॥ श्री ॥

## अध्याय चौदावा

# गुणत्रयविभागयोग

॥ ॐ नमो भगवते वासुदेवाय ॥

श्रीभगवानुवाच—

परं भूयः प्रवक्ष्यामि ज्ञानानां ज्ञानमुत्तमम् ।
यज्ज्ञात्वा मुनयः सर्वे परां सिद्धिमितो गताः ॥ १ ॥

इदं ज्ञानमुपाश्रित्य मम साधर्म्यमागताः ।
सगऽपि नोपजायन्ते प्रलयेन व्यथन्ति च ॥ २ ॥

मम योनिर्महद्ब्रह्म तस्मिन्गर्भं दधाम्यहम् ।
संभवः सर्वभूतानां ततो भवति भारत ॥ ३ ॥

सर्वयोनिषु कौन्तेय मूर्तयः संभवन्ति याः ।
तासां बह्म महद्योनिरहं बीजप्रदः पिता ॥ ४ ॥

सत्त्वं रजस्तम इति गुणाः प्रकृतिसंभवा ।
निबध्नन्ति महाबाहो देहे देहिनमव्ययम् ॥ ५ ॥

तत्र सत्त्वं निर्मलत्वात्प्रकाशकमनामयम् ।
सुखसङ्गेन बघ्नाति ज्ञानसङ्गेन चानघ ॥ ६ ॥

रजो रागात्मकं विद्धि तृष्णासङ्गसमद्भवम ।
तन्निबदनाति कौन्तेय कर्मसंङ्गेन देहिनम् ॥ ७ ॥

तमस्त्वज्ञानजं विद्धि मोहनं सर्वदेहिनाम् ।
प्रमादालस्यनिद्राभिस्तन्निबघ्नाति भारत ॥ ८ ॥

अनुक्रमणिका

सत्त्वं सुखे संजयति रजः कर्मणि भारत ।
ज्ञानमावृत्य तु तमः प्रमादे सञ्जयत्युत ॥ ९ ॥

रजस्तमश्चाभिभूय सत्त्वं भवति भारत ।
रजः सत्त्वं तमश्चैव तमः सत्त्वं रजस्तथा ॥ १० ॥

सर्वद्वारेषु देहे ऽ स्मिन्प्रकाश उपजायते ।
ज्ञानं यदा तदा विद्याद्विवृद्धं सत्त्वमित्युत ॥ ११ ॥

लोभः प्रवृत्तिरारम्भः कर्मणामशमः स्पृहा ।
रजस्येतानि जायन्ते विवृद्धे भरतर्षभ ॥ १२ ॥
अप्रकाशो ऽ प्रवृत्तिश्च प्रमादो मोह एव च ।
तमस्येतानि जायन्ते विवृद्धे कुरुनन्दन ॥ १३ ॥

यदा सत्त्वे प्रवृद्धे तु प्रलयं याति देहभृत् ।
तदोत्तमविदां लोकानमलान्प्रतिपद्यते ॥ १४ ॥

रजसि प्रलयं गत्वा कर्मसाङ्गिषु जायते ।
तथा प्रलीनस्तमसि मृढयोनिषु जायते ॥ १५ ॥

कर्मणः सुकृतस्या ऽऽ हुः सात्त्विकं निर्मलं फलम् ।
रजसस्तु फलं दुःखमज्ञानं तमसः फलम् ॥ १६ ॥

सत्त्वात्संजायते ज्ञानं रजसो लोभ एव च ।
प्रमादमोहौ तमसो भवतो ऽ ज्ञानमेव च ॥ १७ ॥

ऊर्ध्वं गच्छन्ति सत्त्वस्था मध्ये तिष्ठन्ति राजसाः ।
जघन्यगुणवृत्तिस्था अधो गच्छन्ति तामसाः ॥ १८ ॥

नान्यं गुणेभ्यः कर्तारं यदा द्रष्टा ऽ नपश्यति ।
गुणेभ्यश्च परं वेंत्ति मद्भावं सो ऽ धिगच्छति ॥ १९ ॥

गुणानेतानतीत्य त्रीन्देही देहसमुद्भवान ।
जन्ममृत्युजरादुःखैर्विमुक्तो ऽ मृतमश्नुते ॥ २० ॥

अर्जुन उवाच—

अनुक्रमणिका

**कैर्लिंङ्गैस्त्रीन्गुणानेतानतीतो भवति प्रभो ।**
**किमाचारः कथं चैतांस्त्रीन्गुणानतिवर्तते ॥ २१ ॥**

श्रीभगवानुवाच—

**प्रकाशं च प्रवृत्तिं च मोहमेव च पांडव ।**
**न द्वेष्टि संप्रवृत्तानि न निवृत्तानि काङःक्षति ॥ २२ ॥**

**उदासीनवदासीनो गुणैर्यो न विचाल्यते ।**
**गुणा वर्तन्त इत्येव यो ऽ वतिष्ठति नेङ्गते ॥ २३ ॥**

**समदुःखसुखः स्वस्थः समलोष्टाश्मकाञ्चनः ।**
**तुल्यप्रियाप्रियो धीरस्तुल्यनिन्दात्मसंस्तुतिः ॥ २४ ॥**

**मानापमानयोस्तुल्यस्तुल्यो मित्रारिपक्षयोः ।**
**सर्वारम्भपरित्यागी गुणातीतः स उच्यते ॥ २५ ॥**

**मां च यो ऽ व्यभिचारेण भक्तियोगेन सेवते ।**
**स गुणान्समतीत्यैतान्ब्रह्मभूयाय कल्पते ॥ २६ ॥**

**ब्रह्मणो हि प्रतिष्ठा ऽ हममृतस्याव्ययस्य च ।**
**शाश्वतस्य च धर्मस्य सुखस्यैकान्तिकस्य च ॥ २७ ॥**

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे “गुणत्रयविभागयोगो नाम” चतुर्दशो ऽ ध्यायः ॥ १४ ॥

श्रीकृष्णार्पणमस्तु ।

----------

अनुक्रमणिका

माउलींनी ह्या अध्यायाची सुरुवात गुरुदेवांच्या जयजयकाराने केली आहे. या अध्यायाचे नाव गुणातीत योग असेही आहे. आत्मा स्वभावतः गुणातीत आहे पण प्रकृतिच्या संगामुळे त्या आत्म्यालाच सुखदुःखाचा भोग घडतो असा आभास होतो असे म्हटले आहे. वास्तविक आत्म्याच्या मूळ स्थितीस कशानेही बाधा येत नाही. तेराव्या अध्यायात हा विषय मांडल्यावर असे हे गुण किती, त्यांचे बंधन कशा प्रकारचे आणि गुणातीत झालेला पुरुष कसा ओळखावा ह्या विषयाचे येथे विवेचन केले आहे. "ह्या गुणातून सुटण्याचा उपाय म्हणजे माझी अव्यभिचारी भक्ति" असे सांगून देवानी हा अध्याय संपवला आहे.

या चिंतनात आपण वरचेवर असा पडताळा घेतो आहो की, "माउलींच्या सांगण्याच्या आणि माझ्या व्यक्तिगत जीवनाचा मेळ कुठे नी कसा घालावा." स्वतःच्याच गुणदोषांची स्वतः छाननी करावयाची आणि गुणदोष ताटस्थ्याने पहायचे हे आपण मानले तरी सत्त्वगुण हा भगवंताच्या जवळ नेणारा गुण आहे आणि कुठल्यातरी गुणाच्या रंगणात उतरावेच लागले तर फक्त ह्या गुणाच्या रंगणात उतरावे एवढी काळजी साधकाने घेणे जरूर आहे असे वाटते. तेव्हा गुणातीत योग ह्या अध्यायाचे चिंतन काळजीपूर्वक करणे आवश्यक आहे.

विचार केला की, आपल्याला कळतेच आहे की, आपली वृत्ति एका तासातसुद्धा अनेक गुणांचा आविष्कार करते आहे. सत्त्वगुणाचा उदय होतो न होतो तोच थोड्या वेळात रजोगुणाचा वादळवारा सुटतो आणि थोड्याच वेळात तमोगुणाचा अंधार पडतो. अमुक वृत्ति अमक्या वेळी उठावी हे आपल्या हाती कधी रहात नाही. किंबहुना अवतीभवतीची परिस्थिती एका विशिष्ट गुणास पोषक असताना, त्या गुणाच्याविरुद्धच दुसरा गुण उठतो, कसाबसा टिकवलेला संयमाचा बांध कुठल्या कुठेच वाहून जातो. तेव्हा सात्त्विक वृत्तीचा परिपोष होईल असा जीवनक्रम आखणे आणि गुणातीत करणाऱ्या अव्याभिचारी भक्तिने क्षण आणि क्षण भरून टाकणे एवढेच आपल्या हाती रहाते.

गुरुदेवांनी म्हटले आहे की, "मी देवाची भक्ति करीन, परमार्थ करीन" असेसुद्धा आपण आपल्या सामर्थ्याच्या जोरावर म्हणू शकत नाही. "माझा परमार्थ संभाळ" अशी त्या भगवंताचीच करूणा भाकावी लागते.

माउली म्हणतात, "सर्व देवांमध्ये श्रेष्ठ, बुद्धिरूपी प्रातःकाळ करणारे सूर्य आणि सुखाचा उदय करणारे आपण श्रीगुरूराज अहा. आपला जयजयकार असो.

आपण सर्व जगाचे विश्रांतस्थान अहा. सोहंभावाने आपण सुशोभित झालेले अहा."

गुरूदेव रानड्यांनी भाऊसाहेब महाराजांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे, "आपणांस भाऊसाहेबमहाराज या नावाने हाक मारण्यापेक्षा "आत्मदेव" म्हणून हाक मारणेच जास्त चांगले होणार आहे. कारण आपले देवाशी तादात्म झाले असल्याने देहउपाधि, नामउपाधि व रूपउपाधि ही सर्व लयासच गेली आहे. आपण केवळ देवरूपच जाहला असल्याने आपणास "आत्मदेव" म्हणूनच हाक मारण्यास काय हरकत आहे?"

गुरुदेवांच्या ह्या गुरुभक्तिपर उद्‌गाराप्रमाणे माउलीही गुरूंचे वर्णन करीत आहेत. त्यांनी म्हटले आहे, "आपण तर केवळ समुद्र अहा आणि ब्रह्मलोक इत्यादि ह्या आपल्यावर सहज उठलेल्या लाटा आहेत. ऐकावे

महाराज, आर्त, पीडित यांचे आपण केवळ बंधूच अहा. करूणेने निरंतर भरलेले असे समुद्र अहा. अध्यात्मविद्या हीच एक शुद्ध विद्या आहे. त्या वधूचे आपण स्वामी अहा. महाराज आपले ज्याला दर्शन झाले नाही, त्यालाच विश्वाकार भासमान होतो. आपले रूप आपण लपविले असल्याने जग दिसते. आपण प्रकट झाला की, केवळ आपणच दिसता, जग दिसतच नाही. समारेच्या माणसाची नजरबंदी करणे हे गारुडीहि करू शकतो पण महाराज आपले विलक्षण सामर्थ्य असे की, आपण स्वतःही आपल्याला दिसत नाही. जगाला आपले रूप आपण प्रकट करीत नाहीच पण स्वतः आपल्यालाही आपल्या रूपाचे भान ठेवीत नाही. आपण केवळ ज्ञानरूप आंहात. ज्ञाता हे वेगळेपण आपण शिल्लक ठेवलेले नाही. आपले लाघव तर असे की, सर्व जगात एक आपणच भरलेले अहा पण आपले ज्ञान कुणाला होते तर कोणाच्या वाट्यास नुसती मायाच येते. एकच वस्तु पण दोघांना वेगवेगळी दिसतेच ना? एकास वाटतो सर्प तर दुसऱ्यास वाटतो रत्नहार! हा दोष वस्तूचा नव्हे, पहाणाऱ्याच्या दृष्टिचा आहे. त्याप्रमाणे कितीकास आपले पूर्ण अज्ञानच आहे. पण माझ्यापुढे मात्र निवृत्तिनाथांच्या रूपात आपण आपले रूप प्रकट केले आहे तेव्हा मी स्वतःस धन्य मानून आपल्याला नमस्कार करतो.

महाराज, मला हे कळून चुकले आहे की, आपणच परब्रह्म अहा. आपल्यामुळे जगात पाण्याला ओलावा आहे. आपणच त्याला आपली आर्द्रता दिली आहे. आपल्या अंगची सहज क्षमा आपण पृथ्वीस दिली आहे. म्हणून ती सहनशील झाली आहे. मुळात चंद्र, सूर्य हे सगळे शिंपले आपल्या प्रकाशात तळपतात म्हणून तेजोमय झाले आहेत. वायू भुवनत्रयात फिरतो तो त्याला आपण तसे सामर्थ्य दिले म्हणूनच! आणि आकाश तर काय आपल्या स्वरूपात लपंडाव खेळत असते.

महाराज, ज्ञानाचे आपण प्रकाशक अहा. ह्यात काही नवल नाही पण अमर्याद मायाज्ञानाचे प्रकाशकही आपणच अहा हे केवढे आश्चर्य आहे! श्रुतींनादेखील आपले वर्णन करता येत नाही मग मी कसे काय वर्णन करणार?

गुरुदेवा, तुमच्या चांगुलपणाची स्तुती करत वेद स्वतःही प्रतिष्ठेला पोचतात. पण हे तुमच्या स्वरूपाच्या हद्दीवर पोचेपर्यंत. एकदा का ते त्या काठावर पोचले की आमच्याबरोबर त्यानांही मूग गिळून निमूट बसावे लागते.

प्रलयकाळच्या महासमुद्रात एक थेंबही वेगळा पाहूया असे म्हटले तरी तो वेगळा दिसत नाही तर त्या महापुरात सामावून गेलेल्या नद्या कोठून दिसणार? सूर्योदय झाल्याबरोबर आतापर्यंत प्रकाशमान दिसणारा चंद्र जसा काजव्यासारखा दिसू लागतो तशी आमची व वेदांची तुझे वर्णन करण्याबाबत अवस्था होते. महाराज, आपल्या दर्शनाने द्वैत नाहीसे होते, परावाणीसह वैखरी नाहीशी होते. आता तुझी स्तुती तरी कोणत्या वाणीने करावी? तेव्हा आता आपली स्तुती करावी ही आशा सोडून देतो, निवांत होतो आणि आपल्या पायावर माथा ठेवतो. हेच करणे भले. माझी मागणी आता ऐकावी महाराज.

महाराज, अहो आपल्यासारखा दाता कुठे मिळणार मला? माझ्यावर आता आपण कृपा करा आणि माझा हा ग्रंथरूप उद्योग सफल होण्यास माझे सावकार आपण व्हा. आपले भांडार भरलेले आहे, मी दीन याचक आहे. पण केवळ भिक्षेवर जगावे असे म्हणत नाही. आपण मला भांडवल द्या. त्या भांडवलाच्या जोरावर

मी उद्योगधंदा करीन आणि संपन्न होईन. आपण माझी बुद्धिरूपी पोतडी भरा मग ज्ञानाने भरलेल्या काव्याचा मला लाभ होईल. मी त्यामुळे सावरेन आणि विचारांची चांगली कर्णभूषणे संतांना लेववीन.

महाराज, आपले कृपांजन माझ्या डोळ्यात घाला. म्हणजे गीतेमधील उत्तम उत्तम अर्थाचे गुप्त ठेवे माझ्या डोळ्यांपुढे प्रकट होतील. महाराज, आपले करुणाबिंब अशा प्रकाशमयतेने उदयास येऊ दे की एकाच दृष्टिक्षेपात माझ्या बुद्धिच्या डोळ्यांना ही वाक्सृष्टि  दिसेल.

माझी प्रज्ञावेली नाजूक, लहानशी आहे. पण कृपाळूंचे शिरोमणी आपण वसंत होऊन या आणि ती प्रज्ञा वेगाने फुलेल, तिला काव्याची फळे लागतील असे करा.

आपण आपल्या उदार दृष्टिचा असा काही अमर्याद वर्षाव करा की ही माझी मतिगंगा प्रमेयांच्या महापुराने भरून वाहून जाऊ दे.

विश्वाच्या एकुलत्या एक आधारा, गुरूदेवा, तुमचा प्रसादचंद्रमा पूर्णत्वाने उदयास येऊ दे आणि माझ्या मनात स्फूर्तीची पौर्णिमा करू दे. आपण कृपादृष्टिने माझ्याकडे पाहिलेत की माझ्या ज्ञानसमुद्राला स्फूर्तीची भरती येईल आणि रसवृत्तिच्या लाटा त्यावर आंदोळतील.

त्यावर माझे गुरूराज अत्यंत संतोषित होऊन म्हणाले, "ज्ञानदेवा, स्तुती करण्याच्या मिषाने हे तर द्वैतच मांडले तुम्ही! आपणा दोघात असे द्वैत आहे काय? आता ते वायफळ बोलणे राहू दे. गीतेतील ज्ञानाचा सुंदर अर्थ स्पष्ट करून सांगा. ग्रंथाकडे लक्ष द्या. श्रोत्यांना श्रवणाची फार उत्कंठा लागली आहे त्यात बिघाड आणू नका. त्यांची इच्छा मोडू नका."

ज्ञानदेव हात जोडून म्हणाले, जी मी ह्या आपल्या आज्ञेचीच वाट पहात होतो. आपल्या श्रीमुखातून "ग्रंथ सांग" अशी आज्ञा होण्याचीच काय ती खोटी होती. आता ग्रंथ सांगतो. हरळीची मुळी आधीच अमर त्यात तिच्यावर अमृताचा पूर यावा तशी ह्या प्रसादाची वृष्टी मूळपदावर झाली. आता मी ती पदे विस्तारपूर्वक सांगीन. त्या विवरणात चातुर्य असेल, विस्तार असेल आणि श्रोत्यांच्या जीवाच्या आत असलेल्या संशयाची होडी बुडून जाईल इतकी निःसंदिग्धताही त्यात असेल. निरूपण इतके मधुरही असेल की ते पुन्हा पुन्हा ऐकावे असे जीवाला वेड लावील. गुरूंच्या कृपेच्या घरी मी कर्जफेडीची भिक्षा मागतो आहे. आपण मला कर्जमुक्त करा आणि माझ्या वाणीमध्ये अशी गोडी प्रकट व्हावी असा आशीर्वाद द्या. ऐकावे महाराज, मागच्या तेराव्या अध्यायात श्रीकृष्ण अर्जुनाला असे म्हणाले की, "क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांच्या संबंधात जग उत्पन्न होते. आत्मा हा निःसंग खरा पण त्रिगुणात्मक प्रकृतीच्या संगाने संसारी होतो.

आता प्रकृतीच्या तावडीत सापडल्यामुळे तो आत्मा सुखदुःख भोगतो असे म्हणावे तर मग तो गुणातीत कसा? त्या असंगाला संग कसा घडतो? क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांचा संबंध कसा? गुण किती व कसे आहेत? ते गुण कसे बांधतात? गुणातीतत्वाची लक्षणे कोणती? या सर्वांचा अर्थ सांगणे हा ह्या चौदाव्या अध्यायाचा विषय आहे. जगाचा स्वामी श्रीकृष्ण यासंबंधीचा आपला अभिप्राय स्पष्ट करून सांगत आहेत. आपण ऐकावे.

देव म्हणाले, “अर्जुना, तुला हा गुणांचा विषय पुन्हा एकदा समजावून सांगतो. अवधानाची सगळी सेना एकवटून तू ह्या ज्ञानाला झोंबावेस. आम्ही पुष्कळ प्रकारच्या युक्तिवादांनी हा विषय तुला समजावून सांगितला पण अजून अनुभवाची कुशी बाहेर आलेली दिसत नाही. म्हणून श्रुतींनी सर्वांच्यापलीकडचे म्हणून जे ज्ञान “पर” ह्या शब्दाने संबोधिले ते ज्ञान मी आता तुला पुन्हा सांगतो आहे.

पर म्हणजे परकेसुद्धा. आपण स्वर्ग आणि संसार यांच्या आवडीने मोहग्रस्त होऊन गेलेलो असतो म्हणून हे ज्ञान म्हणजे आपलेच रूप असून आपण त्याला पारखे होतो. ते आपलेच रूप आहे म्हणून त्या ज्ञानाला मी उत्तम ज्ञान असे म्हणतो. अग्निने हा हा म्हणता गवताचा नाश होतो. त्याप्रमाणे ह्या ज्ञानाची प्राप्ती झाली की इतर सगळी ज्ञाने भस्मीभूत होऊन जातात. त्यांचे प्रयोजनच उरत नाही. इतर ज्ञाने स्वर्ग व संसाराला जाणतात, यज्ञ उत्तम असे म्हणतात. त्यांच्या दृष्टीमध्ये द्वैतभाव चांगला भरलेला असतो.

आकाश वाऱ्याच्या लाटा गिळून टाकते, जागृती स्वप्न खाऊन टाकते, त्याप्रमाणे हे अध्यात्मज्ञान इतर सर्व ज्ञाने मिथ्या करून टाकते. सूर्य उगवला की चंद्र, तारा ह्या तेजांचा निरास होतो. प्रलयकालात नदी, नद, एकच होऊन एक महासमुद्र होतो. त्याप्रमाणे ह्या ज्ञानाचा उदय झाला की इतर सर्व ज्ञाने लयाला जातात आणि म्हणूनच धनंजया, मी ह्या ज्ञानाला उत्तम ज्ञान म्हणतो.

महर्षी याज्ञवल्क्यांना दोन गृहिणी होत्या. मैत्रेयी व कात्यायनी. एकदा महर्षी तपाचरणासाठी निघण्यापूर्वी दोघींना बोलावून म्हणाले, “मी माझ्या हाताने हा संसार दोघींना वाटून देतो म्हणजे तुम्हा दोघींत मतभेद होण्याचा प्रसंग येणार नाही. त्यावेळी मैत्रेयी म्हणाली, “महाराज मला ह्या संपत्तीची वाटणी नको. आपल्या आत्मज्ञानात हवी. ह्या संपत्तीची वाटणी घेऊन मी काय करू? माझा काय फायदा होणार?” आणि मग मोठ्या आनंदाने महर्षींनी तिला बोध केला. भगवंताच्या सांगण्याचा भावार्थ असा की अर्जुना, तुझी पसंती ज्ञानाच्याबाबतीत मैत्रेयीसारखी असू दे.

देव पुढे म्हणाले, “तसे म्हटले तर अनादि काळापासून आपण मुक्तच आहो पण त्याचे भान व स्मरण आपल्याला नाही. ह्या ज्ञानाच्या योगाने मोक्ष आपल्या हाती येतो. शूर पुरुष या ज्ञानाची प्रतीती घेऊन संसाराला डोके वर काढू देत नाहीत. मनाची प्रवृत्ति मनानेच मागे हटवून देहामधेच असताना देहबंधन घेत नाहीत. आपण देहाएवढेच आहो असे समजत नाहीत. स्थूल आणि सूक्ष्म या दोन्ही देहाचे दुबेळके एकाच वेळी ओलांडून टाकून वजनात माझ्याबरोबरीचे होतात. माझी योग्यता त्यांना प्राप्त होते. एवढी ह्या ज्ञानाची व्याप्ति आहे. देहाची उपाधि त्यांनी सहज टाकून दिलेली असते आणि त्यामुळे माझ्या नित्यतेने ते पुरुष परिपूर्ण होतात. मी जसा अमर्याद आनंद आणि सत्याचा समुद्र आहे तसे तेही होतात. त्यांच्यात आणि माझ्यात काही भेदच उरत नाही. घट फुटल्याबरोबर त्यांतील आकाश जसे तत्क्षणी आकाशाशी एकरूपच होऊन जाते तसे हे घडते. दिव्याच्या मूळ ज्योतीत दुसऱ्या अनेक ज्योती येऊन मिळाव्या आणि मूळच्या दिव्यात सामावून जाव्या, वेगवेगळ्या उरू नयेत तसा प्रकार इथे होतो.

याप्रमाणे अर्जुना, द्वैताची येरझार संपते. देव आणि भक्त यातील मी-तूपणा विरहित, एकाच पंक्तीला,

एकाच रूपात, आम्ही नांदतो. माझ्याशी ते ज्ञानी एकरूप झाल्याने जेव्हा पुन्हा सृष्टिची रचना सुरू होते तेव्हा ते त्या चक्रास जुंपले जात नाहीत. सृष्टिच्या सुरवातीलाच देहाचे बंधन न पडल्याने प्रलयकाळी तरी ते नाश कसे पावतील? पांडवा, ह्या ज्ञानाची कास धरून ते जन्ममृत्यूच्या पलीकडे जातात." पार्थाला या ज्ञानाची गोडी लागावी यासाठी देवानी ज्ञानाचे माहात्म्य वर्णन करून सांगितले. अर्जुनाला देव "प्रज्ञावंता" असे म्हणत आणि त्याप्रमाणे अर्जुनाला ह्या निरूपणाचे महत्त्व तात्काळ पटले. त्याच्या सर्वांगाला कान अशी एक वेगळीच अवस्था त्याला प्राप्त झाली. तो अवधानाची जणू काय मूर्तीच झाला. देवांचे निरूपण जसजसे वाढत चालले तसतसे अर्जुनाचे अवधान विस्तृत होत गेले. देव सांगतील तो सर्व अभिप्राय तो आत्मसात करीतच चालला. देवांनी ते जाणले आणि त्यांनाही निरूपण करण्यात आनंद वाटू लागला. आता तो विस्तार आकाशात मावेना. देव म्हणाले, "प्रज्ञाकांता, आमच्या वक्तृत्वरूपी कन्येस आज उत्तम वर मिळाला. बोललेले जसेच्या तसे ग्रहण करणारा समर्थ श्रोता तुझ्या स्वरूपात मिळाला. आता हा गुणांचा विषय तुला सहज समजावून देतो.

अर्जुना, मी एकच एक असून त्रिगुणाच्या विळख्यात कसा सापडतो, ते पारधी मला देहपाशात कसे अडकवतात, क्षेत्राच्या योगाने ह्या जगांना मी कसा जन्म देतो हे सांगतो ऐक.

मी तुला पूर्वी सांगितलेच आहे की माझ्या संगरूपी बीजाने प्राण्यांचे पीक या मायेमध्ये येते म्हणून देहाला क्षेत्र असे नाव दिले आहे.

माया किंवा महद्ब्रह्म ही सृष्टिरूप गर्भ ठेवण्याचे ठिकाण आहे. महत्तत्त्वादिक तत्त्वांना हे विश्रान्तिस्थान असल्यामुळे त्या मायेला महद्ब्रह्म असे नाव आहे. हे पुष्कळ विकार वाढविते म्हणूनही त्याला महद्ब्रह्म म्हटले जाते. अव्यक्तवादी लोकांच्या मताप्रमाणे त्याला अव्यक्त म्हणतात आणि सांख्यांच्या अनुभवाप्रमाणे यालाच प्रकृति असे नाव आहे. वेदांतिही तिला माया असे नाव देतात. प्राज्ञराया किती नावे दिली तरी ते "अज्ञान" आहे. अर्जुना, आपल्या मूळ स्वरूपाचा आपल्याला विसर पडतो आणि त्या विस्मरणासच अज्ञान, माया, प्रकृति, महद्ब्रह्म ही नावे आहेत. आता माया शब्दानेच तिचे रूप प्रगट होते. "नाही जी" ती माया. ज्ञानाचा अभाव हेच अज्ञान. अंधाराला जसे वेगळे अस्तित्व नाही तसे! सूर्य उगवला की मग अंधार घालविण्याची खटपट करावी लागते काय? तसेच आहे हे.

या संदर्भात परमपूज्य रामकृष्णांच्या चरित्रातील कथा हा विषय समजण्याच्या दृष्टीने फार सुंदर आहे.

प्रश्नोत्तराच्या स्वरूपात चरित्रलेखकास प्रश्न विचारला गेला, "निर्विकल्प अवस्था प्राप्त होऊन काही काळपर्यंत श्रीरामकृष्णांच्या मीपणाचा लोप झाला होता, मग पुढे काय झाले?" लेखकाने उत्तर दिले, "याप्रमाणे मीपणाच्या बोधाचा लोप झाल्यानंतर कारणस्वरूपिणी जगदंबेचे साक्षात् दर्शन रामकृष्णांना झाले. पण तेवढ्याने त्यांची तृप्ति झाली नाही. सदासर्वकाळ तसेच दर्शन व्हावे म्हणून त्याच अवस्थेत रहाण्याचा ते प्रयत्न करू लागले. हा प्रयत्न चालू असता केव्हा केव्हा मीपणाचा लोपच होऊन शरीरावर मृताची लक्षणे दिसून येत पण आत जगदंबेचे पूर्ण दर्शन होत असे. केव्हा केव्हा मीपणाचा अल्पांश मात्र शिल्लक राहून शरिरावर जिवंतपणाची थोडीफार लक्षणे दिसून येत. आत त्यांच्या शुद्ध सत्त्वगुण मनाच्या पडद्यातून श्रीजगदंबेचे किंचित बाधायुक्त दर्शन होत असे. अशारीतीने कधी मीपणाचा पूर्ण लोप व मनाच्या सर्व वृत्तींचा पूर्ण लय होऊन

जगदंबेचे पूर्ण दर्शन व्हावे, तर कधी मीपणाचा थोडासा अंश उरून, थोड्याशा चित्तवृत्ति उरून श्रीजगदंबेचे ओझरते दर्शन व्हावे असे होत असे. अशारीतीने कधी मीपणाचा पूर्ण लोप व किंचित लोप असा प्रकार एकसारखा काही महिने सुरू होता.

त्यानंतर श्रीजगदंबेने म्हणा, श्रीभगवानांनी म्हणा किंवा विराट चैतन्याने म्हणा "अरे भावमुखी रहा" असा आदेश दिला.

या अवस्थेस पोचल्यावर मी अमक्याचा मुलगा, तमक्याचा पिता, मी ब्राह्मण इत्यादी सर्व गोष्टी मनातून अगदी धुवूनपुसून काढल्या जातात आणि मी विश्वव्यापी परमात्मा आहे या गोष्टीचा बोध सर्वकाळ जागृत राहतो. त्यानुसार ठाकुरांचा एकत्वाचा अनुभव इतका दृढ झालो की, या ब्रह्मांडातील सर्व व्यवहार आपणच करीत आहो असा त्यांना प्रत्यक्ष अनुभव येऊ लागला.

एका पावसाळ्यात कालीमंदिराच्या आवारातील एका बाजूला सुंदर हिरवेगार गवत उगवले होते. एक दिवस त्या सुंदर जागेकडे पहात असता श्रीरामकृष्ण इतके तन्मय होऊन गेले की ती जागा आपल्या शरीराचाच एक भाग आहे असे त्यांना वाटू लागले. इतक्यात एक मनुष्य त्या जागेतील गवतावरून चालत पलीकडे गेला. श्रीरामकृष्ण सांगत "आपल्या छातीवरून कोणी चालत गेल्यास जशा वेदना होतील तशा वेदना मला त्यावेळी झाल्या. छाती काही वेळ लाल होऊन गेली!

"एकदा गंगा किनाऱ्यावर नावाड्यांचे भांडण झाले आणि ते एकमेकांना काठ्या मारू लागले. मंदिरातून हे दृश्य पहाणाऱ्या श्रीरामकृष्णांना भावावेश होऊन ते मोठ्याने ओरडू लागले. हृदय धावत येऊन पहातो तो काठ्यांचे वळ ठाकुरांच्या पाठीवर उठले होते! अशी ही एकात्मका! ज्ञान पूर्ण झाले की द्वैत नाहीसे होऊन केवळ विश्वात्मकता कशी उरते त्याचे हे उदाहरण आहे. ठाकुरांना विश्वचैतन्य आणि प्रकृति यांचे हे असे अनुभव येत.

यावरून एकच अवस्था टिकत नाही व समाधीतूनही काही काल मन खाली उतरते व प्रकृतिच्या अंमलाखाली येते हे आपल्याला कळते.

देव पुढे म्हणाले, "अर्जुना, ह्या अज्ञानाचा आणखी एक विशेष असा की, वात लावल्यावर अंधार उरत नाही तसे हे अज्ञान विचाराच्यावेळी उरत नाही. अज्ञानाचे रूप जितके सांगता येईल तितके सांगतो.

अर्जुना, जागृति व स्वप्न ह्या दोन अवस्था तुझ्या परिचयाच्या आहेत. आता जागृति पण नाही, स्वप्नही नाही आणि स्वरूपाचे ज्ञानही नाही अशी गाढ सुषुप्ति असते त्यासारख्या अवस्थेला अज्ञान म्हणावयाचे.

वारा नाही, मेघ नाही असे वांझ रिकामे आकाश असावे त्यांच्यासारखे खरोखर अज्ञान आहे. यथार्थ स्वरूपाचे भान नाही व देहादिकांचेही भान नाही अशी जी स्फुरणरहित अवस्था त्या अवस्थेस अज्ञान म्हणावयाचे. पलीकडे खांब उभा आहे की पुरुष आहे हे कळत नाही किंवा भास कसला होतो तेही समजत

अनुक्रमणिका

नाही. धड रात्र नाही किंवा दिवसही नाही अशा संधिकाळास सांजवेळ म्हणावे त्याप्रमाणे ज्या अवस्थेत विपरीत ज्ञान नसते अथवा स्वरूपज्ञान नसते, केवळ न कळणे असते अशा अवस्थेस अज्ञान असे म्हणतात. यालाच क्षेत्र म्हणावयाचे. ह्या अज्ञानाने गुंडाळलेला जो चित्प्रकाश त्याला क्षेत्रज्ञ असे नाव आहे. अज्ञानास महत्त्व आणावे, स्वरूप मात्र जाणू नये हे क्षेत्रज्ञाचे स्वरूप आहे असे समज. क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ यांचा संबंध हा असा आहे हे नीट समजावून घे. अज्ञानाशी संबंध असणे हा सामान्य चैतन्याचा-सत्तेचा सहज स्वभाव आहे. आपण आपल्या अज्ञानाप्रमाणे ब्रह्मवस्तू पहातो, भेदरूपाने पहातो पण ते नानात्व कोणत्या एका ब्रह्मवस्तूचे आभासात्मक अनेकत्व आहे हे आपण जाणत नाही.

एखादा दरिद्री भ्रमाने, "जा रे मी राजा आलो आहे" असे म्हणतो किंवा एखादा मूर्च्छित मनुष्य त्या मूर्च्छावस्थेत स्वर्गलोकाला पोचतो त्याप्रमाणे आत्मरूपावरून दृष्टि घसरली की, मी भगवंत सृष्टिला जन्म देतो असे त्या पुरुषास वाटू लागते. एकटा निजलेला पुरुष स्वप्नात भ्रमाने अनेक होऊन स्वतःला पहातो तीच स्थिती आत्म्याची स्वरूपाच्या विस्मरणाने होते. आता हेच दुसऱ्या प्रकाराने समजावून सांगतो. मात्र मी सृष्टि प्रसवतो वगैरे स्वप्नाप्रमाणे मिथ्या आहे हे ध्यानात ठेव.

ही अविद्या माझी गृहिणी आहे. ती अनादि तरूणी आहे. तिचे गुण किती आहेत याची गणना करता येत नाही. हिचे रूप म्हणजे "नसणे" आकाराने वा व्याप्तीने ती अमर्याद आहे. ती स्वरूपी निजलेल्या अज्ञानी जीवांना जवळ आहे. स्वरूपात जागृत असलेल्या ज्ञानी जीवांना दूर आहे. मी झोपलो की ती जागी असते. माझ्या संगाने म्हणजे सत्तेने ती अनंत ब्रह्मांडे उदरात साठवते. गर्भिणी होते. महद्ब्रह्म आपल्यापासून आठ विकारांनी जगद्रूप गर्भाची वाढ करते. माझ्या व मायेच्या संयोगाने प्रथम बुद्धितत्त्व जन्मास येते. बुद्धितत्त्व रजोगुणाने भारले गेले की मन होते. मनाची तरूण स्त्री, ममता, अहंकार तत्त्व तयार करते आणि त्या अहंकारातून महाभूते व्यक्त होतात. विषय व इंद्रिये यांचा स्वभावतः पंचमहाभूतात अंतर्भाव होत असल्यामुळे महाभूताबरोबरच तीही जन्मास येतात. पंचमहाभूते, विषय व इंद्रिये ही तयार महाभूताबरोबरच तीही जन्मास येतात. पंचमहाभूते, विषय व इंद्रिये ही तयार झाल्याबरोबर मागील सूक्ष्म प्रकृतिपासून उत्पन्न झालेल्या आठ विकाराच्या हालचालीने त्रिगुणांचा तयार झालेला हा गर्भपिंड व्यक्त होतो. त्यावेळी वासनेत सूक्ष्मरूपाने राहिलेला जीव जसा असावयास पाहिजे तसा त्या गर्भपिंडात प्रवेश करतो. बीजाच्या कणाला पाण्याचा आधार भेटल्याबरोबर जसा वृक्षाचा आकार सूक्ष्मरूपात तयार होऊ लागतो, त्याप्रमाणे माझ्या संगाने अनेक जगरूपी अणकुचीदार कोंभ घेऊ लागते.

सुजनांच्या राजा अर्जुना, त्या गर्भगोलाचा आकार कसा व्यक्त होऊ लागतो ते ऐक. मणिज, स्वेदज, उद्भिज, जारज हे अवयव स्वभावतः उमटतात. मणिज हा अवयव आकाश व वायू यांच्या योगाने गर्भरस वाढल्याने जीवन पावतो. तम आणि रज हे दोन गुण पोटात घालून आप आणि तेज यांचे आधिक्य झाले की, स्वेदज अवयव उत्पन्न होतो. आप, पृथ्वी यांच्या अधिक्याने आणि केवळ नीच अशा तमोगुणाने स्थावर स्वरूपाचा उद्भिज निर्माण होतो. पंचमहाभूते सहकार्य करतात, मन, बुद्धि ही साधने तरतरीत होतात आणि मनुष्यादि जारजयोनी उत्पन्न होते. आता हे चार त्या ब्रह्मांड बाळाचे हातपाय आहेत. स्थूल महाप्रकृति हे त्याचे शिर आहे. प्रवृत्ति हे पुढे आलेले पोट आहे. निवृत्ति ही सरळ पाठ आहे. अष्ट देवयोनी ही कमरेच्या वरची आठ आंगे आहेत. आनंदभरित स्वर्ग हा या बाळाचा कंठ आहे. मृत्यूलोक हा खालचा आणि मधला भाग आहे. पाताळ ह्या त्याच्या

कमरेचा पृष्ठभाग आहे. ही प्रकृति असे हे एक बाळ प्रसवली. त्याला तीन्ही लोकांचे बाळसे आले. चौऱ्यांशी लक्ष योनी ह्या त्या बालकाच्या कांड्यांचे पेराचे सांधे आहेत, हे बाळ रोज वाढते. माया त्याच्या अवयवावर नित्य नव्या नावाचे अलंकार घालते. मोहरूपी दूध पाजून ती त्याला नित्य नवेपणाने वाढविते. वेगवेगळ्या सृष्टि ह्या बाळाच्या हातात घातलेल्या आंगठ्या आहेत. निरनिराळे अभिमान हे त्या आंगठ्यांचे रूप आहे. स्थावर जंगमरूपी एकुलते बाळ ती माया प्रसवली आणि त्या बाळाकारणे स्वतःही थोर झाली. विचारहीन अवस्थेत हे बाळ सुंदर वाटते. ब्रह्मा त्या बाळाचा प्रातःकाळ आहे, विष्णू माध्यान्ह आहे व सदाशिव सायंकाळ आहे. हे बाळ खेळून खेळून दमते आणि महाप्रलयाच्या शेजेवर झोपते. कल्पाच्या आरंभी त्याला पुन्हा भेदज्ञान होते आणि ते पुन्हा जागे होऊन त्याच्या खेळास आरंभ करते. अर्जुना, मिथ्यादृष्टिच्या घरात युगायुगांची पाउले ते बाळ कौतुकाने टाकत जाते.

संकल्प हा त्या बाळाचा आवडता मित्र आहे. अहंकार हा खेळगडी आहे आणि त्या बाळाचा शेवट ज्ञानाने होत असतो.

जास्त काय बोलावे? अशा विश्वाला मायेने जन्म दिला आहे. त्या कामात तिला माझ्या सत्तेचा आधार मिळतो. या दृष्टिने पाहिले तर ह्या विश्वाचा मी पिता आणि माया माता आहे. हा जगाचा पसारा आमचे अपत्य आहे.

आता जगातली ही वेगवेगळी शरीरे पाहून अर्जुना, तुला त्या प्राण्यांच्यामध्ये भिन्नता, भेद वाटेल पण तसा वाटू देऊ नको. मन, बुद्धि, अहंकार व पंचमहाभूते ही आठ तत्त्वे ह्या सर्व शरीरात एकच आहेत. अनेक अवयव असले तरी ते जसे एकाच देहाचे असतात त्याप्रमाणे हे विचित्र विश्व नानाविध प्रकारचे आहे असे वरवर पहाता दिसले तरी मुळात एकच आहे. वरच्या आणि खालच्या फांद्या ह्या वेगवेगळ्या दिसल्या तरी त्या एकाच वृक्षाच्या असतात, एकाच बीजापासून झालेल्या असतात. घट हा जसा मातीचा पुत्र, वस्त्र जसे कापसाचा नातू किंवा लाटाच्या माळा ही जशी समुद्राची संतती आहे तसा आमचा आणि ह्या चराचराचा संबंध आहे. अग्नि आणि ज्वाळा हे दोन्ही जसे अग्निच तसेच हे सगळे जग मी आहे. माझा आणि जगाचा संबंध आहे हे म्हणणे मिथ्या आहे कारण जग म्हणजेच मी, हे खरे आहे.

झालेल्या जगाने जर मी झाकला गेलो असे म्हटले तर जगपणाने कोण प्रकाशते म्हणावयाचे? माणकाच्या तेजाने माणिक लोपले जाते काय? त्या माणकाचे तेज म्हणजेच माणिक नव्हे काय? सोन्याने अलंकाराचे रूप घेतले म्हणून काय सोने नाहीसे झाले काय? कमळ उमलले म्हणजे त्याचे कमलत्व नाहीसे झाले काय? अवयवी त्या अवयवाकडून झाकला जातो की हेच त्या अवयवांचे रूप आहे? जोंधळ्याचा दाणा पेरला की कणीस येते. आता ते कणीस दाण्याने भरून जाते मग पहिला दाणा नष्ट झाला म्हणावे की पुष्कळ पटीने तो दाणा वाढला म्हणावे?

म्हणून जग पलीकडे सारून म्हणजे जगाचा निरास करून मला पहावयाचे असा मी नव्हे. हे सगळे जग सरसकट मीच आहे. अर्जुना, जगत् आणि मी एकच आहो हा मी सांगितलेला बोध तू जीवाच्या गाठीस बांधून ठेव, तोच खरा जिव्हाळा आहे.

अनुक्रमणिका

आता तुला वाटेल की, जर असे असेल तर प्रत्येक शरीर, त्याचे कर्म, त्याचे भाव वेगवेगळे कसे दिसतात? गाय गवत खाते, दूध देते, स्वभावानेही शांत आहे. सिंह गायीस खातो, सिंहीण दूध देते पण फक्त आपल्या पिलांनाच. सिंह स्वभावाने क्रूर व आक्रमणशील आहे. नुसते मनुष्यस्वभाव मानवी कर्म पाहिले तरी ते नानाविध रंगी दिसते. मग मूलतः हे सगळे एकच हे कसे पटवून घ्यावयाचे?

तर त्या शंकेचे उत्तर असे की, शरीर गुणांनी युक्त आहे. त्या शरीराशी माझा संग झाल्यामुळे मी त्या गुणांनी बांधला गेलो असे पहाणाऱ्यास वाटते. कपिध्वजा अर्जुना, स्वप्नामध्ये आपले मरण आपण कल्पनेने पहावे आणि त्या मरणाचे दुःख आपणच भोगावे तसे हे घडते. मरणही खोटे आणि दुःखही खोटे.

आपल्याला कावीळ झाली की, पांढरी वस्तू पिवळी दिसते आणि आपल्याला कावीळ झाल्याचे समजते. कावीळ झाल्याचे ज्ञानही डोळ्यांनीच होते. सूर्य प्रकाशमान झाला की अभ्र दिसते. अभ्राने सूर्य झाकून टाकला की हेही त्याच सूर्याच्या प्रकाशाने दिसते. आपल्या छायेला आपण भ्यायलो तर ते कुणाला पाहून भ्यायलो म्हणायचे? हे अनेक देह दाखवून मी अनेक झाल्यासारखा होतो आणि अनेक शरिरात अनेक गुणांनी बांधला गेलो असा बंधही दाखवितो.

बंध मला का बांधू शकत नाही हे कळले का अर्जुना? मला माझे यथार्थज्ञान असल्याने गुणाचा बंध मला बांधू शकत नाही. स्वरूपज्ञान न जाणल्यानेच बंध निर्माण होतो.

अर्जुन देवा, कोणत्या गुणाने व कसा मलाच मी बंधन आहे असे वाटते ते ऐका. गुण किती आहेत, त्याचे धर्म काय आहेत, त्याचे नाव व रूप काय, ते कोठे उत्पन्न होतात हे वर्म ऐका.

सत्त्व, रज, तम ही त्या तिघांची नावे आहेत. प्रकृति ही त्यांची जन्मभूमी. सत्त्व हा उत्तम, रज मध्यम आणि तम हा सहजच कनिष्ठ आहे. एकाच देहात ज्याप्रमाणे बाल्य, तारुण्य वार्धक्य ह्या तिन्ही अवस्था येतात. त्याप्रमाणे एकाच अंतःकरण वृत्तीच्या ठिकाणी त्रिगुणत्व भासते असे समज. मुळात चोख असलेल्या सोन्यात हीण मिसळत गेले की ज्याप्रमाणे वजन वाढत जाते पण किंमत पंधरासोळा रुपयापासून पाच रुपयावर घसरते किंवा आळसाने सावधपणा कमी होत होत सुषुप्ति बळकट होऊन बसते, त्याप्रमाणे शुद्ध सोहंवृत्तिने अज्ञानाचा अंगीकार केल्याबरोबर तीच वृत्ति मलिन होत होत सात्त्विक, राजसच काय पण तामसदेखील होते."

विवेकानंदांच्या आयुष्यातील एक प्रसंग ह्या देवांच्या विवेचनावर झळझळीत प्रकाश टाकतो. श्री. प्रियनाथ सिंह नावाच्या स्वामीजींच्या बाळपणीच्या मित्राशी झालेला हा संवाद आहे. सिंहजी लिहितात, "माझा मनोमन विश्वास होता की, हा माझा मित्र पुढे कोणीतरी थोर पुरुष होणार. तो जेव्हा संन्यासी झाला तेव्हा आम्ही फार हळहळलो. आम्हाला वाटले की, भावी कर्तृत्ववान पुरुष वाया गेला.

शिकागोच्या धर्मपरिषदेत व अमेरिकेतील इतर अनेक शहरी झालेल्या त्यांच्या व्याख्यानांचे वृत्त आम्ही वृत्तपत्रांतून वाचले तेव्हा मात्र वाटले की, अग्नि तो अग्निच. तो काही कापडाने झाकला जाऊ शकत नाही.

स्वामीजी पुढे कलकत्त्यास आले. चहूंकडे उत्साह संचारला. ते गंगाकाठी काशीपूर विभागातील श्री. शील यांच्या बागेतील बंगल्यात उतरले होते. आम्ही लगेच तिथे पोचलो, पण त्यांची निवांत भेट होईना.

शेवटी स्वामींनी जरा रागानेच राबता बंद केला व आपल्या बाळमित्राशी मनमोकळ्या गप्पा सुरू केल्या. बऱ्याच संवादानंतर सिंहजींनी विचारले, “भारतीयांना अगदी अंतःकरणापासून धर्माविषयी प्रेम आहे असेही तुम्ही सांगितले पण आता तर तुम्ही म्हणता की, आपण तमोगुणाने परिपूर्ण आहोत. याचबरोबर पुढे म्हणता की, ऋषींच्या सनातन धर्माचा वारसा आपल्याकडे आलेला असून आपण सगळ्या जगाचे गुरू आहोत हे कसे काय?” स्वामीजी म्हणाले, “देशोदेशींच्या लोकांसमोर मी तुम्हा भारतीयांच्या प्रमादांचा डांगोरा पिटायला हवा होता, असे तुला म्हणावयाचे आहे का? तसे मी केले नाही. उलट तुमच्या देशाचे वैशिष्ट्यपूर्ण गुण आहेत त्यांचाचा उल्लेख मी पाश्चिमात्यांच्यासमोर केला. आता तुमच्यासमोर त्यांचेही दोष स्पष्टपणे दाखविले आहेत. तुम्ही तमोगुणाने कितीही आवृत्त झालेले असला तरी अगदी थोडा का होईना पण प्राचीन ऋषींचा स्वभावधर्म आजही तुमच्यामध्ये निःसंशय वास करीत आहे. छे छे क्षणार्धसुद्धा नको इतक्या अल्पावकाशात त्या तमोगुणाचा नाश करता येईल.” सिंहजी म्हणाले, “पण स्वामीजी सगळ्यांना तुमच्यासारखे कसे होता येईल?”

विवेकानंद म्हणाले, मी मेलो की विवेकानंद संपले असे तुला वाटते काय? जगाला जर हवे असतील तर हजारो नव्हे तर लाखो विवेकानंद निर्माण होतील. खऱ्या तळमळीने अगदी अंतःकरणापासून जर तुम्ही प्रभूला शरण जाल, त्याचे नाव घेऊन जर कार्याला लागाल तर तो स्वतः तुमच्याकडून सगळे काही करून घेईल. तामसवृत्तीचेच श्रेष्ठ अशा सात्त्विक वृत्तीत रूपांतर होईल.

ते पुढे म्हणाले, “जो कोणी केवळ ईश्वर साक्षात्कार व्हावा ह्या हेतूने सतत बारा वर्षे अखंड ब्रह्मचर्यव्रताचे पालन करतो त्याला हे सामर्थ्य प्राप्त होते. तू करशील तर तुला देखील ते मिळेल.”

सिंहजी म्हणाले, “तुम्ही संन्यास घेण्यापूर्वी एक दिवस समाधीचे रहस्य मला समजावून देत होता. आता कलियुगात कोणालाही समाधी प्राप्त होणे शक्य नाही असे म्हणून मी तुमच्या बोलण्यातील तथ्याविषयी शंका प्रकट केली होती. त्यावर अतिशय आवेगाने तुम्ही म्हटले होते. “तुला समाधी पहायची आहे काय? अथवा तुला समाधी स्थितीचा अनुभव घ्यायचा आहे काय? मला स्वतःला समाधी लागत असते आणि तुलाही या स्थितीचा अनुभव मी देऊ शकतो.”

त्यावेळी हे बोलणे तिथेच राहिले. पण आता समाधी स्थितीचा अनुभव देण्याविषयी मी आग्रह केला तेव्हा ते म्हणाले, “वर्षानुवर्ष व्याख्याने देत राहिल्यामुळे व इतर अनेक परिश्रमपूर्ण कार्यात मग्न राहिल्यामुळे माझ्यातील रजोगुण जास्त प्रबळ झाला आहे. त्यामुळे माझ्या अंगची ती शक्ति जणू झाकली गेली आहे. येथील सर्व कार्य सोडून जर मी हिमालयात गेलो आणि काही काळ एकान्त सेवन करून ध्यानधारणा केली तर त्या शक्तिचा पुन्हा माझ्यामध्ये उदय होईल.

मालूताई, विवेकानंदासारख्या विभूतींच्या अंगच्या त्रिगुणांचा हा विचार आहे. तमोगुण अर्थात तिथे

शिल्लक नव्हताच पण सत्त्वगुणही जगाच्या कल्याणासाठी कार्य करीत असतानाही मलिन होऊ शकला हे आपल्यासारख्या सामान्य साधकांनी ध्यानात ठेवण्यासारखे व जागरूकतेने जपण्यासारखे आहे असे वाटत नाही का?

देव म्हणाले, "अज्ञानाचा अंगीकार करून जेव्हा वृत्ति फैलावते तेव्हा तीन प्रकारची होते आणि त्या तीन प्रकारांना गुण म्हटले जाते."

अर्जुना, क्षेत्रज्ञदशेमध्ये आत्मा थोडासा प्रवेश करतो न करतो तोच "मी देह आहे" या वृत्तीचा मुहूर्त करतो. एकदा "मी देह आहे" या वृत्तीचा प्रादुर्भाव झाला की जन्माला आल्यापासून मरेपर्यंत देहाच्या सगळ्या धर्मामध्ये तो ममत्व धरतो. मासे मारणारा धीवर माशाच्या तोंडी आमिष पडल्याबरोबर जसा गळाला हिसडा देऊन मासा ओढून वर घेतो, त्याप्रमाणे "देह मी" या आमिषास जीव भुलल्याबरोबर सत्त्वगुणपारधी सुख आणि ज्ञान हे दोन पाश ओढून घेऊन जीव बंदीवान करून टाकतो. हरण पाशात सापडले की धडपडू लागते तसा तो धडपडू लागतो. ज्ञानाने चरफडू लागतो आणि ज्ञानाचे खूर झाडतो आणि ज्ञान व सुख ह्या दोन्हींच्या नादात हातातले आत्मसुख मात्र गमावून बसतो. विद्येने व मानाने संतुष्ट होतो. आपण संतुष्ट आहो हेही पहातो आणि आणखी संतोषित होतो. अष्ट सात्विक भावांनी गर्वाला चढतो आणि म्हणू लागतो, "काय माझे भाग्य आहे पहा. माझ्यासारखा सुखी कुणी तरी आहे काय" एवढ्यानेच भागत नाही. त्याच्या अंगात विद्वत्तेचे भूत शिरते आणि हे आणखी एक बंधन तयार होते. अर्जुना, अरे आपण ज्ञानस्वरूपच आहो ही आपली भूमिका सुटली, ह्याचा त्याला खेद होत नाही. विषयज्ञानाने तो आकाशाएवढा होतो. एखादा राजा आपल्या मंचकावर राजवाड्यात झोपी जातो. त्याला स्वप्न पडते की, आपण भिकारी आहो. चार दोन दाण्याची भीक मिळाली तरी इंद्रपद मिळाल्यासारखा त्याला आनंद होतो. तसा त्या देहातीताला देहवंत झाल्याबरोबर बाह्यज्ञानाने संतोष होऊ लागतो. आपले राजेपणच जीव विसरून जातो. तसा हा देहवंत आत्मा देहवंत झाल्याबरोबर सात्त्विक गुणांच्या तावडीत सापडला की स्वरूपज्ञान विसरतो आणि संसारसंबंधी शास्त्रे, यज्ञविद्या इतकेच नव्हे तर स्वर्गज्ञान अशा ज्ञानात निष्णात होतो. चातुर्यरूपी चंद्राला माझे मन आकाशासारखे आहे असे तो म्हणतो. माझ्यासारखा दुसरा ज्ञानी जगात नाही असा त्याच्या मनाचा निश्चय होतो. नंदीबैलासारखी त्याची अवस्था होते. सत्त्वगुण त्या जीवाला सुख आणि ज्ञान यांच्या काढण्या बांधून आपल्या ताब्यात फिरवितो, आपल्याला हवी ती कसरत त्याच्याकडून करून घेऊन आपण पुष्ट होतो.

आता जीवाला रंजविण्याची कला त्या रजोगुणात आहे. म्हणूनच त्याला रज असे म्हटले जाते. रजोगुण अभिलाषेचे कधी कमी न होणारे तारुण्य आहे. ह्या गुणाने अंतःकरणात थोडासा प्रवेश केला की ते अंतःकरण कामाच्या मस्तीत येते. चिंतेच्या घोड्यावर स्वार होते. अग्निला तुपाच्या आहुती देऊन प्रज्वलित केल्यावर त्याला विजेच्या अग्निची जोड दिली की मग थोडे जास्त हे न पाहता, ओले सुके न पहाता सरसकट जे दिसेल त्याचा स्वाहाकार करीत तो अग्नि बलिष्ठ होत जात नाही का? तशी त्या रजोगुणाने व्यापलेल्या अंतःकरणाची अवस्था होते. दुःखासकट सर्व गोष्टी त्याला गोड वाटू लागतात. इंद्राचे ऐश्वर्यही कमी भासू लागते. तृष्णा वाढली की मेरू हातात आला तरी तो रजोगुणी मनुष्य बेत करतो की "हे तर साध्य झालेच पण जे असाध्य असेल ते कितीही कष्टप्रद असो पण ते मिळवायचेच. मी मिळवीनच". आज हातात आहे ते खर्च होऊन गेले की उद्या मग काय करायचे अशा तृष्णेने मोठमोठे व्यवसाय हाती घेतो. कवडीवरूनही जीवाची कुरवंडी

करतो. गवताची काडी मिळाली तरी स्वतःला कृतकृत्य समजतो. आता जिवंत असतानाची सगळी ददात मिटली असे वाटले की मेल्यावर आपण स्वर्गात जाऊ मग तिथे आपला निर्वाह कसा होणार अशा काळजीत पडतो. मग यज्ञयाग करून मरणोत्तर सुखाची सोय करून ठेवण्याच्या खटपटीस लागतो. व्रतामागून व्रते आचरतो. इष्ट व पूर्त कर्मे करतो. काम्य कर्माखेरीज इतर कर्मास हातही लावत नाही. ग्रीष्मऋतूचा शेवटचा वारा जसा क्षणभर विसावा न घेता वहात रहातो तसा तो रजोगुणी अहोरात्र धडपड करीत असतो. रजोगुणापुढे मासा कसला चंचल आहे! कामिनीचे नेत्रकटाक्ष जसे चंचल असतात तसा तो मनुष्य चंचल असतो. विजेमध्ये देखील ते चांचल्य नसेल. तिच्या गतीपेक्षाही चंचल गतीने तो स्वर्ग आणि संसार यांच्या तृष्णेमुळे क्रियेच्या धडाडत्या आगीत स्वेच्छेन, हौसेने प्रवेश करतो. देहापासून वेगळा असलेला जीवात्मा तृष्णेची बेडी पायात आणि खटाटोपाची साखळी गळ्यात अडकवून घेतो. देहधारी जो आत्मा त्याला रजोगुणाचे असे भयंकर बंधन पडते.

सत्त्वगुण आणि रजोगुण यांच्या बंधनाबद्दल सांगितलेच. आता तमोगुणाचे कौशल्य सांगतो. या तमोगुणाच्या पडद्याने व्यवहाराचेही डोळे मंद होतात. त्या तमोगुणी माणसाला व्यवहारही नीट कळेनासा होतो. हा तमोगुण मोहरूपी रात्रीचा काळा ढग आहे. त्याला फक्त अज्ञानाचा जिव्हाळा असतो. त्याच्या आधीन झालेले विश्व वाटेल ती कृत्ये करते. अविचार हाच ह्या तमोगुणाचा महामंत्र आहे. मूर्खपणाच्या मद्याने भरलेला हा पेला आहे. जीवाला पडलेले हे मोहनास्त्रच आहे. पार्था, तमोगुण अशा प्रकारे मोह, अज्ञान, अविचार व मूर्खपणा या युक्तींनी जीवाचे चारी पाय बांधून टाकतो. मीच देह ह्या भ्रमांत जगणाऱ्या जीवाला ह्या तमोगुणातून निसटणे फारच कठीण आहे. चराचरांतील कुठल्याही देहात हा माजला की तिथे दुसऱ्या वृत्तीला जागाच मिळत नाही. सर्व इंद्रियामध्ये जडपणा येतो. मनामध्ये मूर्खपणा भरतो. आणि इंद्रिये व मन दोघेही आळसाच्या दृढपणाचा आश्रय घेतात. कोणतेही काम करण्याचा त्याला आळसच असतो. तो अंगाला आळोखेपिळोखे देत रहातो आणि एका पाठोपाठ एक नुसत्या जांभया देत रहातो. अर्जुना, त्याला इतकी जागरूकता नसते की डोळे उघडे असून त्याल दिसत नाही आणि कुणी हाक मारली नसली तरी तो ओ देत असतो. एका जागेवर पडलेली मोठी धोंड जशी कुशीवर वळत नाही तसाच तो मुरकुंडी काढत नाही. पृथ्वी पाताळात जावो नाहीतर आकाश कोसळून पडो आपण उठावे असा भाव काही केल्या त्याच्या मनांतही येत नाही. आळसात लोळताना उचित अनुचित असे काही त्याला वाटत नाही. जिथल्या तिथे लोळत असावे हीच काय ती त्याला आवड असते. दोन्ही तळहात वर करून तो गाल धरतो आणि गुडघ्यात डोके घालतो. झोपेबद्दल त्याला इतकी आवड असते की झोपेपुढे त्याला स्वर्गसुखही व्यर्थ वाटते. ब्रह्मदेवाचे आयुष्य असावे आणि ते सुखाने झोपून काढावे यावाचून त्याला दुसरे व्यसन नाही. सहज वाटेने जाता जाता कलंडले की त्याला झोप लागते. अमृत आणि झोप अशा दोन गोष्टींपैकी तो अमृत टाकून झोप पसंत करतो. एखादा आंधळा रागावून आवेशाने निघावा आणि मग कुठे जाईल कुठे पडेल याचा नेम नसतो तसा हा तमोगुणी त्वेषाच्या भरात काही काम करण्यास निघालाच तर त्यास कुणाशी कसे बोलावे, काय करावे, कोणते काम साध्य आहे, कोणते असाध्य आहे याचा तोल रहात नाही. सगळा वणवा मी माझ्या पंखांनी पुसून घेईन अशी मनात हाव धरून पतंग त्या वणव्यावर तुटून पडावा तसे तो करतो. त्या अविचारी पतंगाप्रमाणेच तो तमोगुणी पुरुष आटोक्याबाहेरच्या धोक्याच्या कामाकडे वळतो. जे काम करू नये ते करण्याचीच त्याला जबर हाव असते. किंबहुना असा प्रमाद करण्याचीच स्वभावतः त्याला आवड असते. अर्जुना, ध्यानात घे. निद्रा, आळस आणि प्रमाद या तीन प्रकारांनी तमोगुण निरुपाधिक व शुद्ध अशा आत्म्यास बांधतो.

अनुक्रमणिका

अग्नि काष्ठात भरला की अग्नि काष्ठाच्या आकाराचा दिसतो. घागरीने आवरलेले आकाश घटाकाश म्हटले जाते, भरलेल्या सरोवरात चंद्रबिंब प्रतिबिंबित होते व सरोवरात पडल्यासारखे वाटते तसे आत्मतत्त्व गुणांनी बांधल्यासारखे वाटते.

आता तो आत्मा एकाच गुणात नित्य अडकलेला दिसत नाही. दोन गुणांना मागे सारून गुणच प्रामुख्याने प्रतीत होतो. कफ, वात, पित्त, हे प्रकृतीचे त्रिदोष आहेत. त्यात कफ वातास हटवून पित्तच देहाला संतप्त करते. वर्षाकाळ आणि ग्रीष्म यांना जिंकून शिशिरच आकाश व्यापून टाकते किंवा स्वप्न व जागृति यांना जिंकून सुषुप्ति येते आणि क्षणभर चित्तवृत्ति जडमूढच होऊन जाते त्याप्रमाणे रज, तम यांचा पराभव करून सत्त्वच आपले मोठेपण मिरवतो तेव्हा "मी सुखी आहे ना" असे जीवाकडून वदवितो. त्याचप्रमाणे सत्त्व, रज लोपून तमोगुणाची मूर्ती नाचते तेव्हा आत्मा सहजच प्रमादी होतो. त्याच क्रमाने व पद्धतीने सत्त्व आणि तमाला पोटात घालून जेव्हा रजोगुण उठतो तेव्हा कर्मावाचून जगात काही सुंदर वस्तूच नाही असा देहराज तो आत्मा देहात असताना मानतो. तीन गुणांची वृद्धि कशी होते याचे निरूपण तीन श्लोकांत सांगितले. आता सत्त्वादी गुणवृद्धिचे लक्षण सांगतो. ते आदरपूर्वक ऐक.

रज आणि तम यांच्यावर विजय मिळवून जेव्हा सत्त्वगुणाची देहात वृद्धि होते तेव्हा ह्या देहावरही काही चिन्हे दिसतात.

रामकृष्ण परमहंसांच्या चरित्रात असा उल्लेख आहे की त्यांना माणसाची पारख काही विलक्षण असे. आपल्याकडे येणाऱ्या प्रत्येकाच्या मनातील भाव पूर्णपणे ओळखून ते त्याच्याशी वर्तन करीत व त्याच्या स्वभावानुरूप ते त्याला आपल्या स्वतःशी वर्तन ठेवायला लावीत. केशवचंद्र सेन यांच्या अनुयायात फाटाफूट होऊ लागल्याबरोबर एक दिवस ते त्यांना म्हणाले, "केशव, तू आपल्या मंडळीत वाटेल तशी खोगीरभरती करतोस म्हणून असे होते. नीट परीक्षा केल्याशिवाय मी कोणालाही आपल्या मंडळीत घेत नाही. काचेच्या कपाटातील सर्व वस्तु ज्याप्रमाणे दिसतात त्याप्रमाणे माणसाच्या आत काय आहे, काय नाही हे सर्व आई मला दाखवून देते. माणसाच्या काठीवरून आणि छत्रीवरून त्याचा स्वभाव मला ओळखता येतो." पुढे ते म्हणाले, "पहाटे उठून तुम्हा सर्वांचे कल्याण चिंतीत असताना कोणाची किती उन्नती झाली आहे, कोणाची का होत नाही या सर्व गोष्टी आई मला समजावून देते."

ते पुढे म्हणाले, "शारीरिक लक्षणावरून स्वभाव कळतो. पद्‌मपत्रासारखे ज्याचे डोळे आहेत त्याची वृत्ति सात्त्विक असते. बैलासारखे ज्याचे डोळे आहेत त्याच्यात काम प्रबळ असतो. योग्याचे डोळे ऊर्ध्वदृष्टिसंपन्न व आरक्त असतात. देवचक्षु फारसे मोठे नसतात. पण त्यांची लांबी अधिक असते. एखाद्याशी बोलताना त्याच्याकडे विशेष न्याहाळून पहाण्याची ज्याला सवय असते तो साधारण माणसापेक्षा अधिक बुद्धिमान असतो. दुष्ट माणसाचा हात जड असतो. नाक चपटे असणे चांगले नाही. शंभुचंद्राचे नाक चपटे होते म्हणून ज्ञानी असूनही ते तितक्या सरळ वृत्तिचे नव्हते. हात आखुड व कोपरे मोठी हे तसेच एक वाईट लक्षण आहे. मांजरासारखे घारे डोळे असणे बरे नव्हे. तसेच डोळा तिरळा असणे आंधळा असण्यापेक्षा वाईट.

भक्तिवान मनुष्याचे आंग स्वाभाविक कोमल असते. त्याच्या हातापायाचे सांधे ढिले असतात."

नरेंद्राची परीक्षा तर त्यांनी फारच कसून केली होती. एक दिवस ते त्याला म्हणाले. "तुझी सर्व लक्षणे फारच उत्तम आहेत. झोपेत तुझा निःश्वास तेव्हढा जोराने पडतो. एवढीच एक गोष्ट वाईट आहे". योगी म्हणतात, "असा मनुष्य अल्पायु होतो."

परमहंस समोरच्या शिष्याची परीक्षा अशी शारीरिक लक्षणावरून करत. मग त्याला जवळ करत. येणाऱ्या मनुष्याच्या मनात त्यांच्याबद्दल जी श्रद्धा असे ती उत्तरोत्तर वाढते आहे की नाही इकडे त्यांची नेहमी दृष्टि असे. आपली अध्यात्मिक अवस्था व आचरण त्याला कितपत समजले आहे हे पहाण्यासाठी ते त्याला स्वतःसंबंधी काही प्रश्न विचारीत आणि मग आपल्या भक्तमंडळीपैकी ज्याच्याशी सहवास ठेवल्याने त्याचा फायदा होईल असे त्यांना वाटेल त्याच्याशी त्याची ओळख करून देत.

एका भक्ताने त्यांच्या प्रश्नांना उत्तर देताना म्हटले, "महाराज, मी आपल्याला साक्षात् ईश्वर मानतो. आपण शंकराचे ध्यान करावयास सांगितले पण मी ध्यानास बसलो की आपलीच मूर्ति समोर येते. शंकराचे ध्यान करण्याची इच्छाच होत नाही. म्हणून मग आपल्यालाच शिव समजून आपलेच ध्यान करीत असतो."

ठाकूर हसून म्हणाले, "काय म्हणतोस तरी काय? पण माझी स्वतःची तर खात्री आहे की, मी तुझ्या एखाद्या लहानशा केसाहूनही मोठा नाही. ते काही असो तुझ्याबद्दल मला फार काळजी वाटत होती, ती आज नाहीशी झाली."

मालूताई आपण असे म्हणूया की, बाह्यलक्षणावरून गुरू आपला स्वीकार करतात, बोध करतात, योग्यता वाढवत जातात आणि आपल्या प्रयत्नाने आपली भूमिका जितक्या उच्चस्तरावर नेऊ तितक्या प्रमाणात ते परम दयाळू मायबाप आपल्याला पुढच्या रस्ता दाखवतात, नव्हे हाताला धरून चालवतात.

देव बाह्य लक्षणाविषयी सांगत आहेत व सांगता सांगता अंतःस्थितीचे वर्णन करीत आहेत. ते म्हणाले, "वसंत ऋतूत सुवास फुलांच्या पाकळ्यात मावेनासा होऊन बाहेर पसरतो त्याप्रमाणे बुद्धि प्रगल्भ होते आणि आत न मावता बाहेर फाकते."

आता सात्त्विक वृत्ति आंतून मोहरून आली की, सात्त्विकतेनेच जगायचे असा तिचा निश्चय होतो. बुद्धिचा निश्चय बळकट झाला असेल तर इंद्रिये त्याप्रमाणे वाटचाल करतात आणि ती स्वतःच इतकी चतुर व योग्यायोग्य जाणणारी होतात की, सर्व इंद्रियांच्या अंगणातच विवेकाचा जागता पहारा सुरू होतो. खरे सांगतो अर्जुना, हातापायांनासुद्धा डोळे मिळतात. राजहंसाच्या चोचीचे अग्र दूध आणि पाणी यांचा निर्णय करून जसा त्यांचा झगडा निकालात काढते त्याप्रमाणे पाप व पुण्य निवाड्यात इंडिये परस्पर पारख करतात. त्यांना मनाचा वा बुद्धीचा सल्ला लागत नाही. त्या इंद्रियांनी नियम पाळण्याऐवजी नियमच त्यांची सेवाचाकरी करतो. ऐकू नये ते कानच वर्ज करतात. पाहू नये ते डोळेच परस्पर टाकून देतात. जे बोलू नये ते जीभच टाळते. दिव्यापुढे अंधार पळत सुटतो त्याप्रमाणे निषिद्ध त्याच्या इंद्रियापुढे टिकतच नाही.

पावसाळ्यात महानदी जशी उचंबळून वर येते तशी त्याची बुद्धि सर्व शास्त्रामध्ये प्रवीण होते. पौणिमेच्या दिवशी आकाशात चंद्रप्रभा सर्वत्र पसरते तशी त्याची वृत्ति ज्ञानामध्ये पसरते, वासना एकवटून जातात, प्रवृत्तिला आहोटी लागते, मनाला विषयाचा वीट येतो. सत्त्वगुण वाढला की अशी स्थिती होते. ही लक्षणे दिसतात आणि अशाच तऱ्हेच्या जीवनक्रमाचा जेव्हा शेवट होतो, देहांत होतो तेव्हा त्या जीवास घरी संपत्ती आणि औदार्य असल्यावर जशी इहलोकी कीर्ती आणि परलोकी उत्तम गती मिळते त्याप्रमाणे नवा जन्मही त्या जीवाला सत्त्वगुणयुक्तच मिळतो. घरात सुकाळ आहे. मेजवानीचा बेत आहे आणि आपले जिवलग मनुष्य स्वर्गातून परतून घरी यावे आणि मग आनंदोत्सवास उधाण यावे तसेच इथे घडते. त्या आनंदास उपमाच देता येत नाही. सत्त्वगुणी माणसास जो नवा जन्म मिळतो त्याच्या सत्त्वगुणाच्या उत्कर्षाचे वर्णनही करता येत नाही. भोगालाच योग्य असलेले हे खोपटासारखे शरीर तो सत्त्वगुणी पुरुष टाकून देतो आणि सत्त्वगुणाने संपन्न असा नवा जन्म घेतो. धनुर्धरा, जास्त काय सांगू. तो सत्त्वगुणी ज्ञानी पुरुषांच्या घरी जन्मास येतो. अर्जुना, एखादा राजा सहज डोंगरात फिरायला जातो अशावेळी त्याच्या राजेपणात काही उणेपणा येतो काय? किंवा एखादा प्रदीप्त दिवा गावाहून दुसऱ्या गावी नेला तर त्याचा उजेड कमी होतो काय? तिथे तो तसाच प्रकाशमान होतो ना? त्याप्रमाणे ह्या नव्या जन्मात त्याची बुद्धि विवेकावर तरंगू लागते. पोहू लागते, विहार करू लागते. महदादितत्त्वांचा विचार करीत करीत तो विचारासकट त्या ब्रह्मतत्त्वात विलीन होऊन जातो.

वेदान्तात छत्तीस तत्त्वे आहेत. ब्रह्म हे सदतिसावे तत्त्व, सांख्याच्यामते तत्त्वे चोवीस व ब्रह्म पंचविसावे आणि सत्त्वादि तीन्ही गुणास नाहीसे करून जे स्वभावतः चौथे आहे असे जे सर्वोत्तम ब्रह्म ते ज्या सत्त्वगुणी मनुष्यास सुगम झालेले असते अशांच्या कुळात त्या सत्त्वगुणी माणसास जन्म मिळतो.

आता तमोगुण आणि सत्त्वगुण जेव्हा खाली बसतात आणि रजोगुणाची वृद्धि होते आणि तो शरीररूप गावात धुमाकूळ घालतो त्यावेळीही शरिरात लक्षणे उमटतात. चक्री वावटळ सापडेल तो पदार्थ वेटाळून घेऊन आकाशात चढत जाते त्याप्रमाणे इंद्रियांना विषय सेवनास पूर्ण मोकळीक असते. त्यांना कुठलाही संयमाचा दाब नसतो. परस्त्री असो, परधन असो यांचा लोभ धरणे शास्त्रविरुद्ध आहे असे त्यास वाटत नाही. ती इंद्रिये स्वैराचाराचा धुमाकूळ घालतात आणि शेळीप्रमाणे बरेवाईट सर्व विषय चरत रहातात. जे वेटाळून घेता येत नाही तेव्हढेच उरते. कोणताही धंदा समोर आला की, तो धंदा करण्याविषयीचा मनाचा कल माघार घेतच नाही. एखादा प्रासाद बांधावा, अश्वमेध यज्ञच करावा, नगररचना करावी, सरोवरे निर्माण करावी, नानाविध महावने लावावी अशा अफाट कर्मांना आरंभ करतो आणि इहपर सुखाच्या प्राप्तीसाठी कर्म करताना आता पुरे असे म्हणतच नाही. ह्या रजोगुणी माणसांची अभिलाषा इतकी दुर्दम्य असते की, समुद्र त्या अभिलाषेपुढे हार खाईल आग सर्वभक्षक पण त्या आगीची किंमत ह्या अभिलाषेपुढे तीन कवड्या आहे. अभिलाषा मनाच्या पुढे पुढे आशेची धाव घेत असते. सर्व विश्व आशेच्या पायातळी घातले जाते. रजोगुण वाढला की ही अशी चिन्हे दिसतात. अशा लक्षणाच्या समुदायात देह पडला की तो जीव नव्या दुसऱ्या देहात प्रवेश करतो पण मनुष्य योनीतच जन्म होतो आणि कष्ट पुन्हा नव्याने सुरू होतात. एखादा भिकारी मोठ्या मजेने एखाद्या राजवाड्यात बसला तर तो काय राजा होतो? अर्जुना, भिकारी तो भिकारीच! मोठ्या समर्थाचे वऱ्हाड वाहून नेले म्हणून बैलाला कोणी पक्वान्ने चारतो काय? त्याच्या नशिबी कडबाच! त्याप्रमाणे कर्म करता करता ज्यांना ना दिवसा

उसंत ना रात्री उसंत, अशा लोकांच्या घरी तो रजोगुणी मनुष्य जन्म घेतो. फार काय सांगावे जो रजोगुणांनी बनलेल्या वृत्तीच्या उत्कर्षरूपी डोहात मरण पावतो तो काम्य कर्मे करणाऱ्या लोकांच्याच कुळात जन्मतो.

अर्जुना, याच न्यायाने सत्त्व आणि रज बाजूस राहून जेव्हा तमोगुण बलिष्ठ होतो तेव्हा काय लक्षणे दिसतात हे लक्ष देऊन नीट ऐक. ही लक्षणे देहाच्या आत आणि बाहेर दोन्हींकडे उमटतात अमावस्येच्या रात्री चंद्र व सूर्य या दोघांच्याही अभावामुळे आकाश जसे काळेकभिन्न असते तसे त्याचे मन काजळाने भरलेले असते. अंतःकरण विचारशून्य व स्फूर्तिहीन रिकामे असते. बुद्धि जडपणात दगडासही मागे सारते. तिने कोमलपण इतके टाकलेले असते. स्मरणशक्ति देशोधडीस लागलेली असते. शरीर अंतर्बाह्य अविवेकाने माजलेले असते. देवघेव चालते ती केवळ मूर्खपणाची. तमोगुणी पुरुषाच्या इंद्रियरूपी अमंगल ग्रामात आचारभ्रष्टतारूपी हाडे रोवलेली असतात. देहांतापर्यंत त्या पुरुषाची वृत्ति अशा आचारभ्रष्टतेकडेच जाते. एवढ्यानेच भागत नाही. दुष्कृत्य करावयाचे म्हटले की त्याला उल्हास येतो. घुबडाला जशी रात्री दृष्टि असते तशी त्याला दुष्कर्माची आवड असते. निषिद्धकर्म म्हटले की, कुठल्याही निषिद्ध कर्माने त्याचे मन भरून जाते आणि हे करायचेच असा त्याच्या मनाचा निश्चय होतो. ते करण्यासाठी इंद्रिये धावू लागतात. मदिरापान न करताच तो डुलत असतो. सन्निपात वायू न होताच बरळत असतो. वेडा मनुष्य प्रेमावाचूनच भुलतो तसा तो भुलतो. चित्त तर जागेवर नाही पण उन्मनी अवस्थाही प्राप्त झालेली नाही अशी त्याची स्थिती होते. केवळ उन्मत करणाऱ्या मोहाने त्याचे मन व्यापलेले असते. या तमोगुणाचा त्याच्या सर्व सामुग्रीशी जेव्हा उत्कर्ष झालेला आहे अशा स्थितीत त्याला मृत्यू आला तर या जन्मातल्या तमोगुणासह नवा जन्म येतो आणि तो अपाय काय सांगू? मोहरीपण पोटात साठवून जेव्हा बी जमिनीत प्रवेश करते तेव्हा मोहरीचे झाड म्हणून अंकुरते. अग्निपासून दिवा लावला आणि तो मध्ये विझला तरी लावला की पुन्हा ज्योत पेटते. तमाच्या मोटेत संकल्पाला बांधुन जेव्हा देह जातो तेव्हा पुन्हा मिळणारा देहही तमोगुणी असतो. आता जास्त बोलून काय उपयोग? जी तमाच्या उत्कर्षात मरण पावती तो पशु, पक्षी, झाड किंवा कृमी होतो. हा सगळा विचार करूनच श्रुतीचा संकेत सुचवितो की ज्या कर्मातून सत्त्वगुणाचा जन्म होतो त्याला सुकृत म्हणावयाचे. आता ह्या सुकृतालाच सुख आणि ज्ञान ही दोन निर्मळ, सरळ व अपूर्व अशी फळे येतात. अर्जुना, ध्यानात ठेवावयाचे की सत्त्वगुणापासून सात्त्विक कर्म घडते. त्यामुळे सुकृत निर्माण होते आणि त्या सुकृतामुळे सुख आणि ज्ञान हे अपूर्व सुंदर फल मिळते.

आता ज्या क्रिया राजस किंवा रजोगुणाने रित केलेल्या आहेत. त्या इंद्रावणीचे पिकलेले फळ जसे बाहेरून सुंदर पण आतून कडू असते तसे ते फळ बाहेरून सुखाने रंगलेले पण आतून दुःखाने भरलेले असते. निंबोळीचे फळ बाहेरून दिसायला गोड पण आतून विषासारखे कडू असते. त्या क्रियेचे फळ असे फसवे असते. तामस कर्म जितके असते, ते अज्ञानरूपी पिकाने फळते विषांकुरातून जसे विषच पिकते.

अर्जुना, ज्ञानाला हेतू सत्त्वगुणच आहे. सूर्य हा जसा दिवसाला कारणीभूत असतो त्याप्रमाणे सत्त्वगुण ज्ञानाला कारणीभूत होतो. अद्वैत परब्रह्माला आपल्या स्वरूपाचे विस्मरण होते आणि मग जीवदशा आत्म्याला प्राप्त होते. त्याचप्रमाणे रजोगुण वाढला की, लोभ उत्पन्न होतो. प्रबुद्धा, मोह, अज्ञान आणि प्रमाद ही दोषांची त्रयी तमोगुणापासून निर्माण होते. अर्जुना, तळहातावरचा आवळा जसा सर्व बाजूनी निरखून पहाता येतो. तसे हे तिन्ही गुण तुला निरखून पाहता यावे अशा स्वरूपात तुला सांगितले आहेत. आर्त, जिज्ञासु, अर्थार्थी व मुमुक्षु असे भक्तांचे चार प्रकार तुला सांगितलेच आहेत. सर्व बाजूंनी विचार करून माझे परमज्ञानी भक्त पहिल्या तीन

प्रकारच्या भक्तीचा त्याग करून चौथ्या प्रकारची भक्ति करण्याचे व्रत जन्मभर आचरतात. त्याप्रमाणे रजोगुण आणि तमोगुण हे फार मोठ्या पतनास कारणीभूत होतात हे जाणून आणि सत्त्वगुणानेच ज्ञान प्राप्त होते ही खूणगाठ बांधून, इतर दोन गुणांचा सर्वस्वी त्याग करून, केवळ सात्त्विक वृत्तित जीवन घालण्याचा निश्चय कित्येक पुरुष करतात. सत्त्वाच्या उत्कर्षात जे जगतात आणि मरतात ते तनुत्यागानंतर स्वर्गाचे राजे होतात. त्याचप्रमाणे जे रजोगुणात मग्न होऊन जगतात आणि मरतात ते मृत्यूलोकी मनुष्य योनीत जन्माला येतात. त्यांना या मृत्यूलोकात सुखदुःखाची खिचडी देहरूपी एकाच ताटात खावी लागते. मृत्यूलोकात रजोगुणाच्या आधीन झाले की, मरणरूप वाटेत मनुष्य सापडतो आणि त्यातून बाहेर पडू शकत नाही. त्याचप्रमाणे तमोगुणातच जगून तमोगुणातच जे मरतात त्यांनी नरकभूमीला जाण्याचा दाखला घेतला असे समजण्यास हरकत नाही.

अर्जुना, अशी रीतीने वस्तूचा सत्तेने सत्त्व, रज, तम हे तीन्ही गुण उन्नतीस व अवनतीस कसे कारण होतात हे तुला सविस्तर सांगितले आहे. यानंतर देव सांगत आहेत की, "गुणातीत पुरुष द्रष्टा होऊन," गुणच कर्मे करतात आणि आत्मा ह्या पलीकडे आहे व तो आत्मा हेच आपले स्वरूप आहे. "हे जाणतात व मीहि गुणातीत असल्याने माझ्या स्वरूपात येऊन मिळतात."

मालूताई, आपल्यासारख्या सामान्य साधकाने आता असा विचार पक्का लक्षात ठेवावयाचा की देवांनी अगदी व्यव्यस्थित क्रम सांगितला आहे. सत्त्वगुणातून सत्कर्म घडते, सत्कर्मामुळे सुकृत तयार होते व त्या सुकृताचे पक्व फळ म्हणजे सुख आणि ज्ञान. सुख हे त्या सुकृताचे फळ असले तरी ते ज्ञानाचे सहोदर आहे आणि ज्ञानाचे स्वरूपच आत्म्याची ओळख करून देऊन आपण गुणातीत आहो हे जीवास प्रत्यक्ष अनुभूतितून पटवून देणे आणि त्या अवस्थेतच जीवास जास्तीत जास्त काल ठेवणे हे आहे. म्हणजे काट्याने काटा काढावा त्याप्रमाणे सत्त्वगुणाचा उपयोग करून सत्कर्माने सुकृताचा साठा तयार करावयाचा व आपण सत्त्वगुणदेखील नव्हे हे जाणावयाचे अशी ही प्रक्रिया!

पुष्कळदा मनात येते आपण किती वेगवेगळ्या प्रकारची उपासना करतो. देवांची पूजा, उत्सव, भजन करतो, जपाचे सकाम, निष्काम अनुष्ठान करतो. साधुसंतांची चरित्रे वाचतो, ऐकतो, दर्शन घेतो, त्यांचे ग्रंथ वाचतो, व्रते करतो, स्वाहाकार करतो, तीर्थक्षेत्रासही जातो. काय होत असेल ह्या सगळ्या क्रियांचा परिणाम? जन्मभर एकाच प्रकारची उपासना करणाऱ्याना जास्त अनुभव असतील काय? आपला रस्ता तर चुकलेला नाही? आपल्याला ह्या अशा वेगवेगळ्या प्रकारच्या उपासनेची ओढ वाटते हे आपल्या चंचलतेचे तर लक्षण नव्हे?

तर ह्या देवांच्या निरूपणावरून असा विचार येतो की आपण शरिराच्या पुष्टीकरता तुष्टीकरता वेगवेगळ्या प्रकारचे अन्न खातो. त्या चवी परस्पर विरोधी पण असतात. त्या विविध प्रकारच्या अन्नाचा तोल जर उचित असला तर परिणाम पुष्टी व तुष्टी मिळणे हा एकच होतो. त्याचप्रमाणे ह्या सर्व सत्क्रियांचा संकलित परिणाम सत्त्वगुणाची वृद्धि होणे हा होत असणार. सत्त्वगुणापासून आत्मज्ञानापर्यंतच्या वाटचालीचे टप्पे देवांनी वर्णन करून सांगितलेच आहेत तेव्हा साधकाने आपल्यामधील सत्त्वगुण वाढतो आहे ना एवढेच पहायचे, सुकृताचे फळ देणे भगवंताच्या मर्जीचे काम आहे असे मानले पाहिजे. गुरुदेवांच्या चरित्रात श्री. शं. गो. तुळपुळे

लिहितात, “प्रीतम हा गुजराथी संत म्हणतो “हरिनो मारग छे शूरानो.” हरीचा मार्ग हा शूरांचा मार्ग आहे. भेकडांना इथे स्थान नाही. मोती पाहिजे असतील तर जीवावर उदार होऊन खोल समुद्रात उडी घेतली पाहिजे. काठावर उभे राहून मौज पहाणाऱ्याना काहीही मिळणार नाही. प्रपंचातच आनंद मानून परमार्थात केवळ विनोद (रंजन) केल्याने देव मिळणार नाही. मुळच्या विषयोन्मुख असणाऱ्या वृत्ति उन्नत करण्याचा, ईश्वरोन्मुख करण्याचा मार्ग आहे या मार्गात हिणकस वृतिंचे स्वरूपच मुळात पालटते व साधकाची “भागवती तनु” होते मात्र कर्म सत्त्वगुणांनी युक्त असले पाहिजे.”

सत्त्व, रज, तम अशा ह्या त्रिगुणांतील दोन गुणांनी मिश्र अशा प्रकारचे कर्म घडण्याची शक्यताही आहे. तमाचा सर्वतोपरी त्यागच इष्ट असल्याने त्याचा विचार नकोच. तरी पण यासंबंधी शान्तिपर्वात एक गोष्ट आहे ती मनात येते.

महर्षी गौतमांना चिरकारी नावाचा एक मुलगा होता. तो बुद्धिमान व कार्यकुशल होता. पण प्रत्येक काम करताना ते काम करण्याची आवश्यकता व औचित्य ही समजल्याशिवाय तो ते काम करीत नसे. ते कार्य करण्यासंबंधी विचार करीत राही. काही लोक त्याला आळशी पण म्हणत. प्रस्तुत विषयाच्या अनुरोधाने आळस हे तमोगुणाचे लक्षण आहे.

एकदा गौतमांना पत्नीचा फार राग आला त्यांनी आज्ञा केली, “बाळा तुझ्या ह्या दुष्ट आईला मारून टाक.” महर्षीनी आला केली व ते वनांत निघून गेले.

चिरकारीने शस्त्र हातात घेतले आणि आपल्या स्वभावानुसार त्याने विचार करण्यास सुरवात केली. तो मनात म्हणाला, “आता मी काय करू? पित्याची आज्ञा पाळावी तर मातेचा वध करावा लागणार. मातेचा वध न करावा तर पित्याच्या आज्ञेचा भंग केल्याचे पातक लागणार. पुत्राला माता-पिता दोघेही पूज्य आहेत. मी आता काय करणे उचित होईल? माता दोषी आहे काय याचा विचार करणे अधर्म आहे व पित्याची आज्ञा उचित आहे की नाही याचा विचार करणेही अधर्म आहे.

अशा विचारा मातेचा वध करणे राहून गेले. राग शांत झाल्यावर गौतमांचा विवेक जागा झाला. ते म्हणू लागले, “अरेरे मी ही काय आज्ञा दिली आज! क्रोधाच्या आधीन होऊन मी विनाकारण स्त्रीहत्त्येची आज्ञा दिली.” पश्चातापदग्ध गौतमांना परत येताना पाहून चिरकारीने शस्त्र लपविले व पित्यास नमस्कार केला व आपल्या हातून आज्ञापालनास विलंब झाल्याबद्दल क्षमा मागितली.

गौतमांना वृत्तांत ऐकून आनंद झाला. ते आशीर्वाद देऊन म्हणाले, “बाळा असेच करावे. कोणाशी मैत्री करताना व कुणाला शिक्षा करताना फार विचार करूनच ते कम करावे.”

आता चिरकारी आळशी म्हणजे तमोगुण युक्त म्हणावा तर त्या गुणानेच त्याला महापातकातून वाचवले. हे कर्म सत्त्वगुणांनी अधिष्ठित अशा तमोगुणातून झाले असे म्हणावे लागते.

तेव्हा गुणांचा विचार करताना त्या कर्माने माझ्यातील सत्त्वगुणाची वृद्धी होत आहे ना एव्हढाच विचार साधकाने करावा असे वाटते.

देव सांगत आहेत, "अर्जुना, ब्रह्मवस्तु आपल्या ठिकाणी पूर्णत्वाने आहेच, पण गुणाच्या संगाने देहामध्ये त्या त्या गुणाच्या विशेष कार्याप्रमाणे वागते असे वाटते. एखाद्या राजाला स्वप्न पडते की आपल्या राज्यावर परचक्र आले. मग तो स्वतःच हरतो, जिंकतो. सगळे काही आपणच होतो. त्याप्रमाणे उत्तम, मध्यम, कनिष्ठ हे गुणवृत्तीचे भेद आहेत. गुणांची दृष्टि टाकली की एक शुद्ध ब्रह्म वस्तूच अस्तित्वात आहे असे अनुभवास येते. अर्जुना, हा बोलण्याचा ओघ राहू दे मात्र विषयांतर झाले असे समजू नको. आता मागील विषय पुढे सांगतो.

अर्जुना, हे तिन्ही गुण आपआपल्या सामर्थ्याने स्वभावतः देह बनतात. लाकूड चांगले पेटले की त्या लाकडाच्या आकाराचा निखारा होऊन रहातो. भूमीमधला रस तिच्यातून येणाऱ्या वृक्षाच्या रूपाने व्यक्त होतो. दूधच विरजल्यामुळे दही होते. उसाच्या रूपाने गोडी साकार होते. त्याप्रमाणे हे तीन गुण अंतःकरणासकट स्थूल व सूक्ष्म देह होतात. ह्या देहामध्ये आत्मा रहातो आणि म्हणून त्याला त्या गुणांचे बंधन घडते.

धनुर्धरा अर्जुना, पण आश्चर्याची गोष्ट ही आहे की जीवाला ह्या गुणाचे एवढे गुंतागुंतीचे बंधन असूनही जीवाच्या मुक्त स्थितीला कमीपणा येत नाही. आपआपल्या धर्माप्रमाणे हे गुण देहाच्या मागे पुढे हालचाल करीत असताना अंतस्थ आत्म्याच्या गुणातीत अवस्थेला जरासुद्धा धक्का लागत नाही.

अर्जुना, तू ज्ञानमधाचा आस्वाद घेणारा चतुर भ्रमर आहेस म्हणून तुला सांगतो की आत्म्याची सहज मुक्तस्थिति आहे. चैतन्य गुणात असते पण गुणाच्या आधीन नसते हे मी तुला पूर्वी सांगितलेच आहे तू त्याचा बोध चित्तात ठसवून घे. म्हणजे जागृति आल्यावर स्वप्नाचे खोटेपण कळते तशी अवस्था तुला प्राप्त होईल. गुणातीत आत्म्याचा तुला प्रत्यक्ष साक्षात्कार होईल.

नट रंगभूमीवर येताना सोंग सजवून प्रवेश करतो, हावभाव करतो, अभिनय करतो, पण आपण हे नाटक रंगवितो आहो हे तो विसरत नाही. त्याप्रमाणे गुणाशी तद्रूप न होता गुणांचा खेळ पहावा. आकाशात तिन्ही ऋतू येतात. खेळ मांडतात, जातात. आकाशाच्या अलिप्तपणात ह्या लीलेमुळे काही फरक पडत नाही. नदी तीरावर एखादा उभा असतो, आपले प्रतिबिंब पाण्यात पडलेले पहातो. लाटांबरोबर प्रतिबिंबाचे अनेक तुकडे झालेलेही निर्विकार मनाने पाहतो. त्या पाण्याच्या हालचालीचा त्या स्वरूपावर काहीच परिणाम होत नाही. गुणात असून जे गुणाच्या पलीकडे आहे त्या आपल्या मूळ भूमिकेशी तो तद्रुप झालेला असा रहातो. त्या भूमिकेतून आपल्या जीवनाकडे पहातो आणि म्हणतो, "मी अकर्ता आहे साक्षी आहे. क्रियेचे नियोजन मी करीत नाही गुण करतात. सत्त्व, रज, तम ह्या निरनिराळ्या गुणाप्रमाणे कर्माचा विस्तार होत जातो. वसंतऋतु वनामध्ये वनशोभेस केवळ कारणीभूत होतो. सूर्य आपल्या ठिकाणी आकाशात उगवतो. तारा अस्तंगत व्हाव्या, सूर्यकांत माणि प्रदीप्त व्हावा, कमले विकसित व्हावी, तमाचा नाश व्हावा ही कामे काही सूर्य आपल्या हाताने करीत नाही. तो उगवतो, कार्य घडते इतकेच. तो जसा अकर्ता तसा मी ह्या देहात साक्षित्वाने सत्तारूप आहे. मी गुणांचे प्रकाशन करतो. गुणांचे पोषण करतो, गुणांचा निरास झाल्यावरही उरतो अशा तऱ्हेने गुणांचा निरास

झाल्यावरही उरणारा जो मी हे माझे स्वरूप आहे." आता असा विवेक ज्याच्या अंतःकरणात उदय पावला धनंजया, तो पुरुष उच्च पंथाने गुणातीत अवस्थेस प्राप्त होतो.

ह्या अवस्थेस पोचल्यावर निर्गुण म्हणून जे आणखी आहे ते तो बिनचूक जाणतो ज्ञानाने त्याच्याच अंतःकरणात रहाण्याचे ठिकाण आता केलेले असते. अर्जुना, अरे तो पुरुष मला येऊन असतो आणि नदी समुद्राला मिळाली की तिचे नदीपण संपून ती समुद्र होते त्याप्रमाणे तो पुरुष मला येऊन मिळालेला असतो आणि नदी समुद्र होते त्याप्रमाणे मद्रुप झाल्याने माझ्या सत्तेचा अधिकारी होतो. एखादा पिंजऱ्यात अडकलेला पोपट त्या बंधनातून सुटावा आणि मोठ्या आनंदाने झाडाच्या फांदीवर जाऊन बसावा तसा तो त्या गुणाच्या विळख्यातून सुटून स्वरूप अहंतेच्या मोकळ्या आकाशात विहार करतो. अज्ञानाच्या निद्रेमध्ये तो मोठमोठ्याने घोरत होता तो, हे प्रबुद्धा, स्वस्वरूपाच्या जागृत अवस्थेत येतो. बुद्धिभेदाचा जो आरसा त्याच्या हातात होता त्यात तो आपले रूप पहाण्यात गुंग होता पण आता तो आरसा त्याच्या हातातून गळून पडल्यामुळे जीवपणाचा भास संपला. जीव आणि ईश्वर यांचे ऐक्यच असताना "मी देह आहे" ह्या भावनेचा वारा सुटल्यामुळे समुद्राहून लाट वेगळी दिसत होती तो वाराच संपल्यामुळे लाट व समुद्र यांचे पूर्ववत् ऐक्य होते. पावसाळा संपल्यावर ढग आकाशात विरून जातात त्याप्रमाणे त्या पुरुषाला गुणातीतत्वाचा अनुभव आला की माझी प्राप्ती होते. आता तो मद्रूप झाल्यामुळे या देहात असतानाही देहास जन्मास घालणाऱ्या गुणामध्ये तो अडकत नाही. भिंगाच्या घरामध्ये दिवा ठेवलेला असतो त्या भिंगाना त्या दिव्याचा प्रकाश आवरता येत नाही. तो बाहेर फाकतोच. समुद्रात वडवानल अग्नि असतो, रहातो पण समुद्राचे पाणी त्या अग्निस विझवू शकत नाही. गुण आले गेले तरी त्याला झालेला बोध गुणाच्या संगाने मळत नाही, आकाशातील चंद्र त्याचे प्रतिबिंब पाण्यात पडले म्हणून भिजत नाही तसा.

तीन्ही गुण आपआपल्या सामर्थ्याने ह्या देहात निरनिराळी सोंगे उभी करतात पण ती सोंगे पहाण्यासाठीसुद्धा तो अहंतेला बाहेर पाठवत नाही. आपण ह्या गुणापलीकडेच आहो हा निश्चय त्याच्या अंतःकरणात इतका जोर करून स्थिर झालेला असतो की शरीरात काय घडते आहे याची त्याला वार्ताही नसते. पण परमहंस स्वतःकडे बोट दाखवून म्हणत असत, "इथे काही तरी विशेष आहे. साधक जन्मभर, परिश्रम करून मोठ्या कष्टाने एक-दोन भावात सिद्ध होऊ शकतो. इथे एकाच वेळी एकाधारे तसले एकोणीस भाव वसत आहेत." स्वतःचा भाव व हे शरीर यासंबंधी ठाकुरांचे स्वतःचे शब्द आहेत. ते भावाकडे व शरीराकडे किती त्रयस्थ भूमिकेतून पहात ह्याचे उदाहरण आहे. मग गुणासंबंधी बोलावयासच नको.

त्यांच्या शिष्यांपैकी गिरीशचंद्र श्रीरामकृष्णाना साक्षात परमेश्वर समजत. श्रीरामकृष्ण म्हणत, "गिरीशचा सतरा आणे विश्वास आहे. त्याची अवस्था पाहून पुढे लोक चकित होतील." एकदा आंब्याच्या झाडाखाली काही मंडळी गप्पागोष्टी करीत असताना परमहंस तिथे आले व मंडळीत गिरीश आहे असे पाहून म्हणाले, "गिरीश तू माझे असे काय पाहिले आहेस म्हणून ज्याला त्याला मी अवतार आहे ह्या गोष्टी सांगत असतोस?"

हा एकाएकी केलेला प्रश्न ऐकूनही गिरीशचंद्र बिलकुल गोंधळले नाहीत. ते लगबगीने उठून रस्त्यावर आले. हात जोडून श्रीरामकृष्णांच्या पायापाशी गुडघे टेकून बसून त्याच्या तोंडाकडे पहात सद्गदित कंठाने

म्हणाले, “व्यास, वाल्मिकि अशासारखे महर्षीसुद्धा ज्यांचा महिमा वर्णन करता करता थकून गेले त्यांच्या संबंधाने मी यःकश्चित पामर आणखी जास्त ते काय सांगणार?” गिरीशचंद्राचे हे असे अद्भूत  विश्वासाचे उद्‌गार ऐकून श्रीरामकृष्णांचे सर्वांग रोमांचित झाले, हृदय उचंबळून आले व मन एकाएकी उच्च भूमिकेवर आरूढ होऊन त्यांना गाढ समाधी लागली. अशी गुणातीत अवस्था! हनुमंतास जशी त्याच्या शक्तीची कुणी तरी आठवण करून द्यावी तसेच हे घडले. एखादे वाक्य त्या मूळस्वरूपासंबंधी कानावर पडले की, देहाची उपाधि त्या ज्ञानवानांनी टाकलीच. किंबहुना देव सांगत आहेत की, अशी गुणातीत अवस्था प्राप्त झाली की देहाचे त्यांना भानच उरत नाही ते मन मी देह आहे या भूमिकेवर परत येतच नाही. सर्प जसा अंगावरची कात टाकून देऊन पाताळात गेला की ती टाकलेली त्वचा संभाळीत बसत नाही तसेच ह्या ज्ञानी पुरुषांचे घडले.

क्रियायोगाचे अध्वर्यु परमहंस योगानंद यांच्या चरित्रातील एक गोष्ट अशीच ह्या अवस्थेवर प्रकाश टाकणारी आहे. योगानंदजी एकदा आपल्या परमगुरुपत्नीच्या दर्शनास गेले व म्हणाले, “माताजी, आपल्या आयुष्यातील काही घटना मला सांगाल का? आपणा उभयतांचे चरित्र म्हणजे एक पवित्र ग्रंथ वाटतो म्हणून विनंती करतो. ”

काशीमणी म्हणाल्या, “ये बाळ वर चल तुला सांगते. बाळा माझ्या पतींची योग्यता मला कित्येक वर्षे कळलीच नाही. याच खोलीत एका रात्री मला दिसले की माझ्यावर काही देवता अंतराळात तरंगत आहेत हे पाहून मी जागी झाले आणि पहाते तो सगळी खोली प्रकाशाने भरून गेली आहे. तुझे परमगुरु व माझे पती पद्‌मासन घालून खोलीच्या मध्यभागी अंतराळीच तरंगत होते, आणि त्या देवता हात जोडून त्यांना नमस्कार करीत होत्या, पूजा करीत होत्या. मला वाटले की मी झोपेतच आहे पण लाहिरी महाशय म्हणाले, “बाई तू झोपेत नाहीस आता कायमचीच झोपेतून जागी हो.” थोड्याच क्षणात जे जमिनीवर उतरले. मी त्यांचे पाय धरून म्हटले, “आपली योग्यता मला कळली नाही. क्षमा करा. मला आपली शिष्या करून घ्या.”

त्यांनी मला शिष्या केले आणि त्या दिवसापासून त्यांनी खालच्या मजल्यावर रहायला सुरुवात केली. रात्रंदिवस ते शिष्यांच्या मेळाव्यात राहू लागले, संसाराकडे लक्ष देईनात.

पुढे काही कामासाठी एकदा ते या खोलीत आले असताना मी त्राग्याने म्हटले, “तुम्ही सर्व वेळ त्या शिष्यांत घालवता तुमच्या बायकामुलांना कोणी पोसायचं? त्यांनी काय करायचं? त्यांना कोण पैसे देणार?”

माझ्याकडे नजर टाकून महाशय एकदम अदृष्य झाले. “बाळा, काय सांगू माझी अवस्था! कारण खोलीच्या कानाकोपऱ्यातून शब्द येत होते “शून्यांतून तुला संपत्ती कशी मिळणार? मी तर शून्य आहे.”

मी हात जोडून विनविले “गुरूदेव, चुकले मी. माझ्या पापी डोळ्यांना आपले दर्शन होईना, आपण माझ्यापुढे प्रकट व्हा, मी पुन्हा असे म्हणणार नाही.”

“मी इथे आहे.” गुरुदेव छताजवळ होते. त्यांचे डोळे ज्वाळेसारखे दिसत होते. मी रडत रडत त्यांच्या पायाजवळ पडले. ते म्हणाले. “बाई पारमार्थिक संपत्तीची हाव धर. असल्या क्षुद्र संपत्तीचा लोभ धरू नकोस.

आतला खजिना हस्तगत झाला की बाहेरची संपत्ति वाट चालत येईल." ते पुढे म्हणाले, "माझा एक शिष्यपुत्र तुमच्या निर्वाहाची व्यवस्था करील." आणि तसेच झाले. त्यांनी स्वतः प्रपंचाचा कधीच विचार केला नाही. देव म्हणत आहेत "अर्जुना, असा पुरुष पुन्हा देहाहंततेकडे वळत नाही. कमल कोशामधला सुगंध एकदा का पक्क होऊन आकाशात गेला की परत त्या जीर्ण पाकळ्याकडे कधीही परतून येत नाही. त्याप्रमाणे स्वरूपाशी समरस झाल्यावर तो पुरुष देहाचे धर्म काय आहेत, देह कसा आहे ह्या विवेचनात पडत नाहीत. जायते, वर्धते, परिणमते, अपक्षीयते, नश्यति हे जे देहाचे सहा गुण हे त्यांच्या देहाला होतात, त्यांना होत नाहीत, त्यांना त्याचे भान असत नाही. घट फुटल्यावर खापऱ्या फेकून दिल्या जातात आणि घटकाश आपोआपच महदाकाश होते त्याप्रमाणे देहबुद्धि गेल्यावर आत्मस्मरणच केवळ रहाते आणि आत्मस्मरण झाल्यावर काही करावयाचे उरतच नाही. अशा थोर ज्ञानसंपन्नतेने युक्त असे त्याचे देहात असणे असते म्हणून मी त्याला गुणातीत म्हणतो."

मेघाच्या गर्जनेने ज्याला साद घातलेली आहे असा मोर जसा आनंदाने नाचू लागतो तसे अर्जुनाचे संतुष्ट मन श्रीकृष्णाच्या ह्या बोलांनी नाचू लागले.

मग त्या संतोषाच्या भरात तो वीर विचारू लागला, "महाराज, काय हो त्या महात्म्यांची ही योग्यता! देवा, असा पुरुष कधी माझ्या दृष्टीस पडेल का हो? आणि जरी पडला तरी त्याची ही देहातीत अवस्था मला ओळखेल का हो? महाराज, काय हो त्याची ही बोधावस्था! कधी मला त्या दर्शनाचे भाग्य लाभलेच तर मला ओळख पटेल अशी काही लक्षणे सांगाल का देवा? आपण तर कृपेचे माहेरघर अहा. माझ्यावर कृपा करा आणि सांगा की त्या गुणातीत पुरुषाचे आचरण कसे असते? तो गुणांचे निवारण तरी कसे करतो?"

या अर्जुनाच्या प्रश्नावर तो ज्ञान, वैराग्य, ऐश्वर्य, यश, श्री व औदार्य ह्या सहा गुणांचा मालक राजा श्रीकृष्ण अर्जुनाच्या प्रश्नाचे उत्तर देऊ लागला.

देव म्हणाले, "अर्जुना. तुझा प्रश्न नेहमी अचूक व मार्मिक असतो. तू फार लक्षपूर्वक ऐकतोस आणि मग तुझ्या सर्व शंका विचारून घेतोस. पण यावेळी तुझ्या प्रश्नातच थोडा गोंधळ आहे. अर्जुना, तो गुणातीत काय कर्मे करतो आणि तो गुणातून कसा तरून जातो असे विचारणे म्हणजे "खरे हे खोटे कसे" असे विचारण्यासारखे आहे. गुणातीत असे ज्याला म्हणावयाचे तो गुणांच्या आधीन नसतो. तो गुणांत वावरतो असे दिसले तरी तो गुणात सापडत नाही."

तुझ्या प्रश्नाची आपण पुन्हा मांडणी करूया. एखादा पुरुष गुणांच्या आधीन आहे की गुणातीत आहे हे त्या गुंतागुतीत कसे ओळखावयाचे असे विचारून उत्तर पाहूया. कारण ही तुझी खरी शंका आहे. तू ती विचारलीस हे फार चांगले केलेस. त्या शंकेचे आनंदाने उत्तर देतो. अर्जुना, कोणकोणत्या गुणामुळे काय काय दृश्य परिणाम घडतात ते पुन्हा एकदा सांगतो आणि त्यात तो पुरुष कसा वावरतो हे स्पष्ट करतो.

देहामध्ये रजोगुण वाढला की कर्माचे अंकुर फुटतात. प्रवृत्ति त्या स्थूल व सूक्ष्म देहाला वेढून टाकते. आता हा गुणातीत पुरुष ह्या आपल्या कर्मप्रवृत्तीकडे अलिप्तपणे पहातो आणि म्हणतो, "वा म्हणजे सध्या

रजाचा अंमल चालू आहे तर चालू दे. आम्ही त्यात नाहीच आहो." मी कर्मकर्ता हा अहंकार त्याच्या मनाला स्पर्श करीत नाही. बरे, कर्मे करावयाची राहिली तरी त्याला खेद वाटत नाही."

रजोगुण म्हणजे प्रकृति व प्रकृति म्हणजे साक्षात् जगदंबा अशी भक्ताची धारणा असते व तो त्या भावाने तिला शरण जातो, ओळखतो, नमस्कार करतो. ठाकुरांच्या चरित्रात एक गोष्ट आहे. ते म्हणाले. "एक दिवस मंदिरात आसनावर बसून आईचे ध्यान करू लागलो. पण काही केल्या आईची मूर्ति काही ध्यानात येईना. हे असे का होते म्हणून पहातो तो काली घाटावर रमणी म्हणून एक वेश्या नेहमी स्नान करायला येत असे. तिच्यासारखे नटून देव्हाऱ्याच्या जवळच उभी राहून आई डोकावून पहात आहे. हे पाहून मला हसू आले व म्हणालो, "वाहवा आई, तुला आज रमणी व्हयची इच्छा झाली होय? तरीही बरे. आता याचरूपाने आज आपली पूजा घे." रमणीसारखे नटून आईने दाखवले की, "वेश्यादेखील मीच" अशी भावना! ही गुणातीत अवस्था."

देव म्हणाले, "जेव्हा सत्त्वगुणाचा उत्कर्ष होतो तेव्हा सर्व इंद्रियांतून ज्ञानाचा प्रकाश फाकू लागतो पण त्या ज्ञानामुळे तो संतोषित होत नाही. चांगली विद्या प्राप्त न झाली तरी त्याचा खेदही मानीत नाही. तमोगुण वाढला तरी मोह, भ्रम यांनी तो ग्रासला जात नाही, आपले अज्ञानत्व पाहून श्रमी होत नाही किंवा त्या अज्ञानाचा स्वीकारही करीत नाही. मोहाच्या वेळेस ज्ञानाची हाव धरत नाही, ज्ञानाच्या वेळेस कर्माचा आदर करीत नाही. त्यातून कर्म घडलेच तर दुःखही मानीत नाही. सूर्याला सकाळ, दुपार, संध्याकाळ या तीन्ही काळांचा हिशोब करण्याचे कारण नाही तसा तो ह्या गुणांच्या बाबतीत निर्लेप असतो.

तो मुळांतच ज्ञानी असल्याने सत्त्वगुणाच्या उत्कर्षाने आणखी ज्ञान ते काय मिळावयाचे उरते? समुद्र काय पावसाच्या पाण्याने भरतो? कर्मप्रवृत्ति झाली तरी त्याला काय त्याचे कर्तृत्व वाटणार आहे? अरे हिमालय थंडीने कुडकुडतो काय? मोह आला तर त्या मोहामुळे त्याचे ज्ञान कलुषित होते काय? उन्हाळ्यामुळे महाअग्निच्या ज्वाळात आणखी भर ती पडणार?

त्याप्रमाणे गुण व गुणांचे कार्य हे तो सर्व आपणच आहो हे जाणून एकेका गुणाच्या उत्कर्षाने विचलित होत नाही. वाटेने जाताजाता संध्याकाळ झाली म्हणून नाइलाजाने एखाद्या धर्मशाळेत वस्ती करावी तसा ती घटकाभर वस्तीस आलेल्या प्रवाशासारखा देहात उदासीनपणे वावरतो. अर्जुना, रणभूमीला जसे कोण हरला, कोण जिंकला याचे सुखदुःख नसते, ती केवळ तटस्थ व त्या लढाईस आधारभूत असते तसा तो गुणातीत गुणांना जिंकत नाही, हारवत नाही, गुणांच्या आधीन होत नाही, विरोधही करीत नाही. चव्हाट्यावरला खांब नाहीतर घरी आलेला पांथस्थ जसा उदास असतो तसा शरीरातल्या प्राणासारखा गुणकार्याबद्दल उदास असा तो असतो. मृगजळाच्या हेलकाव्याने मेरू पर्वत जसा यत्किंचितही हालत नाही त्याप्रमाणे गुणांच्या वादळाने तो हालत नाही, चळत नाही. जास्त काय सांगू? आकाश वाऱ्याने उडत नाही, अंधाराकडून सूर्य गिळला जात नाही तसा तो गुणामुळे विचलित होत नाही. जाग्या माणसाला स्वप्न भ्रमात पाडत नाही तसा तो गुणांनी बांधला जात नाही बघ.

त्याला गुणांचा खेळ दिसतो खासच. पण सभ्य पुरुष लाकडी बाहुल्यांच्या खेळ दुरून पहात असतो, त्या गर्दीत शिरत नाही किंवा त्या लाकडी बाहुलीशी एकरूप होत नाही तसा तो तटस्थ राहून गुणांची भरती-ओहोटी कौतुकाने दुरून पहातो. सात्त्विक भावात सत्कर्मे घडतात, रजोगुणात रजोगुणी कर्मे होतात, तमोगुणात मोहादिक कर्मे घडतात. त्या गुणातीत पुरुषाची कर्मे गुणानुरूप घडत जातात. पण ती कर्मे तो करीत नाही. त्या क्रिया केवळ त्याच्या सत्तेने चालतात. सूर्याच्या आस्तित्वात जशा जगाच्या क्रिया घडतात तशा! समुद्रास भरती येते, सोमकांत मणि पाझरतो, चंद्र विकासी कमले उमलतात पण चंद्र निमूटपणे फक्त आकाशात उगवलेला असतो इतकेच! वारा वाहतो, विझतो, आकाश निश्चळ असते पण गुणांच्या गडबडीने तो डोलत नाही. अर्जुना, अशी त्याच्या मनाची तटस्थ वृत्ति असते. चित्त निश्चल असते.

वस्त्रामध्ये पाठीपोटी जसा तंतूच असतो तंतूशिवाय दुसरे काही नसतेच त्याप्रमाणे जगात माझ्याशिवाय दुसरे काही दिसतच नाही. माझ्या रूपानेच चराचर नटले आहे हे तो जाणतो."

अमृतधारा ह्या काव्यामध्ये पूज्य स्वामी स्वरूपानंदानी म्हटले—

**"भुः भुः भुः भुंकते श्वान ते? छे छे प्यारे राम**
**डरॉव् डरॉव् बेडूक ओरडे? छे रे आत्माराम**
**चिंव चिंव गाते चिमणी? छे छे माझा प्यारे राम**
**टि टिव टि टिव टिव टिटवी? छे रे माझा आत्माराम"**

गुणातीतांच्या ह्या स्वानुभवाच्या उद्‌गाराना उद्देशूनच देवांचे हे सांगणे आहे.

भगवंत शत्रुमित्रांना जसे सारखेच मोक्षदान करतो तसा तो गुणातीत सुखदुःखांना एकाच मापाने मोजतो. अर्जुना, सहज विचार केला तर हे सुखदुःख भोगले असे केव्हा म्हटले जाते? जेव्हा ह्या देहजळात मासोळी होऊन पोहले तरच! ह्या देहाशी आत्मीयता घेतली तरच! मळणी झाल्यावर जसे दाणे कोंड्यापासून अलग होतात तसे ती देहाहंतता तर त्याने टाकलेली असते. आणि तो आपल्या स्वरूपाशी समरस झालेला असतो मग ते सुखदुःख जाणवणार कुणाला?"

"मी कोण आहे असे आपल्याला वाटते?" असा प्रश्न जेव्हा शारदा अंबा माताजींनी ठाकुरांची चरणसेवा करताना त्यांना विचारला तेव्हा परमहंस म्हणाले, "जी माता त्या कालीमंदिरात आहे तिनेच या शरीराला जन्म दिला असून सध्या ती नौबतखान्यात रहाते आहे आणि तीच आता माझे पाय चेपते आहे. तू मला खरोखरच नेहमी साक्षात् आनंदमयीच्या स्वरूपातच दिसत असतेस."

अशा ह्या देवस्वरूपी मनात कामभाव उठेलच कसा?

देव सांगू लागले, "गंगा खूप खळखळ करत कैलासावरून उतरते. गडबडीने समुद्राला मिळण्यासाठी वाकडे वळणे घेत वहात रहाते पण जेव्हा का समुद्रास येऊन मिळते तेंव्हा तिची समुद्राशी एकरूपता होते, तिची

सगळी खळखळ शांत होते. अर्जुना, त्या गंगेच्या पाण्याने समुद्रात वस्ती केली की ते जसे शांत होते तशी त्या गुणातीताने स्वस्वरूपात वस्ती केल्याने सुखदुःखाची तगमग संपते. सुखदुःख काय ते देहापुरते उरते. खांबाला रात्र आणि दिवस दोन्ही सारखीच तसे त्या आत्मारामाला देहाचे सुखदुःख सारखेच असते. ह्या द्वंद्वाची नोंद आत होतच नाही. आणि म्हणून झोपेत असलेल्या माणसाच्या उशाशी उर्वशी बसली काय किंवा नागाने फडा काढला काय त्याला त्याचे भानच नसते. सुखदुःख नसते तशी त्याच्या चित्ताची अवस्था असते. त्याला शेण आणि सोने सारखेच असते. रत्ने आणि दगड यात फरक वाटत नाही, घरात स्वर्ग येवो किंवा वाघ अंगावर उडी घालो त्याच्या आत्मबुद्धिचा केव्हाही भंग होत नाही. मेलेले मनुष्य जागे होत नाही, भाजलेले बी अंकुरत नाही त्याप्रमाणे त्याचे मन साम्य बुद्धितून बाहेर निघत नाही.

"आपण प्रत्यक्ष ब्रह्मदेवच", अशी कुणी स्तुती केली तरी त्याला आनंद नाही. नीच म्हणून कुणी निंदा केली तरी खंत नाही. राख जळणे, विझणे जाणत नाही त्याप्रमाणे निंदा आणि स्तुती यांचे त्याच्या ठिकाणी प्रकाशनच होत नाही. जशी कांही सुर्याघरी दिवेलागणी किंवा काळोख.

ईश्वर बुद्धिने कुणी पूजा करो, चोर म्हणून कुणी छळ करो, बैल आणि हत्ती यांनी वेढला जावा व राजपद मिळो, मित्र जवळ येवो वा वैरी अंगावर धावून येवो, सूर्य जसा रात्र आहे का उजाडले हे जाणत नाही तशी त्याला त्या निंदास्तुतीची कल्पनाच येत नाही. साही ऋतु आले गेले तरी आकाशाला जसा त्यांचा लेप नाही तसा त्याच्या मनाला विषमतेचा स्पर्श होत नाही.

अर्जुना, त्याच्या ठिकाणी कर्ममात्राचा लोप झालेला दिसेल. प्रवृत्ति पूर्ण मावळून गेल्याकारणाने तो पुरुष कुठल्याही कर्माच्या प्रारंभाचा संकल्प करीत नाही आणि संकल्परहित कर्म घडत असल्याने त्या कर्माचे फळ स्वभावतःच दग्ध झालेले असते. इहलोक व परलोक यांच्यासंबंधीच्या कुठल्याही भोगाची आकांक्षा त्याच्या चित्तात उरली नसल्याने जे आपोआप प्रारब्धानेसमोर येऊन ठाकेल त्याचे तो सेवन करीत जातो. दगड जसा सुखदुःख जाणत नाही तसा तो सुखावत नाही, शिणत नाही. त्याच्या मनाने अमुक कर्म करावयाचे, अमुक करावयाचे नाही ही सांडीमांडी टाकूनच दिलेली असते. भोग भोगण्यासंबंधीची ही उदासवृत्ती गुणांचे उल्लंघन केल्यामुळे त्याला प्राप्त झालेली असते. आता ही गुणातीत अवस्था कशी प्राप्त होते ते सांगतो.

अर्जुना, ही अवस्था माझी अव्यभिचारी भक्ति केल्याने प्राप्त होते.

श्री गुरूदेवांचे चरित्रकार म्हणतात, "गुरूकृपा तोचि किली" हे मान्य करून प्रो. रानडे म्हणाले असते "भक्ति तोचि किली" गुरुदेवांच्यामते भक्ति हा सर्व सद्गुणाचा मुकुटमणि आहे. इतकेच नव्हे तर त्याचे उमगस्थान आहे. अध्यात्मिक पातळीवरून असे म्हणता येईल की सद्गुणाला असे स्वतंत्र स्थान नसून उत्कट भक्तीचाच तो एक अविष्कार होय. साधन मार्गात भक्ति व भगवत्प्राप्ति ही दोन्ही साधक एकदमच अनुभवितो.

देव पुढे म्हणाले, "मी कोण, माझी अव्यभिचारी भक्ति कशी, अव्यभिचारी भक्ति म्हणजे काय हे सगळे स्पष्ट झाले पाहिजे."

पार्था, पुन्हा एकदा सांगतो ऐक. रत्नाच्या ठिकाणचे तेज म्हणजे रत्नच, द्रवपणा म्हणजेच पाणी, अवकाश म्हणजेच आकाश, गोडी म्हणजेच साखर वेगळे नव्हे. अग्नी हाच जाळ, पाकळ्यांचे नावच कमळ, वृक्ष म्हणजेच फांद्या, फळे, फुले, बर्फ गोठून एकत्र झाले तोच हिमवंत, दूध विरजले तेच दही त्याप्रमाणे विश्व असे ज्याचे नाव तोच मी आहे. चंद्राच्या कळा वेगळ्या न सोलता पूर्ण चंद्र बिंब घ्यावे, तुपाचा घट्टपणा न मोडताच तूप घ्यावे, काकण न आटवता त्यातील सोने मान्य करावे, कापडातील सुते बाहेर न काढता सूत हेच वस्त्र हे जाणावे, घट फोडून त्याची माती करून मग माती न म्हणता घट, घट ह्या स्वरूपात असतानाच त्यातील मृत्तिका समजून घ्यावी म्हणून विश्वपण बाजूस काढून मग मला घ्यावे असे न करता विश्वासकटच मला जाणावे. मी विश्वच आहे व मीच विश्व आहे हे समजावे. यात भेद पहाणे याला व्यभिचार म्हणावयाचे. विश्वात आणि माझ्यात अभेद जाणणे यास अव्यभिचारी भक्ति म्हणावयाचे. भेद टाकून देऊन स्वतःसकट मला व विश्वाला वेगळे मागू नये. अर्जुना, सोन्याचीच टिकली सोन्यावर बसवली तर जमा अभेद. तसा अभेद मानावा. किरण तेजोमय असतो, तेजापासूनच निघतो. तेजाशीच संबद्ध असतो त्या किरणासारखा बोध असावा. पृथ्वीमध्ये परमाणु, हिमाचलात हिमकण त्याप्रमाणे माझ्यामध्ये अहं पहावे. तरंग लहान असला तरी समुद्रापासून अभिन्न असतो. तसा मी ईश्वरापासून वेगळा नाही. ह्या सामरस्याने जेव्हा दृष्टी विकसित होते तेव्हा त्या सामरस्य बुद्धिस "भक्ति" असे आम्ही म्हणतो. ही दृष्टी ज्ञानाचा चांगलेपणा व योगाचे सर्वस्व आहे. मेघ आणि समुद्र यांच्यामध्ये जशी अखंड जलधारा लागलेली असते तशी त्या गुणातीताची वृत्ती ब्रह्माशी अखंड जोडलेली असते. विहिरीचे तोंड आणि आकाश यांच्यामध्ये जसा सांधा असत नाही त्याप्रमाणे तो गुणातीत परब्रह्माशी समरस होऊन असतो.

प्रतिबिंबापासून बिंबापर्यंत प्रभेचा जसा एकसंधी सरळपणा असतो तशी ही सोहंवृत्ती अखंड असते असे समज. याप्रमाणे जीव ब्रह्म यांच्यामध्ये सोहंवृत्ती अवतरते त्यावेळी शेवटी ती सोहंवृत्तीदेखील नाहीशी होते. एक ब्रह्मरसच कोंडून रहातो. सैंधवाचा कण सिंधुमध्ये पडला की विरून जातो. तो विरून जावा म्हणून काहीही प्रयत्न करावा लागत नाही. तृण जाळून टाकल्यावर अग्नि विझूनच जातो. भेदाचा नाश करून पांडवा, अरे ज्ञानही उरत नाही. मी ईश्वर मायेच्या अलीकडे व माझा भक्त मायेच्या पलीकडे हा भेदच संपतो. अनादि ऐक्य जे मुळात आहेच ते सिद्ध होते. आणि मग तो पुरुष, तो माझा लाडका भक्त गुणांना जिंकतो, या गोष्टी बोलायलाही उरत नाहीत. फार काय सांगू अर्जुना, आता ह्या एकपणाला साक्षीही कोणी उरला नाही. अर्जुना, अशी अवस्था तीच ब्रह्मतदाकारता, जीवब्रह्मैक्य.

सख्या अर्जुना, धनुर्धरा, अशा लक्षणांनी जो भक्त माझी भक्ति करतो त्याची ब्रह्मता ही पतिव्रता होते. गंगेच्या ओघाचे पाणी डळमळत हिमाचलापासून निघते. त्याला एक सिंधुपदच जसे पोचण्याचे ठिकाण तसे जो माझी अशी ज्ञानदृष्टिने अभेदभावाने भक्ति करतो त्याला ब्रह्मतेच्या मुकुटातील चूडारत्न हे पद मिळते. या ब्रह्मत्वाला "सायुज्य" असे नाव आहे, आणि हाच चौथा पुरुषार्थ म्हणजे मोक्ष होय.

पण अर्जुना, माझे आराधन हे ब्रह्मस्थितीला पोचण्याचे साधन आहे असे मात्र चुकूनसुद्धा मनात येऊ देऊ नको. माझ्यावाचून ब्रह्म दुसरे नाही. ब्रह्म म्हणजे मीच. चंद्र आणि बिंब यांचे अभिन्नत्व त्याप्रमाणे चतुर अर्जुना, मी आणि ब्रह्म यांचे अभिन्नत्व आहे. दुजेपणच नाही. अर्जुना, ब्रह्म नित्य, अचल, प्रकट धर्मरूप, अमर्याद, सुखरूप व अद्वितीय असे आहे. विवेक आपले काम करून ज्या ठिकाणी प्राप्त होतो ते स्थान मी आहे.

सिद्धान्ताची परिसीमा असे हे स्थान मी आहे. तेव्हा ह्या माझ्या स्वरूपात तो गुणातील पुरुष अभेदभक्तिच्या आधाराने विलीन होतो."

"महाराज, ऐका, अनन्याचा सखा असा तो भगवंत पार्थाला असा बोध करता झाला."

संजयाचे हे बोलणे ऐकून धृतराष्ट्र म्हणाला, "संजया, अरे हे कशाला मला सांगत बसला आहेस? मी तुला विचारले आहे का? उगाच वायफळ गोष्टी कशाला सांगतोस मला? मला माझ्या मुलाच्या विजयाची काही बातमी सांगशील की नाही? ती सांगून माझी शंका दूर कर. बाकी कृष्णार्जुनांचा संवाद काय झाला हे ऐकून मला काय करायचे आहे?" राजाचे हे बोलणे ऐकून संजय मनात म्हणाला, "राजा त्या विजयाच्या गोष्टी सोडून दे." संजयाला मनात फार विस्मय वाटू लागला तो संतापून म्हणू लागला "काय चमत्कार आहे हो हा! काय ह्याचे हे देवाशी वैर! पण खरोखरच वाटते की, कृपाळू श्रीकृष्ण याच्यावर संतुष्ट होवो. यास आत्मानात्म विचार सेवन करण्याचे सामर्थ्य येवो आणि हा मोहरूपी महारोग बरा होवो."

मनात धृतराष्ट्राविषयी विचार करीत असता आणि संवादाचे चिंतन करीत असताना हर्षाचा महापूर त्याच्या चित्तात लोटला.

संजय त्या उत्साहाच्या आवेशाने श्रीकृष्णाचे बोलणे सांगेल. मी निवृत्तिनाथांचा शिष्य ज्ञानदेव त्या अक्षरातील अभिप्राय तुमच्यापर्यंत पोहोचवीन. ऐकावे महाराज.

***

॥ श्री ॥

## अध्याय पंधरावा

# पुरुषोत्तमयोग

॥ ॐ नमो भगवते वासुदेवाय ॥

श्रीभगवानुवाच—

ऊर्ध्वमूलमधःशाखमश्वत्थं प्राहुरव्ययम् ।
छन्दांसि यस्य पर्णानि यस्तं वेद स वेदवित् ॥ १ ॥

अधश्चोर्ध्वं प्रसृतास्तस्य शाखा गुणप्रवृद्धा विषयप्रवालाः ।
अधश्च मूलान्यनुसंततानि कर्मानुबन्धीनि मनुष्यलोके ॥ २ ॥

न रूपमस्येह तथोपलभ्यते नान्तो न चादिर्न च संप्रतिष्ठा ।
अश्वत्थमेनं सुविरूढमूलमसङ्गशस्त्रेण दृढेन छित्त्वा ॥ ३ ॥

ततः पदं तत्परिमार्गितव्यं यस्मिन्गता न निवर्तन्ति भूयः ।
तमेव चाद्यं पुरूषं प्रपद्ये यतः प्रवृत्तिः प्रसृता पुराणी ॥ ४ ॥

निर्मानमोहा जितसङ्गदोषा अध्यात्मनित्या विनिवृत्तकामाः ।
द्वन्द्वैर्विमुक्ताः सुखदुःखसंज्ञैर्गच्छन्त्यमूढाः पदमव्ययं तत् ॥ ५ ॥

न तद्भसयते सूर्यो न शशाङ्को न पावकः ।
यद्गत्वा न निवर्तन्ते तद्धाम परमं मम ॥ ६ ॥

ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः ।
मनःषष्ठानीन्द्रियाणि प्रकृतिस्थानि कर्षति ॥ ७ ॥

शरीरं यदवाप्नोति यच्चाप्युत्क्रामतीश्वरः ।
गृहीत्वैतानि संयाति वायुर्गन्धानिवाशयात् ॥ ८ ॥

श्रोत्रं चक्षुः स्पर्शनं च रसनं घ्राणमेव च ।

अनुक्रमणिका

अधिष्ठाय मनश्चायं विषयानुपसेवते ॥ ९ ॥

उत्क्रामन्तं स्थितं वाऽपि भुञ्जानं वा गुणान्वितम् ।
विमूढा नानुपश्यन्ति पश्यन्ति ज्ञानचक्षुषः ॥ १० ॥

यतन्तो योगिनश्चैनं पश्यन्त्यात्मन्यवस्थितम् ।
यतन्तोऽप्यकृतात्मानो नैनं पश्यन्त्यचेतसः ॥ ११ ॥

यदादित्यगतं तेजो जगद्भसयतेऽखिलम ।
यच्चन्द्रमसि यच्चाग्नौ तत्तेजो विद्धि मामकम् ॥ १२ ॥

गामाविश्य च भूतानि धारयाम्यहमोजसा ।
पुष्णामि चौषधीः सर्वाः सोमो भूत्वा रसात्मकः ॥ १३ ॥

अहं वैश्वानरो भूत्वा प्राणिनां देहमाश्रितः ।
प्राणापानसमायुक्तः पचाम्यन्नं चतुर्विधम् ॥ १४ ॥

सर्वस्य चाहं हृदि संनिविष्टो मत्तः समृतिर्ज्ञानमपोहनं च ।
वेदैश्च सर्वैरहमेव वेद्यो वेदान्तकृद्वेदविदेव चाहम् ॥ १५ ॥

द्वाविमौ पुरूषौ लोके क्षरश्चाक्षर एव च ।
क्षरः सर्वाणि भूतानि कूटस्थोऽक्षर उच्यते ॥ १६ ॥

उत्तमः पुरुषस्त्वन्यः परमात्मेत्युदाहृतः।
यो लोकत्रयमाविश्य बिभर्त्यव्यय ईश्वरः ॥ १७ ॥

यस्मात्क्षरमतीतोऽहमक्षरादपि चोत्तमः ।
अतोऽस्मि लोके वेदे च पथितः पुरुषोत्तमः ॥ १८ ॥

यो मामेवमसंमूढो जानाति पुरूषोत्तमम् ।
स सर्वविद्भजति मां सर्वभावेन भारत ॥ १९ ॥

इति गुह्यतमं शास्त्रमिदमुक्तं मयानघ ।
एतद्बुद्ध्वा   बुध्दिमान्स्यात्कृतकृत्यश्च भारत ॥ २० ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे

अनुक्रमणिका

श्रीकृष्णार्जुनसंवादे "पुरुषोत्तमयोगो नाम" पंचदशोऽध्यायः ॥ १५ ॥

श्रीकृष्णार्पणमस्तु ।

----------

**अनुक्रमणिका**

मालूताई, पंधरावा अध्याय तसा गीतेच्या श्लोकांच्या दृष्टीने लहान आहे. शाळातून हा लहानपणी पाठ करून घेतला जातो. माझी मैत्रीण सुधाताई जोशी सांगत होत्या की एका भारतीयास अमेरिकेत अपघाताने मृत्यू आला. आता अंत्यसंस्कार कसे होणार असा प्रश्न आला. तेव्हा सुधाताईंच्या पुतण्याने पंधरावा अध्याय म्हणत त्या भारतीयास निरोप दिला. सुधाताईंच्या पुतण्याचे ह्या कामगिरीबद्दल फार कौतुक झाले. संसाराचे अनित्यत्व दाखविणारा म्हणून हा अध्याय प्रसिद्ध आहे.

पण विचार केला तर हा अध्याय मरण म्हणजे काय हे शिकविणारा आहे, तसाच जीवन म्हणजे काय हेही शिकविणारा आहे असे वाटते. माउली संसाराच्या अनित्यतेचे सविस्तर वर्णन करून क्षरपुरुष, अक्षरपुरूष व पुरुषोत्तम याविषयी विवेचन करीत आहेत. ह्या तिघांचे स्वरूप प्रकट करून दाखवत आहेत आणि म्हणत आहेत की, पुरूषोत्तमाशी ऐक्य साधणे हे आपले काम आहे आणि हे ऐक्य साधण्याचा सोपा मार्ग जीव शोधत असतो. पूज्य सत्यदेवानंदसरस्वतींना एकदा आम्ही म्हटले होते की, “स्वामीजी मार्गात प्रगती होते आहे की नाही, हे आमचे आम्हाला कसे कळणार?” स्वामीजी म्हणाले, “अखंड मौनजप, अखंड अनुसंधान सुरू झाले की नाही यावर लक्ष ठेवावयाचे. ज्या प्रमाणात जप होत असेल त्या प्रमाणात प्रगती होते आहे असे समजावयाचे.”

क्षराक्षराचा त्याग करून आपण त्या उत्तम पुरुषाच्याजवळ जात आहो याची ही खूण स्वामीजींनी सांगितली होती आणि त्या दृष्टीने ह्या अध्यायाचा अभ्यास करावयाचा.

श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या दृष्टीने ज्ञानकांडाचा व पर्यायाने गीताशास्त्राचा पंधरावा अध्याय हा शेवटचा व महत्त्वाचा अध्याय आहे.

प्रथम संसार किती अनित्य आहे त्याचे वर्णन करून ज्याला त्याची अनित्यता कळली, पटली त्याने त्या संसारवृक्षाच्या अस्तित्वाच्या भ्रमाचा तात्काळ त्याग केला पाहिजे असे माउली म्हणतात.

ज्याची मुळे वर आणि फांद्या खाली आहेत अशा अद्भुत अश्वत्थ वृक्षाच्या रुपकाने देव संसारवृक्षाचे वर्णन करीत आहेत.

ते पुढे म्हणतात, “मात्र तो मुळातच खोटा असल्याने त्याचा नाश करण्यास इतर कुठलेही उपाय लागू पडत नाहीत, यथार्थ ज्ञान हाच एकमेव उपाय आहे. हे ज्ञान प्राप्त होण्यासाठी वैराग्याची जोड असणे आवश्यक आहे.

अज्ञानी लोकांना आत्माच मरतो आणि पुन्हा जन्म घेतो असे वाटते. पण वास्तविक हे जन्ममृत्यूचे धर्म देहाचे म्हणजे प्रकृतीचे आहेत, आत्म्याचे नाहीत हे ज्ञानी पुरुष जाणतात. हे विरक्त मुमुक्षु अपरोक्षानुभूतीने त्या प्रकृतीचा त्याग करून आत्मस्वरूप पहातात.

जगात क्षर आणि अक्षर हे दोन पुरुष आहेत. क्षरपुरुष ज्ञानदृष्टिहीन, देहासक्त व उपाधितंत्र तर अक्षरपुरुष सर्वांगाने परिपूर्ण आहे. या दोघांहून अगदी वेगळा, श्रेष्ठ, उपाधिरहित असा तिसरा उत्तम पुरुष आहे व तो प्रगट झाला की क्षर व अक्षर ह्या दोन्ही पुरुषांस त्यांच्या उपाधीसह गिळून टाकतो.

देव म्हणतात की, हा उत्तम पुरूष माझे रूप आहे आणि गीता ही लक्ष्मी आहे. तिने क्षर व अक्षर हे दोघे पुरुषच नव्हेत असे म्हणून त्यांचा त्याग केला आणि मला पुरुषोत्तमाला माळ घातली. ह्या अध्यायातील ओवी नित्य पाठांत असावी ती अशी आहे.

**साचचि बोलाचे नोहे हे शास्त्र । पै संसारु जिणते हे शस्त्र ।**
**आत्मा अवतरिविते मंत्र । अक्षरे इये ।** (ओ. ५७७)

"आता शुद्ध अंतःकरण हाच एक चौरंग करून त्यावर श्रीगुरूंची पावले बसवू" असे माऊली म्हणतात.

यातील "आता" या शब्दाबद्दल विचार केला तर असे वाटते की ज्ञानदेवांना काही विशेष विचार सांगावयाचा आहे आणि तो म्हणजे—

चौदाव्या अध्यायातील गुणातीताचे विवेचन यापुढे कायम डोळ्यापुढे ठेवायला हवे आहे. आपल्या दैनंदिन जीवनक्रमात बारीक नजरेने आपल्या प्रकृतिगत गुणांची लीला पहातपहात आपण त्या खेळापासून कसे पूर्ण अलिप्त आहो याचा अनुभव घ्यावयास हवा आहे.

पूज्य सत्यदेवानंदसरस्वतींनी मलकापूर मुक्कामी वहिनीसाहेब सुर्वे, सुधाताई जोशी व मी तिघींना उद्देशून म्हटले होते, "अभ्यासाची दिशा अशी की देहाला आंघोळ घालायची आहे, जेवायला घालायचे आहे, झोपवायचे आहे अशा वृत्तीतून ह्या सर्व क्रिया करण्याची सवय करावयाची." "मी ब्रह्म आहे." "सोऽहं सोऽहं" या बोधावर परतून क्षणाक्षणास यावयाचे. चार पत्रे लिहायची असली तर एक पत्र लिहून झाले की बोधावर यावयाचे आणि मग दुसरे सुरू करावयाचे. म्हणजे हळूहळू देहापासून "मी निराळा, मी निराळा" हा अनुभव येईल.

आम्ही विचारले, "स्वामीजी, ही जागृत अवस्थेतील अभ्यासाची दिशा झाली. पण भाऊसाहेबमहाराज उमदीकरांच्या नेमाविषयी ज्यांनी गोष्ट सांगितली ते गोखले भटजी म्हणाले होते. निद्रेतही नामस्मरण होत राहिले पाहिजे. हे कसे घडते?" स्वामीजी हसून म्हणाले, "पाण्यामध्ये मासा झोप घेतो कैसा? ॥ जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे ॥" ही अवस्था शब्दात कशी सांगता येईल? पण देहाला विश्रान्ती द्यायची आहे ह्या भावाने तो देह बिछान्यावर ठेवला की देह झोपतो. आपण जागेच आहो असा अनुभव येतो आणि नामस्मरण घडते. अशा अवस्थेत दोन तास झोप पुरते."

पूज्य स्वामी स्वरूपानंदांच्या एका पत्रात आहे, "आता अगदी थोडक्यात परवाची मौज लिहितो. सकाळी जागृत झाल्याबरोबर निश्चय ठरला की सर्व व्यवहार 'स्वस्थ' राहून करावयाचा. उठताच कार्याला

आरंभ झाला. नळावर तांब्या भरण्याची क्रिया चालली होती. तांब्या क्षणाक्षणानी भरत होता, तसतसा भजनमार्गाने एक एक पाऊल पुढे जात होतो. काही क्षणांनी तांब्या भरला व मी नळाची तोटी बंद केली आणि केव्हा न कळे माझा स्वस्थपणा सुटला तो सुमारे तीन-चार मिनिटे. क्षणात स्मरण तर क्षणात विस्मरण अशी त्या दिवशी मोठी मौज चालली होती. जेवताना चार घास घशाखाली घातले तोच पापडाने तोंडघशी पाडले. अपोष्णीच्या वेळी आठवण तर आंचवताना विस्मरण! भोजनोत्तर एका गृहस्थाकडे लिहिण्यासाठी जावयाचे होते. रस्ता घटकाभराचा होता. आता सुंदर संधी मिळाली म्हणून समाधान वाटते होते. परंतु चार पावले चाललो तो पुन्हा विस्मरण! त्या दिवशी संध्याकाळी मला समजून आले की भजनाचे स्मरण आणि विस्मरण सांसारिक किंवा व्यावहारिक कार्याच्या जबाबदारीवरच सर्वस्वी अवलंबून असते असे नाही. व्यवहारात सांसारिक जबाबदारीचे काम करावयाचे असले तर भजन कमी प्रमाणात होते. हा अनुभव खरा. परंतु अगदी साध्या गोष्टी करीत असतानाही भजनाचा विसर पडावा हे आश्चर्य!"

पूज्य स्वामीजींनी हे पत्र २०-१-१९२९ ला लिहिले आहे. तसेच एक पत्र १०-१०-१९६२ रोजी लिहिले आहे. त्यात ते लिहितात, "साधकाने आपल्या मनाचे, बुद्धिचे खेळ कसकसे चालत असतात, हे शांतपणे, अलिप्तपणे पहावयाला पाहिजेत. अंतःकरणात धर्माधर्माच्या, नीति-अनीतिच्या, पाप-पुण्य, सुख-दुःख यासंबंधीच्या वृत्ती कशा निर्माण होत असतात यांचे शांतपणे, स्वस्थपणे, अवलोकन करावयास हवे." "विषयजनित सुखे सुख होणार नाही." ही कल्पना साधकाला आली, पटली तरी विषय त्याला पुन्हा पुन्हा आपल्याकडे ओढीत असतात. म्हणून त्याने आपल्या मूळ स्वरूपाचे, स्वस्वरूपाचे चिंतन करीत हा सृष्टीचा त्रिगुणात्मक खेळ, मायेचा खेळ, सावधपणे पहात असावे. हे स्वरूपाचे चिंतन, हे सोऽहं ध्यान, हे भजन सहजतेने अखंड व्हावयास हवे. चालताना-बोलताना, लिहिताना-वाचताना, खाताना-पिताना सर्व व्यवहार होत असता हा सावधपणा पाहिजे. साधनाभ्यासानेच मन हळूहळू निवृत्त होऊन शांत होते व साधकास परमार्थाचा लाभ होतो.

परमार्थ म्हणजे अखंड प्रसन्नता, परमशांति! ह्या परमशांत अवस्थेत साधक सोऽहं ध्यानाने परमात्मरूपाशी समरस होऊन त्याला ह्या विश्वाच्या दृश्य पसाऱ्यात आपणच ओतप्रोत भरून राहिलो आहे, विश्वरूपाने आपणच नटून राहिलो आहो असा प्रत्यय येतो व तो सुखदुःखातीत अखंड आनंदात निमग्न होऊन रहातो. किंबहुना आनंदरूपच होतो. आता ह्या विश्वरूपात्मकतेचे भान कशावर अवलंबून असते असे नाही. Autobiography of a Yogi ह्या पुस्तकात योगानंदजी लिहितात, एके दिवशी लाहिरी महाशय आपल्या शिष्यांना भगवद्गीता समजावून सांगत होते. कूटस्थ चैतन्य म्हणजे काय हे समजावून देत होते. एकदम लाहिरी महाशयांना धाप लागली. ते ओरडले, "अरेरे, जपानच्या किनाऱ्याजवळ अनेक जिवात्म्यांच्या शरिरात मी बुडतो आहे."

दुसरे दिवशीच्या वृत्तपत्रात बातमी होती की, "जपानच्या किनाऱ्याजवळ बोट बुडून अनेकांना मृत्यू आला." कूटस्थ चैतन्य आणि महाचैतन्य हे अविभक्त कसे आहे याचा लाहिरी महाशयांनी शिष्यांना जणू काय वस्तुपाठच दिला. शिवाय ते शिष्यांना म्हणत, "तुम्ही जेव्हा क्रियायोगाचा अभ्यास करता तेव्हा मी तुमच्या जवळच असतो. "

अशी सद्‌गुरुकृपा झाल्यावर अभ्यास दृढ होत जातो आणि गुणातीत, द्वंद्वरहित अशी अवस्था शिष्याला प्राप्त होते. माउली सुचवत आहेत की आधी सतत अभ्यासाने अंतःकरण शुद्ध झाले पाहिजे आणि मग आपल्या मनात ती सद्‌गुरूंची पावले स्थिर केली पाहिजेत. “आता” या शब्दाने ही अवस्था माउलींनी सूचित केली आहे.

ज्ञानदेव म्हणतात, “शुद्ध अंतःकरणाच्या चौरंगावर श्रीगुरूंची पावले ठेवून पूजा करूया. ओंजळीत सर्व इंद्रियांच्या कमळकळ्या भरून त्या पुष्पांजलीने अर्घ्य देऊया. एकनिष्ठतेच्या शुद्ध पाण्याने गुरूंना स्नान घालूया आणि त्यांच्याविषयी असलेल्या वासनेचे गंध अनामिकेने त्यांना लावू या. प्रेमरूपी सोन्याच्या लगडीतून तयार केलेली नृपुरे गुरूंच्या सुकुमार पायात लेववू या. अनन्यतेने शुद्ध झालेले प्रेम ही रणजोडवी गुरूंच्या पायाच्या अंगठ्यात घालूया. आनंदरूपी सुवासाने भरलेली आणि सात्विक भावांनी उमललेली कमळाची कळी पायावर वाहू. पूजास्थानामध्ये अहंभावाचा धूप जाळू आणि नाहं तेजाने गुरूंना ओवाळू. समरसतेने गुरूंचे पाय पोटाशी धरू श्रीगुरूंच्या दोन पायात देह आणि प्राण या खडावा घालू. पारत्रिक भोग व मोक्ष यांची गुरुचरणावरून कुरवंडी करून टाकू.

या गुरुचरणसेवेमुळे आम्ही धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चारी पुरूषार्थांच्या सिंहासनावर राज्यभिषेक होण्याच्या दैवाला प्रात्र होऊ. केवळ चारी पुरूषार्थांचाच आम्हाला लाभ होणार असे नाही तर ब्रह्मपदाची विश्रान्ती मिळेपर्यंत आमच्या ज्ञानाचा उत्कर्ष होईल. आमच्या वाचेला इतकी गोडी प्राप्त होईल की जसा काही अमृताचा समुद्रच आहे. कोट्यवधि पूर्णचंद्र वक्तृत्वावरून ओवाळून टाकावे अशी गोडी अक्षरा अक्षरात उतरेल. पूर्वेकडे सूर्य उगवतो पण सगळ्या जगाला प्रकाशाचे राज्यपद मिळते त्याप्रमाणे श्रोत्यांना आणि वक्त्याला आनंदाची दिवाळी होईल. त्या गुरूसेवेमुळे प्राप्त झालेल्या दैवाने असे शब्द स्फुरतील की त्यांच्यापुढे नादब्रह्म ठेंगणे वाटेल आणि मोक्षाचा प्रकाशही मंद वाटेल, श्रवणसुखाच्या मांडवामध्ये जगाला वसंत ऋतूचा आनंद अनुभवता येईल अशी ही मोगरीची वेल फुलेल.

शब्द आणि मन ह्यांना देवाचा कुठे पत्ताच लागत नाही. म्हणून शोध घेऊन हिरमुसून परत येतात पण श्रीगुरुकृपाप्रसाद झाला की तोच आजवर न सापडलेला देव शब्दांचा विषय होतो, शब्दांत सापडतो.

ज्ञानाला जे कळत नाही, ध्यानामध्ये जे सापडत नाही, दृष्टिला जे दिसत नाही, ते ब्रह्म वाणीमध्ये प्रगट होते. हा केवढा चमत्कार आहे! श्रीगुरुचरणरूपी कमलातील परागाचा लाभ झाला की वाणीला इतके सौभाग्य प्राप्त होते.

आता जास्त काय सांगू? आज ते दैव माझ्याशिवाय अन्य ठिकाणी कुठेच कुणाला लाभलेले नाही असे मी ज्ञानदेव म्हणतो. मी श्रीगुरूंचे तान्हे मूल आहे, माझ्या गुरूंना मी एकटाच पुत्र आहे आणि म्हणून त्यांच्या कृपेला एकुलते एक ठिकाण झालो आहे. मेघ आपली वृष्टि त्या चातकाच्या स्वाधीन करतो त्याप्रमाणे त्या माझ्या स्वामींनी आपल्या सगळ्या कृपेचा वर्षाव माझ्यावर केला आहे. ती कृपा झाल्याबरोबर शास्त्रांचा कधी अभ्यासही न केलेले माझे रिकामे तोंड सहज बडबड करू गेले तर त्या बोलण्यात त्याला गीताशास्त्रासारखे गोड शास्त्र सापडले. अदृष्ट, अनुकूल असले की वाळूच रत्ने होऊन उलटते. आयुष्याची दोरी बळकट असली तर जीव घेण्यासाठी आलेला मनुष्यच जिवापाड लोभ करू लागतो! आधणात वाळूचे खडे वैरले आणि भगवंताच्या मनात

अनुक्रमणिका

तुमच्या भूकेची वेळ निभावून न्यावी असे आले तर त्या खड्यांचेच अमृतासारखे गोड तांदूळ होतात. श्रीगुरु भगवंताचेच रूप असल्याने ते जेव्हा एखाद्याचा अंगिकार करतात तेव्हा सगळा संसारच मोक्षमय करून टाकतात.

पहा, त्या नारायणाने त्या पांडवाच्या ठिकाणी असलेल्या वैगुण्यांना विश्ववंद्य पुराणाची योग्यता आणून दिलीच ना? त्याप्रमाणे मी पुरा अज्ञानी असताना श्रीनिवृत्तिनाथांनी ते अज्ञानपणच ज्ञानाच्या योग्यतेला आणून ठेवले. मुळातली वस्तु निंद्य, त्याज्य, दुःखदायक असली तरी समर्थाचा स्पर्श झाला की त्या वस्तूंचे स्तुत्य सुखदायक रूप होते.

अक्कलकोट स्वामी समर्थांच्या चरित्रातील एक प्रसंग आठवतो. बसाप्पा तेली नावाचा समर्थांचा एक शिष्य आपल्या दारिद्र्याचे गाऱ्हाणे नेहमी समर्थांना सांगत असे. एकदा समर्थ त्याला घेऊन रानात गेले आणि बसाप्पा पहातो तो सगळीकडे सापच साप. समर्थ म्हणाले, "तेल्या उचल ह्यातले हवे तेवढे" बसाप्पाने भीत भीत एक साप कसाबसा उपरण्यात गुंडाळून घेतला. घरी जाऊन उपरणे झाडून पहातो तो चोख सोन्याची लगड! गुरुकृपेने अशी किमया होते असा महिमा माउलींनी वर्णन केला आणि म्हटले, "पण ते आता असो. वर्णन केले की प्रेम मळून जाते, आणि तसे म्हटले तर यथार्थ वर्णन करावे असे मला ज्ञान तरी कुठे आहे? पण आता श्रीगुरूंच्यांच आशीर्वादाने गीतेतील अभिप्राय सांगून आपणा संताची मी सेवा करीन."

काय झाले की चौदाव्या अध्यायाच्या शेवटी कैवल्यपती श्रीकृष्णांनी असा निर्णय केला की शंभर यज्ञ करणाऱ्याच्या हाती स्वर्गाची संपत्ती येते. त्याप्रमाणे ज्याला ज्ञान हस्तगत झाले, तोच मोक्ष मिळवण्यास समर्थ होतो. लागोपाठ शंभर जन्म जो ब्रह्मकर्म करतो तोच ब्रह्मदेव होतो. दुसरा कोणी होत नाही. डोळसालाच सूर्यप्रकाशाचा लाभ होतो, नेत्रहीनाला होत नाही. त्याप्रमाणेच ज्ञानानेच मोक्ष मिळण्याची योग्यता प्राप्त होते. पण हे ज्ञान मिळविण्यासाठीसुद्धा योग्यता हवीच. एक मजेची गोष्ट मामासाहेब दांडेकरांच्या चरित्रात आहे. एका विद्यार्थ्याला ते संस्कृत व्याकरण शिकवत होते. राम व हरि हे दोन शब्द पुल्लिंगी असून एक अकारान्त व दुसरा इकारान्त आहे. हे त्यांनी समजावून दिले. राम शब्द-रामः रामौ रामाः असा चालतो व हरि शब्द-हरिः हरी हरयः असा चालतो याची त्यांनी दहा-वीस वेळा संथा दिली. शेवटी विचारले, "काय रे, राम हा शब्द चालवून दाखव!" मुलाने उत्तर दिले, "हरिसारखा चालतो." मामा म्हणाले, "हे बघ, मी आजपर्यंत कुणाजवळ गुरुदक्षिणा मागितली नाही, परंतु आज तुझ्याजवळ मागतो. तू मोठा झालास आणि कोणी तुला विचारले की तू संस्कृत कोणाजवळ शिकलास तर कृपा करून दांडेकराजवळ शिकलो असे सांगू नकोस. एवढीच गुरुदक्षिणा मागावयाची आहे."

ह्या मजेच्या गोष्टीवरूनही कळते की ज्ञान ही वाटेल त्यास सहज मिळणारी गोष्ट नाही. त्याला योग्यता हवी. आणि ज्ञानदेव म्हणतात, "की ज्ञानास योग्य कोण हे पहाता-पहाता एकजणच सापडला आणि तो म्हणजे विरक्त पुरुष, पाताळामधला खजिना डोळ्यात अंजन घातले की, दिसेल पण ते डोळे पायाळू माणसाचे हवे. जे मन विरक्त असेल तेच शुद्ध असू शकते. तेव्हा वैराग्यावाचून मनःशुद्धि नाही आणि मनशुद्धिवाचून ज्ञान नाही. म्हणजेच विरक्तिवाचून ज्ञान नाही असा भगवंताचा पक्का निर्णय आहे. कोणत्या प्रकारच्या विरक्तिने येऊन मनाला माळ घातली पाहिजे याचाही देवानी विचार करून ठेवला. देव सर्वज्ञच आहेत. तेव्हा विचाराची सर्व

भूमिका त्यांनी पक्की बांधून घेतली आहे. ते म्हणाले, “एखादा मनुष्य जेवायला बसणार आहे, पानात पक्वान्नेही वाढलेली आहेत, पण अशावेळी कुणी त्याच्या कानात सांगितले की, “अहो, ह्या पक्वान्नात जालीम विष मिसळलेले आहे. तर तो जेवणारा तात्काळ उठून जातो, “चार घास खाऊन बघतो” असे म्हणत नाही. त्याप्रमाणे समस्त संसाराची अनित्यता मनाला पटली की वेगळा वैराग्याचा विचार आणावा लागत नाही. वैराग्यच हात धुऊन त्याच्या मागे कायम लागते. दडवतो म्हटले तरी ते जात नाही. तेव्हा मुख्य गोष्ट अशी की पार्था, ह्या संसाराची क्षणभंगुरता माणसाला पटली पाहिजे. ज्या संसारावर त्याचा इतका लोभ आणि भरवंसा आहे तो किती फसवा आणि फाटका आहे हे कळले की तो त्या संसाराच्या लोभाचा तात्काळ त्याग करील.” तेव्हा आता तो विश्वेश ह्या पंधराव्या अध्यायात वृक्षाच्या रूपकाने जगाचे अनित्यत्व कसे आहे हे वर्णन करून सांगत आहेत.”

महाभारतात अनुगीतेमध्ये दोनदा ब्रह्मवृक्ष किंवा ब्रह्मवन याचे वर्णन सांख्यांच्या तत्त्वांना धरून केलेले आहे. ब्रह्मवृक्ष म्हणजे संस्कृतीचा पिंगा किंवा प्रकृतीचा अगर मायेचा पसारा होय. ह्याला वृक्ष म्हणण्याची वहिवाट फार प्राचीन म्हणजे वेदापासून आहे. या वृक्षाचे मूळ परब्रह्म वर आणि शाखा म्हणजे दृश्यसृष्टीचा पसाराखाली एवढेच वर्णन वेदात केले आहे. उपनिषदात यासच सनातन अश्वत्थ वृक्ष असे म्हटले आहे.

महाभारतात असे म्हटले आहे की अव्यक्त (प्रकृति) हे ज्याचे बी, बुद्धि (महान) हे ज्याचे खोड, अहंकार हा ज्याचा मुख्य पल्लव, मन व दहा इंद्रिये ही ज्याच्या आतल्या ढोल्या (सूक्ष्म), महाभूते (पंचतन्मात्रा) या ज्याच्या मोठ्या शाखा आणि विशेष म्हणजे स्थूल महाभूते ह्या ज्याच्या आडशाखा किंवा डहाळ्या असा हा नेहमी पाने, फुले व शुभाशुभ फळे धारण करणारा, सर्व प्राणिमात्रांना आधारभूत असा पुरातन मोठा ब्रह्मवृक्ष आहे. याला तत्त्वज्ञानरूपी तरवारीने छेदून व त्याचे तुकडे तुकडे करून ज्ञानी पुरुषाने जन्म, जरा व मृत्यू उत्पन्न करणारे संगरूपी पाश तोडावे आणि ममत्व बुद्धि व अहंकार यांचा त्याग करावा म्हणजे तो निःसंशय मुक्त होतो.

पूज्य लोकमान्यांनी भगवद्गीता रहस्यामध्ये असे अवतरण घेतले आहे. त्यांनी म्हटले आहे की, “हे वैदिक वर्णन आणि सांख्यांची तत्त्वे यांची जोड घालून गीतेतील अश्वत्थ वृक्षाचे वर्णन बनविले आहे.”

तेव्हा माऊली म्हणतात, “देव म्हणाले, उन्मळून पडलेले झाड शेंडा खाली, बुडखा वर, असे पडले की लौकरच सुकून नाहीसे होते. पण हा संसारवृक्ष तसा नव्हे, हे अर्जुना, नीट ध्यानात घे” असे म्हणून आनंदाचा महासमुद्र, पौर्णिमेचा पूर्ण चंद्र, अशा द्वारकाधीश श्रीकृष्णांनी, वृक्षाचे रूपक योजून ह्या प्रपंचाचा जणू हिशोबच मांडला आहे ते संसारातील जन्ममृत्यूरूपी येरझार संपविण्यासाठी संसाराचे मिथ्यात्व प्रथम दाखवून आत्मस्वरूपाच्या ठिकाणी स्थिर होण्याचा मार्ग स्पष्ट करीत आहेत. पंधराव्या अध्यायात हाच विषय आहे व ह्या ग्रंथातील हे सगळे चांगले सिद्धान्त विस्ताराने आता स्पष्ट केले जातील. श्रोते सज्जन हो, आपण हे विवेचन जीव लावून ऐकावे.

देव म्हणाले, “अरे पंडुकुमरा, स्वरूपाच्या घरी येताना विश्वाचा आभास अडथळा करतो. स्वरूपापर्यंत जीवाला पोचू देत नाही.”

अनुक्रमणिका

आणि एकदा का ती स्वरूपस्थिती प्राप्त झाली की मग ती जीवाला विश्वाभासामध्ये परत येऊ देत नाही. श्रीरामकृष्ण परमहंस म्हणत माझ्या मनाची स्वाभाविक गती ऊर्ध्व दिशेकडे म्हणजे निर्विकल्प अवस्थेकडे आहे. एकदा समाधी लागली म्हणजे तीतून उतरण्याची मनाची इच्छा नसते म्हणून तुमच्यासाठी त्याला जबरदस्तीने खाली आणावे लागते. परंतु काही एखादी वासना शिल्लक असल्याशिवाय त्याला खाली आणता येत नाही. म्हणून "तमाखू पाहिजे." "पाणी प्यायचे आहे." "अमक्याला भेटायचे आहे" अशी एखादी लहानसहान वासना मनात जेव्हा काही काळ घोळत ठेवावी तेव्हा कुठे ते हळूहळू खाली उतरते. एखादे वेळी खाली उतरता-उतरता ते मध्येच पुन्हा आपले मूळ पदाकडे (निर्विकल्प अवस्थेकडे) धाव घेते. मग पुन्हा एखाद्या वासनेचा जप करावा लागतो आणि पुन्हा त्याला खाली ओढावे लागते."

केवळ सगुणाच्या अनुभवाने त्यांना समाधान वाटेना म्हणून त्यांनी ही अवस्था जगदंबेजवळ हट्ट मागून घेतली होती. एकदा ते आईला म्हणाले, "आई, या साऱ्या सगुणभावांना विच्छेद आहे. जिला विच्छेद नाही अशी माझी अवस्था कर" तेव्हा अखंड सच्चिदानंद अवस्था त्यांना प्राप्त झाली. मनातला सगळा भक्तिभाव नाहीसा होऊन गेला. भक्तांची आठवणही येईनाशी झाली. डोके जड होऊन गेले. प्राण जातो की काय असे वाटू लागले. निर्विकल्प अवस्थेतून मन जेव्हा थोडेसे खाली उतरे तेव्हा प्राण कासावीस होई. असे वाटायला लागले की आता जिवंत तरी कशाच्या आधारावर रहायचे! तेव्हा मग मन भक्तांकडे, भक्तिकडे पुन्हा लागू लागले. मग ते ज्याला त्याला विचारीत हिंडू लागले, "हे मला असे काय झाले आहे?"

भोलानाथ म्हणाला, "याचे कारण भारतात सांगितले आहे. समाधिमग्न पुरुषाचे मन जेव्हा समाधीतून परत फिरते तेव्हा ते कशाच्या आधाराने रहावे म्हणून मग ते भक्त व भक्ती यांच्या ठिकाणी रमू लागते" आणि खरोखरच १८७६ पासून श्रीरामकृष्ण चोवीस तास भावसमाधीतच राहू लागले. त्यांच्या तोंडचे शब्द क्वचित् ऐकायला मिळत.

तेव्हा देव तीच प्रक्रिया उलट्या बाजूने सांगत आहेत की, "पार्था विश्वाभास स्वरूपदर्शनाच्या आड येत असतो. हा विश्वरूपी संसार नव्हे तर एक महावृक्ष बळावला आहे, असे समज.

पण तो इतर वृक्षांसारखा नाही. सामान्य वृक्षाची मुळे खाली आणि शाखा वर असतात. जमीन ही ह्या वृक्षाची माता आहे. ती त्याचे भरण, पोषण, संरक्षण करते. पण ह्या संसारवृक्षाची माता आकाश आहे, शून्य आहे म्हणून त्याची मुळे वर आणि शाखा खाली पसरत आल्या आहेत. सामान्य वृक्ष आगीने जाळून टाकता येतो, कुऱ्हाडीने तोडून नाहीसा करता येतो. मूळाशी घाव घातले किंवा अग्नी घातला की त्याचा विस्तार वर किती का असेना तो क्षणार्धात खाली घेता येतो. पण हा आकाशातून निर्माण झालेला वृक्ष कसा तोडणार? कसा पाडणार? कसा नष्ट करणार? त्याचा नाश बाह्य उपायांनी होण्यासारखा नाही. ते काम साधा वृक्ष तोडण्यासारखे सोपे नव्हे.

काय ह्या अद्भुत  वृक्षाचा चमत्कार सांगावा? ह्या वृक्षाची वाढ अधोमुख आहे. मोजता येत नाही, गणित करता येत नाही अशा उंचीवर सूर्य असतो पण त्याचे किरण भूमीवर येऊन पसरतात. त्यासारखे ह्या

संसारवृक्षाचे स्वरूप आश्चर्यकारक आहे. कल्पान्तीच्या पाण्याने आकाशसुद्धा व्यापले जाते तसे जे आहे आणि नाही ते सगळेच्या सगळे या वृक्षाने व्यापून टाकले आहे. सूर्य मावळला की रात्र अंधाराने आकाश कोंदून टाकते त्याप्रमाणे ह्या एकाच वृक्षाने आकाश व्यापून टाकले आहे. अर्जुना त्याचे फळ खाऊ म्हटले तर त्याला फळ येतच नाही. फुलाचा वास घेऊ म्हटले तर फूल धरत नाही. पंडुसुता पहावे तिकडे हा वृक्षच भरून राहिलेला आहे असे दिसते.

याचे मूळ वरती आहे पण उपटून पडल्याने ते मूळ वर गेलेले नाही. तो वृक्ष वरूनच खाली आला आहे त्यामुळे त्याची पाने आणि शाखा सतत हिरवीगार असतात. त्याला उर्ध्वमूळ असे म्हटले आहे खरे पण तो नुसता उर्ध्वमूळ नाही त्याला खालीसुद्धा पुन्हा मुळे आहेतच. झपाट्याने वाढणाऱ्या लव्हाळ्याप्रमाणे त्याची वेगाने वाढ होत असते. वडाला किंवा पिंपळाला जशा पारंब्यामध्ये डहाळ्या असतात त्याप्रमाणे त्याला खाली फक्त फांद्या आहेत असे नाही तर धनंजया, उर्ध्व दिशेलासुद्धा त्याला वर शाखांचे समुदाय विस्तारलेले दिसतात.

हा संसारवृक्ष म्हणजे जणू काही आकाशच वेलाच्या रुपाने नटले आहे. क्षणभर वाटते की वाहत्या वाऱ्यानेच ह्या वृक्षाचे रूप घेतले आहे. कधी वाटते की जागृति, स्वप्न, सुषुप्ति ह्या अवस्थात्रयाचाच ह्या वृक्षाच्या रूपाने उदय झाला आहे. पार्था, हा घनदाट उर्ध्वमूळवृक्ष असा उदयास आला आहे असे समज.

आता उर्ध्व म्हणजे काय? संसारवृक्षाचे जे मूळ त्याचे लक्षण काय? त्याचा खाली वाढण्याचा स्वभाव का आहे? याच्या फांद्या कशा आहेत? ह्या वृक्षाच्या मूळ्या कोणत्या आणि कशा? या संसारवृक्षाची प्रसिद्धी अश्वत्थ म्हणून कोणत्या कारणासाठी आहे? या सर्व प्रश्नांबाबत निर्णय होणे आवश्यक आहे. तसेच मग ह्या अशा अद्भूत प्रचंड वृक्षाबद्दल आत्मज्ञानी लोकांनी काय निर्णय केला आहे हेही तुला सांगावयास हवे. तुला समजेल अशाप्रकारे हे सगळे सांगितले जाईल. तेव्हा अर्जुना, तू हे विवेचन सर्वांगाचे कान करून ऐक बरं का.

भाग्यवंता अरे हा सगळा विषय तुला सांगण्याजोगाच आहे; म्हणून मी सांगतो आहे तू अगदी अंतःकरण देऊन ऐक म्हणजे झाले.

यादववर श्रीकृष्णांनी प्रेमरसाने भरलेले हे भाषण केल्याबरोबर अर्जुनाचे अवधान चौगुणी वाढले किंबहुना अर्जुन अवधानाची मूर्तीच झाला.

अहो सज्जन श्रोते हो, चमत्कार असा की ते देवाचे निरूपण सानुले वाटावे एवढी अर्जुनाच्या अवधानाची व्याप्ती वाढली. दाही दिशांनी आकाश आपल्या कवेत घ्यावे आणि आलिंगन देऊन आपल्यामध्ये सामावून टाकावे त्याप्रमाणे अर्जुनाच्या अवधानाने देवाचे विवेचन आपल्या पोटात सहज सामावून घेण्यास सुरवात केली. श्रीकृष्णाचे बोलणे समुद्रासारखे अमर्याद खरे पण त्या समुद्राच्या पाण्याचे आचमन घेणाऱ्या अगस्तीसारखे अर्जुनाचे अवधान सामर्थ्यशाली झाले. अर्जुनाची अमर्याद उत्कंठा पाहून देवाना अतिशय सुख झाले. त्यांनी ते सुखच हातात घेतले आणि त्या आपल्या लाडक्याची दृष्ट काढली! ते म्हणाले, "धनंजया, ते ब्रह्म वर आहे उर्ध्व आहे, हा वृक्ष खाली आहे, म्हणून सापेक्षभावाने त्या ब्रह्मास उर्ध्व असे म्हणावयाचे. एरवी त्या ब्रह्माच्या ठिकाणी

वरचा, मधला, खालचा असे भेदच नाहीत. फार काय सांगू, तो अद्वितीय आहे याबद्दल सर्वांची एकवाक्यता आहे.

ब्रह्माचे स्वरूपच असे की ते कानाला विषय न होणारा नाद, नाकाला न कळणारा सुगंध, भोगाशिवाय प्रगट होणारा आनंद आहे. ब्रह्माला अलीकडे-पलीकडे. पुढे-मागे सगळीकडे ब्रह्मच आहे. पहाणाऱ्यावाचूनच ते पाहिले जाते आणि स्वभावतःच इंद्रियांना अगोचर आहे. मायेची दुपदरी कंठी त्याच्या गळ्यात घातली की मगच त्या संबंधामुळे नामरूपाचा संसार त्याच्या मागे लागतो. एरवी त्याला नामही नाही आणि रूपही नाही. हे ब्रह्म म्हणजे ज्ञाता आणि ज्ञेय यांच्या विरहित निखल ज्ञान आहे. ते आकाशाच्या पदरातून गाळून घेण्याइतके सूक्ष्म आहे आणि तरीही सुखाने परिपूर्ण आहे. ते कोणाचे कार्य नाही किंवा ते कुठल्याही कार्याचे कारणही नाही. ज्याला दुसरे कोणी नसल्याने एकटे तरी कसे म्हणावे कारण एकटेपणा हे दुजेपणामुळे सापेक्ष आहे. ते आपले आपल्याला आहे असे समज अर्जुना, अशी जी ब्रह्मवस्तु ती ह्या वृक्षाचे मूळ आहे. ह्या ब्रह्माच्या ठिकाणी संसारवृक्षास अंकुर निघतो आणि मग त्या वृक्षाच्या विस्तारास सुरवात होते.

त्या सुरवातीचे कारण आहे माया! ही माया ब्रह्मवस्तूच्या ठिकाणी आहे. म्हणावे तर ब्रह्मवस्तु तर एकच एक आहे. नाही म्हणावे तर विश्वपसारा हे तिचे कार्य अनुभवास येते आहे. तेव्हा ती आहे आणि नाही अशा स्वरूपात ब्रह्मवस्तूत आहे. वांझेच्या संततीचे वर्णन करावे असे हिचे असणे आहे. ती सत्ही नाही आणि असत्ही नाही. विचाराचे नाव मात्र तिला सहन होत नाही. ती त्याच्यापुढे नाहीशीच होते. तिला आरंभ नाही म्हणून तिला अनादि हे नाव आहे. ही संसारवृक्षाचे बीज आहे. प्रपंच पिकवणारी जमीन आहे. विपरीत ज्ञान प्रकट करणारा दिवा आहे. ही नानाप्रकारच्या शक्तींनी भरलेली पेटी आहे. जगदभ्र जिथे दिसतो ते आकाश आहे. संपूर्ण विश्वाकाररूपी वस्त्राची केलेली घडी आहे. घडी म्हणण्याचे कारण असे की पार्था, तिच्या पोटात काय काय दडलेले आहे याचा हिशोब कोणाला माहीत नाही. तिचा सगळा खजिना अजून कुणी पाहिलेला नाही.

आपल्याला झोप येते आणि ती आपल्याला मूढ करते. दिव्याच्या ज्योतीवर काजळी धरली की दिव्याचा प्रकाश मंद होतो. नवऱ्यापुढे निजलेली स्त्री स्वप्नात पतीला आलिंगन देऊन सकाम करते. त्याप्रमाणे आहे आणि नाही अशी ही माया ब्रह्मवस्तूला स्वतःचे म्हणजे ब्रह्मवस्तूचे विस्मरण पाडते आणि हे विस्मरण ह्या संसारवृक्षाचे मूळ आहे."

श्रीरामकृष्ण परमहंस म्हणत, "पंचमहाभूतांच्या कचाट्यात सापडून ब्रह्म रडत असते. डोळे मिटून तुम्ही कितीका म्हणना की, 'मला काटा बोचला नाही. माझा पाय दुखत नाही.' पण काटा बोचला की वेदनांनी लगेच तळमळ सुरू होतेच. त्याचप्रमाणे मनाला कितीका शिकवाना की तुला जन्म नाही, मरण नाही, तुला पाप नाही, पुण्य नाही, तुला शोक नाही, दुःख नाही, तुला क्षुधा नाही, तृष्णा नाही, तू जन्मजरारहित, निर्विकार, सच्चिदानंदस्वरूप आत्मा आहेस. पण जराशी कुठे प्रकृती बिघडली, जरासे मनापुढे संसारातील रूपरसादि विषय आले, जरासे काम कांचनाच्या वरवर दिसणाऱ्या सुखाला भुलून हातून वाईट काम झाले की लगेच मोह, दुःख, यातना यांची मनात गर्दी उसळून सारा आचारविचार विसरून जाऊन माणूस अगदी गडबडून जातो. त्याला काही सुचेनासे होते. ईश्वराची जर कृपा झाली नाही, महामायेने गळ्याला बांधलेली दोरी जर सोडून टाकली नाही तर कोणालाही आत्मज्ञान आणि आनंदाची प्राप्ती होणार नाही. हे खूप समजून असा. चंडीत

(सप्तशतीत) सांगितले आहे नाही? “सैषा प्रसन्ना वरदा नृणां भवति मुक्तये।” तिने कृपा करून वाट मोकळी केली नाही तर काहीएक होण्याची अशा नको.

राम, लक्ष्मण आणि सीता वनात चालले होते, एका वेळी एकच मनुष्य जाऊ शकेल अशा वनातल्या अरुंद वाटेने तिघेजण चालले होते. धनुष्यबाण हाती घेऊन श्रीराम सर्वांच्या पुढे चालले होते. त्यांच्या मागोमाग सीता चालली होती आणि तिच्या मागोमाग लक्ष्मण धनुष्यबाण घेऊन चालला होता. लक्ष्मणाची रामचंद्रावर अत्यंत भक्ति आणि प्रीति, त्याला वाटे की आपल्याला रामचंद्र नेहमी दिसावे. पण करतो काय? त्याच्या आणि रामचंद्राच्यामधे सीता चाललेली असे. राम न दिसल्याने त्याला एकसारखी तळमळ लागलेली असे. बुद्धिमते सीतेच्या लक्षात ही गोष्ट आली. तिच्या मनात करुणा उत्पन्न होऊन वाट चालता चालताच ती थोडीशी बाजूला झाली आणि म्हणाली, “हं, आता बघा.” तेव्हा कुठे लक्ष्मण डोळे भरून आपल्या इष्ट मूर्तीला पाहू शकला. त्याप्रमाणे जीव आणि ईश्वर यांच्यामध्ये ही मायारूपी सीता असते. तिची कृपा झाली की जीवरूपी लक्ष्मणाला रामरूपी ईश्वराचे दर्शन होण्यास मुळीच वेळ लागत नाही. तेव्हा मायेचे स्वरूप ईश्वराधिष्ठित असले तरी जीवाला मान्य करावे लागते.

तेव्हा देव अर्जुनाला समजावून सांगत आहेत की, ‘अर्जुना, ब्रह्मवस्तूला पडलेला स्वरूपाचा विसर हा ऊर्ध्वामध्ये घनीभूत झालेला कंद आहे हीच माया. वेदांतात ह्यालाच बीजभाव असे नाव आहे. पूर्ण अज्ञानरूपी सुषुप्तिस बीजावस्था व स्वप्न जागृती ही फलावस्था आहे असे वेदांत सांगतो. वेदांताच्या निरूपणात या संज्ञांनी त्या अवस्थांचा उल्लेख होतो. ते राहू दे पण स्वरूपाचे अज्ञान हे त्या संसारवृक्षाचे मूळ आहे एवढे ध्यानात ठेव.

या उपाधिरहित व सर्वांच्यापलीकडे असलेल्या निर्मळ आत्मतत्त्वाचा मायेशी संबंध येतो. तो दृढसंयोग हेच कुणी आळे तयार होते. मग मुळे फुटून संसारवृक्षाचा खालचा आणि त्याचबरोबर वरचा भाग प्रकट होऊ लागतो. नानाप्रकारच्या देहाचे आकार घेऊन ती अग्रे खाली चहूकडे घुसतात. ब्रह्माच्या ठिकाणी जसजशी माया बळकट होऊ लागते तसतसे अग्राचे झुबकेच्या झुबके खाली येऊ लागतात.

आता चिद्‌वृत्ति म्हणजे माया. त्या मायेपासून महत्तत्त्व म्हणजे बुद्धितत्त्व हे अगदी कोवळे, लुसलुशीत पान निघते. त्या पानास सत्त्व, रज, तम असा अहंकाररूपी तीन पानांचा शेंडा फुटतो. तो शेंडा बुद्धिचे बळ घेतो आणि भेद वाढवू लागतो आणि ह्या भेदातून मनाची डहाळी वाढू लागते. वरती माया ब्रह्मवस्तूमध्ये जितकी बळकट होईल त्या प्रमाणात विकल्परूपी रस ह्या वृक्षात भरू लागतो. मन. बुद्धि, चित्त, अहंकार ह्या लहानलहान फांद्या ह्या त्रिगुणात्मक अहंकारात फुटतात, मग आकाश, वायू, तेज, आप आणि पृथ्वी हे पंचमहाभूतांचे सरळ फोक जोराने फुटतात. श्रोत्रादि पंचज्ञानेंद्रिये व सूक्ष्म विषय ही त्या शेंड्याला पूर्णपणे न उमललेली अशी गर्भपत्रे निघतात. ही पाने एकमेकापासून अगदी वेगवेगळी असतात. शब्दांकुरांची वाढ होत असताना श्रोत्रेंद्रियही ऐकण्याच्या इच्छेची दीडपट कांडी तयार करीत असते. शरिरातील त्वचारूपी वेल आणि पाने स्पर्शांकुरापर्यंत धाव घेतात. आणि त्यातून अभिनव अशी विकाराची वाढ होते. रूप पहावे ह्या इच्छेची पाने फुटू लागतात आणि डोळे लांबलचक कांडे घालतात. भ्रमाचा पसारा चांगलाच वाढतो. रसविषयाच्या संकल्पाचे डहाळे वेगाने चहूबाजूंनी वाढतात आणि जिभेला रसविषयाच्या इच्छेची पाने आत पुन्हा फुटतात. घ्राणेंद्रियाचा शेंडा पण आता बळ धरू लागतो आणि वास घ्यावा ही इच्छा अनावर झाली की शेंडा वाढू लागतो.

आधी मनात संकल्प आणि त्यानुसार इंद्रिये तयार होत जातात आणि वृक्षाचा विस्तार वाढू लागतो. याप्रमाणे मायेपासून महत्, महत्पासून मन, बुद्धि, अहंकार व पंचमहाभूते तयार होतात व ही आठ तत्त्वे ही संसाराची सीमा ठरते. मग ह्या आठ अंगांनी तो वृक्ष वाढतो, सर्वांगांनी पुष्ट होतो. पण अर्जुना हे ध्यानात ठेवावयाचे की तो किती वाढला तरी ब्रह्मवस्तूपेक्षा मोठा होऊ शकत नाही. जेव्हढी शिंप तेव्हढाच रुप्याचा भास!

समुद्राच्या विस्ताराइतका त्यावर लाटपणा पसरतो त्याप्रमाणे ते ब्रह्मच अज्ञानमूळ असलेल्या संसारवृक्षाच्या आकाराचे होते. एखादा मनुष्य झोपतो आणि आपणच आपला परिवार होतो. ही ब्रह्मवस्तू ही अशीच स्वरूपाचा विसर पडल्याने आपणच आपला भासमान विस्तार करते. ह्या विश्वाएवढा त्या मूळ वस्तुचा आकार आणि अवकाश परंतु हे वर्णन राहू दे. सारांश असा की हा चमत्कारीक वृक्ष असा वाढतो, महत्तत्त्वापासून त्याला खाली शाखा फुटतात. अर्जुना, ह्या वृक्षाला “श्वत्थ” असे म्हणतात. त्याला हे नाव का दिले गेले ते सांगतो, श्वः म्हणजे उषःकाल उषःकालापर्यंतसुद्धा त्याला अस्तित्व नाही, तो टिकत नाही म्हणून त्याला अश्वत्थ असे म्हणतात. हा एकसारखा बदलतो आहे, नाश पावतो आहे, उत्पन्न होतो आहे. चांचल्य हाच ह्यांचा स्थायीभाव आहे. एक क्षण गेला की ढगांचे रंग बदलतात. वीज क्षणभर चमकून नाहीशी होते. हलणाऱ्या कमळाच्या पाकळीवरील पाण्याच्या थेंबाला स्थिरता कोठली? व्याकुळ माणसाच्या चित्ताला शांती कोठली? हे सर्व पदार्थ जसे चांचल्याचे पुतळे आहेत तसा हा संसारवृक्ष चंचल आहे. क्षणाक्षणाला त्याची घडामोड चालू आहे. त्याला निमिषाची उसंत नाही.

व्यवहारातल्या पिंपळासही पारंब्या खाली येऊन त्याची मुळे होतात त्यामुळे साध्या पिंपळाचे प्रतीकही मानण्यास हरकत नाही. मला तेही योग्य वाटते आहे पण श्रीहरीचा तो अभिप्राय नाही. लौकिकार्थाशी आपले काम नाही. तेव्हा तो अर्थ राहू दे. देवांनी उद्यापर्यंत न टिकणारा या अर्थानेच संसारवृक्षास अश्वत्थ हे नाव दिले आहे.

आता एकीकडे त्या संसाररूपी अश्वत्थ वृक्षाला क्षणभंगुर म्हणावयाचे, पण दुसऱ्या अर्थी तो अविनाशी आहे. त्याची अविनाशी म्हणूनच प्रसिद्धी आहे. त्याला उपमा समुद्राची देता येते. एका बाजूने मेघ समुद्राचे पाणी उपसत असतात आणि दुसऱ्या बाजूने नद्या समुद्रात पाणी ओतत असतात. त्यामुळे तो आटतही नाही आणि उतूही जात नाही. मेघ आणि नदी यांची फुली जोवर उघडत नाही तोवर समुद्र परिपूर्णच राहणार. ह्या संसारवृक्षाचे होणे आणि जाणे असेच इतक्या वेगाने होत असते की वृक्ष होतो आहे की नाश पावतो आहे याचा तर्कच करता येत नाही. म्हणून लोक याला अव्यय म्हणतात. दानशील मनुष्य दान करीत असतानाच पुण्यसंचय करीत जातो. त्याप्रमाणे हा वृक्ष नाश पावत असतानाच नव्याने जन्माला येत असतो आणि म्हणून त्याचा नाशच होत नाही. तो अव्ययच आहे असे भासते. रथाचे चाक खूप वेगाने फिरत असले की भूमीत रुतल्यासारखे दिसते. त्याप्रमाणे काळाच्या क्रमामुळे जी भूतशाखा गळून खाली पडेल त्याच ठिकाणी कोट्यवधी अंकुर त्या संसारवृक्षास फुटतात आणि जीर्ण भूतशाखा गळून पडल्याची खूणसुद्धा रहात नाही. आषाढात ढग कधी जमून येतात. कधी जातात हे कळतसुद्धा नाही. त्याप्रमाणे कोट्यवधी शाखा आल्या कधी आणि गेल्या कधी हे कळत नाही. महाकल्पाच्या शेवटी उत्पन्न झालेली चौदा भुवने उन्मळून पडतात आणि कल्पाच्या प्रारंभाच्या वेळी दुसऱ्या नव्या चौदा भुवनांचे रान माजते. संहारकारक प्रचंड वाऱ्याने महाप्रलयकाळच्या अखेरीची संसारवृक्षाची जुनी साल गळून पडते न पडते तोच नव्या कल्पास प्रारंभ होऊन

शाखांची जुंबाडे उत्पन्न होतात. कांड्यामागून कांडे उत्पन्न करीत ऊस वाढतो त्याप्रमाणे एका मनूच्या काळापुढे दुसऱ्या मनूचा काळ येऊन एका वंशामागून दुसरा वंश असा वंशवृद्धिचा विस्तार होतो. कलियुगाच्या शेवटी चार युगांची वाळलेली पाने हा वृक्ष टाकून देतो तोच कृतयुगाची पहिली मोठी साल उत्पन्न होऊ लागते. चालू वर्ष जाते ते पुढच्या वर्षास बोलावून आणणारे निमंत्रणच होते. दिवस जातो आहे की येतो आहे हे आपल्याला सांगता येते काय? वाऱ्याच्या झुळकांना मधे सांधा असतो का? त्याचप्रमाणे शाखा गळतात आणि नव्या फुटतात हा क्रम अखंड चालू असतो या संसारवृक्षाचा देहरूपी एक शेंडा गळून पडतो तोवर त्याला अगणित देहांचे नवे अंकुर येतात आणि म्हणून हा भववृक्ष अविनाशीच आहे असा भास होतो.

वाहत्या पाण्याजवळ उभे राहिले की पाण्याचा एक ओघ पुढे जाईपर्यंत दुसरा ओघ त्याला मागून लोटीत येत असताना दिसतो आणि पहाणाऱ्याला मात्र असा भास होतो की तेच पाणी आपण पहातो आहो. मूळचा अस्थिर असलेला हा वृक्ष स्थिर आहे असे वाटते. पाण्यावरची लाट डोळे मिटून उघडेपर्यंत कोटी वेळा घडते, मोडते. कावळा आपले बुबुळ दोन्ही डोळ्यात इतक्या वेगाने फिरवत असतो की पहाणाऱ्या त्रयस्थाला त्या कावळ्याला दोन बुबुळे आहेत असेच वाटते. भिंगरी जोराने फिरू लागली की तिचा तो प्रचंड वेग जमिनीला खिळूनच राहिली आहे असा भ्रम उत्पन्न करतो. अंधारात कोलती झपाट्याने फिरवली तर ती अखंड चक्रावर आहे असे दिसते. त्याप्रमाणे हा संसारवृक्ष इतक्या वेगाने मांडला जातो आणि मोडला जातो आहे की वेडे लोक त्याच्या ह्या गतीमुळे फसून जातात आणि हा वृक्ष अविनाशीच आहे असा ग्रह बळकट धरून ठेवतात. ज्या ज्ञानी पुरूषास ह्या बदलाचा वेग कळतो तो हा वृक्ष क्षणिक आहे, कोट्यवधी वेळा घडतो, मोडतो आहे हे जाणतो. तो हेही जाणतो की त्या वृक्षाची साल जीर्ण असल्यामुळे तो जुनाट वाटला तरी त्याचे अस्तित्वच मुळी खोटे आहे. आपल्याला त्या वृक्षाचे मूळ रूप न कळल्याने आपण तो वृक्ष खरोखर अस्तित्वात आहे असे मानीत होतो व आपल्या स्वरूपाचे अज्ञानच ह्या भासाला कारणीभूत आहे हे तो जाणतो. संसाराचे हे क्षणभंगुरत्व जो जाणतो त्याला मी सर्वज्ञ म्हणतो. वेदांच्या सिद्धांताला तो पूज्य आहे. सर्व प्रकारच्या योगाचे फल त्यालाच प्राप्त झाले, त्याच्याच उपयोगास आले किंबहुना भववृक्ष केवळ मिथ्याभास आहे हे ज्या ज्ञानी पुरुषाने जाणले त्याचे कोण वर्णन करू शकेल? पार्था, ज्ञान त्याच्या रूपाने जगते आहे असे समज.

या संसारवृक्षाला खाली जशा शाखा आहेत तशा काही शाखा सरळ वरही जातात. जी डाळे खालच्या बाजूस फाकतात त्यांना तिथे मुळे फुटतात आणि तळाशीच पाने आणि डिऱ्या फुटतात. मी हे तुला एकदा सांगितलेच आहे पण सोप्या भाषेत पुन्हा सांगतो.

प्रथम अज्ञानाचे मूळ बळकट झाले की महत्तत्वाच्या भराने वेदरूपी मोठी पाने येतात. तिथून स्वेदज, जारज, अंडज, उद्भिज हे चार मोठे फोक उत्पन्न होतात आणि त्यांतून चौऱ्यांशी लक्ष प्रकारचे अंकुर फुटतात. जीवरूपी फांदीच्या ठिकाणी पुष्कळसे फाटे उत्पन्न होतात. या सरळ शाखांना नाना सृष्टिरूपी डहाळ्या येतात आणि अनेक जातीरूपी आडव्या फांद्या ह्या वृक्षाला येतात आणि स्त्रीपुरुष, नपुसक हे भेदात्मक आकाराचे घोस विकारांच्या भाराने एकमेकांवर आदळतात.

वर्षाकाळ आला की नवे नवे ढग आकाशात गर्दी करतात त्याप्रमाणे अज्ञानाच्या ठिकाणी आकारमात्राचा वेल पसरतो. मग शाखा आपल्याच अंगच्या भाराने एकमेकात गुंततात आणि उत्कर्षाचे वारे

उत्पन्न करतात. गुणांच्या झणझणाटाने हा उर्ध्वमूळ वृक्ष तीन भागात चिरतो. रजोगुणाचा वारा जास्त जोराने वाहू लागला की मनुष्यजाती ही शाखा फोफावते. त्या मनुष्यरूपी शाखा वर किंवा खाली न जाता मध्ये आडव्याच गर्दीने विस्तारतात. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र असे चार वर्ण त्यात असतात. वेदवाक्यांची कोवळी पालवी, विधीनिषेधाने नटते आणि ह्या मनुष्यशाखांना अपूर्व शोभा आणते. ऐहिक भोगाची क्षणिक स्थाने हेच कुणी अंकुर होऊन अर्थ आणि काम यांच्या अग्राच्या डहाळ्या वाढतात. संसाराचा उत्कर्ष व्हावा. वृद्धि व्हावी म्हणून शुभाशुभ कर्माचे किती सोट फुटतात त्याला हिशोब नाही. यामध्येच मागील जन्मातील कर्मभोग संपला की, देहाची शुष्क काष्ठे म्हणजेच ह्या झाडाची शुष्क, काष्ठे गळून पडतात आणि लगेच नव्या देहांचा विस्तार होऊ लागतो. शब्दादिक ह्या आकर्षक विषयाचे पल्लव नित्य नवे तयार होत रहातात. रजोगुणाच्या प्रचंड वाऱ्याने याप्रमाणे मनुष्यरूपी शाखांचे समुदाय तयार होतात आणि मनुष्यलोक रुढ होतो.

आता हा रजाचा वारा जरासा ओसरू लागला की तमाचा वारा घोंघावू लागतो. याच मनुष्यरूपी शाखांना नीच वासनारूपी अंकुर येऊन कुकर्माच्या डहाळ्या येतात. नीच अप्रवृत्तीचे खडबडीत फोक निघतात आणि प्रमादांची पाने, पाला व डहाळ्या माजतात. यजुर्वेद व सामवेद यातील ज्या ऋचा अमुक कर्म निषिद्ध आहे असे सांगतात त्याच ऋचांतील मंत्ररूपी पल्लव डहाळ्यांच्या टोकावर फडफडू लागतात. जागा-मारण-उच्चाटन इत्यादि कुकर्मे प्रतिपादन करणाऱ्या शास्त्रांचा उत्कर्ष होतो. ती आणि वासनारूप वेल विस्तारतात. त्यांचा असा विस्तार झाला की अकर्माचे तळातील बुडखे मोठे मोठे होत जातात आणि जन्मरूपी शाखा पुढे पुढे धाव घेतात. श्रेष्ठ योनीतून नीच योनीत जन्म येतात. तमोगुणाने मोहित होऊन कर्मभ्रष्ट झाल्यामुळे जीवांना चांडाळादि निकृष्ट योनीत जन्म येतात आणि दोषांची जाळी तयार होतात. पशु, पक्षी, डुक्कर, वाघ, विंचू, साप ह्या आडशाखांचे समुदाय थोरावतात. अर्जुना, या तमोगुणाच्या उत्कर्षात या मनुष्यशाखांना नित्य नवा नरकवास हे फळ भोगावे लागते. येथे हिंसा आणि विषय हेच मुख्य पुढारी असतात. वाईट कर्माची संगत ही अग्रगण्य असते. हिंसादि कुकर्माचे अंकुर जन्मापासून फुटतात. तमोगुणाचे परिणाम भोगता भोगता ही माणसे शेवटी वृक्ष, गवत, लोखंड, माती आणि दगड या योनीत जातात. इथे शाखाही त्याच आणि फळेही तीच."

तमोगुणाने काय काय अनर्थ मनुष्याच्या जीवनात होऊ शकतो. याचे एक उदाहरण आहे. रोममध्ये एक चित्रकार होता. त्याच्या मनात आले की भोळेपणा, सरळपणा, नम्रता, निरागसपणा ज्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसतो आहे अशा एखाद्या अबोध बालकाचे चित्र काढावे. बराच शोध घेतल्यावर एक मुलगा त्याच्या कल्पनेसारखा त्याला मिळाला. त्याने त्या मुलाला बसूवन त्याचे चित्र काढले लोकांना ते इतके आवडले की, त्यांनी त्या चित्रकाराकडून त्या चित्राच्या अनेक प्रती काढून घेतल्या. चित्रकार चांगलाच प्रसिद्धीस आला.

वीस वर्षांनी त्या चित्रकाराच्या मनात आले की ज्या चेहऱ्यावर धूर्तता, क्रूरपणा, स्वार्थ, निर्दयता अगदी स्पष्ट दिसून येईल अशा माणसाचे चित्र काढावे. असा मनुष्य तुरुंगात नक्कीच सापडेल या विचाराने चित्रकार तुरुंगात गेला आणि त्याला हवा तसा मनुष्य तिथे सापडला.

त्याला चित्रकार म्हणाला. "मला तुझे चित्र काढावयाचे आहे."

कैदी भिऊन म्हणाला, "माझे? कशासाठी?" त्यानंतर चित्रकाराने ते पहिले सुंदर चित्र त्या कैद्याच्या

समोर धरले आणि म्हटले, “याच्याविरुद्ध भाव चेहऱ्यावर असलेले चित्र काढावयाचे आहे म्हणून.”

ते चित्र पहाताच कैद्याने आपले तोंड ओंजळीत लपवले आणि तो स्फुंदून स्फुंदून रडू लागला. चित्रकाराला काही कळेना. तो कैदी थोडा शांत झाला आणि मग चित्रकाराने विचारले, “का रे बाबा रडतोस?” कैदी म्हणाला, “महाशय, अहो वीस वर्षांपूर्वी तुम्ही हे चित्र ज्याला पुढे बसवून काढले तोच मी.”

अशी ही शोककथा.

देव सांगत होते, “अर्जुना ऐक. मनुष्यापासून अधोगती होता होता ह्या खालच्या शाखा स्थावर योनीत जन्मास येण्यापर्यंत उतरतात. म्हणून मनुष्यरूपी ज्या मधल्या शाखा आहेत त्याच खालच्या शाखांची मुळे होतात आणि इथून हा संसारवृक्ष विस्तार पावतो. अर्जुना, संसारवृक्षाचे ऊर्ध्वमूळ अज्ञान आहे आणि मनुष्यप्राणी हा मध्यावरच्या शाखा आहेत. या मनुष्याशाखा तामस गुणामुळे खालच्या बाजूस वाढतात आणि सात्त्विक गुणामुळे वरच्या शाखा वाढतात कारण तमोगुण दुष्कृत्ये व सत्त्वगुण सत्कृत्ये माणसांकडून घडवितो.

ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद ही तिन्ही वेदरूपी पाने मनुष्यशाखांनाच लागतात इतर ठिकाणी लागू शकत नाहीत. वेदांच्या आज्ञांना मनुष्य अधिकारी आहे. इतर कोणी नाही. म्हणून मी असे म्हणतो, मनुष्यदेह ह्या ऊर्ध्वमुळाकडून खालच्या शाखा असल्या तरी कर्मवृद्धिच्या दृष्टिने मुळे आहेत. इथून कर्म विस्तार पावते.

अर्जुना, प्राकृत, वृक्षात शाखा वाढल्या की, मुळे जमिनीत खोल बळावतात. मुळे बळावली की शाखाचा विस्तार वाढतो. जोपर्यंत कर्मे आहेत तोपर्यंत देहाचे अस्तित्व आहे आणि जोपर्यंत देह आहे तोपर्यंत कर्मे घडतच रहाणार आणि म्हणून मनुष्यदेह संसारवृक्षाच्या शाखापण आणि मुळेपण असे मी म्हणतो.”

जगज्जनक श्रीभगवान श्रीकृष्ण पुढे म्हणाले, पार्था, तमाची ती भयंकर वावटळ शांत झाली की, सत्त्वाची जोरदार वावटळ सुटते. आता त्याच मनुष्याकाराच्या मुळ्या नव्या आरा घेतात. सुवासनेचे अंकुर येतात आणि सुकृताचे कोंब फुटतात, ज्ञान उजळते. प्रज्ञाकौशल्याचे तीक्ष्ण अंकुर एका क्षणात विस्तारून निघतात. बुद्धिचे फोक स्फूर्तीच्या बळाने वाढतात. विवेकामुळे बुद्धिमध्ये प्रकाश पडतो. धारणाशक्तीरूपी रसाने आस्थारूपी पाने सुशोभित होतात आणि सद्वृत्तीचे सरळ कोंब वर जातात. सदाचाराचे डहाळे गजबजून जाऊन वेदपद्यांच्या घोषाने गर्जू लागतात. श्रेष्ठ पुरुष व शास्त्रे यांनी सांगितलेल्या आचरणाने व यज्ञयागाने पानावर पाने उमलतात. यमदमाचे घोस असलेल्या डहाळ्या उत्पन्न होतात आणि त्यास वैराग्यरूपी शाखा आलिंगन देतात. धैर्याच्या अंकुराने तीक्ष्ण आहेत असे श्रेष्ठ व्रतरूपी फोक वरवरच्या श्रेणीतील जन्माच्या वेगाने उंचावतात. थोडक्यात व्रताचरणाच्या पुण्याने वरच्या योनीतील जन्म मनुष्यांना येतात. तामसाच्या उत्कर्षामध्ये माणसांना कुवासना निर्माण होऊन त्याच्या हातून कुकर्मे घडतात आणि नीच योनीतील जन्म येता येता शेवटी दगडासारख्या निर्जीव योनीत जन्म येतो, तर सात्त्विकाच्या उल्हासामध्ये मनुष्यास सुवासना होतात. त्याच्या हातून सत्कर्मे घडतात आणि मग मनुष्ययोनीच्या वरवरचे जन्म येत ती शाखा मूळ जी माया तिच्यापर्यंत येऊन पोचते.

अनुक्रमणिका

अर्जुना, सत्त्वाचा वारा जोराने सुटला की तो चांगल्या विद्येचा झणझणाट करतो आणि ह्या संसारवृक्षास वेदांची पाने येतात हे मी तुला सांगितले आहेच. त्या वेदाज्ञा प्रमाणात मानून सत्कर्म घडत गेल्यामुळे धर्मरूपी शाखेच्या विस्तारात जन्मशाखा सरळ फुटतात. त्या फांद्यांना स्वर्गादिक फळाने युक्त असे आडफाटे फुटतात. पुढे वैराग्यरूपी लाल रंगाच्या शाखेस धर्म मोक्षाची कोवळी लुसलुशीत पालवी येते आणि तिचा विस्तार होत राहतो. याच धर्मरूपी शाखेला सूर्य, चंद्र वगैरे श्रेष्ठ ग्रह, पितर, ऋषि, विद्याधर हे आणखी आडव्या शाखांचे प्रकार विस्तार घेतात. धर्माचरणामुळे श्रद्धेनुसार माणसाना हे लोक प्राप्त होतात. ह्या शाखांच्यावर इंद्रादिक मोठ्या फांद्याचे झुबके आहेत. तपोज्ञानाने उंच गेलेला मरीची, कश्यपादि शाखा ह्या इंद्रादिक शाखांच्यावर असतात. असा उत्तरोत्तर चोहोबाजूनी ऊर्ध्वशाखांचा विस्तार होतो. हा संसारवृक्ष मुळाशी लहान पण विस्ताराने मोठा असून बुडाशी थोडी व शेंड्याला जास्त फळे आहेत. अर्जुना, शिवाय या शाखानंतर ह्या संसारवृक्षाला जे फळभार येतात ते ब्रम्हदेव, शंकर इत्यादि अंकुरांचे कोंब असतात. फळांच्या ओझ्याने मनुष्यरूपी शाखा ऊर्ध्व दिशेने जातात व जवळ जवळ ब्रम्ह्याला टेकतात. प्राकृत वृक्षाला खूप फळे लगडली की शाखा लवून मुळाजवळ येतात. त्याप्रमाणे ह्या संसारतरूचा उठाव जेथून होतो त्या ठिकाणी येऊन पोचतो. ब्रह्मदेव, शंकर यांच्या पलीकडे जीवांना आणखी वाढणे, वर जाणे नाही. त्यावर केवळ एक ब्रह्मच आहे. तेव्हा वाढणाऱ्या ज्ञानाच्या योगाने जीव ब्रह्मापर्यंत जाऊन पोचतो.

परंतु ते असो. लक्षात घे, या ब्रह्मादिक डहाळ्या संसारवृक्षाचे जे मूळ त्या मायेबरोबर मात्र तोलता येत नाही. आणखी काही सनकादिक ज्या विख्यात शाखा आहेत त्या संसारवृक्षाच्या फळात वा मुळात न सापडता ब्रह्मस्वरूपानेच भरलेल्या आहेत. याप्रमाणे मनुष्यापासून तो थेट वरचे जे ब्रह्मादिक लोक तेथपर्यंत त्या वृक्षाची चांगली वाढ होते. ब्रह्मादिक लोक हे त्या वृक्षाची पालवी आहे. या ब्रह्मादिक लोकांचे मूळ मनुष्यत्त्वात आहे. म्हणून मनुष्यत्व ही खालची मुळे आहेत. असे आम्ही म्हटले, ही मुळे खालची कशी तेही तुला सांगितले.

तुझ्या मनात असा विचार येईल का 'हे एवढे मोठे झाड तोडायचे कसे? हे समूळ उपटावे म्हटले तरी उपाय तरी काय करावा? वर जाणाऱ्या शाखा म्हणजे ब्रह्मादिक आणि वृक्षाचे मूळ निराकार ब्रह्मामध्ये! स्थावररूपाने हा वृक्ष खालच्या बाजूसही डवरून आला आहे. मनुष्यरूपी डहाळ्यामध्ये भरून गेल्या आहेत. शिवाय ह्या मनुष्यशाखा पुन्हा मुळे होऊन वर ब्रह्मलोकांपर्यंत पोचतात. असा हा गाढ आणि अफाट वृक्ष आता ह्याचा शेवट तरी कोण करणार? कसा करणार? असा भाव कदाचित तुझ्या मनात येईल. पण पार्था, तो मुळीसुद्धा येऊ देऊ नको. अर्जुना, एखाद्या लहान मुलाला भिववण्यासाठी बागुलबोवा करतात. आता ह्या बागुलबोवाचा बंदोबस्त करावयास शस्त्रास्त्रांची काही जरूरी आहे काय? आकाशात मोठमोठे ढग येतात त्या ढगांचे आकार एखाद्या प्रचंड किल्ल्यासारखे दिसतात. आकाशात गंधर्वानी हे किल्ले बांधले आहेत ते पाडून टाकायला हवे म्हणून कोणी लढाई करते काय? हा संसारवृक्ष पाडून टाकण्यासाठी श्रमाची तशीच काहीही जरूरी नाही. सशाला शिंग असले तर ना ते मोडायचे? आकाशात फूल लागले तर ना ते तोडायचे? तसाच हा संसारवृक्ष खरा असला तर ना तो उपटण्याची खटपट करायची?

हे वीरा, हा संसारवृक्ष मुळात खरा नव्हेच. आणि तो खरा नव्हे म्हणूनच तो उपटून टाकण्याचा दरारा मनात बाळगणे बरोबर नव्हे. आम्ही तुला जे मूळ आणि शाखा यांचा विस्तार वर्णन करून सांगितला तो वांझेच्या घरभर पसरलेल्या मुलांच्या वर्णनासारखा खोटा आहे. स्वप्नामध्ये पुष्कळ बोलणी होत असतात पण जागे

झाल्यावर त्याला काही किंमत असते का? त्याप्रमाणेच ह्या संसारवृक्षाची कथा पोकळच आहे. स्वरूपामध्ये याचे मूळ जर खरोखरच दृढ असते आणि हा संसारवृक्ष आम्ही वर्णन केल्याप्रमाणे जर खरा असता तर असा कोण मायेचा पूत आहे की जो ह्या वृक्षाची पाळेमुळे खणून काढील? पार्था, हा सगळा भ्रम आहे. आभास आहे हे ध्यानात ठेव.

धनंजया, आम्ही हे जे संसारवृक्षाचे रूप वर्णन करून सांगितले ते कासवीच्या तुपाने राजाचे ताट सजविले म्हणण्यासारखे आहे. अरे, मृगजळाची तळी आपण दुरूनच न्याहाळून हा तर आभास आहे हे समजून रहायचे की 'केवढा हा पाण्याचा साठा! या पाण्यावर कितीतरी केळीच्या बागा पोसल्या जातील! केवढे तरी भात पिकेल!' असे बेत करीत केळी-साली लावण्यासाठी कंबर कसायची?

हे बघ, ह्या संसारवृक्षाचे मूळ आहे अज्ञान! अज्ञान तर मिथ्या, मग ह्या अशा मिथ्या कारणापासून निर्माण होणारे कार्य तरी काय किंमतीचे असणार? अज्ञानामुळे भासमान होणारे हा वृक्ष कितीही प्रचंड असला तरी खरा कसा ठरणार? तर तो खरा नाहीच, खोटा आहे, आभासमय आहे, म्हणून त्याचा नाश करण्यास परिश्रमाची जरूरीच नाही.

आता तुला शंका येईल की मग त्याचा नाश होत नाही हेही खोटे की काय? तर असे पहा की जोवर जाग आली नाही तोवर निद्रेला अंत नाही. रात्र संपली नाही तोवर पहाट होत नाही, आणि जोवर विवेकाने डोके वर काढले नाही तोवर या अश्वत्थरूपी भववृक्षाचा नाश होत नाही.

वाहणारा वारा निवांत झोपत नाही तोवर लाटा अनंतच म्हणाव्या लागतात. सूर्य तळपतो आहे तोवर मृगजळाचा भास होतच रहातो. दिवा तेवतो आहे तोवर प्रकाश पडणारच. पण ज्या क्षणी वारा शांत होतो, त्या क्षणी लाटा संपतात. ज्या क्षणी सूर्य मावळतो त्या क्षणी प्रकाशाचा अंत होतो. मूळच्या अज्ञानाचा नाश करणारे ज्ञान प्रगट झाल्याबरोबर त्या भववृक्षाचा नाश होतोच. मात्र ज्ञान प्रगट झाल्याशिवाय त्या संसारवृक्षाला नाश नाही.

अर्जुना, ह्या भववृक्षाला 'अनादि' म्हटले जाते. हा अनादि हा शब्दसुद्धा एका अर्थाने त्या वृक्षाचे स्वरूप दाखवणारा आहे तो त्या वृक्षावर आलेला आळ नव्हे. अरे ज्याला आदि नाही तो अनादि! जो कधी झालाच नाही त्याचा अंत होणार कसा? ह्या संसारवृक्षाच्या ठिकाणी खरेपणाच नसल्याने त्याची आई म्हणून कुणाचे नाव घ्यावयाचे? अर्जुना लक्षात आले ना त्याला अनादि म्हणणे बरोबर का आहे ते?

वांझेच्या मुलाची पत्रिका मांडावी, आकाशात निळी भूमी आहे म्हणावे तसे 'संसारवृक्ष आहे' हे म्हणणे व्यर्थ आहे. आकाशपुष्पांचा देठ तोडावा कसा? जो आस्तित्वात आलाच नाही अशा भववृक्षाला आदि तरी कोठला म्हणून सांगावा? आस्तित्वातच नसलेला 'घट नाही' हे वेगळे प्रस्थापित करावे लागते काय? तो तर नाहीच आहे तसा हा वृक्ष झालाच नाही म्हणून त्याला आरंभ नाही.

अर्जुना, ह्याला आदि आणि अंत नाही पण हा मधे भासतोच असे तू म्हणशील. पण ते त्याचे भासणे मृगजळासारखे आहे असे समज. ते मृगजळाचे पाणी ब्रह्मगिरीहून निघतही नाही आणि समुद्राला जाऊन मिळतही नाही. अधेमधेच भासत असते इतकेच. आद्यंती खरा नाही पण खोटेपणाचे नवल असे की भासमान मात्र होतो. आकाशात निरनिराळ्या रंगांनी नटलेले इंद्रधनुष्य प्रत्यक्ष आहेच असे वाटते ना? तसा हा अश्वत्थ खराच आहे असा भास होतो.

बहुरुपी निरनिराळी सोंगे आणून लोकांना फसवतो तसा हा संसार स्थितिकाली अज्ञानी लोकांच्या डोळ्यावर भूल टाकतो. आकाश निळे आहे असा भास होतो ना? दिसो बिचारे निळे पण क्षणात तो निळेपणाही जातो. स्वप्नातले पदार्थ स्वप्नापुरते खरे वाटले तरी प्रत्यक्षात टिकत नाहीत, नाहीसे होऊन जातात. त्याप्रमाणे हा संसारवृक्षाचा भास क्षणिकच आहे. माकडाने पाण्यात पडलेले आपले प्रतिबिंब धरण्यासाठी पाण्यात हात घातला की ते प्रतिबिंब नाहीसे होते तसा हा आभास क्षणिक आहे. ग्रीष्माचा वारा मागून येतो की पुढून येतो हे जसे कळत नाही. त्याप्रमाणे ह्या संसारवृक्षात एकसारखेपणा नसतोच, स्थिरता नसतेच.

पार्था, थोडक्यात ह्याला आदि नाही म्हणून अंतही नाही. मधला आभास चांचल्यपूर्ण असल्याने स्थितीही नाही. आता मला सांग अशा ह्या नसलेल्याच वृक्षाचा नाश करण्यासाठी श्रम ते काय पडणार आहेत? केवळ जीवाला अज्ञानामुळे तो अस्तित्वात आहेसा वाटतो. त्याला छेदून टाकण्याचा उपाय म्हणजे 'स्वरूपज्ञान' ह्या ज्ञानाशिवाय जे जे उपाय करशील ते ते अपायकारकच होतील. याच्या शाखाशाखांतून वरच्या खालच्या मुळातून तू किती हिंडणार? त्यापेक्षा या भववृक्षाच्या मुळाचे यथार्थ ज्ञान करून घे. म्हणजे मात्र त्याच्या मुळावर घाव बसून तो अनायासे तुटेल.

पुष्कळदा असे घडते की दोरीचा साप दिसतो, तो मारण्यासाठी कुणी एक काठी शोधत वनामध्ये फिरतो. नसलेल्या सापाला मारण्यासाठी साधन शोधण्याच्या नादात त्या वनातील काठ्यांचा भार मात्र विनाकारण त्याला वहावा लागतो. आणखी कुणी एकजण मृगजळाची गंगा पहातो. ती गंगा पार करण्यासाठी नाव बांधावी म्हणून झाड शोधता-शोधता वनातल्या खऱ्या ओहळात बुडून मरून जातो. त्याप्रमाणे नसलेल्या ह्या संसारातून सुटण्यासाठी उपाय करता-करता थकून कुणी एकजण प्राणासही मुकतो. स्वप्नातील भय नाहीसे होण्यासाठी औषध केवळ एक जागृती! त्याप्रमाणे ज्याचे मूळ अज्ञानच आहे त्या संसारवृक्षाच्या छेदनास खड्ग हवे ज्ञानानेच!

पार्था, ज्याला हे ज्ञानाचे खड्ग परजावयाचे असेल त्याच्या बुद्धिला अभंग आणि नित्य नवे वैराग्याचे बळ हवे. कुत्र्याचे वमन जसे पाहूसुद्धा नये असे वाटते त्याप्रमाणे स्वर्ग, मृत्युलोक, पाताळ या तिन्ही लोकांचा त्या वैराग्याने त्याग केला पाहिजे. अर्जुना, सर्व पदार्थमात्राबद्दलच असे धगधगीत वैराग्य असावयास हवे. असे वैराग्य सिद्ध झाले की त्या ज्ञानखड्गावरील 'मी देह आहे' या अहंतेचे म्यान झटक्याने काढून टाकून अंतर्मुख झालेल्या बुद्धिच्या हातात ते हत्यार घ्यावे. त्याचे पाते विवेकाच्या सहाणेवर घासून तीक्ष्ण केलेले असावे. त्यास 'मी ब्रह्म आहे' या बोधाची धार हवी आणि ती धार पूर्ण बोधावर पुन्हा पुन्हा घासावी. हत्यार आता तयार झाले खरे पण त्याची मूठही बळकट असावी म्हणून तोलून पहावे. 'मी ब्रह्म आहे' हा निदिध्यास झाला की मग हत्यार उचलावे. पण अर्जुना, तुला आता असा अनुभव येईल की तोडायला समोर भववृक्षच उरलेला नाही. एकसुद्धा

घाव घालण्याची जरूरी नाही असे तुला वाटेल. ते आत्मज्ञानाचे खांडे अद्वैत प्रभेने इतके तेजःपुंज होईल की तो भववृक्ष त्या तेजापुढे कुठल्या कुठेच गडप होईल.

शरद ऋतुतील वारा एकदा सुटला की आकाशात मेघाचा तुकडादेखील उरू देत नाही. सूर्य उगवला की तो अंधार गिळून टाकून त्याची नावनिशाणीही शिल्लक ठेवत नाही. एकदा जागृति आली की स्वप्नात झालेल्या गर्दीचा संभ्रम संपतो त्याप्रमाणे 'मी ब्रह्म आहे' अशा प्रतीतीचा घाव भववृक्ष नाहीसां करून टाकतो. स्वरूपानुभूति आली की मग चांदण्यात मृगजळ दिसत नाही त्याप्रमाणे ऊर्ध्व, ऊर्ध्वीचे मूळ, शाखा वा शाखाजाल यातले काहीही शिल्लक रहात नाही. वीरनाथा खड्गाचा उपयोग कसा करावयाचा, घाव कसा घालावयाचा हे काही मी तुला शिकवायला नको. तू सिद्धहस्त योद्ध्याचाही नाथ आहेस. तेव्हा उचल आत्मज्ञानाची तलवार आणि तोड तो ऊर्ध्वमूळ अश्वत्थ!

अर्जुना, तुझ्या मनात आता विश्व आणि आपण स्वतः यात भेद आहे असा काही भ्रम उरलेला नाही ना? तू एकदा का 'अहं' स्फुरणाचा निरास केलास की 'इदं' स्फुरण संपते. 'मी आहे' हे स्फुरण असते म्हणून 'तो आहे' ही भावना असते. देहाबद्दलची अहंताच संपली की जीव ब्रह्मरूप होऊन जातो. 'इदं' हे असे कुणी कुणाला म्हणावयाचे मग? कुणी कुणाला पहायचे आता? अज्ञानी जीव आरशाचा आधार घेऊन आपले मुख पहातात आणि एका मुखाची दोन मुखे करतात, ज्ञानी पुरुषांचे पहाणे अशा प्रकारचे नसते.

अर्जुना, विहीर खोदण्यापूर्वीच विहिरीत झरा भरलेला असतो, खोदण्याची जरूरीच नसते. त्याप्रमाणे ज्ञानी पुरुष आपणच आपल्याला अद्वैतभावाने पहात असतो. पाणी आटले की प्रतिबिंब बिंबात विरून जाते. घट फुटला की घटाकाश महदाकाशात सामावून जाते. इंधन संपले की अग्नि आपण आपल्यात लीन होतो. त्याप्रमाणे त्याची अहंता जिरून गेलेली असते. आता जिव्हेने आपली चव चाखावी, किंवा डोळ्यांनी आपले बुबुळ पहावे त्यासारखे हे पहाणे आहे. प्रभेला प्रभा मिळावी. आकाश आकाशावर लोळू लागावे, पाण्याच्या खोळीत पाणी भरावे त्याप्रमाणे अहंता विसरून ज्ञानी आपण आपल्याला पहातात. अर्जुना, माझे बोलणे तुला विचित्र वाटेल पण ते अंतिम सत्य आहे. ह्या माझ्या शब्दावर पूर्ण भरवसा ठेव."

श्रीरामकृष्ण परमहंसांचा असा अद्वैतभाव सिद्ध झाला होता. ते म्हणत, "असे पहातो की माणूस, जनावर, झाड, प्राणी ह्या जणू काय निरनिराळ्या खोळीच आहेत. उशीच्या, तक्क्याच्या, पिशव्या असतात ना तशा? एखादी चिटाची, एखादी खादीची, एखादी गझनीची तशीच एखादी वाटोळी, एकादी चौकोनी! अशा पिशव्या निरनिराळया कापडाच्या व आकाराच्या असतात. पण त्या साऱ्यात कापूस हा एकच पदार्थ भरलेला असतो. त्याप्रमाणे माणूस, जनावर वगैरे सर्वांत तो एकच अखंड सच्चिदानंद भरलेला असतो. खरोखरच मला दिसतं रे की ह्या साऱ्या निरनिराळ्या चादरी अंगावर घेऊन आई आतून डोकावून पहाते आहे."

एक दिवस नरेंद्रास त्यांनी अद्वैतमत समजावून दिले, पण त्याची समजूत पटेना. तो तिथून हाजरा महाशयाकडे गेला. तिथे त्यांच्याशी बोलता-बोलता आताच ऐकलेल्या अद्वैतमताचा त्याने उपहास सुरू केला, "किती विचित्र गोष्ट आहे. काय म्हणे घर ईश्वर, दार ईश्वर, भांडे ईश्वर, झाड ईश्वर, तुम्ही आम्ही सर्वजण

अनुक्रमणिका

ईश्वर! असे कधी तरी शक्य आहे काय?" हाजरा महाशयांनी नरेंद्राच्या शब्दांना पुष्टी दिली आणि दोघेही खो खो हंसू लागले.

श्रीरामकृष्ण भावावस्थेत होते. आपले नेसण्याचे धोतर बगलेत मारून ते बाहेर आले आणि म्हणाले, "तुमच्या काय गोष्टी चालल्या आहेत रे?"

आणि असे म्हणून हसत हसत नरेंद्राजवळ जाऊन त्यांनी त्याच्या अंगाला स्पर्श केला आणि आपण समाधिमग्न होऊन गेले.

नरेंद्रनाथ पुढे सांगत असे, "श्रीरामकृष्णांच्या त्या अद्भुत स्पर्शाने क्षणार्धात माझे विलक्षण भावांतर होऊन गेले. काय चमत्कार! मला खरोखरीच असे दिसू लागले की या साऱ्या ब्रह्मांडात ईश्वरावाचून काहीही नाही. मी विचार करू लागलो, पाहू हीच मनाची अवस्था किती वेळ टिकते ती. पण त्या दिवशी काही ती स्थिती बिलकुल कमी झाली नाही. घरी परत आलो तिथेही तेच जे जे दिसे ते ते ईश्वरच असे वाटे. ताट, वाटी, अन्न, अन्न वाढणारा, मी स्वतः जेवणारा हे सारे ईश्वरच आहे असे वाटे. कसेबसे एक-दोन घास खाल्ले पुढे जेवणच जाईना. "असा का स्वस्थ बसला आहेस? आज जेवत का नाहीस?" असे आईने विचारले त्याबरोबर एकदम भानावर आलो.

असे झाले की, "रस्त्यातून चालताना गाडी पुढून येत आहे असे मी चांगले पहातो आहे पण तिच्या पुढून बाजूस होण्याची प्रवृत्तीच होऊ नये. वाटावे की काय हरकत आहे? गाडी तरी काय ईश्वरच आहे की, तिच्यात आणि माझ्यात काय फरक आहे?"

"हा सर्वेश्वर भाव जेव्हा थोडाबहुत कमी होई तेव्हा हे सारे जगत् स्वप्न आहे असे वाटावे. हेदुया तलावाजवळच्या रेल्वेच्या रुळावर डोके आपटावे व हे रूळ खरे आहेत की स्वप्नातील आहेत हे पहावे. हातापायात शक्ति नसल्यामुळे वाटावे आता अर्धांगवायु खास होणार. बरेच दिवस या अवस्थेत गेल्यावर मग हा भाव जरा जसा कमी होऊ लागला तेव्हा कमी वाटले की हाच तो अद्वैत विज्ञानाचा थोडासा अनुभव तेव्हापासून अद्वैत तत्त्वाबद्दल माझ्या मनात कधीही संशय म्हणून आला नाही."

देव अशा अद्वैतानुभवाच्या गोष्टी सांगत आहेत. ते पुढे म्हणाले, "अर्जुना, मी पहातो आहे हे पहातेपणही टाकून पहायचे आहे. मी जाणतो आहे हे जाणतेपणही टाकून जाणायचे आहे. असे जे आत्मस्वरूप जाणायचे आहे त्याला आद्यपुरुष असे म्हटले जाते. वेदांनासुद्धा ही खुबी कळली नाही की इथे नामरूपाच्या उपाधिशिवाय जाणावयाचे आहे. त्यांनी मायेच्या उपाधीचा आश्रय केला आणि जिभा उचलून नामरूपाचे वर्णन करण्याचा गलगला उगीचच्या उगीच सुरू केला.

खरे म्हणजे ती मूल वस्तू आपणच आपली मौनाने पहायची आहे. ती कधीही शब्दांत सापडण्यासारखी नाही.

अनुक्रमणिका

अर्जुना, जे संसाराला आणि स्वर्गाला कंटाळले ते मुमुक्ष अष्टांगयोग व ज्ञान यांचा आधार घेतात. स्वर्ग आणि संसार यात पुन्हा यावयाचेच नाही अशी प्रतिज्ञा करतात. संसार पाठलाग करीत असताना त्याच्यापुढे हे वैराग्यशील पुरुष प्रतिज्ञेने पळतात. कर्माचा शेवट जे ब्रह्मपद किंवा सत्यलोक त्या लोकाचा कडा मागे टाकतात, अहंकारादि सर्व अनात्म वस्तूचा झाडा देतात आणि "ह्यांना मूळघरास जाऊ द्यावे" असा दाखला घेतात, आणि मग आपले मूळरूप आपण पहातात.

मूळ वस्तूच्या अज्ञानामुळेच जग जाणणे ही क्रिया बळावते. 'मी आणि तू' हे द्वैत आस्तित्वातच नसताना अज्ञानामुळे जगात नांदवले जाते. निदैवी माणसाची आशा जशी उगीचच्या उगीच नसताना अज्ञानामुळे जगात नांदवले जाते. निदैवी माणसाची आशा जशी उगीचच्या उगीच कोरडी वाढत असते त्याप्रमाणे अज्ञानातून हा विश्वपरंपरेचा वेल वाढत असतो. जिथून हा वेल वाढला ते आपले खरे स्वरूप आहे हे ते ज्ञानी पुरुष जाणतात आणि त्या स्वरूपाशी एकरूप होतात. थंडीने थंडी थंड व्हावी त्याप्रमाणे ते आपले मूळरूप होऊन जातात आणि मग एकदा त्या स्वरूपाला ते भेटले की परतून येतच नाहीत.

देहाहंता सोडून ब्रह्यतदाकारतेची अनुभूति एकदा का आली की ते ज्ञानी पुरुष पुन्हा चुकूनही 'मी देह आहे' ह्या भावनेवर येत नाहीत. महाप्रलयकालच्या पाण्याने जसे सगळे जग सारखे परिपूर्ण भरलेले असते त्याप्रमाणे ते अद्वैतज्ञानाने पूर्णत्वास पोचतात आणि एकदा पोचले की त्या अवस्थेपासून कधी ढळत नाहीत. पार्था, न ढळणे ही त्या अवस्थेची ओळखण्याची खूण आहे, असे तू समज.

आता ह्या ज्ञानी पुरुषांचे व्यावहारिक जीवनही बदलून जाते. वर्षा काळ संपला की ढग आकाश सोडून जातात. त्याप्रमाणे मोह आणि मान ह्या कल्पनांनी त्याचे मन सोडून दिलेले असते. त्यांच्या मनात ह्या कल्पना येतच नाहीत.

पुन्हा परमहंसांच्या दिव्य चरित्रातील एक प्रसंग आठवतो. दक्षिणेश्वरी एकदा डॉ. सरकार काही कामासाठी आले. काम झाल्यावर श्रीकाली दर्शनासाठी ते देवळात गेले. आवारातील बागेतून जात असताना तेथील नानाप्रकारच्या फुलांच्या ताटव्यांच्या परिमलाने त्यांना आनंद झाला. श्रीरामकृष्ण त्यावेळी तेथे सहज हिंडत होते. त्यांना पाहून हा कुणी बागेतील माळीच असावा असे समजून डॉक्टरांनी त्यांना दोन-चार फुले तोडून देण्यास सांगितले. श्रीरामकृष्णांनी काही सुंदर फुले तोडून तात्काळ नसतेने त्यांच्या हाती दिली. पुढे बरेच दिवसांनी डॉक्टरांना आपली चूक कळली व त्यांनी ठाकुरांची क्षमा मागितली पण ठाकुरांच्या चित्तात त्या प्रसंगाची आठवणही नव्हती.

देव म्हणत आहेत की ज्ञानी पुरुषांच्या मनाचा 'त्याग, मोह आणि मान' करतात. दरिद्री आणि निष्ठूर अशा पुरुषाला जसे सोयरेधायरे इथे आता आपल्याला काही थारा मिळणार नाही हे समजून सोडून जातात. त्याप्रमाणे सगळे विकार त्या पुरुषाजवळ रहायला कंटाळतात आणि निघून जातात. काहीबाही क्रिया शिल्लक रहातात पण घड लागलेली केळ उलथून पडते त्याप्रमाणे प्रबळ असे आत्मलाभाचे फळ देऊन त्यांची क्रियापण हळूहळू गळून पडते. ज्या वृक्षाला आग लागली आहे अशा वृक्षावरचे पक्षी जसे त्याचा भराभरा त्याग करून सैरावैरा उडून जातात तसे सगळे विकल्प त्यांना सोडून पळतात. भेदबुद्धिच्या जमिनीत सगळ्या दोषांना अंकुर

फुटतात. पण ज्ञानी पुरूषांच्या कानी ह्या भेदबुद्धिची गोष्टही येत नाही. सूर्योदयासरशी रात्र जाते त्याप्रमाणे अज्ञानाबरोबर "मी देह आहे" हा भावही जातो. आयुष्य संपल्याबरोबर जीव देहाला टाकतो त्याप्रमाणे निदसुऱ्या द्वैतबुद्धिने त्यांना टाकलेले असते. परिसाजवळ लोखंडाचे दुर्भिक्ष्य आणि सूर्याजवळ अंधाराचे दारिद्र्य त्याप्रमाणे त्या ज्ञानी पुरुषाजवळ द्वैताचा अभाव असतो. ज्या सुखदुःखाच्या रुपाने देहामंध्ये द्वंद्व गोचर होते ती सुखदुःखे त्या पुरुषांच्यासमोरच येत नाहीत. स्वप्नामध्ये राज्य मिळाले किंवा मरण आले तरी जागे झाल्यावर राज्यलाभाने हर्ष, मरणामुळे खेद असा प्रकार होत नाही. सर्प गरुडाला धरू शकत नाही त्याप्रमाणेच सुख-दुःख, पुण्य-पाप या द्वंद्वाकडून त्या पुरुषाला काही ताप पोहचू शकत नाही. अनात्मपदार्थरूपी पाणी टाकून आत्मरसाचे दूध ते विचारी, ज्ञानी पुरुष एखाद्या राजहंसाप्रमाणे सेवन करतात. सूर्य भूतलावर आपल्या तेजाचा वर्षाव करतो आणि किरण समुदायरूपी जाळ्याने परत बिंबामध्ये आकर्षून घेतो त्याप्रमाणे आत्म्याचे विस्मरण झाल्यामुळे बारा वाटांनी विखुरलेली मूळ वस्तू ज्ञानदृष्टीने एकवटून तिचे अखंडत्व ते पुन्हा प्रस्थापित करतात. गंगेचा ओघ समुद्रात निमग्न होतो त्याप्रमाणे त्या सत्पुरुषांचा विवेक आत्म्याच्या निश्चयात तद्रूप होतो. आकाश स्वभावतःसर्वव्यापी आहे. त्याला एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्याचे कारण नाही त्याप्रमाणे आपणच सर्व काही झाल्याने त्यांना अभिलाषा ती कसलीही उरत नाही. अग्निच्या डोंगरावर कसलेही बी अंकुरत नाही त्याप्रमाणे त्यांच्या मनात कुठलाही विकार उदय पावत नाही.

क्षीरसमुद्रामध्ये मंथनासाठी योजलेला मंदार पर्वत मंथन संपल्यावर समुद्रातून काढला आणि क्षिराब्धि घुसळण थांबल्यामुळे शांत झाला, त्याप्रमाणे ज्या ज्ञानी पुरुषांच्या मनातील कामोर्मि शांत झालेली असते. सोळा कलांनी युक्त असलेला चंद्र जसा कुठल्याही अंगाने उणा वाटत नाही. त्याप्रमाणे कुठलीही इच्छा उत्पन्न होण्याचे न्यून त्याच्या ठिकाणी दिसत नाही. आता ह्या निरुपम गोष्टी किती सांगू? धुळीचे कण जसे सोसाट्यांच्या वाऱ्यापुढे टिकत नाहीत त्याप्रमाणे त्याच्या मनापुढे विषयाचे नावसुद्धा टिकू शकत नाही.

ज्ञानाच्या अग्निने त्या ज्ञानी पुरुषांच्यामध्ये अशी काही किमया केली जाते की ते ज्या पदाला व्यय नाही, कमीपणा नाही अशा आत्मरूपात सोन्यात सोने मिसळावे त्याप्रमाणे मिसळून जातात. काय त्या पदाचा महिमा वर्णन करावा.

अर्जुना, दृश्यपणाने पहावे का ज्ञेयत्वाने जाणावे असे ते पद नव्हेच. ते अमुक आहे असे पण त्याच्याबद्दल म्हणता येत नाही. ह्या जागाचे जे दर्शन जीवांना होते ते त्या पदाच्या दृष्टिने न पहाणे आहे. ते पद लपल्यामुळे भास होतो. "शिंप आहे" हे यथार्थ ज्ञान जसजसे हारपते, तसतसे हे रुपे आहे हा भास दृढ होत जातो.

"ही दोरी आहे" हे यथार्थ ज्ञान जितके जितके लपत जाते तितका तितका हा सापच आहे हा भास वाढत जातो. रविचंद्राचे तेज झळझळित आहे असे मानले जाते पण हा त्या परब्रह्मवस्तुचा अंधार त्या ग्रहांना प्रकाशित करतो हे ध्यानात ठेव. परब्रह्मवस्तू आपले रूप, आपले तेज, आच्छादित करते म्हणून चंद्रसूर्याचा उजेड पडतो. ती वस्तु तेजाची रासच आहे. ती चंद्रसूर्याच्या मनात प्रकाशते आणि सर्व भूतामध्येही प्रकाशमान होते. चंद्रसूर्य या त्या प्रकाशाच्या मानाने सावल्या आहेत. तेजस्वी वस्तूत जे जे तेज आहे, ते ते त्या ब्रह्मवस्तूचे तेज आहे, ब्रह्मवस्तूचे अंग आहे.

सूर्योदयाबरोबर चंद्र, नक्षत्रे जशी आकाशात हारपून जातात. त्याप्रमाणे त्या वस्तूच्या प्रकाशात चंद्रसूर्यासह जग हारपून जाते. संध्याकाळी मृगजळ दिसत नाही आणि जागृती आली की स्वप्नातील पसारा उरत नाही. त्याप्रमाणे ज्या वस्तूच्या ठिकाणी कुठलाही अभास नाही ते माझे मुख्य ठिकाण आहे असे समज.

महोदधीमध्ये नद्यांचे प्रवाह जाऊन मिळाले की जसे लुप्त होतात त्याप्रमाणे जे पुढे तिथे गेले ते मागे येण्यास पाऊल उचलत नाहीत. मिठाची हत्तीण धुवावी म्हणून लवणसागरात घातली तर ती त्या समुद्रात विघरून जाते परत येतच नाही. अग्निज्वाळा एकदा अंतराळात गेल्या की परतून माघारी येत नाहीत किंवा तापलेल्या लोखंडावर टाकलेल्या पाण्याची वाफ होऊन जाते, त्याप्रमाणे जे माझ्याशी एकरूप होऊन गेले त्यांना पुन्हा जन्ममरण येत नाही, पुनरावृत्तीची वाट बुझूनच जाते.

प्रज्ञापृथ्वीचा राजा अर्जुन म्हणाला, “देवा, आपण हे सगळे मला सांगता हा माझ्यावर आपला केवढा महाप्रसाद आहे! आपण उपदेश करता अहा तो माझी योग्यता पाहून करता की, माझ्यावर आपले जे अपरंपार प्रेम आहे त्या प्रेमापोटी करुणाबुद्धिने सांगता हे सगळे आपले आपल्याला माहीत. पण मी मात्र हा उपदेश म्हणजे आपल्या पूर्णकृपेची खूण समजतो.

पण देवा, आपण जे आताच सांगितले ते जसेच्या तसे माझे मन स्वीकारीना. एक शंका येते आहे. ती मी आपल्याला विचारतोच. आपण लक्षपूर्वक ऐकून घेऊन तिचे निवारण करा. आपल्याशिवाय मला निःशंक कोण करणार?

देवा, आपण प्रथम म्हटले की, द्वैत मानणे हे अज्ञान आहे आणि आता सांगता की, ते ज्ञानी पुरुष तुमच्याशी एकरुप होतात, माघारी येतच नाहीत. आता मला सांगा ते पुरुष आपल्याशी भिन्न असतात. की अभिन्न असतात? अनादिसिद्ध तुमच्याहून भिन्न असले तर ते माघारी येत नाहीत हे असंबंद्ध आहे. मग जे भ्रमर फुलामध्ये गुंग होऊन राहिले ते फुलेच झाले म्हणावे लागेल. बाण जसे लक्ष्याला शिवून पुन्हा वेगळे पडतात तसे ते पुरुष देवाच्या स्वरूपाला स्पर्श करून माघारी येणारच आणि जर तुमचे आणि त्यांचे अनादिसिद्ध ऐक्यच मानले तर कुणी कुणाला मिळावयाचे? शस्त्र काय आपले आपल्याला रुपते काय?

देवा म्हणून अभिन्न असे जीव तुमच्याशी नित्य संलग्नच, एकरूपच रहाणार की! अवयव शरिराशी रहातात तसेच ते जीव तुमच्याशी संलग्न रहाणार आणि जर ते तुमच्याहून वेगळे मानले तर तुमच्याशी त्यांचे ऐक्य होते हे कुठल्याही दिवशी संभवत नाही. तुमच्या स्वरूपातून ते माघारी येतात की नाही याची वाटाघाटच व्यर्थ ठरते. तुमच्या स्वरूपाला मिळून माघारी न येणारे असे हे कोण ते मला नीट समजावून सांगा. सर्वत्र मुखे असलेला म्हणून आपल्याला सर्वतोमुख हे नाव आहे. तेव्हा मला आपण माझ्या शंकेचे उत्तर सहजच द्याल. क्षमा करा देवा, मी आपल्या शब्दावर लगेच विश्वास ठेवत नाही म्हणून. पण मनात शंका असताना मी पटले असे कसे म्हणू?

सर्वज्ञांचे शिरोमणी भगवान शिष्याचा आक्षेप ऐकून फार आनंदित झाले. अर्जुनाच्या चित्तात बोधाचा प्रकाश कसा प्रखर आहे हे त्या शंकेवरून कळत होते.

अनुक्रमणिका

देव हसून म्हणाले. “महामती अर्जुना, तू शंका किती मार्मिक घेतलीस रे.” मी तुला उगीच का प्रज्ञाकांत म्हणतो? मी सांगतो ते सर्व तू ग्रहण करतोस पण जसेच्या तसे नव्हे तर त्या सांगण्याची पूर्ण छाननी करीत करीत घेतोस. तुझ्या बुद्धिला जे पटेल त्याचाच फक्त स्वीकार करतोस. उत्तम शिष्याचे हेच तर लक्षण आहे. फार चांगली शंका विचारलीस.

अर्जुना, माझ्या स्वरूपाशी ऐक्य पावून जे माघारी येत नाहीत ते भिन्नही आहेत आणि अभिन्नही आहेत. विवेकबुद्धिने खोलवर पाहिले तर ते आणि मी एकच. वरवर पाहिले तर मी भिन्न लक्षात आले का अर्जुना? आत्मबुद्धिच्या दृष्टिने ऐक्य आणि देहबुद्धिच्या दृष्टिने भिन्नता! उत्पन्न झाले की कल्लोळ पाण्याहून वेगळे दिसतात पण मुळात निखळ पाणीच. दागिने सोन्याहून आकाराने भिन्न पण सोने ह्या दृष्टिने एकच. अज्ञानाने भिन्नत्वाचा भास झाला तरी ज्ञानाच्या दृष्टिने किरीटी ते माझ्याहून अभिन्नच आहेत.

आत्मदृष्टिने पाहिले तर सगळीकडे एकटा मीच असताना माझ्याशिवाय दुसरे कोणी असेलच कसे? भिन्न आणि अभिन्न हा व्यवहार कसा सांगता येईल? भिन्नता संभवत नाही हे ध्यानात घे. सूर्याने सगळे आकाश पोटात घातले आणि ब्रह्मांडगोल व्यापून टाकला तर त्या सूर्याचे प्रतिबिंब पडणार कुठे? किरण शिरणार कुठे? कल्पांताच्या वेळी जेव्हा सगळे विश्व जलमय होऊन जाते तेव्हा पाण्याचे ओघ वेगवेगळे येऊन समुद्रात मिळताना दिसतात काय? त्या ओघांनी समुद्र भरून टाकला असे तरी म्हणता येते काय? त्याप्रमाणे अविकारी अशा मला अंशरुपाने विश्वरूप झालो असे म्हणता येईल काय? आकारामुळे बाह्यतः भिन्नता भासले एवढेच. ओघ कधी सरळ जातो कधी वाकडे वळण घेतो म्हणूनच केवळ पाणी सरळ आणि वाकडे दिसते. पाण्याला काही वाकडेपणा सरळपणा आहे का? सूर्याचे पाण्यात प्रतिबिंब पडले की एकाच बिंबाची दोन बिंबे भासतात. घटामध्ये आकाश वाटोळे, मठामध्ये चौकोनी असे म्हटले जाते ते केवळ घटामठाच्या आकारामुळे नाही का? ना ते पाणी वाकडे होत, ना तो सूर्य द्विधा होत, ना ते आकाश घटामठासारखे होत. अरे हा भिन्नत्वाचा भास आकारामुळे आलेला असल्याने वरवरचाच नव्हे काय?

निद्रा लागल्यामुळे एखादा मनुष्य स्वप्नात राजा होतो. मग सर्व वैभव परिवार आपणच होती. खरे पाहिले तर एकटाच असतो पण झोपेने घेरल्यामुळे अनेक होतो. सोने मुळात चोख होते पण त्यात हीण मिसळते आणि ते शंभर कसाचे सोने त्यात ज्या ज्या प्रमाणात हीण मिसळले जाईल त्या त्या प्रमाणात कमी-कमी कसाचे होत जाते. त्याप्रमाणे मी मुळात शुद्ध, अविकारी, एकच एक असताना मायेने ग्रासला जातो. माझ्यावर मायेचे पटल येते मग ‘मी कोण’ असा विकल्प येऊन मी देह असा निश्चय होतो. आता मुळचे व्यापक ज्ञान या शरिराएवढेच आहे असे भासून तो माझाच एक लहानसा अंश आहे असे वाटू लागते. जड देहाला सचेतन करणारा आणि देहअहंतेस जन्म देणारा मी जीवलोकी ‘जीव’ असा वाटू लागतो. क्रम ध्यानात घे पार्था.

मायेच्या पटलाने माझ्या एकसंधी रूपात अनेकता भासू लागते. अनेक रूपे दिसू लागल्याबरोबर माझे अभेदत्व विरून जाऊन माझेच अंश झाले असे भासू लागते.

शरीर उत्पन्न झाले की मी जन्मास आलो व ते नाहीसे झाले म्हणजे मी मेलो हीच अवस्था खरी अशी जी जीवाची समजूत झाली आहे त्यालाच मी जीवलोक किंवा संसार म्हणतो. अर्जुना, मी जीवलोक, जीवलोक कशाला म्हणतो आहे, कोणत्या अवस्थेला म्हणतो आहे हे ध्यानात घे. शरिराच्या जन्ममरणास मी जीवलोक म्हणतो आहे. या जीवलोकात मी नाही. केवळ माझे प्रतिबिंब आहे. चंद्राचे प्रतिबिंब पाण्यात दिसते पण चंद्र त्या पाण्यापासून वेगळा रहातो. तो त्या पाण्याने काही भिजत नाही. स्फटिकाचा खडा कुंकवावर ठेवला तर त्या कुंकवामुळे लाल रंगाचा दिसतो पण तो रंग कुंकवाचा आहे स्फटिकाचा नव्हे. तसेच हे आहे. माझे अनादिपण मोडत नाही, माझे अक्रियत्व भंगत नाही. पण मी प्रकृतिच्या संगामुळे कर्ता आहे, भोक्ता आहे अशी भ्रान्ती उत्पन्न होते. शुभ्र स्फटिक लालभडक दिसतो तशी! किंबहुना तो चोख आत्मा प्रकृतिशी एकरूप होतो, आणि प्रकृतिधर्माची मालकी स्वतःकडे घेऊ लागतो. एकदा का त्याने प्रकृतिशी एकरूपता मानली की त्याची धावाधाव सुरू झालीच म्हणून समज. मनादि सहाही इंद्रिये, डोळे, कान, नाक, जीभ, त्वचा ह्यांच्या व्यापारावर प्रकृतिबरोबर तो आरूढ होतो. एखाद्या संन्याशाला स्वप्न पडते की आपण गृहस्थाश्रमी आहो. तो लगेच स्वप्नात सगळा प्रपंच थाटतो. त्याला बायको, मुले हा सर्व परिवार वेढून टाकतो आणि त्या सगळ्यांच्या चिंतेने आणि मोहाने बिचारा गांजून जातो. सैरावैरा धावत सुटतो. त्याप्रमाणे त्या आत्म्याला आपल्या मूळ स्वरूपाची विस्मृती होते. तो प्रकृतिमध्ये पूर्णपणे गुरुफटतो आणि प्रकृतिसारखाच होऊन शरीरास अनुसरू लागतो, मनाच्या रथावर आरूढ होतो, श्रवणेंद्रियाच्या द्वाराने बाहेर पडतो आणि शब्दाच्या दाट जंगलामध्ये शिरतो. तितक्यात प्रकृति लगाम ओढते आणि रथाचा मोहरा त्वचेच्या दिशेला वळवते. लगेच प्रकृतिच्या आधीन झालेला आत्माराम मुकाट्याने त्वचेच्या घोर रानात शिरतो. कधी कधी एखाद्या वेळी नेत्राच्या द्वाराने बाहेर पडतो आणि रूपाच्या डोंगरात सैरावैरा हिंडतो. रसनेच्या वाटेने बाहेर पडला की रसाची दरी जे पोट ते भरावयास लागतो. हा देहेश आत्मा कधी घ्राणेंद्रियातून बाहेर पडला की गंधविषयांची भयंकर राने ओलांडतो. प्रकृति आपल्या मर्जीप्रमाणे देह आणि इंद्रिये यांचा स्वामी असलेल्या त्या आत्मराजास फिरावयास लावते. आणि मनाची जवळीक करायला लावून शब्दादिंक विषयांचा समुदाय भोगायला लावते. इतकेच नव्हे तर ‘मी कर्ता,’ ‘मी भोक्ता’ हा भ्रमही जीवाला उत्पन्न करते. त्याला ह्या विषयभोगापासून दूर होऊच देत नाही. पण अर्जुना, ही गोष्ट लक्षात ठेव की आत्मा जन्माला येत नाही, मरत नाही, देह जन्माला येतो आणि मरतो, आत्मा आणि देह यांचा मिलाफ झाला की, कर्माचा पंखा उघडतो.

कर्ता आणि भोक्ता अशी जीवाची स्थिती जेव्हा तो जीव आपल्या गतकर्मानुसार एखाद्या स्थूल शरिरात प्रवेश करतो तेव्हाच दिसते.

एखादा पुरुष राजधानीत रहायला येतो तेथे त्याच्या राहाणीच्या थाटामाटावरून, डामडौलावरून तो श्रीमान व विलासी आहे हे कळते. त्याप्रमाणे जीवाला नवा देह प्राप्त होतो, तेथे त्याच्या अहंकाराचे कर्तृत्व विषयेंद्रियाचा धुमाकूळ या क्रिया प्रगट होऊ लागतात व त्याचे गतजन्मातील कर्म काय हे दिसू लागते. त्या गतकर्मानुसार देह व देहक्रिया घडत असतात.

एखादा जीव जेव्हा शरिराचा त्याग करून निघून जातो तेव्हा इंद्रियांच्या समुदायामागील तत्त्वे तो काढून बरोबर घेऊन जातो. जीव गेला तरी देहातील इंद्रिये जागच्याजागीच असतात, पण त्यांच्यामागील प्रेरक शक्ति, प्रेरक कार्यशक्ति जीवाबरोबर निघून जाते. आता ती इंद्रिये आपली कुठलीच क्रिया करू शकत नाहीत.

अतिथीचा अपमान झाला की, तो त्या गृहस्वामीच्या सुकृताची संपत्ती लुटून घेऊन जातो. दोरा तुटला की कळसूत्री बाहुल्यांची हालचाल थांबते. सूर्य मावळला की डोळ्यांचे पहाण्याचे सामर्थ्य नाहीसे होते. वारा वाहू लागला की फुलातील सुगंध तो घेऊन जातो. त्याप्रमाणे अर्जुना, देहराज जो जीव तो देहातून बाहेर पडत असताना मन, पाच ज्ञानेंद्रिय, पाच कर्मेंद्रिये यांची कार्यशक्ति घेऊन जातो. मग इहलोकी किंवा स्वर्गलोकी तो जीव ज्या देहाचा अंगीकार करतो त्या देहात तेथे पूर्वीच्या मनादिकांचा विस्तार करतो. एखादा दिवा मालवला की प्रभेसहित तो जातो आणि दुसऱ्या गावी जरी नेला तरी लावला की पुन्हा त्याचा प्रकाश फाकतो. त्याप्रमाणे ह्या जीवाच्या बाबतीत घडते.

एक देह सोडला आणि दुसऱ्या देहात प्रवेश केला की मागील जन्मातील मन, बुद्धी, अहंकार व ज्ञानेंद्रियांची शक्ती पुन्हा जशीच्या तशी फाकते. पहाणाराही तसाच ज्ञानी असला तर त्याला हा जीव कोणत्या ठिकाणाहून आला आहे. हे कळते. पूज्य गोंदवलेकरमहाराजांच्या चरित्रात असा प्रसंग आहे की, त्यांची माता त्यांच्यावेळी आठ महिन्यांची गरोदर असताना एके दिवशी रामेश्वरास जाण्यासाठी निघालेला एक बैरागी आला. ब्रह्मचैतन्यांची माता भिक्षा घालण्यासाठी दारात आल्याबरोबर त्या मातेला पाहून बैरागी आश्चर्याने उद्गारला, “मेरा लाला तू यहाँ है? तो मेरी यात्रा यहाँही सफल हो गयी!”

गर्भस्थ बालकाचा गतजन्म जाणणारा तो बैरागीही त्याच सामर्थ्याचा होता.

Autobiography of a Yogi या पुस्तकात योगानंदजी लिहितात. “रांचीच्या शाळेमधील काही विद्यार्थ्यांना घेऊन आम्ही एकदा सहलीला गेलो. वनभोजन झाल्यावर एका झाडाखाली मी व माझे विद्यार्थी बसला होतो. एका विद्यार्थ्याने विचारले, सर, मला सांगा मी ह्या संन्यासमार्गावर आपल्याबरोबर कायम राहीन ना? मी चटकन् म्हटले, “छे रे, तुझ्या घरची मंडळी तुला जबरदस्तीने इथून नेतील आणि मग पुढे तू लग्न करून गृहस्थाश्रमी होशील.” (आणि पुढे तसेच झाले.) मग काय प्रत्येकानेच प्रश्न विचारायला सुरवात केली.

काशी नावाच्या मुलाने प्रश्न विचारायला सुरवात केली. तो बारा वर्षाचा होता. तो फार हुशार व सर्वांचा आवडता विद्यार्थी होता. त्याने विचारले, “सर माझ्या भवितव्यात काय आहे ते सांगा.”

मी एकदम बोलून गेलो, “तुझे आयुष्य संपत आले आहे.” हे शब्द मी उच्चारले मात्र मला फार वाईट वाटले. भविष्य सांगणे बंद करून आम्ही सर्व शाळेत परत आलो. काशी थोड्या वेळाने माझ्या खोलीत आला आणि हुंदके देत मला म्हणाला, “सर मी जर मेलो आणि पुन्हा जन्माला आलो तर तुम्ही मला शोधून काढून पुन्हा अध्यात्ममार्गाला लावाल काय? मला तसे वचन द्या.”

मी म्हटले, “काशी, देवाने मदत केली तर मी तुला पुन्हा शोधून काढीन. पण तू जर आश्रम सोडून सुटीत घरी गेला नाहीस तर मरण टळेलसुद्धा.”

पण तसे व्हावयाचे नव्हते. काशीचे वडील आले आणि मी नसताना जबरदस्तीने काशीला घेऊन गेले. कलकत्यास तो घरी गेला आणि काही तरी खाल्ल्याचे निमित्त होऊन कॉलऱ्याला बळी पडला. काशीवरचे माझे प्रेम व दिलेले वचन मला रात्रंदिवस आठवत होते.

योगाची एक गुप्त प्रक्रिया करून मी काशीवरचे माझे प्रेम वातावरणात प्रक्षेपित करीत होतो. दोन भुवयांच्या मध्ये असलेल्या तृतीय नेत्राचा मी मायक्रोफोन म्हणून उपयोग करीत होतो. दोन्ही हात वर करून त्यांचा ॲन्टिनासारखा उपयोग करून गोल गोल फिरत मी काशीने पुन्हा जन्म घेतला आहे की काय याचा शोध घेत राहिलो.

काशीच्या मृत्यूनंतर सहासात महिन्यांनी काही मित्रांबरोबर कलकत्त्याच्या बोबाझारच्या गर्दीच्या रस्त्याने जात असताना मी नेहमीप्रमाणे हात वर केले तो काय माझ्या बोटांना आणि तळहातांना संदेश येऊ लागले. माझ्या जाणिवेत एक विचार घुसला "मी काशी आहे, मी काशी आहे. माझ्याकडे या." माझ्या हदयाच्या रेडिओत काशीचे शब्द ऐकू येत होते.

मी उद्गार काढले, "काशीचा आत्मा ह्या गल्लीतील एका घरात मातेच्या उदरात आहे."

या संदेशाच्या मागे जात जात मी त्या गल्लीतील घरापुढे उभा राहिलो. नोकराने दार उघडले. वरून घरमालकही खाली आले. हसतमुखाने त्यांनी संन्यास वेष पाहून स्वागत केले पण चर्या प्रश्नार्थक होती.

मी विचारले, "महाशय आपल्या पत्नी सहा महिन्याच्या गरोदर आहेत काय?"

मालक विनयाने म्हणाले, "होय! हे खरे आहे पण आपल्याला कसे कळले?" मग मी काशीची सर्व हकीकत सांगितली. माझ्या वेषामुळे त्यांचा लगेच विश्वासही बसला. मी मग त्यांना सांगितले, "तुम्हाला गोऱ्या रंगाचा मुलगा होईल. त्याचा चेहरा रुंद असेल, कपाळावर केसाची एक बट असेल आणि त्या मुलाचा कल लहानपणापासूनच अध्यात्माकडे असेल." त्याप्रमाणे त्यांना मुलगा झाला. त्याचे नावही काशीच ठेवले. मी अमेरिकेत असताना त्या माझ्या काशीचे मला पत्र आले. त्याने संन्यास घेण्याचा आपला मनोदय मला कळवला होता. मी हिमालयातील एका साधूपुरुषाकडे त्याला पाठवले. काशीने त्यांचे शिष्यत्व पत्करून आपली मागच्या जन्माची तपश्चर्या पुरी केली व आपला मनोदय पूर्ण करून घेतला. या जन्मात तयार झालेले मन व घासून पुसून लखलखीत झालेली कर्मेंद्रिये व ज्ञानेंद्रिये यांची प्रेरक शक्ति मरणकाळी आत्म्याबरोबर कशी निघून जाते आणि नव्या देहाचा आधार मिळाला की या जन्मातील संकल्प पुरे करण्यासाठी पुनर्जन्मात कशी प्रगट होते हे ह्या काशीच्या उदाहरणाने कळते आहे. देव सांगत आहेत, "किरीटी अर्जुना, खरोखर अशी व्यवस्था असताना अविवेकी पुरुष असे समजतात की आत्मा जन्माला आला, त्याने भोग भोगले आणि तो मृत्यूच्या वाटेने निघून गेला. आता आले कोण, गेले कोण, मध्यंतरीच्या काळात भोग भोगले कोणी असा जर विचार केला तर तुझ्या ध्यानात येईल की ह्या सर्व उपाधी त्या देहाला आहेत, आत्म्याला नाहीत हा सर्व खेळ मायेचा आहे. आत्मा त्या कशातच गुंतलेला नाही. परंतु लहानसा देह उत्पन्न झाला. त्या देहात चेतना प्रगट झाली म्हणून अविवेकी पुरुष त्या देहाच्या हालचालीकडे पाहून आल्या जन्माला आला असे म्हणतात. आता देह म्हटला की इंद्रिये आलीच

ही इंद्रिये आपआपली कामे करतात. ह्या त्यांच्या क्रियांना हे अविचारी लोक भोग असे नाव देतात. भोगक्षीणता आली की देह पडतो, त्याची काही हालचाल दिसत नाही म्हणून ते लोक 'तो आत्मा गेला गेला' असा बोभाटा करतात.

आता हालचाली असल्या तरच आस्तित्व मानायचे म्हटले तर वायू वहात असला की वृक्ष डोलतात. तोच वायू वहायचा थांबला की वृक्षाची हालचाल थांबते तेव्हा वृक्ष हालत नाहीत वायूच नाहीसा झाला असे म्हणावे लागेल. जिथे वृक्ष नाहीत तिथे वायु नाही आहे काय?

आरसासमोर असताना आपला चेहरा त्यात दिसतो. पण असे असते काय की अरसासमोर आणल्यावर मुख आस्तित्वात आले? ते मुख आरसासमोर येण्याच्या आधीपासून आस्तित्वात होतेच ना? समज आरसा दूर केला. आता प्रतिबिंब नाही मुखाभास नाही म्हणजे मुखच नाही असे म्हणावे काय? असा निर्णय घ्यावा काय?

मुळात शब्द हा गुण आकाशाचा पण गडगडाट सुरू झाला की त्या शब्दाचा आरोप मेघावर केला जातो, त्याच्या कपाळी मारला जातो. चंद्रावरून ढग पळू लागतात. पण चंद्रच पळतो आहे असा दृष्टीला भास होतो. ढगांच्या गतीचा आरोप चंद्रावर येतो. देहाचे जाणे-येणे, भोगणे हे अविचारी आंधळे अविकारी आत्मसत्तेवर आरोपित करतात.

या सर्व भाऊगर्दीत आत्मा हा आत्म्याच्या ठिकाणी आणि देह देहाच्या ठिकाणी पहातात ते खरे देखणे म्हणावे, पूज्य सत्यदेवानंदसरस्वती स्वामीजींनी गुरुपौणिमेस दिलेल्या वाङ्मय प्रसादात म्हटले आहे—

**मना देह प्रारब्ध ओघीं वहावा । अहंभाव आतील देवास द्यावा ।**
**विभागून देता जयाचे तयासी । स्वरूपांत आनंद लाभे जिवासी ।**

स्वरूपात आनंद यातील श्लेष लक्षात घेतला तरी आनंद वाटतो आहे. स्वामीजींच्या मौनकाळानंतर त्यांना एक काव्य पाठवले होते. त्यांना उत्तरात स्वामीजींनी बोध केला होता—

**औट मोटके शरीर नश्वर मी नच ते माझे ।**
**ऐसे भावुन माव्यावरचे उतरावे ओझे ।**

आता हा सर्वच अनुभव नोंद करण्यासारखा आहे म्हणून पाठविलेल्या काव्याच्या पार्श्वभूमीचा उल्लेख करावासा वाटतो.

नवरात्रासाठी आम्ही मलकापूरला आणि स्वामीजी कोल्हापूरला मौनामध्ये होते. आता स्वामीजींचे मौन संपेल या काळात त्यांना काही विशेष अनुभव आलेच असतील असे विचार प्रभावी झाले आणि काव्याच्या ओळी आल्या त्या जशाच्या तशा उतरल्या आणि स्वामीजींना पाठवल्या. ओळी अशा होत्या—

अनुक्रमणिका

**दूरदेशिचा प्रवास करुनी स्वामी आपण आला ।**
**श्रम नाही ना झाले कांही? शीण नाहिं ना आला?**

**कुशल प्रश्न हे अनुचित असती जाणुनि हे अंतरी ।**
**वेडे मन हे तरिहि आपणा वारंवार विचारी ।**

**विंद्य हिमाद्रि ओलांडोनी गेला मानस तीरी?**
**हंसासम त्या विमल जलान्तरी झाला सरसविहारी ।**

**तिथें लाभला काय मधुरसा मोत्यांचा चारा?**
**काय घेतला स्वच्छंदाने हिमाचलाचा वारा?**

**काय पाहिल्या गगनांतरिच्या नक्षत्रांच्या माळा?**
**किंवा दिसल्या शशिसूर्याच्या तेजोमय लीला?**

**आकाशाने असेल केले अपूर्व स्वागत आपुले ।**
**कधी लाभावी तयास असली सोन्याची पाउले ।**

**काय पाहिली पाताळीची धगधगती ज्योती?**
**काय भेटला नागराज तो? कैशी त्याची वस्ती?**

**गंगा यमुना काय म्हणाल्या? कशा उसळल्या वरती?**
**काय त्यागुनी त्यांना आपण थेट साधला उदधी?**

**आपण धाला! अतृप्त आम्ही वाट पहातो इथे ।**
**कधी लाभतो अंश सुखेचा आपण रमला जिथे ।**

**अद्भुत सुंदर त्या दुनियेची वार्ता सांगावी ।**
**असतिल अपुरे शब्द तरी मग अनुभूतिच द्यावी ।**

ह्या कवितेस स्वामीजींनी काव्यातच उत्तर पाठवले होते. त्याची सुरवातच ह्या शेवटच्या ओळींतील शब्द उचलून साखळीसारखी केली होती. त्यांनी म्हटले—

**अद्भुत सुंदर मम दुनियेची वार्ता ऐकावी ।**
**समर्थ शब्दांमधुनी आपण अनुभूतिच घ्यावी ।**

अनुक्रमणिका

परम दयाधन सद्‌गुरु सकला गगनपथीं नेती ।
भू, जल, तेज, समीर उलंडुनि "खं" मय हो वृत्ति ।

विशाल सुस्थिर निर्मल गगनी गगनरूप होता ।
सद्‌गुरु वदती परमशांत ही बघ बघ निजसत्ता ।

उंच उंच हिमशिखरे पाहत एकले निघावे ।
पवित्र एका उच्चतम स्थलि अलगद बैसावे ।

अंवती भंवती कोणी नाही स्वकीयही नसती ।
निवांत अद्भुत  दुनियेमधली आपलीच वसती ।

नयना पुढती एक जलाशय निर्मल आणि अपार ।
क्षितिजावरती तेजोनिधि तो दिसे वर्तुलाकार ।

तांबुस शीतल भानुबिंब ते अवलोकन करिता ।
देहांतर्गत मुख्य वायुची स्थिति सोहंभरिता ।

आज्ञा चक्रापासुनि पुढती दशांगुळे गणिता ।
जन्म मृत्यु चुकविता नांदतो तेथे निजजनिता ।

औट मोटके शरीर नश्वर मी नच ते माझे ।
ऐसे भावुन माथ्यावरचे उतरावे ओझे ।

बघ उघडुनिया दार दहावे हंसा मुक्त करोन ।
केवळ गगना वांचुन तेथें उरे अन्य कोण?

सद्‌गुरु वदती परमशांत ही बघ बघ निजसत्ता ।
त्या सत्तेचे अधिष्ठान परमात्मा तूंच स्वतः ।

येणे परि तूं गगनाचाही साक्षी होउन राही ।
अद्भुत  सुंदर त्या दुनियेतिल नवलाई पाही ।

दृष्टा दर्शन दृश्य भान हे नुरते लवमात्र ।
ऐशा अद्भुत  दुनिये माजी कुठले दिनरात्र?

अनुक्रमणिका

**अद्भुत  सुंदर त्या दुनियेतिल व्हावे रहिवासी ।**
**सत्य देव यति गुरुवर किंकर विनवी सकलांसी ।**

स्वामीजींनी या काव्यात देह आणि आत्मा यांचा संबंध काय व ते निराळे आहेत याचा अनुभव कसा घ्यावा याचे इतके सुंदर दिग्दर्शन केले आहे की ज्ञानेश्वर कन्या सखी मंडळाने ध्यानास बसण्यापूर्वी ही कविता रोज म्हणायची असे तेव्हा ठरविले होते.

देव म्हणतात, "अर्जुना, देह आणि आत्मा हे वेगळे पहाण्याची प्रक्रिया ज्ञानामुळे होते. ज्ञानी पुरुषांची दृष्टि मग देहाच्या खोळीपर्यंत पोचून तिथेच थांबत नाही. ग्रीष्मातील तीक्ष्ण सूर्यकिरण जसे आत घुसतात तशी ती त्यांची ज्ञानदृष्टि विवेकाच्या विस्तारामुळे थेट आत्म्यापर्यंत पोचते आणि त्यांची स्फूर्ती स्वरूपाच्या ठिकाणी स्थिर होते. आकाशात नक्षत्रे खच्चून भरलेली असतात. ती समुद्राच्या पाण्यात प्रतिबिंबित होतात. पण पहाणारा असे म्हणत नाही की आकाश तुटून समुद्राच्या पाण्यात पडले आहे. आकाश जिथे होते तिथेच आहे आणि ते पाण्यात पडले आहे असे दिसणे हा आभास आहे. हे ज्याप्रमाणे ते दृश्य पहाणारा सहज जाणतो त्याप्रमाणे देहात सापडलेल्या आत्म्याला ते ज्ञानी पुरुष वेगळेपणाने पहातात. खळखळ वहाणाऱ्या पाण्याबरोबर आकाशतला चंद्र वहात नाही. तो चंद्रप्रकाश चंद्राच्या ठिकाणी सुरक्षित असतो हे ते जाणतात. एखाद्या डबक्यात सूर्याचे प्रतिबिंब पडते, ते डबके भरते, सुकते, प्रतिबिंब नाहीसे होते, पण सूर्य आपल्या ठिकाणी जशाचा तसा असतो. ज्ञानी पुरुष देह येताना आणि जाताना त्या देहाकडे लक्ष न देता त्यातल्या आत्म्याला म्हणजेच मला पहातात. घट आणि मठ होतात-जातात, आकाश त्यांच्या आत बाहेर जसेच्या तसे असते, घट आणि मठ आहेत किंवा आता नाहीत म्हणून त्या आकाशाच्या स्थितीत काही फरक होत नाही. त्याचप्रमाणे त्रिकालाबाधित अशा आत्मसत्तेवर देह होतात आणि जातात त्या आत्मसत्तेवर ह्या देहाच्या जाण्या-येण्याचा काहीही परिणाम होत नाही हे ज्ञानी पुरूष पक्के ओळखतात. त्यांची नजर त्या देहात असणाऱ्या अविनाशी आत्मसत्तेवर खिळलेली असते. हे चैतन्य वाढत नाही, कमी होत नाही, कर्म करीत नाही, करायलाही लावीत नाही हे ते पुरुष चोख असे आत्मज्ञान झाल्यामुळे जाणतात.

पण पार्था, हे आत्मज्ञान होण्यासाठी मनामध्ये पूर्ण विरक्ती असली पाहिजे. एरवी ज्ञान आपलेसे झाले. बुद्धिने झाडून सगळ्या विश्वातील परमाणूंचाही हिशोब दिला, सगळ्या शास्त्रांचे तात्पर्य हाती आले. अशी विद्वता आंगी आली आणि मनात विरक्तीने मात्र घर बांधलेले नाही अशी स्थिती झाली असेल ता माझी सर्वात्मकाची भेट होईल अशी आशासुद्धा धरू नये.

तोंडाने विचारांची बडबड आणि अंतःकरणात विषयांना थारा असे असेल तर धनुर्धरा मी कधीही अशा माणसाच्या हाती सापडणार नाही हे त्रिवार सांगतो. अर्जुना, झोपेत ग्रंथ बरळण्याने कधी संसाराचा गुंता सुटेल काय? पोथीला स्पर्श करून पोथी वाचल्यासारखे होईल काय? डोळे बांधून नाकांनी मोत्याचा वास घेतला तर त्या मोत्याची किंमत करता येईल काय?

त्याप्रमाणे मनात अहंतेला थारा आणि जिभेला मात्र सर्व शास्त्रांचा सराव याप्रमाणे कोट्यवधी जन्म गेले तरीसुद्धा तो मनुष्य माझ्यापर्यंत येऊन पोचत नाही. मात्र मी कुठे तरी दूर आहे आणि मला येऊन पोचायचे आहे

असे मात्र समजू नको. जीवाला माझ्या अस्तित्वाची विषयात गुंतल्यामुळे जाणीव होत नाही. पण लक्षात ठेव की मी सर्व भूतांना व्यापूनच आहे. आता माझ्या व्याप्तीचे वर्णन तुला सांगतो.

सूर्यासह ही सर्व विश्वरचना जो प्रकाश दाखवतो तो प्रकाश माझा आहे, तो प्रकाश विश्वाच्या आदि आणि अंती असतोच. अर्जुना, सूर्य पृथ्वीतील पाणी शोधून घेतो, तो प्रकाश माझाच, पृथ्वीचे पाणी सूर्याने शोषून घेतल्यावर चंद्राचा प्रकाश तिला पुन्हा ओलावा पुरवितो तोही प्रकाश माझाच. पाण्याचे शोषण करणारा सूर्याचा प्रकाश माझाच, पृथ्वीला ओलावा पुरवणारा चंद्राचा प्रकाश माझाच. जे प्रखर तेज सतत जाळण्याची, अन्न शिजविण्याची क्रिया शेवटास नेते ते अग्निच्या ठिकाणचे तेजही माझेच आहे.

अरे, मी ह्या भूतकाळामध्ये शिरलो आहे म्हणून समुद्राच्या महाजळामध्ये पृथ्वीचे हे मातीचे ढेकूळ विरघळून जात नाही. पंडुसुता, मी आकाशामध्ये चंद्राचे रूप घेतो. पृथ्वीवर ज्या औषधी वनस्पती आहेत त्यांचे मुळे चंद्रकिरणातून अमृताचा वर्षाव करून वाढवतो. त्या वनस्पतीमध्ये रस भरण्याचे काम चंद्रकिरण करतात, म्हणजे त्या रूपाने मी करतो. अरे, चंद्ररूपी चालते अमृताचे सरोवर मी झालो आहे. मी धान्यादिकांचे भरण-पोषण करतो आणि अन्नाच्याद्वारे सर्व प्राणिमात्रांना जीवन देतो.

शिजवून तयार केलेले अन्न जीव खातात, पण जठरातील अग्नि प्रदीप्त असल्याशिवाय अन्न पचून जीवांना समाधान कसे मिळणार? म्हणून प्राणिमात्रांच्या नाभीकंदावर आगटी तयार करून अर्जुना, पोटातील अग्नि मीच झालो आहे. प्राण आणि अपान ह्या दोन वायूच्या जोडभात्याने अहोरात्र फुंकफुंकून पोटामधले किती अन्न मी पचवितो याचा हिशोब नाही. कोरडी, स्निग्ध, शिजलेली, भाजलेली अशी चार प्रकारची अन्ने आहेत पण ती सर्व पचविणारा मी एकटाच आहे. याप्रमाणे लक्षात घे की सर्व प्राणी मीच आहे. प्राण्यांना जगविणारे अन्न मीच आहे. अन्नपचनाच्या कामात प्रमुख असा जठराग्नि मीच आहे. आता माझ्या व्याप्तीची अपूर्वाई यापेक्षा मी अधिक काय सांगू? विश्वात सर्व ठिकाणी केवळ मीच आहे, दुसरे कोणी नाही.

अर्जुना, तुझ्या मनात शंका आली आहे ना? तुला असे वाटते आहे की जर सगळीकडे देव आहे तर कित्येक जीव सदा सुखी, कित्येक सदा दुःखी असे का? एखाद्या शहरात एकाच दिव्यावर सगळे दिवे लावले गेलेले असताना काही प्रकाशमान झाले आणि काही लागलेच नाहीत असे का झाले? तुला ही शंका आली आहे ना? तुझ्या मनात तर्कवितर्क येऊ देऊ नकोस. तुझ्या शंकेचे निराकरण करतो ऐक.

अर्जुना, मी सर्वांच्या ठिकाणी सारखा भरून राहिलो आहे हे अगदी सत्य आहे, परंतु प्राण्यांच्या बुद्धीनुसार प्रगट होत असतो. प्राण्याचे अंतःकरण ही काच आहे व मी प्रकाश आहे ती काच शुद्ध, अशुद्ध, रंगी बेरंगी असेल त्या त्या प्रमाणे त्या काचेतून पडणारा प्रकाश बदलतो. अनेक वाद्ये आहेत. त्यातून ध्वनी निघतो. मुळात ध्वनि हा आकाशाचा गुण आहे. पण प्रत्येक वाद्यातून निघणारा ध्वनि त्या वाद्यांचा गुण घेऊन वाजतो. तबला वेगळा वाजती, सारंगी वेगळी वाजते, ध्वनीचे मूळ कारण आकाश एकच पण ध्वनीला आकार देणारे वाद्य वेगळे वेगळे म्हणून ध्वनि भिन्नभिन्न. सर्व जगाच्या क्रिया सूर्याच्याच प्रकाशात चालतात. पण प्रत्येकजण क्रिया निरनिराळ्या करतो. प्रकाश एका सूर्याचाच पण प्रत्येक मनुष्य त्या प्रकाशाचा उपयोग आपआपल्या गरजेनुसार म्हणजेच बुद्धिनुसार करतो. झाडे वाढविण्याचे काम पाणी करते पण येणारे रोप बीजधर्मानुसार येते. पाणी

पाटाने वहात जाते ऊसही वाढतो, कुंपणाला एरंडही वाढतो. त्याप्रमाणे माझे स्वरूप निरनिराळ्या जीवामध्ये निरनिराळे परिणाम घडवून आणते. एका जाणत्या आणि नेणत्या पुढे एक नीलमण्याची दुपदरी कंठी पडली होती. जाणत्याला ही रत्नावली आहे हे समजून सुख झाले. नेणत्याला एकसारखा सापाचा भास होत राहिला आणि दुःख झाले. स्वातीचे पाणी शिंपल्यात आणि सापाच्या मुखात एकदमच पडले पण शिंपल्यात झाले मोती आणि सापाच्या मुखात झाले विष! तेव्हा अर्जुना, तू शंका सोडून दे. मी सर्व ठिकाणी सारखा भरलेला असताना परिणामात भिन्नता का दिसते हे तुझ्या ध्यानात आले काय? मी त्यांच्या हृदयातच असताना जीव प्रकृतीच्या आधीन झाल्याने मला ओळखत मात्र नाहीत. अरे, सर्वांच्या हृदयात अहोरात्र 'मी' असे जी स्फुरण होते ते माझे स्वरूप आहे. एरवी जीवांना त्याची जाणीव नसते खरी. पण संतांच्या सहवासात राहिले की, आपोआप होऊ लागते. योग व ज्ञान यांचा अभ्यास केला, वैराग्याने युक्त होऊन गरुचरणसेवा केली की या सत्कर्मामुळे अशेष अज्ञान विरते आणि अहंकार आत्मस्वरूपात विश्रांती घेतो."

१९१० मध्ये लिंगाप्पा सावळगींच्यासारखे ज्येष्ठ गुरुबंधू रामभाऊ रानड्यांना काही दिवस तरी गुरूंच्या सहवासात रहाण्यास सुचविले होते. पण रामभाऊंना ते जमेना. अशा स्थितीत सावळगींच्यामार्फत भाऊसाहेबमहाराजांनी निरोप पाठविला, "रामरायाला म्हणावे नुसता नेम करून काय होणार? येथे येऊन राहिले पाहिजे."

मग गुरुदेव दोन महिने गुरूंच्या सहवासात राहून आले. नेमावलीच्या प्रस्तावनेत गुरूदेव लिहितात. "प्रस्तुत लेखकास अलीकडे बरेच दिवस त्याजबरोबर (भाऊसाहेब महाराजांबरोबर) राहण्याचा प्रसंग आला होता व त्यांच्या प्रत्येक क्रियेचे त्याने सूक्ष्म अवलोकन केले आहे. त्यांची निस्पृहता, त्यांचे दयालुत्व, त्यांचा नेमस्तपणा, त्यांचा दृढतर मनोनिग्रह, अबालवृद्धांशी समता, शिष्यांवर अलोट प्रेम, गुरूवर व आत्मज्ञानावर निस्सीम भक्ति अलौकिक शांति, उपाधीपासून अलिप्त रहाण्याची शैली हे व इतर अनेक गुण वरवर पहाणाऱ्याससुद्धा दिसून येतील. फार काय सांगावे दासबोधांतर्गत निस्पृह वर्तणूक, निस्पृह लक्षण, निस्पृह व्यापलक्षण वगैरे जे आचारबोधक समास आहेत त्यातील प्रत्येक ओवीप्रमाणे त्यांनी आपले वर्तन ठेवले आहे."

देवाना हा असा सहवास सुचवावयाचा आहे. आपल्याला आत्मसाक्षात्कार होण्यासाठी संतसहवासाचा केवढा उपयोग आहे हे स्पष्ट होते आहे.

देव पुढे म्हणाले, "या ज्ञानी पुरुषांच्या पहाण्यास माझ्याशिवाय दुसरा हेतू नसतो. ते आपले स्वरुप आपण पहातात आणि ते त्यांचे स्वरुप तर मीच आहे. तेव्हा ते माझ्याशी एकरुप होऊन, सुखरूप होऊन जातात हे ध्यानात ठेव. आता हे जे आत्मदर्शन त्यांना होते तेही माझ्यामुळेच होते. सूर्योदय झाला की त्या सूर्यप्रकाशातच सूर्य पहावा तसा मला जाणण्यासाठी मीच कारण आहे. माझ्यामुळेच माझे रूप त्यांना दिसते किंबहुना असे म्हणूया की माझ्यामुळेच त्यांचे माझ्याशी ऐक्य होते ही स्थिती ते अनुभवतात. अर्जुना, तुला वाटेल की माझ्यामुळे केवळ ज्ञानावस्थाच अनुभवता येत असावी तर तसे तू मानू नको. अज्ञानावस्थासुद्धा माझ्यामुळेच प्राप्त होत असते.

अनुक्रमणिका

शरीराच्या सेवेत गुंतलेले आणि संसारगौरवच ऐकणारे पुरुष स्वर्ग आणि संसार यांतील आकांक्षांनी वेडे होऊन कर्ममार्गावरून धावत असताना दुःखाच्या शेलक्या भागाचे अधिकारी होतात. त्यांची अहंता देहामध्ये बुडून गेलेली असते. पण हा सर्व भोगसुद्धा त्यांना माझ्यामुळेच घडत असतो. जागा असणारा पुरूष जसा जागृती व स्वप्न ह्या दोन्ही अवस्थांना कारण असतो किंवा ढग आल्याने दिवस हारपतो आणि तो हरपला हे त्या दिवसाच्याच अंधुक प्रकाशाने कळते. त्याप्रमाणे मला न जाणून आणि न जाणल्यामुळेच जीव विषय भोगत असतात. जीवाला होणाऱ्या ज्ञानाला आणि अज्ञानाला मीच कारण आहे हे लक्षात घे. दोर जेव्हा सापासारखा दिसतो तेव्हा दोरपणा व सापपणा एकाच दोरीवर भासतात. त्याप्रमाणे ज्ञान आणि अज्ञान हे दोन्ही व्यवहार माझ्यामुळेच सिद्ध होतात. दोन्ही अवस्था माझ्या सत्तेमुळे अस्तित्वात येतात.

माझी ही अशी सर्वंकष सत्ता न जाणता वेद मला समजून घ्यायला गेले म्हणून त्यांच्यामध्ये एकमत होईना. उलट मतभेदच वाढले आणि त्यातून वेदांच्या तीन शाखा झाल्या. जाणण्याची वस्तू मी एकच! पण मला एकाला जाणण्याचा प्रयत्न करणाऱ्या वेदांच्या शाखा तीन! पूर्वेकडून काय किंवा पश्चिमेकडून काय वहात येणाऱ्या नद्यांना जसा समुद्र हेच एकमेव विश्रान्तीस्थान आहे तसे हे आहे. सुगंधिक वाऱ्याच्या झुळुकी आकाशात नाहीशा होतात; त्याप्रमाणे ‘एकमेवाद्वितीयं ब्रम्ह’ ह्या महासिद्धांतापाशी वेद शब्दासह नाहीसे होऊन जातात. वेद जेव्हा लाजून स्तब्ध होतात तेव्हा मीच त्या वेदांचा अर्थ पुन्हा प्रकट करतो. आता वेदांसह सर्व जग जिथे निःशेष हरपते, तेव्हा ते शुद्ध आत्मज्ञान जाणणारा मीच आहे. त्याप्रमाणे निजलेल्यास जागे केले की स्वप्नात भासणारे दुजेपण संपते आणि पूर्ववत एकाकीपणाचे भान येते. त्याप्रमाणे माझा अद्वैतपणा मी द्वैत संबंधाशिवाय जाणतो. हा बोध जाणणाराही मीच आहे. अर्जुना, कापूर पेटला की, तो विझवताना काजळी उरत नाही आणि अग्निही उरत नाही, त्याप्रमाणे समूळ अज्ञान खाऊन टाकणारे ज्ञानही बुडून जाते. आता त्या आत्मस्वरूपाला आहेपणाही नाही आणि नाहीपणाही नाही. विश्वच घेऊन जाणाऱ्या त्या चोराला कुणी धरावयाचे? वीरा, अर्जुना, ज्ञानही नाही आणि अज्ञानही नाही अशी जी एक शुद्ध अवस्था ती अवस्था मीच आहे.”

याप्रमाणे मोक्षाचे स्वामी श्रीकृष्ण परमात्मा यांनी चराचरातील आपल्या व्याप्तीचे वर्णन केले. आकाशात उगवलेला चंद्र क्षीर समुद्रात जसाच्या तसा प्रतिबिंबित व्हावा त्याप्रमाणे देवानी केलेला हा बोध अर्जुनाच्या चित्तावर जसाच्या तसा उमटला. भिंती अगदी स्वच्छ गुळगुळीत असल्या की आरशात प्रतिबिंब उमटावे त्याप्रमाणे समोरच्या भिंतीवरील चित्र दुसऱ्या भिंतीवर उमटते त्याप्रमाणे वैकुंठनाथांच्या चित्तातील बोध अर्जुनाच्या चित्तात प्रवेश करून नांदू लागला. काय आश्चर्य आहे पहा! जो जो वस्तूचे स्वरूप अनुभवास येते तो तो त्या वस्तूची गोडी वाढू लागते. म्हणूनच अनुभव घेणाऱ्यांचा राजा अर्जुन हात जोडून त्या भगवंतास विनंती करू लागला. तो म्हणाला, “महाराज आपण आपले व्यापक रूप सांगत असताना आपले निरुपाधिक रूप सहज जाता जाता सांगितले. पण त्यामुळे माझ्या मनाची तृप्ती झाली नाही. आपण आपले ते निरुपाधिक रूप हातचे काही राखून न ठेवता सांगा.”

अर्जुनाची ही विनंती देवांनी ऐकली मात्र! त्यांना आनंदाचे भरते आले ते हसून म्हणाले, “अर्जुना बाबा भले केलेस. अरे हा विषय पुन्हा पुन्हा कौतुकाने सांगावा असे मला कितीतरी वाटते, पण करावे काय? कोणी विचारणारे भेटतच नाही. मी काय हा विषय अखंड सांगायला तयार आहे पण सांगू कुणाला? अर्जुना, तुझ्या रूपाने माझे मनोरथ फळाला आहे आहेत रे सख्या! तू तोंड भरून प्रश्न विचारतोस, चित्त भरून ऐकतोस आणि

जीव भरून अनुष्ठान करतोस.

अद्वैतापलीकडचा तो अनुभव मला तुझ्या सहाय्याने, तुझ्या निमित्ताने भोगता येईल. पार्था, हा प्रश्न विचारून तू माझेच सुख मला देतो आहेस. आरसा समोर आला की आपले मुख आपल्या डोळ्यांना दिसते. त्याप्रमाणे शुद्ध संवाद करण्यामध्ये चतुर असणाऱ्या अर्जुना, ह्या संवादाच्या मिषाने तू माझेच सुख मला देतो आहेस.

अरे, तुला माहित नाही म्हणून तू विचारावेस आणि मी ज्ञानी म्हणून तुला सांगावयास बसावे तसा प्रकार माझ्या लाडक्या, आपल्यामध्ये नाही. तू तर हे सगळे जाणतोसच पण संवादाचे सुख आपण भोगावे व मलाही द्यावे म्हणून केवळ तू प्रश्न विचारतोसच आणि मीही उत्तर देतो आहे."

देवांना प्रेमाचा आवेग आवरेना. त्यांनी अर्जुनाकडे कृपादृष्टीने पाहिले आणि एकदम त्याला मिठी मारली.

गहिवरलेल्या कंठाने देव कसेबसे बोलू लागले. म्हणाले, "अर्जुना, दोन ओठांनी एकच बोलणे, दोन पायांनी एकच चालणे, त्याप्रमाणे रे, तुझे विचारणे आणि माझे सांगणे. तू आणि मी एकच अर्थ पहायचा आहे रे. सांगणारा आणि पुसणारा दोघेहि एकच आहेत."

देव मोहाने भुलून गेले. अर्जुनाला आलिंगन दिल्याबरोबर त्यांचे देहभानच हारपले. थोड्या वेळाने भानावर येत ते मनाशी म्हणाले, "नको हे ऐक्य! उसाच्या रसाची ढेप झाली की तिची चव जास्त चांगली व्हावी म्हणून तिला मीठ लावणे बरे नव्हे. ऐक्यच झाले तर संवादसुखाची गोडी नासेल. जीवाभावाच्या गोष्टी कुणाशी बोलाव्या मग? आम्ही नरनारायण, दोघात भेद नाहीच. त्यात पुन्हा जर ऐक्य झाले तर संपलेच. तेव्हा हा प्रेमाचा आवेग माझ्याच ठिकाणी जिरवून टाकला पाहिजे म्हणून देवानी शेल्याने डोळे टिपून घेतले आणि हळूच हाक मारली, "वीरेशा अर्जुना, कसा रे तुझा प्रश्न होता?"

पण उत्तर द्यावयास अर्जुन तरी कुठे भानावर होता? त्याची कथा तरी कुठे वेगळी होती? तो कृष्णरूपात विरूनच चालला होता. प्रश्न ऐकून तो देहभानावर आला आणि त्यानेच केलेल्या प्रश्नांची उत्तरे ऐकण्यासाठी तयार झाला. सद्‌गद् कंठाने तो म्हणाला, "जी, मी म्हटले की देवा मला आपले निरुपाधिक रूप सांगा जी."

या बोलण्यावर तो शार्ङ्गी श्रीकृष्णाने निरुपाधिक रूपाचे ज्ञान करून देण्यासाठी दोन प्रकारांनी उपाधी सांगण्यास सुरवात केली.

अर्जुनाने विचारले निरुपाधिक रूप आणि देव सांगत आहेत उपाधी, हा काय प्रकार आहे असे जर कुणाला वाटले तर देवांचा हेतू असा की उपाधी सांगाव्या त्या काढून टाकल्या की जे उरते ते निरुपाधिक! दही घुसळून ताक काढून टाकल्यावर जे उरते ते लोणी. किडाचा दोष काढून टाकला की जे राहील ते चोख सोने.

पाण्यावरचे शेवाळे काढून टाकले की खाली रहाते ते शुद्ध पाणी. कोंड्याचे आवरण झाडून काढून टाकले की हाती निव्वळ स्वच्छ धान्य उरते तसेच हे आहे. एखादी नवरी जमलेल्या पुरुषांची नावे सांगते, नाती सांगते, पण त्यातल्या एकाचेच नाव ही सांगत नाही, नातेही सांगत नाही, नुसतीच लाजते आणि आपले पतिराज कोणते हे सुचविते.

त्याप्रमाणे जे निरुपाधिक रूप शब्दात सांगण्यासारखे नाहीच. त्याचे रूप दाखविण्यासाठी लक्ष्मीपति श्रीकृष्ण आधी उपाधि सांगत आहेत. पाडव्याची लहानुली चंद्राची कोर दाखविण्यासाठी वृक्षाच्या फांदीकडे बोट करून "तिथून ती वर दिसते आहे पहा" असे सांगावे त्याप्रमाणे देव उपाधि सांगून निरूपाधिकाचे विवेचन करीत आहेत. ते म्हणाले, "अर्जुना, डाव्या आणि उजव्या दोन्ही हातांनी तू शस्त्रे, अस्त्रे सारख्याच शिताफीने चालवतोस. तू तसा सरावच केला आहेस म्हणून तुला सव्यसाची म्हटले जाते. आता तुझ्या बुद्धिची परीक्षा आहे. सोपपाधिक आणि निरुपाधिक या दोन्ही रूपाशी तुला झुंज घ्यावयाची आहे. माझ्याकडून जास्तीत जास्त स्पष्ट करता येईल तितके करतो.

हे बघ ह्या संसाररूपी नगरामध्ये स्वभावतः अल्प अशा दोन पुरुषांची वस्ती आहे. ह्या एवढ्या प्रचंड आकाशप्रांगणात ज्याप्रमाणे दिवस आणि रात्र ह्या दोनच अवस्था नांदतात, त्याप्रमाणे ह्या संसारराजधानीत दोनच पुरुष रहातात. आणखी एक तिसरा पुरुष आहे पण तो अप्रगट असतो. तो प्रगट झाला की त्या राजधानीसकट त्या दोन्ही पुरुषांना खाऊन टाकतो. त्याचे नावसुद्धा त्याला सहन होत नाही. त्या पुरुषाची कथा नंतर सांगतो. आधी ह्या दोन पुरुषांची अवस्था पाहूया. या संसारग्रामामध्ये दोघेजण वस्तीत आले आहेत. एक आंधळा-वेडा-पंगू आणि दुसरा सर्वांगाने धड आहे. ज्ञानदृष्टिहीन म्हणून आंधळा. देहाला मी म्हणणारा म्हणून वेडा आणि उपाधीच्या तंत्रात सापडला असल्याने पांगळा असा जो त्यातला एक आहे त्याला नाव आहे क्षर! सर्वांगाने धड आहे त्याला म्हणावयाचे अक्षर! क्षर आणि अक्षर अशा दोन पुरुषांनीच हा सर्व संसार कोंदून भरून टाकला आहे. क्षर म्हणजे काय? आणि अक्षर म्हणजे काय? या संपूर्ण अभिप्रायाचे विवेचन करतो. त्याची लक्षणेही सांगतो.

महत्तत्त्व अहंकारापासून ते गवताच्या पात्यापर्यंत जे जे काही लहान, मोठे, स्थावर, जंगम आहे, जे जे मनबुद्धिकडून जाणले जाते, जे पंचमहाभूतांच्या मेळाने तयार होते, आणि नामरूपात सापडते आणि सत्त्व, रज, तमाच्या टांकसाळीत तयार होते, ते ते सगळे क्षर आहे. भूताकृतीचे नाणे ज्या सोन्यापासून पाडले जाते आणि काळ ज्या कवड्यांनी जुगार खेळतो ते क्षर जाणावे.

भ्रान्तीच्या जंगलातील लाकडे कापून हा सृष्टीचा देखावा उभा केला जातो. विपरीत ज्ञानाने तो देखावा जाणला जातो आणि क्षणाक्षणाला त्याचा निरासही होत असतो. हे सगळे क्षर आहे.

अर्जुना, मी सातव्या अध्यायात त्या क्षराचे अष्टधा प्रकृति स्वरूप दाखवले. तेराव्या अध्यायात त्या प्रकृतींतील छत्तीस तत्त्वे विवरून सांगितली. आताच पंधराव्या अध्यायात त्याचे वृक्षाच्या रूपकात सविस्तर वर्णन केले ते सगळे क्षर आहे.

ह्या आठ प्रकारच्या प्रकृतित किंवा छत्तीस तत्त्वात किंवा त्या अश्वत्थ रूपकात सांगितलेल्या आकारात ते चैतन्य प्रवेश करते आणि त्यासारखा आकार आपल्याला आला अशी त्या चैतन्याला भ्रान्ती पडते.

एकदा एका सिंहाने विहिरीत आपले प्रतिबिंब पाहिले. हा कोणी दुसरा प्रतिस्पर्धी सिंह आहे असे मानून रागावून त्याचे पारिपत्य करावे म्हणून त्याने मोठ्याने गर्जना केली आणि त्या विहिरीत उडी मारली. त्याप्रमाणे पाण्यामध्ये आकाश तत्त्व आहेच पण बाह्यतः त्या पाण्यावर आकाशाचे प्रतिबिंब पडते आणि अद्वैत असून द्वैताचा भास निर्माण होतो. त्याप्रमाणे आत्मा त्या आकारवान शरिरास नगर कल्पून तेथे प्रवेश करतो आणि तेथे प्रवेश केल्यावर त्याला स्वतःचा विसर पडतो, झोप लागते. मात्र हे निजणेसुद्धा भासात्मक आहे हे विसरू नको. स्वप्नात बिछाना पहावा आणि स्वप्नातच त्यावर झोपावे त्याप्रमाणे तो आत्मा ह्या आकाराच्या नगरीत झोपला आहे असे समज. आता एकदा ती झोप मान्य केली की पुढे असे घडते की त्या निद्रेच्या प्रभावाने तो मी सुखी, मी दुःखी असे घोरणे सुरू करतो आणि त्या अहं समाधीत बरळू लागतो की हा पिता, ही माता, मी गोरा, व्यंग असलेला, अव्यंग, हा पुत्र, ही कांता, हे धन! हे सगळे माझेच नव्हे काय? अशा स्वप्नाच्या घोड्यावर स्वार होऊन भवस्वर्गाच्या रानामध्ये जो धावत सुटतो त्या चैतन्याचे नाव अर्जुना क्षरपुरुष आहे.

आता त्यालाच क्षेत्रज्ञही म्हटले जाते. जग ज्या दशेला जीवदशा म्हणते, तो स्वरूपाच्या विस्मृतीमुळे सर्व भूतांच्यासारखा होतो म्हणून त्याला क्षरपुरुष म्हणतात. देहरूपी नगरात तो झोपलेला असतो म्हणूनही त्याला पुरुष असे नाव पडते. तो आत्मरूपाने पूर्ण आहे, म्हणूनही त्याला पुरुष म्हणतात. हा आत्मरूपाने परिपूर्ण असूनही उपाधीशी तादात्म्य करून राहिला म्हणून त्याच्यावर क्षरपणाचा आरोप आला. खळाखळा वहाणारे पाणी आटते आणि चंद्रिका त्याबरोबर नाहीशी होते. त्याप्रमाणे उपाधीने युक्त असलेले चैतन्य उपाधीच्या नाशाबरोबर दिसेनासे झाले म्हणून त्या चैतन्यावर आळ आला की ते क्षर आहे, नाशवंत आहे. पण उपाधीचा नाश म्हणजे चैतन्याचा नाश नव्हे. पाण्याबरोबर प्रतिबिंबाचा नाश होतो इतकेच.

म्हणून सर्व जीवचैतन्य क्षरपुरुष आहे असे समजावे.

आता जो अक्षरपुरुष म्हणतात तो कोण कसा हे सांगतो, हा पुरुष यथार्थ ज्ञान व विपरीत ज्ञान यांच्यामध्ये असणारा आहे. धनुर्धरा, सर्व मोठमोठ्या पर्वतांच्यामध्ये जसा मेरु पर्वत तसा हा मध्यस्थ आहे. तो मेरु पर्वत पृथ्वी, स्वर्ग, पाताळ या तीन लोकांमुळे त्रिधा होत नाही, तीन ठिकाणी वाटला जात नाही, तसा तो अक्षरपुरुष यथार्थ ज्ञानाशी संबंध करीत नाही किंवा विपरीत ज्ञानाशीही संबंध करीत नाही. “मी ब्रह्म आहे” या यथार्थ ज्ञानाशी तो एकरूप होत नाही किंवा विपरीत ज्ञानाने देहाशीही तादात्म्य पावत नाही, मी देह आहे असे समजत नाही. निव्वळ न जाणणे हे त्याचे स्वरूप आहे. उंबऱ्यावर उभा असलेला मनुष्य घरात आहे असे म्हणता येत नाही, घराबाहेर आहे असेही म्हणत येत नाही. तशी ही मध्यस्थ स्थिती आहे. धूळपण निःशेष गेले आहे पण अजून घट, भांडी इत्यादी आकार यावयाचे आहेत अशा चिखलाच्या गोळ्याचे जे रूप तेच या अक्षर पुरुषाचे रूप आहे. समुद्र आटल्यावर लाटा नाहीत, तरंगही नाहीत अशी जी अनाकार दशा तशी ह्या अक्षरपुरुषाची अवस्था आहे. जागृती तर बुडाली आहे, पण स्वप्न काहीच मांडलेले नाही त्या निद्रेसारखे हे रूप समजावे. संपूर्ण विश्वाभास मावळला आहे आणि आत्मबोध तर अजून उजळलेला नाही या न जाणण्याच्या अवस्थेला अक्षरपुरुष हे नाव आहे.

ह्या अज्ञानावस्थेला श्रुतीमध्ये अजा म्हटले आहे. त्याचा अर्थ त्याला जन्म नाही असा आहे. आता जन्म नाही तर नाश कसला? म्हणून अज्ञानदशेला अक्षर असे नाव आहे. सर्व कलांनी सोडून दिलेला चंद्र जसा चंद्रपणाने अस्तित्व असते तसे त्या अज्ञानाचे रूप आहे. फळ पूर्ण पिकले की झाड जसे बीजात साठवले जाते, त्याप्रमाणे सर्व उपाधीच्या नाशानंतर जीवदशा तिथे साठवली जाते. उपाधीच्यासह असलेले चैतन्य आणि उपाधी ही दोन्ही ज्या ठिकाणी लीन होऊन रहातात त्याला अव्यक्त म्हणावे. वेदांताने ह्या अव्यक्ताला बीजभाव असे नाव दिले आहे आणि अक्षरपुरुषाच्या रहाण्याचे ठिकाण तेच आहे.

या अव्यक्त अवस्थेपासून विपरीत ज्ञान फाकते, व स्वप्न जागृति या अवस्थांचा विस्तार करते आणि भेदबुद्धीच्या रानात शिरते. या अव्यक्तापासून जीवत्व विश्व या कल्पनेपर्यंत विस्तारते आणि प्रलयकाली संकोच करीत करीत या अव्यक्तातच लीन होते. या अव्यक्तासच अक्षरपुरुष म्हणावयाचे, क्षरपुरुष जागृति, स्वप्न या अवस्थात खेळतो. त्या दोन्ही अवस्थांना हा अक्षरपुरुष जन्म देतो.

अर्जुना, ही जी अवस्था आहे तिला अज्ञान घन सुषुप्ति असे म्हटले जाते. या अवस्थेला ब्रह्मस्थिति म्हणता येत नाही. कारण तिच्यामध्ये उणीव आहे.

अर्जुना, खरोखरच हा अक्षरपुरुष पुन्हा स्वप्न, जागृति या स्थितीला येत नसता तर त्याला ब्रह्मभावच म्हणता आले असते. पण तसे होत नाही. ह्या अक्षरपुरुषातूनच पुन्हा पुन्हा ह्या अवस्था येतात. ह्या अक्षरपुरुषरूपी आकाशातच प्रकृतिपुरुष हे ढग येतात-जातात. क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ हे पदार्थ ज्या निद्रेत दिसतात ती निद्रा तो अक्षरपुरुष आहे.

थोडक्यात, खाली शाखा असलेल्या ह्या संसार वृक्षाचे अक्षरपुरुष हेच मूळ आहे. पुरीमध्ये निजलेल्या ह्या पूर्ण पुरुषाला अक्षरपुरुष असे नाव आहे हे ध्यानात आहे ना अर्जुना? या अक्षरपुरुषस्थितीत विकारांची येरझार किंवा विपरीत ज्ञानाचा प्रकार कळत नाही. त्या अर्थाने ही सुषुप्तीच म्हणावयाची. याला स्वभावतः क्षरणे म्हणजे गळणे नाही. मात्र ज्ञानाचा उदय झाला की त्या अक्षरपुरुषाचा नाश झालाच. ज्ञानाशिवाय इतर कोणत्याही उपायाने त्याचा निरास होत नाही. या अर्थाने वेदांत शास्त्रात त्याला अक्षर म्हटले आणि ह्या सिद्धांताची मोठी व्याप्ती झाली आहे. अर्जुना, सूत्रमय सांगावयाचे म्हणजे जे चैतन्य जीवरूपी कार्याचे कारण व मायेचा आश्रय करून रहाणे हे ज्याचे लक्षण आहे त्या चैतन्याला अक्षरपुरुष म्हणावयाचे. आता जागृति आणि स्वप्न या लोकांच्यामध्ये विपरीत ज्ञानाच्या ज्या दोन अवस्था आहेत त्या अज्ञानरूप तत्त्वामध्ये म्हणजे सुषुप्तित नाहीशा होतात. ते अज्ञान किंवा सुषुप्ति ज्ञानामध्ये बुडते. ज्ञान अज्ञान हरण करते आणि स्वतःही नाहीसे होते.

शंकरांनी जालंदराला मारण्यासाठी सिंहमुखी आकृती असलेला पुरुष निर्माण केला. जालंदरादिकांना मारूनही त्याची भूक शमेना तेव्हा शंकरांनी त्याला स्वतःचेच शरीर खाण्याची आज्ञा केली आणि उरलेल्या तोंडाच्या आकृतीस किर्तीमुख असे नाव दिले व ती आकृती प्रत्येक शिवालयात काढण्यास सांगितले. या किर्तीमुख दर्शन घेऊन मग शिवाचे दर्शन घेण्याची पद्धत आहे.

अनुक्रमणिका

या किर्तीमुखाप्रमाणे ज्ञान अज्ञानाला गिळून टाकते आणि स्वतःही नाहीसे होते आणि मग उरते केवळ "वस्तु." लाकूड जाळून अग्नि स्वतःही शांत होतो. त्याप्रमाणे 'अहं ब्रह्मास्मि' हा साक्षात्कार करून देऊन ज्ञानही जाते. ज्ञानावाचून जे जाणणे तेवढेच उरते.

अर्जुना, वृत्तिज्ञानावाचून जे केवळ ज्ञान राहिले ते केवळ ज्ञान म्हणजे उत्तम पुरुष होय. हा पुरुष क्षर व अक्षर या दोन पुरुषांपेक्षा वेगळा व शेवटचा आहे. सुषुप्ति आणि स्वप्नापेक्षा ज्या जागृतीत बोध आहे ती अवस्था जशी अगदी वेगळी किंवा सूर्यकिरण व मृगजळ यापेक्षा प्रत्यक्ष अफाट सूर्यबिंब जसे वेगळे तसा हा उत्तम पुरुष या क्षर व अक्षरपुरुषापेक्षा वेगळा आहे. काष्ठामध्ये असलेला अग्नि काष्ठापासून जसा भिन्न असतो, त्याप्रमाणे ह्या दोन पुरुषापेक्षा तो पूर्णतया भिन्न असतो.

आपली मर्यादा गिळून टाकून नदी आणि नद यांना एक करीत जसा प्रलयकालचा महासमुद्र एकत्वाने प्रगट होतो त्याप्रमाणे स्वप्न नाही, जागृति नाही, सुषुप्तिही नाही अशी ती अवस्था असते. दिवस नाही, रात्र नाही अशी प्रलयतेजाची स्थिती असते. जिथे एकपण नाही, द्वैतही नाही हेही कळत नाही. अनुभव तिथे दिपून नाहीसा होतो, ही जी अवस्था, हे जे काही आहे ते म्हणजे तो उत्तम पुरुष! अर्जुना, त्यालाच परमात्मा असे नाव आहे.

क्षराक्षरपुरुष अलीकडले व तो उत्तम पुरुष पलीकडला आहे. विचाराच्या काठावर उभे राहून वेदांना ह्या पलीकडच्या तीरावरील पुरूषाच्या गोष्टी करता आल्या. ह्या परमात्म्याविषयी बोलावयाचे ते त्याच्याशी न मिसळता जीवदशेमध्ये राहून शब्दात बोलावयाचे. नदीमध्ये बुडणाऱ्याच्या गोष्टी काठावर उभा असलेला मनुष्य सांगतो त्याप्रमाणे हे घडते आणि यामुळेच क्षर, अक्षरपुरुष अलीकडले आणि हा उत्तम पुरुष पलीकडच्या तीरावरला म्हणून त्याला परमात्मा असे म्हटले जाते शब्दांनी जरी त्याला पुरुषोत्तम असे म्हटले तरी वास्तविक त्याचा शब्दात उल्लेख करता येतच नाही. न बोलण्याने त्याचे वर्णन होते. न जाणून तो जाणला जातो. काहीच नाही हेच त्या वस्तूचे असणे आहे.

'मी ब्रह्म आहे' हा सोहंभावही तिथे संपतो. सांगणाऱ्याचे सांगणे सरते. दृष्टत्वाबरोबर दृश्य नाहीसे होते अशी ही अवस्था. नाक आणि फुले यांच्यामध्ये सुगंध तरळत असतो. तो डोळ्यांना दिसत नाही म्हणून तो नाहीच असे म्हणू नये. तसे द्रष्टा आणि दृश्य हे गेल्यावर काय रहाते असे कुणी म्हटले तर ह्या दोन्ही कल्पना नाहीशा झाल्यावर जे उरते असा अनुभव येतो तेच त्याचे रूप आहे.

तो परमात्मा प्रकाशाशिवाय प्रकाश आहे. त्याला कुणी प्रकाशमान करीत नाही. नियम्य पदार्थाशिवाय तो नियामक आहे. सगळी पोकळी तो भरून टाकत असतो. ध्वनीकडून ऐकला जाणारा तो ध्वनि आहे. चवीकडून चाखली जाणारी ती चव आहे. आनंदाकडून भोगला जाणारा आनंद आहे. सुखाला प्राप्त झालेले सुख आहे. तेजाला सापडलेले तेज आहे. महाशून्यामध्ये लीन झालेले शून्य आहे. तो परमात्मा पूर्णतेचा शेवट आहे. विश्रान्तीची विश्रांती आहे. तो विश्वाच्या विस्ताराला पुरून उरला आहे. लयाचाही त्याच्या ठिकाणी लय होतो. तो पुष्कळापेक्षा पुष्कळ पटीने पुष्कळ आहे.

अनुक्रमणिका

शिंप स्वतः रूपे होत नाही शिंपच असते. पण पहाणाऱ्याच्या अज्ञानामुळे ती शिंपच रुपे आहे असा भास ती करवते. अनेक प्रकारच्या अलंकारांचे रूप झालेले सोने खरे म्हणजे जास्तच प्रगट होते. पण पहाणाऱ्याच्या दृष्टिला ते सोने स्वतःचे रूप न दाखविता अलंकारांचे रूप दाखवते. ते लपत नाही पण दृष्टिदोषामुळे लपल्यासारखे वाटते. तो परमात्मा तसाच विश्व न होता विश्वाला धारण करतो. पाण्यापासून तरंगाला वेगळेपण नाही. जग प्रकाशित होते याचाच अर्थ परमात्मा प्रगट होतो. पाण्यामध्ये दिसणारा चंद्र आपल्या संकोचविकासास आपणच कारणीभूत आहे. त्याप्रमाणे परमात्मा आपल्या संकोचविकासास आपणच कारणीभूत आहे. विश्वपणाने तो होत नाही, विश्वलोपाबरोबर जात नाही. रात्र आणि दिवस यामुळे सूर्याचे दोन भाग होत नाहीत. त्याप्रमाणे हा उत्तम पुरुष कधीही, कोणीकडूनही, कशामुळेही कमी होत नाही. त्याच्यासारखा जगात तोच एक आहे. तो आपणच आपल्याला प्रकाशित करतो. धनंजया, तुला आणखी काय सांगू? त्याच्याशिवाय दुसरे काही नाहीच असे समज. क्षर आणि अक्षर याहून वेगळा आणि निरुपाधिक असा मी परमात्मा असल्याने जग व वेद मला पुररुषोत्तम असे म्हणतात.

पण ते असो. धनंजया, ज्ञानसूर्याचा उदय झाल्यावर त्या ज्ञानाच्या प्रकाशाने जी मला पाहतो त्याच्या दृष्टित आता भेद उरत नाही. जागृतीचे ज्ञान झाले की स्वप्न नाहीसे होते. त्याप्रमाणे आतापर्यंत होत असलेले विश्वाचे स्फुरण मिथ्या आहे हे कळते. माळ हातात घेतली की, सर्प वाटत होता तो भास आणि त्या भासामुळे वाटणारे भय नाहीसे होते. त्याप्रमाणे माझे ज्ञान झाले की, तो ज्ञानी जगदाभासाच्या विळख्यात सापडत नाही. ज्याला अलंकारातले सोने दिसले तो अलंकारपण खोटे आहे असे म्हणतो, त्याप्रमाणे माझे सर्वव्यापी रूप ज्याने जाणले त्याने भेदाचा पूर्णत्याग केला आहे असे समजावे. मग तो म्हणतो, “सच्चिदानंद सर्वत्र भरलेला आहे. तो सच्चिदानंद स्वयंसिद्ध आहे आणि मीही सच्चिदानंदरूपच आहे.”

अर्जुना, मला जाणून त्याने भेद कसा टाकला हे कळले ना?

आता त्याने सर्व जाणले असे म्हणणेसुद्धा अपुरे होईल. तोच ब्रह्म झाल्याने त्याला द्वैत उरलेलेच नाही. आकाशच आकाशाच्या मिठीला योग्य नव्हे कां? क्षीर समुद्राला क्षीर समुद्राचीच मेजवानी द्यायला नको काय? अमृतात मिसळून जावयाचे असेल तर अमृतच व्हावयास नको का? शुद्ध सोन्याशी एकरूप होण्यास शुद्ध सोनेच योग्य नव्हे काय? त्याप्रमाणे माझी भक्ती करण्यास मद्रूपच व्हावयास नको का? तसा तो ज्ञानी पुरुष माझ्याशी एकरूप झाला असल्याने माझी भक्ती करण्यास अधिकारी आहे.

बाबा अर्जुना, सिंधूहून गंगा जर वेगळ्या जातीची असती तर त्याच्याशी एकरूप कशी झाली असती? म्हणून माझ्याशी एकरूप न होता माझ्या भक्तित प्रवेश कसा होणार? मी होऊनच माझी भक्ती करावी पार्था. म्हणजेच ती अनन्य भक्ती होते. लाट समुद्राहून अभिन्न असते तसा माझा भक्त माझ्याहून अभिन्न असावा. सुर्याला आणि त्याचा प्रभेला जशी एकरूपता असते तशी एकरूपता असली की भक्तिची योग्यता आली असे म्हणावयाचे.

**अनुक्रमणिका**

हे या गीतारूपी उपदेशाच्या आतापर्यंतच्या सर्व उपदेशाचे सार आहे. उपनिषद्रूपी कमळाचा हा सुगंध आहे. सर्व शास्त्राच्या अभ्यासानंतर येणारा साक्षात् अनुभव आहे, फल आहे. वेदरूपी दह्यामध्ये व्यासबुद्धिच्या रवीने घुसळण करून आम्ही हे अनादिसिद्ध लोणी काढले आहे.

पार्था, ही गीता ज्ञानरूपी अमृताची गंगा आहे. आनंदचंद्राची सतरावी कला आहे. विचाररूपी क्षीर समुद्राचे मंथन करून काढलेली नवी लक्ष्मी आहे. म्हणून गीतारूप लक्ष्मी आपल्या पदांनी, आपल्या वर्णांनी, आपल्या अर्थाच्या जीव प्राणांनी, माझ्याशिवाय दुसरे काही होणे जाणत नाही. क्षरपुरुष क्षरपणाने व अक्षरपुरुष अक्षरपणाने तिच्या समोर आले असता तिने त्यांच्या सोपाधिक पुरुषत्वाचा त्याग केला आणि आपले सर्वस्व मला पुरुषोत्तमाला अर्पण केले. अर्जुना, आतापर्यंत तू जी गीता ऐकलीस ती आत्मरूप असलेला जो मी त्याची पतिव्रता आहे. माझ्याशिवाय तिच्या चिंतनात कोणीही नाही.

काय सांगू अर्जुना? हे बोलण्याचे शास्त्र नव्हे. संसार जिंकण्याचे हे शस्त्र. साक्षात आत्मा समोर प्रकट करणारे मंत्र आहेत.

अर्जुना, हे गौप्यधन आज मी तुझ्यासाठी बाहेर काढले आणि तुझ्या स्वाधीन केले. सख्या, मी चैतन्यशंभू. माझ्या मस्तकामध्ये ही ज्ञानगंगा गुप्त होती. ती बाहेर काढणारा तू गौतम झालास. तू आस्थेचे भांडार असल्याने मोठ्या उत्साहाने मी ते सर्व गुप्त ज्ञान आज तुझ्यापुढे प्रकट केले आहे. समोरचे मुख उत्तम रीतीने प्रतिबिंबित व्हावे म्हणून आरशाने स्वतःला चोख करावे त्याप्रमाणे तू स्वतःचे मन चोख करून त्यात आमचे ज्ञान जसेच्या तसे प्रतिबिंबित केलेस. चंद्र आणि तारे यांना समुद्राने आपल्यामध्ये आणावे त्याप्रमाणे अर्जुना, गीतेसकट तू मला आपल्या अंतःकरणात घातले आहेस.

हे सुभटा, तू त्रिविध मळ टाकून शुद्ध झाला आहेस आणि म्हणून माझे व गीतेचे वसतिस्थान झाला आहेस. परंतु आता हे जास्त कशाला बोलू? माझी ज्ञानाची वेली जी गीता ती जो जाणील तो सर्व मोहापासून मुक्त होईल. अमृतसरितेचे सेवन केले की असलेला रोग तर जातोच पण उत्तम असे अमरपण सहज हाती येते. त्याप्रमाणे गीता जाणून घेतली की, मोह जातो यात नवल नाही. पण आत्मज्ञान होऊन आत्मस्वरूपाशी मिळता येते. आजपर्यंत केलेले सगळे सत्कर्म आत्मज्ञान देते आणि जीवितातून मुक्त होऊन लयाला जाते. हरवलेली वस्तू दाखवून जसा मार्ग लयाला जातो, त्याप्रमाणे कर्मप्रासादावर ज्ञानाचा कळस चढून मंदिराचे काम पूर्ण होते. आता आणखी काय करावयाचे उरत नाही. ज्ञानी पुरुषाला आता कर्म करणे हा भाग उरत नाही. कर्माचे कामच संपते.

अनाथांचा सखा असा तो भगवंत असे म्हणाला, श्रीकृष्णाच्या मुखातून निघालेले हे बोधामृत पार्थरूपी पात्रामध्ये भरून खाली सांडत होते. व्यासांच्या कृपेने ते अमृत संजयालाही प्राप्त झाले. संजयाने ते बोधामृत बळे बळे धृतराष्ट्रास पाजले आणि त्यामुळे जीवनाचा अंत होताना त्याच्या चित्ताची गडबड उडाली नाही.

एरवी प्रत्यक्ष गीता ऐकत असताना तो धृतराष्ट्र पूर्ण अनाधिकारीच होता. पण अंतसमयी तो बोध त्याला आठवला आणि उपयोगाला आला. द्राक्षाच्या वेलीच्या बुडाशी खत म्हणून दूध घातले तर ते त्यावेळी वाया गेले

असते वाटते. परंतु जेव्हा का गोड फळे त्या वेलाला लगतात त्यावेळी वाया गलेले दूध दुप्पट फायद्याचे ठरते. त्याप्रमाणे हरिमुखातून आलेली अक्षरे जेव्हा संजयाने आदराने त्या अंध धृतराष्ट्रास सांगितली तेव्हा त्याचा काही उपयोग झाला नाही असे वाटले पण तो आंधळा राजा कालांतराने त्या बोधाच्या सामर्थ्याने सुखी झाला.

भगवंताच्या मुखातील तो बोध मी मराठी भाषेच्या रचनेने ओबडधोबड ज्ञानाने मला कळले न कळले तसे सांगितले. शेवंतीचे झाड अरसिकांनी पाहिले तर त्यांना त्यात काही विशेष सौंदर्य जाणवत नाही पण जे भ्रमर त्या फुलातील सौरभ्य नेतात त्यांना त्याची मधुरता कळते, त्यांना त्यातले सार कळते.

श्रोतेहो, या रचनेतील प्रमेय आपण घ्यावे. उणे असेल ते मला द्यावे. महाराज, मी अज्ञ मूल आहे. न समजणे हे स्वाभाविक आहे. पण त्या मुलाचे आईबाप त्या अज्ञानाकडे पाहूनच अत्यंत आनंदित होतात. त्या आपल्या लाडक्याचे कौतुक करतात. त्याचे बोबडे बोल ऐकून त्या आईबापाचा आनंद गगनात मावत नाही. तुम्ही संत तसेच माझे मायबाप अहा. माझे माहेर अहा. तुम्ही भेटलात की मी लडिवाळपणा करतो. महाराज, तो लडिवाळपणा म्हणजेच हा ग्रंथ आहे असे आपण समजावे.

आता विश्वात्मक असे माझे श्रीगुरु निवृत्तिराज माझी ही वाक्यपूजा ऐकोत, असे श्रीज्ञानदेव म्हणाले.

मालूताई, ज्ञानेश्वरीच्या पंधराव्या अध्यायाचे विवेचन संपले. लिहून झाल्यावर असे वाटले की आपण अर्थ लिहिला खरा पण माउलींना आणखी काही तरी या अध्यायात विशेष सांगावयाचे आहे आणि ते अजून आपल्याला सापडले नाही. पुष्कळ विचार केल्यावर असा विचार चमकून गेला की ज्ञानराज या अध्यायात संसाराची अनित्यता, मरणकाळ, पुरुषोत्तम अवस्था सांगत आहेतच. पण साधकास ध्यानाची प्रक्रिया समजावून देत आहेत, रोज मरायचे कसे हे सांगत आहेत आणि सुचवत आहेत की मरण आणि रोजचे ध्यान यात फरक नाही. मरणामध्ये त्याच देहात पुन्हा प्रवेश नाही आणि ध्यानात मात्र आहे. बाकी प्रक्रिया सगळी तीच.

आणि मग माझ्या आयुष्यातला एक प्रसंग आठवला. एकदा काय झाले की गुळवणीमहाराजांच्याकडे आम्ही दोघी बहिणी गेलो होतो. महाराजांची प्रकृति अगदी बेताची होती. पण आमचे भाग्य असे की आम्हाला दर्शन झाले. आमच्या उपासनेची सगळी चौकशी करून आम्ही जेव्हा निरोपाच्या वेळी पायावर डोके ठेवले तेव्हा त्यांनी माझ्या डोक्यावर हात ठेवला. मग मी कोल्हापूरला आले. ध्यानाच्या वेळी एकदा गुळवणीमहाराजांच्या बरोबरच तंटा सुरू केला. म्हटले, “महाराज आपण तर पुण्याला देहाने असून स्पेनमधल्या साधकाची कुंडलिनी जागृत करता, त्याला समाधीचा अनुभव आणून देता. मग मी तर इतक्या जवळ कोल्हापूरला आहे. आपण काही तरी अनुभव का आणून देऊ नये? आणि एक दिवस जगदंबेच्या पेन्टिगपुढे नेहमीप्रमाणे ध्यानास सुरवात केली. ॐकार चालू होता. एकदम हातापायाशी आपला काही संबंध नाही. आपण कापसासारखे हलके झालो आहो असे वाटू लागले. जगाचे भान गेले म्हणत नाही पण आपण अगदी एकाकी आहो, आपल्याला शरीर नाहीच की काय असे वाटू लागले. भय वाटू लागले की आपला प्राण आता चाललाच की काय! डोळे कष्टाने उघडले आणि खिडकीतून दिसणारे झाडांचे माथे, आकाश याकडे पाहिले व शेवटी जगदंबेकडे टक लावली. हळूहळू पुन्हा देहभान आले.

बाबामहाराज आर्वीकरांचे दोन शिष्य पुढे थोडे दिवसांनी या ध्यानाच्या खोलीत बसले होत. ध्यानाची, उपासनेची पद्धत विचारीत होते. त्यांना हा अनुभव सांगितला. तेव्हा ते म्हणाले, “अरेरे, उगीच भ्यायला. तसेच पुढे जायचे होते. हे जगदंबेचे चित्र अप्रतीम आहे. तिने तुमचे पूर्ण संरक्षण केले असते. एक चांगली संधी वाया घालवलीत. भ्यायचं नाही अशा वेळी.”

संधि गेलीच पण गुळवणीमहाराजांनी माझा हट्ट पुरवला असे मात्र वाटले. ध्यानामध्ये शरिराचा विसर कसा पडतो याचा अनुभव त्यांनी आणून दिला आणि पंधरावा अध्याय लिहून झाल्यावर ध्यानाबद्दलचे मार्गदर्शन लक्षात आले.

अगदी सूत्रमय विचार केला तर प्रथम ह्या भववृक्षाचे वर्णन, मग क्षरपुरुष त्याग, क्रमाने अक्षरपुरुष त्याग व एकदम झेपावून पुरुषोत्तमास मिठी असा ह्या अध्यायाचा आराखडा आहे. पुरुषोत्तमाची भेट अनन्यत्वाने घ्यावी असे म्हणताना अनन्य म्हणजे देवाशी एकरूप होऊन देवाहून अन्य न रहाता भेट घ्यावयाची आहे असे सुचविले आहे. आता ही अवस्था कशी गाठावयाची?

मरणकालची जी अवस्था वर्णन केली आहे ती ध्यानावस्थेस लावून पहायची. देव सांगत आहेत की, “देहराजाने पाच ज्ञानेंद्रियांची तांडी आणि मन देहातून काढून देहापासून नेली.” इथे ज्ञानेंद्रिय म्हणजे ज्ञानेंद्रियांची प्रेरक शक्ति असा अर्थ आपण घेतलाच आहे. पुढे देव सांगतात की आता ह्या नेलेल्या इंद्रिये व मन या सामुग्रीसहित देहराज नवा देह घेतो आणि मग ह्या नव्या देहात ती जुनीच ज्ञानेंद्रिये आणि मन नव्याने प्रकाशमान होतात.

आता ध्यानात काय करावयाचे? तर आसन घातले की सर्व ज्ञानेंद्रिये मनात एकवटून मन बंदिस्त करावयाचे. अशी कोंडलेली ज्ञानेंद्रिये काही करत नाहीत. कर्मेंद्रिये आधीच खोडाबेडीत आहेत मग ते मन काय करणार? थोडावेळ चुळबुळ करते आणि आपोआप शांत शांत होत जाते. बाहेरच्या प्रपंचाचा निरास आपण कर्मेंद्रिये व ज्ञानेंद्रिये बंदिस्त करून केलाच आहे. आतले प्रपंचभान मन बंदिस्त करून झाले की आपण एका वेगळ्या जगाच्या उंबरठ्यावर येतो. या उंबरठ्यावर येण्यापूर्वी आपण क्षरपुरुषाचा त्याग केलाच आहे. आता अवस्था येते अक्षरपुरुषाच्या भानाची. आठवते ना मालूताई, की देव म्हणाले हा अक्षरपुरुष मध्यस्थ आहे? मध्यस्थ म्हणजे प्रपंचभान नाही आणि ब्रह्मज्ञान व्हावयाचे आहे. दिवस संपला आहे पण रात्र पडलेली नाही. रात्र संपली आहे पण अजून दिवस उगवलेला नाही. अशी ही मध्यस्थ अवस्था.

उंबऱ्यावर उभा असलेला मनुष्य घरात आहे की, घराबाहेर आहे म्हणावा? मरणाशी ही अवस्था ताडून पहायची तर म्हणता येईल की एक देह सोडला आहे पण अजून दुसरा मिळायचा आहे किंवा घ्यावयाचा आहे.

आता ध्यानात या मध्यस्थ पायरीवर आपण आलो की कधी तरी पायाला मुंगी चावते, एखादा मोठा आवाज होतो, एखादा तीव्र वास येतो आणि पटकन आपण परत प्रपंचभानात येतो. भाग्यवशात् कधी तरी तो उंबरा ओलांडून गरुडझेप घेऊन केवळ प्रकाशमय अशा त्या भगवंताशी, त्या पुरुषोत्तमाशी एकरूप होतो. मग कुठला क्षरपुरुष आणि कुठला अक्षरपुरुष? आपले ऐक्य त्या सम्राटाशीच. स्वतःचे आस्तित्वच नाही. तर केवळ

त्या भगवंताचेच स्फुरण रहाणार!

त्या स्थितीतून खाली येताना कधी गेलो त्या क्रमाने म्हणजे अक्षरपुरुषाची मध्यस्थ अवस्था आणि मग अक्षरपुरुषाशी पुन्हा तादात्म्य! तर कधी मधली अवस्था टाकून एकदमच प्रपंचभान येते आणि परत व्यवहार चालू होतो.

पण मालूताई, केशराच्या कुपीतून केशर काढून घेतले तरी कुपीत वास शिल्लक रहातो. त्याप्रमाणे त्या भगवंताच्या भेटीतील अपूर्व आनंदाच्या, स्वच्छंद विहाराच्या आठवणी मनात रेंगाळत रहातात. देहराजाने ज्या अमृताचा आस्वाद घेतला त्यातील थोडा थोडा अंश त्या ज्ञानेंद्रियांना, त्या मनाला तो देहराज देतोच. ध्यानावस्थेपूर्वीची ज्ञानेंद्रिय व मन आणि नंतरची ज्ञानेंद्रिये व मन यात जमीन अस्मानाचा फरक होतो. ती अगदी ताजीतवानी, उल्हसित व आनंदी होतात, लखलखीत होतात आणि व्यवहारातही त्या आनंदाच्या खुणा उमटू लागतात. भोगलेले ते अपूर्ण सुख पुन्हा पुन्हा भोगावे अशी हुरहुर लागते. अणि मग ध्यानास बैठक घातली की क्षरपुरुष, अक्षरपुरुष ह्यांचा झटक्यात निकाल करून जीव त्या पुरुषोत्तमाच्या स्वाधीन होतो.

हा असा मार्ग तयार होत होत आणखी एक प्रक्रिया घडते. अक्षर व क्षर यांचा निरास करण्यास लागणारा वेळ कमी कमी होतो. आणि त्या सर्वोच्च ऐक्याचा वेळ इथे घड्याळांतील वेळ या अर्थाने वाढू लागतो. जिन्यावरून एकदा चढायला शिकले आणि उतरण्याचाही चांगला सराव झाला की तो परम दयाळू भगवंत एक दिवस आपल्याबरोबर एक पायरी खाली उतरतो.

राजपुत्राचे मित्र असतात ते वाड्याच्या दरवाजात कधी एकटे तर कधी राजपुत्राबरोबर येतात. पहारेकरी त्या मित्रांना दटावू शकतो, इकडे जायचे नाही, तिकडे पहायचे नाही, ह्याला हात लावायचा नाही, तिथे चढायचे नाही असे जरबीने बोलतो. पण त्या मित्रांच्या घोळक्यात राजपुत्र दिसला की देखावा बदलतो. त्या मित्रांना कसलाही अटकाव करण्याची आता त्या पहारेकऱ्याची हिम्मत नसते. उलट राजपुत्राबरोबर त्या मित्रांनाही सलामी मिळते. इथे तसाच प्रकार घडतो.

आपल्याबरोबर प्रत्यक्ष भगवंत खाली उतरत आहेत म्हटल्यावर काय ताकद आहे त्या अक्षरपुरुषाची वा क्षरपुरुषाची आपल्याला काही अडथळा करण्याची! आपले देवाशी सख्यत्व, ऐक्य झालेले पाहून ते बिचारे निमूट होतात.

आता जीवन असे की ह्या प्रपंचातच देव येऊन खेळतो आहे आपल्याबरोबर. अहो, त्या गोकुळातल्या गौळणीशी खेळायची सवय आहे त्याला! भारी लबाड आहे तो क्षणात भेटेल, क्षणात लपेल, क्षणात म्हणेल “कशी फजिती केली. मी तर इथेच होतो की!”

मग ध्यान अखंडच. ध्यानास वेगळे बसणे कशाला? उघड्या डोळ्यांनीच सर्व ज्ञानेंद्रिये, जागी, टवटवीत, मोकळी सोडूनच त्या परमात्म्याशी ऐक्य! कशाला त्यांना बंदीवास? त्या महन्मंगलाच्या स्पर्शाने जीवाचे सोने झाल्यावर त्याला आता सोनेच म्हणावयाचे. लोखंडपणाची नावनिशाणीसुद्धा उरलेली नाही. मग

जीवन जगताना आनंदच आनंद! आपण नित्यच त्या भगवंताशी ऐक्य साधूनच आहो, त्याचा आनंद, प्रकाश आणि चैतन्य आपल्या ठिकाणी अनुभवतो आहो.

म्हणून सुरवातीस म्हटले की पंधरावा अध्याय हा जसा मरण म्हणजे काय हे शिकवणारा आहे. तसाच जीवन म्हणजे काय हेही शिकवणारा आहे. मरण आणि ध्यानाच्या प्रक्रिया अगदी सारख्या कशा हे सांगणारा आहे. आपण ह्या दृष्टिने हा अध्याय वाचला, त्याप्रमाणे ध्यानाचा अभ्यास केला तर तो पुरुषोत्तम आपली वाट पहात उंबऱ्याबाहेर उभाच आहे. तोही उत्सुक आहेच.

दुसराही एक विचार मनात येतोच. तो तर अर्जुनाच्याही मनात आलाच होता. समजा, ध्यानाचा हा अभ्यास करता-करता देहाचा त्याग करण्याची वेळ आली तर काय होणार पुढे? ह्या प्रश्नाचे उत्तरही साधकाचे मन देत असते. वाटते की, साधकाला मरण काय वेगळे वाटणार आहे? जिवंतपणीच त्याने तो सराव करून ठेवलेला नाही काय? क्षराक्षरपुरुषभावाचा त्याग करून अनंतात लीन होण्याची त्याच्या पंखास रोजचीच सवय आहे. देहदुःख सोसावे लागेल आणि ते किती तीव्र असेल हे माहीत नाही हे भय आहेच पण देहाचा त्याग करणे त्याला कठीण जाऊ नये. देहाचा त्याग झाला तर देहराजाने ती शुद्ध ज्ञानेंद्रिये आणि भगवंताच्या स्पर्शाने पुनीत झालेले मन बरोबर जाईल. बालपणापासूनच तो जीव नव्या देहात जुन्या ज्ञानाच्या भूमिकेवरून क्रियेस सुरवात करील तेव्हा तीही काळजी नाही. जीवाच्या उद्धारासाठी योगी महात्मे आपले उच्च स्थान सोडून परम दयाळू अंतःकरणाने अवतीर्ण होतच असतात. मागे झाले सध्या होत आहेत पुढेही होणारच. अशी मुमुक्षू जीवांना हाती धरून उरलेला प्रवास सुखाने घडविण्याची त्यांनी प्रतिज्ञाच केलेली आहे.

असामान्य चरित्राचा आलेख सामान्यांपुढे असावा म्हणजे वाटचालीला साधकांना उत्साह येत असतो. म्हणून परमहंस रामकृष्णांच्या जीवनातील प्रसंग मननात, चिंतनात ठेवावयाचा. प्रसंग आहे परमहंस आणि विवेकानंद म्हणजेच नरेंद्रदत्तांच्या भेटीचा. नरेंद्रांनी स्वतःच ही हकीकत सांगितली. ते म्हणाले, "गाणे तर गायलो. ते संपताच रामकृष्ण लगबगीने उठून माझ्याजवळ आले आणि माझा हात धरून मला उत्तरेच्या बाजूच्या व्हरांड्यात घेऊन गेले. व्हरांड्यात गेल्याबरोबर रामकृष्णांनी दार लावून घेतले. मला वाटले की हे मला एकीकडे आणून काही उपदेश करणार असावेत." पण साराच प्रकार विपरीत. माझे हात आपल्या हातात धरून एकसारखे अश्रू गाळीत, हुंदके देत एखाद्या अतिशय ओळखीच्या माणसाप्रमाणे मला प्रेमाने म्हणू लागले, इथे यायला इतके दिवस का लावायचे? मी इथे तुझी किती उत्कंठतेने वाट पहात बसलो आहे!" काही वेळाने ते हात जोडून उभे राहिले व म्हणू लागले, "प्रभो, मला ठाऊक आहे की तू तो पुरातन नारायण ऋषी असून जीवांची दुर्गति निवारण करण्यासाठी पुन्हा शरीर धारण करून आला आहेस." पुढे नरेंद्र म्हणाले, "हा प्रकार पाहून मी अत्यंत आश्चर्यचकित होऊन गेलो. मनात म्हणू लागलो मी इथे कुणाच्या दर्शनाला म्हणून आलो आणि इथे गाठ कुणाची पडली! यांना तर उन्मादवायु झालेला दिसतो." पण पुढे परमहंसांनी त्याच नरेंद्रदत्ताची विवेकानंद ही महान विभूति करून सोडली. परमहंस म्हणतात—

> "एक दिवस मन समाधीस्थितीत ज्योतिर्मय मार्गाने उच्च उच्च स्थानी चढत होते. हळूहळू या भावजगताच्या चरम सीमेपाशी येऊन ठेपले. ज्योतिर्मय पडद्यापलीकडील अखंडाच्या राज्यात प्रवेश केला. पण पाहतो तो दिव्य देहधारी सात ऋषी तेथे समाधिमग्न

होऊन बसलेले दिसले. इतक्यात त्या ज्योतिर्मंडलापैकी एक अंश धनीभूत होऊन त्यापासून एक दिव्य बालक निर्माण झाले. ते त्या सप्तर्षीपैकी एकाजवळ गेले. आणि आपल्या कोमल हातांनी त्याच्या गळ्याला मिठी मारून मारून त्यांना समाधीतून उठविण्याचा प्रयत्न करू लागले. ऋषींची समाधी उतरलेली पाहून त्याला अत्यानंद झाला. ते म्हणाले, "मी निघालो आहे. तुम्हाला माझ्याबरोबर आले पाहिजे. ऋषींनी त्यावर काही उत्तर न देता मानेने रुकार दिला आणि त्या बालकाकडे प्रेमपूर्ण नयनांनी पहात पहात ते पुन्हा समाधिमग्न झाले. आणि काय चमत्कार! त्यांच्या शरिरमनाचा एक अंश उज्वल ज्योतीच्या आकाराने विलोभ मार्गाने पृथ्वीवर उतरत असलेला मला दिसू लागला. नरेंद्राला पहाताक्षणी मी ओळखले की हाच तो ऋषी."

ही कथा वाचली की आपल्या मनाला कितीतरी धीर येतो. अध्यात्माच्या जगातील ऋणानुबंध जन्मजन्मांतरीचे असतात अणि एकदा का श्रीगुरूंनी आपला स्वीकार केला की ते जन्मांतरीदेखील आपल्यावर पाखर करतील असा विश्वास वाटतो. श्रीरामकृष्ण परमहंस म्हणत, "ईश्वरी शक्ति सर्व मनुष्यांच्या मनात कमी अधिक प्रमाणात वास करीत असल्यामुळे गुरुभक्तिपरायण साधक अखेरीस अशा अवस्थेला जाऊन पोचतो की ही शक्ति त्याच्या स्वतःमध्येच आविर्भूत होऊन त्याच्या मनातील संशयाचा उलगडा करून गूढ गूढ अध्यात्मिक तत्त्वे त्याला समजावून देते. मग आपले संशय दूर करण्यासाठी त्याला त्यावेळी दुसरीकडे कोठेही जावे लागत नाही, शेवटी मनच गुरू होते."

ही प्रक्रिया व्हावी म्हणून माउलींनी पंधराव्या अध्यायात साधकासाठी ध्यानमार्ग वर्णन करून ठेवला आहे आणि त्याच्या मनांत कुठलाही संशय राहू नये अशी मांडणी केली आहे व हे सूत्र लक्षात ठेवून जर अध्यायाचा अभ्यास केला तर—

**साचचि बोलाचे नव्हे हें शास्त्र ।**
**पै संसारु जिणते हें शस्त्र ।**
**आत्मा अवतरविते मंत्र ।**
**अक्षरें इये ॥** (ओ. ५७७)

ही ओवी अनुभवास येईल आणि त्या भावातूनच आपण आता सोळाव्या अध्यायाकडे वळू. सोळाव्या अध्यायातील पहिलीच ओवी आहे.

**मावळवीत विश्वाभासु ।**
**नवल उदयला चंडांशु ।**
**अद्वयाब्जिनीविकासु ।**
**वंदूं आता ॥** (अ. १६-ओ. १)

***

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

॥ श्री ॥

अध्याय सोळावा

# दैवासुरसंपद्विभागयोग

॥ ॐ नमो भगवते वासुदेवाय ॥

श्रीभगवानुवाच—

अभयं सत्त्वसंशुद्धिर्ज्ञानयोगव्यवस्थितिः ।
दानं दमश्च यज्ञश्च स्वाध्यायस्तप आर्जवम् ॥ १ ॥

अहिंसा सत्यमक्रोधस्त्यागः शान्तिरपैशुनम् ।
दया भूतेष्वलोलुप्त्वं मार्दवं ह्रीरचापलम् ॥ २ ॥

तेजः क्षमा धृतिः शौचमद्रोहो नातिमानिता ।
भवन्ति सम्पदं दैवीमभिजातस्य भारत ॥ ३ ॥

दम्भो दर्पोऽभिमानश्च क्रोधः पारुण्यमेव च ।
अज्ञानं चाभिजातस्य पार्थ सम्पदमासुरीम् ॥ ४ ॥

दैवी सम्पद्विमोक्षाय निबन्धायासुरी मता ।
मा शुचः सम्पदं दैवीमभिजातोऽसि पांडव ॥ ५ ॥

द्वौ भूतमगौ लोकेऽस्मिन्दैव आसुर एव च ।
दैवो विस्तरशः प्रोक्त आसुरं पार्थ मे श्रृणु ॥ ६ ॥

प्रवृत्तिं च निवृत्तिं च जना न विदुरासुराः ।
न शौचं नापि चाचारो न सत्यं तेषु विद्यते ॥ ७ ॥

असत्यमप्रतिष्ठं ते जगदाहुरनीश्वरम् ।
अपरस्परसम्भूतं किमन्यत्कामहैतुकम् ॥ ८ ॥

एतां दृष्टिमवष्टभ्य नष्टात्मानोऽल्पबुद्धयः ।

प्रभवन्त्युग्रकर्माणः क्षयाय जगतोऽहिताः ॥ ९ ॥

काममाश्रित्य दुष्पूरं दम्भमानमदान्विताः ।
मोहाद्गृहीत्वाऽसद्ग्राहान्प्रवर्तन्तेऽशुचिव्रतः ॥ १० ॥

चिंतामपरिमेयां च प्रलयान्तामुपाश्रिताः ।
कामोपभोगपरमा एतावदिति निश्चिताः ॥ ११ ॥

आशापाशशतैर्बद्धाः कामक्रोधपरायणाः ।
ईहन्ते कामभोगार्थमन्यायेनार्थसंचयान् ॥ १२ ॥

इहमद्य मया लब्धमिमं प्राप्स्ये मनोरथम् ।
इदमस्तीदमपि मे भविष्यति पुनर्धनम् ॥ १३ ॥

असौ मया हतः शत्रुर्हनिष्ये चापरानपि ।
ईश्वरोऽहमहं भोगी सिद्धोऽहं बलवान्सुखी ॥ १४ ॥

आढ्योऽभिजनवानस्मि कोऽन्योऽस्ति सदृशो मया ।
यक्ष्ये दास्यामि मोदिष्य इत्यज्ञानविमोहिताः ॥ १५ ॥

अनेकचित्तविभ्रान्ता मोहजालसमावृताः ।
प्रसक्ताः कामभोगेषु पतन्ति नरकेऽशुचौ ॥ १६ ॥

आत्मसंभाविताः स्तब्धा धनमानमदान्विताः ।
यजन्ते नामयज्ञैस्ते दंभेनोऽविधिपूर्वकम् ॥ १७ ॥

अहंकारं बलं दर्पं कामं क्रोधं च संश्रिताः ।
मामात्मपरदेहेषु प्रद्विषन्तोऽभ्यसूयकाः ॥ १८ ॥

तानहं द्विषतः क्रुरान्संसारेषु नराधमान् ।
क्षिपाम्यजस्त्रमशुभानासुरीष्वेव योनिषु ॥ १९ ॥

आसुरीं योनिमापन्ना मूढा जन्मनि जन्मनि ।
मामप्राप्यैव कौन्तेय ततो यान्त्यधमां गतिम् ॥ २० ॥

त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनमात्मनः ।

अनुक्रमणिका

**कामः क्रोधस्तथा लोभस्तस्मादेतत्त्रयं त्यजेत् ॥ २१ ॥**

**एतैर्विमुक्त्ः कौन्तेय तमोद्वारैस्त्रिभिर्नरः ।**
**आचरत्यात्मनः श्रेयस्ततो याति परां गतिम् ॥ २२ ॥**

**यः शास्त्रविधिमुत्सृज्य वर्तते कामकारतः ।**
**न स सिद्धिमवाप्नोति न सुखं न परां गतिम् ॥ २३ ॥**

**तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ ।**
**ज्ञात्वा शास्त्रविधानोक्तं कर्म कर्तुमिहार्हसि ॥ २४ ॥**

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे "दैवासुरसंपद्विभागयोगो नाम" षौडशोऽध्यायः ॥ १९६ ॥

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

----------

अनुक्रमणिका

या अध्यायाची सुरवात चित्सूर्याच्या रूपकाने होते आहे. ह्या अपूर्व रूपकास वाङमयात क्वचितच तोड असेल.

म्हैसूर युनिव्हर्सिटीचे व्हाइस चॅन्सलर डॉ. हिरेअण्णा यांना गुरुदेव रानड्यांनी ह्या सुरवातीच्या सोळा ओव्यांचा इंग्रजी अनुवाद करून दिला. प्लेटोच्या SUN ह्या रूपकाने असेच वर्णन केले आहे. त्यापेक्षाही हे वर्णन कितीतरी श्रेष्ठ आहे. हा इंग्रजी अनुवाद ऐकून हिरे अण्णांना मोठा आनंद झाला. ते गुरूदेवांना म्हणाले, "अहो, हे किती उत्कृष्ट वर्णन आहे हो! मी आता याचे भाषांतर ऐकत नाही. मी ते मुळात वाचण्यासाठी तुमच्यापाशी मराठीचा अभ्यास करतो."

परप्रांतीय विद्वानांनीही महती गावी असे सोळाव्या अध्यायाच्या सुरवातीचे हे सूर्यरूपक! आपण ते मराठीतून वाचू शकतो हे केव्हढे आपले भाग्य!

ज्ञानदेव पुढे म्हणतात की, "देवांनी आतापर्यंतच्या अध्यायांत ज्ञानाचेच महत्त्व सांगितले. ते ऐकून जिज्ञासूंना वाटू लागले की, आत्मसाक्षात्कारास जर ज्ञानच कारणीभूत होत असेल तर आपण अशा त्या ज्ञानाचीच कास धरावी. ते ज्ञान कसे मिळवावे, मिळाले तर कसे टिकवावे, वाढवावे, ज्ञानाला विरोधक गोष्टी कोणत्या, त्याचा निरास कसा करावयाचा हे समजून घ्यावे."

ह्या जिज्ञासूंसाठी देवांनी ज्ञान जिच्यामुळे वाढेल त्या दैवी संपत्तीचे विवरण या अध्यायात केले आणि ज्ञानाला विरोधक असणारी जी आसुरी संपत्ती तीही टाळण्यासाठी सांगून ठेवली.

अध्यायाच्या शेवटी दैवी संपत्तीने युक्त झाल्यावर आपले कर्म वेदाज्ञेप्रमाणे केल्याने अनिष्ट भेटत नाही आणि ब्रह्मप्राप्ती होते असा निर्णय देवानी केला असे ज्ञानदेव म्हणतात.

माउली म्हणतात, "जीवाला झालेला विश्वाभास नाहीसा करणारा व अद्वैतस्थितीरूपी कमल विकसित करणारा श्रीगुरु निवृत्तिनाथरूपी आश्चर्यकारक सूर्य उगवला आहे. त्याला आम्ही नमस्कार करतो.

लौकिक सूर्य उगवला की, जगताचे प्रकाशन होते पण श्रीगुरुरूपी सूर्य उगवला की जगदाभास नाहीसा होतो. लौकिक सूर्यामुळे स्वतःसहित सर्व पदार्थ स्पष्ट दिसू लागल्याने द्वैत वाढते तर ह्या गुरुसूर्याच्या प्रकाशाने द्वैत जाऊन अद्वैत सिद्ध होते. म्हणून त्यास आश्चर्यकारक सूर्य म्हटले आहे."

श्रीरामकृष्ण परमहंसांच्या चरित्रात एक कथा आहे. ते म्हणत, "अत्यंत एकनिष्ठ भक्ताला आपल्या गुरूबद्दल अतिशय आदर असतो, श्रद्धा असते. गुरु जे सांगेल ते त्याला प्रमाण! त्यामुळे त्याला जिकडे तिकडे ईश्वरच सर्व काही झालेला आहे असे दिसू लागते."

दक्षिणेश्वरी एक दिवस श्रीरामकृष्ण एका सरल पण वादप्रिय स्वभावाच्या शिष्याला काही गोष्ट

समजावून देत होते. त्याच्या विचारशक्तिला ती काही पटेना. तीन-चार वेळा ती गोष्ट सांगूनही जेव्हा त्या शिष्याचा तर्क व विचार संपेना तेव्हा किंचित् रागावल्यासारखे करून पण गोड शब्दांनी ते त्याला म्हणाले, “तू कसा मनुष्य आहेस रे? मी स्वतः सांगतो आहे तरीसुद्धा तुला हे पटत नाही?”

तेव्हा मात्र त्या शिष्याचे गुरुप्रेम एकदम जागे झाले. तो किंचित् लाजून म्हणाला, “महाराज, चूक झाली. आपणच प्रत्यक्ष सांगता आणि मला पटणार नाही असे कसे होईल?”

ठाकूर पुढे म्हणाले, “गुरुभक्ति कशी असावी सांगू? गुरु जसे सांगतील तसे लागलीच दिसू लागले पाहिजे. अशी भक्ति अर्जुनाची होती. एक दिवस रथात बसून अर्जुनाबरोबर श्रीकृष्ण सहज फिरत चालले असता मधेच आकाशाकडे पाहून म्हणाले, “अहाहा! अर्जुना हे पाहिलेस का कसे एक सुंदर कबूतर उडत चालले आहे ते?” आकाशाकडे पाहून अर्जुन म्हणाला, “खरेच कृष्णा, किती सुंदर कबूतर आहे हे!”

पण पुन्हा श्रीकृष्ण वर पाहून म्हणाले, “छे छे अर्जुना, अरे हे कबूतर नव्हे.” अर्जुन तिकडे पाहून म्हणाला, “खरेच कृष्णा, हे कबुतर दिसत नाही.”

मग श्रीकृष्ण म्हणाले, “मला तर वाटते हा बहिरी ससाणा आहे.” अर्जुन लगेच म्हणाला, “हो कृष्णा, बहिरी ससाणाच आहे.”

देव हंसून म्हणाले, “अरे अर्जुना, मग आहे काय ते? कबूतर की बहिरी ससाणा?”

अर्जुन म्हणाला, “आपण म्हणाल ते आहे. कबूतर म्हणाल तर कबूतर, बहिरी ससाणा म्हणाल तर बहिरी ससाणा आहे. आपल्या शब्दाबाहेर वस्तू असेल कशी?”

श्रीकृष्णाची खुषामत करावी म्हणून अर्जुनाने असे म्हटले नाही. देवांवर त्याची इतकी निष्ठा होती की देव म्हणतील ते त्याला दिसत होते. गुरुशिष्य भाव हा असा असतो.

ते पुढे म्हणाले, “गुरू म्हणजे सखी. जोपर्यंत राधेची व कृष्णाची भेट झालेली नसते तोपर्यंत सखीचे काम संपत नाही. भेट झाली की लगेच संपते. श्रीगुरु आपल्या शिष्याचा हात धरून त्याला उच्च उच्चतर भावप्रदेशात नेत नेत त्याच्या इष्टदेवतेसमोर आणून, “हं, शिष्या, हे बघ तुझे इष्टदैवत.” असे म्हणून अंतर्धान पावतात.”

एक निष्ठावन्त भक्त म्हणाला, “तर मग अखेरीस एक दिवस श्रीगुरुंची आणि आमची ताटातूट होणार काय? श्रीगुरु मग कोठे जातात ठाकूर?”

श्रीरामकृष्ण म्हणाले, “गुरु त्या इष्टदेवतेशी एकरूप होऊन जातात. गुरु, कृष्ण, वैष्णव हे तीनही एकच. एकाचीच ही तीन रूपे.”

अनुक्रमणिका

स्वतः परमहंसांना ईश्वर जगत् स्वरूपावाचून काही दिसत नसे. त्यांच्या अद्वैत ज्ञानाची गंभीरता इतकी होती की, अगदी थोड्याशा उद्दीपनानेदेखील त्यांना एकदम समाधी लागे.

एक दिवस ते आपल्या खोलीच्या सज्ज्यात बसले असता तेथे एक पतंग उडत आला. त्याच्या अंगात भला मोठा काटा घुसला असून तो पतंग काटा काढण्याची खूप धडपड करीत होता. त्याची ती अवस्था पाहून श्रीरामकृष्णांचे अंग थरारले. “रामा, काय रे तुझी ही शोचनीय अवस्था”, असे म्हणत म्हणत ते समाधिमग्न झाले.

आणि ते ही समाधीअवस्था शिष्याच्या ह्रदयाला व जिव्हेला स्पर्श करून प्राप्त करून देत. पुढे पुढे तर ते म्हणत, “या शरिरात सध्या अशी एक शक्ति आविर्भूत झाली आहे की आता कोणाला स्पर्श करण्याचेही कारण नाही. “तू त्याला स्पर्श कर” असे मी एखाद्याला सांगितले आणि त्याने स्पर्श केला म्हणजे झाले. तेवढ्यानेच त्या दुसऱ्याला चैतन्यप्राप्ती होईल.” तेव्हा गुरूंच्या सामर्थ्याची ही परमहंसांच्या चरित्रातील कथा ध्यानात ठेवण्यासारखीच आहे असे वाटते. माउली गुरूंच्या अशा सामर्थ्याचे सूर्यप्रतिकाच्या माध्यमातून वर्णन करीत आहेत.

माउली म्हणतात, “श्रीगुरुरूपी सूर्य मायेच्या रात्रीचा नाश करतो. ज्ञान आणि अज्ञानरूपी चांदण्या गिळून टाकतो. आता ही सुंदर पहाट झाल्याबरोबर “मी देह आहे” या भ्रान्तीच्या घरट्यात मायेच्या अंधारात झोपलेले जीवपक्षी जागे होतात. त्यांना आत्मज्ञानाचे डोळे प्राप्त होतात आणि ते घरटी सोडून आकाशात झेप घेतात. जीव चैतन्यभ्रमर, लिंगदेहरुपी कमळाच्या मिटलेल्या पाकळ्यात अडकून पडला होता, त्याचा त्या बंधनात नाश होतो की काय असे भय वाटत होते पण त्या गुरुसूर्याच्या उदयाबरोबर ते लिंगदेहरूपी कमल विकसित झाले आणि तो जीव बंदीवासातून सुटला, मुक्त झाला. शब्दांच्या अडचणीच्या जागेत मतभेदरूपी नदीच्या दोन काठांवर बुद्धि आणि बोध हे चक्रवाकाचे जोडपे एकमेकाच्या विरहाने वेडे झाले होते. शास्त्रातील विसंगतीने झालेला त्यांचा वियोग चिदाकाशरूपी भुवनात श्रीगुरुरूपी सूर्य उदयास आल्याबरोबर संपला. त्या सूर्याने त्यांना ऐक्याचा आनंद दिला आहे.

गुरुरूपी पहाटेच्या प्रकाशाने भेदाची चोरवेळ नाहीशी होते. पांथिक योगी या प्रकाशात आत्मानुभवाच्या वाटेने थेट पुढे चालू लागतात. आपला मार्ग त्यांना स्वच्छ दिसतो.

त्या श्रीगुरूंच्या विवेकरूपी किरणांनी बुद्धिरूपी सूर्यकांत मण्यातून ठिणग्या निघतात आणि त्या ज्ञानशलाकांनी संसाराची जंगले जाळून टाकली जातात त्या गुरूंच्या प्रखर किरणांचा वर्षाव ब्रह्मस्वरूपी माळजमिनीवर झाला की, अष्टमहासिद्धीच्या मृगजळास पूर येतो.

मी ब्रह्म आहे अशी वृत्ति हाच माध्यान्हकाळ आहे. श्रीगुरुरूपी सूर्य माथ्यावर येतो आणि शिष्यांच्या आत्मभ्रान्तीची छाया त्याच्या पायाशी लपून जाते. त्यावेळी विश्वस्वप्नही सहज संपते. अद्वैतबोधनगरात महानंदाची इतकी रेलचेल उडून जाते की, सुखानुभूति कुणी कुणाला द्यायची? ते देणे घेणे मंदावू लागते. फार

काय सांगावे त्या गुरुरूपी सूर्य प्रकाशात नेहमीच कैवल्याचा मुक्त लाभ होतो. श्रीगुरूंच्या घरी जसे काही अमृताचे सदाच मुक्तद्वार भोजन आहे.

आत्मस्वरूपरूपी आकाशाचा राजा श्रीगुरु वास्तविक सदैव उगवलेलाच आहे पण तो उगवल्याचा शिष्यास अनुभव आल्याबरोबर पूर्वेची काळिमा नाहीशी करतोच पण पश्चिमादि सर्व दिशाच उजळून टाकतो. अज्ञानही जाते ज्ञानही संपते आणि ह्या दोन्हींनी झाकलेले मूळ स्वरूप प्रकट होते. जास्त काय सांगू? ही एक वेगळीच उषा आहे. रात्र आणि दिवस ही दोन्ही सापेक्ष आहेत. प्रकाश आहे म्हणून दिवस आणि नाही म्हणून रात्र होते पण श्रीगुरूंच्या ठिकाणी प्रकाशित करण्याच्या पदार्थाशिवायच प्रकाश आहे. ते महाराज केवळ ज्ञानसूर्यच आहेत. अशा ह्या चित्तेजोभास्करास  कोणी जाणावे? कोणी त्याची स्तुती करावी? कोणत्या शब्दात करावी? शब्दांनी केलेली स्तुती बाधकच होईल म्हणून त्या निवृत्तिनाथरूपी ज्ञानसूर्याला माझा वारंवार नमस्कार असो.

गुरुदेवा, आपली स्तुती करावी अशी आवड मात्र मनात उत्पन्न होते. आपले महिमान पाहिले की वाटते काहीतरी गुणगान करावेच. पण स्तव्यबुद्धिबरोबर आपण लयाला गेल्याशिवाय आपली खरी स्तुती होणार कशी? काही न जाणता आपले रूप जाणता येते. मौनाच्या मिठीने आपल स्तुती करता येते. काही न होता आपल्याशी ऐक्य साधले तर आपले स्वरूप कळते त्यामुळे स्तवनाच्या मिषाने काही बोलावे ती मध्यमा आणि पश्यंती यांना पोटात घालून परावाणीसह वैखरीच नाहीशी होते. आपण अद्वयानंद अहा. सेवकपण घेऊन मी शब्दांनी स्तोत्रपाठ करून आपल्यावर अलंकार चढवीन असे म्हणणे ही माझी धिटाई सहन करा असे माझे म्हणणेसुद्धा आपल्याला सहन होण्यासारखे नाही, पण एखाद्या दरिद्री माणसाच्या समोर जर अमृताचा सागर पाहुणा म्हणून उभा राहिला तर उचित, अनुचित याचा विचार न करता आपल्याजवळ असलेला भाजीपाला घेऊन त्या अमृतसागरास पाहुणचार करावा म्हणून तो रंक धावत जात नाही काय? त्याचा तो आनंदाचा पूर पाहून भाजीपालाही फार मोठे पक्वान्न म्हणून त्या समुद्राने स्वीकारावे ना? सूर्याला काडवातीने ओवाळावे तसेच हे आहे. सूर्याला काय त्या वातीकडून प्रकाशाची अपेक्षा आहे? पण त्या आरतीच्या मागे असणारा उत्कट भक्तिभाव पाहून तो संतुष्ट होतोच की नाही? बाळाला कसे वागावे हे कळू लागले की मग बाळपण कुठे शिल्लक रहाते? बाळपण आहे, अज्ञान आहे म्हणूनच ना आई आनंदित होत असते? गावातले सांडपाणी घेऊन ओहोळ गंगेला निघाला आणि गंगेजवळ जाऊन पोचला तर ती काय 'दूर हो, तुझे पाणी स्वच्छ नाही.' असे म्हणून त्याला झिडकारते का? त्यालाही आपल्या पोटात सामावून घेतेच ना? भृगुऋषींनी देवाना लाथ मारली. देवानी रागावण्यासारखाचा हा ऋषींचा अपराध होता. पण देवानी ती लाथ वक्षःस्थलावर झेलली. ते लांच्छन कायमचे अनुग्रह म्हणून आनंदाने छातीवर वागविले आणि प्रेमाचा उपचार आहे असा भाव ठेवून संतोषच मानला ना? अंधाराने खच्चून भरलेले आकाश प्रकाशाने परिपूर्ण असलेल्या दिवसनाथापुढे आल्यावर तो काय अंधाराला पलीकडे सर असे म्हणतो काय? तेव्हा सूर्यरुपकाबरोबर मी आपली तुलना केली ह्या माझ्या अपराधाची आपण क्षमा करा, माझा हा अपराध पोटात घाला.

काहींनी आपले ध्यान केले, वेदांनी तर वाचेने स्तवन केले, महाराज त्यांचे हे अपराध आपण सहन केलेतच ना? मग आता सूर्याबरोबर आपली तुलना केली हा माझा अपराध आपण सहन करावा.

अनुक्रमणिका

आपण सहन करा अगर रागाने दूर ढकला मी काही आता अर्धपोटी उठणार नाही. आपल्या गुणांच्या पक्वान्न भोजनाला लालचावलो आहे, हा काय माझा अपराध आहे का? अपराध असलाच तर तो आपल्या गुणांचा आहे. त्यांनी मला एवढी गोडी लावली त्याला मी काय करू? गीता या नावाने तुझे प्रसादामृत सेवावे म्हणून मी गीतेचे वर्णन करू लागलो तर माझे दैव दुपटीने प्रबळ झाले. प्रभू मी सत्यभाषणाचे तप पुष्कळ कल्प केले आणि त्याचे फळ म्हणून गीतारूपी महाद्वीपामध्ये येऊन पोचलो. इथे पोचल्यावरही मी अनेक प्रकारचे पुण्यकर्म करून तुझे गुणवर्णन करण्याच्या योग्यतेचा झालो. ती योग्यता मला देऊन ती पुण्ये माझ्या ऋणातून पूर्णतया मुक्त झाली. जीवदशेच्या आडरानात मरणरूपी वस्तीत सापडलो होतो ती माझी अवदशा आज पुरी फेडली गेली. गीता म्हणजे तुमचीच नावाजण्याजोगी कीर्ति आहे. बलाढ्य अशी अज्ञानदशा त्या गीतेने जिंकून घेतली आणि आम्हाला वर्णन करण्यास उत्तम विषय मिळाला. मी वर्णन करण्यास अपात्र असेनही पण महाराज, एखाद्या निर्धन माणसाच्या घरी महालक्ष्मी स्वतः आली आणि त्याच्या घरी तिने आपले निवासस्थान केले तर त्यानंतर त्या माणसाला निर्धन म्हणता येईल का? अंधाराच्या घरी दैवयोगाने सूर्य आला तर तो अंधाराचेच प्रकाशात परिवर्तन करीत नाही का? देवाची थोरवी एवढी मोठी की हे सर्व विश्व त्याच्यापुढे एखाद्या परमाणुएवढेसुद्धा दिसणार नाही. पण तोच देव भक्ताचा भाव जसा असेल तसे रूप घेत नाही का? मी गीतेचे व्याख्यान करतो हे माझे म्हणणे आकाशपुष्पाचा वास घेण्यासारखे आहे. पण गुरूदेव, आपण आपल्या सामर्थ्याने माझी ती हौस पुरवली. त्याच प्रसादाच्या जोरावर मी म्हणतो आहे की, यानंतरही गीतेचा अर्थ मी विशद करून सांगीन.

ऐकावे महाराज, पंधराव्या अध्यायात श्रीकृष्णांनी त्या पांडवाला सगळा शास्त्रसिद्धान्त सांगितला. एखादा उत्तम वैद्य जसा रोग्याच्या अंगात मुरलेल्या जुन्या रोगाचे अचूक निदान करून उपाययोजना करतो, औषध देतो, त्याप्रमाणे वृक्षरूपाच्या परिभाषेमध्ये जीवाच्या उपाधीचे रूप स्पष्ट करून दाखवले. मग मायारूप उपाधीचा आश्रय करून रहाणारा जो अक्षरपुरुष तो दाखविला. उपहित चैतन्यही स्पष्ट केले. नंतर 'उत्तम पुरुष' अशा शब्दाचे मिष करून चोख असे आत्मतत्त्व प्रत्यक्ष दाखवले आणि ह्या आत्मतत्त्वाच्या प्राप्तीसाठी बळकट साधन म्हणून ज्ञानाचा त्यांनी उल्लेख केला. तसे पाहिले तर साध्य आणि साधन दोन्ही मागच्या अध्यायात सांगून झाल्यामुळे आता ह्या अध्यायात काही सांगावयाचे उरलेले नाही. आता गुरुशिष्य यांच्या प्रेमाची वाढ होत रहाणार एवढेच उरते. ज्ञान हेच एकमेव साधन आत्मवस्तूच्या प्राप्तीसाठी आहे हे अपार जाणत्यांना कळून आले. त्यांची त्याविषयी खात्री पटली पण इतर मुमुक्षु साकांक्ष झाले.

"मर्मज्ञ अर्जुना, त्या मला पुरुषोत्तमाला जो ज्ञानमार्गाने भेटतो तोच सर्वज्ञ आहे आणि भक्तिचीही सीमा तोच आहे." असे जे त्रैलोक्यनाथ भगवंत पंधराव्या अध्यायात म्हणाले त्या श्लोकाचा निष्कर्ष म्हणजे देवांनी आनंदाने ज्ञानाचीच स्तुती केली हे त्या मुमुक्षूंनी जाणले.

हे ज्ञान संसाराचा निरास करून, पहाता पहाता पहाणाऱ्या जीवाला आनंद साम्राज्याचा पट्टाभिषेक करते हे त्यांना कळले. एवढ्या सामर्थ्याचा दुसरा उपायच नाही, यथार्थज्ञानाची प्राप्ती करून देणाऱ्या साधनांचा हा राजा आहे असे देवानी म्हटलेले त्यांनी मनात बाळगून ठेवले आणि त्या आत्मजिज्ञासूंनी अत्यंत आनंदाने त्या ज्ञानाला आदराने जीवाभावाने ओवाळले. आता असे आहे की ज्या वस्तुबद्दल आवड उत्पन्न होते तीच वस्तू इतर वस्तूंना मागे सारून पुन्हा पुन्हा मनात येते. तिच्यावर प्रेम जडून जाते.

अनुक्रमणिका

म्हणून ते सम्यनक्ज्ञान आपल्या कसे स्वाधीन होईल आणि त्या ज्ञानाची वृद्धि कशी होईल हे जाणून घ्यावे असा विचार त्यांनी केला. जे ज्ञानास उत्पन्नच होऊ देत नाही आणि ज्ञान उत्पन्न झाले तर जे त्या ज्ञानाला भलत्या मार्गात घालते हेही समजून घेण्याचे त्यांनी ठरविले. असाही मनाचा निश्चय केला की जे ज्ञानास विरुद्ध असेल ते घालवून देऊ आणि सर्व भावाने ज्ञानाच्या प्राप्तीस जे अनुकूल असेल ते विचारून त्या साधनाच्या मागे लागू."

श्रोतेही, तुम्ही मनामध्ये जो हा हेतू धरला आहे तो उत्तम आहे. तुम्ही जिज्ञासु अहा आणि तो लक्ष्मीपती सांगण्यास उत्सुक आहे. तो भगवंत तुमच्या मनाची इच्छा पूर्ण करण्यासाठी बोलेल. जिच्या योगाने ज्ञानास उत्तम जन्म लाभेल आणि शिवाय आपल्या विश्रान्तीसही जी कारणीभूत होईल अशी दैवी संपत्ती देव सांगतील, सविस्तर वर्णन करून तुमच्या मनाचे समाधान होईल अशा प्रकारे सांगतील. ज्ञानाचे काम काढून म्हणजे ज्ञान नाहीसे करून रागद्वेषादिकांना थारा देणारी जी आसुरी संपत्ती तिचेही वर्णन करतील.

नवव्या अध्यायातच याचा विस्तार व्हावयाचा पण दुसरा विषय पुढे आल्याने ते राहिले. दैवी संपत्ती स्वभावतःच इष्ट करणारी आहे व आसुरी स्वभावतःच अनिष्ट करणारी आहे. त्यांचे तेच कौतुक आहे. आता मात्र देव ह्या दोन प्रकारच्या संपत्तीचे सविस्तर वर्णन करीत आहेत. मागील क्रमाप्रमाणे संख्या पाहता हे निरूपण म्हणजेच सोळावा अध्याय आहे.

पण ते असो. ज्ञानाचे हित व अहित करण्याचे सामर्थ्य ह्या दोन संपत्तीमध्ये आहे. मुमुक्षूंना मुक्कामावर नेऊन पोचवणारी व मोहरात्रीमध्ये वाटसरूंच्या संरक्षणासाठी लावलेला धर्मदिवाच असलेली जी दैवी संपत्ती तिचे वर्णन प्रथम ऐका.

संपत्तीचा अर्थ असा असतो की तिथे असणारे पदार्थ एकमेकास पोषक, मदत करणारे असतात. खजिना असला पाहिजे, मंदिरे हवी, तलाव हवे, हत्ती, घोडे, उंट, गायी, बैल असे पशुधन हवे आणि ह्याचबरोबर सदाचरण असावे. असा मेळ ज्याच्याजवळ असतो त्याला राजा म्हटले जाते. तिथे संपत्ती आहे असे म्हटले जाते. दैवी संपत्ती सुख उत्पन्न करणारी असते, सर्व दैवी गुण तिथे एकत्र नांदत असतात, सर्वांचा निर्वाह त्याच ठिकाणी होतो म्हणून त्या मेळास दैवी संपत्ती म्हटले जाते. देव म्हणाले, "आता ह्या गुणसंपत्तीमध्ये पहिल्या आसनावर जो बसतो त्या गुणाला अभय असे म्हणतात. भयाचे कारणच ठेवले नाही की अभय सिद्ध होते. महापुरामध्ये पोहायला उडी घातलीच नाही म्हणजे बुडण्याचे भयच रहात नाही. जो मनुष्य नेहमीच पथ्याने रहातो त्याच्या घरी रोग प्रवेशच करीत नाही. **विहित कर्म केल्याचा अहंकार बाळगायचा नाही आणि निषिद्ध कर्म करायचेच नाही असे ठरवून तो मनुष्य संसाराचे भय समूळ नष्ट करून टाकतो.** सर्व विश्वाशी ऐक्यभावानेच नांदत असल्याने व दुसरा जीव हा आपलाच आत्मा आहे असे समजून राहिल्याने भयवार्ता त्याने दूरदेशास पिटाळून लावलेली असते. पाणी मिठाला बुडवायला आले आणि मीठच पाणी होऊन गेले मग बुडण्याचे भय कुठे आहे? त्याप्रमाणे तो स्वतःकडे विश्वात्मक भावाने आणि विश्वाकडे आत्मभावाने पहात असल्याने कुणाचे कुणाला भय वाटणार? आपण अद्वैतच झाल्याने सगळे भय नाहीसेच होऊन जाते, अशा वृत्तिस अभय असे म्हणावयाचे. हे अभय यथार्थज्ञानाच्या बरोबर रहाणारा व रक्षण करणारा शिपाई आहे.

राख जळत नाही किंवा विझत नाही. शुक्ल प्रतिपदेस कलेची वाढ न घेता पण अमावास्येचा ऱ्हास मागे टाकून चंद्र ह्या दोन स्थितीच्यामध्ये मूळ स्वरूपात रहातो. वर्षाऋतू संपला आहे पण ग्रीष्मऋतूचे शोषण अजून सुरू व्हावयाचे आहे. अशा मधल्या अवस्थेत गंगा स्थिरपणाने वहात असते. तशीच ह्या साधकाच्या मनाने संकल्प विकल्पाची ओढ टाकून दिलेली असते आणि आत्मचिंतनाचे प्रेम अनुभवणारी त्याची बुद्धि आपल्या मूळ स्वरूपात स्थिर झालेली असते. त्याची इंद्रिये त्याला चांगले व वाईट पदार्थ दाखवत असतातच. तो त्यांचा स्वभावच आहे. पण त्या चांगल्या, वाईट गोष्टींनी त्याच्या चित्तात काही चलबिचल होत नाही, जिचा पती गावाला गेला आहे अशी स्त्री विरहाने इतकी व्यथित झालेली असते की इतर हानी, लाभ तिला जाणवतच नाही. त्याप्रमाणे सत्त्वरूपावरच त्या साधकाचे इतके प्रेम जडलेले असते की तो इतर गोष्टींचा विचारच करीत नाही. केशिहंता भगवंत म्हणाला, "जेव्हा अशी अनन्यवृत्ती होते तेव्हा त्या गुणास सत्वशुद्धी असे म्हणावयाचे."

आता तिसरा गुण आहे ज्ञान व योग यांचे ठिकाणी तत्परता. ज्ञान व योग यापैकी जे साधन आपल्याला करता येईल त्याविषयी अगदी मनापासून निकराचे प्रयत्न करणे याला "ज्ञानयोग व्यवस्थितीः" असे म्हटले जाते. आपल्या सगळ्या चित्तवृत्ति एकवटून इतर विषयांचा त्याग करून साधन करावयास हवे. एखादा याज्ञिक निष्काम वृतिने यज्ञ करीत असता अग्निमध्ये जशी पूर्णाहुती देतो तशी स्थिती असावी. एखाद्या कुलीन पुरुषाने आपली कन्या उत्तम कुळात द्यावी त्याप्रमाणे या साधकाने आपल्या सर्व वृत्ति साधनास अर्पण कराव्या. देवी लक्ष्मी जशी मुकुंदाच्या ठिकाणी पूर्ण समर्पणाने स्थिर होऊन रहाते तशा साधकाच्या वृत्ति एकदा साधन काय करावयाचे हे ठरले की अनन्यतेने, स्थिरतेने त्या साधनातच रहाव्या. योग किंवा ज्ञान यांच्या ठिकाणी वतनदार होऊन रहाणे यालाच "ज्ञानयोग व्यवस्थितिः" असे नाव आहे आणि अर्जुना, साधकाच्या ठिकाणी हा तिसरा गुण असणे अत्यंत आवश्यक आहे.

श्रीरामकृष्ण परमहंसांच्या चरित्रात अनेक अद्भुत कथा आहेत. त्यात एकदा एक मार्ग पत्करला की त्यासाठी पडतील ते सर्व क्लेश सहन करण्याची त्यांची कशी तयारी असे ते दिसून येते. त्यांनी लग्न केले पण कधीही संसार केला नाही. त्याचप्रमाणे पत्नीचा त्यागही केला नाही. जवळ निद्रित असलेल्या पत्नीकडे पाहून ते एक दिवस म्हणाले, "मना, ह्यालाच स्त्री-शरीर म्हणतात. सारे जग यालाच परमभोग्य वस्तु समजून त्याच्या प्राप्तीसाठी सर्वदा लालचावलेले असते. ह्याचे ग्रहण केल्यास देहासक्तीमध्ये गुंतून पडावे लागते आणि त्यामुळे सच्चिदानंद ईश्वराचा लाभ करून घेता येत नाही. मना, खरे खरे सांग. पोटात एक, बाहेर एक असे करू नको. तुला हे शरीर हवे आहे की ईश्वर हवा? हे शरीर तुझ्या शेजारी आहे. पाहिजे असल्यास ग्रहण कर." आणि असा विचार येतो न येतो तोच त्यांना गाढ समाधी लागली. सकाळ झाल्यावर त्यांच्या कानात कितीवेळ तरी ईश्वराचे नामस्मरण केल्यावर मग त्यांची समाधी उतरली. नंतर जेष्ठी अमावास्येस तर रात्री देवीभावाने त्यांनी पत्नीचे पूजन केले. मंत्रोच्चार करीत, नमस्कार करीत ते म्हणाले, "हे सर्व मंगलाच्या मंगलस्वरूपे! हे सर्वकर्मनिष्पन्नकारिणी! हे शरणदायिनी! त्रिनयने! शिवगेहिनी गौरी! हे नारायणी, तुला शतशः प्रणाम असोत."

जपाची माळ व आजवर केलेल्या साधनेचे फल आपण स्वतः त्या देवीस्वरूप पत्नीच्या चरणावर वाहून ते मोकळे झाले. ज्ञान व योग यावर अशी अपूर्व निष्ठा देवांना अभिप्रेत आहे.

अनुक्रमणिका

पूज्य ब्रह्मचैतन्य गोंदवलेकरमहाराज यांच्या चरित्रातही असे आहे की तुकाई गुरूंनी एक दिवस ब्रह्मचैतन्य, तुकाई व काही मुले वाळवंटात एकत्र असताना अशी आज्ञा त्यांना केली की, “वाळवंटात खड्डा काढ आणि त्या मुलाला त्यात पुरून टाक.” गोंदवलेकरमहाराजांनी गुरूंची आज्ञा शिरसावंद्य मानून मुलास खड्डयात पुरून टाकले. इतर मुले घाबरून गावात पळून गेली आणि हकीकत सांगू लागली. गावातली व घरातली मंडळी धावत आली. तुकाई व ब्रह्मचैतन्य स्वस्थ बसलेले होते. तुकाईंना लोकांनी विचारले, “अहो, मूल कुठे आहे?” तुकाईंनी ब्रह्मचैतन्यांकडे बोट दाखवून म्हटले, “ह्या बाबाने मूल वाळवंटात त्या तिथे पुरले.” लोकांनी हे ऐकल्याबरोबर काहीजण मुलास काढण्यास धावले व काहींनी हातातल्या काठ्या ब्रह्मचैतन्यांच्या अंगावर फोडण्यास सुरवात केली. ब्रह्मचैतन्य शांत होते आणि तुकाई गंमत पहात होते. खड्डयातून मूल अगदी सुरक्षित बाहेर आल्यावर माणसे त्याला घेऊन गावात निघून गेली.

तुकाई ब्रह्मचैतन्यांच्या जवळ जाऊन त्यांना कुरवाळून म्हणाले, “शबास रे. आता माझ्याजवळचे सगळेच्या सगळे तुला देऊन मी मोकळा होतो.” आणि त्याप्रमाणे तुकाईनी ब्रह्मचैतन्यांना पट्टाभिषेक करून निरोप दिला. चित्तवृत्ति अशी न हालता स्थिर राहिली पाहिजे असे देवांनी सांगितले.

अर्जुना, साधक उदार असला पाहिजे. देह, वाचा, मन यापैकी काही किंवा आपल्याजवळ असेल ते विद्यमान, धन, वैरी जरी दारात आला तरी क्षणाचाही विचार न करता त्याने दिले पाहिजे. या कामात त्याने वृक्षास गुरु करावे. वृक्ष आपले पान, फूल, फळ, मूळ, छाया हे वाटसरूला द्यायला चुकत नाही. त्याप्रमाणे क्षणाचाही विचार न करता आर्ताची आर्ती यथाशक्ति दूर केली पाहिजे. मनापासून धनापर्यंत आल्या प्रसंगास जे विद्यमान असेल ते त्याने दिले पाहिजे. श्रमलेल्याच्या मनास आनंद होईल अशा प्रकारे उपयोगी पडणे याला दान म्हणावयाचे. हे दान मोक्षरूपी ठेवा दाखवणारे अंजनच आहे.

एकदा काय झाले की, खूप उष्मा होता. पृथ्वी जशी काही प्रदीप्त अग्निच झाली होती. चटके बसत होते. अशा वेळी भोजराजाचे राजकवी रस्त्याने जरूरीच्या कामासाठी निघाले होते काम आटोपून परत येत असताना एक दुबळा, थकलाभागलेला मनुष्य उघड्या पायाने रस्त्यावरून चालला होता धापा टाकत. तो रस्त्यावरून धावण्याचा प्रयत्न करीत होता. राजकवीचे कोमल मन ही अवस्था पाहून कळवळले. ते त्याच्याजवळ गेले, आपल्या पायातील चढाव काढून त्याच्यापुढे सरकवीत ते म्हणाले, “भाऊ, हे घाल तुझ्या पायात.”

राजकवींना उघड्या पायाने चालण्याची कधीच सवय नव्हती. त्यात वरून प्रखर ऊन! कवी रस्त्यात मूर्च्छा येऊन पडले. राजाचा माहुत हत्ती घेऊन रस्त्याने चालला होता. त्याने कवींना पाहिले व उचलून हौद्यात घेतले. अशा रीतीने कविराज हत्तीवरून निघाले! शहरात येता येता भोजराजाची स्वारी घोड्यावरून चालली होती. त्यांनी हसून कवीला विचारले “वा कवी! हा हत्ती आणि कुठे मिळाला तुम्हाला?”

कवीने उत्तर दिले—

**“उपानहं मया दत्तं जीर्णं कर्णविवर्जितम् ।**

अनुक्रमणिका

**तत्पुण्येन गजारूढो न दत्तं वैहितग्द्तम् ॥”**

महाराज, कानतुटक्या वहाणेचे दान करून मी गजारुढ झालो आहे! अहो, जे द्रव्य दिले जात नाही, ज्याचे दान केले जात नाही, ते फुकटच गेले म्हणावयाचे.

असा हा आर्तास दान करण्याचा परिणाम! आणि देव सांगत आहेत की, असे दान त्या साधकाच्या हातून तात्काळ व अक्षय्य होत जावे, त्याचा तो स्वभावच होऊन जावा. इथे राजकवी गजारूढ झाला, पण ज्ञानी पुरुषास तर मोक्षारूढ व्हावयाचे आहे. तेव्हा दान कधी कधी सटीसहामासी करून भागावयाचे नाही. आर्ताची आर्ती क्षणार्धात त्याच्या काळजास भिडावी आणि वरून हुकूम येण्याच्या आत हाताने दान देऊनही धन्य व्हावे.

देव म्हणतात, “अर्जुना, दानाचे माहात्म्य तुला माहीतच आहे. जास्त काय सांगू? आता दमाचे लक्षण सांगतो. लक्षपूर्वक ऐक. विषयाशी इंद्रियांच्या झालेल्या एकतानतेची ताटातूट करून ठेवणे म्हणजे दम, गढूळ पाण्यात निवळीचे बी टाकले की पाणी स्वच्छ होते. ते बीज पाण्यातील माती अलग करून तळाशी नेते आणि वर स्वच्छ पाणी ठेवते. त्याप्रमाणे तो साधक इंद्रियांना चित्ताच्या स्वाधीन करून टाकतो. विषयांचा वारासुध्दा त्याच्या द्वारात वाहू देत नाही. आत चित्तापर्यंत विषयांचा त्याग करून प्रवृत्ति त्या साधकाला सोडून निघून जाते. आता ती कधी परतून येऊ नये म्हणून तो दाही इंद्रियांच्या दारात वैराग्याचा अग्नि पेटवून ठेवतो. श्वासोच्छ्वासापेक्षाही जास्त व्रतांचे आचरण तो करीत असतो. ही व्रते कडक असतात आणि ती तो रात्रंदिवस करीत असतो. हे तप अहोरात्र झाले तरी त्याला समाधान नसते. अर्जुना, अशा या गुणास दम असे म्हणावे आणि त्याचे लक्षण हे असे आहे.”

एकदा उन्हाळ्याच्या दिवसात दासीने राणीचा बिछाना घातला, खिडक्या उघडल्या, फुले गुंफून ठेवली. राणीच्या बिछान्याची उत्तम व्यवस्था तयार झाली. नदीकडून येणाऱ्या थंड वाऱ्याने दासीला गुंगी आली. ती क्षणभर राणीच्या पलंगावर बसली तर तिला तिथेच झोप लागली. राणी येऊन पहाते तो दासी आपल्या पलंगावर झोपलेली आहे! राणीला खूप राग आला. तिने दासीला उठवले आणि चाबकाने मारण्यास सुरवात केली. दासी प्रथम व्याकुळ झाली पण मग हसू लागली. राणीला खूप आश्चर्य वाटले. तिने चाबूक मारणे थांबवून विचारले. “काय झाले हसायला? दासी म्हणाली, “राणीसाहेब, मी क्षणभर असल्या बिछान्यावर झोपले तर मला इतके फटके बसले. आपण रोज त्यावर झोपता आपल्याला किती बसतील असे मनात आले आणि आपण त्यापुढे बसणाऱ्या फटक्यांची आठवण न ठेवता मला मारता अहा याचे मला हसू आले.”

ही गोष्ट एका नापिकाने राजाला सांगितली. राजाने ही गोष्ट ऐकली मात्र त्याने तात्काळ राज्याचा त्याग केला आणि तप करण्यासाठी तो वनात चालता झाला. असे हे इंद्रिय दमन!

शुकदेव ज्ञान करून घ्यावे म्हणून जनकाच्या घरी गेले असता त्यांना पहिल्या पहाऱ्यात उन्हात तीन दिवस, दुसऱ्या पहाऱ्यात तीन दिवस व तिसऱ्या पहाऱ्यात सावलीत तीन दिवस उभे रहावे लागले. पण त्यांच्या मनात काहीच चलबिचल झाली नाही. हे पाहिल्यावर प्रधान मंत्री येऊन त्यांची त्यांनी सन्मान पूजा केली आणि मग बायकांच्या घोळक्यात महालात आणून सोडले. शुकांचे मन तिथेही अविचलित राहिले. बायका

आवतीभवती असतानाच त्यांनी पलंगावर आसन घालून ध्यान लावले. मग दोन प्रहरी झोप घेतली. पुन्हा ध्यानमग्न, पहाटेसुद्धा दोन प्रहर ते ध्यानमग्न होते. मग मात्र जनकाची खात्री झाली. त्यांची भेट घेऊन पाद्यपूजा करून तो शुकांना म्हणाला, "शुकदेवा, आपल्याला ज्ञान कोण देणार? आपण तर मुक्तच अहा."

साधकाने "दम" ह्या गुणाची अशी वाटचाल करावयाची आहे.

देव पुढे म्हणाले, "तुला आता यज्ञाचा अर्थ सांगतो. ब्राम्हणांपासून ते थेट स्त्रियादिकांपर्यंत आपआपल्या वर्णाश्रमधर्माप्रमाणे आश्रय करण्यासारखे जे जे देवताधर्म आहेत ते अधिकारानुरूप शास्त्रात सांगितल्याप्रमाणे विधीपूर्वक आचरणात आणणे याचे नाव यज्ञ. यजन, याजन, अध्ययन, अध्यापन, दान, परिग्रह अशी सहा कर्मे शास्त्रांनी ब्राह्मणास सांगितली आहेत. ब्राह्मणाने ही सहा कर्मे करणे हा त्याने केलेला यज्ञ व शूद्राने त्याला केलेला नमस्कार हा त्याचा यज्ञ दोघानांही यज्ञ केल्याचे श्रेय मिळते. इतकेच नव्हे तर दोघांच्या यज्ञाची योग्यता सारखीच असते. अर्जुना, एक पथ्य मात्र पाळावे लागते. आपआपल्या अधिकारानुरूप यज्ञ करावयाचा पण त्या यज्ञाचे फल मला मिळावे या आशेचे विष त्यात कालवायचे नाही. ही आशा मुळात निर्माणच होऊ नये म्हणून देहाच्या कुठल्याही द्वारात "मी कर्ता" हा भाव जाऊ द्यायचा नाही. वेदाने करावयास सांगितलेल्या कर्मांना आपण फक्त निवासस्थान होऊन रहायचे. शास्त्रशुध्द आचरण अधिकारानुरूप फलाशा सोडून निर्मळ मनाने करीत राहिले की ते कर्म मोक्षमार्गाचा जाणकार वाटाड्या होते. ज्याला ज्ञानाची अपेक्षा आहे त्याने असा यज्ञ केला पाहिजे."

एकदा भीमसेन वनवासामध्ये धर्मराजावर खूप संतापला, तो म्हणला, "दादा, ह्या सगळ्या अनर्थाचे कारण तुम्ही अहा. खरे म्हणजे तुम्ही क्षत्रिय नाहीच. वेद पठण करणारा आणि शिकवणारा निरुपद्रवी ब्राह्मण अहा. सभेमधल्या त्या अपमानाने कुठलाही क्षत्रिय संतापाने पेटून हत्यार घेऊन उठला असता. तुम्ही धर्म धर्म म्हणत त्या धर्माचे पालन करीत दीनवाणे बसून राहिला. काय त्या धर्मपालनाचे फळ आहे? हा अरण्यवासच ना? धर्म कशासाठी पाळायचा?"

धर्मराज शांतपणाने म्हणाले, "भीमा, राग येण्यास जरा उशीर झाला. फांसे खेळणारे माझे हात तू सभेत जाळून टाकायला हवे होतेस. पण फळाचे म्हणशील ना तर भीमा, मी धर्माचे पालन धर्मपालन करावयाचे म्हणून करतो. फलासाठी नाही." आणि हे धर्मपालन धर्मराजांनी इतके झळझळीत केले की यक्षाच्या शापाने जेव्हा चारी बंधू मृत झाले व यक्षाच्या प्रश्नांची उत्तरे दिल्यानंतर त्याने चार भावांपैकी एकास जिवंत करतो तर "सांग कुणास करू?" असे विचारले. तेव्हा धर्मराज म्हणाले, "यक्षराज, कुंतीचा पुत्र मी जिवंत आहे. माद्रीचा वंशही राहिला पाहिजे. तेव्हा माद्रीपुत्रासच जीवदान द्या." तेव्हा यक्षाने यमधर्म हे आपले रूप प्रकट केले व संतुष्ट मनाने चारी भाऊ उठविले.

असे फलाशारहित केलेले कर्म मोक्ष मिळवून देते.

देव पुढे सांगू लागले, "स्वाध्याय याचा अर्थ अभ्यास. श्रुतींनी प्रतिपादन केलेला ईश्वर आपल्याला साक्षात् भेटावा म्हणून केलेला श्रुतींचा निरंतर अभ्यास साधकाने केला पाहिजे. चेंडू पुन्हा हातात यावा म्हणून

भूमीवर जोरात आपटावा, शेतातून भरपूर पीक यावे म्हणून बी पेरावे, आपणच ठेवलेली वस्तू आपल्याला दिसावी म्हणून दिव्याचा आधार घ्यावा, शाखेला फळे लागावी म्हणून मुळास पाणी घालावे किंवा आपले मुख आपल्याला स्पष्ट दिसावे म्हणून आरसा पुन्हा पुन्हा प्रेमाने पुसून स्वच्छ करावा तसा ईश्वर साक्षात्काराचा हेतू मनात धरून निरंतर अभ्यास करावयास हवा. आत्मतत्वासारखी पवित्र वस्तू हाती यावी म्हणून ब्राम्हणांनी ब्रम्हसूत्रे घोकावी, इतरानी स्तोत्रे म्हणावी, नामस्मरण करावे. अधिकारानुरूप साधने वेगळी असली तरी साध्य एकच आणि अभ्यास सर्वानाच अहोरात्र. तो अभ्यासही असा की त्या अभ्यासाचे रहस्य ओळखून केला गेला पाहिजे."

असे सांगतात की, एक विद्वान ब्राह्मण एका धर्मशील राजाच्या राजवाड्यात गेला आणि म्हणाला, "राजन्, आपली इच्छा असली तर मी आपल्याला श्रीमत् भागवत ऐकवतो."

राजाने त्याच्या कडे पाहिले व म्हटले, "भगवन्, आपण आणखी काही दिवस भागवताचा अभ्यास करा आणि मग या." ब्राम्हणाला फार वाईट वाटले. पण काय करणार? पुन्हा घरी जाऊन त्याने खूप पाठांतर केले. सर्व भागवत कंठस्थ केले व पुन्हा गेला.

राजाची भेट झाली. राजा म्हणाला, "आपण आणखी थोडे दिवस भागवताचा अभ्यास करा व मग या." तीनदा हेच उत्तर ब्राह्मणास मिळाल्यावर तो निराश झाला. भागवत पाठ मात्र त्याने सोडला नाही. एक दिवस वैराग्य बोधपर श्लोकाकडे त्याचे लक्ष गेले आणि पश्चाताप होऊन तो मनाशी म्हणू लागला, "छे, छे, काय केले हे मी! श्रीकृष्णरूप दयामय भागवत माझ्या समोर असताना त्याला शरण न जाता त्या सामान्य नरेशापुढे लोभाने अंध होऊन चार चार वेळा कशाला उभा राहिलो?" आता ब्राह्मणाचा श्रीमद्भागवत पाठ अत्यंत तन्मयतेने होऊ लागला.

पुष्कळ दिवसात ब्राह्मण आला नाही म्हणून राजाने त्याला बोलावण्यासाठी दूत पाठवला. आता जाण्याचे कामच उरले नाही म्हणून ब्राह्मण गेलाच नाही. मग मात्र राजा स्वतः त्याच्या झोपडीत आला आणि नम्रतापूर्वक अभिवादन करून म्हणाला, "ब्रह्मन् मला क्षमा करा. आता आपले भागवत अध्ययन पूर्ण झाले. आता आपण पाठ करा. मी आपल्या पायाशी बसून आपल्या श्रीमुखातून श्रीमद्भागवत आनंदाने ऐकतो."

तेव्हा अभ्यास तर हवाच पण तो अभ्यास अशा परिणामाने युक्त झाला पाहिजे, तरच साधकाला अभ्यासाचे रहस्य कळले असे म्हणता येईल. अभ्यासाने वैराग्य जितके बाणेल तितके ज्ञान स्थिर होत जाईल असा भगवंताचा सिद्धांत आहे.

देव म्हणाले, "पार्था, अशा अभ्यासास स्वाध्याय म्हणावयाचे. आता तप शब्दाचा अर्थ सांगतो. वनस्पती स्वतः फळते आणि सुकते, धूप अग्निप्रवेश करतो, सुवास देतो आणि नाहीसा होतो. सोने शुद्ध करताना हीण जळून गेल्यामुळे सोन्याचे वजन कमी होते पण सोने शुद्ध होते. त्याप्रमाणे आत्मानुभवासाठी, त्याच्या विकासासाठी प्राण, इंद्रिये, शरीर यांची आटणी करणे म्हणजे तप. आता ही आटणी करता करता साधकाची अवस्था राजहंसासारखी होते. राजहंसाने दूधपाण्यात चोच घातली की तो लगेच दूध वेगळे व पाणी वेगळे

करतो. त्याप्रमाणे तपाने प्रखर झालेली साधकाची बुद्धि देह व जीव यांच्या मिश्रणाकडे पाहते आणि देहापासून आत्मा तात्काळ वेगळा करते. आता ही विवेकबुद्धि तो साधक अंतःकरणात सतत जागी ठेवतो. मग अशा स्थितीत देह व आत्मा त्या बुद्धिच्या जोरावर वेगवेगळा पहाता आला की बुद्धि आत्मदर्शनात जास्त जास्त स्थिर होते आणि बुद्धिच्या विस्ताराचा संकोच होतो. ती आता अनेक शास्त्रे पहात फिरत नाही. आत्मानुभूति तिच्या हातात आल्यावर तिचे हिंडणे, फिरणे, शोधणे संपते. जागृति आली की त्या जागेपणात स्वप्न बुडून जाते. त्याप्रमाणे देहपण आत्मचिंतनात बुडून जातो. हा तप शब्दाचा अर्थ आहे. मग अशा तपासाठी रानावनात जाण्याचीही जरूरी नाही. कारण आत्मानात्मविचार साधकाला कुठेही करता येतो. रानावनात जाता येत नाही. म्हणून तप करत नाही असे म्हणणे म्हणजे 'आम्हां गरिबाला कुठले गोत्र?' म्हणण्यासारखे आहे. एका स्वयंपाकीणबाईनी हे उत्तर मनापासून दिले होते.

देव पुढे आर्जवाचे रूप स्पष्ट करीत आहेत. मातेचे दूध जसे सर्व बाळांना हितकारक, चैतन्य जसे भिन्न भिन्न प्राण्यामध्ये एकच, त्याप्रमाणे सर्व प्राणिमात्राशी वागण्याचा जो सर्रास भलेपणा त्याला आर्जव असे म्हणावयाचे. एकाशी एका प्रकारे दुसऱ्याशी दुसऱ्या प्रकारे असा त्याच्या वागण्याचा प्रकार नसतो.

जर्मनीच्या एका सेनाधिकाऱ्याने युद्धाच्यावेळी हुकूम फर्माविला की, "घोड्यांसाठी गवत गोळा करा."

सैनिकांनी गावातल्या एका शेतकऱ्याला पकडले आणि सांगितले, "ह्या गावात कुणाच्या शेतात उत्तम गवत आहे ते दाखव." शेतकरी निरूपायाने सैनिकाबरोबर निघाला. तो शेतकरी सांगे, "पुढे चला. यापेक्षा उत्तम गवत दाखवतो." हळूहळू गावाच्या हद्दीपर्यंत त्या शेतकऱ्याने नेले आणि सांगितले, "कापा ह्या शेतातले गवत."

सैनिक अधिकारी रागावून म्हणाला, "उगीच इतक्या लांब आम्हाला हेलपाटा पाडलास. त्यापेक्षा जवळच्या शेतातले गवत कितीतरी चांगले होते."

शेतकरी म्हणाला, "मला माहीत होते की आपण गवताची किंमत देणार नाही. मी दुसऱ्याचे शेत दाखवून त्याचे नुकसान कसे करू? हे माझे शेत आहे आणि माझ्या दृष्टिने हे गवत सर्वांच्या गवतापेक्षा चांगले आहे हे आपणही मान्य करालच."

अधिकारी लाजला. त्याने त्या गवताचा हिशोब पूर्ण चुकता केला आणि त्या शेतकऱ्याच्या सौजन्याचा गौरव केला. खरे आर्जव हे असे असते.

दुसरा प्रसंग आठवतो तो Gone with the wind ह्या कादंबरीतील. ही कादंबरी मार्गारेट मिचेल या बाईंनी लिहिली. अमेरिकेतील अंतर्गत यादवीच्या पार्श्वभूमीवर ह्या कादंबरीची रचना आहे. दक्षिणेकडील व उत्तरेकडील राज्ये गुलामगिरीच्या प्रश्नावरून लढत असताना. एक प्रसंग असा रंगवला आहे की दक्षिणेकडील राज्यातील बायका युद्धातील सैनिकासाठी कपडे, बँडेज करण्यासाठी जमल्या आहेत. दोन्ही बाजूंचे सैनिक युद्धात कामी येऊन आजूबाजूस पडत आहेत. ह्या बायकांच्या सभेमध्ये मेलिनी नावाची एक अत्यंत सोज्वळ,

प्रेमळ बाई आहे. विषय चालला आहे उत्तरेकडील योद्ध्याच्या थडग्याजवळ काय करायचे याचा. एक बाई तावातावाने म्हणाल्या, “काय? त्या यॅन्कीच्या थडग्यावरचे तण आम्ही काढायचे? अशक्य आहे. मला शक्य असते तर ती सगळी थडगी उकरून त्या यॅन्कीची प्रेते उकिरड्यावर फेकून दिली असती.”

मेलिनी हळूच म्हणाली, “माझे जरा ऐकून घ्याल का? मी तर म्हणते की, आपण त्याही थडग्याभोवती फुलबाग करूया. मी जेव्हा चार्लीच्या थडग्यावर फुले वहायला जाते तेव्हा शेजारच्या त्या यॅन्कीच्या च्या थडग्यावरही चार फुले वाहून येते. ते थडगे किती एकाकी दिसते बिचारे!” हे ऐकल्याबरोबर सगळीकडे कल्लोळ उडाला. सगळ्या जणी एकदम बोलू लागल्या. “यॅन्कीच्या थडग्यावर फुले! मेलिनी तुला हे करवते तरी कसे?”

मेलिनीने खुर्चीचा आधार घेतला आणि ती म्हणाली, “जरा ऐकून घ्या. देवदयेने चार्लीशिवाय ह्या युद्धात माझे कोणी मारले गेले नाही. चार्ली कुठे पडला हेही मला नशिबाने माहीत आहे पण सांगा आपल्यापैकी कितीतरी जणींचे पती, पुत्र, बंधू, पिता कुठे आहेत हे माहितही नाही.

खोलीत शांतता पसरली. कितीतरी जणींच्या डोळ्यात अश्रू आले.

मेलिनी पुढे म्हणाली, “यॅन्कीच्या प्रदेशात कुठे तरी त्यांची थडगी असतील. कुणीतरी चांगल्या बायका उत्तरेस असतीलच की. त्यांनी जर दक्षिणेकडील योद्ध्याच्या थडग्यावरचे तण काढले, फुले वाहिली तर आपल्याला केवढा आधार वाटेल! चार्लीचे थडगे उत्तरेत असते आणि एखाद्या बाईने त्याच्यावर चार फुले वहाण्याचे सौजन्य दाखवले तर मला काय वाटेल? तुम्ही जर सर्वजणी हा विचार करणार नसाल तर दोन्ही क्लबाचा माझा राजीनामा! मी मात्र दक्षिण, उत्तर, शत्रु, आप्त असा विचार न करता दक्षिणेकडील योध्दयांच्या थडग्यावरचे तण तर काढीनच पण फुलेही वाहत राहीन. मग तुम्ही त्याला काही म्हणा.” आणि मग मात्र तिच्याने पुढे बोलवेना, हुंदके आवरेनात.

दोन्ही क्लबानी तिची सूचना मान्य केली आणि तिच्यावर कौतुकाचा वर्षाव केला असे हे आर्जव.

देव म्हणाले, “जगाला सुख व्हावे म्हणून शरीर, वाणी, मन ह्याना राबवणे याचे नाव अहिंसा.”

अर्जुना, सत्य भाषण ही दैवी संपत्ती आहे. पाण्याचे भेदन करून कमलकलिका वर येते म्हणून ती तीक्ष्ण व अत्यंत सुकुमार म्हणून कोमल म्हणावयाचे. चंद्राचे तेजच असते पण ते शीतल असते. एखादे औषध असेही असते की ते घेतल्याबरोबर रोग बरा होतो आणि जिभेला कडूही लागत नाही. पाणी डोंगराचा कडा फोडते पण डोळ्यात घातले तर बुबुळास टोचतसुद्धा नाही. तसे भाषण असावे. शंका दूर करण्याच्या कामी लोखंडाच्या कांबीसारखे तीक्ष्ण पण ऐकायला इतके गोड की प्रत्यक्ष मधुरता पायाखाली घालते आहे. ते बोलणे सहज ऐकले तर कानांना मुखे निघतात आणि ते ब्रह्माचाही उलगडा करून देते. फार काय सांगू ते भाषण गोड असले तरी कुणाला फसवू मात्र शकत नाही. फसविण्याचा हेतूच नसतो. पारध्याचे गाणे कानाला गोड लागते खरे पण त्याचे खरे स्वरूप पाहिले तर हरिण पकडण्यासाठी टाकलेला तो एक डाव असतो. अशा ह्या गोडपणाला आग

लागो! काय त्याचा उपयोग आहे? तो गोडपणा उलट घातकच असतो. जे भाषण कानाने ऐकले तर गोड पण अर्थाकडे नजर टाकली की काळजास भिडणारे असते ते शब्द म्हणजे सुंदर रूप धारण केलेली लावसटच असते.

कधी कधी आईसुद्धा रागाने मुलाला टाकून बोलते. पण त्यात मुलाचे अकल्याण होऊ नये हा हेतू असतो. कडक शिस्त लावणारी तीच आई लाड करताना एखाद्या फुलाहून मृदु होते. त्याप्रमाणे साधकाचे बोलणे ऐकायला गोड, परिणामी हितकारक व ऐकणाऱ्याच्या मनात राग द्वेष इत्यादि विकार उत्पन्न न करणारे असावे. अशा बोलण्यास अर्जुना, मी सत्य भाषण म्हणतो आणि दैवी संपत्तीपैकी हा गुण साधकाजवळ असला पाहिजे.

अर्जुना, तसेच त्याच्याजवळ अक्रोधत्व पण असले पाहिजे. दगडावर पाणी घातले तरी अंकुर फुटत नाही. कांजी किती घुसळली तरी लोणी येत नाही. सापाची कात पायाने ढकलली तरी फडा काढत नाही. वसंतऋतु आला म्हणून आकाशाला फुले लागत नाहीत. रंभा, उर्वशी समोर आल्या तरी शुक्राच्या मनात काम विकार येत नाही. भस्मामध्ये किती तूप घातले तरी ज्वाला येत नाही. लहान मुलाला देखील राग येईल असे अपशब्द उच्चारले किंवा अशीच अनेक निमित्ते झाली तरी गतायुषी मनुष्य जसा प्रत्यक्ष ब्रह्मदेवाच्या सुद्धा पाया पडले तरी उठत नाही. त्याप्रमाणे त्या साधकाच्या मनात क्रोधाची लाट उठत नाही. ह्या अशा स्थितीस अक्रोधत्व म्हणावे."

एकदा एक संत रस्त्याने जात असता समोरून कोळशाची टोपली घेऊन येणाऱ्या माणसाने त्याच्या अंगावर ती सगळी टोपली पालथी केली. संतांनी अंगरखा झाडत हात जोडले. बरोबर मित्र होता. तो रागावून म्हणाला, "काय हा तुमचा बावळटपणा! तुमचा अंगावर त्याने कोळसे ओतले आणि तुम्ही त्यालाच हात जोडता?" संत हंसून म्हणाले, "भाई, मी देवाला हात जोडले. त्याची केव्हढी कृपा की टोपलीत निखारे नव्हते. नुसते कोळसेच होते. देवाने निखारा ओतला असता तरी बरोबर झाले असते. पण देवाची दया की कोळशावरच भागले!" असे हे अक्रोधत्व संतांनी पूर्णतया आत्मसात केलेले असते.

देव आता यज्ञ कशाला म्हणावयाचे हे सांगत आहेत. ते म्हणाले, पार्था, साधकांनी देहावरची अहंता सोडून दिलेली असते व त्यामुळे आपोआप अशेष संसाराचाच त्याग होतो. ते अत्यंत बुद्धिमान असल्यामुळे अनर्थाचे मूळ कुठे आहे ते शोधून काढून ते मुळावरच घाव घालतात व अनर्थाचा नाश करतात. मातीचा त्याग केला की घटाचा त्याग आपोआपच होतो. बीजाचा त्याग म्हणजेच वडाचा त्याग होतो. भिंत पडली की त्यावर रंगवलेले चित्र संपते. झोप सरली की सगळ्या विचित्र स्वप्नांचा निरास झालाच. तंतू टाकून दिला की, वस्त्र उरतच नाही. पाणीच आटले की तरंग नाहीसे होतात. पावसाळा संपला की ढगांचा मागमूसही दिसत नाही. दान करून संपत्तीच संपवली की भोगाची भीतीच गेली तसे हे घडते."

ज्याचे अवयव यज्ञरूप आहेत असा भगवान अर्जुनाला हे वेगळेच रूप दाखवत आहे. यज्ञ म्हटले की डोळ्यापुढे कुंड, मंडप, समिधा, यज्ञकर्ता हा पसारा दिसतो पण इथे देव अशा यज्ञाचे वर्णन करीत आहेत की

ज्यात साधनसामुग्री काही नाही. याजक देहाहंतेच्या समिधा वैराग्याच्या अग्नित वहात "मी ब्रह्म आहे" या मंत्राचा अखंड उच्चार करीत असतो.

अर्जुनाचे मन क्षणाक्षणास प्रबुद्ध होत होते. दैवी संपत्ती म्हणजे काय हे ऐकता ऐकता त्याच्या मनात एक वेगळा प्रकाश फाकत होता. तो देवांना विचारू लागला, "देवा, आपण ज्याला शांती म्हणाला तिचे लक्षण काय असते? मला अगदी स्पष्ट करून सांगा. ज्ञान स्थिर होण्यासाठी किती स्वच्छ भूमिका हवी हे मला आता थोडेथोडे कळते आहे. देवा, ज्ञानाच्या गोष्टी ऐकायला किती मधुर वाटतात पण ते टिकवून ठेवण्यास केवढे आणि किती प्रकारचे सामर्थ्य हवे नाही? एखाद्या सैन्यामध्ये रथ, हत्ती, घोडे, पायदळ, रथी, महारथी, अतिरथी हवेत. तरच त्याला सुसज्ज सैन्य म्हणता येते. तसेच हे आहे असे वाटते. सर्वच भूमिकांमध्ये साधन शुद्ध व निर्धारयुक्त असले पाहिजे हे मला आता कळले. आपण मला शांतीचे रूप सांगा."

देव म्हणाले, "सांगतो. नीट लक्ष दे अर्जुना, खरी शांती कधी लाभते सांगू का? जेव्हा जाणावयाच्या विषयाला म्हणजे ज्ञेयाला गिळून नंतर ज्ञाता म्हणजे जाणणारा व ज्ञान हे तीनही नाहीसे होतात तेव्हा खरी शांती सिद्ध होते. प्रलयकाळच्या पाण्याचा लोट विश्वाचा पसारा बुडवून जेव्हा आपणच आपल्या ठिकाणी घनदाट भरून जातो तेव्हा उगम, ओघ, समुद्र हा व्यवहार भेद उरतच नाही. इतकेच काय सगळे पाणी एकवटले आहे हा बोध होण्यासही कोणी उरत नाही. ज्ञेयाला मिठी दिल्याबरोबर ज्ञातेपणाचा लय झाला की ज्ञानही संपते. या अवस्थेस शांती असे म्हणावयाचे. अर्जुना, ध्यानात घे ही खरी शांती आहे."

असे मनात येते की शांतीची ही व्याख्या ज्ञानदेवांनी स्वानुभवातून केली आहे. मोत्याचे शिंपले समुद्रात खोल पाण्यात असतात. ते काढण्यासाठी पाणबुडे जेव्हा बुडी मारतात तेव्हा त्यांना अगदी समुद्रतळाशी जावे लागते. समुद्र वर अशांत असला तरी खोल तळाशी अगदी शांत असतो. लाटा वर वर येतात. पाणबुड्यास विचारले तर तो नक्कीच सांगणार की जिथे मोत्याचे शिंपले पसरलेले असतात तिथे तर पाणी निःस्तब्धच असते. त्याची इथे आठवण होते. ज्ञानदेवानी ही त्रिपुटीरहित शांती नित्यच अनुभवली होती त्यामुळे ज्ञातृज्ञेयविहीन अवस्था म्हणजे शांती अशी व्याख्या केली. इतर कुठल्याही अवस्थेत विचारांची थोडी तरी खळबळ असणार पण त्या समुद्राच्या तळाशी पूर्ण शांतीचा त्यांनी अनुभव घेतला असला पाहिजे.

देव पुढे म्हणाले, "अर्जुना, अपैशून म्हणजे दुसऱ्याचे दोष न पहाणे. एखाद्या वैद्याकडे रोगी गेला की तो आपला परका असा भेद न करता त्याच्या व्याधीकडे पूर्ण लक्ष पुरवून वैद्य त्याचा रोग बरा व्हावा म्हणून औषधयोजना करतो. त्या रोग्याच्या अंगात शक्ति यावी म्हणून काळजी करतो. चिखलात गाय रुतली आहे असे पाहिल्याबरोबर ती दुभती आहे की भाकड आहे याची पंचाईत न करता तिच्या दुःखाने एखादा दयाळू मनुष्य कासावीस होतो आणि तिला गाळातून वर काढण्याची खटपट करतो, करुणेने प्रेरित होऊन बुडत्याला वर काढणारा बुडणारा मनुष्य ब्राह्मण आहे की अंत्यज आहे हे पहात नाही. मोठ्या अरण्यात कुणी पाप्याने एखाद्या स्त्रीला वस्त्रहीन केले तर सज्जन आपल्या अंगावरचे वस्त्र तिच्या अंगावर टाकूण मगच तिच्याकडे पहातो. त्याप्रमाणे साधकाने जर दुसऱ्याच्या ठिकाणी अज्ञान, प्रमाद दोषयुक्त प्राक्तन सगळ्या बाबतीत निंद्य आचरण पाहिले तर आपल्या गुणांतून ह्या दोषाकडे पहावे. पूजा करून मग देवाचे दर्शन घ्यावे, शेतात धान्य पेरून शेत पहावे, अतिथीला आधी संतुष्ट करून मग प्रसाद घ्यावा त्याप्रमाणे आपले गुण देऊन समोरच्या माणसाचे न्यून

दूर करावे आणि तिथे सलणारी शल्ये विसरावयास लावावी. कुणाच्याही वर्मावर घाव घालू नये. करू नये त्या कर्मात कुणाला ढकलू नये. ज्यामध्ये त्या माणसाचा दोष दाखवला जातो तशा नावाने हाकही मारू नये."

धर्मराज ह्या अपैशून्याचे मूर्तिमंत उदाहरण होते. त्यानी कौरवाकडे देखील कधी दोष दृष्टीने पाहिले नाही. तसे पाहिले तर दुर्योधन हेच त्यांच्या सर्व हाल अपेष्टांचे कारण होते पण त्यांनी त्याला कधीही 'दुर्योधना' अशी हाक मारली नाही. नेहमी प्रेमाने 'सुयोधना' असेच म्हणत गेले. युद्धाच्या प्रसंगी देखील 'नरो वा कुंजरो' ह्या प्रसंगाखेरीज त्यांनी कधीही अधर्माचरण केले नाही.

मोरोपंतांच्या आर्यापैकी ज्या आर्या स्वभावदर्शनाच्या दृष्टीने अप्रतीम आहेत त्यापैकी रथाचे चाक भूमीतून वर काढण्याच्या खटपटीत कर्ण गुंतला असता जेव्हा तो अर्जुनास अशा रथहीन योद्ध्याशी लढणे अधर्माचे आहे असे सांगू लागला तेव्हा राग अनावर होऊन भगवंतानी स्वतःच उत्तरे दिली त्या आर्या आहेत, देवांनी परत प्रश्न केला की काय रे आज तुला धर्म आठवला काय? लाक्षागृह, पांचाली छळ, अभिमन्यू वध करताना काय तुम्ही धर्मानेच वागत होता?" सर्व अपराधांचा पाढा वाचून शेवटी देव म्हणाले—

**रक्षावा धर्म असा करिसी उपदेश तरि असे मान्य**
**रक्षितसू "धर्म" आम्ही आम्हाला धर्म ठाउका नान्य**

देवाने ज्या धर्माचा पक्ष अशा आवेशाने घेतला तो काटा उगीच? धर्मराज अपैशून्याची मूर्ती होते म्हणूनच. ज्ञान स्थिर होण्यास दोष दृष्टि जायला हवी असे देवांचे सांगणे आहे.

एकदा रस्त्यामध्ये एक कुत्रा मरून पडला होता. जाणारे येणारे नाकाला पदर लावून तिरस्काराने पहात निघून जात होते. एवढ्यात येशू ख्रिस्त आपल्या शिष्यासह रस्त्याने जात असताना तेथे आले. कुत्र्याकडे पाहून ते म्हणाले, "काय मोत्याच्या सरासारखे दात आहेत ह्याचे!"

देव आता उचंबळून येऊन पुढच्या गुणाचे वर्णन करीत आहेत. ते म्हणाले, "पार्था, आकाशात पूर्ण चंद्र उगवला की आपली चंद्रिका लहान थोर अशी निवड न करता सर्वांच्यावर सारखीच पसरते आणि शांत करते. त्याप्रमाणे जो कोणी व्यथित असेल त्याला शांत, आनंदित करणे, त्याची व्यथा दूर करणे याला दया म्हणावयाचे. दुःखिताचे दुःख हलके करताना हा उत्तम, तो अधम असा विचार साधकाने करू नये. उत्तम असो, अधम असो त्याचे दुःख जितके कमी करता येईल तितके कमी केले पाहिजे. अर्जुना, पाणी आपला प्राणही देते पण गवताचा जाणारा जीव वाचविते. समोरच्या माणसाचे दुःख पाहून त्याचा जीव इतका कळवळला पाहिजे की त्यासाठी सर्वस्व दिले तरी थोडेच असे वाटले पाहिजे. पाणी वहाता, वहाता समोर जर एखादा खळगा आला तर तो खळगा भरून टाकूनच पाणी पुढे जाते. त्याशिवाय पुढे जाणे त्याच्या स्वप्नातही येत नही. त्याप्रमाणे हा साधक दुःख हलके केल्याशिवाय तिथून पुढे जाऊ शकत नाही. काटा बोचतो पायाला, पण पाणी येते डोळ्याला, त्याप्रमाणे संकट दुसऱ्यावर येते पण क्लेश याच्या मनाला घरे पाडतात. पायाला थंडावा मिळाला की डोळेही शांत होतात त्याप्रमाणे साधक दुसऱ्याच्या सुखाने सुखी होतो. किंबहुना ताहानेल्या माणसासाठी

पाण्याचे जगणे तसे दुःखी माणसाचे सांत्वन करण्यासाठीच त्याचे जीवन असते. वीरश्रेष्ठा, असा पुरुष मूर्तिमंत दयाच आहे. ती दया त्याच्या अंतःकरणात उत्पन्न झाली की मी त्याच क्षणी त्याचा ऋणी होतो.

अर्जुना, तो अशी दया करतो पण ती दया करण्यामागे त्याच्या मनात कुठल्याही लाभाची अपेक्षा नसते. किंबहुना असे म्हणावे की कशाचाही लोभ, लोलुपता, नाही हा त्याचा स्वभावच असतो. सूर्यविकासी कमळ जीवाभावाने त्या सूर्याच्या दिशेने आपले मुख वळवत रहाते, पण सूर्य त्या कमळातील सुगंधास शिवतो तरी काय? वसंताचे आगमन झाले की वनश्रीच्या अक्षौहिणी फुलतात पण तो वसंत त्या वनश्रीचा आस्वाद न घेताच निघून जातो ना? महासिध्दी घेऊन प्रत्यक्ष लक्ष्मी जरी विष्णूजवळ आली तरी तिच्या लाभाने काय तो भगवंत स्वतःला मोठेपणा आला असे मानतो काय? त्याप्रमाणे इहलोकीचे किंवा स्वर्गाचे भोग इच्छेचे पाईक झाले तरीही ते भोग भोगावे हे त्या साधकाच्या मनाला रुचत नाही. कौतुकानेसुध्दा त्याच्या जिवाची विषयभोगाकडे वृत्ति जात नाही. ती अभिलाषाच त्याच्या मनात उत्पन्न होत नाही. अलोलुपत्व दशा ही अशी असते हे जाणून घे अर्जुना.

विषयाची इच्छा नाहीशी झाली की अर्जुना, ते मन अगदी मृदु होते. आता या मार्दवाची तुला कल्पना यावी म्हणून सांगतो. मधमाशांना मोहळ, जळचरांना पाणी आणि पाखरांना जसे आकाश सुखकारक आणि वावरण्यास मोकळे वाटते तसे त्याचे मन सर्वांना मोकळे व मृदु असते. आई मुलाकडे ज्या प्रेमभरल्या नजरेने पहाते त्याप्रमाणे त्याची नजर जगाकडे पहाताना प्रेमपूर्ण असते. डोळ्यांना प्रिय वस्तूंची भेट सुखकर असते आणि कूर्मी आपल्या पिलांकडे मृदु नजरेने पहाते त्याप्रमाणे त्यांची नजर जगाकडे पहाताना जगाला सुखकारक होते. प्राणिमात्राशी त्याचे अशेष वागणे मृदु असते. कापूर स्पर्शाला अतिमृदु, तोंडात टाकला तर स्वादिष्ट आणि वासास मधुर व अंगाने अगदी निर्मळ असतो. साधक त्या कापरासारखा सर्वार्थाने असतो. पण कापूर जास्त घेतला तर अपायकारक होतो. या साधकाचा सहवास जितका घ्यावा तेवढा सुखदायक होतो. आकाश आपल्या पोटात इतर चार महाभूतांना सहज सामावून घेते. इतके विशाल असते तर लहानशा परमाणूतही सुखाने नांदण्याइतके सूक्ष्मही असते. जसे विश्व असेल तसे ते होते. तसा तो साधक जगाच्या जीवेप्राणे जगतो. मी या गुणास मार्दव असे म्हणतो.

अर्जुना ऱ्ही याचा अर्थ लज्जा, ह्या साधकाच्या मनात एक खंत, एक लज्जा सतत जागी असते. देहपणाने नावारूपाला येणे हे त्याला फार लाजीरवाणे वाटते. राजाचा पराभव व्हावा, मानी माणसाला हीन दशा यावी, चांडाळ मंदिरापाशी अवचित चुकून संन्यासी जावा, महासतीला वैधव्यसूचक शब्दांनी संबोधावे, स्वरूपवानाच्या अंगावर कुष्टरोग उमटावा, संभावितावर आळ यावा, म्हणजे जशी लाज वाटू लागते तशी लाज त्याला साडेतीन हाताचे शरीर होऊन शरीर म्हणून प्राणहीन अवस्थेत जगावे आणि वारंवार जन्मास येऊन मरावे याची वाटते. गर्भातील त्या मेदमुशीत रक्त, मूत्र, वीर्य यांचा ओतीव पुतळा व्हावे हे त्याला लाजिरवाणे वाटते. त्या लाजेने देह धरणे हे त्याला प्राणसंकट वाटते. ही अवकळा मनात घोळत असल्याने त्याला शरिराचा कंटाळा येतो. अर्जुना, शरिराशी तादात्म्य करून रहाण्याची लाज केवळ निर्मळ साधकासच असते. इतर निर्लज्ज पुरुषांस ते तादात्म्यच गोड वाटत असते.

आता एकदा शरिराचा कंटाळा आला की जीव त्यातून सुटण्याची धडपड करू लागतो. कळसूत्री बाहुली नाचविण्याची दोरी तुटली की त्या बाहुलीच्या हालचाली संपतात. त्याप्रमाणे प्राण्याच्या जयाने कर्मेंद्रियांचे व्यापार बंद पडतात. सूर्य मावळला की किरणांचा विस्तार संपतो त्याप्रमाणे मनोदय केला की बुद्धि आणि इंद्रियाचे व्यापार थांबतात. साधक हे ध्यानात घेतो आणि प्राण व मन यांचे नियमन करून दहाही इंद्रिये हतबल करून सोडतो आणि या गुणास अचापल्य असे म्हटले जाते.

मरणासारखे संकट जरी समोर आले असले तरी सती जाणारी स्त्री त्यानंतर होणाऱ्या पतीच्या भेटीवर दृष्टि ठेवते आणि हे मरणाचे संकट नव्हे असे मानते, निर्भय मनाने अग्नित प्रवेश करते त्याप्रमाणे साधकाचे लक्ष परमेश्वराकडे सहज धावते. त्याला मी अध्यात्मिक तेज असे म्हणतो. साधक आत्मनाथाच्या चिंतनात विषयविषाची बाधा नाहीशी करून शून्याच्या काटेरी वाटेने धावत असतो. विधिची भीड पडत नाही, निषेध त्याच्या आड येत नाहीत. महासिध्दिचे त्याला कौतुक वाटत नाही. केवळ ईश्वरप्राप्तीच्या ध्यास असतो आणि त्याला तेज असे म्हणावे.

अर्जुना, आपण सर्व सहन करतो ह्या विचाराने येणाऱ्या मोठेपणाचा गर्व न होणे याला क्षमा म्हणावयाचे. देह अंगावर किती केस वागवतो. पण आपण इतके केस वागवतो असा गर्व देहाला होत नाही. या गुणास क्षमा म्हणावयाचे.

आता धृति म्हणजे काय हे सांगतो. विषयसेवनाची हाव हद्दीबाहेर वाढली, प्रारब्धयोगाने रोग खवळून उठले, प्रिय वस्तुचा वियोग किंवा अप्रिय वस्तुंचा योग घडला, किंवा ह्या सगळ्यांचाच एकदम पूर येऊन अंगावर धडकला तरी समुद्राचे आचमन करणाऱ्या अगस्तीसारखा धैर्याने उभा राहून साधक तोंड देतो. आकाशात जोराने धुरांचा लोट उठला तर त्या लोटाला वारा एका झुळुकेसरशी गिळून टाकतो. त्याप्रमाणे अधिभूत म्हणजे प्राण्यांकडून होणारे, अधिदैविक म्हणजे देवाकडून होणारे आणि अध्यात्मिक म्हणजे आत्मविषयक असे तीन प्रकारचे ताप जरी उध्दवले तरी त्याचे धैर्य ते तीन्ही गिळून टाकते. ईश्वरप्राप्तीसाठी प्रयत्न करीत असताना ज्ञान किंवा योग या मार्गांनी जात असता येणाऱ्या संकटाशी लढाई करून त्यावर मात करण्याएवढे धैर्य त्याच्या ठिकाणी असते. चित्ताची गडबड उडून जाण्याची वेळ येईल त्यावेळी ते वर उचलून त्याला बळकट करण्याच्या ह्या गुणास धृति असे म्हटले जाते. अर्जुना, साधकाच्या अंगी अंतर्बाह्य शुचिता असली पाहिजे. शुध्द सोन्याचा कलश गंगेच्या पाण्याने भरून ठेवावा त्याप्रमाणे तो शुध्द असतो. शरिराने निष्काम, शुध्दाचार आणि मनात सतत जागृत असा विवेक असल्याने आतबाहेर तो शुचित्वाने घडविल्यासारखा असतो आणि त्यालाच खरे शुचित्व म्हणावयाचे. गंगेचे पाणी जगाचा ताप आणि पाप फेडीत तीरावरचे वृक्ष पोशीत समुद्राला जाऊन मिळते, सूर्य जगाचे आंधळेपण घालवीत आणि लक्ष्मीचे निवासस्थान असलेली कमळे फुलवीत प्रदक्षिणेला निघतो. त्याप्रमाणे बांधलेले जीव मुक्त करीत, बुडत असणारे जीव वर काढीत, आर्तांची दुःखे नाहीशी करीत किंबहुना अहोरात्र दुसऱ्याचे सुख आणि उन्नति साधीत तो आत्महितात प्रवेश करतो. आपल्या कामासाठी प्राणिमात्राच्या अहिताचा संकल्प करून आपल्या अध्यात्मिक जीवनात आडकाठी उत्पन्न करणे हे तो कधीही करीत नाही. अर्जुना, अशा गुणाला अद्रोहत्व असे नाव आहे. किरीटी, तुला हातात घेऊन न्याहाळता येईल अशा स्पष्टपणाने मी तुला गुणांचे वर्णन करून सांगतो आहे.

अनुक्रमणिका

अर्जुना, गंगा शंकराच्या माथ्यावर उतरल्याबरोबर संकोचाने त्याच्या जटेमध्ये गुप्त झाली त्याप्रमाणे साधकास कुठल्याही प्रकारचा मोठेपणा मिळाला की तो लज्जित होतो. त्या गुणाला अमानित्व असे म्हणतात. मागे मी त्याचे वर्णन केले आहेच. वरचेवर आणखी काय सांगू?

ह्या सव्वीस गुणांच्या रूपाने ब्रह्मसंपदा वास्तव्य करीत असते. हे गुण म्हणजे मोक्षरूपी सार्वभौम राजाने इनाम दिलेल्या जमिनीच आहेत. ही दैवी संपत्तिरूपी गंगा विरक्त पुरुषरूपी सगराच्या दैवाने प्राप्त झाली आहे. गुणरूप तीर्थानी ती नित्य नवी भरलेली असते. ही गुणकुसुमांची माळा हातात घेऊन मुक्तिरूपी बाळा वैराग्याने निरपेक्ष झालेल्या पुरुषाचा गळा शोधत येते. सव्वीस गुणरूपी ज्योतींनी उजळलेली आरती घेऊन गीता आपला पती जो आत्मा त्याला ओवाळण्यासाठीच जणू काय आली आहे. गीतारूपी समुद्रातील हा गुणरूपी शिंपला आहे. त्यातून ही निर्मळ मोत्ये निघाली आहेत. फार काय वर्णन करू? आपोआप स्पष्ट होईल अशा प्रकारे दैवी संपत्तिरूप गुणराशींचे वर्णन केले आहे. देव म्हणाले, "आतापर्यंत मोठ्या आनंदाने मी तुला दैवी संपत्ती सांगितली. आता मात्र मनाला क्लेश होत आहेत. ही आसुरी संपत्ती म्हणजे दुःखाची चिवट वेली आहे. दोषकाट्यांनी ती भरलेली आहे. तरी पण मी माझ्या निरूपणात ती घालतो आहे. ती आसुरी संपत्ती त्याज्य आहे व त्याज्य काय ते कळावे म्हणूनच घालतो आहे, ह्या निरुपयोगी उपद्रवी संपत्तीचे वर्णन करतो आहे. पार्था, नीट ऐकून ठेव. काय काय टाकायला हवे ते सुध्दा साधकाला पूर्णतया माहीत पाहिजे.

नरकातील दुःख वाढविण्याकरिता भयंकर दोषांनी जो मेळ केला आहे त्याला आसुरी संपत्ती म्हणायचे. सर्व विषे एकत्र झाली म्हणजे त्याला काळकूट असे नाव आहे. त्याप्रमाणे दोषांच्या लगडीला आसुरी संपत्ती असे नाव आहे.

वीरा, आसुरी संपत्तीपैकी ज्याच्या मोठेपणाचा डांगोरा सर्वत्र आहे त्याचे नाव दंभ असे आहे. आपली आई हे तीर्थ खरे पण तिचीच लोकांत विटंबना केली तर ते तीर्थ असून मनुष्याच्या पतनास कारणीभूत होते. गुरूंनी दिलेली विद्या चव्हाट्यावर उघड केली तर मुळात विद्या इष्ट देणारी असली तरी तिचा असा अपमान झाला की तीच अनिष्टकारक होते. महापुरात बुडत असताना पैलतीरावर सुखरूप नेऊन पोचवणारी नाव जर डोक्यावर घेतली तर बुडवणार नाही काय? जीवित रक्षण करणारे अन्न वाजवीपेक्षा जास्त खाल्ले तर पंडुसुता, तेच अन्न विष होऊन मरणास कारणीभूत होते ना? तसा आपल्या दृष्ट आणि अदृष्ट या दोन्हीचा सखा असणारा धर्म जर चव्हाट्यावर आणून आपण धर्माचरण कसे केले याचा विस्तार आरंभला तर मुळात तारक असणारा तो सखा या कृत्यामुळे निर्माण झालेल्या दोषामुळे मारक होतो. अशा रितीने धर्माचरणाचा मिरवलेला मोठेपणा म्हणजे दंभ हे समजून घे.

मूर्खाच्या जिभेवर चार अक्षरांचा शिंतोडा पडला की ब्रह्मदेवाच्या सभेला तो तुच्छ मानू लागतो. तबेला ठेवणाऱ्या लोकांच्या तबेल्यातील घोडा भाड्याने देण्यासाठी समजून बाहेर काढला की आपल्यापेक्षा ऐरावतही कमी योग्यतेचा आहे असे मानतो. काट्यावर पसरलेला सरडा स्वर्ग अगदी ठेंगणा, आपल्या आटोक्यात आहे असे समजतो. गवत पेटले की ज्वाला थेट आकाशाला भिडवतात. डबक्यातल्या पाण्याच्या जोरावर त्या डबक्याला मासा समुद्राला उथळ समजतो. तसा स्त्रिया, धन यामुळे तो माजतो. विद्या, स्तुति यानी मत्त होतो. एक दिवस भरपूर परान्न मिळाल्याबरोबर दरिद्री मनुष्य उन्मत होतो. थोड्या लाभाने ह्या माणसाची तशी अवस्था

होते. ढगाची सावली किती चांगली आहे. आता घराची काय जरूरी आहे असे म्हणून घर पाडून टाकणारा एखादा मूर्ख असतोच. तो दुर्दैवीच म्हणायचा. दुसरा एखादा मृगजळाच्या पाण्याच्या साठ्याने फसून जाऊन आपल्या हाती असलेले पाण्याचे तळे फोडून टाकतो तशी त्याची स्थिती असते. किंबहुना संपत्तीच्या योगाने उन्मत्त होण्यासच दर्प म्हणावयाचे. याबद्दल काही वेगळे बोलावयासच नको.

आता दंभ, दर्प यासारखाच या आसुरी संपत्तीपैकी साधकाचा बलिष्ठ शत्रू आहे अभिमान. “जगाच्या विश्वासाचे ठिकाण वेद आहे, ईश्वराविषयी सर्वांचा पूज्यभाव आहे. जगात सर्वात तेजरूपी सूर्यच आहे, सार्वभौम राजाची गादी हे महत्त्वाकांक्षेचे सर्वोच्च ठिकाण आहे, न मरणे हे जगाला आवडते ह्या सगळ्या गोष्टी जशा निर्विवाद आहेत तसेच वेद व ईश्वर यांचे मोठेपण वादातीत आहे.” असे जर कोणी आनंदाने वर्णन करू लागले तर त्याला मत्सर वाटतो. आपल्यापेक्षा जगात कुणी वरचढ नाही अशी त्याने आपली समजूत करून घेतलेली असते. असा अभिमानी मनुष्य, “मी ईश्वराला खाऊन टाकीन, वेदांना विष घालीन” अशा भलभलत्या वल्गना करतो आणि आपला मोठेपणा मिरविण्यात आपले बळ नाहीसे करतो. पतंगाला दिव्याची ज्योत आवडत नाही, काजव्याला सूर्याची खंती वाटते आणि टिटवी, “समुद्राला हा माझा वैरी आहे” असे म्हणते. “मी आणि माझे नाव” याच्या भुलीमध्ये ईश्वराचे नावही त्याला सहन होत नाही. वेदांना तो म्हणतो. “ही माझी सवतच आहे.” स्वतःच्या मान्यतेचा मोठा ताठा त्या माणसाला असतो. अभिमानी पुरुष अत्यंत उन्मत्त असतो. अर्जुना रौरव नरकाला जाण्याचा अभिमान हा प्रसिध्द मार्ग आहे.

विचार केला तर असे वाटते की दंभ, दर्प आणि अभिमान ही एक तीन दोषांची साखळीच आहे. कुणाला कशाचा व कधी अभिमान होईल हे काही सांगता येत नाही. एरवी दैवी संपत्तीने युक्त असलेल्या जीवाच्या मनातही हे शत्रू कसे हळूच प्रवेश करतात हे पहाण्यासारखे आहे.”

एकदा इंद्राने एक मोठा राजवाडा बांधावयाचे ठरविले. शंभर वर्षे विश्वकर्म्यास सुटी दिली नाही. वाडाही पुरा होईना. विश्वकर्मा फार घाबरला. ब्रह्मदेवास शरण गेला. ब्रह्मदेवांनी विष्णूची प्रार्थना केली. भगवंतानी सर्व कथा ऐकून घेतली आणि एका लहान मुलाचे रूप घेतले. ते इंद्राकडे गेले आणि त्याला म्हणाले, “देवेंद्रा, मी आपल्या अद्भुत राजवाड्याची कीर्ति ऐकली. वाड्याच्या कामावर किती विश्वकर्मा आहेत आणि तो कधी पुरा होणार आहे?”

इंद्र हसून म्हणाला, “अरे, काय बोलतोस तूं? विश्वकर्मा काय एकापेक्षा जास्त आहेत?”

बहुरूपी देव म्हणाले, “अरे देवेंद्रा, एवढ्याने घाबरून गेलास? सृष्टि किती प्रकारच्या आहेत? ब्रह्मांड किती आहेत? ब्रह्मा, विष्णू, महेश किती? या ब्रह्मांडात किती इंद्र आणि किती विश्वकर्मा आहेत याचा हिशोब कोण करणार? इतक्यात एक मुंग्यांचा थवा त्याना दिसला. तो बालकरूपधारी भगवंत त्या मुंग्यांच्याकडे बोट दाखवून म्हणाला, “ह्या मुंग्या बघ. ह्या सगळ्या एक दिवस इंद्र होत्या. कर्मानुसार त्यांना ही गती मिळाली.”

एवढ्यात एक वृध्द तपस्वी तेथे आले. त्याच्या अंगावर कृष्णाजिन होते, डोक्यावर चटई होती आणि वक्षस्थलावर केसाचे एक चक्र होते. इंद्राने त्या तपस्वीची पूजा केली, सन्मान केला आणि विचारले, “महात्मा

आपण कोण? कुठे रहाता? कुठे चालला? डोक्यावर ही चटई कशाला आणि वक्षस्थलावर हे लोमचक्र कसे?"

तपस्वी म्हणाले, "ह्या लोमचक्रामुळे मला लोमश असे म्हणतात. एका इंद्राचे पतन झाले की ह्यातला एक केस पडतो. दिसते ना की यातले अधले मधले केस गळले आहेत ते माझे आयुष्य ह्या लोमचक्रातील केसाएवढे आहे. आता ह्या एवढ्याशा आयुष्यात लग्न, घर वगैरे कुठे करायचे म्हणून मी एकटाच राहिलो. या चटईमुळे ऊन, पाऊस याची बाधा होत नाही. तेव्हा फक्त भगवंताची भक्ति करीत असतो. ऐश्वर्य स्वप्नवत आहे आणि भक्ति मोक्षापेक्षाही सुखद आहे. एक सांगतो, ऐक

**दुर्लभं श्रीहरेदस्यिं भक्तिर्मुक्तेर्गरीयसी ।**
**स्वप्नवत् सर्व ऐश्वर्य सद्भक्तिव्यवधायकम् ॥**

बालक आणि लोमश तपस्वी दोघेही तिथून नाहीसे झाले आणि इंद्राला आपल्या ऐश्वर्याची किंमत कळली.

एकदा गरुडासही बलाचा अभिमान झाला आणि कृष्णपत्नीस रूपाचा! भगवंतानी गरुडास आज्ञा केली की, "यक्षराज कुबेर सरोवरातून कमल घेऊन ये." गरुडास आपल्या सामर्थ्याचा गर्व! तो क्षणात उडाला आणि गंधमादन पर्वतावर जाऊन कमल गोळा करू लागला. तिथे हनुमंताचा निवास होता. ते म्हणाले, "कोण रे तो फुले गोळा करतो आहे? कुबेरांना विचारल्याशिवाय फुलांना हात लावणारा तू कोण आहेस?"

गरुड गर्वाने म्हणाला, "मी भगवान श्रीकृष्णासाठी कमळे नेतो आहे. भगवानाच्यासाठी फुले नेण्यास मला कोणाच्या अनुमतीची जरुरी नाही." हनुमंतानी गरुडास पकडले आणि एका काखेत दाबले आणि द्वारकेच्या रोखाने उड्डाण केले. तेवढ्यात देवाचे सुदर्शन आले ते त्याने दुसऱ्या काखेत दाबले. श्रीकृष्ण घाईघाईने सभोवताली असलेल्या राण्यांना म्हणाले, "कुणीतरी चटकण सीतेचा वेष घ्या. हनुमंत येतो आहे. इथे त्याला रामचंद्र सीतेचे दर्शन झाले नाही तर तो एका क्षणात द्वारका समुद्रात बुडवील."

एकाही राणीला सीतेचे रूप घेणे जमेना. मग देवांनी राधेचे स्मरण केले. राधा सीतेच्या रूपात येऊन उभी राहिली. श्रीकृष्णांनी रामचंद्राचे रूप धारण केले. एवढ्यात हनुमंत येऊन पोचले. पहातात तर आपले दैवत उभे. त्यानी पायावर डोके ठेवले. दोन्ही हात तसेच दाबलेले होते. देवांनी विचारले, "हनुमंता, अरे काखेत काय आहे तुझ्या?" हनुमंतांनी उत्तर दिले. "स्वामी, एका काखेत आहे एक बिचारे पाखरू! आपले भजन करीत होतो. तिथे येऊन उगीच चिवचिव करून त्रास देत होते म्हणून पकडले आणि दुसऱ्या काखेत एक लहानसे खेळणे आहे. आले होते अंगावर धावून म्हणून दाबून धरले आहे. बाकी काही नाही महाराज आणि आपल्याला जेव्हा फुले हवी असतील तेव्हा नुसती माझी आठवण करा मी फुले घेऊन येईन. हे पाखरू शिवभक्त यक्षाच्या सरोवरातून फुले आणण्यास कसे समर्थ होईल?"

देव म्हणाले, "बरं बरं असू दे. आता सोडून दे बिचाऱ्या त्या पाखराला. त्याचा जीव तो केवढा? मी तुझ्यावर प्रसन्न आहे. खुशाल भजन कर."

हनुमंतांनी गरुड व सुदर्शन यांना सोडून दिले आणि गंधमाधन पर्वतावर उड्डाण केले "जय राम जय राम" असे भजन करीत!

पण ह्या हनुमंतानाही एकदा लंकादहन करून आल्यावर आपल्या शक्तिचा गर्व झाला. महेंद्राचलावर ते उतरले तर त्यांना फार तहान लागली होती. तेवढ्यात त्यांची नजर ध्यानस्थ बसलेल्या एका मुनीकडे गेली. हनुमंत त्या मुनीजवळ गेले आणि म्हणाले, "मुने, श्रीरामचंद्रजीचे सीताशोधाचे काम पूर्ण करून परत आलो आहे. फार तहान लागली आहे. थोडे पाणी द्या. नाहीतर एखादा तलाव कुठे असला तर तसे सांगा." मुनीनी तलावाकडे बोट केले. पाणी प्यायचे तर ओंजळ मोकळी हवी म्हणून मारुतीरायांनी सीतेचा चुडामणी, रामनामांकित मुद्रिका व ब्रह्मदेवाचे पत्र त्या मुनींच्यासमोर ठेवले व पाणी पिण्यासाठी ते तलावाजवळ गेले. एवढ्यात एक वानर आला आणि त्याने सगळ्या वस्तू त्या मुनींच्या कमंडलूत टाकल्या. हनुमंत पाणी पिऊन आले आणि वस्तू मागू लागले. मुनींनी कमंडलूकडे बोट केले. हनुमंत कमंडलू पहातात तो त्यात तशा हजारो मुद्रिका!

त्यांनी मुनींना घाबरून म्हटले, "मुने ह्या सर्व मुद्रिका तुम्हाला कुठे मिळाल्या? आणि मी आणलेली मुद्रिका आता मला कशी सापडणार?"

मुनी म्हणाले, "अरे जेव्हा जेव्हा रामावतार होतो तेव्हा तेव्हा सीताशोध करून हनुमंत परत येत असताना शोधमुद्रिका यात टाकतो. आता तू आणलेली मुद्रिका यातच कुठे तरी असेल."

हनुमंताचा सगळा अहंकार नष्ट झाला. हात जोडून त्याने विचारले, "मुने, असे राघव किती झाले आजपर्यंत?"

मुनी म्हणाले, "या मुद्रिका मोजल्यावर कळेल. मोजून बघ."

कुठले काय? मुद्रिकांची गणती करवेना. मुद्रिका कोणती आणली ते कळेना.

हनुमंत रामचंद्रप्रभूजवळ पोचले. त्यांनी मान खाली घालून वृतांत सांगितला आणि क्षमा मागितली.

प्रभू म्हणाले, "बाळा, तुझे कल्याण व्हावे म्हणून मीच ती रचना केली होती. बघ, ही मुद्रिका माझ्या बोटातच आहे."

असा हा अहंकाराचा भाग! थोडासाही अहंकार, दंभ, दर्प देव भक्तांच्या अंतःकरणात उरू देत नाहीत. प्रत्यक्ष द्रौपदीच्या पातिव्रत्याचा गुप्त अहंकार देवांनी तुटलेले जांभूळ पुन्हा चिकटविण्यास सांगून प्रकट केला आणि कर्णास पाहून, "ह्या पाचाप्रमाणे तो सहावा पती असता तर किती बरे झाले असते." असा विचार मनात आल्याचे तिच्या तोंडून वदविले. प्रातःस्मरणीय द्रौपदीची ही कथा मग सामान्यांचे काय विचारायवे? एक बरे

आहे, सामान्यांच्या अंगी असामान्यत्व नसल्याने अहंकार झाला तरी बेताचा होतो! सर्व भक्तांच्या अहंकाराची अशी वाट लावणारे देव पुढे सांगत आहेत, “अर्जुना, क्रोध हा आसुरी संपत्तीचा एक भाग आहे. आपल्या समोरच्या माणसाचे सुख पाहिले की क्रोधाचे विष मनोवृत्तीत चढते. तापलेल्या तेलाच्या कढईत पाण्याचा शिंतोडा उडला तर जशी तडतड होते, किंवा चंद्र पाहून जसे कोल्ह्याच्या पोटात जळते तसे ह्या क्रोधी माणसाचे होते, विश्वाचे आयुष्य ज्यामुळे प्रकाशमान होते तो सूर्य प्रातःकाळी उगवलेला पाहिला की पापी घुबडाचे डोळे जातात. जगाला जी सुखपहाट वाटते ती चोराच्या दृष्टीने मरणाहून वाईट असते. साप दूध पितो आणि विष निर्माण करतो. अगाध समुद्राचे पाणी पिऊनही वडवाग्नि कधी शांत होत नाही. विद्या, विनोद, ऐश्वर्य हे दुसऱ्याच्या ठिकाणी पाहिले की त्याचा संताप दुप्पट होतो. ह्याला क्रोध समजावयाचे.

आता अज्ञान म्हणजे काय हे स्पष्ट करतो. अर्जुना, जो अज्ञानी असतो त्याचे मनच कठीण असल्याने सगळीकडे ते काठिण्य अनुभवास येते. त्या माणसाचे मन म्हणजे सापाची कुटी, तर बोलणे निखाऱ्याची वृष्टि! डोळ्यातून तर एकसारखे बाणच सुटत आहेत असे वाटते. त्याच्या इतर सर्व क्रिया पोलादाच्या तीक्ष्ण तरवारीसारख्या दुःखदायक असतात. असा मनुष्य अधम आहे, कठीणपणाची मूर्ती आहे असे समज.

अर्जुना, अज्ञानी माणसाचे विवेचन मी तुझ्याजवळ केलेच आहे. पाप, पुण्य असा विवेक न करता त्याची सरभेसळ करून, खिचडी करून खाताना बुद्धिच्या व्यापारास चांगले, वाईट, गोड कडू कळत नाही. त्या अवस्थेस अज्ञान म्हणावयाचे. दगडाला शीत आणि उद्या यांचा निवाडा कुठे करता येतो? जात्यंधाला दिवस आणि रात्र यातला फरक कुठे कळतो? अग्नि प्रदीप्त होऊन भक्षण करण्यास उद्युक्त झाला की मग खाद्याखाद्य असे कुठे पहातो? परिसाला लोखंड आणि सोने हा भेद कुठे कळतो? ह्या मार्गाने जावे ह्या मार्गाने जाऊ नये हे वाऱ्याला कुठे समजते? हे स्वच्छ आहे हे अस्वच्छ आहे असे दिसले ते तोंडात घालणाऱ्या लहान मुलास कुठे भान असते? ह्या सर्वांना कृत्य आणि अकृत्य यांचा विवेक करण्याच्या कामात अंधत्व असते. पाप, पुण्य मिसळून खाणारा हा पुरुष असाच अविवेकी, अज्ञानी आहे. ह्या अविवेकास अज्ञान म्हणावयाचे.

अर्जुना, दंभ, दर्प, अभिमान, क्रोध, पौरुष्य आणि अज्ञान या सहा जणांची झालेली ही आसुरी संपत्ती फार बलिष्ठ आहे. भुजंगाचे अंग लहान असते पण विष जालीम असते. त्याप्रमाणे हे दोष सहाच खरे पण महाभयंकर आहेत. प्रलयाग्नि, विद्युताग्नि, वडवाग्नि हे तिघे एकत्र एका पंक्तीस आले तरी ह्या दोषांपुढे ते कमी प्रलयकारी ठरतील. ते विश्वाला खावयास निघाले तर त्यांच्या प्राणाहुतीलासुद्धा पुरणार नाही. कफ, वात, पित्त हे शरीराचे त्रिदोष एकत्र झाले तर ब्रह्मदेवाला शरण जाऊनसुद्धा मरण चुकत नाही आणि हे तर तिघांच्या दुप्पट सहाजण आहेत. ह्या सहा दोषांनी संपूर्ण आसुरी संपत्तीची उभारणी केली आहे आणि म्हणूनच आसुरी संपत्ती कमी सामर्थ्यशाली आहे असे समजू नये. मरणाराच्या अंगात सगळे दोष उद्भवतात, कुमुहूर्तावर सगळे कुयोग एकवटून येतात, शेळीचे आयुष्य संपले की सात नांग्यांची इंगळी डसावी त्याप्रमाणे ज्याचा नाशकाल येतो त्याच्या ठिकाणी हे सहाही दोष दिसू लागतात. ज्याच्यावर विश्वास ठेवला त्यानेच आपल्याला चोरांच्या तावडीत द्यावे, आधीच दमल्या भागलेल्या माणसाला महापुरात ढकलावे त्याप्रमाणे हे दोष त्या माणसाचे समूळ अकल्याण करतात. मोक्षाच्या मार्गाने जाणाऱ्यावर जर या दोषांचा शिंतोडा पडला तर “मी संसारातून निघणार नाही” असे म्हणत म्हणत तो संसारात बुडी देतो आणि एकेक पायरी उतरत उतरत शेवटी

स्थावर योनीच्या तळापर्यंत येऊन पोचतो. हे बोलणे राहू दे. त्याच्या ठिकाणी हे सहा दोष उत्पन्न होऊन एकत्र येऊन आसुरी संपत्ती वाढविली जाते.

या जगात प्रसिद्ध असलेल्या दोन प्रकारच्या संपत्ती मी तुला वेगवेगळ्या करून विस्ताराने सांगितल्या.

आता हे ध्यानात ठेवायचे की मोक्षसूर्याने उजाडलेली पहाट म्हणजे दैवी संपत्ती आणि ही जी दुसरी सांगितली ती आसुरी संपत्ती. मोहरूपी लोखंडाची जीवाला बांधणारी साखळी आहे. पण म्हणून तू मात्र भिऊ नकोस. रात्रीचा धाक सूर्याला असतो का? तू मुळीच भय बाळगू नकोस. जो ह्या सहा दोषांना थारा देतो त्यालाच धनंजया, ही आसुरी संपत्ती बंधनकारक होते. पांडवा, अरे तू तर दैवी गुणांची पूर्ण संपत्ती बरोबर घेऊन जन्माला आलेला असा भाग्यवंत आहेस. पार्था, ह्या दैवी संपत्तीचे स्वामित्व ध्यानात घेऊन तू आता कैवल्याचे सुख अनुभवावेस. तू मोक्षाचा अधिकारी आहेसच. एखाद्या सम्राटाला आपल्याजवळ असलेल्या संपत्तीचा हिशोब ठाऊक नसतो तसेच तुझे झाले आहे म्हणून मी आसुरी संपत्तीचे वर्णन करीत असताना तुझ्या चेहऱ्यावर भयाची छाया मला दिसत होती. तुला भिण्याचे मुळीच कारण नाही. हे ध्यानात धरावयाचे की कायम वसतिस्थान असणे आणि पांथस्थासारखे क्वचित येणे, जाणे, असणे यात फरक आहे. प्रकृति आहे तिथे ह्या सहाही दोषांची निसटती छाया पडायचीच. पण त्यांना विचारांच्या प्रांतातूनच हाकलून काढायचे; कृतीपर्यंत पोचू द्यायचेच नाही. दुसरी गोष्ट अशी की एखादा दुष्ट मनुष्यसुद्धा वेळ प्रसंगी उपयुक्त ठरतो तसे ह्या दोषांचे आहे. दंभ, दर्प, अभिमान हे उचित गोष्टीसंबंधी असेल की अचाट साहसाची कृत्ये करवितात. क्रोध तर हवाच. नाहीतर जीव वाटेल ते अन्याय सहन करतील. ह्या अन्यायाशी झगडताना पौरुष्य हवेच ना? भीष्म, द्रोणांना पाहून यांच्यावर हत्यार कसे चालचू असे तू करुणाबुद्धिने म्हणालास तेव्हा मीच ना तुला दोष दिला? पण अज्ञान मात्र तिळभरही असू नये. आपल्या विवेकाची धार प्रखर असली पाहिजे. पाप कोणते, पुण्य कोणते हे जीवाला कळलेच पाहिजे. तेव्हा ह्या सहापैकी तिघांना आपल्या बाजूस वळवून घ्यायचे, दोघांचा उपयोग करावयाचा आणि सर्व शक्ति एकवटून सहाव्याशी प्राणपणाने लढत रहायचे असे करायला हवे.

कारण ते असे तसे नव्हेत. ह्या दोन्ही प्रकारच्या संपत्तीने बलवान असणाऱ्या माणसांचे आचरणाचे मार्ग अनादिसिद्ध आहेत. रात्रीच्या वेळात पिशाच्च्यांचा वावर असतो. दिवसाच्या काळात मनुष्यादिकांचे चांगले व्यवहार चालतात. किरिटी, त्याप्रमाणे दैवी सृष्टिचे व आसुरी सृष्टिचे लोक आपआपल्या वागणुकीच्या पद्धतीने वागतात.

या ग्रंथाच्या मागल्या भागात ज्यावेळी ज्ञान सांगण्याचा प्रसंग आला तेव्हा दैवी संपत्तीच्या माणसांच्या क्रियेचे सविस्तर विवेचन केले आहे. इथे आसुरी सृष्टितील लोकांच्या गोष्टी विस्ताराने सांगू. अवधानाची एकाग्र दृष्टि असू दे. ही आसुरी प्रकृति एखाद्या शरिराचा आश्रय घेते आणि प्रकट होऊ लागते. वाद्याशिवाय नाद ऐकू येत नाही, फुलाशिवाय सुगंध येत नाही. त्याप्रमाणे तिने एखाद्या शरिरात प्रवेश केल्याशिवाय ती दिसत नाही. लाकडात अग्नि प्रथम गुप्त आणि लाकूड पेटले की प्रकट होतो. त्याप्रमाणे एखाद्या शरिरात आसुरी प्रकृति सापडली की अनुभवास येऊ लागते. ऊसाची वाढ झाली म्हणजेच आतल्या रसाची वाढ झाली असे समजले जाते. त्याप्रमाणे ज्या देहाचा ती स्वीकार करते तो देहाकार वाढला की तीही वाढते. अशा आसुरी संपत्तीच्या दोषांची वृद्धि ज्यांच्यामध्ये झाली आहे अशा प्राण्यांचे वर्णन करू.

कोशकीटक घर बांधण्याच्या भरात आत जाण्यायेण्यास आपण दार ठेवले आहे की नाही याचा विचारही न करता घर बांधत जातो आणि आतच कोंडून पडतो किंवा दिलेले भांडवल परत येईल की नाही याचा विचार न करता एखादा मुर्ख मनुष्य चोराला भांडवल देतो आणि बुडतो. त्याप्रमाणे त्यांचे मन पुण्याकडे प्रवृत्ति आणि पापापासून निवृत्ती या गोष्टीबद्दल आंधळे असते. जशी काही काळीकभीन्न काजळी रात्रच आहे! आसुरी प्रकृतिचे लोक हा विषयच जाणत नाहीत. शुचित्व तर त्यांच्या स्वप्नातही येत नाही. कोळसा काळेपणा एक वेळ सोडील, कावळा एकवेळ पांढरा स्वच्छ होईल, राक्षस एकवेळ मांसास विटू शकेल. पण धनंजया, या आसुरी प्राण्यांना शुचित्व कधीही कळत नाही. मद्याचे भांडे जसे कधी पवित्र होतच नाही तसे हे लोक कधीही पवित्र होतच नाहीत. शास्त्राप्रमाणे वागण्याची आशा धरतील? की वाडवडिलांची आचाराची रीत पहातील किंवा आचारधर्माचा शोध घेतील? त्यातले काही करण्याची भाषासुद्धा ते बोलत नाहीत.

शेळी वाटेल तशी चरते, वारा वाटेल तसा सैरावैरा वाहतो, अग्नि जाळू लागला की ओले सुके पहात नाही, त्याप्रमाणे त्या लोकांच्या क्रियेचा मोहरा स्वैर असतो. त्यांचे सत्याशी सदा वैरच असते. विंचवाच्या नांगीने जर गुदगुल्या होत आहेत असे मानले तरच ते खरे बोलतात असे म्हणता येईल. अपान वायू सुगंधित असला तरच त्या असुरांना सत्याची भेट हाईल. त्यांनी काही न केले तरीही ते स्वभावतःच वाईट असतात. तुला आश्चर्य वाटेल पण त्यांची बोलणी तुला सांगितली तर मग माझे म्हणणे खरे वाटेल. उंटाचा कुठलाच अवयव धड नसतो. त्याप्रमाणे ह्या असुरांचे काहीच चांगले नसते. धुराड्यातून जसे धुराचे लोट बाहेर पडत असतात, तसे त्यांच्या तोंडून भलभलते शब्द कायम येत असतात.

पार्था, हे विश्व अनादि आहे, याचा नियामक ईश्वर आहे, याच्या चावडीवर अन्याय, न्याय यांचा निवाडा वेद करीत असतात. अन्यायी ठरला तर त्याला नरकवासाची शिक्षा होते आणि न्यायी माणसाला स्वर्गसुख मिळते, अशी ही अनादि विश्वरचना आहे. हे असुर म्हणतात, “अहो, हे सगळे खोटे आहे, हा सगळा भ्रम आहे. यज्ञवेडे यज्ञात, देववेडे देवमूर्तीत आणि भगवी वस्त्रे धारण करणारे हे योगी समाधीच्या भ्रमात बुडलेले असतात.

या जगात न्याय नाही आणि अन्याय नाही. आपल्या अंगच्या बळाने जे जे वेटाळून घेता येईल ते घ्यावे आणि भोगावे हेच आहे पुण्यकर्म! दुसरे कुठले पुण्यकर्म आहे? शरिराच्या अशक्तपणाने भोग मिळवून आणताही येत नाहीत आणि भोग भोगताही येत नाहीत. अशा स्थितीत विषयसुखावाचून पिडले जाणे हेच पाप आहे. दुसरे कुठले पाप? श्रीमंताचे प्राण घेणे हे जर खरेच पाप असेल तर त्यांचे सर्वस्व आपल्या हाती येते हे पुण्यकर्मच आहे नव्हे काय? पुण्याचेच फळ नव्हे काय?

बलवानाने दुर्बलास खाऊन जर ते कर्म पाप म्हणून बाधक होत असले तर मोठे मासे लहान माशांना खात नाहीत काय? त्या पापाने कुठे त्या मोठ्या माशांचे निसंतान होते? लग्न करायचे तर म्हणे दोन्ही कुळे शोधावी, शुभ मुहूर्तावर वधूवरांचे मिलन करावे, पण प्रजा उत्पन्न करणे हा जर लग्नाचा हेतू आहे तर कुळाची आणि शुभयोगाची काय जरूरी आहे? पशुपक्षांच्या अगणित जाती आहेत, त्यांना उदंड मुलेबाळे होतात. आता त्यांची लग्ने कोणत्या विधीने आणि कोणत्या मूहुर्तावर लागतात?

अनुक्रमणिका

चोरीचे धन आले म्हणून ते कुणाला विष होते? विषयप्रेमाने व्यभिचार केला म्हणून कोण कोडी झाला आहे?

म्हणून देव मालक आहे, धर्माधर्म तो भोगायला लावतो, जो करतो त्याला परलोकी भोगावे लागते, ही बोलणी फुकटची आहेत. कुणी पाहिला आहे देव? कुणी पाहिला आहे परलोक? कर्ता तर मरून गेलेला दिसतो. मग भोग कुणाला भोगावा लागतो? सगळा भ्रम आहे. प्रत्यक्ष अनुभव येतो तो असा. स्वर्गलोकात उर्वशीच्या सहवासात इंद्राला जे सुख मिळते तेच सुख नरकातला किडा नरकात भोगत असतो, आनंदात असतो.

म्हणून स्वर्ग नाही आणि नरक नाही. पापपुण्याचा यांच्या प्राप्तिशी काहीही संबंध नाही. दोन्ही ठिकाणी कामाचाच सुखभोग आणि तोही सारखाच असतो. कामाच्या उद्देशाने स्त्री-पुरूष एकत्र आले की त्या ठिकाणी जगाचा जन्म होतो. आता ह्या कामातूनच द्वेष उत्पन्न होतो आणि तो द्वेष जगाचा नाश करतो. थोडक्यात "कामावाचून जगाला मूळच नाही." असे हे असुर बोलतात. आता हे सगळे वाईट बोलणे राहू दे. जास्त विस्तार करीत नाही. कारण त्या विस्ताराने वाचेला शीणच होतो आहे. वाचा निष्फळ होते आहे.

अर्जुना, तुला असे वाटेल की ईश्वराच्या तिरस्काराने हे अशी बडबड उगीच करतात. पण तसे नसते. ईश्वर नाहीच असा त्यांच्या मनाचा दृढ निश्चय झालेला असतो. फार काय सांगावे. उघड उघड अंगामध्ये धर्महीनतेचे पाखांड भरून त्यांनी जीवामध्ये नास्तिकपणाचे हाड रोवलेले असते आणि असे केल्यामुळे स्वर्गाबद्दल आदर किंवा नरकाबद्दल भय या वासनांचा अंकुरच जळून गेलेला असतो आणि मग अर्जुना, या शरिराच्या खोड्यात ते पडतात. ते शरीर तर अपवित्र पाण्याच्या बुडबुड्याप्रमाणे 'क्षणभंगुर' असते. त्या शरीराच्या खोड्यात पडल्यावर विषयरूपी चिखलात बुडतात. जलचरांचा नाश होण्याची वेळ आली की त्या डोहावर कोळी जमा होतात. शरीर पडण्याची वेळ आली की शरिरात रोगांचा प्रादुर्भाव होतो. जगाचे अनिष्ट होण्याची वेळ आली की धूमकेतू उगवतो त्याप्रमाणे जगाचा नाश होण्याची वेळ आली की ह्या असुरांचा जन्म होतो. अशुभ अंकुरले की जे कोंभ फुटतात ते हे असुर समजावे. ते जणू काय पापाचे किर्तीस्तंभच असतात. मागे पुढे जाळत सुटावे एवढेच ज्याला माहीत आहे. त्या अग्निसारखी त्या असुरांची वैरभावाची भलती क्रिया असते. अशा ह्या विध्वंसनाचे काम करण्याची वेळ आली की मग मात्र त्यांना जो उत्साह वाटतो त्याचा प्रकार ऐक, असे श्रीनिवास पार्थाला म्हणाले.

देव म्हणाले, "पार्था, त्याच्या हावरेपणाचा प्रकार असा असतो की, मासे पकडण्याचे जाळे जसे पाण्याने भरले जात नाही, अग्निला इंधन कधी पुरेसे होत नाही, तशी त्यांची हाव कधीच संपत नाही. काम हे त्या हावरेपणाचे प्रकट स्वरूप! त्या पहिल्या प्रतिच्या हावरेपणाचा जीवाभावाने आश्रय करून दंभ व मान यांचा समुदाय जमवतात. माजलेल्या हत्तीला दारू पाजली तर तो जसा मदाने ताठून जातो, त्याप्रमाणे म्हातारपण येऊ लागले तर तो अधिकच ताठून जातो. आग्रहाचे तर तो आश्रयस्थान. त्यात मूर्खपणा मदतीस आला की मग त्या निश्चयाची स्थिरता काय वर्णावी.

दुसऱ्या जीवास पीडा व्हावी, परक्या जीवाचा नाश व्हावा अशा कर्मात ते असुर जन्मभर वतनदार होऊन रहातात. आता अशी कर्मे आपण करतो याचा त्यांना फार अभिमान वाटू लागतो आणि ते आपली कृत्ये जगात डंका वाजवून जाहीर करतात, जगाला तुच्छ समजतात आणि हावरूपी आपले जाळे आणखी आणखी पसरत दाही दिशा व्यापून टाकतात. देवाला धर्मार्थ सोडलेली गाय जशी वाटेल तिथे तोंड खुपसून धान्य, गवत वगैरे सरसकट तोडत जाते, त्याप्रमाणे मनाला जे हवेसे वाटेल ते, ते वाटेल त्या मार्गाने मिळवीत जातात.

याच एका सामुग्रीने त्यांची कर्मप्रवृत्ती असते. ते जगण्याच्याही पलीकडची चिंता वहातात. पाताळाहून खोल आकाशापेक्षाही उंच आणि त्रिभुवन एखाद्या अणुसारखे वाटावे अशी अपार चिंता ते वहातात. नवीन संन्यास घेतलेला मनुष्य संन्यास दीक्षेबरोबर आलेल्या नियमांची सारखी घोषणा करतो. मरणातही पतिव्रता स्त्री पतीला धरून रहाते, त्याप्रमाणे ह्या आसुरांच्या मनात अमर्याद चिंता घोळत असतात.

ते आपला जीव असार विकारादिकामध्ये बुडवूनच ठेवतात. स्त्रियांनी गाइलेले ऐकावे, स्त्रीरूप डोळ्यांनी पहावे, सर्वेद्रियांनी स्त्रीला आलिंगन द्यावे आणि ज्या सुखावरून अमृत ओवाळून टाकावे असे सुख स्त्रीशिवाय दुसरीकडे नाही असा त्यांनी मनाचा निश्चय केलेला असतो. मग त्या स्त्रीभोगासाठी पाताळ, स्वर्ग आणि दाही दिशा ह्या विभागापलीकडेही धावतात.

आता याचा परिणाम असा की, आमिष समोर दिसले की विचार न करता मासा गळ गिळतो तशी त्यांची दशा विषयाच्या आशेने होते. आटोकाट प्रयत्न करून हवे ते प्राप्त होत नाही, झाले तर टिकत नाही, त्यामुळे आशेची संतती कोरडीच वाढत रहाते. आशेपासून आशा वाढवीत वाढवीत ते कोशकीडे होतात. आता जी अभिलाषा इतकी वाढलेली असते ती पुरी झाली नाही की द्वेष वाढतो, थोडक्यात या असुरांचा पुरुषार्थ काम, क्रोध व द्वेष वाढविण्यापलीकडे जात नाही. अर्जुना, दिवसा यजमानापुढे चालावे, रात्री पहारा करावा अशा कामात पहारेकऱ्यास जशी उसंत मिळत नाही तशी त्यांची स्थिती होते. आशा, काम, क्रोध, द्वेषाच्या खाईत त्यास एकसारखे लोटीत असते. काम उंचावरून ढकलून देतो, मग ते क्रोधाच्या खडकावर आपटतात. विषयावरचे प्रेम कमी न होता वाढतच जाते आणि असे धक्के चपेटे खाऊन ते कोडगे होतात. तेवढ्यानेही भागत नाही. जीवाच्या हावेप्रमाणे विषयवासनांचे समुदाय मिळवले खरे पण त्या वासना तृप्त करून घेण्यास द्रव्य हवे ना? ते द्रव्य हवे म्हणून मग ते जगावर डाके घालतात. एकाला संधी साधून मारतात. एकाचे सर्वस्व हरण करतात, एकाला मारण्यासाठी अपायांची यंत्रे उभी करतात. अर्जुना, पोट भरण्यासाठी प्राणी मारून आणावे म्हणून पारधी फासे, पोती, जाळी, कुत्री, ससाणे, चिकाटे, भाले इत्यादी साहित्य घेऊन जसे डोंगराकडे निघतात त्याप्रमाणे हे आसुरी प्रकृतिचे लोक नीच कर्म करून द्रव्य मिळवतात. पार्था, दुसऱ्याचा प्राणघात करून मिळवलेले हे द्रव्य पाहून त्याच्या मनाला इतका संतोष होतो की काय सांगू!

त्यांना आपल्या ह्या कामाची फुशारकी वाटू लागते. ते म्हणतात, “आता बहुतेक सर्वांची संपत्ती माझ्या हाती आलीच आहे. मी धन्य नव्हे काय.” जो जो ते अशी स्वतःची स्वतः स्तुती करतात तो तो त्यांच्या मनातील लुटण्याची हाव वाढू लागते लगेच म्हणतात, “आता उद्या आणखी काही लोकांचे आणू. हे जेवढे द्रव्य मिळवले त्याच्या भांडवलावर उरलेले स्थावर जंगमसुद्धा मी फायद्यात घेईन. विश्वाच्या धनाचा मी एकटाच काय तो मालक होईन” आणि असे मनात घोळवत पुढे म्हणतो, ज्या ज्या वस्तूवर माझी दृष्टि पडेल ती ती वस्तू मी

माझ्या मालकीची करीनच करीन.

आजवर मारले ते शत्रू तर थोडेच आहेत. मी आणखी संधी साधून बलिष्ठ शत्रू मारीन. सगळे माझे दास करीन, जे दास होणार नाहीत त्यांना मारीन. किंबहुना या चराचराचा मी ईश्वर होईन, मी भोगभूमीचा राजा आहे. सगळ्या सुखाचे आश्रयस्थान आहे. माझ्याशी तुलना केली तर इंद्रही व्यर्थ आहे. खोटा आहे. मी देहाने, मनाने, वाचेने जे जे करीन असे म्हणेन ते होणार कसे नाही? ज्याची आज्ञा जगास शिरसावंद्य आहे, सिध्दच आहे असा माझ्याशिवाय दुसरा कोण आहे? मी बिनजोड आहे. जोवर मी दिसलो नाही तोवरच काळ बलवान आहे. खरोखर निव्वळ सुखाची रास असेल तर तो मी आहे.

कुबेर आपला आहे थोडासा श्रीमंत, पण त्याला माझी योग्यता कुठली! लक्ष्मीपती भगवंताचे ऐश्वर्यसुद्धा माझ्या तोडीचे नाही. माझ्या कुळाची शुद्धता घ्या, जातीगोताचा मेळ घ्या, ब्रह्मदेवदेखील माझे हे वैभव पाहून उणा आहे. अहो ह्या ईश्वराचे नाव उगीचच्या उगीच लोक मिरवतात. माझ्याबरोबरीचे खरे म्हटले तर कुणी नाहीच. आता जारणमारण हे लोपले आहेत त्यांचा मी जीर्णोद्धार करीन यज्ञ करून शत्रूचा काटा काढावा अशी पद्धत घालून देईन. माझे गुणवर्णन करतील, स्तोत्रे गातील, नृत्य, नाटक यांनी माझे मनोरंजन करतील त्यांना ते मागतील ती वस्तू देईन. मादक पदार्थ खाऊन पिऊन, प्रमदांना आलिंगन देऊन मी त्रिभुवनात आनंदकार होईन." काय सांगू आणखी? आसुरी प्रकृतिने वेडेपिसे झालेले हे लोक आकाशपुष्पाव असा वास घेत रहातात.

आता या बोलण्याला शुद्धीतील बोलणे म्हणावयाचे काय? ज्वराने तापल्यावर रोगी जसा वाटेल ते बडबडतो त्याप्रमाणे अर्जुना, त्याच्या संकल्पाची ही बडबड समजावी. अज्ञानरूपी धुळीत ते सापडतात. आशेच्या वावटळीमध्ये वरवर चढतात आणि मनोरथाच्या आकाशात गरगर फिरत रहातात. आषाढातल्या अमर्याद मेघाप्रमाणे किंवा समुद्रातल्या अभंग लाटाप्रमाणे हे आसुरी लोक अखंड नवनव्या इच्छा करीत असतात मग त्या कामना अंतःकरणात वेलीच्या जाळ्या होतात. त्या कामना कधी पूर्ण होत नाहीत मग कांट्यावरून कमळे ओढावी किंवा पाषाणाच्या माथ्यावर मातीची घागर फुटून तुकडे तुकडे व्हावे तशी त्यांच्या अंतःकरणाची स्थिती होते. पण ते आशाभंगाने सावध होत नाहीत. रात्र वाढते तसा काळोख दाट होतो त्याप्रमाणे मोह अंतःकरणात दाटतो, वाढतो. मोह वाढला की विषयांना जागा मिळते तेही वाढू लागतात आणि विषय जिथे आहेत तेथे पातकांना आश्रय मिळतोच आणि पापे आपल्या बळाने पापांचे समुदाय तयार करतात. आणि जिवंतपणीच सर्व नरक चालून येतात.

सुमति अर्जुना, काय सांगू? कुमनोरथांना जे आसुर थारा देतात ते त्या नरकात रहायलाच येतात.

ह्या नरकाचे वर्णन करणे देखील दुःखदायक आहे, येथे तरवारीची पाती पाने असलेली झाडे आहेत. खैराच्या निखाऱ्याचे डोंगर आहेत. तापलेल्या तेलाचे समुद्र आहेत. इथे सर्वप्रकारच्या यातनांची पंगतच्या पंगत बसलेली असते. यमाची जाचणी नित्य नवीन असते. अशा ह्या दारुण नरक लोकात हे आसुरी संपत्तिवान येऊन पडतात. अशा शेलक्या नरकाचे भागीदार होऊन जे जन्माला येतात ते सुध्दा भ्रमात पडून यज्ञयाग करताना दिसतात. आता यज्ञयागादिक कर्माचे फळ जसे एरवी मिळावयाचे तसे मिळायला हवे पण नाटकी जसे सोंग आणतात तसे हे लोक यज्ञयाग करण्याचे नाटक करतात आणि यज्ञच निष्फळ करून टाकतात. वाईट

चालीच्या बायका प्रियकराचा आश्रय करतात, त्यालाच पती मानतात, स्वतःला पतिव्रता मानतात आणि ह्या पातिव्रत्याच्या नाटकाने फार संतोषित होतात. तसे हे आसुर यज्ञयाग करण्याचा आव आणतात. महंतपण आपल्या अंगी आले असे मानतात आणि असाधारण गर्वाने फुगून जातात. हे लोक असल्या ह्या नाटकी महंतपणाने इतके ताठून जातात की, जसे काही लोखंडाचे खांबच. ते थोडेसुद्धा लवत नाहीत. आकाशात उंच गेलेल्या पर्वताप्रमाणे त्यांना लीनता म्हणजे कशी असते ती ठाऊकच नसते. आपल्या चांगुलपणाच्या कौतुकात रमत इतरांना गवताच्या काडीपेक्षा ते तुच्छ समजतात. धनुर्धरा, धनाच्या मदिरेने मत्त होऊन कृत्य, अकृत्य हा विवेक टाकून आपण जगापेक्षा कोणीतरी जगावेगळे मोठे आहो असे समजू लागतात. अशी सामुग्री त्यांच्याजवळ असल्यावर यज्ञाची गोष्ट बोलायलाच नको. पार्था, अरे ही वेडीपिशी माणसे काय करीत नाहीत ते विचार.

एखादे वेळी एकदम त्यांच्या मनात येते की आपण यज्ञ करावा. मुर्खपणारूपी मद्याच्या अंमलात मग यज्ञाची नक्कल सुरू होते. ना कुंड, ना मंडप, ना वेदी, ना उचित साधनांची सिद्धी. त्यांचे आणि विधीचे तर नेहमी वाकडेच असते. देवब्राह्मणांच्या नावाने त्यांना आडवाराही नको असतो. मग तेथे कुणास यावेसे वाटणार आहे? पण व्यवहारात अत्यंत चतुर असणारे बुद्धिमंत मेलेल्या वासरात पेंढा भरतात आणि ते गायीपुढे ठेवतात. ते वासरू पाहून गायीला पान्हा आला की दूध काढून घेतात. त्याप्रमाणेच हे लोक यज्ञाच्या नावाने डांगोरा पिटतात, आपल्या हावेला जग अर्पण करतात आणि अहेरावारी सगळ्या जगाला लुटतात. आपल्या उत्कर्षासाठी ते जे काही होम हवन करतात त्या होमात प्राण्यांच्या सर्वनाशाची इच्छा करतात. भेरी, निशाणे पुढे मिरवत ते आपले दीक्षितपण आपणच व्यर्थ "वाहवा वाहवा" म्हणत प्रसिध्द करतात. ह्या उसन्या महत्त्वाने ते अधम आणखी गर्वाची पायरी चढतात. काळोखाला काजळाचा लेप द्यावा तसा हा महिमा आणखी गर्व वाढवतो. मग मूर्खपणा दृढ होतो, उद्धटपणा उंचावतो, अहंकार दुप्पट होतो, अविवेक बळावतो. आता मग आपल्याशिवाय दुसऱ्या कुणाचे नावसुद्धा निघू नये म्हणून सामर्थ्याला आणखी बळ येते. असा अहंकाराचा आणि बळाचा मिलाफ झाला की दर्पाचा समुद्र मर्यादा सोडून उचंबळतो. उन्मत्तपणा असा अमर्याद वाढल्यावर कामाचे पित्त खवळते आणि त्या उष्णतेने क्रोधाग्नि पेटतो. रखरखीत उन्हाळ्यात तेलातुपाच्या कोठाराला आग लागावी आणि त्यात पुन्हा सोसाट्याचा वारा सुटावा तसे घडते.

बळाचे साह्य मिळालेला अहंकार व कामक्रोधांनी व्यापलेला उन्मत्तपणा यांचा मिलाफ त्यांच्या ठिकाणी होतो आणि वीरश्रेष्ठा अर्जुना, आपल्या इच्छेनुरूप ते कोणकोणत्या प्राण्यांना मारत नाहीत!

धनुर्धरा, प्रथमतः जारणमारणासाठी ते स्वतःच्या मांसरुधिराची आहुती देतात. अर्जुना, त्यांना वाटते की आपल्या ह्या भीषण कृतीने केवळ स्वतःच्या शरिरासच क्लेश होतात पण तसे नाही. त्या शरिरात रहाणारा जो मी त्या माझ्यावर हे घाव पडतात. ते स्वतःचा देह जाळतात पण क्लेश मला शरिरस्थास होतात. मग पुढे त्या अभिचारादि दुष्कृत्यामुळे जितक्या वस्तूंना त्रास होतो, पिडा होते तितक्या वस्तूंच्या ठिकाणी चैतन्यरूप असणाऱ्या मला आत्म्याला क्लेश होतात. अभिचाराच्या त्यांच्या तडाख्यातून जे क्वचित तगून रहातील त्यांच्याकडे दोषदृष्टिरूपी दगडांचा मारा करतात. सती आणि सत्पुरुष, दानशील आणि याज्ञिक, तपस्वी, अलौकिक संन्यासी किंवा महात्मे, भक्त ही जी माझी अगदी जिव्हाळ्याची स्थाने त्यांतून श्रोतादिक यज्ञक्रियांनी शुद्ध झालेली असतात त्यांना वाईट शब्दांचे बाण द्वेषाचे काळकूट विष माखून मारतात.

अर्जुना, अशा प्रकारे माझ्याशी जे शत्रुत्व करतात त्या पाप्यांना मी काय करतो ते सांगतो, ऐक. ज्या मनुष्यदेहाचा आश्रय घेऊन हे आसुर त्या जगाचा नाश करायला पहातात ती मनुष्यदेह ही पदवीच मी काढून घेतो आणि तमोयोनीमध्ये जन्म देतो. ही तमोयोनी क्लेशगावातील उकिरडा आणि संसाररूपी शहराचा पाणवठा आहे. मी त्यांना त्या तमोयोनीचे वतनदारच करून ठेवतो. खाण्याकरिता जिथे गवतसुध्दा उगवत नाही अशा अरण्यात मी त्यांना वाघ, विंचू करतो. मग ते क्षुधेच्या दुःखाने स्वतःलाच तोडून खातात. तिथेच मरतात आणि पुन्हा तिथेच उत्पन्न होतात किंवा मी त्यांना आपल्याच विषाने ज्याची त्वचा जळते आहे असा बिळात अडकलेला सर्प करतो. त्या दुर्जनाला आत घेतलेला श्वास बाहेर टाकण्याइतकाही विसावा मिळत नाही. कोट्यवधी कल्पसुद्धा मोजले तरी संख्या अपुरीच पडेल इतका वेळ मी त्यांना त्या क्लेशातून बाहेर काढतच नाही. पण अर्जुना, तेथून जे क्लेश भोगण्यासाठी त्यांना पुढे जावयाचे आहे त्या जागेकडे पाहिले तर हे क्लेश म्हणजे मुक्कामाचे पहिले ठिकाण म्हणावे लागेल. हा त्या क्लेशाचा शेवट नव्हे. पुढील कष्टांचा विचार केला तर हे आताचे क्लेश काहीच नव्हेत एवढे मोठे दुःखाचे ताट त्यांच्यापुढे वाढून ठेवलेले आहे.

त्या आसुरी संपत्तीच्या योगाने त्या दुर्दैवी लोकांनी केवढी अधोगती जोडली आहे बघ. नंतर वाघादि तामस योनीत त्यांना जो थोडासा काही विसावा मिळतो तोही मी हिसकावून घेतो आणि मग ते लोक केवळ तमाची मूर्तीच बनतात. पापाला ज्याची किळस वाटते, नरक ज्याचे भय घेतो, प्रत्यक्ष श्रमच श्रमाने मूर्छित होतो, मळ जिथे मळतो, तो ताप जिथे पोळतो, महाभयही ज्याचे नाव घेतले की घाबरते, पापालासुद्धा ज्याचा कंटाळा येतो, अशुभापासून जिथे अशुभ निर्माण होते, विटाळही ज्या विटाळाला घाबरतो अशा विश्वातील वाईटातील वाईट ठिकाणी धनंजया, तामस योनीनंतर ते आसुर दुःख भोगत रहातात.

अरे, सांगताना वाणी रडत आहे, आठवण झाली तर मन मागे हटते आहे. हाय, हाय, ह्या मूर्खांनी हा केवढा नरक प्राप्त करून घेतला आहे बरे! ज्या आसुरी संपत्तीने त्यांचे हे असे घोर पतन घडवून आणले ती त्या मूर्खांनी अशी अपरंपार काय म्हणून वाढविली असेल!

धनुर्धरा, म्हणून तुला पुन्हा पुन्हा सांगतो की ज्या ठिकाणी हे आसुरी संपत्तिवंत रहात असतील त्या ठिकाणाकडे तू चुकूनसुद्धा तोंड वळवू नकोस.

दंभादि सहाही दोष ज्यांच्या ठिकाणी असतील त्यांचा त्याग कर हे काही वेगळे सांगायला नकोच. एकच ध्यानात ठेव की ज्या ठिकाणी काम, क्रोध आणि लोभ या तिघांचे बंड माजले असेल तिथे अशुभ पिकले आहे. कुणालाही आपली सहज भेट घेता यावी म्हणून सर्व दुःखानी नेमलेले वाटाडे म्हणजे हे तीन दोष! ते दुःखापर्यंत नीट पोचवतात. असे म्हणावे की पापी माणसांना नरकात घालण्यासाठी जगात बसलेली ही पराक्रमी सभाच आहे, रौरव नरक आहे असे पुराणातून वगैरे ऐकावयास मिळते पण हे तिघे जोवर अंतःकरणात उठले नाहीत तोवरच नरकाची वार्ता कानाने ऐकून भागते. जरा का त्यांनी माणसावर अम्मल सुरू केला की, त्या ऐकलेल्या नरकयातना माणसाला प्रत्यक्ष भोगाव्या लागतात रे.

या तिघांच्यामुळे अपाय सोपे होतात, यातना स्वस्त होतात. अर्जुना, हानी हानी म्हणतात ती हीच. एवढेच काय हे तीन म्हणजे मूर्तिमंत हानीच आहेत. अर्जुना, तुला पुन्हा पुन्हा सांगतो. काम, क्रोध, लोभ ही सर्व

बाबतीत निंद्य असलेली त्रिपुटी टाकावीच टाकावी रे. फार काय सांगू धर्म, अर्थ, काम, मोक्ष यातील एकाही पुरुषार्थाची गोष्ट बोलायची असेल तर ह्या तिघांची संगत ज्याने सोडली असेल त्यानेच बोलावी.

देव पुढे म्हणाले, “हे तिघे जोवर जीवाच्या अंतःकरणात जागते आहेत तोवर ‘कल्याणाची प्राप्ती होईल’ हे नुसते ऐकावयासही माझे कान तयार नाहीत.”

अर्जुना, अरे ज्याचे स्वतःवर खरेखुरे प्रेम आहे, आत्मनाशाची ज्याला भीती वाटते त्याने काम, क्रोध, लोभ यांच्या वाटेलाही जाऊ नये. अतिशय दक्ष, सावध असावे. पोटाला दगड बांधून आपल्या बाहुबळावर समुद्रात पोहायला पडावे किंवा जीव जगविण्यासाठी काळकूट विषाचे भोजन करावे. त्याप्रमाणे या काम, क्रोध, लाभ यांच्यामुळे कार्यसिद्धि होईल अशी आशा बाळगणे व्यर्थ आहे. अर्जुना, यांचा ठावठिकाणाही ठेवू नको.

अर्जुना, ह्या तिघांची बळकट गुंफलेली साखळी आहे. लोभातून काम आणि कामातून क्रोध उत्पन्न होत, एकमेकाला उठवत, बलिष्ठ करत ते जीवाला जखडून टाकतात. कधी अकस्मात असे घडते की ही त्यांची साखळी तुटते. मनातून लोभच नाहीसा झाला तर छळणाऱ्या निरनिराळ्या कामना संपतात आणि मग कामनापूर्ती झाली नाही म्हणून येणारा क्रोधही उरत नाही. कशाची आकांक्षा उरली नाही की हाव संपली आणि हाव संपली की क्रोध संपला. एकमेकात अडकलेले दुवेच तुटले की ही बेडी तुटून पडते आणि पार्था, आता जीवाला सुखाने आपल्या वाटेने चालता येते. शरीरातले त्रिदोष गेले, नगरातील त्रिकुटी संपली, मनातले त्रिविध ताप नाहीसे झाले की जशी प्रसन्नता येते तशी प्रसन्नता जीवाला प्राप्त होते. ह्या तीन दुष्टांची संगत संपली की सुखी झालेला तो जीव मोक्षमार्गावर चालत असताना सज्जनांच्या सहावासाची इच्छा करू लागतो. त्याची ती आकांक्षा मी पुरवितो आणि त्या प्रबळ सत्संगाने उत्तम शास्त्राच्या महतीने जन्ममृत्यूरूपी माळरानातून त्या जीवाचा प्रवास सुखरूप पार पडतो. अर्जुना, आता त्याला गुरूकृपारुपी सुंदर नगर समोर दिसू लागते. तो झपाट्याने पाय उचलत आत्मानंद जिथे रहातो, त्या नगरात पोचतो. गुरुकृपेच्या त्या नगरात प्रियाची परमसीमा असा तो माउली आल्या त्याला भेटतो आणि त्या क्षणीच जन्ममृत्यूची गडबड संपून जाते.

अर्जुना, काम, क्रोध, लोभ हे झाडून टाकून देणाऱ्या जीवाला हा ‘असा’ अपरिमित लाभ होतो. एवढ्या मोठ्या पदाचा तो स्वामी होतो.

पुन्हा एकदा सांगतो अर्जुना, की हे न करता जर काम, क्रोध, लोभ यातच डोके घालून राहिले तर त्याने आत्मघात करून घेतला आहे असे खुशाल समज. जगामध्ये सगळ्यांच्यावर सारखीच कृपा करणाऱ्या आणि हिताहितावर दिव्यासारखा प्रकाश टाकणाऱ्या वेदरूपी पित्यास तो जुमानीत नाही. आत्महिताची चाड बाळगत नाही. केवळ इंद्रियांचे कोडकौतुक करणे एवढेच तो जाणतो.

कामक्रोधांना त्याने वचन दिले आहे की मी तुम्हाला कधी सोडणार नाही आणि ते वचन तो उत्तम रीतीने पाळतो. स्वैराचाराच्या अफाट रानाचा तो आश्रय घेतो. जन्ममरणातून सुटकेच्या ओघातील पाणी तो पिऊच शकत नाही. ती कहाणी त्याच्या स्वप्नापासूनही दूर रहाते.

अनुक्रमणिका

काय सांगू अर्जुना, खरोखर तो परलोकास मुकतो हे तर ठाम ठरलेच पण ऐहिकही भोग तो भोगू शकत नाही. दुसऱ्यास दुःख देऊन मिळवलेले भोग तो सुखाने कसा बरे भोगू शकेल? तेही त्याच्या हातून सुटून जातात. मासे खाण्याच्या लोभाने ब्राह्मण कोळ्यांच्या जातीत शिरला. पण 'असला नास्तिक आमच्यामध्ये नको' असा तिथेही त्याचा धिक्कारच झाला. तशी त्याची स्थिती होते. विषयांच्या गोडीने त्याने परलोक हातचा घालविला आणि इतक्यात मरणाने त्याला विषयसुखापासून वंचित करून दुसरीकडे नेले अशी स्थिती होते.

याप्रमाणे परलोक नाही, स्वर्ग नाही आणि ऐहिक विषयांचाही भोग नाही असे जिथे घडते तिथे मोक्षाची गोष्ट काय बोलावी? पार्था, कामाच्या बळाने जो आग्रहाने विषय सेवन करीन म्हणतो त्याला विषयभोगही मिळत नाही आणि स्वर्ग तर मिळत नाहीच नाही. मग त्याचा उद्धार होत नाही हे काय वेगळे सांगू?

धर्मानुजा पार्था, ज्याला स्वतःची दया येत असेल त्याने वेदांच्या आज्ञेबाहेर जाता कामा नये. एखादी पतिव्रता स्त्री पतीच्या मताप्रमाणे वागून आत्महित साधते ना? श्रीगुरुंच्या वचनावर दृष्टि ठेवून त्यांनी दिलेला उपदेश जतन करणारा, अनुष्ठान करणारा, शिष्य आत्मभुवनामध्ये निरंतर वास करतो ना? आपला ठेवा आपल्या हातात यावा अशी इच्छा असेल तर आदराने दिवा पुढे करून शोध घ्यावा लागतो ना? त्याप्रमाणे चारी पुरुषार्थ साधावे असे ज्याला वाटत असेल त्याने श्रुतिस्मृति आपल्या मस्तकावर धारण कराव्या. शास्त्र ज्याचा त्याग करण्यास सांगेल ते टाकावे. राज्यसुद्धा तृणवत मानावे. शास्त्र जे घेण्यास सांगेल ते विष असले तरी विरुद्ध मानू नये. सुभटा, वेदावर जर अशी अनन्य श्रद्धा ठेवली तर अनिष्ट कसे आणि कुठे भेटेल? अहितापासून वाचविणारी आणि हित देऊन उत्कर्ष करणारी अशी श्रुतीशिवाय जगात आई नाही. ती जीवाला ब्रह्मापर्यंत पोचविते म्हणूनच तिचा कुणीही त्याग करू नये. तिच्या वचनांची हेळसांड करू नये. पार्था, तू सुद्धा तिला एकनिष्ठेने भजावे कारण धर्माचरणाच्या बळावर शास्त्रांना सार्थकता आणण्यासाठीच तू जन्माला आला आहेस. धर्मानुजा, धर्माचा धाकटा भाऊ असे जे नाव तुला आहे, ते सार्थच आहे. मी तुला तरीही पुन्हा पुन्हा सांगतो की तू धर्माविरुद्ध कधीही आचरण करू नकोस.

कार्य आणि अकार्य यांचा विवेक करीत असताना त्याची पारख करून निर्णय देण्याचे काम शास्त्रांच्यावर सोपवत जा आणि तो निर्णय जीवाभावाने पाळीत जा. अकृत्य म्हटले की ते त्याज्य आहे, असे समजून त्याचा तात्काळ त्याग करीत जा. शास्त्रांनी 'कृत्य' असे ज्याला म्हटले ते उचलून घेत जा. आदराने त्याप्रमाणे आचरण करीत जा आणि ते काम पुरे करीत जा. सात्त्विक बुद्धिच्या अर्जुना, विश्वप्रामाण्याचा शिक्का तुझ्या हाती आहे. तू ज्या आचरणावर शिक्का मारशील ते आचरण योग्य ठरणार आहे. तूच तर लोकसंग्रहाचा खरा अधिकारी आहेस. ”

याप्रमाणे देवानी आसुरी दोषांच्या समुदायाचे वर्णन करून त्यातून सुटण्याचा उपायही पांडवाला सांगितला.

ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, “यावर तो पांडुपुत्र अर्जुन देवांना आणखी प्रश्न विचारील आणि आपल्या अंतःकरणातील योग्य विचार देवापुढे ठेवील. देवही त्याचे समाधान करतील. श्रोतेहो, चैतन्याचा कान करून आपण तो संवाद ऐकावा. व्यासांच्या आज्ञेने संजयाने सर्व इतिहास धृतराष्ट्रास सांगून त्याची वेळ निभावून नेली.

अनुक्रमणिका

निवृत्तिनाथांच्या कृपेने मीही तो वृत्तांत आपल्याला सांगीन. आपण संतमंडळी माझ्यावर जर कृपादृष्टिचा वर्षाव कराल तर आपल्याला मान्य होईल एवढा मोठा मी होईन."

"महाराज, माझ्या ह्या सेवेबद्दल आपण मला प्रसादाचे दान द्यावे म्हणजे मी आपली सेवा करण्यास समर्थ होईन." असे ज्ञानदेव म्हणाले.

दैवी संपत्तीमध्ये सव्वीस गुण आणि आसुरी संपत्तीमध्ये सहा दोषांचा अंतर्भाव करून "आसुरी संपत्तीचा स्पर्शही होऊ न देता वेदाज्ञेप्रमाणे आचरण ठेव असे देवांनी अर्जुनास व पर्यायाने साधकास सांगितले आहे. मनात विचार येतो की स्त्री-साधकांनी काय करावयाचे? वेदांची आज्ञा काय हे कळावे कसे? त्यांना तर वेदांची अक्षरे ऐकण्याचाही अधिकार नाही, मग या आपत्तीतून मार्ग कसा निघणार?

आणि मग ज्ञानदेवांच्या ह्या ग्रंथरचनेचे खरे महत्त्व ध्यानात येते. स्त्री-पुरुष असा भेद न करता सर्वांना गीता कळण्यास सुलभ करून त्यांनी जगावर केवढा उपकार करून ठेवला आहे. देवांच्याजवळ जाण्यास दैवी संपत्ती जवळ असावी, आसुरी संपत्तीचा विटाळ असू नये हे तर नक्की कळते आहे. देवांनी आपल्याजवळ येणाऱ्यावर जास्त कडक बंधने घातली हे योग्यच आहे.

इचलकरंजीचा एक प्रसंग आठवतो. नात्यातील एक गृहस्थ जमिनीचे नोकर असून कारकुनी फडात नोकरीस होते. त्यांच्या हातून काही अपराध झाला म्हणून सरकारांनी दंड केला. दंडाची रक्कम पाहून त्या गृहस्थांना तो अन्याय वाटला. ते भेटायला गेले आणि म्हणाले, "मला इतका दंड म्हणजे माझ्यावर अन्याय होतो आहे." सरकार म्हणाले, "होय मला माहीत आहे. इतर कुणी कारकुनाने ही चूक केली असती तर मी इतका दंड केला नसता पण तू माझा भाचा असून हा गुन्हा करतोस तेव्हा तुला दुप्पट दंड करणेच योग्य आहे." बिचारा अपराधी मुकाट्याने परत आला.

देव तसेच सांगत आहेत की, "माझा म्हणवून घ्यायचे असेल तर इतके शुद्ध झाले पाहिजे. "

एकदा एक संन्यासी स्नान करून रस्त्याने निघालेले असताना त्यांना एका अंत्यजाचा स्पर्श झाला. रागाने त्याच्याकडे पहात ते म्हणाले. "दिसत नाही तुला मी स्नान करून निघालो आहे? मला आता पुन्हा स्नान करून यायला हवे."

अंत्यज त्यांच्याकडे निरखून पहात म्हणाला, "तुम्ही करा न करा मला तुमच्या रागाचा विटाळ झाला आहे. मला मात्र स्नान करायलाच पाहिजे."

तसेच गुरुदेव रानडे याना भाऊसाहेबमहाराज म्हणाले होते की "इतर बाबतीतला अहंकार आपल्यापेक्षा कुणी वरचढ पाहिला की जाईल पण मी परमार्थी हा अहंकार फार वाईट आहे तो काही केल्या जात नाही. तेव्हा साधकाने त्याला जपावे."

अनुक्रमणिका

वेदांच्या आज्ञा काय असतील त्या असोत पण ज्ञानदेवांच्या आज्ञा स्पष्ट, निःसंदिग्ध आहेत.

सोळाव्या अध्यायात दोन प्रकारच्या संपत्तीचे वर्णन करून सतराव्या अध्यायाचा पाया घातला आहे.

सतराव्यात अर्जुनाचा प्रश्न आहे "देवा शास्त्रविधीचे ज्ञान नसल्यामुळे शास्त्राज्ञाचे उल्लंघन करून केवळ श्रद्धेने युक्त होऊन जे पूजनादि उपासना करतात त्यांची गती काय होते बरे? सात्विक राजस का तामस उपासना म्हणावयाची ही?"

हे वाचत असताना आपल्याला वाटते की अर्जुनाला आपल्या जीवाचाच प्रश्न कळला आहे. देव त्या प्रश्नाचे उत्तर देऊन आपलेही पूर्ण समाधान करीत आहेत.

***

अनुक्रमणिका

॥ श्री ॥

## अध्याय सतरावा

# श्रध्दात्रयविभागयोग

**॥ ॐ नमो भगवते वासुदेवाय ॥**

अर्जुन उवाच—

**ये शास्त्रविधिमुत्सृज्य यजन्ते श्रद्धयान्विताः ।**
**तेषां निष्ठा तु का कृष्ण सत्त्वमाहो रजस्तमः ॥ १ ॥**

श्रीभगवानुवाच—

**त्रिविधा भवति श्रद्धा देहिनां सा स्वभावजा ।**
**सात्त्विकी राजसी चैव तामसी चेति तां श्रृणु ॥ २ ॥**

**सत्त्वानुरूपा सर्वस्य श्रद्धा भवति भारत ।**
**श्रद्धामयोऽयं पुरुषो यो यच्छ्रद्धः स एव सः ॥ ३ ॥**

**यजन्ते सात्त्विका देवान्यक्षरक्षांसि राजसाः ।**
**प्रेतान्भूतगणांश्चान्ये यजन्ते तामसा जनाः ॥ ४ ॥**

**अशास्त्रविहितं घोरं तप्यन्ते ये तपो जनाः ।**
**दम्भाहंकारसंयुक्ताः कामरागबलान्विताः ॥ ५ ॥**

**कर्षयन्तः शरीरस्थं भूतग्राममचेतसः ।**
**मां चैवान्तः शरीरस्थं तान्विद्ध्यासुरनिश्चयान् ॥ ६ ॥**

**आहारस्त्वपि सर्वस्य त्रिविधो भवति प्रियः ।**
**यज्ञस्तपस्तथा दानं तेषां भेदमिमं श्रृणु ॥ ७ ॥**

**आयुःसत्त्वबलारोग्यसुखप्रीतिविवर्धनाः ।**
**रस्याः स्निग्धाः स्थिरा हृद्या आहाराः सात्त्विकप्रियाः ॥ ८ ॥**

अनुक्रमणिका

कट्वम्ललवणात्युष्णतीक्ष्णरूक्षविदाहिनः ।
आहारा राजसस्येष्टा दुःखशोकामयप्रदाः ॥ ९ ॥

यातयामं गतरसं पूति पर्यूषितं च यत् ।
उच्छिष्टमपि चामेध्यं भोजन तामसप्रियम् ॥ १० ॥

अफलाकांक्षिभिर्यज्ञो विधिदृष्टो य इज्यते ।
यष्टव्यमेवेति मनः समाधाय स सात्त्विकः ॥ ११ ॥

अभिसंधाय तु फलं दम्भार्थमपि चैव यत् ।
इज्यते भरतश्रेष्ठ तं यज्ञं विद्धि राजसम् ॥ १२ ॥

विधिहीनमसृष्टान्नं मन्त्रहीनमदक्षिणम् ।
श्रद्धाविरहितं यज्ञं तामसं परिचक्षते ॥ १३ ॥

देवद्विजगुरुप्राज्ञपूजनं शौचमार्जवम् ।
ब्रह्मचर्यमहिंसा च शारीरं तप उच्यते ॥ १४ ॥

अनुद्वेगकरं वाक्यं सत्यं प्रियहितं च यत् ।
स्वाध्यायाभ्यासनं चैव वाङ्मयं तप उच्यते ॥ १५ ॥

मनःप्रसादः सौम्यत्वं मौनमात्मविनिग्रहः ।
भावसंशुद्धिरित्येतत्तपो मानसमुच्यते ॥ १६ ॥

श्रद्धया परया तप्तं तपस्तत्त्रिविधं नरैः ।
अफलाकाङ्क्षिभिर्युक्तैः सात्त्विकं परिचक्षते ॥ १७ ॥

सत्कारमानपूजार्थं तपो दम्भेन चैव यत् ।
क्रियते तदिह प्रोक्तं राजसं चलमध्रुवम् ॥ १८ ॥

मूढग्राहेणात्मनो यत्पीडया क्रियते तपः ।
परस्योत्सादनार्थं वा तत्तामसमुदाहृतम् ॥ १९ ॥

दातव्यमिति यद्दानं दीयतेऽनुपकारिणे ।
देशे काले च पात्रे च तद्दानं सात्त्विकं स्मृतम् ॥ २० ॥

अनुक्रमणिका

**यत्तु प्रत्युपकारार्थं फलमुद्दिश्य वा पुनः ।
दीयते च परिक्लिष्टं तद्दानं राजसं स्मृतम् ॥ २१ ॥**

**अदेशकाले यद्दानमपात्रेभ्यश्च दीयते ।
असत्कृतमवज्ञातं तत्तामसमुदाहृतम् ॥ २२ ॥**

**ॐतत्सदिति निर्देशो ब्रह्मणस्त्रिविधः ।
ब्राह्मणास्तेन वेदाश्च यज्ञाश्च विहिताः पुरा ॥ २३ ॥**

**तस्मादोमित्युदाहृत्य यज्ञदानतपःक्रियाः ।
प्रवर्तन्ते विधानोक्ताःसततं ब्रह्मवादिनाम् ॥ २४ ॥**

**तदित्यनभिसंधाय फलं यज्ञतपःक्रियाः ।
दानक्रियाश्च विविधाः क्रियन्ते मोक्षकाङ्क्षिभिः ॥ २५ ॥**

**सद्भावे साधुभावे च सदित्येतत्प्रयुज्यते ।
प्रशस्ते कर्मणि तथा सच्छब्दः पार्थ युज्यते ॥ २६ ॥**

**यज्ञे तपसि दाने च स्थितिः सदिति चोच्यते ।
कर्म चैव तदर्थीयं सदित्येवाभिधीयते ॥ २७ ॥**

**अश्रद्धया हुतं दत्तं तपस्तप्तं कृतं च यत् ।
असदित्युच्यते पार्थ न च तत्प्रेत्य नो इह ॥ २८ ॥**

इति श्रीमद्भगवद्गीता सूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे “श्रद्धात्रयविभागयोगो नाम” सप्तदशोऽध्यायः ॥ १७ ॥

श्रीकृष्णार्पणमस्तु ।

----------

अनुक्रमणिका

दैवी आणि आसुरी संपत्ती कशास म्हणावे याचे विवेचन करून, "आसुरी संपत्तीचा मनाला स्पर्शही होऊ देऊ नकोस आणि वेदाज्ञेप्रमाणे आपला जीवनक्रम ठेव म्हणजे अशुभ भेटणार नाही आणि माझी प्राप्ती होईल." असा निर्णय सोळाव्या अध्यायाची पूर्तता करताना देवानी केला.

अर्जुनाच्या मनात शंका आली की, वेदाज्ञेप्रमाणे आचरण करावयाचे ही आज्ञा देवांनी केली खरी, पण ती शास्त्राज्ञाच कळली नाही म्हणून तिचे उल्लंघन करून केवळ श्रद्धेने जे भजन, पूजन, दान, तप करतात त्यांची गीत काय होते? त्यांना भगवंत भेटतो की नाही? शंका आली की तिचे निरसन करून घ्यायचेच अशीच अर्जुनाची वृत्ति असल्याने त्याने सतराव्या अध्यायाच्या सुरवातीसच हा प्रश्न विचारला.

देव म्हणाले, "नुसत्या श्रद्धेच्या जोरावर मोक्ष मिळत नाही. श्रद्धा, यज्ञ, दान, तप या सर्व क्रिया सात्त्विक, राजस, तामस या तीन प्रकारच्या आहेत. इतकेच काय आहारातही हे तिन्ही प्रकार आहेत.

साधकाने राजस व तामस क्रियांचा त्याग करून एका सत्त्वगुणाचाच अंगिकार करावा. शुद्ध सत्त्वगुणाने युक्त होऊन शास्त्रविहित कर्म केले तर उत्तम लोकलोकांतराचे फल मिळेल. पण त्यात आणखी एका गोष्टीची भर घातली तरच साक्षात मोक्षाची प्राप्ती होईल. एरवी स्वतंत्रपणे सात्त्विक कर्मसुद्धा मोक्ष देऊ शकत नाही.

"ॐ तत् सत्" हे जे परब्रह्माचे नाव आहे ते घेऊन जर सात्त्विक कर्मे केली तरच मोक्षापर्यंत पोचविण्याची शक्ती त्या कर्मामध्ये येते.

कर्माच्या आरंभी ॐ काराचा वाचेने उच्चार करावा. ॐ काराचे सहाय्य झालेल्या या विधियुक्त क्रियांना पुढे फळ येऊ लागले की, "तत्" ह्या पदाचा उपयोग करावा व या उच्चाराने कर्म आणि फळ भोगायला शिल्लक न ठेवता ब्रह्माला अर्पण करावे. ब्रह्मार्पण करणारा मी ते ब्रह्मार्पण केले या भावनेने शिल्लक राहिलेला असतो. कर्ता जोपर्यंत असा वेगळा राहिलेला आहे तोवर त्याची संसारातून सुटका नाही म्हणून सत् या पदाचा कर्माच्या शेवटी विनियोग करावा. ब्रह्मरूप झालेल्या कर्माचे सत् या पदाशी ऐक्य झाले की मग काहीही शिल्लक राहत नाही.

अर्जुना, जीवाला जन्ममरणाच्या संसारात बांधणाऱ्या यज्ञदानादि कर्मांना त्यांच्या कर्त्यासह ब्रह्मापर्यंत पोहचविण्याचे सामर्थ्य "ॐ तत् सत्" या नामामध्ये आहे.

जीवाला ब्रह्मप्राप्ती करून देणाऱ्या या नामाचे महात्म्य श्रीकृष्णाच्या मुखातून ऐकत असता त्या ब्रह्मानंदात अर्जुन विरून गेला. त्याला त्या युद्धाच्या घनघोर प्रसंगीही समाधी लागली. हे पाहून सात्त्विक अंतःकरणाचा संजयही त्या आनंदात नाहीसा होऊ लागला. अर्जुन हा त्याच्या स्वामीचा शत्रू खरा पण त्याच्यामुळे देवांच्या मुखातून हे अलौकिक भाषण ऐकावयास मिळाले या उपकाराची त्याला आठवण होत होती व ती तो बोलून दाखवू लागला.

पण धृतराष्ट्रास त्यामुळे राग येईल म्हणून उघड स्तुति करण्याचे संजयाने थांबविले आणि अर्जुनाने जो प्रश्न देवाना विचारला त्याचे वर्णन करण्यास सुरवात केली. निवृत्तीदास ज्ञानदेव शेवटी म्हणतात,

"संजयाने अर्जुनाचे गुणवर्णन करण्याचे सोडून अर्जुनाने श्रीकृष्णास विचारलेली गोष्ट सांगण्यास जसा आरंभ केला तसेच व्याख्यान मीही करीन. श्रोते हो, आपण ऐकावे."

पहिल्या अध्यायात संपूर्ण सारस्वतच गणेशरूप आहे व सारस्वताचे मूळ ॐ मध्ये व ॐ हे गणेशाचे रूप असे माउलींनी सांगितले व अशारीतीने मंगलाचरण केले.

सतराव्या अध्यायात ते गुरूंना गणेश म्हणत आहेत व ते गणेशरूप शिवापेक्षाही जास्त योग्यतेचे कसे काय आहे ते सांगतात.

माउली म्हणत आहेत. "सद्‌गुरो, आपल्याला योगनिद्रा लागली की विश्व प्रकट होऊ लागते. आपण आपल्या तेजाने प्रकाशमान झाला की विश्वाचा मागमूसही लागत नाही. विश्व प्रफुल्लित होते ते आपण योग निद्रेत असतानाच! जी गणेंद्रा, आपल्याला माझा नमस्कार असो.

मयासुराने ब्रह्मदेवाकडून तीन अभेद्य पुरे मागून घेतली लोखंड, रूपे, सोने यांची एकावर एक अशी तीन नगरे रचून मयासुरानंतर त्याच्या अनुयायांनी देवांना फार त्रास देण्यास सुरवात केली. तेव्हा देव महादेवाकडे गेले आणि त्या राक्षसाचा बंदोबस्त करावा अशी प्रार्थना केली. सर्व देवांनी लढाईत शंकरांना सहाय्य केले पण प्रारंभी गणपतीची आराधना न करता लढाई सुरू केल्यामुळे देवाना यश मिळेना. मग गणतीची प्रार्थना केली व शंकरांना त्रिपुराचा नाश करता आला.

ही कथा ध्यानात घेऊन ज्ञानदेव म्हणतात की, "सत्त्व, रज, तम ह्या तीन गुणांच्या पुरांनी वेढलेला जीव ह्या दुर्गम किल्ल्यात अडकून पडलेला आत्मा शंभूंनी गुरुरूपी गणेशाच्या स्मरणाने सोडवला. त्रिगुणाच्या विळख्यातून जीवाला मुक्तता करून घ्यावयाची असेल तर गुरुरूपी गणेशाशिवाय दुसरा कोणी त्राता नाही. प्रत्यक्ष शिवांना गणेशाचे स्मरण करावे लागले म्हणून तसा विचार केला तर शिवापेक्षा गुरू जास्त सामर्थ्यशाली ठरतात.

गुरू म्हणजे मोठा. ह्या गुरू शब्दावरची ज्ञानदेवांची कोटी फार सुंदर आहे. ते म्हणतात, "गुरू म्हणजे जड पण जड म्हणावे तर गुरुदेव मायाजळातून हलक्या भोपळ्यासारखे तारून नेतात. तेव्हा ह्यांना जड म्हणावे तर हलके आणि हलके म्हणावे तर शब्दशः गुरू म्हणजे जड!

माउली म्हणतात. "गणपतीचे दुसरे नाव आहे वक्रतुंड. गुरुदेवा, जे आपल्याविषयी अज्ञानी आहेत. त्यांच्यापुढून आपण आपले मुख दुसरीकडे फिरवता. म्हणून वक्रतुंड हे गणेशाचे नावही आपल्याला शोभते. ज्ञानी पुरुषांच्या मात्र आपण सदैव समोर असता.

आपली दृष्टी गणेशासारखी बारीक, सूक्ष्म शोधणारी आहे. आपल्या डोळ्यांची उघडझाक होते त्याला अनुसरून जगाची उत्पत्ति आणि नाश होतो. डोळ्यांची उघडझाक जशी अगदी सहज होत असते त्याप्रमाणे जगाची उत्पत्ति आणि लय ह्या आपल्या सहज चालणाऱ्या लीला आहेत. गणेशाचे कान जसे अधून मधून पंख्यासारखे हालतात त्याप्रमाणे आपले प्रवृत्ति आणि निवृत्ति हे दोन कान अधून मधून फडफडतात. प्रवृत्ति हा कान जेव्हा क्रियाशील होतो तेव्हा गंडस्थळातून वाहणाऱ्या मदाच्या सुवासाने युक्त वारा सुटतो. त्या वासाला भुलून जीवरूपी भ्रमर आपल्या मस्तकावर गोळा होतात. ते निळे भुंगे डोक्यावर बसले की जशी काही निळ्या कमळांनीच आपली पूजा बांधली आहे असे वाटते. मग आपण निवृत्ति हा दुसरा कान हालवता. त्याच्या फडत्काराने भुंगे उडून जातात. निळ्या कमळांची ती पूजा विस्कटते आणि मोकळ्या अंगाचेच आपल्याला लेणे होते. गुरुदेवा, ते मोकळे अंगदेखील आपल्याला शोभून दिसते.

माया हीच कोणी आपली स्त्री आहे. तिची नृत्यक्रीडा सुरू झाली की जगाचा आभास दिसू लागतो आणि देवा आपण आपल्या तांडवनृत्याने तिचे नृत्यकौशल्य आपल्या आस्तित्वावर आहे हे स्पष्ट करता.

महाराज, आपला आणखी एक चमत्कार आहे. आपण ज्याचे सोयरे होता तो सोयरेपणाच्या व्यवहारास मुकतो. आपण त्याच्यावर प्रेम करता तेव्हा त्याला आत्मप्रचीती आणून देता. आत्मप्रचीती आली की आपपरभाव मुळापासून नाहीसा होतो. मग तो जीव सोयरेपणाचा व्यवहार करणार तरी कसा?

आपले नाव जगद्बंधू ! म्हणजे जगाचा बंधू म्हणजे भाऊ किंवा जगाला असलेला बंध. म्हणजे तेही नाव मोठ्या चमत्कृतीचे आहे. आपण तर जगाला सर्व प्रकारच्या बंधनातून सोडविता आणि नाव जगद्बंधू ! आपल्या ठिकाणी हे नावदेखील त्यातील प्रशस्तीमुळे यथार्थ वाटते.

जीव जेव्हा आपल्याला जीवाचेच रूप मानतो तेव्हा देहदृष्टिने तो जीव वेगळा असला तरी वेगळा उरत नाही. गुरूदेव आपण आणि तो जीव ऐक्यबोधानेच नांदू लागता.

आपल्याला साध्य मानून काही जीव आपल्या मूर्तीचे ध्यान पूजा करतात. पुष्कळ उपाय करतात. मनात हेतू असतो की गुरूदेव भेटावे. द्वैतभावातून जे अशी आपली भेट घेण्याची पराकाष्ठा करतात त्यांच्यापासून आपण कितीतरी दूरच रहाता.

जो ध्यान करून गुरूदेवांना आपल्या मनी मानसी साठवावे असे म्हणतो त्याच्या त्या देशात आपण पाऊलच टाकत नाही. जो ध्यानही विसरून आपल्याशी सामरस्य साधतो त्याच्यावर आपले प्रेम असते.

महाराज, कुणाला असे वाटते की शब्दाने स्तुती केली, स्तोत्रे गायली, वर्णन केले तर आपण साध्य व्हाल पण आपण सिध्द अहा, साध्य कसे होणार आपण? शब्दात आपण सापडणारच नाही. सर्वज्ञपणासाठी जे वेद प्रख्यात आहेत त्यांचे बोलणेही आपल्या कानापर्यंत पोचत नाही तर सामान्य जीवांचा काय पाड आहे? मौन हेच आपले जन्मराशीवरून काढलेले नाव आहे. मी आता आपले स्तोत्र गाण्याची हाव कशी धरू? जेवढे आपले रूप मला दृग्गोचर होते ती जर मायाच आहे तर भजन कशाचे करू? आपली सेवा करावी असा विचार केला

पण लगेच वाटते की सेवक आणि सेव्य असा द्वैतभाव आपण मनात आणला हाच द्रोह झाला. म्हणून मी आता आपले ध्यान करीत नाही, स्तोत्रे गात नाही किंवा पूजाही करत नाही. मी आपल्याहून वेगळा रहातच नाही.

कशाचीही अहंता घेऊ नये हे आपल्या पूजेचे वर्म मला समजले आहे. ध्यान म्हटले की ध्याता आला. पूजा म्हटले की पूजक आला आणि स्तोत्रे गावी म्हटले की स्तवनकर्ता आला. सगळ्या गोष्टी मला आपल्यापासून दूर नेणाऱ्या आहेत, जवळ आणणाऱ्या नाहीत. तेव्हा अद्वैत भावाने आपल्यात विरून जावे. हे आराध्यलिंगा, आपले खरेखुरे आराधन आहे हे मला कळले आहे. मीठ पाण्यात विरून जाऊन पाण्याला भजते तशा भावाने मी आपल्याला नमन करतो आहे. आपली मूर्ति समोर आली की मी हात जोडतो पण हात जोडता जोडता कुणाला कुणी नमस्कार करावयाचा अशी माझी स्थिती होते. अशा वृत्तिने मी आपल्याला वंदन केले मात्र! तोच रिकामा कुंभ समुद्रात शिरला की तो ओतप्रत भरूनच बाहेर येतो किंवा वात दिव्याला लागली की पेटून दिवाच होते. त्याप्रमाणे मी नमस्कार केल्याबरोबर निवृत्तिनाथमयच झालो. माझ्यात आणि माझ्या गुरूंत अंतराय राहिलाच नाही.

महाराज, आता मी गीतार्थ सांगतो, "Autobiography of a Yogi" ह्या ग्रंथामध्ये एक प्रसंग आहे. कुंभमेळ्यामध्ये युक्तेश्वरांना त्यांच्या गुरूंचे गुरू बाबाजी भेटले. कुंभमेळ्यातील बुवाबाजी ढोंग पाहून कंटाळा आला होता. अशावेळीच त्यांना बाबाजींनी बोलावले आणि "कुंभमेळा कसा वाटला?" असे विचारले.

युक्तेश्वरजी म्हणाले, "महाराज, आपली भेट होईपर्यंत मी तर हा मेळा पाहून निराशच झाला होतो." योगानंद पुढे लिहितात, युक्तेश्वर पुढे सांगू लागले, "गुरूदेवांच्यापेक्षा वयाने मी निदान दुप्पट मोठा असेन." पण ते मला म्हणाले, "बाळ पुष्कळांच्यामध्ये दोष दिसतात म्हणून सगळ्यांनाच दोषी धरू नये. या जगात सगळ्याच वस्तू मिश्र स्वरूपाच्या असतात, साखर आणि वाळू मिसळलेली असते. तेथे आपण शहाण्या मुंगीसारखे व्हावे. ती शोधून साखरेचा कण उचलते आणि वाळू सोडून देते. मेळ्यात पुष्कळ भोंदू साधू असले तरी मेळ्याला आशीर्वाद देण्यासाठी काही सिद्ध पुरुषही इथे येतात हे ध्यानात ठेवायचे."

मी म्हटले, "महाराज, पश्चिमेकडील अत्यंत बुद्धिमान शास्त्रसंशोधकांना सिद्धपुरुष भेटण्याची संधी मिळत नाही ते शास्त्र व तत्त्वज्ञान यात हा पारंगत असतात.

पण जडवादात बुडलेले असतात. त्यांना गुरूकृपेचा लाभ होत नाही. सर्व धर्मांचे ऐक्य त्यांच्या ध्यानात येत नाही आणि असे भय वाटते की हा दुरावा आणखी जास्त वाढेल.

बाबाजी म्हणाले, "तुम्हाला पूर्वेबरोबरच पश्चिमेबद्दलही जिव्हाळा आहे असे दिसते. तुमची उदारवृत्ति आहे, सर्वांच्यासाठी अंतःकरण कळवळते आहे. हे कळल्यामुळेच तुम्हाला इथे बोलावले. तुम्ही हिंदू व ख्रिश्चन धर्मांच्या ग्रंथांमध्ये मुळात एकवाक्यता कशी आहे यावर ग्रंथ लिहा."

मी म्हटले, "महाराज काय ही आपली आज्ञा? हे काम माझ्या हातून होईल काय?" बाबाजी हसून म्हणाले, "बाळा, अरे अशी शंका का घेतोस? कुणाचे हे सगळे काम आहे? सर्व क्रियांचा कर्ता कोण आहे?

भगवंताने माझ्या तोंडून जे वदवले आहे ते खासच प्रत्यक्षात होईल, ते पुस्तक लिहून झाले की आपण भेटूच तोवर आता निरोप.”

युक्तेश्वर पुढे बनारसला गेले आणि त्यांनी रात्रीच बायबल आणि सनातन धर्म यांचा अभ्यास सुरू केला. भगवान ख्रिस्ताची वचने उद्धृत  करून त्यांनी तौलनिक लेखन सुरू केले. लवकरच ते पुस्तक लिहून पूर्ण झाले. लेखनास सायासही पडले नाहीत.

श्रीरामकृष्ण परमहंसांच्या आयुष्यात तर असा प्रसंग आहे की, संप्रदाय चालविण्याची जबाबदारी ठाकुरांनी नरेंद्राच्या खांद्यावर टाकली. त्यांची प्रकृति एक दिवस अत्यंत अस्वस्थ झाली. अंतकाळ जवळ आला असे वाटून मंडळी शोकाकुल झाली. एकजण म्हणाला. “महाराज, आता आम्ही कोणाच्या तोंडाकडे पहावे.” हे ऐकून श्रीरामकृष्णांना फार दुःख झाले. क्षीण आवाजात ते म्हणाले. “नरेंद्र तुम्हाला शिकवील” ही जबाबदारी आपल्या शक्तीबाहेरची आहे असे वाटून नरेंद्र म्हणाला. “महाराज, हे माझ्याने होणार नाही.” त्याबरोबर क्षणमात्र त्याच्याकडे पाहून श्रीरामकृष्ण म्हणाले, “तू काय नाही म्हणतोस? तुझी हाडेसुद्धा करतील.”

पुढे काही दिवसांनी नरेंद्राला खोलीत हाक मारून त्याला त्यांनी ध्यानस्थ बसण्यास सांगितले. नरेंद्र बसला आणि लवकरच त्याचे बाह्य जगाचे भान नाहीसे झाले. काही वेळाने ध्यान विसर्जन करून पहातो तो श्रीरामकृष्ण जवळ बसले असून त्यांच्या नेत्रांतून अश्रू वहात आहेत! श्रीरामकृष्ण त्याचेकडे पाहून म्हणाले, “नरेंद्र, मजजवळ होते नव्हते ते सर्व तुला देऊन मी खराखुरा फकीर झालो. धर्मप्रचाराच्या कामी तुला या शक्तिचा उपयोग होईल.”

श्रीरामकृष्णांनी आपल्या सर्व शक्तिचे दान केल्याचे पाहून नरेंद्राचे डोळे भरून आले. ठाकुरांच्या आज्ञेप्रमाणे धर्मप्रसारासाठी विवेकानंद होऊन त्यांनी हाडाची काडे केली हे सर्वश्रुतच आहे.

या दोन्ही उदाहरणांत गुरूंची शिष्याला आज्ञा होती तर माउली गुरूंना प्रसन्न करून त्यांची कृपा मिळवून आणि गुरूंशी एकरूप होऊन गीतार्थाच्या निरूपणास सुरवात करीत आहेत. माउली म्हणत आहेत, “सोळाव्या अध्यायाच्या शेवटी समाप्तीच्या श्लोकात देवानी निश्चयात्मकरीतीने असा सिध्दान्त प्रस्थापित केला की अर्जुना, कार्य आणि अकार्य यांच्या व्यवस्थेबद्ल आणि अनुष्ठानाबद्दल शास्त्रच एकमेव प्रमाण आहे. तुझे सर्व जीवन शास्त्रमर्यादेत चालू दे.”

अर्जुन म्हणाला, “हे असे कसे घडणार? शास्त्राशिवाय कर्माला सुटका नाही हे जमणार तरी कसे? तक्षकाच्या डोक्यातला मणी काढावा, सिंहाच्या नाकातला केस मिळवावा त्यात तो मणि ओवावा आणि मगच कंठभूषण करावे असेच हे आहे. नागमणी आणि सिंहाचा केस मिळाला नाही की, काय मोकळ्या गळ्याने हिंडावे? दुसरा काही दागिना गळ्यात घालूच नये काय?

या शास्त्रामध्ये असंख्य मतभेद. ते सगळे मतभेद पाहून त्यात एकवाक्यता कुठे दिसते काय हे हुडकून काढून मगच शास्त्रार्थ हाती लागणार आधी ही एकवाक्यता होणे. कठीण त्यात त्या शस्त्रार्थाप्रमाणे अनुष्ठान

करण्यास लागणारा वेळ कसा मिळणार? इतका निवांतपणा कुठून आणणार? एवढे आयुष्य तरी लाभणार आहे काय? साधनेसाठी शास्त्रार्थ, पैसा, सांगितलेले ठिकाण, वेळ ह्या सगळ्या गोष्टी सगळ्यांना कशा काय अनुकूल होणार? म्हणून शास्त्रवचनानुसार आचरण करणे हे फारच असंभवनीय वाटते." या शंकेचे उत्तर मिळण्यासाठी अर्जुनाने जी प्रस्तावना केली ती सतराव्या अध्यायाचा विषय आहे. सर्व भोगांविषयी निरिच्छ, सर्व कलांमध्ये प्रवीण आणि श्रीकृष्णासही नवल वाटेल असा दुसरा श्रीकृष्ण अर्जुनत्व घेऊन नटला आहे, असा अर्जुन बोलू लागला, अर्जुन म्हणजे शौर्याला सापडलेला आधारच आहे. तो सोमवंशाचे भूषण आहे. दुसऱ्यास सुख होईल असा उपकार करणे ही त्याची लीला आहे. खरे म्हणजे एकदा अर्जुनत्वाने नटलेला दुसरा श्रीकृष्णच म्हटल्यावर त्याच्या ठिकाणी कुठल्याही प्रकारचे अज्ञान संभवतच नाही. पण आपणच प्रश्न विचारावा, आपणाच उत्तर द्यावे, आणि ह्या संवादातून जगाचे कल्याण साधावे, ही उपकार करण्याची भावना ह्या सोहळ्यामागे आहे. बुद्धिचा प्रियोत्तम, ब्रह्माविद्येचे विश्रान्तिस्थान, आणि देवांच्या मनोधर्माप्रमाणे वागणारा देवांच्या नित्य सान्निध्यात असणारा आणि त्यांना अनुसरणारा अर्जुन म्हणाला, "तमालश्यामा श्रीकृष्णा, आपण जे सांगितले ते मी अगदी मनापासून ऐकले. अहो आपण म्हणजे आमच्या इंद्रियांना अत्यंत भाग्याने प्राप्त झालेले प्रत्यक्ष बह्मच अहा. आम्ही आपले शब्द ऐकावे ते जीवाभावाने झेलावे, त्याप्रमाणे आचरण करण्याची जिवापाड पराकाष्ठा करावी हे तर खरेच आहे. पण मला आपल्या बोलण्यात संशयास्पद अशा कितीतरी गोष्टी वाटतात.

शास्त्रावाचून प्राण्यांना आपला मोक्ष दिसत नाही असे शास्त्राचा पक्ष घेऊन आपण कसे काय म्हणता? देवा, शास्त्रात सांगितलेली अनुकूलता दुर्लभ आहे. सांगा, उपासनेला योग्य असलेले ठिकाण कसे मिळणार? मनुष्य व्यावहारिक जीवन जगत असताना त्याला वेळ कसा सापडणार? अभ्यासाला सहाय्यभूत होणारी साधनसामुग्री कशी जमवता येणार? साधना करण्यासाठी पूर्वकर्म अनुकूल हवे, बुद्धिचे सहाय्य हवे आणि म्हणून म्हणतो की शास्त्राभ्यास करावा हे अशक्यप्रायच आहे. आणि म्हणून काही लोक शास्त्राभ्यासाच्या पहाडावर नखी लागत नाही म्हणून शास्त्राची वाटाघाट सोडतात आणि शास्त्राचा निर्णय घेऊन शास्त्रार्थाप्रमाणे पवित्र आचरण करूण परलोकात जे नांदत आहेत त्यांच्यासारखे आपण व्हावे म्हणून इच्छा करतात व त्या पोचलेल्या पुरूषांप्रमाणे आचरण ठेवतात त्यांना काय गति मिळते? दातारा, धड्यात जशी अक्षरे असतात तशीच हुबेहूब काढून बाळ लिहायला शिकतो. आंधळा डोळस माणसाला पुढे करून त्याच्यामागे त्याच्या आधाराने चालतो आणि मुक्कामास पोचतो. त्याचप्रमाणे ज्यांचे आचरण शास्त्रशुद्ध आहे तेच प्रमाण मानून तोच कित्ता समोर ठेवून आपल्या श्रद्धेने जे उपासना करतात त्यांना काय गति मिळते? हे लोक शिवादिक देवांची पूजा करतात, भूमिदानासारखी महादाने देतात. अग्निहोत्रादि यज्ञयाग करतात आणि ही सगळी कामे हे उपासक मोठ्या श्रद्धेने करतात. पुरुषोत्तमा, ह्या मंडळींना सत्त्व, रज, तम यापैकी कोणती गति मिळते?"

देवानी हा प्रश्न ऐकला आणि त्याचे उत्तर देण्यास प्रारंभ केला. तो श्रीकृष्ण वैकुंठपीठातील आराध्य दैवत आहे. वेदरूपी कमलातील पराग आहे. त्याच्या अंगच्छायेमध्ये जग जगते. स्वभावतः असलेली काळाच्या ठिकाणची प्रबलता, लोकोत्तरता आणि प्रौढपण, अद्वैतत्त्व, गूढता आणि आनंदघनता हे सगळे गुण त्या भगवंताच्या ज्या सामर्थ्याने बलिष्ठ होतात त्या गुणांचा पूर्ण उदय ज्याच्या ठिकाणी आहे तो श्रीकृष्ण आपल्या मुखाने अर्जुनाला उपदेश करू लागला.

देव म्हणाले, "अर्जुना, तुझा आग्रह मला समजतो. शास्त्राभ्यासाची अडचण तुला वाटते आहे ती मला

कळते आहे. पण प्रबुध्दा, नुसत्या श्रध्देच्या जोरावर त्या परमपदाला झोंबू पहाशील तर ते सोपे नाही. अर्जुना, केवळ श्रध्दा आहे म्हणून कोणी पोहचू शकत नाही. ब्राह्मण अंत्यजाच्या संसर्गाने अंत्यज होत नाही काय? गंगोदक मद्याच्या भांड्यात ठेवले तर ते गंगोदक म्हणून स्वीकारता येईल का? विचार करून बघ. चंदन उगाळले व त्याचा लेप केला तर ते शीतल आहे खरे पण चंदनाचे खोड पेटले तर हातात घेतल्याबरोबर ते हात भाजून टाकल्याशिवाय राहील काय? हिणकस सोने आटविण्याच्या मुशीत चोख सोने पडले तर त्या मुशीतील हिणकसाशी संयोग होऊन हे चोख सोने आहे असे समजून विकत घेणाऱ्याचे नुकसान करीत नाही का? त्याप्रमाणे श्रध्देचे मुळचे रूप अगदी चोख आहे हे खरे असले तरीपण प्रत्येक प्राण्याच्या ठिकाणी असलेल्या गुणाप्रमाणे त्या श्रध्देचे रूप पालटते.

अनादि मायेच्या प्रभावामुळे प्राणी स्वभावतःच त्रिगुणाचे वळलेले असतात. हे तीन गुण जरी एकत्र असले तरी त्यातल्या एकाच गुणाचा एका वेळी उत्कर्ष असतो. दोन गुण खाली बसतात आणि तिसरा ताबा घेतो, आणि त्या त्या वेळी जो गुण प्रबळ असेल त्याप्रमाणे प्राण्याची वृत्ति त्या त्या वेळी होते. वृत्ति उठतात, विरतात, पुन्हा उठतात. त्या वृत्तिनुसार मन तसतसे हळूहळू तयार होत जाते. सात्त्विक वृत्ति वरचेवर उठत राहिली की प्रबल होऊ लागते. आणि मन सात्त्विक होत जाते. हीच स्थिती राजस व तामस गुणांच्या बाबतीत घडते आता मन ज्या प्रकारचे असते त्याप्रमाणे क्रिया घडतात आणि त्या क्रिया ज्या गुणास अनुसरून घडतात त्याप्रमाणे एक देह पडल्यावर दुसरा देह घेतात. नवा देह घेतात. नवा देह कोणत्या प्रकारच्या वृत्तिस अनुकूल मिळावयाचा हे ह्या जन्मातील वृत्ति व क्रिया यावर अवलंबून असते हे ध्यानात आले ना अर्जुना? आणि असे घडत असल्यामुळे बीज नाहीसे होते, झाड येते. झाड नाहीसे होते, बीज तयार होते. त्याप्रमाणे कोटी कल्पे गेली तरी झाडाची जात जगातून नष्ट होत नाही. ही असंख्य जन्मांतरे होत असताना प्राण्यांचे त्रिगुणत्व बदलत नाही. फक्त त्यातला कोणता तरी एक गुण कर्मानुसार बलिष्ठ होत जातो. आणि म्हणूनच प्राण्यांच्या ठिकाणी जी श्रद्धा असते तीही त्या प्राण्यांच्या स्वाभाविक गुणासारखी होते. कदाचित जेव्हा सत्त्वगुण वाढतो तेव्हा तो ज्ञानाला हाक मारतो. इतर दोण गुण सत्त्वाला विरोधी आहेत. सात्त्विक श्रद्धा जेव्हा मोक्ष फळापर्यंत जाते तेव्हा रज आणि तम तरी स्वस्थ कसे रहाणार? ते पण सामर्थ्यवान होऊ पहातात. सत्त्वाचे बळ मोडून जेव्हा रजोगुण आकाशापर्यंत वाढतो तेव्हा तो श्रद्धा कर्म केरसुणी होते. सरकट सर्व प्रकारची कर्म होऊ लागतात. मग जेव्हा तमाची आग उठते तेव्हा श्रद्धेचा भलताच प्रकार होऊन ती भलत्या भोगाकडे वळते. कर्म चांगल्या रीतीने जाणणाऱ्या अर्जुना, ह्या जीवग्रामामध्ये सत्त्व, रज आणि तम यांच्या तीन गुणांपेक्षा दुसरे काही नाही. विषवल्ली, ऊस, मिरी ह्या सर्वांना एकच पाणी जाते पण विषवल्ली मारक, ऊस गोड व मिरी तिखट होतात. त्या त्या झाडातील रसाशी संयोग झाला की पाणी तसतशी चव घेते, परिणाम करते. त्याप्रमाणे श्रद्धा सत्त्वगुणी देहात सात्त्विक, रजोगुणी देहात राजस आणि तमोगुणी देहात तामस होते. काजळ आणि शाई यांच्या रंगात जसा काही फरक नाही त्याप्रमाणे तमाच्या आधिक्यात जो जगतो आणि मरतो त्याच्या ठिकाणी श्रद्धा तमोगुणाचीच होते आणि तमाचे परिणाम करते. हा सगळा विश्वपसारा केवळ श्रद्धेचा ओतलेला आहे. पण प्राणीच तीन गुणांचे असल्यामुळे त्यांच्या श्रद्धेमध्येही तीन प्रकारची लक्षणे दिसतात. झाड काय प्रकारचे आहे हे फुले पाहून कळते, मनात काय आहे हे बोलण्यावरून कळते आणि या जन्मातील भोगावरून पूर्वजन्मीचे कर्म कशा प्रकारचे होते ते कळते. त्याप्रमाणेच ज्या ज्या लक्षणांनी श्रद्धेची तिन्ही रूपे समजून येतात तो प्रकार सांगतो ऐक. अर्जुना, ज्यांचा पिंड सात्त्विक श्रद्धेचा असतो त्यांची बुद्धि जास्तीत जास्त वेळ स्वर्गप्राप्तीचा विचार करते आणि मग स्वर्गप्राप्तीसाठी कसकसे यत्न करावे ते ते लोक ठरवितात. सर्व विद्यांचे अध्ययन करतात. यज्ञक्रियेत निष्णात

होतात आणि ह्या सात्त्विक क्रियांचे फल म्हणून देवलोकी जातात. राजस श्रद्धेने जे घडलेले असतात ते, वीरेशा, अर्जुना, भूते, राक्षस यांची भक्ति करतात. तामस श्रद्धा ही पापराशी आहे. निर्दयपणामुळे अतिकर्कश असते. जीवांच्या वधाचा बळी देऊन ते तामसी श्रद्धावान लोक भूत, प्रेत यांच्या अमंगल समुदायाचे पूजन करतात. अशा प्रकारचे हे लोक तमोगुणाचे सार काढून निर्माण झालेले आहेत असे वाटते. ते तामस श्रद्धेचे घरच आहेत.

जगामध्ये तीन लक्षणांची ही श्रद्धा आहे. त्यांचे वेगवेगळे लक्षण मी तुला यासाठी सांगितले आहे कारण ज्याची वृत्ति सात्त्विक आहे आणि जो त्या आपल्या सत्त्वगुणाची डोळ्यात तेल घालून जपणूक करतो त्याला मोक्ष कसा मिळेल याचे भय बाळगण्याचे मुळीच कारण नाही. तो मनुष्य ब्रह्मसूत्रांचा अभ्यास न करू दे, सर्व शास्त्रांचा अभ्यास न करू दे, त्याच्या हाती स्वतंत्र सिध्दांत ही नसू दे, फक्त त्याने राजस आणि तामस या दोन्ही श्रद्धांचा त्याग केला आणि सात्त्विक श्रद्धा जतन केली म्हणजे पुरे. एकदा सात्त्विक वृत्ति अंगी बाणली की तो वडिलांचे अनुकरण करतो. अर्जुना, हे जे वडील असतात त्यांनी श्रुतिस्मृतींचे अर्थ जाणून घेतलेले असतात. ते अर्थ मनात बाणून घेऊन आणि त्याप्रमाणे आचरण करूनच ते अर्थ जगाला प्रकट करीत असतात. अशा वडिलांच्या पावलांवर पावले ठेवीत हे सात्त्विक श्रद्धावान पुरुष चालतात आणि मग त्या थोर थोर महात्म्यांना जे फळ मिळते ते मिळवतात.

आणि ते योग्यच आहे नाही का? एखाद्याने पुष्कळ प्रयत्नाने दिवा लावला तर आणखी दुसरा पुरुष त्या दिव्यावर आपला दिवा लावून घ्यावा म्हणून त्याने आपल्या दिव्याची वात पहिल्या वातीवर धरली तर तो नवा दिवा प्रकाशमान होतोच. त्याची काही फसवणूक होत नाही त्याला प्रकाश मिळतोच. दात्याने पुष्कळ पैसा खर्च करून धर्मशाळा बांधली, पुष्कळ मोठी इमारत बांधली तर त्याचे सुख पांथस्थ घेतोच. एखाद्याने तळे बांधले तर काय फक्त त्याचीच तहान भागते काय? स्वयंपाकी स्वयंपाक करतो मग ते अन्न काय तो एकटाच खातो? इतरांनाही मिळते ना? जास्त काय सांगू? गौतमालाच गंगा आणि इतरांना काय ती ओहोळ झाली? इतरांचीही ती पापहर्ती झालीच आहे ना? त्याप्रमाणे आपआपल्या अधिकारानुसार शास्त्रांना अनुसरणाऱ्यांचे अनुकरण करणारा श्रद्धावान मूर्ख असला तरी तरून जातो. पण शास्त्राच्या नावाने आरंभ करणेही काही माणसे जाणत नाहीत. शास्त्रज्ञानाला ते शिवेवरही टेकू देत नाहीत. वडिलांचे आचरण पाहून ते त्यांना वेडावून दाखवतात. पंडिताना पाहून चुटक्या वाजवितात, त्याचा तिरस्कार करतात. आपल्या अभिमानाने श्रीमंतीच्या गर्वाने पाखांड्यांची तपे स्वीकारतात. शास्त्रबाह्य आचार स्वीकारतात. आपल्या व दुसऱ्याच्या अंगात शस्त्रे खुपसून रक्तमांसाने भरलेली पात्रे पेटत्या कुंडात ओततात, चेड्याच्या तोंडाला लावतात. नवस केलेल्या देवांना मुलांचा बळी देतात. क्षुद्र देवता श्रेष्ठ आहेत अशा आग्रहाच्या उत्कर्षाने सात सात दिवस अन्नत्याग करून रहातात. अर्जुना, जे पेरले तेच उगवते हे त्यांच्या ध्यानी येत नाही. आपल्याला व दुसऱ्याला पीडा देऊन आपल्या तमोगुणी अंतःकरणरूपी शेतात ते हेच बीज पेरतात. स्वतःला हात नाहीत आणि नावेचाही आश्रय करीत नाहीत अशा पुरुषांची भर समुद्रात जी दुर्दशा होते ती त्याची होते. जो रोगी वैद्याचा द्वेष करतो, लाथेने औषधे उडवतो, तो यातनामुक्त कधी तरी होईल काय? डोळसाच्या द्वेषाने जो आपले डोळे काढतो तो माजघरात आंधळा होऊन पडतो ना? तशी त्या असुराची स्थिती होते. ते शास्त्राची निंदा करतात आणि योग्य असा शास्त्राचा मार्ग सोडून देऊन मोहाने अरण्यात धावत सुटतात. काम जे करवील ते करतात. क्रोध ज्याला मारवील त्याला मारतात. किंबहुना मला ते दुःखरूपी दगडात पुरतात कारण व आपल्या दुसऱ्याच्या देहाला जे

जे काही दुःख देतात ते मला आत्म्यालाच देतात तो सगळा शीण मलाच सहन करावा लागतो. अर्जुना, हे सगळे वर्णन करतानाही मला दुःख होते आहे. पण ते टाळता येत नाही कारण वाचेच्या पदरानेही त्या पाप्यांना स्पर्श करू आहे. पण प्रेत बाहेर काढण्याकरिता स्पर्श करावाच लागतो. अंत्यजास दूर हो असे सांगण्यासाठी त्याच्याशी बोलावेच लागते. धुण्यासाठी मलास स्पर्श करावा लागतोच. शुद्ध होण्याची इच्छा असल्याने तो संसर्ग दोषास्पद मानता येत नाही पण अर्जुना, तू जेव्हा अशा आसुरी वृत्तिचे लोक पहाशील तेव्हा माझे स्मरण कर बरं का. एरवी दुसरे कोणतेही प्रायश्चित इथे उपयोगी पडत नाही.

पार्था, म्हणूनच हा सर्व अनर्थ टाळण्यासाठी सात्त्विक श्रद्धा नीट जतन केली पाहिजे. ती एकच तारक आहे. अशीच संगत धरावी की ज्याच्यामुळे सात्त्विक भागाचे पोषण होईल. सत्त्ववृद्धि होईल असा आहार घेत जावे. स्वभाव कसा असावा, त्यातील कोणता भाग काढावा याला बलिष्ठ हेतू आहारावाचून दुसरा नाही. वीरा, तू प्रत्यक्ष पहातोसच की सावध असलेल्या माणसाने जर मदिरा घेतली तर त्याचक्षणी तो उन्मत्त होऊन रहातो. जो मनसोक्त अन्न खातो तो वात श्लेष्मादिकांनी व्यापला जातो. अंगात ताप भरला की, एरवी थंडावा देणारे दूध अपायकारक ठरते. अमृत घेतले की मरण निवारले जाते आणि विष मरण दिल्यावाचून रहात नाही. म्हणून हे नेहमी ध्यानात ठेवावे की, जसा आहार घ्यावा तसे रक्त, मांस इत्यादी शरीर घटक तयार होतात आणि जसे शरिरात घटक असतील तसाच भाव अंतरात येतो आणि वाढतो. चुलीवर भांडे ठेवले की भांडे तापते आणि त्या भांड्यातले पाणीपण तापते. त्याप्रमाणे शरिरात ज्या प्रकारचा धातू असेल त्याप्रमाणे चित्तवृत्ति होते. सात्त्विक रस आपण आहारात ठेवला तर सत्त्वाची वाढ होते. राजस, तामस रस घेतला तर त्या त्या प्रकारची वृत्ति होते."

एक महात्मा राजगुरू होते. ते नेहमी राजवाड्यात प्रवचनास जात. एक दिवस दुपारी जेवण करून महात्मा राजमहालात एकटेच विश्रांती घेत होते. खुंटीला एक मौल्यवान हार टांगलेला होता. राजगुरूंची नजर त्या हारावर गेली आणि त्यांच्या मनात लोभ उत्पन्न झाला. त्यांनी खुंटीवरचा हार आपल्या झोळीमध्ये घातला आणि आपल्या झोपडीत ते परत आले. हार सापडेना म्हणून राजवाड्यात तपास सुरू झाला. महात्माजींचा संशय घेण्याचे कारण नव्हते व नोकर निरपराध होते. हार काही केल्या सापडेना. चोवीस तास झाले आणि मग महात्म्यास पश्चात्ताप झाला ते हार घेऊन दरबारात हजर झाले. राजाच्या पुढे हार ठेवून ते म्हणाले, "माझी बुध्दि भ्रष्ट झाली आणि मी हा हार काल चोरून नेला. माझ्या मनात लोभ उत्पन्न झाला. आज माझी चूक मला कळली आणि मी पळत आलो. मला सगळ्यात वाईट वाटले की, मी चोरी केली आणि नोकरावर आळ आला." राजा हसून म्हणाला. "आपण हाराची चोरी कराल हे अशक्य आहे. बहुधा चोराने आपले पाय धरले आणि ही चोरी मीच केली असे आपण केवळ करुणाबुद्धिने म्हणण्यास सुरवात केली आहे."

महात्मा म्हणाले, "राजा, ही चोरी मीच केली आहे. मात्र मला जे अन्न काल वाढले ते कुठून आले त्याचा तपास कर. अन्नदोषाने माझी बुद्धि भ्रष्ट झाली आणि मला लोभ सुटला. त्या अन्नाचा जास्तीत जास्त अंश शरिरातून जेव्हा निघून गेला तेव्हा मला पुन्हा सुविचार सूचला. तपास कर राजा हे अन्न कसले होते?"

तपास करता करता कळले की, ज्या भाताची खीर राजगुरूंना वाढली गेली ते तांदूळ चोरीच्या जप्त मालापैकी होते. देव ह्या अन्नदोषापासून दूर रहा असा इषारा म्हणूनच देत आहेत.

अनुक्रमणिका

एका राजाच्या घरी एक संत आले. काही गप्पागोष्टी झाल्यावर राजाने विचारले, “महाराज, हक्काची भाकरी कोणत्या भाकरीला म्हणावे बरे?”

संत म्हणाले, “शहराबाहेर एक म्हातारी रहाते. तू तिच्याकडे जा आणि तिला म्हणावे आई, मला हक्काची भाकरी दे. मग तुला कळेल हक्काची भाकरी कोणत्या भाकरीला म्हणावे ते.”

राजा गावाबाहेरच्या म्हातारीच्या झोपडीत गेला. त्या म्हातारीला म्हणाला, “आई मला हक्काच्या भाकरीची भिक्षा घाल.”

म्हातारी म्हणाली, “राजन्, माझ्याकडे एकच भाकरी आहे. अर्धी हक्काची आहे, अर्धी हक्काची नाही.”

राजाने विचारले, “आई, हक्काची नाही म्हणजे काय?”

म्हातारी म्हणाली, “राजन्, मी सूत कातून पोट भरते. सूत काढताना मी माझा दिवा लावला होता. अर्धी गुंडी काढली आणि इतक्यात एक मिरवणूक आली. त्या मिरवणुकीत बरेच दिवे होते. त्या उजेडात मी अर्धी गुंडी काढली. ती गुंडी विकून त्या पैशांतून ही भाकरी केली आहे. मिरवणुकीचा उजेड माझ्या हक्काचा नव्हता. तो मी वापरला आणि मग माझ्या ध्यानात आले की, हा उजेड माझ्या हक्काचा नव्हे. म्हणून म्हणते की, यातील अर्धी भाकरीच माझ्या हक्काची आहे.”

राजाने हे ऐकून म्हातारीला वंदन केले. देवांच्या ह्या आहाराबद्दलच्या विवेचनास म्हणून फार महत्त्व आहे.

जे. कृष्णमूर्तींच्या सांगण्यातही अन्न कमविण्यासाठी आपण कोणत्या प्रकारचा उद्योग करतो याचा विचार करण्यावर नेहमी भर असतो. अन्न तर शुद्ध असावेच पण ते अन्न ज्या पैशातून विकत आणले आहे तो पैसाही शुद्ध असला पाहिजे. पैसा शुद्ध याचा अर्थ उद्योग शुद्ध असला पाहिजे, तरच त्या शुद्ध अन्नावर पोसलेला देह सात्त्विक वृत्ति निर्माण करतो आणि सात्त्विक वृत्तिशिवाय मोक्षाची गोष्टच बोलायला नको. तेव्हा right means of living याचा विवेक नेहमी झालाच पाहिजे. हे तर अन्न शिजविण्याबाबत जास्तच विचारार्ह आहे. शाकाहारी माणसाच्या जेवणात दूध, दही, तूप, भाज्या, डाळी तांदूळ, गहू हे पदार्थ येतात. यातल्या प्रत्येक पदार्थाची शिजण्यापूर्वीही शुद्धी होणे आवश्यक आहे. स्वयंपाक करणारी गृहिणी स्वयंपाकघराची शुद्धी करून, स्नान करून कामास सुरवात करते. स्नान करतानाही ती गंगाष्टक म्हणत अंगावर पाणी घेत असते. शरिराचा आणि मनाचा मल क्षालन करून आपल्या घरातील आबाल-वृद्धांच्या आहाराचा विचार करून स्वयंपाक सुरू करते. तो स्वयंपाक करीत असतांना त्या स्वयंपाकाने संतुष्ट होणारी आपल्या घरची मंडळी तिला दिसत असतात. त्यांच्यावर मनातल्या मनात प्रेमाचा वर्षाव करीत ती ताक करते, भाजी चिरते, डाळ शिजत लावते. पाठ केलेले एखादे स्तोत्र तोंडाने चालू असते आणि स्वयंपाक होत येतो मग वाढप.

अनुक्रमणिका

आमच्या थोरल्या सरकारांच्या मोठ्या भगिनी तान्हू अक्कासाहेब म्हणत. “हे बघ, आपण वाढायला उभे असावे. प्रत्येकाच्या पानाकडे लक्ष असावे. वाढताना ज्याला जेवढे जे हवे असेल ते व तेवढेच वाढता आले पाहिजे. दुसरे ध्यानात ठेव की आपण वाढत असलो की कुणालाही मागायला लागता कामा नये. आपण सगळ्यांच्या पानाकडे असे लक्ष ठेवायचे की जेवणाऱ्याने मागण्यापूर्वीच तो पदार्थ पानात वाढला गेला पाहिजे.” त्या नेहमी पंगत वाढताना असे सांगत असावयाच्या.

अय्यर मास्तर कोल्हापूरला फार प्रसिद्ध इंग्लिशचे शिक्षक. ते थिऑसॉफिस्ट होते व नेहमी घरी येत. त्यांनी एकदा सांगितले की आमची आजी आम्हाला सांगायची पानात अन्नाचा कण टाकायचा नाही. मी लग्न होऊन घरात आल्यावर तुझ्या आजोबांनी सांगितले, “माझ्या पानाजवळ पाण्याचे एक भांडे आणि सुई ठेवत जा.” मी पन्नास वर्षोत करीत आले पण त्याचा उपयोग काय हे मला कळले नाही. मग मी एक दिवस विचारले.” आपण मला हे पाण्याचे भांडे आणि सुई ठेवायला सांगितली मी ठेवत आले पण त्याचा उपयोग काय हे मला अजून कळले नाही. आपण सांगितले म्हणून मी केले पण आता विचारते की हे कशासाठी?”

ते हसून म्हणाले, “मी विसरूनच गेलो. मी ते एवढ्यासाठी सांगितले होते की तुझ्या हातून वाढताना आणि मासा हातून जेवताना एखादे शीत ताटाबाहेर पडले तर सुईने उचलून पाण्याच्या भांड्यात टाकणार होतो पण तू इतके जपून वाढत होतीस आणि मी इतके जपून जेवत होतो की ती वेळच कधी आली नाही. आता उद्यापासून ठेवूच नको.” तेव्हा बाबा असे जेवावे आणि अर्थात असे अभिप्रेत की असे वाढावे.

आहाराच्या बाबतीत वाढप हे असे होणे जरूर आहे. आमचे आजोबा इचलकरंजी सरकार म्हणत, “आमचे आचारी स्वयंपाक करतात, त्यांच्या मनात घोळत असते की ह्यातले आम्हाला उरेल ना? करणारा ह्या बुद्धिने करतो. वाढपी त्या बुद्धिने वाढतो. घरच्या बाईने स्वयंपाक केला आणि वाढले की ती मनाशी म्हणत असते मी केलेले सगळ्यांना आवडू दे. सगळी पोटभर खाऊ देत. सगळे संपले तर छानच. मला काही उरले नाही तरी चालेल.”

यासाठीच आमच्या इथल्या अन्नाला चव असत नाही.

मालूताई, आणि त्यात हे सगळे अन्न घरोघर भगवंतास प्रथम समर्पण करून मगच ग्रहण केले जात होते. बुद्धि सात्त्विकच असावी यासाठी ही जागरूकता होती आणि ती आजही रक्षणीयच आहे नाही का?

म्हणूनच देव आहाराचे विवेचन बारकाईने करीत आहेत. ते म्हणाले, “अर्जुना, सात्त्विक आहार कोणता, राजस, तामस आहार कोणता हे सगळे विवेचन करतो. ऐकण्याच्या बाबतीत आदर ठेव. आहाराचे तीन प्रकार कशाने झाले तेही सांगतो. पार्था, जेवणाऱ्याच्या रुचीप्रमाणे अन्न तयार केले जाते जेवणात तर जगात तीन गुणांचा गुलाम आहे. कर्ता भोक्ता असा जीव तीन गुणांमुळे तीन प्रकारचा स्वभावतःच होतो आणि सगळीच कर्मे तीन प्रकारांनी करतो.

अनुक्रमणिका

म्हणून आहार, यज्ञ, तप, दान व इतर सर्व व्यवहार जीवांच्या ठिकाणी तीन प्रकारची दिसतात. त्यात आता आधी सात्त्विक आहाराचे लक्षण सांगतो ते नीट ऐकून घे.

जेव्हा दैवयोगाने भोक्ता सत्त्वगुणाकडे वळतो तेव्हा मधुर रसाकडे त्याची स्वाभाविक वृत्ति वळते. ते पदार्थ स्वभावतः चांगले रसभरित असतात, जे गोड आणि स्निग्ध असतात आणि जे चांगले शिजलेले असतात असे पदार्थ त्या जीवाला आवडतात. त्याला आवडणारे जिन्नस आकाराने बेढव असत नाहीत. ते स्पर्शाला मऊ असतात, जिभेला आवडणारे चवदार असे असतात. रसाने जे जिन्नस भरलेले असतात. त्यांची साल पोकळ असते, त्यांच्यामध्ये ओलेपणा भरलेला असतो. अग्निच्या उष्णतेपासून ते सुटलेले असतात. गुरूमुखातून येणारी अक्षरे जशी मोजकी असली तरी त्याचा परिणाम फार चांगला असतो त्याप्रमाणे हे पदार्थ थोडे खाल्ले तरी अपार तृप्ती देतात. मुखामध्ये हे पदार्थ मधुर लागतातच पण ते पोटात गेल्यावरही हितकारक होतात. सात्त्विक मनुष्यांची अशा अन्नावरील प्रीती वाढत असते. सात्त्विक अन्न हे अशा प्रकारचे असते. त्या अन्नामुळे आयुष्याचे नित्य नवे रक्षण होत असते. जेव्हा सात्त्विक आहाररूपी मेघ देहात वर्षाव करतो तेव्हा आयुष्यरूपी नदी दिवसेंदिवस वाढत जाते. दिवसाच्या वृद्धिला जसा सूर्य तसा हा सात्त्विक आहार खरोखर सद्बुद्धि पोसणारा होतो. शरिराला आणि मनाला बळाचा आश्रय करून देणारा आहार मिळाला की मग रोगाला आस्तित्व कसे मिळणार? हा सात्त्विक आहार मिळणे म्हणजे आरोग्य भोगण्यासाठी शरिराचे भाग्यच उगवले असे मी समजतो. सत्त्वगुणी अन्नामुळे सुखाचेच देणे घेणे होऊ लागते. आनंदाशी सख्य वाढते. त्या आहारामुळे शरिराच्या आतबाहेर फार चांगला परिणाम घडतो. तो आहार शरिरावर अंतर्बाह्य उपकार करतो.

आता रजोगुणी मनुष्याला ज्या रसांची प्रीति आहे त्यांचीही प्रसंगानुसार स्पष्टता करतो. या मंडळींना कडू, आंबट, खारट, अति उष्ण, तीक्ष्ण, रुक्षा, दाह करणारे असे पदार्थ फार प्रिय असतात. काळकूट विषाप्रमाणे जे कडू जहर आहेत असे पदार्थ त्यांना आवडतात. ते खाल्ल्यावर प्राण जात नाहीत एवढाच त्या पदार्थात आणि काळकूट विषात फरक. बाकी चव तशीच. चुन्यापेक्षाही जिभेला जास्त चटका देणारे आंबट ते खातात. कणीक मळताना पाणी व तेव्हढे मीठ घालतात. इतर पदार्थांतही मीठ असेच प्रमाणाबाहेर घातलेले असते. कारण रजोगुणी माणसांना अतिशय खारट पदार्थ खाणे आवडते. जे पदार्थ ते खातात ते इतके ऊन असतात की तो जसा काही अग्निच आहे. कढत पदार्थाच्या वाफेच्या टोकावर वात धरली तरी ती पेटेल असे कढत पदार्थ ते खातात. भयंकर वावटळीचा वारा जसा झोंबतो किंवा पहारीचा घाव बसला की जशा वेदना होतात तसे झणझणीत तोंडी लावणे त्याला आवडते. राखेपेक्षा कोरडे आत बाहेर जे सारखेच रूक्ष आहेत असे पदार्थ त्याला आवडतात. जिभेला दंश झाल्याप्रमाणे झोंबल्याशिवाय त्याला पदार्थ आवडत नाहीत. ते पदार्थ खाताना दात परस्परावर आपटत राहिले की त्याला संतोष होतो. मुळचे झणझणीत पदार्थ आणखी मोहरी वगैरे लावून तो तिखट करतो आणि मग खाताना नाकातोंडातून वाफा निघाल्या की त्याला बरे वाटते. आगीला मागे सारील अशी रायती त्याला प्राणापेक्षा प्रिय वाटतात. जिभेने वेडा केलेला तो पुरुष तोंडाच्या वखवखीला पुरेसा न पडून पोटात जणू काय धडाडलेला अग्निच भरतो. आता हे असले जेवण केले की अंगाचा दाह सुरू होतो. त्याला भुईवर बसून चैन पडत नाही का अंथरूणावर झोपून बरे वाटत नाही का पाण्याचे भांडे तोंडापासून सुटत नाही. पार्था, अरे त्याने हा आहार पोटात घातला नाही तर शरिरात झोपलेले रोगरूपी सर्पच जागे केले आहेत असे समजावे. त्याने हा अनर्थ ओढवून घेण्यासाठी माजवणच पोटात घातलेले असते. मग एकमेकाच्या स्पर्धेने एकदम रोग उठतात. राजस आहाराचे फळ जे दुःख ते त्याच्या पदरात पडते. अर्जुना, तामस गुणाच्या

माणसाला कोणता आहार आवडतो हे मी विस्ताराने तुला सांगितले तर तुला किळसच येईल. म्हैस जसे उष्टे, कुजलेले अन्न कसे खावे आपल्याला अपाय होईल की काय असा विचार न करता आंबोण खाते तसे अन्न तो खातो, दुपारी शिजलेले आहे की आदल्या दिवशीचे आहे याचा विवेकच त्या तमोगुणी पुरुषाजवळ नसतो. तो शिळेच खात असतो. अर्धेच उकडलेले किंवा पार करपूनच गेले आहे असे नीरस तो आनंदाने खातो. ज्या अन्नात ते तयार झाल्यावर रस आहे ते अन्नच नव्हे अशी त्याची प्रचीति असते. समज चुकून जर कधी उत्तम अन्न मिळालेच तर वाघ जसा भक्ष्य कुजेपर्यंत वाट पहातो तसा तो ते अन्न बिघडेपर्यंत थांबतो आणि मग खातो. बायकामुलांसह असल्या केलेल्या आहाराचा परिणाम व्हावयाचा तोच होतो. आवडीने तो ते खातो खरे पण ज्या क्षणी खातो त्या क्षणीच पापास पात्र होतो. त्या आहाराचे फळ मिळण्यास फार थांबावे देखील लागत नाही. दुसऱ्याच क्षणी यातना सुरू होतात. "शिरच्छेद झाला तर काय होते पाहू या, आगीत प्रवेश केला तर कसे भाजते बघू या" असे कुणी म्हणेल काय पण ते तो मनाशी म्हणतो आणि हे अपवित्र अन्न खातो. हे अन्न खाल्ल्यावर जे दुःख होते तोच त्याचा परिणाम आहे आणखी वेगळा काय परिणाम सांगावा?

आहाराप्रमाणे यज्ञही तीन प्रकारचा असतो. उत्तम कीर्तिवंतामध्ये शिरोमणि असलेल्या अर्जुना, सात्त्विक यज्ञाचे वर्म मी तुला सांगतो. प्रियोत्तमास सोडून पतिव्रतेचा काम कुठेही दुसरीकडे जात नाही. गंगा एकदा समुद्राला जाऊन मिळाली की, तिथून आणखी कुठे जात नाही. वेदांना एकदा आत्म्याचे दर्शन झाल्याबरोबर ते मुकेच झाले. त्याप्रमाणे सात्त्विक यज्ञ कर्ता चित्तवृत्ति आपल्या हिताकडे लावतात आणि फळाकडे मन जाऊ देत नाहीत. पाणी झाडाच्या मुळापर्यंत जाते आणि तिथे जिरून जाते मागे फिरण्याचा विचार करीत नाही. त्याप्रमाणे मन आणि देह दोन्ही यज्ञ करण्याच्या निश्चयाला वाहून टाकतात आणि त्या यज्ञामुळे मला अमुक मिळावे अशी वांच्छा शिल्लक ठेवत नाहीत. स्वधर्माचरण करावे यापलीकडे काही इच्छा मनात ठेवत नाहीत. सर्वांगांनी परिपूर्ण असा यज्ञ करतात. आरशामध्ये आपले आपण रूप पहावे, तळहातातील दिव्याने रत्नाची परीक्षा करावी, सूर्य उगवल्यावर मार्गक्रमण करावे त्याप्रमाणे वेदांचा आधार घेऊन ते यज्ञाची तयारी करतात. कुंडे मंडप, वेदी आदि करून जी जी सामुग्री लागेल ती जशी काही शास्त्राने स्वतःच केली आहे अशा प्रकारची उत्तमोत्तम जमवतात सगळ्या अवयवांना उचित अशी लेणी असावी त्याप्रमाणे सगळे पदार्थ जिथल्या तिथे ठेवलेले असतात. काय सांगू अर्जुना! ह्या तयारीकडे पाहून वाटते की प्रत्यक्ष यज्ञविद्या सर्व अलंकारांनी सजून या यजनमिषाने साक्षात मंडपात आली आहे. हा यज्ञ अंगे उपांगे यासहित उत्तम रीतीने केला जातो पण एक पथ्य पाळले जाते की मोठेपणाच्या संबंधास कुठेही डोके वर काढून दिले जात नाही. पार्था, धर्मराजांच्या मनात यज्ञाबद्दल अहंकाराचा थोडासा विचार आल्याबरोबर अर्धे अंग सोन्याचे झालेल्या मुंगूसाने येऊन त्यांचे गर्वहरण केले हे ध्यानात आहे ना तुझ्या? तर सात्त्विक यज्ञास अहंकाराचा वास, वाससुद्धा सहन होत नाही. तुळशीच्या झाडाचा प्रतिपाळ अत्यंत आदराने केला जातो. त्या पूजेपासून फळ, फूल, छाया यातले कुठलेच फळ अपेक्षित नाही. तेव्हा फळाशेशिवाय अशा युक्तीने जो यज्ञ केला जातो तो सात्त्विक यज्ञ केला म्हणावयाचे.

रजोगुणी पुरुषसुद्धा ह्या सात्त्विक यज्ञकर्त्यासारखाच सर्वसामुग्री जमवून यज्ञ करतो पण वीरेशा, त्याच्या ह्या यज्ञाच्या मागे फळाची अपेक्षा असते. घरात श्राद्ध आहे त्याचवेळी राजाला मेजवानीस बोलावले म्हणजे राजा प्रसन्न होऊन आपले काम करतो, राजाला मेजवानी दिली म्हणून कीर्ती होते आणि शिवाय श्राद्धकर्मही उरकले जाते! राजस यज्ञासंबंधी असाच विचार करतो. यज्ञात दीक्षित म्हणून मान मिळेल आणि

अनायासे स्वर्गप्राप्ती होईल असा त्याचा विचार असतो. फळ मिळविण्यासाठी व स्वतःचे महत्त्व वाढविण्यासाठी जो यज्ञ केला जातो तो राजस यज्ञ समजावा. बाकी सर्व यज्ञक्रिया उत्तम झाली तरीही फलाशा धरल्याचा दोष येतो आणि तो यज्ञ म्हणून सात्त्विक न ठरता राजस ठरतो.

पशुपक्ष्यांच्या विवाहात कामाशिवाय लग्न लावणारा जोशी लागत नाही. तामस यज्ञात हाच प्रकार असतो. यज्ञ करण्याचा आग्रह हेच ह्या यज्ञाचे मूळ आहे. वारा कोणत्याही वाटेने वहातो, मरणाला मुहूर्ताची गरज नसते, आग निषिद्ध पदार्थाचे भय मानीत नाही. त्याप्रमाणे तमोगुणी माणसाच्या आचाराला वेदविधीचा धरबंद असत नाही. तो आचार स्वैर असतो. तिथे विधीची पर्वा असत नाही. मंत्रादिकांची जरुरी असत नाही, माशीच्या तोंडून कुठल्याही प्रकारचे अन्न सुटत नाही तसे त्याचे वागणे असते. ब्राह्मण आपला शत्रू आहे असे तो मानतो आणि म्हणून दक्षिणा वगैरे देण्याचा प्रश्नच येत नाही. वावटळ सुटली असताना त्या वावटळीस अग्निचे सहाय्य मिळावे आणि मग तो जसा सैरावैरा आग लावत सुटतो त्याप्रमाणे ह्या तामस यज्ञात विधी, मंत्र, ब्राह्मण, दक्षिणा, या सर्वांचाच अभाव असतो आणि वेड्यावाकड्या प्रकाराने हा यज्ञ चालू असतो. निपुत्रिकाचे घर नागवले जावे त्याप्रमाणे श्रद्धेचे मुखही न पहाता केलेल्या ह्या यज्ञामध्ये केलेला खर्च व श्रम वाया जातात. श्रीनिवास भगवंत अर्जुनाला म्हणाला. "पार्था, हा यज्ञ म्हणजे एक यज्ञाचा आभास असतो आणि ह्या निष्फळ यज्ञाचे नाव तामस यज्ञ असे आहे. गंगेचेच पाणी पण निरनिराळ्या मार्गांनी नेले जाते. एका मार्गाने नेलेले पाणी अमंगलता प्राप्त करून देते तर दुसऱ्या मार्गाने नेलेले शुद्धत्व देते. त्याप्रमाणे तपाचा प्रकार आहे. तेही त्रिगुणात्मक आहे. एकाप्रकारचे तप पाप देते तर दुसरे शुद्धत्व आणते. या तपाचे तीन भेद कोणते हे जर जाणून घ्यावयाचे तर सुबुद्धि अर्जुना, तप म्हणजे काय हे जाणून घेणे आवश्यक आहे. आधी तप म्हणजे काय हे तुला सांगतो आणि त्यांचे तीन भेद समजावून देतो. तप मुळात कोणत्या तीन प्रकारांनी घडते ते एक शारीर, मानसिक आणि शाब्द असे हे तीन प्रकार आहेत. अर्थ स्पष्ट आहे. शरिराने केलेले, मनाने केलेले आणि वाणीने केलेले असे तीन प्रकारचे तप असू शकते. आता ह्या तिन्हीपैकी शारीर तप प्रथम सांगतो ते ऐक.

शंकर वा विष्णू यापैकी आपल्याला जे दैवत आवडत असेल त्या प्रिय देवतेच्या देवालयात जाण्यास, त्या देवतेच्या यात्रा करण्यास भक्ताच्या पायाला जसा काही अष्टौप्रहर भोवरा बांधलेला असतो. देवांगण झाडून लोटून स्वच्छ करून, रांगोळी काढून सुशोभित करण्यात त्याला फार आनंद वाटतो. देवाच्या प्रतिमेस जे जे उपचार लागतील ते ते पुरविणे ही आपल्या हातांची शोभा आहे असे ती समजतो. लिंग किंवा प्रतिमा दृष्टिस की तो भुईवर काठी पडावी तसा साष्टांग नमस्कार घालतो. जे ब्राह्मण विद्याविनयादी गुणांनी संपन्न आहेत. वडिल आहेत त्यांची तो खरोखर मनापासून उत्तम सेवा करतो. अथवा जे प्रवासाने शिणले भागले किंवा संकटाने पीडित झाले त्यांना जीवाला सुख वाटेल असे उपचार देतो. सर्व तीर्थांमध्ये श्रेष्ठ असे जे माता-पितर त्यांच्या सेवेसाठी आपल्या देहाची कुरवंडी करतो. ज्ञानदानामध्ये करुणामय असे जे श्रीगुरू भेटल्याबरोबर संसाराचा दारुण शीण हरण करतात त्या गुरूंची तो भक्ति करतो. त्याला स्वधर्माचे पालन करताना पाहून असे वाटते की त्याने हा एक अग्निच प्रदीप्त केला आहे आणि त्यात तो देह जाड्यरूपी किटाच्या आहुती देत ते सगळे जाड्य निपटून काढीत शुद्ध होतो आहे.

प्रत्येक प्राणिमात्राच्या ठिकाणी तो ब्रह्म पाहतो आणि नमस्कार करतो. जगात त्याला ब्रह्मावाचून दुसरे काही दिसतच नाही. प्राणिमात्रांवर उपकार करून तो त्यांची भक्ति करतो. स्त्रीविषयी तो मनाचा निग्रह करतो.

जन्माच्यावेळी जो काय स्त्री-देहाचा स्पर्श झाला तेवढाच. तेव्हापासून जन्मभर तो सोवळ्याने रहातो. भूतमात्रासंबंधी त्याच्या मनात एवढी करूणा भरून राहिलेली असते की तो गवतदेखील हिसडत नाही. त्या ठिकाणी देव आहे म्हणून तो कशाचीही मोडतोड करीत नाही. अशा प्रकारच्या वागण्याचा जेव्हा शरिरात उत्कर्ष होतो तेव्हा शरीर तप भरास आले आहे असे समजावे. पार्था, हे सर्व शरिराकडून केले जाते म्हणून मी त्याला शारीर तप असे म्हणतो. या तपाची साधकास अत्यंत जरुरी आहेच. त्याच्या शरिराचा अणुरेणू ह्या शारीर तपाने उजळून निघाल्यावर मग वाचिक तपाला ह्या शरिराचा अडथळा येत नाही. ते साथच देऊ लागते. शारीर तपानंतर असे वाचिक तप तुला सांगतो. परिस जेव्हा लोखंडाला स्पर्श करतो तेव्हा त्या लोखंडाचे वजन कमी न करता असलेल्या सगळ्या लोखंडाचे सोने करून सोडते त्याप्रमाणे त्या वाचिक तप करणाऱ्या माणसाचे बोलणे ऐकणाऱ्या जोडीदाराला दुःख न देता सुख उत्पन्न करते. त्या बोलण्यातूनच त्याचे साधुत्व दृष्टिस पडते. पाणी मुख्यतः झाडाला जाते पण गवत सहज त्या पाण्यामुळे जगते. त्याप्रमाणे तो मनुष्य एकाला सांगत असतो पण त्यामुळे सर्वांचे हित होते. अमृताची गंगा भेटली की प्राण अमर करते, स्नानाने पाप आणि ताप निवारण करते शिवाय मधुरताही देते. त्याप्रमाणे अविवेक फिटेल, आपले अनादित्व भेटेल आणि ऐकताना ऐकतच रहावेसे वाटेल अशी अमृतासारखी गोड रुचि त्या बोलण्याच्या ठिकाणी असते. तो जास्त बोलतही नाही. कोणी बोलले तर बोलावे एरवी वेद किंवा भगवन्नाम याच्या अहोरात्र उच्चार करावा असा त्याचा क्रम असतो. ऋग्वेदादी तिन्ही वेदांची तो आपल्या वाणीच्या मंदिराचे ठिकाणी प्रतिष्ठापना करतो. जशी काही त्याने तिथे वेदपाठशाळाच स्थापन केली आहे. ते नाही तर शैव किंवा वैष्णव आवडेल ते नाव तो सतत घेत असतो. अशा रीतीने वाणीचा नित्या विनियोग करणे याला वाचिक तप असे म्हणावे."

हे वाचिक तप कोणत्याही शारीर क्रियेच्या आड येत नाही आणि याबद्दलचा सोप्यात सोपा उपदेश श्रीसमर्थांनी केला आहे.

ते म्हणतात—

**"स्मरण देवाचे करावे । अखंड नाम जपत जावे**
**नामस्मरणे पावावे । समाधान**

**नित्य नेम प्रातःकाळी । माध्यान्हकाळी सायंकाळी**
**नामस्मरण सर्वकाळी । करीत जावे**

**हर्षकाळी विषमकाळी । पर्वकाळी प्रस्तावकाळी**
**विश्रान्तिकाळी निद्राकाळी । नामस्मरण करावे**

**नामे संकटे नासती । नामे विघ्ने निवारिती**
**नामस्मरणे पाविजेती । उत्तम पद**

**हरिनामे प्रल्हाद तरला । नाना आघातापासूनि सुटला**

**नारायणनामे पावन झाला । अजामेळ**

**नाम स्मरे निरंतर । जाणावे पुण्य शरीर**
**महादोषांचे गिरिवर । ते रामनामे नासती**
**म्हणोनि नाम अखंड स्मरावे.**

शरीर माता-पितर, गुरू देव आणि पीडित यांच्या सेवेसाठी तो झिजवितो आणि ह्या सगळ्या क्रिया करीत असताना वाचा पण त्याच्या आज्ञेखाली वावरते. ती असेच शब्द उच्चारते की जे सुखकारक, हितकारक व मधुर आहेत. शिवाय त्या जिभेने भगवन्नामाच्या उच्चाराचा ओघही अहोरात्र वहाता ठेवलेला असतो. जी जीभ देवाचे नाव अखंड उच्चारत असते ती दुःखदायक, अहितकारक शब्द उच्चारणे देखील विसरून जात असावी. व्यक्त व्यापार असे शुद्ध व भगवंतमय होऊन गेल्यावर मानसिक व्यापार तरी वेगळे कसे होतील?"

इंद्रादिक देवांचे नाथ श्रीकृष्ण पुढे म्हणाले, "पार्था, आता तुला मानसिक तप म्हणजे काय हे सांगतो.

अर्जुना, शरीर आणि वाणी यांच्या तपानंतर त्याचे मनही शुद्ध होते. तरंगांनी सरोवर सोडून द्यावे, मेघांनी आकाशाचा त्याग करावा, सर्पांनी चंदनाचे उद्यान त्यागून जावे, कलांच्या कमीजास्तपणाने चंद्राचा त्याग करावा, राजा व्याधीतून मुक्त व्हावा किंवा मंदराचल क्षीर समुद्रातून निघावा त्याप्रमाणे विकल्पाच्या जाळ्याने त्याचे मन सोडून दिले असल्याने ते स्वरूपामध्ये स्थिर होऊन जाते. आता ते मन पूर्ण शुद्ध होते. थंडी आपले आंग थंडीने कापू देत नाही त्याप्रमाणे मनाला आपले खरे निवासस्थान जे स्वरूप ते भेटले की मग ते हलत नाही. त्याचे चांचल्य संपते. मन आपला चंचल भावच विसरते, स्थिर होते. ज्योतिषशास्त्रदृष्ट्या मनाचा कारक चंद्र आहे तेव्हा अचल असलेल्या निष्कलंक पूर्ण चंद्राप्रमाणे ते मन प्रसन्न, प्रकाशमान, शांत होते. वैराग्याचे ओरखडे नाहीत, धापकाप नाही. त्या ठिकाणी केवळ आत्मज्ञानाची चोख भूमिका असते. शास्त्र विचारण्यासाठी ज्या मुखाचा उपयोग करावा ते मुख वाचेचे सूत्र हातीही धरत नाही. शब्द मुके होतात. ज्या अवस्थेची वाटचाल त्या शास्त्रांना विचारायची ती अवस्था तो प्रत्यक्ष अनुभवत असतो. म्हणून विचारणे संपते, सांगणे संपते. मिठाने आपले मूळ स्वरूप जे पाणी त्याला स्पर्श केल्याबरोबर मीठपण संपून जाऊन केवळ जसे पाणीपण शिल्लक राहते तसे ते मन स्वरूपात लीनच होऊन जाते. आत्मलाभ झाल्यावर मनाचे मनपणच उरत नाही. आता मनच उरत नाही मग वेगवेगळे भाव उठणार कुठून? इंद्रियांच्या मार्गांनी धावत जाऊन विषयाच्या गावाला पोचणार कोण? तळहाताला जसे केस असत नाहीत, रोमशुद्धि असते त्याप्रमाणे त्याच्या मनामध्ये पूर्ण भावशुद्धि असते. अर्जुना, अशा मनाची नुसती आठवण झाली तरी आनंद होतो आहे, काय सांगू? अशा प्रकारची मनाची स्थिति झाली की ते मानसिक तप झाले."

देव पुढे म्हणाले, "मानसिक तपाचे लक्षण मी तुला संपूर्णपणे सांगितले आहे."

१८६७ च्या सुमारास रामकृष्ण परमहंस यांना मथुरबाबूंनी तीर्थयात्रेस जाण्याचे योजले. ठाकुरांना बरोबर चालण्याची विनंती केली. आपल्या वृद्ध मातोश्री आणि हृदय बरोबर येत असतील तर आपली येण्याची

तयारी आहे असे ठाकूर म्हणाले. त्यांनी दोघांनी कबूल केल्यावर मथुरबाबूंनी मोठ्या थाटामाटाने ही सर्व यात्रा केली.

तीर्थक्षेत्रासंबंधी रामकृष्ण म्हणत, “ईश्वराच्या दर्शनाची तळमळ लागून ज्या ठिकाणी अनेक साधक जप, तप, अनुष्ठान इत्यादि करीत आले त्या ठिकाणी ईश्वराचा प्रकाश निःसंशय आहे असे समजा. त्या ठिकाणी साधकांच्या भक्तिच्या ईश्वरीय भावना उत्कटतेने एकत्रित होऊन त्याच्या योगाने तेथील वातावरणसुद्धा भरून गेलेले असते. म्हणून अशा ठिकाणी साधकाचे ईश्वरीय भाव तेव्हाच जागृत होतात. ईश्वराचे दर्शन घेण्याच्या हेतूने त्या ठिकाणी पुरातन काळापासून किती साधू, किती सिद्ध पुरुष येऊन गेलेले असतात. साऱ्या वासना सोडून देऊन त्या ठिकाणी त्यांनी ईश्वराची एकाग्र चित्ताने भक्ति केलेली असते म्हणून इतरही सर्व ठिकाणी ईश्वर सारखाच भरून राहिलेला असला तरी अशा जागी त्याचा अधिक अंश प्रकाशित झालेला असतो. गुरे ज्याप्रमाणे खाउन घेतात आणि मग खंथ करीत स्वस्थ बसतात. त्याप्रमाणे देवस्थाने, तीर्थस्थाने यांचे दर्शन घेतल्यावर मनामध्ये ज्या पवित्र भावना उत्पन्न होतात त्या सर्व घेऊन निश्चिंतपणे एकांतात बसून त्यांच्यावर पुन्हा पुन्हा विचार करावा. त्यात बुड्या माराव्या. नाही तर घरी येताच त्या टाकून देऊन जर “येरे माझ्या मागल्या” केले आणि पुन्हा मनामध्ये सारे प्रापंचिक विचार घोळत ठेवले तर या देवस्थानाच्या, तीर्थस्थानाच्या दर्शनापासून काय फायदा? मग त्या ईश्वरीय भावना मनामध्ये स्थिर व्हाव्या कशा?” ठाकुर शिष्यांना मानसिक तप म्हणजे काय तेच समजावून देत आहेत.

“Autobiography of a yogi” या पुस्तकात एक प्रसंग आहे. युक्तेश्वरजींनी ख्रिस्ताची शिकवण व वेद यांच्या उपदेशातील साम्य दाखविणारे पुस्तक परमगुरू बाबाजी यांच्या सांगण्यावरून लिहून पूर्ण केले. “ज्या दिवशी पुस्तक पूर्ण होईल त्या दिवशी भेटू.” असे बाबाजींनी सांगितले होते. पुस्तक पूर्ण करून युक्तेश्वर गंगेवर स्नानासाठी गेले. मनमुराद स्नान करून गंगेतून बाहेर पडले तो वडाच्या झाडाखाली काही शिष्यांसह बाबाजी बसलेले! “नमस्कार स्वामीजी”, बाबाजी आपल्या अत्यंत गोड आवाजात म्हणाले, “कबूल केल्याप्रमाणे तुम्ही पुस्तक पुरे केलेत. उत्तम काम केलेत. कबूल केल्याप्रमाणे मीही आलो आहे धन्यवाद द्यायला.”

युक्तेश्वरजी धावत गेले. त्यांनी परमगुरूंना साष्टांग नमस्कार घातला आणि हात जोडून म्हटले. “महाराज, माझे घर इथून जवळ आहे. आपण ह्या शिष्यांना घेऊन या ना माझ्या घरी.”

परमहंस बाबाजी हसून म्हणाले. “नाही बेटा. आमच्यासारख्यांना झाडाची सावलीच बरी. ती पुरतेही.”

“परमहंसजी, क्षणभर थांबा. मी आपल्यासाठी मिठाई तरी आणतो.” असे म्हणून युक्तेश्वरजी धावत गेले. मिठाई घेऊन आले तर झाडाखाली सावलीत कुणीच नव्हते. युक्तेश्वरजींना फार वाईट वाटले. पण काय करणार? दोन महिन्यांनी ते बनारसला आपले गुरू लाहिरीमहाशय यांच्याकडे गेले. लाहिरीमहाशय म्हणाले, “ये बेटा. आताच बाबाजी येऊन गेले. तुला उंबऱ्याजवळ भेटले काय?

युक्तेश्वरजी विस्मयाने म्हणाले, “नाही.”

लाहिरीमहाशय म्हणाले, “इकडे ये” आणि युक्तेश्वर जवळ आल्यावर त्यांनी युक्तेश्वराच्या कपाळास स्पर्श केला. त्या क्षणी उंबऱ्याजवळ बाबाजीमहाराज उमललेल्या कमळासारखे उभे असलेले युक्तेश्वरांना दिसले. तो वटवृक्षाखालचा प्रसंग आठवून युक्तेश्वर चिडले. त्यांनी परमगुरूंना नमस्कारही केला नाही. लाहिरीमहाशय आश्चर्यचकित होऊन पहातच राहिले. बाबाजी युक्तेश्वरांच्याकडे पहात म्हणाले, “स्वामीजी आमच्यावर रुसले आहेत.”

युक्तेश्वर म्हणाले. “मी का रुसू नये? आपण हवेतून येता, क्षणात नाहीसे होता. आम्ही काय समजावे?”

बाबाजी म्हणाले, “अरे, तुझे मन इतके खळबळीने भरले होते की त्या वादळामुळे मी वातावरणात विरूनच गेलो. बेटा, तुला अजून बरेच ध्यान करायला हवे आहे. तुझी नजर अजून स्थिर झालेली नाही. सुर्यप्रकाशाच्या आड मी लपलो होतो. तुझी दृष्टि साफ असती तर मी तुला दिसलोच असतो.

मन किती स्थिर हवे! ते तसे नसले तर येणारे अतींद्रिय अनुभव कसे बाधित होतात ते यावरून कळते आहे.

देव सांगत आहेत, “देह, वाणी, चित्त यामुळे तीन प्रकारचे झालेले सर्वसाधारण तप मी सांगितले. आता हे तप त्रिगुणांच्या संगतीने पुन्हा त्रिविध होते. बुद्धि स्थिर ठेवून पार्था, मी सांगतो ऐक.

प्रबुद्धा, हे कायिक वाचिक, मानसिक तप पूर्ण श्रद्धेने फळाशा सोडून अंतःकरण शुद्ध करून व आस्तिक्य बुद्धिने आचरिले जाते तेव्हा त्याला बुद्धिमान पुरुष सात्त्विक तप म्हणतात. तपाच्या स्थापनेकरिता जगात द्वैतभाव निर्माण करून मोठेपणाच्या शिखरावर बसण्यासाठी, त्रिभुवनाच्या सन्मानाने आपल्याशिवाय दुसऱ्या ठिकाणी जाऊ नये म्हणून, पंक्तीत पहिल्या पानावर बसावयास मिळावे या इच्छेने जे तप केले जाते ते राजस तप म्हटले जाते. विश्वाने आपली स्तोत्रे गावी यासाठी अंगी पात्रता आणण्याची खटपट असते. विश्वाने आपली यात्रा करण्यासाठी यावे असा मनात हेतू असतो. लोकांना विविध पूजनासाठी आपल्याशिवाय दुसरा आश्रय नसावा असे त्यांना वाटते. महत्वाच्या पांघरूणाखाली निरनिराळे भोग भोगण्याची त्यांना इच्छा असते. वेश्या आपले शरीर शृंगारून ज्याप्रमाणे त्याचा विक्रय करते त्याप्रमाणे अंग व वाणी तपाने माखून ते मान्यतेसाठी विकत असतात. पैसा आणि प्रतिष्ठा यांच्या इच्छेने असे जे तप केले जाते त्याला राजस तप म्हणावे. पहुरणी नावाच्या किड्याने गाभण गुराचे सड चोखले की जनावर व्यायले तरी दूध देत नाही. उभे कोवळे शेतच जनावरास खाऊ घातले तर कापणी करायला काही उरतच नाही. त्याप्रमाणेच कष्ट करून केलेले तप त्याचा उदो उदो आपल्या तोंडाने केला तर फलित होतच नाही वायाच जाते. आता ह्या तपाला फळ येत नाही असे पाहिले की तो तपकर्ता तप करणे मधेच सोडून देतो. त्या तपाला स्थिरता असतच नाही. अकाली आलेला मेघ आकाशात फळी धरतो, मोठमोठ्याने गर्जना करीत आता ब्रह्मांड फोडून टाकतो की काय असे वाटायला लावतो पण घटकाभर तरी टिकतो काय? त्याप्रमाणे राजस तप आहे. ते फलाच्या बाबतीत वांझ असते आणि आचरणात शेवटपर्यंत टिकत नाही. अर्जुना, परलोक आणि कीर्ती यांना अंतरून केलेले तामस तप आता सांगतो. मूर्खपणाचा संचार जिवामध्ये घेऊन धनुर्धरा, ते लोक शरीर वैरी आहे असे म्हणू लागतात. मग

साहजिकच त्या शरिराला जास्तीत जास्त क्लेश देण्याचे ते ठरवितात. पंचाग्निच्या ज्वाला शरिरास लावल्या जातात. शरिराला इंधन समजून अग्नित टाकतात. मस्तकावर गुग्गुळ जाळतात. पाठीत गळ घालतात. पाहताना भय वाटेल असे निखारे अंगावर घेतात. श्वासोच्छ्वास दवडून वायाच उपास केले जातात. अधोमुख टांगून घेऊन धुराचे घास गिळत राहतात. थंडीत आकंठ बर्फाच्या पाण्यात बसावे, खडकावर किंवा नदीच्या काठावर आसन मांडावे, अंगाचे जिवंतपणी लचके तोडून आहुती द्यावी अशा प्रकारचे हे तप असते. शरिरावर असे नाना प्रकारचे घाव घालून त्यांचे तप चालते आणि त्या तपाने दुसऱ्याचाही नाश केला जातो. अंगभाराने एखादा मोठा धोंडा डोंगरावरून सुटतो; आपटत आपटत खाली येतो. येत असताना त्याचे तर तुकडे तुकडे होतातच पण आड येईल त्यालाही तो जाता जाता चिरडतो. सुखाने जगणाऱ्या प्राण्यांना जिंकण्याच्या इच्छेने स्वतःची आटणी करून ते तप केले जाते. ही क्लेशाची हातोटी साधून जे तप केले जाते त्याला तामस तप म्हणावायाचे.

पार्था, सत्त्वादि तीन गुणात पडलेले तप तीन प्रकारचे होते. ते तिन्ही प्रकार मी तुला समजावून सांगितले आहेत.

आता बोलताना प्रसंगात आले म्हणून दानांच्या लक्षणांचे स्वरूप तीन प्रकारचे कसे असते ते सांगू. तीन गुणांमुळे दानही तीन प्रकारचे होते. त्यातील सात्त्विक दानाचे वर्णन करून सांगतो.

स्वधर्माचरणाने जे जे आपल्याला मिळाले असेल ते मोठ्या सन्मानाने द्यावे. उत्तम बी आहे पण जमिनीला वाफसा नाही तर शेत कसे पेरावे? त्याचप्रमाणे सात्त्विक दानास कोणतेही अंग उणे असून चालत नाही. अमोल रत्न मिळाले तर ते जडविण्यासाठी लागणारे सोने कमी पडते, रत्न आणि सोने मिळून अलंकार तयार झाला तर तो घालण्यास योग्य शरीर मिळत नाही. पण सण असावा, जवळ सुहृद असावे आणि संपत्ती असावी असा अपूर्व योग भाग्य चढते असले म्हणजे येतो. त्याप्रमाणे उत्कृष्ट प्रकारचे दान देण्यास सात्त्विक भाव उत्तेजित होतो तेव्हा देश, काल, पात्र आणि द्रव्य अशा चार योग्य गोष्टींचा संगम होतो आणि तेव्हा ते दान सात्त्विक दान होते."

गुजराथची राजमाता मीनलदेवी सव्वाकोट सोन्याच्या मोहरा घेऊन सोमनाथाच्या दर्शनास गेली. सुवर्णतुला, दानधर्म अपार झाला. मातेच्या या यात्रेच्या निमित्ताने राजा सिद्धराजने प्रजेला लाखो रुपयांचा कर माफ केला. मीनलदेवीच्या मनात किंचित अहंकार उत्पन्न झाला. "माझ्याइतके दान जगात कोणी केले नसेल," असा विचार तिच्या मनात आला. रात्री स्वप्नात सोमनाथ आले व म्हणाले "माझ्या मंदिरात एक अत्यंत गरीब स्त्री यात्रा करण्यासाठी आली आहे. तू तिच्याकडून तिचे पुण्य मागून घे." राणी जागी झाली आणि म्हणू लागली, "यात तर काहीच कठीण नाही. त्या गरीब बिचारीस पैसे देईन आणि पुण्य विकत घेईन." तिने त्या बाईला शोधण्यासाठी माणसे पाठवली. नोकरांनी मंदिरातून बाईला शोधून आणले!

मीनलदेवी म्हणाली, "बाई, तुझ्या यात्रेचे पुण्य मला दे आणि तुला हवे असेल तितके द्रव्य मागून घे." ती बाई कबूल होईना. राजमाता म्हणाली. "तू एवढे पुण्य तरी काय केले आहेस? ते तरी मला सांग."

बाई म्हणाली, “राजमाता, मी शेकडो मैल पायी चालत आले. वाटेत भिक्षा मागून निर्वाह केला. इथे येऊन पोचले. काल तर उपवासच होता. आज एका पुण्यात्म्याने मला थोडे आळणी सत्तू दिले. त्यातल्या अर्ध्या सत्तूंनी देवाची पूजा केली. जे राहिले त्यातल्या अर्ध्या भागाचे दान दिले आणि उरलेले सत्तू खाऊन मी उपास सोडला. माझे पुण्य ते काय? आपले पती, पिता पुत्र, भाऊ सगळेच राजे आहेत. आपण सव्वा कोट मोहरा खर्च केल्या, प्रजेचा कर माफ केला. इतके पुण्य जोडून आज आपण माझ्याकडे पुण्याची याचना करता, का ते सांगू का? राग मानणार नसाल तर सांगते.

राजमाता, संपत्तिमान असूनही नियम पालन करावे, दंड देण्याची शक्ति असूनही दुसऱ्याचा अपराध सहन करावा, यौवनात कठोर नियम पाळावे आणि दरिद्री असूनही शक्त्यानुसार दान करावे हे चार आचारधर्म पाळले तरच दानाचे पुण्य मिळते.”

राजमातेचा अहंकार नष्ट झाला. त्यासाठीच भगवंतांनी त्या दरिद्री स्त्रीला पाठवले होते. सात्त्विक दान यासच म्हणायचे. या दरिद्री स्त्रीप्रमाणेच एका राजाची कथाही उद्बोधक आहे.

राजा साइरसने क्रोसीयस नावाच्या राजाला बंदीवान केले. साइरस स्वतः फार उदार होता, दानी होता. त्याच्या राज्यात गरिबीचे नाव घेणे पाप समजले जात असे. प्रजा स्वस्थ व सुखी होती.

बंदी क्रोसियस साइरसला म्हणाला, “राजा, अशा प्रकारे दान केलेस तर थोड्याच दिवसात खजिना मोकळा होऊन तू कंगाल होशील. पैसा वाचवून साठवून ठेवलास तर अपार संपत्तीचा स्वामी होशील.”

साइरस म्हणाला, “मी सिंहासनावर बसल्यापासून आजपर्यंत कुणाला काहीही दान केले नसते तर माझ्याजवळ किती संपत्ती साठली असती असा तुझा अंदाज आहे?”

क्रोसियस म्हणाला, “अपार संपत्ती!” साइरसने विचार केला आणि प्रजा व मित्र यांना सूचना पाठविली की, “फार मोठ्या कामासाठी मला अपार संपत्तीची जरुरी आहे. तरी द्रव्य द्यावे.” प्रजेला ही राजाची सूचना कळल्याबरोबर सोन्याचा प्रवाह दरबाराकडे सुरू झाला. पर्वतप्राय ढीग पडलेले पाहून क्रोसियस आश्चर्यात बुडून गेला.

साइरस म्हणाला, “राजा, बघ हीच संपत्ती मी दान न करता पुरून ठेवली असती तर प्रजेने द्वेष व शत्रूंनी वैर केले असते. दान केल्याने माझी संपत्ती अशी सुखरूप आहे.” क्रोसियसने साइरसची क्षमा मागितली आणि त्याच्या दानशूरतेचे कौतुक केले.

तेव्हा सात्त्विक दानाचे स्वरूप हे असे आहे.

देव पुढे म्हणाले. “अर्जुना, कुरुक्षेत्र किंवा काशी यासारखा पवित्र देश असावा. आता ही दोन्ही ठिकाणे मिळाली नाहीत तर त्यांच्या तोडीची पुण्यभूमि पहावी, रवि, चंद्र यांचा ग्रहणकाळ किंवा इतर निर्मळ पुण्यकाळ

असावा. मग दान घेण्यास योग्य पुरुष शोधावा. शुचित्वाची जणू काय मूर्तीच, आचाराचे मूळ पीठ, वेदाची उतारपेठ अशासारखे ब्राम्हणरत्न पहावे आणि त्याच्या ठिकाणी 'इदं न मम' असे म्हणून त्या द्रव्यावरची आपली सत्ता काढून घेऊन ते द्रव्य अर्पण करावे. पतीकडे गेल्यावर कांता आपले सर्वस्व ज्या भावाने अर्पण करते तो भाव दात्याच्या चित्तात असावा. ज्याचे त्याला देऊन आपण ऋणातून मोकळे झालो असा भाव असावा. विडा बांधणाऱ्या राजाच्या नोकराने राजाच्याच मालकीच्या साहित्याचा विडा मोठ्या आदराने राजापुढे करावा तो आदरभाव दात्याजवळ दान देताना असला पाहिजे. निष्काम वृत्तीने भूमी इत्यादि दाने द्यावी पण फलाची इच्छा मनात उठू देऊ नये.

दुसरे एक पथ्य पाळावे ते असे की ज्याला आपण दान दिले त्याला त्याची कधीही परतफेड करता येऊ नये असे पहावे. आरशाच्या मागच्या बाजूकडे मुख पाहिले तर दिसत नाही. पाण्यावर आपटलेला चेंडू परत हाती येत नाही. तसा केलेला उपकार आपल्या हाती परत येऊ शकणार नाही असे पहावे. पितृ कर्मानिमित्त सोडलेला पोळ जसा निरिच्छतेने सोडलेला असतो किंवा कृतघ्न माणसावर केलेले प्रेम जसे निष्फळ असते तसे दान असावे. ते परत येण्याची थोडीसुद्धा शक्यतो ठेवू नये. दान घेणारा मनुष्य दात्याचा उपकार कुठल्याही प्रकारे फेडू शकणार नाही असा असावा. दात्याने आपण दान दिले याचे स्मरणही ठेवू नये. वीरराजा अर्जुना, लक्षात ठेव की असा सगळ्या सामुग्रीनिशी जे दान केले असेल त्याला उत्तमात उत्तम असे सात्त्विक दान म्हणावयाचे.

आता राजस दानाचा विचार करावयाचा. अर्जुना, सात्त्विक दानामध्ये जी जी सामुग्री असते ती ती सर्व राजस दानामध्ये असतेच. पुण्य देश, पुण्य काळ, सत्पात्र याचक, निर्मळ आणि न्यायाने मिळविलेले द्रव्य ही सगळी सामुग्री तशीच असते. फक्त संकल्प चुकीचा असतो.

मनात दुभत्याची आशा धरून गाय पोसावी, दाणे साठविण्यासाठी पेव बांधून मग शेत पेरायला जावे, आहेरावर दृष्टि ठेवून सोयरे धायरे यांना आमंत्रण धाडावे किंवा ज्याच्या घरी वसा आहे त्याच्या घरीच वाण पाठवावे. तसा हा राजस दानाचा प्रकार आहे. आधी व्याज वसूल करून मग समोरच्या माणसास कर्ज द्यावे, पूजा करून घेऊन मग रोग्यास औषध द्यावे. त्याप्रमाणे हे दान हेतुपूर्वक असते. दान देत असतानाच संकल्प असा असतो की हे दान दिले तेवढ्याने तो ऋणी होऊन वेळप्रसंगी आपल्या कामास उपयोगी पडेल. कधी कधी वाटेने जाणारा, दिलेले दान परत करू शकणारच नाही असा याचक भेटलाच तर एका कवडीच्या मोबदल्यात अशेष गोत्रज्यांच्या अशेष पापांची प्रायश्चित्ते त्या दानाच्या संकल्पात घातली जातात आणि त्या याचकाच्या हातावर उदक सोडले जाते. त्या दानाचे फळ म्हणून पारलौकिक फळांची तो इच्छा करतो. दान मात्र इतके थोडे असते की घेणाऱ्याच्या एका भुकेलाही ते पुरेसे होत नाही. तो ब्राह्मण ते दान घेऊन गेला की त्या हानीने तो राजस दाता सर्वस्व गेल्यासारखा उदास होतो. हे सुमति अर्जुना, फार काय सांगू? पण या मनोवृत्तितून जे दिले जाते ते राजस दान आहे एवढे ध्यानात ठेव म्हणजे झाले.

आता राहिले तामस दान. तामसाचे नुसते वर्णन केले तरी वाचा शिणते, तिला क्लेश होतात. तामस यज्ञ, तामस तप, तामस आहार याप्रमाणे तामस दानही घृणास्पदच असते. तू तसे कधी चुकूनही करू नकोस. तू तसे दान देऊ नयेस म्हणूनच केवळ ह्या दान प्रकाराचा विस्तार करावयाचा.

अनुक्रमणिका

इथेही देश, काल, पात्र व संपत्ती यांचा विचार करावयास हवाच. म्लेंच्छांच्या रहाण्याच्या ठिकाणी अरण्यात, धर्मकृत्यास अयोग्य ठरलेल्या देशात, सैन्याच्या छावणीत किंवा चव्हाट्यावर हे दान केले जाते. म्हणजे देश अपवित्र असतो, तिन्हीसांज किंवा रात्र अशी अयोग्य वेळ असते आणि दानाचे द्रव्य म्हणशील तर ते चोरून आणलेले असते. आता हे द्रव्य भाट, गारुडी, वेश्या, जुगारी अशा अपात्रांना दिले जाते. देताना त्या दात्यांची वृत्ति भ्रमामध्ये बुडलेली असते. रूपाची आणि नृत्याची त्यात भर पडते. हे नाचगाणे त्यांच्या डोळ्यांना भूल पाडते. भाटांची स्तुतिपर कवने कानावर पडतात हेच दानाचे मंत्र होतात, जप होतो. थोडासा फुलांचा, चंदनाचा, सुगंधी द्रव्यांचा वास नाकाना येऊन भिडतो आणि मग जसा काही भ्रमाचा वेताळ अवतीर्ण होतो. लोकांना लुटून आणलेले अनेक पदार्थ तो तामस दाता वाटू लागतो. जसे काही मांगांना अन्नछत्र घातले आहे. अशा प्रकारे जे जे दिले जाते त्याला मी तामस दान म्हणतो. आता कधी दैवगुणाने असे घडते की लाकडे कोरणारा घुणा नावाचा किडा लाकूड पोखरतो आणि ते पोखरणे क्वचित एखाद्या अक्षरासारखे दिसते. सहज टाळी वाजवताना कावळा टाळीत सापडतो तसाच एखादा योग्य पुरुष त्याच्या श्रीमंतीकडे पाहून याचना करण्यासाठी आलाच तर अभिमानाच्या अतिरेकाने भांबावला जाऊन तो तामस दाता अंतःकरणात श्रद्धा नसताना देतो पण आदर सत्कार न करताच देतो. मस्तक लववून नमस्कारही करत नाही, अर्ध्यादिक करीत नाही, करवीतही नाही. आलेल्याला आसनसुद्धा देत नाही मग गंधाक्षता कुठल्या? तामस माणसाच्या ठिकाणी अशा प्रकारचा सद्भाव संभवतच नाही. काहीतरी थोडेसे देऊन सावकाराची बोळवण करावी त्याप्रमाणे त्या याचकाच्या हातावर काहीतरी देऊन त्याला फसवतो. त्याच्या तोंडी आदरार्थी बहुवचन येतच नाही तू, तुझे असेच शब्द फार करून येतात. अर्जुना, त्याला जे देतो तेवढीच त्याची किंमत समजतो. वाईट शब्द बोलून अपमान करून त्या याचकाची अवहेलना करतो. हे आता असो. याप्रमाणे पैसा खर्च करून दान देणे याला तामस दान म्हटले जाते.

अशी आपल्या लक्षणांनी अलंकृत केलेली तीन प्रकारची दाने दाखविली. राजस व तामस दानाकडे तसे दान करणे टाळण्यासाठी तू लक्ष ठेव.

विचक्षण अर्जुना, मी जाणतो की तुझ्या मनात येईल की, ‘एकटे सात्त्विक कर्मच जर भावबंधातून मुक्त करण्यास समर्थ आहे तर त्या सात्त्विकाच्या विरुद्ध असणारी ही दोन प्रकारची सदोष कर्मे कशासाठी सांगितली जात आहेत?’ पण असे आहे की, पिशाच्चाला दूर केल्याशिवाय पुरून ठेवलेला खजिना हस्तगत होत नाही. धूर सहन केल्याशिवाय वात पेटत नाही त्याप्रमाणे शुद्ध सत्त्वाच्या आड रजोगुण व तमोगुण यांचा पडदा आहे. तो नाहीसा करण्याला वाईट किंवा निष्कारण का म्हणावे? आम्ही श्रद्धेपासून दानापर्यंत ज्या सगळ्या क्रिया सांगितल्या त्या तीन गुणांनी व्याप्त आहेत. खरोखरच आमचा हेतू तिन्ही गुणांचे वर्णन करावे असा नव्हता पण सत्त्व कोणते हे दाखविण्यासाठी दुसऱ्या दोघांचे वर्णन केले. रात्र आणि दिवस ह्या दोहोंचा त्याग केला की त्यांच्यामध्ये असणारे संध्येचे रुप प्रकट होते. त्याप्रमाणे रज आणि तम यांचा नाश झाला की जे तिसरे उत्तम उरते ते आपोआपच सत्व म्हणून ओळखता येते.

अर्जुना, सत्त्वाचे स्वरूप स्पष्ट व्हावे म्हणून केवळ आम्ही तुला रज आणि तम यांचे निरुपण केले. आता ह्या दोहोंचा त्याग कर, सत्त्वाची कास धर आणि आपले काम साधून घे, या निर्मल सत्त्वगुणाच्या भूमिकेतून

यज्ञाची सव क्रिया कर अणि मग बघ. आपले स्वरूप आपल्या हाती आले आहे असे तुला कळून येईल. सूर्याने प्रकाशित केलेली कोणती वस्तू दिसणार नाही? त्याप्रमाणेच सत्त्वगुणातून केलेली कोणती क्रिया फलित होणार नाही?

खरोखरच आपल्याला हवे ते फळ मिळवून देण्याच्या दृष्टिने सात्त्विक कर्म योग्य आहे पण जेव्हा सात्त्विक कर्माचे फळ म्हणून मोक्ष मिळावा अशी अपेक्षा असेल तर ती उपासना वेगळी आहे. त्या वेगळ्या उपासनेचा आधार सात्त्विक कर्माला मिळाला की मग त्याला मोक्षाच्या गावात प्रवेश मिळतो. सोने अगदी चोख असले तरी त्यावर राजमुद्रा असली तरच ते नाणे बाजारात चालते. स्वच्छ, शीतल, सुगंधित पाणी सुखप्रद असते खरे पण त्याचा तीर्थाशी संबंध आला तरच ते पवित्र ठरते. नदी कितीही मोठी असो तिचा गंगेने स्वीकार केला तरच सागरात प्रवेश मिळतो, पावित्र्य लाभते, लोकांचे पाप नाहीशी करण्याची योग्यता येते, इतकेच काय पण गंगेच्या पोटात सामावल्यामुळे तिचे नुसते दर्शनही पुण्यदायक होते. त्याप्रमाणे सात्त्विक कर्म जेव्हा मोक्षाच्या भेटीला निघते तेव्हा ती भेट सुलभ व्हावी, त्यात कुठलीही अडचण येऊ नये असे घडवून आणणारे एक तत्त्व आहे ते वेगळेच आहे."

हे शब्द अर्जुनाच्या कानावर पडल्याबरोबर ते तत्त्व जाणून घेण्यासाठी त्याला इतकी उत्सुकता वाटू लागली की, ती त्याच्या जिवात मावेना. तो देवांना म्हणाला, "काय आहे ते तत्त्व? कृपा करून देवा मला ते लवकर आणि विस्ताराने सांगा."

तो कृपाळूंचा चक्रवर्ती नारायण म्हणाला, "अर्जुना सांगतो ऐक, सात्त्विक कर्माच्या रत्नाचे तेज ज्यामुळे आणखी फाकते ते तत्त्व तुला सांगतो. पार्था, अनादि असे जे परब्रह्म ते जगाचे विश्रांतीस्थान आहे, जगाचे उत्पत्तिस्थान आहे, आदि, स्थिती आणि लय अशा ह्या जगाच्या तीन अवस्था आणि त्या खऱ्याखुऱ्या जिथे आहेत त्या जागेस त्रिधा अशा प्रकारचे एक नाव आहे. खरोखर ती अवस्था अनादि, अनाम अशी असूनही अज्ञानाच्या रात्रीमध्ये ते उगम विश्रांतीस्थान ओळखता यावे म्हणून वेदांनी एक नाम ठरविले, एक खूण निश्चित केली. जन्मास आलेल्या बाळाला प्रथम काही नाव नसते, मग त्याला नाव दिले जाते. हे आपलेच नाव आहे हे त्या बाळाला कळले की ते त्या नावाने हाक मारताच "ओ" देऊ लागते. संसाराचा शीण वाहून जे थकले भागले ते त्या देवाकडे गाऱ्हाणे घेऊन आले पण त्या देवाला कोणत्या नावाने हाक मारावी हे त्यांना कळेना. आपला शीण कोण हरण करील हे त्यांना समजेना तेव्हा त्यांनी वेदांचे पाय धरले. वेद अत्यंत कृपाळू पण जीवांचा उद्धार करण्याचे, दुःख हरण करण्याचे काम केवळ एका भगवंतांचे. वेद स्वतःही त्या देवांचा शोध घेऊन थकलेच होते. "नेति नेति" घोकत होते. पण कुणाला शरण जावे हे त्यांना उमजत नव्हते. मग त्यांनी ध्यानावस्थेत एक ध्वनि ऐकला. तो ध्वनि ह्या जगातला नव्हता. स्थूल जगाचा निरास करता करता ते आकाशापर्यंत आले आणि त्या आकाशाच्या पोकळीत त्यांनी आपले ध्यान स्थिर केले. जिथे काहीच कंपने नव्हती, प्रकाश नव्हता, गति नव्हती अशा अवस्थेत असताना त्यांना त्या काळ्याकभिन्न अंधारातून एक गंभीर नाद ऐकू आला आणि त्या नादाबरोबरच प्रकाश आणि गति प्रकट होऊ लागली. नाद जास्त जास्त गंभीर होत चालला, स्पष्ट होत चालला. आनंदाच्या लहरीवर लहरी उठू लागल्या आणि वेद म्हणाले, "हो, हो, हेच त्याचे नाव" ॐ ॐ ॐ आणि असे म्हणत असताना त्या शून्यापलीकडून प्रतिसाद आला ॐ ॐ ॐ "वेद आनंदाने प्रफुल्लित झाले आणि त्या दीन आर्त संसार दुःखितांना म्हणाले, त्या ब्रह्माचे नाव ॐ बरं का. त्या नावाचे तुम्ही त्याला कळवळून हाक

मारा तो दयाघन तुमच्या हाकेला “ओ” देईल तुमचे सगळे दुःख हरण करील. तुम्ही त्याला मारता मारता ते परब्रह्म तुम्हाला आपल्या मिठीत घेईल आणि आपल्या अद्वैत स्वरूपात विलीन करून टाकील. “वेदांनी जीवांच्या दुःखाकडे पाहून त्या परब्रह्मास हाक मारण्याचा एकमेव मार्ग स्वानुभवातून शोधून काढला.

आणि म्हणून गोरक्षबोध ह्या ग्रंथात गोरक्ष व मच्छिंद्र यांच्या संवादात नादासंबंधी खुलासा आहे. गोरक्ष मच्छिंद्रांना विचारात आहेत.

**कथमुत्पद्यते नादः कथं नादः समो भवेत् ।**
**कथं संस्थाप्यते नादः कथं नादो विलीयते ॥**

“महाराज नाद कुठे उत्पन्न होतो, तो कशासारखा असतो, कोठे रहातो व कशात लय पावतो?”

मच्छिंद्र उत्तर देतात–

**ॐ कारादुत्थितो नादः शून्ये नादः समो भवेत् ।**
**पवने स्थाप्यते नादो नादो ब्रह्मणि लीयते ॥**

ॐ कारातून नाद उठतो शून्याप्रमाणे तो असतो पवन हे त्याचे स्थान आहे व तो ब्रह्मामध्ये लीन होतो.

नाद ही अतिसूक्ष्म ब्रह्मानुकंपा होय. हा मुळ ब्रह्मसंकल्प होय. ॐ हे त्या ब्रह्माला व्यक्तपणाने जाणण्याची खूण आहे, हे देव अर्जुनास समजावून देत आहेत.

ते पुढे म्हणाले. “पार्था, ह्या एका नावाने त्या ब्रह्माला आळवले तर ते ब्रह्म वृत्तिच्या मागे होते ते साक्षात वृत्तिच्या पुढे उभे राहते. परंतु वेदरूपी पर्वताच्या शिखरावर उपनिषदांच्या अर्थरूपी नगरीत जे परब्रह्माच्या पंक्तीस बसले आहेत त्यांनाच हे नामाचे रहस्य कळते. ब्रह्मादेवाच्या ठिकाणी विश्व निर्माण करण्याची जी शक्ति आली ती या नामाच्या आवृत्तिमुळेच आली. सृष्टि निर्माण करण्यापूर्ती तो प्रजापति ब्रह्मा वेड्यासारखा गोंधळलेला अवस्थेत एकटाच होता. मला ईश्वराला तो जाणत नव्हता. सृष्टिही निर्माण करू शकत नव्हता. पण एका नामाने त्याच्या ठिकाणी निर्माण करण्याची शक्ति उदित झाली.

**‘ॐ तत् सत’** असा तो मंत्र होता. त्या मंत्राच्या अर्थाचे त्याने मनाशी चिंतन केले, त्या मंत्राचा जप केला आणि सृष्टी निर्माण करण्यास सुरवात केली. त्याने प्रथम ब्राह्मण निर्माण केले. त्यांना आचरणाची पद्धत शिकविण्यासाठी वेद दिले. उदरनिर्वाहासाठी यज्ञकर्म करण्याची आज्ञा दिली. नंतर किती असंख्य लोक ब्रह्मदेवाने निर्माण केले हे काही कळत नाही. तिन्ही भुवने त्याने त्या लोकांना अग्रहार करून दिली.”

लक्ष्मीनाथ श्रीकृष्ण म्हणाले. “ज्या नाममंत्राने प्रत्यक्ष ब्रह्मदेवाला इतके सामर्थ्य दिले त्याचे स्वरूप तुला समजावून देतो, ऐक. त्या तीन शब्दांच्या मंत्रामध्ये सर्व मंत्रांचा राजा जो ॐ ते पहिले पद आहे, तत् हे

दुसरे व सत् हे तिसरे पद आहे.

याप्रमाणे 'ॐ तत् सत्' या रूपाने ब्रह्माचे हे नाम तीन प्रकारचे आहे. या सुंदर फुलाचा वास उपनिषदे घेतात इतके त्याचे महत्त्व आहे. आता सात्त्विक कर्म जेव्हा ह्या मंत्राशी एकरूप होऊन चालते चालते तेव्हा ते कर्म मोक्षाला आपल्या घरी पाईक करते. अडचण आहे ती ह्या मंत्राचा उपयोग कसा आणि कधी करावयाचा हे कळण्याची! कापराचे केलेले सुंदर दागिने आणून दिले तरी बाबा, ते अंगावर घालायचे कसे हे कळण्याचीच अडचण आहे. सत्कर्माचा आदर करता येईल, या ब्रह्मनामाचा जपही करता येईल पण त्याचा विनियोग कसा करावा हे कळले पाहिजे. महंताचा तांडा घरी आलाआपणहून आला आणि त्याचा आदरसत्कार कसा करावा हे कळले नाही तर मुदलातच पुण्यक्षय होतो. सोने आहे, त्यात जडविण्यासाठी रत्ने पण आहेत पण त्याचे जडावाचे दागिने कसे करावयाचे हे कळले नाही तर सोने आणि रत्ने यांच गाठोडे करून गळ्यात बांधण्याची वेळ यावयाची! अन्न समोर आहे, पोटात भूक आहे पण ते खावे कसे हे न कळल्याने लहान मुलाचा लघंनच व्हावयाचे! तेल, वात, अग्नि ही तिन्ही असून दिवा लावण्याची हातोटी नसली तर प्रकाश मिळायचाच नाही. त्याप्रमाणे तोंडात ब्रह्मनाम आहे, हाताने सत्कर्मही चालले आहे पण त्या ब्रह्मनामाचा व सत्कर्माचा मेळ कसा घालावा हे न कळल्याने श्रम वाया जातात म्हणून हे ध्यानात घे की वेळेवर कर्म घडते आहे, त्या कर्माचा मंत्रही आठवतो आहे पण त्याचा विनियोग कसा करावा हे जर कळले नाही तर सगळा खटाटोप व्यर्थ जातो. परब्रह्माच्या ह्या तीन पदात्मक नामाचा विनियोग सांगतो तो नीट ऐक आणि त्याप्रमाणे विनियोग करून आपले हित साधून घे.

अर्जुना, कर्माच्या आधी, मध्ये व शेवटी या तीन पदांची योजना करावी.

किरीटी, ब्रह्मविद् पुरुष ब्रह्माच्या भेटीस येतात तेही एक हातोटी जाणून घेऊनच येतात. शास्त्र जाणणारे पुरुष यज्ञादिक कर्माचा त्याग करीत नाहीत. ते यज्ञादिक सर्व कर्मे करतात पण यज्ञाचा हेतू मात्र त्या परब्रह्माशी ऐक्य साधावे हा असतो. त्यांना ह्या मंत्राचा विनियोग उत्तम प्रकारे माहीत असतो.

कर्माच्या आरंभी ते ध्यानाने ॐ कार सिद्ध करतात. मग वाचेने ॐ असा स्पष्ट उच्चार करतात. त्या ध्यानाने ॐ कार सिद्ध झाल्यावर आणि प्रणवोच्चार स्पष्टपणे झाल्यावर ते क्रियेच्या वाटेस लागतात. अंधारात केव्हाही न विझणारा दिवा हाती यावा, अरण्यात एखादा बलदंड सोबती बरोबर असावा तसा कर्मारंभी प्रणव जाणावा. ॐ काराच्या उच्चाराने कर्म निर्विघ्नपणे सिद्धीस जाते. ॐ कार व गणेश हे एकरूप असल्याने कर्मारंभी विघ्नहर्त्या गणेशाचे स्मरण केले जाते."

बाबामहाराज आर्वीकरांनी म्हटले आहे की उपास करून तीन रात्री ॐ काराचा एक हजार जप केला तर विघ्नांचा नाश होतो असा अनुभव आहे.

देव म्हणाले, "अर्जुना, सत्कार्माचा विचार केला तर दिसते की, काही लोक धर्माने मिळवलेले विपुल द्रव्य वेदांनी सांगितलेल्या योग्य देवतेच्या उद्देशाने ब्राह्मणद्वारा वा अग्निद्वारा यज्ञयाग करण्यात खर्च करतात. काही लोक विधानात निष्णात होऊन आहवनीयादि अग्नीमध्ये आहुती देऊन यज्ञ करतात. काहीजण चांगल्या

तऱ्हेने यज्ञ करून देहाहंकारादि उपाधींचा त्याग करतात. काहीजण न्यायाने मिळविलेल्या पवित्र अशा आपल्या मालकीच्या जमिनी वगैरे मालमत्तेचे शुध्द अशा देशकाल व पात्राचे ठिकाणी दान करतात."

आमच्या आजी ती. श्री. काशीबाई कानिटकर यांच्या आत्मचरित्रात त्यांनी एक हकीकत दिली आहे. त्या लिहितात, "माझे वडील अण्णासाहेब बापट अष्ट्यास मामलेदार असताना सरकारी मामलेदार कचेरीच्या वाड्यात माझा जन्म १८६१ च्या जानेवारीत झाला. अष्ट्यास असताना आणि माझ्या जन्मापूर्वी अण्णासाहेब फिरतीवर औदुंबरला दत्तदर्शनासाठी व कृष्णास्नानास वारंवार जात. औदुंबर येथील ब्रह्मानंद महाराजांना दृष्टांत झाला की "अण्णासाहेबांनी देऊळ बांधावे." पहिला दृष्टांत अण्णासाहेबांनी मानला नाही. ते म्हणाले, "त्यांना दृष्टांत झाला. मला नाही." पण अण्णासाहेबांना पुन्हा चार वेळा दृष्टांत झाले. पहिल्या व दुसऱ्या दृष्टान्ताच्या वेळी त्यांना हा आपल्या कल्पनेचा खेळ असावा असे वाटले. तिसऱ्या वेळी वाटले. "आपण गरीब मनुष्य, दृष्टांत खरा असला तरी देवळाचे अवाढव्य काम आपणास कसे झेपणार?" असे म्हणून त्यांनी तो नाद सोडला. चवथ्यांदा दृष्टांत झाला "देऊळ बांध. लहान बांध पण मी तुझ्याच हातून देऊळ बांधून घेणार." त्यानंतर त्यांनी देऊळ बांधण्याचे मनावर घेतले व त्याच्या तयारीस लागले. पाचवा दृष्टांत झाला की, "कारागिरास वाडीला पाठवून तेथील देवळाच्या मापाने येथे देऊळ बांधावे." देऊळ बांधू लागल्यावर दत्ताचे काम दत्तानेच करून घेतले.

अवघी चारपाचशेची प्राप्ती! कुटुंब मोठे! त्यामुळे अंगावर घेतलेले काम कसे पार पडेल याची अण्णासाहेबांना काळजी लागून राहिली. त्यांनी मॅजिस्ट्रेटी भत्ता देवळाच्या खर्चाकडे लावून दिला होता. काम दोन वर्षात पार पडले. त्याच ठिकाणी सेवेकऱ्यांसाठी धर्मशाळा बांधल्या व मधुकरीचे अन्नछत्र ठेवले. देवाला फुले लागतील म्हणून एक लहानशी बाग केली व बागेला पाणी पाहिजे म्हणून विहीर खणली. देवाच्या नंदादीपाकरिता एका पुजाऱ्याला जमीन विकत घेऊन दिली. देवाची रोजची पूजा, एकादष्णी नैवेद्य, वैश्वदेव ह्याकरिता एका ब्राह्मणाला दर महिन्यास वर्णी देण्याची योजना केली. मधुकरीला एक खूप मोठी जाड भाकरी व खूप मोठे ओगराळेभर आमटी घालण्याचा शिरस्ता घालून दिला. मठाच्या खर्चाला वार्षिक दोनशे रुपयांच्या उत्पन्नाच्या जमिनी घेऊन दिल्या. त्या ठिकाणी ब्रह्मानंदमहाराज म्हणून जे मोठे योगी रहात असत त्यांना स्वतंत्र जागा बांधून दिली. स्वतःच्या श्रमाच्या कमाईतून ही सर्व व्यवस्था आण्णासाहेब बापटांनी केली. श्रीदत्ताचे पाच दृष्टांत घेऊन आण्णासाहेबांनी ॐ कार सिद्ध केलाच होता. औदुंबरचे देऊळ तयार झाल्यावर त्या सत्कर्माचे स्वामित्व ज्याचे त्याला अर्पण करण्याचा प्रसंग लगेच आलाच.

ती. श्री. वहिनी (काशीबाई कानिटकर) लिहिते, "औदुंबरचे देऊळ तयार झाल्यावर देवाच्या अर्चेची तयारी झाली. तेथे एक पुजारी होता. त्याने पुढाकार घेऊन "अण्णासाहेब आपस्तंब शाखेचे आहेत म्हणून त्यांनी अर्चा करू नये" असा विरोध केला. ते म्हणत "आम्ही ऋग्वेदी आहो. आम्हीच देवाची अर्चा करणार."

अण्णासाहेबही विशेष हट्ट न धरता "तुम्ही अर्चा करा." असे म्हणाले.

आपण देऊळ बांधले, देवळाची व्यवस्था केली असा अहंकार अण्णासाहेबांना वाटतो की काय अशी जणू काही देवाने परीक्षा पाहिली.

अनुक्रमणिका

ती वहिनी लिहिते. “परंतु पुजाऱ्यांना दृष्टान्त झाला की, ‘मी तुमचे हातून अर्चा घेणार नाही. अण्णासाहेबांनीच अचो करावी.’ त्यामुळे सर्वांचा नाइलाज होऊन ते सर्व गप्प बसले आणि अर्चा अण्णासाहेबांचे हातूनच झाली.”

शुद्ध दान, शुद्ध यज्ञ हा असा असतो.

देव म्हणाले. “काहीजण एक दिवसाड जेवतात. काहीजण कृच्छ्र करतात. पहिले दिवशी एकदा जेवण, दुसरे दिवशी सायंकाळी जेवण, तिसरे दिवशी न मागता आपोआप प्राप्त होईल ते खाणे व चौथे दिवशी उपोषण याप्रमाणें क्रमाने बारा दिवस करावयाचे या व्रतास कृच्छ्र असे म्हणतात. काहीजण चांद्रायण व्रत करतात. पौर्णिमेस पंधरा घास खाऊन वद्य पक्षात रोज एकेक कमी करत अमावास्येस उपोषण व शुक्ल पक्षात एकेक घास जास्त खावयाचा याला चांद्रायण व्रत म्हणतात. काहीजण मासोपवास करतात आणि शरीरशोषण करून तप करतात. ॐकाराचा उच्चार करून जर ही बंधनरूप म्हणून प्रसिद्ध असलेली यज्ञ, दान, तप, व्रते केली तर ती मोक्ष मिळणे सोपे करतात. ती बंधक होत नाहीत मोचक होतात.

परंतु, आता ते राहू दे. अशा तऱ्हेने या यज्ञदानादिक क्रिया ॐकाराच्या सहाय्याने चालू होतात. सुरवात ॐकाराने होते. त्या क्रिया जेव्हा फळामध्ये थोडासा प्रवेश करू लागतात तेव्हा पहा की, ते पुरुष तत् शब्दाचा विनियोग करतात. जी वस्तू सर्व जगापलीकडे आहे, जी वस्तू सर्वांचाही द्रष्टा आहे ती वस्तू तत् ह्या शब्दाने दर्शवली जाते. हे ज्ञाते पुरुष तत् नावाचे ब्रह्म सर्वांच्या आरंभीचे आहे त्याचे चित्तात ध्यान करतात. तत् शब्दाचा उच्चार करतात आणि म्हणतात हे तत् स्वरूप ब्रह्म, आम्ही या ज्या क्रिया केल्या त्या त्या फलासहित तुला अर्पण होवोत. आम्हाला भोगावयास काही उरू देऊ नको. याप्रमाणे तत्चा उच्चार करून त्या तत्च्या ठिकाणी फलासहित सर्व क्रिया अर्पण करून “न मम” असे म्हणून अंग झाडून टाकतात. ॐकाराच्या विनियोगाने ज्या कर्माचा आरंभ झाला तत् शब्दाच्या विनियोगाने त्या कर्माला ब्रह्मत्व प्राप्त होते. पण कर्म ब्रह्मार्पण व ब्रह्मरूप होऊनही भागत नाही. अजून कर्ता शिल्लक असतो. मीठ पाण्यात विरघळले तरी खारटपणाच्या रूपाने शिल्लक असते. त्याप्रमाणे कर्म ब्रह्माकार झाले तरी कर्ता शिल्लक असल्याने द्वैत उरलेले असते आणि जोवर द्वैत आहे तोवर संसारभय प्राप्त होतेच असे देव सांगत आहेत, प्रत्यक्ष सांगत आहेत, वेदांच्या मुखांनी सांगत आहेत. परत्वाने असलेले ब्रह्म आत्मत्वाने अनुभवास येण्यासाठी अजून असलेल्या द्वैताची उणीव भरून काढण्यासाठी देवांनी सत् ह्या पदाची योजना केली आहे. ॐकार व तत्कार ह्यांच्या सहाय्याने जे कर्म केले व असे कर्म करून शरीरच ब्रह्मवस्तूने भरून टाकले त्या कर्माची ‘प्रशस्त’ अशा शब्दाने स्तुती केली जाते त्या प्रशस्त कर्मामध्ये तिसरे पद जे सत् त्याचा विनियोग कसा करावयाचा ते सांगतो.

सत् शब्दाने सुचनिले जाते आहे ब्रह्म. असत् नव्हे ते सत्. या शब्दाने असत् चे नाणे आटवून टाकून पदार्थमात्राचा निरास करून सत्तेचे म्हणजे ब्रह्माचे निर्दोष स्वरूप सांगितले जाते. ही जी ब्रह्माची सत्ता किंवा सत् हे देशकाळानुरुप वेगळे होत नाही. त्या सतास बद्दल माहीतच नाही ते आपण आपल्या ठिकाणी अखंड आहे. हे जितके काही दृश्य साकार जग आहे ते असत् असल्यामुळेच, ते असत् आहे हे कळल्याबरोबर, त्या सत् चा म्हणजे ब्रह्म वस्तूचा अनुभव येतो. त्या ब्रह्मस्वरूपाचा आधार मिळतो. सर्वात्मक ब्रह्मस्वरूप झालेले ते प्रशस्त

कर्म आपल्यासह त्या ब्रह्माशी एकरूप झालेले अनुभवास यावे म्हणून सत् शब्दाचा विनियोग करावा. कर्म करण्यासाठी ॐकार, कर्म व कर्मफळ ब्रह्मार्पण करण्यासाठी तत्कार व हे कर्म करणारा कर्ता म्हणजे आपण त्या ब्रह्मरूप कर्मासहित ब्रह्मरूप होऊन जाण्यास सत्कार यांचा विनियोग करावा. कर्म सुरू करताना कर्म अर्पण करताना कर्ता हा भाव असतो पण तोही मोक्षास बांध म्हणून हे कर्तेपणही ब्रह्मार्पण करावयाचे आदि, मध्य व अंत ही कर्माची तीन स्थाने त्या ती स्थानी ॐ तत् सत् यांचा हा असा विनियोग देवानी सांगितला. सत् शब्दाचा हा अंतरंग विनियोग आहे, असे श्रीरंग म्हणाले. ज्ञानदेव म्हणतात, "असे देव म्हणाले हो. मी म्हणत नाही. मी हे माझे म्हणणे आहे असे म्हणणे म्हणजे मी देवाहून वेगळा आहे असे म्हटल्यासारखे आहे व मग द्वैत मांडल्याचा दोष उत्पन्न होईल म्हणून मी म्हणतो हे म्हणणे देवांचेच.

देव म्हणाले. "या सत् शब्दाचा आणखी एक उपयोग आहे. सात्त्विक कर्मावर हा सत् शब्द आणखी एक उपकार करतो. सत्कर्मे आपआपल्या अधिकाराप्रमाणे चाललेली असतात पण मधेच एखादे अंग उणे पडते. एखादा अवयव उणा पडला की, शरिराचे व्यापार थांबतात किंवा चाक वगैरे नसलेल्या रथाची गती मंद होते, त्याप्रमाणे एका गुणाचा अभाव झाल्यामुळे सत्कर्मच असत्कर्मपणा धारण करते. तेव्हा ॐकार व तत्कार यांच्या सहाय्याने उत्तमप्रकारे चाललेले कर्म असे एखाद्या अंगाच्या अभावाने उणे पडू लागले की सत् शब्दाचा उच्चार ते उणेपण भरून काढतो, त्या कर्माचा जीर्णोद्धार करतो आणि ते सत्कर्म सर्वांगाने परिपूर्ण होते. सत् या शब्दाचे सामर्थ्यच असे अपूर्व असते की कर्माचे असत्पण नाहीसे करावे, त्यास सत्पणाची व्यवहारात जोड करून द्यावी मोठेपणा प्राप्त करून द्यावा. रोग्याला दिव्यौषधी मिळावी, खचलेल्या माणसाला धैर्य प्राप्त व्हावे त्याप्रमाणे न्यून असलेल्या कर्माला सत् शब्द पूर्णत्व आणून देतो.

पुष्कळदा असेही घडते की सरळ चालता चालता मनुष्य वाट चुकतो. पारखून घेणारा मनुष्य फसवला जातो. व्यवहारात काय काय घडत नाही? कोणकोणत्या चुका होत नाहीत? अविचाराने कधी कधी कर्माची मर्यादा सुटते आणि ते कर्म असाधु कर्म या दोषाकडे येऊ लागते. तेव्हा जर ह्या सत् शब्दाचा उपयोग केला तर ते कर्म सत्कर्मच रहाते. ॐकार व तत्कारापेक्षाही सत्कार जास्त प्रौढ आहे, बलवान आहे. लोह परिसावर घासावे, ओहोळ गंगेला जाऊन मिळावा किंवा मृतावर अमृताचा वर्षाव व्हावा त्याप्रमाणे असत्कर्माचा विनियोग त्याचे असत्त्व घालवून सत्कर्मात परिवर्तन करण्याच सामर्थ्य ह्या सत् या पदात आहे. एवढा याचा गौरव आहे. वर सांगितलेले कर्म लक्षात घेऊन जर तू या नामाचा विचार करशील तर तुला कळेल की हे नाम म्हणजे केवळ ब्रह्मच आहे.

अर्जुना, पहा की 'ॐ तत् सत्' या नामाचा उच्चार हे जग जिथून दृश्यमान होते त्या जागी नेऊन पोचवते. ते ठिकाण तर निधर्म चोख असे परब्रह्म आहे. 'ॐ तत् सत्' हे नाव त्याला व्यक्त करून दाखवते.

'पण पार्था, नाम आणि नामी यांचा अभेद आहे तुला पटते ना? आकाश या नावाला आकाश हाच आधार आहे. त्याप्रमाणे 'ॐ तत् सत्' या पदाचा म्हणजे नामाचा परब्रह्मास म्हणजे नामीस आधार आहे, अभेद आहे. सूर्य प्रकाशात उगवला की सूर्यच सूर्याला प्रकाशित करतो त्याप्रमाणे नामाचा उच्चार केल्याबरोबर ब्रह्मच प्रकाशमान होते. हे ध्यानात घे अर्जुना. हे तीन अक्षरी नाम, नाम म्हणू नये साक्षात् ब्रह्मच म्हणावे.

म्हणून म्हणतो की यज्ञ, दान, तप इत्यादी कोणतीही कर्म असोत, कठीण असोत वा सोपी असोत पुरी होवोत वा अपुरी असोत ब्रह्मार्पण केली की ब्रह्मरूप व अव्यंग होतात. परिसाचा कसोटीवर लोखंड चांगले वाईट अशी विवंचना नसते. जिथे सर्व प्रकारच्या लोखंडाचे सरसकट उत्तम सोनेच होते. त्याप्रमाणे कर्म कसेही असो ब्रह्माने त्याचा स्वीकार केला की, ते उत्तमच होते. समुद्रात लहानमोठ्या नद्या जशा वेगवेगळ्या न राहता एकच होतात. त्याप्रमाणे सर्व कर्म पोटात घालून त्याचे फळ मोक्षकर्त्याच्या स्वाधीन करणे हे त्या तीन अक्षरी मंत्राचे सहज सामर्थ्य आहे.

राजा अर्जुना, तू मर्मज्ञ आहेस. वीरा, मी तुला हा मंत्र सांगितला, त्यातल्या प्रत्येक अक्षराचा वेगवेगळा विनियोगही सांगितला. तू हे ब्रह्मनाम नीट जाणलेस काय? राजा, ह्या नामावर तुझी अढळ श्रद्धा असू दे. कारण या नामाच्या विनियोगाने झालेले कर्म जन्ममरणरूपी बंध उरू देत नाही. ज्या कर्मामध्ये या नामाचा सद् विनियोगासह प्रयोग अनुष्ठिला जातो तेथे संपूर्ण वेदाचेच अनुष्ठान घडते असे समज आणि याचे अत्यंत श्रद्धापूर्वक नित्य अनुष्ठान कर. तो मंत्र तुला या भवचक्रातून सोडवील.

जर का ह्या नामाचा आश्रय टाकून दिला आणि दुराग्रहाचे बल वाढविले आणि कोटी अश्वमेध यज्ञ केले, रत्नांनी भरून पृथ्वीचे दान दिले, हजारो वर्षे अंगठ्यावर उभे राहून तपश्चर्या केली, समुद्रासारखे मोठमोठे तलाव खोदले तरी ते सगळे व्यर्थ आहे. खडकावर झालेली वृष्टि, भस्मामध्ये दिलेली आहुति, सावलीला दिलेले आलिंगन हे जसे व्यर्थ आहे त्याप्रमाणे हे सगळे यज्ञ, दान, तप व्यर्थ आहे. आकाशाला थप्पड मारल्याप्रमाणे हा सगळा समारंभ वाया गेला असे समजावे. घाण्यामध्ये दगड गाळून काय होणार, तेल मिळणार की पेंड उरणार आहे? होते दारिद्र्य तेवढे शिल्लक राहणार! पदराच्या शेवास खापरी बांधली तर ती या तीरावर किंवा पर तीरावर काही पैसा म्हणून चालणार आहे का? उपाशी मरण्याचीच पाळी नाही का?

अरे, नाममंत्रावाचून केलेल्या अशा ह्या कर्माचे फळ म्हणून ऐहिक भोगसुद्धा भोगायला मिळत नाहीत, तर परलोकाच्या प्राप्तीची काय अपेक्षा ठेवायची आहे? अर्जुना, ब्रह्मनामावरची श्रद्धा सोडून केलेले कर्म म्हणजे इहपरलोकी नुसता शीणच आहे. ज्ञानी पुरुषाने असा हा वाया शीण करू नये.

पापरूपी हत्तीचा नाश करणारे जणू सिंहच आणि त्रिविधतारूपी अंधःकारास जणू काय सूर्यच, श्रीनरहरि श्रीकृष्ण असे म्हणाले.

संजय म्हणाला, “चंद्र चांदण्याने झाकला जावा तसा अर्जुन निजानंदामध्ये हरपून गेला. आहे, ही लढाई म्हणजे जसा काही एखादा वाणी आहे आणि तो बाणाच्या मापाने जीवितासह शरिराचे माप टाकतो आहे. पण महाराज अशा कर्कशवेळी हा अर्जुन स्वानंदराज्य कसे भोगतो आहे पहा. भाग्योदय ज्याला म्हणावे तो आज त्याच्याशिवाय आणखी कुठल्याही ठिकाणी नाही.”

संजय पुढे म्हणाला, “महाराज शत्रूच्या या गुणाचा आपण गौरव केला पाहिजे. अहो आमच्या सुखाचा हा गुरू आहे. ह्या अर्जुनाने जर देवांना प्रश्न विचारले नसते तर देवांनी आपली ही गुप्तधनाची गाठ कशाला सोडली असती? आणि आमची आणि परमार्थाची कशी गाठ पडली असती? अज्ञानाच्या अंधारात

जन्ममरणरूपी रस्त्याने आम्ही युगानुयुगे चालतच होतो पण त्या अर्जुनाने आम्हाला आत्मप्रकाशाच्या मंदिरात आणले. तुम्हा आम्हांवर या पार्थाने केवढा हा उपकार केला आहे! व्यास आमचे गुरू! आता पार्थाने आम्हांला उपदेश ऐकवून धन्य केले आणि आमचा गुरू झाला. म्हणजे प्रत्यक्ष व्यासांचा सहोदर झाला." संजय असे बोलता बोलता मधेच थांबला. त्याच्या ध्यानात आले की, "ही अर्जुनाची स्तुति राजा धृतराष्ट्रास मुळीच खपणार नाही. तेव्हा त्याला झोंबणारे भाषण एवढे केले हेच खूप झाले." असे म्हणून संजयाने तो विषय सोडला आणि पार्थाने पुन्हा जो प्रश्न विचारला आणि देव त्या प्रश्नाचे उत्तर देऊ लागले. ह्या विषयास सुरवात केली.

निवृत्तिदास ज्ञानदेव म्हणाले, "संजयाने जे व्याख्यान धृतराष्ट्रासाठी केले तेच मी करेन. ऐकावे महाराज."

***

अनुक्रमणिका

॥ श्री ॥

अध्याय अठरावा

## मोक्षसंन्यासयोग

॥ ॐ नमो भगवते वासुदेवाय ॥

अर्जुन उवाच—

संन्यासस्य महाबाहो तत्त्वमिच्छामि वेदितुम्
त्यागस्य च हृषीकेश पृथक्केशिनिषूदन ॥ १ ॥

श्रीभगवानुवाच—

काम्यानां कर्मणां न्यासं संन्यासं कवयो विदुः ।
सर्वकर्मफलत्यागं प्राहुस्त्यागं विचक्षणाः ॥ २ ॥

त्याज्यं दोषवदित्येके कर्म प्राहुर्मनीषिणः ।
यज्ञदानतपःकर्म न त्याज्यमिति चापरे ॥ ३ ॥

निश्चयं श्रृणु मे तत्र त्यागे भरतसत्तम ।
त्यागो हि पुरुषव्याघ्र त्रिविधः संप्रकीर्तितः ॥ ४ ॥

यज्ञदानतपःकर्म न त्याज्यं कार्यमेव तत् ।
यज्ञो दानं तपश्चैव पावनानि मनीषिणाम् ॥ ५ ॥

एतान्यपि तु कर्माणि सङ्गं त्यक्त्वा फलानि च ।
कर्तव्यानीति मे पार्थ निश्चितं मतमुत्तमम् ॥ ६ ॥

नियतस्य तु सन्यासः कर्मणो नोपपद्यते ।
मोहात्तस्य परित्यागस्तामसः परिकीर्तितः ॥ ७ ॥

दुःखमित्येव यत्कर्म कायक्लेशभयात् त्यजेत् ।
स कृत्वा राजसं त्यागं नैव त्यागफलं लभेत् ॥ ८ ॥

अनुक्रमणिका

कार्यमित्येव यत्कर्म नियतं क्रियतेऽर्जुन ।
सङ्गं त्यक्त्वा फलं चैव स त्यागः सात्त्विको मतः ॥ ९ ॥

न द्वेष्ट्यकुशलं कर्म कुशले नानुषज्जते ।
त्यागी सत्त्वसमाविष्टो मेधावी छिन्नसंशयः ॥ १० ॥

न हि देहभृता शक्यं त्यक्तुं कर्माण्यशेषतः ।
यस्तु कर्मफलत्यागी स त्यागीत्यभिधीयते ॥ ११ ॥

अनिष्टमिष्टं मिश्रं च त्रिविधं कर्मणः फलम् ।
भवत्यत्यागिनां प्रेत्य न तु संन्यासिनां क्वचित् ॥ १२ ॥

पञ्चैतानि महाबाहो कारणानि निबोध मे ।
सांख्ये कृतान्ते प्रोक्तानि सिद्धये सर्वकर्मणाम् ॥ १३ ॥

अधिष्ठानं तथा कर्ता करणं च पृथग्विधम् ।
विविधाश्च पृथक् चेष्टा दैवं चैवात्र पञ्चमम् ॥ १४ ॥

शरीरवाङ्मनोभिर्यत्कर्म प्रारभते नरः ।
न्याय्यं वा विपरीतं वा पञ्चैते तस्य हेतवः ॥ १५ ॥

तत्रैवं सति कर्तारमात्मानं केवलं तु यः ।
पश्यत्यकृतबुद्धित्वान्न स पश्यति दुर्मतिः ॥ १६ ॥

यस्य नाहंकृतो भावो बुद्धिर्यस्य न लिप्यते ।
हत्वाऽपि स इमाँल्लोकान्न हन्ति न निबध्यते ॥ १७ ॥

ज्ञानं ज्ञेयं परिज्ञाता त्रिविधा कर्मचोदना ।
करणं कर्म कर्तेति त्रिविधः कर्मसंग्रहः ॥ १८ ॥

ज्ञानं कर्म च कर्ता च त्रिधैव गुणभेदतः ।
प्रोच्यते गुणसंख्याने यथावच्छृणुः तान्यपि ॥ १९ ॥

सर्वभूतेषु येनैकं भावमव्ययमीक्षते ।
अविभक्तं विभक्तेषु तज्ज्ञानं विद्धि सात्त्विकम् ॥ २० ॥

अनुक्रमणिका

पृथक्त्वेन तु यज्ज्ञानं नानाभावान्पृथग्विधान् ।
वेत्ति सर्वेषु भूतेषु तज्ज्ञानं विद्धि राजसम् ॥ २१ ॥

यत्तु कृत्स्नवदेकस्मिन्कार्ये सक्तमहैतुकम् ।
अतत्त्वार्थवदल्पं च तत्तामसमुदाहृतम् ॥ २२ ॥

नियतं पङ्‌गरहितमरागद्वेषतः कृतम् ।
अफलप्रेप्सुना कर्म यत्तत्सात्त्विकमुच्यते ॥ २३ ॥

यत्तु कामेप्सुना कर्म साहंकारेण वा पुनः ।
क्रियते बहुलायासं तद्राजसमुदाहृतम् ॥ २४ ॥

अनुबन्धं क्षयं हिंसामनपेक्ष्य च पौरुषम ।
मोहादारभ्यते कर्म यत्तत्तामसमुच्यते ॥ २५ ॥

मुक्तसङ्गोऽनहंवादी धृत्युत्साहसमन्वितः ।
सिद्‌ध्यसिद्‌ध्योर्निर्विकारः कर्ता सात्त्विक उच्यते ॥ २६ ॥

रागी कर्मफलप्रेप्सुर्लुब्धो हिंसात्मकोऽशुचिः ।
हर्षशोकान्वितः कर्ता राजसः परिकीर्तितः ॥ २७ ॥

अयुक्तः प्राकृतः स्तब्धः शठो नैष्कृतिकोऽलसः ।
विषादी दीर्घसूत्री च कर्ता तामस उच्यते ॥ २८ ॥

बुद्धेर्भेदं धृतेश्चैव गुणतस्त्रिविधं श्रृणु ।
प्रोच्यमानमशेषेण पृथक्त्वेन धनंजय ॥ २९ ॥

प्रवृत्तिं च निवृत्तिं च कार्याकार्ये भयाभये ।
बन्धं मोक्षं च या वेत्ति बुद्धिः सा पार्थ सात्त्विकी ॥ ३० ॥

यया धर्ममधर्मं च कार्यं चाकार्यमेव च ।
अयथावत्प्रजानाति बुद्धिः सा पार्थ राजसी ॥ ३१ ॥

अधर्मं धर्ममिति या मन्यते तमसावृता ।
सर्वार्थान्विपरीतांश्च बुद्धिः सा पार्थ तामसी ॥ ३२ ॥

अनुक्रमणिका

धृत्या यया धारयते मनःप्राणेंद्रियक्रियाः ।
योगेनाव्यभिचारिण्या धृतिः सा पार्थ सात्त्विकी ॥ ३३ ॥

यया तु धर्मकामार्थान्धृत्या धारयतेऽर्जुन ।
प्रसङ्गेन फलाकाङ्क्षी धृतिः सा पार्थ राजसी ॥ ३४ ॥

यया स्वप्नं भयं शोकं विषादं मदमेव च ।
न विमुञ्चति दुर्मेधा धृतिः सा तामसी मता ॥ ३५ ॥

सुखं त्विदानीं त्रिविधं श्रृणु मे भरतर्षभ ।
अभ्यासाद्रमते यत्र दुःखान्तं च निगच्छति ॥ ३६ ॥

यत्तदग्रे विषमिव परिणामेऽमृतोपमम् ।
तत्सुखं सात्त्विकं प्रोक्तमात्मबुद्धिप्रसादजम् ॥ ३७ ॥

विषयेन्द्रियसंयोगाद्यत्तदग्रेऽमृतोपमम् ।
परिणामे विषमिव तत्सुखं राजसं स्मृतम् ॥ ३८ ॥

यदग्रे चानुबन्धे च सुखं मोहनमात्मनः ।
निद्रालस्यप्रमादोत्थं तत्तामसमुदाहृतम् ॥ ३९ ॥

न तदस्ति पृथिव्यां वा दिवि देवेषु वा पुनः ।
सत्त्वं प्रकृतिजैर्मुक्तं यदेभिः स्यात्त्रिभिर्गुणैः ॥ ४० ॥

ब्राह्मणक्षत्रियविशां शूद्राणां च परंतप ।
कर्माणि प्रविभक्तानि स्वभावप्रभवैर्गुणैः ॥ ४१ ॥

शमो दमस्तपः शौचं क्षान्तिरार्जवमेव च ।
ज्ञानं विज्ञानमास्तिक्यं ब्रह्मकर्म स्वभावजम् ॥ ४२ ॥

शौर्यं तेजो धृतिर्दाक्ष्यं युद्धे चाप्यपलायनम् ।
दानमीश्वरभावश्च क्षात्रं कर्म स्वभावजम् ॥ ४३ ॥

कृषिगोरक्ष्यवाणिज्यं वैश्यकर्म स्वभावजम् ।
परिचर्यात्मकं कर्म शूद्रस्यापि स्वभावजम् ॥ ४४ ॥

अनुक्रमणिका

स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः ।
स्वकर्मनिरतः सिद्धिं यथा विन्दति तच्छृगु ॥ ४५ ॥

यतः प्रवृत्तिर्भूतानां येन सर्वमिदं ततम् ।
स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विन्दति मानवः ॥ ४६ ॥

श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् ।
स्वभावनियतं कर्म कुर्वन्नाप्नोति किल्बिषम् ॥ ४७ ॥

सहजं कर्म कौन्तेय सदोषमपि न त्यजेत् ।
सर्वारम्भा हि दोषेण धूमेनाग्निरिवावृताः ॥ ४८ ॥

असक्तबुद्धिः सर्वत्र जितात्मा विगतस्पृहः ।
नैष्कर्म्यसिद्धिं परमां संन्यासेनाधिगच्छति ॥ ४९ ॥

सिद्धिं प्राप्तो यथा ब्रह्म तथाऽप्नोति निबोध मे ।
समासेनैव कौन्तेय निष्ठा ज्ञानस्य या परा ॥ ५० ॥

बुद्ध्या विशुद्ध्या युक्तो धृत्यात्मानं नियम्य च ।
शब्दादीन्विषयांस्त्यक्त्वा रागद्वेषौ व्युदस्य च ॥ ५१ ॥

विविक्तसेवी लघ्वाशी यतवाक्कायमानसः ।
ध्यानयोगपरो नित्यं वैराग्यं समुपाश्रितः ॥ ५२ ॥

अहंकारं बलं दर्पं कामं क्रोधं परिग्रहम् ।
विमुच्य निर्ममः शान्तो ब्रह्मभूयाय कल्पते ॥ ५३ ॥

ब्रह्मभूतः प्रसन्नात्मा न शोचति न काङ्क्षति ।
समः सर्वेषु भूतेषु मङ्गक्तिं लभते पराम् ॥ ५४ ॥

भक्त्या मामभिजानाति यावान् यश्चास्मि तत्त्वतः ।
ततो मां तत्त्वतो ज्ञात्वा विशते तदनन्तरम् ॥ ५५ ॥

सर्वकर्माण्यपि सदा कुर्वाणो मद्व्यपाश्रयः ।
मत्सप्रसाददवाप्नोति शाश्वतं पदमव्ययम् ॥ ५६ ॥

अनुक्रमणिका

चेतसा सर्वकर्माणि मयि संन्यस्य मत्परः ।
बुद्धियोगमुपाश्रित्य मच्चित्तः सततं भव ॥ ५७ ॥

मच्चित्तः सर्वदुर्गाणि मत्प्रसादात्तरिष्यसि ।
अथ चेत्त्वमहंकारान्न श्रोष्यसि विनङ्क्ष्यसि ॥ ५८ ॥

यदहंकारमाश्रित्य न योत्स्य इति मन्यसे ।
मिथ्यैष व्यवसायस्ते प्रकृतिस्त्वां नियोक्ष्यति ॥ ५९ ॥

स्वभावजेन कौन्तेय निबद्धः स्वेन कर्मणा ।
कर्तुं नेच्छ्सि यन्मोहात्करिष्यस्यवशोऽपि तत् ॥ ६० ॥

ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशे ऽर्जुन तिष्ठति ।
भ्रामयन्सर्वभूतानि यन्त्रारूढानि मायया ॥ ६१ ॥

तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत ।
तत्प्रसादात्परां शान्तिं स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम् ॥ ६२ ॥

इति ते ज्ञानमाख्यातं गुह्याद्गुह्यतरं मया ।
विमृश्यैतदशेषेण यथेच्छसि तथा कुरु ॥ ६३ ॥

सर्वगुह्यतमं भूयः श्रृणु मे परमं वचः ।
इष्टोऽसि मे दृढमिति ततो वक्ष्यामि ते हितम् ॥ ६४ ॥

मन्मना भव मदक्तो मद्याजी मां नमस्कुरु ।
मामेवैष्यसि सत्यं ते प्रतिजाने प्रियोऽसि मे ॥ ६५ ॥

सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज ।
अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ॥ ६६ ॥

इदं ते नातपस्काय नाभक्ताय कदाचन ।
न चाशुश्रूषवे वाच्यं न च मां योऽभ्यसूयति ॥ ६७ ॥

य इदं परमं गुह्यं मद्क्तेष्वभिधास्यति ।
भक्तिं मयि परां कृत्वा मामेवैष्यत्यसंशयः ॥ ६८ ॥

न च तस्मान्मनुष्येषु कश्चिन्मे प्रियकृत्तमः ।
भविता न च मे तस्मादन्यः प्रियतरो भुवि ॥ ६९ ॥

अध्येष्यते च य इमं धर्म्यं संवादमावयोः ।
ज्ञानयज्ञेन तेनाहमिष्टः स्यामिति मे मतिः ॥ ७० ॥

श्रद्धावाननसूयश्च श्रृणुयादपि यो नरः ।
सोऽपि मुक्तः शुभाँल्लोकान्प्राप्नुयात्पुण्यकर्मणाम् ॥ ७१ ॥

कच्चिदेतच्छ्रुतं पार्थ त्वयैकाग्रेण चेतसा ।
कच्चिदज्ञानसंमोहः प्रनष्टस्ते धनंजय ॥ ७२ ॥

अर्जुन उवाच—

नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा त्वत्प्रसादान्मयाऽच्युत ।
स्थितोऽस्मि गतसन्देहः करिष्ये वचनं तव ॥ ७३ ॥

संजय उवाच—

इत्यहं वासुदेवस्य पार्थस्य च महात्मनः ।
संवादमिममश्रौषमद्भुतं रोमहर्षणम् ॥ ७४ ॥

व्यासप्रसादाच्छ्ररुतवानेतद्गुह्यमहं परम् ।
योगं योगेश्वरात्कृष्णात्साक्षात्कथयतः स्वयम् ॥ ७५ ॥

राजन्संस्मृत्य संस्मृत्य संवादमिममद्भुतम् ।
केशवार्जुनयोः पुण्यं हृष्यामि च मुहुर्मुहुः ॥ ७६ ॥

तच्च संस्मृत्य संस्मृत्य रूपमत्यद्भुतं हरेः ।
विस्मयो मे महान्राजन्हृष्यामि च पुनः पुनः ॥ ७७ ॥

यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।
तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ॥ ७८ ॥

इति श्रीमदगवद्तीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे

अनुक्रमणिका

श्रीकृष्णार्जुनसंवादे “मोक्षसंन्यासयोगो नाम” अष्टादशोऽध्यायः ॥ १८ ॥

श्रीकृष्णार्पणमस्तु ।

----------

**अनुक्रमणिका**

“मोगरा फुलला” या श्री. गो. नी. दांडेकर यांच्या कादंबरीत अठराव्या अध्यायास सुरवात झाली तो प्रसंग अतिशय सुंदर रंगवला आहे.

भट्ट देव हकीकत सांगत आहेत असा भाग आहे. ते म्हणतात. “शेवटी अठरावा अध्याय सुरू व्हायचा दीस उजाडला.

एकीकडे मने हुरहुरत होती तर दुसरीकडे तृप्तीने उचंबळोन येत होती. आम्हा सर्वांच्या कल्पनांना धक्के देत ज्ञानदेवाने या अध्यायाचे नमन थेट देववाणीत सुरू केले.

**जयजय देव निर्मळ ।**
**निजजनाखिलमंगळ ।**
**जन्मजराजलदजाळ । प्रभंजन ॥**

**जयजय देव प्रबळ ।**
**विदळितामंगळकुळ ।**
**निगमागमद्रुमफळ । फलप्रद ॥**

मुक्ता मजजवळी बसत असे. म्या कुजबुजत तिजला पुसले “हे काये बाळा?” ती माझे कानी बोलली,

“गीता ग्रंथ देववाणीत रचलेला. शेवटील अध्यायी त्या ग्रंथाची वाक्पूजा त्याच भाषेमाजी”

ह्या संस्कृतप्रचुर नमनाचे एवढे देखणे स्पष्टीकरण दुसरे काय असू शकणार?

माउली श्रीगुरूचे वर्णन करीत आहेत. म्हणतात, “हे निष्पापा, स्वजनांचे आपण कल्याण करणारे आहात. देवा, आमचे मंगल कशात आहे हे जाणून आपण त्याप्रमाणे आमचे कल्याण करता, जन्म, जरा, मृत्यू यांच्या भयाने आमचे मन जसे काही वर्षाकाळच्या मेघांनी भरलेल्या आकाशासारखे आंधारून आले होते; पण आपण त्या मनामध्ये सोसाट्याच्या वाऱ्याप्रमाणे घुसला आणि त्या भयाची दाणादाण उडवून दिली. जन्म, जरा, मृत्यू ह्या उपाधि आमच्या ह्या टीचभर देहालाच आहेत हे समजावून दिले आणि आत्मानुभवाचा दिव्य प्रकाश दाखवला. मनातले भय कुठेच्या कुठेच त्या प्रकाशात दडून गेले. महाराज, आपल्या ह्या वायुरूपास माझा नमस्कार असो, आपला जयजयकार असो, महाराज आपण प्रचंड सामर्थ्यशाली देव अहात. आमच्या जीवनातील अमंगलतेचे समुदाय आपण पराभूत केलेत, त्यांचा नाश केलात. एखाद्या जमिनीमध्ये खोल नांगरट करून त्यातील तण काढून टाकावे, ती चांगली तापवावी आणि त्यात उत्तमोत्तम वृक्ष लावावे आणि मग कालांतराने त्या वृक्षाला फल यावे असे व्यवहारात घडते. पण आपण मात्र आमच्यातील अमंगल दूर केले आणि वेद आणि शास्त्र यांचे फलच आमच्या हाती ठेवले. आपण स्वतः वेद आणि शास्त्रे याचे फल अहात आणि आम्हालाही आपण ते फल विनासायास जोडून दिले. श्रीगुरूदेवा, आपला जयजयकार असो.

अनुक्रमणिका

ज्यांनी विषयाचा त्याग केला ते सगळे आपल्या प्रेमाचे अधिकारी आहेत. आपण त्यांच्यावर वात्सल्याचा वर्षाव करता. काळाच्या करामतीसही आपण अंकित करून ठेवले आहे, तो आपला अंकित आहे. आपले स्वरूप कालातीत म्हणजे अंशादि विभागापलीकडचे आहे. श्रीगुरो, आपला जयजयकार असो.

महाराज, आपण सर्व उपाधींचा त्याग केलेला आहे. चंद्र पूर्ण कलेने प्रकट होतो तसे आपण आनंदाच्या लहरींनी प्रकट होता. ह्या लहरी समुद्रासारख्या अखंड उचंबळत असतात. आपण अखिल विश्वाचे कारण अहा. आपण सर्व प्रकारचे दोष नेहमी नाहीसे करीत असता. आपला जयजयकार असो.

देवा, आपण स्वयंप्रकाशी विशुद्ध अहा. जगद्रूपी ढगाला जन्म देणारे आकाश अहा. स्वर्गादि लोकांच्या उत्पत्तीचे आपण आधारभूत खांबच अहा. भवभयाचा नायनाट करणारे केवळ आपणच अहा. श्रीगुरूदेवा आपला जयजयकार असो.

गुरूदेवा आपण निश्चल अहा. चंचल चित्तास पिऊन टाकून आपले पोट अगदी तृप्त झाले आहे. जगत् प्रकट करण्याचा हा आपला आवडता खेळच चालला आहे. आपला जयजयकार असो.

हे अत्यंत शुद्धा, आपण ज्ञानोदयरूपी अरण्यात निर्भयतेने वावरणारे गजराज अहा. शमदम यांच्या प्रभावाने आपण कामभयाचा नाश करून टाकता. आपण करूणेचे साक्षात समुद्र अहा. आपला जयजयकार असो.

हे अविकारी देवा, आपण मदनरूपी सापाच्या घमेंडीचा धुव्वा उडवला आहे. भक्तांच्या प्रेमरूपी घरामध्ये आपण दिव्यासारखे तेजोमय अहा. आपला जयजयकार असो.

महाराज, आपण अद्वितीय अहा. परिपक्व झालेल्या वैराग्यवंतांचे आपल्यावर प्रेम आहे. आपण आपल्या भक्तांच्या आधीन असता पण मायेला मात्र अगम्य अहा. आपला जयजयकार असो.

महाराज, आपण तर कल्पतरू अहा. कल्पतरू इच्छा करावी ते देतो. आपण आपल्या भक्तांना प्रथम कल्पनारहित असे स्वरूपज्ञान देता आणि मग देवा त्या भक्ताला ते रूपच डोळ्यापुढे रहावे एवढीच एक इच्छा उरते आणि मग ती इच्छा आपण मोठ्या आनंदाने पुरविता. स्वरूपज्ञानरूपी वृक्षाचे बीज वाढविण्याची जमीन हे आपले रूप आहे. देवा, आपला जयजयकार असो.

देवा, आपण भेदरहित अहा. निरनिराळ्या विवेचनाद्वारे आपली स्तुती करावी हे देखील चुकीचे आहे. आपले वर्णन करणेच शक्य नाही कारण आपल्याला जे जे विशेषण लावावे ते लावून आपल्या स्वरूपाकडे पाहिले की कळते आहे की, त्या विशेषणांनी जे रूप सूचित केले ते आपले रूपच नाही. त्यामुळे आपली स्तुती करावी अशी किती जरी अनावर इच्छा झाली, स्तोत्र गाण्यास सुरवातही केली तरी ते उचित नव्हे हे जाणवते आणि लाज वाटते. मी माझ्या मनाला पुन्हा पुन्हा समजावून सांगतो आहे की, गुरूप्रेमाचे किती कल्लोळ उठले

तरी मना, ते वाचेमध्ये आले की, मळतात आणि त्यातून वाचेने शिकस्त केलीच तर ती स्तुती यथायोग्य होत नाही. पण महाराज, मी तरी काय करू? समुद्र पुष्कळ बढाई सांगतो की, "मी कधीही मर्यादा सोडून उसळत नाही." पण ही बढाई जोपर्यंत त्याचा लाडका पुत्र सुधाकर उदयाला येऊन आकाश उजळत नाही तोवरच टिकते. चंद्रकांत मणी असे काही ठरवत नाही की आपल्या पाण्याने चंद्राला अर्घ्य द्यावयाचे पण चंद्र उगवला की, तो नकळत पाझरतोच. चंद्राकडून परस्परच हे कार्य घडते. वनात वसंताचा प्रवेश झाला की, कशी कोण जाणे झाडांना आंग भरून पालवी फुटते. त्या वृक्षांना काही तो मोहोर आत दाबून ठेवता येत नाही. वसंत आला की पालवी फुटतेच. वृक्षांची इच्छा असो, नसो. प्रिय वस्तूच्या दर्शनाने मन पाझरणे हे सहजच आहे. सूर्यविकासी कमलिनींला सूर्यकिरण लाभले की ती संकोचून मिटून रहाते का? मिठाला पाण्याचा स्पर्श झाला की मीठ आपले शरीर विसरूनच जात नाही का? त्याचप्रमाणे मला आपले स्मरण झाले की मी आपले मीपण विसरतो. तृप्त पुरुष जसा ढेकरेने व्याप्त होतो त्याचप्रमाणे मी आपल्या स्मरणाने तृप्त होतो, मी स्वतःला आवरू शकत नाही. महाराज, आपणच मला तसे केले आहे. माझे मीपण देशांतराला धाडून दिले आणि स्तुतीच्या मिषाने माझ्या वाचेला आपल्या गुणवर्णनाचे वेड लावले. आता शुद्धीवर राहून स्तुती करावी असे म्हटले तर गुण आणि गुणातीत यांची बरोबरी केल्यासारखे होईल. आपले स्वरूप एकरशी आहे. स्वुती केली तर विभाग केल्यासारखे होईल. मोती आधी फोडायचे आणि मग जोडायचे असे करण्यापेक्षा ते जसेच्या तसे एकसंधी ठेवलेले चांगले नाही का? आणि स्वुती करावी तर काही तरी उपाधि आपल्याला चिकटवल्यासारखे होईल. आपण आमचे मायबाप असे म्हटले की 'लेकरूं' या उपाधीचा विटाळ निर्माण होतो. आता आपण आमचे स्वामी, आम्ही आपले पाईक असे म्हणावे तर आपले स्वामित्व दासाच्या उपाधीने उष्टे होते आहे. तू आमचा आत्मा म्हणावे तर कूटस्थ आत्म्याला बाहेर घालविल्यासारखे होईल. आपण ना कुणाचे स्वामी, ना कुणाचे मायबाप! अंतर्बाह्य सर्व आपणच अहा. आत्मा आपण अहा असेही म्हणता येत नाही. या जगात जे जे दृष्ट, अदृष्ट आहे ते सर्व आपण व्यापले आहे. त्यामुळे आपण अमुक असे नाव घेता येत नाही. सर्वचे सर्व आपण अहा, म्हणूनच खरोखर आपण जसे अहा तसे वर्णन करण्यास जगात विशेषणेच नाहीत. आपण मौनावाचून दुसरा दागिनाच अंगावर घालत नाही.

मौन हीच आपली स्तुती आहे. काही उपचार न अर्पण करणे ही आपली पूजा आहे. मी जीव, मी शिव मी ब्रह्म हा असा कुठलाच अहंकार न घेणे हाच आपला सहवास आहे.

तरी भ्रमाने भुलून गेलेला एखादा मनुष्य असंबद्ध बडबड करतो आणि त्याच्यावर प्रेम करणारी माणसे ती बोलणी सहन करतात. एखादा सुसंबद्ध शब्द त्यात आला तर कौतुक करतात त्याप्रमाणे मी जी स्तुती केली, आपले जे वर्णन केले, ज्या उपमा दिल्या, जी तुलना केली ते सर्व माझ्याकडे पाहून सहन करा. तसे न कराल तर ह्या सगळ्या सज्ज्नांच्या सभेत मी बोलू तरी काय. आपण क्षमा केली पाहिजे. आपण मला एकदा आपले म्हटले आहे ना? मग माझे सगळे अपराध आपल्याला पोटात घातले पाहिजेत आणि माझ्या विवेचनावर शिक्कामोर्तब केले पाहिजे. गीतार्थ मी सांगतो आहे खरा पण "तो योग्य आहे, लोकांनी मान्य करावा", असा आपल्या हातातील मोत्याच्या अंगठीचा शिक्का त्या अर्थावर आपण उठवला तरच तो अर्थ ह्या सभेतील चतुर श्रोते मान्य करतील. महाराज, गीतार्थ मान्य होणे हे माझ्या वक्तृत्त्वाचे सामर्थ्य नव्हे, आपल्या पसंतीचे आहे. हे सर्व सज्ञन आपण मान डोलवण्याची वाट पहात आहेत.

हे बोलणे ऐकून आशीर्वादासाठी हात उचलून निवृत्तिनाथ म्हणाले, "ज्ञानदेवा, किती स्तुती कराल? किती गौरव कराल? हे वरचेवर कशाला बोलून दाखवता? त्याचे प्रयोजन नाही. लोखंडाला परिसाचा स्पर्श एकदा झाला की पुरतो. परिसावर लोखंड वरचेवर घासावे लागत नाही." त्यावेळी मोठ्या आनंदाने ज्ञानदेवांनी हात जोडले आणि गुरूंचा आशीर्वाद मस्तकी झेलत ते म्हणाले, "जी, असे झाले आहे ना? आपण असे म्हटले हाच माझ्यावर कृपाप्रसाद झाला आहे. मी आता गीतार्थ सांगतो. आपण अवधान द्यावे.

महाराज, हा अठरावा अध्याय ह्या गीतारत्न प्रासादाचा कळस आहे. सर्व गीताच रत्नांनी घडवलेली आहे. पण हा कळस चिंतामणी रत्नाने केला आहे. गीतेचा अर्थ कळण्यासाठी हा अठरावा अध्याय वाटाड्या म्हणून घ्यावा. तो सर्व सतरा अध्यायांचे मर्म उलगडून दाखवील. लोक असे म्हणतात की दुरून कळसाचे दर्शन घेतले तरी मंदिरात जाऊन प्रत्यक्ष मूर्तीचे दर्शन घेतल्यासारखे होते त्याप्रमाणे इथे आहे. या एकाच अध्यायात गीतेचे सार आहे. हा समजला की संपूर्ण गीता समजलीच आणि म्हणून मी ह्या अठराव्या अध्यायाला कळस असे म्हणतो. बादरायण व्यासांनी हा या गीताप्रासादावर कळसच चढविला आहे. एकदा कळस चढला की, प्रासादाचे काम संपले. आता यानंतर काही करावयाचे राहिले नाही असे सूचविले जाते. या कळसाध्यायाने व्यास सुचवत आहेत की, "आता यापेक्षा काही उपदेश करावयाचा राहिला नाही. गीता सांगून झाली".

व्यास हे सहज फार कुशल कलावंत कारागीर होते. त्यांनी जगात पुष्कळ शोध घेतला. कारण ज्या भूमीवर हे मंदिर उभे करावयाचे ती भूमी भक्कम, पवित्र असली पाहिजे. शिवाय हे मंदिर कुठूनही दिसावे अशी योजना असली पाहिजे. त्यांनी असे पाहिले की वेदरूप रत्नांचा विशाल पर्वत ह्या मंदिरास योग्य अशी भूमी आहे. ती पवित्र आहे, उंच आहे व ह्या मंदिराचे वजन पेलण्यासारखी आहे. त्यांनी तेथे उपनिषदे हे पठार मंदिर बांधण्यासाठी पक्के केले आणि पाया खणण्यास सुरवात केली. त्या खणतीमध्ये अर्थ, काम, धर्मरूपी तीन पुरुषार्थांचा जो चाराचुरा निघाला त्याचा महाभारतरूपी कोट तयार झाला. धर्म, अर्थ, काम यांचे विवरण ह्या गोष्टीतून केले आणि मोक्ष हा चौथा पुरुषार्थ जीवांनी साधावा म्हणून ह्या कोटाच्या मध्यभागी गीतामंदिराची जागा नीट आखून घेतली. ह्या खणतीमध्ये व्यासांना आत्मज्ञानरूपी चिरे देखील सापडले. ते त्यांनी कानेकोपरे काढून घडवून सुबक करून घेतले आणि श्रीकृष्ण व अर्जुन यांच्या संवादातून ह्या मंदिराची उभारणी करण्याचे ठरविले. सर्व शास्त्रार्थाचा पक्का उत्तम घोटीव चुना तयार केल्यावर ते चिरे मधे चुना घालून रचायला सुरवात केली. मंदिराचा आकार मोक्षरेषेचा होता आणि निवृत्तिरूपी ओळंबा सतत हाती धरून व्यासांनी गीतेचे अध्याय बांधले. विवेचन निवृत्तीस सुटून कधीही होऊ दिले नाही आणि शेवटी मोक्षरेषाच साधावी असा त्या मंदिराचा डौल ठेवला. भूमी स्वच्छ केल्यापासून पंधरा अध्याय संपेपर्यंत रचना झाल्यावर मंदिराचे काम गच्चीपर्यंत आले. सोळावा अध्याय हा गळ्याचा, डेऱ्याचा आकार आहे व सतरावा हा कळसाच्या बैठकीचा ओटा आहे असे दिसू लागले. त्याच्याही वर अठरावा अध्याय हाच सहज कळसाच्या ठिकाणी झाला. आता फक्त ध्वज राहिला. "व्यासांनी गीताशास्त्र केले" या कीर्तीचा ध्वज ह्या कळसावर लागला व तो यावच्चंद्रदिवाकरौ फडकत राहील अशा सामर्थ्याने मंदिराच्या कळसावर झळकत राहिला. पहिल्यापासूनचे हे अध्याय चढत्या भूमिका दाखविणारे आहेत. आता हे काम पुरे झाले हे अठरावा अध्याय सांगतो. आपल्या अस्तित्वाने प्रसिद्ध करतो. झालेल्या कामामध्ये काही उणे राहिले नाही हे कळसामुळे स्पष्ट होते. त्याप्रमाणे अठरावा अध्याय गीतामंदिर पूर्ण झाले हे दाखवितो.

कुशल व्यासांनी गीताप्रसाद जीवांना मोक्ष मिळावा यासाठीच बांधला आहे. त्यांनी त्या मंदिरात आत्मरूप श्रीहरीची स्थापना केली आहे. या गीतामंदिरात कोट्यवधी जीव दर्शनासाठी येतात. ह्या सगळ्यांना आपआपल्या अधिकारानुरूप सेवा करता यावी अशी सोय केली. कोणत्याही प्रकारे जीव सेवा करो, त्याला मोक्षच असा निरंतरचा आशीर्वाद देऊन ठेवला. काय त्या औदार्याचे वर्णन करावे!

कुणी जपाच्या योगाने मंदिराला प्रदक्षिणा घालतात. ते मंदिराच्या बाहेरच वावरतात. काहीजण गीता श्रवण करून तिच्या सावलीत बसतात. काहीजण मात्र पूर्ण अवधानाचा विडा पैसा घेऊन देवळाच्या गाभाऱ्यात जातात. गीताज्ञानाचा अर्थ समजावून घेत या गीतेच्या गाभाऱ्यातच वस्ती करतात आणि एक दिवस पूर्णबोधाने युक्त होऊन त्या आत्मरूप श्रीहरीला उराउरी भेटून कृतार्थ होतात.

समर्थांच्या घरी जेवणाची पंगत बसली की वरच्या आणि खालच्या पानावर बसलेल्या माणसाला तेच पक्वान्न मिळते. पंक्तिप्रपंच केला जात नाही त्याप्रमाणे गीता श्रवण केली, पठण केली किंवा गीतेचा अर्थ समजून घेतला तरी सगळ्यांना 'मुक्ती' हाच प्रसाद मिळतो. भेदभाव केला जात नाही. गीतेची सेवा कुठल्याही पद्धतीने केली तरी त्या सेवेचे फळ मोक्ष हेच आहे.

हे वर्म जाणूनच मी म्हटले की गीता हे वैष्णव मंदिर आहे. इथे कुणालाही आडकाठी नाही. खुशाल आत जावे आणि देवाला मिठी मारावी. ह्या मंदिराचा कळस हा अठरावा अध्याय आहे असे जे मी म्हटले ते ती खूण स्पष्ट करण्यासाठी की सर्व गीतेचे श्रवण, पठण, अर्थज्ञान करणे जीवांना शक्य झाले नाही तर त्यांनी अठराव्या अध्यायाची सेवा केली तरी पुरे. कळसाचे दर्शन म्हणजे देवतेचे दर्शन असे मानले जातेच.

आता सतराव्या अध्यायानंतर त्यातून अठराव्या अध्यायाचा अंकुर कसा व्यक्त झाला ते सांगतो. या गीतेमध्ये चरण, श्लोक, अध्याय असे जरी भाग दिसले तरी सर्वांतून देवांनी एकच सिद्धांत मांडला आहे. सिद्धांतात भेद नाही. गंगेचे आणि यमुनेचे पाणी ओघाच्या दृष्टिने पाहिले तर वेगवेगळे दिसते पण पाणी या दृष्टिने पाहिले तर एकच आहे. ओघ या दृष्टिने भेद. पाणी या दृष्टिने अभेद. अर्धनारी नटेश्वर ह्या रूपामध्ये अर्धे शरीर स्त्रीचे आणि अर्धे शरीर पुरुषाचे असे जरी दिसले तरी ती दोन्ही एकमेकाशी इतकी संलग्न असतात की, त्या दोन अर्ध्या शरीरांचे मिळून एक व्यवस्थित पूर्ण शरीर होते. चंद्र हळूहळू कलेकलेने वाढतो आणि पौर्णिमेच्या दिवशी बिंब पूर्ण होते. पण त्या एकेका कलेचे थर चंद्रावर वेगवेगळे दिसत नाहीत. एकच पूर्ण बिंब दिसते. त्याप्रमाणे चरण, श्लोक, अध्याय हे वेगळे केले. सुटे करून पाहिले तर भेद पण ते सगळे मिळून एकच रूप दिसते. इतकेच काय पण ह्या भेदामध्ये सिद्धान्तरूपाने अभेदत्वच नांदते. रत्नमणी अनेक असले तरी ते एकाच सुत्रात ओवलेले असतात. पुष्कळ मोती जमवून एका सुतात ओवून त्यांचा एक सर केला तरी त्या सगळ्या मोत्यांची एकच शोभा दिसते. फुले आणि फुलांच्या हाराचे पदर मोजता येतात. वेगळे पहाता येतात. पण त्या सगळ्या फुलांचा वास एकच असतो. तिथे वासांचे म्हणून वेगळे बोट घालावे लागत नाही.

त्याचप्रमाणेच सातशेहे श्लोक आणि अठरा अध्याय खरे पण देवांनी एकच ज्ञानसिद्धांत सांगितला. दुसरे तिसरे काही सांगितले नाही आणि मीही ती संगती न सोडता ग्रंथाचे विवरण केले आहे. आता अठराव्या

अध्यायाचे निरूपण करतो. श्रोते हो, अठराव्या अध्यायाचे महत्त्व वेगळे, शोभा वेगळी असे असले तरी ज्ञानसिद्धान्तच त्यात मांडला गेला आहे. हे ध्यानात घेऊन आपण अवधानपूर्वक हा अध्याय ऐकावा.

सतराव्या अध्यायाच्या शेवटी, शेवटच्या श्लोकात देव असे म्हणाले की, 'ॐ तत् सत्' या ब्रह्म नामावर श्रद्धा न ठेवता जी जी कर्मे केली जातील ती असत्कर्मे होतात. देवांचे हे बोलणे ऐकून अर्जुन मान डोलवून मनाशी म्हणाला, "देवांनी कर्मनिष्ठांना दोष ठेवला की, अहो कर्मनिष्ठ ईश्वराचे साक्षात दर्शन न झाल्याने आंधळा आणि दीन असतो. त्याला ईश्वराचे ते नाम आणि त्यावर श्रद्धा ठेवूनच कर्म करावे हे कसे कळणार? देवांनी श्रद्धेचेही विवेचन करून राजस व तामस श्रद्धा दोषार्ह ठरविल्या. एक सात्त्विक श्रद्धाच असली पाहिजे असे सांगितले. मनुष्याच्या अंतःकरणात तर रजोगुण आणि तमोगुण यांचे बलिष्ठ ठाणे आहे. ते समूळ नाहीसे झाल्याशिवाय ती सात्त्विक श्रद्धा स्थिर कशी होणार? आणि पुढे त्या सात्त्विक श्रद्धेला त्या गूढ ब्रह्मनामाचा लाभ कसा काय होणार? ब्रह्मनामाच्या ठिकाणी ती श्रद्धा कशी काय जडणार? बरे, कर्म तर चालूच असणार, ते कर्म ह्या सात्त्विक श्रद्धेशिवाय शस्त्राच्या अग्राला आलिंगन देणे, दोरीवर धावणे किंवा नागिणीबरोबर खेळणे या क्रियाइतके परिणामी घातक आहेत. शिवाय देवांनीच सांगितले की ह्या कर्माची प्रवृत्ती दुसरे जन्म देण्याची असते. कर्ता फलाची आशा ठेवीत कर्म करीत जातो. या जन्मात फल नाही मिळाले तर दुसरा जन्म घेऊन फल भोगावे लागणार. इतके कुयोग या ब्रम्ह्मनामावर श्रद्धा न ठेवल्याने कर्मामध्ये एकवटतात. बरे, सत्कर्मे नीट पार पडली तर ज्ञान देतात आणि तेच कर्म यथासांग झाले नाही तर तो कर्ता नरकाच्या घरात जातो. मग अशा ह्या इतक्या अडचणी कर्मामध्ये आहेत तर कर्मठांना मोक्ष मिळण्याची आशाच करायला नको.

असले हे कर्म केलेच नाही, कर्मत्याग केला कर्मसंन्यास केला तर ते कर्माचे दारिद्र्य फिटेल की, असे केले की, संन्यासाचा आपोआप आदर घडेल. तो संन्यास अशा प्रकारचे कर्मफल देत नसल्याने जन्ममरणाची बाधा संपेल. आत्मज्ञान स्वाधीन होईल. संन्यास आणि त्याग हे ज्ञानाला आवाहन करणारे मंत्र आहेत. ज्ञानाचे पीक ज्या ठिकाणी येते ते उत्तम शेत हे आहे. ज्ञान आकर्षून घेणारे सूत्र आहेत. तेव्हा मला तरी वाटते की, जगाने कर्माचा त्यागच करावा. संन्यास आणि त्याग यांचा स्वीकार करावा आणि ह्या अनुष्ठानाने भवचक्रातून आपली सुटका करून घ्यावी. आता हाच प्रश्न देवांना विचारतो, असे म्हणून पार्थाने त्याग आणि संन्यास यांच्या व्यवस्थेबद्दल स्पष्ट कल्पना यावी म्हणून प्रश्न केला आणि त्याचे प्रत्युत्तर म्हणून श्रीकृष्णांनी जे निरूपण केले त्या प्रश्नोत्तरातून अठरावा अध्याय सिद्ध झाला. जन्यजनकभावाने याप्रमाणे एक अध्याय पुढच्या अध्यायास जन्म देतो आहे. त्याप्रमाणे अठराव्या अध्यायाचा जन्म सतराव्याच्या शेवटच्या श्लोकाने झाला आहे. अर्जुनाचा प्रश्न मार्मिक आहे आणि अर्जुनास देवांनी दिलेले उत्तर सविस्तर आणि सगळे संदेह नाहीसे करणारे आहेत.

श्रोते हो, आता असे आपल्या मनात येईल की, देव स्वतः अर्जुनाला "प्राज्ञ, विचारवंत, प्रज्ञाकांत, बुद्धिमंत," इत्यादी नावांनी गौरवत आहेत. अर्जुनाचे प्रश्न पाहिले तर एकही विसंगती त्याच्या नजरेतून सुटली नाही, एकही शंका त्याने आपल्या मनात संकोचाने मागे ठेवली नाही असे आपल्याला कळते आहे. माऊलींनी तर अनेक ठिकाणी देव जसजसे विवेचन करतील तसतसे पार्थाचे अवधान चौगुणी वाढत होते म्हणूनच देवांचे निरूपण त्याने सहज पचविले म्हणून गौरव केला आहे. इतकेच काय संजयाससुद्धा अर्जुनाच्या प्रज्ञेचे कौतुक होते. अशा स्थितीत आणि देवांच्या अंतःकरणातला बोध आरशात बिंब पहावे तसा जशाचा तसा अर्जुनाच्या अंतःकरणात उमटलेला असताना अजून अर्जुन शंकित कसा असे आपल्या मनात येते. पण खरी गोष्ट अशी

होती की, देव आता आपल्याला आणखी काही ज्ञानाच्या गोष्टी सांगणार नाहीत गप्पच रहातील हे त्याला सहन होईना. आता ह्या सुखास आपण आचवणार असे वाटून त्याला फार वाईट वाटले. सिद्धान्ताविषयी तो अगदी निःशंक झाला होता पण वासराचे पोट भरले तरी ते गायीपासून दूर होत नाही तिला ढुशा देत राहते त्याप्रमाणे अर्जुनाची स्थिती झाली. देवांना पुन्हा बोलते करण्यासाठी अज्ञान पांघरणे भाग होते. प्रेमाची पद्धतच अशी असते की त्याला क्षणाचा दुरावा सहन होत नाही. कामाशिवाय बोलावे, पाहिलेलेच पुन्हा पहावे, भोगले तेच पुन्हा पुन्हा भोगावे ह्या प्रेमाच्या खुणा आहेत आणि पार्थ तर प्रेमाची मूर्तीच होता. म्हणून देवाच्या उगे राहण्याचे त्याला फार वाईट वाटले. संवादाच्या मिषाने अव्यवहारी वस्तु अनुभवावयास मिळत होती त्या सुखाला तो लालचावला होता. आरशात आपले रूप पहावे आणि संतोषावे तसा प्रकार घडत होता. आता तो संवाद संपला, आत्मसुखाचा अनुभव घेणे संपले, हे त्याच्या मनाला कसे सोसेल? त्यासाठी पार्थाने “त्याग आणि संन्यास हे दोन्ही एकच की वेगवेगळे आहेत. वेगळे असेल तर त्यांचे वेगळेपण मला समजावून सांगा.” असे म्हणून गीतारूपी वस्त्र देवांना पुन्हा उलगडावयास लावले.

विचार केला तर हा अठरावा अध्याय नव्हे. ही एकाध्यायी गीताच आहे. देवांनी न कंटाळता एकाच अध्यायात सर्व गीतेचा बोध पुन्हा सांगितला आहे. वासरूच धार काढायला बसल्यावर पान्हा सोडायला गायीला किती वेळ लागणार? गीता संपण्याच्या वेळीच अर्जुनाने गीता आदराने पुन्हा परतवली. मात्र यात आश्चर्य तर काहीच नाही. गुरूशिष्याच्या संवादात काय काय चमत्कार घडणार नाहीत? तेव्हा ते असू दे. अर्जुनाने विचारले, “देवा माझ्यावर रागावू नका. आपण अगदी सविस्तर बोध केलात पण माझ्या मनात अजूनही एक शंका राहिली आहे. विश्वेशा, शिष्यास निःशंक करून सोडावे हे आपले ब्रीदच आहे. तेव्हा मला आपण समजावून सांगा की संन्यास आणि त्याग हे एकच ना? संघात आणि संघ हे दोन्ही शब्द समुदाय याच अर्थाचे ना? तसेच इथे आहे का? माझ्या मनाला तरी वाटते आहे की त्याग आणि संन्यास हे दोन्ही एकच असावे. संन्यास म्हणजेच त्याग की नाही? देवा मला सांगा या दोन्हीमध्ये कांही भेद आहे का? माझ्या विचारात काही चूक होते आहे का? देवांनी ह्यातील साम्यभेद विशद करून सांगावे.”

देवांनी अर्जुनाचा हेतू जाणला. ते मनाशी म्हणाले, “आता अगदी मुळापासून सर्वच विषय पुन्हा मांडण्याची वेळ आली. मला तरी कुठे थांबायला आवडत होते? असा श्रोता मला पुन्हा कधी मिळणार आहे? सगळाच बोध पुन्हा करू या” आणि असा विचार करून देव म्हणाले, “अर्जुना, अरे ते दोन्ही एक कसे होतील? ते वेगवेगळे आहेत.

एरवी त्याग आणि संन्यास हे दोन्ही एकच असे तू मानतोस. मी ही तसे मानतो. ह्या दोन्ही शब्दांनी त्यागच सुचवला जातो पण त्यांत भेद असण्याचे कारण तुला सांगतो. मुळी कर्मच करावयाचे नाही असे एखादा साधक ठरवितो. त्या त्यागाला संन्यास असे म्हणावे, कर्म करावयाचे पण त्या कर्माच्या फलाचा त्याग करावयाचा याला त्याग असे म्हणावे, आता असे आहे की, काही कर्मांचा त्याग आणि काही कर्मांचा संन्यास करावा लागतो.”

हिरण्यकश्यपूने खांबावर लाथ मारली आणि श्रीनृसिंह प्रकट झाले. हिरण्यकश्यपूचा वध केला तरी देव शांत होईनात, शंकर, ब्रह्मा, सर्व देवता येऊन देवांची स्तुती करू लागल्या. लक्ष्मीसुद्धा जवळ जाईना. ती

म्हणाली, "आराध्याचे इतके उग्ररूप मी कधी पाहिले नाही. मी जवळ जात नाही. मला फार भय वाटते. शेवटी ब्रह्मदेव प्रल्हादाला म्हणाले, "बाळा आता तूच देवापुढे जा आणि देवाचा क्रोध शांत कर." प्रल्हादाला भय म्हणजे काय हे माहितच नव्हते. तो देवांच्या समोर उभा राहिला आणि त्याने देवाना साष्टांग नमस्कार घातला. प्रल्हादाकडे पाहाताच भगवंतांचे वात्सल्य जागे झाले. त्यांनी त्याला मांडीवर घेऊन कुरवाळले आणि जिभेने त्याचे मस्तक चाटू लागले. प्रल्हादाला देव म्हणाले, "बाळा मला क्षमा कर. मला यायला उशीर झाला आणि म्हणून तुला अपार कष्ट भोगावे लागले." प्रल्हाद मांडीवरून खाली उतरला व देवासमोर हात जोडून उभा राहिला आणि त्याने प्रार्थना केली.

देव गहिवरून गेले आणि म्हणाले, "प्रल्हादा मी प्रसन्न आहे. तुझ्या मनात जी इच्छा असेल ती सांग पुरी करतो."

प्रल्हाद म्हणाला, "प्रभो, आपण हे काय सांगता? आपण माझे स्वामी, मी आपला सेवक, सेवकाने काही लाभ होईल अशी आशा धरून सेवा केली तर ती सेवाच नव्हे. मी आपला चरणाश्रित सेवक आहे. आपण काही देतो म्हणता तर हेच द्या की, माझ्या मनात कधी कोणती कामनाच येऊ नये."

भगवान सर्वज्ञच! त्यांनी "एवमस्तु" असा आशीर्वाद दिला आणि म्हणाले, "प्रल्हादा काही तरी मागून घेच."

प्रल्हाद मनाशी म्हणाला, "ज्याअर्थी, भगवान पुन्हा मला काही मागून घे म्हणतात त्याअर्थी माझ्या मनात कुठेतरी नक्की काहीतरी कामना आहे" आणि त्याने विचार करून भगवानास म्हटले, "नाथ, माझ्या पित्याने आपली फार निंदा केली. आपल्या सेवकाला-मला कष्ट दिले मी आपल्याजवळ मागतो की, ह्यामुळे जे पाप घडले असेल त्यातून माझा पिता मुक्त व्हावा, पवित्र व्हावा."

भगवान नृसिंह हसून म्हणाले, "अरे ज्याला असा तुझ्यासारखा पुत्र झाला तो त्यामुळेच पवित्र झाला. ज्या कुलात तुझ्यासारखा माझा भक्त जन्म घेतो त्या कुलाच्या एकवीस पिढ्या तरून जातात."

असा निष्काम भक्त देवांच्या डोळ्यापुढे होता आणि देव विवेचन करीत होते. "अर्जुना, कोणत्या कर्माचा त्याग करावा, आणि कोणत्या कर्माचा संन्यास करावा हे सांगतो. अर्जुना, निरूपयोगी झाडेझुडपे डोंगरावर वाटेल तशी वाढतात, वाटेल तितकी न लावता उगवतात पण राजाच्या बागा किंवा भाताची शेते आपोआप तयार होत नाहीत. रानटी गवत वाटेल तेवढे उगवते पण साळी तशा येत नाहीत. जमीन नांगरून, तापवून, भाजून रोप तयार करून ते लावल्यावर भात येते. आपले आंग आपल्याला सहज लाभले आहे पण त्यावर अलंकार चढवावयाचा असेल तर प्रयत्नाने, उद्योगाने तो घडवावा लागतो. नदी आपोआप वाहते आहे पण विहिरी, तळी खोदावी लागतात. त्याप्रमाणे नित्यनेमित्तिक कर्मे स्वाभाविक आहेत. ती वेदाज्ञेनेच आपल्याकडे सहज आली आहेत. पण काम्यकर्म मात्र फलाची इच्छा धरून केले जाते. ते आपोआप चालून आलेले नाही. मनुष्य काही एक कामना मनात धरतो, शोध घेतो आणि त्या कामनापूर्तीसाठी जे कर्म शास्त्राने सांगितले असेल ते करतो. कामनेचा समुदाय हे कर्म घडण्यास कारण असतो. अशी काम्यकर्मे असंख्य आहेत.

कामना मनात धरून अश्वमेधादि याग केले जातात. विहिरी, बारवा, बागा तयार केल्या जातात, ब्राह्मणांना इनाम दिले जाते, मोठाली गावे बसविली जातात. असे अनेक व्रतांचे पसारे मांडले जातात. अशी ही इष्ट म्हणजे यज्ञादि आणि पूर्त म्हणजे विहिरी, तलाव इत्यादि कर्मे केली जातात. या सगळ्यांच्या मुळाशी कामना असते. ही कामना धरून केलेली कर्मे त्या कर्त्यास बांधून घालून फळ भोगावयास लावतात. पार्था, अरे, एकदा ह्या देहाच्या गावात आल्यावर जन्म-मृत्यूच्या सोहळ्याला नाही म्हणून चालेल काय? तो सोहळा मकाट्याने सोसला पाहिजे. त्याप्रमाणे धनंजया, ते फल भोगले पाहिजे. कपाळावर जे लिहिले आहे ते चुकत नाही. शरिराचे काळेगोरेपण धुवून निघत नाही. तसे ते काम्यकर्माचे फळ भोगल्याशिवाय सुटका नाही. घेतलेले ऋण फेडून घेण्यासाठी सावकार धरणे धरून बसतो तसे ते काम्यकर्म कर्त्यास फळभोग देण्यासाठी धरणे धरते.

कधी कधी असेही घडते की, मनात कामना नसतानाही काम्यकर्म घडते. पण कामना धरली नाही म्हणून फळ भोगातून सुटका होईल असे मात्र मानू नये. लढाईच्या धुमाळीत शिरले आणि लढाई न करताच राहिले तरी बाण लागायचा तो लागतोच. राख आहे असे समजून नकळत विस्तावावर पाय पडला तरी तो विस्तव पायाला भाजून काढणारच. त्याप्रमाणे ह्या काम्यकर्मात स्वाभाविकच असे सामर्थ्य आहे की, फल द्यावयाचेच. मग ते कर्म फलाशेने झाले असो वा नसो.

म्हणून या कर्मापासून मुमुक्षूने दूर राहिले पाहिजे. ह्या काम्यकर्मांचे त्याला थोडे सुद्धा कौतुक नसावे. विष चुकून पोटांत गेले आहे हे कळल्यावर जसे हर प्रयत्नाने ते ओकून बाहेर पडेल असे केले जाते त्याप्रमाणे त्या काम्यकर्माचा मुमुक्षूने सर्वथैव त्याग करावा. मग अशा या त्यागाला सर्व द्रष्टे साधू अंतरंगात संन्यास असे म्हणतात. काम्यकर्माच्या त्यागाचा फार मोठा फायदा असा की, त्यामुळे मनात कामना उठत नाही. धनाचाच त्याग केला की, चोरीचे भय संपते. त्याप्रमाणे काम्यकर्माचा त्याग केला की, कामना मनात शिल्लक रहात नाही आणि मग काम्यकर्मच हातून न घडल्याने कर्मफलाचा आस्वाद घेण्याचेही बंधन येत नाही. अर्जुना, मनात कामना असतात म्हणून काम्यकर्म हातून घडते आणि कर्मफलाचा जीवाला बंध होतो. जीव अशा ह्या चक्रात सापडला की, मुक्ति कोठून मिळणार? म्हणून म्हणतो पार्था, काम्यकर्माचा त्याग केला पाहिजे. म्हणजेच काम्यकर्माचा मुमुक्षुने संन्यासच घेतला पाहिजे.

चंद्रसूर्यग्रहणे पार्वण नावाची श्राद्धे करण्याचा प्रसंग आणतात, मातापित्यांच्या मृत्यूने अंकित असे श्राद्धदिवस असतात, अतिथी घरी आल्यामुळे त्यांचे आदरातिथ्य करावे लागते, ही सर्व कर्मे नैमित्तिक आहेत. वर्षा ऋतूमध्ये आकाश तेच असते पण ढग येऊन क्षुब्ध होते. वन तेच पण वसंत आला की, त्याची शोभा वाढते, देह तोच पण यौवनामुळे त्याच्यात वेगळे तेज येते. सोमकांत मणी तोच पण चंद्रदर्शन झाले की, तो पाझरतो. कमळे तीच पण सूर्यदर्शनाने विकसित होतात. त्याप्रमाणे नित्य कर्मालाच त्या निमित्ताने नियम लागू होतात आणि नित्य कर्मासच नैमित्तिक हे नाव येते. जी वस्तू आहे तिचाच विस्तार होतो.

जे कर्म सकाळी, दुपारी, सायंकाळी करावयाचे ते अधिकाराच्या ओघाने सहज वाट्यास आलेले असते आणि त्यालाच नित्य कर्म म्हणतात. दृष्टी हा जसा डोळ्याचा स्वाभाविक धर्म आहे. बाहेरून अधिक दिलेला नव्हे. गति हा पायाचा धर्म आहे. त्यासाठी वेगळे परिश्रम करावे लागत नाहीत. दिव्यामध्ये उजेड, चंदनामध्ये सुगंध त्याप्रमाणे नित्य कर्म हे अधिकाराचे रूपच आहे. ते करावेच लागते. ब्राह्मणास अध्ययन, क्षत्रियास

युद्धविद्या, वैश्यास व्यापार, शूद्रास सेवा ही कर्मे अधिकाराने प्राप्त झालेली आहेत ती केली पाहिजेत. त्यांचा त्याग करणे उचित नाही. पार्था, नैमित्तिक कर्मे कोणती, नित्य कोणती, हे तुझ्या ध्यानी आले ना? ही नित्य नैमित्तिक कर्मे अवश्य अनुष्ठेय आहेत. ती निष्कळ आहेत असे काही लोक म्हणतात ते बरोबर नाही.

जेवता जेवता तृप्ती होते, भूक जाते त्याप्रमाणे ह्या नित्य नैमित्तिक कर्माचे आहे. मिश्र सोने आगीत टाकले की हिणकस जळून जाऊन शुद्ध सोने हाती राहते. त्याप्रमाणे ही कर्मे कर्त्यांचे दोष झाडून टाकतात. स्वाधिकाराला अधिक अधिक उजाळा देतात आणि हातोहात सद्‌गती मिळवून देतात.

पण अर्जुना, मूळ नक्षत्रावर जन्मलेल्या मुलाचा त्याग करावा त्याप्रमाणे ह्या नित्य नैमित्तिक कर्मातून उत्पन्न होणाऱ्या प्रचंड कर्मफळाचा मात्र तात्काळ त्याग करावा. वसंतऋतु आला की, लता फुलांनी भरून जाते. आंब्याच्या झाडाला पालवी फुटते पण तो वसंत ना त्या फुलांचा आस्वाद घेतो, ना त्या फळांचा,! दोहोंचा त्याग करून तो निघून जातो. त्याप्रमाणे फळाकडे लक्ष न देता फळ निषिद्ध समजून नित्य नैमित्तिक कर्माचे मनापासून आचरण करावे. या कर्मफळ त्यागाला त्याग असे जाणते म्हणतात. याप्रमाणे त्याग आणि संन्यास यांतील भेद तुला ऐकविला आहे. फलाचा संन्यास करणे जर जमत असेल तर पार्था, काम्यकर्मदेखील बाधक होऊ शकत नाही.

ह्या मुमुक्षु कर्त्याने निषिद्ध कर्म तर कधीच मागे टाकून दिलेले असते. नित्य नैमित्तिक कर्म फलत्यागाने निष्फळ होते, शिरच्छेद झाला की, शरीर निष्प्राण होते तसे होते. धान्य पक्व झाल्यावर जसे वाळून जाते तसे सगळे कर्मजात नाहीसे झाले की, आत्मज्ञान त्या पुरुषाला शोधत येते. आत्मज्ञान मिळविण्यासाठी त्याला प्रयत्नच करावे लागत नाहीत. लक्षात आले ना अर्जुना, काम्यकर्म बंधक म्हणून त्याज्य, निषिद्ध कर्म शास्त्रविरुद्ध म्हणून त्याज्य, नित्य नैमित्तिक करावयाचेच पण त्याच्या फलाचा त्याग म्हणून ते निष्फल. अशातऱ्हेने कर्म करणारा आत्मज्ञानी होतो. त्याग आणि संन्यास असे आचरणात आले की, साधकाला आत्मज्ञानाचा पट्टाभिषेक होतो. ही हातोटी फार महत्त्वाची आहे. कधीही न विसरण्यासारखी आहे. कर्म करण्याचा संकल्प मनात की, लगेच असा विचार करावयाचा.

१. ते कर्म निषिद्ध आहे का? असेल तर करावयाचे नाही.
२. ते कर्म काम्य आहे का? असेल तर फळ भोगण्याच्या बंधनात घालील म्हणून करावयाचे नाही.
३. ते कर्म नैमित्तिक आहे का? करावयाचेच पण फलाचा त्याग करावयाचा.
४. ते कर्म नित्य आहे का? करावयाचेच पण फलाचा त्याग करावयाचा.

ही चतुःसूत्री ध्यानात ठेवूनच साधकाने आपल्या कामाची आखणी करावी. कारण तसे न केले आणि अनुमानाने हाताने वजन करूनच जर कर्मत्याग केला तर कशाचाही त्याग होत नाही उलट तो मनुष्य घोटाळ्यात मात्र पडतो. रोगाची परीक्षा न करताच औषध घेतले तर ते उलटे विषासारखे मारक होते. भूक असताना अन्नाचा अनादर केला तर भूक मारणार नाही का? त्याप्रमाणे जे त्याज्य नव्हे ते टाकले तर अपाय होतोच. अर्जुना, अरे जे करणीय आहे ते टाकू नये आणि जे त्याज्य आहे त्याचा लोभ धरू नये. त्यागाचे वर्म चुकून जर सर्वत्याग केला तर त्या त्यागाचेच ओझे होते. म्हणून सगळ्या मोहाशी झुंज देणारे वैराग्यशील पुरुष

अशा अनुचित त्यागाच्या मोहाशीही झुंज देतात आणि आपले पाऊल त्या दिशेने पडू देत नाहीत. आपली दृष्टी त्या दिशेला वळवत नाहीत.

मी सांगतो यावर पूर्ण श्रद्धा ठेव पार्था. तुझ्या कानावर वेगवेगळी मते पडतील. तुझी बुद्धि तिकडे जाऊ देऊ नको. पुष्कळांना असे वाटते की, कर्मच टाकले पाहिजे. एखादा नग्न जसा जगाला भांडखोर म्हणतो तसा हा विचार आहे. कर्मफलाची अभिलाषा सुटत नाही म्हणून हे लोक असे प्रतिपादन करतात. ज्याच्या जिभेची चव गेली आहे असा रोगी अन्नाला नावे ठेवतो, कुष्ठी आपल्या रोगावर न रागवता माशा बसतात म्हणून त्यांच्यावर राग काढतो. त्याप्रमाणे फळकामाची इच्छा टाकण्यास असमर्थ असणारे सांख्यशास्त्रकर्त्या कपिलांचे अनुयायी कर्मालाच दोष ठेवतात आणि मुळापासून कर्माचा त्याग करावा असा निर्णय देतात.

आता पूर्वमीमांसक म्हणतात बाकीचे कर्म करू नये पण यज्ञयागादिक कर्मे करावीच त्याशिवाय साधकाची शुद्धि होण्याचे दुसरे साधन नाही. मनाची शुद्धि लवकरात लवकर व्हावी अशी ज्याला इच्छा असेल, या कामात वेगाने जय व्हावा असे वाटत असेल तर चित्तशुद्धिच्या कामात सबळ असलेले हे यज्ञकर्म करण्याचा मुळीच आळस करू नये. अहो, शुद्धिच्या कामात आळस कसा चालेल? सोने शुद्ध व्हावे असे वाटत असेल तर आगीला कंटाळता येईल का? आरसा स्वच्छ व्हावा म्हणून त्याला चुना लावायला नको का? लुगडी स्वच्छ व्हावयास हवी तर परटाच्या धुण्याच्या पात्राला ते घाणेरडे म्हणून चालते का? त्याप्रमाणे कर्म क्लेशकारक आहे म्हणून त्याचा त्याग करून चालेल का? स्वयंपाकाचा कंटाळा केला तर उत्तम अन्न मिळेल का?"

असे बोलून काही लोक जीवांना कर्मबंधनात अडकवून टाकतात. मतभेद झाल्यामुळे कर्माचा त्याग करावा की नाही याचा निर्णय लागत नाही. वादच होत रहातात.

आता तो विसंवाद संपेल, त्यागाबद्दल निश्चित निर्णय करता येईल असे गोमटे विवेचन करतो. तू अवधान दे. अर्जुना, ज्याला त्याग त्याग असे म्हटले जाते तो तीन प्रकारचा आहे. हे तिन्ही प्रकारे वेगवेगळे वर्णन करून सांगतो. पण त्यागाच्या तात्पर्यार्थाचे सार इतकेच आहे असे समज. मला सर्वज्ञाला त्यागाबद्दलचे जे मत पटते ते ठाम मत तू ऐक.

संसारबंधनातून सुटण्याची ज्याला मनापासून तळमळ आहे, जो त्याविषयी सर्व प्रकारे जागरूक आहे त्याने काय करणे अत्यावश्यक आहे ते सांगतो—

अर्जुना, एखादा वाटसरू पावलापुढे पाऊल टाकत मुक्कामाची जागा गाठतो. मुमुक्षूने मोक्षाच्या वाटेने जाताना यज्ञ, दान, तप ही पावले टाकली पाहिजेतच. त्याने यज्ञ, दान, तप ही कर्मे अवश्य करावी. अरे, हरवलेली वस्तू सापडण्यापूर्वीच तिचा शोध सोडावयाचा का? पूर्ण तृप्ती झाल्याशिवायच पानावरून उठावयाचे काय? परतीराला पोहचल्याशिवाय नाव टाकू नये, केळीचा घड हाती आल्याशिवाय केळ कापू नये. पुरलेला ठेवा हस्तगत झाल्याशिवाय दिव्यास निरोप देऊ नये, त्याप्रमाणेच आत्मज्ञानाबद्दल पूर्ण खात्री झाल्याशिवाय यज्ञादिक कर्माविषयी उदासीन होऊ नये. आपआपल्या अधिकारानुरूप दान, यज्ञ, तप ही कर्मे अधिकाधिक दक्षतेने करावीतच. झपाट्याने चालले की, मुक्काम लवकर गाठून विसावा घेता येतो म्हणजे आताचा वेग

विसाव्यास कारण होतो. कर्माचा जोर नैष्कार्य साधण्यासाठी उपयोगी पडतो. रोगी जेव्हा औषध घेण्याचा निश्चय करतो आणि औषध घेण्याचा नियम अमलात आणतो तेव्हा ते औषध घेता घेता त्याची व्याधी दूर होते. त्याचप्रमाणे जेव्हा कर्मे योग्य हातवटीने केली जातात तेव्हा चित्ताजी चंचलता हा रजोगुण आणि पापवासना हा तमोगुण झाडा देऊन नाहीसे होतात. हिणकस सोन्याला वरचेवर क्षारांची पुटे दिली की, हीण जळून जाऊन शुद्ध सोने उरते तसे हे घडते. धनंजया, कर्मे बाधक तर नाहीतच. निष्ठेने स्वाधिकारानुसार केलेली कर्मे रज, तम चित्तातून काढून टाकून अंतःकरणशुद्धीचे ठिकाण प्रत्यक्ष अनुभवास आणतात. सत्त्वशुद्धीच्या दृष्टीने ती कर्मे तीर्थाच्या योग्यतेला येतात. तीर्थांनी बाह्यमळ धुतला जातो आणि कर्मांने चित्त उज्ज्वल होते म्हणून सत्कर्मे हीच तीर्थे आहेत असे समज.

अरे, तृषार्त माणसाला मारवाडच्या वाळवंटात त्या उन्हाळ्याच्या झळीबरोबर अमृतवृष्टी व्हावी किंवा आंधळ्याच्या सोयीसाठी प्रत्यक्ष सूर्यच प्रकट व्हावा, बुडणाऱ्याचे रक्षण करण्यासाठी प्रत्यक्ष नदीने धाव घ्यावी किंवा पडणाऱ्याला पृथ्वीनेच झेलून घ्यावे, मरणाऱ्याला मृत्यूनेच आयुष्य वाढवून द्यावे त्याप्रमाणे मारक जे विष ते औषध म्हणून दिले की, तारक होते त्याप्रमाणे कर्मबद्ध असलेल्या मुमुक्षूला कर्मच बंधमुक्त करते. फलत्यागाच्या हातोटीने कर्मे केली की, धनंजया, बंधक असणारी कर्मेच मुक्त करण्यास कारणीभूत होतात.

किरीटी, ही फलत्यागाची हातवटी किती सुंदर आहे ते तुला सांगतो. ही साधली की, कर्मेच कर्माला नाहीसे करते. महायागादि प्रमुख कर्मे आपल्या हातून बिनचूक पार पडली तरी, “हा महायाग मी केला, मी किती पुण्यवान,” असा कर्तेपणाचा गर्व यज्ञकर्त्यास असू नये. एखादा मनुष्य तीर्थयात्रेस जातो पण कुणा एकाने आपल्या हातून यात्रा घडत नाही आणि पुण्य जोडत नाही म्हणून यात्रेचा खर्च देऊन “माझ्यासाठी यात्रा कर,” असे सांगितलेले असते. प्रत्येक तीर्थक्षेत्रामध्ये यजमान म्हणून ह्या दात्याचाच नामोच्चार गोत्रोच्चार होतो अशावेळी ही यात्रा मी केली असे त्या यात्रेकरूस वाटत नाही, असा अहंकार उत्पन्न होत नाही. समर्थाच्या शिक्क्यावर लढणारा एखादा सैनिक एकटाच दुसऱ्याच्या सैन्यावर तुटून पडतो, जय मिळवतो पण मी लढाई जिंकली असे म्हणत नाही. आमच्या स्वामींचा जय झाला असे म्हणतो. दुसऱ्याच्या कासेला धरून पोहणारा मी पोहतो आहे असे म्हणत नाही किंवा यजमानाच्या द्रव्याने आणि आज्ञेने जो पुरोहित दान देतो तो मी दाता असा गर्व वहात नाही. त्याप्रमाणे कर्माच्या अभिमानाने येणारे कर्तृत्त्व आपल्याकडे न घेता कर्मे जशी आपोआप येतील तसतशी संपवावी. जे कर्म हातून घडले त्याच्या फळाकडे तो आपला मनाचा मोहरा कधीही वळू देऊ नये. कर्माचा आरंभ करण्यापूर्वीच त्या त्या कर्माच्या फळाची आशा सोडून द्यावी. दुसऱ्याच्या मुलाचे पालन करताना एखादी दाई ज्या अलिप्त मनाने असते तसे आपले मन फलाशेत न गुंतता अलिप्त ठेवावे. पिंपळाची फळे मिळावी म्हणून पिंपळाला पाणी घालत नाहीत, त्याचप्रमाणे फलाच्या आशेचा त्याग करूनच कर्म करावे. गोवारी सगळ्यांची जनावरे गोळा करून रानात येतो त्यांना चारून संध्याकाळी ज्या त्या घरी पोहचती करतो त्या गाई-म्हशीच्या दुधाच्या प्राप्तीची आशा मनात ठेवत नाही. अशा युक्तीने कर्म करणाऱ्या कर्त्यास आपल्या आत्मस्वरूपाचा लाभ होतो. म्हणून फळाची इच्छा सोडून, देहाचा अहंकार टाकून कर्मे करावी असा माझा सर्वांना कल्याणकारक निरोप आहे. जीवाच्या बंधनामुळे जो शिणला आहे आणि जो त्यातून सुटण्यासाठी खटपट करतो आहे त्याने मी सांगितलेल्या ह्या हातवटीस विसंबू नये, असे माझे वरचेवर पुन्हा पुन्हा सांगणे आहे. कर्मे केलीच पाहिजेत हे कधी विसरू नये. कर्मे करण्याचेच टाकून देणे हे योग्य नव्हे.

अर्जुना, हे बघ, अंधारात दिसत नाही म्हणून रागारागाने आपल्या डोळ्यात नखे खुपसावी त्याप्रमाणे जो मनुष्य सर्वच कर्माचा द्वेष करून सरसकट सर्वच कर्माचा त्याग करतो त्याचा कर्मत्याग तामस आहे असे समज. डोके दुखते म्हणून डोकेच तोडण्यासारखे ते वेडेपणाचे आहे. मार्ग कठीण असला तर चालून चालून पाय तो संपवतीलच पण त्या मार्गाच्या अवघडपणाचा राग पायांवर काढून पायच तोडून टाकले तर कसे होईल? एखाद्या माणसाच्या भुकेच्या वेळी अन्नाचे ताट आले आणि त्याने, "अन्न फार ऊन आहे," असे म्हणून ते ताटच उडवून दिले तर तो उपवासाने व्याकुळच रहाणार. त्याच्या बुद्धिने लंघनाच्या परिणांमाचा विचार केलेला नाही असे होत नाही का? भ्रमाने मस्त झालेल्या माणसाला कर्म करण्याच्या युक्तिने कर्मबंधाचा निरास कसा करावा हेच कळत नाही. तो वर्णाश्रमधर्माप्रमाणे वाट्याला आलेले कर्मच कर्मबंधनांतून सुटण्याच्या इच्छेने टाकून देतो. अर्जुना, परंतु अशाप्रकारच्या तामस त्यागाचा विटाळ तू चुकूनही स्वतःला होऊ देऊ नकोस.

पुष्कळदा असेही घडते की, आपल्या आश्रमधर्माप्रमाणे आपला धर्म काय हे तो कर्ता जाणतो. आपले कर्तव्यही त्याला कळते पण ते कर्म करण्यामध्ये जो त्रास आहे त्याला तो कंटाळतो. कर्माच्या आरंभाची बाजू प्रथम थोडा वेळ कष्टदायक असते. शिदोरी वाहून नेताना जड वाटते. लिंब जिभेला कडू आणि हिरडा तुरट लागतो पण परिणामी ही सर्व हितकारक आहेत. त्याप्रमाणे कर्माचा अलिकडचा भाग म्हणजे प्रारंभ त्रासदायक असतो. गाय उत्तम पण शिंगाकडून मारकी असते, शेवंतीचे फूल अत्यंत सुवासिक पण फांद्यांना काटे आहेत ही अडचण असते. जेवणाचे सुख उत्तम पण स्वयंपाकाच्या व्यापाच्या दृष्टीने कष्टदायक असते. आणि त्या कष्टाला कंटाळून कर्ता कर्माचे श्रम मानतो. शास्त्राने करावयास सांगितले म्हणून वास्तविक पहाता कर्ता कर्मास सुरुवात करतो पण त्या कर्माच्या क्लेशाने त्यास व्यापले की, अग्निने पोळलेला मनुष्य अग्नि टाकून देतो त्याप्रमाणे तो कर्ता कर्म मध्यंतरीच टाकून देतो. आणि उलट विचारधारा सुरू होते. तो मनाशी म्हणतो की, "देहासारखी सुंदर वस्तु हाती आली आहे. फार भाग्याने मिळाली आहे तर पाप्यासारखा कर्माचा शीण त्या देहाच्या मागे कशाला लावू? कर्माचे फळ कधी मिळेल तेव्हा मिळेल आज हातात असलेले उत्तम भोग न भोगता त्या कर्माचे फळ मिळण्याची आशा कशाला करीत बसू. हातचे भोगायचे नाही आणि देहाला कष्ट देऊन शास्त्रवचनाप्रमाणे कर्म करत त्या कर्माचे फळ मिळेल म्हणून वाट पहात आशेने बसायचे हे कुणी करावे? आज समोर आहेत ते सुखभोग भोगून घ्यावे हाच शहाणपणा आहे.

अर्जुना, शरिराला क्लेश नकोत म्हणून कर्माचा त्याग केला जातो त्यावेळी वीरेशा, त्या त्यागाला राजस त्याग म्हणावे. ह्या राजस त्यागामध्ये कर्माचा त्याग होतो खरा पण उतू गेलेले दूध, तूप अग्नित पडले तर काही होम केल्याचे पुण्य मिळत नाही, त्याप्रमाणे ह्या राजस त्यागाने त्यागाचे फळ मिळत नाही. एखादा मनुष्य पाण्यात बुडून गेला तर त्याने जलसमाधी घेतली असे म्हणू नये. हे दुर्मरणच झाले आहे, त्याप्रमाणे देहाच्या लोभाने कर्मावर जेव्हा पाणी सोडले जाते तेव्हा खरोखरच त्यागाचे फळ मिळत नाही. तो कर्मत्याग मोक्ष देत नाही. पार्था, ज्ञान उदयाला आले की, उजाडल्यावर सूर्यप्रकाश नक्षत्रे गिळून टाकतो त्याप्रमाणे, सर्व क्रिया आपल्या कारणासह म्हणजे अज्ञानासह आपोआप नाहीशा होतात आणि हा खरा कर्मत्याग आहे आणि फक्त अशा प्रकारच्या कर्मत्यागाने मोक्ष मिळतो. कोणत्या त्यागाने मोक्षफळ घरात घुसते तो त्याग कशा प्रकारचा आहे हे सांगतो.

अनुक्रमणिका

हा कर्ता प्रथम आपला अधिकार काय हे पहातो. त्यावर शास्त्रवचनाचा अलंकार चढवितो आणि त्याप्रमाणे आचरण करतो.

कलकत्ता हायकोर्ट जज्ञ गुरूदास बानर्जी आपल्या खाण्यापिण्याच्या नियमाविषयी अत्यंत कट्टर होते. लॉर्ड कर्झनच्यावेळी कलकत्ता विश्वविद्यालय कमिशनमध्ये त्यांनी गुरूदासांची सदस्य म्हणून नेमणूक केली. त्यासंबंधीचे कामकाज उरकून सिमल्याहून व्हॉईसरॉयच्या स्पेशल ट्रेनमधून गुरूदास कलकत्त्यास येत होते. व्हॉईसरॉयनी त्यांना आपल्या डब्यात बोलावून घेतले. पुष्कळ वेळ गप्पा गोष्टी झाल्यावर जेवणाची वेळ झाल्यावर व्हॉईसरॉय गुरूदासांना म्हणाले, “आता आपण भोजन करून या.” गुरूदास म्हणाले, “मी गाडीत काही खात नाही. फक्त बरोबरचे गंगाजल पितो.” व्हॉईसरॉयनी पुन्हा विचारले, “मग आपला मुलगा कधी जेवणार? गुरूदास म्हणाले, “मी जेवल्याशिवाय तो कसा जेवेल?” व्हॉईसरॉयनी विचारले, “मग त्याला फार भूक लागली तर?” गुरूदास म्हणाले, “घरी केलेली मिठाई त्याच्याजवळ आहे ती तो खाईल.” व्हॉईसरॉय म्हणाले, “ठीक आहे, अलाहाबादला गाडी थांबवू. आपण स्नान, भोजन करा. मीही आपले भोजन होईपर्यंत जेवणार नाही.”

गाडी अलाहबादला थांबवली गेली. गुरूदास पितापुत्रांनी गंगास्नान केले. डाळभात करून खाल्ला; मग व्हॉईसरॉय व गुरूदास यांना घेऊन गाडी कलकत्ता मार्गाने निघाली!

आमच्या घरातलीच गोष्ट! आमचे आजोबा श्रीमंत बाबासाहेब इचलकरंजीकर आणि माझे आजेसासरे श्रीमंत आबासाहेब विशाळगडकर उभयता दिल्ली दरबारला गेले होते. दरबार आटोपल्यावर काशीस जाण्याचे ठरले. उभयता स्वाऱ्या व परिवार यांची रिझर्वेशन्स झाली. गाडीची वेळ होत चालली. आबासाहेब सरकार संध्यावंदन व इतर नित्यकर्मास बसलेले. बाबासाहेब सरकारांच्याकडून निरोप गेला “महाराज गाडीची वेळ होत आली निघायला हवे.” स्वतः सरकार गेले. आबासाहेब सरकार त्यांना म्हणाले, “बाबासाहेब, माझे नित्यकर्म आटोपले तर मी येईन. आपण माझी वाट पाहू नका. आपण निघा.” अशी कर्मावरील ज्वलंत निष्ठा भगवंतांना अभिप्रेत असावी.

देव पुढे म्हणाले, “अर्जुना, इतक्या कठोर पालनानंतरही मी हे विशेष काही करतो.” असा भाव त्या कर्त्यांच्या मनात असत नाही आणि कर्म करीत असताना फळाच्या आशेवर त्याने पाणी सोडलेले असते. पहिल्या क्रियेतूनच किंबहुना त्यागातून दुसरा त्याग सिद्ध होतो. तो कर्ता कर्तुत्वच घेत नाही आणि म्हणून कर्मफळ त्याग सहजच घडतो. त्यासाठी श्रम घ्यावे लागत नाहीत, विचार करावा लागत नाही. पण अर्जुना, कामना ठेवायची नाही म्हणून अवज्ञा करावयाची असे मात्र समजू नको. मातेच्या बाबतीत ज्याप्रमाणे कामना आणि अवज्ञा दोन्हीही पतनाला कारणीभूत होतात त्याप्रमाणे कर्माचे आहे. म्हणून त्या दोन्हींचा त्याग करावा आणि केवळ मातेची भक्ति करावी. गायीचे तोंड अपवित्र म्हणून सगळी गायच टाकावी काय? आपल्या आवडत्या फळात असार साल बी आहे म्हणून सर्व फळच त्याज्य समजावे काय? त्याप्रमाणे कर्तृत्वाचा अभिमान आणि कर्म फळाचा आस्वाद ह्या दोन्हीचे नाव कर्मबंध असे आहे. यातूनच कर्माचा बंध निर्माण होतो. बाप लेकीबद्दल विषयवासना न ठेवता ज्याप्रमाणे कर्तव्य म्हणून तिचे पालनपोषण आणि रक्षण करतो, त्यामुळे त्रास झाला असे मानत नाही त्याप्रमाणे जो कर्ता विहित क्रिया करताना त्या क्रियेच्या फळाची आकांक्षा ठेवत नाही

किंवा त्या क्रियेचा त्रास मानत नाही. या त्यागास सात्त्विक त्याग म्हणावे. हा त्याग फार श्रेष्ठ वृक्ष आहे आणि यालाच मोक्ष हे फळ तेरे, अशी ह्या त्यागाची प्रसिद्धी आहे.

असे का घडते हे पाहिले की, ध्यानी येते आहे की, बीज जाळून टाकून वृक्षाचा निर्वंश करावा त्याप्रमाणे फलाचा त्याग करून ज्याने कर्माचा त्याग केला त्याच्या चित्तावरील रजोगुण व तमोगुण हे दोन्ही सात्त्विक कर्मत्यागाने नाहीसे होतात. गंज आणि काळिमा हे लोखंडाचे अंगभूत दोष परिसाचा स्पर्श झाला की, त्या लोखंडाचे सोने होऊन नाहीसे होतात त्याप्रमाणे कर्मत्यागाच्या स्पर्शाने हे दोन दोष जातात आणि अंतःकरणात फक्त सात्त्विक भाव शिल्लक राहतो. संध्याकाळ झाली की, मृगजळाचा भ्रम नाहीसा होतो. त्याप्रमाणे त्या शुद्ध सत्त्वभावाने विश्वभ्रमाचा निरास होतो आणि आत्मबोधाचे डोळे उघडतात. आकाश सगळीकडे असूनही जसे दिसत नाही पोकळी एवढेच स्वरूप कळते त्याप्रमाणे बुद्ध्यादिकांपुढे जो एवढा मोठा विश्वाभास आहे तो त्याला कोणीकडेच दिसत नाही.

प्रारब्ध कर्माच्या बळाने बरी वाईट कर्मे प्राप्त झाली तरी आकाशात ढग विरून जातात त्याप्रमाणे त्याच्या दृष्टीला त्यांचा बरेवाईटपणा दिसत नाही. त्याच्या दृष्टीमुळे ती कर्मे चोखच होतात आणि म्हणून शुभकर्मे करताना आनंद, अशुभ करताना दुःख त्याच्या मनात येत नाही. शुभकर्म हर्ष निर्भर चित्ताने करावे. अशुभ कर्माचा द्वेष करावा असे तो करत नाही. पार्था, तुझ्या मनात येईल की, असे कसे घडेल? शुभकर्माचा आनंद, अशुभकर्माचा खेद असे झाल्याशिवाय कसे राहील? तर घडते काय की त्याचा विश्वाभासच नाहीसा झाला असल्याने कर्माची शुभाशुभता मिथ्या आहे हे तो सहजच जाणतो. जागृत झालेल्या पुरुषास स्वप्न खोटे होते याविषयी तिळमात्र शंका उरत नाही. त्यामुळे समोर आलेले कर्म उत्तमरीतीने करावयाचे एवढेच तो सात्त्विक कर्ता जाणतो. किंबहुना कर्म आणि कर्ता ह्या द्वैतभावाची वार्ताही पांडुसुता त्या सात्त्विक त्यागात उरलेली नसते. अर्जुना, अशा रीतीने केलेला कर्मत्याग खरा असतो व मोक्षदायक होतो, एरवी दुसऱ्या कुठल्याही प्रकारे केलेला कर्मत्याग बंधालाच कारण होतो. कर्मे टाकली जातच नाहीत आणखी बंधन करतात. सव्यसाची अर्जुना, देहाची मूर्ति घेऊन जे कर्माची खंति मनांत बाळगतात ते खरे म्हणजे गावंढळच आहेत. घट जोवर घट ह्या स्वरूपात आहे तोवर मातीचा वीट मानून काय करणार? वस्त्र तंतूचा त्याग कसा काय करणार? अग्निच्या ठिकाणी जोवर अग्निपणा आहे तोवर तो उष्णतेला कंटाळून काय करणार? हिंगाने आपला उग्र वास टाकला तर त्याला सुगंधत्व कोठून मिळणार? द्रवपणाच सोडला तर पाणी कसे उरणार? तेव्हा त्याप्रमाणे जोवर शरिराच्या आभासाने व्यवहार चालू आहे तोवर "कर्मत्याग करीन" असे म्हणणे त्या कर्त्याचा वेडेपणा आहे. अरे, कपाळावर लावलेला टिळा आपण वरून लावलेला आहे म्हणून लावतापुसता येतो पण कपाळास काय करणार? ते तर काढताबसवता येत नाही? शास्त्राने सांगितलेले कर्म आपण स्वीकारले आहे म्हणून टाकता येईल पण शरिराच्या रूपाने कर्मच मागे लागले आहे त्याचे काय करावयाचे? ते टाकता येईल काय? हे स्वाभाविक कर्म जागेपणी तर चालूच आहे पण निजल्यावरदेखील श्वासोच्छ्वासरूपाने चालू आहे. काही न करणे हे देखील या देहाच्या गावी एकप्रकारचे कर्मच घडते. म्हणून अर्जुना, मी तुला सांगतो, पुन्हा पुन्हा सांगतो, की कर्माचा त्याग करण्याची एकच रीत आणि ती म्हणजे फळाशेच्या ताब्यात जावयाचे नाही. आपल्या सर्व कर्माचे फळ ईश्वराला अर्पण करावे म्हणजे त्याची कृपा होऊन बोधाचा उदय होतो. आणि दोरीच्या ठिकाणी सापाचा आभास होत होता ते संपते. आत्मज्ञानाने अज्ञानासह कर्माचा नाश होतो आणि हा असा कर्मत्याग म्हणजेच खरा त्याग होतो. पार्था, जगामध्ये जो या प्रकाराने कर्मत्याग करणारा असेल त्यालाच आम्ही त्यागी

अनुक्रमणिका

म्हणू. एरव्ही रोग्याला मूर्च्छा आलेली असताना तो विसावा घेतो आहे असे म्हणण्यासारखे आहे. एका कर्माचा शीण आला म्हणून दुसऱ्या कर्मात विसावा शोधावा असेही कुणी कुणी करतात पण दांडक्याचा मार चुकविण्यासाठी बुक्क्यांचा मार खावा तसे हे होते. परंतु आता जास्त बोलणे राहू दे. फळाचा त्याग करून कर्म नैष्कर्मावस्थेस नेणारा कर्ता त्यागी आहे असे निश्चित समज. त्रिभुवनात केवळ तोच सर्वार्थाने त्यागी आहे.

अर्जुना, कर्माचे फल किती प्रकारचे असते हेही तुला सांगतो. कर्माचे फल तीन प्रकारचे असते. इष्ट, अनिष्ट व मिश्र. हे त्रिविध जग ह्या त्रिविध कर्माचे फल आहे. देव, मनुष्य व स्थावर ह्या सर्वांना जगडंबर असे म्हणतात. हे तीन प्रकार केवळ मूर्तिमंत कर्मफलच आहे. स्वधर्मास मान देऊन आपल्या अधिकारानुरूप वेदांना विचारून जे पुण्यकर्म केले जाते त्या पुण्यामुळे सव्यसाची अर्जुना, इंद्रादि देवांचे देह प्राप्त होतात. ते इष्ट कर्मफल समजावे. विषयासक्तबुद्धिने स्वैराचार अंगवळणी पाडून केलेल्या निषिद्ध अशा वाईट कर्मामुळे कृमि, कीटक, मातीचे ढेकूळ असे जन्म येतात. तेव्हा त्यास अनिष्ट फळ म्हणावे. शुभाशुभ कर्मे जेव्हा समभाग असतात तेव्हा मनुष्यदेह मिळतो, हे मिश्रफळ समजावे. गोड आणि आंबट या दोन चवी एकत्र झाल्या की वेगळीच आंबट गोड चव तयार होते व त्याचा स्वाद पहिल्या दोहोना मागे सारणारा असतो. योगमार्गात वायू बाहेर थांबवला की तो कुंभक होऊन वायूच्या निश्चलतेस कारणीभूत होतो. वायू स्वभावाने चंचल पण त्याचा निरोध केल्याने तो अशा प्रकारे उलट प्रकृति धारण करून निश्चल होतो. सत्य आणि असत्य यांची भेसळ झाली की, काही वेगळाच प्रकार होतो. निर्भेळ सत्यास असत्य जिंकते आणि आपला शिरकाव करून घेते. मिश्र कर्मफळाची याप्रमाणे स्थिती आहे.

धनंजया, एरव्ही, घडते असे की हे इष्ट, अनिष्ट व मिश्र कसलेही कर्मफळ असो कर्मफलाची आशा जे सोडत नाहीत त्यांनाच ते भोगावे लागते. नुसते कर्म बंधनकारक होत नाही. कर्मफळाची लालसा बंधन निर्माण करते. बाप मुलीला जन्म देतो, वाढवितो, कन्यादान करताना, “ही माझी नाही”, असे म्हणून जावयाच्या हातावर उदक सोडतो. आता जन्म देऊनही पिता मुक्त झाला, दान घेतल्यामुळे जावई अडकला. विषाचे आगर करणारे मळेकरी विषवल्ली वाढवतात, पैसा करतात, खुशाल आनंदात जगतात. ती वल्ली पैशाने विकत घेऊन खाणारे प्राणाला मुकतात. जो कर्ता कर्म करतो आणि जो कर्ता कर्म करतो पण फलाशेचा त्याग करून अकर्ताच होतो ह्या दोघांना नुसते कर्म आवरू शकत नाही. वाटेमध्ये असलेल्या आंब्याच्या झाडाचे पक्के फळ जो कोण ते उचलून खाईल त्याचे असते त्याप्रमाणे जो कर्मफळाची इच्छा ठेवतो त्यालाच ते मिळते. जो कर्म करूनही फळ घेत नाही तो जगाच्या घडामोडीत शिरतच नाही.

राजा भरतास मृत्युसमयी हरिणाचा ध्यास लागल्याने एक जन्म हरिणाचा घ्यावा लागला व पुढच्या जन्मी मनुष्य देह आला. आकांक्षेमुळे व कर्मामुळे प्राणी जन्म मरणाच्या चक्रांत सापडतो तेव्हा काहीच क्रिया आपणहून करावयाच्या नाहीत असे त्याने ठरविले. कुठलेही संस्कार स्वतःवर होऊ दिले नाहीत. जे मिळेल ते खावे, कुठेही पडावे, कोणी काही काम सांगितले तर करावे, नाहीतर स्वस्थ असावे अशा त्याचा क्रम असे. पगार न देता राबवून घेण्यासारखा मजूर मिळाला म्हणून लोक त्याच्याकडून वाटेल तितके काम करून घेत. कधी नीट जेवू घालत, कधी नाही. पुढे पुढे भावांनी आपल्या शेतावर राबवून घेण्यास सुरवात केली. तरी जडभरत आनंदात मग्न! एकदां तर जाडजूड बलिष्ठ जडभरतास बळी देण्यासाठी देवीच्या मंदिरात नेले. मालकास असा नर बळी पाहून फार आनंद झाला. त्याने सांगितले “याला आंघोळ घालून चांगली वस्त्रे द्या.”

आंघोळ झाल्यावर सांगितले "आता पोटभर जेव." जडभरत म्हणाला, "ठीक अहे. जेवूं या." पोटभर जेवल्यावर मालक म्हणाला, "आता देवीपुढे उभा रहा," "तुझा देवीला बळी अर्पण करायचा आहे." जडभरत म्हणाला "करा" आणि देवीपुढे उभा राहिला.

सरदाराने शिरच्छेद करण्यासाठी तलवार उगारल्यावर मात्र देवीला रहावेना. तिने तात्काळ सरदाराचा व शिपायांचा नाश केला. जडभरताने भद्रकालीचा हा पराक्रम कौतुकाने पाहिला आणि तो मुकाट्याने तिथून निघून गेला.

तर अशा उदासवृत्तिबद्दल देव बोलत आहेत. ते म्हणाले, "कर्माच्या फलाबद्दल तुझी इतकी उदासवृत्ति नसेल तर मात्र कर्मफल सोडत नाही, कर्म करताना व तेही फलाशेवर नजर ठेवून करताना गोड वाटते पण ते कर्मफल भोगताना क्लेश होतात. जिभेने स्वाद घेणे वाढत जाते, जेवतानाही गोमटे वाटते पण त्यामुळे परिणाम मरण प्राप्त होणे हा होतो. संभावित दिसणाऱ्या चोराची मैत्री अरण्य लागेपर्यंत बरी, सामान्य स्त्री अंगस्पर्श होत नाही तोवर बरी, त्याप्रमाणे शरिराने कर्म करीत असताना मोठेपणाची भरभराट होते पण मृत्यूसमयी कर्माची फले एकदम प्राप्त होतात. सावकार आहे, समर्थ आहे, पैसे परत करण्याची मुदतही भरली आहे अशावेळी तो धनको पैसे मागायला आला तर जसा पैसे वसूल केल्याशिवाय रहात नाही तशी ही कर्मे फल भोगविल्याशिवाय कर्त्यास सोडत नाहीत. कणसातून कण पडतो त्यातून कणीस तयार होते पुन्हा कण जमिनीत पडतो पुन्हा उठतो त्याप्रमाणे मागील कर्मफले भोगत असताना जी कर्मे होतात ती आणखी कर्मांना जन्म देतात. चालताना एक पाऊल दुसऱ्या पावलाला जिंकत पुढे जाते, नाव एका तीरावरून दुसऱ्या तीरावर गेली की तिकडून परत इकडे येते. म्हणून पैलतीर हे ऐलतीर होते त्याप्रमाणे कर्मफलाच्या भोगाच्या प्रयासापासून जीवाची सुटका होत नाही. कर्मापासून फल व फलापासून पुन्हा कर्म याप्रमाणे कर्मफल भोगाचा विस्तार होत जातो आणि त्या अत्यागी कर्त्यास प्रपंच गुरफटून टाकतो

म्हणून तुला पुन्हा पुन्हा सांगतो की, तू प्राप्तकर्म मग ते कोणत्याही प्रकारचे असो ते उत्तमरीतीने कर. फलाशेवर कर्माच्या आरंभीच पाणी सोडून दे. मग कर्म तुला बांधू शकणार नाही. जाईचे फूल फाकते म्हणजेच सुकते त्याप्रमाणे कर्मे करूनच कर्मत्याग करावा. बियाचे धान्य पोटगीसाठी संपवले की, वाढती कुळवाडीच संपते त्याप्रमाणे फलत्याग करूनच कर्माचे काम ते संपवून टाकतात. आता अशी उत्तम सत्त्वशुद्धि झाली की, गुरूकृपेच्या अमृताचा वर्षाव होतो आणि बोध वाढत जातो, द्वैताचे दैन्य फिटून जाते. ज्यांना ज्ञानप्रधान असा हा संन्यास करता येतो ते फळभोगाच्या त्रासापासून सुटतात. आता ह्या संन्यासामुळे त्यांची दृष्टी आत्मरूपापर्यंत जाऊन पोचते, स्थिर होते. कर्म म्हणजे काही वेगळे आहे असे त्यांना आता दिसतच नाही. ज्या भिंतीवर चित्र काढलेले असावे तीच पडून गेली तर चित्राची केवळ माती होते. पहाट होऊन उजाडले की अंधार उरत नाही. रूपच नाही तर सावली कशाची पडणार, आरसाच नाही तर बिंब कुठे पहाणार? एकदा झोपेचा अम्मल संपला की स्वप्नाचा प्रसंग कुठला आणि स्वप्न खरे का खोटे याची वाटाघाट तरी कोण करणार? त्याप्रमाणेच ह्या संन्यासामुळे मायाच जिवंत रहात नाही. मग तिचे कार्य करावे, सोडावे, हा भागच संपतो. म्हणून पार्था, असे ध्यानात ठेव की ह्या संन्यासात कर्माची भाषाच उरत नाही.

अनुक्रमणिका

खरे सांगू का अर्जुना, जोपर्यंत देहात अज्ञान नांदते आहे. तोपर्यंत कर्तेपणाच्या जोरावर आत्मा बऱ्यावाईट कर्मास प्रवृत्त झालेला दिसतो. वृत्ति द्वैताच्या राज्यपदावर आरूढ झालेली असते. मर्मज्ञा अर्जुना, आत्मा आणि कर्म ही एकमेकाहून पूर्व दिशा आणि पश्चिम दिशा यांच्याइतकी वेगळी आहेत. पार्था, आत्मा कर्माहून पूर्ण अलिप्त पण अज्ञानामुळे आत्मा कर्म करतो असे भासते पण आत्मा ह्या कर्माच्या जंजाळातून पूर्ण मुक्त असतो. नदीचे पाणी पांघरून खडक पाण्यात असतो पण नदीहून वेगळा असतो, पाण्यावर गोंडाळ असते पण पाण्याहून वेगळे असते. दिव्याजवळ असते म्हणून काजळी दिवा होऊ शकत नाही. चंद्राच्या ठिकाणी दिसणारा कलंक काही चंद्राशी एकरूप झालेला नाही. दृष्टि आणि डोळा यात किती फरक आहे. वाटसरूहून वाट भिन्न, पात्राहून पाणी भिन्न आणि आरशाहून मुख भिन्न त्याप्रमाणे कर्माहून आत्मा भिन्न आहे. कमलिनी फुलते आणि सूर्योदय झाल्याचे सुचविते व भ्रमराकडून सुगंध नेवविते. सूर्य काहीच करत नाही. त्याच्या आस्तित्वाने कमलिनीकडून ह्या सर्व क्रिया घडतात इतकेच.

आत्म्याच्या ठिकाणी सर्व क्रिया घडलेल्या दिसतात असे जरी म्हटले तरी ते चुकीचे ठरेल. क्रियेची पाच कारणे दुसरीच आहेत. ती मी तुला सांगतो.

सांख्य सिद्धान्तामध्ये क्रियेची पाच कारणे सांगितली जातात. कदाचित ती कारणे तुला माहितही असतील. वेदाच्या राजधानीत सांख्य वेदान्ताच्या प्रासादामध्ये निरूपणाच्या नौबतीच्या आवाजाने ती सांगितली जातात. शास्त्रे हात वर करून उघडपणाने ही कारणे सांगतात आणि बजावतात की सर्व कर्माच्या सिद्धीला हीच पाच कारणे आहेत. आत्मराजास अयोग्य रीतीने त्या कारणात घालू नये. अर्जुना, वर्णनाच्या दवंडीने ती कारणे प्रसिद्धीस आली आहेत. आता ती तुझ्याही कानावर असू देत म्हणून सांगतो. मी ज्ञानरत्न तुझ्या हातात सापडल्यावर ते ज्ञान तू आणखी कोणा दुसऱ्याकडून ऐकावे हे संकट कशासाठी? आरसा पुढे मांडल्यावर, “बघा हो माझे रूप कसे दिसते?” असे लोकांना विचारून त्यांच्या दृष्टिला मान कशाला द्यावा उगीच? आपले आपल्याला दिसतेच आहे.”

“पार्था, अरे भक्त ज्या भावनेने मला पाहील ते ते रूप घेऊन मी त्याची हौस पुरवितो. तोच मी आज तुझ्या हातातले खेळणे झालो आहे.”

भक्ताच्या भावाप्रमाणे देव रूप धारण कसे करतात या संबंधीची एक फार मार्मिक गोष्ट आहे. एका ब्राह्मणाने सावकराकडून पाचशे रुपये कर्ज घेतले. ब्राह्मण, वृंदावनातील बिहारींजीचा पुजारी, जमतील तसतसे पैसे फेडीत तो जवळजवळ दहा-पाच रुपये बाकीवर आला असता सावकाराने पैसे त्याच्या खात्यावर जमा न करता दुसऱ्याच पानावर जमा केले आणि फिर्याद ठेवली. पुजारी बिहारीच्या देवळात पूजा करीत होता. तिथे कोर्टाचा माणूस फिर्यादीची नोटीस घेऊन आला. नोटीस पाहून पुजाऱ्याला फार आश्चर्य व भय वाटले. डोळ्यात पाणी आणून तो सांगू लागला, “अहो मी सगळे पैसे भागवले आहेत. दहा-पाच राहिले असतील ते देतो पण फिर्याद कशासाठी माझ्यावर?” चपराशी म्हणाला, “सगळे खरे, पण तुझ्या बाजूने कुणी साक्षीदार आहे का? पैसे सावकाराला कधी दिले, किती दिले, याला तुझ्या बाजूने कोण साक्षीदार आहेत?”

ब्राह्मण म्हणाला, “माझे कोण आहे बिहारीजीशिवाय? घाला साक्षीदार म्हणून बिहारजींचे नाव.” चपराशाने तसे केले. बिहारीजींच्या नावाने नोटीस आणली आणि पुजाऱ्याला विचारले, “बिहारीजींचा पत्ता द्या कुठे राहतात ते? त्यांची साक्ष आहे ना?” पुजारी म्हणाला, “देवळाच्या भिंतीवर लावा बिहारीजींच्या नावची नोटीस.”

चपराशीने आपले काम केले. फिर्याद सुरू झाली. साक्षीदार म्हणून बिहारीजींचे नाव पुकारले. तीनदा पुकारल्यावर उत्तर आले. “हजर”

एक अतिशय सुंदर युवक साक्षीदाराच्या पिंजऱ्यात येऊन उभा राहिला आणि जज्ञसाहेबांकडे पाहू लागला. साहेबांनी युवकाकडे पाहिले मात्र! त्यांच्या हातातून लेखणी गळून पडली. पंधरा मिनिटे ते तटस्थ बसून राहिले. त्यांचे शरीर हालले नाही की ते काही बोलूही शकले नाहीत. नंतर ते भानावर आले. बिहारींनी साक्षीस सुरवात केली. ते म्हणाले, “मी नेहमी पुजाऱ्याबरोबर असतो. माझ्या समक्ष त्यांनी सावकाराचे सगळे देणे दिले आहे. काही अगदी थोडे पैसे राहिले असतील. शेटजीनी जमा करताना पुजाऱ्याच्या नावावर पैसे जमा न करता वहीच्या अमुक पानावर, अमुक नावावर जमा केले आहेत.”

मग जज्ञ बिहारीला घेऊनच सावकाराच्या दुकानात गेले. बिहारी जे जे म्हणेल ते ते खरे निघत गेले. ज्या पानावर दुसऱ्याच नावावर रक्कम जमा केली होती ते पान व रक्कम बरोबर निघाली. बिहारींच्या सांगण्याप्रमाणे रक्कम जमा झाल्याचे जज्ञाने पाहिले व वही बाजूस ठेवून पहातात तर तिथे कुणी नाही. जज्ञांनी कचेरीत जाऊन कडक निकाल लिहिला आणि त्याचबरोबर आपल्या नोकरीचा राजीनामा लिहून संन्यास घेतला देव भक्तासाठी असे वाटेल ते रूप घेऊन वाटेल ते काम करून त्याचे रक्षण करतात. आता तर आपण ह्या अर्जुनाच्या हातातले खेळणे झालो आहे या विचाराने देव गहिवरून गेले. प्रेमाचा असा प्रचंड ओघ आला की देव भानावर राहिले नाहीत, इकडे त्यावेळी अर्जुनाचीही तीच स्थिती झाली होती. आनंदाने अर्जुनाचेही देहभान नाहीसे होऊ लागले. चंद्रकांत मण्यांच्या डोंगरावर चांदण्याचा वर्षाव झाल्याने ते मणी पाझरू लागून सरोवर निर्माण व्हावे त्याप्रमाणे सुख आणि सुखाचा अनुभव यातील द्वैतभावाची भिंत मोडून सुखच अर्जुनाकृती होऊ लागले. मला सुख होते आहे असे अनुभवणारे अर्जुनपणच विरघळून जाऊ लागले. दोघांपैकी देव समर्थ म्हणूनच प्रथम भानावर आले आणि सुखात बुडणाऱ्या अर्जुनाला वर काढण्यासाठी त्यांनी धाव घेतली. अर्जुनाएवढे मोठे धेंड पण आपल्या विस्तृत प्रज्ञेसह तोहि आत बुडून जावा एवढे आनंदाचे भरते आले होते. ते काढून लावून देव म्हणाले, “पार्था, ऐकतोस ना? चांगला भानावर ये.”

देवांच्या हाकेने अर्जुन भानावर आला निश्वास सोडून त्याने मान डोलावली. स्वतःला कसेबसे सावरून तो म्हणाला, “देवा, दातारा मी तुमच्या शेजारी रहायला मी आता कंटाळलो आहे, तुमच्याशी एकरूपच व्हावे म्हणतो तर आपण मला असे दूर का लोटता? आता ऐक्य घडेल असे वाटता वाटता जीवदशा आड कशाला घालता? माझे सगळे हट्ट पुरवता आणि हाच का पुरवत नाही?”

श्रीकृष्ण म्हणाले, “अरे वेड्या, तुझ्या-माझ्यात द्वैत आहेच कुठे? चंद्र आणि चंद्रिका ही का वेगळी आहेत? त्यांना द्वैत मोडण्यासाठी कांही धडपड करावी लागते काय? जिथे मुळात अद्वैतच आहे तिथे काय

बोलायचे? मात्र हे मी तुला बोलून दाखवायला भितो. आपल्या आवडीचे कोणी असावे, मग त्याची समजूत घालावी, यात प्रेम अधिकाधिक दृढ होत जाते. आता आपण दोघे आहोत म्हणूनच हे सुख भोगू शकतो रे. आता तुझे माझे हे वरवरचे द्वैत किती आनंदाचे आहे. हे द्वैत निमिषार्धात संपेल आणि त्याबरोबर संवाद सुखाला मी मुकेन. तेव्हा ह्या ऐक्याविषयीचे बोलणे जरा बाजूला ठेवू या.

पंडुसुता, आपण काय बोलत होतो ते आठवते ना तुला? आत्म्याहून कर्म सर्वतः भिन्न आहे असे मी तुला सांगत होतो."

अर्जुन म्हणाला, "हो हो देवा खरच आपण तर अगदी माझ्या मनातलेच बोलला. महाराज, आत्मा जर कर्माला कारणीभूत नाही तर मग कर्माचे कारण आहे तरी कोण असे मला सारखे वाटत होते. आपण आठव्या अध्यायात कर्माची व्याख्या करताना म्हटले होते की, कर्त्याशिवाय अव्यक्ताच्या ठिकाणी हा भासमान होणारा आकार उत्पन्न होतो. ज्याच्यामुळे असा हा व्यापार होतो त्याला म्हणावयाचे कर्म. तेव्हाच आपण असेही म्हटले की कर्ता दिसत नाही, कारण कळत नाही पण मधेच कार्य मात्र वाढलेले दिसते. आता याबद्दल माझ्या मनात शंका होती ती आपल्या ह्या विवेचनाने जाईल. कार्य म्हटले की कर्ता आणि कारण असतेच असा सामान्य नियम असताना हे असे कर्ता आणि कारण याशिवाय कार्य घडते कसे हे कळण्याची मला फार उत्कंठा लागली आहे. सगळ्या कर्माचे एक कारण पंचक आहे आणि मी ते तुला समजावून देईन अशी आपण पैज घेतली आहे तेव्हा माझे देणे द्या बर लवकर. शिवाय आपण म्हटले आहे की कर्माच्या कारणाशी आत्म्याचा काही संबंध नाही. आपल्या विवेचनाची मी अगदी आतुरतेने वाट पहातो आहे देवा."

अर्जुनाचे हे बोलणे ऐकून देवांना फार संतोष झाला. ते म्हणाले, "बाबा, असे धरणे धरणारा तरी कोण भेटतो आहे? अर्जुना, मी तुला सगळे निरूपण करतो अगदी सोप्या भाषेत करतो. पण या प्रेमाने तुला ऋणी व्हावे लागेल.

तेव्हा अर्जुन हसून म्हणाला, "वाहवा देवा, आताच काय म्हणालात हे विसरलात वाटते. या गोष्टीत मीतूपणा ठेवलातच होय?"

देव म्हणाले, "खरंच की पार्था, आता मात्र खरोखरच निरूपणास सुरवात करतो. अवधान चांगले पघळ करून ऐक बरं का? अर्जुना, खरोखरच आत्मस्वरूपाच्या बाहेरच्या बाहेर सर्व कर्माची उभारणी होते. ज्या पाच कारणांच्या समुदायाकडून हा कर्माचा पसारा मांडला जातो तीच कारणे कर्माचा हेतू असल्याने ते हेतूही उघडउघड पाच आहेत. पार्था, हे ध्यानात ठेव. ते आत्मतत्त्व ह्या कर्माच्या उभारणीत कुठेही, कधीही थोडेसुद्धा अडकलेले नाही. ते त्या कर्माचा हेतू नाही किंवा उपादान कारणही नाही. उपादान कारण म्हणजे ज्या कारणाचा कार्यात प्रवेश असतो ते. आता घटाचे उदाहरण घेतले तर मातीने घटरूपात प्रवेश केला असल्याने माती हे घटाचे उपादान कारण आहे. आत्मा मात्र कर्मापासून पूर्ण अलिप्त असल्याने कुठल्याही कर्माचे उपादान कारण होऊ शकत नाही. त्याचप्रमाणे आत्मा स्वतः कर्म पार पाडण्याचे कामी सहाय्यही करत नाही.

आकाशात रात्र, दिवस येतात जातात. आकाशाचा त्याचा काही संबंध नसतो, ते ह्यापासून अलिप्तच

असते. त्याप्रमाणे वेगळ्याच कारणांनी कर्म उत्पन्न होते आणि ती शुभाशुभ कर्मे आत्म्याच्या ठिकाणी उत्पन्न झाली असे वाटते. पाणी, उष्णता आणि वाफ यांचा संगम झाला आणि त्यांना वायूचे सहाय्य मिळाले की आकाशात ढग येतात. आकाशाला ढगांची वार्ताही नसते. अनेक लाकडांनी नाव तयार होते, नावाडी ती ढकलतो आणि वारा ती चालवतो, पाणी केवळ साक्षी असते. पृथ्वीवरची माती खर्च पडून चिखलाचा गोळा तयार होतो. तो चाकावर टाकला जातो, चाक फिरत राहते आणि त्या चिखलाचे भांडे तयार होते. चिखलाच्या गोळ्यांचे मडके बनविण्याचे काम कुंभार करतो. पृथ्वी त्या चाकाला आधार देते एव्हढेच. बाकी आधारावाचून पृथ्वीचे काय खर्च हाते? सूर्याच्या उदयाने लोकांचे सर्व व्यवहार होत असतात. पण सूर्याकडे कोणत्या कर्माचे कर्तृत्व येते? त्याचप्रमाणे पाच हेतू एकत्र झाल्यावर ह्या कारणांकडून कर्मलताची लावणी होते. आत्मा अगदी भिन्न असतो. मोत्ये वजन करून घ्यावी त्याप्रमाणे ही पाच कारणे वेगवेगळी खुलासेवार बारकाईने सांगतो.

कर्माच्या कारणांपैकी देह हे पहिले कारण आहे. या देहाला अधिष्ठान असे नाव आहे कारण भोक्ता जो जीव तो आपल्या सुख दुःखादि भोगासह या देहात राहतो. इंद्रियांच्या दहा हातांनी रात्रंदिवस शिणत प्रकृतीकडून सुखदुःखे मिळविली जातात. ती भोगण्यासाठी देहाशिवाय जीवाला दुसरी जागाच नाही म्हणून देहाला अधिष्ठान हे नाव दिले जाते. चौवीस तत्त्वरूपी कुटुंबाचे रहाण्याचे देह हे घर आहे. बंधमोक्षाची गुंतागुंत इथेच उलगडली जाते. फार काय सांगू अर्जुना, जागृति, स्वप्न, सुषुप्ति या तीन्ही अवस्थांना देहच आधारभूत आहे. तेव्हा त्यामुळेही देहाला अधिष्ठान हे नाव मिळाले आहे. जीव येथे सुखदुःखाचा भोग भोगतो म्हणून देह हे अधिष्ठान ह्या नावाने कर्माचे पहिले कारण मानले जाते.

कर्माचे दुसरे कारण म्हणजे कर्ता. हे चैतन्याचे प्रतिबिंब आहे. आकाशातून वृष्टि होते त्या पाण्याने डबके तयार होते आणि त्या डबक्यातच पुन्हा आकाश प्रतिबिंबित होते, त्याप्रमाणे हे घडते. एखाद्या राजाला गाढ झोप लागते, तो झोपेमुळे राजेपण विसरतो. स्वप्नात दीन, रंक होतो. ते दैन्यदुःख पांघरून वावरतो, त्या दैन्याशी एकरूप होतो. त्याप्रमाणे चैतन्याला आपला विसर पडतो. देहाच्या आकाराने ते भासू लागते आणि चैतन्य भ्रमाने मी देह आहे असे म्हणू लागते. चैतन्याने अशी विपरीत समजूत करून घेतली की त्याला जीव म्हणावयाचे. ह्या जीवरूपी आभासाने देहाबरोबर करारमदार केला आहे की तू आणि मी एक. आता भ्रमातून का होईना अशी शपथ झाली असल्याने प्रकृती जी जी कर्मे करते ती ती मी केली असे चैतन्य म्हणू लागते आणि मग ह्या चैतन्याला जीव हे नाव येते. हे कर्माचे दुसरे कारण आहे. राजनंदना पार्था, कर्माचे तिसरे कारण ही ज्ञानेंद्रिय आहेत. दृष्टि पापण्यापासून बाहेर पडण्यापूर्वी अखंड असते पण पापण्यांच्या केसामुळे चिरलेली वाटते, चवरीसारखी होते. घरामध्ये लावलेल्या एकाच दिव्याचा प्रकाश निरनिराळ्या गवाक्षांतून बाहेर पडल्यामुळे वेगळा वेगळा दिसतो. बुद्धिचे एकच ज्ञान निरनिराळ्या इंद्रियांतून बाहेर फाकते व वेगळे होते. तीच बुद्धिशक्ती नाकामध्ये वास घेणारी, डोळ्यामध्ये पहाणारी, कानामध्ये ऐकणारी, जिभेमध्ये चव घेणारी आणि त्वचेमध्ये स्पर्श घेणारी होते. या पाच ज्ञानेंद्रियांतून जीवाला येणारे अनुभव स्वतंत्र असले तरी अनुभव येण्यासाठी लागणारी बुद्धि एकच असते. इंद्रियानुरूप ती वेगळे रूप धारण करते इतकेच.

शरिरात संचार करून निरनिराळ्या, कर्मेंद्रियांकडून निरनिराळी भिन्न स्वरूपाची कामे करून घेणारी वायुशक्ति हे कर्माचे चौथे कारण आहे. बुद्धिशक्ति जशी ज्ञानेंद्रियांच्या मागे उभी असते त्याप्रमाणे वायुशक्ति कर्मेंद्रियांच्या मागे उभी असते आणि कर्मेंद्रियांकडून कर्म करविते. एकच पाणी पूर्व आणि पश्चिम ओघातून वाहू

लागले की त्याला नद आणि नदी अशी वेगवेगळी नावे येतात. ज्याप्रमाणे एकच पुरुष नव रसांना अनुसरू लागला की, नऊ प्रकारचा झाल्यासारखा वाटतो. वायूमध्ये असलेली अखंड क्रियाशक्ति नाना स्थानापाशी आली की नाना प्रकारची होते वाचेमध्ये आली की बोलणे होते. हातामध्ये आली की, देणे घेणे होते. अर्जुना, ती वायुशक्ति पायाजवळ आली की चालणे होते. दोन्ही अधोद्वाराजवळ गळणे होते. आता ही वायुशक्ति नाभिकमळापासून हृदयापर्यंत ॐकाराचा ध्वनी करत जाते, त्यावेळी शरीरात तिला प्राण असे नाव असते. त्याच शक्तिच्या हृदयावरच्या येण्याजाण्याच्या क्रियेमुळे उदान असे नाव आहे. खालच्या द्वाराच्या गतीमुळे अपान हे नाव ह्या क्रियाशक्तिस मिळाले आहे. व्यापकपणे ती शक्ति व्यान झालेली आहे. भक्षण केलेल्या अन्नाचा रस सर्व शरिरात सारखा भरून कुठलाही सांधा न सोडता सर्व सांध्यामध्ये ती भरलेली असते म्हणून तिला समान असे नाव मिळते. वायुशक्ति एकच पण तिच्या विशिष्ट क्रियेमुळे तिला ही नावे मिळतात. जांभई, शिंक, ढेकर ह्या शरिराच्या कर्मानुसार वायूस नाग, कूर्म, कुकुर अशी नावे आहेत.

सुभटा अर्जुना, एकच वायुशक्ति पण प्राण, अपान, व्यान, उदान, समान अशा पाच प्रकारानी शरिरात वेगवेगळ्या क्रिया घडविते. ही वायुशक्ति हे कर्माचे चौथे कारण आहे.

अर्जुना, चक्षुरादि दहा इंद्रियांच्या मागे आपल्या अनुयायांसह सूर्यादिक देवतांचा जो समुदाय उभा असतो तो कर्माचे पाचवे कारण आहे. या दहा इंद्रियांच्या देवता अशा आहेत.

**पंच ज्ञानेंद्रिये**

| **इंद्रिय** | **देवता** | **विषय** |
|---|---|---|
| कान | दशदिशा व आकाश | शब्द |
| त्वचा | वायु | स्पर्श |
| डोळे | सूर्य | रूप |
| रसना | वरुण | रस |
| नाक | अश्विनीकुमार | गंध |

**पंच कर्मेंद्रिये**

| **इंद्रिय** | **देवता** | **विषय** |
|---|---|---|
| वाणी | अग्नि | बोलणे |
| हात | इंद्र | देणे, घेणे |
| पाय | विष्णू | जाणे, येणे |

**अनुक्रमणिका**

| | | |
|---|---|---|
| उपस्थ | प्रजापति | रतिभोग |
| गुद | यम | मलत्याग |

याप्रमाणे ह्या दहा इंद्रियांच्या मागे हे दहा देवतावृंद उभे असते. त्या त्या देवतेची कृपा असली पाहिजे.

ऋतूंमध्ये उत्तम ऋतू शरद. त्यात चंद्र उगवावा आणि तोही पौर्णिमेचा असावा, वसंत ऋतूमध्ये आधीच बाग आल्हादकारक त्यात त्या बागेत प्रियजनांचा सहवास आणि या सुंदर संगमामध्ये आणि सुंदर उपचारही मिळावे, पांडवा, कमलाच्या ठिकाणी विकासाची शोभा असावी आणि त्यातही त्यातले पराग उठावदार दिसावे, वाचेमध्ये उत्तम कवित्व असावे त्यात ते कवित्व सुरस असून पुन्हा त्यात परमात्मवर्णन असावे म्हणजे जशी शोभा येते त्याप्रमाणे मनादि सर्व वृत्तिच्या ऐश्वर्यात बुद्धि उत्तम. त्या बुद्धिला इंद्रियांच्या सामर्थ्याची जोड आणि त्या सुदृढ इंद्रियांच्या समुदायाला देववृंदाची चांगली शोभा आहे. ह्या देवतांचा समुदाय हे कर्माचे पाचवे कारण आहे. अर्जुना, याप्रमाणे कर्म घडण्यास जी पाच कारणे आहेत ती मी तुला चांगली समजतील अशी सांगितली आहेत. पाच कारणरूपी ह्या खाणीची वाढ पाच हेतूंनी होत असते. ते पाच हेतूपण मी तुला सांगता.

एखादे कर्म मग ते शास्त्रविहित असो की निषिद्ध असो, मनुष्य करतो ते कर्म शरीर, वाणी आणि मन यांच्या योगे करत असतो. हे पहा, अकस्मात वसंत ऋतू आला की झाडांना पालवी फुटते. पालवीतून फुलांचे गुच्छ येतात आणि त्या गुच्छापासून फळे लागतात. वर्षा ऋतु आला की ढग येतात, ढगातून वृष्टि होते, वृष्टिमुळे धान्य पिकते व सुकाळ होतो. पूर्व दिशा अरुणाला जन्म देते, अरुणानंतर सूर्योदय होतो आणि सूर्याच्या योगाने जगाला उजेडाची प्राप्ती होते. त्याप्रमाणे अर्जुना, मन कर्मासंबंधी संकल्प करते. तो संकल्प वाचेचा दिवा लाबतो. वाचेचा दिवा सर्व कर्माची वाट दाखवतो आणि मग कर्ता कर्तृत्वाच्या व्यापारात सापडतो. येथे शरिरादिक समुदाय शरिरादिकास हेतूच आहे. लोखंडाची वस्तू लोखंडाच्या मदतीनेच करावी किंवा चतुर अर्जुना, तंतूच्या ताण्यामध्ये आडवा तंतू भरीला घालावा की तो तंतूच वस्त्र होतो, रत्नाचा आकार, पैलू जसा रत्नानेच तयार होतो त्याप्रमाणे शरिरादिक कारणे हेतू कशी होतात हे कळावयास हवे असले तर सांगतो ऐक. सूर्याच्या प्रकाशाला कारण व हेतू सूर्यच, ऊसाचे कांडेच दुसऱ्या कांडीच्या वाढीस कारण व हेतू! हे बघ वाग्देवतेचे स्तोत्र गावे असे वाटले तर वाचेचाच उपयोग करावा लागतो. वेदांचा मोठेपणा वेदांनीच सांगावा. त्याप्रमाणे शरीर, वाचा, मन ही तीन कर्माची कारणे आहेत. हे सर्वांना ठाऊकच आहे पण ती हेतूही आहेत. पूर्वी सांगितलेल्या देहादि पाच कारणांना शरीर, वाणी, मन या हेतूंची जोड मिळाली आणि मग ते कर्म शास्त्राने मानलेल्या मार्गाला अनुसरून असेल तर तो न्याय्य मार्ग न्याय्य कर्मांना हेतू होतो. पावसाचे पाणी जमिनीवर पडते, त्याचा प्रवाह तयार होतो, ते पाणी वाहता वाहता अकस्मात भाताच्या शेताच्या पाटात शिरले तर शेत तुडुंब भरून शेतात जिरून जाते पाणी नाहीसे झालेले दिसले तरी त्या पाण्यामुळे भाताची रोपे तरारून येऊन अचाट पीक येते. एखादा मनुष्य रागावून घराबाहेर पडतो आणि नकळत द्वारकेच्या वाटेने चालू लागतो. त्याला चालण्याचा शीण होतो खरा पण चालणे फुकट जात नाही. हेतु आणि कारण यांच्या मेळाने शास्त्र न जाणता केलेले कर्म जर यथाशास्त्र झाले असेल तर त्या कर्माला न्याय्य कर्मच म्हणावे. शास्त्र कर्माआधी जाणून घेतले नाही म्हणून त्या कर्मास दोष ठेवू नये. पण कारण आणि हेतू यांचा मेळ आहे पण शास्त्राधार मात्र नाही असे कर्म उत्पन्न झाले असेल तर त्याला न्याय्य कर्म म्हणता येत नाही. दूध वाढविण्याच्यावेळी चुलीवर उतू जाऊनच

संपले तर तो खर्च योग्य कारणाला झाला असे म्हणता येणार नाही. चोरांनी लुटून नेलेले धन दानात जमा होत नाही. त्याप्रमाणे शास्त्राच्या सहाय्याशिवाय केलेले कर्म सफल होत नाही. अरे, बावन्न वर्णापलीकडे कुठला तरी मंत्र आहे का? बावन्न वर्णांचा उच्चार केल्याशिवाय कोण मनुष्य राहिला आहे? पण कोदंडपाणी अर्जुना, मंत्रोच्चार कसा करावयाचा हे जर कळले नाही तर मंत्रोच्चार केल्याचे फळ वाणीला मिळत नाही. त्याचप्रमाणे कारण आणि हेतू आहे पण शास्त्रास धरून मात्र नाही असे कर्म निर्माण झाले तर कर्म घडते खरे पण कर्म करण्याचा तो मार्ग अन्याय्य आहे आणि त्यामुळे घडणारे कर्मही अन्याय्यच ठरते.

आता कर्माची पाच कारणे व चार हेतू तुला सांगितले. यात कुठे आत्मा सापडलेला दिसतो का तुला अर्जुना? म्हणून कीर्तिमाना, मी तुला म्हटले होते की आत्मा कर्माचे कारणही नाही आणि हेतूही नाही. तो उदासीन वृत्तिने नुसता साक्षी आहे. आणि चाललेला हा खेळ नुसता पहातो रे. त्याच्यावर 'कर्मकर्ता' हा आळ केवळ संगदोषामुळे आला आहे.

सूर्य स्वतः कुठलाही दृश्य पदार्थ होत नाही. फक्त प्रकाशतो आणि दृष्टिला पदार्थ दिसतात. आत्मा कर्मे होत नाही, कर्माचे कारण होत नाही पण त्याच्या सत्तेमुळे कर्मे घडतात. हे वीरश्रेष्ठा अर्जुना, आरशात स्वतःचे रूप पहाणारा प्रतिबिंब होत नाही. आरसा पण होत नाही. पण आरसा आणि प्रतिबिंब दोन्ही प्रगट करतो. पांडुसुता, रात्र आणि दिवस ही दोन्ही काही सूर्य होत नाही. सूर्य आपल्या मार्गाने जात असतो दिवस आणि रात्र त्याच्या उपस्थितीमुळे, अनुपस्थितीमुळे होत रहातात. त्याप्रमाणे आत्मा कर्ताही होत नाही कर्मही होत नाही. फक्त कर्ता आणि कर्म यांचे प्रकाशन करतो.

पण काहीजण मी देहच आहे अशा भ्रमाने देहातच बुद्धि बुडवितात. त्यांना मात्र आत्म्याविषयी मध्यरात्रीसारखा अंधार असतो. त्यांनी चैतन्य, ब्रह्म, ईश्वर या सर्वांचीच परम सीमा म्हणजे देह हा विचार पक्का केलेला असतो, आणि आत्मा हा कर्मकर्ता आहे असे ते धरून चालतात. काहीजण ह्याच्याही पुढे जाऊन म्हणतात की 'आत्मा वगैरे काही देहच खरोखर कर्मकर्ता आहे. कधी न पाहिलेला, न ऐकलेला, न खाल्लेला तो आत्मा मानण्याचे कारणच काय? देह कर्म करताना दिसतो तेवढाच फक्त आम्ही मानणार.'

आपण कर्मातीत आत्मा आहो. कर्माचे केवळ साक्षी आहोत ही आपल्या खऱ्या स्वरूपाची कथा त्यांच्या कानावरच नसते. अशा ह्या अज्ञानी माणसांनी अपरिमित अशा आत्म्याला देहाच्या मापाने मोजावे यात विचित्र ते काय आहे? दिवस उगवला की दिवाभीत डोळे मिटून घेऊन दिवसाची रात्र करीत नाही का? पण असे काहीतरी घडतेच. आकाशातला खरा सूर्य ज्याने पाहिला नाही तो डबक्यात दिसणारे सूर्याचे प्रतिबिंब म्हणजेच सूर्य असे मानणार नाही का? एकदा डबक्यातला सूर्य खरा आहे, हे मानले की डबक्यामुळे सूर्य असतो, डबक्यातले पाणी वाऱ्याने हालले की सूर्य कापतो, डबके आटले की सूर्य नाहीसा होतो हे सगळे खरेच ठरणार. जोवर झोप लागली आहे तोवर स्वप्न खरेच आहे. दोरी आहे हे न कळल्याने साप म्हणून त्या आकाराची भीति वाटते यात आश्चर्य काय आहे? कावीळ आहे तोवर चंद्र पिवळा दिसणारच. मृगजळ पाहिले की तान्हेलेले मृग त्या पाण्याच्या आशेने तिकडे धावणारच आपल्या मनाच्या शिवेवर शास्त्र आणि गुरू यांच्या नावाचा वारासुद्धा जो माणूस टेकू देत नाही तो केवळ मूर्खपणाच्या जीवित्वावर जगतो. चंद्रावरून ढग धावू लागले की कोल्हा मूर्खपणाने चंद्रच धावतो आहे असे मानतो. ढगाच्या वेगाचा आळ चंद्रावर घालतो. त्याप्रमाणे हा मनुष्य मी देह

आहे ह्या बुद्धिने आत्म्याला देहाच्या जाळ्यात घालतो. एकदा त्याने ही चूक केली की त्या चुकीमुळे देहाच्या बंदीशाळेत कर्माच्या पक्क्या शृंखलेत तो अडकतो. पहा तो बिचारा पोपट नळीवर मोकळ्या पायांनी बसलेला असतो. त्याच्या मानाची समजूत होते की आपले पंजे ह्या नळीला बांधून टाकलेले आहेत. आपण बंधनात आहो अशी भ्रामक कल्पना झाली की प्रकृतिचे कर्म तो निर्मळ आत्मरूपावर आरोपित करतो आणि असे झाले की मग कोट्यवधि कालपर्यंत कर्मे करीत, कर्मे मोजीत राहतो. त्या कर्मबंधनातून तो सुटूच शकत नाही. या उलट आत्म्याला जो प्रकृतिपासून वेगळा पाहतो तोही कर्मे करतो पण कर्मबंधनात सापडत नाही. समुद्राच्या पोटात असणाऱ्या वडवानळ अग्निला समुद्राचे पाणी स्पर्श करू शकत नाही, त्याप्रमाणे अशा पुरुषाला कर्म बाधक होऊ शकत नाही. कर्मात राहून कर्मापासून स्वतःला वेगळे कसे पहावे हे तो संतांच्याकडे पाहून त्यांच्या सहवासामध्ये शिकतो. मुक्त पुरुष कसे वागतात, कसे बोलतात याचे चिंतन करता करता त्याला आपलीही मुक्तता दिसू लागते. आरसा उजळला की आपले रूप आपल्याला भेटते. मीठ पाण्यास भेटले की पाणीच होते. प्रतिबिंबाने बिंब पाहिले की त्याचे प्रतिबिंबत्व जाऊन अनायासे बिंबच होते. त्याप्रमाणे आपली आत्मवस्तू आपल्याला हरवली आहे ती संताना पाहिले, ऐकले, त्यांचे वर्णन केले की आपल्या हाती येते, आणि मग कर्मामध्ये असूनही त्या बऱ्यावाईट कर्मामुळे आपण बांधले जात नाही, असा त्याला अनुभव येतो. संतांचे गुणवर्णन करावे, त्यांच्याजवळ रहावे हे तर खरेच पण अर्जुना, अज्ञानाच्या निद्रेमध्ये विश्वस्वप्नाचा व्यवहार भोगणारा जीव गुरूंनी महावाक्याचा बोध केला आणि मस्तकावर हात ठेवून जणू काय थापटून झोपेतून जागा केला असे घडते. धनंजया, मग तो गुरूकृपांकित जीव विश्वस्वप्नासहित माया निद्रा टाकून अद्वयानंद रूपावर येतो. त्याचे आताचे रूप बाहू उभारून तुला सांगतो.

ऐक. अरे, तो आता जागा झाला. आता मायेच्या विळख्यात सापडत नाही किंवा विश्वाभासातही गुंतत नाही. टक लावून तो आपले मुद्दल रूप पहातो.

चंद्राचे किरण फाकले की दुपारच्या उन्हाने भासणारे मृगजळाचे पूर नाहीरो होतात. बालपण संपले की बागुलबोवाचे भयही पळते. लाकूड संपले की स्वयंपाक थांबतो. जाग आली की स्वप्न नाहीसे होते. त्याप्रमाणे किरीटी, त्या माणसाला मी आणि माझे उरत नाही. सूर्याला एकदा वाटले की, ‘एकदा अंधार काय असतो हे पाहू या तरी’ आणि मग तो कडेकपारी गुहा सगळीकडे अंधार शोधून आला, पण त्याला अंधार कुठे सापडलाच नाही, तसे त्या माणसाचे होते. जो आत्मत्वाने वेढला गेला आहे तो जिकडे तिकडे पहातो ते ते दृश्य स्वतःच होऊन जातो. द्रष्टेपणासह दृश्य स्वतःचेच रूप आहे असा त्यास अनुभव येतो. ज्या लाकडाला अग्नि लागतो ते लाकूड स्वतः अग्निच होऊन रहाते. जाळणारा आणि जळणारा असा भेद शिल्लकच रहात नाही.

आत्म्याहून भिन्न भासणारे कर्म आता आत्म्यावर कर्तेपणाचा आरोप आणू शकत नाही. हा आळ निघून गेल्यावर शब्दांनी न सांगण्याजोगे जे काही-बाही उरते त्या आत्मस्थितीचा तो आता राजा होतो आणि मग देहाला आपले ठिकाण समजण्याची चूक त्याच्या हातून होईल कशी? प्रलयकाळचा समुद्र स्वतःला ओघ मानतो काय? बिंबाला सूर्य आपल्या स्वरूपाएवढा करता येईल काय? ताकातून घुसळून वर काढलेले लोणी ताकात ठेवले तरी ताकात मिसळत नाही, अलिप्त रहाते. त्याप्रमाणे सर्व ठिकाणी मीच भरलो आहे ही पूर्ण अहंता देहापुरती मर्यादित राहू शकत नाही.

अनुक्रमणिका

काष्ठाचा अग्नि झाल्यावर तो काष्ठाच्या पेटीत दडपून ठेवता येईल का? रात्रीच्या पोटातून बाहेर पडलेला भास्कर रात्र पाहू शकतो काय? त्याप्रमाणे ज्ञात्यासह संपूर्ण ज्ञेय जो गिळून बसला त्याला देह म्हणजे मी ही अहंता कोठून असणार?"

श्याम पुकुरातील बगीच्यात रहात असता एक दिवस एकाने त्यांना साकार व निराकार ध्यानाला उपयोगी अशी आसने विचारली असता ती त्याला श्रीरामकृष्ण समजावून देत होते. पद्मासन घालून डाव्या हाताच्या पंजाचा पृष्ठभाग उजव्या हाताच्या पंजावर ठेवून ते दोन्ही हात आपल्या वक्षस्थळावर धारण करून डोळे मिटून ते म्हणाले, "सर्व प्रकारच्या साकार ध्यानाला हे आसन प्रशस्त आहे." नंतर याच आसनावर बसून डाव्या गुडघ्यावर डावा, उजव्या गुडघ्यावर उजवा पंजा उताणा ठेवून अंगठा व तर्जनी यांची टोके एकमेकांना मिळवून बाकीची बोटे सरळ ठेवून दृष्टि भुवयांमध्ये स्थिर करून ते म्हणाले, "निराकार ध्यानाला हेच आसन प्रशस्त आहे" आणि असे म्हणता म्हणता त्यांना समाधी लागली. समाधीतून उतरल्यावर ते म्हणाले, "आता आणखी काही सांगत नाही कारण अशा रीतीने या आसनावर असताक्षणीच उद्दीपन होते, मन तन्मय होते व समाधीलीन होऊन जाते."

सदैव ईश्वराचेच चिंतन व सदैव भाव व समाधी यामध्ये निमग्न रहात गेल्याने त्यांचे ठिकाणी अद्वैतभावाची पराकाष्ठा होऊन गेली होती आणि ते यथार्थ दिव्य भावारूढ झाले होते. ईश्वराहून आपले पृथक् अस्तित्व ते विसरूनच गेले होते. 'अहं'चा लवलेशही त्यांच्या मनात राहिला नव्हता. त्यांची व ईश्वराची इच्छा एकच अशी त्यांची अवस्था होती. त्यांच्या सर्व व्यवहारात बोलण्याचालण्यात मानवी दुर्बलता अगर असंपूर्णता यत्किंचितही राहिली नव्हती. त्यांचे शरीर चैतन्यमय होऊन गेले असून दिव्य ईश्वरी शक्ति प्रकट होण्याचे ते एक प्रचंड यंत्र बनून गेले होते.

ब्राह्म समाजाचे दोन भाग झाल्यावर नरेंद्र साधारण ब्राह्म समाजाचा अनुयायी झाला. दर रविवारी तो समाजाच्या उपासनेस हजर राहून भजनादिकात भाग घेई. त्यामुळे त्याला एकदोन आठवडे दक्षिणेश्वरी जाता आले नाही. श्रीरामकृष्णांना चैन पडेना ते स्वतःच उठून रविवारी कलकत्त्यास गेले. संध्याकाळच्या सुमारास उपासना गृहात जाऊन दाखल झाले. विजयकृष्ण वगैरे मंडळीनी समाज सोडण्यास श्रीरामकृष्ण कारण झाले असे वाटत असल्याने त्यांना कुणी 'या बसा' असेसुद्धा म्हटले नाही. पण रामकृष्णांना त्याचे भानही नव्हते. सभागृहात येताच त्यांना भावावस्था प्राप्त झाली होती व वेदीपर्यंत जाताच ते समाधिमग्न झाले. श्रीरामकृष्णांना पहाताच नरेंद्र त्यांच्याजवळ येऊन उभा राहिला व सर्वांनी मिळून बऱ्याच वेळाने वाढणाऱ्या गर्दीतून दिवे घालवून मोठ्या प्रयासाने ठाकुरांना धरून बाहेर आणले. पण त्याचेदेखील त्यांना भान नव्हते. इतकी देहाबद्दलची पूर्ण अनासक्ती व आत्मभावाशी पूर्ण ऐक्य!

देव सांगत आहेत, "आकाश सर्वत्र गच्च भरले असल्याने ते जिथे जाईल तेथे ते असतेच त्याप्रमाणे जे कर्म करावे ते कर्म तो स्वभावाने होऊन जातो. कर्म त्याच्याहून वेगळे उरत नाही आणि म्हणून कर्तेपणा कुणी घ्यावयाचा? आकाशाशिवाय रिकामी जागा नाही, समुद्राला वेगळा प्रवाह नाही, ध्रुवाला आपली जागा सोडून कुठे जाणे नाही, तशी त्याची स्थिती होते. देहाबद्दलचा अहंकार नष्ट होऊन जातो.

पण असे झाले तरी जोवर देह आहे तोवर कर्मे करणे रहातेच."

या देवांच्या सांगण्यावरून पुन्हा श्रीरामकृष्ण परमहंसांच्या चरित्राचा मागोवा घ्यावासा वाटतो. विवेकानंद म्हणत, 'मनाच्या बाहेर असणाऱ्या शक्तिंना काही उपायांनी वश करून घेऊन त्यांच्या जोरावर काही चमत्कार घडवून आणणे ही काही विशेषशी गोष्ट नाही पण हा दक्षिणेश्वरांच्या देवळातील अशिक्षित पुजारी एखाद्या चिखलाच्या गोळ्याला जसे वाटेल तसे आकार द्यावे तसे लोकांच्या मनाला वाटेल तसे आकार देई. त्यांची वाटेल तशी घडामोड करी. स्पर्शाने किंवा नुसत्या इच्छेने त्यांच्या मनातील विचारप्रवाह वाटेल तसे बदलून टाकी. यापेक्षा अधिक आश्चर्यकारक चमत्कार मी कुठेही पाहिलेला नाही.

त्यांच्या स्वतःच्या बाबतीत देह आणि देहाचे कर्म यात वाटेल ती उलथापालथ होत असे. वैष्णवांच्या पर्वदिवशी वैष्णवभाव, शाक्तांच्या पर्वदिवशी शाक्तभाव, त्यांच्या ठिकाणी विशेष प्रमाणात दिसून येई. दुर्गापूजेच्या वा कालीपूजेच्या दिवशी ते श्रीजगदंबेच्या भावात इतके तन्मय होत की त्यांच्या शरिराची ठेवणसुद्धा श्रीजगदंबेच्या वराभयकरमूर्तीप्रमाणे होऊन जाई."

ख्रिस्ताचे दर्शन होऊन त्यांनी ख्रिस्ती धर्माचा अनुभव घेतला. मुसलमान धर्माप्रमाणे तीन दिवस आचरण ठेवून त्या धर्माची तत्त्वे आत्मसात केली. ख्रिस्ताचे नाक चपटे आहे हे त्यांनी ख्रिस्ताला प्रत्यक्ष पाहून सांगितले होते.

मुसलमानी धर्माचा अनुभव घेत असताना परमहंसांनी गोमांस खाण्याचा हट्ट घेतला होता. इतके त्यांचे शरीर त्या त्या भावांशी पूर्ण तादात्म साधत असे व कर्म करीत असे. देव पुढे म्हणाले, "सामान्य साधकाचे शरीर मात्र पूर्व प्रारब्धानुसार कर्म करीत राहते. बोधामुळे त्या कर्माचे बंधन मात्र होत नाही. आत्मबोधाच्या खुणा कधी ह्या कर्मावर दिसतात, कधी दिसतही नाहीत. पण देह आपला कर्मे करीत रहातो. अरे, वारा वाहत असताना झाडे डोलत असतात. वारा वाहायचा थांबला तरी पण झाडे थोडा वेळ डोलतातच. कापराच्या डबीतला कापूर संपला तरी डबीला थोडा वास शिल्लक रहातो. गाण्याची बैठक संपते पण त्या गाण्याची मनावर आलेली धुंदी शिल्लक राहते. पाणी जिरून नाहीसे होते पण ओल मागे शिल्लक असते. सूर्य मावळतो, लखलखीत बिंब दृष्टिआड होते पण पश्चिमेला असलेला तेजस्वी रक्तिमा राहतो. बाण धनुष्याहून सुटतो, पण प्रत्यंचा ज्या बळाने खेचलेली असेल ते बळ अंगात भरून घेऊन तो धावतोच, लक्ष्याचा भेदही करतो पण त्याची गती अजून संपलेली नसते. लक्ष्य भेदूनही तो पुढे जातो, बळ संपेपर्यंत थांबत नाही. कुंभार चाक फिरवतो, चिखलाचा गोळा वर ठेवतो भांडे तयार करून काढून घेतो. भांडे तयार होऊन बाजूस ठेवले गेले तरी चाक फिरायचे लगेच थांबत नाही. भ्रमतच राहते त्याप्रमाणे धनंजया, देहाभिमान जरी गेला तरी कर्म करीत रहाण्याची देहाची सवय काही लगेच सुटत नाही.

संकल्पाशिवायच स्वप्न पडते. लावण केल्याशिवाय जंगलात झाडे उगवतात. गंधर्वनगर आकाशात कोणी न बांधताच निर्माण होते. आत्म्याने काहीही हालचाल केली नाही तरी कर्माची जी देहादि पाच कारणे सांगितली ती एक झाली की कर्म सुरू होते. हे कर्म सर्व प्रकारचे असते. प्राचीन संस्काराचा शेष राहिल्यामुळे शरीर, वाचा, मनादि हेतू व देहादि पाच कारणे यामुळे अनेक प्रकारची कर्मे निर्माण होतात. आत्म्याला याचा

पत्ता नसतो. कोणत्या प्रकारचे कर्म घडते आहे याच्याशी आत्म्याचा काहीच संबंध नसतो आणि कर्म तर प्राचीन संस्काराप्रमाणे घडते आहे. अशा स्थितीत निषिद्ध कर्मदेखील क्वचित घडते."

मुक्तानंदानी आपला एक अनुभव सांगितला आहे. ते म्हणतात, "मी गणेशपुरीच्या आश्रमात ध्यानावस्थेत असताना माझे गुरू नित्यानंदजी आतून येत, इकडे तिकडे फिरत, कधी मला स्पर्श करीत, हसत नाचत आत निघून जात आणि कधीही अपशब्द न उच्चारणारा मी भराभर अपशब्द उच्चारू लागे. कोण समोर येईल त्याला प्रसाद मिळावयाचा. माझा अगदी गोंधळ उडावयाचा. हे काय घडते आहे हे काही मला कळायचेच नाही." शेवटी नित्यानंद त्यांना म्हणाले, "अरे, तू नाही रे तो. मी आहे मी." मग मुक्तानंदांना कळले की नित्यानंद आपल्या देहात संचार करून योगाच्या काही प्रक्रिया करून घेत आहेत आणि त्याबरोबरच त्यांच्यातील काही दोषही आपल्यामध्ये खुणा म्हणून ठेवत आहेत. अपशब्द नित्यानंद नावाचे व्यक्तिमत्त्व उच्चारत आहे. मुक्तानंद नावाचे नव्हे!

देव सांगत आहेत, "अरे, अर्जुना, जग संहरो वा नवे निर्माण होवो त्याचा आत्म्याशी काही संबंधच नाही. चंद्रविकासिनी कुमुदिनी सुकली, सूर्यविकासिनी कमलिनी फुलली हे काही तो सूर्य पहात बसत नाही. त्याला काही ह्या सुकण्या फुलण्याची गंधवार्ताही नाही. आकाशाला माहीत नसते की, आता विजा चमकत आहेत, त्या कोसळून भूमीच्या ठिकऱ्या होत आहेत, आता उत्तम पर्जन्यवृष्टि होते आहे, आणि भूमी हिरवीगार झाली आहे. हा देहात रहाणारा विदेहदृष्टि पुरुष देहाकडून घडणाऱ्या कर्माच्या बाबतीत उदासीन, अलिप्त, निःसंग असतो. देहादिकांच्या क्रियामुळे सृष्टि घडते आहे की मोडते आहे याची दखल तो ज्ञानी पुरुष घेत नाही. जागा झालेला पुरुष जसा स्वप्नाचा विचार करीत नाही तसे हे घडते.

आता वरवर पहाणारा त्या मुक्ताचे बाह्य कर्म फक्त पहातो आणि पुष्कळदा फसतो. त्याला खात्री वाटते की हा आपल्यासारखाच एक सामान्य कर्मकर्ता आहे. त्याची दृष्टि केवळ कातड्याच्या डोळ्यांची असते त्यामुळे ही चूक होते. शेतावर गवताचे बुजगावणे असते पण कोल्ह्याला राखणदार बांधावर राखण करीत बसला आहे असेच वाटते. वेड्या माणसाच्या अंगावर वस्त्र आहे की नाही हे दुसऱ्यानेच पहायचे त्याला स्वतःला काहीच भान नसते. वीरश्रीचा संचार झालेला योद्धा जेव्हा लढाईच्या धुमश्चक्रीत असतो तेव्हा त्याच्या अंगावरच्या जखमा दुसऱ्यानीच मोजायच्या असतात. महासतीचे भोग खरोखर पहाणारे सगळे जग बघते. त्या सती जाणाऱ्या स्त्रीला आग दिसत नाही, अंग दिसत नाही , अवतीभवतीचे लोक दिसत नाहीत केवळ पतीच्या चिंतनात ती खुशाल चित्तेवर चढते. त्याप्रमाणे आत्मस्वरूपाच्या बोधाने जो जागा झाला, दृश्य आणि द्रष्टा या दोन्ही भावना ज्याच्या गेल्या तो आपली इंद्रिये काय करीत आहेत हे जाणतही नाही. त्याला कशाचेच वेगळेपण जाणवतच नाही.

अर्जुना, जिच्यावर लाटा उसळत आहेत अशा नदीच्या काठी कुणीएक उभा राहिला तर मोठ्या लाटात लहान लहान लाटा नाहीशा होताना त्याला दिसतात. आता एका लाटेने दुसरी लाट गिळली असे म्हटले तर कुणी कुणाला गिळले म्हणावयाचे? सगळे तर एक पाणीच आहे. त्याप्रमाणे पूर्ण पुरुषाला दुसरा पदार्थच जगात प्रतीत होत नाही. मग तो मारणार तरी कुणाला? सोन्याची चंडिका, सोन्याचा महिषासुर आणि सोन्याचा त्रिशूळ हे भेद पुजाऱ्याच्या दृष्टिने ठीक आहेत, पण विचार केला तर त्या तिन्हीत भेद कुठे आहे? सगळे तर सोनेच आहे. चित्रामध्ये अग्नि, पाणी काढले आहे. चित्र कापडावरच आहे पण तो चित्रातला अग्नि किंवा चित्रातले

पाणी काही ते कापड जाळत नाही का भिजवतही नाही. मुक्ताचा देह तसा संस्कारामुळे हालत असतो, ती देहाची हालचाल पाहून वेडे लोक त्याला कर्ता म्हणतात. पण खरे म्हणजे तसे करू नये. त्या मुक्ताच्या कृतीने त्रिभुवनाचा जरी नाश झाला तरी तो त्याच्या हातून झाला असे म्हणू नये. सूर्याला अंधार दिसतच नाही मग त्याने अंधाराचा नाश केला असे कसे म्हणता येईल? ह्या ज्ञानी पुरुषाला दुजेपण उरलेलेच नाही तर तो करणार तरी काय?

नदीला अपवित्र म्हणता येते ती गंगेला मिळाली नाही तोवरच! ती एकदा गंगेला मिळाली की तिचा अपवित्रपणा संपला. आता ती गंगा झाली, गंगेसारखी पवित्र झाली.

आगीला आग बिलगली तर काय आगीला पोळते? शस्त्र काय आपले आपल्याला रुतते? आपल्याशिवाय सर्व कर्म वेगळे न समजणाऱ्या त्या मुक्ताची बुद्धि त्या कर्मानेच कशी लिप्त होईल?

म्हणून कार्य, कर्ता, कर्तृत्व हे त्याचे स्वरूपच झाले आहे. शरिराकडून भले किती कर्म होवो ते त्याला बाधक होत नाही. जीव कर्म करण्यात कुशल आहे. तो शरिरादिक पाच खाणी काढून इंद्रियरूपी दहा औतांच्या सहाय्याने कर्म करीत रहातो. न्याय्य आणि अन्याय्य दोन्ही प्रकारचे आकार साधून वेळ न लावता कर्माच्या इमारती उभ्या करतो. या एव्हढ्या मोठ्या कामाला आत्मा मात्र यत्किंचित सहाय्यकारी होत नाही. कर्म प्रवृत्ति दिसली तरी त्याचे श्रम आत्म्याला पडत नाहीत. तो केवळ ज्ञानस्वरूप साक्षी असतो. तो कर्मप्रवृत्तीच्या संकल्पाला आपणच कसे आमंत्रण देईल? तो ज्ञानी केवळ आत्म्याचे शुद्ध रूप होऊन रहातो. आता त्याला कर्माची बंदीशाळा नाही. तो कर्ता, कर्म, क्रिया, ज्ञाता, ज्ञान, ज्ञेय या त्रिपुटीच्या पलीकडे नांदतो.

जगाचे चित्र जे उमटते ते ह्या त्रिपुटीच्या मेळाने! अज्ञानरूपी वस्त्रावर स्थूल व सूक्ष्म प्रचंचाचे चित्र उमटते. ते चित्र काढले जाते; ज्ञाता, ज्ञेय, ज्ञान या त्रिपुटीमुळे! ही त्रिपुटीच जगाचे कारण आहे. कर्माचा आरंभ ही त्रिपुटीच करते. या त्रिपुटीतील एकेक वेगळे घेऊन धनंजया तुला सांगतो ऐक.

अर्जुना, ज्ञाता म्हणजे काय हे आधी सांगतो. जीवाला कर्ता म्हणावयाचे. ह्या जीवरूपी सूर्याचे किरण म्हणजे श्रोत्रादि ज्ञानेंद्रियें! बिंबापासून निघणारे हे किरण कधी पाची, कधी कधी दोन, कधी चार, कधी एकच अशा द्वाराने बाहेर फाकून विषयरूपी कमलाच्या कळ्या प्रफुल्लित करतात. अर्जुना, ध्यानात आले ना? जीवच ह्या विषयांना प्रफुल्लित करतो आणि विषयाचे ज्ञान करून घेतो. तुला परिचयाचा दृष्टांत देतो. जीवरूपी राजाचे घोडे विषयाच्या देशात जातात. त्या मनाच्या संकल्परूपी बिन खोगिराच्या पाठीवर इंद्रियांचे बाजारबुणगे असते. मग हे लष्कर विषयाच्या प्रांतातून लूटमार करून परत येते आणि आणलेली लूटमार जीवराजापुढे ठेवते. इंद्रियाच्या द्वाराने ह्या येरझारा चालू असतात आणि जोपर्यंत ह्या चालतात तोपर्यंत विषयज्ञान जीवाला सुखदुःख भेटवते. अर्जुना, विषयाच्या देशातून आणलेल्या लुटीला ज्ञान असे इथे म्हटले आहे. हे ज्ञान जाणण्याची जी क्रिया तिला ज्ञातृत्व म्हणावयाचे आणि हे जाणणाऱ्या जीवाला ज्ञाता म्हणावयाचे. हे ज्ञान फक्त सुषुप्तिकाली लीन होऊन रहाते. हे सामान्यज्ञान आहे. आता सामान्यज्ञान म्हणजे काय ते सांगतो. ते ज्ञान केवळ विषय जाणते. त्यापलीकडे त्याची धाव जात नाही. सर्व पदार्थांना नावे देण्याचे काम हे ज्ञान करते. ह्या ज्ञानाच्या पुढच्या बाजूला विषयांच्या धोंड्याचा बोध असतो. मागच्या बाजूला विषयांचे ज्ञान जीवाला झाल्याने

तो जीव ज्ञाता होतो. ह्या सामान्यज्ञानाचा जन्म अविद्येच्या पोटी होतो आणि जन्मास आल्याबरोबरच ते ज्ञाता, ज्ञातृत्व, ज्ञेय असे तीन विभाग करते आणि आपला प्रवास सुरू करते. अविद्येतून बाहेर पडल्यावर विषयापाशी त्याची धाव संपते आणि त्याच क्षणी मागच्या बाजूस जीव ज्ञाता होतो. ज्ञाता आणि ज्ञेय या दोघांच्यामध्ये हे असते. सामान्यज्ञान म्हणजे काय हे कळले काय अर्जुना? अध्यात्मज्ञानाहून हे कसे पूर्णतया वेगळे आहे हेही ध्यानात ठेव. अध्यात्मज्ञानात जीवदशा संपते तर इथे आणखी एक पदवी मिळून संपन्न होते. अध्यात्मज्ञानात त्रिपुटीचा लय आहे. तर सामान्यज्ञानात त्रिपुटीचा स्पष्ट उदय आहे. अध्यात्मज्ञानात लयावस्था आहे तर सामान्यज्ञानात भेदावस्था आहे. अध्यात्मज्ञानाने जीव मुक्त होतो तर सामान्यज्ञानाने जीव प्रपंचाशी जास्त जास्त जखडला जातो. अध्यात्मज्ञानाने कर्म संपते तर सामान्य ज्ञानाने कर्माचा पसारा वाढतो. तेव्हा हा प्रकार ध्यानात ठेवून आता ज्ञेयाकडे पाहू या. अध्यात्मज्ञानात ज्ञेय ब्रह्म आहे की ज्याच्याशी एकरूप होऊन अभेद साधायचा आहे, इथे ज्ञेय आहे रंगी बेरंगी प्रपंच! की जो निरनिराळ्या ज्ञानेंद्रियांच्या सहाय्याने भेदवृत्तितून भोगावयाचा आहे.

शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध हा ह्या सामान्यज्ञानाचा आभास आहे. आंबा रसाने, रंगाने, सुवासाने, जीभ, डोळे, नाक ह्यांना वेगवेगळ्या प्रकाराने भेटतो एकाच वेळी वेगळे वेगळे सुखानुभव देतो. म्हणजेच ज्ञेय आंबा हा एकच पण ज्ञान त्या त्या इंद्रियांनुसार तीन प्रकारचे होते. समुद्रजवळ ओघाचे वाहाणे थांबते, कणीस आले की धान्याच्या गवताची वाढ संपते. त्याप्रमाणे इंद्रियाच्या प्रवाहात वहाणाऱ्या ज्ञानाची धाव विषयापर्यंत पोचली की थांबते. हे मुक्कामाचे ठिकाण ज्ञेय म्हणून ओळखले जाते. ज्ञाता, ज्ञेय, ज्ञान ही त्रिपुटीच कर्माची प्रेरणा आहे.

आता हे जे शब्दादिक विषय आहेत हे प्रिय वा अप्रिय होऊ शकतात आणि केवळ ज्ञाता असलेला जीव प्रिय किंवा अप्रिय ठरविण्याचे काम करू लागतो. ह्या ज्ञात्याला थोडेसे ज्ञान झाले की तो लगेच “हे मला प्रिय, हे मला अप्रिय आहे.” अशी वाटणी करू लागतो. ज्ञेयाची थोडीशी चाहूल लागली की धावत सुटावे हा त्याचा स्वभावच असतो. मासा दिसला की बगळा, पैसा दिसला की निर्धन, स्त्री पाहिली की कामुक ही जशी गडबडून जातात आणि ती वस्तू पाहिजेच म्हणून धावतात. उताराचे पाणी जसे खळाळत उतरते किंवा फुलाचा वास आल्याबरोबर भुंगा किंवा धारेच्यावेळी वासरू गाईकडे धावत सुटते तसा तो ज्ञाता ज्ञेयासाठी कासावीस होतो, ज्ञेयाकडे पळत सुटतो. स्वर्गातील उर्वशीच्या सौंदर्याचे वर्णन ऐकून माणसे यज्ञयाग करून तिच्यासाठी शिड्या लावतात. पारवा आकाशात उंच उडत असतो पण पारवी पाहिल्याबरोबर आकाशातून आंग जमिनीकडे लोटून देतो. ढग गडगडू लागले की मोर नाचू लागतो. आकाशात कौतुकाने उडू पहातो त्याप्रमाणे ज्ञाता ज्ञेय समोर आल्याबरोबर धाव घेतो. आणि ज्ञेयाच्या भेटीसरशी ज्ञाता प्रिय आणि अप्रिय ठरवतो. प्रिय असेल तर ते भोगण्यासाठी एका क्षणाचाही विलंब त्याला सहन होत नाही. ज्ञेय अप्रिय वाटले की, ते टाकण्यासाठी तो इतका आतुर होतो की त्या अप्रिय विषयाच्या त्यागास लागणारा वेळ त्याला युगांतासारखा वाटू लागतो. एखादा मनुष्य सर्पाजवळ आला आणि त्याला वाटले की हा नीलमण्याचा हार आहे की लगेच मनात हार सापडल्याच्या आनंदाच्या लहरी उठू लागतात. हात पुढे करून तो हार उचलावा म्हणून पुढे व्हावे तर तो सापच आहे असे कळून भय आणि खेद निर्माण व्हावा तसे होते. प्रिय किंवा अप्रिय ज्ञेय पाहिल्याबरोबर ज्ञाता त्याचा लगेच स्वीकार आणि त्याग करू लागतो. बरोबरीच्या मल्लाबरोबर युद्ध करण्याची हौस असलेला रथात बसून फिरणारा मल्ल समोरून मल्ल येताना पाहून कुस्तीच्या खुमखुमीने रथ सोडून जमिनीवर उतरून दंड ठोकून आवेशात उभा राहतो तसा हा ज्ञाता ज्ञेयाच्या दर्शनाबरोबर आपली योग्य भूमिका सोडतो आणि कर्ता ह्या दशेला

येतो. अर्जुना, प्रिय आणि अप्रिय अशी वाटणी करून प्रियाचा हव्यास व अप्रियाचा त्याग करण्याच्या ज्ञात्याच्या धांदलीमुळे ही अवदशा त्याला येते हे लक्षात घे. प्रथम ज्ञाता काही कर्ता नव्हता पण ज्ञेयाच्या भेटीने प्रियाप्रिय हा स्वीकार, त्याग आणि ह्या भूमिकेमुळे जीवाची प्रिय मिळविण्याची व अप्रिय टाकण्याची धडपड प्रत्यक्ष ज्ञात्याची योग्यता बिघडवून त्याला ह्या खालच्या पायरीवर आणते.

भगवान बुद्धांची कीर्ति बाहक नावाच्या एका साधकाच्या कानी गेली आणि आपण बुद्धांचा उपदेश घ्यावा असे त्याला वाटू लागले. तो राजगृहात जाऊन पोचला. आश्रमात पोचल्यावर मोठ्या उत्सुकतेने तो विचारू लागला, "मला भगवान तथागताना भेटायचे आहे. कुठे आहेत ते मला लवकर सांगा."

शिष्य म्हणाले, "तथागत भिक्षेसाठी गावात गेले आहेत. आता कुठली भेट? थांबा जरा." बाहक म्हणाला, "नाही, नाही, कोणत्या बाजूला भगवान गेले आहेत तेवढे सांगा मी जातो." शिष्याने सांगितल्याप्रमाणे बाहक धावतच शोधू लागला. भगवान हातात भिक्षापात्र घेऊन एका दाराशी उभे होते. त्यांना पाहताच बाहकाने पायाशी लोळण घेऊन म्हटले, "भगवान, माझ्यावर कृपा करा. मला उपदेश द्या."

दयार्द्र दृष्टिने त्याच्याकडे पहात भगवान म्हणाले, "ही भिक्षेची वेळ आहे. लोक भिक्षा घालण्यासाठी हातात भिक्षा घेऊन दारात तिष्ठत उभे आहेत. तेव्हा आता कसा उपदेश करणार? संध्याकाळी बघू."

बाहक म्हणाला, "भगवान मला तात्काळ उपदेश हवा. माझे आयुष्य किती आहे कुणास ठाऊक? संध्याकाळपर्यंत मी असेन याची काय खात्री आहे?"

त्याचे हे निर्वाणीचे बोलणे ऐकून भगवानांनी भिक्षापात्र खाली ठेवले ते तिथेच एका ओट्यावर बसले आणि म्हणाले, "ठीक आहे. हे बघ, तू पहाशील तेव्हा नुसता पहा, खाशील तेव्हा नुसता खा, ऐकशील तेव्हा नुसता ऐक, कुठलीही क्रिया करताना ती नुसती क्रिया कर. त्यावर आसक्ति ठेवू नको. क्रिया बंधनात घालत नाही, आसक्ति बंधनात घालते."

बाहकाने उपदेश ग्रहण केला. भगवानांच्या पायावर मस्तक ठेवले आणि तो उठला. भगवानांनी भिक्षापात्र उचलले आणि तेही भिक्षेला गेले. थोड्याच वेळात घाबऱ्या घाबऱ्या शिष्य धावत आले आणि म्हणाले, "भगवान काय करावे? तो बाहक आला होता उपदेशासाठी पण त्याला बैलाने शिंगावर घेऊन ठार केले आहे." भगवान म्हणाले, "बाहकाचे अंत्यसंस्कार करून त्या विभूतिवर स्तूप बांधा. त्याला झालेल्या उपदेशानुसार तो अर्हतपदाच्या वाटेने चालू लागला आहे." जेवणारा मनुष्य स्वयंपाकी व्हावा, भ्रमराने फुलांचा मळा लावावा, सराफच कसोटीचा दगड व्हावा किंवा देवच देवळाच्या कामास लागावा तशी स्थिती ह्या ज्ञात्याची होते आणि मग ती आसक्ती भवबंधनास कारण होते असा भगवानांच्या बाहकाला झालेल्या उपदेशाचा सारांश आहे आणि तेवढा उपदेश बाहकाच्या उद्धारास पुरेसा झाला.

माउली सांगत आहेत, अर्जुना ज्ञेयाच्या हावेने आता हा ज्ञाता कर्ता होतो आणि इंद्रियादि आपली करणे म्हणजे साधने त्या ज्ञेयाच्या प्राप्तीसाठी राबवू लागतो. आता हा ज्ञाता कर्ता झाल्याबरोबर ज्ञेयच कार्य ह्या

रूपास येते, क्रियेचे फळ होते. ज्ञाता, ज्ञान, ज्ञेय ह्या त्रिपुटीच्या जागी आता कर्ता, करण, कर्म ही त्रिपुटी येते. रात्र पडल्याबरोबर डोळ्याची शोभा पालटते. अदृष्ट उदास झाल्याबरोबर श्रीमंताचे विलास संपतात, पौर्णिमा उलटली की चंद्राचे रूप बदलते, त्याप्रमाणे ज्ञाता इंद्रियांचा उपयोग करून आसक्तिपोटी कर्मे करू लागला की ज्ञाता, कर्ता ह्या रूपास आल्यावरच्या खुणा आता तुला सांगतो.

अंतःकरण चतुर्विध आहे. बुद्धि, मन, चित्त, अहंकार ही चार अंतःकरण चतुष्ट्य म्हटले जाते. त्वचा, कान, डोळे, जीभ, नाक ही पाच प्रकारची इंद्रिये आहेत. कर्ता जीव अंतःकरण चतुष्ट्याच्या सहायाने 'हे कर्म मला सुखकारक होईल' असे ठरवितो. आणि बाहेरची चक्षुरादि इंद्रिये कामास जुंपतो आणि मनात योजलेल्या फलाची प्राप्ती होईपर्यंत स्वतःही स्वस्थ रहात नाही आणि त्या इंद्रियांनाही बसू देत नाही. आता त्या कर्माचे फल दुःख या स्वरूपाचे व म्हणून अप्रिय मिळणार असे वाटल्याबरोबर त्या दुःखाच्या निवारणार्थ दाही इंद्रियांचा समुदाय लावतो. धान्याचा कणही ज्याच्याजवळ नाही अशा दीनवाण्या माणसास राजा जसा अहोरात्र राबवून घेतो तसा तो कर्ता ती इंद्रिये रात्रंदिवस राबवून घेतो.

अर्थ इतकाच की प्रियाप्रियांच्या स्वीकार त्यागाच्या ह्या राबणुकीमध्ये हा कर्ता झालेला ज्ञाता इंद्रियांचा भार खांद्यावर घेऊन वाटचाल करतो. बैलाच्या औताप्रमाणे इंद्रियांचा उपयोग करावा लागत असतो म्हणून इंद्रियांना आम्ही करणे असे म्हणतो. ह्या करणांच्या सहाय्याने कर्ता ज्या क्रिया उभारतो त्या क्रियांकडून जे व्यापले जाते ते कर्म म्हणावयाचे. चतुरांच्या श्रेष्ठा अर्जुना, सोनाराची बुद्धि लेणे व्यापते, चंद्राच्या किरणांनी चांदणे व्यापले जाते, विस्तृतपणाने वेल व्यापला जातो, प्रभा आकाश व्यापून टाकते आणि गोडी सर्व ऊस व्यापून टाकते, पोकळी आकाश भरून टाकते त्याप्रमाणे कर्त्याच्या क्रियांना जे व्यापून टाकले जाते त्याला कर्म म्हणावयाचे. कर्ता, करण, कर्म ह्या तिन्हींचे स्वरूप समजले ना अर्जुना? ज्ञाता, ज्ञेय, ज्ञान हे तीन कर्माची प्रेरणा करतात आणि कर्ता, करण, कार्य हा कर्माचा साठा आहे.

अग्निच्या ठिकाणी धूर ठेवलेला असतो, बीजामध्ये वृक्ष साठवलेला असतो, मनामध्ये काम भरून राहिलेला असतो त्याप्रमाणे कर्ता, क्रिया व इंद्रिये म्हणजेच करणे ही सर्व कर्माचे जीवन आहेत. सोन्याच्या खाणीला सोने जसे जीवन आहे त्याप्रमाणेच हे आहे.

मात्र अर्जुना हे कार्य, हा मी कर्ता असा भाव आहे अशावेळी देखील आत्मा या समस्त क्रियांपासून दूर असतो. सुमति अर्जुना, आत्मा ह्या कर्मापासून अगदी वेगळा आहे. तुला हा विषय पुन्हा पुन्हा किती सांगणार? तू तर आता ते जाणतोच आहेस पण ज्ञान, कर्म आणि कर्ता यासंबंधी सगळे सांगून झाले असे मात्र समजू नकोस. कारण ह्या तिघांमध्ये पुन्हा सात्त्विक, राजस व तामस हे तीन भेद आहेत आणि त्यापैकी सात्त्विक ज्ञान, सात्त्विक कर्म आणि सात्त्विक कर्ता हे काय ते आपल्या हिताचे आहेत बाकी राजस व तामस हे दोन्ही प्रकार बंधनासच कारण होतात.

अर्जुना, ज्ञान, कर्म, कर्ता यावर त्यांची छाननी न करता कधीही विसंबून राहू नये. जीवाला हा बोध असावा म्हणून सांख्यशास्त्राने पूर्ण विचार करून गुणांचे प्रकार स्पष्ट करून मांडले आहेत. सांख्यशास्त्र म्हणजे विचारांचा क्षीरसागर आहे. आत्मज्ञानरूपी चंद्रविकासिनी कमलाचा चंद्र आहे. सर्व शास्त्रांचा ज्ञान डोळस राजा

आहे. प्रकृति पुरुष ही दोघे दिवस-रात्रीसारखी एकमेकात मिसळली आहेत. त्या दोन्हींकडे ज्ञानदृष्टिने पाहून त्यांची विभागणी करणारा त्रिभुवनातला तेजस्वी सूर्य आहे. अपार मोहराशीरूप हा संसार ह्याचे ह्या शास्त्राने मोजमाप करून चोवीस मूलतत्त्वे शोधून काढली. संसाराचा हिशोबच मांडला. ही मूलतत्त्वे ध्यानात ठेवून त्या तत्त्वांचा निरास करून परमात्मतत्त्वामध्ये सुखात रहाता येते इतके ह्या सांख्यशास्त्राचे माहात्म्य आहे.

तर या सांख्यशास्त्राने ज्या गुणभेदांचे चरित्र वर्णन केले आहे ते गुणभेद चरित्र असे आहे. त्यांचे म्हणणे थोडक्यात असे की जेवढे काही दृश्य जगत आहे त्यावर त्रिविधपणाचा शिक्का आहेच. या सत्त्व, रज, तमाचा महिमा एवढा मोठा आहे की ब्रह्मदेवापासून किडामुंगीपर्यंत ह्यांची सत्ता चालते.

परंतु जे ज्ञान भेदले गेल्यामुळे जगातील सर्व पदार्थांचे समुदाय गुणभेदात पडले ते ज्ञान अगोदर सांगतो. दृष्टि शुद्ध असली की वाटेल तो पदार्थ शुद्धच दिसतो. त्याप्रमाणे ज्ञान शुद्ध असले की त्यामुळे सर्वच शुद्ध प्राप्त होते. मोक्षरूपी गुणांचा ठेवा श्रीकृष्ण म्हणाले, "अर्जुना, ज्याच्या उदयामध्ये ज्ञेय बुडून जाते आणि ज्ञाता हारपतो त्याला चोख असे सात्त्विक ज्ञान म्हणावयाचे."

स्वतः विवेकानंद हकीकत सांगत असत. ते म्हणत, "दक्षिणेश्वराला जाण्यास त्या दिवशी मी पायीच निघालो. मागे एकदा गेलो होतो पण तो गाडीतून. त्यामुळे दक्षिणेश्वर इतके दूर असेल अशी माझी मुळीच कल्पना नव्हती. किती चालून गेलो तरी वाटच संपेना. शेवटी तेथे एकदाचा जाऊन पोहोचलो व तडक श्रीरामकृष्णांच्या खोलीत गेलो. ते आपल्या पलंगडीवर एकटेच विचारमग्न होऊन बसलेले होते. जवळपास कोणीही नव्हते. मला पहाताच मोठ्या आनंदाने त्यांनी मला जवळ बोलावले व आपल्या पलंगडीवरच एका बाजूला बसविले. थोड्याच वेळात मला दिसून आले की त्यांना भावावेश प्राप्त झाला असून तोंडाने अस्पष्ट स्वराने काहीतरी पुटपुटत माझ्याकडे टक लावून पहात हळूहळू माझ्याच बाजूला सरकत येत आहेत. त्याबरोबर मला वाटले की आता पुन्हा त्या दिवशीसारखा काहीतरी प्रकार होणार. हे मनात येते न येते इतक्यात मजजवळ येऊन त्यांनी आपला उजवा पाय माझ्या अंगावर ठेवला. त्याबरोबर काय चमत्कार सांगावा? असे दिसू लागले ती खोली तिच्यातील सर्व वस्तू मोठ्या वेगाने फिरावयास लागून कोठे तरी अंतर्धान पावत आहेत व सारे विश्व व त्याबरोबर माझा अहंकारही एका सर्वग्रासी महाशून्यामध्ये विलीन होण्यासाठी मोठ्या झपाट्याने चालला आहे. हा प्रकार पाहून माझी पाचावर धारण बसली. असे वाटले की 'मी पणाचा नाश म्हणजेच तर मरण! मग मरणाला आता काय बाकी राहिली आहे?' त्यासरशी धीर सुटून मी एकदम ओरडलो, "अहो तुम्ही मला काय करीत अहा? मला आईवडील आहेत अजून!"

हे एकून ते खदखदा हसू लागले व हातांनी माझे वक्षस्थळ चोळीत चोळीत म्हणू लागले, "तर मग आता राहू दे. एकदमच व्हायला नको. हळूहळू होईल." आणि आश्चर्याची गोष्ट ही की, त्या त्यांच्या स्पर्शाने तो सारा अद्भुत देखावा नाहीसा झाला व मी पहिल्यासारखा देहभानावर आलो."

आणखी एका अशाच भेटीची हकीकत स्वतः विवेकानंदांना स्मरत नसली तरी श्रीरामकृष्णांकडून चरित्रलेखकास कळली. "बरीच गर्दी असल्याने श्रीरामकृष्ण विवेकानंदांना यदुमल्लिकाच्या बागेत घेऊन गेले. बगीच्यात फिरून श्रीरामकृष्ण व नरेंद्र बंगल्याच्या दिवाणखाण्यात गेले. अत्यंत सावधगिरीने राहूनही

रामकृष्णांनी स्पर्श केल्याबरोबर नरेंद्राची समाधी लागली. त्यावेळचे अनुभव नरेंद्राला स्मरत नसावेत. श्रीरामकृष्ण म्हणत, "बाह्य संज्ञेचा लोप झाल्यावर त्या दिवशी मी त्याला कित्येक गोष्टी विचारल्या. "तू कोण, कोठून आलास, कशासाठी जन्म घेतला आहेस, इथे पृथ्वीवर किती दिवस रहाणार आहेस" वगैरे आणि त्यानेही अंतर्मुख होऊन त्या प्रश्नांची उत्तरे दिली. त्याच्यासंबंधाने मी जे पाहिले होते त्याचा त्याच्या उत्तराशी पडताळा जमला. त्या साऱ्या गोष्टी सांगायला निषेध आहे. त्याच्या सांगण्यावरून एवढी गोष्ट मात्र मला कळून आली की ज्या दिवशी आपण कोण याचे त्याला स्मरण होईल त्या दिवशी तो इहलोकी रहाणार नाही. योगमार्गाने तात्काल शरिराचा त्याग करील. नरेंद्र ध्यानसिद्ध महापुरुष आहे."

एखादे दिवशी श्रीरामकृष्ण म्हणत, "नरेंद्रासारखा पुरुष ह्या युगात पृथ्वीवर आजपर्यंत कधीही झाला नाही. जगत्पालक नारायणाने नर व नारायण या दोन ऋषींच्या रूपाने जगताच्या कल्याणासाठी तपश्चर्या केली. त्यापैकी एका ऋषीचा नरेंद्र अवतार आहे."

अशा प्रकारच्या सात्त्विक ज्ञानाच्या गोष्टी भगवंत सांगत आहेत. सूर्याला अंधार कधी दिसतच नाही. नदी समुद्रात लीन झाल्यावरही समुद्राला त्याची खबर नसते. कितीही मिठी मारावयास गेले तरी आपली छाया आपल्याला धरता येत नाही. त्याप्रमाणे ह्या ज्ञानाला शिवापासून तृणापर्यंत ही भूते वेगवेगळी दिसत नाहीत. हाताने चित्र पहावे, पाण्याने मीठ धुवावे किंवा स्वप्नातून जागे व्हावे त्याप्रमाणे या ज्ञानाने विषय पाहणे आहे. तेथे जाणता आणि जाणणे उरतच नाही. बुद्धिमान माणसांना दागिन्याच्या स्वरूपात असतानाच दागिन्यातल्या सोन्याचा प्रत्यय येतो. दागिने आधी आटवावे आणि मग त्यांतील सोन्याचा अनुभव घ्यावा असे करावे लागत नाही. लाटा म्हणजेच पाणी हे ठरविताना फडक्यावर लाटा गाळून मग काही लाटा वेगळ्या नव्हेत, हे पाणीच आहे असे ठरवावे लागत नाही. लाटा, लाटा ह्या स्वरूपातही, पाणीच आहेत हे त्यांना कळते त्याप्रमाणे ह्या ज्ञानाच्या हाताला दृश्याची वार्ताच लागत नाही. आरशात कौतुकाने पहावे तर पहाणाराचेच रूप पुढे उभे रहावे त्याप्रमाणे ज्ञानाच्या द्वारा ज्ञाता पाहू लागला की ज्ञेय दूर करून ज्ञाताच त्या जागी असल्याचे अनुभवास येते. ह्या ज्ञानाला सात्त्विक ज्ञान असे म्हणतात. हे एकटेच काय ते मोक्षाचे साधन आहे, हे सात्विक ज्ञान मोक्षलक्ष्मीचे मंदिर आहे.

पार्था, आता राजसज्ञानाचे लक्षण सांगतो जे भेदाची कास धरून चालते. अर्जुना, त्याला राजस ज्ञान म्हणावयाचे. भूते वेगवेगळ्या प्रकारची आहेत म्हणून ते ज्ञानही स्वतःचे वेगवेगळे तुकडे करते आणि मग ज्ञात्याला भ्रमात घालते. जागृतीतील स्वरूपाचा विसर पाडून झोप स्वप्नाचे ओझे झोपणाऱ्याच्या डोक्यावर ठेवते. त्याप्रमाणे आत्मज्ञानाच्या आवाराबाहेर, असार संसाराच्या मोकळ्या माळावर हे ज्ञान जागृति स्वप्न, सुषुप्ति या अवस्थांचे खेळ जीवाला दाखवते. लहान मुलाला दागिन्यात लपलेले सोने दिसत नाही, हा गोफ, ही अंगठी एवढेच वाटते. त्याप्रमाणे नाम, रूप यामुळेच हे विश्व आस्तित्वात आहे असे तो राजस ज्ञानी समजतो. त्याला ब्रह्माची ओळख नाहीच पण विश्वात्मक ब्रह्माचे अद्वैतही कळत नाही. वरच्या आकारालाच तो भुलतो आणि वरचा आकार हेच वस्तूचे रूप असे मानू लागतो. माती गाडग्याचे रूप घेऊन अवतरली की तो फक्त गाडगे ओळखतो आणि माती विसरतो. दिवा मानतो, अग्नि जाणत नाही. वस्त्र मान्य करतो पण तंतूला ओळखत नाही. चित्र पहातो पण आधारभूत असलेला पट त्याला दिसत नाही, असा मूर्खपणाचा व्यवहार त्याच्या हातून होत असतो. विश्वातले अनेकत्व पाहून त्यात ओतप्रोत भरलेले एकच एक ब्रह्मतत्त्व विसरून जातो.

अनुक्रमणिका

सगळ्यात अडचण अशी की अशा तऱ्हेने भेद बुद्धितून जगाकडे, आपल्याकडे पहाण्यात आपण काही चूक करतो आहो असे त्याला कधीच वाटत नाही. अभेदापर्यंत दृष्टि पोचण्यास लागणारे सामर्थ्य हे राजस ज्ञान त्या ज्ञात्याला देऊच शकत नाही. विश्वात असे काही एक ऐक्य असेल व ते आपण समजून घ्यावे असे त्याला कधीही वाटत नाही. अनेक लाकडांत अग्नि पेटला की अग्निच अनेक झाले, पुष्कळ फुले असली की सुवासाचेही फुलांगणिक तुकडे पडले किंवा पाण्यात पडलेले चंद्राचे प्रतिबिंब लाटांनी विस्कळित झाले की चंद्रच विसकटला असे म्हटल्यासारखे हे राजस ज्ञान पदार्थांचे विविध रंग, रूप, आकार पाहून जगच वेगवेगळ्या प्रकारचे आहे असे शिकविते.

मांगाचे घर टाळावे म्हणून ते माहित असावे म्हाणूनच पार्था, तुला आता तामस ज्ञानाचे लक्षण सांगतो. एरवी ते ज्ञान नुसते ऐकण्यासारखेसुद्धा नाही. अर्जुना, ह्या ज्ञानाचा प्रकार असा की ते ज्ञान विधिरूपी वस्त्राने रहित असते म्हणून श्रुती त्याच्याकडे पाठ करून उभी राहते. श्रुतीच्या वचनाखाली शास्त्रांनी तांमस ज्ञान निंद्य आहे असे म्हणून म्लेंच्छ धर्माच्या डोंगरात हद्दपार केले आहे. ते त्या ज्ञानाचा विटाळ आपल्याला होऊ देत नाहीत इतका दोष शास्त्रांनी त्या तामस ज्ञानाला ठेवला आहे.

अर्जुना, ते ज्ञान तमोगुणरूपी पिशाच्चाने पछाडलेले असते आणि त्यामुळे वेडे होऊन ते भ्रमण करीत रहाते. ते तामस ज्ञान विषयभोगाच्या बाबतीत नात्याची आडकाठी मानत नाही, कुठलाही निषेध खाण्याच्या बाबतीत समजत नाही. एखाद्या ओसाड गावात सोडलेल्या कुत्र्याप्रमाणे त्याच्या तोंडातून कुठलाच पदार्थ सुटत नाही. त्याच्या तोंडापर्यंत जे येत नाही आणि जे खाल्याने तोंड भाजते तेवढेच काय ते वर्ज्य. एरवी कुठलाही पदार्थ वर्ज्य, निषिद्ध नाही. खाटकाच्या दुकानात टांगलेले मांस चोरताना उंदीर बरेवाईट पहात नाही. मांसाहारी मनुष्य जनावर काळे की गोरे पहात नाही. रानामध्ये भडकलेला वणवा हे झाड जाळावे, ते सोडावे असा विचार करीत नाही किंवा माशी कुठे बसावे, कुठे न बसावे असा विचार करीत नाही. कावळा मिळेल ते अन्न खात असतो त्याप्रमाणे निषिद्ध सोडावे आणि विहिताचा आदराने सत्कार करावा हे विषयाने अंध झाल्याने तामस ज्ञान जाणतच नाही. जितके समोर येईल तेवढे भोगायचे आणि स्त्री व पोट याकडे ते वाटायचे येवढेच ते ज्ञान जाणते. पाण्याने तहाण भागली की झाले मग ते पाणी पवित्र आहे की अपवित्र आहे याचा विचार करण्याचे कारण नाही असे ते ज्ञान मानते. खाद्य, अखाद्य, निंद्य, अनिंद्य असा काही एक विचार न करता तोंडाला जे आवडेल ते पवित्रच आहे असे हे ज्ञान सांगते. स्त्री-जातीकडे स्पर्श सुखातून पहाते एरवी दुसरा काही विचार करण्याचे कारण त्याला वाटत नाही. आपल्या कामात जो उपयोगी पडेल, मदत करील तो नातलग. बाकी इतर नात्यांशी तामस ज्ञानाचा संबंध नसतो. विश्व म्हणजे सगळे भोग्य विषय आणि देहभरण हे फळ असे ते ज्ञान मानते. आकाशातून पडलेल्या पाण्याला थारा एक समुद्रच त्याप्रमाणे कर्ममात्र केवळ पोटासाठीच आहे, असा त्या तामसी ज्ञात्याचा निश्चय असतो. स्वर्ग, नरक आहेत, विहित कर्म केले की स्वर्गप्राप्ति होते, निषिद्ध कर्म केले की नरक मिळतो याबद्दल तामस ज्ञान अंधारात असते. साडेतीन हाताचा देह हा आत्मा आणि पाषाणाची मूर्ती हा देव ह्या पलीकडे त्या तामस ज्ञानाची मजल जात नाही.

"शरीर पडले की कर्मासह आत्म्याचा ठावठिकाणा नाहीसा होतो मग कोणत्या वेषाने कर्माचे फळ भोगायचे? आत्मा नाही, कर्म नाही, शरीर नाही मग भोगायला उरतेच कोण" असे त्याचे म्हणणे असते. कुणी

म्हटलेच की, "ईश्वर आहे तो आपल्या कर्माची फळे भोगायला लावतो," तर तो धातूचे देव विकूनच टाकतो आणि ते पैसे प्रपंचात खर्च करतो. गावातील दगडाचे देव जर सृष्टिचे नियामक आहेत तर त्यांच्यापेक्षा लक्षपटीने मोठे असलेले डोंगर का गप्प बसले आहेत असा त्याचा प्रश्न असतो.

बरे, कधी नाइलाजाने देव मानलाच तर तो दगडाचा देव मानतो आणि देहाला आत्मा म्हणतो. पापपुण्य हे सगळे खोटेच आहे, ह्या सगळ्या नुसत्या भ्रामक कल्पना आहेत असे त्याचे मत असते. अग्नि जसा सर्वभक्षक आहे त्याप्रमाणे सर्व विषयांचे सुख भोगत जावे असे तो मानतो. स्थूल दृष्टिला दिसेल ते व तेवढेच आणि इंद्रियांना जे गोड वाटेल ते व तेवढेच खरे अशी त्याची पक्की खात्री असते. आकाशात धुराची वेल उगीचच वाढते तसा त्याचा अनुभव फुकट वाढत जातो. भेंडाचे झाड वाळलेले असले किंवा ओले असले तरी निरुपयोगीच तसा तो तामस ज्ञानी वाढतो आणि फुकट मोडतो. हे ज्ञान अर्जुना, निरर्थक आणि स्वैर असते. उसाची कणसे, नपुंसक माणसे, काटे निवडुंगाचे वन, बाळाचे मन, चोराघरचे धन किंवा शेळीचे गलस्तन तसे हे ज्ञान आहे. अशा ह्या निरर्थक ज्ञानाला मी तामस ज्ञान म्हणतो. जात्यंध माणसाचे डोळे मोठाले असावे त्याप्रमाणे ह्या तामस ज्ञानाला ज्ञान म्हणावयाचे. बधिराचे बाहेरचे कान सुबक असावे किंवा अपेयाला पान म्हणावे तसे ह्या तामस ज्ञानाला ज्ञान हे आडनाव आहे एवढेच. ते राहू दे. त्याबद्दल जास्त काय सांगावे. असे ज्ञान तुला दिसले तर ते ज्ञान नव्हे तर स्वच्छ तमोगुण आहे असे समज.

मनात येते की, देव स्वगत म्हणाले असतील की, "पार्था, तमोगुणाचा चित्रपट तर तुझ्यापुढे बाळपणापासूनच उलगडतो आहे. तामस ज्ञानाची जी जी लक्षणे मी तुला सांगितली ती एकवटून मूर्त स्वरूपात जरा समोर नजर टाकलीस की, तुला त्या सुवर्णरथात बसलेली दिसतील.कुरु वंशात ज्येष्ठ पुत्र म्हणून जन्मास आलेला हा दुर्योधन बघ म्हणजे तामस ज्ञानाचा मूर्तिमंत पुतळा तुला पहायला मिळेल. तुला ठाऊक आहे ना की त्याच्या जन्माच्या वेळी इतकी अशुभ चिन्हे झाली की गांधारीसहित सर्वांनी कुलक्षय टाळण्यासाठी ह्या एका पुत्राचा त्याग करण्याचा धृतराष्ट्रास सल्ला दिला? पुत्रप्रेमाने पुन्हा एकदा अंध झालेल्या त्या राजाने तो उपदेश मानला नाही आणि हा अनर्थ ओढवून घेतला. दुर्योधनाची बुद्धि कमी होती, शौर्य कमी होते किंवा योजक बुद्धि कमी होती असे नाही उलट ह्या सर्व गुणांमुळे त्याच्या तामस ज्ञानाला वेगळीच धार आली आणि भीमास विषप्रयोग करण्यापासून त्याने आपल्या कपट मंदिराचा पाया घातला. लाक्षागृह दाहादि दुष्कृत्ये कमी पडली म्हणूनच की काय शेवटी कपटद्यूताने धर्मास हरवून प्रत्यक्ष पांचालीस भर सभेत आणून त्याने त्या मंदिरावर कळस चढविला. देव नाही, धर्म नाही, वयोवृद्ध नाहीत, शास्त्र नाही, गुरू नाही कशाचाही अधिकार त्याने मानला नाही. काय याच्याबद्दल बोलावे?"

देवांनी प्रकट एक सुस्कारा सोडला आणि म्हणाले, "अर्जुना तू श्रोत्यांचा शिरोमणि आहेस. तुला मी आताच ज्ञानाचे तीन प्रकार त्यांच्या लक्षणासहित सांगितले आहेत.

आता पुढचा प्रकार ऐक. त्या ज्ञानाच्या प्रकाशातच कर्त्याच्या क्रिया होत असतात. जसे ज्ञान तशा प्रकारच्या क्रिया होतात. कर्म जेव्हा ह्या ज्ञानाला अनुसरते तेव्हा एकच पाणी निरनिराळ्या ओघांत पडले की निरनिराळे घडते त्याप्रमाणे कर्मच, पण तीन प्रकारांनी घडते.

अनुक्रमणिका

त्यापैकी सात्त्विक कर्माचा प्रकार प्रथम तुला सांगतो. अर्जुना, ह्या सात्त्विकाबद्दल बोलताना इतका आनंद वाटतो रे, नुसते त्याचे वर्णन करणे देखील सुखाचे आहे. आता एकच आहे की, कर्माचे वर्णन करताना त्या कर्त्याचेच वर्णन करावे लागते. कोणत्या वृत्तितून ह्या कर्माचे आचरण होते ते सांगतो. पतिव्रतेच्या आलिंगनाने जसे पतीस सुख होते त्याप्रमाणे वर्णाश्रमाच्या धर्माने वाट्यास आलेले कर्म आनंदाने घडत असले की ते सात्त्विक कर्म म्हणावे. सावळ्या अंगाला चंदन भूषणासारखे शोभावे, तरुण स्त्रीच्या सुंदर डोळ्यामध्ये काजळ उठून दिसावे त्याप्रमाणे ते कर्म कर्त्याला भूषणास्पद होते. नित्य कर्म अशा प्रकारे आदराने आणि बिनचूक चालते आणि सोन्याला सुगंधाची जोड मिळावी त्याप्रमाणे कधी कधी नैमित्तिक कर्माची वेळ येते. शरीर आणि प्राण यांची सर्व शक्ति पणाला लावून आई अशी बाळाची जोपासना करते त्याप्रमाणे तो पुरुष त्या निष्काम मातेप्रमाणे ते नैमित्तिक कर्मही संतोषाने पुरे करतो. याप्रमाणे नित्य आणि नैमित्तिक कर्माचे अनुष्ठान करीत असताना तो मनाने त्या कर्मफळावर पाणी सोडत 'ॐ तत्सत् ब्रह्मार्पणमस्तु' असे म्हणत असतो. ह्या सगळ्या कर्माचे अनुष्ठान साक्षेपाने करण्याचा हेतू ब्रह्मवस्तूची प्राप्ती व्हावी हा असतो. केव्हा केव्हा त्याच्या आयुष्यात असाही प्रसंग येतो की सत्पुरुषाशी आत्मचर्चा करण्याच्या आनंदात त्याचे नित्यनैमित्तिक कर्म करावयाचे राहून जाते. आपल्या आवडत्या पाहुण्यासाठी घरातली अन्नसामुग्री संपली म्हणून जसे गृहस्थाश्रमी पुरुषास दुःख होत नाही, त्याप्रमाणे त्याला आत्मचर्चेमध्ये नित्यकर्म अंतरले तरी खेद वाटत नाही. अर्थात इतर वाटेल त्या कारणासाठी तो नित्यकर्म करावयाचे टाकतो असे मात्र नाही. तो फक्त सारासार विचार करून कर्माचे महत्त्व ठरवितो एवढेच ध्यानात घे.

मुळातच तो सात्त्विक कर्ता आत्मज्ञानावर नजर ठेवूनच जगत असल्याने धनंजया, कर्म घडले तरी त्याचा आनंद नाही व न घडले तरी खेद नाही अशा हातोटीने कर्म करीत असतो. अशा ह्या वृत्तीतून जे कर्म तयार होते त्याला मी सात्त्विक कर्म म्हणतो.

एक मजेची गोष्ट आहे. एक साधू सकाळी नदीकिनाऱ्यावर गेला आणि धोब्याच्या दगडावर उभा राहून ध्यान करू लागला. इतक्यात धोबी गाढवावर कपडे लादून धुण्यासाठी नदी किनाऱ्यावर आला. गाढवावरून कपड्याचा गठ्ठा खाली उतरून ठेवून धोबी साधूचे ध्यान संपण्याची वाट पाहू लागला. पुष्कळ वेळ झाला साधूचे ध्यान संपेना. धोबी कंटाळून म्हणाला, "साधूमहाराज, आपण जरा त्या दगडावरून खाली उतरून नदीच्या किनाऱ्यावर उभे राहून ध्यान केलेत तर बरे होईल. मी आपल्या कामाला लागीन मला उशीर होतो आहे." साधूने धोब्याच्या म्हणण्याकडे लक्ष न देता ध्यान चालूच ठेवले. धोब्याने पुन्हा विनंती केली तरी साधू ऐकेना. मग मात्र धोबी चिडला. त्याने साधूचा हात पकडला आणि त्याला खाली उतरून घेण्याचा प्रयत्न केला. मग साधूने रागाने बोलायला सुरवात केली. साधूचा क्रोध पाहून धोब्याची उरलीसुरली श्रद्धा संपली. त्याने साधूला उचलले आणि किनाऱ्यावर आणून ठेवले आणि आपल्या कामाला सुरवात केली. धोबी चांगलाच बलदंड होता. साधूचे काही चालेना तेव्हा त्याने देवाची प्रार्थना सुरू केली, "आराध्य देवते, मी इतके दिवस तुझी मनापासून पूजाअर्चा केली, ध्यान केले आता ह्या धोब्याच्या तावडीतून तू माझी सुटका का करत नाहीस?"

साधूला आकाशवाणी ऐकू आली, "तुझे म्हणणे बरोबर आहे. मला सुटका करण्याची इच्छा पण आहे. पण मला समजेनासे झाले आहे की तुमच्यामधला साधू कोण आणि धोबी कोण आहे? ते नीट कळले की सुटका करू या".

अशी ही कर्माची स्थिती आहे. देव म्हणत आहेत की सात्त्विक कर्माच्या खुणा तू नीट ध्यानात ठेव. त्या गोष्टीतल्या साधूलाही मनातला अहंकार काढून टाकून धोब्याची क्षमा मागावी लागली आणि ध्यानाबरोबरच आपले सर्वच कर्म, दया, क्षमा, शांती यांनी भरून टाकावे लागले.

देव पुढे म्हणाले, "सात्त्विक कर्मानंतर आता राजस कर्म वर्णन करणे भाग आहे. ह्या राजस कर्मामध्ये कर्माचा क्रमच प्रथमतः विपरीत असतो. मघाशी सांगितले त्याप्रमाणेच आताही कर्माचे वर्णन करताना कर्त्याचेच वर्णन करणे भाग आहे. हा राजस कर्ता नित्य नैमित्तिक कर्मे करतो. सात्त्विक कर्ता जसा आत्मचर्चेसाठी ही नित्य नैमित्तिक कर्मे सहज बाजूला ठेवतो तसे मात्र हा राजस कर्ता करू शकत नाही. एकदा नित्यकर्मास बसला की बसला. त्यात सारासार विचार करत नाही. मूर्ख मनुष्य घरी मातापितरांशी धड चार गोड शब्द बोलत नाही पण सगळ्या जगाचा आदरसत्कार मात्र करीत असतो. तुळशीच्या झाडावर दुरूनदेखील पाण्याचा शिंतोडा उडवायचा नाही पण द्राक्षाच्या वेलाच्या बुडाशी दूध ओतावयाचे अशी त्याची फळावर दृष्टि खिळलेली असते. त्याप्रमाणे हा राजस कर्ता काम्यकर्मासाठी शरिराचा होम करायलासुद्धा मागे पुढे पहात नाही. इतके मोठे फळ हवे तर देहत्यागसुद्धा कमीच आहे असे मनात घट्ट धरतो. दीडपटीने व्याज मिळते तर सावकार वाटेल तेवढे कर्ज देतो, उद्या हाती अपरंपार पीक येईल म्हणून शेतकरी वाटेल तेवढा पेरा करतो, एकदा परिस हाती आला की किमयेच्या मागे लागलेला साधक आपली सगळी संपत्ती लोखंड खरेदी करण्यात खुशाल खर्च करतो त्याप्रमाणे पुढे अमुक फळ मिळणार असे कळले की तो राजस कर्ता दीडपट काम्य कर्मे करतो आणि इतकी कर्मे करूनही त्याचे समाधान होत नाही. मी अमुक इतकी व्रते, दाने, यज्ञ केले याची तो दवंडी पिटण्यास सुरवात करतो. आता अहंकाराने अशी ही दवंडी पिटली की केलेल्या कर्माचे महत्त्व संपून जाते. ज्याला काळज्वर भरलेला आहे असा रोगी औषधाला मान देत नाही. त्याप्रमाणे ह्या कर्मामुळे अहंकार मात्र उतू जातो आणि तो कर्ता मग पिता, गुरूजन यांना तिळमात्र मान देत नाही. फळ मिळविण्याच्या इच्छेने त्याला इतके भारून टाकले जाते की एवढ्याशा लाभासाठी तो वाटेल तेवढे कष्ट उपसतो. कोल्हाटी जसा जिवावर उदार होऊन कसरत करीत पोट भरतो किंवा एका कणासाठी उंदीर डोंगर उपसतो. किंवा शेवाळासाठी बेडूक समुद्र ढवळून काढतो किंवा भीक मिळविण्यासाठी अजगराची टोपली गारुडी डोक्यावर वाहतो तशी ह्या राजसकर्त्याची अवस्था असते. काय करावे? एखाद्याला कष्टच गोड वाटतात. परमाणूच्या लाभासाठी पाताळ ओलांडून जाण्याची वाळवीची तयारी असते त्याप्रमाणे तो स्वर्गसुखाच्या लोभाने वाटेल तेवढे शरीरकष्ट सोसतो, पैसा खर्च करतो, सक्लेश अशा तऱ्हेचे हे कर्म राजसकर्म म्हणून ओळखले जाते.

फळावर दृष्टि ठेवल्यामुळे हा सगळा फरक पडतो. बाकी सात्त्विक व राजसकर्ता, कर्म उत्तमच करतात एका फलाशेचा त्याग करूनच कर्मारंभ करीत असल्याने कर्मबंधनातून सुटतो आणि दुसरा सतत फलाशासमोर ठेवूनच कर्म करीत असल्यामुळे कर्म फळाच्या आस्वादासाठी जन्ममरणाच्या फेऱ्या घालत राहतो.

पण हा अनर्थ पत्करला इतका अनर्थ तामस वर्तनामुळे घडत असतो. मुळात तामस ज्ञान हेच निंदेचे दोषास्पद घर आहे. या तमास कर्मामुळे निषिद्ध कर्माचा जन्म सफल होतो. पाण्यावर रेघ काढली तर ती जशी दिसतच नाही त्याप्रमाणे हे कर्म कितीही घडले तरी त्याचे चांगले फल दिसतच नाही. कांजी कितीही घुसळली तरी लोणी कुठून निघणार? कोळसे फुंकले तरी विस्तव कसा पेटणार? वाळू गाळून तेल कसे पडणार? समजा

भूस वाऱ्यावर धरले, आकाशाला बाण मारला, वाऱ्याला पाश मांडला तर हातात काय पडणार? ह्या सर्व क्रिया वांझ म्हणून फुकट जातात. करून त्याचा उपयोग नाही. नरहेदाएवढे धन नासून जाते आणि त्याबरोबरच जगाचे सुखही नाहीसे होते. कमळवनावरून फास ओढला तर कमळाचा नाश होतोच पण फासही फुकट झिजतो. दिव्यावर झडप घालणारा पतंग स्वतःच्या जिवाला मुकतोच पण जगाचे डोळेही दुखवतो. त्याप्रमाणे सर्वस्व वाया जावो, देहावर घाव पडोत पण समोरच्या माणसाला अपाय करावा हीच त्या तामस कर्त्याची धडपड असते. अपाय किती प्रखर असावा हे त्याने मनाशी ठरविलेले असते परंतु तो अपाय करण्याचे सामर्थ्य आपल्याजवळ आहे की नाही हे तो पहात नाही. आपल्या शक्तिबाहेर अविवेकाने तो चालत असतो. आपण इतका मोठा खटाटोप केल्यावर काय प्राप्ती होईल याचाही तो विवेक करीत नाही. स्वतःची हानी झाली तरी चालेल पण दुसऱ्याची झालीच पाहिजे असे त्याचे धोरण असते. 'मी हे कर्म करणारच' असा अभिमान त्याच्या ठिकाणी असतो आणि अविचाराने कर्म करणे चालू असते. आश्रय जाळून अग्नि फैलावतो, मर्यादा सोडून समुद्र उचंबळतो आणि मग अग्नि आणि समुद्र कमी-जास्त, मागे-पुढे, मार्ग-अमार्ग ह्याचा विचार न करता चालत रहातात. कृत्याकृत्य सरकटत, आपपर भेद न ठेवत योग्य आणि अयोग्य याचा विवेक न करत जे कर्म चाललेले असते त्याला तामस कर्म म्हटले जाते.

अर्जुना सात्त्विक, राजस आणि तामस ह्या कर्मातील भेद त्याच्या उपपत्तीसह तुला सांगितला."

मालूताई, कर्माबद्दल विचार केला तर ध्यानात येते की एकदा अमुक प्रकारचे कर्म करावे असा मनाचा निश्चय झाला की ते कर्म सरावाने उत्तम घडू लागते. आपल्याला माहित असेल की १९६०-६२ मध्ये इथे हातमाग घातले होते. विणकर कसबी होते आणि लुगडी उत्तमच निघावी असा आमचा आग्रह असल्यामुळे मागच्या इमारतीत माझा बराच वेळ जावयाचा. त्यावेळी एका विणकराने गोष्ट सांगितली. तो म्हणाला. "बाप मागावर विणायला बसला की मुलगी कांड्या भरायला बसायची." लुगड्याला नक्षीचे काठ होते. मुलगी रंगीत कांड्या भरत होती. तिकडे सहज बापाचे लक्ष गेले. तो म्हणाला, "अग तुझ लक्ष आहे कुठं? सुताला बारिक गाठ आहे बघ." मुलगी म्हणाली, "बाबा मी ती पाहिली आहे. पण तुम्ही खुशाल धोटा मारा ती गाठ राघूच्या डोळ्यात जाईल बरोबर" आणि खरेच काठातल्या पोपटाच्या डोळ्यात ती गाठ बरोबर जाऊन बसली. नुसत्या कांड्या भरताना, ताणा बाणा पहात पहात, त्या मुलीने धाग्याचा इतका अचूक अंदाज बांधला होता. कर्म करता करता ते असे सुलभ व उत्तम होत जाते. पुन्हा एकदा श्रीरामकृष्णांच्या चरित्रात डोकावले तर त्यांचे चरित्र लेखक सांगत आहेत, "एक दिवस ते शंभुचंद्राकडे गेले असता त्यांचे पोट दुखू लागले. शंभुचंद्र त्यांना म्हणाले, "आपल्याला मी एक दोन अफूच्या गोळ्या देईन. परत गेल्यावर त्या खा म्हणजे पोट दुखणे राहील." श्रीरामकृष्णांनी ती गोष्ट मान्य केली. पुढे बराच वेळपर्यंत दोघांच्या गप्पागोष्टी झाल्या व बोलण्याच्या नादात दोघेही ही गोष्ट विसरून गेले.

श्रीरामकृष्ण परत जावयास निघाले व दहा-वीस पावले गेल्यावर त्यांना गोळ्यांची आठवण झाली. त्याबरोबर ते परत फिरले. पण परत येऊन पहातात तर शंभुचंद्र तेथून गेले होते. तेव्हा एवढ्यासाठी त्यांना कशाला हाक मारावी असा विचार करून कंम्पाउंडरजवळून अफूच्या दोन गोळ्या घेऊन ते परत फिरले. पण वाटेला लागल्याबरोबर काय झाले कुणास ठाऊक त्यांना नीट चालवेना. पाय रस्त्याने सरळ न जाता नाल्याच्या बाजूला ओढ घेऊ लागले. असे का होते, वाट तर चुकली नाही ना, असा संशय घेऊन मागे वळून

पहातात तो मागील रस्ता नीट दिसत होता. न जाणो खरोखरच रस्ता चुकला असेल असे वाटून ते शंभुचंद्राच्या फाटकापर्यंत परत गेले व तेथून आपला रस्ता पुन्हा एकवार नीट पाहून घेऊन परत जाऊ लागले तरीही तेच. असे दोन तीन वेळा झाल्यावर ते निराश होऊन रस्त्यात बसले तो एकाएकी त्यांच्या मनात आले, “अरे हो, शंभू तर म्हणाला की, माझ्याजवळून गोळ्या घेऊन जा.” तसे न करता, त्याला न कळवता मी त्यांच्या कंम्पाउंडरकडून गोळ्या घेऊन चाललो आहे! म्हणूनच आई मला येथून जाऊ देत नसावी. शंभूला विचारल्याशिवाय गोळ्या देणे कंम्पाउंडरला योग्य नाही व माझ्याजवळून घेऊन जा म्हणून त्याने सांगितले असता दुसऱ्याजवळून घेऊन जाणे मलाही योग्य नाही. तर अशारीतीने गोळ्या नेण्यात असत्य भाषण आणि चोरी हे दोन्ही दोष आहेत. म्हणून आई मला येथून जाऊ न देता इथेच अडकवून ठेवीत असावी” असे मनात येताच ते तात्काळ दवाखान्यात गेले तो कंम्पाउंडरही तेथे नव्हता. तेव्हा त्यांनी दारातूनच ती गोळ्याची पुडी आत टाकून “ह्या तुमच्या गोळ्या टाकल्या हो.” असे म्हणून मोठ्याने ओरडून आपला रस्ता धरला. आता या वेळेस पाय ठीक चालत होते व रस्ताही नीट दिसत होता. लवकरच ते आपल्या खोलीत जाऊन पोहोचले. ते नेहमी म्हणत असत ज्याने आपला भार सर्वस्वी आईवर टाकला त्याचा पाय ती इतकासुद्धा बेताल पडू देत नाही.”

तेव्हा साधकाने प्रथम सात्त्विक कर्मच हातून व्हावे अशी देवांची विनवणी करावी आणि दक्षतेने आपल्याच कर्माकडे त्रयस्थ म्हणून पहात आपणच तयार करून ठेवलेल्या कसोटीपट्टीकडे पहात मूल्यमापन करावे. गुरूदेवांनी बदली होऊन परगावी चाललेल्या एका साधकाला असेच म्हटले होते की, “परमार्थ संभाळा, माझा परमार्थ संभाळा अशी देवालाच प्रार्थना करावी.” राजस, तामस कर्माचा तर विटाळ होऊ देऊच नको, असे देव सांगतच आहेत. तेव्हा आपण कर्माबद्दल किती जागरूक हवे ते इथे कळते आहे.

देव पुढे म्हणाले, “चारी आश्रमांत एकच पुरुष वेगवेगळा भासतो. त्याप्रमाणे कर्मभेदाप्रमाणे कर्त्यामध्येही त्रिविधता आहे. आता त्या तिन्हींपैकी सात्त्विक कर्ता कसा असतो ते तुला सांगतो. तू लक्ष देऊन ऐक. बावन ह्या उत्तम चंदनाचे झाड आणि शाखा दोन्ही सरळसोट वाढतात. ह्या वाढीमध्ये फळाची आशा तर नसतेच. नागवेलीला फळे येतच नाहीत. तेव्हा नित्य क्रिया अशाप्रकारे फळाची आशा टाकून जो करतो तो सात्त्विक कर्ता समजावा. नित्यकर्म हे कर्त्याच्या मनातील रजोविकार आणि तमोविकार नाहीसे करून ते जास्तीत जास्त सात्त्विक करीत जाते व त्यामुळे ते स्वतःच फलरूप होते. त्यामुळे ते निष्कळ आहे, फलशून्य आहे असे म्हणून नये ते स्वभावतः फलच आहे. फळाला वेगळे फळ काय येणार?

स्वभावतःच फलद्रूप होणारी नित्यकर्मे अत्यंत आदराने आणि बिनचूक केली तरी कर्ता वर्षाकालीन मेघाप्रमाणे मुकाट्याने ती करतो. गर्जना वा गडबड करून मी ही नित्यकर्मे उत्तम करतो असे तो प्रसिद्ध करीत फिरत नाही. आपले कर्म त्या परमात्म्यांच्या प्रतिमेला अर्पण करण्याइतके सुंदर कसे होईल याची तो काळजी वाहतो. मग प्रथम त्या कर्माला जे शुद्ध स्थळ शास्त्राने सांगितले असेल ते तो शोधतो. ते कर्म करण्याची जी वेळ शास्त्राने सांगितली असेल ती तो चुकू देत नाही. कर्म कसे करावे याबद्दल शास्त्राचा निर्णय विचारतो आणि मग कर्माच्या पलीकडे मनाला जाऊ देत नाही. नियमांच्या साखळीत मनाला वागवतो. हा निग्रह करण्यासाठी चांगल्या सर्वोत्कृष्ट धैर्याची जागती चिंता तो वहातो आणि आत्मसुखाच्या आवडीने कर्मे करता करता देह सुखाची पर्वा करीत नाही. झोप जसजशी कमी होईल, भुकेची जसजशी आठवण होईनाशी होईल तसतशी

नित्यादिक कर्मे करीत तो अधिकाधिक उत्साह धरतो.

एका बगीच्यात काम करणारा एक मजूर होता. तो जातीचा काछी व वयाने वृद्ध म्हणून लोक त्याला काछीबाबा म्हणत. दिवसभर बागेत काम करावे आणि संध्याकाळी नदीकाठी मालतीकुंजामध्ये भाकरी करून खावी व तिथेच झोपाचे असा त्याचा नित्यक्रम होता. रात्री कुणीतरी नदीवर आल्यावेळी त्याने मालतीकुंजातून "राम राम" असा स्पष्ट ध्वनी ऐकला. त्याने डोकावून पाहिले तर काछीबाबा झोपले होते आणि श्वासाबरोबर राम राम ध्वनि येत होता.

एक दिवस काछीबाबा गावात गेले असता बगीच्याच्या मालकाने रुपयांची थैली भरून मजुरीचे पैसे बाबाला दिले. दुसरे दिवशी काछीबाबा थैली घेऊन दुकानात परत आले. थैली मालकासमोर ठेवली आणि नमस्कार करून म्हणाले, "मालक. हे आपल्याजवळच राहू दे. काल ह्या थैलीच्या काळजीने मला झोपही नाही आणि देवाचे नावही येईना तेव्हा मला हे नको".

सात्त्विक कर्ता इतक्या अनासक्तीने कर्म करीत असतो.

माउली म्हणतात, "सोने आगीत तापवले की त्यातील हीण जळून जाते वजन कमी होते पण कस वाढतो. त्याप्रमाणे नित्यकर्माने त्याला शीण होत असला तरी शुद्धि होत जाते. आगीत उडी टाकताना भीतीने सतीच्या अंगावर रोमांच आले आहेत असे कधी दिसते काय? आत्म्यावर त्याचे इतके प्रेम बसलेले असते की देह सोडताना त्याला काही खेद होत नाही. विषयाचा उल्हास जसजसा कमी होईल तसतसा देहाहंकार कमी होतो आणि कर्म करण्यामधला आनंद दुप्पट होतो. याप्रमाणे तो कर्म करतो पण एखादे वेळी जर कर्म करणे काही कारणाने थांबले तर तो संकोचितही होत नाही. एखादा गाडा कड्यावरून धडाधड कोसळून खाली आला तर त्या गाड्याला जसे काही संकट वाटत नाही त्याप्रमाणे कर्म थांबल्याचे त्याला दुःख वाटत नाही. बरे, आदराने आरंभिलेले कर्म, समजा, अव्यंगपणाने सिद्धीला गेले तरीही आपण विजय मिळविला असे तो समजत नाही. या प्रकारे मर्म जाणून जो कर्म करीत असतो तो सात्त्विक कर्ता आहे असे समज.

आता राजस कर्ता आहे तो जगातील सर्व अभिलाषांचे आश्रयस्थान आहे. गावातील सर्व केरकचरा उकिरड्यावर येतो त्याप्रमाणे जगातल्या सर्व अभिलाषांचे हे पाय धुण्याचे ठिकाण आहे. ज्या कर्मामध्ये कष्ट कमी पण फल जास्त असेल अशी कर्मे करण्यात ती बुडलेला असतो. आपण मिळवलेल्या पैशातून कवडीसुद्धा खर्च करायला तो तयार नसतो. त्या पैशावरून क्षणाक्षणाला तो जिवाची कुरवंडी करतो. एखादा बगळा माशावर टिपण धरून बसतो त्याप्रमाणे किंवा कृपण आपल्या ठेव्याला जपत असतो त्याप्रमाणे दुसऱ्याच्या मौल्यवान वस्तूवर तो लक्ष ठेवून असतो. बोरीच्या झाडाजवळ गेले तर ते गुंतविते आणखी जवळ गेले तर काट्यांनी अंग फाडते आणि त्याचे फळ काढून तोंडात घातले तर ते जिभेला चटका देते. त्याप्रमाणे शरिराने, मनाने, वाणीने तो वाटेल त्याला दुखवितो. आपल्या स्वार्थासाठी आपण दुसऱ्याचे अनहित करतो आहो, हे तो ध्यानात घेत नाही. कर्माचे आचरण करण्याचे बळ त्याच्या अंगी असतेच असे नव्हे पण कर्माबद्दल अरुचि मात्र कधीच त्याच्या मनात निर्माण होत नाही. धोतऱ्याच्या फळाच्या बिया विषारी आणि फळावर काटे असतात तसा शुचित्वाच्याबाबतीत तो दरिद्री असतो. त्याचे कर्म नेहमीच सकाम असल्याने कर्माचे फल हातात पडल्याबरोबर

तो आनंदाने वाकुल्या दाखवतो. आरंभलेले कर्म जर फलहीन झाले तर त्या निराशेने तो जिंकला जातो. कर्माचा लगेच धिक्कार करू लागतो. अशा प्रकाराने जो कर्म करतो त्याला राजस कर्ता म्हणून तू ओळख.

आता कुकर्माचे आगर असलेल्या तामस कर्त्याचेही वर्णन केले पाहिजे. अग्नि ज्याला स्पर्श करील त्याला तो जाळून काढतो पण आपण जाळतो आहो हे त्याला कळत नाही. दाहकता त्याचा स्वभावधर्मच आहे. शस्त्र आपल्या धारेने दुसऱ्याचा जीव घेते पण त्या शस्त्राला आपण मारक आहो याची खबर नसते. काळकूट प्राण घेते पण आपल्या कृत्याचा परिणाम त्याला ठाऊक नसतो. त्याप्रमाणे आपण ज्या वाईट क्रिया करतो त्यामुळे आपला आणि दुसऱ्याचा घात होतो आहे याची खबर त्या कर्त्याला नसते. क्रियेच्या परिणामाची तर तो काळजी करतच नाही पण क्रिया करत असतानाही ती क्रिया किती अपायकारक आहे याचा तो विचार करीत नाही. वावटळीचा वारा जसा सैरावैरा धावत वाटेल तो अनर्थ करीत जातो तशी त्याची क्रिया असते. तो तामस कर्ता पाहिला की पुरे, मग वेडा मनुष्य पहाण्याची जरूरी नाही. त्या कर्त्याचा आणि त्याच्या क्रियांचा काही मेळच असत नाही. बैलाला लागलेल्या गोचिडाप्रमाणे इंद्रियांना प्राप्त झालेल्या विषयांचे सेवन करून तो आपल्या आयुष्याची वाटचाल करतो. लहान मूल जसे क्षणात हसते, क्षणात रुसते, रडते तसा त्याच्या वृत्तिचा उच्छृंखलपणा असतो. तो तामस कर्ता प्रकृतिच्या आधीन राहून कृत्य आणि अकृत्य याचा विवेकही न करता वाटेल तशी कृत्ये करून उकिरडा माजावा तसा माजतो. मान्य पुरुषालाही मान द्यावा पण हा तामस कर्ता ईश्वरालादेखील मान देत नाही. मूढपणामध्ये डोंगर बरा असे म्हणण्याची वेळ येते. त्याचे मन कपटी, वागणूक पक्की चोरटी आणि दृष्टि वारांगनेप्रमाणे ओली असते. किंबहुना त्याचा देहच कपटाने घडविलेला असतो आणि त्याचे जीवन म्हणजे चव्हाट्यावरचे द्यूतगृहच असते. त्याचा तो अवतार म्हणजे लोभी भिल्लांचाच गाव आहे. म्हणून सांगतो धनंजया, तू या वाटेने जाऊ येऊ नकोस. अरे, त्याचे मन इतके मत्सरी असते की दुसऱ्याचे भले झालेले त्याला पहावतही नाही. दुधात जर मद्य मिसळले तर ते जसे दुधालाच अपेय करते त्याप्रमाणे दुसऱ्याचे कल्याण त्याच्या मनात मत्सराचा अग्नि पेटवते. पार्था, मयसभा पाहून दुर्योधनाला राग येण्याचे काय कारण होते सांग. राजसूय यज्ञ तुम्ही पांडवांनी इंद्रप्रस्थाला केला. कोषागार तर तुम्ही त्याच्याच स्वाधीन ठेवले होतेत. हेतू त्याला मोठेपणा देण्याचा होता पण परिणाम असा झाला की दुर्योधनाची ईर्षा वाढत गेली, द्वेष वाढत गेला, मत्सर भडकला. तुमचे वैभव पाहून त्याला तुमचा नायनाट कसा करावा ह्या एका विचारानेच ग्रासून टाकले. हातात तरवार घेऊनच दुर्योधनाने संतापाने मयसभेमध्ये प्रवेश केला होता आठवते ना? जमीन समजूनच त्याने पाण्याने भरलेल्या कारंज्यात पाऊल टाकले आणि तो पाय घसरून पडला. दैवानेच पुढच्या अनर्थाची तेव्हा तयारी केली. भीमाला आणि द्रौपदीला हसू आवरेना आणि दोघांनी हसत हसत 'आंधळ्याचा पुत्रही आधळाचं' असे उद्‌गार काढले. पार्था, मत्सर, द्वेष संतापाने पेटलेल्या दुर्योधनाच्या मनात ह्या उपहासांनी किती भर घातली असेल? पुढचे द्यूताचे भीषण नाट्य यातूनच निर्माण झाले ना? या यज्ञात आता किती आहुती पडतात काय सांगावे? असा हा तामस कर्माचा प्रकार आहे.

थंड पदार्थ अग्निमध्ये घातला की, तो क्षणात धडाडून अग्निरूपच होतो. त्याच्या थंडपणाचा लवलेशसुद्धा उरत नाही. शरिरात कितीही उत्तमोत्तम पदार्थ घातले तरी त्याचा मलच होतो त्याप्रमाणे दुसऱ्याच जे जे चांगले होईल ते ते माझे वाईट झाले असाच भाव त्याच्या मनात उत्पन्न होतो. दुसऱ्याचे गुण पाहून तो त्याची निंदा करतो सापाला दूध पाजले की विष तयार होते तसा दुसऱ्याचा गुण त्याच्या मनात आला की तो दोषाचेच रूप घेतो आणि निंदारूपाने बाहेर पडतो. अमृताचे विष करणारी तामस वृत्ती त्याच्या रोमारोमात

भरलेली असते आणि चुकून कधी सत्कृत्य करण्याची वेळ त्या तामस कर्त्यापुढे आलीच तर ती त्याच्या हातून निसटून जाते. दुर्वासांची इतकी उत्तम सेवा त्या दुर्योधनाने केली आणि जेव्हा ते प्रसन्न झाले तेव्हा आपले कल्याण करून घेण्याची संधी त्याला नव्हती काय? पण पार्था, "पांडव वनात आहेत अस्तमानानंतर आपण आपल्या साठ हजार शिष्यांसह जाऊन त्यांच्याकडे भोजन मागा आणि जर धर्म ते देऊ शकला नाही तर त्याला शाप द्या." हेच मागणे त्याने मागितले नाही काय? तसे घडते.

इहलोकी सुखाने जगता येईल, परलोकी सुखाची प्राप्ती होईल असे उचित कर्म करण्याची वेळ आली की मग मात्र तो अगदी झोपेचे ग्रासून टाकला जातो. दुर्व्यवहार करण्याची वेळ आली की झोप चार हात लांब उभी रहाते आणि दुष्कृत्याची वाट मोकळी करते. द्राक्षरस, आमरस खावे अशी वेळ आली की कावळ्याचे तोंड यावे तसा हा प्रकार होतो. दिवस उगवला की घुबडाचे डोळे जातात, त्याप्रमाणे कल्याणकाळ आला की त्याला आळस भरलाच. प्रमादाच्या वेळी मात्र वाटेल तितका उत्साह त्याच्या अंगी संचरलेला असतो.

समुद्राच्या पोटात जसा वडवानल कायमचा पेटलेला असतो त्याप्रमाणे जन्मभर खेदाची आग तो पोटात वहात असतो. हे वीरा अर्जुना, कल्पान्ताच्या पलीकडे का होईना पण फलप्राप्ती झाली पाहिजे असे त्याच्या व्यापाराचे धोरण असते. जगाच्या पलीकडच्या गोष्टींची तो चिंता वाहतो, पण गवताची काडीदेखील त्याच्या हाती लागत नाही. हा तामस कर्ता मूर्तिमंत पापच आहे. तू असा एखादा कर्ता जेव्हा पहाशील तेव्हा तो तामस कर्ता आहे हे निर्विवाद ओळख. सुजनांचा तू चक्रवर्ती राजा आहेस. तुला ज्ञान, कर्म, कर्ता या तिघांची वेगवेगळी लक्षणे सांगितली आहेत. तू ती ध्यानात घे.

आता अज्ञानाच्या गावी बुद्धि, मोहाची पैठणी नेसून, संशयाचे सर्व दागिने घालून, जीवाच्या स्वरूपाच्या निश्चयाची शोभा पहाण्याचा व्यापार करीत असते. ही बुद्धिसुद्धा अर्जुना, तीन प्रकारची आहे.

अर्जुना, अरे जगात अशी एकही वस्तू नसेल की जी त्रिगुणांनी व्यापलेली नाही. वस्तु म्हटली की तिचे तीन प्रकार झालेच. असे कोणते लाकूड आहे की ज्याच्या पोटात अग्नि नाही? अशी कोणती वस्तू जगात आहे की जी गुणांच्यामुळे ती तीन ठिकाणी विभागली गेली नाही? बुद्धिचे म्हणून गुणांनी तीन प्रकार केले आहेत आणि त्याचप्रमाणे धैर्याचेही! बुद्धि आणि धृति ह्या दोन्ही मुळात एक पण कोणत्या तरी एका गुणाशी त्यांचा मेळ झाला की त्या त्या गुणांचे रूप त्या घेतात. पाण्याला मुळात रंग नाही खरा पण ते ज्याच्या बरोबर राहील त्याचा रंग घेते.

एक राजा रोज रात्री दूध पीत असे. सोन्याच्या पेल्यातून दूध पिऊन राजा कंटाळला मग त्याने खजिन्यातून एक मोठा अनगड पाचू आणवला तो खोदून त्याचा सुंदर पेला तयार करून त्या पेल्यातून तो दूध पिऊ लागला. लहानपणापासून त्याला वळण लावलेले होते की दूध, पाणी किंवा खाण्याचा पदार्थ समोर आला तर त्याकडे निरखून पाहून मग तो ग्रहण करावयाचा. त्याप्रमाणे तो पाचूच्या पेल्यातील दूध पहायचा आणि मग प्यायचा. पाचूच्या पेल्यातील दूध पिण्यास सुरवात केल्यापासून राजाची प्रकृति नीट राहीना. राजा रोड दिसू लागला. राजवैद्य आले, प्रकृति तपासली पण दोष कुठे सापडेना. मग त्यांनी सव दिवस राजाबरोबर घालवला. रात्री नित्यक्रमाप्रमाणे पाचूच्या पेल्यातून दूध सेवकाने आणून दिले. राजाने पेला हातात घेतला, दुधाकडे

पाहिले आणि दूध पिऊन पेला तबकात ठेवला. राजाच्या चेहऱ्यावर होणारे फेरबदल राजवैद्य निरखून पहातच होते. त्यांनी हात जोडून म्हटले, “महाराज, आपल्या प्रकृतित बिघाड करणारा हा पाचूचा पेला आहे. त्या पाचूचा रंग दुधाला येतो आहे आणि आपल्या मनात “यात विष तर मिसळले नसेल ना” अशी शंका येते आणि मग दिवसभर तोच विचार मनात राहून आपली प्रकृति बिघडते.”

राजाने हे निदान मान्य केले. राजवैद्यांना बक्षीस दिले आणि पाचूच्या पेल्याची जामदारखान्यात रवानगी केली. दोष दुधाचा नव्हता. ते दूध ज्या पेल्यात ठेवले जात होते त्या पेल्याचा होता. त्याप्रमाणे देव सांगत आहेत की अर्जुना, बुद्धि आणि धृति यांना मुळात रंग नाहीत पण गुणाशी मेळ झाला की त्यांना रंग चढतो. ह्या गुणांची लक्षणे सांगतो आणि भेदही सांगतो. बुद्धि आणि धृति यापैकी आधी बुद्धिचे तीन प्रकार सांगतो.

अर्जुना, प्रथम सात्त्विक बुद्धि म्हणजे काय हे सांगतो. ‘अमुक कर्म करू या’ असा जे निश्चय करते त्या तत्त्वास बुद्धि म्हणावयाचे. प्राणी ज्या वाटांनी संसारात येतात त्या तीन वाटा म्हणजे—

**(१) विहित कर्माचे आचरण न करणे.**
**(२) काम्य कर्माचे आचरण करणे.**
**(३) निषिद्ध कर्माचे आचरण करणे.**

अशा आहेत. आता त्या तीनही वाटा त्याज्य, निंद्य, दोषास्पद आहेत. विहित कार्माचे आचरण करावयाचेच. आणि काम्य व निषिद्ध कर्म कधीही करावयाचे नाही असा निश्चय करणारी बुद्धि सात्त्विक बुद्धि आहे असे समज. अनेक जन्मांच्या शुभसंस्कारामुळे ती बुद्धि उपजताच निश्चय करते की आपल्या अधिकारानुरूप जे आले, शास्त्राच्या ओघाने जे सांगितले ते नित्य कर्म करण्यातच आपले कल्याण आहे. तान्हेला मनुष्य तहान भागविण्यासाठी पाणी पितो त्यात दुसरा काही हेतू नसतो. त्याप्रमाणे सात्विक बुद्धियुक्त कर्ता मोक्ष हे एकच ध्येय डोळ्यापुढे ठेवून अत्यंत निष्ठेने नित्यकर्म करीत रहातो. अशा प्रकारे बुद्धिचा एकदा निश्चय झाला की कर्म व्यवस्थित घडत रहाते, संसारभयापासून सुटका होते आणि त्या कर्त्यास मोक्ष सुलभ होतो. बुद्धिचा निश्चय झाला की, मोक्ष ठेवलेलाच आहे असेसुद्धा मी म्हणतो.

अर्जुना, वर वर पाहिले तर हा कर्ता नित्यकर्म इतके सुंदर करतो त्याअर्थी त्याची कर्माकडे प्रवृत्तिच आहे असे वाटते पण आतून त्या कर्माच्या फळावर त्याने पाणी सोडले आहे त्यामुळे त्याची प्रवृतिही निवृत्तिच्या पीठावर मांडलेली आहे असे म्हणावे लागते. निश्चय करून बुद्धिने हा नित्यकर्माचा कलश झळझळीत करून मांडला की तात्काळ तो कर्ता मोक्षाचा अधिकारी होतो. इतके या कर्मफलाच्या त्यागाचे माहात्म्य आहे आणि हे माहात्म्य जाणूनच त्या सात्त्विक बुद्धिने फलत्यागपूर्वक नित्यकर्म करण्याचे कंकण बांधलेले असते. तान्हेल्या माणसाला पाणी मिळाले की तो जगतो, पुरात वहाणारा मनुष्य नाव मिळाली की सुखरूप बाहेर येतो, अंधाऱ्या विहिरीत सूर्यकिरण पडले की आत पडलेल्या माणसाला बाहेर निघण्याची वाट दिसू लागते, रोग्याला पथ्य आणि औषध दोन्हींचा लाभ झाला की तो जगतो, तडफडणारा मासा पाण्यात सोडला की निवांत होता त्याप्रमाणे जीवाने विहित कर्माची कास धरली की त्याला मोक्ष मिळतोच.

या बुद्धिला करणीय कर्म कोणते हे उत्तम प्रकारे कळते त्याचप्रमाणे तिला अकरणीय कोणते हेही अवगत असते. ती म्हणते की "ही काम्यकर्मे संसाराचे भय देणारी आहेत. शास्त्रवचन व गुरूवचन यांनी त्यांच्यावर ती कधीही करू नयेत असा कायम शिक्का मारलेला असतो. मी ती कधीही करणार नाही." पार्था, अकरणीयाचे तिचे ज्ञान असे पक्के असते. काम्य व निषिद्ध ही दोन्ही कर्मे जन्ममरणाच्या चक्रात पुन्हा पुन्हा गुंतवणारी आहेत हे जाणून त्या कर्माकडे थोडीसुद्धा प्रवृत्ति उठते आहे असे पाहिले की बुद्धि हत्यार घेऊनच त्या प्रवृत्तिला मागच्यामागे पळवते.

अग्नित प्रवेश करवत नाही, अथांग समुद्रात उडी घालवत नाही, धगधगीत शूळ हातात धरवत नाही, फू फू करणारा काळसर्प पाहिला की त्याला धरावे अशी इच्छा होत नाही किंवा वाघाच्या गुहेत प्रवेश करण्याचे धाडस होत नाही त्याप्रमाणे अकरणीय कर्म पहाताच ह्या बुद्धिचा थरकाप होतो. निःसंदिग्धपणे ती मागे फिरते. विचार करते की "अहो ह्या अन्नामध्ये विष कालवलले आहे हे कोण खाईल? हे जर कुणी खाल्ले तर मृत्यू आल्याशिवाय कसा राहील म्हणून मी त्याकडे पाहणारसुद्धा नाही, नुसते पाहूनदेखील मला एखादे वेळी बंधन निर्माण व्हावयाचे."

मी एकदा आमच्या आजोबांना-इचलकरंजी सरकारांना-विचारले, "मिश्र क्लबामध्ये वगैरे बायकांनी का जायचे नाही? बायकांच्यावर हे बंधन का आहे?" सरकार म्हणाले, "तिथे सगळ्या गोष्टी बायकांनी पहाण्यासारख्या, ऐकण्यासारख्या नसतात. पाहून पाहून डोळे मरतात, ऐकून ऐकून कान मरतात आणि मग हळूहळू त्या प्रकाराचे त्यांना काही वाटेनासे होते म्हणन जपायचे."

हे त्यांचे शब्द काय मोलाचे आहेत हे तेव्हा पूर्णतया कळले नाही पण आता कळते आहे की आपल्या इंद्रियातील सात्त्विकता ही एक फार मोलाची आणि नाजूक वस्तू आहे. जपावी तेवढी थोडी. तरवारीचे पाते जसे धारदार ठेवावे लागते, आपोआप रहात नाही तसे हे नाजुकपण अलगद जपावे लागते. तरवारीचे पोलाद एकदा खूप तापवून लगेच अगदी थंडगार पाण्यात बुडवून ठेवावे लागते तेव्हा ते तयार होते म्हणे. म्हणजे पोलादाची ती प्रक्रिया आणि हत्यार तयार झाल्यावरची त्याची ही जपणूक! नाही तर गंज चढून ते पाते निकामी होते. तेव्हा हा भाव लक्षात ठेवून ती बुद्धि निषिद्ध कर्मापासून स्वतःला पूर्ण दूर ठेवते.

बंधभयाने भरलेले निषिद्ध कर्म जर समोर आलेच तर त्या कर्मापासून कसे निवृत्त व्हावयाचे हेही ती बुद्धि जाणते आणि त्या कर्मापासून आपली सुटका करून घेते. रत्नपारखी ज्याप्रमाणे हिरे, पाचू इत्यादी रत्ने पारखून घेती त्याप्रमाणे ही बुद्धि कार्य आणि अकार्य याबद्दल अत्यंत जागरूक राहून पारख करते आणि खऱ्याचा स्वीकार आणि खोट्याचा त्याग त्या जवाहिऱ्याप्रमाणे करते. अशा तऱ्हेने ती पारख करीत जाईल तसतशी निवडीच्या कामात ती तल्लख होत जाते, तयार होत जाते. तिला फारसा विचारच करावा लागत नाही.

एका न्यायाधीशांची सत्यभाषणाबद्दल फार ख्याती होती. ते कधीही असत्य भाषण करीत नाहीत हे सर्वांना ठाऊक होते. तेव्हा एके दिवशी त्यांना त्यांच्या मित्राने विचारले, "काय हो, तुम्ही अगदी जन्मभर हे व्रत पाळले. तुमची काही व्यावहारिक फायदा झालेला तर दिसत नाही? मग तुम्ही तुमच्या व्यवसायात नित्य खरे बोलून मिळवलेत तरी काय?"

अनुक्रमणिका

न्यायाधीश हसून म्हणाले, "भाई, प्रश्न अगदी बरोबर आहे. माझ्यावर विश्वास ठेव असे मी म्हणतच नाही कारण मी खोटे कधी बोलत नाही, हे तुला माहीतच आहे. पण व्यवसायात काय मिळवले हे सांगतो. माझ्यासमोर जेव्हा एखादा साक्षीदार उभा असतो तेव्हा त्याने, त्याच्या वकिलाने वा विरुद्ध पक्षाच्या वकिलाने कितीही चलाखी केली तरी सत्य प्रकार काय आहे हे मला तात्काळ कळते. न्याय देताना यापेक्षा आणखी काय हवे आहे?"

देव म्हणतात "तेव्हा ध्यानात ठेव की सात्त्विक बुद्धि मुळात शुद्ध असतेच पण कार्याकार्य विवेक करता करता जास्त जास्त उजळत जाते आणि मग तिच्यामध्ये आत्म्याचे स्वच्छ प्रतिबिंब पडते. अखंड अभ्यास त्या बुद्धिला या पदावर नेऊन पोचवतो. पार्था, अशा ह्या बुद्धिला सात्त्विक बुद्धि म्हणावयाचे.

अर्जुना, सर्व जीवामध्ये जर ही एकटीच असती तर किती कल्याण झाले असते पण तसे होत नाही. रजोगुणाशी संसर्ग झाला की बुद्धि रजोगुणी होते. तिला कार्य आणि अकार्य ह्यांची निवड करता येत नाही. राजहंस पक्षी दूध आणि पाणी वेगवेगळे करू शकतो पण बगळ्याच्या गावात दूध आणि पाणी एकत्र करूनच घेतले जाते. त्या बगळ्यांना त्यातील दूध घ्यावे, पाणी टाकावे हे कळत नाही. आंधळ्या माणसाला रात्री आणि दिवसा अंधारच असतो. ज्याने फुलांतील मकरंद सुखाने घ्यावा तो भ्रमर वाळलेले लाकूड कोरत बसतो आणि हे त्याच्या स्वभावानुरूपच घडत असते. तो एकीकडे मकरंद खातो, एकीकडे लाकूडही कोरतो त्याप्रमाणे ही राजसी बुद्धि कार्य आणि अकार्य न पहाता, निवड न करता, सरसकट मिश्र कर्मे करीत सुटते. अधर्म आणि धर्म यातील भेदच तिला कळत नाही. नीट पाहिल्याशिवाय जर मोत्यांची खरेदी केली तर चुकून सौदा बरोबर व्हावा पण फसगत व्हावी हे नक्कीच घडत रहाते. जेवणाचे आमंत्रण निवड न करता सगळ्या मांडवासच द्यावे त्याप्रमाणे ती बुद्धि सगळ्याच कर्मांना आवाहन करीत असते.

आता तामस बुद्धिचे वर्णन करायला हवे. ते क्रमाने येते आहे म्हणूनच करावयाचे. आतापर्यंत तुझ्या ध्यानात आलेच असेल की ह्या तामस गुणाचे सात्त्विकाच्या बरोबर उलट वर्तन असते. राजसामध्ये थोडा सात्त्विक व थोडा तामस भाग असतो. आपापल्या गुणाच्या अंशाप्रमाणे मग राजस तामसाकडे आणि सात्त्विकाकडे झुकत असतो. संगीतात जसा तीव्र कोमल ऋषभ गांधार मध्यम आणि मग स्थिर पंचम आणि धैवत निषाद पुन्हा तीव्र कोमल असतो आणि तोडीसारख्या रागात पुन्हा अति कोमल ऋषभ आणि अति तीव्र मध्यम असे सूर येतात तसेच हे आहे. तामसातल्या तामसाचे रंग असे की राजरस्ता चोरांना आडवाट वाटतो आणि राक्षसांना दिवसच रात्रीसारखा नकोसा होतो तशी ती तामस बुद्धि असते. ती बुद्धि खऱ्याला खोटे मानण्यात आनंद मानते. एखादा भाग्यहीन मनुष्य असतो त्याच्या पुरलेल्या ठेव्याचे जसे कोळसे होतात त्याप्रमाणे शास्त्रानुसार जे वर्तन योग्य असेल नेमके तेच त्या तामसी बुद्धिला नकोसे होते. सगळ्याच अर्थाचा ती बुद्धि अनर्थ समजते आणि जितके म्हणून गुण आहेत ते सगळे दोष मानते. श्रुतींनी ज्याचा अंगीकार केला ते सगळे त्या बुद्धिला त्याज्य वाटते."

ह्या विवेचनाच्यावेळी शेक्सपियरच्या मॅकबेथ नाटकाची आठवण होते. सुरवातच आहे तीन चेटकिणींच्या गाण्याने. त्या गात आहेत—

| | |
|---|---|
| 1st Woman- | Where Shall We three meet again? |
| 2nd Woman- | When the hurly-burly is done. |
| | When the battle is lost and won. |
| 3rd Woman- | That Will be ere the set of Sun. |
| 1st Woman- | Where the place? |
| 2nd Woman- | upon the heath. |
| 3rd Woman- | I come Grymalkin |
| | All paddock calls-anon |
| | Fair is foul and foul is fair |
| | Hover through the fog and filthy air. |

आता यातील fair is foul and foul is fair हे वाक्यच सर्व नाटकातले सूत्र आहे. सत्कृत्य म्हणजे दुष्कृत्य म्हणजे दुष्कृत्य म्हणजे सत्कृत्य असे मानून आणि ह्या चेटकिणींच्या वाक्याने भारून जाऊन मॅकबेथने काय काय गुन्हे केले हे विहितच आहे. ज्या वृद्ध राजाने आपला सन्मान केला, पदवी दिली त्या अन्नदात्याचा झोपेत खून करणे हे त्या मालिकेतील पहिले दुष्कृत्य. माउली तामसी वृत्तिचे वर्णन करीत असतात आणि आपल्याला मॅकबेथच्या स्वरूपात ही मूर्तिमंत तामसी बुद्धि भेटत असते.

देव म्हणत आहेत, “अर्जुना, जिथे चांगले ते वाईट आणि वाईट ते चांगले असे सांगितले जाते ती बुद्धि तामसी आहे हे तू कोणालाही न विचारता ठरव. धर्मार्थ पाहून का ही रात्र आहे असे आपण ठरवितो? आपल्या डोळ्यांना रात्र दिसतेच की.

आत्मबोधरूपी कमलाचा विकास करणाऱ्या चंद्रा अर्जुना, तुला बुद्धिचे तीन प्रकार स्पष्ट करून दाखवले आहेत. या बुद्धिच्या योगे तीन प्रकारच्या कर्मांचा निश्चय केला जातो आणि तीन प्रकारच्या धैर्याने हा निश्चय तडीला नेला जातो. सात्त्विक बुद्धिला सात्त्विक धैर्य, राजस बुद्धिला राजस धैर्य व तामस बुद्धिला तामस धैर्याची जोड दिली जाते. साहजिकच तेव्हा धैर्याचेही तीन प्रकार होतात. त्यांच्या लक्षणासह हे तीन प्रकार सांगितले जातील. तू चांगले लक्ष दे.

प्रथम सात्त्विक धृतिचा प्रकार सांगतो. ही सात्त्विक धृति मनात उत्पन्न झाल्याबरोबर मनादिक इंद्रिये आपआपले व्यापार उभ्या उभ्या टाकून देतात. सूर्य उगवल्याबरोबर अंधार आणि चोरी दोन्ही बरोबरच नाहीसे होतात. राजाज्ञा सुटली की, गैरव्यवहार थांबतात. वाऱ्याचा जोर वाढला की ढग आपल्या गर्जनेसहित नाहीसे होतात. अगस्ति ऋषि दृष्टिस पडल्याबरोबर भयाने समुद्र मौन धारण करतो, चंद्रोदय झाल्याबरोबर सूर्यविकासी कमळांचे वन पाकळ्या मिटून घेते, एखाद्या मत्त हत्तीपुढे गर्जना करीत सिंह येऊन उभा राहिला तर तो मदोन्मत्त हत्ती उचललेले पाऊल खाली ठेवतो त्याप्रमाणे या धृतिच्या दर्शनाने मनादिक इंद्रियांची अवस्था होते.

इंद्रियांच्या आणि विषयांच्या गाठी आपोआप सुटतात. दाही इंद्रिये आपली आई जे मन त्या आईच्या पोटात शिरून स्वस्थ बसतात. या धैर्याच्या जोरावर प्राण, अपान, व्यान, उदान, समान, नाग, कूर्म, कृकल, देवदत्त या नऊ वायूंची पेंढी सुषुम्नेमध्ये एकवटून उडी घालते. दहाही इंद्रियांना सामावून घेऊन मन संकल्पविकलल्पाचे लुगडे सोडून बुद्धिच्याही मागच्या बाजूला निमूट बसून राहते. हा धैर्यरूप राजा मन, प्राण आणि इंद्रिये यांची आपआपल्या कर्माची संभाषणे टाकायला लावतो आणि ध्यानाच्या आतल्या कोठडीत अष्टांगयोगाच्या युक्तिने बंदीवान करून ठेवतो. चक्रवर्ति परमात्म्याची भेट होत नाही तोवर तो धैर्यराज मन, प्राण इत्यादिकांनी कितीही लाच देऊ केली तरी त्यांना दाद देत नाही. श्रीकांत भगवान म्हणाले. "अर्जुना, हे जे धैर्य दाखवले जाते त्याला सात्त्विक धैर्य असे म्हटले जाते.

राजस धैर्य पण जीवाना अचाट कर्म करावयास लावते. आपण देहच आहो असे समजून जीवात्मा ह्या राजस धैर्याच्या जोरावर धर्म, अर्थ, काम या तीनांच्या प्राप्तीसाठी अहोरात्र कष्ट करतो आणि स्वर्ग व संसार या दोन्ही ठिकाणी पोटभर नांदतो. मनोरथाच्या समुद्रावर धर्म, अर्थ, काम ह्या तीन जहाजांवरून क्रियारूपी व्यापार तो या धैर्यामुळेच करतो. या व्यापारात जे कर्मरूपी भांडवल तो घालतो त्याच्या चौपट तरी प्राप्ती होईल असे धोरण बांधतो आणि ती तशी व्हावी म्हणून अपार कष्ट करतो. पार्था, ह्याला राजस धैर्य म्हणावयाचे.

आता तामस धैर्य कसे असते ते सांगतो. कोळसा जसा मुळात काळा, काळ्या रंगानेच बनलेला असतो त्याप्रमाणे सर्वांत नीच असा जो तमोगुण त्या तमोगुणाचेच हे धेर्य बनलेले असते. ह्या गुणाला 'गुण' म्हणावयाचे ते केवळ उपचार म्हणून. राक्षस हे दुष्ट, पापी असून त्यांना पुण्यजन म्हटले जाते ना तसेच या हीन अशा तमोगुणाला गुण असे म्हणावयाचे. ग्रहामध्ये विस्तवासारखा जो प्रखर आहे त्याला मंगळ असे नाव आहे ना? त्याप्रमाणे ह्या तमोगुणाला गण म्हणणे म्हणजे अविचारीपणाच आहे. सुभटा अर्जुना, खरे म्हणजे हा तमोगुण सगळ्या दोषांचे वसतिस्थान आहे. ह्या तामस, धृतिवान पुरुषाचे शरीर म्हणजे या सर्व दोषांची मूर्तीच असते. पापी माणसाला दुःख कधी सोडत नाही. त्याप्रमाणे झोप त्याच्या काखेतच असते. आळस त्याला सोडून कुठे दुसरीकडे जात नाही. देहावर अत्यंत आसक्ती असल्याने त्या देह धनाची चोरी तर होणार नाही ना या भीतीने तो जन्मभर ग्रासलेलाच असतो. दगडाला कठीणपण सोडून जातच नाही तसे भय त्याला सोडत नाही. पदार्थमात्राचे प्रेम त्याच्या मनात ठाण मांडून असते आणि पदार्थांचा संयोगवियोग तर सारखा चालूच असतो. कृतघ्न माणसाला पाप सोडत नाही आणि पदार्थाला लंपट असलेल्या माणसाला शोक सोडत नाही. त्याच्या जीवाला असंतोषाने धरून ठेवलेले असते आणि म्हणून विषादाने त्याच्याशी घनिष्ठ मैत्री केलेली असते. लसणाला वास सोडत नाही, अपथ्यशीलास रोग सोडत नाही, त्याप्रमाणे विषाद त्याला आमरण सोडत नाही. तारुण्य, पैसा आणि काम या तिघांनी त्याचा भ्रम वाढविला असल्याने मदही तिथेच रहायला येतो. अग्निला उष्णता, अस्सल नागाला वैर आणि जगाला भय जसे कायम धरून ठेवते त्याप्रमाणे तामसाला मद कायमचा धरून ठेवतो. शरिराच्या मागे जसा काळ अखंड लागलेला आहे तसा मद ह्या तामसाला अखंड धरूनच रहातो. निद्रा, आळस, असंतोष, मद इत्यादि दोष ज्या धैर्याच्या जोरावर तो तामसकर्ता टिकवून धरती त्या धैर्याला तामस धैर्य असे म्हणावयाचे.

तीन प्रकारची बुद्धि ज्या ज्या प्रकारच्या कर्माचा निश्चय करते ते ते कर्म या तीन प्रकारच्या धैर्याच्या बळाने केले जाते. सूर्यामुळे मार्ग दिसतो हे खरे आहे पण मार्ग पायानीच चालावयाचा असतो आणि तो

चालण्यास धैर्य हवे. त्याप्रमाणे बुद्धि कर्म काय करावयाचे हे सांगते, इंद्रिय समुदाय ते कर्म घडवून आणतो पण कर्म सिद्धीस जाण्यासाठी धैर्याची जरूरी आहे. त्या धैर्याशिवाय बुद्धि वा इंद्रिये कर्म शेवटास नेऊ शकत नाहीत. अर्जुना, आता कर्म झाले की फळ येणारच आणि त्याला 'सुख' असे म्हटले जाते. कर्माच्या प्रकाराप्रमाणे त्यातून निर्माण होणाऱ्या सुखाचेही तीन प्रकार आहेत. त्या सुखाचे विवेचन स्पष्ट, स्वच्छ शब्दात करतो. पण अर्जुना, त्या शब्दाची शुद्धता अशी असेल की ऐकणे ह्या क्रियेनेसुद्धा त्याला मालिन्य येईल. तू जीवाच्या जीवाने, आपल्या अंतःकरणाने हे शब्द ऐक. बाहेरच्या अवधानाचा त्याग कर आणि आत अंतरात ऐक.

प्राज्ञा, तीन प्रकारचे सुख कसे असते ते सांगतो असे मी तुला सांगितले आहेच. तर अर्जुना, आत्म्याच्या दर्शनाने जीवाला जे सुख होते ते दृष्टिने पहाण्यासारखे तुला सांगतो. अर्जुना काय सांगू! अरे, जगात खरे सुख तेवढेच आहे. उत्तम औषध घ्यावयाचे झाले तर मात्रेच्या प्रमाणाने थोडे थोडे घेत गेले की, हळूहळू रोग हटून आरोग्य संचरते. कथलाचे रुपे करावयाचे झाले तर रसाची पुटे द्यावी लागतात, मिठाचे पाणी करावयाचे झाले तर चार-दोन वेळा मिठावर पाणी शिंपावे लागते त्याप्रमाणे आत्म्याच्या भेटीत मिळणाऱ्या सुखाचा अनुभव अभ्यासाने वरचेवर घेतला की, जीवपणाच्या दुःखाच्या दुःखाचा नाश होतो. जीवपणाच्या दुःखाचा नाश करणारे जे आत्मभेटीचे सुख तेच खरे सुख हे ध्यानात घे. पण ते सुख त्या भेटीत मिळाले तरी जीव पुन्हा जीवपणाच्या अवस्थेत येतोच आणि त्रिगुणाच्या सापळ्यात ते निर्मल सुखही अडकते आणि त्यावर त्या गणांचा रंग चढू लागतो. सुखही मग तीन प्रकारचे होते.

अर्जुना, प्रथम सात्त्विक सुखाचा विचार करूया. ह्या सुखाला वैराग्य हे मूळ आहे आणि आत्मानुभवाची विश्रांति हे त्याचे फल आहे. जे सुख अशा प्रकारच्या परिणामामध्ये फलित होते ते सात्त्विक सुख समजावे. पण ध्यानात ठेवावयाचे की. ह्या सुखासाठी सुरवातीस फार कष्ट आहेत. चंदन उत्तम खरा पण त्याच्या बुडख्याजवळ सर्पाचे विळखे असतात, खजिना मौल्यवान खरा पण त्याच्या रक्षणासाठी पिशाच्च ठेवलेले असते. स्वर्गाचे सुख गोमटे खरे पण यज्ञयागाचे कष्ट सहन केल्यावर मग ते मिळते. बाळंतपणात त्रासाचे प्रसंग आले की, ते नकोसे होते पण ते भोगले पाहिजेत. दिवा लावायचा म्हणजे आधी धूर सोसला पाहिजे. रोग बरा होण्यासाठी औषध घ्यावायचे पण त्याचा जिभेला बसणारा चटका सोसला पाहिजे. त्याप्रमाणे हे सात्त्विक सुख मिळावे अशी अपेक्षा असली तर कष्टदायक यमदमांचे समुदाय सोसले पाहिजेत. सगळ्या स्नेहाला मिठी देणारे असे धगधगीत वैराग्य अंगी बाणावयास हवे की जे स्वर्ग आणि संसार या दोहोंच्याही कुंपणाचे काटे काढून टाकते. सतत विवेक श्रवण चालले असल्याने कठोर व्रताचरण केले जाते आणि बुद्ध्यादिकांचे लचके काढले जातात. सुषुम्नेच्या तोंडाने प्राणापानाचे लोंढे गिळाव लागतात. सात्त्विक सुख मिळविण्यासाठी सुरवातीसच हे असे श्रम कष्ट भोगावे लागतात. विषयाचे घर सोडताना इंद्रियांना होणार दुःख पचवावे लागते. अर्जुना, ते दुःख सामान्य समजू नको. चक्रवाक पक्ष्यांचा वियोग व्हावा. कासेपासून वासरू ओढून काढावे, दरिद्री उपाशी माणसाला भरल्या ताटावरून उठवावे किंवा एकुलत्या एक मुलावर आईसमोर काळाने झडप घालावी, माशाला पाण्यातून बाहेर काढावे आणि मग त्या जीवांचा जो आकांत होतो. तसा युगांत इंद्रिये आणि विषय यांचा वियोग झाला की होतो. पण ते सर्व क्लेश वैराग्यशील पुरुष सहन करतात. ह्या सात्त्विक सुखप्राप्तीच्या मार्गात सुरवातीस इतके खडतर क्लेश असले तरी समुद्र मंथनाचे कष्ट सोसल्यावर ज्याप्रमाणे क्षीराब्धीतून अमृताचा लाभ देवांना झाला त्याप्रमाणे अपूर्व सुखाचा लाभ ह्या क्लेशानंतर होतो. अभ्यासाच्या कठीणपणाचे विष धैर्यशंभूने कंठात धारण केले की ज्ञानामृताचा सोहळा जीवाला भोगावयास मिळतो. द्राक्षे प्रथम इतकी आंबट असतात की जिभेला

ठिणगी लागल्यासारखा चटका बसतो पण तीच द्राक्षे पिकली की अमृतालाही मागे सारतात. त्याप्रमाणे आत्मज्ञानाने वैराग्यादिक परिपक्क झाल्यावर वैराग्यासह सर्व अविद्या नाहीशी होते, गंगा समुद्राला मिळाली की समुद्र होते. त्याप्रमाणे बुद्धि आत्म्याला मिळाली की आत्मरूप होते आणि अद्वयानंदाची आपोआप खाण उघडते. अर्जुना, म्हणून मी सुरवातीस तुला म्हटले की ह्या सुखाचे मूळ वैराग्यात आहे आणि शेवट आत्मसुखात आहे. अशा प्रकारचे जे सुख त्याला सात्त्विक सुख म्हणावयाचे. खरा धैर्यवान साधक सात्त्विक धैर्याच्या सामर्थ्याने ते सुख साध्य करून घेतो.

आता राजस सुखाचा भाग असा आहे की ते प्रथम गोड पण परिणामी कडू असते. विषय आणि इंद्रिये यांचा मेळ झाला की सुख मिळतेच. दोन्ही थड्या सोडून नदीचा प्रवाह बाहेर वहावा तसे ते सुख ओसंडून येते. गावात तोरणे, पताका लावून अधिकाऱ्याचे स्वागत करावे किंवा कर्ज काढून थाटामाटाने लग्नसमारंभ करावा तशी ह्या राजस सुखाची अवस्था असते. रोग्याने साखरेबरोबर केळे खाल्ली तर जिभेला गोडच लागते पण कुपथ्य झाल्यामुळे रोग उलटतो. बचनाग खाताना गोड लागतो पण परिणामी प्राण जातो. संभावित चोराची मैत्री प्रथम सुखकारक वाटते, वेश्येचे प्रेम गोड वाटते, बहुरूप्याचे विनोद मनोरंजन करतात पण इंद्रियसुख भोगून पुण्याचा क्षय झाला की पुण्य तर संपतेच पण सुखही संपते. इंद्रियसुखाने पुष्ट झालेला तो राजस भोक्ता हंस खडकावर आपटून प्राणास मुकावा त्याप्रमाणे हतबल होतो. जे भोगले ते जसे काही स्वप्नातच भोगले आणि आज ही हानी झाली ती खरी आहे आणि त्यातच आता लोळावे लागणार हे त्याला कळून चुकते. इहलोकी हे फसवे सुख आपत्तीत घालते आणि परलोकी विष होऊन उलटते, पूर्णच घात करते. ज्या सुकृताच्या जोरावर विषयसुख तरी भोगता आले ते सुकृतही या भोगामुळे संपून गेलेले आहे अशी परिस्थिति होते. धर्माचा मळा जाळून इंद्रियांना विषयाचा लळा लावल्यामुळे विषय भोगता येतात पण त्यामुळे पातकाचे ठाणे बळकट होते व ती जीवाला नरकात जागा देतात. या राजस सुखाचा हव्यास परलोकास असा अपायकारक होतो. बचनाग चवीला गोड लागतो पण जो मनुष्य बचनाग खाती तो त्या नागापासून जीव बचावू शकत नाही. सुरवातीस गोड आणि परिणामी कडू असे हे राजस सुख अत्यंत घातक आहे. ते रजोगुणाचे बनलेले आहे. त्याच्या वरवरच्या मोहक स्वरूपाला भुलून तू त्याच्या वाटेला जाशील आणि फसशील तेव्हा पार्था, तू चुकूनही तिकडे जाऊ नकोस. दक्ष रहा.

आता त्या तामस सुखाचे वर्णन करणे ओघाने आलेच! तामस सुखाला सुख असे नुसते म्हणताही येत नाही. तेव्हा त्याचे फार वर्णन करतच नाही. अपेय पान आणि अखाद्याचे भोजन तसेच स्वैर स्त्रीचा सहवास यामुळे जे सुख झाल्यासारखे वाटते ते तामस सुख म्हणावयाचे. दुसऱ्यांना ठार मारून, दुसऱ्याच्या धनाची चोरी करून किंवा भाटांनी केलेली स्तुती ऐकूनही ते निर्माण होत असते. त्याचे पोषण आळसाकडून केले जाते. झोपेमध्ये त्याचा अनुभव घेता येतो आणि आत्मसुखाविषयी आरंभापासून शेवटपर्यंत जे भूल घालते आणि आत्मसुख खोटे आहे असे सांगते ते तामस सुख समजावे. सुखाला कारण असलेले कर्म तीन प्रकारचे असल्याने त्याचे फळही याप्रमाणे तीन प्रकारचे होते. मी तुला हे सगळे शास्त्राला धरून सांगितले आहे.

अर्जुना, त्रिगुणाचा प्रभाव पाहिलास ना? कर्माकर्म, कर्मफळ ही केवळ एक त्रिपुटी आहे. किरीटी ही तीन गुणांनी युक्त असते आणि या त्रिपुटीशिवाय जगात एकही वस्तू नाही हे ध्यानात ठेव.

अनुक्रमणिका

तंतूचा पट होतो त्याप्रमाणे ही त्रिपुटी तीन गुणांनी केलेली आहे. आता हे त्रिगुण म्हणजेच प्रकृति. यच्चयावत् पदार्थ हे प्रकृतिने तयार झालेले असल्याने त्रिगुणाने बांधलेले असतात. स्वर्गलोकात, मृत्यूलोकात या त्रिगुणांशिवाय वस्तु नाही. लोकरीशिवाय कांबळे नाही. मातीशिवाय चिखलाचा गोळा नाही आणि पाण्याशिवाय लाटा नाहीत त्याप्रमाणे ध्यानात घे की जगात वस्तु नाही. सृष्टिच्या रचनेत जो तयार झाला तो गुणाचा बनलेला नाही असे होतच नाही. याकरिता हे सगळे जग तीन गुणांचे बनलेले आहे असे मी तुला म्हटले, अरे, या गुणांचा एवढा प्रताप आहे की देवांचे त्यांनी ब्रह्मा, विष्णू, महेश असे तीन प्रकार केले आणि वेगवेगळी कामे त्यांच्यावर सोपविली. एका देवाने सृष्टि रचावी, दुसऱ्याने तिचा सांभाळ करावा आणि तिसऱ्याने संहार करावा अशी व्यवस्था लावली. या गुणांनीच स्वर्ग, मृत्यू, पाताळ असे तीन लोक निर्माण केले आणि या गुणांनीच चार वर्णांना वेगवेगळे व्यवसाय लावून दिले.

आता हे जे चार वर्ण आहेत त्यामुळे चार वर्णात प्रमुख ब्राह्मण आहेत. याशिवाय हे जे दुसरे दोन म्हणजे क्षत्रिय आणि वैश्य हे ब्राह्मणाच्या बरोबरीचे मानावे. वैदिक कर्माचा त्यांना अधिकार असल्याने ते तीन वर्ण सारखे मानावे. शूद्र वर्णाचा वेदांशी काही खरोखर संबंध नाही तेव्हा त्याची वृत्ति या तीन वर्णांच्या आधीन आहे. या वृत्तिच्या निकट संबंधामुळे ब्राह्मणादिक तीन वर्णांबरोबर शूद्र हा चौथा वर्ण झाला आणि फुलांच्या हारातील दोराही फुलाबरोबर स्वीकारावा त्याप्रमाणे या तीन वर्णांबरोबर शूद्रांचाही वेदांनी स्वीकार केला आहे. अर्जुना, यातील सर्वांनाच जन्म-मृत्यूच्या कात्रीतून सुटून ईश्वराच्या ठिकाणी प्रतिष्ठित होण्याचा सारखाच अधिकार आहे.

त्यांच्या त्यांच्या प्रकृतिधर्माप्रमाणे कर्म करणे सुलभ व्हावे यासाठी ही चातुर्वर्ण्य व्यवस्था आहे आणि आपआपले कर्म तुला सांगितलेल्या फलत्यागाच्या युक्तिने करील तर तो खासच ईश्वरापर्यंत पोचेल. मग तो जीव कोणत्याही वर्णाचा असो. एखाद्या वत्सल पित्याने आपल्या मुलांचे स्वभाव पारखून त्या स्वभावाला योग्य असे कर्म त्याच्यावर सोपवावे त्याप्रमाणे प्रकृतिच्या गुणांनीच ही वाटणी केली आहे.

एक गोष्ट आहे की राजाला चार राण्या होत्या. राजाने चौघींना वेगवेगळी कामे वाटून दिली होती. पहिलीला दूधदुभते, दुसरीला स्वयंपाकघर. तिसरीला मुलांचा सांभाळ व चौथीला राजाने स्वतःची सेवा नेमून दिली. काही दिवस ही कामाची विभागणी नीट चालली, पण पुढे चौघींच्या मनात विकल्प आला की "मी हेच काम काय म्हणून करावे? त्यांची आपसात भांडणे सुरू झाली आणि त्याचा परिणाम असा झाला की घरची सगळी कामे थांबली. राजा उदास झाला. त्याला काय करावे हे काही केल्या कळेना. कुणाचीच समजूत पटेना.

एक दिवस एक महात्मा राजवाड्यात आले. राजाच्या उदासीनतेचे कारण त्यांनी विचारले. राजाने सगळी हकीकत सांगितली. महात्मा म्हणाले, "मी उपाय शोधून पहातो." आणि त्यांनी ध्यान लावले व चौघींच्या पूर्वजन्माची हकीकत जाणून घेतली. ते पहिल्या राणीकडे गेले आणि म्हणाले, "राणी, तुझ्याकडे दूधदुभते पहाण्याचे काम आहे ना?"

राणी म्हणाली. "होय महाराज." महात्मा म्हणाले, "राणी तू मागच्या जन्मी गाय होतीस. दिवसभर जंगलात चरून परत येताना शिवालयात जाऊन शिवलिंगावर दुधाच्या धारांनी अभिषेक करून मग घरी येत

होतीस. तुझी आराधना पुरी होण्यापूर्वीच तुला मृत्यू आला. पुण्याईने तुला राणीपद मिळाले. तू दूधदुभते सगळ्यांना घालून शिवभावाने राजाला दूध दे म्हणजे तुझी आराधना पुरी होऊन तुझे कल्याण होईल. "राणीने आज्ञा प्रमाण म्हणून समाधानाने नमस्कार केला.

दुसऱ्या राणीकडे जाऊन महात्मा म्हणाले. "राणी, स्वयंपाकाच्या कामापासून पळतेस की काय? अग, गेल्या जन्मी तु गरीब ब्राह्मण स्त्री होतीस. कोरी भिक्षा मागून स्वयंपाक करून देवाला नैवद्य दाखवत होतीस. त्या पुण्याईने तू राणी झालीस. आता स्वयंपाक करून सगळ्यांचे आत्मे तृप्त कर तुझे कर तुझे कल्याण होईल." त्याही राणीने आनंदाने काम करण्याचे कबूल केले.

महात्मा तिसऱ्या राणीकडे गेले, "राणी, तू तर मागच्या जन्मी माकडीण होतीस. उत्तम उत्तम फळे गोळा करून तू शंकराला अर्पण करीत होतीस. त्या पुण्याईने तू राणी झालीस, मुलेबाळे झाली. आनंदाने त्यांचा सांभाळ कर आणि भगवान शिवांना प्रसन्न करून घे."

महात्मा चौथ्या राणीकडे गेले. तिला म्हणाले, "राणी तू मागच्या जन्मी घार होतीस. ऐन दुपारी जंगलातल्या शिवलिंगावर छाया करीत होतीस. शिवलिंगास ऊन लागू नये म्हणून तू ही जी आराधना केलीस त्याने भगवान प्रसन्न झाले आणि त्यांनी तुला राणीपद दिले आणि छपर पलंगावर बसविले. राजाची उत्तम सेवा कर आणि आपले कल्याण साधून घे."

पूर्वजन्मानुसार आपल्याला या जन्मात हे काम मिळाले आहे हे समजून आल्यामुळे चौघी मोठ्या आनंदाने व प्रेमाने आपआपले काम करू लागल्या. आपले काम दुसऱ्याच्या कामापेक्षा श्रेष्ठ-कनिष्ठ हा भावच गेला आणि राजाच्या आनंदाला आकाश ठेंगणे झाले.

या गोष्टीवरून देवांना काय सांगायचे आहे हे स्पष्ट होते आहे. आणखी एक गोष्ट फारच बोधप्रद आहे.

भृगुकुलोत्पन्न ऋचिक ऋषी एकदा विश्वामित्री नदीच्या काठी गेले असता कान्यकुब्ज राज गाधी यांची कन्या सत्यवती स्नानास आलेली त्यांनी पाहिली. ते मोहित झाले. गाधीने वानप्रस्थ स्वीकारला होता व वनात वास करीत असतानाच त्यांना ही अप्सरेसारखी कन्या झाली होती.

ऋचिकांनी गाधीजवळ कन्येसाठी मागणी घातली. राजाला मागणीचा अव्हेर करता येईना. तो म्हणाला, "द्विजवर्य, आमच्या घराण्यात आमच्या पूर्वजांनी एक प्रघात पाडून ठेवला आहे. ज्यांचे कर्ण एका बाजूने कृष्णवर्ण आहेत असे एक सहस्त्र अश्व वराने द्यावयास हवेत. आपणासारख्या महात्म्याला मला कन्या द्यावयाची आहे. फक्त आपण हे कन्याधन द्यावे."

ऋचिक लगेच गंगेच्या काठी गेले. त्यांनी वरुणाला आवाहन केले. वरुणही भार्गवांचे पूर्वजच. त्यांनी ही अट पुरी केली. वरुणामुळे गंगेतून ज्या ठिकाणी श्यामवर्ण घोडे वर आले ते अश्वतीर्थ म्हणून प्रख्यात झाले.

अट पुरी झाल्याने विवाह सोहळा ठरला. विवाहप्रसंगी वरपक्षाचे वऱ्हाडी म्हणून देवगण आले होते. गाधीने आपली कन्या ऋचिकांना अर्पण केली व ते भृगुश्रेष्ठ पत्नीसह आश्रमी जीवनात रंगून गेले. लग्नसोहळा पहाण्यासाठी कुलपुरुष भृगुमुनी तेथे आले व आपल्या मुलाला व स्नुषेला पाहून आनंदित झाले. ते आपल्या सूनेला म्हणाले, "हे सौभाग्यवती, मी प्रसन्न आहे तू वर माग. जे इष्ट असेल ते मी देईन."

सत्यवतीने स्वतःसाठी व आपल्या मातेसाठी पुत्रकामना व्यक्त केली. मातेने पिंपळाला व सुनेने औदुंबराला आलिंगन द्यावे व त्यानंतर विराटस्वरूपी परमात्म्याचे चिंतन करून जे दोन चरू केले आहेत त्याचे भक्षण करावे असे भृगुमहर्षींनी दोघींना सांगितले. दोघींनी आलिंगन देण्याच्या वृक्षामध्ये व चरूमध्ये अदलाबदल केली.

अज्ञानवशात म्हणा वा दैववशात म्हणा मातेने आपला चरू कन्येला दिला व तिचा आपण भक्षण केला. क्षात्रतेजानेयुक्त असे ब्रह्मतेज सत्यवतीच्या चरूमध्ये होते तर तिच्या आईच्या चरूमध्ये ब्राह्मतेजयुक्त क्षात्रतेजाचा आविष्कार निक्षेपित केला होता. त्यामुळे ब्रह्मतेजाकडे प्रवृत्ति असलेला विश्वामित्रासारखा पुत्र गाधीराजांना झाला. अत्यंत प्रकोपी व दुष्टांचे निर्दालन करू शकणारा क्षात्रतेजाने युक्त असा पुत्र सत्यवतीला होणार असे ऋचिक म्हणाले तेव्हा सत्यवतीने प्रार्थना केली की, "भगवन् आपणाप्रमाणे मूर्तिमंत शांतीच ज्याच्यात आहे असाच पुत्र मला व्हावा. आपल्या चरूच्या प्रभावाने वाटल्यास पौत्र क्षात्र तेजयुक्त होऊ दे.

आणि तसेच घडले. सत्यवतीस तपोनिष्ठ, शांतिसंपन्न, जितेंद्रिय असा जमदग्निसारखा पुत्र झाला आणि त्यांच्या पोटी परशुरामांचा पूर्ण क्षात्रतेजयुक्त असा अवतार झाला.

पूर्वकर्मानुसार जन्म आणि या जन्मीचे कर्म व वर्ण ठरतो हे यावरून कळते. क्षत्रिय कुलात जन्म घेऊन विश्वामित्र ब्रह्मर्षिपदापर्यंत पोचले आणि बाह्मकुलात जन्मलेले भगवान परशुराम क्षात्रधर्माने तळपले. ही उदाहरणे पाहून चातुर्वर्ण्यांचा खरा अर्थ ध्यानात येतो. म्हणून देव म्हणत आहेत की, "अर्जुना, अरे प्रकृतिधर्माप्रमाणे कर्म घडत असते म्हणून मी गुणाप्रमाणे वर्णांची योजना केली आहे. उच्चनीचतेच्या भावाचा त्यात लवलेशही नाही. तेव्हा तू ह्या वर्णांच्या व्यवस्थेकडे गुणांच्या दृष्टिने पहा. म्हणजे तुझ्या ध्यानात येईल की बापाने मिळवलेले द्रव्य मुलास त्याने वाटून द्यावे, सूर्याने वाटसरूंना त्यांचे मार्ग दाखवावे किंवा मालकाने निरनिराळ्या नोकरांना निरनिराळी कामे वाटून द्यावी त्याप्रमाणे प्रकृतिच्या गुणांनी कर्मांची वाटणी चार वर्णांमध्ये केली आहे.

सत्त्वगुण कमी जास्त प्रमाणात असेल त्याप्रमाणे ब्राह्मण व क्षत्रिय केले. रजोगुण पण त्यात सत्त्वगुण थोडा आहे अशा ठिकाणी वैश्य झाले. रजोगुणात तमोगुण मिसळला असेल तेथे शूद्र ठेवले. हे बुद्धिमंता अर्जुना, एकच प्राणीवृंद पण स्वभावजन्य गुणांनीच त्यांचे चार प्रकार केले आहेत.

आपण ठेवलेली वस्तू रात्रीच्यावेळी दिवा दाखवतो. त्याप्रमाणे गुणांनी भिन्न झालेले आपले कर्म शास्त्र दाखवते. कोणत्या वर्णाला कोणते कर्म विहित आहे व त्याचे लक्षण काय हे आता सांगतो. श्रवण सौभाग्यनिधी अर्जुना, तू लक्ष देऊन ऐक.

१ शम (चित्ताची शांती)

२ दम (इंद्रियनिग्रह)

३ तप

४ शुद्धि (बाह्य व आंतर)

५ क्षमा

६ सरळपणा

७ ज्ञान (शास्त्राचाराने ईश्वराची प्राप्ती करून घ्यावयाची)

८ अनुभवयुक्त ज्ञान

९ आस्तिक्य बुद्धि (शास्त्रांनी सांगितलेल्या मार्गाचा आदरयुक्त स्वीकार).

हे ब्राह्मणाचे नऊ गुण आहेत. हे नऊ गुण ज्या कर्मामध्ये प्रगट होतात ते ब्राह्मणाचे स्वभाविक कर्म समज.

ब्राह्मणाचा पहिला गुण आहे शांती. ही चित्ताची शांती कधीही ढळू देता कामा नये. सर्व इंद्रियांच्या वृत्ति आपल्या हातात घेऊन ज्याप्रमाणे पतिव्रता स्त्री मोठ्या प्रेमाने पतीला अनुसरते त्याप्रमाणे तो आपली बुद्धि आत्म्याला भेटवितो. बुद्धि आत्म्याला भेटली की अपार शांतीचा लाभ होतो आणि ही शांती त्याने एकदा अभ्यासपूर्वक मिळविली की ती त्याला कधी सोडून जात नाही.

एका साधुमहाराजांच्याजवळ एक साधक गेला आणि म्हणाला, "महाराज, आत्मसाक्षात्काराचा उपाय मला सांगा."

साधूंनी त्याला एक मंत्र दिला आणि सांगितले की, "एकांतात राहून एक वर्षभर या मंत्राचा जप कर. ज्या दिवशी वर्ष पुरे होईल त्या दिवशी स्नान करून माझ्याकडे ये."

त्याप्रमाणे साधकाचे वर्ष पुरे होत आले. झाडूवालीस साधूंनी सांगितले की, "तो आंघोळ करून आला की झाडलेला सगळा कचरा त्याच्या अंगावर उडव."

झाडूवालीने आपले काम बरोबर बजावले साधक संतापून झाडूवालीस मारायला उठला. मग साधूमहाराजांकडे गेला. महाराज म्हणाले, "आणखी एक वर्षभर एकांतात जप करून मग माझ्याकडे ये." साधक परत गेला व वर्षाने पुन्हा साधूच्या सांगण्यावरून झाडूवालीने अंगावर कचरा टाकला. यावेळी साधकाच्या रागाचा पारा थोडा कमी चढला. पुन्हा वर्षभर जप करण्याची आज्ञा दिली आणि मग मात्र वर्षाने झाडूवालीने अंगावर कचरा उडवल्याबरोबर त्याने हात जोडले आणि म्हटले. "बाई, तू माझी गुरू आहेस." त्याबरोबर साधुमहाराज आसनावरून उठून धावत बाहेर आले. त्यांनी साधकास आलिंगन दिले आणि आश्रमात

नेऊन अनुग्रह दिला. तर ध्यानात घ्यायचे की देव अशा अपार शांतीबद्दल बोलत आहेत.

देव पुढे म्हणाले, “बुद्धि आत्म्याच्या ठिकाणी अंतर्मुख होणे याचे नाव शम आहे.

आणि बाह्य इंद्रियाचे समुदाय विधीच्या दंडाने पिटून त्यांना अधर्माकडे कधीच जाऊ न देणे याचे नाव दम. इंद्रिये आपल्या ताब्यात ठेवण्यासाठी निरनिराळ्या नियमांच्या साखळीत ती ठेवून अंतर्मुख झालेल्या वृत्तिच्या सहाय्याने त्यांचा निग्रह केला की दम सिद्ध होतो.

सिद्धचरित्रातील महादेवमहाराजांचे उदाहरण ध्यानात येते. सुंदर स्त्री त्यांच्यावर अनुरक्त झाली आणि ते स्नानासाठी नदीवर चालले असताना तिने आग्रहाने स्नान, जेवण यांची व्यवस्था केली आणि अस्तमानानंतर त्यांच्या खोलीत प्रवेश केला. महाराज उत्तर गीता वाचत स्वस्थ बसले होते. बाई आलेली पहाताच तिचा हेतू त्यांच्या लक्षात आला. पोथीचे पान बाजूस ठेवून ते बाईंना म्हणाले. “मी सांगीन ते करशील काय?” बाई “हो” म्हणाल्या. त्यांनी बाईंना आपल्यासमोर आसन घालण्यास सांगितले आणि तिची समाधी लावली. पहाटेपर्यंत समाधी अवस्थेचा अनुभव तिला दिला. समाधीतून बाई भानावर आल्यावर त्यांनी महाराजांचे पाय धरले आणि “ही स्थिती अखंड राहू दे” असे मागणे मागितले. इतके महाराजांचे अपूर्व इंद्रिय दमन, जाता जाता कुणाचा उद्धारही साधून देणे हे त्यांचे महात्म्य!

ब्राह्मणाचा तिसरा गुण आहे ईश्वराविषयी मनात सतत विचार बाळगणे. पाचवी सहावीच्या दिवशी दिव्याची वात जशी रात्रभर संभाळली जाते त्याप्रमाणे मनात अखंड ईश्वराचा विचार घोळत असावा, कुठलीही क्रिया करताना देवाच्या पायाशी चित्त जडलेले असावे आणि तेही सतत.

चैतन्यमहाप्रभूंची शेवटची बारा वर्षे जगन्नाथपुरीमध्ये गेली. बराच वेळ ते दिव्योन्मादात असत. फार थोडा वेळ जागृतीत असत. सहसा भक्त नेहमी बरोबर असत. पण एकदा समुद्र किनाऱ्यावर ते एकटेच उभे होते. समुद्राच्या उसळत्या लाटा व रंग पाहून त्यांना एकदम कृष्णाचे स्मरण झाले. समुद्र कृष्णरूप दिसू लागला. त्यांनी कृष्णाला भेटायला म्हणून समुद्रात उडी मारली. शेवटी एका कोळ्याच्या जाळ्यात त्यांचा देह अडकला, कोळ्यांनी प्रभूंना तीरावर आणून ठेवले. भक्तांना जेव्हा हे समजले त्यावेळी भक्त धावतच त्या ठिकाणी गेले आणि नामसंकीर्तन करून त्यांनी प्रभूंना सावध केले. इतकी देवाशी त्यांची तन्मयता झाली होती. ब्राह्मणाने ही तन्मयता साधण्याची पराकाष्ठा करावयाची आहे.

ब्राह्मणाचा तिसरा गुण “तप” आहे. शरीर, वाचा, मन या सर्वांनी एका मेळाने हे तप केले पाहिले. श्री. रमण महर्षींनी म्हटले, “आपण करीत असलेले नामस्मरण कानाने ऐकणे आणि त्यावर चिंतन करणे याचे नाव तप.”

उपमन्यू एक दिवस आईच्या मांडीवर बसला आणि म्हणाला, “आई, मला थोडे गोड दूध दे.” आईचे डोळे आसवानी भरले. ती म्हणाली, “बाळा आपण गरीब आपल्याजवळ तर धान्यसुद्धा नाही. तुला दूध रे कोठून देऊ?”

पण उपमन्यू ऐकेना. मग आईने थोडे पीठ पाण्यात कालवून ते दूध म्हणून त्याला दिले. तो रागावून म्हणाला, “हे काय दूध आहे? खरं दूध तर गोड असतं” उपमन्यू रडू लागला.

आई त्याला समजावू लागली. ती म्हणाली. “बाळा संसारात हिरे, मोती सगळे काही असते पण ते भाग्यवानांना मिळतात. आपण अभागी आहो. आपल्याला खरे दूध मिळणेसुद्धा कठीण आहे. भगवान शिव सर्व शक्तिमान आहेत ते तपाने प्रसन्न होतात. ते प्रसन्न झाले तर तुला दुधाचा समुद्रसुद्धा देतील.”

“ठीक आहे. मी शिवांना प्रसन्न करून घेईन आणि क्षीरसमुद्र मिळवीन.” उपमन्यू दृढ निश्चयाने म्हाणाला. क्षणात त्याने घर सोडले, आणि हिमालयाची वाट धरली. तिथे जाऊन घोर तपाचरण सुरू केले. महादेव प्रसन्न व्हावे म्हणून त्याने अन्नपाणीसुद्धा सोडले. या उग्र तपाने सगळ्या जगाला ताप होऊ लागला. सर्व देवांनी शिवांची प्रार्थना केली की, “भगवन्, उपमन्यूला तपापासून निवृत्त करावयास आपल्याशिवाय कोणीही समर्थ नाही.” शिवांनी मान डोलावली व इंद्राचा वेष धरून मायावी ऐरावतावर बसून उपमन्यू तप करीत होता तेथे प्रवेश केला.

“बाळा इतके उग्र तप तुझ्या बालवयाला योग्य नाही.” इंद्रवेषधारी शिव म्हणाले. उपमन्यूने वंदन केले आणि म्हटले, “आपण आला हा आश्रम धन्य झाला. आपण मला आशीर्वाद द्या की शिवचरणावर माझी भक्ति दृढ असावी.”

इंद्रवेषधारी शिव म्हणाले, “अरे, शिवाची प्राप्ती होणे कठीण आहे. मी इंद्र, तिन्ही जगाचा स्वामी आहे. तू मला शरण ये. तुला मी उत्तमोत्तम भोग प्रदान करतो.”

उपमन्यू त्वेषाने म्हणाला, “माझ्या दैवताची निंदा करता? मला तर वाटते की इंद्रवेषात आपण कुणीतरी दैत्यच अहा. माझ्या तपामध्ये विघ्न आणण्यासाठी आला अहा. अरे तू शिवनिंदक आहेस. थांब तुझा प्राणच घेतो.” असे म्हणून उपमन्यू अंगावर धावून गेल्याबरोबर शिव प्रसन्न झाले. त्यांनी आपले रूप प्रकट केले.

शिवांचे दर्शन झाल्याबरोबर उपमन्यूने त्यांचे पाय धरले. शिवदेव म्हणाले, “बाळा, तुझी परीक्षा पाहिली रे. तू तर निश्चल भक्त झालास. तुझ्या तपाने मी प्रसन्न झालो आहे. तुला क्षीरसागरच देतो आणि हे बघ यापुढे ही जगन्माता पार्वती तुझी आई आणि मी तुझा पिता.”

जगन्मातेने त्याला जवळ घेतले आणि योग, ऐश्वर्य आणि ब्रह्मविद्या दिली. मग ते अपूर्व मातापिता अंतर्धान पावले.

देव “तप” या शब्दाने असे तप सुचवित आहेत. ब्राह्मणाचे तप असे असले पाहिजे असे त्यांचे म्हणणे आहे.

अनुक्रमणिका

देव पुढे म्हणाले, “ब्राह्मणाचा चौथा गुण शुचिता हा आहे. मन भावशुद्धिमुळे आणि शरीर विहित कर्माचरणामुळे शुद्ध झाले पाहिजे.

पृथ्वीप्रमाणे सर्व काही सोसणे हा ब्राह्मणाचा पाचवा गुण आहे. सुरामध्ये जसा पंचम तसा हा पाचवा गुण अत्यंत महत्त्वाचा आहे. कोणी, कसलाही कितीही अपराध करो ब्राह्मणाने त्या अपराधाची क्षमाच केली पाहिजे. इतकेच नव्हे तर आपण सगळे अपराध सहन केले हा अहंकारही मनात येता कामा नये. पृथ्वी माणसाकडून भाजली जाते, खणली जाते, नांगरली जाते पण ती माता माणसाला ह्या सगळ्या अपराधांची क्षमा करते. आपल्याला झालेले क्लेश ती विसरते आणि प्रेमाने पेरलेल्या धान्याच्या शतपटीने धान्य माणसाच्या पदरात टाकून त्याचे पोषण करते आणि नव्या पिकासाठी क्लेश सोसण्यास तयार होते. ब्राह्मणाची क्षमा ही अशी असली पाहिजे. कामधेनूच्या लोभाने विश्वामित्राने वसिष्ठांचे शंभर पुत्र मारले पण वसिष्ठांनी ते सर्व दुःख मुकाट्याने सहन केले इतकेच नव्हे तर एकदा पांढरे स्वच्छ चांदणे पडलेले पाहून पत्नीला ते म्हणाले. “पहा चांदणे कसे विश्वामित्राच्या तपासारखे निर्मल आहे.” ही खरी क्षमा आणि अशी क्षमा ब्राह्मणाकडून देवांना अपेक्षित आहे.

अर्जुना, वागणुकीचा सरळपणा हा ब्राह्मणाचा सहावा गुण आहे. दुसरा कसाही वागो. खरा ब्राह्मण आपला सरळपणा सोडत नाही. वाकड्या ओघांतून गंगा सरळच वहाते, वाकडा वळलेला ऊस गाडीच्या बाबतीत सरळच असतो त्याप्रमाणे आपल्याशी विरोध करणाऱ्या माणसाशीही ब्राह्मणाचे वर्तन सरळ असावे.

ज्ञान हा ब्राह्मणाचा सातवा गुण आहे. माळी प्रयत्नपूर्वक झाडाच्या मुळांना पाणी घालतो पण त्याला पक्के माहीत असते की आपल्या श्रमाचा परिपाक फळामध्ये पहायचा आहे. ब्राह्मण जाणून असतो की शास्त्राप्रमाणे आचरण ठेवीत गेले की त्या कर्माचे फल ईश्वर प्राप्ती हे आहे.

आता ह्या ज्ञानामुळे, शास्त्रामुळे किंवा ध्यानामुळे ईश्वर तत्त्वामध्येच बुद्धि निश्चये करून मिळते. अर्जुना, याला विज्ञान म्हणावयाचे ते विज्ञान ह्या गुणांत आठवे गुणरत्न आहे. राजाचा शिक्का असलेला हुकूम भलतासलता असला तरी प्रजा मानते. त्याप्रमाणे शास्त्राने जो मार्ग सांगितला, मान्य केला, तो आदराने आपण मान्य करणे ह्याला मी आस्तिक्य ह्या नावाचा नवा गुण म्हणतो.

अर्जुना, हे नऊ गुण ब्राह्मणाचे भूषण आहेत. सूर्याजवळ प्रकाश निरंतर असतो त्याप्रमाणे ब्राह्मण ह्या नऊ गुणांचा हार कधीही न उतरविता अंगावर वागवितो. तो ह्या नऊ गुणांचा समुद्रच आहे. चाफ्याचे झाड सतत फुलांनी भरलेले असावे, चंद्र चांदण्याने शुभ्र झालेला असावा, चंदन सुवासाने सतत मंडित झालेला असावा, त्याप्रमाणे नऊ गुणांनी जडलेला हा निर्दोष अलंकार ब्राह्मणाचे अंग सोडीत नाही आणि ह्या नऊ गुणांच्या प्रकाशात त्याचे पाऊल क्षणाक्षणास भगवंताच्या दिशेने पडत जाते आणि एक दिवस तो करुणामय त्याला आपल्यात सामावून घेतो.

अर्जुना, क्षात्रधर्माचा सुंदर पुतळा तू स्वतःच आहेस. तुला क्षत्रियाचे गुणवर्णन करून सांगण्याचे कारणही नाही. पण सांगतो ऐक. क्षत्रियाचे गुण आणि त्या गुणानुरूप त्याचे कर्म हे एखाद्या सूर्याच्या तेजासारखे स्वयंप्रकाशी आहे. प्रकाशासाठी त्याला कुणाच्या मदतीची अपेक्षा नसते. सिंह शिकारीसाठी कुणाच्या

अनुक्रमणिका

सहाय्याची वाट पहात नाही. क्षत्रिय त्या सिंहासारखा सामर्थ्याशाली असतो, कुणाच्या आधाराशिवाय उत्कर्षास येतो. ह्या गुणास शौर्य म्हणावाचे व हा क्षत्रियाचा पहिला गुण आहे. सूर्य आपल्या प्रतापाने कोट्यवधि नक्षत्रांचा लोप करून टाकतो. पण त्या असंख्य नक्षत्रांच्या मदतीस चंद्र जरी धावला तरी त्या सर्वांकडून एकट्या असलेल्या दीप्तिमान सूर्याचा लोप होऊ शकत नाही. आपल्या सामर्थ्याने आणि गुणाने जगाला विस्मित करून सोडणे पण आपल्या अंतःकरणात क्षोभ उत्पन्न होऊ न देणे याला तेज असे म्हणावयाचे. हा पाणीदारपणा क्षत्रियाचा दुसरा गुण आहे.

धैर्य हा क्षत्रियाचा तिसरा गुण आहे. आकाश वरून पडले तरीही त्याच्या मनाकडून बुद्धिचे डोळे झाकले जात नाहीत. ज्या गुणाच्या सामर्थ्याने हे घडते त्याला धैर्य असे म्हणावयाचे.

पाणी वाटेल तितके खोल असले तरी ते जिंकून कमळ वर येते आणि फाकते, कितीही उंच वस्तू असली तरी आकाश तिच्याहूनहि उंच रहाते, त्याप्रमाणे नाना प्रकारच्या अवस्था प्राप्त झाल्या तरी त्या जिंकून त्यातून निर्माण होणाऱ्या हर्ष, भय, शोकादि विकारांचे बुद्धिने भेदन करणे याला दक्षत्व म्हणावयाचे. अर्जुना, हा क्षत्रियाचा चवथा गुण आहे.

लोकोत्तम युद्ध हा क्षत्रियाचा पाचवा गुण आहे. आदित्याची झाडे ज्याप्रमाणे सूर्याकडे तोंड वळवत असतात त्याप्रमाणे क्षत्रिय नेहमी शत्रूला तोंड देत असतो. कधीही पाठ दाखवत नाही. चारही पुरुषार्थाच्या वर जशी भक्ति तसा हा क्षत्रियांच्या आचारातील सर्वश्रेष्ठ असा पाचवा गुण आहे.

आता दान हे क्षत्रियाचे सहावे गुणरत्न आहे. वृक्ष आपल्याजवळची फुले, फळे दान करून मोकळ्या शाखांनी मिरवतो किंवा कमळ आपला सुगंध आपल्याजवळ न ठेवता त्याचे दाही दिशांना दान करते. त्याप्रमाणे क्षत्रिय पराक्रमाने धन मिळवतो आणि त्याचे उदारपणाने दान करून टाकून नव्या पराक्रमाची सिद्धता करतो. अर्जुना, दान देणे हे क्षत्रियाच्या स्वभावात इतके मुरलेले असते की रामलक्षणाच्या विवाहात कन्यादानाचा प्रसंग आल्याबरोबर लक्ष्मण उसळून म्हणाला, "दान? मला? मी क्षत्रिय आहे. दान देत असतो, घेत नसतो!"

पसरलेले चांदणे ज्याला जेवढे हवे असेल तेवढे त्याने खुशाल घ्यावे त्याप्रमाणे ज्याला जे हवे असेल ते दान तो क्षत्रिय मोठ्या आनंदाने देत असतो. अर्जुना, या दानशूरात क्षात्रतेजाने झळकणाऱ्या कर्णाने आपल्या अक्षय्य कवचकुंडलांच्या दानाने पहिल्या प्रतीचे स्थान सहज घेतले आहे, हे तुझ्या ध्यानात आहेच. अरे यात तो खऱ्याखुऱ्या क्षत्रियासारखाच वागला आहे. परशुरामांनी एकवीस वेळा पृथ्वी निःक्षत्रिय केली व सर्व पृथ्वीचे स्वामित्व त्यांना मिळाले. तेव्हा त्यांनी विश्वजित यज्ञ केला आणि क्षत्रिय संहाराच्या मोहिमेत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष जे जे काही मिळाले त्याचे दान केले. देण्यासारखे असे त्यांनी काहीही जवळ शिल्लक ठेवले नाही. "माझ्याजवळ शस्त्रविद्या आणि शरीर तेवढे शिल्लक आहे बाकी सर्व मी मागेच दान करून टाकले." असे परशुरामांनी द्रोणाचार्यांना सांगितले असे हे क्षत्रियांचे असामान्य दान! क्षत्रियाचा हा सहावा गुण अर्जुना, तुझ्या ध्यानात असू दे.

ईश्वरभाव हा क्षत्रियाचा सातवा गुण आहे. ईश्वरभाव याचा अर्थ नियामक शक्ति. हा गुण म्हणजे क्षत्रियांच्या सर्व गुणांचा राजा आहे. आपले हातपाय आपल्या मर्जीप्रमाणे राबवून त्यांच्याकडून काम करून घ्यावे त्याप्रमाणे प्रजेचे पालन करून, प्रजेची काळजी वाहून तिचे नियमन करण्याच्या शक्तिस ईश्वरभाव म्हणावयाचे. ईश्वर जसा जगाचा शास्ता, पालनकर्ता, पिता, नियमनकर्ता आहे तसा क्षत्रिय असला पाहिजे.

शौर्यादिक सात गुणांनी क्षत्रिय भूषविला जातो. आकाशात जसे सप्तर्षि झळकतात तसे हे सात गुण राजाच्या अंगी झळकत असतात. आता या सात अलौकिक गुणांनी जे कर्म पवित्र केले आहे ते क्षात्रकर्म आहे असे जाणावे. अरे, तो क्षत्रिय नव्हे तर सत्त्वरूपी सोन्याचा मेरू पर्वत आहे. ही सातगुणरूपी समुद्रांनी वेढलेली पृथ्वीच तो क्षत्रिय भोगीत आहे असे त्याचे दिव्यकर्म पाहून वाटते किंवा क्षत्रिय हा समुद्र आहे व हे सात गुणांचे ओघ मिळून झालेली गंगा त्या समुद्रात प्रवेश करीत आहे असे वाटते. जास्त काय सांगू? शौर्यादिक सात गुणात्मक कर्म हे क्षत्रियांचे स्वाभाविक कर्म आहे हे तू जाणून घे.

विशालबुद्धि अर्जुना, आता वैश्याच्या जातीला योग्य जे कर्म आहे ते निश्चयात्मक सांगतो ऐक. जमीन, बी, नांगर या भांडवलाचा आधार घ्यावा, शेती करावी, गायी बाळगून रहावे, वस्तू स्वस्त घेऊन महाग विकाव्या आणि पुष्कळ नफा मिळवावा हा वैश्यांच्या कर्माचा मेळावा आहे. त्यांच्या स्वभावाला अनुसरून एवढेच कर्म त्यांना योग्य आहे.

वैश्य, क्षत्रिय, ब्राह्मण हे तिन्ही वर्ण द्विजन्मे आहेत. यांची सेवा करावी तेवढेच शूद्रांचे कर्तव्य आहे. या सेवेपलीकडे शूद्रांवर आणखी काही कर्म करण्याची जबाबदारी नाही. याप्रमाणे पार्था, चारही वर्णांना उचित असलेली कर्मे तुला सांगितली आहेत.

अर्जुना, वेगवेगळ्या वर्णांना वेगवेगळी कर्मे सांगण्याचा हेतू असा की गोऱ्या अंगाला जसा गोरेपणा शोभतो त्याप्रमाणे वर्णाश्रमधर्मानुसार जे कर्तव्यकर्म भागाला आले असेल तेच त्याला शोभते. प्रत्येक इंद्रियाला जसा वेगळा विषय नेमलेला असतो तसेच हे आहे. मेघांपासून खाली पडलेल्या पाण्याला नदी योग्य आणि नदीला जसा समुद्र योग्य त्याचप्रमाणे ज्याचे जे विहित कर्म वाट्यास आले असेल ते स्वभावानुसार आले असल्याने योग्यच आहे.

वीरोत्तम अर्जुना, आपले विहित कर्म कोणते हे कळण्यासाठी शास्त्राच्या मुखातून त्याचा निर्णय करून घ्यावा. आपलेच रत्न पण ते रत्नपारख्यास दाखवून पारखून घ्यावे त्याप्रमाणे आपले विहित कर्म शास्त्राकडून पारखून घ्यावे आणि मग निश्चयात्मक बुद्धिने त्या कर्माची कास धरावी. दृष्टि शाबूत आहे पण रात्र पडली आहे अशावेळी दिवा हाती घेतल्यावाचून आपल्याच मालकीची वस्तू आपल्याला मिळणार कशी? आपले पाय धडधाकट आहेत पण जर रस्ताच सापडला नाही तर पाय असून काय उपयोग आहे. तेव्हा आपआपल्या जातीप्रमाणे जो अधिकार आपल्याला प्राप्त झाला असेल तो शास्त्राला विचारून स्पष्ट करून घ्यावा. आता मात्र आपल्या घरात आपणच ठेवलेली वस्तू पण अंधारात सापडत नव्हती ती हाती दिवा आल्याबरोबर सापडण्यास अडचण नाही.

पांडवा, स्वाभावाने आपल्या भागास आले, शास्त्राने त्याला सम्मती दिली की जे विहित कर्म स्पष्ट होईल ते आचरावे बाबा.

पण ते कर्म अगदी झडझडून करावे. आळस टाकून द्यावा, फलाशा दवडून टाकावी आणि शरिराने आणि मनाने ते कर्म करण्याकडेच सगळा भर ठेवावा. ओघात पडलेले पाणी उलट वाहत नाही सरळ ओघाबरोबर जाते त्याप्रमाणे ह्या कर्माचे व्यवस्थित आचरण करावे.

अर्जुना, असे कर्म आचरणाऱ्याची योग्यता तुला काय सांगू? अरे, तो मोक्षाच्या अलिकडच्या दारात प्रतिष्ठित होतो. तो विहित कर्म टाकत नाही आणि काम्य व निषिद्ध कर्म करत नाही. या दोन्हींशी तो आपला जरासुद्धा संबंध येऊ देत नाही. त्यामुळे तो संसारयोनीला मुकतो, काम्यकर्म म्हणजे चंदनाचा असला तरी पायातला खोडाच आहे हे समजून घेऊन तो कौतुकानेसुद्धा त्या खोड्यात पाय अडकू देत नाही. नित्यकर्माचे फल त्याने आधीच टाकून दिले आहे आणि म्हणून त्याला कर्म बंधनात घालूच शकत नाही. हळूहळू चालता चालता तो मोक्षाच्या शिवेवर येतो. पापपुण्यात्मक संसाराने त्याचा त्यागच केला असल्यामुळे तो सहज वैराग्यरूपी मोक्षाच्या द्वारात उभा राहतो.

अर्जुना, अरे हे वैराग्य म्हणजे सामान्य वस्तू नव्हे. ती सर्व भाग्याची सीमा आहे. मोक्षप्राप्तीचे ज्ञान करून देणारी आहे. कर्म मार्गाच्या श्रमांच्या ह्या वैराग्याच्या ठिकाणी शेवट होतो. वैराग्य हे मोक्षाचे तारण आहे. वैराग्याने मोक्ष मिळणारच असा करार आहे. तेव्हा ते वैराग्य पुण्यरूप वृक्षाला आलेले फूल आहे. अत्यंत सुगंधित फूल आहे. एखाद्या भुंग्याने फुलावर अलगद पाऊल टेकावे तसा तो निष्काम कर्म करणारा जीव वैराग्यरूपी फुलावर पाऊल ठेवतो आणि त्या वैराग्यातच रंगून जातो. वैराग्याची प्राप्ती म्हणजे आत्मज्ञानाचा निर्मळ दिवस आता उगवणार हे सांगणारा मंगल अरुणोदयच आहे. किंबहुना आत्मज्ञानाचा ठेवा हस्तगत करून देणारे वैराग्य हे अंजनच आहे. ते दिव्यांजन तो साधक डोळ्यात घालतो.

अर्जुना, या विहित कर्माचे अनुष्ठान केल्यामुळे त्या मुमुक्षूला मोक्षाचा अधिकार प्राप्त होतो. पार्था, याप्रमाणे आपल्या वाट्यास आलेले कर्म चोखपणाने केले की आपले आयुष्य कृतार्थ झाले असे समजावे आणि त्याजबरोबर हे ध्यानात घ्यावे की सर्वात्मक असा जो मी त्याचीही तीच सर्वश्रेष्ठ सेवा आहे. पतिव्रता स्त्री पतीसह जी जी क्रीडा करते ती तिने तपेच केली असे समजावे. लहान बाळाला आईशिवाय जगण्याचे दुसरे काय साधन आहे? म्हणून त्याने आईचा आधार घ्यावा, हाच त्याचा धर्म आहे. मासा गंगेत राहिला भरपूर पाणी आहे म्हणून पण गंगेचा आधार घेतल्यामुळे सर्व तीर्थाचे जे विश्रान्तीचे स्थान समुद्र तिथे आपोआपच पोहोचला. त्याप्रमाणे आपल्या विहित कर्माला विसंबू नये हाच मोक्षप्राप्तीचा उपाय आहे. अशा तऱ्हेने विहित कर्म केले की त्याचे ओझे त्या जगन्नाथावर पडते, त्याला मोक्ष द्यावाच लागतो.

पार्था, हे ध्यानात घे की अमक्याने अमुक काम करावे हे त्या ईश्वराचेच मनोगत आहे. आपल्या स्वामीचे मनोगत ओळखून काम करणारा सेवक स्वामीला किती प्रिय होतो! तसेच तेथे घडते. मनोगत ओळखून कर्म केले की ते कर्म थेट त्या ईश्वरापर्यंत नेऊन पोचवतेच. एखादी दासी मालकाच्या कसोटीस उतरली तर पूर्वीची दासी खरी पण स्वामीला संतोष दिल्यामुळे मालकीण होते. स्वामीकार्यासाठी तळहातावर शिर घेणाऱ्या

योद्ध्याला इनाम देऊन त्याची सनद दिली जाते त्याप्रमाणे इथे घडते. स्वामीच्या मनाप्रमाणे वागणे हीच स्वामींची परमसेवा असते. पांडवा, हे सोडून केलेल्या बाकीच्या सर्व क्रिया केवळ व्यापार होतो. ज्यापासून ही सगळी भूते आकाराला आली त्याची आज्ञा पाळावी म्हणून वाट्यास आलेले कर्म उत्तम प्रकारे केले म्हणजे त्या ईश्वराला अत्यंत संतोष होतो. तो परमात्मा अज्ञानरूपी चिंध्या गुंडाळून जीवरूपी बाहुल्या तयार करतो. त्रिगुणात्मक अहंकाररूपी दोरीने तो त्या खेळवीत असतो. सगळ्या दिव्यांमध्ये जसे एकच तेज भरून राहिलेले असते त्याप्रमाणे हा ईश्वर जगात आतबाहेर भरून राहिलेला असतो. त्या सर्वात्मक ईश्वराची पूजा स्वकर्माच्या फुलांनी बांधली तर त्याला अपार संतोष होतो. त्या पूजेने प्रसन्न होऊन तो आत्मराज वैराग्य हा प्रसाद देत असतो. ह्या वैराग्याचा लाभ झाला की ईश्वराचाच फक्त बोध शिल्लक रहातो आणि इतर वस्तू नकोशा होतात.

प्राणनाथाच्या ध्यासाने विरहिणीला जीवन नकोसे होते त्याप्रमाणे संसारातील सर्व सुखे दुःखाप्रमाणे त्रासदायक वाटू लागतात. अजून यथार्थ व्हावयाचे आहे अशा स्थितीतच ईश्वराच्या वेधाने तन्मयता प्राप्त होते अशी बोधाची योग्यता त्याला लाभते. म्हणून मोक्षाच्या प्राप्तीसाठी जो शरीर, वाचा, मन यांच्या सहायाने व्रते आचरत असतो त्याने स्वधर्माचे अनुष्ठान उत्तम प्रकारे करावे.

आपला स्वधर्म आचरण करण्यास जरी कठीण असला तरी त्या स्वधर्माचरणाचे फल मोक्ष आहे ह्याकडे दृष्टि ठेवावी. निंब कडू आहे पण तो घेतला तर आपल्या प्रकृतिस बरे वाटून सुख होते असे ठरले की, तो कडू आहे म्हणून घ्यावयास कंटाळा करून कसे चालेल? कडू असतानाही पुढे मिळणाऱ्या आरोग्याकडे लक्ष देऊन आपण तो घेतलाच पाहिजे. ‘केळीला काय नुसती पानेच येत आहेत काय उपयोग आहे या झाडाचा’ असे म्हणून कोका पडण्यापूर्वीच जर केळ तोडून टाकली तर अत्यंत रसाळ असा तो केळीचा घड आपल्याला कोठून मिळेल? स्वधर्म कठीण आहे म्हणून तो टाकला आणि दुसऱ्याच्या धर्माचा स्वीकार केला तर मोक्षसुख अंतरणारच. आपली आई कुरूप आहे, दुसरी बाई सुस्वरूप आहे म्हणून काय बाळाने आपल्यावर जीव टाकणाऱ्या, आपले पालनपोषण करणाऱ्या त्या कुरूप आईचा त्याग करून त्या सुंदर बाईला आई म्हणावे? आई कुरूप म्हणजे ती जे प्रेम करते ते ही कुरूप आहे काय? परक्या स्त्रिया रंभेहून सुंदर आहेत पण त्या बाळाला त्याचा काटा उपयोग आहे? पाण्याहून तुपात पुष्कळ चांगले गुण आहेत म्हणून त्या माशाला पाणी सोडून काय त्या तुपात जगता येते काय? अरे सगळ्या जगाला जे विष ते त्या विषात जगणाऱ्या किड्यांचे जीवन असते आणि सगळ्या जगाला प्रिय असणारा गूळ त्याचे मरण असते. म्हणून संसाराचे धरणे उठवायचे असेल तर ज्याच्या वाट्याला जी क्रिया आली असेल ती भली कठोर असली तरी त्याने तीच केली पाहिजे. पायाचे चालणे पायानेच करावे. ते डोक्याने करता येते काय? दुसऱ्याच्या आचार आपल्या काय कामाचा? जाती आणि स्वभाव यांच्यामुळे जे कर्म वाट्यास आले ते जो मनुष्य चोखपणे करतो त्याने कर्मबंधावर विजय मिळवला असे समज.

अर्जुना, मनात विकल्प आणून एखाद्याने असे ठरविले की स्वधर्माचे आचरण करावे, दुसऱ्याचा धर्म टाकावा हा नियम मी पाळणार नाही, वाटल्यास कर्म करीन नाहीतर करणारच नाही. कर्म केलेच पाहिले किंवा अमूकच केले पाहिजे हा कायदा मी काय म्हणून पाळावा? कर्मबंध निर्माण होऊ नये एवढेच ना? मग कर्म केलेच नाही म्हणजे झाले.

अनुक्रमणिका

तर अडचण अशी आहे की जोवर आत्मानुभव आलेला नाही तोवर कर्म करणे थांबत नाही. कुठल्या ना कुठल्या स्वरूपाचे कर्म हातून घडतेच. अरे, मी कुठलेही कर्म करणार नाही हा जीवाचा आग्रह आणि त्या नियमांचे पालन हे देखील एक प्रकारचे कर्म होते व ह्या आग्रहाचा बंध तयार होतो. तेव्हा तू लक्षात ठेव की कर्म करणे कधी चुकत नाही आणि म्हणून त्या कर्माचे श्रमही चुकत नाहीत. अशा स्थितीत कर्म करावयाचेच तर स्वधर्माप्रमाणे कर्माचरण करण्यात काय दोष आहे? आडरानातून धावले तरी पाय शिणणारच आणि राजरस्त्याने धावले तरी शिणणारच मग राजरस्त्यानेच धावणे योग्य नाही काय? ओझे वहायचेच तर शिळा वाहण्यापेक्षा शिदोरी वाहिली तर निदान विश्रान्तीच्या वेळी पोटभर अन्न तरी मिळेल. शिळा वाहून वहाताना भार आणि प्रवासाच्या शेवटी पण भारच! तांदूळ आणि कोंडा कांडताना होणाऱ्या श्रमात काही फरक नाही पण श्रमाच्या परिणामात किती अंतर! दही आणि पाणी घुसळताना घुसळण्याचे श्रम सारखेच पण पाणी घुसळण्याचे श्रम फुकट आणि दही घुसळल्यावर शेवटी लोणी हाती येते. वाळू घाण्यात घातली तर नुसतेच श्रम आणि तीळ घातले तर शेवटी तेल मिळते. अग्नि पेटवला की धूर सहन करावा लागतो, पण तोच अग्नि जर होमासाठी पेटवलेला असला तर श्रमाचे उत्तम फल देतो. लग्नाची स्त्री व अन्य संबंधाची स्त्री दोघींना पोसण्याचे श्रम सारखेच पडतात मग दूषणास्पद संबंध करून अपकिर्ती पदरात कशाला घ्यावयाची? अरे, लढाईत एखादा योद्धा आपल्या मागे हत्यार घेऊन धावत असला तर फुकट त्याच्या हातून भ्याडासारखे मरण्यापेक्षा उलटून चार हात करून पराक्रम गाजवून मेलेले बरे नव्हे काय? एखादी वाईट चालीची बाई नवऱ्याला सोडून दुसऱ्याच्या घरी जाऊन राहिली आणि जर तिथेही तिला दांडक्याने मार खावा लागला तर नवऱ्याला उगीचच सोडले असे ठरत नाही काय? त्याप्रमाणे आपल्याला आवडणारे कर्म करावे असे म्हटले तरीसुद्धा श्रम केल्याशिवाय ते सिद्ध होतच नाही मग विहित कर्म श्रमाचे आहे असे कोणत्या तोंडानी म्हणावे सांग बरे.

अर्जुना, अमृत अक्षय्यत्व देते व ते मिळते आहे असे कळल्यावर आपले सर्वस्व देऊनही अमृत मिळविण्याचाच प्रयत्न करणे हे शहाणपणाचे आहे ना? का पैसे देऊन विष विकत देऊन आत्मघात करून घेणे हे बरोबर आहे? त्याप्रमाणे इंद्रियांना जाच करून, आयुष्याचे दिवस खर्च करून पापाचा संचय केला तर आपल्या पदरात दुःखावाचून दुसरे काय पडणार आहे? म्हणून म्हणतो की श्रम करावे केवळ स्वधर्म आचरण्यासाठी! हा स्वधर्म कर्माचे श्रम हरण करतो आणि चारी पुरुषार्थांपैकी जो वरिष्ठ पुरुषार्थ म्हणजे मोक्ष तो देतो. संकटामध्ये जसे सिद्धमंत्रास विसंबू नये तसेच स्वधर्माच्या आचरणामध्ये कधीही कंटाळा करू नये. महासमुद्रात नाव, महारोगामध्ये दिव्यौषधी जशी तारक तसाच स्वधर्म तारक आहे हे विचारात ठसवून घ्यावे. कपिध्वजा अर्जुना, ह्या स्वकर्माच्या पूजेमुळे त्या ईश्वरास अत्यंत आनंद होतो. साधकाच्या चित्तावरची रजोगुणाची व तमोगुणाची काजळी झाडून काढतो, जीवाला शुद्ध सत्त्वाची उत्कंठा लावतो, स्वर्ग व संसार काळकूट विषाप्रमाणे वाटावयास लावतो आणि मागे ज्या वैराग्याचे वर्णन केले त्या मुक्कामाला मुमुक्षूला आणून पोचवितो.

वारा जसा जाळ्यात अडकत नाही तसा हा वैराग्यशील पुरुष देहादिक संसाररूपी पसरलेल्या गंताड्यात सापडत नाही. फळ पिकले की मग फळ देठाला धरत नाही त्याप्रमाणे तो संसारास चिकटत नाही आणि त्याला संसार चिकटत नाही. पुत्र, पत्नी, धन ही सर्व अगदी त्याच्या मनाप्रमाणे असली तरी ही सगळी माझी आहेत असे तो म्हणत नाही. विषाच्या पात्रापासून जसा शहाणा दूर रहातो तसा तो ह्या प्रपंचाच्या आसक्तीपासून त्या आसक्तीचे परिणाम ध्यानात ठेवून नित्य सावध रहातो, दूर रहातो. ममत्व गळूनच पडते.

विषयांच्या अनुभवाने पोळून निघालेली बुद्धि पाऊल मागे घेते आणि हृदयाच्या एकान्तामध्ये शिरून बसते. एखाद्या समर्थाच्या भयाने त्याची दासी जशी त्याने घालून दिलेली मर्यादा मोडत नाही त्याप्रमाणे त्या साधकाने 'बाहेर विषयाकडे जाऊ नको, माझी शपथ आहे.' अशी बुद्धिला घातलेली शपथ ती मोडत नाही. आता बाहेरचा तिचा नाद सुटला की ती स्थिर होते आणि मग तो साधक चित्त एकाग्र करून अंतःकरण आत्म्याच्या वेधात जोराने लावतो. सूर्यप्रकाशात धरलेला सूर्यकांत जसा सूर्याचे किरण एकाग्र करून खाली धरलेला कापूस प्रज्वलित करतो त्याप्रमाणे विषयापासून काढून घेतलेले आणि एकाग्र केलेले अंतःकरण आत्म्याकडे लावले की उरले सुरले किल्मिष जळून जाऊन ज्ञानाचा प्रकाश प्रगट होऊ लागतो. अग्नि राखेने दडपावा त्याप्रमाणे ऐहिक आणि पारलौकिक ह्या दोन्हींबद्दलची अभिलाषा संपली आहे व मन अगदी झळझळीत शुद्ध झाले आहे अशा भूमिकेवर साधक आरूढ होतो.

पांडवा, अरे त्याचे विपरीत ज्ञान नाहीसे झाले आहे, ज्ञानाच्या ठिकाणी निश्चय स्थिर झाला आहे अशी अवस्था होते. साठवलेले पाणी संपते त्याप्रमाणे प्रारब्ध भोगून संपते आणि नवे कर्म करीत असतानाच त्याने फलत्याग केला असल्यामुळे ते कर्म फल देतच नाही.

अर्जुना, ही अशी कर्मसाम्यदशा प्राप्त झाली की,

**"श्रीगुरू भेटेचि आपैसा"**

शिष्याची अशी भूमिका कधी स्थिर होते आणि मी त्याला आपला कधी म्हणतो असेच जणू श्रीगुरू मनाशी म्हणत असतात आणि ज्या क्षणी साधकाची अशी अवस्था होते त्या क्षणी त्या शिष्याच्या उद्धारासाठी, त्याला पूर्णत्वास नेण्यासाठी आपणहून उडी घालतात.

गुरूदेव रानड्यांनी एका निरक्षर अंत्यजास व एका साध्या भोळ्या ड्रायव्हरला बोलावून आणून नाम दिले. याविषयी बोलताना ते म्हणाले, "आमच्या मागे पुष्कळ जण असतात पण आम्हीही काही जणांच्या मागे असतोच."

देव म्हणत आहेत, "अर्जुना, रात्रीचे चार प्रहर संपले की अंधाराचा नाश करणारा तो सूर्य येऊन डोळ्यांना भेटतो, फळाचा घड लागूनच केळीची वाढ थांबते. त्याप्रमाणे गुरू भेटून त्या साधकाची सर्व तळमळ शांत करतात, त्याचे कर्मकर्तृत्व संपवतात.

शेगावच्या गजानन महाराजांच्या लीळाचरित्रात एक कथा आहे. शेगावच्या दक्षिण दिशेला चिंचोली हे गाव आहे. त्या गावचा माधव नावाचा एक ब्राह्मण एके दिवशी महाराजांच्याकडे आला आणि महाराजांच्या दारी उपोषण करीत बसला. तोंडाने नारायणाचा जप चालला होता. अंतःकरण पश्चात्तापाचे बोल बाहेर पडत होते. अंतःकरण ओरडून उठले होते. "तरुणपणी मी सढळ हाताने संसार केला तो संसार आता सरून गेला. त्या संसारातली सारी माणसे सोडून गेली. आता मागे काय उरलंय? आता मला तुमच्यावाचून कोण वाली आहे?"

महाराज म्हणाले, “आता उपोषण करून काय उपयोग आहे? आजवर तुला देव आठवला नाही. घराला आग लागल्यावर विहीर खणून काही उपयोग आहे का? तरुणपणी देवाचा आठव केला नाहीस त्याची फळे भोगायलाच हवीत. उपोषणाचा भलताच हट्ट कशाला करतोस?”

पण माधवाने हट्ट सोडला नाही, उपोषण सोडले नाही, नारायणाचे नाव सोडले नाही आणि महाराजांचा उंबराही सोडला नाही. कांता, पुत्र गेले, पैसा गेला, संसार उजाड झाला अशा साठ वर्षाच्या माधवाला आता वैराग्य आलेले पाहून महाराज म्हणाले, “अरे, अट्टाहास करू नको. तरुणपणी शाश्वताकडे पाठ फिरवलीस. पदरी अशाश्वत बांधून घेतलेस. फळ भोगले पाहिजे. उपोषणाचा हट्ट सोड.”

पण माधव काही ऐकेना. मध्यरात्री आसपास कोणी नाही असे पाहून महाराजांनी अत्यंत भयंकर रूप धारण केले. ते माधवाच्या अंगावर धावून गेले. माधवाच्या उरात धडकी भरली. त्याच्या तोंडातून शब्द फुटेना.

त्याची ती विकलांग अवस्था पाहून महाराजांनी एकदम सौम्य रूप धारण केले. ते म्हणाले. “अरे, हाच का तुझा धीटपणा? माधवा, माणूस हा केव्हाही काळाचे भक्ष्य असतो हे लक्षात ठेव. एक ना एक दिवस काळ तुला असाच खाऊन टाकील. भविष्यकाळात घडणाऱ्या गोष्टीची तुला केवळ चुणुक दाखवली. यम लोकात गेल्यावर पळून तरी कुठे जाणार आहेस?”

माधव गयावया करीत म्हणाला. “महाराज, यम लोकाचं नावदेखील काढू नका. यम लोकात जे दिसणार होतं ते आपण इथंच दाखवलत. आता मला तिकडे पाठवू नका. कृपा करून मला वैकुंठाला पाठवून द्या. मी फार पापी आहे हे खरं पण माझ्या पातकांच्या राशी जाळून टाकणं तुम्हाला काही अवघड नाही. माझी थोडीफार पुण्याई होती म्हणूनच आपली भेट झाली. मला खरंच वैकुंठाला धाडून द्या.”

महाराज हसून म्हणाले, “माधव, तुझं मरण जवळ आले आहे. परंतु तुला आणखी जगायची इच्छा असेल तर तुझ्या आयुष्याची वाढ करतो.”

माधव म्हणाला, “नको, नको, महाराज आता मला प्रपंचाच्या लटक्या मायेत गुंतवून ठेवू नका. मला मुळीच आयुष्य नको आहे. ”

महाराज म्हणाले, “तथास्तु. तुझे जन्ममरणाचे फेरे चुकले. पुन्हा तू आता इथे येणार नाहीस. तू मुक्त झालास.”

महाराजांचे हे बोल ऐकून माधव हरखून गेला. लोक त्याला भ्रमिष्ट म्हणत, पण खरोखर माधवाची विदेही स्थिती झाली होती. त्याच्यावर इतकी गुरूकृपा झाली होती की त्याच्या आयुष्याचे सोने झाले.

श्रीसंत रंगावधूत महाराजांची कथा तर याहूनही अद्भुत !

**अनुक्रमणिका**

रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर तालुक्यात देवळे नावाचे गाव आहे. तेथे जयरामभट्ट नावाचे एक वेदशास्त्रसंपन्न ब्राह्मण रहात असत. ते दशग्रंथी विद्वान ब्राह्मण होते. त्यांचे धाकटे चिरंजीव विठ्ठलपंत तेही धर्मपरायण, वेदपरायण व दशग्रंथी विद्वान म्हणून रत्नागिरी जिल्ह्यात प्रसिद्ध झाले. त्यांच्या पत्नीचे नाव रुक्मिणी. विठ्ठलपंत व रुक्मिणी यांची पांडुरंगावर नितांत भक्ति होती. गुजराथेत गोध्रा येथे सखारामपंत सरपोतदार यांनी खूप खर्च करून पांडुरंगाचे देऊळ बांधले. योगायोगाने देवळ्याच्या विठ्ठलभट्टांची कीर्ती त्यांच्या कानी गेली. त्यांनी विठ्ठलभट्टांना सपत्नीक गोध्र्यास बोलावून नेले. पांडुरंगाच्या पूजेची जबाबदारी त्यांच्यावर सोपवली. आधीच पांडुरंगभक्त असलेल्या विठ्ठलभट्टांना हे काम फारच आवडले. त्यांनी मोठ्या आनंदाने ते काम पत्करले. ते भक्तिने पांडुरंगाची पूजा-अर्चा करीत आणि फावल्या वेळात याज्ञिकी करीत. समाजात त्यांनी फार प्रतिष्ठा मिळवली.

कार्तिक महिन्यातील शुद्ध अष्टमीचा दिवस होता. विठ्ठल मंदिराजवळ एका घराला आग लागली. आग विझविण्यासाठी शर्थीचे यत्न चालले होते. आसन्नप्रसवा रुक्मिणीबाई पण घागरी-घागरीने पाणी नेऊन देत होत्या. हळूहळू आग विझली. रुक्मिणीबाईंना प्रसूतिवेदना सुरू झाल्या आणि श्रीसंत रंगावधूत महाराजांचा जन्म झाला. का कोण जाणे सरपोतदारांना वाटले हा कोणी महात्माच जन्मास आला आहे. त्यानीच पुढाकार घेतला, घरोघर साखर वाटली आणि मुलाचे नाव ठेवले “पांडुरंग.”

पांडुरंगाची तेजस्वी प्रज्ञा लहानपणापासून सर्वांच्या ध्यानी येऊ लागली. पांडुरंग साडेचार वर्षाचा असताना एक प्रेतयात्रा दारावरून गेली. पांडुरंगाने प्रश्न विचारायला सुरवात केली.

“हे लोक का रडतात? सारेच असे मरतात? तुम्ही आणि आईसुद्धा मरणार? मेल्यावर जीव कुठे जातो? जन्म मृत्यू पुन्हा जन्म असे हे चक्र सारखे चालू असते का? यातून सुटण्याचा काही मार्ग नाही का?”

विठ्ठलभट्टांनी सर्व प्रश्नांची उत्तरे देत देत शवटी म्हटले, “बाळ जर देवाचे नाव सतत घेतले, देवाची भक्ति मनापासून केली तर जन्म-मृत्यूच्या फेऱ्यातून मुक्ति मिळते.”

वडिलांच्या ह्या उत्तराचा पांडुरंगाच्या मनावर फार खोल परिणाम झाला. त्याचे अंतर्द्वार उघडले. तो एकांतात बसून देवाचा जप करू लागला. मोठ्या श्रद्धेने देवाची भक्ति करू लागला. १९०१ साली विठ्ठलभट्टांना प्लेग झाला व त्यातच त्यांचा देहांत झाला. वडिलांचा मृत्यु झाला तेव्हा पांडुरंग पाच वर्षाचा होता. त्याचा भाऊ नारायण तीन वर्षाचा होता.

रुक्मिणीबाईंनी गोध्रा सोडले नाही. देवळात मिळणाऱ्या दक्षिणेवर आणि धान्यावर त्या निर्वाह करू लागल्या. पांडुरंग आठ वर्षाचा झाला. मुंज करायला हवी म्हणून त्या देवळ्याला आल्या. काकांनी मुंज लावली व मग मंडळी नृसिंहवाडीला दत्ताच्या दर्शनास गेली. नदीकाठ, झाडी, पवित्र वातावरण पाहून रुक्मिणीबाई व पांडुरंग प्रभावित झाले. त्यातच परमपूज्य सद्‌गुरू श्रीवासुदेवानंदसरस्वती महाराज यांचा मुक्काम तेथेच होता. रुक्मिणीबाई मुलांना घेऊन महाराजांच्या दर्शनास गेल्या. महाराज ज्या खोलीत होते त्या खोलीच्या दारात आठ वर्षाचा पांडूरंग उभा राहिला व महाराजांच्याकडे टक लावून पाहू लागला. महाराजांनी त्याच्याकडे

पाहिले मात्र ते उद्‌गारले,

“हा बाळ तर आमचाच आहे.”

महाराजांचे हे शब्द बाळाने ऐकले मात्र तो धावत सुटला. महाराज सोवळ्यात आहेत, सोवळ्याच्या कपड्याने बाळाने शिवू नये म्हणून शिष्यांनी खूप प्रयत्न केले पण त्याला कोणी अडवू शकले नाही. त्याने थेट महाराजांचे पाय गाठले. त्यांच्या पायावर मस्तक ठेवून तो मुसमुसून रडू लागला. महाराजांनी त्याच्या मस्तकावर हात ठेवला आणि त्याच्या पाठीवरून हात फिरविला. त्या क्षणापासून सारे जीवन महाराजांच्या सेवेला अर्पण करण्याचा निश्चय पांडूरंगाने केला आणि गुजराथेमध्ये दत्तसंप्रदायाचे ठाणे उभारले.

असा हा गुरूंनी केलेला स्वीकार.

देव म्हणतात, “पौर्णिमेने चंद्राला आलिंगन दिले की, त्याच्या कलेतील उणीव दूर होते. त्याप्रमाणे वीरोत्तमा, गुरूंनी स्वीकार केला की, पूर्ण कृपा होऊन शिष्यात तिळमात्र उणे रहात नाही.

रात्रीबरोबर अंधार नाहीसा होतो. त्याप्रमाणे कृपा झाली की अज्ञान नाहीसे होते. अज्ञानाच्या कुशीतच कर्म, कर्ता, कार्य अशी त्रिपुटी असते. गाभिणी मारावी त्याप्रमाणे अज्ञान नाहीसे होते. अज्ञानाचा नाश झाला की त्रिपुटी आपोआप नाहीशी होते. तिच्या नाशासाठी वेगळा प्रयत्न करावा लागत नाही. म्हणजेच अज्ञाननाशाबरोबरच सगळे कर्मच नाहीसे होते आणि खराखुरा संन्यास सिद्ध होतो. मूळ अज्ञानाचा निरास झाला की दृश्याचा ठावठिकाणा नाहीसा होतो आणि जे आत्मतत्त्व जाणावयाचे ते तो स्वतःच होऊन जातो. जागृत झाल्यावर स्वप्नातल्या डोहात आपण बुडत होतो तेव्हा आपल्याला वर काढावे हा भाग संपतो. आता ते बुडणेही संपले आणि काढणेही संपले! मी अज्ञानी आहे मी आता जाणून घेईन हे जे दुःस्वप्न त्याला पडले होते ते संपले. आता तो जाणणारा, जाणण्याचा विषय, जाणण्याची क्रिया हे सगळे स्वतःच झाला. ज्ञानरूपच झाला. हे वीरश्रेष्ठा अर्जुना, एकजण आरशात आपले मुख पहात होता. आरशात मुखाचे प्रतिबिंब त्याला दिसत होते. तितक्यात तो आरसा बाजूला केला गेला. आता आरसाही नाही, प्रतिबिंबही नाही पण पहाणारा जसा आधी होता तसाच आताही आहेच. हे जसे घडते तसा तो निजरूपात सुप्रतिष्ठित होतो. अज्ञान गेले आणि जाताना त्याने ज्ञानही नेले. आता फक्त चैतन्य उरले.

अर्जुना, आता सहाजिकच कोणतीही क्रिया संभवत नाही. म्हणून या स्थितीला ‘नैष्कर्म्य’ असे म्हणावयाचे. वारा बंद झाला की लाटा नाहीशा होऊन शांत समुद्रात लीन होतात, त्याप्रमाणे अज्ञानामुळे घडत असलेले कर्म संपवून तो कर्ता आपल्या रूपाशी एकरूप होतो. कर्माचे हे जे न होणे सिद्ध होते त्याला नैष्कर्म्य सिद्धि म्हणावयाचे व सर्व सिद्धिमध्ये ही परमसिद्धि आहे. कळस चढला की देवळाचे काम संपते. गंगा समुद्राला मिळाली की तिचा प्रवास संपतो. सोने सोळा कसाचे ठरले की शुद्धिची मर्यादा संपते. त्याप्रमाणे जे ज्ञान आत्मस्वरूपाचे अज्ञान नाहीसे करते ते ज्ञानही गिळून असणे ही जी अवस्था तिच्या पलीकडे मिळविण्याचे काही राहिले नाही. सर्व सिद्धित ही नैष्कर्म्य सिद्धि ज्याच्याजवळ भाग्याचा ठेवा असेल अशा पुरुषासच प्राप्त होते. सूर्य उगवल्याबरोबर अंधाराचा प्रकाश होतो, दीपाच्या स्पर्शाबरोबर कापराची ज्योतच होते. मिठाचा कण पाण्यात

पडल्याबरोबर त्याचे पाणी होते. झोपेतून जागे झाल्यावर झोप आणि स्वप्न दोन्ही वाया ठरतात. तो पुरुष जागृतीशी एकरूप होतो. त्याप्रमाणे ज्या कोणाला गुरूवाक्य ऐकल्याबरोबर द्वैत गिळून टाकले जाऊन आत्मस्वरूपात वृत्ति स्थिर होऊन जाते असा साधक विरळा. कान आणि गुरूवाक्य यांची भेट झाल्याबरोबर जो आत्मरूप होऊन जातो त्याला काही करावयाचे उरले आहे असे कोण म्हणेल? आकाशाला कुठे येणे जाणे आहे काय? त्याला आता काही करावयचे उरले नाही हे त्रिवार सत्य आहे.

पण ही अवस्था सर्वांना साध्य होत नाही. ती फार थोड्यांना होते. बाकीच्यांना ती स्थिती गाठण्यास वेळ हा लागतोच. त्यांनी स्वकर्माच्या अग्निमध्ये काम्य आणि निषिद्धाच्या इंधनाने रजोगुण आणि तमोगुण जाळून टाकलेला असतो. मुले, पैसा, परलोक याबद्दलची अभिलाषा आपली सेवक व्हावी, आपल्या ताब्यात असावी हेही झाले. इंद्रिये निरनिराळ्या पदार्थांत बुडल्याने अशुद्ध झाली ती पण प्रत्याहार तीर्थामध्ये न्हावून शुद्ध झाली. आता ती त्यांचे त्यांचे विषय जरी समोर आले तरी तिकडे ढूंकून पहात नाहीत. स्वधर्माचे फळ ईश्वरास अर्पण करून त्याच्या बदल्यात वैराग्य मागून घेऊन ते पद अढळ केले. आत्मसाक्षात्कार होण्यासाठी जी जी सामुग्री लागते ती त्यांनी पुरी संपादन केली आणि त्याच वेळी सद्‌गुरू भेटले आणि त्यांनी हातचे काहीही राखून न ठेवता ज्ञानाचा उपदेश केला तरीही ब्रह्मस्थिती प्राप्त होण्यास वेळ म्हणून जो हवा तो लागतोच. अर्जुना, औषध घेतल्याबरोबर आरोग्य कसे मिळेल? सूर्य उगवल्याबरोबर माध्यान्ह कशी होईल? ओल असलेल्या उत्तम जमिनीत उत्तम बी पेरले तरी अपार फळ हातात येण्यासाठी वेळ हा लागतोच. सोपा मार्ग सापडला, बरोबर चांगले सखे-सोबती चांगले मिळाले तरी मुक्कामाच्या ठिकाणी पोचण्यास वेळ हा लागतोच.

वैराग्यलाभ झाला, त्यात सद्‌गुरू भेटले, अंतःकरणात नित्यानित्य विकाराचा अंकुरही फुटला. ब्रह्म सत्य, इतर सर्व भ्रान्ती हे देखील पटले, अगदी पूर्णतया पटले आणि ब्रह्मस्थितीच्या पोटात जागृति, स्वप्न, सुषुप्ति या तिन्ही अवस्था जिरून गेल्या की, त्या सर्वात्मक सवोत्तम ब्रह्मामध्ये मोक्षाचेही काम संपते, ज्ञानालाही ते मिठी देते, पण ऐक्याचे एकपणसुद्धा तिथे संपते, आनंदकणही विरून जातो आणि काहीच उतर नाही. असे हे जे ब्रह्म ते क्रमानेच प्राप्त होते. भूक लागलेल्या माणसापुढे षड्रस पक्वान्ने वाढली तरी तृप्ती घासाघासालाच होत जाते त्याप्रमाणे वैराग्यरूपी तेलाचे भरण मिळाल्यावर विचाराचा दिवा प्रज्वलित होतो आणि मग त्या दिव्याचा प्रकाश आत्मठेवा काढून देतो. आत्मस्वरूपाचे ऐश्वर्य भोगावे एवढ्या योग्यतेची सिद्धि ज्याच्या अंगावर कायमचा अलंकार होऊन राहिली ती ज्या क्रमाचा अंगीकार केल्यामुळे राहिली त्या क्रमाचे वर्म सांगतो.

गुरूदेव रानड्यांचे चरित्रकार लिहितात श्रीरामदास स्वामींनी मोक्ष केव्हा मिळतो या प्रश्नाचे उत्तर “ज्या क्षणी अनुग्रह त्या क्षणी मोक्ष” असे दिलेले असले तरी ते केवळ तत्त्वापुरते आहे. प्रत्यक्षात घडीने घडी काळ सार्थक करावा असे त्यांचेही म्हणणे आहेच. ते म्हणतात, “अल्प स्वल्प कळोनि राहे समाधाने.”

गुरूदेवांच्या मते साक्षात्कार ही घडण आहे, घटना नव्हे (a process and not an event) ही घडण होत होत जाते. म्हणजेच साक्षात्काराचे प्रमाण हळूहळू वाढत जाते. ते कोठवर जाईल याला अर्थातच मर्यादा नाही. पारमार्थिक अनुभूतिचे स्वरूप एक असले तरी साधकावस्थेतील अनुभूति व सिद्धावस्थेतील अनुभूति यांच्या प्रमाणात फरक आहे आणि यातच क्रममुक्तिचा सिद्धान्त मांडला जातो.

आता क्रमाने मुक्तिची तयारी होत जाते असे म्हटले की वाटचाल, प्राग्जन्म व पुनर्जन्म यांना धरूनच होत जाणार. गुरूदेव म्हणत की जन्मास येताना मनुष्य आपल्या पूर्वजन्मातून जो ठेवा बरोबर घेऊन येतो ती तीन प्रकारचा असतो. बौद्धिक, नैतिक, पारमार्थिक. त्यापैकी बौद्धिक गुण पूर्वजन्मातून या जन्मात फारच थोड्या प्रमाणात संक्रान्त होऊ शकतात कारण त्यात अनुवंशिकतेचा भाग अधिक असतो. नैतिक गुणांचे थोड्याफार प्रमाणात जन्मांतर होते हे खरे परंतु एकंदरीत नीति हा मानवी मनाचा गुणधर्म असल्याने व मन हे आत्म्याप्रमाणे अखंड अविनाशी नसल्याने पूर्वजन्मीची नीति या जन्मातही पूर्णपणे राहीलच असे नाही पण परमार्थाची गोष्ट निराळी आहे. त्याचा संबंध आत्म्याशी असल्याने व हे आत्मतत्त्व अविनाशी असल्याने मनुष्य जन्मास येताना आपली पूर्वजन्मातील सर्व पुण्याई बरोबर घेऊन येतो यालाच गुरूदेव आध्यात्मिक संक्रमण (Spiritual Transmission) म्हणतात. हे संक्रमण पूर्णत्वाने होते असा त्यांचा सिद्धान्त आहे. ते पुढे म्हणत, "साधक परमार्थास आरंभ करतो तो पूर्वजन्मातील आपल्या अनुभवाचा ठेवा बरोबर घेऊन करतो. सहाजिकच पूर्वजन्मीच्या अनुभवाचे आकलन व साक्षात्कार त्याला अल्पावधीत होतो आणि त्यामुळे त्याची प्रारंभीची प्रगती झपाट्याने होते असे वाटते. यापुढे नवी कमाई करावयाची असते. ती फार सावकाश होते. ही जी सुरवातीस झपाट्याने होणारी प्रगति किंवा उजळणी हा विहंगम मार्ग आणि या जन्मात आत सावकाश होणारी प्रगति म्हणजे पिपिलिका मार्ग! प्रत्येक साधक प्रथम विहंग व नंतर पिपिलिका मार्गाने जात असतो. तुकाराम म्हणत, "जन्मोजन्मी आम्ही बहु पुण्य केले व मगच विठ्ठलाने आमच्यावर कृपा केली." ही कृपासुद्धा ज्वालामुखीचे स्फोट मधूनच व्हावे त्याप्रमाणे साधकाच्या अनुभवास येत असते. त्याच्या पारमार्थिक अनुभूतिच्या नदीला मधेच पूर येतो व तिच्या पाण्याची उंची कोठवर पोचणे शक्य आहे याची त्याला कल्पना येते. गुरूदेव म्हणत, "हे पूर म्हणजे अनुभवाच्या पाण्याने गाठलेले उच्चांक (High Watermark) होत. ते साधकाची अनुभवक्षमता दर्शवितात, साधनेस पूर आला की अनुभवास तो येणारच."

गुरूदेवांच्या मते दैव म्हणजे केवळ पूर्व कर्मांचा पारिपाक नव्हे. ते म्हणत दैवाचा अर्थ तत्त्वज्ञानात कसाही असला तरी परमार्थात दैव म्हणजे देवाची कृपा! ती ज्या क्षणी होईल त्या क्षणी देवाचा अनुभव येईल."

साधकाने निग्रहाने जास्तीत जास्त साधना करीत रहावयाचे. मागील जन्मीच्या पुण्याईच्या जोरावर, पायावर या जन्मीच्या साधनेचे मंदिर उभे करीत रहावयाचे. मुक्तिचा कळस त्यावर कधी चढवावयाचा हे देवाच्या कृपेचे काम आहे हे ध्यानात ठेवावयाचे. मात्र प्राग्जन्मातील साधना या जन्मात पूर्ण संक्रान्त होते आणि या जन्मातील साधना पुनर्जन्मात होणार यावर दृढ विश्वास ठेवावयाचा. हा विचार साधकाला किती आधार देणारा आहे ह प्रत्यक्ष अनुभवाने कळते.

रंगावधूत महाराजांच्या जीवनातील आणखी एक प्रसंग असा की वासुदेवानंद सरस्वतींनी त्यांना जवळ केल्यावर रुक्मिणीबाई मुलांना घेऊन गोध्र्यास परत आल्या. मुलांचे शिक्षण सुरू झाले. पांडुरंगाच्या मनाला मात्र सद्गुरुंच्या भेटीची ओढ लागली. त्याची झोप उडाली तो सतत कळवळून महाराजांची प्रार्थना करू लागला. परमेश्वराच्या दर्शनाची ओढ त्याला लागली. अंतर्यामीच्या तळमळीने त्याला सारखे रडू येई. रडून रडून डोळे लाल होत. धड झोप नाही, धड जागृति नाही अशा विलक्षण अवस्थेत दिवसामागून दिवस जाऊ लागले. तो सतत परमेश्वराची प्रार्थना करू लागला. "हे दत्तदिगंबरा, मला दर्शन दे. तुझ्यावाचून मी पळभरही राहू शकत नाही."

अनुक्रमणिका

विरहवेदनांनी बाळ बेशुद्ध पडला आणि त्याची ती आर्त प्रार्थना ऐकून परमात्मा त्याच्यासमोर सत्पुरुषाच्या रूपात प्रगट झाले. त्यांनी त्याला मांडीवर घेतले. त्याच्या मस्तकावर हात ठेवला. बाळाला आनंदसागरात पोहत असल्यासारखे वाटले. त्या दैवी तेज असलेल्या रूपाने बाळाला सांगितले. **"पोथी पहा."**

आणि ती दैदिप्यमान प्रभा अंतर्धान पावली. या दर्शनामुळे बाळाला शांतता वाटली पण कोणती पोथी पहावी हे काही कळेना. सारखी वासुदेवानंद सरस्वतींची प्रेममय श्रीमूर्ति पांडुरंगाला समोर दिसू लागली. तसेच जवळ हुक्का ठेवलेली दुसरी एक मूर्ति त्याच्या डोळ्यासमोर येऊ लागली. ही मूर्ती कोणाची हे त्याला कळेना. अक्कलकोटचे स्वामी महाराज किंवा श्रीसाईबाबा यापैकी कोणाची तरी ती मूर्ती असावी असे त्याला वाटले.

पांडुरंगाची मामावर खूप भक्ति होती. मामा श्रीसाईबाबांचे शिष्य होते. शिरडीला ते दर्शनाला जात. मामांना मुलगा नव्हता. मामांनी प्रार्थना केली तेव्हा श्रीसाईबाबांनी गुरूचरित्राची पोथी मामांना दिली व नेहमी पारायणे करावयास सांगितले. मामांनी नित्य पारायणे केली. त्यांना मुलगा झाला. मुलगा झाल्यावर ते पोथीची पूजा करीत पण पारायण होईना. त्यात व्यत्यय येऊ लागला.

पांडुरंग मामाकडे गेला. त्याने मामांना दृष्टांत सांगितला. मामांनी मोठ्या भक्तिने साईबाबांनी दिलेली गुरूचरित्राची पोथी पांडुरंगाला दिली व नित्य पारायण करावयास सांगितले. पांडुरंग नित्य पारायण फार भक्तिने करू लागला. इकडे कॉलेज शिक्षणही उत्तम रीतीने चालू होते. पदवी परीक्षाही त्यांनी दिली पण त्याचे मन संसारात रमेना. नर्मदातिरी तप करावयास जाण्यासाठी ते आईकडे परवानगी मागू लागले व एक दिवस घराबाहेर पडले.

घर सोडताना त्यांचा निश्चय हिमालयात जाण्याचा होता. हिमालयाकडे जाण्यासाठी ते पायी निघाले. काही मैल चालून गेल्यावर त्यांना "मागे फिर, मागे फिर" असे शब्द दाही दिशातून ऐकू येऊ लागले. त्यांचे गुरू वासुदेवानंद सरस्वती त्यांच्या डोळ्यासमोर सतत येऊ लागले. तेव्हा गुरूंची हिमालयात जाण्यास परवानगी नाही हे जाणून त्यांनी नर्मदातिरी घनदाट जंगलात रहाण्याचा निश्चय केला.

मग महाराज नारेश्वरापर्यंत चालत आले. नदीच्या तिरावर अरण्य होते. आत जाण्यास पाऊलवाटसुद्धा नव्हती. महाराजांना हा परिसर फार आवडला. पिंपळाच्या झाडाखाली ते ध्यान लावून बसू लागले. ते नागफणीच्या झाडावर आलेली लाल बोंडे खात, कधी कधी जंगली कंदाचे भक्षण करीत. जे मिळेल त्यावर संतुष्ट असत.

अशा ह्या उग्र तपश्चर्येनंतर त्यांना दत्त भगवानांचे दर्शन झाले आणि त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्वाला वेगळेच सामर्थ्य प्राप्त झाले. कालांतराने नारेश्वर हे लाखो भक्तांचे तीर्थस्थान झाले व गुजराथेत दत्तसंप्रदाय स्थिर झाला.

हा जीवनपट क्रममुक्तिच्या सिद्धान्ताचे जणू काय प्रात्यक्षिकच आहे. श्रीसद्गुरू शिष्याचे भवितव्य जाणून यथायोग्य मूर्ति क्रमाक्रमाने घडविण्यासाठी अहोरात्र जागरूक राहून कृपा करतात.

देव सांगत आहेत, "अर्जुना, ज्याला गुरूवाक्य कानी पडल्याबरोबर ब्रह्मस्थितीचा स्थिर अनुभव प्राप्त होत नाही त्याला क्रमाने मुक्ति मिळते. तो गुरूंनी दाखवलेल्या वाटेने जाऊन बुद्धिचा मळ विवेकतीर्थाच्या किनाऱ्यावर धुवून टाकतो. राहूच्या विळख्यातून सुटलेला चंद्र आपल्या प्रकाशाने शोभू लागतो त्याप्रमाणे त्यांच्या बुद्धिला शुद्धता जशी काय जडून जाते. सासर, माहेर या दोन्ही कुलांचा त्याग करून पतिव्रता जशी केवळ आपल्या पतीला अनुसरते त्याप्रमाणे त्याची ती शुद्ध बुद्धि द्वंद्वाचा त्याग करून आत्मचिंतनात रंगून जाते. ज्ञानासारखी अपूर्व वस्तू विषयाकडे नेऊन नेऊन इंद्रियांनी त्यांचा बडेजाव आजपर्यंत वाढवला होता पण आता सूर्यकिरण नाहीसे झाल्यावर मृगजळही लयास जाते त्याप्रमाणे इंद्रियांचा निग्रह करून त्याने शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध या पाचही विषयांचा निरास केलेला असतो. अधर्माचे अन्न खाल्ले असे कळल्याबरोबर ते उलटून टाकावे त्याप्रमाणे त्याने इंद्रियांची विषयवासना पूर्णपणे टाकलेली असते. मग तो विषयापासून निवृत्त झालेली अंतर्मुख वृत्ति आत्माकार वृत्तिरूपी गंगेच्या तिरावर आणून ठेवून शुद्धिकारक प्रायश्चिते करतो. आता ती शुद्ध झालेली इंद्रिये सात्विक धैर्याच्या जोरावर योगधारणेस लावतो. आणि मग अशा वेळी प्राचीन इष्टानिष्ट भोगासह अचानक येऊन भेटले तरी त्या इष्टाची अभिलाषा धरत नाही, संतुष्ट होत नाही. त्या अनिष्टामुळे खेद मानत नाही त्याचा त्याग व्हावा अशी धडपड करत नाही. सगळे काही सोसतो आणि हळूहळू आपण काही सोसतो आहो हेही विसरतो, त्याचे त्याला भानही उरत नाही. त्याला आता विजनवासाची ओढ लागते. जेथे गजबज नाही अशा वनातील जागेत फक्त आपल्या शरिराच्या अवयवांच्या सोबतीने रहातो. तो शमदमाशी खेळतो, न बोलणे हेच त्याचे बोलणे असते. गुरूवाक्याशी मेळ साधता साधता किती वेळ गेला ह्याचे त्याला भान असत नाही. अंगात बळ यावे, भूक नाहीशी व्हावी, जिभेच्या इच्छा पुरवाव्या अशी कुठलीही वासना जेवणाबद्दल त्याच्या मनात उरत नाही. अगदी थोड्या आहाराने त्याला संतोष होतो. अगदी माप भरेपर्यंत तो खात नाही. जठराग्नीच्या भडक्याने प्राण नाहीसा होऊ नये, इतक्या बेताने तो अन्न खातो. परपुरुषाने कितीही इच्छा केली तरी कुलवधू त्याच्या स्वाधीन होत नाही त्याप्रमाणे झोप आणि आळस यांच्या स्वाधीन तो आपले शरीर होऊ देत नाही. देवाला साष्टांग नमस्कार घालताना त्याचे अंग काय भूमीस लागेल तेवढेच. एरवी तो जमिनीवर आळसाने अंग टाकीत नाही, कधीही लोळत पडत नाही. देहाचा निर्वाह होण्यापुरते तो हातपाय हालवितो. अशा रीतीने त्याने शरीर व मनादिक इंद्रिये आपल्या आधीन करून ठेवलेली असतात. वृत्तिला आपल्या मनाच्या उंबऱ्यापर्यंत देखील येऊ देत नाही. मग बोलणे चालणे या क्रियांची गोष्टच बोलायला नको.

देह, वाचा, मन हे जे बाह्य प्रदेश आहेत ते सगळे जिंकून तो ध्यानाचे आकाश स्वाधीन करून घेतो. एखादा मनुष्य हाती घेतलेल्या आरशात आपले प्रतिबिंब जसे स्वच्छ पाहतो त्याप्रमाणे गुरूवाक्याच्या बोधाने उठवलेला तो साधक आपल्या ठिकाणी स्वरूप निश्चय पहातो. ध्यानाची प्रसिद्ध रीत अशी आहे की ध्याता आपल्यालाच ध्यानवृत्तिमध्ये ध्येयत्वाने पाहतो. ध्यान, ध्येय, ध्याता हे तिन्ही एकरूप होऊन जातात. अशा प्रकारच्या ध्यानात तो साधक पूर्णपणे रंगून जातो. अशा वेळी मग तो अष्टांग यागाचीही मदत घेतो. अर्जुना, आत्मज्ञानाच्या बाबतीत तो मुमुक्षु दक्ष असला तरी त्याला अजून पूर्णाभिषेक व्हावयाचा असतो.

शिवणीचा भाग टाचेने दाबून मूळ बंध उड्डियान बंध व जालंधर बंध या तीन बंधांनी शरीर आवळून प्राणापानादि वायू एकत्र करून तो कुंडलिनी जागी करतो, सुषुम्ना नाडीचा विकास करून मूलाधारापासून आज्ञाचक्रापर्यंतच्या चक्रांचा भेद करून तो सहस्त्रदळामध्ये स्थिर होतो आणि त्या कमलातील अमृताचा ओघ मूलाधारापर्यंत पोचवितो. आज्ञाचक्राच्या पर्वतावर नाचणाऱ्या चैतन्यरूप भैरवाच्या पात्रात मन आणि पवन यांची खिचडी वाढून देऊन योगाभ्यास चांगला दृढ झाला की तिन्ही बंधांचा समुदाय पुढे करून तो मागच्या बाजूस ध्यान सिद्ध करतो. ध्यान आणि योग या दोन्ही भूमिका निर्विघ्नपणे दृढ व्हाव्यात म्हणून वैराग्यासारखा मित्र त्याने प्रथमपासूनच जोडून ठेवलेला असतो. तो मित्र ध्यानाच्या वेळी किंवा योगाच्या वेळी त्याच्या बरोबर चालत असतो. जी वस्तू आपण शोधत असतो ती दृष्टिस पडेपर्यंत हातातला दिवा खाली ठेवू नये असे केले की वस्तू सापडतेच. त्याप्रमाणे मोक्षाच्या ठिकाणी प्रवृत्त झालेल्या पुरुषाची वृत्ति ब्रह्माच्या ठिकाणी लयाला जाईपर्यंत वैराग्य त्याच्या बरोबर चालत असल्याने त्या साधकाला कुठेही धक्का लागत नाही.

अर्जुना, असे समजू नये की, मुमुक्षू मार्गास लागला की त्याच्यावर येणारी मार्गातील सर्व संकटे संपली. उलट तो जसजसा मोक्षमंदिराची एकेक पायरी चढतो तसतसे त्याचे सर्व प्रकारचेच सामर्थ्य वाढत जाते. साधकाच्या अंगी सत्त्वगुण वाढला की अहंकार, बल, दर्प, काम, क्रोध, संग हे सहा शत्रू देखील पूर्वीपेक्षाही प्रबल होतात आणि हे जाणून तो मुमुक्षू या सर्वांच्याशी लढण्याच्या तयारीतच असतो. व्यवहारातला शत्रू एकदा मारला की काम संपते पण आपल्याच ठिकाणी सत्त्वगुणाबरोबरच वाढणारे हे अंतर्गत शत्रू क्षणाक्षणास कधी एकेक तर कधी सहाही मिळूनसुद्धा साधकावर चाल करून येतात. साधकाच्या सात्त्विक धैर्याची इथे परीक्षाच होते. त्या शत्रूंचा पराभव लक्षवेळा केला तरीही ते पुन्हा पुन्हा डोके वर काढतात. म्हणून आत्मलाभाच्या लढाईसाठी बाहेर पडलेला तो साधक ज्ञानाचा अभ्यास करून आपले बळ वाढवितो. मग वैराग्याचे चिलखत अंगात चढवितो आणि राजयोगरूपी घोड्यावर स्वार होतो. जे दृश्य दृष्टिस पडेल त्यातील लहान, मोठा वगैरे भेद नाहीसा करणारी ध्यानरूपी तीक्ष्ण तरवार तो विवेकरूपी मुठीत घट्ट धरतो.

सूर्य जसा बेडर वृत्तीने अंधारात जातो तसा तो साधक मोक्षविजयरूपी लक्ष्मीला वरणारा भर्ता होण्यासाठी संसाररूपी रणभूमीमध्ये निर्भयपणाने जातो.

आता ह्या लढाईत त्याच्याशी लढायला येणारा पहिला शत्रू आहे देहाहंकार! त्याला तो आधी धोपटून काढतो. हा देहाहंकार मेल्यावरही सोडत नाही, पुन्हा जन्माला घालतो आणि हाडाच्या तुरुंगात घालून छळतो. त्या अहंकाराचा थारा म्हणजे देह हा किल्ला. तो साधक प्रथम हस्तगत करतो. दुसरा शत्रु आहे बल! विषय म्हटले की हे बल चौपट वाढते. जगाला ते बल मृतावस्था आणते. विषयाच्या नादाने वाढलेले हे बल जगाचा संहार करूनही आपली तृप्ती करून घेण्यास मागे पुढे पहात नाही. तो बलरूपी शत्रु विषयाचा भरलेला समुद्र आहे. नुसता समुद्र नव्हे तर विषाने भरलेला समुद्र आहे. सगळ्या दोषाचा तो राजा आहे. हे सगळे जरी खरे असले तरी ध्यानखड्गाचा घाव त्याला सहन होत नाही इतके ते हत्यार पाजळलेले असते.

तिसरा शत्रू आहे दर्प. प्रिय विषय मिळाले की सुख वाटते. ह्या सुखाचा बुरखा घालून हा दर्प मिरवीत असतो. तो गर्जना करू लागला की, साधकाला सन्मार्गावरून काढून अधर्माच्या वाटेला ओढून नेतो. तिथे त्या साधकाला कोणी त्राता नसतो आणि मग दर्पाच्या धुंदीमध्ये नरकरूपी वाघाच्या तावडीत तो सापडला की त्याचे

त्याला काही कळत नाही. सुखाचा बुरखा घालून, विश्वास देऊन, घात करून मारणाऱ्या दर्पाला हा साधक मारून टाकतो.

आता काम आणि क्रोध हे दोन शत्रू तर एकमेकाच्या गळ्यात गळा घालूनच साधकावर हल्ला चढवितात. आधी काम उत्पन्न होतो. तो पुरा झाला नाही की कोधाग्नि पेटतो. ह्या क्रोधाचा तर तपस्व्यांनीसुद्धा धसका घेतलेला आहे. काम तर काय जेवढा भरावा तेवढा मोकळा होत रहातो. तो काम ह्या साधकाने कुठेच नाही इतका नाहीसा केला आणि काम नाही असे म्हटल्यावर क्रोधही आपोआप नाहीसा झाला. मूळ तोडले की, जशा फांद्या आपोआपच गळून पडतात त्याप्रमाणे काम ह्या लढाईत मेल्याबरोबर क्रोधाचीही येरझार संपते. परिग्रह हा सहावा शत्रु! हा निःसंग पुरुषालासुद्धा संगामध्ये घालून बुडवितो. राजा गुन्हेगाराच्या पायात घालावयाचा खोडा त्यालाच आपल्या डोक्यावरून वहावयास लावतो त्याप्रमाणे ही आसक्ति भोगायला लावून आपणा बलिष्ठ होते. जीवाला स्त्री पुत्रांचा भार हा परिग्रह भोगायला लावतो. तो संग आपले खोगीर जीवाच्या मस्तकावर ठेवतो. अंगामध्ये अवगुण घालतो आणि ममत्वाची काठी जीवाला धरावयाला लावतो. आता एखाद्याने संसाराचा त्याग केला तर तो शिष्य, शास्त्र, मठ या रूपाने साधकाच्या मनात आसक्ति निर्माण करतो. निःसंगालाही फासात घालतो. कुटुंबाची माया तोडली, मठादि उपाधि अंगी लावूनच घेतली नाही. साधक वनामध्ये वन्य प्राण्यासारखा राहू लागला तरी उघड्या शरिराच्या रूपाने का होईना तो जीवाच्या मागे लागलेलाच असतो. असा जिंकण्यास कठीण असलेला परिग्रह जिंकून त्याचे ठाणे काबीज करून संसार जिंकल्याचा आनंद तो साधक भोगतो.

अमानित्वादि ज्ञानगुणांचे मेळावे हे मोक्षदेशीचे राजे आहेत. ते यथार्थ ज्ञानाचे राज्य अशा साधकाला अर्पण करतात आणि आपण त्याच्या परिवारापैकी होऊन रहातात. सहा शत्रूंचा नाश करून, मोक्षदेशीचे साम्राज्यपद मिळवून साधक सिद्ध होऊन रहातो तेव्हा त्याची विजययात्रा चालू होते. प्रवृत्तिच्या राजपथावर असणाऱ्या जागृति, स्वप्न, सुषुप्ति या तीन अवस्था पावलापावलावर आपआपल्या सुखाचे निंबलोण त्याच्यावरून उतरतात. विवेक हातात चोपदार काठी घेऊन बोध करीत दृश्याची गर्दी दूर करतो. योगभूमिका हातात आरती घेऊन त्याला ओवाळायला येतात. ऋद्धिसिद्धिंचे समुदाय धावत येऊन पुष्पवृष्टी करतात, त्याला जणु काय फुलांनी न्हाऊ घालतात. ब्रम्हैक्यासारखे स्वराज्य जवळ जवळ येत असताना तो तिन्ही लोक आनंदाने भरून टाकतो. आता त्याच्या दृष्टिमध्ये शत्रू आणि मित्र या भेदाचा लवलेशही उरलेला नसतो. अर्जुना, अरे काय सांगू, कोणत्याही निमित्ताने हे माझे असे म्हणण्याएवढे द्वैत त्याच्यापुढे येतच नाही इतका तो द्वैतरहित झालेला असतो. आपल्या एकछत्री सत्तेने त्याने सर्व जगत कवटाळून घेतले आहे. त्यामुळे आपल्या ममतेला कोठेही चिकटू न देता तो अनासक्त रहातो.

सगळे शत्रु त्याने जिंकले आहेत, हे सगळे जग आपलेसे केले आहे आणि त्याच्या बैठकीचा राजयोगरूपी घोडा आता स्थिर झाला आहे अशी अवस्था होते. वैराग्याचे जे बळकट चिलखत त्याने अंगात घातलेले असते ते तो थोडे ढिले करतो. आता मारायला समोर कोणी नाही म्हणून ध्यानाचे खांडे तो आवरतो. वृत्तिवरचा ताबाही त्याला आता एकसारखा ठेवावा लागत नाही. त्या शांतच होऊन जातात. जिथे जावयाचे ते मुक्कामाचे ठिकाण आले की जसे पाऊल स्थिर होते, चालणे थांबते त्याप्रमाणे अभ्यासही मंद होतो. पाऱ्याचे औषध आपले काम करून, आरोग्य देऊन शरिरातून नाहीसे होते त्याप्रमाणे ब्रह्माशी ऐक्य होण्याची वेळ आली

की साधने कमी कमी होत जातात. जोराने वहात येणारी गंगा समुद्राजवळ आली की शांत होते, कामिनी कांतापाशी स्थिर होते, केळीला घड पडला की केळीची वाढ खुंटते, गावाजवळ रस्ता संपतो त्याप्रमाणे आत्मसाक्षात्कार अनुभवला येणार असे वाटल्याबरोबर तो साधन हत्यार हळूच बाजूला ठेवतो. वैराग्याची मावळती वेळ येते. ज्ञानाभ्यासाला वार्धक्य येते आणि योगरूप फळ पक्व होते. सुभटा अर्जुना, ही जी अवस्था ती खरी शांती. ही शांती ज्यावेळी संपूर्णपणाने त्या साधकाच्या अंगी येते तेव्हा तो पुरुष ब्रह्म होण्याच्या योग्यतेचा होतो. पौर्णिमेपेक्षा चतुर्दशीला चंद्रामध्ये जो एका कलेचा उणेपणा असतो तेवढाच ब्रह्म आणि ब्रह्म स्वरूपात मिळण्यासाठी आलेल्या या साधकात रहातो . ब्रह्माचा कस सोळावा तर "ब्रह्महोतयाचा" पंधरावा असतो . समुद्रामध्ये वेगाने शिरणारे गंगेचे पाणी आणि आत शिरून स्थिर झालेले पाणी एवढाच फरक यात असतो . हे जे लवमात्र अंतर आहे ते शांतीच्या जोरावर तो कधीच तोडतो आणि ब्रह्म होतो . ब्रह्मैक्य होण्यापूर्वीदेखील त्यांनी ब्रह्मपण अनुभवलेले असते आणि तसा विचार केला तर तो साधक ब्रह्म होण्याच्या योग्यतेस पोचलाच आहे असे समज.

अर्जुना, ब्रह्म होण्याच्या योग्यतेस पोचलेला तो पुरुष मग आत्मबोध प्रसन्नतेच्या पदावर बसतो . ज्या अग्निवर स्वयंपाक होतो तो अग्नि विझला की स्वयंपाक आल्हाददायक होतो , शरद्ऋतूमध्ये गंगा आपली वर्षाऋतूमधली धावपळ सोडून शांत होते, गाणे थांबले की साथींची हत्यारे पण बंद होतात. त्याप्रमाणे आत्मबोध होण्यासाठी केलेल्या उद्योगाचे श्रम मग शांत होतात . आत्मबोध प्रसन्नता ही जी अवस्था प्रख्यात आहे ती दशा महामती अर्जुना तो योगी भोगतो.

रंगावधूत महाराज १०८ दिवसात नर्मदा प्रदक्षिणा घुरी करावयाची ह्या निश्चयाने निघाले . साधनेत व्यत्यय येऊ नये म्हणून केवळ गूळ पाणी घेत . एक कौपिन , एक कांबळे , हातात बांबूची काठी , डोक्यावर वासुदेवासारखी एक टोपी असा त्यांचा वेष असे . त्यांची ती मूर्ती पाहून ते इंग्रजी व संस्कृत शिकलेले त्या काळातील गाढे पंडित व पदवीधर असतील असे कोणालाच वाटले नसते.

प्रदक्षिणेच्या मार्गावर रोज त्यांना कोणी ना कोणी प्रवासी भेटत . महाराज त्यांच्याशी मिळून मिसळून वागत व त्यांच्या सुखदुःखांच्या गोष्टीत भाग घेत. त्यांना मार्गदर्शन करीत. सारेजण त्यांच्या ब्रह्म तेजाने प्रभावित होत असत.

एकजण एक दिवस महाराजांना म्हणाला , "महाराज, आपल्याला तर कोणतेही दुःख वा काळजी दिसत नाही, आपण ही कष्टप्रद प्रदक्षिणा कशासाठी करीत आहात?"

महाराज म्हणाले, "सारे जग सुखाच्या मागे धावत आहे पण मी दुःख कोठे आहे हे शोधतो आहे . आश्चर्य हेच वाटते की मला दुःखाचा लवलेशही कुठे दिसत नाही. मला जिकडे तिकडे सुखच दिसते आहे."

ब्रह्मैक्य पावलेला योगी हा असा असतो.

देव सांगू लागले, "ही वस्तू माझी म्हणून आत्मीयता धरून शोक करावा , काही प्राप्त व्हावे अशी इच्छा

अनुक्रमणिका

करावी हे त्या पुरुषाला ऐक्यभावाच्या भरतीमुळे संपते. सूर्य उदयाला आला की स्पष्टपणे चमकणाऱ्या नक्षत्रांच्या ज्योती तो आपल्या अंगच्या तेजाने निष्प्रभ करतो , त्याप्रमाणे आत्मानुभवाचा उदय झाल्याबरोबर भूतभेदाची व्यवस्था मोडत मोडत तो आपल्या स्वरूपापर्यंत येऊन पोचतो . पाटीवरची अक्षरे सहज ओल्या हाताने पुसावी त्याप्रमाणे त्यांच्या दृष्टितून भेद पुसूनच टाकला जातो . जागृती आणि स्वप्न ह्या दोन्ही अवस्था अज्ञानामध्ये व पुढे अज्ञान ज्ञानामध्ये व ज्ञान आत्मस्वरूपामध्ये लीन होऊन जाते. पूर्ण बोधामध्ये सगळे बुडूनच जाते.

जेवता जेवता भूक थोडी थोडी कमी होत जाते व तृप्तीच्या वेळी नाहीशी होऊन जाते. जागृतावस्था आली की झोप संपते. चालता चालता वाट थोडी थोडी होत ज्या ठिकाणी पोचावयाचे तिथे आली की संपते, आपले पूर्णत्व चंद्राला पौर्णिमेस भेटते आणि चंद्राची वाढ खुंटते आणि शुक्लपक्षही नाहीसा होतो. त्याप्रमाणे पदार्थमात्र नाहीसे करणारे ज्ञान घेऊन जेव्हा तो त्या ज्ञानाने माझ्या स्वरूपात येतो तेव्हा त्याचे अज्ञान नाहीसे होते. कल्पान्ताच्या वेळी नदी आणि समुद्र यांचे भिंडोळे मोडून आब्रह्म सगळे त्रैलोक्य पाण्याने भरून जाते. घट आणि मठ पडून गेले की आतले आणि बाहेरचे आकाश एक होऊन जाते. काष्ठे जळून गेली की काष्ठांचा अग्निच होतो. लेण्याचे ठसे मोडून गेले की नामरूपभेद जाऊन नुसते सोने उरते त्याप्रमाणे बुद्धिमंता, त्याला त्याच्यासकट माझ्यावाचून काही उरत नाही ही अशी माझी चौथी अभेद भक्ति त्याला मिळते. आणखी आर्त, जिज्ञासु, अर्थार्थी हे तीन प्रकारचे भक्त ह्या भक्तिच्या वाटेला लागलेले असतात. त्यातला हा चौथा ज्ञानी भक्त मला येऊन मिळतो. अर्जुना, ह्या तीन प्रकारच्या भक्ति आहेत म्हणून ह्या भक्तिला मी चौथी भक्ति म्हटले इतकेच. एरवी इथे पहिली, दुसरी, तिसरी, चौथी वगैरे भक्तिचे प्रकार केवळ वरवरचे आहेत. इथे पहिली नाही आणि चौथी नाही. माझ्या सहज स्वरूपस्थितीला भक्ति हे नाव आहे. या भक्तिचा विशेष गुण असा की, ज्याच्या ठिकाणी माझ्याबद्दल अज्ञान आहे तिथे ती प्रकाश आणते. त्या भक्ताला मी जसा हवा असेल तसा तसा दाखवते आणि सर्वांची समजूत घालून सर्वांनाच भक्तिच्या वाटेला लावते. जे स्वरूप भक्ताला आवडत असेल त्या त्या स्वरूपात ती भक्ताला माझे दर्शन घडवते. त्याचे मन जिथे स्थिर होईल त्या ठिकाणी माझे रूप त्याला तसेच दिसते. माझ्या अखंड प्रकाशाने ती तशी वेगवेगळ्या स्वरूपाची दर्शने होतात. कपिध्वजा, स्वप्नाचे दिसणे अथवा न दिसणे हे आपल्या अस्तित्वावर अवलंबून आहे. त्याप्रमाणे विश्वाचे असणे वा नसणे हे माझ्या प्रकाशावर अवलंबून आहे. हा जो माझा सहज प्रकाश तो "भक्ति" या नावाने ओळखला जातो आणि म्हणून आर्ताच्या ठायी आर्ती पुरविणाऱ्याचे मी रूप घेतो. अर्थप्राप्तीची इच्छा करणाऱ्याला, याचना करणाऱ्याला अर्थ पुरवितो. ज्या हेतूने भक्ति केली असेल त्या हेतुप्रमाणे त्या भक्तिला ते ते नाव येते आणि भक्ताच्या इच्छेप्रमाणे मी तसा तसा होत जातो. याप्रमाणे अज्ञानाचा अंगीकार करून ही माझी भक्ति व्यवहार करू लागली की ती भक्ति मला द्रष्ट्याला दृश्य करून दाखविते. मुखाच्या योगाने मुखाला मुख दिसते हे खरे पण लटके दुजेपण आरसाच दाखवतो. दृष्टि चंद्राला पहाते हे खरे पण तिच्यात दोष उत्पन्न झाला की एका चंद्राचे दान चंद्र दिसू लागतात. मीच माझ्याकडून भक्तिच्या योगाने आकलन केला जातो पण वेगळेपण दिसते ते खोटे आहे व ते अज्ञानाला वश झाल्याने दिसते. ज्ञानदृष्टिमुळे अज्ञान फिटते. माझे दृष्टत्व मला भेटते आणि प्रतिबिंब बिंबात एकवटते त्याप्रमाणे हा ज्ञानी भक्त माझ्याशी एकरूपच होतो.

सोन्यामध्ये हिणकस धातू असते तेव्हाही त्यातील सोने अढळ असतेच पण ती हिणकस धातू त्यातून निघून गेली की निव्वळ सोनेच उरते. पौणिमेच्या आधी चंद्र कलांनी युक्त असतोच पण पूर्णिमेस त्याला पूर्णता भेटते, त्याप्रमाणे मी ह्या तिन्ही भक्तांना दिसतो पण अन्यथा ज्ञानाच्या द्वारे दिसतो. ज्ञानी भक्त मात्र दृश्याचा

अनुक्रमणिका

विरास करून मला एकरूपतेने भेटतो. पार्था, म्हणून ही जी ज्ञानोत्तर भक्ति आहे हा दृश्यरूप मार्गाच्या पलीकडचा व सर्वश्रेष्ठ असा चौथा भक्तियोग आहे असे मी तुला म्हटले. या ज्ञानोत्तर भक्तिने तो माझा भक्त माझ्याशी एकरूप झाला, तो केवळ मीच झाला हे तुला ऐकून ठाऊक आहेच.

कपिध्वजा अर्जुना, सातव्या अध्यायामध्ये मी हात वर करून निश्चयात्मक रीतीने तुला सांगितले आहेच की तो ज्ञानी भक्त माझा आत्मा आहे. कल्पाच्या आरंभी ही भक्ति मी भागवताच्या मिषाने सर्वांत उत्तम म्हणून ब्रह्मदेवाला उपदेश करून सांगितली. त्या श्रेष्ठ भक्तिला निरनिराळे लोक निरनिराळी नावे देतात. ज्ञानी तिला स्वसंवित, शैव तिला शक्ति अशी नावे देतात पण अर्जुना, आम्ही तिला परमभक्ति असे नाव देतो.

अर्जुना, तुला क्रमयोग्याचे वर्णन सांगितले आहेच. माझी भक्ति करीत करीत मला येऊन मिळण्याची वेळ येते तेव्हा ती त्या क्रमयोग्याला प्राप्त होते आणि मग ती प्राप्त झाल्यावर माझ्या निर्मळ स्वरूपाने सर्व विश्व भरून जाते.

असे मनात येते की देवाला भक्ति अत्यंत प्रिय. नवव्या अध्यायात, बाराव्या अध्यायात देवांनी मुक्त कंठाने अर्जुनाला भक्तिचा उपदेश केला. सातव्या अध्यायात ही भक्ति चार प्रकारची किंबहुना "माझे भक्त चार प्रकारचे आहेत" असे सांगितले.

आर्त, जिज्ञासू, अर्थार्थी व ज्ञानी असे चार प्रकारचे भक्त असले तरी त्यापैकी सर्वश्रेष्ठ भक्त म्हणजे ज्ञानी भक्त असे म्हटले. अर्थात हे चार प्रकार वरवरचे आहेत. भक्तित पहिली आणि चौथी असा विशेष भेद नाही असेही म्हटले. मग वाटते की भक्तित प्रकार नाहीत पण अवस्था असाव्या. संसारात अर्थाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे आणि म्हणून त्या बाबतीत जीव प्रथम देवाकडे धाव घेतो. सकाम भक्ति असते पण श्री. गुरूदेव रानडे म्हणत की. "प्रथम भक्ति सकाम असायचीच. मीसुद्धा परीक्षेत यश मिळावे म्हणूनच नाम घेवू लागलो."

गुरूदेवांनी १९०१ मध्ये म्हणजे पंधराव्या वर्षी भाऊसाहेबमहाराज उमदीकर यांचा अनुग्रह घेतला व ते थोडेफार नामस्मरण करू लागले. नामस्मरण केले तर परीक्षेतही यश मिळते असे गुरूंचे उद्गार ऐकून त्यांनी मॅट्रिकच्या परीक्षेच्या वेळी नेमाने काही माळा करण्यास सुरवात केली. त्या परीक्षेत गुरूदेवांनी जगन्नाथ शंकरशेट स्कॉलरशिप मिळाली तर आपले गुरू खरे असा एक संकेत मनाशी ठरवला होता. त्याप्रमाणे स्कॉलरशिप मिळालीही घरची परिस्थिती बेताची असल्याने ही स्कॉलरशिप मिळाल्यामुळे त्यांचे पुढील चार वर्षांचे शिक्षण सुकर झालेच पण सर्वांत मोठा फायदा हा झाला की पारमार्थिक गुरूवरील श्रद्धा बळकट झाली.

नोकरी, पत्नीवियोग, पुत्रवियोग, मातृवियोग अशा अनेक संकटकाळामध्ये त्यांनी गुरूचरणांजवळ आर्ततेने धाव घेतली. "नाम वाढवावे". "कट्टाने करावे", "जेव्हढी भक्ति तेव्हढी प्राप्ती" असा उपदेश गुरू करीत होते आणि त्यामुळे मातृवियोगाच्या वेळी "देवा तुझ्या मनात असेल तर तिला राहू दे नसेल तर घेऊन जा." असे म्हणण्याइतकी मनाची तयारी झाली होती. "देवाच्या इच्छेने जे व्हावयाचे असेल ते होऊ दे" अशी भूमिका तयार झाली. ह्या सगळ्या प्रपंच दुःखातून देवाबद्दलची जिज्ञासा पूर्ण होऊन त्याच्याशी एकरूप

होण्याइतकी तयारी झाली. घराच्या कोनशिलेवर "तत्त्वजिज्ञासेचे प्रश्न ईश्वरपादपरागसेवेवाचून सुटत नसतात" हे भागवतातील एका उताऱ्याला दिलेले शीर्षक निंबाळच्या घरालाही द्यावे असे त्यांनी सुचविले. इतकेच काय पण "माझ्यापुरते काम झाले आहे" असे निश्चयात्मक रीतीने म्हणण्यापर्यंत ते पोचले होते. सगुणाचा साक्षात्कार तर होतच होता, निरनिराळे नाद, निरनिराळ्या प्रकारचे तेज, शेषदर्शन, अनंतदर्शन ते घेत होतेच पण कुणीतरी विचारले, "तुमचा मार्ग सगुण की निर्गुण?" या प्रश्नाचे उत्तर त्यांनी दिले, "कुठला सगुण? कुठला निर्गुण? आमच मार्ग देवाचा."

श्री. गणपतराव कारखानीसांना त्यांनी १९२० मध्ये स्पष्टच सांगितले, "गणपतराव, माझ्यापुरता परमार्थ झाला. आता यापुढे श्रीमहाराजांची जशी इच्छा असेल तसे होईल." कारखानीस पुढे म्हणतात, "माझ्यापुरता परमार्थ झाला याचा अर्थ—

**ज्ञानदेव म्हणे तरलों तरलों ।**
**आतां उद्धरिलो गुरूकृपे ॥**

असा होय. माझ्या एकट्याचा उद्धार झाला. मी सुटलो, मी मुक्त झालो असा आहे. आता जगास उद्धारण्याचे सामर्थ्य देणे वा न देणे हे श्रीगुरूकृपेवर अवलंबून आहे. असा गुरूदेवांच्या म्हणण्याचा आशय."

स्कॉलरशिप म्हणून ठराविक माळा करण्यापासून येथेपर्यंत गुरुदेवांनी नामाची कास धरून भक्ति फुलविली आणि ती जगास शिकविली. देव भक्तिचे जे जे चार प्रकार सांगतात ते म्हणजे भक्तिच्या चढत्या अवस्था असाव्या असे वाटते.

देव पुढे म्हणाले, "अर्जुना सगळे जगच असे परमात्मभावाने भरले की वैराग्य आणि विवेक, बंध आणि मोक्ष, वृत्ति आणि चिंतन हे सगळेच त्या भावात एकत्वाने बुडून जाते. कल्पांताच्या वेळी चोरी भूतांना आकाश गिळून टाकते त्याप्रमाणे अरत्र आणि परत्र हे दोन्ही काठ एकच होतात. साधक असा अनुभव घेतात की, मी परमात्मा अलीकडे, पलीकडे यांच्यापेक्षा वेगळा साध्यसाधनातीत, शुद्ध असा आहे. हे एकदा जाणवले की ते मी होऊन माझा अनुभव घेतात.

ऐक पार्था, समुद्राच्या अंगामध्ये मिळून जशी गंगा समुद्रावर स्पष्ट तळपते त्याप्रमाणेच हे देवभक्तांचे ऐक्य आहे. आरसे स्वच्छ करून एकमेकापुढे मांडावे म्हणजे आरशाचेच रूप ज्याप्रमाणे आरशात दिसते त्याप्रमाणे पाहिला जाणारा व पाहणारा हे दोघेही द्रष्टेच होतात. जागृति आल्यावर स्वप्न नाहीसे व्हावे आणि आपण आपलेपण अद्वैताने भोगावे तसे हे घडते. 'आरसा बाजूला नेला, मुखबोधही गेला' म्हणजे एकट्यानेच देखलेपणाचा अनुभव घ्यावा तसे हे आहे.

आता कुणी कुणी असे म्हणतील की ऐक्य झाल्यावर भोग घडतोच हे कसे घडेल? शब्दांनीच शब्दांची स्तुती आणि निंदा होते ना तसेच हे आहे. ऐक्य असूनही त्याचा भोग हेच त्याचे स्वरूप आहे हे पार्था, तू पक्के ध्यानात ठेव.

हे बघ मद्रूप झाल्याशिवाय माझी भक्ति कशी करता येईल? राजेपण अंगी? असल्याशिवाय राजा राजेपण कसे भोगू शकेल? अंधाराने अंधाररूप रहाणार असा हट्ट धरला तर तो सूर्याला आलिंगन कसे देणार? अरे, शंका घेणाऱ्यांच्या गावी बहुधा सूर्य पहायला दिवा लावत असतील किंवा आकाश आत घ्यावयासाठी मांडव घालत असतील.

अरे, आकाश झाल्याशिवाय आकाशाचे स्वरूप कळेल कसे? गुंजांचे लेणे दागिन्याच्या ताटात शोभेल कसे? जो मद्रूप झालाच नाही त्याला मी कळणार कसा?

तरुण स्त्री आपल्या आंगचे तारुण्य भोगते त्याप्रमाणे तो क्रमयोगी मी होऊन माझा अनुभव घेतो. तो सर्वांगाने माझे रूप होऊन जातो. काहीही क्रिया न करता तो माझी भक्ति करतो. अलंकार सोनेपण जसे सहज मिरवते तसा तो मद्रूप होतो. चंदन आणि सुवास, चंद्र आणि चंद्रिका ही जशी अकृत्रिम आणि सहज एकरूप असतात त्याप्रमाणे अद्वैतात केवळ अद्वैत नांदते. त्या अद्वैतास क्रिया सोसतच नाही. ही ज्ञानोत्तर अभेद भक्ति कशी असेल हे पार्था, अनुभवाचे शास्त्र आहे. बोलण्याचे नाही.

आता पूर्वसंस्कार आहेत म्हणून काहीबाही बोलण्याची क्रिया नकळत भक्ताच्या हातून घडते पण त्या विनवणीला ओ देणारा पण मीच आणि बोलणारा पण मीच असतो. बोलणाराच जेव्हा बोलणाऱ्याला भेटेतो तेव्हा बोलणे घडत नाही. मौनच घडते आणि हे मौनच माझी उत्तम स्तुती आहे. म्हणून तो बोलत असताना त्याच्या बोलण्यातून मीच बोलतो मीच मला भेटल्याने मौन सिद्ध होते आणि ह्या मौनाने तो माझी स्तुती करतो. त्याप्रमाणे अर्जुना बुद्धिने किंवा दृष्टिने तो जे जे पाहू जातो ते पहाणे दृश्य पदार्थ लोटून देते आणि पहाणारच दाखवते. दृश्य जाऊन द्रष्टा तेव्हा द्रष्ट्यालाच भेटतो. कसा म्हणशील तर आरसा पुढे येण्यापूर्वीपासून असलेले मुख ते पहाणारे असून तेच प्रतिबिंबरूपाने आपल्याला पहाते त्याप्रमाणे द्रष्टा द्रष्ट्याला भेटला की एकटा द्रष्टाच राहतो आणि मग द्रष्टेपणही घडत नाही. स्वप्नातल्या प्रियेला आलिंगन देण्यासाठी उत्सुक झालेला पुरुष जागा झाला की स्वप्नातील मिथ्या स्त्री नाहीशी होऊन एकटाच उरतो. दोन लाकडे एकमेकावर घासली की अग्नि निर्माण होतो आणि त्या दोन्ही लाकडांचा नाश करून केवळ आपण उरतो, दोन ही भाषाच उरू देत नाही. सूर्य आपले प्रतिबिंब हातात घेऊ गेल्यास प्रतिबिंब तर जातेच पण बिंबही जाते त्याप्रमाणे मी होऊन तो पुरुष दृश्याला पाहू गेला तर दृश्य जातेच पण दृश्यसापेक्ष जो द्रष्टेपणा तोही जातो. सूर्याने अंधार प्रकाशित केला की सगळीकडे प्रकाशच प्रकाश होऊन प्रकाश्यता जशी वेगळी उरत नाही त्याप्रमाणे माझ्याशी एकरूप होऊन पहाणे नाही आणि न पहाणेही नाही जी अवस्था निपजते ते खरोखर माझे दर्शन आहे.

किरीटी, काय सांगू त्या अनुभवाची प्रौढी! अरे, कुठला वाटेल तो पदार्थ असू दे त्याच्या भेटीबरोबर तो क्रमयोगी दृष्ट दृश्यातील द्रष्टेपण सदाच अनुभवत असतो. आकाश आकाशाने भरून गेले की हालत नाही, ढळत नाही, जात नाही, येत नाही त्याप्रमाणे माझ्याशी एकरूप झाल्यामुळे तो आत्मरूप होऊन जातो आणि दुसऱ्या कशालाही तेथे जागा उरत नाही.

कल्पान्ती पाणी इतके सगळीकडे भरून जाते की त्या पाण्याला हलायलासुद्धा जागा उरत नाही त्याप्रमाणे मी आत्म्याने त्याला भरून टाकले की त्याची तशी अवस्था होते. आपलाच पाय आपल्या डोक्यावर कसा चढेल? अग्नि स्वतःचाच दाह कसा करणार? पाणी स्नान करण्यासाठी पाण्यात कसे शिरणार?

म्हणून अर्जुना, त्याचे सर्व काही मी झाल्यामुळे त्याचे जाणे येणे थांबते. मी जो द्वैतशून्य एकाकी आहे, त्या माझी यात्रा करणे हे असे आहे. लाटा पाण्यावर खूप वेगाने धावतात. पण लाटांनी काही कुठला दूरचा प्रवास केलेला नसतो. जे सोडावे, मांडावे, ज्या ठिकाणी जावे, यावे, ज्याच्या योगाने चालावे ते सगळे पाणीच पाणी आहे, त्यामुळे लाट कुठेही गेली तरी पाणीच आहे, पाण्याशी तिची असलेला एकात्मता काही मोडत नाही, त्याप्रमाणे हा क्रमयोगी परमात्मपणाने पूर्ण भरलेला असतो. तो सर्व बाजूंनी मलाच प्राप्त झालेला असतो आणि अशा रीतीने कुठे न जाणे ही माझी यात्रा त्याला घडते. त्या यात्रेचा तो उत्तम यात्रेकरू होतो. अजून त्याचे शरीर शिल्लक आहे आणि म्हणून तो काही एक करावयास बसतोही मात्र.

गुरूदेव रानडे म्हणत, “आध्यात्मिक जीवन जगावे हाच माझा तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाचा हेतू आरंभापासून होता आणि त्या अभ्यासाची परिणतीही परमार्थातच व्हावी असे एकच मागणे देवापाशी आहे.”

एकदा त्यांना कुणीतरी विचारले, “तुम्ही नेहमी इतरांचे विचार स्पष्ट करून सांगता पण तुमचे स्वतःचे तत्त्वज्ञान काय आहे?” त्यावर त्यांनी उत्तर दिले. “मी सकाळी उठल्यापासून रात्री निजेपर्यंत ज्या ज्या क्रिया करतो त्याचे सूक्ष्म निरीक्षण केले तर माझे तत्त्वज्ञान काय आहे हे तुम्हाला आपोआप कळून येईल.”

१९२१ मध्ये आजारी पडून ते इंचगेरीस जाऊन राहीले तरी तिथेही त्यांचे लेखन वाचन चालूच होते. त्यावेळी ते आपल्या उपनिषदावरील ग्रंथाची तयारी करीत असल्यामुळे ध्यानधारणा सांभाळून दिवसाकाठी चांगले पाच-सहा तास हे काम ते करीत. श्री. ग. वि. तुळपुळे यांनी त्यांना पत्र लिहून विचारले, “प्रकृति बरी नसताना आपण इतके काम कशाला करता? त्यापेक्षा हा वेळ नामस्मरणाकडेच का देत नाही?” त्यावर प्रो. रानडे यांनी उत्तर लिहिले, “माझ्याने करवले असते तर चोवीस तास नामस्मरणच केले असते. पण ते होत नाही म्हणून हा उद्योग करतो. वास्तविक या कामाला मी कवडीइतकीही किंमत देत नाही. पण एकसारखा नेम होत नाही म्हणून त्याला पोषक होईल असा दुसरा काहीतरी उद्योग करावा लागतो. एक वेळ अशी होती की परमार्थाहून तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाची माझी ओढ वरचढ ठरली असती परंतु सुदैवाने तसे झाले नाही आणि माझा परमार्थ जिवंत राहिला.”

श्री. गुरूदेवांनी काही व्याख्याही वेगळ्या सांगून ठेवल्या. ते म्हणत, “अवतार म्हणजे राम-कृष्णादि अवतार नव्हेत. साधकाच्या डोळ्यापुढे अवतरणारा त्याचा पारमार्थिक अनुभव! असा जो अनुभव अवतरतो तो अवतार!

सगुणभक्ति म्हणजे मूर्तिपूजा नव्हे. पोथी वाचन, अध्यात्मश्रवण, भजन व देहधारी गुरूची सेवा म्हणजे सगुण भक्ति.

अनुक्रमणिका

"निर्गुण भक्ति म्हणजे ब्रह्म, माया, विवेक नव्हे तर केवळ नामस्मरण!"

एक दिवस ते म्हणाले, "अलीकडे लोक सगुणाच्या मागे फार आहेत. जो उठतो तो मला नमस्कार करतो आणि माझे फोटो घेतो. हा सर्व सगुणभक्तिचा अतिरेक आहे. सगळीकडे सगुण भरले आहे. निर्गुणाची जागा आता एकच उरली आहे ती म्हणजे नेमाची खोली! "

ते असेही म्हणत, "कृष्णार्पणमस्तु म्हटल्याने कृष्णार्पण होत नाही. तर कोणतेही कर्म करताना व केल्यानंतर देवाचे नामस्मरण करणे हे खरे अर्पण होय. तत्त्वमसि हे वाक्य देखील केवळ कल्पना नव्हे. साधकासमोर जेवढी प्रचीती आहे तेवढा तो स्वतः आहे याचे ते वाक्य द्योतक आहे. साधकांनी आपापले अनुभव एकमेकाना निरहंकार वृत्तिने सांगणे म्हणजे "सख्य भक्ति"

देवांचे रूप दिसत नसतानाही त्याच्या नामाचे स्मरण करणे हा कर्मयोगाचा खरा अर्थ आहे.

पारमार्थिक वृत्तिस बळकटी यावी, ती सतत टिकावी यासाठी संत, साधु, सज्जन नमस्कारीत जावे हे रामदासांनी सांगितलेले व्रत गुरूदेवांनी जन्मभर पाळले व साधकांनाही पाळायला सांगितले. नेमाबद्दलही त्यांचा असाच कटाक्ष होता. एकदा सप्ताह झाल्यावर बरीच साधक मंडळी आपआपल्या गावी गेली. काही थोडी निंबाळला राहिली होती. सप्ताह संपला म्हणून साधक नेमाकडे दुर्लक्ष करून गप्पा मारीत बसले होते. ते पाहून गुरूदेव नेमाच्या खोलीतून बाहेर आले व त्यांना म्हणाले,

"आमचा सप्ताह कधीच संपत नाही. तो सुरूच असतो. व्यर्थ कालक्षेप करू नका. नेमाला बसा."

तेव्हा देव सांगत आहेत. "तो साधक काही करायला बसला तरी भक्तिच्या प्रांगणातच माझ्याशी ऐक्य भावाने खेळत असतो. अर्जुना, कर्म आणि कर्ता हे जाऊन माझ्याशी ऐक्य पावून मला पाहिले की, तो मीच होतो. आरशाने आरशात पाहिले तरी न पाहिल्यासारखे होते सोन्याने सोने झाकले तर न झाकल्यासारखे होते. दिव्याने दिव्याला प्रकाशले तरी ते न प्रकाशने होते त्याप्रमाणे मी होऊन केलेले कर्म, कर्म होतच नाही. तो क्रमयोगी कर्म करत असतो पण अमुक कर्म मला कर्तव्य आहे असा भावच नसल्याने त्याचे कर्म करून न केल्यासारखे होते. मद्रूप झाल्याने कर्माचे हे जे न करणे आहे तेच माझे मर्माचे पूजन आहे. चांगल्या रीतीने कर्म करीत असताना कर्म केलेच नाही असे जे काही त्याचे करणे आहे ती माझी महापूजाच तो करतो आहे असे समज. तो बोलतो ते माझे स्तवन आहे, तो पहातो ते माझे दर्शन आहे तो चालतो ते माझे अद्वयाचे चालणे आहे, तो जे जे करील ती ती माझी पूजा आहे. तो जी कल्पना करतो तो माझा जप आहे, तो ज्या स्थितीत असतो ती स्थिती ही माझी समाधीच आहे. सोने आणि काकण ही जशी एकमेकांशी अनन्य भावाने एक असतात त्याप्रमाणे तो भक्ति योगाने माझ्याशी अनन्य असतो.

काय सांगू अर्जुना, तंतु आणि वस्त्र, मृत्तिका आणि घट ही जशी एकरूप आहेत तसा तो माझा भक्त माझ्याशी एकरूप असतो. हे सुबुद्धि अर्जुना, याप्रमाणे अनन्यसिद्ध भक्तिने या अवघ्या दृश्यामध्ये मला द्रष्ट्याला तो अनन्यत्वाने पहातो. 'जागृति, स्वप्न, सुषुप्ति या तिन्ही अवस्थांच्याद्वारे स्थूल, सूक्ष्म, कारण या तीन

प्रकारच्या उपाधींच्या व विश्व, तैजस व प्राज्ञ या तीन उपहितांच्या आकाराने जागृती व स्वप्न यात असणेपणाने आणि सुषुप्तिमध्ये नसणेपणाने जे जे काही दृश्य म्हणून आहे या सर्वांचा द्रष्टा मी आहे. अशा पूर्ण बोधाच्या भरात लग्नामध्ये जसा वधूवरांना खांद्यावर घेऊन धेंडा नाचतो तसा तो ज्ञानी भक्त माझ्याशी एकत्व झाल्याचा अनुभव खांद्यावर घेऊन नाचतो.

साप भासत होता पण तो साप नव्हे दोरीच आहे. आकार केवळ सापासारखा होता हे ज्ञान नीट पाहिल्यावर होते. अलंकारामध्ये नुसते सोने आहे, सोन्यापलीकडे अलंकार नाही हे तो अलंकार आटवला की, पक्के होते. सगळे पाणीच आहे, लाटा हा काही वेगळा पदार्थ नाही तेव्हा त्या लाटांच्या आकाराने फसू नये असे पहाणारा ठरवितो. स्वप्नामध्ये सगळे पदार्थ जाग आल्यावर मोजायला सुरवात केली तर आपण स्वतःशिवाय दुसरा पदार्थ खराखुरा आस्तित्वातच नव्हता हे कळते. त्याप्रमाणे तो ज्ञानी भक्त जे जे काही आहे आणि नाही ते ते सगळे मीच आहे हा अनुभव घेतो आणि ही प्रतीति भोगतच रहातो. तो ज्ञानी भक्त माझ्याशी एकरूप झाला की स्वतःकडे पहायला जातो आणि त्याला दिसतो देवच! मग तो आनंदाने नाचतो, गातो आणि म्हणतो,

“अहो, मला जन्म नाही. मला जरा नाही. मला क्षय नाही. मी अपूर्व आहे.
मी अपार आहे. आनंदमय आहे.
मी अचल आहे. अच्युत आहे.
आद्य आहे. अव्यक्तही आहे. व्यक्तही आहे.
मी नियम्य आहे. नियामकही आहे.
आरंभरहित आहे, अमर आहे, अभय आहे.
सर्वांचा आधार आहे आणि आश्रित आहे.
मी स्वामी आहे, निरंतर असणारा आहे.
स्वतःसिद्ध आहे, अखंड आहे.
मी नवा पण, जुना पण, शून्य पण, संपूर्ण पण, स्थूल पण आणि अणुहीपण.
मी अक्रिय आहे, असंग आहे, अशोक आहे, व्याप्त आहे. व्यापकपण आहे,
मी पुरुषोत्तम आहे.
मी अशब्द, अक्षोत्रु, अरूप, अगोत्र, सम आणि स्वतंत्र आहे.
“मी ब्रह्म आहे.”

अद्वय भक्तिने पार्था आत्मत्त्वाने तो मला पहातो. हा बोध जाणणाराही मीच आहे हे तो जाणतो.

झोपेतून जागे झाल्यानंतर आपले एकपण उरते. तेही आपल्याला आपल्या ठिकाणीच स्फुरते. सूर्य उगवला हे सूर्यप्रकाशानेच कळते. प्रकाशक आणि प्रकाश्य यांचा अभेद दाखवणारा पण तोच असतो. त्याप्रमाणे ज्ञेय वस्तूचा लय झाला म्हणजे जाणणारा उरतो आणि तो जाणणारा स्वतःकडूनच जाणवला, जाणला जातो. अर्जुना, ह्या आपल्या अद्वयपणाला जाणणारे जे ज्ञान ते ज्ञान ईश्वर आहे आणि तो ईश्वर मी स्वतःच आहे हा बोध त्याला होतो.

द्वैत आणि अद्वैत यांच्या पलीकडचा आत्मा मी आहे हे तो जाणतो. जागे झाल्यावर स्वप्नांतील अनेकत्व जाऊन आपले एकपण जसे आपल्या आपण दिसते व तोही जागृतीचा एकाकीपणाचा अनुभव गेल्यावर ज्याप्रमाणे काय होऊन रहाते हे कळत नाही त्याप्रमाणे मी देव व तो भक्त हे द्वैत स्वानंदानुभवाच्या ऐक्याने कालवून माझ्यामध्ये भक्त प्रवेश करतो तेव्हा 'तो' ही भाषा संपते आणि 'तो' च्या सापेक्ष जो 'मी' तोही संपतो. जेथे तोही नाही, मीही नाही अशा माझ्या स्वरूपात तो सामावून जातो. सोन्याच्या दागिन्याकडे सोने म्हणून पाहिले की अलंकार न आटविता आटून जातो ना? पाण्याशी मिसळून पाणी झाल्यावर मिठाचा खारेपणा पाण्याच्या रूपाने राहतो आणि तो खारेपणाही गेल्यावर मिठाचे पाणी झाले हा व्यवहारही संपतो, तसेच हे घडते. कापूर जळून संपला की अग्निही संपतो. दाह्य कापूर व दाहक अग्नि ही दोन्ही नाहीशी होऊन त्यांच्यापलीकडे असलेले शून्य आकाश उरते. एकातून एक काढून टाकला की शुन्य उरते त्याप्रमाणे आहे आणि नाही ही दोन्ही गेली की मी उरतो. ब्रह्म, आत्मा, ईश इत्यादि शब्दांचा लाग लागत नाही. बोलण्यालाही तिथे अवकाश रहात नाही. न बोलणेही बोलू नये ते तोंड भरून बोलावे, जाणीव आणि नेणीव ह्या दोन्हीचे भान टाकून ते जाणावे. या स्वरूपात बोधानेच बोध जाणावयाचा, आनंदानेच आनंद घ्यावयाचा, सुखानेच केवळ सुख भोगावयाचे. अर्जुना, तिथे आता लाभाला लाभ झाला, प्रभेला प्रभेने आलिंगन दिले, विस्मय विस्मयात बुडाला, ऐक्यभाव ऐक्याला आला, विश्राम विश्रान्तीला आला. अनुभव अनुभवाने वेडा झाला.

किंबहुना असे शुद्ध मीपण हे फळ त्या क्रमयोग्याला क्रमयोगाच्या विस्तृत वेलीची सेवा केल्यामुळे मिळते. क्रमयोगी आपली जीवदशा मला अर्पण करतो आणि त्या मोबदल्यात क्रमयोगरूपी सार्वभौम राजाच्या मुकुटावर असणारे ज्ञानरत्न जो मी तो होतो. जीवदशा जाते आणि परमात्मरूप ज्ञापरत्न तो होतो. अरे क्रमयोग प्रासादाच्या मोक्षरूपी कळसाच्या वरची जी पोकळी ती तो झाला.

अर्जुना, संसाराच्या आडरानात क्रमयोगरूपी चांगली वाट माझ्याशी ऐक्य होणे या गावात प्रविष्ट झाली आहे. त्या भक्तचित्तरूपी गंगोदकाने मी जो स्वानंदाचा समुद्र त्याच्यामध्ये त्वरेने प्रवेश केला की तो भक्त माझ्याशी एकरूपच होऊन जातो. क्रमयोगाचा महिमा हा इथपर्यंत आहे म्हणूनच आम्ही तुझ्याजवळ त्याचे पुन्हा पुन्हा वर्णन करतो आहो.

पण अर्जुना, अमक्या स्थानी अमुक वेळी अमक्या पदार्थामुळे मी मिळतो असे मात्र समजू नको. मी सर्वांच्या ठिकाणी सर्व वेळी आयता आहेच. म्हणून माझ्या प्राप्तीसाठी तसा विचार केला तर श्रमावयाची काही जरूरीच नाही. या सुलभ क्रमयोगामुळे विनासायास माझी प्राप्ती होते.

माझ्या प्राप्तीचा उपाय सांगणारे संप्रदाय प्रसिद्धीस आले आहेत, गुरूशिष्य परंपरेने ते उपाय नीट जतन करून पुढच्या साधकांस सांगितलेही जातात पण तसा विचार केला तर किरीटी, पृथ्वीच्या पोटात खजिना सिद्धच असतो. आचळात दूध तयारच असते, स्वतः सिद्धच असलेली गोष्ट आपल्या हाती यावी एवढाच या उपायांचा उपयोग असतो."

माउली म्हणतात, "फळ सांगून झाले ते प्राप्त करून घेण्याचे उपायही सांगून झाले." असे असताना देव पुन्हा साधन प्रकार का सांगत आहेत असे कुणाच्या मनात येईल. देवानी हे परिश्रम घेतले याचे कारण

अनुक्रमणिका

एवढेच की मोहाने व्याप्त झालेल्या अर्जुनाच्या मनावर एकदा बोध ऐकून परिणाम होईल का? त्याच्या मनातल्या सगळ्या शंका जातील का? त्याला उपदेश नीट कळला की नाही असा विचार त्या परमवत्सल भगवंताच्या मनात आला. ते मनाशी म्हणाले, “ह्याच्या चेहऱ्यावर अजूनही ज्ञान झाल्याचा संतोष पूर्णतया प्रगट झालेला दिसत नाही. दिव्याची काजळी पूर्ण गेली असे दिसत नाही. तेव्हा पुन्हा एकदा बोलून त्याच्या चित्ताची भ्रान्ति पूर्ण दूर करू दे. मला कितीही कष्ट पडोत पण हा माझा सखा पूर्ण बोधयुक्त होऊन पुन्हा आपल्या तेजाने चमकू दे.”

आणि गीतेशिवाय तर कुणाला तरणोपाय नाही इतर शास्त्रे अविद्येचा नाश करण्यास समर्थ आहेत. ती उपायही सांगतात पण आत्मस्वरूपाचे ज्ञान करून देण्याची स्वतंत्र योग्यता त्यांच्यामध्ये नाही. वारा ढग उडवून देतो पण काही सूर्याची घडण करीत नाही. हाताने पाण्यावरचे गोंडळ दूर करता येते पण पाणी निर्माण करण्याचे सामर्थ्य त्या हातात नाही. इतर शास्त्र उपाय सांगतात, गीता देवाची, मोक्षाची प्रत्यक्ष प्राप्ती करून देते. इतर अध्यात्मशास्त्रांना जेव्हा काही शंका येतात तेव्हा ती शास्त्रे आपल्या अभिप्रायाचा खरेखोटेपणा विचारून घेण्यासाठी जिथे येतात ते हे गीताशास्त्र आहे. पूर्वेकडे सूर्य उगवल्याबरोबर पूर्व दिशा तेजोमय होतेच पण इतरही दिशा उजळून निघतात त्याप्रमाणे गीतेमुळे इतर शास्त्रे प्रकाशमान होतात. गीतेच्या उपदेशाने इतर शास्त्रातील बोधाचा उलगडा होतो. गीता हा जणू काही शास्त्रेश्वरच आहे आणि ईश्वर म्हणजेच नियामक! गीतेमुळेच सर्व शास्त्रे सनाथ झाली आहेत. आतापर्यंत आत्मा आपल्या हातानी घेता येईल असे उपाय विस्ताराने देवानी अर्जुनाचे निमित्त करून विश्वकल्याणासाठी प्रगट केले आणि आता तर गीता संपत आली. तेव्हा “आरंभापासून शेवटपर्यंत मी एकच प्रमेय सांगतो आहे.” असा शिक्का शिष्याच्या मनावर अढळपणाने उमटविण्यासाठी देव पुन्हा एकदा बोध थोडक्यात सांगत आहेत इतकेच.

या गीताग्रंथाच्या मध्यभागी निरनिराळ्या अधिकाराचे विवेचन करण्याच्या निमित्ताने देवांनी अनेक सिद्धान्ताचे निरूपण केले. या ग्रंथाचा मागला, पुढला संबंध लक्षात घेतला नाही तर देवांनी गीतेत अनेक सिद्धांत सांगितले आहेत असे कुणाला वाटेल पण तसे नाही. इतर सिद्धान्त देवाच्या महासिद्धान्तामध्ये अंतर्भूत आहेत हे ध्यानात ठेवावयाचे. देवांच्या महासिद्धान्ताचे स्वरूप असे आहे—

“अविद्येचा निरास झाला पाहिजे.
अविद्येचा निरास करून मोक्ष मिळतो.
अविद्येचा निरास व मोक्ष प्राप्ती
या दोन्हीस साधन आहे

**“ज्ञान”**

ह्या गीता ग्रंथामध्ये हा एकच महासिद्धान्त नाना प्रकारानी देवांनी मांडला आहे.

देव ज्ञानदाता असले तरी भक्तवत्सल पण आहेत. “माझ्या अर्जुनाला हा बोध कळला असेल ना!” ही शंका जराशीसुद्धा देवांना सहन होईना.

साध्याचे वर्णन, विवेचन करून झाल्यावर देवांनी नाना प्रकारानी विस्तृतपणे या ग्रंथात सांगितलेला उपदेश दोन अक्षरात पुन्हा सांगावा असा विचार करून देव साधनाचे स्वरूप सांगण्यास प्रवृत्त झाले. देवांना क्रमयोगाचे इतके कौतुक होते की, त्यांनी पुन्हा एकदा क्रमयोग्याबद्दल सांगायला सुरवात केली.

ते म्हणाले, "सुभटा अर्जुना कळले ना रे? क्रमयोगी निष्ठेने या मार्गाने येऊन माझ्या स्वरूपात स्थिर होती. स्वकर्मरूप पवित्र फुलांनी माझी उत्तम पूजा करतो आणि त्या पूजेचा प्रसाद म्हणून मी संतुष्ट होऊन त्याला ज्ञाननिष्ठा देतो. तो ज्ञानमार्ग जेव्हा हस्तगत होती तेव्हा माझी भक्ति प्रगट होते आणि त्या भक्तिने तो माझ्याशी समरस होऊन सुखी होतो. अर्जुना, कर्मज्ञान आणि भक्ति यांचा मुळीच संघर्ष नाही. ते एकाच हिऱ्याचे दैदिप्यमान पैलू आहेत, हे तुझ्या ध्यानात आले ना? अरे ज्ञान प्रगट होण्यासाठी जिथे ज्ञान प्रगट व्हावे त्या साधकाचे सगळे घटक शुद्ध होण्यास स्वकर्माचरणाशिवाय दुसरा उपाय नाही, ज्ञानाचा प्रकाश पडला की भक्तिचा उदय आणि भक्तिने माझ्याशी ऐक्य हा क्रम नीट ध्यानात ठेव.

विश्वाचे प्रकाशन करणारा आत्मा जो मी त्या मला तो अनुसरतो. माझे सर्वव्यापकत्व जाणून तो अनुसरतो. आपला कठिणपणा टाकून मिठाचे पाण्याचा आश्रय करावा किंवा वाऱ्याने आपले भटकणे सोडून देऊन आकाशात स्थिर व्हावे, निश्चल व्हावे, तसा तो क्रमयोगी बुद्धि, वाचा, शरीर या सर्व बाबतीत माझा आश्रय घेऊन स्थिर होतो, निश्चल होतो. गंगेला मिळाल्यावर गावगंगा आणि महानदी हा फरक उरत नाही. अग्निने दोघांना कवटाळून घेतले की चंदन व जंगली लाकूड हा भेद रहात नाही. परिसाचा स्पर्श झाला की पाच कस की सोळा कस हा विचार भेद रहात नाही. त्याप्रमाणे शुभाशुभ भासते. मी सगळीकडे प्रकाशमान झालो नाही तोवरच रात्र आणि दिवस हा भेद, जोवर सूर्य उगवला नाही तोवरच असतो तसा.

अर्जुना, एकदा का माझी भेट झाली की त्या क्रमयोग्याची सर्व कर्मे संपली. अगदी निषिद्ध कर्म जरी त्याच्या हातून घडले तरी तेही फल देण्यास समर्थ होत नाही. कर्माचे अवसानच संपते. अर्जुना, तो क्रमयोगी माझ्याशी ऐक्य साधून मोक्षपदावर जाऊन बसतो. देश, काल, स्वभाव यामुळे ज्यामध्ये कधीही कमीपणा येत नाही, कधीही ज्याचा नाश होत नाही असे माझे अविनाशी पद त्याला मिळते. फार काय सांगू अर्जुना, मी जो आत्मा त्याची प्रसन्नता त्याला प्राप्त होते. अरे, ती एकदा प्राप्त झाली की मग आणखी काय मिळवावयाचे राहिले सांग.

पृथ्वी प्रदक्षिणा करावी आणि पुन्हा घरी परत यावे त्याप्रमाणे धनंजया तुला सांगतो की तू आपली सर्व कर्मे माझ्या स्वरूपात अर्पण कर.

पण वीरा अर्जुना, तो त्याग कदाचित कृत्रिम करशील तर तसे मात्र करू नको. कर्म करतानाच चित्तवृत्ति आत्मविचाराकडे लावावी हा खरा संन्यास आहे. असे घडले म्हणजे मग त्या आत्मविचाराच्या बळाने स्वतःला कर्मावेगळा असा माझ्या निर्मल स्वरूपात पहाशील. कर्माची जन्मभूमि जी प्रकृति ती स्वतःपासून वेगळी आहे हेही तुला कळेल आणि ती प्रकृति मग तुझ्यातच सामावून जाईल, वेगळी उरणार नाही. शरिराची छाया

जशी वेगळी रहात नाही तशी प्रकृतिही तुझ्यात लीन होईल. असा प्रकृतिनाश झाला की काहीही श्रम न पडता कारणासहित कर्माचा त्याग सहज होऊन जाईल.

कर्मजात गेले की मी आत्मा काय तो आपल्या ठिकाणी उरतो. त्या आत्म्याच्या ठिकाणी तू आपली बुद्धि पतिव्रतेसारखी एकनिष्ठ करून ठेव. अनन्ययोगाने बुद्धि माझ्यामध्ये प्रवेश करते तेव्हा ती चिंतन करण्याचे सर्व विषय टाकून देते व चित्त मलाच भजते. अर्जुना, म्हणून चिंतनाच्या सर्व विषयांचा ज्याने त्याग केला आहे अशा चित्ताने तू माझी भक्ति कर. ते चित्त नित्य माझ्या ठिकाणी जडून राहील असे कर.

अशा अभिन्न सेवेने जेव्हा मी चित्तात भरून जाईन तेव्हा तू समज की तुझ्यावर माझी पूर्ण कृपा झाली. मग सगळ्या दुःखांचे घर असे जे जन्ममृत्यू ते आतापर्यंत तुला तरून जाण्यास कठीण वाटत असतील तेच सुगम वाटू लागतील. सूर्याच्या सहाय्याचा आधार डोळ्यांना मिळाला की मग त्यांना अंधाराची काय भीती आहे? माझ्या प्रसादाने ज्याची जीवदश नाश पावते तो संसाराच्या बागुलबुवाला कशाला भिईल? धनंजया, ह्या संसाराच्या दुर्गतीतून तू माझ्या प्रसादामुळे तरून जाशील. अर्जुना, हे माझे सांगणे नीट ऐकून त्याप्रमाणे आपले आचरण ठेव बरे.

अहंभावाने माझे हे बोलणे जर तू कानामनाच्या शिवेला टेकू दिले नाहीस तर फार अनर्थ परंपरा ओढवेल. तू नित्यमुक्त आहेस, अव्यय आहेस हे माझे बोलणे व्यर्थ होऊन 'मी देह आहे' या भ्रमात तू रहाशील आणि मग देहबंधनातून येणारे भाव तुझ्यावर पडतील. अरे, एकदा का देहसंबंध मानला की आत्मघात झालाच. मग ते घाव सोसताना क्षणाची उसंत मिळत नाही. तू जर माझ्या बोलण्याचा विचार केला नाहीस तर तुझ्या खऱ्या स्वरूपाला मरण नसताना दारुण मरण भोगावे लागेल. जो पथ्याचा द्वेष करतो त्याला ताप सोडत नाही. दीपाचा जो द्वेष करतो त्याला अंधार चुकत नाही. विवेकाचा द्वेष केला की अहंकार सोडत नाही. 'मी देह' हे अज्ञान घेतले की त्या देहाच्या सर्व उपाधी सहजच मागोमाग येतात. अर्जुना, मग तू स्वतःच्या देहाला 'अर्जुन' हे नाव देशील, दुसऱ्याच्या देहाना 'स्वजन' असे म्हणशील आणि ह्या समोर ठाकलेल्या संग्रामाला 'पापाचार' असे नाव देशील. आपल्याच बुद्धिने ह्या तिघांना ही तीन नावे देऊन मग धनंजया, 'मी लढाई करणार नाही' असा निश्चयही करशील. पण तो निश्चय तुझ्या नैसर्गिक स्वभावामुळे वाया जाईल. तू कितीही पराकाष्ठेचा प्रयत्न केलास, तू प्रत्यक्ष पुरुषोत्तम आहेस हे विसरलास की ती प्रकृति तुला आपल्या मर्जीनुरूप खेळविल्याशिवाय रहाणार नाही.

अर्जुना, तात्त्विकदृष्टिने विचार केलास तर हे समोर माझे आप्तजन आहेत त्यांचा वध करणे म्हणजे पातक आहे या तुझ्या समजूतीमध्ये काही तथ्य आहे काय? आधी बाळपणापासून युद्धनीति शिकून उत्तम योद्धा व्हावे, मग युद्धाचा प्रसंग आला म्हणून हत्यार हातात घ्यावे आणि मग मात्र न झुंजण्यासाठी देवांगण करावे याला काही अर्थ आहे काय?

तू तोंडाने मी लढणार नाही असे म्हणतोस पण लोकदृष्टिने पाहिले तर तू लढवय्याच आहेस लक्षात ठेव, मनाने 'मी मुळीच लढणार नाही.' असा तू कितीही निश्चय कर पण तुझा क्षात्रस्वभाव ह्या निश्चयाविरुद्ध

तुला आचरण करायला लावीलच. प्रकृतिविरुद्ध किती निश्चय करशील पार्था? अरे, ती माझी शक्ति आहे. तिच्याशी किती झुंज घेशील? तिचे सामर्थ्य तुला मान्य करावे लागेलच.

एक दिवस संध्याकाळी श्रीरामकृष्ण तोतापुरींच्या धुनीजवळ बसले होते. ईश्वरीय कथा प्रसंगात दोघांचीही मने इतक्या उच्च स्थितीला जाऊन पोहोचली होती की ती जवळजवळ अद्वैतानुभवात तन्मय होऊन गेली होती. त्यांच्या पुढे असलेल्या त्या धुनीतील अग्निनारायणाचा आत्मासुद्धा जणु काय त्यांच्या आत्म्याशी एकत्वाचा अनुभव घेऊन आनंदाने आपल्या शंभर जिभा बाहेर काढून खदखदा हसत होता. त्या दोघांनाही जगताचे जवळजवळ भानही नव्हते. अशावेळी बागेच्या नोकरांपैकी एकजण आपली चिलीम भरून घेण्यासाठी तेथे आला. धुनीतून एक लाकूड बाहेर काढून तो त्याचा निखारा घेऊ लागला. ब्रह्मानंदामध्ये निमग्न असलेल्या त्या दोघांचे प्रथम तिकडे लक्ष नव्हते पण इतक्यात तोतापुरींची नजर त्या नोकराकडे गेली. आपल्या पवित्र अग्निला हा मनुष्य शिवला असे पाहून ते संतापले. शिवीगाळही करू लागले. चिमटा उचलून त्याला मारावयास उठण्यापर्यंत पाळी आली.

हा सर्व प्रकार पाहून तन्मय स्थितीत असलेले रामकृष्ण अर्धबाह्य अवस्थेत येऊन मोठमोठ्याने हसू लागले. वरचेवर "वाहवा, वाहवा, शाबास, शाबास!" असे म्हणू लागले. श्रीरामकृष्णांनी आपल्याला असे म्हणावे याचे आश्चर्य वाटून तोतापुरी विचारू लागले, "तू असे काय करतोस? पहा बरे, ह्या माणसाने केवढा अपराध केला आहे तो!" श्रीरामकृष्णांनी हसत हसत उत्तर दिले, "हं, त्याचा अपराध तर खरा पण मला त्याच्यापेक्षा तुमच्या ब्रह्मज्ञानाचीच जास्त गंमत वाटली. आताच ना तुम्ही म्हणत होता की एका ब्रह्मावाचून या जगात दुसरे काहीही सत्य नाही. जगतातील सर्व वस्तू आणि व्यक्ति त्याचाच प्रकाश आहेत आणि लगेच एका क्षणात हे सर्व विसरून त्या माणसाला मारायलाही तयार झालात? म्हणून हसतोय की महामायेचा प्रभाव केवढा जबरदस्त आहे!"

तोतापुरी हे ऐकून गंभीर झाले आणि तेव्हापासून त्यानी राग सोडून दिला. ते पुन्हा कधीही रागावलेले कुणी पाहिले नाही.

स्वतः ठाकुरांनी तर आपल्या देहाच्या बाबतीतही पूण अनासक्ति ठेवली होती. अखेरच्या वर्षी काशीपुऱ्यातील बगीच्यात श्रीरामकृष्ण गळ्याच्या रोगाने अत्यवस्थ असून रोग दिवसेंदिवस वाढतच होता. ते आजारी असल्याचे ऐकून श्रीयुत शशधर तर्क चूडामणी व आणखी काही मंडळी एक दिवस त्यांच्या समाचारास आली. बोलता बालता पंडितजी श्रीरामकृष्णांना म्हणाले, "महाराज शास्त्रात वाचले आहे की आपल्यासारखे पुरुष इच्छामात्रेकरून शारीरिक रोग सहज बरे करू शकतात. मन काही वेळ रोगाच्या जागी एकाग्र करून "आराम होवो" अशी इच्छा करताच रोग बरा होऊन जातो. तर मग आपण एकदा असे करून पाहिल्यास चालावयाचे नाही काय?"

श्रीरामकृष्ण म्हणाले, "तुम्ही पंडित असून ही काय गोष्ट बोलता हो? मन एका सच्चिदानंदाला अर्पण केले त्याला तेथून उठवून या भंगलेल्या हाडामासाच्या सापळ्यात आणण्यास प्रवृत्ति होईल काय?"

अनुक्रमणिका

या उत्तराने पंडितजी गप्प राहिले पण विवेकानंद प्रभृति भक्तमंडळींना स्वस्थ बसवेना. पंडितजी निघून गेल्यावर त्यांनी पंडितजींच्या म्हणण्याप्रमाणे करण्याविषयी श्रीरामकृष्णांना अत्यंत आग्रह केला.

ते म्हणाले, "महाराज आपल्याला रोग नाहीसा केला पाहिजे. आमच्याकडे पाहून तरी बरा केला पाहिजे "

श्रीरामकृष्ण म्हणाले. "माझी काय अशी इच्छा आहे होय रे की रोग भोगत बसावे? मी तर खूप म्हणतो रोग बरा व्हावा पण तसं होतय कुठं? बरे होणे न होणे ह्या साऱ्या आईच्या हातातल्या गोष्टी आहेत."

स्वामी विवेकानंद म्हणाले, "तर मग आईला सांगा ना रोग बरा करायला. ती आपले खचित ऐकेल."

हो ना करता करता श्रीरामकृष्ण आईला विचारायला तयार झाले. विवेकानंद काही तासानी विचारायला गेल्यावर श्रीरामकृष्ण म्हणाले, मी आईला म्हणालो (गळ्याकडे बोट दाखवून). "आई याच्यामुळे मला काही खाता येत नाही तरी दोन घास खाता येईल असे काही तरी कर." त्यावर तुम्हा साऱ्यांकडे बोट दाखवून आई म्हणाली, "का बरं? या इतक्यांच्या तोंडानी तू खात नाहीस काय?" हे ऐकून मला लाज वाटली. माझी छाती धाडधाड उडू लागली व मी आणिक काही बोलू शकलो नाही.

देहबुद्धिच्या अशा अद्भुत  अभावाबद्दल देव अर्जुनाला सांगत आहेत. ते म्हणाले, "अर्जुना प्रकृतिविरुद्ध जाता येत नाही. पूर्वेकडे पाणी वहात असताना आपण जर उलट पोहण्याचा प्रयत्न केला तर केवळ आपला आग्रह उरतो. पाणी ओघाने आपल्याला घेऊन जातेच. साळीच्या कणाने अगदी निकराचा निश्चय केला की मी साळ म्हणून उगवणार नाही तर तो अंकुर काय गव्हाचा म्हणून वर येईल काय? त्याचप्रमाणे अर्जुना तुला प्रकृतिने क्षात्रसंस्काराने घडविला आहे. आता मी तो धंदा करणार नाही असे म्हणून काय उपयोग बरे? क्षात्रसंस्कार तुला उठवतीलच.

अरे, जन्मतःच तुला प्रकृतिने शौर्य, तेज, दक्षता हे क्षत्रियाचे गुण दिले आहेत. त्यात युद्धकलेचे संस्कार तुझ्यावर ह्या समोर उभ्या असलेल्या द्रोणाचार्यांनी केले आहेत. ते पुरेसे झाले नाहीत म्हणूनच की काय उग्र तप करून त्या भगवान शंकराशीही लढाई करून पाशुपतास्त्रासारखे अस्त्र मिळवलेस. अर्जुना, तुला ह्या सगळ्या क्षात्रगुणांनी सर्व बाजूंनी बांधून टाकला आहे. कोदंडपाणि अर्जुना, आता तू क्षत्रियासारखे आचरण करण्याच्या प्रवाहातून बाहेर पडूच शकत नाहीस.

आपले जन्ममूळ, आपले संस्कार, आपले अंगभूत क्षात्रतेज यांचा विचार न करता जर तू, 'मी लढणार नाही' असा वेडा हट्ट धरशील तर तुझी स्थिती आणखी दयानीय होईल. एखाद्याचे हातपाय बांधावे आणि त्याला रथात घालावा म्हणजे तो जसा कुठेही न चालत जाता परतंत्र अवस्थेत दिगंतराला जातो त्याप्रमाणे तू आग्रह धरशील की, "मी काही करणार नाही" पण प्रकृति मात्र तुलाच करायला लावील.

आठवण कर अर्जुना, तुम्ही विराट नगरीत अज्ञातवासाचे दिवस काढत होता. कीचक वधामुळे दुर्योधनाला तुम्ही तिथे असल्याचा संशय आला. अज्ञातवासात असताना तुम्हाला हुडकून काढून पुन्हा वनवासास पाठवावे या हेतूने दुर्योधनाने विराटची गोधने हरण करण्याचा कट रचला. विराट राजधानीत नव्हता तेव्हा गोप राजपुत्र उत्तराकडे आले. "मला सारथी नाही. नाहीतर मी या शत्रूंची दाणादाण उडवली असती" ही उत्तराची बढाई तुला का सहन झाली नाही? नाइलाजाने धारण केलेला तो स्त्रीवेष तू झुगारून का दिलास? उत्तराची पाचावर धारण बसलेली पाहून तू आपल्या धनुष्याला प्रत्यंचा का बरे चढवलीस? आपण अज्ञातवासात आहो आता प्रगट झालो आणि वर्ष भरले नसले तर पुन्हा अरण्यवास करावा लागेल याचा विचार तुझ्या मनाला का शिवला नाही? वर्षभर आपण ह्या शस्त्रांना हातही लावलेला नाही तर आपल्याला एकट्याला एवढ्या मोठ्या सैन्याचा पराभव करता येईल काय अशी शंका तरी तुला आली काय? उत्तर लढाईतून पळू लागल्याबरोबर तू त्याला खेचून आणलेस आणि त्याच्या हातात लगाम देऊन पराक्रमास का उभा राहिलास? त्या कुरु सैन्याची दाणादाण उडवून ते विराटाचे गोधन परत का आणलेस? अरे, तू क्षत्रिय आहेस, तुझा स्वभाव असाच असला पाहिजे. अकरा अक्षौहिणी सैन्य शस्त्रहीन करणारा कोदंडपाणि महान योद्धा आहेस. ती तुझी प्रकृति तुला लढाई करावयास लावीलच. पार्था रे, रोग काय त्या रोग्याला आवडतो? दारिद्र्य काय त्या दरिद्री माणसास प्रिय असते? पण बलवान प्रारब्ध या अनिष्ट गोष्टी माणसाला भोगायला लावतेच. अदृष्ट वेगळे काही करू शकत नाही. आता हे प्रारब्ध ईश्वराच्या स्वाधीन आहे हे मात्र ध्यानात घे.

मात्र हा प्रारब्धनियामक ईश्वर बाहेर कुठे नाही. तो सर्व प्राणिमात्राच्या अंतरंगात हृदयाच्या महाअंबरात चिद्‌वृत्तिच्या सहस्त्र किरणांनी उगवलेला आहे. जागृति, स्वप्न, सुषुप्ति हे तिन्ही लोक प्रकाशून देह, मी व देहसंबंधी माझे या विपरीत ज्ञानाने जाणारे वाटसरू तो जागे करतो आणि त्यांना खऱ्या ज्ञानाची वाट दाखवितो. दृश्य जगद्रूपी सरोवरात विषयरूपी कमळे विकसित करून पंचज्ञानेंद्रिये आणि सहावे मन ह्या षट्पद भ्रमररूपी जीवांना तो त्या विषयातील मकरंद सेवन करायला लावतो. हे रूपक राहू दे. दुसरे सांगतो, पार्था, तो ईश्वर सगळ्या भूतांचा अहंकार पांघरतो आणि निरंतर प्रकट होत रहातो. आपल्या मायेचा पडदा मधे उभा करून आपण एकटाच खेळाची सूत्रे चालवितो. बाहेर त्या मायेच्या पडद्यावर चौऱ्यांशी लक्ष चित्रे नाचवितो. ब्रह्मापासून कीटकापर्यंत त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणे देह त्यांना देतो आणि त्या सर्व अगणित देहांची सूत्रे आपल्या हाती ठेवतो. प्राण्यांच्या कर्मानुसार प्राण्याला देह मिळतो आणि 'तो देह मी आहे' या अहंकारावर तो प्राणी आरूढ होतो. सूत सुताने गुंतावे, गवताची पेंडी गवताने बांधावी किंवा लहान मुलाने पाण्यातले आपले प्रतिबिंब पाहून ते आपण आहो असे समजावे. त्याप्रमाणे देहाच्या आकाराने आपल्यालाच दुसरे कल्पून जीव त्या देहाच्या ठिकाणी आत्मबुद्धिने प्रगट होतो. ऐक, याप्रमाणे प्राणी शरीराकाररूपी यंत्रावर बसवून ईश्वर प्रारब्ध कर्माचे सूत्र हालवितो. प्राण्याला जे जे कर्मसूत्र मांडून ठेवले असेल ते तो होऊ लागतो. धनुर्धरा, ईश्वर सर्व प्राण्यांना वाऱ्याने गवताच्या काड्या आकाशात फिरवाव्या तसे फिरवतो. लोहचुंबकाच्या संगाने जसे लोखंड फिरते त्याप्रमाणे ईश्वराच्या सत्तायोगाने प्राणिमात्राची हालचाल होते. चंद्राच्या सान्निध्याने जशी समुद्राची हालचाल होते, त्या समुद्राला भरती येते, सोमकांत मण्याला पाझर फुटतो, चंद्रविकासी कमळे आणि चकोर यांचा संकोच नाहीसा होतो. त्याप्रमाणे कारणरूप अज्ञानाच्या ताब्यात असलेले प्राणी त्या ईश्वराकडून चेष्टविले जातात. अर्जुनपण न घेता 'मी' असे जे रूप तुझ्या अंतःकरणात उठते ते त्या ईश्वराचे रूप आहे. तो ईश्वर त्या प्रकृतिला प्रवृत्त करील आणि 'मी लढणार नाही' असे जे तू म्हणतोस ते चालू देणार नाही. तुला लढायला

लावीलच. म्हणून ईश्वर मालक आहे, तो प्रकृतिवर हुकमत चालवितो आणि ती प्रकृति प्राण्यांच्या इंद्रियाकडून ज्यांची त्यांची कामे अनायासाने करून घेते, हे ध्यानांत ठेव.

पार्था, करणे न करणे ह्या दोन्ही गोष्टी त्या प्रकृतिच्या माथ्यावर ठेवून प्रकृति ज्या हृदयस्थ परमात्म्याच्या स्वाधीन आहे त्याला तू शरण जा. शरण जाताना गंगेचे पाणी जसे महासागराला आपले सर्वस्व अर्पण करते. त्याप्रमाणे शरीर, वाचा, मन, अहंकार ही सर्व त्या ईश्वराला अर्पण करून शरण जा. मग त्या ईश्वराच्या प्रसादाने स्वरूप शांतिरूपी तरुण स्त्रीचा मालक होशील. उत्पत्ती ज्याच्यामुळे होते, विश्रान्ती जेथे विसावा घेते, अनुभव ज्या अनुभवाला अनुसरतो त्या आत्मस्थितीचा अर्जुना तू अक्षय राजा होशील," असे लक्ष्मीपती अर्जुनाला म्हणाले.

देव पुढे म्हणाले, "पार्था, आत्मा हे रत्न ज्याच्यामुळे हस्तगत होते ते सर्व वाङ्मयाचे सार असलेली गीता मी तुझ्या हाती दिली आहे. वेदांताने ह्या गीतेला 'ज्ञान' या नावाने गीताशास्त्राचा मोठेपणा वर्णन केलेला आहे आणि म्हणूनच वेदांताला जगात शुद्ध कीर्ती प्राप्त झाली. बुध्यादिक हे ज्ञानवान पदार्थ गीताशास्त्राचे कवडसे आहेत. ह्या गीताशास्त्राचा उदय झाला की सर्व द्रष्टा मी अनुभवास येतो. पार्था, गौप्याचेही गौप्य असे हे आत्मज्ञानरूपी धन आहे पण तू माझा जिवलग सखा आहेस, तुझ्यापासून तो कसा लपवून ठेवू. करुणेने व्याप्त होऊन आमच्या जवळचा हा गुह्य ठेवा आज तुझ्या स्वाधीन केला आहे. आई प्रेमाच्या भरात बाळाला वेड्यावाकड्या नावानेही हाका मारते. आमचेही तुझ्यावर त्या आईचे बाळावर आहे तसेच अलोट प्रेम आहे. पण आम्ही त्या आईसारखे अयथार्थ बोलत नाही. मी सर्वज्ञ असलो तरीही नीट विचार करून तुला बोलतो आहे. आकाश गाळून घ्यावे, अमृताची साल सोलून घ्यावी, दिव्याकरवी दिव्य करवावे ज्यांच्या अंगाच्या प्रकाशाने पाताळीचा परमाणुही दिसतो त्या सुर्याच्याही डोळ्यात अंजन घालावे त्याप्रमाणे मी सगळा विचार करून जे उत्तम आहे ते धनंजया तुला सांगितले आहे.

आता तुला एकच सांगतो, माझ्याकडून मी तुला योग्य काय ते सांगितले आहे. तू सुरवातीस मला म्हटले होतेस की कृष्णा, धर्म्य असेल, जे उचित असेल, इहपरत्र आमच्या हिताचे असेल ते सांग. त्याप्रमाणे मी तुला सांगितले आहे. आता यानंतर तू स्वतः विचार कर.

"नीट विचारांती काय करावयाचे ते ठरव आणि कर."

देवांनी हा एवढा उपदेश केला आणि ते स्तब्ध झाले. पुढे काही बोलावयाचे उरलेच नव्हते. पण अर्जुनाच्या मुखाकडे पाहून त्यांना गहिंवर आला ते म्हणाले, "का रे अर्जुना, तू अजून उदास? तुझी खात्री पटली नाही काय? तुला अजून काही शंका राहिली आहे काय? तू असा मुकाट्याने उभा का राहिला आहेस? बोल ना. मी आणखी काय समाधान करू? अरे, तुझ्यामाझ्यात संकोच असावा असे आपले सख्यत्व आहे काय? मोकळेपणाने सांग, आपली आपण फसगत करून घेऊ नको. जेवायला बसलेला मनुष्य संकोचाने जर वाढणाऱ्याला 'पुरे पुरे, नको पोट भरले' असे म्हणू लागला तर दोष आणि पीडा दोन्ही त्या अस्थानी संकोचाकडेच आहे ना? सर्वज्ञ गुरू भेटल्यावर जर आपण आपल्या सर्व शंका विचारून घेतल्या नाहीत तर तो न

विचारणारा स्वतःला फसवितो. फसविल्याचे पातकही त्यालाच लागते. सत्य स्वरूपाला तो आपल्याच हट्टाने मुकला असे होते. तेव्हा तसे करू नको. सर्व ज्ञान तुला पुन्हा एकदा सांगू काय?"

अर्जुनाने डोळे भरून देवाकडे पाहिले. हात जोडले आणि तो म्हणाला, "दातारा, माझे मन जाणणारे आपल्याशिवाय दुसरे कोण आहे? सर्व ज्ञेय म्हणून जे जे आहे ते ते सगळे जाणणारा ज्ञाता केवळ तू एकटा आहेस. वर्णन तरी कसे करू? सूर्य म्हणून सूर्याचे काय वर्णन करावयाचे? तेव्हा आपण माझ्या मनातलीच गोष्ट बोललात एवढेच म्हणतो."

श्रीकृष्ण हसून म्हणाले, "अरे त्यात काय कठीण आहे? स्तुती कशाची करतोस? आम्ही सांगितलेले तुला कळत आहे हीच आमची स्तुती आहे. पुन्हा सांगतो ऐक. अवधान चांगले विस्तृत करून ऐक बरं का. आता अगदी स्पष्ट निर्मळ शब्दात तुला सांगतो."

अर्जुना, खरे सांगू का? हे बोलण्यासारखे आहे म्हणून बोलावे, ऐकण्यासारखे आहे म्हणून ऐकावे असे नव्हे. हा बोलण्या-ऐकण्याचा विषयच नव्हे पण तुझे भाग्यच अलौकिक आहे. पिलासाठी कासवीच्या दृष्टित पान्हा येतो, चातकाच्या घरी मेघ पाणी भरतो. तसे हे घडते आहे. तेथे व्यवहार न घडताच व्यवहाराचे फळच पदरात पडते आहे.

द्वैताची येरझार नाहीशी करून ऐक्याच्या घरात जी गुह्य गोष्ट भोगावयाची ती ही आहे. अर्जुना, निमित्तावाचून प्रेमाचा विषय होणारा फक्त आत्मा एवढाच आहे. दुसरे काहीही नाही आणि तू तर माझा आत्मा आहेस. आपलेच रूप नीट दिसावे म्हणून जसा आरसा घासून पुसून स्वच्छ करावा आणि ही घासपूस जशी आरशासाठी नसते आपल्यासाठी असते त्याप्रमाणे पार्था, तुला उपदेश करण्याच्या मिषाने मी आपल्याशी सुखसंवाद करतो आहे. तुझ्यामाझ्यात दुजेपणा आहेच कुठे? म्हणून माझ्या जिव्हारीचे गुज तुला म्हणजे मी माझ्या जीवालाच सांगतो आहे. पांडवा, अनन्यगतिक भक्ताचे मला वेड आहे. मीठ आपला खडेपणा विसरून स्वतःला पाण्यात मिळवून टाकते आणि पाण्याशी एकरूप होताना मुळीच लाजत नाही. त्याप्रमाणे तू माझ्याशी एकरूप होतोस मग मी तरी हे ज्ञान माझ्याजवळ चोरून कसे ठेवीन? हा उपदेश अर्जुना अतिशय गूढ आहे. इतर गुह्यांशी त्याची तुलना केली तर ती गुह्ये उघड वाटू लागतात. इतके हे ज्ञान गुह्य आहे. तेव्हा माझे चोख पण गुह्य भाषण काळजीपूर्वक ऐकून घे.

अर्जुना, हा विषय मी अगदी सविस्तर सांगितला आहेच. पण म्हणून आता जे सूत्रमय सांगतो त्याची उपेक्षा करू नकोस.

अरे, आतबाहेर सर्वत्र मीच भरलो आहे हे पक्के मनानं ठसवून घे. इंद्रियाकडून बाहेर घडणाऱ्या कर्मांना आणि मनादिकांकडून आत घडणाऱ्या कर्माना मला विषय कर. माझ्याशिवाय कशालाही थारा देऊ नकोस. एकदा तुझ्या आतबाहेर मी भरून राहिलो की मग वायू सर्वांगांनी आकाशाशी मिळून असतो त्याप्रमाणे सर्व कर्मांमध्ये तू माझ्याशीच मिळून रहा.

फार काय सांगावे, तू आपले मन माझ्या एकट्याचेच रहाण्याचे ठिकाण कर. आत्मज्ञानाने शुद्ध झालेले जे संत ती सगळी माझीच रूपे आहेत. सुंदर स्त्रीवर जशी अभिलाषा जडून जाते त्याप्रमाणे प्रेम त्यांच्या पायाशी जडवून ठेव. सर्व जगाला रहाण्याचे ठिकाण ही माझी नामे आहेत. ती अंतःकरणात स्थिर होण्यासाठी वाचेच्या वाटेला लाव. हाताचे करणे, पायाचे चालणे हे सगळे माझ्यासाठी होते आहे असे कर. आपल्या ठिकाणी वा परक्याच्या ठिकाणी जो काही तू उपयोगी पडशील त्या उपकाररूपी यज्ञाने पार्था, तू माझा याज्ञिक हो. तुला हे एकेक काय शिकवू? अर्जुना, सर्व जग मद्रूप आहे हे उमजून ते सेवा करण्यास योग्य आहे असे समज. आपल्या ठिकाणी सेवकपण बाणवून घे आणि सेवा कर.

प्राणिमात्राचा द्वेष, भेद तुझ्या मनातून पूर्णतया जाऊ दे. एकदा द्वेष तुझ्या मनातून गेला की नमस्कार करण्याजोगा मी एकटाच जगात भरून राहीन. माझा परम आश्रय, माझे अंतिम जवळिकेचे सान्निध्य तुला प्राप्त होईल. एकदा माझी अशी जवळीक लाभली की भरल्या जगात जरी तू गेलास तरी तुझ्या आणि माझ्याशिवाय तिसरा कोणी उरणार नाही. लोकांतामध्येही तुझा माझा एकांत होईल. कुठल्याही अवस्थेत मी तुला आणि तू मला अनुभवशील. अशा ह्या अपूर्व अनुभवाचे सुख वाढतच राहील. आपल्या दोघांच्या मीलनात अडथळा करणारी विश्वकल्पना आहे ती निमाली की तू मी म्हणूनच माझ्याशी एकरुप होशील.

जलात पडलेले प्रतिबिंब जल आटून गेल्यावर बिंबाला भेटण्यास येताना कशाचा अडथळा येणार? पाणी आटले की प्रतिबिंब बिंबात लीन होऊन जाते ना? वारा आकाशात लीन होण्यास, लाट सुमुद्रात लीन होण्यास कशाचा अडथळा आहे? अर्जुना, तू आणि मी हे केवळ वरच्या देहाच्या उपाधीमुळे दोन आहोत. ही देहभावना विराम पावली की तू मद्रूपच होशील.

पार्था, हे खरे होईल की नाही असे म्हणू नकोस. मी वाटल्यास तुझी शपथ घेऊन सांगतो की दुसरे काही होणार नाही ऐक्यच होईल. पण तुझी शपथ घेतो असे म्हटले ते चुकलेच की, अरे, तुझी शपथ घ्यावयाची म्हणजे आम्ही आपली शपथ घेण्यासारखेच झाले की! पण मला त्याची देखील लाज वाटत नाही. प्रेमाच्या राज्यात लाज कसली?

वेदांनी माझे वर्णन केले की मी निष्प्रपंच म्हणजे भेदशून्य आहे. माझ्या आधारामुळे हा विश्वाभास खरा वाटतो. माझ्या आज्ञेचा प्रताप काळाला जिंकतो. अर्जुना, काय सांगू मी सत्यसंकल्प देव जगाचे कल्याण करणारा पिता आहे आणि असे असून मी हा शपथेचा आग्रह का धरावा असे तुला वाटेल. पण अरे सख्या, तुझ्या वेधाने मी देवपणाची बिरुदे सांडून टाकली आहेत. काय नवल आहे पहा मी तुझ्या ध्यासाने जवळजवळ जीवदशेला आलो आहे आणि तू माझ्या ध्यासाने जवळजवळ पूर्ण ईश्वर झाला आहेस. आपल्या कामासाठी राजा आपलीच शपथ वहातो ना तसे माझे झाले आहे बघ.

अर्जुन देवाचे हे बोलणे ऐकून चकित झाला. तो घाईघाईने म्हणाला, "देवा, काय हे तुमचे अचाट बोलणे! हे असले काही बोलू नका. अहो आपल्या एका शब्दाने आमचे काम होईल असे असून तू पुन्हा पुन्हा कळवळून हे सगळे आम्हाला समजावून सांगतोस आणि सांगता सांगता वर शपथही घेतोस या तुझ्या विनोदाला काही सीमा आहे काय? सगळ्या कमलवनाचा विकास करण्यासाठी सूर्याच्या किरणाचा अंश पुरतो, पण

कमलाचे निमित्त करून जगाला तो प्रकाशाचे दान करतो. पृथ्वीचा दाह शांत करून समुद्रही भरून टाकावा येवढे त्या मेघांचे सामर्थ्य असते पण वृष्टि करण्यासाठी तो निमित्त चातकाचे करतो. तसेच हे आहे. कृपानिधे, राजा श्रीकृष्णा, तुमच्या औदार्याला मी केवळ निमित्त झाला आहे. तुमच्या ह्या दानाने सगळे त्रैलोक्य संतुष्ट होईल असा हा कृपेचा वर्षाव झाला. खरोखरच माझे भाग्य की माझ्या निमित्त्य हे अमृत जगाला लाभले. अर्जुनाची धन्यता पाहून देव सुखी झाले, आनंदित झाले. त्यांनाही तो आनंदाचा वेग आवरेना. हात हालवून ते म्हणाले, "थांब अर्जुना, नको इतकी स्तुती करूस. एवढेच ध्यानात घे की या उपायाने खरोखरच तुला माझा लाभ होईल. मीठ समुद्रात पडल्यावर त्यात क्षणी ते विरून जाते. खडेपणाने उरण्याचे कारणच रहात नाही. त्याप्रमाणे पदार्थमात्रामध्ये मला पाहिले की सर्व मीच आहे हा निश्चय होऊन देहाहंकार नष्ट होऊन खरोखर मीच होशील. याप्रमाणे कर्मापासून ते माझ्या स्वरूप प्राप्तीपर्यंतचे सर्व उपाय मी तुला स्पष्ट करून सांगितले आहेत.

पांडुसुता, सर्व कर्मे मला अर्पण केलीस की सर्वत्र माझ्या प्रसन्नतेचा तुला लाभ होईल. नंतर तो माझा प्रसाद झाला की माझे ज्ञान सिद्धीला जाईल आणि त्यामुळे निश्चितपणाने तू माझ्या स्वरूपात येऊन मिळशील. आता ही अवस्था झाली की साध्य आणि साधन हा विषयच संपतो, किंबहुना तुला काही करावयाचे उरत नाही.

अर्जुना, सर्व कर्मे मला अर्पण करीत जा. हे खरे म्हणजे तुला सांगण्याचीसुद्धा जरूरी नाही. तू नेहमी तसे करीत आलाच आहेस आणि त्यामुळेच माझी प्रसन्नता तुला लाभली आहे. मी तुझ्यावर इतका प्रसन्न आहे की सध्या युद्धाचा प्रसंग असून त्याचा अडथळा न मानता तुला उपदेश करतो आहे. मी तुझ्यावर असा एकावेळीच भाळलो आहे आणि प्रसन्न होऊन प्रपंचासहित अज्ञान जाते, एकटा मीच गोचर होते असा हा चमत्कार घडवून आणणारे गीताशास्त्र अनेक युक्तींच्या उपायाने तुला सांगितले आहे. नाना प्रकारांनी सांगितलेल्या या ज्ञानाने युक्त होऊन धर्माधर्माच्या कल्पनांना जन्म देणारे अज्ञान अर्जुना, तू टाकून दे. आशा दुःखाला, निंदा पापाला आणि दुर्भाग्य दैन्याला जन्म देते. त्याप्रमाणे अज्ञान, स्वर्ग, नरक सुचविणाऱ्या धर्माधर्मास जन्म देते. असे हे अज्ञान, ज्ञानयुक्त होऊन तू टाकून दे. हातात दोरी घेऊन सर्पाच्या आभासाचा त्याग करावा, स्वप्नात दिसणाऱ्या परिवाराचा निद्रात्याग करून नाश करावा त्याप्रमाणे ज्ञानाने अज्ञानाचा नाश कर.

कावीळ बरी झाली की दृष्टि स्वच्छ होऊन चंद्रावर भासणारे पिवळेपण जाते व्याधी गेली की तोंडाचा कडूपणा नाहीसा होतो, दिवस बुडला की मृगजळ संपते, लाकडांचा त्याग केली की अग्नि विझून जातो. त्याप्रमाणे धर्माधर्माचे टवाळ दाखवणारे जे मुळातले अज्ञान त्याचाच त्याग कर म्हणजे धर्माधर्माच्या कल्पनेचा आपोआप निरास होईल.

निद्रेबरोबर स्वप्न संपते त्याप्रमाणे अज्ञान गेल्याबरोबर विश्वाभास नाहीसा होतो आणि सहजच मी एकटाच काय तो उरतो. माझ्यावाचून मग भिन्नभिन्न काही रहात नाही.

अर्जुना, तू अज्ञानाचा त्याग केलास की तुझी ही भूमिका सिद्ध होईल आणि

**'सो ऽ हं'**

अनुक्रमणिका

या बोधाने तू ब्रह्माच्या ठिकाणी अनन्य होशील माझ्याकडून स्वतःला वेगळे न मानणे असे ऐक्य मानणे याचेच नाव मला शरण येणे आहे. मला अनन्यभावाने शरण येणे म्हणजे माझ्याहून स्वतःला वेगळे न मानणे हे आहे. घट फुटला की आतील आकाश बाहेरच्या आकाशास जाऊन मिळते त्याप्रमाणे ऐक्यभावाने मला शरण ये. लाट समुद्राला आणि सुवर्णमणी सोन्याला ऐक्याने शरण जातो, तसा अर्जुना तू मला शरण ये. वडवानल समुद्राला शरण गेला खरा. पण समुद्रापासून वेगळा राहिल्याने त्याच्या पोटात राहून प्रदीप्तच राहिला ना? तसे मात्र करू नको. वेगळा राहू नको. वेगळे रहाण्याची गोष्टच टाकून दे. मला शरण यावयाचे आणि पुन्हा जीवदशा शिल्लक ठेवावयाची या बोलाचा धिक्कार असो. या बोलण्याची लाज कशी वाटत नाही? अरे, एखाद्या सामान्य राजाने जिचा अंगीकार केला अशी दासीसुद्धा राजाच्या बरोबरीची होते. मग मी विश्वेश्वर भेटलो आणि जीवग्रंथी सुटली नाही हे असले अयोग्य शब्द कानावर पडूसुद्धा देऊ नको. ताकातून लोणी एकदा बाहेर काढले की मग ते काही केल्या ताकात पुन्हा एकजीव होत नाही. लोखंड उभे टांगून ठेवले तरी त्याला गंज चढतो पण त्याच लोखंडाला एकदा परिसाचा स्पर्श होऊन त्याचे सोने झाले की गंज त्याला काही करू शकत नाही, मळ त्याला शिवू शकत नाही. लाकडापासून काढलेला अग्नि प्रथम जरी लाकडातच होता तरी एकदा प्रदीप्त झाल्यावर लाकडात कोंडून राहू शकत नाही. त्याप्रमाणे अद्वयत्वाने एकदा मला शरण आल्यावर धर्माधर्म तुला स्पर्श करू शकणार नाहीत. सूर्याला कधी अंधार दिसतो काय? स्वप्नातला भ्रम जागृतावस्थेत भेटतो काय? त्याप्रमाणेच एकदा माझ्याशी एकरूप झाल्यावर सर्वरूप असा जो मी त्या माझ्याशिवाय दुसरे काय उरणार? म्हणून मला शरण ये. आणि मग धर्माधर्म, पापपुण्य, यांची काही काळजी करू नकोस. विचक्षण अर्जुना, पाण्यात पडलेल्या मिठाचे जसे सर्व पाणीच होऊन जाते तसा तू माझ्याशी एकरूप होऊन गेलास की पार्था, अरे तुझे पापपुण्य सगळे मी पाहून घेईन. मीच होऊन राहीन.

माझ्याहून द्वैतभावाने असणे हेच सर्व बंधरूप पाप आहे. ते द्वैतभावाचे पाप तू माझ्याशी एकरूप झालास की नाहीसेच होऊन जाईल. अर्जुना, केवळ मला अनन्य शरण आल्यामुळे तू आपोआप सुटशील. मला नीट समजावून घे. मी तुला सोडवीन.

अर्जुना, अरे ही प्रपंचाची चिंता सोड. पापपुण्याचे, धर्माधर्माचे भय सोड, देहाहंकार सोड आणि केवळ मला अनन्य शरण ये. माझे खरे स्वरूप जाणून ऐक्यभावाने शरण ये. अरे मी तुला खास सोडवीन."

माउली म्हणतात, "देव एवढे म्हणून थांबले नाहीत. सर्व रुपाने रूपवान, सर्व दृष्टिमुळे डोळस, सर्वत्र वास करणाऱ्या श्रीकृष्णांनी सुवर्णकंकणाने शोभणारा आपला सावळा उजवा हात पसरला. शरण आलेल्या त्या भक्तराज अर्जुनाला आपल्याजवळ घेतले.

बुद्धिला काखेत मारून वाचा ज्या ठिकाणी न पोहचता निराश होऊन परत फिरते त्या ठिकाणाचा प्रत्यक्ष अनुभव देण्यासाठी देवानी अर्जुनाला आलिंगन देण्याचे मिष केले. वाचा बुद्धिला जिथे अटक होती त्या ठिकाणी देवानी अर्जुनाला नेऊन पोचविले अर्जुनाचे आणि देवांचे हृदय एक झाले. त्यांनी आपल्या हृदयातील ज्ञान अर्जुनाच्या हृदयात घातले. द्वैत न मोडता अर्जुनाला आपल्यासारखे केले. दिव्याने दिवा लावावा तसे ते आलिंगन झाले. देह दोन दिसत होते पण आतून देव आणि पार्थ एकच झाले. काय तो सुखाचा पूर वर्णन

करावा! अहो, धनंजयाला आनंदाचे भरते आलेच पण एवढा मोठा देवसुद्धा त्या सुखाच्या पुरात बुडून गेला. एक महासागर दुसऱ्या महासागरास भेटून दोघेही दुप्पट व्हावेत आणि त्या दोघांनी मिळून आकाशाला पाण्याची गवसणी घालावी तसे त्या दोघांचे मीलन झाले. आता ते मीलन आवरावे तरी कोणी आणि जाणावे तरी कोणी? किंबहुना नारायणाने सगळे विश्व भरून टाकले."

मालूताई, या ओव्या म्हणजे गीतामृताचे खरोखर सार आहे. ह्या वाचताना आणि लिहिताना असे वाटते की आपल्या शरिराच्या अणुरेणुमध्ये तो भगवंत उसळून राहिला आहे. विजेच्या लहरींनी आपले अंग आणि अंग सळसळते आहे. जग प्रकाशाने भरून गेले आहे. वाटते हा अनुभव असाच राहील काय? कानात ही ओवी गर्जना करते आहे.

**"किंबहुना नारायणे विश्व कोंदले ।"**

वाटते आहे देवांनी अर्जुनालाच आलिंगन दिले असे नाही तर अखिल विश्वालाच आलिंगन दिले आणि तेही त्या क्षणापुरते नव्हे तर शाश्वत काळासाठी देवानी ही अनुभूति माउलींच्या शब्दात भरून ठेवली आहे. जो कोणी चित्त स्थिर करून खरोखरच अनन्यभावाने त्या करुणामयाला शरण जाईल त्यांच्यासाठी देवानी बाहू पसरलेले आहेत हे स्पष्ट जाणवते. माउलींनी काय जादू करून ठेवली आहे हे कळत नाही. पण त्यांनी ह्या चार शब्दांत मोक्षाची अनुभूति करून ठेवली आहे फक्त अनुभूति घेणारा, समुद्राचे आचमन करणारा अगस्ति झाला पाहिजे इतकेच, असे मनात येते!

माउली पुढे म्हणतात, याप्रमाणे वेदाचे सूत्ररूपाने असलेले मूळ व सर्व अधिकाराचे केवळ एकच एक पवित्र असे ठिकाण जे गीताशास्त्र ते श्रीकृष्णांनी प्रकट केले.

गीता हे वेदाला मूळ कसे असे म्हणाल तर त्याचा प्रसिद्ध कार्यकारण संबंध युक्तिपूर्वक सांगतो. वेद देवाच्या निःश्वासातून जन्माला आले. त्या सत्यप्रतिज्ञ देवांनी स्वतः आपल्या मुखांनी गीता सांगितली आहे आणि म्हणून वेदांना मूलभूत गीता आहे असे म्हणणे उचित आहे. अहो ह्या गीतेमध्ये देव पैजेचा विडा उचलून बोलत आहेत.

स्वरूपाने नाश न पावता ज्याचा विस्तार जेथे लीन होऊन राहतो ते त्याचे बीज असे जगात म्हणतात. वृक्ष सूक्ष्मरूपाने बीजामध्ये असतो. कांडत्रयात्मक संपूर्ण वेद गीतेमध्ये बीजात वृक्ष असावा तसा आहे आणि म्हणूनही वेदांचे बीज म्हणजे गीता असे मी म्हटले ते तसे सहज दिसतही आहे.

कर्म, ज्ञान, उपासना हे वेदाचे तीन भाग गीतेमध्ये उत्तम रीतीने उमटले आहेत. अलंकारातील रत्नांनी सर्वांग भूषवावे तसे हे तीन भाग वेदांच्या अंगावर शोभतात. आता कर्म, ज्ञान, उपासना ही तीन कांडे गीतेमध्ये कशी कशी आहेत हे सांगतो. पहिला अध्याय गीताशास्त्रप्रवृत्तिची प्रस्तावना आहे. दुसऱ्यामध्ये सांख्यशास्त्राचा अभिप्राय थोडक्यात आहे. मोक्ष देण्याच्या कामी ज्ञान हे प्रधान आहे. त्या शास्त्राचे सूत्र दुसऱ्या अध्यायात उभारले आहे. अज्ञानाने बांधलेल्यांनी मोक्षपदावर बसण्यासाठी साधन काय करावे ते तृतीयाध्यायामध्ये

सांगितले आहे. देहाभिमान बंध सोडून काम्य निशिद्ध कर्मे टाकून विहित कर्म प्रमाद न करता करावे असा निर्णय देवांनी तिसऱ्या अध्यायात केला. शुद्धभावाने कर्म करावे हा देवांच्या निर्णयाचा तिसरा अध्याय म्हणजेच कर्मकांड असे जाणावे.

नित्यादिक कर्माचे आचरण केले की अज्ञानापासून सुटका होते असे जे देव म्हणाले, ते कसे घडते हे चौथ्या अध्यायात सांगितले. देव म्हणाले की मोक्षाची इच्छा झाली असता बद्ध सांसारिकाने विहित कर्म ब्रह्मार्पण बुद्धिने करावी ही युक्ति देवानी सांगितली. देह, वाचा, मन यांच्या योगे जे जे विहित कर्म निपजेल ते सर्व ईश्वरोद्देशाने कर असे देवांनी सांगितले, कर्मयोगाने ईश्वराच्या ठिकाणी उपासना कशी करावी हे चौथ्या अध्यायाच्या शेवटी सांगितले. तेथपासून अकराव्या अध्यायाच्या शेवटापर्यंत कर्माने देवाची पूजा करावी हे सांगितले. चारपासून अकरापर्यंतचे हे आठ अध्याय स्पष्ट देवताकांड आहे हे पडदा दूर करून मी स्पष्ट सांगतो. ईश्वराच्या प्रसादाने आणि श्रीगुरूसंप्रदायाने जे खरे कोवळे ज्ञान अंकुरते ते अद्वेष्टा वगैरे बाराव्या अध्यायाच्या भागाने अथवा तेराव्या अध्यायातील अमानित्व वगैरेंच्या वर्णनाने कसे वाढवावे हे देवानी सांगितले. म्हणून बाराव्यापासून पंधराव्या अध्यायापर्यंत ज्ञानरूपी फळाच्या परिपक्वतेबद्दल देवांनी सांगितले. म्हणून बाराव्या अध्यायापासून ऊर्ध्वमूल या श्लोकापासून सुरू होणाऱ्या पंधराव्या अध्यायापर्यंत ज्ञानकांडाचे निरूपण झाले आहे. याप्रमाणे कर्म, उपासना, ज्ञान त्या तिन्ही कांडांचे निरूपण करणारी गीता ही गोजिरवाणी श्रुतीच आहे. या श्रुतीने श्लोकरूपी रत्नांचे अलंकार घातले आहेत. हे असो, कांडत्रयात्मक असलेली गीतारूपी श्रुती मोक्षरूपी फळ अवश्य प्राप्त करून घ्यावे म्हणून गर्जना करीत आहे.

या मोक्षाचे साधनच असलेल्या ज्ञानाशी नित्य वैर करणारे जे अज्ञान त्याचे वर्णन सोळाव्या अध्यायात केले आहे. मुक्कामावर पोचविणारा शास्त्ररूपी रक्षक बरोबर घेऊन अज्ञानगुणांचा वैरी जिंकावा असा निरोप सतराव्या अध्यायात देवांनी सांगितला. याप्रमाणे पहिल्या अध्यायापासून सतराव्या अध्याया अखेरपर्यंत देवांनी आपला निश्वास जो वेद तो स्पष्ट करून दाखवला. आता ह्या सतरा अध्यायांचे तात्पर्य ज्यात एकत्र सांगितले आहे तो हा अठरावा कलशाध्याय आहे.

हा श्रीभगवद्‌गीता ग्रंथ सगळ्या ज्ञानाचा समुद्र आहे. मूर्तिमंत वेदच आहे पण औदार्याच्या बाबतीत वेदापेक्षाही श्रेष्ठ आहे. वेद अत्यंत संपन्न खरा पण तीन वर्णांच्याच कानी त्यांनी आपले ज्ञान असावे असा नियम करून आपल्या मनाची कृपणताच दाखवली. संसार-दुःखात सापडलेल्या स्त्रीशूद्रादिकांना आपल्या ज्ञानाचा लाभ घेण्यास अधिकार नाही असा निर्णय करून वेद स्वस्थ राहिले. विचार केल्यावर मला वाटते की मागचे हे उणे फेडावे आणि कुणाच्याही उपयोगी पडावे या सद्बुद्धिने वेद गीतारूपाने पुन्हा प्रकट झाला. आता या गीतेची सेवा कोणत्याही रूपाने करणाऱ्या संसाराच्या चव्हाट्यावर मोक्षाचे मुक्तद्वार उघडले आहे. ही गीता आता अर्थ जाणून घेणाऱ्याच्या मनात प्रवेश करते. गीता ऐकणाऱ्याच्या कानाच्याद्वारे आत प्रवेश करते. जपाच्या, पाठाच्या मिषाने मुखात वस्ती करते आणि मोक्षाचे वरदान करते. गीतेचा पाठ जो जाणतो त्याच्या संगतीमध्ये राहून स्वतः गीता लिहून काढून किंवा पुस्तकमिषाने जवळ बाळगूनदेखील मनुष्य मोक्षाचा अधिकारी होतो आहे. वेदांनी गीतेचे रूप धारण करून शुद्ध मोक्षसुखाचे अन्नछत्र घातले आहे. आता उत्तम, मध्यम आणि अधम असा भेद इथे नाही. अंतरिक्षात विहार करण्यास, पृथ्वीवर बसण्यास आणि सूर्यप्रकाशाला वावरण्यास जसे आकाश हेच आवार आहे त्याप्रमाणे उत्तम, मध्यम आणि अधम असा भेदभाव मनात न आणता कैवल्यदान करून जगाला

निवविण्यासाठी हा वेदाचा नवा अवतार कृपणपणाच्या अपकीर्तीला भिऊन झाला आहे. गीतेच्या पोटात शिरून त्याने आता उत्तम कीर्ती मिळविली.

सहज सेवन करता यावे असे सुंदर रूप वेदांनी गीतेमध्ये घेतले आणि श्रीकृष्ण व अर्जुन यांच्या संवादातून हा बोध प्रुफुल्लित करीत नेला.

श्रीकृष्णांनी उपदेश अर्जुनाला केला पण त्या उपदेशाने त्रैलोक्याचे कल्याण झाले. चातकाची दया येऊन मेघ पाणी घेऊन धावतो पण त्या वृष्टिने चराचराची शांती होते. अनन्यगति कमळासाठी सूर्य उगवतो पण त्रिभुवनाचे डोळे सुखी होतात. अर्जुनाच्या निमित्ताने श्रीराज भगवंतांनी गीता प्रकट केली आणि सर्व जगाच्या माथ्यावर असलेले संसाराचे ओझे फेडले. सर्व शास्त्ररूपी रत्नाचे तेज प्रकट करून दाखवणारा हा सूर्यच उगवला आहे. लक्ष्मीपतीच्या मुखरूपी आकाशातला गीता हा सूर्यच नव्हे काय?

अहो, पार्थ या ज्ञानाला पात्र झाला आणि त्याने आपले कुळ धन्य केले. या अर्जुनानेच गीता हा जगाभोवती स्वतंत्र कोटच निर्माण केला आहे. आता जगाचे खास संरक्षण होईल. माउली म्हणतात, “अद्वैतात बुडून गेल्यावर त्या आपल्या दैववान सख्याला पुन्हा द्वैतभावावर आणण्यासाठी देवांनी त्याला हाक मारली आणि म्हटले,

“अर्जुना रे, भानावर आहेस ना? अरे, मी ज्या शास्त्राचा तुला उपदेश केला ते तुला पटले का? कळले का? अरे, तुला मनापासून पटले का?

भानावर येत अर्जुनाने उत्तर दिले, “हो, हो, देवा, तुम्ही जे जे सांगितले ते ते मला पटले. आपल्या कृपेने मला ते पटले.

तेव्हा देव म्हणाले, “अर्जुना, हे ज्ञान तुला पटले हे फार चांगले झाले. आता ते तुझ्या जीवाच्या स्वाधीन होऊन गेले. पण पार्था, ह्या ज्ञानाच्या जपणुकीबद्दल फार दक्ष रहा बरं का. अरे, एखादी वस्तू हस्तगत झाली तरी ती भोगण्याचे भाग्य लाभावे लागते आणि ते क्वचितच लाभते हे ध्यानात घे. कसे घडते बघ. न विरजलेल्या दुधाचे भांडेच असा तो क्षीरसागर घुसळण्यासाठी देवदानव एकच आले. दोघांनीही खूप सायास केले. कष्ट फळास येऊन तो अमृतकुंभही त्यांच्या दृष्टिस पडला पण त्या अमृताचे रक्षण कसे करावे हे त्यांना कळलेच नाही. अमरत्व येण्यासाठी जे अमृत वाढले त्यामुळे दैत्याला मरण पत्करावे लागले. तेव्हा लक्षात ठेव की वस्तू भाग्याने प्राप्त झाली तरी तिचा भोग कसा घ्यावा हे कळले पाहिजे. ती वस्तू जतन कशी करावी याचे ज्ञान हवे. नाही तर ते ज्ञान उलट परिणाम घडवून आणील.

पुरूरव्याचा नातू नहुष राजा हा फार पराक्रमी व सद्गुणी होता. हातून ब्रह्महत्या झाल्याने इंद्राला इंद्रपदास मुकावे लागले. तेव्हा देव आणि ऋषी यांनी एकमताने नहुषाला इंद्रपद दिले. त्याठिकणी तो अगदी ऐष-आरामात राहू लागला पण विषयलंपट होऊन इंद्रपदाप्रमाणे इंद्राणीचीही प्राप्ती व्हावी अशी इच्छा धरून त्याने तिला बोलाविले. हे संकट टळावे म्हणून तिने निरोप पाठविला की, “अपूर्व वाहनात बसून आपणच

माझ्याकडे यावे." नहुषाने सप्तर्षीनाच रथाला जोडले आणि त्या रथात बसून तो तिच्याकडे निघाला. उतावीळ होऊन तो ऋषींना "सर्प सर्प" चला चला असे म्हणू लागला व त्याने लाथही मारली. अगस्तींना फार राग आला आणि त्यांनी "तू सर्पयोनीत जन्माला येशील" असा शाप दिला. ह्या शापाने नहुष इंद्रपदाला मुकला आणि सर्प होऊन पृथ्वीवर पडला. ही गोष्ट तुला माहित आहेच. ती ध्यानात ठेव. अर्जुना, तू फार पुण्य केलेस आणि त्यामुळे गीतारूपी श्रेष्ठ शास्त्र ऐकण्यास पात्र झाला आहेस. आता या शास्त्राचा संप्रदाय अंगिकारून या शास्त्रार्थाचे चांगल्यारीतीने आचरण कर बरं का. संप्रदायानुसार अनुष्ठान केले नाहीस तर त्या अमृतमंथनासारखी स्थिती होईल. बाबा, उत्तम गाय मिळाली पण धार काढण्याची हातोटी माहित असली तर ना दूध प्यायला मिळणार? त्याप्रमाणे गुरूप्रसन्न होतील, शिष्याला खरोखर विद्याही साध्य होईल पण ती विद्या संप्रदायाप्रमाणे अनुष्ठान केले तरच फलित होते. एरवी नाही. या गीताशास्त्राचा संप्रदाय तुला सांगतो तो तू नीट ऐक.

अर्जुना, तुझ्या आस्थेमुळेच तुला हे गीताशास्त्र प्राप्त झाले आहे, हे विसरू नको. ज्याला आस्था नाही अशा तपोहीन माणसाला गीता कधीही सांगू नकोस. वेदांनी अंत्यजाला जसा वाळीत टाकला तसा जो तापस आहे पण गुरूभक्तिच्या बाबतीत ढिला आहे त्याला हे शास्त्र सांगू नकोस. कावळा वयोवृद्ध आहे म्हणून यज्ञाचा अवशेष प्रसाद त्याला कुणी देत नाही. त्याप्रमाणे गुरूभक्तिहीन तापसाला गीता कधीही देऊ नकोस. तपही करतो, गुरूभक्तही आहे पण गीता ऐकण्याची इच्छा नाही अशा माणसालाही गीता देऊ नको. तो तप आणि गुरूभक्ति या दोन्ही अंगानी उत्तम असला तरी गीता श्रवणाला मुळीच योग्य नाही. मोती टपोरे आहेत, पाणीदार आहेत, मौल्यवान आहेत पण त्याला वेजच नाही तर त्यात दोरा कसा जाणार? त्याची कंठी कशी होणार? समुद्र खोल आहे हे कोणी नाकबूल करीत नाही पण त्यावर होणारी पावसाची वृष्टि फुकटच जाते ना? अरे, ज्याचे पोट भरलेले आहे त्यालाच आग्रहाने दिव्यान्न वाढण्यापेक्षा जो भुकेजला आहे त्याला वाढण्याचे उदारपण का करू नये? म्हणून इतर बाबतीत योग्यता असली आणि गीता श्रवणाची नावड असली तर त्याला मुळीसुद्धा देऊ नकोस. अरे, जिथे जे योग्य असेल तेच फळाला येते. रूप विषयाला जाणण्यात डोळा चतुर खरा पण वास घेण्यासाठी तो पुढे करून काय उपयोग? सांग बरं. सुभद्रापती, तपी, भक्त असले आणि शास्त्र श्रवणाची अनासक्ती असेल तर ते त्याज्य समजावे. तप आहे, भक्ती आहे, ऐकण्याची आर्ती पण आहे तेव्हा ही सगळी सामुग्री आहे म्हणून केवळ ते योग्यच आहेत असे समजू नकोस. गीताशास्त्राचा निर्माता सगळ्या लोकांचा शास्ता असा जो मी त्याच्याबद्दल जर तो सामान्यत्वाने बोलत असेल, मला यःकश्चित समजत असेल तर तो गीता श्रवणास अधिकारी नव्हे.

माझ्या भक्तांना आणि मला दुष्टपणाने बोलणारे जे जे कोणी असतील ते ते सर्वजण गीताशास्त्र श्रवणास मुळीच योग्य नव्हेत. दिव्यावाचून रात्रीची मोकळी ठाणदिवी असते तशी त्याची बाकीची सर्व साधनसामुग्री व्यर्थ आहे असे समज. अंग गोरे आहे, तरुण आहे, अंगावर लेणी पण घातली आहेत फक्त त्या शरिरात प्राण तेवढा नाही. सोन्याचे सुंदर घर निर्माण केले आहे खरे पण दार नागिणीने अडविले आहे. दिव्यान्न चोख आहे, उत्तम आहे पण त्यात काळकूट वीष मिसळलेले आहे. एखाद्याची मैत्री अगदी उत्तम पण त्या मैत्रीमध्ये कपट लपलेले आहे तशी ह्या सगळ्या सामुग्रीचा अवस्था आहे. प्रबुद्धा, तप, भक्ति, बुद्धि असून तो भक्त माझी किंवा माझ्या भक्तांची निंदा करीत असेल तर ते सगळे बाकीचे फुकट आहे.

धनंजया, म्हणून तुला पुन्हा पुन्हा सांगातो, तो भक्त असो, तपी असो, बुद्धिमान असो, बाबा, हे शास्त्र त्याच्या हातात देऊन नकोस. त्याचा स्पर्शही या शास्त्राला होऊ देऊ नकोस. तो निंदक अगदी ब्रह्मदेवाच्या योग्यतेचा असला तरी कौतुकानेसुद्धा गीता त्याला देऊ नकोस.

देवाच्या ह्या सांगण्यावरून श्रीरामकृष्णांच्या चरित्रातला प्रसंग आठवतो. त्यांना स्वतःला कोणी काही म्हटले, निंदा केली तरी त्यांना त्याचे काही एक वाटत नसे पण श्रीकालीची कोणी निंदा केली तर मात्र त्यांचा धीर सुटत असे व ते त्याच्यावर रागावत असत. स्वामी विवेकानंदांचा प्रथम प्रथम ईश्वराच्या साकार स्वरुपावर विश्वास नसे व त्याबद्दल ते श्रीरामकृष्णांशी वरचेवर वाद घालीत. एक दिवस वादाच्या भरात स्वामीजी कालीला काही निंदेचे शब्द बोलून गेले. श्रीरामकृष्ण त्यांना म्हणाले, “बाबा रे, तू मला काय वाटेल ते बोल. माझ्या आईला का?” तरीही विवेकानंदाचा पट्टा थांबेना. तेव्हा रागाने श्रीरामकृष्ण म्हणाले, “मुर्खा, निघ इथून जा. माझ्या इथे येऊन माझ्या आईला नावे ठेवतोस? आजपासून इथे येत जाऊ नकोस.” हे ऐकून विवेकानंदांना वाईट वाटले परंतु, तेथून न जाता ते तेथेच एका बाजूला जाऊन बसले. काही वेळाने श्रीरामकृष्णांना रहावेनासे होऊन ते उठून त्यांच्या जवळ गेले आणि एखाद्या लहान मुलासारखे त्यांना कुरवाळीत म्हणाले, “तू माझ्या आईला का बरे नावे ठेवलीस? म्हणून माझा धीर सुटला. आईला कोणी नावे ठेवलेली मला सहन होत नाहीत. तुला काय बोलायचे ते मला बोलत जा.”

देव अर्जुनाला तोच कायदा समजावून सांगत आहेत की, निंदक गीताशास्त्राचा अधिकारी होऊच शकत नाही. त्याच्या हाती गीताशास्त्र कधीही देऊ नकोस. आता निषेध सांगून झाल्यावर देव विधी सांगत आहेत. ही गीता कुणाच्या हाती द्यावी हे समजावून देऊन देव म्हणत आहेत, “पार्था, गीतेला मंदिर बांधले पाहिजे. धनुर्धरा, तपाच्या गुंड्यानी पाया बळकट बांधून घ्यावा. मग गुरूभक्तिचा प्रासाद बांधावा. मंदिराचा श्रवणेच्छा हा दरवाजा अहोरात्र उघडा ठेवावा. निंदा करावयाची नाही ह्या नियमाचा रत्नाचा कळस वर ठेवावा आणि मग भक्तिरूपी शुद्ध गाभाऱ्यात गीता ह्या रत्नेश्वराची प्राणप्रतिष्ठा करावी. तू असे केलेस की या जगात माझ्या बरोबरच्या योग्यतेला येशील.

ॐ कार हा ॐ या एका अक्षराच्या रूपाने अ, उ, म या त्रिमात्रिकेच्या पोटी गर्भवासामध्ये अडकला होता. वेदाचे बीज असा हा जो ॐकार तो गीतेच्या विस्ताराने विसृत झाला. गीता म्हणजे जणू काय गायत्रीच. श्लोकरूपी फळांनी व फुलांनी प्रफुल्लित झाली. आईशिवाय ज्या बाळाला दुसरे जीवन नाही त्याची आणि त्याच्या आईची भेट करून द्यावी त्याप्रमाणे जो माझ्या भक्ताची आणि ह्या गायत्री मंत्राचे रहस्य सांगणाऱ्या गीतेची ओळख करून देईल तो देहपातानंतर मद्रूपच होईल. गीता आणि भक्त यांची आदराने भेट करून देणाऱ्याला इतके अपरिमित फळ मिळते. शरीररूपी अलंकार घालून तो माझ्यापासून वेगळा वावरत असला तरी जीवे, प्राणे तो माझा आवडता असतो. ज्ञानी, कर्मठ, तापसी ही माझ्या अंतरंगातीलच माणसे खरी पण या खुणेच्या मंडळीतही गीता सांगणारा मनुष्य मला जितका आवडतो तितका दुसरा कोणी आवडत नाही.

अर्जुना, अरे गीता सांगणारा तो माझा भक्त भक्तजनांच्या मेळाव्यामध्ये गीता सांगतो आणि सगळ्या जगात त्याच्या योग्यतेचा दुसरा कोणी नाही अशी माझ्याकडून वाहवा मिळवतो. मज ईश्वरावरच्या प्रेमाने निगर्वीपणाने गीतापठण करताना तो संतांच्या सभेचे भूषण होतो. नवपल्लवांनी झाडांना रोमांचित करीत वसंत

वनात प्रवेश करतो त्याप्रमाणे तो आपल्या पठणाने श्रोत्यांच्या अंगावर रोमांच उभे करतो. झुळझुळ वाहणाऱ्या वाऱ्याने पाने सहज डोलावी तसे श्रोते डोलू लागतात. मकरंदाने फुले भरून जावी तसे श्रोत्यांचे डोळे आनंदाश्रूनी भरतात आणि कोकिळ पक्ष्याच्या पंचमस्वराप्रमाणे कंठ दाटून श्रोत्यांच्या तोंडून अस्फुट आनंदोद्गार निघू लागतात. अर्जुना, त्याच्या गीता पठणाने हा असा आनंदसोहळा घडतो. जन्माचे सार्थक झाले असे चकोराला चंद्र आकाशात उगवला की वाटते. आकाशात नव्यानेच मेघ आले आणि गर्जना करू लागले की मोर नाचत त्यांना ओ देऊ लागतो. सज्ञनांच्या मेळाव्यामध्ये माझ्या स्वरूपदर्शनाचा हेतू मनात ठेवून गीतेतील पदरत्नांचा अमर्याद वर्षाव करतो. मागचे पुढचे भक्त न्याहाळून पाहिले तरी त्याच्याएवढा माझा प्रियतम कोणी नाही असेच मला कळले.

अर्जुना, काय सांगावे? जो गीतार्थाची मेजवानी संतांना करतो त्याला मी येथपर्यंत माझ्या जिव्हारी आणून ठेवतो. जो गीतार्थ सांगतो त्याला हे असे अमाप फल मिळतेच.

पण अर्जुना, तुझ्या माझ्या भेटीत हा संवाद वाढत गेला आणि त्या संवादाच्या गावी मोक्ष प्राप्त करून देणारे उपाय रहायला आले. सकलार्थ देणारा हा आपला दोघांचा संवाद पदांचा अर्थही न करता नुसती गीता जो पाठ म्हणतो त्यानेसुद्धा ज्ञानाग्नि प्रदीप्त करून मूळ अज्ञानाची आहुती त्या अग्निस दिली असे होऊन मी परमात्मा त्या गीतापाठ म्हणणाऱ्यावर संतुष्ट होतो. हे चतुरा अर्जुना, गीतेच्या अर्थाचा आढावा घेऊन ज्ञानी पुरुष जेथे प्राप्त होतात ते ठिकाण त्या गीतापाठकास गीता म्हणण्यामुळे व गीतेचे नुसते वर्णन करण्यामुळे मिळते. गीता ही सर्वांची आई आहे. तिच्याजवळ जाणते आणि नेणते मूल असा भेदच नाही. तिची कृपा सर्वांवर करुणेने वर्षाच करीत असते.

मालूताई, एका व्यक्तिगत अनुभवाची कृतज्ञतापूर्वक नोंद करीत आहे. प्रसंग जसा घडला तसा आपल्या डोळ्यासमोर उभा रहावा म्हणून विस्ताराने लिहिते आहे.

१९७७ साली आमच्या ज्ञानेश्वर कन्या सखी मंडळाचे ज्ञानेश्वरीचे पहिले प्रवचन पारायण पूर्ण झाले. १९७० साली आम्ही सुरवात केली. १९७७ च्या भाद्रपद महिन्यात अगदी शेवटचा भाग आला. आठवड्यातून एकदा जमावयाचे व जमतील त्या व तेवढ्या ओव्या दीड तासात संपवावयाच्या, थोडी चर्चा करावयाची, मला जुळेल तसा मी अर्थ सांगावयाचा असा आमचा क्रम सात वर्षे चालला होता. १९७७ च्या डिसेंबरमध्ये समाप्ती होईल असा अंदाज होता. आमच्यापैकी मंदाताई टेंबे ऑस्ट्रेलियाला निघाल्या म्हणून भेटायला आल्या. तेव्हा म्हणाल्या, “मी आता निघाले. माझी तेवढी ज्ञानेश्वरी अपुरी रहाणार.” मी म्हटलं, “आपण सर्वजण आठ दिवस रोज यायला तयार असला तर मी रोज दोन तास सांगायला तयार आहे. आपण वाईट वाटून घेऊ नका. आपण पूर्णच करूया.”

सगळ्या मैत्रिणी तयार झाल्या व रोज दोन तास बसून झपाट्याने मोठ्या आनंदाने पुढे पुढे चाललो होतो. समाप्तीचा दिवस आला भाद्रपद वद्य पंचमी घरात महालय. सकाळपासूनच सोवळ्याच्या स्वयंपाकाची गडबड म्हणून मी फुले वगैरे आणण्याची भगिनीची गडबड ऐकून त्यांना आदल्याच दिवशी म्हटले उद्या आपण सकाळी आला तर भेट व्हायची कठीण आहे. ब्राह्मण जेवून, पिंडदान होऊन आम्हाला जेवून उठायला दोन

वाजून जातील. तोवर मला सोवळ्यात रहावे लागेल. बाहेर येता यावयाचे नाही. आपण फुले माळा आणाल त्या पहाऱ्यातच ठेवायला लागतील. गैरसमज करून घेऊ नये कुणी." सर्वांनी कबूल केले. सकाळपासून पहाऱ्याच्या हॉलमध्ये फुले, माळा, प्रसादाचे पुडे यांच्या दुरड्या लागल्या.

मला सर्व उरकण्यास दोन वाजून गेले. पिंडदान वगैरे असल्याने माजघर मोकळे केले होते. दोनानंतर महालयाचे साहित्य आवरून बैठक घातली. एका बाजूस पूज्य स्वामी स्वरूपानंद व दुसऱ्या बाजूस पूज्य स्वामी सत्यदेवानंद यांच्या तसबिरी मांडल्या त्या दोहांच्यामधे चौरंगावर आमच्या लहानपणची पालखी ठेवली आणि कुंदा नेर्लेकर या मानस कन्येस म्हटले, "कुंदा, आता त्या फुलाच्या करंड्या आत आण आणि सगळी फुलाची सजावट तुझ्या मनाने कर. सकाळपासून धांदल चालली आहे मी आता जरा वेळ स्वस्थ बसते, अर्धातास बसते. आणि मग आज सांगण्याचा जो शेवटचा भाग आहे तो आणखी एकदा वाचून ठेवते."

दुपारची साडेतीनची वेळ होती. कुंदा हार गुंफून लावत होती. शेवटी ती खुर्चीवर चढली आणि देवघराच्या लाकडी नक्षीच्या कमानीत मोठी डेलियाची फुले बसवू लागली. फुलांचे देठ चांगले लांबसडक होते. तिने ते देठ नक्षीतून ओढून घेऊन फुले नीट बसविली. मी बसून नुसती पहात होते. मनात विचार येत होते. त्यातून एका विचारानें अगदी स्पष्ट रूप घेतले. मी हात जोडून दोन्ही स्वामींना नमस्कार केला आणि मनात म्हटले, "गीतेच्या अर्थाची जो भक्त संताना मेजवानी करतो तो देवांचा लाडका होतो असे देवांनीच म्हटले. नुसत्या गीतापाठकालाही तेच फळ देव देतात असेही म्हटले. मी गेली सात वर्षे जशी जमेल तशी सेवा केली आहे. जाणते नेणते मूल तर गीतेला सारखेच आहे ना? मग माझी सेवा कशीही झाली असो रुजू झाली असेलच. पण महाराज, मला ती सेवा पोचल्याची खूण मिळाली पाहिजे. स्वप्न दृष्टान्ताने माझे समाधान होणार नाही. सर्वांच्या डोळ्यांना दिसेल अशी खूण मला आपण दिलीच पाहिजे."

मी अगदी लहान मुलासारखा हट्ट केला. चार वाजता सर्व तयारी झाल्याचे पाहून उठले. हट्ट विसरून गेले. दोन तास आनंदात डुंबत प्रवचन पूर्ण करून पसायदान म्हणून सात वर्षांच्या सेवेची सांगता केली. इतका अपूर्व सोहळा झाला की आता जे माउलींनी वर्णन केले तो आनंद आमच्या ह्या माजघरात त्या दिवशी भरभरून वाहू लागला. कुणाचेही डोळे कोरडे राहिनात. ज्ञानेश्वरी पालखीत ठेवली. आरती प्रसाद झाला. सखीमंडळाने मोठ्या प्रेमाने ओटी भरली. पालखी देवघराच्या दारात होती. ओटी भरल्यावर श्रीअंबाबाईच्या पाया पडावे म्हणून मी पालखीच्या दांड्याखालून बसून पलीकडे गेले. देवघराच्या दारातून आत पाऊल टाकते तोच कमानीच्या नक्षीत कुंदाने बसवलेले फुल माझ्या डोक्यावर अलगद पडले!!

मालूताई, काय सांगू आजही त्या प्रसंगाची आठवण झाली तरी अंगावर काटा उभा रहातो आहे. मालूताई, ती खरोखरच आई आहे. आपण हट्ट करावा आणि तिने तो पुरवावा! त्या उभयता स्वामींनी सेवेची पावतीच दिली व दस्तुरखुद्द होते प्रत्यक्ष त्या भगवंताचे! कसा सांगू तो आनंद!

माझ्या मुलींना ही हकीकत जेव्हा पुण्यास सांगितली तेव्हा त्या म्हणाल्या, "काय आक्का! देवाजवळ अशी पावती मागायची का?" मी म्हटलं, "अग, हो हो, देवाजवळच मागायची दुसरी जागा आहे काय मागायला?" देवांनी का असं म्हणावं की तो माझा भक्त मला आवडतो. त्यांनी माझा हट्ट पुरवलाच पाहिजे की

मग. मी जर असा हट्ट केला नसता तर हा आनंद मला कसा मिळाला असता सांगा बरं!" अशा ह्या आमच्या मुलीं आमच्याही पुढे वाटचाल करीत आहेत.

त्यावेळी स्वामी सत्यदेवानंद सांगलीस आले होते. त्यांना ही सगळी हकीकत लिहून कळवल्यावर त्यांच्याकडून आलेंले उत्तर माझ्यासमोर आहे. १२-१२-७७ रोजी ते लिहितात,

"काही अतर्क्य व अशक्य कोटीतील घटना वास्तवात अनुभवास येत आहेत, तुमचा निनिर्मित आनंदही वर्धिष्णू आहे हे वाचून धन्योऽहं धन्योऽहं असे मलाच म्हणावेसे वाटते."

हे सगळे लिहिण्याचे कारण एवढेच की माउलीनी गीतेच्या ह्या दोन श्लोकावर केलेल्या विवेचनात एक रेसभरही अतिशयोक्ति नाही. अनुभवासाठी ठाण मांडून बसणाऱ्याला आजही भगवंत अनुभव देण्यास वचनबद्ध आहेत, हे अपरोक्षानुभूतितून आणि कृतज्ञेने भरलेल्या अंतःकरणापासून सांगितलेच पाहिजे, एरवी दुसरा काही हेतू नाही.

देव म्हणत आहेत, "पार्था, परमार्थाच्या सर्व मार्गांची निंदा करणे टाकून शुद्ध आस्थेने जो गीता श्रवण करतो त्याच्या कानावर गीतेची अक्षरे पडतात न पडताच तोच त्याचे पाप पळून जाते. अरण्यामध्ये अचानक वणवा लागला की वनातले प्राणी सैरावैरा धावत सुटून वाट सापडेल तिकडे पळून जातात किंवा उदयाचलावर सूर्य झळकल्याबरोबर अंधार आकाशाच्या पोकळीत नाहीसा होतो त्याप्रमाणे कानाच्या महाद्वारी गीतेचा गजर झाला की सृष्टिच्या आरंभापासूनचे ऐकणाऱ्याचे पाप नष्ट होते. त्याप्रमाणे पुढील जन्म परंपरा स्वच्छ, शुद्ध पुण्यरूप होते. इतकेच नव्हे तर याहीपेक्षा अलोट फळ प्राप्त होते. गीतेची जितकी अक्षरे कानाच्याद्वारे आत शिरतील तितके अश्वमेध यज्ञ केल्याचे पुण्य प्राप्त होते. म्हणून म्हणतो अर्जुना, गीता श्रवणाने पाप जाते, धर्माचा उत्कर्ष होतो, न मागता स्वर्गाच्या राज्याचे ऐश्वर्य प्राप्त होते. पार्था, तो भाग्यवान भक्त माझ्याकडे यायला निघतो तेव्हा पहिला मुक्काम स्वर्गात करतो. जे आवडेल ते ते भोगतो आणि शेवटी माझ्यात येऊन मिळतो. जास्त काय सांगू? धनंजया, ऐकणाऱ्याला, वाचणाऱ्याला गीता अशा ब्रह्मानंद स्वरूपाचे फळ देते.

आता ते सगळे राहू दे पण सख्या ज्या कारणाकरिता हे गीताशास्त्र सांगण्याची सगळी खटपट केली त्या तुझ्या कामाचे काय आले? मला सांग पांडवा, आम्ही हा जो शास्त्रसिद्धांत तुला सांगितला तो तुझ्या मनात ठसला की नाही? आम्ही ज्या रीतीने तुला सांगितले ते जसेच्या तसे तुझ्या मनापर्यत पोचून तिथे स्थिर झाले की नाही? का सांडीविखुरी मधेच हरवले? का तू अनादराने टाकून दिलेस? हे बघ, आम्ही तुला जे सांगितले ते तुझ्या हृदयापर्यंत नीट पोचले असले तर प्रथम मी विचारीन त्याचे स्पष्ट उत्तर लवकर दे. स्वरूपाच्या अज्ञानामुळे मागे तुला मोहाने भुलविले होते. तो मोह आता तुझ्या मनात आहे की गेला? जास्त काय विचारू? मला हे सांग तुला आपल्या ठिकाणी कर्माकर्म काही दिसते का अजून? मी हे करीन, मी हे करणार नाही असे काही अद्याप तुला वाटते काय रे? लवकर सांग बाबा."

माउली म्हणतात, "पार्थ, स्वानंदाच्या रसात पूर्णतया विरून जाईल म्हणून देवांनी प्रश्न विचारण्याच्या मिषाने अर्जुनाला भेद दशेला आणले. पार्थ पूर्णब्रह्म झाला आहे हे श्रीकृष्णनाथ जाणून होते. पण त्यांना

अनुक्रमणिका

त्याच्याकडून कार्य करून घ्यावयाचे होते म्हणून त्यांनी अर्जुनाला मर्यादेचे उल्लंघन करू दिले नाही. त्या सर्वज्ञाला आपण काय केले आहे हे काय कळत नव्हते का? पण पार्थाला देहभानावर आणण्यासाठी देव प्रश्न विचारीत होते. अर्जुनाचा नाहीसा झालेला देहाहंकार परत जागेवर आणून देवांनी त्याला प्राप्त झालेले पूर्णपण सांगावयास लावले. क्षीरसागरातून बाहेर निघून आपल्या किरणांच्या समुदायाने अलंकृत असलेला पूर्णचंद्र क्षीरसागरापासून स्वरूपाने वेगळा न होता आकाशात वेगळा झालेला दिसतो त्याप्रमाणे अर्जुन क्षणांत मी ब्रह्म आहे हे विसरे, देहभानावर येई, तर जगच ब्रह्मरूप झाल्याची त्याला अनूभूति येई, तो अनुभव टाकतो, तो ब्रह्मपणाही विरून जाई असा ब्रह्मभावाने मांडत आणि मोडत तो मोठ्या दुःखाने देहाच्या सीमेवर आला आणि मी अर्जुन आहे या जाणिवेवर उभा राहिला.

मग थरथर कापणाऱ्या हाताने त्याने देहावर रोमांच उभे होते ते दाबले. अंगावर आलेले घामाचे थेंब जिरवले, श्वासोच्छ्वास अव्यवस्थित होत असल्याने डोलणाऱ्या अंगाचाच आधार दिला. चलनवलन विसरून तो स्तब्ध राहिला. दोन्ही डोळ्यामधून जे आनंदामृताचे भरते ओसंडत होते ते पुसून नाना प्रकारच्या उत्कंठेने कंठ दाटला होता, गळ्यात बांध बसला होता तो काढून वाचा विस्कळित झाली होती ती प्राणाने सावरून श्वासोच्छ्वास अनियिमित झाला होता, तो नियमित करून अर्जुन म्हणाला, "काय म्हणालात देवा? मोह आहे की गेला? महाराज, मोह गेला. एकटाच नव्हे तर आपला सर्व परिवार घेऊन निघून गेला. सूर्याने डोळ्याजवळ यावे आणि अंधार दिसतो काय विचारावे तसेच हे झाले. हे बोलणे कोणत्या गावी चालणार आहे? श्रीकृष्णराया, आपण आमच्या डोळ्यांना प्रत्यक्ष दिसता अहा तेवढ्यानेच सगळे काम होऊन गेले असते पण आपण तोंडभरून आईपेक्षाही जास्त गोड बोलून उपदेश करता अहा आणि तो उपदेशही असा की, जो इतर कोणत्याही उपायांनी जाणता येणार नाही. देवा, मग मोह कसा राहील? आपण "मोह गेला का नाही?" असे विचारता म्हणून सांगतो. एरवी हे आता विचारायलाही नको, महाराज, त्रिवार सांगतो की मोह गेला, समूळ गेला. "मी अर्जुन आहे" अशा भ्रांतीने देहामध्ये गुंतून पडलो होतो तो आता तुझ्याशी ऐक्य झाल्याने मुक्त झालो. आता विचारणे आणि सांगणे दोन्हीही उरले नाही.

तुझ्या प्रसादामुळे मला आत्मबोध झाला आहे. त्या मोहाचा कांदासुद्धा त्या बोधाने मनात उरू दिला नाही. कर्म करावयाचे की न करावयाचे हे द्वैतापासून उत्पन्न होते आणि मी तर आता तुझ्याहून वेगळा उरलोच नाही. तेव्हा मी आता करणारा तरी कोण न करणारा तरी कोण? सगळे काही तूच आहेस हे मी समजून चुकलो आहे. आता याविषयी माझ्या मनात काहीही संशय उरला नाही. निश्चयेकरून जेथे कर्माचा संबंध नाही ते ब्रह्मस्वरूप मी झालो आहे. तुझ्या कृपेने मला आत्मस्वरूपाची प्राप्ती झाली. माझे कर्तव्य निःशेष गेले आहे. आता प्रभो, आपल्या आज्ञेवाचून मला काहीही उरले नाही. आपले दृश्य कृष्णस्वरूप असे आहे की, ते इतर सर्व दृश्याचा ते नाश करते. कृष्णस्वरूप जीवाहून वेगळे आहे हे द्वैतच सर्व द्वैताचा निरस करते. देवा आपले ते कृष्णस्वरूप एक असून सर्व देशात सर्वकाळ वास्तव्य करते. ज्याच्याशी संबंध आल्याने संसारबंध संपतो, ज्याची आशा केली की इतर सर्व आशा नाहीशा होतात, जे एक भेटले की सर्व काही भेटल्यासारखे होते तो तू माझी गुरूमूर्ती आहेस. तुझ्या प्रेमासाठी अद्वैतबोधाचे उल्लंघन करावे लागते. तूच एकाकीपणाचा सोबती आहेस. आपणच ब्रह्म होऊन कृत्याकृत्याचे प्रयोजन नाहीसे केले पाहिजे. देवा, तुमची अमर्याद सेवा केली पाहिजे आणि मगच गंगा समुद्राला भेटायला गेली तर तिथे पोचल्याबरोबर समुद्रच झाली तशी भक्ताची अवस्था होते. भक्त तुला अद्वैतबोधातून भेटायला आला की तू त्याला आपल्या परमात्मपदाचा वाटा देतोस. अशा प्रकारचा तू

करुणावत्सल स्वामी आहेस. देवा तुला कसलीही अपेक्षा नाही पण मला मात्र तुला गुरूपदावर बसवून तुझी सेवा करण्याची इच्छा आहे. श्रीकृष्णा, आपल्या मनात येईल की, ब्रह्मपदावर बसविण्याचे उपकार हा काय म्हणून मानतो? महाराज, आपल्यामध्ये आणि माझ्यामध्ये भेदाचे कवाड होते. आपण ते दूर केले आणि मला गोड सेवासुखाची प्राप्ती करून दिली.

देवा, आपल्या पायाचे स्मरण करून प्रतिज्ञापूर्वक सांगतो की देवदेवेश्वरा, आपण वाटेल ते करण्याची आज्ञा करा. आपण सांगाल ते मी करीन. मनात थोडासाही संदेह आणणार नाही.

अर्जुनाचे हे शब्द कानावर पडल्याबरोबर देव आनंदाने डोलू लागले. सुखाने भुलून गेले. मनाशी म्हणू लागले, “मी सदा सफळ, विश्वाचे फळ आणि साध्य पण आज अर्जुन मला फळ झाला.”

आपल्या मुलातील उणेपणा गेला, तो पूर्ण झाला हे पाहून पौर्णिमेला समुद्र आनंदाने उचंबळून येत नाही का, आपली मर्यादा विसरून जात नाही का तशी देवांची अवस्था झाली. संवादाच्या बोहल्यावर कृष्ण व अर्जुन या दोघांचे लग्न लागल्याचे पाहून संजयही आनंदाने उचंबळून गेला.

त्या आनंदाच्या भरामध्ये संजय धृतराष्ट्रास म्हणाला, “महाराज, आपणा दोघांचे व्यासांनी कसे रक्षण केले हो! अहो ऐका, आपल्याला व्यवहारात वावरण्याचीसुद्धा दृष्टि नाही, चर्मचक्षु नाहीत, अशा स्थितीत अतींद्रिय पदार्थ दाखविणाऱ्या ज्ञानदृष्टिच्या व्यवहारात त्यांनी आपल्याला आणले. रथ चालविण्यासाठी जे घोडे लागतात त्यांची परीक्षा करण्यासाठी आपण आम्हाला ठेवले एवढीच आमची योग्यता! असे असताना व्यासांच्या कृपेने हा कृष्णार्जुनांचा अपूर्व संवाद मला ऐकावयास मिळाला. दोन्ही सैन्ये एकाच कुळातील असल्याने कुठलाही पक्ष हरला तरी आपणच हरल्यासारखे आहे असे अशा ह्या दारुण युद्धाच्या प्रसंगी त्या व्यास महामुनींनी आपल्या ब्रह्मानंदाचा अनुभव द्यावा ही त्यांची आपल्यावर केवढी कृपा आहे? धन्य झालो आपण महाराज!” असे म्हणून संजय गहिंवरला पण त्या धृतराष्ट्राला काहीही पाझर फुटला नाही. चंद्रप्रकाशाने चंद्रकांत पाझरतो पण पाषाणावर काहीच परिणाम होत नाही. त्याप्रमाणे धृतराष्ट्र निर्विकारपणाने मुकाट बसला होता. धृतराष्ट्राचा हा कोरडेपणा पाहून संजयाला वाटते की आता ह्या संवादाबद्दल काहीच जास्त बोलू नये. पण तो सुखाने इतका वेडा होऊन गेला होता की त्याला गप्प बसवेना. आनंदाच्या वेगाने बेहोष झालेल्या संजयाला हे निश्चित कळत होते की धृतराष्ट्राला हे सांगून काही उपयोग नाही तरी पण बोलल्याशिवाय त्याला रहावेना. तो आनंदाने म्हणाला, “महाराज, आपला पुतण्या अर्जुन जे म्हणाला ते अधोक्षजाला फार आवडले हो. अहो पूर्व समुद्र आणि पश्चिम समुद्र या दोहोत नावाचाच काय तो फरक एरवी सगळे पाणीच! श्रीकृष्ण आणि पार्थ ही दोन नावे त्यांच्या देहाला असली तरी संवादाच्यावेळी त्या दोघांचे ऐक्यच होऊन जाते आहे. वेगळेपण नावालासुद्धा उरत नाही. आरशापेक्षाही चोख असे पदार्थ जर एकमेकासमोर आले तर ते एकमेक एकमेकाला पहातात त्याप्रमाणे देवासह अर्जुन आपल्याला देवांच्यामध्ये पहात होता आणि श्रीकृष्ण आपल्यासह अर्जुनाला अर्जुनाच्या ठिकाणी पहात होता. श्रीकृष्ण ब्रह्मस्वरूपात देव आणि भक्त सामावलेले पहात होता आणि अर्जुन त्याच ब्रह्मस्वरूपात भक्त आणि देव पहात होता. त्या दोघांशिवाय काहीच नाही तर ते आता काय करतील? दोघेजण एकपणानेच नांदत आहेत पहा.

भेद नाहीसा झाला तर आता प्रश्नोत्तरे कशी घडणार? आणि भेद राहिला तर संवादसुख कसे मिळणार? द्वैतपणाने बोलत असता संवादाचे द्वैत नाहीसे करणारे त्यांचे बोलणे मी ऐकले. स्वच्छ केलेले दोन आरसे एकमेकापुढे ठेवले की कोण कोणाला पाहतो असे म्हणावे बरे? एका दिव्यासमोर दुसरा दिवा ठेवला तर कोण कोणाला प्रकाशमान करतो आहे असे म्हणावयाचे? एका सूर्यापुढे दुसरा सूर्य उगवला तर प्रकाशक कोण आणि प्रकाश्य तरी कोण? महाराज, याचा निश्चय करावयास जावे तर निश्चय कुंठित होतो. सांगताच येत नाही. खरोखर संवाद करता करता ते दोघे असे एकरूपच होऊन गेले. अहो ते दोघे एकमेकात मिसळले यात तर काही आश्चर्य नाही पण दोन बाजूंनी पाणी येते आहे त्याचा प्रतिकार करावा म्हणून जर मीठ मधे उभे राहिले तर त्या मिठाचे जसे निमिषार्धात पाणीच होते तशी माझी अवस्था ह्या दोघांच्या संवादाचा मनात विचार करता करता झाली आहे. मीही ह्या ब्रह्मभावात विरूनच चाललो आहे."

संजय असे थोडेसे बोलतो न बोलतो तोच अष्टसात्त्विक भावांनी त्याची संजयपणाची आठवण हरण करून कुठल्या कुठेच नेली. त्याचा देहाहंकार नष्टच होऊन गेला. अंगावर रोमांच उभे राहिले. अंग संकोचित होऊ लागले. एकटा कंपच स्तंभ आणि खेद यांना जिंकीत होता. अद्वयानंदाच्या स्पर्शाने दृष्टि जलमय झाली. ते अश्रू नव्हते तर डोळ्यांना फुटलेले प्रेमाचे पाझरच होते. पोटात काय मावत नव्हते हे कळेना, गळ्यात काय अडकत होते हे उमजेना. हुंदक्यामुळे वाचा उमटण्याचे बंद पडले. फार काय सांगावे अष्टसात्त्विक भावांच्या योगाने अगदी बोबडी वळून गेली. कृष्णार्जुनाच्या संवादाचा संजय चव्हाटा झाला.

ह्या सुखाची जात मात्र अशी असते की ते आपण होऊनच पुन्हा शांती धरते. त्याप्रमाणे त्या सुखाचा वेग हळूहळू कमी झाला आणि संजयाला देहस्मृती लाभली.

स्थिरावलेल्या आनंदाने मग संजय म्हणून लागला, "महाराज, अहो किती अलौकिक भाग्य माझे. उपनिषदांनासुद्धा जे माहीत नाही ते मी व्यासांच्या प्रसादाने ऐकले. ती कथा ऐकताच माझी ब्रह्मात्वाशी मिठी पडली. दृष्टितील मी-तूपण सगळेच विरून गेले, अज्ञान निघून गेले. सगळे योगमार्ग ज्या श्रीकृष्णाच्या पायाशी येतात त्याचे वाक्य व्यासांनी सुलभ केले आहे. अर्जुनाच्या निमित्ताने देवच अर्जुन झाले आणि आपल्याकरताच देव जे बोलले ते मी ऐकले. महाराज काय सांगावे, गुरूंनी माझे कान त्या अधिकाराला पात्र केले. गुरूंच्या स्वतंत्र सामर्थ्याचे वर्णन तरी कसे करू?"

राजाला उद्देशून बोलता संजय पुन्हा आश्चर्याने व प्रेमाने भरून गेला. त्या योगाने त्याची देहस्मृती गेली. रत्नाचे तेज रत्नाच्या मूळ स्वरूपाला झाकत यावे तसे झाले. हिमालय पर्वतावरची सरोवरे चंद्रोदय झाला की स्फटिकासारखी घट्ट होतात, सूर्योदय झाल्याबरोबर पाझरून त्यांचे पुन्हा पाणी पाणी होते. त्याप्रमाणे देहाच्या स्मृतीने संजय त्या संवादाची आठवण करू लागला की देहाची विस्मृतीच होत होती.

अशा या अवस्थेत हर्षाच्या आवेगाने तो एकदम उठून उभा राहिला आणि म्हणाला, "राजन, श्रीहरीच्या विश्वरूपाला पाहिल्यावर आपण असे उगे कसे राहू शकला? न पाहिल्याने जे दिसते, नाहीपणानेच जे आहे, विसरू म्हटले तरी जे आठवते ते आता मी चुकवू तरी कसे?

अहो, श्रीहरीचे विश्वरूप पाहून मनाला जो चमत्कार वाटतो आहे तो चमत्कार वाटायलाही आता अवकाश उरला नाही. हा विश्वरूपरूपी महापूर माझ्याहीसकट मला वाहून नेतो आहे."

श्रीकृष्णार्जुन संगमामध्ये स्नान करून संजयाने अहंतेला तिलांजली दिली. तो काही तरी अस्फुट बोलत होता. काही अलौकिक आनंदाने उचंबळून येऊन गहिंवरून, "श्रीकृष्ण, श्रीकृष्ण" असे गद्गदून म्हणत होता.

या अष्टसात्त्विक भावाची धृतराष्ट्राला कशी ती कल्पना नव्हती. म्हणून संजयाची अशी काय अवस्था झाली ते त्याला कळेना. संजयाच्या हे लक्षात आल्यावर त्याने आपल्याला झालेला सुखलाभ आपल्या ठिकाणी स्थिर केला. अष्टसात्त्विक भावाचा पुंज जिरवला आणि तो जरा शांत झाला.

इतक्यात धृतराष्ट्र कपाळाला आठ्या घालून म्हणाला, "संजया, हे तू काय पुराण लावले आहेस? व्यासांनी तुला इथे कशासाठी आणून बसविले आहे, भलत्या वेळी ह्या ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी बोलायला तुला कुणी सांगितले आहे? अरे, कुरुक्षेत्रावर चालणाऱ्या लढाईचा वृत्तांत मला सांगण्यासाठी तू इथे माझ्याजवळ बसला आहेस ना? मग हे भलतेसलते कशाला सांगतोस मला? मला ते घेऊन काय करायचे आहे?"

बरोबरच आहे! रानात रहाणाऱ्या माणसाला जर राजमंदिरात नेऊन बसविले तर त्यात त्याला काय सुख वाटणार आहे? ज्याला जेथले महत्त्व कळत नाही त्याला ते विपरीत वाटणारच. तो त्याला अप्रसंग म्हणणारच! धृतराष्ट्राचे तसेच झाले. त्याला संजयाचे सगळे बोलणे वागणे नीरस वाटत होते. तो उत्कंठेने म्हणाला, "अरे, मला हे सांग ह्या लढाईत जय कुणाचा होईल? हे जे युद्ध मधेच उद्भवले आहे यात विजय कुणाचा होणार असे वाटते तुला? विचार केला तर मला तरी वाटते, निश्चितपणाने वाटते की पांडवांच्या दीडपट आमचे सैन्य आहे. दुर्योधनादि आमच्या पक्षाचे वीरही पांडवांना फारच भारी आहेत. तेव्हा आमच्या पक्षाला सैन्य खासच जय मिळवून देईल. ते योद्धे आम्हालाच विजयी करतील असे मला तरी वाटते.

पण उगीच आपले तुला विचारतो तुझे मत काय आहे? तुला भविष्य काय वाटते? आमच्यासारखेच तुझे ज्योतिष आहे ना? तुझे मत काय? तुझा अंदाज काय आहे हे मला नीटसे कळेना म्हणून विचारतो संजया, या लढाईत जय कुणाला मिळेल?

> **"यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः - ।**
> **तत्र श्रीर्विजयो भुतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम"॥** (अ. १८ –श्लो. ७८)

धृतराष्ट्राचा हा प्रश्न ऐकून संजय क्षणभर स्तब्धच झाला आणि मग एकदम उसळून म्हणाला, "महाराज ह्या लढाईत एकमेकाचे काय होईल हे मला माहीत नाही पण मला एकच कळते की,

> आयुष्य आहे तोवर जगणे आहे.
> चंद्र आहे तेथे चंद्रिका आहे.

शंभुदेव आहेत तिथे अंबिका आहे.
संत आहेत तिथे विवेक आहे.
सौजन्य आहे तिथे सोयरीक आहे.
राजा आहे तेथे सैन्य आहे.
अग्नि आहे तेथे दाहक सामर्थ्य आहे.
दया आहे तेथे धर्म आहे.
धर्म आहे तेथे सुखभोग आहे.
सुखभोग आहे तेथे प्रसन्नता आहे.
वसंत आहे तेथे पालवी आहे.
पालवी आहे तेथे फुले आहेत.
आणि फुले आहेत तेथे भ्रमरांचे थवे आहेतच.
गुरू आहेत तेथे ज्ञान आहे.
ज्ञान आहे तेथे आत्मदर्शन आहे.
आत्मदर्शन आहे तेथे समाधान आहेच.
भाग्य आहे तेथे विलास आहे.
सुख आहे तेथे उल्हास आहे.
सूर्य आहे तेथे प्रकाश आहेच आहे.

चारी पुरुषार्थ ज्या स्वामींच्या जोरावर, ज्या स्वामींच्या योगाने सनाथ झाले आहेत तो श्रीकृष्णराज जेथे असेल तेथे जगदंबा महालक्ष्मी असणारच. आपल्या पतीसह ती जगन्माता लक्ष्मी ज्याच्याजवळ आहे त्याच्या घरी अणिमादि सिद्धि दासी होऊन राबत असतात. श्रीकृष्ण परमात्मा आपल्या अंगाने विजयाचे स्वरूप आहे. तो ज्या पक्षाला राहिलेला आहे त्या पक्ष्याला लगभग विजय मिळावयाचाच. विजय तिथेच असावयाचा.

अर्जुनाचे विजय हे नाव विख्यात आहे. श्रीकृष्णनाथ तर स्वतः विजयस्वरूपच आहेत श्रीकृष्णाबरोबर छायेप्रमाणे रहाणारी जगदंबा लक्ष्मी त्याच्याबरोबर त्याच बाजूला असावयाची. महाराज अहो, ज्याला भगवानांच्यासारखा पिता आणि महालक्ष्मीसारखी माता आहे त्याच्या देशामधली रानटी झाडे कल्पतरूशी पैजा मारून त्यांना जिंकणार नाहीत काय? त्याच्या गावातले पाषाण चिंतामणी रत्ने होणार नाहीत काय? त्या देशातील भूमीसुद्धा चैतन्याने सळसळणार नाही काय?

त्या भाग्यवानाच्या गावी अमृताच्या नद्या वहातात असे जरी कुणी म्हटले तरी राजा तुला आश्चर्य वाटू नये. काय सांगावे? अरे, त्याच्या तोंडचे स्वैर शब्दसुद्धा वेदासारखे सर्वमान्य होतात. महाराज अहो तो सदेह सच्चिदानंद आहे हे विसरू नका.

स्वर्ग आणि मोक्ष ही दोन्ही पदे ज्याच्या आधीन आहेत तो श्रीकृष्ण त्या अर्जुनाचा पिता आहे. प्रत्यक्ष कमला त्याची माता आहे म्हणून तो लक्ष्मीचा वल्लभ ज्या बाजूला उभा तेथे सर्वसिद्धि स्वयंभूच आहेत एवढेच मला माहीत आहे. बाकी दुसरे तिसरे मी काही जाणत नाही.

**अनुक्रमणिका**

राजन्, आज अर्जुनाची योग्यता श्रीकृष्णापेक्षाही वरचढ झाली आहे. मेघ समुद्राच्या पाण्याचा बनलेला असतो पण तो समुद्रापेक्षाही तृषार्त भूमीला वृष्टिने शांत करून जगाच्या जास्त उपयोगाचा ठरतो. लोखंडाला सोनेपणाची दीक्षा देणारा परिस हा लोखंडाचा गुरू खरा पण जगाच्या व्यवहारात परिसापेक्षाही सोन्याचा उपयोगच होतो. इथे गुरूपेक्षा शिष्याला महत्व दिले जाते पण त्यामुळे गुरूंना कमीपणा येतो असे मात्र कुणी मुळीच म्हणू नये. कारण शिष्याच्या रूपाने खरे म्हणजे खरे गुरूच प्रकट होत असतात. मेघ जास्त उपयोगी असे म्हटले तरी तो मेघ समुद्राचाच आविष्कार आहे. अग्निने दिवा पेटला. प्रकाश दिव्याचा पडला तरी प्रकाशाचे मूळ अग्निच आहे. त्याप्रमाणे शिष्याची स्तुती ही पर्यायाने त्याच्या गुरूंचीच असते. देवांच्या सामर्थ्यानेच अर्जुन बलवान झाला आहे. पण देवापेक्षाही अर्जुन बलवान आहे असे म्हटलेले देवांना आवडते. इतका देवांचा अर्जुनावर लोभ आहे. मुलांने सर्व बाबतीत माझ्या वरचढ व्हावे, माझा पराभव करावा अशी पित्याची इच्छा असते. भगवान शाङ्‌र्गपाणी श्रीकृष्णाचीही इच्छा तशीच होती आणि ती अर्जुनाने फलद्रुप केली आहे.

फार काय सांगावे, अर्जुन, श्रीकृष्णाच्या कृपेला पूर्ण पात्र झाला आहे. तो अर्जुन ज्या पक्षाकडे असेल त्या पक्षाकडे विजय आहे यात शंका नाही. याउलट काही घडेल असा विचारसुद्धा राजा तू मनात आणू नकोस. अहो, महाराज जर त्या पक्षाला विजय मिळाला नाही तर तो विजयच खोटा आहे असे निश्चित समजा.

जिथे श्रीकृष्ण आणि लक्ष्मी, जिथे तो पांडुराजाचा कुमर अर्जुन अशी तिघेजण सुप्रतिष्ठित असतील तेथेच विजय आहे. तेथेच अभ्युदय आहे.

व्यासांच्या बोलण्यावर जर तुमचा खराखुरा विश्वास असेल तर राजा माझे हे भविष्य अढळ माना. जिथे तो श्रीवल्लभ भक्तांचे मनोरथ पूर्ण करण्यास उभा आहे तिथेच सुखाचा आणि मंगलाचा लाभ आहे.

या माझ्या वाक्यापेक्षा जर अन्यथा काही होईल तर मी पुन्हा स्वतःला व्यासांचा शिष्य म्हणवून घेणार नाही."

संजयाने गर्जना करून प्रतिज्ञेसाठी आपला हात वर केला.

सर्व भारताचे तात्पर्य या—

> **"यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।**
> **तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम" ॥** (अ. १८ -श्लो. ७८)

एका श्लोकाने संजयाने त्या स्नेहांध आंधळ्या धृतराष्ट्राच्या हाती आणून दिले.

अग्निचा आवाका किती मोठा असला तरीपण सूर्यास्त होऊन अंधार पडल्यावर सूर्याची हानी निस्तरण्यासाठी वातीच्या टोकावर त्या अग्निचे स्फुल्लिंग ठेवून दिवा लावावा लागतो. त्याप्रमाणे अनंत वेद,

सव्वा लक्ष भारत झाले. भारताचे सार गीतेच्या सातशेहे श्लोकांत आले. व्यासांचा शिष्य जो संजय त्याचा हा जो पूर्णोद्गार आहे तो ह्या सातशेहे श्लोकांच्या गीतेचे तात्पर्य आहे.

ह्या एकाच श्लोकावर जो पूर्ण विश्वास ठेवून राहील त्याने संपूर्ण विद्यामात्राचे स्वरूप हस्तगत केले असे होईल. देवांनी सांगितलेला क्रम ध्यानात ठेवावा आणि ह्या श्लोकावर पूर्ण विश्वास ठेऊन जीवनक्रम चालवावा म्हणजे मोक्ष दूर नाही.

माउली म्हणतात "याप्रमाणे गीतेची पदे सातशेहे श्लोकांना आपल्या अंगी धारण करतात. पण ह्या श्लोकांना श्लोक म्हणावे की गीतारूपी आकाशातील परमामृत म्हणावे? असे वाटते की, आत्मराजाच्या गीतारूपी सभागृहाला हे सातशेहे उत्कृष्ट खांबच उभे केले आहेत. माझ्या प्रतिभेला तरी तसा अनुभव येतो आहे. असे वाटते की, गीता ही सप्तशती आहे. मंत्रांनी प्रतिपादन करण्यास योग्य अशी देवी आहे. ती मोहरूपी महिषासुराचा नाश करून आनंदित झाली आहे. मन, वाणी, शरीर यांच्यायोगे जो कोणी तिचा सेवक होईल त्याला ती स्वानंद साम्राज्याचा सार्वभौम राजा करते. अविद्यारुपी अंधारावर चाल करून एकेक श्लोक सूर्याला पैजेने जिंकतो असे सातशेहे श्लोक श्रीकृष्णराजांनी गीतेच्या मिषाने प्रकट केले आहेत. श्लोकांच्या अक्षररूपी द्राक्षवेलीला गीता मांडव झाली आहे. संसारात शांत झालेल्या वाटसरूंना विसावा घेण्यासाठी हे विश्रान्तिस्थान झाले आहे. श्रीकृष्णसरोवरामध्ये हे श्लोक म्हणजे फुललेली सुंदर कमळे आहेत. भाग्यवान संत भ्रमर होऊन त्या कमळांतील सुगंध सेवन करतात. हे श्लोक नव्हेत, तर गीतेचे महात्म्य वर्णन करणारे भाट, सातशेहे भाट आहेत अशी कल्पना मला सुचते. सातशेहे श्लोकांना भक्कम कोट करून सर्व शास्त्रे या गीतापुरामध्ये रहायला आली आहेत. किंवा हे श्लोक म्हणजे आपला पती जो श्रीकृष्ण त्याला आवडीने भेटण्यासाठी गीतेने पसरलेले बाहूच नव्हे काय? हे श्लोक गीतारूपी कमळातील भुंगे आहेत, गीतारूपी सागरावरचे तरंग आहेत. श्रीहरीच्या गीतारूपी रथाचे हे घोडेच आहेत. अर्जुन हा सिंहस्थ आहे म्हणून श्लोकरूपी तीर्थांचा समुदाय या श्रीगीतारूप गंगेमध्ये आला आहे. हे श्लोक म्हणजे श्लोकांची पंक्ती नव्हे, तर अचिंत्य जे ब्रह्म ते चित्ताला देणारा चिंतामणी आहे किंवा निर्विकल्प ब्रह्माची प्राप्ती करून देणाऱ्या कल्पतरूंची बाग आहे.

असे हे सातशेहे श्लोक आहेत पण एकापेक्षा एकेक वरचढ आहेत. दिवा आधीचा आणि नंतरचा, सूर्य धाकटा आणि वडील, अमृताचा समुद्र खोल आणि उथळ असे भेद कसे करणार? ही तान्ही आहे, ही पारठी आहे असा भेद कामधेनूच्या बाबतीत कसा करता येईल? त्याप्रमाणे हे श्लोक पहिले, हे श्लोक शेवटचे असा भेद गीतेच्या श्लोकाबद्दल कसा करता येईल? पारिजातकाच्या फुलात नवी जुनी असा भेद करता येईल काय? श्लोकामध्ये कमी जास्त योग्यतेचा असे तर म्हणता येतच नाही पण वाच्य, वाचक हा देखील भेद करता येत नाही. कोणताही मनुष्य हे जाणून असतो की, या गीताशास्त्रामध्ये वाच्य आणि वाचक हे श्रीकृष्णच आहेत. इथे अर्थ जाणून घेतला तरी तेच फळ, नुसता पाठ केला तरी तेच फळ मिळते त्याप्रमाणे वाच्य आणि वाचक दोन्ही या शास्त्रात एकच आहेत. म्हणून मला आता समर्थन करण्यास काही विषय राहिला नाही. गीता ही प्रभूंची शब्दमय मूर्तीच आहे एवढेच म्हणतो. अर्थ सांगून इतर शास्त्रे मावळतात तसे हे नव्हे. हे प्रत्यक्ष परब्रह्म आहे.

विश्वावर कृपा करावी ह्या हेतूने देवांनी अर्जुनाचे निमित्त केले आणि महानंद सोपा करून सांगितला. चकोराच्या निमित्ताने संतप्त झालेली पृथ्वी तिन्ही कलानी युक्त असलेल्या चंद्राने निववीली किंवा गौतमासाठी

शंकरांनी कळीकाळरूपी तापाने तप्त झालेल्यांची पीडा नाहीशी करण्याच्या हेतूने गंगेच्या पाण्याचा ओघ जटेतून खाली सोडून दिला. त्याप्रमाणे अर्जुनाला वासरू करून श्रीकृष्णगायीने जगाला पुरेल एवढे दुभते दिले.

इथे गीतारूपी गंगेत स्नान कराल, अर्थ समजून घ्याल तर गीतारूपी ब्रह्मच व्हाल. नुसता पाठ करण्याच्या निमित्ताने जीभ ओली कराल तरीसुद्धा खरोखर तेच फळ मिळेल. लोखंडाच्या एका अंगाने जरी परिसाल स्पर्श केला तरी सगळे लोखंड सुवर्ण होऊन जाते त्याप्रमाणे पाठरूपी वाटीने गीतेचे श्लोक मुखाला लावता न लावता तोच ब्रह्मतेची पुष्टि अंगी येईल. आता गीतेकडे तोंड वाकडे करून कंटाळ्याने पहाल आणि कानावर गीतेची अक्षरे पडतील तरीही तीच फलप्राप्ती होईल. श्रवण करा, पाठ करा, अर्थ समजून घ्या गीता मोक्षाच्या अलीकडचे काही देत नाही. समर्थ दाता कुणालाही "देत नाही" असे म्हणत नाही. ह्या कृष्णार्जुनाच्या संवादरूप शास्त्राचा शहाण्या माणसाने स्वीकार करावा एरवी इतर सगळी शास्त्रे घेऊन काय करावयाची आहेत? हा संवाद व्यासांनी सगळ्यांना हातात घेता येईल इतका सोपा करून ठेवला आहे. लहान मुलाला जेवू घालताना आई त्याला गिळता येतील असे लहान लहान घास करून ठेवते. अफाट वाऱ्याला शहाण्या माणसानी पंखा तयार करून आपल्या स्वाधीन करून ठेवला त्याप्रमाणे जे शब्दाने कधी लाभत नाही ते ब्रह्म अनुष्टुप् छंदामध्ये बसवून स्त्रीशूद्रांच्यासुद्धा समजुतीत उतरेल अशा रीतीने सोपे करून व्यासांनी जगावर उपकार करून ठेवले. स्वाती नक्षत्राचे थेंब जर शिंपल्यात बंदिस्त होऊन मोती झाले नसते तर सुंदर स्त्रियांच्या अंगावर कसे शोभले असते? नाद वाद्यामध्ये आला नसता तर कसा ऐकू आला असता? सुवास फुले झाला नसता तर नाकाला तो कसा घेता आला असता? गोडी पक्वान्ने झाली नसती तर जिभेला कशी घेता आली असती? आरसा समोर नसता तर डोळ्याला डोळा कसा दिसला असता? द्रष्टा जो श्रीगुरूमूर्ती तो जर दृश्य झाला नसता तर उपासनेने कसा स्वाधीन झाला असता? ते न मोजता येणारे ब्रह्म सातशेहे श्लोकांत सामावले गेले नसते तर जगाच्या आटोक्यात कसे आले असते?

मेघ हा जरी समुद्राचेच पाणी धारण करतो आणि वाहून नेतो तरी जगाला मेघच माहीत असतो; समुद्राची ओळख नसते. कारण वाचेला जे प्राप्त होत नाही ते ज्ञान अमर्याद आहे. ते जर ह्या श्लोकातून प्रकट झाले नसते तर ते कानाला, मुखाला कसे लाभले असते? श्रीकृष्णाच्या बोलण्याला व्यासांनी ग्रंथाचा आकार प्राप्त करून दिला हे जगावर केवढे उपकार केले आहेत.

आणि मीही व्यासांची पावले पहात पहात मराठीच्या श्रवणपथावर हा ग्रंथ आणला आहे. अहो, व्यासादिकांचे ज्ञान ज्या गीतेमध्ये भीत भीत वावरते तेथे मी एक रंक बडबड करतो आहे. मनात विश्वास आहे की देव माझी ही पूजा निश्चित स्वीकारील. गीता हा भोळा देव आहे. व्यासोक्तीच्या फुलांच्या माळा जरी त्याच्या गळ्यात रुळत असल्या तरी तो माझा दूर्वादळाचा खासच धिक्कार करणार नाही.

क्षीरसिंधूच्या किनाऱ्यावर पाणी पिण्यासाठी हत्तीचे थवे येतात आणि मनसोक्त जलक्रीडा करतात. पण तेथेच एखादे क्षुद्र चिलटही पाणी पिऊन तृप्त होते. क्षीरसमुद्र त्याला काही नको म्हणत नाही. नुकतेच पंख फुटलेले पाखरू काही आत्मविश्वासाने त्या अनंत आकाशात उडत नाही, स्थिर होत नाही पण उडत असते, झेपावत असते. त्याच आकाशात गरुडहि मुक्त विहार करीत असतो! राजहंस फार सुंदर चालतो अशी जरी

त्याची जगभर ख्याती झाली आणि तसे चालणे इतर कुणाला जमले नाही तरी काय इतरांनी चालणे सोडावेच काय? महाराज आपल्या पोकळीत घागर पाणी भरून घेते, ते पुष्कळ असते, ओंजळीत अगदी थोडे असते पण पाणी भरून घेता येतेच. दिव्याच्या जवळ प्रकाश पुष्कळ असतो पण लहानशी वात आपल्या आकारानुरूप प्रकाश आणतेच ना? आकश जसे समुद्राच्या आकाराएवढे समुद्रात आणि डबक्याच्या आकाराएवढे डबक्यात प्रतिबिंबत होते त्याप्रमाणे त्या न्यायाने व्यासादिकांसारखे विशालबुद्धि या ग्रंथाचे विवरण करण्यास येतात मग आम्ही आपल्या अल्पबुद्धिने या गीताग्रंथाचे विवरण करण्यास बंदी थोडीच आहे? ज्या समुद्रामध्ये मंदार पर्वताच्या आकाराचे प्राणी विहार करतात त्याच समुद्रात शफर नावाचे लहान मासेही पोहताना दिसतातच. अरूण सूर्याच्या अगदी जवळचा म्हणून सूर्याला पाहू शकतो पण पृथ्वीवरची मुंगी सूर्यापासून इतकी दूर आणि आकाराने इतकी लहान असून सूर्याचे दर्शन घेऊ शकतेच. म्हणून आमच्यासारख्या सामान्य लोकांनी गीता मराठीत आणली हे अयोग्य कर्म आहे असे कुणी म्हणू नये. एखादा पिता रस्त्याने निघाला आणि त्याच्या पावलावर नजर ठेवत मागोवा घेत त्याचा बाळ मागून चालत राहिला तर मुक्कामाच्या ठिकाणाला पोचतोच. त्याप्रमाणेच व्यासांचा मागोवा घेत, भाष्यकारांना वाट पुसत मी चालत राहिलो तर अयोग्य असूनही गीतार्थाच्या योग्य ठिकाणी पोचेनच. शिवाय मी एकटा जात नाही. माझ्याबरोबर माझे गुरू श्रीनिवृत्तिनाथ आहेत. ते माझे गुरू काही सामान्य नव्हेत. पृथ्वी त्यांच्याजवळ क्षमा हा गुण शिकली आहे आणि म्हणूनच ती स्थावर जंगम पदार्थ धारण करताना कंटाळत नाही. चंद्रमा त्यांच्याजवळ अमृतवर्षाव करण्याचा गुण शिकला आहे आणि म्हणून तो जगाला निववू शकतो. सूर्याने माझ्या श्रीगुरूंच्याकडून तेजाचा थोडासा अंश मागून घेतला आहे म्हणून तो जगाला व्यापून टाकणाऱ्या अंधाराचा निरास करू शकतो. समुद्राने माझ्या गुरूंची आर्द्रता, पाण्याने मधुरता, आणि माधुर्याने सुंदरता घेतली आहे. वाऱ्याने बळ मागून घेतले, आकाशाने विस्तृतता घेतली आणि ज्ञानाने उज्वलतेचे दान मागितले. पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश ह्यांना त्यांचे त्यांचे गुण माझ्या चक्रवर्ती गुरूंनी प्रदान केले आहेत. वेद त्यांच्यामुळे सुभाष झाले आहेत. सुखाचा त्यांच्यामुळे उत्कर्ष झाला आहे. त्यांच्यायोगे हे विश्व रूपवान झाले आहे. असे माझे सर्व सामर्थ्यशाली गुरूदेव माझ्यामध्ये शिरून क्रिया करीत आहेत. ते माझ्याकरवी गीतार्थ वदवीत आहेत. मग वर वर पहाणाऱ्याला मी जगात मराठी भोषेतून सहज गीता सांगतो आहे यात का आश्चर्य वाटावे? एकलव्याने द्रोणाचार्यांचा मातीचा पुतळा करून धनुर्विद्या हस्तगत केली. चंदनाच्या परिमळाने व्यापलेली झाडे चंदनाच्या योग्यतेची होतात. वसिष्ठांनी सूर्याच्या ऐवजी सूर्याच्या ठिकाणी ठेवलेली छाटी सूर्यासारखा प्रकाश पाडणारी होते. थोरांनी निर्जिवाचा स्वीकार केला असता त्याला एवढी योग्यता येते आणि मी तर चित्ताने संपन्न आहे. त्यात माझ्या श्रीगुरूसारखा मालक मला लाभला आहे. त्यांनी माझ्यावर नुसती कृपादृष्टि टाकली आणि गीतार्थ सांगण्याची योग्यता माझ्यामध्ये आणली. मुळची दृष्टि स्वच्छ असली आणि त्यात सूर्याची मदत मिळाली की मग दिसत नाही अशी कोणती गोष्ट आहे? गुरूकृपेने काय होणार नाही? माझे साधे श्वासोच्छ्वाससुद्धा काव्यग्रंथ होतील आणि म्हणूनच त्या सामर्थ्याच्या जोरावर मी गीतार्थ मराठीत आणला. सर्व लोकांच्या दृष्टिचा तो विषय व्हावा इतका सोपा करून सांगितला आहे. माझ्या मराठी शब्दाच्या अनुरोधाने गीतेचा अर्थ कुणी समजावून घेतला आणि संस्कृत अर्थ सांगणारा कोणी नसला तरी त्या गीतेच्या अर्थात उणेपणा येणार नाही, एकदेशीयत्व येणार नाही. पूर्ण अर्थ कळेल. माझ्या मराठी अर्थाच्या अनुरोधाने संस्कृत गीतेचा अर्थ सांगणारा असला तरी माझी मराठी टीका त्या संस्कृतला खुलविणारा सुंदर दागिना होईल. माझी मराठी टीका नुसतीच जरी कुणी सांगितली तरी ती संस्कृत गीतेवरून अर्थ सांगण्यालाही मागे सारील. अंगच सुंदर असल्यावर दागिना घातला तरी तो शोभतोच. अत्यंत उचितच आहे पण नुसता दागिनासुद्धा शोभतो. त्यात सुंदर अंग आणि त्यावर अमोलिक दागिना चढवलेला असा योग आला तर मग

अनुक्रमणिका

त्यासारखी योग्य गोष्ट आणखी कोणती आहे? मोत्ये उत्तम प्रतीची असली आणि त्यांची सोन्यात गुंफण केली तर ती खुलतातच पण न गुंफली आणि सुटीच पाहिली तरी सुंदर दिसतात. वसंतागमीच्या टपोऱ्या मोगऱ्यांचा हार केला तरी उत्तमच, मोकळीच ठेवली तरी काही शोभेमध्ये किंवा वासामध्ये कमी नव्हेतच. त्याप्रमाणे संस्कृत गीतेसह माझी मराठी टीका सांगितली तर ती शोभा आणीलच पण गीतेच्या संस्कृत श्लोकाशिवाय जरी ओव्या म्हटल्या तरी त्या शोभा दाखवतील असा ओवीबद्ध काव्यग्रंथ मी केला आहे. मुलापासून जाणत्या माणसापर्यंत सर्वांना सहज समजेल अशा ओवी छंदामध्ये ब्रह्मरसाने भरलेली ही अक्षरे मी गुंफली आहेत. आता चंदनाच्या झाडांना सुवासाकरिता फुले येईपर्यंत थांबावे लागत नाही. त्याप्रमाणे हा ग्रंथ नीट कळेपर्यंत वाट बघावी लागत नाही. यातील ओव्या नुसत्या कानावर पडल्या की श्रोत्यांची समाधी लागेल. या ओवीबद्ध टीकेचे व्याख्यान ऐकले की ते व्याख्यान ऐकण्याचे व्यसनच लागेल. माझी टीका वाचावयास लागले की पांडित्याचा प्रकाश पडेल आणि व्याख्यानाची गोडी लागली की अमृताची गोडीसुद्धा स्मरणातून जाईल. सहज प्राप्त झालेले हे कवित्व सर्वांचे विश्रांतिस्थान झाले आहे. आता याच्या श्रवणाने मनन आणि निदिध्यास ह्यांना जिंकले आहे. ही माझी टीका स्वानंदभोगाचा शेलका वाटा आहे आणि तो वाटा कुणालाही मिळतो. श्रवणाकरवी ती टीका सर्वेंद्रियांचे पोषण करील. चंद्राचे चांदणे भोगून चकोर तृप्त होतात खरे पण त्या चांदण्याचा उपभोग वाटेल त्याला मिळतोच.

या अध्यात्मशास्त्रामध्ये अंतर्मुखवृत्ति झालेले अधिकारी असले तरी यातील शब्दचातुर्यानेही लोक सुखी होतीलच. महाराज हा सर्व निवृत्तीनाथांचा गौरव आहे. हा ग्रंथ नव्हे तर श्रीगुरूंच्या कृपेचे हे वैभव आहे. क्षीरसिंधूच्या परिसरामध्ये पार्वतीच्या कर्णगुहेत श्रीशंभुभगवानांनी हे ज्ञान कधी सांगितले हे आम्हाला माहित नाही. पण क्षीरसागराच्या कल्लोळामध्ये मकराच्या उदरात गुप्त असलेल्या मत्स्येंद्रनाथांच्या हाती ते लागले. सप्तशृंगी पर्वतावर मत्स्येंद्रनाथ हातपाय तुटलेल्या अवस्थेत असलेल्या चौरंगीनाथांना भेटले आणि मत्स्येंद्रनाथाच्या कृपेने चौरंगीनाथ सर्वांगांनी संपूर्ण झाले. कुठलाही व्यत्यय न येता समाधी भोगता यावी म्हणून ते वर्म मत्स्येंद्रनाथांनी गोरक्षनाथांना दिले. त्या सर्वेश्वर मत्स्येंद्रनाथांनी योगरूपी कमळाचे सरोवर व विषयांचा नाश करण्यात शूर असे जे गोरक्षनाथ त्यांना समाधिपदाचे ठिकाणी अभिषेक केला. मग त्यांनी ते शंकरापासून परंपरेने प्राप्त झालेले ते अद्वैतानंद वैभव असे शांभवज्ञान ऐश्वर्य वाणि सामर्थ्य यांच्यासह गहिनीनाथांना दिले.

भूतांना गिळण्यासाठी कलियुग जवळ आलेले पाहून निवृत्तीनाथांना गहिनीनाथांनी आज्ञा केली की, “आदिगुरू शंकरापासून आपली शिष्य परंपरा सुरू झाली आणि बोधाचा लाभ आमच्यापर्यंत आला तो बोध आता आम्ही तुझ्या स्वाधीन करतो. तू तो घे आणि कली आता जीवांना गिळायला आला आहे त्यांना वाचव, सर्व संकटातून त्यांना वाचव.”

माझे गुरू आधीच अत्यंत कृपाळू. त्यात गुर्वाज्ञेचे हे बोल त्याच्या कानावर पडले. मग काय? वर्षाकाळचे मेघ खवळून उठावे तशी अवस्था झाली. मग पीडितांना शांत करण्यासाठी त्यांची दया येऊन निवृत्तीनाथांनी जी शांतरसाची वृष्टि केली तोच हा माझा गीतेवरील टीकारूप ग्रंथ आहे. मी चातकासारखा आर्त होऊन माझ्या श्रीगुरूंच्या पुढे उभा राहिलो. त्यांनी माझ्यावर कृपादृष्टि टाकली आणि वृष्टि करून सगळे जग तृप्त करून सोडले. त्या कृपादृष्टिने हा माझा ग्रंथ पुरा झाल्याचे यश मला मिळाले. नाहीतर ग्रंथ लिहिण्याची माझी योग्यताच नाही. मी शिकलो नाही, काही वाचले नाही, श्रीगुरूंची सेवाही माझ्या हातून काही झाली नाही पण

गुरूक्रमाने आलेले समाधिधन बांधून माझ्या गुरूंनी माझ्या हातात दिले आणि ह्या ग्रंथरचनेची योग्यता मला प्राप्त झाली.

काय सांगावे, खरोखरच श्रीगुरूंनी माझे निमित्त करून ह्या काव्यग्रंथाने ह्या जगाचे रक्षण केले. यजमानाचा पुरोहित जसा यज्ञकर्माचे कर्तेपण आपल्याकडे घेऊन बोलतो तसा मी बोललो याची मला आपण क्षमा करा. सज्जन हो, आपण माझी आई अहा. आईसारखेच आपण क्षमाशील अहा. मी हात जोडून विनवितो की माझ्या अपराधाची क्षमा करा.

शब्द कसा घडवावा, प्रमेय कसे मांडावे, अलंकार कशाला म्हणावे हे मी काहीही जाणत नाही. सूत्रधाराचे बाहुले जसे त्या त्या सूत्राच्या स्वाधीन असते आणि सूत्र हालेल तसे हालते त्याप्रमाणे माझे स्वामी मला जसे बोलावतील तसा मी बोलतो आहे. तो जो जो अभिप्राय दाखविल तो तो व्यक्त करतो आहे म्हणून या ग्रंथातील गुणदोषाबद्दल मी आपली विशेष काही क्षमा मागत नाही. ग्रंथ माझा नव्हेच. माझ्या गुरूंनी उत्पन्न केलेल्या ग्रंथाची मी रचना केलेली आहे.

आपणा संतांच्या सभेत उभे राहूनसुद्धा जर काही उणीव राहिली, ती भरून निघाली नाही तर मला उलट आपल्यावरच रागावता येईल. परिसाचा स्पर्श होऊनसुद्धा जर लोहत्वाच्या अवदशेला लोखंड मुकले नाहीतर तो दोष कुणाकडे जातो? ओहळाने एवढेच करावयाचे की गंगेच्या पात्रात स्वतःला झोकून द्यावयाचे. आता तरीही त्या ओहळाची गंगा झाली नाही तर त्या ओहळाने काय करावे बरे! मोठ्या भाग्याच्या जोरावर मी तुम्हा संतांच्या पायशी आलो आहे. आता मला काय कमी आहे? अहो महाराज, माझ्या स्वामींनी मला तुम्हा संतांची जोड करून दिली आहे आता माझे सगळे मनोरथ परिपूर्ण झाले आहेत. पहा महाराज, मला आपल्यासारखे माहेर मिळाले आणि त्यामुळे ग्रंथरचनेचा माझा हट्ट सिद्धीस गेला.

सगळे भूमंडळ सोन्याचे करणे सोपे आहे. चिंतामणीचे डोंगरसुद्धा रचता येतील. साती समुद्र अमृताने भरणे शक्य होईल. तारा एकत्र करून त्यातून चंद्र घडविणेसुद्धा इतके अवघड नव्हे. कल्पवृक्षाचा बागसुद्धा लावता येईल. त्यात काही अडचण नाही परंतु गीतार्थाचे वर्म हाती येणे हे खरोखरच फार कठीण आहे. मी अज्ञानी असल्याने एक प्रकारे मुकाच आहे पण गीतार्थ मराठी भाषेत सांगीन आणि तोही सर्व लोकांच्या डोळ्यांना स्पष्ट दिसेल असा सोपा करून सांगीन असे म्हणत होतो. तो एवढा अफाट ग्रंथरूपी सागर उतरून पलीकडे गेल्याचा कीर्तीविजयाचा धेंडा नाचतो आहे. गीतार्थाच्या आवारामध्ये अठराव्या अध्यायरूपी कळसासह महामेरू पर्वत तयार करून त्या ठिकाणी श्रीगुरूमूर्तिरूपी शिवपिंडीची पूजा करतो आहे. गीतारूपी निष्कपट आईची आणि मज लेकराची चुकामूक होऊन मी संसाररूपी अरण्यात व्यर्थ सैरावैरा हिंडत होतो. आपण सज्जनांनी आपल्या पुण्याईच्या जोरावर आम्हा मायलेकरांची भेट घडवून आणली. महाराज, आपण सज्जनांनी हे जे काही धर्मकृत्य केले आहे ते समजूनच मी बोलतो आहे. हेसुद्धा काही कमी नव्हे. मी ज्ञानदेव म्हणतो, फार काय सांगू? आपण हा जो ग्रंथसिद्धीचा सोहळा दाखविला त्या योगाने माझ्या जन्माचे सार्थक झाले.

महाराज, मी जितका आपला भरवसा धरला होता तितका तितका पूर्ण करून आपण मला अत्यंत सुखी केले आहे. माझ्यासाठी आपण ग्रंथाची जी ही दुसरी सृष्टि रचली ती पाहून आम्ही त्या विश्वामित्राला हसतो

आहो. मूळची सृष्टि असून ब्रह्मदेवाला कमीपणा आणण्यासाठी विश्वामित्रांनी जी सृष्टि निर्माण केली ती नाशवंत होती. आपण निर्माण केलेली ही ग्रंथसृष्टि तशी नाश पावणारी नव्हे. शंकराने उपमन्यूसाठी क्षीरसागर केला. पण त्याची उपमासुद्धा ह्या आपल्या ग्रंथाला देता येत नाही. कारण समुद्राच्या पोटात विष आहे. अंधःकार चराचराला गिळू लागल्यावर सूर्य त्या त्रैलोक्याच्या मदतीला धावला खरा पण त्याच्या चंड किरणांचा जगाला ताप होतो. मग त्या सूर्याची उपमा आपल्याला कशी द्यावी? तापलेल्या जगाने चंद्राची प्रार्थना केली म्हणून चंद्राने आपल्या चांदण्याचा वर्षाव करून जगाचा ताप हरण केला हे खरे आहे पण त्या चंद्रावर कलंक आहे. त्याची उपमा आपल्या ह्या ग्रंथरचनेच्या उपकारास कशी द्यावी? म्हणून म्हणतो की आपण संतांनी माझ्यावर हा जो ग्रंथरचनेचा उपकार केला तो केवळ निरुपम आहे. त्याला दुसरी तोड नाही.

किंबहुना महाराज, आपण केलेले हे धर्मकीर्तन सिद्धीस गेले आहे, नव्हे ते आपणच सिद्धीस नेले आहे. आता माझ्याजवळ फक्त आपले सेवकपण शिल्लक राहिले आहे. ते सेवकपण तसेच राहील असे आपण म्हणा म्हणजे झाले. दुसरे आपल्या पायापाशी काय मागू? आपली माझ्यावर अशीच अखंड कृपा राहू दे. समर्थांनी एकदा आपला म्हटला की ते त्याचा कधीही त्याग करीत नाहीत. सर्वतोपरी त्याचा सांभाळ करीत नेतात. आपण समर्थ अहा. आजवर जशी सेवा करून घेतलीत तशीच करून घ्या. यावेगळे मागणे नाही. भगवन् आपण म्हणता की मी प्रसन्न आहे. काही तरी माग. देवा मी काय मागावे हे देखील आपणच मला सांगा. त्या आपणा हृदयस्थ परमात्म्याचे स्मरण करतो आणि मी मागणे मागतो की—

देवा, आपण ह्या अणुरेणूमध्ये अहा. सगळे जग आपण भरून टाकले आहे. माझ्या ह्या वाग्यज्ञाने आपण संतुष्ट व्हावे आणि मी मागतो ह्या प्रसादाचे दान द्यावे. देवा, ज्यांना जगात दुष्ट म्हटले जाते, कुटिल म्हटले जाते त्यांच्याही हृदयात आपण अहातच ना? मग त्या अंतःकरणात प्रकट व्हा. आपण प्रकट झाला की त्यांच्या स्वभावातली कुटिलता, वाकुडपणा आपोआपच जाईल आणि त्यांना सत्कर्म म्हणजे काय हे कळू लागेल, विहित कर्माचा मार्ग स्पष्ट दिसू लागेल. देवा एकदा अमृताची चव कळली की मग दुसरा पदार्थ कुणालाही कसा आवडेल? सत्कर्म करावे असेच त्यांना वाटू लागेल. सत्कर्म करता करता जीवाजीवामधली मैत्री वाढेल आणि पापाचा अंधःकार जाईल. स्वधर्मसूर्याचा उदय झाल्यावर तिथे पाप राहीलच कसे? स्वधर्माचा राजरस्ता दिसू लागला की जीवाच्या अंतःकरणात शुभेच्छाच उदयाला येतील आणि महाराज अशा जीवांच्या शुभेच्छा सर्वच्या सर्व आपण पुऱ्या कराव्या. सर्व मंगलाचा वर्षाव करणारे ईश्वरनिष्ठांचे समुदाय जीवांना भेटू देत. हे संतसज्जन कल्पतरूंचे चालतेबोलते बागच आहेत. चेतन चिंतामणीचे गाव आहेत. अमृताचे बोलके सागर आहेत. तापहीन असे चंडप्रतापी असे सूर्य आहेत. कलंकरहित चंद्रमे आहेत. हे सज्जन जीवांचे सोयरे होऊ देत. किंबहुना तीन्ही लोकांना सर्व सुखाची प्राप्ती व्हावी. त्यांनी आदिपुरुषाची अखंडपणे भक्ति करावी. देवा, ज्यांना हा ग्रंथ जीव की प्राण वाटतो त्यांना आपण इहलोकींच्या आणि परलोकींच्या भोगावर विजयी करावे.

"आपल्या शुभचरणावर मस्तक ठेवून देवा, एवढे पसायदान मागतो आहे."

देवांनी माझी ही विनवणी ऐकली आणि विश्वेशराव असा तो भगवंत मोठ्या प्रसन्नतेने "ठीक आहे. तसेच होईल" असे म्हणाला. देवांचे हे वरप्रदान ऐकून ज्ञानदेव अत्यंत संतुष्ट झाले.

याप्रमाणे कलियुगामध्ये महाराष्ट्र देशात गोदावरीच्या दक्षिण तीरावर त्रैलोक्यामध्ये पावन म्हणून गाजलेले पाच कोसाचे एक अनादि क्षेत्र आहे. तिथे जगाचे जीवनसूत्र चालवणाऱ्या श्रीमोहिनीराजाचे देऊळ आहे. या भूभागावर यादव कुलभूषण सर्व कलांचे जणू निवासस्थानच अशा न्यायाने राज्य चालविणाऱ्या श्रीरामचंद्रराजाचे आधिपत्य आहे.

प्रत्यक्ष शंकरांच्या परंपरेतील श्रीनिवृत्तिनाथ शिष्य ज्ञानदेव याने या क्षेत्री हे मराठी भाषेचे लेणे गीतेवर चढविले. श्रीमहाभारतामध्ये भीष्मपर्व प्रसिद्ध आहे. त्या भीष्मपर्वामध्ये श्रीकृष्णार्जुनांचा हा संवाद आहे. ती ही गीता!

ही गीता सर्व उपनिषदांचे सार आहे. सर्व शास्त्रांचे माहेर आहे. या सरोवरामध्ये परमहंस विहार करीत असतात. गीतेचा हा अठरावा अध्याय म्हणजे गीतामंदिराचा कळसच आहे असे मी निवृत्तिदास ज्ञानदेव म्हणतो.

या ग्रंथाच्या पुण्यसंपत्तीने सर्व भूतांना उत्तरोत्तर सर्व सुखाचा लाभ होऊ दे. शके बाराशेहे बारोत्तरें ज्ञानेश्वरांनी ही टीका लिहिली. सच्चिदानंदबाबा अत्यंत आदराने लेखक झाले.

"श्रीकृष्णार्पणमस्तु ।"

***

अनुक्रमणिका

॥ श्री ॥

मालूताई, ८ मे १९८४, वैशाख शुद्ध अष्टमी शके १९०६ दुर्गाष्टमी मंगळवार रोजी सकाळी लेखन पुरे झाले. दोन दिवसापासून वाटत होते की आता काय शंभर ओव्या राहिल्या. आता दोन दिवसांनी लेखन पुरे होईल. लेखन पुरे झाले की आळंदी, पावस इथे जाईन आणि ज्याचे त्याला अर्पण करून पायावर डोके ठेवीन.

पण मनातून सारखे वाटे ८ मे रोजी दुर्गाष्टमी आहे त्या दिवशी लेखन पुरे झाले तर ते घेण्यासाठी स्वामी कुणाला तरी पाठवतील काय? १३ मे ते १६ मे पुळ्यास जावे असाही विचार येतो आहे पण पुन्हा पुन्हा वाटे की हे लेखन हाती घेण्यासाठी स्वामींनी कुणाला तरी पाठवावे. एकही क्षण असे मनात आले नाही की हे लेखन आपण करतो आहो. स्वामी स्वरूपानंदांचे स्मरण करावे आणि लेखणी उचलावी, की १९५६ मध्ये एम. ए. च्या अभ्यासासाठीसुद्धा ज्या गतीने लेखणी चालत नव्हती त्या गतीने चालू लागते. अर्थ, क्रम सुचत जातात. अपूर्व आनंद होतो आणि भगवान् श्रीकृष्णाचे सुंदर रूप उजव्या अंगास उभे आहे असे दर्शन व्हावे असा हा स्वामींचा कृपाप्रसाद झाला. मग माझा हा हट्ट स्वामी पुरवतील काय? एवढी तसदी घेतील काय? पुन्हा वाटे आपण प्रार्थना केली आहे. स्वामींना प्रार्थना होत असतानाच पोचत जाते असा आपल्याला अनुभव आहेच मग शंका का घ्यावी? पण तरीही अशक्य वाटे.

पूज्य अमलानंद येणार आहेत पण त्यांची आपली चुकामूकच होणार असेच वाटले. तेव्हा “श्रीकृष्णार्पणमस्तु” असे नुसते लिहिले नाही तर मनाने पूर्णतया समर्पण केले.

हे कागद कोणाच्या हाती द्यावे ही रुखरुख मात्र मनातून होतीच.

७ मेलाच लेखन पूर्ण झाले असते. पण गोड घास मागे ठेवावा त्याप्रमाणे पसायदान दुर्गाष्टमीसाठी मागे ठेवले. अशा मनःस्थितीत सुधाताई जोशींचा फोन आला. त्यांनी विचारले, “मग काय कुठवर आले लेखन?”

मी म्हटलं “आताच—

**‘यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।**
**तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ॥’** (अ. १८-श्लो. ७८)

हे लिहून उठले आहे. काय म्हणता?”

त्या म्हणाल्या, “मी म. अ. कुलकर्ण्यांच्या घरून बोलते आहे. अमलानंदांना घेऊन आज म. अ. इथे येणार आणि कागलला जाणार. आपण जाऊ या का?” मनात विचार आला कोल्हापूरला दर्शनास फार गर्दी होते असे ऐकले आहे तेव्हा कागलला गेलो तर निवांत भेट होईल. ह्यांना विचारल्यावर हे म्हणाले, “जाऊं या.” संध्याकाळी लवकर परत यायला हवे या दृष्टिने दोनला निघू या असे ठरविले आणि सुधाताईंना फोन केला. त्या

म्हणाल्या, “सुरेखाताई इथेच आहेत त्यांना फोन देते.” सुरेखाताई म्हणाल्या, “मी मामांना तुमच्या लेखनाबद्दल बोलले आहे.” मी म्हटलं, “आपण सगळेच अध्याय नेऊ या का? आपण आपल्याजवळचे घ्या, मी माझ्याजवळ पंधरा, सोळा व अठरा आहेत ते घेते. मामांच्या हातात देऊन त्यांचा आशीर्वाद घेऊ या उद्या.”

आणि मग मंगळवारी पहाटे उठून अठरावा अध्याय पूर्ण केला. उपासच होता. फराळ करून थोडी विश्रांती घेतली आणि २-३० ला निघालो. आम्ही दोघे, सुधाताई, वहिनीसाहेब सुर्वे, अक्का शिरगांवकर व सुरेखाताई कुलकर्णी अशी मंडळी निघालो. मामा विश्रांती घेत होते. म. अ. नी स्वागत केले आणि आत नेले. डॉ. बेडकीहाळ ह्यांनी आपल्या नव्या घराचे नावच अमलकुटी ठेवले आहे. सुरेख घर बांधले आहे. थोड्याच वेळात मामांच्या खोलीचे दार उघडले. आम्ही सगळ्याजणी, सरकार, म. अ. वगैरे मंडळी आत गेलो. मामांची ती तेजःपुंज, वयोवृद्ध व आनंदाने ओसंडून जाणारी मूर्ती दृष्टिस पडल्याबरोबर आनंद वाटला. अक्का, मी वहिनीसाहेब, सुधाताई अशा ओळीने बसलो होतो. अक्का म्हणाल्या, “मला दिसत नाही.”

मामा हसून म्हणाले, “मलाही दिसत नाही. आपण एका बोटीचे प्रवासी झालो.” आणि असे म्हणून त्यांनी पुन्हा प्रसन्न हास्य केले.

मग आमच्या सखीमंडळाची चौकशी केली आणि प्रशंसा करून माझ्याकडे हात करून मामा म्हणाले, “चांगले काम चालविले आहे. असे एकोप्याने, प्रेमाने चाललेले कार्य बघून आनंद वाटतो. छान आहे. तुम्ही एकमेकीवर किती प्रेम करता! कधी जमता? काय काय करता?”

सुधाताई मला म्हणाल्या, “आपण मामांच्या पुढे सरकून बसा म्हणजे ऐकायला येईल.”

मी गादीच्या खाली सतरंजीवर मामांच्या समोर बसल्याबरोबर मामा तरुणाच्या चपळाईने पलंगावरुन उतरले. माझ्यासमोर बसले आणि म्हणाले, “हे बरे. मीच तुमच्यात येऊन बसतो.”

मग म. अ. नी ज्ञानेश्वरीचा विषय काढला. मामा म्हणाले, “आणली आहे काय बरोबर?” म्हटलं. “हो आणली आहे.”

सुरेखाताईंनी बॅगेतून हस्तलिखित बाहेर काढले व मामांच्या पुढे ठेवले. मामांनी ते उचलून हातात घेतले आणि म्हटले, “अहो, हे बरेच लिहिले आहे की, चांगलाच मोठा ग्रंथ होईल हा.” मग म. अ. कडे वळून त्यांनी विचारले, “किती पाने होतील?” म. अ. म्हणाले, “पाचशेहे पाने तरी निश्चितच होतील. बंदावर लिहिले आहे.”

मामा मला म्हणाले, “मग काय हा छापायचा विचार आहे?”

मी म्हटले, “नाही मामा. छापण्याची उपाधी मागे लावून घ्यायची नाही. मी माझ्या आनंदासाठी लिहिले आहे. मला तो मिळाला.”

अनुक्रमणिका

मामा म्हणाले, "ज्ञानेश्वरांनी जे लिहिले तेही स्वतःच्या आनंदासाठीच होते. आपल्या आनंदातच जगाला आनंद मिळतो. हे सगळ्यांच्यापर्यंत जायला पाहिजे."

मी म्हटले, "मामा तो व्याप कोण करणार? छापायचे असा विचार नाही."

मामा समजावून देत म्हणाले, "आपण असे म्हणूच नये. बरं, जरा परीक्षा पाहू या, तुम्ही काय लिहिले आहे त्याची. म. अ. काढ बरं एखादा त्यातला भाग वाचायला. पण मला सांगा तुम्ही हे लिहिताना पांडित्य प्रकट करायला लिहिले की मी लिहिते या अहंभावातून लिहिले?"

मी म्हटले, "पांडित्य तर प्रकट करायला मजजवळच नाही आणि मी लिहिले असा भाव चुकूनही मनात आला नाही. सूचत गेले ते लिहीत गेले, आधार सापडत गेले, गोष्टी मिळत गेल्या आणि आनंद वाढत गेला."

मामांनी नुसती मान डोलावली. ज्ञानेश्वरीच्या वह्यांची चवड समोरच होती. स्वामींना त्यांनी वंदन केले, क्षणभर ध्यान केले आणि त्या चवडीपैकी एक वही काढली. पुन्हा एकदा डोळे मिटले आणि वही उघडून म. अ. ना दिली आणि म्हणाले, "वाच हे."

ती सातव्या अध्यायाची अखेर होती. ज्ञानी पुरुषांना माया दिसते काय हा विषय होता. दोन-तीन गोष्टी आल्याबरोबर मामांनी हसून अनुकूल अभिप्राय व्यक्त केला. "छान छान आहे" म्हणाले. सातव्या अध्यायाची पाने वाचून झाल्यावर म. अ. ना म्हणाले, "पुरे आता" आणि माझ्याकडे वळून प्रश्न विचारायला सुरवात केली.

"कुणाचे स्मरण करून लिहायला बसता?"

मी म्हटले, "स्वामी स्वरूपानंदांचे. त्यांची करुणा भाकते, स्वामी बळ द्या म्हणते आणि लिहायला सुरवात करते."

अमलानंदानी हात जोडले, गुडघे टेकले, त्या वह्यांच्या चळतीवर डोके ठेवले. ती चळत उचलली आणि माझ्या हातात दिली. सद्‍गदित होऊन पुढे म्हणाले, "बाई, हे स्वामींचे देणे आहे. याची कोण किंमत करणार? छापले तर तीन खंडांची किंमत एकशेहेवीस रुपये होईल. तुम्ही ज्या भावातून हे लिहिले आहे त्या भावात जो जाऊ शकेल त्याला ती कळेल पण याची खरी किंमत स्वरुपानंद ही आहे."

माझ्याही डोळ्यात अश्रू उभे राहिले. वह्या बाजूस ठेवल्या आणि मामांच्या पायावर डोके ठेवले. त्यांनी मोठ्या प्रेमाने दोन्ही हात डोक्यावर ठेवले, आणि म्हणाले, "चालू दे चालू दे. उत्तम काम झाले आहे यावर टीका होईल. पण आपण त्या टीकेला जुमानायचे नाही. लोकांना काही म्हणून दे. कावळ्याची दृष्टि व्रणावरच असायची. आपण आनंदात असावयाचे."

अनुक्रमणिका

“बरं हे लिहिताना त्रास किती झाला? काम मोठे आहे.”

मी सांगितले, “काहीही त्रास नाही. पाठ दुखते आहे त्याचे भानही नसे. चार चार तास झपाट्याने लिहून होत असे. लेखनाची स्पीड पाहून माझे मलाच आश्चर्य वाटे की ही गती कोठून येते आहे! कंटाळा नाही, दमणूक नाही. काहीही नाही.”

मामांनी पुढे विचारले, “बरं, अस कधी झालं का की हा अर्थ असा घालावा की तसा घालावा? चिंतन म्हणता अहा म्हणून विचारतो.”

मी म्हटले, “नाही असे सहसा घडले. अर्थ कुणी सांगावा तसा समजत गेला. जसा समजला तसा लिहिला.”

मामा म्हणाले, “ही मुसलमानाची गोष्ट तुम्ही यात घेतली म्हणूनसुद्धा लोक तुम्हाला नावे ठेवतील. आपण लक्ष द्यायचे नाही. बोध झाल्याशी कारण. बाकीचे घेऊन काय करावयाचे आहे आपल्याला. बरं काही काव्यशक्ति आहे काय? कविता वगैरे स्फुरल्या काय कधी?”

मी म्हटले, “हो. या लेखनामध्ये काही कविता घातल्या आहेत. ऑपरेशनच्यावेळी पाठीचे दुःख सोसेना, झोप येईना, तेव्हा स्वामी स्वरूपानंदांची प्रार्थना केली की आपण चाळीस वर्षे देह दुःख सोसले, बिछान्यात काढली. मला आपली ताकद थोडी द्या म्हणजे मी हे दुखणे सोशीन. येणाऱ्या मंडळींना माझे दुखणे पाहून वाईट वाटू नये अशी इच्छा आहे.”

मामांनी विचारले, “मग काय झाले?”

मी कृतज्ञतापूर्वक पुन्हा स्मरण करून म्हटले, “स्वामींनी काव्यस्फूर्ती दिली. सगळे दुखणे या काव्यस्फूर्तीच्या जोरावर मी सोसू शकले. वळता येत नव्हते, लिहिता येत नव्हते तर सगळ्या कविता मुलींनी लिहून घेतल्या. येणारी मंडळी दुखण्याची चौकशी करीत, प्रथम पण लगेच विचारीत आज काय नवीन कविता?”

मामा म. अ. ना म्हणाले, “म. अ. काढ बरं एखादी यातली कविता. त्या कवितेच्या क्वालिटीवरून मला पुष्कळ काही कळेल.”

म. अ. नी कविता काढली. ती होती–
अशीच देई काया।
सर्वांगाने लगटुनि राहिल सदैव तुझिया पाया।
मामा मला म्हणाले, “हं तुम्हीच वाचा.”

अनुक्रमणिका

मी कवितेची पार्श्वभूमी वाचली आणि कवितेची कडवी वाचायला सुरवात केली. सर्वांकडून दाद मिळत होती. मामा तर डोलत होते. कविता संपल्यावर म्हणाले, "अहो ही उच्च दर्जाची अवस्था आहे. ब्रह्मवस्तूचा स्पर्श आहे याला, चांगली आहे फार कविता. स्वामींच्या अमृत धारेत संजीवनी गाथेत असेच उल्लेख आहेत."

मामांनी नंतर स्वामी स्वरूपानंदांच्या आठवणी सांगितल्या आणि मग म्हणाले, "आता ह्या वह्यांचे काय करणार? पावसला नेणार?"

मी म्हटले, "मामा मला पावस इथेच भेटले आहे. काम इथेच झाले. आता कशाला पावसला जाऊ? माझ्याशी देव तिथे असा बोलणार आहे काय?"

मग मात्र मामा खरेच फार आनंदित झाले. म्हणाले, "हा भाव आहे ना? झाले तर, पण आता यापुढे अभ्यास आणि प्रेम एव्हढेच करावयाचे. आणि हे बघा हे काम लोकांसाठी झाले. पण आपले काय? तेव्हा अंतःकरण भरून प्रेम द्यायचे. आनंदात रहायचे. मी ज्येष्ठ गुरूबंधू म्हणजे गुरूसमान, गुरू नव्हे-तेव्हा आशीर्वाद देतो. मात्र हे काम म्हणजे शेवट नव्हे ही सुरवात आहे. काव्यस्फूर्ति होईल. कितीतरी काम स्वामी करून घेतील. फक्त अहंभाव घ्यायचा नाही. त्यांना सगळी काळजी आहे. राज्ये गेली जाऊ देत. आपले खरे वैभव हे आहे. हे कोणी काढून घेऊ शकत नाही." पुढे सरकारांच्याकडे पाहून म्हणाले, "आधार विसरायचा नाही. वेलीला सुगंधित फुले येतात ती वरवर जाते पण तिला वृक्षाचा आधार असतो, म्हणून ती असते. नाथपंथात शक्तिला फार महत्त्व आहे, पण ती शक्ति शिवाच्या आधाराने असते तेव्हा त्या आधाराकडे पहायचे." मग दोघांच्याकडे पहात म्हणाले, "अहो, हे केवढे भाग्य आहे. तुमचे गुरू स्वरूपानंद. आम्ही सगळे त्या पाण्यावरचे बुडबुडे आहोत, त्यांनी शक्ति काढून घेतली की संपले. तेव्हा हे ध्यानात ठेवून चालायचे. आमचे गुरू स्वरुपानंद आणि स्वरूपानंदांचे गुरू आदिनाथ शिव. तेव्हा परंपरा ही अशी आहे.

स्वामींना द्विरुक्ती आवडत नसे. ते म्हणायचे, "आमचा मंत्र सोहंसः सोहंहंसः नाही. सोहंसः जलद गतीने म्हटले की स ह जाऊन ओं रहातो. तो आपला मंत्र. देवानी अठरा अध्याय गीता सांगितली. पण ॐ मित्याक्षर ब्रह्म एवढेच सांगितले. एकोणिसाव्या अध्यायात म्हणजे उत्तर गीतेमध्ये ॐ कार रहस्य समजावून सांगितले. तेव्हा उत्तर गीता वाचली पाहिजे. मात्र आपल्याला पांडित्य, शब्दच्छल, व्युत्पत्ति यात अडकायचे नाही."

तुम्ही कुणाला सांगत नाही पण तुम्हाला ज्ञानेश्वरांचे दर्शन झाले आहे. मला झाले आहे आणि मला ज्या रूपात झाले त्याच रूपात अण्णासाहेब रुकडीकरांना झाले होते. मी त्यांचाकडे गेलो तेव्हा त्यांना विचारले की, "हे कसे चित्र?" तर ते म्हणाले, "मला जसे दर्शन झाले तसे चित्र मी काढून घेतले." माझे आणि त्यांचे दर्शन एकच. तेव्हा आपल्याला जो अनुभव आला तो आणखी कुणाला तरी आला तरच तो खरा मानावा. नाही तर खोटा. कुणी माझ्यापुरते दिसले, कळले म्हटले तर ते खोटे आहे असे समजावे. तेव्हा फार आनंद झाला हे वाचून."

मग मामांनी नारळ, पेढे यांचा प्रसाद दिला. काजूची निम्मी वडी आपल्या हातात व निम्मी मामींच्या हातात दिली.

“हं मामी, वडी घाल त्यांच्या तोंडात.” असे सांगितले. त्या दोघांचा त्या वृद्ध दंपतीचा प्रसाद असा मिळाला आणि मालूताई आम्ही धन्य झालो.

अमलानंद स्वामींच्या पायावर डोके ठेवले ते उचलावेसे वाटेना. लेखन पूर्ण झाले ते स्वामी स्वरूपानंदांनीच उचलून घेऊन शाबासकी दिली आणि आशीर्वाद देत माझ्या हातात दिले असेच वाटले.

आणि मग मनोमन स्वामी प्रज्ञानंद म. अ. कुलकर्णी यांना वंदन केले. वयाने लहान असलेल्या ह्या बाळाने किती पल्ला गाठला आहे. दुसरा अध्याय थोडासा लिहून झाला होता तो त्यांनी मलकापुरास वाचला आणि खूप प्रोत्साहन दिले, “आत्मकथेचा रंग घेऊन हे जसे येते आहे तसेच येऊ दे. ओघ उत्तम आहे. स्वामी स्वरूपानंदांची कृपा वाक्या वाक्यात जाणवते आहे. जरूर लिहा. स्वामी नक्की पुरे करून घेतील.” असे त्यांनी वेळोवेळी म्हटले. म्हणूनच केवळ हे लिखाण माझ्या हातून झाले. एरवी शक्य नव्हते. आत्मविश्वासच वाटत नव्हता.

ह्या प्रज्ञानंदांनी खरोखरच माझी प्रज्ञा जिवंत ठेवली, सगळी मरगळ काढून टाकली आणि “स्वामींची कृपा” असे मी जी भीत भीत म्हणत होते ती आत्मविश्वासाने म्हणू लागले की ज्यांनी—

> “ज्ञानेश्वरी वाच. एका ग्रंथाची कास धरांवी” अशी आज्ञा केली.
>
> “वाचन बरोबर चालू आहे” असा तुम्हाला निरोप आहे असा स्वप्नदृष्टांत दिला.
>
> “ज्यांनी शंभर पारायणे झाल्यावर आळंदीस जाता आले नाही तर गोरक्ष मठातून अंगारा व प्रसाद पोचता केला.”
>
> “ज्यांनी प्रवचन समाप्तीला प्रसादपुष्प दिले त्यांनीच-स्वामी स्वरूपानंदांनीच माझ्याकडून हा ज्ञानेश्वरीचा अर्थ लिहून घेतला” आणि ज्या दिवशी लेखन पूर्ण झाले त्या दिवशी ते लेखन स्वामी अमलानंदांच्या रूपाने प्रत्यक्ष हातात घेऊन आशीर्वाद दिला की—
>
> “ही कामाची सुरवात आहे. शेवट नव्हे.” पण हे सगळे घडले प्रज्ञानंदांच्या उत्तेजनामुळे म्हणून वयाने कितीतरी लहान असलेल्या ह्या बाळाला शतशः नमस्कार.

मालूताई, आपण मला ह्या लेखनाला प्रवृत्त केले. “लिहून पाठवा, आम्ही वाचू” असे आपण म्हटले म्हणूनच माझ्या हातून हे सगळे लेखन झाले. तेव्हा ते पूर्ण लेखन आपल्या हाती देऊन मी मोकळी झाले आहे.

अनुक्रमणिका

आपले आभार कसे मानावे? आभार मानले की ऋणमुक्त होण्यासारखे हे ऋण नव्हे तेव्हा असाच लोभ ठेवावा ही विनंती.

अशीच काही नवी प्रेरणा यावी आणि नवे काम स्वामी स्वरुपानंदांनी करून घ्यावे एवढीच त्यांच्याजवळ प्रार्थना करते.

कळावे, लोभ असावा, ही विनंती.

आपली,
**सौ. शैलजादेवी पंतप्रतिनिधि,**
राजवाडा, मलकापूर.

अनुक्रमणिका

॥ श्री ॥

## पसायदान

आतां विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें  तोषावें ।
तोषोनि मज द्यावें । पसायदान हें ॥

जें खळाची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो ।
भूतां परस्परें पडो । मैत्र जीवाचे ॥

दुरितांचें तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्ये पाहो ।
जो जें वांछील तो तें लाहो । प्राणिजात ॥

वर्षत सकळ मंगळीं । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ।
अनवरत भूमंडळी । भेटतु भूता ॥

चला कल्पतरूंचे आरव । चेतना चिंतामणीचे गांव ।
बोलते जें अंर्णव । पीयूषाचे ॥

चंद्रमे जें अलांछन । मार्तंड जें तापहीन ।
जें सर्वांही सदा सज्ञन । सोयरें होतु ॥

किंबहुना सर्वसुखी । पूर्ण होऊनि तिहीं लोकीं ।
भजिजो आदिपुरुखी । अखंडित ॥


आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं इये ।
दृष्टादृष्ट विजये । होआवें जी ॥

येथ म्हणे श्रीविश्वेशरावो । हा होईल दान पसावो ।
येणें वरें ज्ञानदेवो । सुखिया झाला ॥

अनुक्रमणिका

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर

अनुक्रमणिका



अनुक्रमणिका